धुळे महानगरपालिका,धुळे

दि.०२ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत सभागृह,धुळे
शनिवार दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१९
वेळ दुपारी ४-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क)(ड) व (ह) अन्वये मा.महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज **शनिवार दिनांक ०२/०२/२०१९ रोजी दुपारी ४-००मा. श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर ,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यात आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	दुपारी ४-०० वाजतां
२	मा. सौ. अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	धामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
८	माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
९	वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
१०	नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
११	जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१२	अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्य	----------" ---------
१३	पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१४	सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१५	बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१६	चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१७	बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१८	दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१९	पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
२०	गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
२१	देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
२२	पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२३	पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------

२४	अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य	----------" ---------
२५	बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२६	उबासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२७	कूलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
२८	रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२९	अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
३०	महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
३१	चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
३२	अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
३३	जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
३४	मंडोरे बालीबेन प्रकाशचंद	सदस्या	----------" ---------
३५	भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३६	जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३७	वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३८	सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३९	पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
४०	बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
४१	थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
४२	कर्पे प्रदिप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
४३	अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
४४	शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
४५	मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
४६	पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
४७	अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
४८	शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
४९	अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
५०	खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
५१	जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
५२	पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
५३	खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
५४	ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
५५	पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
५६	जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
५७	जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
५८	बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
५९	सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
६०	खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
६१	मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------

६२	उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
६३	मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
६४	नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
६५	बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
६६	देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
६७	अग्रवाल सारिका प्रविन	सदस्या	----------" ---------
६८	पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
६९	मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
७०	पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
७१	पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
७२	खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. सुधाकर देशमुख	आयुक्त	दुपारी ४-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. एन.पी. सोनार	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्या लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
६	श्री.नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
७	श्री. के. एन. शिंदे	अधियंता	----------" ---------
८	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर	----------" ---------
९	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१२	श्री.बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धा. अधिकारी	----------" ---------
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१४	श्री.एस.एम. देसले	लिपीक मनपा शि.मं.	----------" ---------
१५	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
१६	श्री. के. आर. चव्हाण	लिपीक अभिलेखपाल विभाग	----------" ---------
१७	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग प्रमुख	----------" ---------
१८	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
१९	श्री. श्री. गणेश खोंडे	प्रकल्प विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस नगरसचिव यांनी मा. महापौर साहेब यांचेकडेस मा. आयुक्त साहेब यांचेकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार ३ प्रस्ताव आजच्या विषय पत्रिकेसाठी सादर झालेले आहे.

मा. महापौर मा. आयुक्त साहेब यांचेकडून यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार ३ प्रस्ताव आजच्या महासभेसाठी सादर झालेले आहे ते प्रस्ताव विषय पटलावर दाखल करुन घेण्यांत येत आहे.

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या यादीनुसार मान्यवरांना सन्मानपत्र देणेबाबत

१) जुन्या पिढीतील मार्गदर्शक धुळे शहरातील जेष्ठ विधीतज्ञ तसेच आदरणीय व्यक्तीमहत्व असलेले श्री. जी.व्ही. गुजराथी यांचा दिनांक १/२/२०१९ रोजी सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा साजरा होत आहे.तरी अशा महनीय व पुजनीय जेष्ठ मान्यवर श्री. जी.व्ही. गुजराथी यांचा धुळे महानगरपालिकेमार्फत मानपत्र देऊन नागरी सत्कार करण्यांत यावा .

सुचक :- श्रीमती वालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे , मा. सभापती, स्थायी समिती तथा नगरसेविका मनपा धुळे

२) विश्ववंदनीय संत शिरोमणी प्रकट ब्रम्हस्वरुप श्री. मंहत स्वामीजी महाराज यांचे धुळे महानगरीत प्रथमच आगमन होत आहे त्या निमित्ताने धुळे शहर वासीय व धुळे महानगरपालिकेमार्फत् त्यांना सन्मानपत्र प्रदान करणेबाबतचा ठरा आजच्या मे. महासभेत पारीत करणेत यावा.

सूचक :- श्री. किरण अहिरराव नगरसेवक
श्री. रावसाहेब नांद्रे, नगरसेवक
अनुमोदक :- श्री. प्रदीप बाळासाहेब कर्पे, नगरसेवक
श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, नगरसेवक

म. महापौर सन्मा. सन्मा. सदस्यांच्या यादी नुसार जून्या पिढीतील ज्येष्ठ विधीतज्ञ श्री. जी.व्ही गुजराथी यांचा सहस्त्र चंद्रर्शन सोहळयानिमित्त त्यांचा धुळे मनपातर्फे नागरी सत्कार करणेस, तसेच विश्ववंदनीय संत शिरोमणी प्रकट ब्रम्हस्वरुप श्री. महंत स्वामीजी महाराज यांचे धुळे महानगरीत प्रथमच आगमन होत आहे त्या निमित्ताने धुळे शहर वासीय व धुळे महानगरपालिकेमार्फत् त्यांना सन्मानपत्र प्रदान करणे बाबतचा ठराव करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १ दिनांक ०२/०२/२०१९

सन्मा.सदस्यांच्या यादी नुसार जून्या पिढीतील ज्येष्ठ विधीतज्ञ श्री. जी.व्ही गुजराथी यांचा सहस्त्र चंद्रर्शन सोहळयानिमित्त त्यांचा धुळे मनपातर्फे नागरी सत्कार करणेस, तसेच विश्ववंदनीय संत शिरोमणी प्रकट ब्रम्हस्वरुप श्री. महंत स्वामीजी महाराज यांचे धुळे महानगरीत प्रथमच आगमन होत आहे त्या निमित्ताने धुळे शहर वासीय व धुळे महानगरपालिकेमार्फत् त्यांना सन्मानपत्र प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजली वाहणेबाबची यादी

१) माजी सरक्षणमंत्री, रेल्वे मंत्री,कामगार चळवळीचे नेते जॉर्ज फर्नांडीस यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे. तसेच धुळे शहरातील पुरोगामी चळचळीचे आधारस्तंभ सामाजिक बाधीलकी जोपसणारे कुशाग्र व्यक्तीहत्व सुप्रसिध्द कायदेतज्ञ नानासाहेब एन.डी. सुर्यवंशी यांच्या निधनाने शहराच्या सामाजिक जिवनावर फार मोठा आघात झालेला आहे. तसेच तत्कालीन धुळे नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ. सुमनताई गोरख येरडावकर यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे.तसेच तत्कालीन धुळे नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष राजुअप्पा शिनकर यांचे देखील आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे.

वरील व्यक्तीचे दु:खद निधनानिमित्त त्यांना आजच्या महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. प्रदीप बाळासाहेब कर्पे, नगरसेवक
श्री. रावसाहेब नांद्रे, नगरसेवक
अनुमोदक:- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव, नगरसेवक
श्री. नंदुभाऊ वसंतराव सोनार, नगरसेवक

२) विविध पुरोगामी चळवळीचे आधारस्तंभ, आदिवासी, कष्टकरी जनचळवळीचे अर्धयु जेष्ठ कायदेतज्ञ श्री. निर्मलकुमार दयाराम सुर्यवंशी उपाख्य एन.डी. नाना यांचे दि.१९/०१/२०१९ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले होते.त्यांनी संपूर्ण आयुष्यात आपल्या प्रगल्भ कायदेज्ञाचा उपयोग आदिवासी, केष्टकरी, दलित, पीडीत,वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांच्या संविधानाच्या रक्षणासाठी लोकचळवळीना संरक्षण देणएयांचे उदात्त कार्य केले आहे. तसेच धुळे नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ. सुमनताई गोरख येरडावकर यांचे दिनांक २३/०१/२०१९ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले होते. तसेच कामगार नेते श्री. जॉर्ज फर्नांडीस उर्फ बंद सम्राट यांचे दिनांक २९/०१/२०१९ रोजी दिल्लीतील रुगणलयत उपचार घेतांना दु:खद निधन झाले होते. ते सर्व प्रथम १९६७ मध्ये दक्षिण मुंबई लोकसभा सदस्य सन १९८९ मध्ये बिहार राज्यातील मुझप-फरपूर लोकसभा निवडणूक जिंकली होती. त्यानंतर विश्वनाथ सिंह सरकार मध्ये रेल्वे मंत्री राहिले. सन १९९६,१९९८, १९९९ सलग तीन वेळा मध्ये बिहार मधील नालंदा लोकसभा क्षेत्रातून विजय मिळवला होता. सन १९९८ मध्ये त्यांनी देशाचे केंद्रीय संरक्षण मंत्री म्हणूनही काम केले होते.

सुचक :- सौ. चौधरी प्रतिभा शिवाजीराव , नगरसेविका

तरी वरील तीनही वंदनीय मुर्तीना आजच्या महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन ठराव पारीत करण्यांत यावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार वरील सर्व मान्यवरांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यासाठी दोन मिनिटे मौन उभे राहावे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २ दिनांक ०२/०२/२०१९

सन्मा. सदस्यांच्या यादी वरुन माजी संरक्षणमंत्री, रेल्वे मंत्री,कामगार चळवळीचे नेते जॉर्ज फर्नांडीस यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे. तसेच धुळे शहरातील पुरोगामी चळचळीचे आधारस्तंभ सामाजिक बाधीलकी जोपसणारे कुशाग्र व्यक्तीहत्व सुप्रसिध्द कायदेतज्ञ नानासाहेब एन.डी. सुर्यवंशी यांच्या निधनाने शहराच्या सामाजिक जिवनावर फार मोठा आघात झालेला आहे. तसेच तत्कालीन धुळे नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ. सुमनताई गोरख येरडावकर यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे. तसेच तत्कालीन धुळे नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष राजुअप्पा शिनकर यांचे देखील आजारपणामुळे दु:खद निधन झाले आहे.

वरील मान्यवरांच्या दु:खद निधनानिमित्त या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निमित्त त्यांना दोन निमिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करीत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून सभेस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत प्राप्त झालेल्या अर्जाबाबत

सन्मा. सदस्या सौ. हेमा अनिल गोटे यांनी दिनांक०२/०२/२०१९ रोजी होणा-या धुळे महानगरपालिकेच्या महासभेस उपस्थित राहू शकणार नाही असा अर्ज सादर केला आहे.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या अर्जानुसार आजच्या सभेस सदरच्या अर्जाची नोंद घेण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३ दिनांक ०२/०२/२०१९

सन्मा.सदस्या सौ. हेमा अनिल गोटे यांनी दिनांक २/०२/२०१९ रोजी होणा-या धुळे महानगरपालिकेच्या महासभेस उपस्थित राहू शकणार नाही असा अर्ज सादर केला आहे.सन्मा. सदस्यांच्या अर्जाची नोंद आजच्या सभेत घेण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम५(२) ब चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२तरतुदीनुसार धुळे महानगरपालिकेत मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून पाच (५) नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. व मा.आयुक्त साहेब यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाचे वाचन केले ते पुढील प्रमाणे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम ५ (२) ब चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ तरतुदीनुसार धुळे महानगरपालिकेत मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून पाच (५) नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करणेचा विषय घेणेत आला आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २३/१/२०१९ रोजी दुपारी ४-०० वाजतां विविध पक्षांचे गटनेत्यांची बैठक मा. आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात घेण्यांत आली सदर बैठकीत उपस्थितांना महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नियम ४ मधील क ते छ नुसार नामनिर्देशित सदस्यांची अर्हता विषद करुन नियमांची माहिती देण्यांत आली. तसेच महाराष्ट महानगरपालिका अधिनियम कलम ३१ (अ) नुसार पक्षीय बलाबल व म. विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडेस झालेल्या गटनोंदणीनुसार पक्ष निहाय निश्चित झालेली सदस्यांची पक्षनिहाय संख्येबाबत माहिती देण्यांत आली.

धुळे महानगरपालिकेत खालील पक्षाप्रमाणे सदस्य निवडुन आलेले आहेत.

१) भारतीय जनता पार्टी	-५०
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी	-०८
३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस	-०६
४) ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष	-०४
५) समाजवादी पार्टी	-०२
६) शिवसेना पक्ष	-०१
७) बहुजन समाज पार्टी	-०१
८) लोकसंग्राम	-०१
९) अपक्ष	-०१
एकुण	**७४**

म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अनुक्रमे जा.क्र.न.पा२/२/ गटनोंदणी/ ७१५३ दि.२७/१२/२०१८,जा.क्र.न.पा२/२/गटनोंदणी/७१५४दि.२७/१२/२०१८ , जा.क्र. न.पा २/२/गटनोंदणी /७१५५ दि. २७/१२/२०१८, व न.पा २ / २/ गटनोंदणी /२८ दि.१/१/२०१९ अन्वये महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण अनर्हता नियम १९८७ मधील तरतुदीनुसार सदर नियमातील नियम ५ मधील तनतुदीनुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील नोंदवहीत नमुना नं.IV मध्ये नोंदविण्यांत आलेली आहे. त्यानुसार सदर पत्रातील अनुक्रमानुसार नोंदणी करण्यांत आलेली आहे.

१) मंडोरे वालीबेन प्रकाशचंद, यांनी भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिकेच्या एकुण ५० सदस्यांनी नोंदणी केली आहे.

२) श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह,यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष धुळे महानगरपालिकेच्या एकूण ६ सदस्यांची नोंदणी केली आहे.

३) श्री.कमलेश नारायण देवरे, यांनी नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी,धुळेमहानगरपालिकेच्या एकुण ८ सदस्यांची नोंदणी केली आहे.

४) श्रीमती.नाजीयाबानो नागीरखा पठाण, यांनी ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्ल मुस्लिमीन महानगरपालिकेच्या एकुण ४ सदस्यांची नोंदणी केली आहे.

धुळे महानगरपालिकेवर५नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे साठी एकुण निवडुन आलेले ७४ सदस्य भागिले नामनिर्देशन करावयाचे ५ सदस्य = म्हणजे एका व्यक्तीचे नामनिर्देशन करणेसाठी १४.८ सदस्यांचे पाठबळ असणे आवश्यक असेल.

उक्त तरतुदीनुसार व मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडेस झालेल्या पक्षीय गटांच्या नोंदणीनुसार व उक्त प्रमाणानुसार खालील प्रमाणे पक्ष निहाय संख्याबळ नियमानुसार येत आहे.

१)भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका	५०/१४.८	३.३७
२)नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी	८ / १४.८	०.५४
३)भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस	६ / १४.८	०.४०
४)ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्ल मुस्लिमीन पक्ष ४ /१४.८		०.२७

पक्षीय संख्याबळानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार धुळे महानगरपालिकेत खालील प्रमाणे ५ नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करता येतील.

पक्ष/ गट / आघाडी	संख्याबळ	रेषो	प्रॅक्शन	पहिल्या फेरीतील पुर्णांकातील जागा वाटप	अपूर्णकातील अतिरिक्त जागा	एकुण जागा
भारतीय जनता पाटी	५०	१४ . ८	३.३७	**३**	-	**३**
नॅशलिस्ट कॉग्रेस पार्टी	०८	१४.८	०.५४		**१**	**१**
भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी	०६	१४.८	०.४०		**१**	**१**
एम.आयएम. पार्टी	०४	१४.८	०.२७		-	-
समाजवादी पक्ष	०२	१४.८	०.१३		-	-
शिवसेना	०१	१४.८	०.०६७		-	-
लोकसंग्राम	०१	१४.८	०.०६७		-	-

बहुजन समाज पार्टी	०१	१४.८	०.०६७		-	-
अपक्ष	०१	१४.८	०.०६७		-	-
एकुण जागा						५

वरील तक्त्यावरुन

१) भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ३
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी १
३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस १

याप्रमाणे ५ नामनिर्देशित सदस्य महानगरपालिकेत नामनिर्देशनाव्दारे निश्चित झालेले आहे.

दिनांक ३१/१/२०१९रोजी दुपारी ५-०० वाजेपर्यत नगरसचिव यांचेकडेस गटनेत्यांकडून एकुण ५ नामनिर्देशित सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली आहेत.सादर करण्यात आलेले सर्व नामनिर्देशित सदस्य पदासाठी गटनेत्यांडून दाखल झालेले नामनिर्देशन पत्र हे नियम ४ छ मधील अर्हतानुसार प्राप्त झालेले आहेत.

अ.क्रं.	उमेदवारांचे नांव व पत्ता	वय	उमेदवाराचे मतदार यादी तील प्रभाग क्रं. व अ.नं.	उमेदवाराकडे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा प्रत्यक्ष अनुभव याचा तपशील योग्य प्रमाणात जोडले आहे किंवा नाही	नामनिर्देशन पत्र जमा करणा-या गटनेत्यांचे / पक्षाचे नांव
१	**मंसुरी अब्दुल करीम शेख हसन,** रा. प्लॉट नं. २६, आयेशा मस्जीद समोर,आयेशानगर, ४० गांवरोड, धुळे ४२४००१	५९	प्रभाग क्रं. १२ अ.नं. ६१५८	ख्वाजा ए संजरी खान्देश मंडळ, देवपूर, धुळे या संस्थेवर सचिव (कागदपत्रे जोडली आहेत)	खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह, गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष धुळे महानगरपालिका
२	**महाले संदीप दत्तात्रय,** रा.४५ अभयनगर, मालेगांव रोड धुळे	४९	प्रभाग क्रं. ८ अ.नं. ८१२०	धुळे जिल्हा ॲम्युचअर अक्वॉटीक,असोसिएशन, धुळे या संस्थेवर अध्यक्ष, (कागदपत्रे जोडली आहेत)	वेवरे कमलेश नारायण, गटनेता,नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी ,धुळे महानगरपालिका
३	**गवळी हिरामण विठ्ठल,** ग. नं. ७ घर नं.४६९३ ड धुळे ता.जि, धुळ	६१	प्रभाग क्रं. १० अ.नं. ३५८	मदर टेरेसा सोशल डेव्हलपमेंट ट्रस्ट संस्थेचे सेक्रेटरी (कागदपत्रे जोडली आहेत)	श्रीमती बालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे,गटनेत्या,भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिका
४	**मोगलाईकर शशी सुधाकर**, संभाप्पा कॉलनी, चितोडरोड, शिवमंदिरा जवळ, धुळे	४८	प्रभाग क्रं. १६ अ.नं. ६३३	राजे शिवाजी शैक्षणिक व सामाजिक बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे सेक्रेटरी (कागदपत्रे जोडली आहेत)	श्रीमती बालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे,गटनेत्या,भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिका
५	**शिंदे सोनल दिलीप** रा. प्लॉट नं. २३३/क नुतन पाडवी हायस्कूल समोर, स्टेशनरोड, धुळे ता.जि. धुळे	३५	प्रभाग क्रं. १४ अ.नं. ५७६६	मदर टेरेसा सोशल डेव्हलपमेंट ट्रस्ट धुळे संस्थेचे खजिनदार (कागदपत्रे जोडली आहेत)	श्रीमती बालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे,गटनेत्या,भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिका

उपरोक्त प्राप्त नामनिर्देशन पत्राची व उमेदवारांनी दाखल केलेल्या कागदपत्राची तपासणी केली आहे.

वरील १ ते ५ नामनिर्देशन पत्र नियमास अधिन राहुन व संबंधितांनी सादर केलेले अनुभवाचे कागदपत्राच्या सत्यतेची जबाबदारी अर्जदारांची राहील या शर्तीवर शिफारशीसाठी पात्र आहेत.

नियम ५ (२) नुसार नियम ४ मध्ये नमूद प्रत्येक अर्हतेसाठी (क ते छ) एक सदस्य नामनिर्देशित करणे अभिप्रेत आहे. मात्र प्राप्त झालेले सर्व नामनिर्देशन पत्र नियम ४(छ) नुसार पात्र आहेत. प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्र नियम ४ व ५ नुसार निर्णयासाठी मे.महानगरपालिका सभेकडे सादर करण्यांत आलेला आहे.

म. महापौर

धुळे महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसाठी महानगरपालिका अधिनियमा नुसार व मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडेस झालेल्या गट नोंदणीनुसार पक्ष निहाय जागा निश्चित करण्यांत आलेल्या होत्या. याबाबत संबंधित गट नेत्यांची बैठक घेवून त्यांना याबाबत मा. आयुक्त साहेब यांनी अवगत केलेले होते. त्यानुसार ५ नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन पत्र व त्यावरील मा. आयुक्त साहेब यांनी दिलेला अहवाल महासभेपुढे सादर झालेला आहे.

यांत ५ ही नामनिर्देशन पत्र हे नियम ४ मधील छ नुसार प्राप्त असून त्याबाबतचे आवश्यक ते अर्हतेचे दस्ताऐवज संबंधित उमेदवारांनी आपआपल्या गटनेत्यामार्फत सादर केलेले आहेत. त्यांची नांवे खालील प्रमाणे आहे.

१) मंसुरी अब्दुल करीम शेख हसन भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
२) महाले संदीप दत्तात्रय नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी
३) गवळी हिरामण विठ्ठल भारतीय जनता पार्टी
४) मोगलाईकर शशी सुधाकर भारतीय जनता पार्टी
५) शिंदे सोनल दिलीप भारतीय जनता पार्टी

मा.आयुक्त साहेब यांच्या मार्फत प्राप्त झालेला अहवाल व शिफारशी नुसार वरील ५ नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४ दिनांक ०२/०२/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) ब चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) सुधारणा नियम २०१२ चे कलम ४ व ५ मधील तरतुदीनुसार पक्षीय बलाबलानुसार गटनेत्यांच्या शिफारशी नुसार प्राप्त नामनिर्देशनास मा.आयुक्त यांनी नियम ४ च्या छ नुसार ५ नामनिर्देशनापत्र महासभेत शिफारस केल्यानुसार खालील प्रमाणे ५ नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नांव	सदस्याचा पत्ता	पक्ष / आघाडी
१	मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	प्लॉट नं. २६, आयेशा मस्जीद समोर,आयेशानगर, ४० गांवरोड, धुळे ४२४००१	भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
२	महाले संदीप दत्तात्रय,	रा.४५ अभयनगर, मालेगांव रोड धुळे	नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी

३	गवळी हिरामण विठ्ठल,	ग. नं. ७ घर नं.४६९३ ड धुळे ता.जि, धुळे	भारतीय जनता पार्टी
४	मोगलाईकर शशी सुधाकर,	संभाप्पा कॉलनी, चितोडरोड, शिवमंदिरा जवळ, धुळे	भारतीय जनता पार्टी
५	शिंदे सोनल दिलीप	रा. प्लॉट नं. २३३/क नुतन पाडवी हायस्कूल समोर, स्टेशनरोड, धुळे ता.जि. धुळे	भारतीय जनता पार्टी

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम २० (२) नुसार स्थायी समितीचे गठन करणेकरिता कलम ३१अ(१) व (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेऊन सोळा(१६) स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व टिपणीचे वाचन केले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(१) अन्वये स्थायी समितीत १६ पालिका सदस्य संख्या निर्धारीत केलेली आहे. तसेच महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणूकीनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी सोळा व्यक्तींची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे अशी कलम २०(२) मध्ये तरतूद आहे.

म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अनुक्रमे जा.क्र.न.पा/गटनोंदणी/७१५३दि.२७/१२/२०१८,जा.क्र.न.पा२/२/गटनोंदणी/७१५४दि.२७/१२/२०१८, जा.क्र. न.पा२/२/गटनोंदणी /७१५५ दि.२७/१२/२०१८, व न.पा २ / २/गटनोंदणी/२८दि.१/१/२०१९क्रं.२०१९/नपा-२/२/गटनोंदणी/सपा दि. १७/१/२०१९ अन्वये महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण अनर्हता नियम १९८७ मधील तरतुदीनुसार सदर नियमातील नियम ५ मधील तनतुदीनुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील नोंदवहीत नमुना नं.IV मध्ये नोंदविण्यांत आलेली आहे. त्यानुसार सदर पत्रातील अनुक्रमानुसार नोंदणी करण्यांत आलेली आहे.

१) मंडोरे वालीबेन प्रकाशचंद, यांनी भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिकेच्या एकुण ५० सदस्यांनी नोंदणी केली आहे.

२) श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह,यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष धुळे महानगरपालिकेच्या एकुण ६ सदस्यांची नोंदणी केली आहे.

३)श्री.कमलेश नारायण देवरे,यांनी नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी,धुळे महानगरपालिकेच्या एकुण ८ सदस्यांची नोंदणी केली आहे.

४) श्रीमती.नाजीयाबानो नागीरखा पठाण, यांनी ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन महानगरपालिकेच्या एकुण ४ सदस्यांची नोंदणी केली आहे.

५)श्री.पटेल अमीन अब्दुल करीम यांनी समाजवादी पार्टी धुळे महानगरपालिकेच्या एकुण २ सदस्यांची नोंदणी केली आहे.

७४ निवडुन आलेले सदस्य धागिले १६ स्थायी समितीवर निवडावयाच्या जागा एकुण प्रमाणे ४.६२५ या प्रमाणानुसार खालील प्रमाणे पक्ष निहाय संख्याबळ नियमानुसार येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे बाबत नमूद आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार व मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस झालेल्या पक्षीय गटांच्या नोंदणीनुसार व ४.६२५ या प्रमाणनुसार खालील प्रमाणे पक्ष निहाय संख्याबळ नियमानुसार येत आहे.

१) भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ५०/ ४.६२५ १०.८१
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी ८ / ४.६२५ १.७२
३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस ६ / ४.६२५ १.२९
४) ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष ४ / ४.६२५ ०.८६
५) समाजवादी पार्टी २/४.६२५ ०.४३
६) बहुजन समाज पार्टी यांनी अद्याप पावेतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाही परंतु त्यांचा एक सदस्या निवडुन आलेला आहे त्यांचे संख्याबळ १/४.६२५ ०.२१
७) शिवसेना पक्ष यांनी अद्याप पावतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाहीपरंतु त्यांचा एक सदस्या निवडुन आलेला आहे त्यांचे संख्याबळ१/४.६२५ ०.२१
८) लोकसंग्राम पक्ष यांनी अद्याप पावतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाहीपरंतुत्यांचा एक सदस्या निवडुन आलेला आहेत्यांचे संख्याबळ १/४.६२५ ०.२१
९) अपक्ष एक सदस्य निवडुन आलेला आहे त्यांनी अद्याप पावेतो विभागीय आयुक्त यांचेकडेसनोंदणी केलेली नाही त्यांचे संख्याबळ१/४.६२५ ०.२१

पक्षीय संख्याबळानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे स्थायी समितीवर १६ सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागेल.

१.भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ११
२.नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी ०२
३.भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस ०१
४.ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष ०१
५.समाजवादी पार्टी ०१

उक्त नियमानुसार प्रमाण निश्चिती होत आहे.याबाबत संबंधित गटनेत्यांची मा.महापौर साहेब यांचेकडेस बैठक घेवून त्यांना अवगत करण्यांत आलेले आहे.

म. महापौर त्यानुसार खालील प्रमाणे गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे .

१) भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती वालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ११ सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	पाटील विमलबाई गोपीचंद
२	सोनार सुनिल वसंतराव
३	बारेसे नागसेन दामोदर
४	पाटील रावसाहेब आनंदराव
५	बागुल लक्ष्मी दिनेश
६	खताळ संतोष छगन
७	उगले सुरेखा चंद्रकांत
८	देवरे सुरेखा भगवान

९	पाटील युवराज चैत्राम
१०	उदासी कशिश गुलशन
११	भिल संजय शत्रुग्न

२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील दोन सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	मन्सुरी मुख्तार कासिम
२	शेख शहजहान बी बिसमिल्ला

३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	जगताप सुभाष सुकलाल

४) एम.आय. एम.पक्षाच्या गटनेत्या श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	अन्सारी सईदा म. इकबाल

५) समाजवादी पार्टीचे गटनेते श्री. पटेल अमीन अब्दुल करीम यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे

१	पटेल अमीन अब्दुल करीम

वरील प्रमाणे स्थायी समिती सदस्य पदासाठी गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या १६ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५ दिनांक ०२/०२/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(२) चे तनतुदीनुसार स्थायी समितीवर कलम ३१ (अ) (१) (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटाचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवून तसेच दिनांक २३/१/२०१९ रोजी झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे स्थायी समितीवर १६ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्रं	नांव	पक्ष
१	पाटील विमलबाई गोपीचंद	भारतीय जनता पार्टी
२	सोनार सुनिल वसंतराव	भारतीय जनता पार्टी
३	बारेसे नागसेन दामोदर	भारतीय जनता पार्टी
४	पाटील रावसाहेब आनंदराव	भारतीय जनता पार्टी
५	बागुल लक्ष्मी दिनेश	भारतीय जनता पार्टी
६	खताळ संतोष छगन	भारतीय जनता पार्टी
७	उगले सुरेखा चंद्रकांत	भारतीय जनता पार्टी
८	देवरे सुरेखा भगवान	भारतीय जनता पार्टी
९	पाटील युवराज चैत्राम	भारतीय जनता पार्टी
१०	उदासी कशिश गुलशन	भारतीय जनता पार्टी
११	भिल संजय शत्रुग्न	भारतीय जनता पार्टी
१२	मन्सुरी मुख्तार कासिम	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी

१३	शेख शहजहान वी बिसमिल्ला	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
१४	जगताप सुभाष सुकलाल	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
१५	अन्सारी सईदा म. इकबाल	एमआयएम
१६	पटेल अमीन अब्दुल करीम	समाजवादी पार्टी

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम३०(१)नुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेसाठी कलम३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा (११) महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व टिपणीचे वाचन केले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ कलम ३०(१) नुसार महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जो अनुदेश देईल ते पाळले पाहिजे अशी तरतूद आहे.

त्यानुसार धुळे महानगरपालिकेत निवडुन आलेल्या सदस्यांची पक्षीय स्थिती खालील प्रमाणे आहे.

१) भारतीय जनता पार्टी	- ५०
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी	-०८
३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस	-०६
४) ऑल इंडिया मतजलिस इत्तेहदुल मुस्लिमीन पक्ष	-०४
५) समाजवादी पार्टी	-०२
६) शिवसेना पक्ष	-०१
७) बहुजन समाज पार्टी	-०१
८) लोकसंग्राम	-०१
९) अपक्ष	-०१
एकुण	**७४**

(१- अ) महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यापैकी किमान पंचाहत्तर टक्के सदस्य हे महिला पालिका सदस्यांमधील असतील.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५ दिनांक ३१/१/२००९ नुसार महिला बालकल्याण समिती गठीत करणेसाठी ११सदस्यांची संख्या व एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित करण्यांत आलेला आहे.

म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अनुक्रमे जा.क्र.न.पा २ /२ /गटनोंदणी/७१५३दि.२७/१२/२०१८,जा.क्र.न.पा२/२/गटनोंदणी/७१५४ दि.२७/१२/२०१८, जा.क्र.न.पा२/२/ गटनोंदणी /७१५५ दि.२७/१२/२०१८, व न.पा २ / २/ गटनोंदणी / २८ दि.१/१/२०१९क्रं.२०१९/नपा-२/२/ गटनोंदणी/सपा दि.१७/१/२०१९ अन्वये महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण अनर्हता नियम १९८७ मधील तरतुदीनुसार सदर नियमातील नियम ५ मधील

तरतुदीनुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील नोंदवहीत नमुना नं.IV मध्ये नोंदविण्यांत आलेली आहे. त्यानुसार सदर पत्रातील अनुक्रमानुसार नोंदणी करण्यांत आलेली आहे.

१) मंडोरे वालीबेन प्रकाशचंद, यांनी भारतीय जनता पार्टी, धुळे महानगरपालिकेच्या एकुण ५० सदस्यांनी नोंदणी केली आहे.

२) श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह,यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष धुळे महानगरपालिकेच्या एकुण ६ सदस्यांची नोंदणी केली आहे.

३)श्री.कमलेश नारायण देवरे, यांनी नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी,धुळेमहानगरपालिकेच्या एकुण ८ सदस्यांची नोंदणी केली आहे.

४) श्रीमती.नाजीयाबानो नागीरखा पठाण, यांनी ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन महानगरपालिकेच्या एकुण ४ सदस्यांची नोंदणी केली आहे.

५) श्री.पटेल अमीन अब्दुल करीम यांनी समाजवादी पार्टी धुळे महानगरपालिकेच्या एकुण २ सदस्यांची नोंदणी केली आहे.

महिला बालकल्याण समितीवर ११ सदस्यांची संख्या निश्चित झाल्यास संख्याबळा नुसार खालीलप्रमाणे प्रतिनिधीत्व प्रमाण राहील.

७४ निवडून आलेले सदस्य भागिले ११ महिला बालकल्याण समितीवर निवडावयाच्या जागा एकुण प्रमाणे ६.७२७ या प्रमाणानुसार खालील प्रमाणे पक्ष निहाय संख्याबळ नियमानुसार येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे बाबत नमूद आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार व मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस झालेल्या पक्षीय गटांच्या नोंदणीनुसार व ६.७२७ या प्रमाणनुसार खालील प्रमाणे पक्ष निहाय संख्याबळ नियमानुसार येत आहे.

१)भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ५०/ ६.७२७ ७.४३

२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी ८ /६.७२७ १.१८

३)भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस ६ / ६.७२७ ०.८९

४)ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष ४ / ६.७२७ ०.५९

५)समाजवादी पार्टी २/६.७२७ ०.२९

६)बहुजन समाज पार्टी यांनी अद्याप पावेतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाही परंतु त्यांचा एक सदस्या निवडून आलेला आहे त्यांचे संख्याबळ १/६.७२७ ०.१४

७)शिवसेना पक्ष यांनी अद्याप पावतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाही परंतु त्यांचा एक सदस्या निवडून आलेला आहे त्यांचे संख्याबळ१/६.७२७ ०.१४

८)लोकसंग्राम पक्ष यांनी अद्याप पावतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाही परंतु त्यांचा एक सदस्या निवडून आलेला आहेत्यांचे संख्याबळ१/६. ७२७ ०.१४

९)अपक्ष एक सदस्य निवडून आलेला आहे त्यांनी अद्याप पावेतो विभागीय आयुक्त यांचेकडेस नोंदणी केलेली नाही त्यांचे संख्याबळ १/६.७२७ ०.१४

पक्षीय संख्याबळानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे महिला बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागेल.

१)भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ८

२)नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी १

३)भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस १

४)ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष १

उक्त नियमानुसार प्रमाण निश्चिती होत आहे.याबाबत संबंधित गटनेत्यांची मा.महापौर साहेब यांचेकडेस बैठक घेवून त्यांना अवगत करण्यांत आलेले आहे.

म.महापौर महिला बालकल्याण समिती सदस्य पदासाठी गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे

१) भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती वालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ८ सदस्यांची नांवे महिला बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	जाधव शकुंतला शंकर
२	बागुल योगिता प्रशांत
३	पाटील निशा प्रमोद
४	वाघ सुमनबाई यशवंत
५	पाटील मंगला सुरेश
६	जाधव स्नेहल मनोज
७	मराठे वंदना राजेंद्र
८	बोरसे पुष्पा प्रकाश

२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	चौधरी मंगल अर्जुन

३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	पिंजारी मदीना समशेर

४) एम. आय. एम. पक्षाच्या गटनेत्या श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	शेख जाकीर मेहरुन्नीसा

वरील प्रमाणे महिला बालकल्याण समिती सदस्य पदासाठी गटनेत्यांकडुन प्राप्त झालेल्या सदस्यांची बालकल्याण् समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६ दिनांक ०२/०२/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३०(१)चे तरतुदीनुसार महिला बालकल्याण समिती गठीत करुन तसेच कलम ३१(अ(१) व (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवून तसेच दिनांक २३/१/२०१९ रोजी झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार महिला बालकल्याण समितीवर खालील ११ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्रं	सदस्यांचे नांव	पक्ष
१	जाधव शकुंतला शंकर	भारतीय जनता पार्टी

२	बागुल योगिता प्रशांत	भारतीय जनता पार्टी
३	पाटील निशा प्रमोद	भारतीय जनता पार्टी
४	वाघ सुमनबाई यशवंत	भारतीय जनता पार्टी
५	पाटील मंगला सुरेश	भारतीय जनता पार्टी
६	जाधव स्नेहल मनोज	भारतीय जनता पार्टी
७	मराठे वंदना राजेंद्र	भारतीय जनता पार्टी
८	बोरसे पुष्पा प्रकाश	भारतीय जनता पार्टी
९	चौधरी मंगल अर्जुन	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
१०	पिंजारी मदीना समशेर	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
११	शेख जाकीर मेहरुन्नीसा	एम. आय. एम.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

मा. आयुक्त साहेब यांच्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार विषय पटलावर दाखल झालेला प्रस्ताव

विषय क्रमांक :- ४ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड, प्रकरण २ नियम १ के नुसार मनपासाठी अक्कलपाडा धरण ते हनुमान टेकडी पावेतो पाईपलाईन टाकण्याच्या अंदाजे रुपये १६५ कोटी रकमेच्या प्रस्तावासाठी शासनाकडे अनुदान मागणी व पीएमसी म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची नेमणूक करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरी बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी दाखल झालेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

म. प्रदीप कर्पे कृपया सदर विषय हे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. सर्व सन्मा. सदस्यांना सदर प्रस्तावाची संपूर्ण माहिती देणेस विनंती आहे.

म. आयुक्त आपण तीन अत्यंत महात्वाचे विषय महासभेपुढे घेतलेले आहेत. आणि या शहरासाठी निवडणुक झाल्यानंतर महत्वाचे विषय आपण हातामध्ये घेतलेले कालबध्द गतीने पुर्ण करावयाचे आहे. शासन आणि आपण सर्व ही कामे करणेसाठी कटीबध्द आहात आणि शासनाने या कामांची ग्वाही दिली आहे. म्हणुन मी माझ्याकडुन हे विषय मी तातडीच्या प्रस्ताव स्वरुपात या महासभेला दिलेले आहेत. आणि या सभागृहामध्ये 2003 नंतर 2018 पर्यंत आयुक्तांनी अशाप्रकारचे कदाचीत प्रस्ताव देण्याची ही पहिलीच वेळ आहे. याच्यामध्ये पहिला जो विषय ठेवलेला आहे तो मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केलेली शहरासाठी आपण अक्क्लपाडा योजना करणार आहोत. आणि या योजनेच्या कामासाठी आपण सर्वांनी तीचा पाठपुरावा करावयाचा आहे. मा. महापौर भेट देवुन आले. मा. मुख्यमंत्र्यांनी काही सुचना दिल्यात आणि म्हणुन ही योजना तयार करणेसाठी आपण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आपण या अगोदरच कळविलेले आहे. ही की या प्रमाणे तुम्ही कामकाज सुरु करा शासनाच्या नियमाप्रमाणे राज्य भरामध्ये ज्या सर्व स्थानिक संस्था मग त्या शहरी स्थानीक संस्था नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती आणि महानगरपालिका यांच्या ज्या योजना शासनाच्या निधिमधुन पाणीपुरवठा योजना आणि भुयारी गटारी योजना घेतल्या जातात. या

साठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन नियुक्तीचा विषय आहे. त्या मध्ये त्यांनी प्रकल्प तयार करणे, तो आपल्याला देणे, तो तयार केल्या नंतर शासनाकडे मंजुरीला पाठविणे आणि त्याचे जे वेगवेगळे टप्पे आहेत प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन ते पार पाडणेसाठी आपण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे निवड करण्यासाठी ठराव करणार आहोत. हा पहिला विषय आहे. आणि या मध्ये पुर्ण प्रकल्प या अगोदरच तयारही झालेला आहे. शासनाकडे ही गेलेला आहे. आणि मंजुरीसाठी प्रयत्नही करीत आहोत. आणि लवकरात लवकर मंजुर व्हावा म्हणुन आणि पुढची सभा होणेस वेळे लागेल. पुढील महीन्यात किंवा त्याच्या पुढील महिन्यात निवडणुक आचारसंहिता ही लागु शकते. आणि म्हणुन हे व्यापक हित विचारात घेवुन हे विषय आपण सभेपुढे आणलेले आहेत.

दुसरा जो विषय आहे. आपल्या शहरासाठी सुवर्णजंयती नगरोत्थान योजने अंतर्गत शासनाने सर्व साधारण पणे शासनाकडुन 100 कोटी रुपये निधी उपलब्ध होऊ शकतो अशा प्रकारची ग्वाही दिलेली आहे. या पुर्वीचा 40 कोटीचा प्रकल्प होता तो पुर्ण झालेला आहे. आणि दुस-या टप्प्यासाठी आपल्याला प्रकल्प व्यवस्थापक काम द्यावयाचे होते. निसर्ग कन्सलटन्सी नाशिक जी संस्था आहे त्यांना आपण काम दिलेले होते. अंदाजपत्रकिय दराच्या 1.75% या दराचे ते काम होते. मागच्या वर्षी शासनाने नविन जी. आर काढलेला आहे. त्यात हे जे टप्पे ठरवुन दिलेले आहे आणि म्हणुन जो त्या संस्थेचा दर आहे तो आपण कमी करुन 0.75% टक्के केला आहे. त्या दराने त्या संस्थेकडुन काम करुन घेणेसाठी मंजुरीचा प्रस्ताव आहे. या मंजुरीच्या प्रस्तावानंतर पुन्हा आपल्याला ती कामे निश्चित करणे अशा प्रकारचा दुसरा विषय आहे. जेणे करुन जी कामे आहे त्यांची तांत्रिक मान्यता मिळवुन लवकरात लवकर शासनाकडुन आपल्याला निधी घेता येईल. आणि त्याच्यामध्ये शहरासाठी अत्यंत महत्वाचे प्रकल्प आहेत ते आपल्या शहरामध्ये राबविता येतील. अशा प्रकारचा हा दुसरा विषय आहे.

तिसरा जो विषय आहे. त्याच संस्थेकडुन ग्रामीण भागामध्ये जे आपल्याला हद्दवाठी नंतर कामे करावयाची आहेत त्याच्यामध्ये 350 कोटीचा प्रस्ताव राज्यशासनाला सादर केला होता.350 कोटी पैकी हद्दवाढ क्षेत्रामध्ये हद्दवाढ झाल्यानंतर पहीले पाच वर्ष विशेष निधी मिळतो. शासन सर्वसाधारण पणे 100 ते 150 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचे सकारात्मक सांगीतलेले आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करावयाच्या दृष्टीने आणि हद्दवाढ क्षेत्रामध्ये चांगली कामे व्हावी आणि त्या साठी जे कन्स्ट्रकन्शन कडुन खुप प्रकल्प आपल्याला करुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी आपल्याला तांत्रिक मुंजुरी घेवुन त्या संस्थेची नेमणुक करणे आणि कामे निश्चित करणे अशा प्रकारचा हा तिसरा प्रस्ताव आहे. ही जर महासभेची मान्यता झाली तर हा प्रस्ताव शासनाला जाऊ शकेल आणि आपल्याला जास्तीत जास्त निधी शहरासाठी उपलब्ध होवु शकतो.

म. महापौर अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना संदर्भात 166 कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे तसेच धुळे शहरात 136 कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. भविष्यात शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा होऊ शकतो. या प्रस्तावासाठी मा. केंद्रीय संरक्षण मंत्री ना. सुभाषजी भामरे, तसेचजल संपदा मंत्री ना. श्री. गिरीषजी महाजन, पर्यटन मंत्री ना. श्री.जयकुमारजी रावल, तसेच भाजपा महानगराध्यक्ष श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांनी महत्वपूर्ण सहकार्य केलेले असून शासनामार्फत सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे. सदर योजनेची प्राथमिक तयारी पूर्णत्वास आलेली असून प्रस्ताव कार्यान्वीत झालेला आहे. सदर

योजनेची गरज व शहरासाठी असणारी आवश्यकता लक्षांत घेवून सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७ दिनांक०२/०२/२०१९

धुळे महापालिकेच्या अक्कलपाडा ते हनुमान टेकडी पाणीपुरवठा योजना तयार करण्यासाठी व शासनाकडे निधी मागणी करण्यासाठी ठरावाची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत धुळे शहरासाठी तीन ठिकाणाहून पाणीपुरवठा होत आहे. त्यात सुमारे ६०% भाग तापी पाणीपुरवठा योजनेवरून,४०% भाग हनुमान टेकडी पाणीपुरवठा केंद्रावरून व अल्प स्वरूपात डेडरगाव तलाव येथून होत आहे. उपलब्ध पाणीसाठा व शहरातील पुढील २५ वर्षात वाढणारी लोकसंख्या याचा विचार करता सुमारे ५५ ते ७० MLD क्षमतेच्या पाणीपुरवठ्याची नवीन योजना प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

सदरची योजना तापी योजनेवरून प्रस्तावित केल्यास त्याबाबत जास्तीचे विद्युत खर्च होणार आहे. अक्कलपाडा स्त्रोतातून पाणी पुरवठा योजना राबविल्यास धरणातून शहरापर्यंत उताराने पाणी येणार असल्याने त्यासाठी विद्युत बिलाची बचत होणार आहे. यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण करणे, त्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, याकामी शासनाने यापूर्वीच्या योजनांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची प्रकल्प व्यवस्थापक म्हणून नेमणूक केलेली आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास आवश्यक ते सर्वेक्षण करणे, त्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापक म्हणून काम करणे, शासनाकडे निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणे, याकामी महानगरपालिका मंजुरीसाठी सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत नव्याने निवडणुका झाल्या असून पालिकेची सभा होण्यास विलंब झाला आहे. शासनाकडे प्रस्ताव तातडीने सादर करणे आवश्यक असल्याने व सदरचा प्रस्ताव शहरातील नागरिकांच्या पाणीपुरवठाचा म्हणजेच व्यापक जन हिताचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड, प्रकरण २ नियम १ के नुसार तातडीची बाब म्हणून सभेपुढे सादर करण्यात येत आहे. त्यामुळे खालील बाबींना मंजुरी अपेक्षिली आहे.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यासाठी उचित फी अदा करणे.

२) प्रकल्प व्यवस्थापक (PMC) म्हणून काम करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नेमणूक करणे.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने शासनाकडे निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणे.

४) प्राप्त प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस किंवा आयुक्तास प्रदान करणे.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव दिनांक २ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या महासभेत मा. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार दाखल केलेला आहे.

उक्त सादर झालेला अहवालानुसार धुळे शहराच्या व्यापक जनहिताच्या दृष्टीने सदर प्रस्ताव हा तांतडीने शासनाकडेस सादर होणे आवश्यक असल्याने कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास खालील प्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यासाठी उचित फी अदा करणेस मान्यता देण्यांत येत असून याबाबत आयुक्तांनी कार्यवाही करावी.

२) प्रकल्प व्यवस्थापक (PMC) म्हणून काम करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नेमणूक करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याबाबत तांतडीने शासनास कळविण्यांत यावे.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने शासनाकडे निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यांत येत असून यासाठी आवश्यक तो इतर पत्रव्यवहार करणेची कार्यवाही आयुक्तांनी तांतडीने करावी.

४) प्राप्त प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

५) या योजनेसाठी आवश्यक तो पाठपुरावा करणे व अनुषंगिक सर्व कामे करणे इत्यादीसाठी आयुक्तांना प्राधिकृत करणेत येत आहे.

योजनेच्या निकषानुसार धुळे महानगरपालिका स्वत:च्या हिस्सा महानगरपालिका निधीतून अथवा गरजेनुसार कर्जाची उभारणी करुन भरण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन ३% शुल्क महानगरपालिका योजनेच्या निकषानुसार जीवन प्राधिकरणास अदा करेल यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

मा. आयुक्त साहेब यांच्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार विषय पटलावर दाखल झालेला प्रस्ताव

विषय क्रमांक:- ५ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड,प्रकरण-२, नियम १ के नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक नियुक्त करून कामे प्रस्तावित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत शासनाकडेस तांतडीने प्रस्ताव सादर करावयाचे आहे. सदर प्रस्ताव हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन देण्यांचे सकारात्मक आश्वासन दिलेले असून या योजनेअंतर्गत शहरातील मोठे रस्ते योजनेच्या निकषाप्रमाणे समाविष्ट करण्यांत येणार आहे. भाजपाच्या विकासनाम्यानुसार प्राधान्य क्रमाने याबाबत कार्यवाही केली जात आहे. या प्रस्तावासाठी म. केंद्रीय संरक्षण मंत्री ना. सुभाषजी भामरे, तसेचजल संपदा मंत्री ना. श्री. गिरीषजी महाजन, पर्यटन मंत्री ना. श्री. जयकुमारजी रावल, तसेच भाजपा महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांनी महत्वपूर्ण सहकार्य केलेले आहे. या शहर विकासाच्या कामात सर्व प्रभागांना समान न्याय देण्यांत येणार असून हा प्रस्ताव शहराच्या विकासासाठी महत्वाचा

असल्याने मा. आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८ दिनांक०२/०२/२०१९

धुळे महानगरपालिका दिनांक ३० जून २००३ रोजी अस्तित्वात आली असून दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी शहराची हद्द वाढ झालेली आहे. हद्द वाढी पूर्वी धुळे शहराचे क्षेत्रफळ ४६.४६ चौरस किलोमीटर होते. हद्दवाढीनंतर हे क्षेत्रफळ १०१.०८ चौरस किलोमीटर झाले आहे.अल्प उत्पन्न व उत्पन्नवाढीसाठी पडणाऱ्या मर्यादा यामुळे महानगरपालिकेस विकास कामे घेण्यासाठी आर्थिक अडचणी उद्भवतात. विकास योजना आराखड्यानुसार उपेक्षिलेल्या आरक्षणांचा विकास व रस्ते आणि नाले यांसारख्या सुविधा महानगरपालिका स्वनिधीतून पुरवू शकत नाही. धुळे शहराप्रमाणेच आर्थिक दृष्ट्या मर्यादा पडलेल्या मात्र लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या शहरांसाठी राज्य शासनाने सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना सुरू केली असून या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये सर्वसाधारणपणे ४० कोटी रकमेच्या कामांचा प्रकल्प धुळे महानगरपालिकेने नुकताच पूर्ण केला आहे.

माहे डिसेंबर २०१८ मध्ये धुळे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली असून या निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणात सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत कामे घेण्यासाठी सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा केला जात आहे. पूर्वीच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रकल्पासाठी निसर्ग कन्सल्टन्सी, नाशिक यांची कार्यादेश जा क्र /धुमपा बां.वि./५२/२०१४-१५ दिनांक १४ जुलै २०१४ अन्वये प्रकल्प व्यवस्थापक म्हणून अंदाजपत्रकाच्या १.७५ टक्के दराने नेमणूक करण्यात आली होती. तथापि नगरविकास विभागाच्या दिनांक ४ जून २०१८ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्प व्यवस्थापक संस्थेस वेगवेगळ्या टप्प्यावर एकूण ३ टक्केपर्यंत शुल्क देण्याचे निर्देश दिलेले आहेत. धुळे महानगरपालिकेकडे अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग असल्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रकल्पाचा दुसरा टप्पा तयार करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार प्रकल्प व्यवस्थापक नियुक्तीचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार पहिला टप्पा अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजुरी घेणे व शासन मंजुरी घेणे इत्यादी कामासाठी दर ०.७५ टक्के असा आहे. शासनाने निश्चित केलेला दर महानगरपालिकेने करारात नमूद केलेल्या दरापेक्षा खूपच कमी असून महानगरपालिकेच्या हिताचा आहे. नव्याने निविदा मागवून प्रकल्प व्यवस्थापक नियुक्ती करावयाची झाल्यास कालापव्यय होईल व प्रकल्प वेळेत सादर करण्यासाठी अडचणी निर्माण होतील. त्यामुळे प्रकल्पासाठी कार्यादेश जा क्र /धुमपा बां.वि./५२/२०१४-१५ दिनांक १४ जुलै २०१४ अन्वये निसर्ग कन्सल्टन्सी, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापक म्हणून अंदाजपत्रकाच्या १.७५ टक्के इतक्या दराने केलेली नेमणूक शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या दराप्रमाणे सुधारित करून ०.७५ % इतका दर देऊन याच संस्थेकडून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गतच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रस्ताव तयार करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. पूर्वीया संस्थेकडून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पुढील टप्प्यांमध्ये काम करताना शासन निर्णयानुसारच रकमा देय ठरतील अशा प्रकारच्या करारनाम्यामध्ये दुरुस्त्या करणे प्रस्तावित आहे. तसेच पुढील कामकाज करताना खालील अटी पुरवणी करारनामा यात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

१) या संस्थेवर केवळ पहिल्या टप्प्याच्या कामाची जबाबदारी सोपवण्यात आली असून या टप्प्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.७५% हा दर देय राहील.

२) महानगरपालिकेच्या गरजेनुरूप पुढील टप्प्याची कामे शासन निर्णयातील दरानुसार संबंधित संस्थेवर महानगरपालिका आयुक्त सोपवू शकतील. मात्र केवळ पहिल्या टप्प्याचे काम केले म्हणून पुढच्या कामासाठी व या कामासाठी देय ठरणाऱ्या शुल्कासाठी नियुक्त संस्था दावा करू शकणार नाही.

३) अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर प्रकल्प अहवाल तयार करून शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वरील क्रमांक १ नुसार किंवा करारातील शर्तीनुसार संबंधित संस्थेस शुल्काची रक्कम देय ठरेल. केवळ प्रकल्प अहवाल तयार केला या कारणास्तव कोणतीही रक्कम देणे ठरणार नाही.

४) हा करारनामा ठरावापासून पुढे तीन वर्ष किंवा महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना बंद होईपर्यंत यापैकी आधीची दिनांक असेल तोपर्यंत चालू राहील.

५) या करारानुसार करावयाच्या कामांमध्ये शहरासाठीची पाणी पुरवठा योजना आणि शहर किंवा शहराचा भाग गृहित धरून तयार करावयाची मलनिस्सारण योजना ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापक म्हणून नियुक्त केले जात असल्यामुळे या कामांचा समावेश होणार नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापक नियुक्त करून त्यांचेकडून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. तथापि शहराची गरज, कामांचे प्राधान्यक्रम आणि योजनेचे निकष विचारात घेऊन कामाची निश्चिती होणे आवश्यक आहे. या योजनेत घ्यावयाच्या कामांची निश्चिती महासभेसमोर विषय ठेवणे आवश्यक आहे. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आदर्श आचारसंहिता विचारात घेता याबाबत तातडीने निर्णय घेणे व्यापक जनहिताच्या दृष्टिकोणातून आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील परिशिष्ट ड, प्रकरण-2 , नियम 1के अन्वये आयुक्तांना प्राप्त अधिकारानुसार हा प्रस्ताव दिनांक २ फेब्रुवारी २०१९ च्या महानगरपालिका सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त साहेबानी दाखल केलेला प्रस्ताव हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असून व्यापक जनहिताच्या दृष्टीने याबाबत तांतडीने निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. या योजनेतील कामासाठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून निसर्ग कन्सटन्सी नाशिक या संस्थेस नियुक्ती करणेस कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच संबंधित संस्थेशी पुरवणी करारनामा करणेस व त्यात उक्त अहवालातील नमूद अटी समाविष्ट करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच शहराची गरज,कामाचे प्राधान्य क्रम व योजनांचे निकष विचारात घेवून खालील कामे महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत समाविष्ट करण्यांस तसेच प्राधान्य क्रमाने निधीच्या उपलब्धतेनुसार शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच यासाठी आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्रं.	कामाचे नांव
१	वाखारकरनगर भागात वाखारकर बोर्ड ते राजेंद्र सुरी नगर बोर्ड रस्ता तयार करणे.
२	वाडीभोकर रोड नेहरु चौक ते वाडीभोकरगाव पर्यंत रस्ता तयार करणे.
३	पेठ ग.नं. ४,५,६,७ नगरपट्टी ते जमनालाल बजाज रस्ता पावेतो सर्व रस्ते तसेच ग.नं. १ ते आग्रारोड पावेतो रस्ता तयार करणे.

४	साक्रीरोड ते अमरधाम तनेजा यांचे घरा पर्यत रस्ता तयार करणे.
५	३० मी. रोड समतानगर ते निसर्गोपचार केंद्रापर्यत रस्ता तयार करणे.
६	नकाणे रोड सावरकर पुतळा ते नकाणे गांवापर्यत रस्ता तयार करणे.
७	जुनेधुळे कानुश्री मंगल कार्यालय ते बर्फ कारखाना ॲक्सीडेशन पाण्याची टाकी पावेतो रस्ता तयार करणे.
८	वरखेडी रोड रस्ता रामी प्लॉट ते नाल्या पावेतो रस्ता तयार करणे.
९	चक्करबर्डी रोड ते सुरत बायपास पावेतो रस्ता तयार करणे.
१०	८०फूटी रोड नटराज टॉकीज ते बाखारकरनगर बाबुभाई पटेल यांच्या घरापर्यत रस्ता तयार करणे.
११	सुरत बायपास ते गुरुव्दार रोड पर्यत रस्ता तयार करणे.
१२	लेनीन चौक ते धान्य गोडावून ते बायपास हायवे पर्यत रस्ता तयार करणे .
१३	इंदिरा गार्डन गितानगर ते वाडीभोकर रोड पेट्रोल पंपापर्यत रस्ता तयार करणे .
१४	छत्रपती शिवाजी पुतळा ते ८० फूटी रोड पर्यत डी.पी. रस्ता तयार करणे.
१५	स्वराज्य प्रतिष्ठान ते सीताराम माळी चाळ रोड पर्यत डी.पी. रस्ता तयार करणे.
१६	वडजाईरोड ते हजरत सायरा बानो हायस्कूल रोड पर्यत डी.पी. रस्ता तयार करणे .
१७	सुदर्शन कॉलनी ते गणेश नगर पर्यत डी.पी. रस्ता तयार करणे.
१८	श्री.स्वामी नारायण मंदिर ते भगतसिंग नगर आगारोड ड्रायव्हशन पावेतो रस्ता तयार करणे
१९	मोगलाई ते ड्राव्हर सोसायटी ते कब्रस्थान पर्यत रस्ता तयार करणे.
२०	अग्रवालनगर श्री. मुंदडा यांच्या घरापासून ते जांभळे नर्सरी पावेतो रस्ता तयार करणे.
२१	यल्लमा माता मंदिर ते नालारोड पावेतो रस्ता तयार करणे.
२२	देवपूर आग्रारोड हॉटेल हिम ते वृदावन कॉलनी रोड पावेतो रस्ता तयार करणे.
२३	प्रमोदनगर मधुरम मेडिकल ते भरतनगर बोर्ड व भाग्यश्री प-लोअर मिल ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता तयार करणे.
२४	मोहाडी रेल्वे गेट ते म्हाडा वस्ती पावेतो रस्ता तयार करणे.
२५	लिलाबाई चाळ ते राणा यांच्या घरापर्यत ३० मीटर रस्ता तयार करणे.
२६	पाटणी पॅलेस ते ओमशांती सोसायटी पावेतो रस्ता तयार करणे .

नगरोत्थान महाअभियान योजना निर्णय व परिपत्रके किंवा अटी शर्ती याबाबत वेळोवेळी निगमित होणा-या शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करणेस व या संबंधीचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त साहेब यांच्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-2, नियम 1 के नुसार विषय पटलावर दाखल झालेला प्रस्ताव

विषय क्रमांक :- ६ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड, प्रकरण २ नियम १ के नुसार धुळे महानगरपालिका अंतर्गत हद्द वाढ झालेल्या गावांसाठी प्राथमिक सोयी सुविधा विकास

कामांसाठी अनुदान मागणी करणेबाबत तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत , प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणूक करणे व कामांची निश्चिती करणेसाठी व शासन अनुदान मागणीसाठी सर्वसाधारण सभेचा ठराव करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी दाखल झालेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

म. महापौर नव्याने हद्दवाढ झालेल्या गावांमधील विकास कामे करणेसाठी शासनाकडेस यापूर्वी प्रस्ताव सादर झालेला होता. मनपाच्या आर्थिक मर्यादामुळे विकास कामे घेण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे हद्दवचाढ क्षेत्रात विकास कामासाठी विशेष अनुदान मागणीसाठी प्रस्ताव सादर करावयाचे आहे.सदर प्रस्ताव हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन देण्यांचे सकारात्मक आश्वासन दिलेले असून या योजनेअंतर्गत शहरातील मोठे रस्ते योजनेच्या निकषाप्रमाणे समाविष्ट करण्यांत येणार आहे. भाजपाच्या विकासनाम्यानुसार प्राधान्य क्रमाने याबाबत कार्यवाही केली जात आहे. या प्रस्तावासाठी म. केंद्रीय संरक्षण मंत्री ना.सुभाषजी भामरे, तसेचजल संपदा मंत्री ना. श्री. गिरीषजी महाजन, पर्यटन मंत्री ना. श्री. जयकुमारजी रावल, तसेच भाजपा महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांनी महत्वपूर्ण सहकार्य केलेले आहे. मा.आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९ दिनांक ०२/०२/२०१९

दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी धुळे शहराची हद्दवाढ झालेली आहे. हद्द वाढी पूर्वी धुळे शहराचे क्षेत्रफळ ४६.४६ चौरस किलोमीटर होते. हद्दवाढीनंतर हे क्षेत्रफळ १०१.०८ चौरस किलोमीटर झाले आहे.अल्प उत्पन्न व उत्पन्नवाढीसाठी पडणाऱ्या मर्यादा यामुळे महानगरपालिकेस विकास कामे घेण्यासाठी आर्थिक अडचणी उद्भवतात. विकास योजना आराखड्यानुसार अपेक्षिलेल्या आरक्षणांचा विकास व रस्ते आणि नाले यांसारख्या सुविधा महानगरपालिका स्वनिधीतून पुरवू शकत नाही. नागरी क्षेत्रांच्या हद्दवाढ झालेल्या भागामध्ये विकास कामे करण्यासाठी व सदर चा भाग शहरी भागातील नागरी सुविधांची समान पातळीवर आणण्यासाठी राज्य शासनाने हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. त्याचप्रमाणे नागरी क्षेत्रात काही ठिकाणी विकास कामांसाठी नगर विकास विभागामार्फत विशेष अनुदानही दिले जाते.

माहे डिसेंबर २०१८ मध्ये धुळे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली असून या निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणात सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत कामे घेण्यासाठी सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा केला जात आहे. पूर्वीच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रकल्पासाठी निसर्ग कन्सल्टन्सी, नाशिक यांची कार्यादेश जा क्र /धुमपा बां.वि./५२/२०१४-१५ दिनांक १४ जुलै २०१४ अन्वये प्रकल्प व्यवस्थापक म्हणून अंदाजपत्रकाच्या १.७५ टक्के दराने नेमणूक करण्यात आली होती. तथापि नगरविकास विभागाच्या दिनांक ४ जून २०१८ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्प व्यवस्थापक संस्थेस वेगवेगळ्या टप्प्यावर एकूण ३ टक्केपर्यंत शुल्क देण्याचे निर्देश दिलेले आहेत. धुळे महानगरपालिकेकडे अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग असल्यामुळे हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना व विशेष अनुदान योजना या अंतर्गत प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार प्रकल्प व्यवस्थापक नियुक्तीचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रकल्पासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार पहिला टप्पा अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजुरी घेणे व शासन मंजुरी घेणे इत्यादी कामासाठी दर ०.७५ टक्के असा दर आहे. शासनाने निश्चित केलेला दर

महानगरपालिकेने करारात नमूद केलेल्या दरापेक्षा खूपच कमी असून महानगरपालिकेच्या हिताचा आहे. नव्याने निविदा मागवून प्रकल्प व्यवस्थापक नियुक्ती करावयाची झाल्यास कालापव्यय होईल व प्रकल्प वेळेत सादर करण्यासाठी अडचणी निर्माण होतील. त्यामुळे प्रकल्पासाठी कार्यादेश जा क्र /धुमपा बां.वि./५२/२०१४-१५ दिनांक १४ जुलै २०१४ अन्वये निसर्ग कन्सल्टन्सी, नाशिक यांची हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना व विशेष अनुदान योजना यासाठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून अंदाजपत्रकाच्या १.७५ टक्के इतक्या दराने केलेली नेमणूक शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या दराप्रमाणे सुधारित करून ०.७५ % इतका दर देऊन याच संस्थेकडून हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना व विशेष अनुदान या योजनेअंतर्गत प्रस्ताव तयार करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. पूर्वी या संस्थेकडून काम करताना शासन निर्णयानुसारच रकमा देय ठरतील अशा प्रकारच्या करारनाम्यामध्ये दुरुस्त्या करणे प्रस्तावित आहे. तसेच पुढील कामकाज करताना खालील अटी पुरवणी करारनामा यात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

१) या संस्थेवर केवळ पहिल्या टप्प्याच्या कामाची जबाबदारी सोपवण्यात आली असून या टप्प्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.७५% हा दर देय राहील.

२) महानगरपालिकेच्या गरजेनुरूप पुढील टप्प्याची कामे शासन निर्णयातील दरानुसार संबंधित संस्थेवर महानगरपालिका आयुक्त सोपवू शकतील. मात्र केवळ पहिल्या टप्प्याचे काम केले म्हणून पुढच्या कामासाठी व या कामासाठी देय ठरणाऱ्या शुल्कासाठी नियुक्त संस्था दावा करू शकणार नाही.

३) अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर प्रकल्प अहवाल तयार करून शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वरील क्रमांक १ नुसार किंवा करारातील शर्तीनुसार संबंधित संस्थेस शुल्काची रक्कम देय ठरेल. केवळ प्रकल्प अहवाल तयार केला या कारणास्तव कोणतीही रक्कम देणे ठरणार नाही.

४) हा करारनामा ठरावापासून पुढे तीन वर्ष किंवा हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना व विशेष अनुदान योजना बंद होईपर्यंत यापैकी आधीची दिनांक असेल तोपर्यंत चालू राहील.

५) या करारानुसार करावयाच्या कामांमध्ये शहरासाठीची पाणी पुरवठा योजना आणि शहर किंवा शहराचा भाग गृहित धरून तयार करावयाची मलनिस्सारण योजना ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापक म्हणून नियुक्त केले जात असल्यामुळे या कामांचा समावेश होणार नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापक नियुक्त करून त्यांचेकडून हद्दवाढ क्षेत्रास अनुदान देण्याची योजना व विशेष अनुदान योजना अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. शहराची गरज, कामांचे प्राधान्यक्रम आणि योजनेचे निकष विचारात घेऊन कामाची निश्चिती होणे आवश्यक आहे. या योजनेत घ्यावयाच्या कामांची निश्चिती महासभेसमोर विषय ठेवणे आवश्यक आहे.आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आदर्श आचारसंहिता विचारात घेता याबाबत तातडीने निर्णय घेणे व्यापक जनहिताच्या दृष्टिकोणातून आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील परिशिष्ट ड, प्रकरण-२ ,नियम १ के अन्वये आयुक्तांना प्राप्त अधिकारानुसार हा प्रस्ताव दिनांक २ फेब्रुवारी २०१९ च्या महानगरपालिका सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांनी दाखल केलेला प्रस्ताव हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असून व्यापक जनहिताच्या दृष्टीने याबाबत तांतडीने निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे धुळे महानगरपालिका अंतर्गत हद्द वाढ झालेल्या गावांसाठी प्राथमिक सोयी सुविधा विकास

कामांसाठी अनुदान मागणी करणेबाबत तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत , प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणूक करणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. या योजनेतील कामासाठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून निसर्ग कन्सटन्सी नाशिक या संस्थेस नियुक्ती करणेस कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच संबंधित संस्थेशी पुरवणी करारनामा करणेस व त्यात उक्त अहवालातील नमूद अटी समाविष्ट करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच हद्दवाढ झालेल्या भागातील कामांची आवश्यकता व गरज लक्षांत घेवून प्राधान्य क्रमाने निधीच्या उपलब्धतेनुसार खालील कामांची निश्चिती करुन शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

हद्दवाढ क्षेत्रात अनुदान देण्यासाठी हद्दवाढी पासुन पुढे ५ वर्ष अनुदान उपलब्ध होऊ शकते त्यामुळे सादर आलेला सदर प्रस्ताव हा टप्पा एक समजण्यात यावा.

अ.क्र.	कामाचे नाव
१	वरखेडी येथे श्री. दिलीप गंभीर ते वरखेडी रस्त्याने मशिदी पर्यंत पोलिस चौकी पर्यंत रस्ता, गटार, पथदिवे लावणे.
२	वरखेडी गावात दर्जा पासुन ते नाना चौधरी यांचे घरावरुन श्री. मरीमाता मंदिरा पर्यंत रस्ता, गटारी आणि पोल बसविणे.
३	वरखेडी गावात रामनगर येथे नविन परिसरातील काँक्रीटी रस्ते, गटार, पोल बसविणे.
४	वरखेडी इंदीरा नगर भागात अंतर्गत काँक्रीट रस्ता, गटार, पोल बसविणे.
५	वरखेडी रस्ता ते श्री भोले बाबा जुनी भिलाटी पर्यंत काँक्रीट रस्ता, गटार, पोल बसविणे.
६	वरखेडी रस्ता ते बर्फ कारखाना पर्यंत गटार, पोल बसविणे.
७	वरखेडी रस्ता माऊली नगर ते गुरुदत्त कॉलनी पर्यंत रस्ता, गटार, पोल बसविणे.
८	वरखेडी गावात आधुनिक व्यायाम शाळा बांधकाम करणे.
९	वरखेडी गावात स्मशान भुमी, भिंत, रस्ते, बगीचा तयार करणे.
१०	चितोड येथे प्रकाश पाटील ते ओम शांती भवन पर्यंत रस्ता तयार करणे.
११	चितोड येथे रेणुका नगर येथे रस्ता तयार करणे.
१२	चितोड येथे भामरे मोतीलाल ते सुभाष गुरव पर्यंत रस्ता तयार करणे.
१३	चितोड येथे आखाडे ते गोरख गायकवाड पर्यंत रस्ता तयार करणे.
१४	चितोड येथे किरण राजहंस ते पवार पर्यंत रस्ता तयार करणे.
१५	चितोड येथे शिवा नागपुरे ते भिलाटी पर्यंत रस्ता तयार करणे
१६	चितोड येथे रमेश नगर येथे जिभाऊ पाटील ते अंबर गवळी याच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे.
१७	चितोड येथे रमेश नगर येथे वसंत बर्गे ते चांगरे पर्यंत रस्ता तयार करणे
१८	चितोड येथे रमेश नगर येथे वसंत बर्गे ते चांगरे पर्यंत रस्ता तयार करणे
१९	चितोड येथे रमेश नगर येथे रोहिदास मोरे ते हिलाल खलाणे याच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे
२०	चितोड येथे मंगेश नगर येथे भाऊसाहेब माळी ते श्रीकृष्ण मंदिर पर्यंत रस्ता तयार करणे
२१	मोराणे येथे अमरधाम किरकोळ दुरुस्ती व पेवर ब्लॉक बसविणे, तसेच मोराणे गावातील अंतर्गत रस्ते व पोल बसविणे.
२२	मोराणे येथे जुन्या मारोती मंदिराजवळ पेवर ब्लॉक बसविणे.
२३	मोराणे येथे आदिवासी वस्तीत ते एकलव्य पुतळा सुशोभिकरण करणे.

२४	मोराणे गावातुन हाईवे पर्यंत रस्ता, पोल, गटारी इ. तयार करणे.
२५	वलवाडी येथे संताजी चौक ते सुनील चौधरी यांच्याघरा पर्यंत रस्ता, गटार, पोल. इ. करणे.
२६	वलवाडी येथे वडेल रोड ते अंबाजी नगर येथे रस्ता, पोल तयार करणे.
२७	वलवाडी येथे चावरा शाळा ते नकाणे वलवाडी पर्यंत रस्ता, पोल व गटारी तयार करणे.
२८	वलवाडी येथे वलवाडी कॉलनी मध्ये रस्ते तयार करणे.
२९	वलवाडी येथे भोकर गावात राजाराम नगर मध्ये रस्ते तयार करणे.
३०	वलवाडी येथे वलवाडीगाव ते भोकर पर्यंत रस्ता तयार करणे.
३१	वलवाडी येथे इंदिरा नगर मध्ये रस्ते तयार करणे.
३२	वलवाडी येथे भिलाटी मध्ये रस्ते, शौचालय तयार करणे.
३३	वलवाडी येथे ओपन स्पेस मध्ये सरक्षक भित बांधणे
३४	वलवाडी येथे संजय संतोष धनगर ते अनिल वाणी रस्ता डांबरी करण करणे.
३५	वलवाडी येथे गजानन महाराज मंदिर ते गोपाल खैरनार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे.
३६	वलवाडी येथे विजय सिंग जाधव ते पप्पू पाटील ते महाजन याच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे.
३७	वलवाडी येथे दीपक नाईक ते बोरसे नगर ते उदय महाजन याच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे.
३८	वलवाडी येथे विशाल ठाकुर ते भाऊ जोशी याच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे.
३९	वलवाडी येथे महाजन साहेब ते उमाकांत बोरसे याच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे.
४०	नकाने ते मोराणे पांझरा नदीवर पूल बांधणे.
४१	बाळापुर फागणे येथे आदर्श एकता नगर हॉटेल पंकज मागे रस्ते, गटारी व बगीचा तयार करणे.
४२	बिजली नगर भागात नाल्यावर पूल बांधणे .
४३	महिंदळे येथे अनिरुध्द नगर मध्ये गटार बांधणे. व शितल कॉलनी येथे बगीचा व रस्ते तयार करणे.
४४	महिंदळे येथे अंतर्गत रस्ते, गटार व पोल तयार करणे.
४५	महिंदळे येथे अजिक्यतारा सोसा पेवर ब्लॉक बसविणे.
४६	नकाणे येथे कॉक्रीट रस्ते करणे.
४७	भोकर गावात रस्ते, गटार, पोल,स्मशान भूमी विकसित करणे.
४८	पिंपरी येथे रस्ते, गटार, पोल , स्मशान भूमी विकसित करणे.
४९	नॅशनल हाईवे ते पिंपरी गावा पर्यत हॉटेल साहिल पासुन रस्ता तयार करणे.
५०	बाळापुर शिवार हाईवे गॅस पंप पासुन ते कृष्ण नगर, लक्ष्मी नगर, पावेतो रस्ते, गटार, पोल इ. तयार करणे.
५१	बाळापुर येथे विश्वकर्मा मंदिर येथे लेडीज जेन्ट्स शौचालय, पोल , गावात अंडर ग्राउंड गटार , तयार करणे.
५२	बाळापुर येथे बाळापुर फाटा ते विश्वकर्मा पर्यंत रस्ता ९ मीटर कॉक्रीट गटार, पोल इ. करणे.
५३	बाळापुर येथे स्मशान भूमी पेवर ब्लॉक गेट, गावातील नवीन वसाहत मध्ये रस्ते करणे.
५४	अवधान येथे धनदाई माता मंदिर ते मुंबई आग्रा हाईवे रस्ता करणे.
५५	अवधान येथे निंबा नगर भागात रस्ते, गटार, पोल बसविणे.
५६	अवधान येथे ओम शांती केद्रांजवळ कॉलनी अंतर्गत रस्ते, गटार, पोल बसविणे.
५७	नॅशनल हाईवे नं 3 मुल्ला ढाबा ते अन्वर नाल्या पावेतो 100 फुटी रस्ता तयार करणे.
५८	नॅशनल हाईवे नं 3 पासुन ते करीम भाई यांच्या शेतापर्यंत 50 फुटी रस्ता तयार करणे.
५९	बाळापुर भिलाटी शौचालय बांधणे नवा प्लॉट मध्ये रस्ते कॉक्रीट करणे.

६०	बाळापुर येथे नवा प्लॉट मध्ये शौचालय बांधणे.
६१	बाळापुर येथे जुने गाव लेडीज शौचालय बांधणे
६२	अवधान येथे डिसान ॲग्रो पासुन रानमळा फाटया पावेता रस्ता, गटार, पोल बसविणे.
६३	अवधान येथे भिलाटी मध्ये रस्ते कॉक्रीट करणे गटार पोल बसविणे.
६४	अवधान येथे स्मशान भुमी ते मोहाडी पर्यंत रस्ता, गटार, पोल बसविणे.
६५	अवधान येथे ओपन स्पेस गार्डन तयार करणे.
६६	अवधान येथे स्मशान भुमी, पेवर ब्लॉक, लाईट, संरक्षण भिंत व ओटे तयार करणे.
६७	वलवाडी येथे साळुंखे ते आयोध्या नगर पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
६८	वलवाडी येथे सरस्वती मंगल कार्यालय ते शिवनेरी डीपी पर्यत रस्ता डांबरी करण करणे.
६९	वलवाडी येथे गोकुळ गुरव ते विटा भट्टी लोनारीसर याच्या घरापर्यत रस्ता डांबरी करण करणे.
७०	वलवाडी येथे नरेंद्र ठाकूर ते राजेंद्र भदाणे याच्या घरापर्यत रस्ता डांबरी करण करणे.
७१	वलवाडी येथे रामकृष्ण नगर भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं १४५ पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
७२	वलवाडी येथे समृध्द नगर भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ४७ पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
७३	वलवाडी येथे सुदेव कॉलनी प्लॉट नं १ ते प्लॉट नं ३६ पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
७४	वलवाडी येथे प्राथमिक शिक्षक कॉलनी भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ४८पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
७५	वलवाडी येथे नंदनवन सोसा भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं १०८ पावेतो रस्ता डांबरी करण करणे.
७६	वलवाडी ग्रामपंचायत ऑफिस ते नकाणे रोड साई बाबा मंगल कार्यालय जवळच्या पुलापर्यंत रस्ता, गटार तयार करणे.
७७	वलवाडी येथे एकता नगर भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ९३पर्यत रस्ता डांबरी करण करणे.
७८	वलवाडी येथे गुलमोहर कॉलनी भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ११८ पर्यत रस्ता डांबरी करण करणे.
७९	वलवाडी येथे कृष्णा सोसा भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ४८पर्यत रस्ता डांबरी करण करणे.
८०	वलवाडी येथे किशोर अप्पाचा मळा भागात प्लॉट नं १ ते प्लॉट नं ३७ पर्यत रस्ता डांबरी करण करणे.
८१	महिंदळे येथे भगवान सोसा मध्ये पेवर ब्लॉक बसविणे.
८२	महिंदळे येथे आदिवासी वस्तीत आई मरिमाता मंदिरा जवळ पेवर ब्लॉक बसविणे.

या संदर्भातील निर्णय व परिपत्रके किंवा अटी शर्ती याबाबत वेळोवेळी निगमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करणेस व या संबंधीचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२८ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत सभागृह,धुळे
गुरुवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९
वेळ दुपारी ४-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क)(ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज गुरुवार **दिनांक २८/०२/२०१९ रोजी दुपारी ४-०० मा. श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर, धुळे** महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यात आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	दुपारी ४-०० वाजतां
२	मा. सौ. अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
८	माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
९	बाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
१०	नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
११	जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१२	अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्य	----------" ---------
१३	पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१४	सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१५	बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१६	चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१७	बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१८	वाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१९	गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------

२०	देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
२१	भिल निंबाबाई फुलसिंग	सदस्या	----------" ---------
२२	पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२३	पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२४	अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य	----------" ---------
२५	बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२६	उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२७	रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२८	अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२९	अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
३०	जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
३१	मंडोरे बालीबेन प्रकाशचंद	सदस्या	----------" ---------
३२	भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३३	जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३४	वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३५	सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३६	पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
३७	बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
३८	थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३९	कर्पे प्रदिप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
४०	अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
४१	शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
४२	मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
४३	पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
४४	अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
४५	शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
४६	अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
४७	खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
४८	जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
४९	पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
५०	खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
५१	ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
५२	पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
५३	जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
५४	जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
५५	बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
५६	सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
५७	खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------

५८	मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
५९	उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
६०	मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
६१	नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
६२	बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
६३	देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
६४	अग्रवाल सारिका प्रविन	सदस्या	----------" ---------
६५	पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
६६	मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
६७	पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
६८	पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
६९	खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
७०	मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
७१	गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
७२	मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
७३	शिंदे सोनल दिलीप	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. सुधाकर देशमुख	आयुक्त	दुपारी ४-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. एन.पी. सोनार	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
७	श्री.नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
९	डॉ. बी.वी. माळी	आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१३	श्री.युवराज वाघ	परवाना विभाग अधिक्षक	----------" ---------
१४	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१५	श्री.रा.र. गायकवाड	लिपीक मनपा शि.मं.	----------" ---------
१६	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
१७	श्री. आर.व्ही. पाटील	अभिलेखपाल	----------" ---------
१८	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग प्रमुख	----------" ---------
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी,नगरसेवक बंधु भगिंनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया

१) दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताफयावरील जवानावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला सदर हल्लयात भारतीय सीआरपीएफचे ४४ जवान शहीद झाले होते. भारतीय जवानांना आज रोजीच्या महासभेत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा, धुळे

२) दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताफयावरील जवानावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला सदर हल्लयात भारतीय सीआरपीएफचे ४४ जवान शहीद झाले होते. भारतीय जवानांना आज रोजीच्या महासभेत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- सौ. वैशाली भिकन वराडे, नगरसेविका, मनपा, धुळे

अनुमोदक:- सौ. स्नेहल संजय जाधव नगरसेविका, मनपा, धुळे

३) जम्मू काश्मीरच्या पुलवामात झालेल्या दहशदवादी हल्ल्यात भारताचे ४५ वीर जवान शहीद झाले, दहशदवाद माजवणा-या पाकिस्तानचा निषेधाचा ठराव तसेच शहीद झालेल्या वीर जवानाना श्रध्दांजली वाहण्यासाठी धुळे महानगरपालिकेच्या महासभेत ठराव प्रस्ताव मांडल्यात यावा ही विनंती.

सूचक :- सौ. किरण राकेश कुलेवार, नगरसेविका, मनपा धुळे

४) जम्मू काश्मीर राज्यातील पुलवामा जिल्ल्हयात १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय निमलष्करी दलाच्या जवानांवर भ्याड हल्ला केला आणि त्यात सुमारे ४२ जवानांना वीर मरण आले. शहीद झालेल्या या सर्व जवानांना धुळे मनपाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्याचा ठराव करण्यांत यावा.

सूचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, नगरसेवक, मनपा, धुळे

५) दि १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे जम्मूहून श्रीनगरला जाणा-या केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) ताप-यावर झालेल्या आत्मघाती हल्ल्यात भारतमातेचे ४२वीर जवान शहीद झाले होते. देशात सुरक्षा जवानांवर झालेला आतापर्यंतचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला होता. या हल्ल्यामुळे देशभर संतापाची लाट उसळली आहे यामुळे यात आपले ४२ वीर जवान शहीद झाले त्यांना महासभेत श्रध्दांजली देवून ठराव पारीत करण्यांत यावा.

तसेच दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे जम्मूहून श्रीनगरला जाणा-या केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) ताप-यावर झालेल्या आत्मघाती हल्लयाची जबाबदारी पाकिसतान पुरस्कृत जैश ए महोम्मद या अतिरेकी संघटनेने स्वीकारली होती. यामुळे कायम आंतकवादी संघटना यांना आपल्या भूमीचा वापर करु देणे त्यांना भारत विरोधी कारवाई करण्यासाठी सर्वोपरी मदत करणे हीच पाठीत खंजीर खुपसण्याची भूमिका पाकिस्तान पार पाडत आला आहे. यामुळे या सर्व आंतकवादी संघटना आणि त्यांचा पालहार देश पाकिस्तानचा महासभेत तीव्र निषेध करुन ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

६) पुलवामाच्या भ्याड हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवांनाना श्रध्दांजली व धुळे शहरातील नामवंत शहीर श्री.भटू गिरमकर यांची अल्पशा आजाराने दि. १२/०२/२०१९ रोजी निधन झाल्याने श्रध्दाजली व वायुसेनेने पाक हद्दीत घुसुन दहशत वाद्यांच्या तळावर केलेल्या पराक्रमा बद्दल अभिनंदनाचा ठराव करावा ही विनंती.

सूचक :- सौ. सुरेखा चंद्रकांत (रावसाहेब) उगले, नगरसेविका,मनपा धुळे

अनुमोदक:- शितलकुमार नवले, नगरसेवक, मनपा धुळे

अमोल मासुळें, नगरसेवक, मनपा धुळे

वंदनाताई मराठे, नगरसेविका, मनपा धुळे
संतोष खताळ, नगरसेवक, मनपा धुळे
शशीभाऊ मोगलाईकर नगरसेवक, मनपा धुळे

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या यादयानुसार दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताफयावरील जवानावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला सदर हल्लयात भारतीय सीआरपीएफचे ४४ जवान शहीद झाले होते सर्व शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १० दिनांक २८/०२/२०१९

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताफयावरील जवानावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला सदर हल्लयात भारतीय सीआरपीएफचे ४४ जवान शहीद झाले होते. तसेच धुळे शहरातील नामवंत शहीर श्री. भटू गिरमकर यांची अल्पशा आजाराने दि. १२/०२/२०१९ रोजी निधन झाले आहे.

वरील मान्यवरांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांच्या कुटुंबियाच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांच्या दु:खद निधनानिमित्त मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे जम्मूहून श्रीनगरला जाणा-या केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) ताप-यावर झालेल्या आत्मघाती हल्लयाची जबाबदारी पाकिस्तान पुरस्कृत जैश ए महोम्मद याअतिरेकी संघटनेने स्वीकारली होती.यामुळे कायम आंतकवादी संघटना यांना आपल्या भूमीचा वापर करु देणे त्यांना भारत विरोधी कारवाई करण्यासाठी सर्वोपरी मदत करणे हीच पाठीत खंजीर खुपसण्याची भूमिका पाकिस्तान पार पाडत आला आहे. यामुळे या सर्व आंतकवादी संघटना आणि त्यांचा पालनहार देश पाकिस्तानचा ही सभा जाहीर निषेध करीत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाच्या यादया.

भारतीय वायुसेनेचा व भारतीय सेनेचा अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत

१) दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताप-यावरील जवानांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. सदर हल्ल्यात भारतीय सीआरपीएफचे ४४जवान शहीद झाले होते. सदर पुलवामातील दहशतवादी हल्ल्यामुळे भारतीयांचे रक्त संतापाने सळसळत असतांनाच भारतीय वायुसेनेच्या १२ विमानांनी दि.२६/२/२०१९ मंगळवार रोजी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानत प्रवेश केला व दहशतवाद्यांचे तळ पूर्णपणे उध्यवस्त केले. भारताने पाकिस्तानात त्यांच्या घरात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केला. या हल्ल्यात सुमारे ३२५ दहशतवादी व त्यांचे २५ कमांडर ठार झाले. भारतीय वायुसेनेने केलेल्या उल्लेखनीय तसेच धोका पत्करुन केलेल्या धाडसी कामगिरीबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. हिरामण विठ्ठल गवळी, नगरसेवक, मनपा धुळे
अनुमोदक :- श्री. संजय शत्रुघ्न भिल, नगरसेवक, मनपा धुळे

२) भारताने दि. २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानविरोधात एअर स्ट्राईक करीत मोठी कारवाई केली. भारतीय वायुसेनेच्या हमराज २००० या लढाऊ विमानांनी मंगळवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसुन जैश ए मोहम्मद सह दहशतवादी संघटनांच्या तळावर १००० किलोग्रॉम वजनाच्या

बॉम्बचा वर्षाव केला. एकाच तडाख्यात तब्बल ३५० दहशतवाद्यांचा खात्मा करीत पुलवामा येथे शहीद झालेल्या ४० भारतीय जवानांच्या बलिदानाचा बदला घेतला.

हिंदुस्तानचे लाडके पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी पाकिस्तानवर कारवाई करण्याचा ऐजिहसिक निर्णय घेतला. तसेच भाताने केलेल्या या मोठया कारवाईच्या सर्व अतिमहत्वपूर्ण घडामोडीमध्ये खान्देशचे सुपुत्र तथा धुळे लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार आदरणीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे हे देखील सक्रीयपणे सहभागी झाले. त्यांच्या या कामगिरीमुळे धुळे जिल्हयातील तमाम जनतेची छाती अभिमानाने फुलुन आली. म्हणून लाडके पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब आणि खान्देशचे सुपुत्र ना. डॉ. सुभाषजी भामरे यांच्या कार्याबद्दल सभागृहात त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे तो सर्वानुमते करण्यात यावा.

सुचक:- श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, नगरसेवक मनपा धुळे

३) दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताप-यावरील जवानांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. सदर हल्ल्यात भारतीय सीआरपीएफचे ४४जवान शहीद झाले होते. सदर पुलवामातील दहशतवादी हल्ल्यामुळे भारतीयांचे रक्त संतापाने सळसळत असतांनाच भारतीय वायुसेनेच्या १२ विमानांनी दि.२६/२/२०१९ मंगळवार रोजी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानत प्रवेश केला व दहशतवाद्यांचे तळ पूर्णपणे उध्यवस्त केले. भारताने पाकिस्तानात त्यांच्या घरात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केला. या हल्ल्यात सुमारे ३२५ दहशतवादी व त्यांचे २५ कमांडर ठार झाले. भारतीय वायुसेनेने केलेल्या उल्लेखनीय तसेच धोका पत्करुन केलेल्या धाडसी कामगिरीबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा, धुळे

४) दिनांक १४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताप-यावरील जवानांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. सदर हल्ल्यात भारतीय सीआरपीएफचे ४४जवान शहीद झाले होते. सदर पुलवामातील दहशतवादी हल्ल्यामुळे भारतीयांचे रक्त संतापाने सळसळत असतांनाच भारतीय वायुसेनेच्या १२ विमानांनी दि.२६/२/२०१९ मंगळवार रोजी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानत प्रवेश केला व दहशतवाद्यांचे तळ पूर्णपणे उध्यवस्त केले. भारताने पाकिस्तानात त्यांच्या घरात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केला. या हल्ल्यात सुमारे ३२५ दहशतवादी व त्यांचे २५ कमांडर ठार झाले. भारतीय वायुसेनेने केलेल्या उल्लेखनीय तसेच धोका पत्करुन केलेल्या धाडसी कामगिरी केली. ही अभिमानाची बाब आहे. जगातील मजबूत सैन्य आणि देशापैकी भारत एक देश असल्याचे सैन्याने सिध्द केले आहे.

या यशस्वी कामगिरीबद्दल तसेच कणखर निर्णय घेतल्याबद्दल भारताचे लाडके पंतप्रधान मा. ना. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब, तसेच केर्दीय संरक्षण राज्यमंत्री मा. ना. श्री डॉ.सुभाष भामरे यांचा घडामोडीत सक्रिय सहभाग राहिला तसेच भारतीय हवाई दल यांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सूचक :-श्री.युवराज(आण्णा) चैत्राम पाटील, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे
अनुमोदक:- श्री. प्रदीप बाळासाहेब कर्पे, नगरसेवक, मनपा, धुळे
श्री. देवेंद्र चंद्रकांत सोनार, नगरसेवक, मनपा धुळे
श्री. रावसाहेब आनंदराव नांद्रे, नगरसेवक, मनपा, धुळे

५) दि १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे जम्मूहून श्रीनगरला जाणा-या केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) ताप-यावर झालेल्या आत्मघाती हल्ल्यात भारतमातेचे ४२ वीर जवान शहीद झाले होते. देशात सुरक्षा जवानांवर झालेला आतापर्यंतचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला होता. या हल्ल्यामुळे देशभर संतापाची लाट उसळली आहे यामुळे यात आपले ४२ वीर जवान शहीद झाले. देशात सुरक्षा जवानांवर झालेला आतापर्यंतचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला होता. या हल्ल्यामुळे देशभर संतापाची

लाट उसलेली आहे. यामुळे यात आपले ४२ वीर जवान शहीद झालेल्या जवानाच्या हल्याचा बदला घेतला जाईल तसेच त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते.

यामुळे या आत्मघाती हल्ल्याची जबाबदारी पाकिस्थान पुरस्कृत जैश ए मोहम्मद या अतिरेकी संघटनेने स्विकारली होती. यामुळे त्यांच कायम स्वरुपी नायनाट करण्यासाठी दिनांक २६/२/२०१९ मंगळवार रोजी पहाटे ३-३० वाजतां भारतीय वायूदलाच्या टीमने पाकिस्थानातील आतंकवादी यांच्या आडयावर बॉम्बचा वर्षाव केला यात सुमारे ३०० दहशतवादी ठार झाले होते. यामुळे देशाच्या इतिहासात पहिल्यांदा जश्यास तसे उत्तर देण्याचे काम झाले आहे. याकरिता भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी, केंद्रीय संरक्षणमंत्री भारत सरकार श्रीमती निर्मला सितारमनजी , खान्देशाचे सुपत्र केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरेजी, भारताच्या सुरक्षा यंत्राणेचे प्रमुख श्री. अजीत डोवालजी यांच्या विशेष आदेशाने तीनही सैन्यदलाच्या बैठकीत एअर स्ट्राईक करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी वायुसेनेने पार पाडली आहे. यामुळे संबंध जगात भारताच्या ताकदीचा गौरव झाला आहे.यामुळे सदर महासभेत भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी, केंद्रीय संरक्षमंत्री भारत सरकार श्रीमती निर्मला सितारमनजी खान्देशाचे सुपुत्र केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरेजी आणि तिनही सैन्यदलाचे विशेष अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

म.हिरामण गवळी म.महापौर महोदय, १४ फेब्रुवारी रोजी या भारत देशावर पाक निर्मित आतंकवादी जैश-ए मोहम्मंद या संघटनेच्या अतिरेक्यांनी आपल्या देशाचे CRPF चे जवान हे आपल्या ड्युटीवर असतांना ज्या जागेवर त्यांची नियुक्ती होती त्या ठिकाणी ते जात असतांना २०० किलो चा RDS घेवून या अतिरेक्यांनी त्या गाडीवर हल्ला करुन ४६ जवान त्या ठिकाणी अतिशय चिंधड्या- चिंधड्या देहांच्या झाल्या आहेत. जेव्हा ही बातमी दुरदर्शन चॅनल वरुन आली तेव्हा सारा देश थक्क झाला दिवसभर या बातम्या येत असतांना देशातील लहानात —लहान,मोठयांतील मोठा स्त्री पुरुष यांनी अतिशय हळहळ व्यक्त केली आणि देशातील सर्व धर्मिय लोकांमध्ये प्रथमत: देशातील एकजुट दिसुन आली. सर्वधर्मियांनी रस्त्यावर येवून या घटनेचा निषेध केला आणि आपल्या शहिद जवानांना श्रध्दांजली म्हणुन अनेक प्रकारचे कार्यक्रम केले. त्यांच्या आत्मीयांना शांती मिळावी आणि त्यांच्या घरच्या लोकांना दु:ख सहन करण्याची बळ-शक्ती मिळावी म्हणुन प्रार्थना झाल्यात. मंदिरात मशिदीत तसेच चर्च मध्ये झाल्यात. आणि त्या दिवसापासुन मा. पंतप्रधान साहेबांना प्रत्येक जनतेची मागणी होती की या घटनेचा बदला घेतला पाहिजे. आणि त्याच दिवशी रात्री अतिरेक्यांनी जाहीर केले की या हल्लयामंध्ये जैश-ए मोहम्मंद चा हात आहे. आणि आम्ही ते स्विकारतो. त्या दिवसापासुन लोकांनी सांगितले त्याचा बदला घेतला पाहिजे. १४ तारखेनंतर १६ तारखेला मा. पंतप्रधान मोदी साहेब शासकिय कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी धुळे येथे जेव्हा आले. त्या दिवशीच नागरीकांमधुनही आवाज गेला आणि त्या दिवशी मोदी साहेबांनी सांगितले की, जो मेरे दिल में है, वह तुम्हारे भी दिल में है। में शहिदोंका बलिदान खाली नहीं जाने दुगाँ। उसका बदला लेके रहुँगा। १२ दिवसानंतर १३ व्या दिवशी २६ फेब्रुवारीला आपल्या देशाचे पंतप्रधान १२ दिवस शांत बसले नव्हते आणि सगळी रचना करुन पुर्ण पणे त्यांनी २६ तारखेला पहाटे साडे तीन वाजता या हल्यांचा बदला घेतला तो फक्त पी.ओ.पी आणि एन.ओ.पी रेषेमध्ये अतिरेक्यांचे तळ होते ते उध्वस्त केले आणि उध्वस्त करुन त्यात ३५० आतिरेकी मारले गेले गेले आहेत. सारी जनता नव्हे तर ज्या माता महिलांचे पती शहीद झाले होते त्या म्हणला आपल्या पतीचा तसेच मुलांचा बदला घेतला. परंतु या सरकार ने तीनही दलाच्या सैनिकांना सुट दिली तुमच्यावर कुणाचेही बंधन नसेल यावर त्यांना मोकळीक दिली. एफ-१६ या विमानाने जाऊन त्या ठिकाणी हल्ला केला त्या हल्ल्याच्या दिवशी आपल्या आपल्या अभिमानाची गोष्ट आहे. धुळे लोकसभा मतदार संघाचे खासदार तसेच संरक्षण राज्य मंत्री मा. ना.डॉ. सुभाषजी भामरे हे २४ तारखेला धुळयामध्ये कार्यक्रम होता. लोकसभेच्या सभापती सुमित्रा महाजन या धुळयामध्ये होत्या आणि त्यांना आम्ही विमानतळावर घ्यावयास गेलो

त्यावेळेस बाबांना त्याठिकाणी फोन आला की लवकरात लवकर दिल्लीला पोहचणे बाबांनी एवढेच सांगितले की, आता या देशाचे सभापती आलेले आहेत. लवकर कार्यक्रम आटोपुन मला जावयाचे आहे. तात्काळ बाबा गेले २५ तारखेला ५ लोक वाररुम मध्ये होते. त्यात बाबा डॉ. सुभाषजी भामरे हे सुध्दा त्या ठिकाणी होते तिन्ही दलाचे प्रमुख गृहमंत्री आणि संरक्षण राज्य मंत्री जेव्हा संरक्षण मंत्री यांनी आदेश दिला आदेशानुसार हल्ला करणेत आला. कुठलाही अधिकारी / पदाधिकारी सैन्यात जाऊन लढु शकत नाही. यात सर्वात मोठे श्रेय असेल ते अजित डोहाल साहेबांचे त्यांनी पुर्ण आराखडा तयार करुन हल्ला केला. २६ तारखेला बदला घेवुन आपण या शासनाचा तिन्हीं दलाचे सैनिक या मध्ये ज्यांनी - ज्यांनी सहभाग घेतला महत्वाचे म्हणजे महिलांनी विमान चालविले. आपल्या देशाचे संरक्षण राज्य मंत्री बाबा हे स्पेशल वाररुम मध्ये होते अधिका-यांसोबत होते या गोष्टीचा आम्हांला गर्व आहे. आज आमचा खासदार हा संरक्षण राज्यमंत्री असल्याने आणि पुर्णपणे मा. पंतप्रधान मोदीजींच्या खांद्याला खांदा लावुन काम करत होते. आपण २५ तारखेला बघीतले शहीदांचे स्मारक बनविले त्या ठिकाणी फक्त तीनच लोक होते मोदी साहेब,श्रीमती.सितारामन,आणि मा.श्री.डॉ.सुभाषजी भामरे साहेब. आपल्याला अभिमान वाटावा अशी ही घटना झालेली आहे. आणि म्हणुन या ठिकाणी ज्या—ज्या अधिका-यांनी सेना प्रमुखांनी त्यामध्ये सगळ्यांचा सहभाग आहे. आणि म्हणुन आज आम्ही सर्व नगरसेवक बंधु भगिनींनी जो अभिनंदनाचा ठराव मांडला आहे तो पारित करणेत यावा ही विनंती.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या यादयांनुसार अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११ दिनांक २८/०२/२०१९

दिनांक१४/२/२०१९ रोजी जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे झालेल्या सीआरपीएफ ताप-यावरील जवानांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला.सदर हल्ल्यात भारतीय सीआरपीएफचे ४४जवान शहीद झाले होते. सदर पुलवामातील दहशतवादी हल्ल्यामुळे भारतीयांचे रक्त संतापाने सळसळत असतांनाच भारतीय वायुसेनेच्या १२ विमानांनी दि.२६/२/२०१९ मंगळवार रोजी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडुन पाकिस्तानात प्रवेश केला व दहशतवाद्यांचे तळ पूर्णपणे उध्वस्त केले.भारताने पाकिस्तानात त्यांच्या घरात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केला.या हल्ल्यात सुमारे ३२५ दहशतवादी व त्यांचे २५ कमांडर ठार झाले.भारतीय वायुसेनेने केलेल्या उल्लेखनीय तसेच धोका पत्करुन केलेल्या धाडसी कामगिरी केली. ही अभिमानाची बाब आहे. जगातील मजबूत सैन्य आणि देशापैकी भारत एक देश असल्याचे सैन्याने सिध्द केले आहे.

या यशस्वी कामगिरीबद्दल तसेच कणखर निर्णय घेतल्याबद्दल भारताचे लाडके पंतप्रधान मा. ना. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब, केंद्रीय संरक्षणमंत्री भारत सरकार श्रीमती निर्मला सितारमनजी,तसेच केर्दीय संरक्षण राज्यमंत्री मा. ना.श्री डॉ.सुभाष भामरे यांचा घडामोडीत सक्रिय सहभाग राहिला तसेच भारतीय हवाई दल यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा. सदस्या सौ.हेमा अनिल गोटे, सौ. किरण राकेश कुलेवार, सौ. मंगलाताई अर्जुन चौधरी यांनी दि. २८/२/२०१९ रोजीच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२ दिनांक २८/०२/२०१९

सन्मा.सदस्या सौ. हेमा अनिल गोटे, सौ.किरण राकेश कुलेवार, सौ. मंगलाताई अर्जुन चौधरी यांनी दिनांक २८/२/२०१९ रोजीच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- 7 — मागील महासभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (दि.20/8/2018 तहकूब सभा 27/8/2018 व 19/10/2018)

म.नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. संजय जाधव — सन्मा.महापौर महोदय,आपल्या 20/8/2018रोजीचे जे इतिवृत्त सादर झालेले आहे. त्यासंदर्भात मी माझे मत व्यक्त करणार आहे. विषय क्रमांक 99 ठराव क्रमांक 131 स्थानिक लेखापरीक्षण अहवाल हा सदस्यांच्या माहितीसाठी ठेवण्यात आला होता. आपण 2010-11 पासुनते2013-14पर्यंतचे लेखा परिक्षण अहवाल या सभागृहापुढे ठेवुन आपण अनुपालनासाठी पुढील खात्याकडे वर्ग केलेले आहेत. मला या विषयाबाबत विचारायचे आहे. या 4 ते 5 वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान ज्या काही नस्त्या, कागदपत्र लेखापरिक्षणास पुरविले गेल्या नाहीत ते आपल्याला माहिती आहे का ? याच्यावर आपण काही कार्यवाही , नोटीस देण्यात आली आहे का ? नस्त्या सादर करण्यात आल्या नाहीत म्हणजेच भ्रष्टाचार उघडकीस आला नाही. यावर आपण आयुकत म्हणुन काय कार्यवाही केलेली आहे.

म. आयुक्त सो. — आपण स्पेसिपीक प्रकरणाचा उल्लेख करावा.

म. संजय जाधव — जवळ जवळ 80 % टक्के प्रकरणे असे आहेत त्यांच्या नस्त्यांमधुन एखादा कागद काढून घ्यावयाचा कागद द्यावयाचा नाही म्हणजे तुमचे लेखापरिक्षण होऊ शकणार नाही. लेखापरिक्षण पुर्ण झाले नाही म्हणजे हा भ्रष्टाचार आहे.आपली या प्रकरणांमध्ये आयुक्त म्हणुन काय जबाबदारी आहे? याचा खुलासा करावा.

म. आयुक्त सो. — आपल्याला माझ्या कडुन नेमके काय अपेक्षित आहे.

म. संजय जाधव — या धुळे महानगरपालिकेत 4 ते 5 वर्षा पासुन लेखापरिक्षण सुरु आहे. काही वर्षाचे झाले काही वर्षाचे सुरु आहे. बऱ्याच आपल्या विभागप्रमुखांनी त्यावेळेस लेखापरिक्षणा दरम्यान भ्रष्टाच्याराच्या फाईल्स् किंवा जी काही कागदपत्रे आहे. ते लेखापरिक्षणास पुरविले गेले नाही.

म. आयुक्त सो. — आपण पहिल्यांदा महासभेसमोर विषय सादर केलेला होता. नगरपालिका असतांना आपण नगराध्यक्ष होता. तशी आपली चर्चाही अशी झाली आहे. की लेखापरिक्षण आक्षेप फक्त प्रशासनाचाच असतो असे नाही आपल्या महानगरपालिकेवर आक्षेप आहे.आणि त्याच्या

(complience)अनुपालनाची जबाबदारी आपली आहे.महानगरपालिकेचे लेखापरिक्षण झाल्यानंतर लेखापरिक्षण अहवाल महासभेसमोर दिला जातो.त्यानंतर सदर आक्षेपांचे अनुपालन करणेसाठी संबंधीत विभागाकडे सादर करणेत येतो व विभागामार्फत त्याचे अनुपालन करणेत येते. आता सन 2014-15चे लेखापरिक्षण पुर्ण झाले आहे. सन 2015-2016 व 2016-17 चे सुरु होत आहे. आता त्याच्या अनुपालनामध्ये प्रक्रिया आहे. संबंधीत विभागाच्या लेखापरिक्षण पत्राच्या मान्यतेने औरंगाबाद विभागाची मान्यता होवुन अनुपालन अंतिम मान्य करणेसाठी संचालक स्थानिक निधी लेखा विभाग कोकण भुवन मुबंई यांचे कडेस सादर करणेत येते.मनपाने सदर कालावधीचे लेखाआक्षेपाचे अनुपालने यापुर्वीच मान्यतेच्या कार्यवाहीस सादर केलेले आहे. आलेल्या आक्षेपातील महत्वपुर्ण अनियमीतता असलेले आक्षेप यांची निवड संचालकामार्फत लोकलेखा समितीच्या मान्यतेने परिच्छेद समाविष्ट केले जातात. त्याच्यावर राज्य शासन कार्यवाही करते ते आपल्याकडे होत नाही लेखापरिक्षणातील आक्षेपाची पुर्तता जी आहे.आपण त्यांना दुरुस्ती सादर करावयाची आहे. त्याच्या मधील अनियमीतता ज्या आहे. त्या पुन्हा समितीकडे जातात. आपल्या स्तरावर ते नाही आहे. आपण अनुपालन सादर करणे तेच आपल्या हातात आहे.

म. संजय जाधव — आपण मला वेगळी प्रक्रीया सांगत आहात. मी आपल्याला वेगळी प्रक्रिया सांगत आहे. लेखापरिक्षण सुरु असतांना जी कार्यवाही सुरु असते त्या कालावधीत लेखापरिक्षण जर त्या कार्यकाळात संबधीत कर्मचारी हे त्या फाईल्स् उपलब्ध करुन देत नाही.

म. आयुक्त — यावर मी खुलासा करतो की, ज्या वेळेस समजा मी लेखापरिक्षक आहे. 2011-12 चे लेखापरिक्षण झालेले असतांना सन 2012-13 चे लेखापरिक्षण करायला ज्यावेळेस येतो त्यावेळेस सन 2011-2012 चे लेखापरिक्षणाचे अनुपालन झालेले नाहीत ते 2012-13 चे लेखापरिक्षण करतानां बघुन घ्यावयाचे असतात आणि 2012-13 चे लेखापरिक्षण करतांना लेखे मागवावयाचे असतात. पुन्हा ते लेखापरिक्षक हे जे अनुपालन केलेले नाही. ते मागवावयाचे असतात.

म. संजय जाधव — याबाबत आपली आयुक्त म्हणुन काय जबाबदारी आहे.

म. आयुक्त सो. — वेळेच्या वेळी रेकॉर्ड सादर करणे ही जबाबदारी आहे.

म. संजय जाधव — आपण संबधीत अधिकारी कर्मचारी यांना कागदपत्र, नस्त्या न पुरविण्याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत का?

म. आयुक्त सो. — माझ्या समोर जे लेखापरिक्षण झाले आहे.त्यावेळेस आपण काही कर्मचाऱ्यांना दंड सुध्दा केलेला आहे.याबाबत आपले मनपा चे मुख्यलेखापरिक्षक हे लेखापरिक्षणा बाबत तसेच कर्मचारी अधिकारी यांना काय-काय नोटीसा दिल्या याबाबत स्पष्टीकरण देतील.

म. उपमुख्य लेखापरिक्षक — लेखापरिक्षणाच्या सुरवातीस कार्यालयाने कर्मचारी व अधिकाऱ्यांनी लेखापरिक्षणास लेखे कागदपत्रे, नस्त्या उपलब्ध करुन देणेबाबत परिपत्रक काढले होते. त्यानंतर लेखापरिक्षण पथक ही नेमले होते.

म. संजय जाधव — आपण लेखापरिक्षण् पथक खरेदी करुन ठेवले आहे. मी प्रकाराबाबत वर पर्यंत शासनाकडे तक्रार नेणार आहे. त्याचे परिणाम काहीही होवोत. कदाचीत मला या प्रकरणात अपयश सुध्दा येईल. परंतु या धुळे महानगरपालिकेमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे. आणि त्या भ्रष्टाचारा दरम्यान त्या फाईल्स् नष्ट सुध्दा करण्यात आल्या असतील. आता आयुक्त म्हणुन मी आपणाला सांगतो. फाईलीचे उत्तर सुध्दा आपल्याला देता आले नाही.

म. आयुक्त सो. — स्पेसिपीक माझ्यापुढे आल्या शिवाय मला कार्यवाही करता येणार नाही.

म. संजय जाधव मी आठमहिन्यापुर्वी पत्र दिलेले आहे.वर्तमान पत्रामधुन बातम्या आलेल्या आहेत. आपल्याकडे 4-4 वर्षांचे अहवाल आहेत.

म. आयुक्त सो. लेखापरिक्षण् अनुपालनाची पुर्तता त्या-त्या खात्यांकडुन होत असते.

म. संजय जाधव या फाईल्स दाखविल्या गेल्या नाहीत. नस्त्या जाळल्या गेल्या असतील त्याचे काय? असे अनेक प्रकरणे आहेत.वसुली विभाग एक प्रकरण आहे. लेखापरिक्षण याच विषयावर ते जाळले गेले आहे. आज 10 वर्ष झाले. मोहाडी घरकुल योजनेचा विषय लेखापरिक्षणा समोर का येत नाही ? याचे उत्तर द्यावे.

म. आयुक्त सभागृहात येतांना सर्वच रेकॉर्ड माझ्या सोबत असते असे नाही आहे.

म. संजय जाधव आपल्या बरोबर चांगले अधिकारी ही आहेत.

म. आयुक्त आपण अधिका-यांकडुन कार्यालयामधुन सर्व रेकॉर्ड उपलब्ध करुन घ्यावे.

म. संजय जाधव रेकॉर्डची काहीही गरज नाही. मोहाडी घरकुल योजना आहे. धुळे मनपाच्या शहरात हजारो कोटींच्या मालमत्ता आहेत. त्या नावावर करुन घेण्यास पालीकेस यश येत नाही. आपली आयुक्त म्हणुन जबाबदारी आहे. मोहाडी घरकुल योजनेचा विषय अद्याप पावेता लेखापरिक्षणा समोर का आलेला नाही.

म. आयुक्त लेखापरिक्षण जे होते ना ते लेखापरिक्षण 100% होत नाही.

म. संजय जाधव हे मला माहिती आहे.

म. आयुक्त तुम्हांला माहिती आहे. तुम्ही नगराध्यक्ष असतांना प्रेसिडेन्टं हा लेखासमितीचा अध्यक्ष असतो म्हणुन प्रेसिडेंन्ट म्हणुन नगरपालिकेचे आपल्याला माहिती आहे. त्यामध्ये लेखापरिक्षण घेतांना सुरवातीचे 2 किंवा 3 महिने घेतात. त्यातला मार्च महिना पण असतो. महानगरपालिकेच्या बाबतीत कधी-कधी तीन महिने लेखापरिक्षण घेतात. त्यामध्ये ती फाईल लेखापरिक्षणात आली नसेल तर त्याचे ऑडीट होणार नाही.

म. संजय जाधव आम्ही जर मागणी केली तर स्पेशल लेखापरिक्षण होईल का?

म. आयुक्त शासनाला वाटले तर लेखापरिक्षण करु शकतील.

म. संजय जाधव त्यांच्याकडुन केले पाहिजे.

म. आयुक्त स्पेशल ऑडीट तेच करतात.

म. संजय जाधव तेच विषय का येत नाहीत?

म. आयुक्त सो. त्याच्यामध्ये स्पेसिपिक प्रकरण असेल त्यावर कार्यवाही करता येईल. तुम्ही म्हणाल मला सर्व ऑडीट वाचुन दाखवा हे रेकॉर्ड दिले जात नाहीत. त्यात असंख रेकॉर्ड असते. त्यात ऑडीट रिपोर्ट 200 ते 300 पानांचा असतो. मुळात आपल्याकडे 56 अधिका-यांपैकी 3अधिकारी कार्यरत आहेत. हे मलाच वाचत बसावे लागेल ते मला करणे शक्य नाही.

म. संजय जाधव मी आपल्याला जे पत्र देईल त्यावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

म. शितल नवले महापौर महोदय, मागील सभेचे कार्यवृतत् ठराव क्रमांक 143 दिनांक: 19/10/2018 रोजी झालेला ठराव आहे. रामदेव बाबा नगर मधील मेहतर समाजाचे राहते घर नावाने करणे आणि ज्या सफाई कर्मचा-यांची 25 वर्ष सेवा पुर्ण झालेली आहे. अशा कामगारास मालकी तत्वावर मोफत सदनिका सर्वे नं 532/1/अ घरकुल साठी जागा आरक्षित करणे असा विषय होता. याबाबत मला खुलासा पाहिजे आहे. प्रशासनाने जागेची प्रत्यक्ष पाहणी व मोजमाप न करता खुली जागा दर्शवून सफाई कर्मचारी यांना देण्याचा ठराव झालेला आहे.

म. आयुक्त सो. प्रोसिंडींग कायम करण्याचा विषय आहे.

म. शितल नवले आपण प्रोसिडींग कायम करु नये.

म. आयुक्त तुमचा ठरावावर आक्षेप असेल, ठराव रद्द करावयाचा असेल तर यासाठी वेगळा ठराव करावा लागेल.

म. शितल नवले माझे तेच म्हणणे आहे. आता प्रोसिर्डींग कायम करु नये हा ठराव तहकुब ठेवावा.

म. आयुक्त या विषयाला तुमचा आक्षेप असेल तर तसे आपण लेखी द्यावे. विषय पुन्हा अजेंड्यावर येईल.

म. शितल नवले जागेचा कुठलाही सर्वे न करता ठराव केलेला आहे. सदरची वसाहत 30 ते 35 वर्षापासुन असुन त्याठीकाणी मनपा सर्व सुविधा पुरवित आहे.

म. आयुक्त सदरचा विषय प्रौसिर्डींग कायम करण्यासाठी आलेला आहे. हा निर्णय घेतांना कार्यालयीन प्रस्ताव आलेला आहे. आणि त्या प्रस्तावाला सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. प्रोसिडिंग कायम करण्यासाठी आलेले आहे. सदरच्या विषयाची अंमलबजावणी झालेली नाही. अजुन ठरावाला सहा महिने झालेले नाहीत. आपला आक्षेप असेल तर तुम्ही तसे नगरसचिवांना विनंती करावी.

म. शितल नवले प्रोसिर्डींग कायम करु नये हा आमचा विषय आहे.

म. आयुक्त् प्रोसिर्डींग कायम करणे हा वेगळा विषय आहे.

म. महापौर हा जो विषय आहे. हा ठराव तहकुब ठेवता येत नाही. ठरावात काना - मात्रा काही शब्द राहुन गेले असतील त्यात बदल करता येतो. आपण मला लेखी यादी द्यावी. हा विषय पुन्हा अजेंड्यावर येईल तो पर्यंत सदर ठरावावर प्रशासनाने कुठलीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

म. प्रतिभा चौधरी महापौर महोदय इतिवृत्त मंजुरी साठी जे आलेले आहे त्यासाठी आपल्या सभागृहामध्ये मागील वेळेस हॉकर्स झोन कुठे असावे कुठे नसावे या विषयावर चर्चा झाली असतांना आम्ही देखील चर्चेत सहभाग घेतला होता. मी माझ्या प्रभागातील समस्या होत्या त्यात जयहिंद ज्युनियर ते जयहिंद सिनियर तसेच जयहिंद चौक ते इंदिरा गार्डन व विनोद काका मोराणकर यांचे घराजवळ ठरले होते की त्याठीकाणी हॉकर्स झोन घोषीत करण्यात आलेला आहे. माझी एकच विनंती आहे की, हॉकर्स झोन घोषीत करण्यात आलेले आहे. परंतु अजुन पर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सदरच्या परिसरा मध्ये जयहिंद ज्युनियर कॉलेज, जयहिंद हायस्कुल व जयहिंद मराठी शाळा तसेच महाराणा प्रताप शाळा, जसहिंद सिनियर कॉलेज त्या प्रभागामध्ये राहणारे जे नागरिक आहेत त्यांना पायी चालणे देखील मुश्कील झाले आहे. तेथे आजुबाजुच्या परीसराचे खेडयांवरुन नागरीक येतात व रस्त्याच्या कडेला पट्टी टाकुन भाजी पाला फळे विक्रीचे स्टॉल लावलात या विषयावर परिसरातील नागरिकांनी देखील आपल्या अतिक्रमण विभागामध्ये लेखी तक्रार केलेली आहे. तर जो हॉकर्स झोन घोषीत झालेला असुन देखील त्याची अंमलबजावणी अजुन का झालेली नाही हे मला विचारायचे आहे.

म. आयुक्त आपण जो हॉकर्स झोन चा निर्णय घेतला आहे त्यामध्ये आपल्याला काही आक्षेप आलेले आहेत. परंतु ते गावातले आहेत. मला असे वाटते की देवपुर चा निर्णय घेवुन बाकीचे जे आहेत त्याविषय अधिका-यांची कमिटी तो विषय घेणार आहे. देवपुर आपण इस्टिमेंट करु देवपुर बाबत वेगळा करुन निर्णय घेवु.

म. प्रतिभा चौधरी साहेब आपण मागच्या वेळेला सांगितले होते की, समिती नेमण्यात आली आहे. त्या समोर सदरचा विषय ठेवण्यात येत आहे.

म. आयुक्त समिती आहे समितीच्या अहवाला प्रमाणे आपला प्रस्ताव महासभे पुढे आला होता. महासभेने निर्णय घेतला आणि त्या निर्णयाची फक्त अंमलबजावणी राहीलेली आहे. आणि त्या अंमलबजावणी मध्ये देवपुर भाग आणि हा भाग असे एकत्र आपण घेतलेले आहे. फक्त् या भागाच्या काही गल्ल्या आहेत त्या रोडाला लागुन आहेत. ग.न 3 ते आग्रा रोड हे कमी करुन मधल्या गल्यांमधील हॉकर्स झोन टाकलेत त्या बद्दल लोकांचे आक्षेप आहेत. म्हणुन आपण

गावातील हॉकर्स झोनबद्दल अंमलबजावणीस अडचणी आहेत. देवपुरच्या बाबतीत अश्या तक्रारी नाहीत त्यामुळे देवपुरच्या बाबतीत आपण संपुर्ण निर्णयाची अमंलबजावणी करण्या ऐवजी देवपुर पुरती आपण करु.

म. हर्षकुमार रेलन — म. महापौर महोदय आपण हॉकर्स झोन बाबत आपण निर्णय घ्यावा परंतु आज आपल्या धुळे शहराची अवस्था खुपच वाईट झालेली आहे. मध्यंतरी मी हॉकर्स बाबत माहिती घेतली की, एका झोन मध्ये किती हॉकर्स संख्या आहे.तर मला सांगण्यात आले होती की 900 हॉकर्स आहेत. तर यावर मी प्रश्न केला की बाजारातुन किती वसुली मिळते. तेव्हा मला यावर उत्तर मिळाले 100 लोक सुध्दा पैसे देत नाही. जेव्हा फायदा घ्यावयाचा असतो. हॉकर्स झोन मध्ये त्यांना रजिस्ट्रेशन द्यावयाचे आहे. किंवा काही बेनिफीट द्यावयाचा आहे तेव्हा हॉकर्स धारक कडुन वसुली मिळत नाही.नेमके हॉकर्स आहेत किती ? हॉकर्स बाबत काहीही निर्णय घ्या परंतु आज कोणीही कुठेही गाडी लावुन व्यवसाय करतात त्यांना मात्र बोलायला कुणीही नाही. अतिक्रमण विभागाला सांगुन काहीही होत नाही.आम्ही पोलिस विभागाला पत्र दिले आहे. आपला बाजारपेठ भाग आहे. या ठीकाणी सर्व नागरीक येत असतात पुढे पारोळा रोड आहे. परंतु तेथे कुठलीही सोय झालेली नाही. आम्ही वाहतुक पोलिसांना कडे तक्रार केल्यावर ते उत्त्र देतात आम्ही पोलिस संरक्षण देऊ पुढील कार्यवाही पालिकेने करावी. परंतु कुणीही काहीही करत नाही. आपण याकडे जातीने लक्ष द्यावे. निदान लोकांना रस्त्याने पायी चालता आले पाहिजे. एवढी तरी व्यवस्था करावी ही विनंती.

म. आयुक्त — आपण हॉकर्स झोन बाबत मागील वेळी निर्णय महासभेत घेतला होता. तो बॉडीची मुदत संपत असतांना घेतला होता. आणि त्या मध्ये अंमलबजावणी आतापर्यत वेगवेगळी 4- 5 सदस्यांची पत्र आलेली आहेत ती महासभेसमोर ठेवा. अशी सुचनाही आली होती की कमीटी पुढे एकदा विषय घ्यावा.कमीटीमध्ये निर्णय घेवुन पुढच्या महासभेत आपण विषय घेत आहोत त्याप्रमाणे निर्णय महासभेमध्ये घेवु या.

म. हर्षकुमार रेलन — आपण महासभेत निर्णय घ्या परंतु आज लोकांना रस्त्यावरुन चालता यावे एवढी तरी व्यवस्था करावी.

म. आयुक्त — त्याच्यासाठीच हा विषय आपल्याला महासभे समोर ठेवावा लागेल.

म. रेलन — हॉकर्स झोन होईल तेव्हा होईल परंतु आज लोकांना त्रास होत आहे.

म. आयुक्त — सगळे हे अनाधिकृत म्हणुन 2009 पर्यंत आपण काढुन टाकीत होता.आपल्याला ते अधिकारही होते 2009 मध्ये सुप्रीम कोर्टाने बरेचशे संरक्षण दिलेले आहे.

म. रेलन — रस्ता नाही रस्त्याच्या बाजुला हॉकर्स अतिक्रमण करीत आहेत.

म. आयुक्त — यामध्ये आपण ठरविले होते. की हॉकर्स वाल्यांची गाडी स्पेसिपीक कशा आकाराची गाडी असावी सर्व ठरविण्यात आले होते.आपल्याला मुळात रस्त्याच्या बाबतीत एकमत होत नसल्याने ही अंमलबजावणी थांबविली.

म. हर्षकुमार रेलन — महापौर साहेब यावर काहीतरी निर्णय घ्यावा.

म. महापौर — सर्वात महत्वाचा विषय की, एक उदाहरण सांगतो जमनालाल बजाज रोड आहे त्या ठीकाणी हॉकर्स झोन टाकण्यात आलेला आहे. म्हणजे सर्व गावतले लोक तेथे येवुन उभे राहतील इतर

जे व्यापारी लोकांचे घरे आहेत त्या घरांसमोर हॉकर्स टाकण्यात आलेले आहेत त्यात आपल्याला बदल करावयाचे आहेत एकदा बदल झाल्यानंतर प्रशासन त्याच्या पध्दतीने अंमलबजावणी करेल.

तसेच ठराव क्रं. १४३ दिनांक १९/१०/२०१८ बाबत प्रशासनाने पुढील कार्यवाही करु नये व पडताळणी करुन फेर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करावा.

मागील महासभा दिनांक २०/८/२०१८चे ठराव नंबर११६ तसेच तहकूब सभा दि. २७/८/२०१८च्या सभेतील धुळे मनपा ठराव नंबर ११७ ते १३४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महासभा दिनांक १९/१०/२०१८ चे ठराव नंबर १३५ ते १४९ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३ दिनांक २८/०२/२०१९

मागील महासभा दिनांक २०/८/२०१८चे ठराव नंबर ११६ तसेच तहकूब सभा दि.२७/८/२०१८ च्या सभेतील धुळे मनपा ठराव नंबर ११७ ते १३४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.तसेच महासभा दिनांक १९/१०/२०१८ चे ठराव नंबर १३५ ते १४९ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८ महिला बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर महिला बालकल्याण समिती सभा दिनांक २०/१० /२०१८ सभेतील ठराव नंबर ३ ते ४ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४ दिनांक २८/०२/२०१९

महिला बालकल्याण समिती सभा दिनांक २० /१० /२०१८ सभेतील ठराव नंबर ३ ते ४ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-९ मा.महापौर सो. यांच्या पत्रान्वये धुळे महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी श्री.मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह खान यांची नियुक्ती करण्यांत आली असुन सभागृहाच्या माहितीसाठी सादर.

म. नगरसचिव धुळे महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेते पदी श्री. महोम्मद साबीर मुहिबुल्लाह खान यांची मा. महापौर सो . यांनी नियुक्ती केली आहे. सभागृहाच्या माहितीसाठी सादर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५ दिनांक २८/०२/२०१९

मा.महापौर सो.यांच्या पत्रान्वये धुळे महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी श्री. मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह खान यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ एक अअ.नुसार नियुक्ती करण्यांत आलेली आहे.सदर बाब सभागृहाच्या माहितीसाठी सादर करण्यांत येवून श्री.मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह खान यांचे सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक १० धुळे शहरातील प्र.क्र. २९अग्रवालनगर येथील उद्यानाला जेष्ठ स्व. पुरणमल बालुराम अग्रवाल उद्यान असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालचीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदीप कर्पे हा जो अजेंड्यावर विषय आलेला आहे.विकासाच्या कामापेक्षा नामकरणाचे विषय जास्त आहे. माझी विनंती आहे की, नामकरणांच्या विषयाबाबत निश्चित धोरण आपण केले पाहिजे. सभागृहाने आणि महापौरांनी हे जे नामकरण आपण एखाद्या सभागृहात होतो वस्तुला रस्त्याला नाव दिले ते परत कधी मिटत नाही. आणि नामकरणासाठी आपणा सर्वांना विनंती आहे. की राष्ट्रपुरुष, स्वातंत्र सैनिक,शहीद झालेले सैनिक असे काही व्यक्ती की ज्यांनी देशासाठी, महाराष्ट्रासाठी काही तरी सेवा दिली असेल काही काम केले असेल ज्या काही महापुरुषांनी या शहरासाठी काम केले असेल किंवा सामाजिक काम केले असेल असे एखादया व्यक्तीचे नाव सुचविणे.आपण नगरसेवक एक सहानुभुतीपुर्वक नाव देतो परंतु त्याचा आपण अभ्यास केला पाहिजे.आणि मग नामकरणासाठी नाव सुचवावे. हा फार महत्तवाचा विषय आहे. म्हणुन एक धोरण ठरविले पाहिजे.जर आपण एखादया रस्त्याला किंवा वास्तुला नाव दिले तर त्या ठिकाणी गेल्यावर त्या व्यक्तीची त्याच्या कार्याची आठवण झाली पाहिजे. आपल्याला त्यातुन काही प्रेरणा मिळाली पाहिजे.अशा व्यक्तीचे नाव नामकरणासाठी सुचविणे अशी माझी विनंती आहे.

म. कांतीलाल दाळवाले महापौर महोदय, नामकरणाचे जे विषय आपण घेतो हे ठराव झालेले असतात त्याप्रमाणे मागे १५ ते १६ वर्षापुर्वी डॉ. रा. भ. चौधरी यांचे निधन झाले.त्यावेळेस आताचे सन्मा. सदस्य श्री संजय भाऊ जाधव हे त्यावेळी नगराध्यक्ष होते.त्यांनी त्यावेळी त्यांच्या स्मरणार्थ प्रभाग क्र. ४ मध्ये तपोवन अमरधामाला डॉ.रा.भ. चौधरी नाव देण्याबाबतचा ठराव झालेला होता पंरतु आज पर्यंत त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यावेळी आपले काही अधिकारी तेथे नाव टाकण्यासाठी गेले होते.परंतु त्यांनी काही अपेक्षा ठेवुन नाव दिलेले नाही त्या अमरधामला हरीओम असे जे नाव देण्यात आले आहे त्याचा ठराव झालेला आहे का ? आपल्याला जर शहरात नामकरण करावयाचे असेल तर त्यासाठी समिती गठीत करावी. समितीत महापौर, सभापती, नगरसेवक व जबाबदार अधिकारी वर्ग यांची समिती गठीत करण्यात यावी. डॉ. रा. भ.चौधरी हे पालिकेत नगराध्यक्ष असतांना त्या वेळी त्यांनी फार मोठे कार्य केलेले आहे. ते पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष होते.त्यांचे नाव अमरधामला देण्यास उशिर होत आहे. ठराव झालेला असतांना नंतरचा ठराव रद्द करुन त्याठिकाणी डॉ.रा.भ.चौधरी यांचे नाव देणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

म. महापौर डॉ. रा. भ.चौधरी यांचे नाव देण्याबाबत श्री बिपीन चौधरी हे मला प्रत्यक्ष भेटुन गेले आहेत. सदर नामकरणाबाबत ठराव झालेला असतांना पाठपुरावा होवुन अंमलबजावणी करणे गरजेचे होते. या विषयाबाबत सभागृहाच्या निर्णयानुसार आपण निर्णय घेवु.आपण म्हणतात स्मशान भुमीला "हरीओम " असे नाव देणे बाबत ठराव झाला आहे तरी याबाबत पहिला ठराव रद्द झाल्याशिवाय आपल्याला दुसरा ठराव करता येणार नाही. संबधीत भागातील नगरसेवक यांच्यांशी विचार विनीमय करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

म. अमोल मासुळे महापौर महोदय,आज या ठिकाणी अजेंड्यावर नामकरणाचे विषय आलेले आहेत. विषयाच्या संदर्भात मी माझे मत व्यक्त करु इच्छितो की, विषय क्रमांक 17 व 18 या दोन्हीं विषयांना मंजुरी देण्यात यावी. विषय क्रमांक 17 च्या संदर्भात आदरणीय अटलबिहारी वाचपेयी यांचे नाव आपल्या नविन इमारती मधील मुख्य सभागृहाला दिले जात असतांना संपुर्ण महाराष्ट्राला एक वेगळा संदेश निश्चितच जाणार आहे. आणि सर्वांच्या दृष्टीने चांगली बाब होणार आहे. तसेच विषय क्रमांक 18 या बाबत उपायुक्त यांचे दालना शेजारील हॉलला आदरणीय स्वर्गीय

दिलीप पायगुडे यांचे नाव दिले जात आहे. निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. त्यांच्या विषयी सर्वांमध्ये एक आदराचे स्थान निर्माण झाले होत. त्यांनी धुळे शहरासाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्यांनी प्रशासनाबाबत घेतलेले निर्णय सर्वांनाच प्रेरणा देणारे आणि स्मरणात राहणार आहेत. तरी सदरचे दोन्ही विषय मंजुर करणेत यावे.

म. सुभाष जगताप — विषय क्रमांक 15 प्रभाग क्रमांक 20 मधील महात्मा फुले पुतळा ते स्टेशन चौक कोर्टासमोरील रस्त्याला स्व.अटल बिहारी वाजपेयी लोकमार्ग असे नामकरण करणेबाबत चा विषय आलेला आहे. अटल बिहारी वाजपेयी एक चांगले व्यक्तीमत्व आहे. परंतु कार्यवृत्तात ठराव क्रमांक 122 सदर रस्त्याला ग.द. माळी गुरुजी असे नामकरण झालेले आहे. सदरचा ठराव झालेला असतांना हा विषय आला आहे. तरी सदर रस्त्याला ग.द.माळी गुरुजी हेच नाव राहु दयावे अशी विनंती करतो.

म. महापौर — सदर विषयाबाबत सभागृहातील कोणीही सन्मा.सदस्य बोलले नसले तरी या विषयावर आपण निर्णय घेणार नव्हतो. सदर रस्त्याचे नामकरण झालेले आहे. दुसरे नामकरण करता येणार नाही तरी सदरचा विषय तहकुब करण्यात येत आहे.

म. दिपक खोपडे — महापौर महोदय मी प्रभाग क्र. 14 मधील आपेन स्पेस मधील असलेल्या उद्याना बाबत बोलत आहे. सर्वे क्रमांक 146 मधील सार्वजनिक उद्यान बगीचा आहे. य ठिकाणी मागील पंचवार्षिक योजनेतील काळात मनपाच्या ओपन स्पेसवर आपल्या मनप तर्फे बगिचे निर्माण कार्य झालेले आहे. तेथील रहीवासी श्री. यशवंत चिंधा शिंदे यांचे घराच्या मागे ज्या ठिकाणी आपले नगरसेवक श्री सतिष तात्या महाले हे राहत आहे. त्यांच्या घराच्या मागील बाजुसच हे उद्यान आहे. येथील परिसरातील सर्व नागरीकांना अबाल वृध्द व लहान मुले तसेच तरुणांना बगीचा अतिशय चांगल्या प्रकारे वापर करण्यास वाव मिळालेला आहे. आणि जर या बगीचाचा वापर सुरु झाला तर सर्वांचा फायदा होईलच त्याच बरोबर सर्व नागरिकांचे सामाजिक आरोग्य सुध्दा चांगले सुधारेल ही खात्री आहे. परंतु सदर उद्यानाला असलेल्या कंम्पाऊंटच्या गेटला नेहमी कुलुप लावलेले असते. आणि त्यामुळै गेली 8 ते 10 वर्षापासुन या उद्यानाचा सार्वजनिक वापर कोणालाही करता येत नाही. त्यामुळे मी मा. आयुक्त सो.यांना विनंती करतो की, या उद्यानाची चावी कोणत्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात आहे याची चौकशी करुन ताबडतोब सदर उद्यानाचे कुलुप उघडून हा बगीचा सर्व नागरीक बंधु-भगिंनीना वापरण्यास उपलब्ध करुन द्यावा. तरी कृपया या प्रकरणात वैयक्तिक लक्ष देवुन विशेष प्राधान्याने अंमलबजावणी करावी. तसेच दुसरा विषय असा की, रेल्वे स्टेशन रोड येथील अतिक्रमण धारकांचे पुर्नवसन बाबत ठराव झालेला आहे. रेल्वे स्टेशनला लागुन असलेल्या व ज्या रस्त्याला मॉडेल रोड म्हणुन विकसीत करण्यास मंजुरी मिळालेली आहे. व सदर रस्ता झाल्यामुळे शहरातील सौंदर्यात भर पडणार आहे. या रोड साठी निधी सुध्दा उपलब्ध झालेला आहे. सदर अतिक्रमण धारकांची राहण्याची सोयी करणे सोयीचे होईल. या कामासाठी धुळे येथील संन. 510/ब चक्करबर्डी जवळील जागा सदर अक्रिमण धारकांना मंजुर आहे. आणि विना तक्रार ते सदर जागी सथलांतरीत आनंदाने करण्यास तयार आहे. आणि सदर जागा मागणीचा प्रस्ताव मे. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जमीन 07/2010/प्र.क्र. 99/ज-1 दि. सप्टें
सप्टें. 2010 नुसार मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडे सादर करणे बाबत व उक्त मागणी केलेली 2 एकर जागेचा रहिवास वापर करणे बाबत प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये कार्यवाही करण्यास मंजुरी सर्वांनुमते देण्यात आलेली आहे. तरी याबाबतची कार्यवाही करणेत यावी.

म. राजेश पवार — महापौर महोदय, मोहाडी परिसरात 966 घरकुल बांधुन तयार आहेत. परंतु अद्याप नागरिकांना घरकुलाचे वाटप झालेले नाही. तरी याबाबत खुलासा करावा.

म. महापौर — सन्मा.सदस्यांना सांगु इच्छितो की, नामकरणाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. आपल्याला त्याच विषयावर बोलता येईल. आपल्या प्रश्नाबाबत मला व मा.आयुक्त यांना लेखी पत्र देण्यात यावे त्यावर योग्य ती कार्यवाही करता येईल.

म. कमलेश देवरे — महापौर महोदय, नामकरणाचे जे विषय आहेत. अजेंडावरील विषय क्रमांक 12 पासुन 17 पर्यंत यावर खुलासा केल्यास बरे होईल. मला विषय क्रमांक 13 वर मत मांडावयाचे आहे. वाडीभोकर रोड रस्त्याला कै. झेड बी.पाटील असे नामकरण होवुन ठरावही झालेला आहे. सदरचा प्रस्ताव मीच मांडलेला होता. नामकरण झालेले असतांना देवपुर वाडीभोकर रोड वरील पारस मंगल कार्यालयापासून ते गोंदूर रोड पर्यंतच्या रस्त्यास कै. मधुकर बाबुराव सोनार मार्ग व नाल्याकाठी असलेल्या चौकास कै. मधुकर बाबुराव सोनार चौक असे नामकरण करणेबाबत विषय आलेला आहे. सदरचे नाव देण्यास हरकत नाही. पुर्व पश्चिम रस्ता असेल. वाडीभोकर रोड ते एकविरा देवीच्या मंदीरापर्यंत नाना साहेबांचे नाव दिलेले आहे. कै. मधुकर बाबुराव सोनार यांचे नामकरण करावयाचे असेल तर गोंदुर रोड ते अभियंता नगर पर्यंतच्या रस्तयास नामकरण करता येईल. तसेच सन्मा. सदस्य श्री. सुभाष जगताप यांनी विषय मांडला आहे. विषय क्रमांक 15 महात्मा फुले पुतळा ते स्टेशन चौक कोर्टासमोरील रस्त्याला स्व. अटल बिहारी वाजपेयी लोकमार्ग असे नामकरण करणेबाबत विषय आलेला आहे. सदर रस्त्यास त्या ठिकाणी सदर रस्त्याला ग.द. माळी गुरुजी असे नामकरण झालेले आहे ठराव झालेला असतांना परत नामकरनाचे विषय येत आहेत. असे विषय आल्यास सदस्यांन मध्ये विनाकारण गैरसमज निर्माण होतील तरी प्रशासनाने खात्री करुन नामकरणाचे प्रस्ताव सादर करावेत.

म. प्रतिभा चौधरी — महापौर महोदय जयहिंद सिनियर कॉलेज समोरील वाडीभोकर रस्त्याला जयहिंद संस्थेचे चेअरमन स्वर्गीय नानासाहेब झेड. बी. पाटील असे नामकरण ठराव करुन करणेत आलेले आहे.याबाबत मी पत्र सादर केले आहे. देवपुर वाडीभोकर रोड वरील पारस मंगल कार्यालयपासुन ते गोंदुर रोड पर्यंतच्या रस्त्यास कै. मधुकर बाबुराव सोनार मार्ग असे रस्त्याला नाव देण्याबाबत अजेंड्यावर जो विषय आलेला आहे. याबाबत मी सांगु इच्छिते की, पारस मंगल कार्यालय ते स्टेडीयम कडे जाणारा रस्ता आहे. त्या रस्त्यास सदरचे नाव देण्यास आमची काहीही हरकत नाही. तसेच विषय क्रमांक 17 च्या संदर्भात आदरणीय अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव आपल्या नविन इमारती मधील मुख्य सभागृहाला देणे बाबतचा विषय आलेला आहे. सदरचे नाव देणेबाबत माजी. महापौर श्रीमती कल्पना काकु महाले यांना पत्र सादर केले होते. मा. स्व. अटलबिहारीजी वाजपेयी यांचे सभागृहास नामकरण होत आहे. आणि ते नामकरण भाजपा पक्षाचे महापौर यांचे कडुन नामकरण होत आहे याचा मला अतिशय आनंद आहे. सदरचा विषय मंजुर करणेत यावा अशी विनंती.

म. महापौर — सदरचे जे विषय आहेत ते जुने विषय असल्याने मी अजेंड्यावर घेणार नव्हतो. त्या विषयासंदर्भात ज्या याद्या आलेल्या होत्या त्या माजी नगरसेवकांच्या होत्या परंतु एक विषय घ्यायचा म्हणुन तो अजेंडयावर घेण्यात आला आहे. माझ्या कडे जवळ जवळ २० ते २२ याद्या आलेल्या आहेत. त्या नामकरणा विषयी आहेत. परंतु हा अधिकार महानगरपालिकेचा आहे. जी वास्तु आहे तीला नाव देतांना कोणत्या व्यक्तीचे नाव द्यावे याचा योग्य विचार करुन देण्यात यावे. यापुढे आपण आता नामकरणासाठी प्रशासनामार्फत छाननी करुनच प्रस्ताव महापौर यांच्या मान्यतेने मे. महासभेपुढे सादर करावेत. नामकरणाची यादी सादर करतांना सदर

व्यक्तीचे सामाजिक,राजकीय व धार्मिक कार्य या क्षेत्रातील योगदानाचा विचार करुन यादी दिली गेली पाहिजे. अजेंडयावरील विषय क्रमांक 16, 17, व 18 या विषयांना मंजुरी देण्यात येत असुन बाकीचे विषय तहकुब ठेवण्यात येत आहेत. तसेच महत्वाचे असे की सभागृहात एका बाजुला छत्रपती शिवाजी महाराज यांचे व एका बाजुला म. स्व. अटलबिहारीजी वाजपेयी यांची प्रतिमा लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६ दिनांक २८/२/२०१९

सन्मा.सदस्य श्री. युवराज चैत्राम पाटील यांचे पत्रानुसार धुळे शहरातील प्रभाग क्र.29 येथील स.नं.463/1 अ तिरुपती नगर,अग्रवाल नगर येथे ओपनस्पेस आहे.सदरओपनस्पेस येथे वॉल कंपाऊंड करूनउद्यान प्रस्तावित आहे.सदर उद्यानास धुळे शहरातील ज्येष्ठ समाजसेवक स्व.पुरणमल बालुराम अग्रवाल उद्यान असे नामकरण करणे बाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता सदर ओपन स्पेसला अद्यापपावेतो नामकरण झालेले नाही. सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दैनिक दिव्य मराठी दि.05/07/2018 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता श्री.संदीप महेश पाटील,धुळे यांनी हरकती अर्ज दिला आहे. मात्र हरकती अर्जातील जागा व प्रस्तावित नामकरणाची जागा ह्या वेगवेगळ्या असल्याने हरकत लागू होत नाही. तरी सदरचा विषय मनपा अधिनियम 1949 मधील अनुसुची 'ड' मधील रस्ते या प्रकरणातील 2(1) (अ) नुसार मे. महासभेसमोर निर्णयास्तव सादर करण्यांत आलेला होता.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सुचनेनुसार नामकरणाबाबत अनेक प्रस्ताव महासभेपुढे सादर होतात. तथापि नामकरण करतांना नामकरण करण्यांत येणा-या व्यक्तीचे सामाजिक, राजकीय कार्य व त्या क्षेत्रातील योगदान लक्षात घेणे आवश्यक आहे. यासाठी नामकरण प्रस्ताव सादर करणेपूर्वी छाननी होणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासनामार्फत नामकरण प्रस्तावा बाबत छाननी करुन महापौर यांच्या मान्यतेनंतरच प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करणेत यावे. तोपावेतो सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११ प्रभाग क्रं. ३४ मधील मोहाडी उपनगर येथील नवीन जलकुंभास कै.राजेंद्र पोपटराव शिंदे उर्फ बालू आबा असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर विषय क्रमांक १० नुसार सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७ दिनांक २८/२/२०१९

प्रभाग क्रं. ३४ मधील मोहाडी उपनगर येथील नवीन जलकुंभास कै. राजेंद्र पोपटराव शिंदे उर्फ बालू आबा असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव विषय क्रमांक 10 मधील झालेल्या चर्चेनुसार व निर्णायानुसार तहकूब ठेवण्यांत मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२ धुळे शहरातील वाखारकर नगर /नाटेश्वर कॉलनीतील रस्त्यास राष्ट्रसंत जैन मुनीश्री १०८ तरुण सागरजी महाराज मार्ग व चौकास राष्ट्रसंत जैन मुनीश्री १०८ तरुण सागरजी महाराज चौक असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर विषय क्रमांक १० नुसार सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८ दिनांक २८/२/२०१९

धुळे शहरातील वाखारकर नगर /नाटेश्वर कॉलनीतील रस्त्यास राष्ट्रसंत जैन मुनीश्री १०८ तरुण सागरजी महाराज मार्ग व चौकास राष्ट्रसंत जैन मुनीश्री १०८ तरुण सागरजी महाराज चौक असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव विषय क्रमांक 10 मधील झालेल्या चर्चेनुसार व निर्णायानुसार तहकूब ठेवण्यांत मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३ देवपूर वाडीभोकररोड वरील पारस मंगल कार्यालयापासून ते गोंदूररोड पर्यंतच्या रस्त्यास कै. मधुकर बाबुराव सोनार मार्ग व नाल्याकाठी असलेल्या चौकास कै.मधुकर बाबुराव सोनार चौक असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर विषय क्रमांक १० नुसार सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९ दिनांक २८/२/२०१९

देवपूर वाडीभोकररोड वरील पारस मंगल कार्यालयापासून ते गोंदूररोड पर्यंतच्या रस्त्यास कै.मधुकर बाबुराव सोनार मार्ग व नाल्याकाठी असलेल्या चौकास कै.मधुकर बाबुराव सोनार चौक असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव विषय क्रमांक 10 मधील झालेल्या चर्चेनुसार व निर्णायानुसार तहकूब ठेवण्यांत मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४ धुळे महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.५२३ अजळकर नगर येथील प्रवेशव्दारास मा.तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशव्दार असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर विषय क्रमांक १० नुसार सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २० दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.५२३अजळकर नगर येथील प्रवेशव्दारास मा.तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशव्दार असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव विषय क्रमांक 10 मधील झालेल्या चर्चेनुसार व निर्णायानुसार तहकूब ठेवण्यांत मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५ प्रभाग क्रं.२० मधील महात्मा फुले पुतळा ते स्टेशन चौक कोर्टासमोरील रस्त्याला स्व.अटल बिहारी वाजपेयी लोकमार्ग असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सदर प्रस्तावाबाबत हरकत प्राप्त झाली असून सदरच्या रस्त्यास यापूर्वीच उदयान पंडीत ग.द. माळी यांचे नामकरण करण्यांत आलेले आहे.याबाबत प्रशासनानेही अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव विषय पटलावरुन मागे घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २१ दिनांक २८/२/२०१९

प्रभाग क्रं.२०मधील महात्मा फुले पुतळा ते स्टेशन चौक कोर्टासमोरील रस्त्याला स्व.अटल बिहारी वाजपेयी लोकमार्ग असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर झालेला आहे.तथापि सदर प्रस्तावाबाबत हरकत प्राप्त झाली असून सदरच्या रस्त्यास यापूर्वीच उदयान पंडीत ग.द. माळी यांचे नामकरण करण्यांत आलेले आहे. याबाबत प्रशासनानेही अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव विषय पटलावरुन मागे घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६ अग्रसेन पुतळा ते दसेरा मैदान पाण्याच्या टाकीपर्यंत (अग्रवालनगर मधील) नवीन रस्त्याला श्री.छत्रपती अग्रसेन महाराज मार्ग असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सदरचा प्रस्ताव हा भागातील नागरीकांच्या दृष्टीने महत्वाचा असूनसदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २२ दिनांक २८/२/२०१९

श्री. युवराज चैत्राम पाटील सन्मा.सदस्य यांचे पत्र. तसेच सन्मा.सदस्य.श्री.सोनल दिलीप शिंदे यांचे पत्र दि. ०९/१०/२०१८च्या पत्रानुसार धुळे शहरातील अग्रसेन पुतळा ते दसेरा मैदान पाण्याच्या टाकीपर्यंत (अग्रवाल नगर मधील) नवीन रस्त्याला श्री छत्रपती अग्रसेन महाराज मार्ग असे नामकरण करणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर रस्त्यास नामकरण झालेले नाही. सदर नामकरणाच्या विषयाव हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दैनिक खान्देश मैदान दि.१५/१०/२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एक ही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही. तरी सदरचा विषय मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसुची 'ड'मधील रस्ते या प्रकरणातील२(१)(अ)नुसार धुळे शहरातील अग्रसेन पुतळा ते दसेरा मैदान पाण्याच्या टाकी पर्यंत(अग्रवाल नगर मधील) नवीन रस्त्याला श्री छत्रपती अग्रसेन महाराज मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १७ धुळे महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत बांधण्यांत आलेल्या नुतन सभागहास स्व. अटल बिहारी वाजपेयी सभागृहअसे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सभागृहाच्या मुख्य वयासपिठाच्या मागील दोन्ही बाजूस छत्रपती शिवराय व अटलबिहारी वाजपेयी यांची प्रतिमा तथा छायाचित्र लावण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २३ दिनांक २८/२/२०१९

सन्मा. सदस्या. सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी व सन्मा. सदस्या श्रीमती वालीबेन मंडोरे यांचे पत्रानुसार धुळे महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत बांधण्यातआलेल्या नूतन सभागृहास स्व.अटल बिहारी वाजपेयी सभागृह असे नामकरण करणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर सभागृहास नामकरण झालेले नाही.

सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दैनिक खान्देश मैदान दि.१५/१०/२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही. तरी सदरचा विषय मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसुची 'ड' मधील रस्ते या प्रकरणातील २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत बांधण्यांत आलेल्या नुतन सभागहास **स्व.अटल बिहारी वाजपेयी सभागृह**असे नामकरण करणेस सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सभागृहाच्या मुख्य वयासपिठाच्या मागील दोन्ही बाजूस छत्रपती शिवराय व अटलबिहारी वाजपेयी यांची प्रतिमा तथा छायाचित्र लावण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १८ धुळे महानगरपालिकेच्या नुतन प्रशासकीय इमारतीत मा.उपायुक्त दालना शेजारी असलेल्या सभागृहाला स्व. दिलीप पायगुडे समिती सभागृह असे नाव देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर स्व.दिलीप पायगुडे यांचे नगरपालिका व महानगरपालिकासाठी केलेले कार्य व दिलेले योगदान अत्यंत महत्वाचे व प्रेरणादायी आहे.त्याच्या कार्याची आठवण रहावी म्हणून सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २४ दिनांक २८/२/२०१९

माजी.महापौर.सौ.कल्पना सुनील महाले यांचे दि.24/10/2018 च्या पत्रानुसार तत्कालीन धुळेनगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून दिनांक 6/10/2000 ते दिनांक 29/6/2003 व विद्यमान धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त म्हणून दिनांक 4/7/2003 ते दिनाक 5/7/2004 तसेच आयुक्त म्हणून दिनांक 6/7/2004 ते दिनांक 24/12/2004 या कालावधीत कै.दिलीप सर्जेराव पायगुडे सो. यांनी निस्वार्थपणे सेवा केली आहे.

कै.पायगुडे सो.हे संपूर्ण महाराष्ट्रात तसेच शासन स्तरावर एक शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ, जबाबदार, निस्पृह अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. तसेच कायद्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी करून आपली शासनाप्रती व जनतेप्रती कर्तव्यनिष्ठा सिद्ध केलेली आहे.

त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यास मुकलेला आहे. त्यांनी धुळे नपा व मनपात केलेल्या कार्याचे सदैव स्मरण रहावे यासाठी धुळे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील उपायुक्त दालनाशेजारील सभागृहास कै.दिलीप सर्जेराव पायगुडे सभागृह असे नामकरणकरणे बाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर सभागृहास नामकरण झालेले नाही.

स्व.दिलीप पायगुडे यांचे नगरपालिका व महानगरपालिकासाठी केलेले कार्य व दिलेले योगदान अत्यंत महत्वाचे व प्रेरणादायी आहे. त्याच्या कार्याची आठवण रहावी म्हणून सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीनअहवाल व मनपा अधिनियम 1949 मधील अनुसुची 'ड'मधील रस्ते या प्रकरणातील 2 (1) (अ) नुसार धुळे महानगरपालिकेच्या नुतन प्रशासकीय इमारतीत मा.उपायुक्त दालना शेजारी असलेल्या सभागृहाला स्व.दिलीप पायगुडे समिती सभागृह असे नामकरण करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 — सन -2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ.)करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.खान मोहम्मद — शासकिय योजने बाबतचा जो विषय आहे. यामध्ये अल्पसंख्याक योजनेबाबतचा हा विषय आहे. सदरच्या योजनेमध्ये कोणत्या गोष्टी अंतर्भूत आहे. कायार्लयीन टिपणी काय आहे.? आणि योजनेसाठी शासनाकडुन किती रक्कम मिळणार आहे.आणि ती रक्कम कोठे खर्च होणार आहेत. याबाबत मला माहिती मिळावी.

म. अमीन पटेल — जिल्हास्तरीय नगरोत्थान नागरी दलित वस्ती योजना अल्पसंख्यांक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना यासाठी किती निधी मिळत आहे. याची माहिती द्यावी.

म. आयुक्त — अल्पसंख्यांक निधी अंतर्गत शासनाकडुन एकदा 35लाख रुपये आले त्यानंतर 28 लाख रुपये मिळाले आहेत. सर्वसाधारण दर वर्षी 20 लाख रुपये येतात. शहरातील विकास कामे अल्पसंख्याक कामांचा आढावा घेऊन करण्यात येतात.

खान मोहम्मद — आपण 20 लाखामध्ये कोणती व कशी कामे करणार आहेत. आणि त्यामधुन कोणा-कोणाचे कामे होणार आहेत.म.आयुक्त यांना विनंती आहे. आपण शासनाला कार्यालयाकडुन अहवाल देवुन अल्पसंख्यांक निधी हा जवळ-जवळ 5 कोटी रुपये शासनाकडुन मिळाले पाहिजे. यासाठी आम्ही मुख्यमंत्री यांचे कडे प्रतिनिधी मंडळ घेऊन जाऊ तत्पुर्वी आपण शासनाला कार्यालयीन अहवाल द्यावा.

म. अमीन पटेल — महापौर महोदय आपल्या मनपा साठी 30 लाख रुपये अल्पसंख्यांक निधी आलेला आहे. नगरोत्थान योजने अंतर्गत 4 कोटी रुपये निधी मिळाला आहे. नगरोत्थान निधी एकाच प्रभागात कामे करण्यासाठी दिला आहे. ज्याठीकाणी रस्त्याचे कामे झालेली आहेत. त्या ठिकाणी निधी

दिला जात आहे. तसेच कबीरगंज, मिलपरीसर या ठिकाणी कच्चे रस्ते आहेत. त्या ठिकाणी विकास कामासाठी शासन निधी खर्च केला पाहिजे. आपल्या मनपा मध्ये 79 नगरसेवक आहेत. 4 कोटी रुपयांमध्ये ज्या ठिकाणी रस्ते झालेले नाहीत तेथे निधी खर्च केला पाहिजे आपण महासभेत ठराव केला तर अल्पसंख्याक निधी अतंर्गत कच्चेरस्त्यांचे काम करण्यासाठी 2 कोटी रुपयांची वाढीव मागणी आपण शासनाकडे करु शकतो. अल्पसंख्यांक निधी अंतर्गत कबीर गंज,अंबीका नगर,किशनगंज, जामचा मळा, चक्करबर्डी हा जो भाग आहे. त्या ठिकाणी गटारींची कामे झालेले नाहीत. नागरिक खड्डयांमध्ये साठलेले सांडपाणी हाताने बाहेर टाकतात. अशी परिस्थिती आहे. अल्पसंख्यांक निधी वाढला पाहिजे आणि नगरोत्थान निधी, दलितेत्र निधी हे जे नगरसेवक आहेत त्यांना 10 -10 लाख रुपये निधी दिला गेला पाहिजे. ज्या ठिकाणी कामे होत आहेत. तेथे निधी दिला जातो. आणि ज्या ठिकाणी गरज आहे तेथे निधी मिळत नाही. मनपा निधीमधुन प्रभागातील रस्त्यांसाठी 10 ते 15 लाख रुपये निधी मिळत आहे. पंरतु आपल्याकडे ही कामे करण्यासाठी कोणीही ठेकेदार तयार होत नाही. जे रस्ते झालेले आहेत ते परत डांबरीकरण होत आहे.यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. अल्पसंख्याक विभागातील जे प्रभाग आहेत त्या ठिकाणी 80% रस्त्यांची कामे झालेली नाहीत. बाहेरच्या भागातील कामे होत नसल्याने विकास झालेला नाही.माझी विनंती आहे की विकास कामांसाठी सर्वांना समान निधी मिळाला पाहिजे.

म. शितल नवले — महापौर महोदय,नागरी दलित वस्ती योजनेअंतर्गत कामांचा 6 कोटींचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव सादर केला आहे. यामध्ये कोणती कोणती कामे करण्यात येणार आहेत तसेच पुढील वर्षात कोणत्या कामांचा प्रस्ताव मांडण्यात येणार आहे याचा ही खुलासा करावा.

म. आयुक्त — सन2017-18चे आर्थिक वर्ष संपलेले आहे.आणि सन2018-19 ची कामे प्रस्तावित करावयाची आहेत.

म. वंदना भामरे — महापौर महोदय, मी विषय क्रमांक 19 वर बोलत आहे. त्यात जिल्हा नगरोत्थान योजना, दलित वस्ती सुधार योजना आणि नागरी दलितेत्तर योजना या चार योजनांचा हा विषय आहे. मी असे म्हणेल की माझा 1नं. वार्ड शुन्यातुन शंभर नंबर पर्यंत घेवुन जावयाचा आहे. त्या वार्डात कुठलीही गोष्ट नाही. महाराष्ट्रात आमची ग्रामपंचायत 2 नं वर होती. त्या ठिकाणी कुठलिच विकास कामे झालेली नाहीत. नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतग्रत 6 कोटी 70 लाख रुपये आलेले आहे.मला असे वाटते की, हा जो निधी आहे.हा निधी शहरातील दलितेत्तर लोकसंख्येचा विचार करुन ही हद्दवाढ झाली आहे. आणि बरेचसे भाग शहर हद्दीत आलेले आहेत. लोकांची संख्या सुध्दा वाढलेली आहे. यापुढे केव्हा पण या निधीची मागणी करतांना संपुर्ण विचार करुन निधीची मागणी करण्यात यावी. दुसरी गोष्ट दलित वस्ती सुधार योजनेअंतग्रत आमच्या सहा प्रभागांच्या सदस्यांची कामे सुरु करावी. तसेच नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत कोणती-कोणती कामे केली जातात. तसेच जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गक कुठली कामे केली जातात. या बाबतची माहिती देण्यात यावी. तसेच आमचा हद्दवाढी नंतरचा जो अविकसित भाग आहे. तो विकसित कसा होईल याकडे जातीने लक्ष देण्यात यावे.

म. किरण आहिरराव — महापौर महोदय, प्रभाग क्र 6 मध्ये नागरी दलित वस्ती योजनेतुन सन 2018-19 मध्ये पुढील कामांचा समावेश करण्यात यावा. 1) महिंदळे येथे अजिक्यंतारा सोसायटी रस्ते कॉक्रींट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.2) महिंदळे येथे राजरत्न सोसायटी रस्ते कॉक्रींट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. 3) महिंदळे येथे बुध्दभुषण सोसायटी रस्ते कॉक्रींट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. 4) महिंदळे येथे राजरत्न सोसायटी ओपण स्पेसला वॉल कम्पांऊन्ड बांधणे. 5) महिंदळे येथे

संबोधि नगर भागात रस्ते काँक्रींट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.6) महिंदळे येथे राजदिप सोसायटीत रस्ते काँक्रींट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.7) दैठणकर नगर भागात रस्ते काँक्रीट करणे.8) महिंदळे येथे संबोधि नगर ओपण स्पेसला वॉल कम्पांऊन्ड बांधणे. 9) महिंदळे येथे राजवाडा मध्ये पेव्हर ब्लॉक व गटारी बांधणे. सदर कामांची लेखी यादीची प्रत मी आपणाकडे सादर करीत आहे.

म. महापौर — सर्वात महत्वाचा विषय आहे. हद्दवाढीनंतर ग्रामीण भाग शहरात समाविष्ट झाला आहे. 150 कोटी रुपयाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. या अगोदर 100 कोटीचा प्रस्ताव शहरासाठी पाठविला आहे.150 कोटीचा प्रस्ताव जी हद्दवाढ झालेली आहे. ग्रामीण भागातील जेवढे रस्ते गटारी आहेत ज्या - ज्या समस्या आहे ती कामे घेण्यात आली आहे. दुसरे असे शहरातील जे महत्वाचे रस्ते आहेत.आता जो ही शासनाचा निधी येणार आहे. तो कामासाठी सर्व पक्षीय समान वाटप होणार आहे. शहरातील महत्वाच्या ज्या गोष्टी आहेत. स्टेडीयम आहे, नदी किनारी चौपाटी सुशोभीकरण, त्या ठीकाणी बगीचा, स्टॉल यासाठी सर्व पक्षीयांना समान संधी देण्यात येईल. नागरी दलित वस्तीचा जो विषय आहे. जे सदस्य राखीव प्रभागातुन निवडुन आलेले आहेत. मी व म.आयुक्त शासन निर्णयानुसार निर्णय घेणार आहेत. समजा मी त्याच प्रभागातुन निवडुन आलो आहे. मी सर्व निधी व कामे त्या भागात करेल आणि इतर जे गरीब वस्त्या आहेत. इतर प्रभागात ते या पासुन वंचीत राहतात. म्हणुन शासन निर्णयानुसार अनुक्रमांक 4 नुसार मी कार्यवाही करणार आहे.आणि कोणावरही यामुळे पक्षपात होणार नाही. सर्वांना समान संधी देण्यात येईल सर्वांना विश्वासात घेऊन कामे करण्यात येतील. सदरचा विषय मंजुर करणेत येत आहे.

म. आयुक्त — दलित वस्तीच्या बाबतीमध्ये समाजकल्याण विभागाकडे जो शासननिर्णय प्राप्त आहे. त्याच्या मध्ये म्हटले आहे. की जो प्रभाग अनुसुचीत जातीचा सदस्य निवडून आलेला आहे. त्याला लोकसंख्येची अट नाही त्याच्यात आपण काम देऊ शकतो त्याच्या व्यतिरिक्त जर काम घ्यावयाचे असतील तर तुम्हाला इतर भाग घेता येतात. मात्र तो जो पॉकेट आहे. त्यापॉकेटमध्ये 50% पेक्षा जास्त अनुसुचीत जातीची वस्ती असावी मागच्या वेळी असे प्रस्ताव दिलेले आहे. त्याप्रमाणे काही प्रस्ताव मंजुर पण झालेले आहे. आपण किती जरी ठरविले तरी सुध्दा आपल्याकडे जो निधी येतो त्याचा जवळ-जवळ तो 80 ते 90 % निधी हा फक्त् आणी फक्त राखीव भागामध्येच खर्च होतो असे गट आहे. त्यात हेतु काय आहे. समजा एखादी वस्ती अशी आली की पुर्णपणे दलित वस्ती आहे.ती भागाची लोकसंख्या त्या टक्केवारी प्रमाणे ती अनुसुचित जातीसाठी झाली नाही म्हणून ती वस्ती ज्या दलित योजना आहे.त्याच्यापासुन वंचीत राहु नये म्हणून फक्त त्या वस्तीसाठी त्या शासननिधीतुन सुचविलेल्या याचा अर्थ आपण आपल्या बांधवांना मागीलवर्षी आपण असे प्रस्ताव केलेले होते असे प्रस्ताव बरेचसे मंजुर झालेले आहे. याचा अर्थ सगळा निधी तेथे जाऊ शकतो असा अर्थ अजिबात नाही आहे. आणि जे राखीव प्रभाग आहे.1,4,7,15,16,18 हे सहा प्रभागामध्ये लोकसंख्येची अट लागु होत नाही आणि त्या प्रभागामध्ये दलितवस्तीचे निधी उपलब्ध होतो त्याला आपण विशेष निधी म्हणतो शासन त्याच्या बजेट मध्ये पण ठेवतो आणि आपल्याला प्राप्त निधी मंजुर होतो. गरज पडली तर शासन जास्तही पैसे देते. त्यामुळे घाबरणेचे काहीही कारण नाही.हा निधी दलित वस्तीतून बाहेर पाठविला जाईल अशी परिस्थिती कधीही होऊ शकत नाही. आणी बाहेर कुठे कामे करणे साठी मात्र प्रमाणीत करावे लागते ज्याच्यामध्ये 50 टक्के अनुसुचीत जातीचे लोक राहतात हे जर प्रमाणीत करावयाचे असेल ते प्रमाणपत्र मी अजीबात देत नाही.

म. महापौर सन 2018-19 व सन 2019-20 या वित्तीय वर्षातील कामांसाठी जिल्हा स्तरीय सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना तसेच नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक योजना, नागरी दलितेतर योजना व मनपाकडे वर्ग झालेल्या हद्द वाढीतील 10गावांमध्ये 14 व्या वित्त आयोगाच्या शिल्लक निधी मधून नागरीकांच्या आवश्यकतेनुसार तसेच सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच शहराच्या दृष्टीने आवश्यक ती विकास कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच यासाठी मनपा मार्फत आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २५ दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन 2018-19 व सन 2019-20 या वित्तीय वर्षात **जिल्हास्तरीय सुवर्ण जयंती योजने** अंतर्गत खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्र.क्र.१ मधील वलवाडी भिलाटी भागात बंदिस्त गटार करणे.	१४९५३२७
२	प्र.क्र.१ मधील वलवाडी देव मढी भिलाटी भागात बंदिस्त गटार करणे.	१४८९०५३
३	प्र.क्र.२ मधील गजानन कॉलनी भागात रस्ता कॉक्रीट करणे.	१४९२९०१
४	प्र.क्र.२ मधील भगवती नगर भागातील नाल्यावर पाईपमोरी बांधणे.	४७२३७९
५	प्र.क्र.२ मधील यशोदा हॉस्पिटल आग्रा रोड पासून ते मरिमाता मंदिर ते निलेश चक्की पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२९९८८७७
६	प्र.क्र.२ मधील बडगुजर कॉलनी भागातील ओपनस्पेस येथे उद्यान विकसीत करणे.	१४९८४४१
७	प्र.क्र.३मधील राज चिकन सेंटर ते लोकेश वेल्डिंग वर्क शॉप पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	७९९६८२
८	प्र.क्र.३ मधील विटाभट्टी भागात श्री.सफा शेख ते श्री.सत्तार अन्सारी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	४९८२८१
९	प्र.क्र.३ मधील एव्हर स्मार्ट टेलर ते नितीन मेन्स पार्लर ते एल.एम.सरदार शाळेपर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	९९७१६९
१०	प्र.क्र.३ मधील शारदा नगर भागात डॉ.श्री.अविनाश पिंगळे ते श्री.मंगेश खैरनार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९९४५७९
११	प्र.क्र.३ मधील लोढी नाला पुलापासून ते मरिमाता मंदिरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	७९९६७२
१२	प्र.क्र.३मधील अब्बास अन्सारी यांच्या घरापासून ते हमीद मुकादम यांच्या घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे.	१९९१५२
१३	प्र.क्र.४ मधील गुलमोहोर बंगल्यापासून ते प्रियंका अपार्टमेंट व निलामय बंगला ते रघुनंदन बंगल्यापर्यंत व इंद्रसेन चौकापासून ते रघुनंदन बंगल्यापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे.	१६५८७८७
१४	प्र.क्र.४मधील जयहिंद स्विमिंग टॅक ते श्री.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९४५०९
१५	प्र.क्र.४ मधील यमुना सदन ते मयूर बंगला ते राजे संभाजी व्यायाम शाळा ते श्री.पेंढारकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९७५०९

१६	प्र.क्र.५ मधील शिवाजी नगर भागातील गणपती मंदिर येथे उद्यान विकसीत करणे.	११९४०७०
१७	प्र.क्र.५ मधील प्रमोद नगर भागातील दत्त मंदिर येथे उद्यान विकसीत करणे.	४९२९७५
१८	प्र.क्र.५ मधील शाहू नगर भागात श्री.प्रकाश भंडारी ते नाल्यापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२९९८१३
१९	प्र.क्र.५ मधील प्रमोद नगर सेक्टर नं.३ भागात श्री.आशिष शिसोदे ते श्री.भीमसिंग राजपूत यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९९७७१९
२०	प्र.क्र.५ मधील सुशांत कॉलनी भागात श्री.सुरेश पाटील यांच्या घरापासून ते डॉ.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९८७७२
२१	प्र क्र १२ मधील सज्जू चाक्कीवाले यांच्या घरापासून ते अखिल पैलवान यांच्या घरापर्यंत रस्ता करणे.	१४६४६८९
२२	प्र.क्र १२ येथे कबीर गंज भागात कॉंक्रीट रस्ता करणे.	९९३१६०
२३	प्र.क्र १२ मधील मस्जिदची गल्ली मुनाफ सोसीअल वर्कर यांच्या घरापासून ते फरीदा टँकर यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	९९३१६०
२४	प्र.क्र १२ मध्ये कबीर गंज जुना वडजाई रोड आझाद नगर, भोईवाडा भागात काँक्रीट गटार करणे.	९८६७२८
२५	प्र क्र १३ मध्ये शिवाजी नगर येथे नूर मस्जिद पासून मधील सर्व गल्ली व आप्पा खताळ यांच्या गल्ली पावेतो काँक्रीट गटार करणे.	९८६७२८
२६	प्र क्र १३ मध्ये मोहम्मद सर यांच्या घरापासून ते इस्माईल माझार शेठ यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	९९०६३८
२७	प्र क्र १३ मध्ये स्वेस उर्दू हायस्कूल समोरील भागात कॉंक्रीट गटार करणे.	९८६७२८
२८	प्र क्र १३ मध्ये धुलिया स्टील ते इस्लाम खाटवाला पर्यंत काँक्रीट रस्ताकरणे.	६६२५६६
२९	प्र. क्र. १४ मध्ये राजवाडे नगर येथे श्री उद्धव कचवे यांच्या घरापासून ते जी बी महेश्वरी यांच्या घरापर्यंत व श्री चंद्रकांत मुलमुले यांच्या घरापासून ते श्री तारगे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	३४८६२३१
३०	प्र क्र १४ मध्ये वल्लभ नगर ओम शांती अपार्टमेंट ते श्री पटानी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२८९९०७१
३१	प्र.क्र१५ मध्ये जवाहर नगर येथे देवरे क्लासेस जवळील ओपन स्पेस येथे उद्यान विकसीत करणे.	१४९८९९५
३२	अग्रवाल नगर गणेश अपार्टमेंट समोरील ओपनस्पेस मध्ये उद्यान विकसित करणे.	१६९९९९६
३३	प्र क्र. १९ मध्ये अजमेरा नगर येथे श्री. एजाज शाह यांच्या घराजवळ रोड क्रॉस करणे.	१५६७८१
३४	प्र क्र. १९ मध्ये ग्रीन कॉलोनी अलेरा हायस्कुल जवळ कॉंक्रीट गटार करणे.	९८६७२८
३५	प्रभाग क्र. १० मध्ये ८० फुटी रोड ते जलारामबाप्पा मन्दिर नित्यानंद नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२१४८०४६
३६	प्र.क्र. ८साखला मेडिकल ते राणा हॉटेल घरा पावेतो दोन्ही बाजूला कॉंक्रीट गटार करणे	२४६४५१५
३७	प्र.क्र.८ ग.न.२ जे.बी.रोड स्वामीनारायण चाळ पासून ते गोल बिल्डिंग पर्यंत कॉंक्रीट गटार करणे	३५२५६९८

३८	प्र.क्र. ८ कसाब वाडा ते सलीम प्रोफेसर पावेतो कॉक्रीट गटार करणे	१४६४६५२
३९	प.क्र.६ मोराणे नशनल हायवे, मेनरायझींग लाईन ते पर्यंत एच.डी.पी. पाईप लाईन टाकणे	४९६०५५
४०	प्र.क्र.६मोराणे जोशी यांचे घरापासून ते दादा भाऊ मिस्तरी यांचे घरापर्यंत बंदिस्त गटार करणे.	४९४८८५
४१	प्र.क्र.६किरण दोधा पाटील ते शालिग्राम आनंदा पाटीलयांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	९८९४७४
४२	प्र.क्र.६ महीवळे अजिक्य तारा सोसायटी ,अनिरुद्ध नगर राजेंद्र नगर,मंदार सावंत ते जिभाऊ पाटील, श्री. कदम ते मरिमाता मन्दिर पर्यत कॉक्रीट गटार करणे.	९९७५४५
४३	प्र. क्र. ७ मध्य राकेश परदेशी ते संजय कनोज यांचे घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	८५५०५५
४४	प्र.क्र.७मध्ये जय अंबे फन्सी स्टोर ते स्वामी टेउराम स्कूल कंपाऊंड पर्यंत आर.सी.सी.गटार करणे.	१९९९७८९
४५	प्र. क्र.७ बिसमिल्ला व्यायाम शाळा ते गवळी वाडा गेट पर्यंत मोगलाई येथे कॉक्रीट गटार करणे.	१९६३५९
४६	प्र. क्र.७ संत गाडगे बाबा मठ दीपक परदेशी यांचे घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे.	१४९९८९१
४७	प्र.क्र.७ मध्ये गीता कटारिया यांचे घर ते ज.डी. पोपली यांचे घर ते ब्लॉक नं.७ पर्यंत सिमेंट कॉक्रीट गटार करणे.	१०००१७०
४८	प्र.क्र. ७ मध्ये मदनलाल आर्जून यांचे घर ते श्री दयानंद मेहता यांचे घर ते ब्लॉक डी पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे.	९९९९०५
४९	प्र.क्र.११ माणिक नगर येथे विविध ठिकाणी गटार करणे.	२४९१५९०
५०	प्र.क्र.११ रत्नदीप प्रोव्हिजन ते रमेश मोरे यांचे घरापर्यंत व सर्व न. ३१४ बंदिस्त कॉक्रीट गटार करणे.	१३४८०९५
५१	प्र.क्र.११ पावन नगर येथे विविध ठिकाणी गटार करणे.	९९८१८२
५२	नाटेश्वर कॉलनी भागात विविध ठिकाणी गटार करणे.	४९५३४३
५३	ग.नं. २ जैनमंदिराच्या मागील बोळीत ड्रेनेज व बंदिस्थ गटार तयार करणे.	२०००००
५४	जय बजरंग चौक ते पोस्ट गल्ली पर्यंत बंदिस्त गटार व रोड करणे.	१९९९३७५
५५	न्युसिटी हायकुल ते गांधी पुतळा पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४९७७६८
५६	प्रभाग क्र.१५ मध्ये वैभव नगर भागात राणा चक्की ते इलेक्ट्रिक डी.पी. ते सैय्यद ते अभय पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटकरण करणे.	२९९४१७५
५७	प्रभाग क्र. १५ मध्ये शनि मंदिराच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे.	९८०७८८
५८	प्रभागक्र.१५मध्ये राधाकृष्ण मंदिर ते वानखेडे ते सोदानकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९१४८१
५९	प्रभाग क्र.१६ मध्ये केरुजी अप्पा यांच्या घरापासून ते संतोष महानोर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटकरण करणे.	१४११७५०
६०	प्रभाग क्र.१६ श्री. मगर यांच्या घरापासून ते कैलास नगर बोर्ड पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	१३४१२१७
६१	प्रभाग क्र.१६ मध्ये श्री.सुपनर यांच्या घरापासून ते खांडेकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटकरण करणे.	७६०३६०

६२	प्रभाग क्र. १७ मधील सानेगुरुजी सोसायटी भागात श्री.देवकर ते डॉ. ज्वाला राजपूत , श्री. संदीप माळी ते श्री. भगवान पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे	१६८५९७७
६३	प्रभाग क्र. १७ मधील शांती नगर कॉर्नर ते (भोईटे)समता स्कूल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे,	१५००७४२
६४	प्रभाग क्र. १७ मधील सेवादास नगर भागात श्री.संदीप पाटील ते श्री. रावण पाटील ते श्री. सराफ यांच्या घरापावेतो भूमिगत गटार करणे	२०५६४८१
६५	राष्ट्रवादी भवन अॅड. विसपुते ते स्टेशन रोड व साहेबराव शिंदे ते विनोद मांडरे यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	५०२७८२९
६६	सर्वे नं.५३६/१ ब मधील तुळसाबाई चा मळा येथील डॉ. जैन ते रासकर नगर रोड ते विनोद जगताप यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४९१९९९
६७	प्रभाग क्र.१८ मध्ये भोले बाबा नगर, कोळवले नगर भागात श्री.किशोर राजपूत ते श्री. मनोज वाघ, श्री. शरद खंडागळे ते श्री.भाई पंजाबी पावेतो भूमिगत गटर टाकणे.	१४८६९७६
६८	प्रभाग क्र.१८ मध्ये सहजीवन नगर , समता नगर भागात श्री. ढाके ते श्री. गुप्ता, श्री. खोंडे ते श्री. पाखले पावेतो भूमिगत गटर टाकणे.	१४७५३०५
६९	जुनी महानगरपालिकेच्या पाठीमागे हॉकर्स झोन विकसित करणे.	४९९९९२०
७०	विरशैव लिंगायत गवळी समाज पेठ विभाग,धुळे स्मशान भूमी विकसित करणे.(नदी किनारी सुधा हॉस्पिटल समोरील)	१६६८६८२
७१	देवपूर भागातील कदमबांडे नगर भागांत श्री.साहेबराव पाटील ते श्री.योगेश शिंपी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४९९२३७
७२	देवपूर भागातील कदमबांडे नगर भागांत रस्ते कॉक्रीट करणे.	२४९९४६१
७३	देवपूर विनायक नगर भागांत वाडीभोकर रोड ते श्री.प्रकाश पाठक सर ते नाल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४९९२३७
७४	श्री. विजयअप्पा गवळी ते श्री. शाह अॅण्ड कंपनी पर्यंतरस्ता कॉक्रीटकरण करणे.	१४९२५१३
७५	पांझरा नदी किनारी गरडी जवळील जागेत सभागृह बांधणे.	१९९५८०५
७६	प्रभाग क्रं. ११ येथे नाकोडा मेडिकल ते समता भुवन ते जयविजय फॅक्टरी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९१०६४
७७	राजहंस कॉलनी व श्रीनगर भागातील सर्व्हे नं. ५६७ ए , ५६७ ए बी येथे उद्यान विकसीत करणे.	१५८८०००
७८	प्रभाग क्रं. १४ विशालनगर येथे रस्ते व गटारी करणे	१५०००००
७९	मोहाडी भागातील सर्व्हे नं. ४८७/२ संजयभाऊ नगर येथे श्री शरद रवंदळे ते श्री. गंभीर गावडे, श्री. देवचंद पाटील ते श्री. योगीराज पाटील यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे	१००००००
८०	प्रभाग क्रं. २ श्रीरंग कॉलनीत ओपन स्पेस उद्यान विकसीत करणे.	१०३०६३७
८१	प्रभाग क्रं. ९ फुले कॉलनी महादेव मंदिरामागील बाजू व मोकळया जागेत कॉक्रीटीकरण करणे.	९९९८२६
८२	प्रभाग क्रं. ९ मधील गुरुव गल्ली जुने धुळे येथे समाज मंदिर बांधणे.	१००००००
८३	प्रभाग क्रं. १४ श्री. संजय पाटील ते श्री. शांताराम मालपुरे वर्धमाननगर मोहाडी रोड येथे आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे	४११३०३

८४	देवपूर सर्व्हे नं. २९/१ सुभाषचंद्र बोस कॉलनी येथे ओपन स्पेस उद्यान विकसीत करणे.	४६०१२१
८५	प्र क्र १४ मध्ये विशाल नगर येथे रमेश जांभळे यांच्या घरापासून ते शिवाजी चौधरी यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे	७५६३७९
८६	प्र.क्र ११ नाना वाणी ते पवन नगर बोर्ड पावेतो बंदीस्त गटार करणे.	१०३०८९०
८७	एकनाथ चौधरी ते किरण शेलार ते बापु तुकाराम चौधरी ते सुर्यवंशी मावशी यांच्या घरापर्यंत बंदीस्त गटार करणे.	४९५९७०
८८	बोडवे यांचे किराणा दुकान ते चौधरी काका यांच्या घरापर्यंत बंदीस्त गटार करणे	४९२५६३
८९	भगा मोहन नगर गांगुर्डे मावशी ते विरेंद्र जैन यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता तयार करणे.	६९४२९६
९०	महाराणा प्रताप चौक येथे उद्यान विकसित करणे.	७००००००
९१	देवपूर भागात स.नं. ५२/ अ येथे हॉकर्स झोन विकसीत करणे.	८०००००
९२	अंबीका नगर, विठ्ठल नगर व सप्तश्रृंगी कॉलनी सर्व्हे नं.४७२/३ बी व ३ सी येथे उद्यान विकसीत करणे.	२६९५०२३
९३	प्र क्र १३ मध्ये फिरदोस नगर व काझी प्लॉट भागात लियाकत पठाण यांच्या घरापासून ते मन्नान शेठ व अबुल मजीद ते फिरोज भाई घरापर्यंत व मोहम्मद कुरबान ते हक्का मुकादम घरापर्यंत व राशीद शाह जमात शाह ते चुन्नी भाई व रफिक बाला शाह ते राहेनुमायधिल्लत मदरसा पर्यंत व सुलतान भाई ते सलीम भाई घरापर्यंत काँक्रीट गटार करणे .	९८६७२८
९४	प्र क्र. १९ मध्ये रहेबर बाग येथे नौशाद अहेमद क़ुरेशि यांच्या घरापासून ते शहीद चाक्कीवले यांच्या घरापर्यंत व सलीम पुठ्ठेवाले यांच्या घरापासून ते हुसैन दलाल यांच्या घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	९८६७२८
९५	प्र क्र. १९ मध्ये ख्वाजा नगर येथे काँक्रीट गटार करणे.	९८६७२८
९६	प्र.क्र.३ मधील आग्रा रोड शिवसेना कार्यालय ते दुर्गामाता मंदिरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४९९३७६
९७	प्र.क्र.५ मधील समर्थ कॉलनी भागात श्री.देशमुख ते श्री.मोरे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१२९७१८१
९८	ग.नं. ७ बंजार गल्ली भागात समाज मंदिर बांधणे	१८८६०००

सदर योजने अंतर्गत आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 (अ) सन 2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ. करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २५(अ) दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन 2018-19 या वित्तीय वर्षात **नागरी दलित वस्ती सुधार योजना** अंतर्गत खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रुपये
१	प्र क्र. १ मध्ये इंदिरा नगर भागात विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीट करणे.	२४०००००/-
२	प्र.क्र.१ मध्ये लक्ष्मी नगर, परभणी वाडा, गुरुदत्त नगर, वॉल भिलटी, जि.प. शाळेमागील भिलाटी, वलवाडी भागात बंदिस्त कॉक्रीट गटार करणे.	२४०००००/-
३	प्र. क्र. १ मध्ये युगंधर कॉलोनी,धनदाई कॉलोनी रस्ते कॉक्रीट करणे.	२२०००००/-
४	प्र.क्र. ४ येथे चंदन नगर भागात बनछोडे यांच्या घरापासून ते बाबा वानखेडे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२१०००००/-
५	प्र.क्र. ४ येथे चंदन नगर भागात लहूजी वस्ताद व्यायाम शाळेपासून ते कंदन पानसेंटर पर्यंत व शशिकांत वाघ यांच्या घरापासून ते बिलाल इस्तरीवाले यांच्या घरापर्यंत व प्रमिलाताई वानखेडकर ते साहेबराव भामरे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	२७५००००/-
६	प्र.क्र ४ चंदन नगर येथे वाघमारे डॉ यांच्या घरापासून ते जागृती मित्रमंडळ बोर्डा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२१५००००/-
७	प्र.क्र. ७ येथे भोईवाडा येथे भीमराव मोरे ते धनसिंग मोरे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	८६२०८६/-
८	प्र.क्र. ७ येथे शिवधाम मंदिर ते बहावालपुरी भवन पर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	४४४८१५१/-
९	प्र.क्र.७ मध्येमोगलाई परिसरात गवळी वाडा येथे ४ सीट मुतारी बांधणे.	२०८९७३/-
१०	प्र.क्र. ७ मध्ये स्वामी टेउराम हायस्कूल ते श्रीकृपा कटलरी पर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	१४८१०७९/-
११	प्र.क्र. १५ येथे गोदाई कॉलोनी येथे श्री सूर्यवंशी ते निकुंभे यांच्या घरापर्यंत व श्री अमृत सागर ते श्री चव्हाण यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	२५०००००/-
१२	प्र.क्र. १५ येथे कालिकादेवी नगर बोर्ड पासून ते पाटाईत यांच्या घरापर्यंत व कुरकुले ते वाघ बापु यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	२५०००००/-
१३	प्र.क्र.१५ मध्ये नारायण मास्तर चाल ते LIC कॉलोनी पावेतो कॉक्रीट रस्ता व गटार करणे.	२०००००/-
१४	प्र.क्र.१६ जगदीश देवपूरकर ते साईकृपा इस्त्रीवाले व भाऊसाहेब बेहेरे ते सत्य साईबाबा डीपी रोड भागात रस्ता डांबरीकरण व गटार करणे.	७०००००/-
१५	प्र.क्र. १८ मध्ये खालचे गाव इंदिरा नगर भागात प्रशांत गोसावी ते काळू शेवाळे घरापर्यंत , नेवाडेकर यांच्या घरापासून ते श्री देवा शिंगाडे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	२१०००००/-
१६	प्र.क्र. १८ मध्ये खालचे गाव इंदिरा नगर भागात मारोती मंदिर ते शिवाजी व्यायाम शाळा , श्री सुरेश चेत्राम ते बाळू आव्हाळे , आबा शिंपी ते श्री बच्छाव यांच्या घरा पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	२१०००००/-
१७	प्र.क्र. १८ मध्ये खालचे गाव श्री प्रशांत गोसावी ते श्री भामरे, श्री बच्छाव ते श्री कोकणे आबा, नेवाड यांचे घर ते श्री देवा शिंगाडे, श्री धर्मा शिंपी ते श्री बच्छाव घरापावेतो भागात भूमिगत गटार टाकणे.	१४०००००/-

१८	प्र.क्र. १८ मध्ये खालचे गाव मारोती मंदिर ते शिवाजी व्यायाम शाळा, श्री सुरेश चेत्राम ते श्री बाळू आव्हाळे भागात भूमिगत गटार टाकणे.	१४००००० /-
१९	प्र.क्र. ९ मध्ये जुने धुळे गायकवाड चौकात गटार करणे.	२५००००० /-
२०	निळा चौक भागात रस्ता करणे	३००००० /-
२१	प्र.क्र. ६ मध्ये महिंदळे येथे अनमोल सोसायटी श्री लोंढे यांच्या घरापासून ते श्री खुशाल भामरे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे.	१००००० /-
२२	प्र.क्र. ५ मध्ये आंबेडकर नगर येथे पविंग ब्लॉक बसविणे.	१५००००० /-
२३	डीपी रस्त्यापासून अग्रसेन शाळेलगत हनुमान मंदिरापर्यंत गटार करणे	५००००० /-
२४	महात्मा फुले पुतळा ते अण्णाभाऊ साठे नगर पावेतो रस्ता करणे.	३००००० /-

प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 ब) सन 2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना,अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ. करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २५(ब) दिनांक २८/२/२०१९

शहर हद्दवाढीतील १० गावं अंतर्गत मनपाकडे वर्ग झालेल्या १४ वा वित्त आयोगाच्या खात्यांमधील शिल्लक निधी मधुन खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.न.	कामाचे नाव	अदांजीत रक्कम
१	मोराणे प्र.क्र. ६ येथे गाव विहिर ते आदिवासी वस्ती पावेतो काँक्रीट रस्ता करणे	१५ लक्ष
२	प्र.क्र. ६ मोराणे अमरधाम येथे पेव्हर ब्लॉक बसविणे	१५ लक्ष
३	प्र.क्र.६नकाणे येथे गावदरवाजा ते मयूर रविंद्र पाटील यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१६ लक्ष
४	प्र.क्र. ६ महिंदळे येथे मराठी शाळा परिसर, राजेंद्र नगर व विविध ठीकाणी काँक्रीट गटार करणे.	५ लक्ष
५	प्र.क्र.६ महिंदळे येथे होली चौक ते निलेश पाटील यांचे घर ते गोल गल्ली ते सुयोग सोसायटी पावेतो काँक्रीट रोड करणे.	१८ लक्ष
६	प्र.क्र.६ महिंदळे होलीचौक ते मरिमाता मंदिर ते भगवान बाबा सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.	१० लक्ष
७	प्र.क्र.महिंदळे यथे विविध भागात ४ इंची व ६ इंची HDPE पाईपलाईन टाकणे व १० हॉर्सपॉवरची इलेक्ट्रीक मोटार बसविणे.	८ लक्ष
८	प्र. क्र. ११ बाळापुर मध्ये रतन विश्राम पाटील ते विजय रघुनाथ मिस्तरी यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता व काँक्रीट गटार करणे.	१४ लक्ष
९	प्र.क्र.११ बाळापुर मध्ये संजय निंबा पाटील ते युवराज शिवराम पाटील काँक्रीट रस्ता करणे.	५.५० लक्ष

१०	प्र.क्र. १० मध्ये जुने धुळे, वरखेडी रोड येथे अरुण मोरे ते देविदास धनजी ठाकरे यांच्या घरापर्यंत रस्ता व गटार करणे.	२५ लक्ष
११	प्र.क्र. १० मध्ये जुने धुळे वरखेडी येथे शंकर भिल ते बन्सी भिल यांच्या घरापर्यंत रस्ता गटार करणे.	१८ लक्ष
१२	पिंप्री गावत रस्ते काँक्रीट करणे.	८.८० लक्ष
१३	प्रभाग क्र. १८ मध्ये अवधान येथे श्रीराम मंदिर समोरील रस्ता काँक्रीट करणे	६,२३,३२२/-
१४	प्रभाग क्र. १८ मध्ये अवधान गावत १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.	१२,६७,२३४/-
१५	भोकर गावातील अमरधाम रस्ता कॉक्रीट करणे	८.८० लक्ष्
१६	भोकर गावातील अमरधाम परिसरात शौचालय बाधणे	८ लक्ष्
१७	चितोड गावातील गवळी वाडा स्मशानभुमी येथे शेड उभारणे	१५.२४ लक्ष्

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 (क) सन 2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ.करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २५(क)दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन 2018-19 व सन 2019-20 या वित्तीय वर्षात **नागरी दलितेतर योजना** अंतर्गत खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्र क्र १४ मध्ये राजवाडे नगर येथे श्री घाडगे यांच्या घरापासून ते श्री दीपक शिंदे यांच्या घरापर्यंत व लताबाई चौगुले यांच्या घरापासून ते विमलबाई राहुळे यांच्या घरापर्यंत व दीपक पांडे क्लिनिक पासून ते श्री विलास बडके यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१६५३११३
२	प्र.क्र. ९ मध्ये पप्पुभाई डापसे यांच्या घरापासून ते बंटी गोरे यांच्या घरापासून ते मनोज पोलादे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे	५९७४७०
३	प्र.क्र. ९ मध्ये शांताबाई गोरख मोरे ते वराडे अंडेवाले यांचे बुकानापावेतो रस्ता कॉक्रीट करणे	६५५२९३
४	प्रभाग कर. १० मधील ८० फुटी रोड जुने धुळे फुले कॉलनी ते युवराज आबा ते योगेश बांगडीया यांच्या घरापावेतो कॉन्क्रीत रस्ता करणे .	१९९४४३०
५	प्र.क्र. १०मध्ये वरखेडी रोड ते भोलेबाबा भवन ते भोले बाबा मंदिर पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	१६९४७२५
६	प्र.क्र. १० मध्ये वेडू सोमा माळी ते निरंजन जोशी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे	६९८२२३
७	प्र.क्र. १० मध्ये बजरंग बली मंदिर ते माउलीनगर पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे	९९९१०२

८	प्र.क्र.१०मध्ये जुने धुळे फुले कॉलनी ते ८० फुटी रोड ते विजय नाना पाच्छापूर येथे कॉक्रीटी रस्ता करणे	१९९३१९१
९	प्रभाग क्र.१७ मधील शासकीय दुध डेअरी वॉल कंपाऊंड श्री.वसंत मराठे घर ते किराणा शॉप पावेतो रस्ता डांबरीकरण करणे	९९४९६५
१०	प्र क्र.१९ मध्ये गरीब नवाज नगर येथे बार मदिना मस्जिद पासून ते जाहीर चष्माघर पर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे.	८२८८३८
११	प्र.क्र.११ विठ्ठल नगर येथे कॉक्रीट रस्ता व गटार करणे.	८२६६९८

प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 ड) सन 2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना,अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ. करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २५(ड) दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन 2018-19 या वित्तीय वर्षात **अल्पसंख्याक योजना** अंतर्गत खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रु.
1	प्रभाग क्रं. 13 मधील रहेमनिया मस्जिद ते सलीम गॅरेजपावेतो तसेच गॅरेज पासून ते भंगार बाजार रस्त्यापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे	10,00,000
2	अविष्कार कॉलनी बोर्डापासून ते मदरसा पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	15,00,000
3	प्र क्रं. 8 मध्ये नटराज टॉकीज समोर काझी प्लॉट भागात कॉक्रीट गटार करणे	9,75,000
४	प्रभाग क्रं.3 विट्टाभट्टी भागात दौलत पवार यांच्या घरापासून ते भारत दूध डेअरी पर्यंत कॉक्रीट गटार करणे	1,95,439
५	मौलवी गंज भागात कॉक्रीट गटार करणे	973625
6	लकी बुट हाऊस ते डॉ.काबरे यांचे दवाखान्यापर्यंत खाटीकवाडा अकबर चौक परिसरात कॉक्रीट गटार तयार करणे.	15,00,000
7	प्रभाग क्रं. 13 मधील चाळीसगांव रस्ता काटावाले पासून (हयात हॉस्पीटल) ते मुन्ना शेठ यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण् करणे	23,12,125
8	प्र.क्र. 12 आझादनगर छोटी बावडीजवळ कॉक्रीट रस्ता तयार करणे	9,96,000
9	गजानन कॉलनी 40गांव रस्त्यापासून ते अंजानशाह सोसायटी पावेतो रस्ता कॉक्रीट करणे	20,00,000
10	मोमीन कब्रस्थान देवपूर समोर सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करणे	19,95,219
11	प्रभाग क्रमांक १२ वडजाई रोड जवळ मज्जिदे इस्लाम पासुन ते टेलर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे.	12,000,00

सदर योजने अंतर्गत आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी साहेब तथा शासनाकडेस स सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 19 ई) सन 2018-2019 या वर्षात शासकीय योजनांमधून (जिल्हास्तरीय नगरोत्थान, नागरी दलित वस्ती योजना,अल्पसंख्याक निधी तसेच नागरी दलितेत्तर योजना इ. करावयाच्या कामाच्या निश्चितीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर२५(ई) दिनांक २८/२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन 2018-19 या वित्तीय वर्षात जिल्हा नियोजन मंडळामार्फत यु.डी. 6 या सहाय्यक अनुदानातील कामांसाठी रक्कम रु. 25 लक्ष मात्रची तरतूद केलेली आहे. सदरचे अनुदान शहरातील मंजूर विकास योजनेतील रस्ते बांधणे, गटारी बांधणे, आरक्षणातील भूसंपादन करणे इत्यादी कामासाठी असून यात 23.33 % अनुदान प्राप्त होत असते. याप्रमाणे 25 लक्ष् अनुदान प्रस्तावित करणेकामी सुमारे 1.25 कोटी मात्रची कामे जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रस्तावित करणे आवश्यक आहे.सदरची कामे मंजूर विकास योजनेतील रस्त्यांची कामे असून खालील कामे सहाय्यक अनुदानाअंतर्गत जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रर्तीपूर्तीसाठी प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रु.
१.	वरखेडी रस्ता पासुन ते पापा घारु यांचे घरापर्यंत गटार करणे	25 लक्ष
२.	प्रभग क्रं. 10 बर्फ कारखानाते जयवंत दुसाने यांचे घरापर्यंत गटार करणे	25 लक्ष
३.	सव्हे. नं. 487 पुष्पक अण्णा यांचे घरापासून ते गुप्ता ते अनिल सांगळे ते सुनिल सुराणा यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	25 लक्ष
४.	शासकीय दुध डेअरी मलबारी यांच्या घरापासून ते ढाके ते राजू मराठे ते पालवे यांच्या चक्कीपर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	25 लक्ष
५.	सव्ह. 487 राजू गिर्दोडिया यांच्या घरापासून ते पगारे ते अतुल विभांडीक यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	25 लक्ष
६.	पार्वतीनगर समतानगर भागात बंदिस्त गटार तयार करणे .	5 लक्ष

याबाबत उक्त कामे मंजूर विकास योजनेअंतर्गत असल्याबाबत खात्री करुन तांतडीने प्रस्ताव जिल्हा नियोजन मंडळाकडेस सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २० दि.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका (DAY NULM) अंतर्गत देवपुर विटाभट्टी भागातील समाज मंदिर शहर उपजिविका केंद्र (City Live hood Center) साठी जागा उपलब्ध करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर कार्यालयीन अहवालानुसार सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २६ दिनांक २८/२/२०१९

मा.उपायुक्त सो. यांचे दि.०१/१०/२०१८ चे पत्र तसेच मा. डेएनयुएलएम /SMID /CLC /२ / का. १६/२०१८-१९/२७९ राज्य अभियान व्यवस्थापक कक्ष नगरपालिका प्रशासन संचालनालय,मुंबई दि. ३१ऑगस्ट २०१८ अन्वये दि.अ.यो. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियांन (DAY-NULM) अंतर्गत दारिद्रय रेषेखालील प्रशिक्षण घेतलेल्या विविध कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थीसाठी रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी सर्व्हिस सेंटर सुरु करावयाचे आहे.सदर केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगार (गवंडी, सुतार, इलेक्ट्रीशन, वायरमन, प्लंबर, फिटर इत्यादी कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण इत्यादी) व्यक्तींना एकाच छताखाली एकत्र येवून त्यांच्या मार्फत सर्व्हीस सेंटर व्दारे शहरात सेवा पुरविता येणे शक्य होणार आहे.व बेरोजगारांनाही कायम स्वरुपी रोजगार उपलब्ध होऊ शकेल. यासाठी सर्व्हीस सेंटर व जागा आवश्यक आहे. यासाठी बांधकाम विभागाकडुन देवपुर विट्टाभट्टी भागातील समाज मंदिराचे नवीन बांधकाम मा.खासदार निधीतुन करण्यात आलेले असुन १०००.०० sq. feet पेक्षा जास्तीचे आहे.तरी सदरच्या हॉलमध्ये शहरी नागरी उपजिविका केंद्र सुरु करण्यास मा. महासभेची मंजुरी आवश्यक आहे.सदर (CLC) चा प्रस्ताव मा.आयुक्त तथा संचालक सो.नगर परिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई या कार्यालयास मंजुरी साठी पाठविण्यास मा. महासभेची मंजुरीस्तव सादर झालेला असून कार्यालयीन अहवालानुसार सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- २१ स्वच्छ सव्हेक्षण २०१८-१९अंतर्गत धुळे मनपा कार्यक्षेत्र प्लॉस्टीक मुक्त करणेबाबत शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौरमहोदय,आपण या विषयाची जी टिपणी आहे. त्यात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 ब असाधारण क्र. 81 दिनांक 23 मार्च 2018 च्या अधिसुचनेनुसार 50 मायक्रॉनप्रक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पासुन बनविल्या जाणाऱ्या पिशव्या, थर्मकॉल एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोझल वस्तु यांच्या वर सरसकट बंदी आहे का ? की प्लॅस्टिक पिशव्यांवर आहे. याबाबत खुलासा करावा.

म. आयुक्त पुर्वी हा विषय महासभेपुढे आला होता हा विषय माहीतीसाठी आलेला आहे. याविषयी कायदा झालेला आहे.

म. उपायुक्त मा. महापौर यांचे वतीने खुलासा करतो की, बंदीचा जो ठराव आहे. स्वच्छ सर्वेक्षण 2019 चालु असतांना याबाबत केंद्रशासनाचे जे निर्देश होते की, प्लॅस्टिक बंदी ही त्या स्थानिक बॉडीने स्विकारली पाहिजे.मला सांगायला आनंद वाटतो हे धोरण आपल्या राज्याने यापुर्वीच स्विकारलेले आहे. राज्याने ज्याअर्थी धोरण स्वीकारले आहे.त्या अर्थी ते सर्व स्थानिक संस्थाना बंधनकारक आहे. सन्मा. सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. हा जो ठराव आहे. ही पॉलिसी आहे. या निधीचा या आधीच कायदा झालेला आहे. केंद्रान ठराव दिलेला आहे. काही राज्यांमध्ये कायदा नव्हता लोकल बॉडीचे ठराव मागितलेले आहे. आपल्याकडे ठरावाच्या बाबतीत राज्य शासनाला विचारले कायदा पास केला असेल तर स्थानिक बॉडीचे ठरावांची

काय आवश्यकता आहे. त्यावेळी असाच खुलासा झालेला आहे. स्वच्छ सर्वेक्षणाचा भाग म्हणुन हा ठराव पास करावयाचा आहे. कायदयात ज्या-ज्या तरतुदी दिलेल्या आहेत त्यानुसार पालन होणार आहे.

म. हर्षकुमार रेलन — माझे तेच म्हणने आहे की, कायदा पास झालेला असतांना ठरावाची काय आवश्यकता आहे.

म. आयुक्त — सुरवातीच्या विवेचनात ते आलेले आहे. परंतु टीपणीत खाली नमुद उपरोक्त संदर्भ व विषयान्वये स्वच्छ सर्वेक्षण 2018-19 अतंर्गत महापालिकेचे कार्यक्षेत्र दिनांक 2 ऑक्टोंबर 2018 पर्यंत प्लॅस्टिक मुक्त बाबत में महासभेचा ठराव करणे आवश्यक आहे. सदर विषय महासभेपुढे सादर प्लॅस्टिक मुक्तीचा निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे. प्लॅस्टिक मुक्तीचा पुर्वीचा कायदा होता त्यानंतर दुसरा जो कायदा झाला तो महाराष्ट्र पुरता झालेला आहे. त्याच्यात संपुर्ण प्लॅस्टिक वर बंदी आणली आहे. भारतभर यावर कार्यवाही चालु आहे.

मा.हर्षकुमार रेलन — आज आपण मनपाचा ठराव करणार आहे का?

म.आयुक्त — आपण ठराव करीत नाही सुरवातीच्या विवेचनेत, प्रस्तावनेत आली आहे.आपल्याला केंद्र शासनाने फॉरमॅटमध्ये ठराव सांगितला आहे.त्याप्रमाणे ते आहे. पुर्ण देशातुन, राज्यामधुन ते होत आहे.आपल्या राज्याने या आधी काळजी घेतली आहे. खरे म्हणजे ठरावाची गरज नाही परंतु स्वच्छ सर्वेक्षण 2019 साठी हा ठराव आलेला आहे.

म. महापौर — सदर प्रस्ताव शासनाकडेस नियमाप्रमाणे सादर करावा लागणार आहे.प्रस्तावास सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २७ दिनांक २८/०२/२०१९

भारत सरकार आवासन आणि शहरी कार्य मंत्रालय दिल्ली यांचेकडील पत्र क्र.D.O.NO.१५/५३/२०१८ दि.७/९/२०१८ तसेच महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य विकास अभियान संचालनालय यांचेकडील पत्र क्र. राअस/मा.शि.स/९०८/१८-१९ दि.११/९/१८ रोजीचे पत्रानुसार स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत स्वच्छता ही सेवा हा उपक्रम राबवुन साजरा करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश लोकसहभाग वाढविणे व महात्मा गांधींच्या स्वप्नातील खऱ्या स्वच्छ भारताची संकल्पना समजुन घेणे हा आहे.

याबाबत स्वच्छ सर्व्हेक्षण अंतर्गत मोठ्या प्रमाणावर लोक सहभाग मिळविण्याकरीता विविध स्वच्छता विषयक बाबींचे आयोजन करुन श्रमदान, सार्व. स्वच्छता, स्वच्छतेची शपथ, प्रभातफेरी यांचे आयोजन करुन सन २०१७-१८मध्ये घेण्यात आले होते. धुळे मनपाचा आपला स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८ मध्ये ४०४१ शहरांमधुन ७८ वा क्रमांक मिळवुन आपला अमृत शहरांमध्ये समावेश झाला आहे. उक्त संदर्भिय पत्रान्वये सन २०१८-१९ अंतर्गत २ ऑक्टों.२०१९पर्यंत प्लॅस्टीक मुक्त होणे संदर्भात ठराव करणे बाबत सुचित केले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब असाधारण क्र.८१ दि.२३ मार्च २०१८ च्या अधिसुचनेनुसार ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पासुन बनविल्या जाणाऱ्या पिशव्या (हँडल असलेल्या व नसलेल्या) थर्माकॉल, एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजल वस्तु उदा.ताट, कप, प्लेट्स, ग्लास, भांडे, काटे, चमचे, हॉटेलमधील अन्नपदार्थ पॅकेजींगसाठी वापरले जाणारे भांडे, वाटी, स्ट्रॉ, नॉन ओपन पॉलीपॉपीलेन बॅग्स, द्रव्य पदार्थ साठविण्यासाठी वापरात येणारे प्लास्टीक पाऊच, कप सर्वप्रकारचे अन्नपदार्थ, धान्य साठविण्यासाठी व पॅकींगसाठी वापरले जाणारे प्लॅस्टीक व प्लॅस्टीक वेष्ठन इ. उत्पादन, वापर, साठवणुक, वितरण, घाऊक व किरकोळ विक्री, आयाज व वाहतुक करण्यास राज्यात संपुर्ण बंदी करण्यात आली आहे.

सदरअधिसुचना राज्यातील कोणतीही व्यक्ती, व्यक्तीचा समुह, शासकीज व अशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था, क्रिडा संकुल, क्लक, चित्रपटगृह, नाट्यगृहे, औद्योगीक घटक, समारंभाचे हॉल, वाणीज्य संस्था, कार्यालये, धार्मीक स्थळे, धार्मीक संस्था, हॉटेल, ढाबे, दुकानदार, मॉल, विक्रेता, केटरर्स, घाऊक विक्रेता, व्यापारी, फेरीवाला, वितरक, वाहतुकदार, सेल्समन, मंडई,उत्पादक, स्टॉल्स, पर्यटन क्षेत्रे, वने व संरक्षित वने, इको सेंसेटीव्ह क्षेत्रे, सर्व सागरी किनारे व सर्व सार्व.ठिकाणे, बस स्थानके, रेल्वे स्थानके इ. ठिकाणी लागु आहे.

तरी उपरोक्त संदर्भ व विषयान्वये स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८-१९ अंतर्गत धुळे महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र दि.२ऑक्टों.२०१८ पर्यंत प्लॅस्टीक मुक्तबाबत मे.महासभेचा ठराव करणे आवश्यक आहे.असा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर झालेला असून प्रस्तावास सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 22 स्वच्छ सर्वेक्षण 2018 अतंर्गत धुळे मनपा कायर्क्षेत्र प्लॅस्टिक मुक्त घोषित करुन 3 स्टार मानांकनासाठी शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर प्रस्तावास सर्व सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २८ दिनांक २८/०२/२०१९

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.स्वमअ२०१८/प्र.क्र.८२/नवि-३४ दिनांक २ जुन २०१८ स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी ची अंमलबजावणी करुन धुळे महानगरपालिका हगणदारी मुक्त घोषीत करण्यात आलेली आहे. या अभियाना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहर स्वच्छतेच्या दिशेने कार्यवाही प्रगतीपथावर आहे. नागरी भागात व सार्व.ठिकाणी क्रमाने स्वच्छतेमध्ये सुधारणा होण्यास्तव शहरांना धुळे महानगरपालिकेस तीन स्टार तारांकीत मानांकन (स्टार रेटींग) देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर स्टार रेटींग बाबतची नियमावली (A protocol for making cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आली आलेली आहे. कचरा मुक्त शहरांना तारांकीत मानांकनाची नियमावली राज्य शासनाने स्विकारली असुन ती राज्यातील सर्व शहरांना लागु करण्यास मान्य करण्यास नगरविकास विभागाकडुन दि.२ जुन २०१८ च्या परीपत्रकान्वये मान्यता दिलेली आहे.

कचरा मुक्त शहराच्या तारांकीत मानांकनाबाबत स्वयंघोषणा करण्यापुर्वी शहरातील सर्व प्रभाग सदस्यांकडुन संबंधीत प्रभागाचे कचरा मुक्त तारांकीत मानांकनाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. प्रभाग सदस्यांकडुन प्राप्त झालेल्या तारांकीत मानांकना पैकी जे निम्न तारांकीत मानांकन असेल तेच तारांकीत मानांकन त्या शहराचे तारांकीत मानांकन म्हणुन पडताळणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. प्रभाग सदस्यांकडुन तारांकीत मानांकनाबाबत घोषणापत्र सादर झाल्यानंतर संबंधीत नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांनी ठराव पारीत करुन सार्वजनीक घोषणा करु शकतील. सदर घोषणेच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सुचना १५ दिवसाच्या कालावधीत मागविणे आवश्यक आहे. सदर प्राप्त हरकती व सुचनांची पडताळणी मा.महापौर व मा.आयुक्त यांनी करुन प्रस्तावीत मानांकनाच्या बाबतीत समाधान झाल्यास कचरा मुक्त शहराच्या तारांकीत मानांकनाबाबत स्वयंघोषणा करावयाची आहे. त्यानुसार कचरा मुक्त

शहराच्या तारांकीत मानांकनाबाबत शहराने स्वयंघोषणा करुन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. राज्य शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावानंतर राज्य शासनामार्फत त्रस्त समिती गठीत करण्यात येऊन त्यामार्फत १,२ व ४ तारांकीत मानांकने राज्य शासनाच्या स्तरावर जाहिर करण्यात येतील. तर ३,५,७ तारांकीत मानांकने केंद्र शासनाकडुन पडताळणी करण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर केले जाईल.

कचरा मुक्त शहराचे तारांकीत मानांकन ठरवितांना खालील १०उपअंगे विचारात घेतलेली आहे.

1) घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे (Door to Door Collection)
2) निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण करणे (Segregaiton at source)
3) सार्वजनीक,वाणिज्यक व रहिवाशी भागातील साफसफाई करणे तसेच मलनिस्सारण व नदी नाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे (Sweeping of public, commercial and residential areas (No visible eyesores on streets) and cleaning of storm drains and surface of water bodies)
4) शहरातील कचरा पेट्या आणि पदार्थ पुनर्प्राप्ती सुविधा (Waste Storage Bins, Litter Bins and Material recovery facility)
5) मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे व रहिवाशी कल्याण संघ यांचेकडुन नियमांचे पालन(Bulk Waste Generators and Residential Welfare Association compliance)
6) कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे, शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपनभुमी तयार करणे आणि बांधकामाचा राडा रोडा (Scientific waste processing, Scientific Landfilling C & D Waste)
7) अस्वच्छतेबाबत शिक्षा, दंड व वापरकर्ता शुल्क आकारणी तसेच प्लास्टीक बंदीची अंमलबजावणी (User Fees, Penalties, Spot Fines for littering and enforcement of ban on thin plastic)
8) नागरीकांच्या समस्यांचे निराकरण व अभिप्राय प्रणाली. (Citizen grievance redressal and feedback system)
9) कचऱ्याच्या ढीगांचे निर्मुलन करणे (Eradiction of crude dumping of garbage and dump remediation)
10) शहरातील गटारांची व नैसर्गिक जलसाठ्यांची स्वच्छता (Cleaning of storm water drains and surface of water bodies)
11) कालानुरुप कचरा निर्मितीचे प्रमाण घटविणे (Waste reduction-application of ३-R principles in MSW)
12) शहर सौंदर्यीकरण (City beautification)

सन२०१८च्या स्वच्छ सर्व्हेक्षण मध्ये केंद्र शासनामार्फत स्टार गुणांक पध्दत अवलंबवीली असुन शहरातील सद्या स्थिती पाहता आपण ३ स्टार गुणांकात येवु शकतो. तसेच शहरासाठी ओ.डी.एफ.प्लस दर्जा प्राप्त प्रमाणीत करण्यासाठी राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी मा.महापौर सो.,मा.आयुक्त सो. व सन्मा.नगरसेवक यांचे शहर हगणदारी मुक्त घोषणापत्र बरोबर मे.महासभेच्या ठरावाची आवश्यकता असुन सदर ठराव करुन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याकामी आवश्यकता असल्याने धुळे मनपा कार्यक्षेत्र हगणदार मुक्त घोषीत करुन ३ स्टारसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मे.महासभेपुढे अहवाल सादर करण्यास मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालानुसार व सर्व सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपा कार्यक्षेत्र हगणदार मुक्त घोषीत करुन ३ स्टारसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 23 सन 2018-19 या आर्थिक वर्षात नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अवधान येथे नविन 5 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे तसेच अन्य प्रभागात पाणीपुरवठाची कामे करणेकामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. उमैर शव्वाल महापौर महोदय, मला आपल्याला एक विचारायचे होते निवडणुक होऊन दोन महिने झाले आपण त्यावेळेस भाजप पक्षाकडुन पुर्ण शहरामध्ये असे सांगितले होते की, पुर्ण शहरामध्ये दररोज पाणीपुरवठा होणार त्याचे काय झाले.आता मी तुम्हाला सांगु इच्छितो आमच्या भागामध्ये 10 ते 15 दिवस पाणी येत नाही. मागच्या वेळी आम्ही आमच्या प्रभागामध्ये 25-25 टॅक्न्टरने पाणी पुरविले आहे. लोकांचे हाल होत आहेत प्रशासन लक्ष देत नाही. आपण फक्त वर्तमान पेपर मध्ये जाहीरात देतो की 2 दिवस पाणी येणार नाही पण तसे होत नाही. दर वेळेस आम्हाला आमच्या प्रभागात 8 ते 10 दिवसांनी पाणी मिळते.आणि जामचा मळा येथे जी टाकी आहे ती पुर्णपणे तयार झालेली आहे. ती अजुन पर्यंत सुरु झालेली नाही. ती टाकी लवकरात-लवकर सुरु करावी कारण आमच्या भागात पाण्याची खुपच समस्या आहे. यावर लक्ष देण्यात यावे.

म. महापौर तुम्ही महत्वाचा विषय सादर केला आहे की, भाजप पक्षाची सत्ता आहे, दररोज पाणी देण्याचा जो विषय आहे. आम्ही हे जाहिर नाम्यात सांगितले आम्ही सत्ता स्थापने नंतरही सांगितले आहे. या साठी अक्कलपाडयाची जी योजना आहे ती फक्त 20 ते 22 दिवसात आयुक्त साहेब आणि डॉ. सुभाषबाबा भामरे आणि अनुपजी अग्रवाल यांच्या प्रयत्नातुन मा. पंतर्पधान नरेंद्र मोदी आले आणि अक्कलपाडा योजनेचे उद्घाटन झाले. आणि आपल्या शहराचा 2050 पर्यंतचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे.आणि तेथे जे फिल्टरेशन पाईप बसविले जाणार आहेत त्याचे हनुमान टेकडीला ग्रॅव्हीटीने पाणी येणार आहे. शहरातील सगळया टाक्या ग्रॅव्हीटीने भरल्या जातील. आणि संपुर्ण शहरात रोज पाणी पुरवठा होईल. आणि आज जी शहराची जनता 8 ते 15 दिवस पाण्यासाठी ताटकळत होती त्यांना रोज पाणी पुरवठा होईल. आणि तुमचा जो टाकीचा विषय आहे. त्यासंदर्भात बैठक झाली आहे. त्यासंदर्भात सदरचा विषय झालेला आहे.

म. संजय पाटील महापौर महोदय,शहर हद्दवाढीनंतर जी गावे आहेत त्या ठिकाणी बरेचसे बखळ प्लॉट आहेत. पहिले बखळ जागा ग्रामपंचायतीकडे वर्ग झाले होते. ते आता शहरी भागात वर्ग झाले आहेत. आम्ही रजिस्ट्री करायला जातो माझी मनपाला सुचना आहे. ती रजिस्ट्री मनपाने ऑफिसला ठराव पाढवुन द्यावा त्याबाबत कार्यवाही झालेले नाही.

म. पठाण हिना महापौर महोदय, प्रभाग क्रमांक 19 मधुन निवडुन आली आहे.आमच्या प्रभागामध्ये फक्त 5 सफाई कर्मचारी सफाई साठी देण्यात आलेले आहे.आम्हाला सफाई कर्मचारी वाढवुन देणे ही आमची मागणी आहे.

म. महापौर आपण जे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याबाबत संपुर्ण निरसण करण्यात येईल.

म. राजेश पवार महापौर महोदय, हा विषय मंजुर करणेत यावा. आणि पाणीपुरवठा योजनेचे काम चालु आहे. ते एम.जी.पी कडे वर्ग करावे अशी माझी विनंती आहे.

म. महापौर नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजने अंतर्गत (सन२०१८-१९)अंतर्गत अवधान येथे नवीन ५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे तसेच शहर हद्दवाढीतील वरखेडी, चितोड, धोकर व बाळापूर येथे नवीन जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणेच्या कामास मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव शासनाकडेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर २९ दिनांक २८/०२/२०१९

धुळे मनपा हद्दीत शासनाचा नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजने अंतर्गत सन २०१८-१९ या वर्षात म. जिल्हाधिकारी सो., धुळे यांचे कडील पत्र क्र. / कक्ष – ५ / नपाप्र / कावि /४२९ दि. ३१/१०/२०१८अन्वये प्रस्ताव सादर करणे बाबत कळविले असून त्यानुसार धुळे शहरात सद्यस्थितीत केंद्र शासन निधी अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. तसेच अन्य पाणी पुरवठा केंद्रावरील दुरुस्तीचे कामे सन २०१७-१८ या वर्षात प्रस्तावित करणेत आले होते. त्यामुळे सन २०१८-१९ या वर्षात या योजने अंतर्गत कामे प्रस्तावित करणेत आलेले नाही. तरी सदरचा निधी परत जावू नये म्हणून धुळे मनपा चा हद्दवाढ अंतर्गत समावेशीत अवधान गावात ७० हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ आहे. सदर जलकुंभ गावाची लोकसंख्या लक्षात घेवून बांधलेला आहे. त्यामुळे सदर जलकुंभास मोहाडी पिराची टेकडी जलकुंभावरून २५०एम.एम.डी.आय.पाईप लाईन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा मार्फत टाकणेत येणार आहे.

अवधान गावात पूर्वीचा ७० हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ आहे. परंतु सदर जलकुंभ गावाचा वाढत्या लोकसंख्येला कमी पडत असल्याने नवीन ५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी रु.४६,२१,६८०/- मात्र येणार आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल पाहता नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजने अंतर्गत (सन२०१८-१९)अंतर्गत अवधान येथे नवीन ५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे तसेच शहर हद्दवाढीतील वरखेडी, चितोड, धोकर व बाळापूर येथे नवीन जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणेच्या कामास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव शासनाकडेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक 24 मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सर्वसाधारण रस्ता अनुदानातंर्गत झालेला ठराव क्र.145 दि.19/10/2018मध्ये बदल तथा दुरुस्ती करणेबाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.खान मोहम्मद महापौर महोदय, आपण काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत. काही नगरसेवकांच्या म्हणण्यावरुन आपण जे सांगत आहात की 1 ते 5 कामे तसेच ठेवुन बाकीचे काम बदलणे परंतु आपल्याला सांगतो की 1 ते 5 कामे हे एकाच प्रभागतील आहेत. एकाच नगरसेवकाचे आहेत. आमची विनंती आहे की, सगळेच कामे रद्द करण्यात यावे आणि नविन यादी प्रत्येकाची तयार करणेत यावी. एकाच प्रभागत 5 कामे का? करायचे असेल तर सर्व नामंजुर करा.

म. आयुक्त यामध्ये हा ठराव मागच्या वेळेस फार उशिरा दिला होता आपल्याला रस्ता अनुदान खर्च करण्यासाठी पहिल्यांदा 31 डिसेंबर 2018 पर्यंत मुदत दिली होती. एकुण आपल्याकडे तेव्हा

जेवढा निधी शिल्लक होता तो निधी खर्च करण्यासाठी आपल्याला 31 मार्च 2019 पर्यंत मुदत आहे. ह्या पाच कामांचा ठराव रद्द जरी केला तरी सुध्दा 75 लाख रुपये शासनाला परत जातील. आपल्याला 75 लाख खर्च करायचे नसतील तर हे पाचही जातील आणि 75 लाखही जातील तसा निर्णय महासभेने घ्यावा.

म. शितल नवले साहेब आपण तातडी तिन दिवसाची पण निवीदा काढु शकतो. आपल्या कडे अजुनही 31 मार्च पर्यंतचा 1 महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. असे देखील कामे आहेत की ते 8 दिवसातही पुर्ण होतात कॉन्ट्रयकक्टर कामे पुर्ण करतात. साहेब जर श्रींमताच्याच घरात सगळे टाकायचे आणि बाकीचे आमच्या मिल परिसर गरीब वस्त्या यांना उपाशी ठेवायचे का आपण मागच्या वेळेसही असेच झाले ज्याची लाठी त्याची म्हैस तोच प्रकार आताही होतोय.

म. आयुक्त महानगरपालिकेचा ठराव शासनाकडे ज्या वेळेस येतो त्यावेळे महानगरपलिकेचा ठराव म्हणुन आपण बघतो आणि त्याची अंमलबजावणी जेव्हा करतो त्यात 31 मार्च पर्यंत खर्च करण्यासाठी त्याचे नियोजन केले जाते. सभागृहाने जर आज निर्णय घेतला हे करायचे की नाही. अजुन याचे टेंडर उघडले नाही. त्याचे टेंडर उद्या उघडतील करायचे नसतील तर सगळे रद्द करुन टाकु आणि नविन टेंडर काढु पण उद्या पैसे परत गेले तर मला कुणी विचारायचे नाही की पैसे का परत गेले.

म. शितल नवले मला सांगा साहेब जर टेंडर काढावयाचे होते तर आजच का काढले.

म.आयुक्त महापौरांनी त्याच्या मध्ये सर्व काढायचे असे सांगितले होते. त्यामध्ये दोन वर्षाचे नियोजन होते. दोन वर्षाचे नियोजन म्हणजे या वर्षाचा निधी पुढच्या वर्षी खर्च करता येतो हे पण नियोजन होते आणि शासनाचा निधी 75 लाख रुपये जे खर्च करावयाचे ते 31 मार्च 2019 पर्यंत खर्च झाले नाही परत जाऊ शकतात.वर्षाचे नियोजन पुन्हा करायचे असे नियमात लिहलेले आहे.

म. शितल नवले साहेब आपल्याला असे काही लेखी आदेश आहेत का? की,31मार्च पर्यंत निधीतुन कामे करावे असे.

म. आयुक्त होय तसे आदेश आहेत.

म. शितल नवले आदेश वाचुन दाखविण्यात यावा.

म. आयुक्त शासकिय अनुदान रस्ते अनुदानाच्या बाबतीत मुदतवाढ 31 डिसेंबर ते 31 मार्च पर्यंतची मुदत केलेली आहे.

म. शितल नवले साहेब शासनाला प्रस्ताव पाठविण्यात यावा आम्ही मंजुर करुन आणु.

म. आयुक्त साहेब हा धोरणात्मक निर्णय संपुर्ण महाराष्टासाठी झाला आहे.शासनाने ठरविले तर याची मुदत 31 मार्च 20 देखील होवु शकते.

म. शितल नवले मग असे असेल तर बापु साहेब आपण का म्हणावे की सबका साथ सबका विकास. हे चुकीचे आहे. ना एकाच प्रभागात सगळे कामे होत आहेत.

म. आयुक्त याच्यामध्ये प्रशासनाला कुढलाही रस नाही. तुम्ही सर्व कामे रद्द करुन जरी नविन कामे ठरविले आम्ही नविन टेंडर काढायला तयार आहोत. यात आम्हाला काही अडचण नाही.

म. शितल नवले तसे करण्यात यावे.

म. आयुक्त जर अनुदान परत गेले तर मला कुणीही विचारणा करु नये.

म. शितल नवले साहेब तातडीचे कामे म्हणुन 3 दिवसाची तातडीची निविदा काढता येतात.

म. आयुक्त रस्त्यांच्या कामाला तातडीची निविदा कशी म्हणु शकतात तुम्ही? ज्या अनुदानाला दिड- दोन वर्ष खर्च केला नाही. त्या कामाला तातडी आज कशी आली तुमच्याकडे ? तातडी याला कशी लागु होईल.

म. शितल नवले आता पर्यंत ज्या प्रभागातील ही कामे आहेत तेथे झाले नाहीत.

म. आयुक्त ही कारणे मी समजु शकतो.मी तुम्हाला याआधीच सांगितले.आम्ही आलेला ठराव हा सभागृहाचा ठराव म्हणुन मान राखतो. हा नवलेंचा ठराव आहे किंवा महापौरांचा ठराव आहे

असे आम्ही म्हणत नाही. तो महासभेचा ठराव असतो त्याचा आदर करतो. महासभेचा ठराव आहे तो एका व्यक्तीचा नाही.

म. शितल नवले — साहेब एकदा मोटरसायकल घेऊन मोमेडीयन वस्ती व आमच्या वस्त्यांमधे जाऊन बघा तेथे मोटर सायकल देखील चालविता येत नाही.

म. आयुक्त — मला शहरामध्ये बऱ्याचश्या गोष्टींची अडचण आहे हे माहित आहे. मी तुम्हांला परत सांगतो हे 75 लाख रुपये परत जाण्याच्या तयारीत आहेत.ठराव करावा आणि उद्या टेंडर पबलिश करतो.

म. शितल नवले — सभागृहाने निर्णय घ्यावा.आणि तुमचे बदल काय आहेत ते तरी आम्हाला सांगा. पुढचे कामे काय घेणार आहेत की, ते पण त्याच प्रभागात देणार आहेत.

म. महापौर — हा विषय आयुक्त साहेबांचा नसुन माझा आहे. मी ठरवणार आहे तुम्हांला आधिही सांगितले आताही सांगतो. तुम्हांला नविन टेंडर काढावे असे वाटत असेल तर काही हरतक नाही कादुन टाकु परंतु तो निधी परत गेला तर त्याची जबाबदारी तुम्ही घ्या.75 लाख जमा झाले तर महानगरपालिकेला 75 लाखाचे काम तुम्ही करुन द्या.

म.शितल नवले — महापौर महोदय, मग 75 लाखाच्या निधीत पाच च कामे का? पुढची कामे का नाही घेतली आमचा हा पण प्रश्न आहे. ठराव तर 9 कामांचा मंजुर होता.

म. आयुक्त — ठराव 150 लाखांचा होता. आपल्याला मार्च पर्यंत फक्त 75 लाख रुपये खर्च करावयाचे असा विचार करुन आपण पहिले पाच कामे प्राधान्याने घेतले आहेत.आणि या मध्ये महापौरांनी पत्र दिले होते म्हणुन हे कामे घेतली आहे.

म. कमलेश देवरे — शितल भाऊंच्या सुचनेनुसार एकाच प्रभागात जर 5 कामे होत असतील तर त्या कांमामध्ये 9 नं च काम माझ्या प्रभागातले आहे. त्यात एक कमी करुन 9 नं च काम माझे ही घेवुन घ्या त्यामुळे एकाच प्रभागाचे नावे पण दिसणार नाही. आणि सबका साथ सबका विकास हे ध्येय पण साकार होऊन जाईल. ही विनंती करतो आणि त्या ठरावामध्ये माझे काम टाकुन घ्या असे आपणाला सांगतो.

म. प्रतिभा चौधरी — महापौर महोदय, हा जो विषय आहे रस्ते अनुदानाचा शासनाकडुन जो पैसा आलेला आहे. त्यामध्ये 5 कामे झालेली आहेत किंवा नाहीत या विषयी कार्यालयीन जी टिपणी आहे त्यामध्ये या पाच कामांचा उल्लेख कुठेही दाखविलेला नाही. तसा कार्यालयीन टिपणी मध्ये उल्लेख करायला पाहिजे होता. दुसरे असे की महापौर महोदय, हे जे कामे असतात काही वेळेला कामे सभागृहासमोर न ठेवता मायपॉवर मध्ये ठराव हे जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. सदस्यांसमोर विषय आणले जात नाहीत. मला एक आयुक्त साहेबांना प्रश्न आहे की, जे काही ठराव असतात कलेक्टरऑफिस मध्ये जातात महानगरपालिकेचे ते आयुक्त साहेबांच्या सहीने जात असतात.मग त्या वेळेला शासनाकडुन असा ठराव आलेला असतो का की, पेसिपीक एकाच प्रभागामध्ये हा निधी पाठविलेला आहे किंवा एकाच प्रभागाचा विकास झाला पाहिजे.

म. आयुक्त — महापालिकेचा ठराव कुठल्याही परिस्थितीमध्ये आयुक्तांच्या सहीने होत नाही.त्याच्यावर महापौरांची सही असते आणि नगरसचिव विभागाकडुन तो नंतर प्राप्त होतो. ठराव कधीही आयुक्त घेत नाही. या सभेचा आयुक्त हा सचिव नाही. सभेच्या ठरावाला आयुक्त जबाबदार नाही.

म. प्रतिभा चौधरी — ठराव जेव्हा सचिव आणि महापौरांच्या सहीने येतो तेव्हा प्रशासनाचे प्रमुख म्हणुन तुमचेही कर्तव्य असते की पेसिपिक एका प्रभागाचा विकास न करता संपुर्ण शहराचा विकास झाला पाहिजे आणि महापौर हा शहराचा महापौर असतो एका प्रभागाचा नगरसेवक नसतो हे लक्षात ठेवले पाहिजे. तुम्ही पण प्रशासनाचे प्रमुख आहात.

म. आयुक्त — नगरपालिकेच्या सदस्यामध्ये सदस्याला जो बोलायचा अधिकार आहे.तो आयुक्ताला हे नगरपालिकेमध्ये आयुक्त हा महापालिकेच्या सभेचा सचिव नाही.

म. प्रतिभा चौधरी — सचिव नाही पण सचिव आणि महापौरांनी जे ठराव कलेले असतात ते तुमच्याच सहीने कलेक्टरऑफिसला जात असतात. महापौर महोदय मला असे सांगावाचे आहे की, जे पाच

कामे झालेली आहेत किंवा नाही परंतु आता 75 लाखाचा जो निधी आहे. ज्यामध्ये दुरुस्ती करावयाची आहे त्यामध्ये माझ्या प्रभागामधील जयहिंद जुनियर ते जयहिंद सिनियर चा जो रस्ता आहे तो रस्ता घेण्यात यावा. त्या परिसरामध्ये शाळा, कॉलेज असे 100% टॅक्स भरणारे लोक आहेत. आणि तेथे क्षिरे कॉलनी ते जंलकुभांपर्यंत जी राईझिंग लाईन टाकण्यात आली आहे. त्यामुळे पुर्ण रस्त्यांची वाट लागलेली आहे. माझी अशी विनंती आहे आता जे कामे झाले असतील ते जाऊ द्या परंतु आता जो 75 लाखाचा निधी आहे त्यामध्ये माझ्या प्रभागाचाही थोडासा वाटा असू द्यावा अशी मी विनंती करते.

म. महापौर सन्मा.सदस्यांनी केलेल्या चचेनुसार सन २०१७-१८ मधील प्राप्त सर्वसाधारण रस्ता अनुदानातून ठराव क्रं. १४५दि.१९/१०/२०१८मधील १ ते ५ कामे कायम ठेवण्यांत येत असून उर्वरीत कामामध्ये बदल करण्यांत येत आहे. सदरची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्राप्त सर्वसाधारण रस्ता अनुदानातून घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३० दिनांक २८/०२/२०१९

शासनाकडुन राज्यातील महानगरपालिकाना दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीतील रस्ताची देखरेख, दुरूस्ती, डांबरीकरण व नुतनीकरण इत्यादी आषंगीक कामासाठी दरवर्षी विशेष रस्ता अनुदान व सर्वसाधारण रस्ता अनुदान प्राप्त होते.या अनुदानातून शहरातील विविध भागातील अत्यावश्यक रस्त्यांची कामे घेण्यात येतात.

धुळे महानगरपालिकेस सन 2017/18 व 2018/19 या आर्थिक वर्षात एकूण 1.50 कोटी अनुदान प्राप्त झालेले आहे. सदर अनुदानातून कामे निश्चित करण्यासाठी मापा ठराव क्रमांक 145 दिनांक 19/10/2018 अवये ठराव पारित करण्यात आलेला आहे. तथापी सदर ठरावात विशिष्ट भागातील कामे घेण्यात आल्याने सन्मा.सदस्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.याबाबत सदर ठरावातील कामांमध्ये बदल करण्याबाबत मा.महापौर साहेब यांनी जावक्र / स्विस / मनपा /51 दिनांक 12/ 02/2019 अवये पत्र सादर केलेले आहे. सदर पत्रात उक्त ठरावात नमुद क्रमांक 1 ते 5 ही कामे कायम ठेवून उर्वरीत नविन कामे घेण्याबाबत नमूद करून ठरावात बदल करण्याबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार उक्त ठरावात आवश्यक ती बदल व दुरुस्ती होणे कामी सदरचा प्रस्ताव पुनश्च: मे.महासभेत घेणेबाबत मान्यतेस्तव सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चचेनुसार सन २०१७-१८ मधील प्राप्त सर्वसाधारण रस्ता अनुदानातून ठराव क्रं. १४५ दि.१९/१०/२०१८ मधील १ ते ५ कामे कायम ठेवण्यांत येत असून उर्वरीत कामामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे. सदरची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्राप्त सर्वसाधारण रस्ता अनुदानातून घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव
१	सुभाष नगर बांबुगोडाऊन ते जयवंत दुसाने यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट काँक्रिट करणे.
२	प्रभग क्रमांक १० पापाघारु ते बडगुजर यांच्या प्लॉट पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रिट करणे.
३	प्रभाग क्रमांक ९ पाटावर नगरपट्टी ते बजरंगवाडी साईबाबा मंदिर जुने धुळे पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रिट करणे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- २५ राष्ट्रीय आरोग्य अभियानअंर्तगत महानगरपालिका क्षेत्रामध्ये नविन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राना मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

म. नगरसचिव म.नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३१ दिनांक २८/०२/२०१९

मा.आयुक्त(आ.से)तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचे अ/राआअ /HWC /Constuction /९०९५८-९११६९/दि. ०३/०१/१९ रोजी चे पत्र तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत दिनांक २५/०१/२०१९ रोजीच्या नियामक समितीच्या (Governing Body) बैठकीत झालेला निर्णयानुसार एनयुएचएम कार्यक्रमाअंतर्गत धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात ५ ना.प्रा.केंद्र मंजुर असुन १. नंदीरोड २. हजारखोली ३. प्रभात नगर ४.कृष्णनगर ५.शाळा क्र.२८ चितोडरोड येथे कार्यान्वीत आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ३,७५,५५९ एवढी होती. परंतु दि.११/०१/२०१८ रोजी धुळे मनपाची हद्द वाढ झाल्याने धुळे शहराची अंदाजित लोकसंख्या ६ लक्ष एवढी झाली आहे. धुळे शहरातील सर्व नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ५०,००० लोक संख्येकरिता १ नागरी आरोग्य केंद्र मंजुर असुन त्यानुसार धुळे मनपाची हदवाढ झाल्याने अजुन ५ ना.प्रा.आ. केंद्राची आवश्यकता धुळे मनपा कार्यक्षेत्रात असल्याने सदरील विषय मनपाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान नियामक समितीच्या बैठकित (GoverningBody) विषय क्र.८ ठराव क्र.१२ नुसार मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानुसार धुळे मनपा हद्दीत नविन नागरी आरोग्य केंद्र उभारणीच्या विषयास नियामक समितीच्या बैठकित मंजुरी घेण्यात आलेली असुन सदर नविन ५ नागरी आरोग्य केंद्राकरीता १. वरखेडी २. मोहाडी ३. साक्रिरोड ४. वलवाडी ५. नगावबारी/स्लॉटर हाऊस या ठिकाणी एनयुएचएम कार्यक्रमा अंतर्गत ५ नागरी आरोग्य केंद्र उभारण्यासाठी मा. आयुक्त तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या नविन नागरी आरोग्य केंद्र उभारनी संदर्भातील मार्गदर्शक सुचनांन नुसार मा. नगररचनाकार मनपा धुळे व मा.अभियंता बांधकाम विभाग यांना जा.क्र./धुमपा/आरोग्य/NUHM/२५०/१८-१९ दि. २०/०२/२०१९ ने पत्र देण्यात आले आहे.तरी राष्ट्रीय आरोग्य अभियानअंर्तगत महानगरपालिका क्षेत्रामध्ये नविन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मे. महासभा यांची मंजुरी घेवुन मा. आयुक्त तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या मंजुरीसाठी पाठविणेस आवश्यक आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व नागरीकांच्या आवश्यकतेनुसार नविन ६ नागरी आरोग्य केंद्र १.वरखेडी २.मच्छिबाजार ३.साक्रीरोड ४.मोहाडी ५.स्लॉटर हाऊस ६. वलवाडी या ठिकाणी एनयुएचएम कार्यक्रमा अंतर्गत ६ नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२९ जुन २०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात,धुळे
शनिवार दिनांक २९ जून,२०१९
वेळ सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज **शनिवार दिनांक २९/०६/२०१९ रोजी सकाळी ११-०० मा. श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	मा. सौ. अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
६	सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
७	माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
८	वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
९	नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
१०	पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
११	सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१२	बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१३	चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१४	बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१५	दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१६	पाटील ज्योस्त्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
१७	गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१८	देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१९	भिल निंबाबाई फुलसिंग	सदस्या	----------" ---------
२०	पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२१	पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२२	बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------

२३	उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२४	कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
२५	रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२६	अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२७	चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
२८	जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२९	भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३०	जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३१	सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३२	बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
३३	थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३४	कर्पे प्रदिप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३५	शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३६	मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३७	शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
३८	जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
३९	पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
४०	खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
४१	ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
४२	पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४३	जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
४४	जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
४५	बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
४६	सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
४७	खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
४८	मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
४९	उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
५०	मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
५१	नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
५२	बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
५३	देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
५४	पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५५	मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
५६	पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
५७	पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५८	खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५९	मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६०	गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. राहुल रेखावार	आयुक्त तथा जिल्हाधिकारी,धुळे	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. एन.पी. सोनार	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
७	श्री.नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
८	श्री. के. एन. शिंदे	अधियंता	----------" ---------
९	श्री. मधुकर पवार	आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१३	श्री.युवराज वाघ	परवाना विभाग अधिक्षक	----------" ---------
१४	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१६	श्री. महेंर्द जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ---------
१७	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
१८	सा. मिना सातभाई	महिला बालकल्याण विभाग	----------" ---------
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२०	श्री. पी.एस. सोनवणे	क.अधियंता नगररचना विभाग	----------" ---------
२१	श्री. राजेश वसावे	मलेरिया विभाग	----------" ---------
२२	श्री. आरजी. येवले	महानगरपालिका हायस्कूल धुळे	----------" ---------
२३	श्री. गणेश खोडे	प्रकल्प विभाग (एनयुएचएम)	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिनो, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा. सदस्या सौ. हेमा अनिल गोटे, श्री.नरेंद्र रुपला चौधरी, अन्सारी सईदा मो. इकबाल, श्री सुभाष सुकलाल जगताप, सौ.कल्पना सुनिल महाले, श्री.अन्सारी अ. लतीफ अ. हमीद , श्रीमती वालिबेन प्रकाशचंद्र मंडोरे, सौ. वैशाली भिकन वराडे, श्री. संजय रामदास पाटील, श्री. खान महोहम्मद साबीर मुहिबुल्लाह, पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम, श्रीमती अन्सारी फातेमा बी नुरुल अमीन, सौ. सारिका प्रवीण अग्रवाल,श्री. शशी सुधाकर मोगलाईकर, इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. हिरामण गवळी सदस्यांच्या रजेच्या संदर्भात अधिनियमात काय तरतूद आहे यांची सभगृहाला माहिती द्यावी.

म. नगरसचिव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ११ (ब) मधील तरतुदीनुसार तात्पुरता आजार किंवा महानगरपालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वत: गैरहजर राहील अशी तरतूद असून कलम 11 (क) नुसार कोणत्याही कारणामुळे महानगरपालिकेने मान्य केलेले असो वा नसो लागोपाठ सहा महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वत: गैरहजर राहील असा सदस्य पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यांस अर्नह होईल असे नमूद आहे. या तरतुदीनुसार मागील सभांबाबत गैरहजर असणा-या सदस्यांची पडताळणी करुन त्याप्रमाणे मा. महापौर साहेबांकडे अहवाल सादर करण्यांत येईल.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३२ दिनांक२९/०६/२०१९

सन्मा. सदस्या सौ. हेमा अनिल गोटे, श्री. नरेंद्र रुपला चौधरी, अन्सारी सईदा मो. इकबाल, श्री सुभाष सुकलाल जगताप, सौ.कल्पना सुनिल महाले, श्री.अन्सारी अ. लतीफ अ. हमीद , श्रीमती वालिबेन प्रकाशचंद्र मंडोरे, सौ. वैशाली भिकन वराडे, श्री. संजय रामदास पाटील, श्री. खान महोहम्मद साबीर मुहिबुल्लाह, पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम, श्रीमती अन्सारी फातेमा बी नुरुल अमीन, सौ. सारिका प्रवीण अग्रवाल,श्री. शशी सुधाकर मोगलाईकर, इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर

धुळे महानगरपालिका, धुळे

१) सन्मा. सदस्य श्री. देवेंद्र चंद्रकांत सोनार श्री. नागसेन दामोदर बोरसे सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांचेकडुन आलेले अभिनंदनाचे प्रस्ताव .

१) लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा देशात एनडीए अर्थात भाजपा प्रणीत सरकार आले आहे. यात देशाचे पंतप्रधान मा.श्री नरेंद्रजी मोदी यांच्यावर विश्वास दाखव जनतेन फिर एक बार मोदी सरकार बनवले आहे. यामुळे दुसऱ्यांनादा पंतप्रधान पदाची शपथ घेणारे श्री नरेद्रंजी मोदी साहेब आणि संपूर्ण मंत्रीमंडळाचे तसेच एनडीएतील घटक पक्षांचे मनपुर्वक हार्दिक अभिनंदन करण्यात यावे.

२) आपल्या धुळे लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा खासदार पदावर प्रचंड बहुमताने निवडुन आलेले आपले सर्वांचे लाडके खासदार तथा माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री मा. बाबासाहेब डॉ. सुभाषजी भामरे यांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन करण्यात यावे.

३) धुळे जिल्हयाचे भुमीपुत्र ना. श्री जयकुमार रावल साहेब कॅबिनेट मंत्री पर्यटन व रोजगार हमी योजना यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन या विभागाची विशेष जबाबदारी सोपवल्याबद्दल त्यांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन

यांचे अभिनंदन करणेबाबत यादी सादर झालेली आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या आलेल्या अभिनंदनाच्या यादीनुसार अभिनंदन ठराव संमत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३३(अ) दिनांक२९/०६/२०१९

सन्मा. सदस्य श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार श्री.नागसेन दामोदर बोरसे सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांचेकडुन प्राप्त झालेल्या यादीनुसार लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा देशात एनडीए

अर्थात भाजपा प्रणीत सरकार आले आहे. यात देशाचे **पंतप्रधान मा.श्री नरेंद्रजी मोदी** यांच्यावर विश्वास दाखव जनतेन फिर एक बार मोदी सरकार बनवले आहे. यामुळे दुसऱ्यांनादा पंतप्रधान पदाची शपथ घेणारे **श्री. नरेंद्रजी मोदी साहेब आणि संपूर्ण मंत्रीमंडळाचे तसेच एनडीएतील घटक पक्षांचे** व आपल्या धुळे लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा खासदार पदावर प्रचंड बहुमताने निवडुन आलेले आपले सर्वांचे लाडके खासदार तथा **माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री मा.बाबासाहेब डॉ. सुभाषजी भामरे** यांचे तसेच धुळे जिल्हयाचे भुमीपुत्र **ना.श्री.जयकुमार रावल साहेब** कॅबिनेट मंत्री पर्यटन व रोजगार हमी योजना यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन या विभागाची विशेष जबाबदारी सोपवल्याबद्दल सर्व मान्यवरांचे अभिनंदन करण्यांच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

१) **सन्मा. सदस्य श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार**

१) आपल्या कार्यकुशतेने लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये सुपर्ण उत्तर महाराष्टात भाजपचे ८ खासदार निवडुन आणण्याकामी मा. ना. श्री. गिरीषजी महाजन साहेब यांनी मोलाची भुमिका बजावली व पुनश्च: संकमोचन ही पदवी सार्थ ठरविली त्याबाबत त्यांचे हादीक अभिनंदन करुन तसा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

२) आपल्या कार्यकुशलतेने कणखर,नेतृत्व,संयमी भूमिका व योग्य संयोजनामुळे श्री. अनुपभैय्या अग्रवाल, भाजपा महानगरप्रमुख धुळे शहर यांनी धुळे महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीचे बहुमत गाठून एकहाती सत्ता स्थापन केली. यात त्यांचा बहुमोलाचा हिस्सा आहे. त्याबाबत त्यांचे हादीक अभिनंदन करुन तसा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या आलेल्या अभिनंदनाच्या यादीनुसार अभिनंदन ठराव संमत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३३ (ब) दिनांक २९/०६/२०१९

सन्मा.सदस्य श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार आपल्या कार्यकुशतेने लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये सुपर्ण उत्तर महाराष्टात भाजपचे ८ खासदार निवडुन आणण्याकामी मा.ना. श्री. गिरीषजी महाजन साहेब यांनी मोलाची भुमिका बजावली व पुनश्च: संकमोचन ही पदवी सार्थ ठरविली त्याबाबत त्यांचे आपल्या कार्यकुशलतेने कणखर, नेतृत्व, संयमी भूमिका व योग्य संयोजनामुळे श्री.अनुपभैय्या अग्रवाल, भाजपा महानगरप्रमुख धुळे शहर यांनी धुळे महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीचे बहुमत गाठून एकहाती सत्ता स्थापन केली. यात त्यांचा बहुमोलाचा हिस्सा आहे त्याबद्दल वरील मान्यवरांचा अभिनंदन करण्यांच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

२) **सन्मा. सदस्या सौ. सुरेखा चंद्रकांत उगले, व श्री. शितलकुमार मोहन नवले यांनी दिलेल्या यादीनुसार** मराठा समाजाला सरकारी नोंक-या मध्ये आणि शिक्षणामध्ये आरक्षण देणा-या कायद्याला मुंबई उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली आहे. हा राज्यातील तमाम मराठा समाजाच्या जनआंदेलनाचा

मोठा ऐतिहासिक विजय आहे. राज्यांचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा मराठा आरक्षण संबंधी कालबध्द कार्यक्रम आणि अभ्यासपूर्ण दृष्टीकोनचा हा विजय आहे. आरक्षणामुळे मराठा समाजातील आर्थिक दृष्टया मागासलेल्या लोकांना फायदा होणार आहे.या ऐतिहासिक निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासन तसेच राज्य मागास आयोग तसेच उच्च न्यायालय व सर्व मराठा समाजाच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या महासभेत पारीत करण्यांस विनंती आहे.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या आलेल्या अभिनंदनाच्या यादीनुसार अभिनंदन ठराव संमत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३३(क) दिनांक २९/०६/२०१९

सन्मा. सदस्या सौ. सुरेखा चंद्रकांत उगले,व श्री. शितलकुमार मोहन नवले यांनी दिलेल्या यादीनुसार मराठा समाजाला सरकारी नोंक-या मध्ये आणि शिक्षणामध्ये आरक्षण देणा-या कायद्याला मुंबई उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली आहे. हा राज्यातील तमाम मराठा समाजाच्या जनआंदेलनाचा मोठा ऐतिहासिक विजय आहे. राज्यांचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा मराठा आरक्षण संबंधी कालबध्द कार्यक्रम आणि अभ्यासपूर्ण दृष्टीकोनचा हा विजय आहे. आरक्षणामुळे मराठा समाजातील आर्थिक दृष्टया मागासलेल्या लोकांना फायदा होणार आहे.या ऐतिहासिक निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासन तसेच राज्य मागास आयोग तसेच उच्च न्यायालय व सर्व मराठा समाजाच्या अभिनंदनाच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

४) **सन्मा.सदस्य श्री.अमोल पावबा मासुळे यांच्या यादीनुसार** संपूर्ण धुळ जिल्हयाला अभिमान वाटावा अशी महत्वपूर्ण बाब धुळे शहरात झालेली आहे. मिल परिसरातील रहिवासी असलेले एक सामान्य रिक्षाचालक, हातमजुर कामगार श्री. सुरेश जाधव यांचे चिरंजीव व धुळयांचे सुपुत्र राजशेंखर सुरेश जाधव भारतातून युपीएससी (एनडीए) परिक्षेला बसलेल्या सुमारे 5 ते 6 लाख विद्यार्थ्यांमधून राजशेखर जिल्हयात पहिला तर देशात 236 व्या क्रमाकाने उत्तीर्ण झाला. त्यांचे आज रोजीच्या महासभेत अभिनंदनचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या आलेल्या अभिनंदनाच्या यादीनुसार अभिनंदन ठराव संमत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३३(ड) दिनांक २९/०६/२०१९

सन्मा.सदस्यश्री.अमोल पावबा मासुळे यांच्या यादीनुसार संपूर्ण धुळ जिल्हयाला अभिमान वाटावा अशी महत्वपूर्ण बाब धुळे शहरात झालेली आहे. मिल परिसरातील रहिवासी असलेले एक सामान्य रिक्षाचालक, हातमजुर कामगार श्री. सुरेश जाधव यांचे चिरंजीव व धुळयांचे सुपुत्र राजशेंखर सुरेश जाधव भारतातून युपीएससी (एनडीए) परिक्षेला बसलेल्या सुमारे 5 ते 6 लाख विद्यार्थ्यांमधून राजशेखर जिल्हयात पहिला तर देशात 236 व्या क्रमाकाने उत्तीर्ण झाला. त्यांचे अभिनंदनाच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

५) **सन्मा. सदस्या सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी** यांच्या यादीनुसार देवपुर एकवीरादेवी मंदिर परिसरातील स्वर्गीय सुधाकर जोशी उर्फ बंडु जोशी यांना धुळे मनपा मार्फत मरणोत्तर शौर्य पुरस्कारकरिता प्रक्रिया करुन आर्थिक सहाय्य प्रदान करणे बाबत...

आमच्या प्रभाग क्रमांक चार मधील रहिवासी देवपुरातील एकविरा देवी मंदिर परिसर गल्ली क्र. ७ मध्ये राहणारे सामाजिक कार्यकर्ते सुधाकर ज्ञानेश्वर जोशी ऊर्फ बंडु जोशी यांचे दिनांक ७ मे रोजी गॅस सिलेंडर दुर्घटनेतील आपदग्रस्तांना वाचवतांना स्वत: मृत्युमुखी पडले. यात दिनांक ७ मे वार मंगळवार रोजी एकविरा देवी मंदिर परिसर गल्ली क्र. ७ मध्ये राहणाऱ्या निर्मलाबाई लालचंद भोई यांच्या घरात अक्षयतृतीयेच्या दिवशी सकाळी ७ वाजता गॅस गळती झाल्याने मोठ्या प्रमाणात आगीची दुर्घटना निर्माण झाली होती. यावेळी परिसरातील बरेच नागरिक साखर झोपेत होते. सदर परिसरात प्रचंड दाट वस्ती असून येथे अल्प उत्पन्न गटातील कुटुंबे सदर ठिकाणी वास्तव्यास आहेत. यावेळी अचानक लागलेल्या आगीमुळे अन्य कुटुंबांना त्रास होउु नये व अन्य जीवित हानी व वित्त हानी होऊ नये यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातुन व शेजारधर्म म्हणून त्या भागातील सामाजिक कार्यकर्ते सुधाकर ज्ञानेश्वर जोशी उर्फ बंडू जोशी हे आपल्या प्राणाची पर्वा न करता सौ. निर्मलाबाई भोई यांच्या घरात जाऊन काही वेळ गॅस सिलेंडर दुरुस्तीचा ही प्रयत्न केला होता. पण तोपर्यंत गॅस सिलेंडरने पेट घेवून मोठया प्रमाणात घरात गॅस भडका झाला होता. अश्या हि परिस्थितीत सदर जळते सिलेंडर बंद किंवा दुरुस्त होत नाही हे लक्षात येताच सदर जळते सिलेंडर बाहेर काढण्यासाठी सौ. भोई यांच्या घरात गेले. यावेळी शेजारील अन्य कुंटुंबाना व नागरिकांना जागृत करुन निडरपणे स्वर्गीय जोशी यांनी या प्रसंगात अतुलनीय धैर्य दाखवले तथापि गॅस गळतीमुळे गॅस सिलेंडर जवळ असलेले स्व. सुधाकर जोशी हे सार्वधिक ९८ % भाजले गेले व यानंतर दोन दिवसांनी शासकिय रुग्णालयात उपचार घेताना दुर्घटनेत यांचे दु:खद निधन झाले.

स्व.जोशी हे परिसरात निस्वार्थीपणे सामाजिक कार्यात सहभागी होत असत अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात त्यांचा सहभाग असे.स्व.जोशी हे खाजगी नोकरीत असून त्यांचे संपूर्ण कुटंबाचा आर्थिक भार त्यांच्यावरच होता. कौटुंबीक परिस्थिती फार बेताची असल्याने स्व. जोशी यांना अन्य कोणत्याही आर्थिक सहाय्याची उपलब्धता नाही. सामाजिक आणिवेतून व माणूसकीच्या उद्देशाने आपल्या स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता स्व. सुधाकर जोशी यांनी अनेकांना या दुर्घटनेतुन वाचवले मोठया प्रमाणात होणारी जीवित व वित्त हानी स्व.जोशी यांच्या समयसुचकतेने व जागृत पणाने टळलेली आहे.अशा या साहसपूर्ण कामाची दखल मनपा स्तरावर आणि शासन स्तरावर घेणे आवश्यक आहे.

याकरिता स्व.सुधाकर जोशी यांना धुळे मनपामार्फत मरणोत्तर शौर्य पुरस्कार अथवा राज्य सरकार तथा केंद्र सरकार यांच्या कडे प्रस्ताव पाठवुन आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठया प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळणे कामी आपण आपल्या स्तरावर शासनाकडे मनपा महासभेत ठराव करुन शिफारस करणे तसेच स्व.जोशी यांच्या धर्मपत्नी आणि लहान मुले यांना धुळे मनपामार्फत सर्व सन्मा.सदस्य/सदस्या,पदाधिकारी,अधिकारी वर्ग यांच्यातर्फे आर्थिक सहाय्य करुन सहकार्य करावे. ही नम्र विनंती.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार स्वर्गीय सुधाकर जोशी उर्फ बंडु जोशी यांना धुळे मनपा मार्फत मरणोत्तर शौर्य पुरस्कार मिळणेसाठी राज्य शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच त्यांचे कुटुंबियांना राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणेसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडेस पाठविण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३४ दिनांक २९/०६/२०१९

सन्मा.सदस्या सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांच्या यादीनुसार प्रभाग क्रमांक चार मधील रहिवासी देवपुरातील एकविरा देवी मंदिर परिसर गल्ली क्र. ७ मध्ये राहणारे सामाजिक कार्यकर्ते

सुधाकर ज्ञानेश्वर जोशी ऊर्फ बंडु जोशी यांचे दिनांक ७ मे रोजी गॅस सिलेंडर दुर्घटनेतील आपदग्रस्तांना वाचवतांना स्वत: मृत्युमुखी पडले. यात दिनांक ७ मे वार मंगळवार रोजी एकविरा देवी मंदिर परिसर गल्ली क्र. ७ मध्ये राहणाऱ्या निर्मलाबाई लालचंद भोई यांच्या घरात अक्षयतृतीयेच्या दिवशी सकाळी ७ वाजता गॅस गळती झाल्याने मोठ्या प्रमाणात आगीची दुर्घटना निर्माण झाली होती. यावेळी परिसरातील बरेच नागरिक साखर झोपेत होते. सदर परिसरात प्रचंड दाट वस्ती असून येथे अल्प उत्पन्न गटातील कुटुंबे सदर ठिकाणी वास्तव्यास आहेत. यावेळी अचानक लागलेल्या आगीमुळे अन्य कुटुंबांना त्रास होउ नये व अन्य जीवित हानी व वित्त हानी होऊ नये यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातुन व शेजारधर्म म्हणून त्या भागातील सामाजिक कार्यकर्ते सुधाकर ज्ञानेश्वर जोशी उर्फ बंडू जोशी हे आपल्या प्राणाची पर्वा न करता सौ. निर्मलाबाई भोई यांच्या घरात जाऊन काही वेळ गॅस सिलेंडर दुरुस्तीचा ही प्रयत्न केला होता. पण तोपर्यंत गॅस सिलेंडरने पेट घेवून मोठया प्रमाणात घरात गॅस भडका झाला होता. अश्या हि परिस्थितीत सदर जळते सिलेंडर बंद किंवा दुरुस्त होत नाही हे लक्षात येताच सदर जळते सिलेंडर बाहेर काढण्यासाठी सौ. भोई यांच्या घरात गेले. यावेळी शेजारील अन्य कुंटुंबाना व नागरिकांना जागृत करुन निडरपणे स्वर्गीय जोशी यांनी या प्रसंगात अतुलनीय धैर्य दाखवले तथापि गॅस गळतीमुळे गॅस सिलेंडर जवळ असलेले स्व. सुधाकर जोशी हे सार्वधिक ९८ % भाजले गेले व यानंतर दोन दिवसांनी शासकिय रुग्णालयात उपचार घेताना दुर्घटनेत यांचे दु:खद निधन झाले.

स्व.जोशी हे परिसरात निस्वार्थीपणे सामाजिक कार्यात सहभागी होत असत अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात त्यांचा सहभाग असे.स्व.जोशी हे खाजगी नोकरीत असून त्यांचे संपूर्ण कुटंबाचा आर्थिक भार त्यांच्यावरच होता.कौटुंबीक परिस्थिती फार बेताची असल्याने स्व. जोशी यांना अन्य कोणत्याही आर्थिक सहाय्याची उपलब्धता नाही. सामाजिक आणि माणूसकीच्या उद्देशाने आपल्या स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता स्व. सुधाकर जोशी यांनी अनेकांना या दुर्घटनेतुन वाचवले मोठया प्रमाणात होणारी जीवित व वित्त हानी स्व. जोशी यांच्या समयसुचकतेने व जागृत पणाने टळलेली आहे.अशा या साहसपूर्ण कामाची दखल मनपा स्तरावर आणि शासन स्तरावर घेणे आवश्यक आहे.

स्वर्गीय सुधाकर जोशी उर्फ बंडु जोशी यांना धुळे मनपा मार्फत मरणोत्तर शौर्य पुरस्कार मिळणेसाठी राज्य शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच त्यांचे कुटुंबियांना राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणेसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडेस पाठविण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- २६ मागील महासभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२/२/२०१९)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. प्रदीप कर्पे मागील महासभेचे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. महापौर या मध्ये मागील दि.०२-०२-२०१९ च्या महासभेत विषय क्रमांक ६ ठराव नं. ९ पारीत झालेला आहे. सदर ठरावात महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील एकुण १ ते ८२ कामांचा प्रस्ताव शासनाकडेस सादर केलेला आहे. सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार काही कामांमध्ये किरकोळ फेरबदल प्रस्तावित करावयाचे आहेत.त्यानुसार सदर फेरबदल करुन इतिवृत्त वाचुन कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३५ दिनांक २९/०६/२०१९

मागील महासभा दिनांक ०२/०२/२०१९ चे धुळे मनपा ठराव नंबर०१ ते ०८ क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.तसेच उक्त सभेतील विषय क्रमांक ९ महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील एकुण १ ते ८२ कामांचा प्रस्ताव शासनाकडेस सादर केलेला आहे. सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार काही कामांमध्ये किरकोळ फेरबदल प्रस्तावित करावयाचे आहेत.त्यानुसार सदर फेरबदल करुन इतिवृत्त वाचुन कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- २७ महिला बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.४/६/२०१९)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सौ.निशाताई पाटील महिला व बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करावे मात्र समितीसाठी सन 2019-20 साठी निश्चित केलेली तरतुद कमी असून सदर निधी संपण्यांत आलेला आहे. महिला बालकल्याण समितीकडे सदस्यांचे कामाच्या यादया प्राप्त झालेल्या आहेत. तरी महिला बालकल्याण समितीसाठी राखून ठेवावयाचा निधीत वाढ करण्यांत यावी.

म.महापौर याबाबत मे.महासभेत अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर महासभेत महिला बालकल्याण समितीसाठी राखून ठेवावयाच्या निधीत वाढ करण्यांत येईल. महिला बालकल्याण समितीचे इतिवृत्त दिनांक 4/6/2019 चे क्रम: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३६ दिनांक२९/०६/२०१९

महिला बालकल्याण समिती सभा दिनांक ४/६/२०१९ चे ठराव नंबर १ ते २ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :- २८ म.कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रं. टीपीएस 1018/2331 /2018/ नवि-01/ दि.21 डिसेंबर 2018 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल मौजे देवपूर येथील स.नं.25 मधून प्रस्तावित 15.00 मी.रुंद विकास योजना रस्तावगळणे बाबत प्रस्ताव नामंजूर करणेत आलेला आहे.सदर आदेश माहितीसाठी मे. महासभपुढे सादर.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रतिभाताई चौधरी महापौर महोदय, हा जो नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ नुसार १५.०० मीटरचा डी.पी. रस्ता जयहिंद कॉलेज मधुन जाणेचा जो विषय आहे. हा विषय मागील पंचवार्षीकलाही घेणेत आला होता.आणि जो कॉलेजमधुन जाणारा रस्ता कॉलेजच्या मागे पारशी लोकांची स्मशान भुमी आहे.आणि त्यापुढे मुस्लीम समाजाचे कब्रस्थान आहे. त्याच्यामुळे हा रस्ता पुढे जाऊ शकत नाही.आणि दुसरे असे की, या रस्त्याला दुसरे पर्यायी रस्ते आहेत. जानकी नगर मधुन जाणारा आणि नेहरुनगर मधुन जाणारा डी. पी. रस्ता आहे. नेहरुनगर मधुन जाणारा रस्ता आहे. असे तीन चार रस्ते आहेत.स्वामी नारायण मंदीर येथील रस्ता आहे. या धर्तीवर वगळण्यात आला आहे.स्वामी नारायण मंदीर येवुन जाणारा रस्ता वगळुन शासकीय तंत्रनिकेतन कॉलेजमधुन जो करणेतआला आहे.हा रस्ता जयहिंद कॉलेजमधुन गेला तर जातीय वाद निर्माण होतील. मुस्लीम लोकांच्या जातीय भावना दुखावल्या जातील. जाणाऱ्या

रस्तावर मुस्लीम लोकांची स्मशान भुमी आहे.तत्कालीन महापौर श्रीमती कल्पना काकु महाले महापौर असतांना या विषयाबाबत ठराव करणेत आला होता त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता.जयहिंद कॉलेज उत्तर महाराष्ट्रातील नावाजलेले कॉलेज आहे. सदर रस्त्याला पर्यायी डी.पी. रस्ते आहेत.आपण शासनाला पुन्हा रस्ता रद्द करण्याचा फेर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. यावर प्रशासनाच्या माध्यमातुन पाठपुरावा करणेत येईल.

म. प्रदीप कर्पे — महापौर महोदय, सन्मा. सदस्य श्रीमती प्रतिभा ताई चौधरी यांनी सुचना मांडल्या आहेत. हा जो विषय आलेला आहे. जयहिंद कॉलेजमधुन जाणारा जो रस्ता आहे. सदर रस्त्याला त्याच्या आजुबाजुला पर्यायी चार रस्ते असल्यामुळे या रस्त्याचा फेर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. हा जो रस्ता प्रस्तावीत केलेला आहे. त्या रस्त्याचा भुसंपादनाचा मोबदला ही मनपा ला द्यावा लागणार आहे. त्या दृष्टीने मनपाच्या आर्थिकबाबींचा ही विचार केला पाहिजे . तरी फेर प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत यावा.

म. महापौर — जयहिंद कॉलेजमधुन जाणाऱ्या रस्त्याचे आम्ही पाहणी केली आहे.पाहणीच्या वेळी त्या प्रभागातील सन्मा. सदस्या प्रतिभा ताई चौधरी, सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे,कांतीलाल दाळवाले,सौ. पुष्पा बोरसे, मनपाचे पदाधिकारी, अधिकारी तसेच संस्थाचालक उपस्थित होते. पाहणी केली असता जयहिंद कॉलेज मध्ये दिले जाणारे शिक्षण एक नावाजलेली संस्था या गोष्टींचा विचार केला पाहिजे.जयहिंद कॉलेजमधुन जाणारा जो रस्ता आहे. त्या ठिकाणी पारशी लोकांची स्मशान भुमी तसेच पुढे त्याच रस्त्यावर मुस्लीम लोकांचे कब्रस्तान आहे. या संदर्भात यापुर्वी महानगरपालिकेने सदर देवपुर सर्वे नं २५ म्हणजेच जयहिंद महाविद्यालयातुन प्रस्तावित असलेला १५ मी. विकास योजना रस्त्याचे आरक्षण वगळणेबाबत ठराव पारित केलेला होता. तसेच तद्नंतर या बाबत हारकती सुचना मागवुन एकही हरकत न आल्याने पुनश्च: ठराव करुन शासनाकडेस आरक्षण वगळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. तथापी शासनाने सदर प्रस्ताव नामंजुर केलेला असुन त्याबाबत माहितीस्तव विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.तथापी सदर संस्था ही आपल्या खान्देशातील नावाजलेली व अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे.सदर रस्ता ताब्यात घेण्यासाठी जागेचे भुसंपादन करावे लागेल. त्यासाठी आर्थिक मोबदला द्यावा लागणार आहे. तसेच सदर रस्ता हा सल्लंग्न ठेवणे आवश्यक आहे. सदर रस्ता हा मुस्लीम कब्रस्तानातुन सल्लंग्न होणार आहे. धुळे शहर मंजुर विकास योजना २०१५ मध्ये अंतिम करण्यात आली.सदर योजना प्रस्तावित करण्यापुर्वी सदर ठिकाणी जयहिंद संस्थेच्या अस्तित्वातील इमारतीचे बांधकाम झालेले होते.व सद्यस्थितीलमुस्लिम कब्रस्तानही अस्तित्वात होते याबाबत नगररचना विभागाकडुन सर्वेक्षण करतांना प्रत्यक्षातील स्थिती तपासुन प्रस्ताव प्रस्तावीत करणे आवश्यक होते.परंतु या प्रमाणे कार्यवाही न झाल्याने प्रत्यक्ष बांधकाम झालेल्या ठिकाणी रस्ता प्रस्तावित झालेला आहे. सद्य स्थितीत रस्त्याला पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत त्यामुळे आर्थिक व व्यवहारीक दृष्टया सदर रस्त्याचे आरक्षण ठेवणे योग्य ठरत नाही.

त्यामुळे सदर रस्त्यांचे आरक्षण वगळणेकामी प्रस्ताव पुनश्च:फेर निर्णयार्थ शासनाकडेस सादर करण्यास सर्व सन्मा. सदस्यांच्या संमतीने मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३७ दिनांक: २९/०६/२०१९

प्रस्तुत प्रकरणात धुळे शहरातील जयहिंद महाविद्यालय स.क्र. २५/१ या जागेतून धुळे शहराची सन १९८६ साली मंजुर झालेल्या विकास योजनेत व प्रारुप विकास योजना, धुळे (दुसरी सुधारीत) ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१)अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस १०१२/५२६ (न) पुर्नबांधणी क्र. ६२ /

प्र.क्र.१०६/१२/नावि-९ दि. २८ डिसेंबर २०१२ अन्वये भागश: मंजुर केली असुन तसेच प्रारुप विकास योजना, धुळे (दुसरी सुधारीत) ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस १०१२/५२६ (न) पुर्नबांधणी क्र. ६२/प्र.क्र.१०६/१२/नावि-९ दि. ३ जुलै २०१५ अंमलात आलेल्या विकास योजनेत १५ मी डि.पी. रस्ता जात आहे. तथापि या बाबत मा.चेअरमन, जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट देवपुर यांना यापुर्वी तत्कालीन धुळे नगरपालिका पत्र क्र. ६८७६ दि.५/२/२००३ रोजी डि.पी.रस्त्यात बांधकामाबाबत तसेच सदर जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९ नुसार नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीतील अनुसरुन मा. चेअरमन, जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट देवपुर धुळे यांनी मे. शासनाचा अर्ज करुन सदर बाबत स्थगन आदेश घेतलेला होता, परंतु मे.शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.१००३/४९१/प्र.क्र.२९/०३/नवि दि.३०/८/२००६च्या पत्रान्वये सदर स्थगनआदेश रद्द करण्यात आलेला आहे.

परंतु सदर १५.० वि.यो. रस्ता हा संस्थेच्या खाजगी जागेतून जात असल्याने रस्ताच्या क्षेत्राचे अधिग्रहण मंजुर विकास आराखडयानुसार महानगरपालिके मार्फत करणे आवश्यक आहे व त्याचा मोबदला म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६मधील तरतुदीनुसार तसेचशासनाने मंजुर केलेले ड वर्ग महानगरपालिका इमारत बांधकाम उपस्थित व विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक ते वाडीव चटई क्षेत्र अथवा टीडीआर देणेबाबत तरतुद आहे तरीही शासन आदेशानुसार उक्त नोटीसीत नमुद केल्यानुसार सदर १५ मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यातील बांधकाम काढुन घेणेबाबत इकडील कार्यालयीन पत्र क्र.धुमपा/नर/२०६० दि.१८/१/२०१७ अन्वये संस्थेस कळविण्यात आले आहे.

तसेच उक्त संस्थेने विकास योजनेतील १५.मी डि.पी. रस्ता रद्द करणेबाबत मे. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट अर्ज क्र. १२८६/२०१६ दावा दाखल केलेला आहे.मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ जनहित याचिका क्र.१७/२०१८ चे दि. १/२/२०१८चे आदेशातील परिच्छेद क्र.३ नुसार श्री. अनिल गोटे यांच्या अर्जावर निर्णय घेतला नसल्यास आदेशाच्या दिनांका पासुन ६ महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने देवपुर स. क्र. २५जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट देवपुर धुळे या जागेतुन जात असलेल्या १५.० वि.योजना रस्ताबाबत कार्यवाही करणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ मे.महासभेपुढे ठेवला असता धुळे महानगरपालिका ठराव क्र.७४ दि. ३१/०८/२०१७अन्वये सद्य:स्थितीत सदर रस्त्याला पर्यायी मार्ग उपलब्ध आहे त्यामुळे आर्थिक व व्यवहारिक दृष्टया सदर रस्त्याचे आरक्षण वगळणे योग्य होणार आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७अन्वये सदर आरक्षण बदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देणेत आलेली आहे. प्रशासनाने अन्यत्र पर्यायी रस्त्यासाठी तातडीने जागेचा शोध घेवुन आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत ठराव पारीत केलेला आहे.

उक्त ठरावाचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१)चे तरतुदीनुसार जा.क्र.धुमपा/नर/६६९ दि.१९/१२/२०१७ अन्वये स्थानिक

वर्तमानपत्रात नागरीकांकडुन उक्त फेरबदलाबाबत हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्या तसेच महाराष्ट्र शासनाचे दि. १८ जानेवारी २०१८ चे राजपत्रात हरकती व सुचना मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार विहित मुदतीत फक्त ३९५ सुचना प्राप्त झाल्या असुन मुदतीत एकही हरकत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अधिनियमानुसार उक्त फेरबदलाबाबत सुचना हया ठरावाच्या बाजुने असल्याने त्यांची सुनावणी घेणेची आवश्यकता नसल्याने ठरावाच्या विरोधात हरकती अर्ज नसल्याने सदर प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यासाठी व सदर बाब धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय मे.महासभेपुढे सादर केला असता महानगरपालिका ठराव क्र.१११ दि. २४/४/२०१८ अन्वये उक्त जागेच्या फेरबदलाचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठु शासनास इकडील कार्यालयीन पत्र क्र.धुमपा/नर/१४१दि.८/६/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आलेले असत शासनाने पत्र क्र.टिपीएस-१०१८/२३३१/ प्र.क्र. ३०१/२०१८ नवि-०९ दि.२१/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल मौजे देवपुर येथील स.नं.२५ मधुन प्रस्तावित १५.०० मी.रुंद विकास योजना रस्ता वगळणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करणेत आलेला आहे.

तरी सदर शासनाने पत्र क्र.टिपीएस- १०१८/२३३१/प्र.क्र ३०१/२०१८ नवि-०९ दि. २१/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल मौजे देवपुर येथील स.नं.२५ मधुन प्रस्तावित १५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करणेत आलेला आहे, सदर आदेश सभागहाच्या माहितीसाठी सादर करण्यांत आला.

या प्रस्तावासंदर्भात सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार यापुर्वी महानगरपालिकेने सदर देवपुर सर्वे नं २५ म्हणजेच जयहिंद महाविद्यालयातुन प्रस्तावित असलेला १५ मी. विकास योजना रस्त्याचे आरक्षण वगळणेबाबत ठराव पारित केलेला होता. तसेच तद्नंतर या बाबत हारकती सुचना मागवुन एकही हरकत न आल्याने पुनश्च: ठराव करुन शासनाकडेस आरक्षण वगळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. तथापी शासनाने सदर प्रस्ताव नामंजुर केलेला असुन त्याबाबत माहितीस्तव विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे. तथापी सदर संस्था ही आपल्या खान्देशातील नावाजलेली व अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. सदर रस्ता ताब्यात घेण्यासाठी जागेचे भुसंपादन करावे लागेल.त्यासाठी आर्थिक मोबदला द्यावा लागणार आहे.तसेच सदर रस्ता हा सल्लंग्न ठेवणे आवश्यक आहे.सदर रस्ता हा मुस्लीम कब्रस्तानातुन सल्लंग्न होणार आहे.धुळे शहर मंजुर विकास योजना २०१५ मध्ये अंतिम करण्यात आली. सदर योजना प्रस्तावित करण्यापुर्वी सदर ठिकाणी जयहिंद संस्थेच्या अस्तित्वातील इमारतीचे बांधकाम झालेले होते.व सद्यस्थितील मुस्लिम कब्रस्तानही अस्तित्वात होते याबाबत नगररचना विभागाकडुन सर्वेक्षण करतांना प्रत्यक्षातील स्थिती तपासुन प्रस्ताव प्रस्तावीत करणे आवश्यक होते.परंतु या प्रमाणे कार्यवाही न झाल्याने प्रत्यक्ष बांधकाम झालेल्या ठिकाणी रस्ता प्रस्तावित झालेला आहे. सद्य स्थितीत रस्त्याला पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत त्यामुळे आर्थिक व व्यवहारीक दृष्टया सदर रस्त्याचे आरक्षण ठेवणे योग्य ठरत नाही.

त्यामुळे सदर रस्त्यांचे आरक्षण वगळणेकामी प्रस्ताव पुनश्च:फेर निर्णयार्थ शासनाकडेस सादर करण्यास सर्व सन्मा.सदस्यांच्या संमतीने मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :- २९ धुळे महानगरपालिका धुळेचे सन २०१४-१५ या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा औरंगाबाद यांच्या मार्फत करणेत आले असुन त्या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल मे. महासभेच्या विषय पटलावर अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. संजय जाधव महापौर महोदय, हा जो लेखापरिक्षणाचा अहवाल आला आहे. हा विषय मागील महासभेत घेण्यात आला होता. आणि तो विषय योग्य ठरल्यामुळे तत्कालीन आयुक्त श्री. देशमुख साहेब यांनी त्या सभे नंतर सर्व सन्मा. सदस्यांना नोटीस पाठवीली. की, सभा शास्त्र नियमानुसार विषय मांडले गेले पाहिजे. आणि त्या अनुषंगाने मी देखील महापौर व नगरसचिव यांना पत्र दिले आहे. हा विषय जरी सभागृहाला अवलोकनार्थ असला तरी या ठीकाणी सभागृहाला काही गोष्टी माहित झाल्या पाहिजेत. सन २०११-१२,२०१२-१३,२०१३-१४ आणि आजचा जो विषय आहे. २०१४-१५ लेखापरिक्षण अहवाल आलेला आहे. मला या ठिकाणी विचारावयाचे आहे. की जे लेखापरिक्षण अहवाल आलेले आहेत. त्यामधे जे ऑडीट परिच्छेद होते त्या संदभार्त किती अनुपालन स्थानिक निधी लेखा परिक्षण औरंगाबाद यांना सादर करणेत आले आहे. याची माहिती सभागृहाला मिळावी.

म.मु.लेखाधिकारी लेखापरिक्षण आक्षेपासंदर्भात सन २०११-१२,२०१२-१३,२०१३-१४ अनुपालन सादर केलेले असुन परंतु अनुपालन स्विकृत केलेले नाही.

म. संजय जाधव यावर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे? त्यांनी स्विकृत केले नाही याचा अर्थ परिच्छेद मध्ये आक्षेप आहे. लेखापरिक्षणात ज्या लोकांवर रिकव्हरी निघाली आहे. त्यांच्यावर रिकव्हरी झालीच पाहिजे. यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

म.मु.लेखाधिकारी लेखापरिक्षणातील आक्षेपासंदर्भात प्रत्येक विभागाकडुन अनुपालना बाबतची कार्यवाही करणेत येईल.

म. संजय जाधव विभाग प्रमुख हे स्वत: कशी कार्यवाही करतील ? त्यांनी अनुपालन सादर केले आहे काय?

म. महापौर या संदर्भात विषय असा आहे. मनपाच्या लेखापरिक्षणात महानगरपालिकेत काही अफरातफर झाली आहे का? किंवा भ्रष्टाचार झाला आहे का? तसा लेखापरिक्षणात "क" मध्ये आक्षेप आला आहे का? या बाबत खुलासा करावा.

म.मु.लेखाधिकारी सदर २०११-१२,२०१२-१३,२०१३-१४ लेखापरिक्षणातील "क" मध्ये कुठलाही आक्षेप नाही.

म.महापौर या संदर्भात म. आयुक्त साहेब खुलासा करतील.

म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळे. सन्मा.सभागृहाला मी माहिती देवु इच्छितो की, जेव्हा लेखापरिक्षण त्रुटींचे आक्षेपावर त्यांचे स्पष्टीकरण सादर करीत असतो त्या वेळेस आपण सगळ्या कार्यवाही पुर्ण करुनच सादर करीत असतो. त्यामध्ये दोन प्रकारचे आक्षेप असतात १. प्रासिजरल ईरेग्युलारीटीज् २. फायनान्सशियल मिसअॅप्रोप्रिएशन हे दोन प्रकार झाले या मध्ये एक म्हणजे प्रक्रिया लांबविणेचे असते. ज्या प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली. आणि दुसरे म्हणजे आर्थिक गैरव्यवहार त्याच्यात आर्थिक गैरव्यवहार असेल त्याला सहसा गंभीर प्रकारचे आक्षेप समजले जातील. जे प्रोसिजरल् अनियमीतता आहे. त्यासाठी आपण स्पष्टीकरण पाठवित असतो. जेव्हा आपण लेखा परिक्षण अहवाल पाठवित असतो त्यावेळस त्याची जी काही आवश्यक कार्यवाही आहे. ती कार्यवाही करुनच पाठविले जाते. आता आपण कार्यवाही साठी पाठविलेनंतर जो पर्यंत ते लेखापरिक्षण विभाग आपल्याला त्रुटी कळवितो तो पर्यंत आपण काहीही करत नाही. आता अहवालाची पुर्तता करुन लेखापक्षिण अहवाल पाठविला गेला असेल तर तिकडुन त्रुटी येई पर्यंत आपल्याला थांबावे लागेल तो पर्यंत पुढील कार्यवाही होत नाही.

म. संजय जाधव — लेखापरिक्षणात बऱ्याचशा आक्षेपात अनुपालन सादर केलेले नाही. एक छोटेसे उदाहरण सांगतो साहेब आपण या जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी आहेत. या धुळे महानगरपालिकेतील एक बांधकाम विभाग आहे. उदाहरण देतो फक्त बाकी बरेच विभाग आहेत. बांधकाम विभागाचे जे काही आता पर्यंत लेखापरिक्षण झाले त्यामध्ये या लोकांनी लेखापरिक्षण सुरु असतांना एम.बी पुरविल्या गेल्या नाहीत. त्यांनी तांत्रीक मंजुरी घेतली नाही. काही प्रशासकिय मंजुरी घेतलेली नाही. तरी सुध्दा निविदा काढलेल्या आहेत. आता एम.बी. म्हणजे पुर्ण रेकॉर्ड आहेत. ते न देता या लोकांनी फक्त तेवढया तरतुदी करुन पुढे पाठविले. ते रेकॉर्ड आहे किंवा नष्ट केले जाईल याची जबाबदारी कुणी तरी घेतली गेली पाहिजे.अनुपालन हे यामुळे सादर करत नाहीत. कारण यामध्ये परिच्छेद वगळलेजाणार नाही. त्या लोकांवर शंभर टक्के ती रिकव्हरी निघणार आहे. लेखाधिकारी म्हणतात यामध्ये एक पण गंभरी आक्षेप नाहीत का? या चार अहवालांवर बोलतोय मी
लेखापरिक्षणाचे पाचही अहवाल माझ्याकडे आहेत. मी वाचले आहेत म्हणुन सांगतोय तुम्हांला अस समजु नका की अवलोकन करुन निघुन गेला असे.

म.मु.लेखाधिकारी — "क" मध्ये एकही आक्षेप नाही.

म. संजय जाधव — आता पर्यंत झालेल्या चार लेखापरिक्षण अहवालाबाबत मी बोलत आहे.माझ्या कडे लेखापरिक्षण अहवालाचे पुरावे आहेत.सभागृहात तुम्हांला जे बोलायचे ते बोला. लेखी स्वरुपात मला जे मांडायचे ते मी मांडेल. आणि महापौर साहेब माझे म्हणजे असे आहे की, सर्वांचे अनुपालन सादर केले गेलेत का नाही पर्यंत हा विषय तहकुब ठेवावा याला माझा विरोध आहे. अवलोकनार्थ असला तरीही माझा विरोध आहे.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय, भामरे साहेबांनी जो खुलासा केलेला आहे. त्यामध्ये "अ" आणि "ब" मध्ये किती अनुपालन झालेले आहे याची माहिती द्यावी.

म.उप.मु.लेखाधिकारी — मा. महापौर साहेब यांच्या वतीने खुलासा सादर करतो.अहवाल हा विभागांनुसार आलेला आहे. प्रत्येक अहवाल हा विभागानुसार आलेला असतो. आणि या अहवालांवर आलेल्या परिच्छेदांचे अनुपालन सादर करणे आणि ते कशात आलेले आहे या सर्वस्वी नोंद ठेवणे त्या-त्या विभांगाची स्वतंत्र रजिष्टर भरुन त्यांनी कार्यवाही करावयाची आहे. याबाबत जर तुम्हांला अ, ब,क, ड याच्यामध्ये जर माहिती पाहिजे असेल तर ती नंतर सादर करणेत येईल.

म. नागसेन बोरसे — तो पर्यंत पाठवु नका. त्या विषयावर पुर्ण चर्चा करु मग पाठवु.

म.उप.मु.लेखाधिकारी — आपण अनुपालन सादर केलेले आहेत.

म. नागसेन बोरसे — अनुपालन सादर केले आहे बरोबर आहे. मग ऑडीट होत असतांना का सादर केले नाही.

म.उप.मु.लेखाधिकारी — तेव्हाही सादर केलेले आहे. ते अर्धसमास देतात ते त्याच्यावर उत्तर आपण दिलेले असतात. आणि अंतिमीकरण होत असतांना ही अनुपालन दिलेले असतात. परंतु अनुपालन सादर होत असतांना त्यांना मनपाचा ठराव लागतो. त्या शिवाय ते डिपार्टमेंन्ट त्यावर कार्यवाही सुरु करत नाही.

म. नागसेन बोरसे — मग आपण स्मरण पत्र किती पाठविले. अनुपालन पाठविले नंतर?

म.उप.मु.लेखाधिकारी — प्रत्येक विभागाने पाठविले आहे दर सहा महिन्यांनी.

म. नागसेन बोरसे — किती पाठविले? स्मरण पत्र तर काय पाठविले नाही.अनुपाल झाले किंवा नाही हे आम्हांला कशावरुन समजेल.

म.उप.मु.लेखाधिकारी — याची माहिती तुम्हांला लिहुन कळविण्यात येईल.

म. सुनिल बैसाणे — मग महासभेमध्ये तुम्ही काय माहिती देणार आहात सदस्यांना?

म. नागसेन बोरसे अनुपालन साठी आपण जे पाठविलेले आहे. किती दिवस झाले त्याला ४ ते ६ महिने किंवा वर्ष झाले असेल. एका वर्षात किती पत्रव्यवहार केले आपण अनुपालन का झाले नाही या संदर्भात

म.उप.मु.लेखाधिकारी हे तुम्ही २०१४-१५ च्या संदर्भात बोलत आहात की त्यापुर्वीचे ?

म. नागसेन बोरसे सन २०१४-१५ च्या संदर्भात.

म.उप.मु.लेखाधिकारी २०१४-१५ चे अनुपालन पाठविलेले आहेत. ४ महिनेझाल्यानंतर अहवाल काढतोय.

म. नागसेन बोरसे मग आता किती दिवस झाले त्याला पाठवुन.

म.उप.मु.लेखाधिकारी पाच-सहा महिने झाले असतील.

म. नागसेन बोरसे सहा महिन्यात किती वेळा त्यांना पत्रव्यवहार केला.

म.उप.मु.लेखाधिकारी त्यासाठी पत्रांची आवश्यकता नाही.

म. नागसेन बोरसे स्मरण पत्र असतील ना काही. अनुपालन मान्य नाही झाले असे.

म.उप.मु.लेखाधिकारी अहवालच आपल्यासमोर या साठी आलेला आहे. अनुपालना सोबत जो मनपाचा ठराव पाहिजे आहे त्याशिवाय संबंधीत विभाग त्यावर कोणतीच कायर्वाही सुरु करत नाही.

म. नागसेन बोरसे त्यापुर्वी म्हणजेच १९८७-८८,१९९३-९४ साली जे ऑडीट झाले आहे त्याचे अनुपालन पाठविलेले होते का?

म.उप.मु.लेखाधिकारी त्या बाबत नाही सांगता येणार.

म. नागसेन बोरसे २०१४-१५ चे ऑडीट केलेय ना तुम्ही मग या पुर्वी झालेल्या १९८७-८८, १९९३-९४ चे ऑडीट झालेय मग त्याचे अनुपालन पाठविले होते का? अ,ब,क या संदर्भात काय निर्णय झाला. त्याला तर आता भरपुर दिवस, वर्ष झाले आहेत. पुढच्या महासभेमध्ये तो विषय चर्चेत घेण्यात यावा.

म. महापौर सदर लेखापरीक्षण अहवाल हा अधिनियमातील तरतुदीनुसार अवलोकनार्थ सादर झालेला आहे. महासभेच्या अवलोकनानंतर लेखा आक्षेपातील परिच्छेद विभाग निहाय दिले जातात. सदर लेखा आक्षेपाची पूर्तता व प्रस्तावातील त्रुटयाबाबत पूर्तता करुन स्थानिक निधी लेखा विभाग औरंगाबाद यांचेकडेस सादर केले जातात. याबाबत पडताळणी करुन आक्षेप वगळणे किंवा कायम ठेवणे याबाबतची कार्यवाही संबंधित विभागाकडून करण्यांत येते आक्षेपाधिन परिच्छेदाबाबत आवश्यक ती पूर्तता व कार्यवाही करण्यात येते. यापूर्वी सन २०१३-१४ व आता सन २०१४-१५ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अवलोकनार्थ सादर झालेला आहे. यात भ्रष्टाचार अपहार किंवा अन्य गंभीर आक्षेप निदर्शनास आलेले नाहीत. कार्यवाहीतील त्रुटयांमुळे अनियमितता झालेली असून याबाबत तांतडीने संबंधित विभागाकडून आवश्यक ती पूर्तता करणेबाबत तात्काळ प्रशासनाने कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३८ दिनांक २९/०६/२०१९

धुळे महानगरपालिका धुळेचे सन 2014 -15 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा औरंगाबाद यांच्या मार्फत करणेत आले असुन त्या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल म.न.पास प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त पत्रानुसार संबंधीत विभागांना आपेक्षांची पुर्तता करुन सादर करणेबाबत कळविलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 107 अ मध्ये नमुद नुसार स्थानिक निधी लेखापरिक्षण यांच्याकडुन अहवाल मिळाल्यानंतर तो महानगरपालीकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील त्यानंतर आयुक्त महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियम यातील तरतुदीनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करील. अशी तरतूद आहे.

विषयांकीत बाबतीत कालमर्यादा विचारात घेता यापुढे मुख्य लेखा अधिकारी (लेखाविभाग) यांनी मान्यतेचा होणारा विलंब टाळणे करीता थेट मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करणे योग्य व उचित ठरेल असे मत मा. आयुक्त सो यांनी नोंदविलेले आहे.

सदर लेखापरीक्षण अहवाल हा अधिनियमातील तरतुदीनुसारअवलोकनार्थ सादर झालेला आहे.महासभेच्या अवलोकनानंतर लेखा आक्षेपातील परिच्छेद विभाग निहाय दिले जातात. सदर लेखा आक्षेपाची पूर्तता व प्रस्तावातील त्रुटयाबाबत पूर्तता करुन स्थानिक निधी लेखा विभाग औरंगाबाद यांचेकडेस सादर केले जातात.याबाबत पडताळणी करुन आक्षेप वगळणे किंवा कायम ठेवणे याबाबतची कार्यवाही संबंधित विभागाकडून करण्यांत येते आक्षेपाधिन परिच्छेदाबाबत आवश्यक ती पूर्तता व कार्यवाही करण्यात येते. यापूर्वी सन २०१३-१४ व आता सन २०१४-१५ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अवलोकनार्थ सादर झालेला आहे.यात भ्रष्टाचार अपहार किंवा अन्य गंभीर आक्षेप निदर्शनास आलेले नाहीत. कार्यवाहीतील त्रुटयांमुळे अनियमितता झालेली असून याबाबत तांतडीने संबंधित विभागाकडून आवश्यक ती पूर्तता करणेबाबत तात्काळ प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :- ३० धुळे महानगरपालिकेत वृक्ष समिती गठित करणे विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. तसेच वृक्ष समितीसाठी पूर्वी निश्चित केल्याप्रमाणे 15 सदस्य संख्या निश्चित झालेली आहे. यात वृक्ष समितीचे अध्यक्ष म्हणून पदसिध्द आयुक्त असतात. उर्वरीत 14 सदस्य हे प्रत्येक पक्षाच्या गटामार्फत पक्षीय संख्या बलानुसार निश्चित केलेले असून याबाबत नियमाप्रमाणे नियुक्त करावयाचे सदस्य संख्या व सदस्य निवडीचे निकष सन्मा.गटनेत्यांना पत्राव्दारे अवगत करण्यांत आलेले आहे.त्यानुसार सन्मा. गटनेत्यांनी वृक्ष समितीसाठी नांव सादर करावयाची आहेत.

म. महापौर या संदर्भात वृक्ष समितीमध्ये एकुण १५ सदस्य संख्या निश्चित असुन या समितीचे अध्यक्ष हे पदसिध्द आयुक्त असतात. उर्वरित १४ सदस्य हे पक्षीय संख्या बळानुसार घ्यावयाचे आहेत. याबाबत पक्षांच्या गटनेत्यांना पत्र सादर करुन संख्या बळानुसार निश्चित होणाऱ्या सदस्यांची नावे सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार गटनेत्यांनकडुन आलेल्या नावांना वृक्ष समिती सदस्य पदी नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ३९ दिनांक २९/०६/२०१९

पर्यावरणाचे संतुलन सांभाळण्यासाठी अधिनियमानुसार धुळे महानगरपालिके मार्फत वृक्ष समिती गठन करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत नविन कौन्सिल अस्तित्वात आल्याने नविन वृक्ष समितीचे गठन करणे आवश्यक आहे.

या संदर्भात मा.महापौर यांनी सदरबाबत आदेशित केलेले आहे.सन 1975चा महाराष्ट्र अधिनियम क्र.44 महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 अन्वये प्रकरण 2 मधील कलम 3 चा (1) कोणतेही नागरी क्षेत्रात अधिनियम अंमलात आणल्या नंतर शक्य तितक्या लवकर संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यांमधून ते प्राधिकरण ठरवतील अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या (अध्यक्ष व इतरासह) कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 15 व्यक्तिचे मिळून बनविलेले एक वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करील अशी तरतूद आहे. त्याअनुषंगाने सदर समितीचे अध्यक्ष मा.आयुक्त

मनपा धुळे हे असतील. याबाबत इतर सदस्यांबाबत नियुक्तीसाठी सदर प्रस्ताव मे.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत आलेला आहे.

वृक्ष समितीमध्ये एकुण १५ सदस्य संख्या निश्चित असुन या समितीचे अध्यक्ष हे पदसिध्द आयुक्त असतात. उर्वरित १४ सदस्य हे पक्षीय संख्या बळानुसार घ्यावयाचे आहेत.याबाबत पक्षांच्या गटनेत्यांना पत्र सादर करुन संख्या बळानुसार निश्चित होणाऱ्या सदस्यांची नावे सादर करणेबाबत कळविलेले होते.त्यानुसार गटनेत्यांनकडुन प्राप्त् झालेल्या पत्रानुसार वृक्ष समितीसाठी खालील प्रमाणे वृक्ष समिती सदस्य पदी नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	पक्ष
1	श्रीमती भामरे वंदना संजय	नगरसेविका	भारतीय जनता पार्टी
2	श्रीमती भिल निंबाबाई फुलसिंग	नगरसेविका	भारतीय जनता पार्टी
3	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	नगरसेवक	भारतीय जनता पार्टी
4	श्री.मासुळे अमोल पावबा	नगरसेवक	भारतीय जनता पार्टी
5	श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण	नगरसेविका	भारतीय जनता पार्टी
6	श्री. जाधव बन्सीलाल माणिक	नगरसेवक	भारतीय जनता पार्टी
7	श्री.तेजराम उर्फ अनिल सुकलाल थोरात	सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी	भारतीय जनता पार्टी
8	श्री.राहुल सुर्यकांत तारगे	सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी	भारतीय जनता पार्टी
9	श्री.मनोज भिका शिरुडे	सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी	भारतीय जनता पार्टी
10	श्री. संदीप दत्तात्रय महाले	नगरसेवक	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
11	श्री. मोहंमद उमेर शव्वाल अन्सारी	नगरसेवक	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
12	श्री. मोमीन आसिफ इस्माईल	नगरसेवक	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
13	श्रीमती फातमा नुरुल अमीन अन्सारी	नगरसेविका	समाजवादी पार्टी
14	श्रीमती पठाण नाजीया बानो ऑसिफ खान	नगरसेविका	एमएमआय

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :- ३१ धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास वेंतनश्रेणी सह व सन २०१६ मध्ये शासन मान्य सेवा प्रवेश, प्रवेश नियमावलीत फेरबदलासह प्रस्ताव शासनाकडेस मान्यतेस्तव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे महापौर महोदय, महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातुन आणि आपल्याला या महानगरपालिकेला काम करत असतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, कार्यालयीन विचार करता आपण धुळे महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील असलेल्या पदांचा बाबतीत नियमावली मध्ये फेरप्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सदरचा विषय आलेला आहे. या विषयामध्ये आपले लक्ष वेधु इच्छितो की पदांना मंजुरी व वेतन निश्चित करत असतांना अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, इतर मागासवर्गीय जे कर्मचारी अधिकारी असतील त्यांना या ठीकाणी पदोन्नतीच्या बाबतीमध्ये विचार केला पाहिजे. आणि त्या पदांमध्ये जर त्यांची निश्चिती होत असेल आणि ते पदे भरण्यासाठी या सुचीमध्ये प्रस्ताव सादर करावयाचा असेल तर त्याचा

विचार देखील आपण केला पाहिजे.इतर महानगरपालिकेमध्ये वेतन श्रेणी काय आहे. शासनाचे नियमानुसार यामध्ये सुधारीत पाचवा वेतन, सहावा वेतन किंवा सातवा वेतन जो काही असेल याचा देखील विचार केला गेला पाहिजे. हे करत असतांना कुणावरही अन्याय होणार नाही याची काळजी आपण घ्यायची. महानगरपालिकेमध्ये कर्मचारी वर्ग मुबलक नसल्याने अनेक विकास कामे करतांना अडचणी येत असतात. शासनाला प्रस्ताव सादर करत असतांना या सर्व गोष्टींचा विचार करुन तसेच शासनाच्या निकषांचा विचार करुन सदरचा प्रस्ताव पाठविणेत यावा.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय, हा विषय महानगरपालिकेच्या दृष्टीने खुप महत्वाचा विषय आहे. कारण जी कर्मचारी संख्या आहे ती फार तोडकी आहे. हा आकृती बंध सादर झाला पाहिजे. खुप वर्ष झाली हा आकृतीबंध सादर झाला नाही. परंतु यामध्ये मी एक गोष्ट विचारु इच्छितो पदांच्या मंजुरीसाठी आपण पदे पाठविली आहेत या पदांमध्ये सहाय्यक आयुक्त हे पद पदोन्नतीने भरले आहे असे दाखविले आहे. ते पदोन्नतीचे पदे कसे भरली त्याची माहिती सांगा.

म. कार्यालय अधि. — कार्यालयीन पद हे सहा.आयुक्तांचे पद ते म. गोसावी साहेबांचे आहे.

म. नागसेन बोरसे — तुम्हांला काय पद आहे?

म. कार्यालय अधि. — मी कार्यालयीन अधिक्षक आहे.

म. नागसेन बोरसे — कार्यालयीन अधिक्षक पदाची तुम्हांला रितसर ऑर्डर आली आहे का ? पदोन्नती दिली आहे का तुम्हांला? त्याची ऑर्डर आहे का?
शासनाला चुकिची माहिती दिली गेली आहे. १९९० ला एक ऑर्डर झाली आहे. म्हणजे अदिवासी प्रकल्प विभागातुन उमेदवारांची यादी मागवुन सरळसेवा भरतीचे आदेश आले होते. पण इकडुन अशी माहिती देणेत आली की पदे मंजुर नाहीत. अनुसुचीत जाती जमातींचे किती पदे मंजुर होती त्यावेळेस ती माहिती देणेत यावी. यांची माहिती का झाली नाही हे विचारावयाचे आहे मला महापौर महोदय अनुसुचीत जाती जमातींवर झालेला अन्याय आहे हा श्रीमती लक्ष्मीबाई फतेसिंग वसावे या दिल्लीपर्यंत गेल्या होत्या तो ही विषय यायाला हवा पदे रिक्त होती किंवा नाही.

म. महापौर — हा विषय यात नाही. अजेंडयावरचे विषय येण्याअगोदर आपण प्रश्नोत्तराचा तास होता त्यात प्रत्येकाला संधी दिलेली होती.

म. नागसेन बोरसे — तुम्ही आकृती बंध सादर करताय ना त्या आकृती बंधामध्ये तुम्ही असे म्हटलेले आहे का? अनुसुचीत जाती जमातीचे किती पदे रिक्त आहेत किती पदांना मंजुरी भेटली आहे. अनुसुचीत जाती जमातीचे किती पदे रिक्त होते १९९० मध्ये त्याची माहिती सांगा?

म. कार्यालयीन अधि. — माहिती घेवुन सांगता येईल आता नाही.

म. नागसेन बोरसे — आज किती पदे रिक्त आहेत अनुसुचीत जाती जमातींचे? श्रेणी ४, श्रेणी ३ आणि श्रेणी २ चे किती पदे रिक्त आहेत?

म. कार्यालयीन अधि — आज ती माहीती माझ्या जवळ नाही.आकृतीबंधात अनुसुचीत जाती, जमाती, इतरमागास वर्ग असे काही नसते फक्त एकुण रिक्त पदे असतात.

म. नागसेन बोरसे — आरक्षणा वर आधारीत आहे ना सगळे. एकुण पदांना किती आरक्षण असते हे तुमच्या जवळ आहे का?

म. महापौर — या संदर्भात म. आयुक्त साहेब खुलासा करतील.

म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळे.सभागृहाला माझी विनंती आहे या विषयावर मी थोडे स्पष्टीकरण देवु इच्छितो. आकृतीबंध म्हणजे एका पदावर एकुण किती पदे रिक्त आहेत ते आपण शासनाकडे सादर करतोय ती संख्या असते. आरक्षण हा विषय त्या नंतर ठरविला जातो. आपण शासनाला फक्त

इतकी माहीती देतो की एका पदनामासाठी किती पदे रिक्त आहेत ते मंजुर करुण देणेत यावे. जेव्हा शासन ते मंजुर करुन देते त्यानंतर आपण हा आकृती बंध विभागीय आयुक्त कार्यालयात पाठवित असतो. तेथील मागासवर्ग कक्षामार्फत या आकृतीबंधामध्ये किती पदे कोणत्या संवर्गासाठी संवर्गासाठी आरक्षीत ठेवायचे हे ठरवुन आपल्याला देत असते. हे ठरवुन दिल्या नंतर मग भरतीची प्रक्रिया होत असते. जेव्हा आकृती बंध या पध्दतीने आरक्षणाची, संवगा्रची स्थिती ठरवुन आपल्याला देते त्यानंतर जी पदे आपल्याकडे जी पदे सद्यस्थितीत भरलेली आहेत त्या पदांना आपण या आरक्षणात आधी बसवतो. उदाहरण द्यावयाचे झाले तर समजा ५० लिपीकांचे पदे मंजुर झाली या ५० पैकी १० पदे एक विशेष संवगा्रसाठी मंजुर करुन दिली विभागीय आयुक्त कार्यालय त्या संवगा्रतले जर आपल्याकडे आधी ४ लोक असतील तर आपण त्या १० जागांपैकी ४ जागा राखीव ठेवतो आणि ६ जागांसाठी भरतीची प्रक्रीया राबवित असतो. तर जेव्हा आपण भरतीची जाहीरात देतो तेव्हा ही सगळी प्रक्रिया करुन रिक्त पदांची संवर्गनिहाय संख्या आपण ठरवितो आणि नंतर भरतीची प्रक्रिया करतो. आज आपण फक्त आकृतीबंध पाठवित आहोत याचा आणि आरक्षणाचा काहीही संबंध नाही. पंरतु आकृती बंध मंजुर झाल्या नंतर आपल्याकडे जी पदे भरलेली आहेत त्या पदांना आकृतीबंधाच्या आरक्षणामध्ये बसवुन मग त्या संवर्गातील रिक्त पदे सोडुन त्यांची भरती करण्यात येते. आजच्या अजेंड्याचा विषय फक्त आकृतीबंध जो आपण शासनाला पाठवित की यापदनामासाठी एवढे पदे रिक्त आहेत. तेवढी पदे मंजुर करुन द्यावीत. एवढाच विषय आजच्या तारखेला आपण आपल्या सभेच्या अजेंड्यांवर ठेवलेला आहे. यापेक्षा आणखी काही विशीष्ट माहिती पाहिजे असेल तर संबंधीत कर्मचा-यामार्फत ती आपल्याला आपली सभा संपुन सात दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळविण्यात येईल याची मी काळजी घेईल.

म. नागसेन बोरसे — हा विषय मी या साठी घेतला आहे की, आपली भरती प्रक्रीया होवु शकत नाही. कारण आपला आस्थापना खर्च ६०% च्या जवळपास आहे. पदे जरी मंजुर होवुन आले तरी भरती प्रक्रीया होवु शकत नाही. शासनाचे असे निर्देश आहेत महानगरपालिकांना आस्थापना खर्चा पोटी अनुदान येत नाही. तर माझी अशी विनंती आहे सभागृहाला पुढच्या वेळेस महासभेत विषेश सभा घेवुन असा विषय पारीत करणेत यावा की ज्या अटीं व शर्ती लागु आहेत महानगरपालिकांसाठी त्या मधुन धुळे महानगरपालिकेला वगळण्यात यावी. आणि ज्याप्रमाणे नगरपालिकांना आस्थापना खर्चा पोटी रक्कम मिळते तशी आपल्याला मिळावी यासाठी शासनाला ठराव करुन पाठविण्यात यावा. जेणेकरुन आस्थापना खर्च जर कमी झाला तर भरती प्रक्रीया पुढे राबविली जाईल. एवढी काळजी घ्यावी.

म.संजय जाधव — महापौर महोदय,हा विषय माझ्या माहीती प्रमाणे या आधी सेवा प्रवेश नियमावलीच्या दुरुस्तीचा विषय शासनाला पाठविला गेला आहे. या ठिकाणी मी एक विचारु इच्छितो की ज्या लोकांना पदोन्नती आणि समावेशाचा हा विषय आहे. समावेशन ची व्याख्या सांगा माहिती साठी.

म. कार्यालयीन अधि. — समावेशन म्हणजे जे पदे आपल्याकडे आज आहेत ते पदे बसवुन बाकी रिक्त पदे कीती शिल्लक आहेत.

म. संजय जाधव — जे पदे आज मंजुर आहेत

म. कार्यालयीन अधि. — जे पदे मंजुर आहेत ते नाही कार्यरत आहेत ते समजा अधिक्षक चे १० पदे आहेत आणि १ च पद जर कार्यरत असेल तर ९ पदे रिक्त आहेत. समायोजन साठी एकच पदआहे असे दाखविले जाते.

म. संजय जाधव — मग यामध्ये जो पदोन्नतीचा विषय आहे.

म. कार्यालयीन अधि. — पदोन्नतीचा विषय कुठेच नाही याच्यात.

म. संजय जाधव — पदोन्नती आणि सेवा प्रवेशनियमावलीचा जो दुरुस्तीसाठी तुम्ही पाठविले आहे. पदोन्नती व सेवानियमन म्हटले आहे.

म. कार्यालयीन अधि. — आयुक्त साहेबांनी सांगीतल्या प्रमाणेच आहे. त्यानंतर पुढची कार्यवाही करणेत येईल.

म. संजय जाधव — त्याअनुषंगाने एक विषय आहे.आपल्याकडे निवृत्त झालेले अधिकारी श्री.कवठळकर हे उपायुक्त,श्री.फुलपगारे, श्री.गिते साहेब हे सहा आयुक्त होते या पदांना मंजुरी मिळाली आहे का?

म. कार्यालयीन अधि. — सदर पदांना मंजुरी होती. त्यासंदर्भात पायगुडे साहेबांची ऑर्डर आली होती.

म. संजय जाधव — आता जे श्री. कैलास शिंदे कार्यरत आहेत ते कोणत्या पदावर काम करीत आहे.

म. कार्यालयीन अधि. — ते अभियंता या पदावर कार्यरत आहेत.

म. संजय जाधव — हे पद आपल्याकडे आज अस्तित्वात आहे का?

म.कार्यालयीन अधि. — ते कार्यरत असे पर्यंत अभियंता पद राहील

म.संजय जाधव — ते सेवा निवृत्त झाल्यानंतर ते पद नष्ट होणार आहे का

म. कार्यालयीन अधि. — त्या पदनामात बदल होणार आहे. ते उपअभियंता पद होणार आहे.

म. संजय जाधव — या विषयांवर मला परिपुर्ण माहिती द्यावी.

म. कार्यालयीन अधि. — परिपुर्ण माहिती देणेत येईल.

म. संजय जाधव — मी मा. महापौर यांना सांगु इच्छितो हा जो अजेंडा आहे त्या मध्ये पुर्ण पणे मोघम माहीती देणेत आली आहे. या अजेंड्यांसोबत दिलेल्या टिपणी मध्ये विषयाबाबतची माहिती दिलेली नाही. सभागृहातील जवळ जवळ सर्व सन्मा.सदस्य नविन आहेत. दिनांक १६/०२/२०१६ ची जी मंजुर सेवा प्रवेश नियमावलीची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात यावी. त्या सेवा प्रवेश नियमावलीची मंजुर ०४/०३/२०१६ च्या आकृतीबंधाची प्रत देणेत यावी आणि सदर नियमावलीतील परिशिष्ट १,२,३,४ च्या प्रती या सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात याव्या. यामुळे या ठिकाणी नगरसेवक अभ्यासपुर्ण सांगु शकतील मंजुर पदे आहेत किंवा नाही. आजच्या स्थितीला आपल्या कडे बरेचसे लोक हे प्रभारी म्हणुन वेगवगळया पदांवर काम करीत आहेत.आपल्या शेजारी बसलेले श्री. मनोज वाघ हे सुध्दा प्रभारी नगरसचिव म्हणुन कार्यरत आहेत. ठीक आहे कामगीरी चांगली बजावत आहेत त्या बद्दल वाद नाही. नगरसेवकांनी जर अशा विषयांना मंजुरी दिली तर त्यांना माहिती पाहीजे की आपण कशाला मंजुरी देत आहोत. तर माझी सभागृहाच्या वतीने विनंती असेल की हा विषय तहकुब ठेवावा. मी ज्या काही प्रतींची मागणी केली आहे. त्या प्रती नगरसेवकांना पुरविण्यात याव्यात व हा विषय पुढच्या सभेत घेणेत यावा. तुर्त या सभेमध्ये माझा या विषयाला विरोध आहे.

म. हिरामण गवळी — महापौर महोदय, मी सभागृहाला सांगु इच्छितो की मी आज पर्यंत ऐकत आलो आहे. की, धुळे महानगरपालिकेचा आस्थापना खर्च जास्त आहे. या ठीकाणी कर्मचाऱ्यांची भरतीच झाली नाही. यानंतर तत्कालीन नगराध्यक्ष श्री पिंगळे नाना आणि धुळे न.पा.चे उपनगराध्यक्ष कै. बाळासाहेब कंड्रे यांच्या कार्यकिर्दीत फक्त ५४ लोक भरले गेले त्यानंतरच्या काळात अनेक कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर त्या जागा भरल्या गेल्या नाहीत. आणि तरीही आस्थापनाचा खर्च तसाच आहे. आकृतीबंधाबाबत मा. जिल्हाधिकारी साहेबांनी बरोबर सांगीतले आहे. परंतु या ठिकाणी असे आहे की, मी कार्यालयीन अधिक्षक यांना विचारणा केली अनेक लोकांना निलंबीत केले आहे. ते कर्मचारी घरी बसल्या-बसल्या ७५% पगार घेत आहेत. मग २५% रकमेसाठी का म्हणुन घरी ठेवतात. मग यासाठी त्यांना ७५% पगार देणे पेक्षा २५% टक्के देवुन त्यांना कामावर घ्यावे. आपल्याकडे मनपात कर्मचारी नाहीत. आपल्याकडे एकच इंजिनियर पाणी पुरवठा विभाग, बाधंकाम विभाग बघतो त्यामुळे त्यांना कामे सांगताना प्रश्न

पडतो. त्यामुळे आपल्याकडे पदोन्नतीच्या विषयांमध्ये सन्मा. सदस्य श्री. संजय जाधव यांचा चांगला अभ्यास आहे. आकृती बंधाचा हा जो विषय आहे. आत्ताच आपल्या धुळे मनपा शहर हद्दीत ११ गावांचा समावेश झालेनंतर आपला खर्च वाढलेला आहे. आणि जे काही कमी झालेले कर्मचारी आहेत.त्यांचा पगाराचा खर्च हा अस्थापना खर्चातुन कमी करुन घ्यावा. आपण आस्थापना खर्चा बाबत पर्याय काढला पाहिजे. धुळे शहर सुधारण्यासाठी कर्मचाऱ्यांची गरज आहे. म्हणुन हा विषय मंजुर करणेत यावा.

म. सुरेखा उगले — महापौर महोदय, धुळे मनपा कायम कर्मचाऱ्यांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी देणेबाबतच्या विषयास मंजुरी देणेत यावी. आज पावेतो महापालिकेचे कर्मचारी १५ ते २० वर्षापर्यंत एकाच पदावर कार्यरत आहेत. तसेच एक कर्मचारी ३ कर्मचाऱ्यांचे काम करत आहे. त्यामुळे सदरच्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळणार आहे. त्यामुळे सदरचा विषय मंजुर करुन शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा ही विनंती.

म. महापौर — धुळे महानगरपालिकेमार्फत शासनाकडेस मनपा साठी आवश्यक ती पदांचा आकृतीबंध मंजुर झालेला आहे.तथापी सदर आकृतीबंधात त्या पदांना असणारी वेतनश्रेणी नमुद नसल्याने पुनश्च: वेतन श्रेणी नमुद करुन शासनाकडेस प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. तसेच मंजुर सेवा प्रवेश नियमावली मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करावा लागणार आहे. यासाठी स्थायी समितीने विषय मान्यतेसह महासभेपुढे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाकडेस मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. तथापी सन्मा. सदस्यांना या विषयाबाबत परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत येईल. तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४० दिनांक २९/०६/२०१९

धुळे महानगरपालिकेमार्फत शासनाकडेस मनपा साठी आवश्यक ती पदांचा आकृतीबंध मंजुर झालेला आहे.तथापी सदर आकृतीबंधात त्या पदांना असणारी वेतनश्रेणी नमुद नसल्याने पुनश्च: वेतन श्रेणी नमुद करुन शासनाकडेस प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. तसेच मंजुर सेवा प्रवेश नियमावली मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करावा लागणार आहे. यासाठी स्थायी समितीने विषय मान्यतेसह महासभेपुढे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाकडेस मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे.

तथापी सन्मा.सदस्यांना या विषयाबाबत परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत येईल. तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ३२ — धुळे शहरात एलईडी पथदिवे बसविणेसाठी ईएसएल कंपनीशी करार करणेसाठी यापूर्वी झालेला ठरावाबाबत फेर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे — महापौर महोदय, हा जो ३२ क्रमांकाचा विषय आहे. एलईडी पथदिवे बसविणेबाबत अतिशय चांगला विषय शहराच्या दृष्टीकोणातुन आहे. शहराला गटार, रस्ते, पथदिवे याची गरज असते. म्हणुन हा विषय महत्वाचा आहे. पण माझी या विषयासंदर्भात महापौर साहेबांना विनंती की, जे विद्युत अभियंता आहेत त्यांना आपण बोलवावे या बाबतीत मला त्यांना विचारावयाचे आहे. हा जो विषय विषय पत्रिकेवर घेतला आहे. त्याबाबत मला माहीती हवी आहे.

म.विद्युत अभियंता — या बद्दल मी माहिती देवु इच्छितो. शासनाने १२ जानेवारी २०१८ नुसार आपल्याला ईएसएल कंपनीशी करार करायचा होता. त्यानंतर पुन्हा शासनाने जुन २०१८ ला एक शासन परिपत्रक काढले. त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका व महानगरपालिकांना ईएसएल कंपनीशी करार नामा करण्याचे आदेश दिले आहेत. याच्यामध्ये प्रथम महानगरपालिकांना ईएसएल कंपनीशी करारनामा केल्यानंतर आपण कंपनीला माहिती दिली. धुळे शहरात किती पोल, पथदिवे बसविलेले आहेत ही माहिती दिल्यानंतर मग आपण दिलेल्या माहितीवर ईएसएल कंपनी त्यावर कार्य करणार आहे.

म. प्रदिप कर्पे — ईएसएल ही जी कंपनी आहे. त्यांनी महाराष्ट्रातल्या बऱ्याच महापालिकां आणि नगरपालिकां मध्ये काम केले आहे. जळगाव महानगरपालिकेमध्ये ही या कंपनीने काम केले आहे. परंतु त्यांच्या कामाची जी पध्दत आहे ती अत्यंत चुकीची आहे यांचा अत्यंत वाईट अनुभव जळगाव महानगरपालिकेला आणि जनतेला आलेला आहे. तुम्हांला माहिती नसेल तर मी तुम्हांला पुर्ण जळगाव महानगरपालिकेची कागदोपत्री माहिती आपल्याला देतो. अत्यंत निकृष्ट काम त्यांनी तेथे केलेले आहे. पथदिव्यांमध्ये जे व्हॅट आहेत त्या एका व्हॅटची किंमत ८५ रु. लावलेली आहे. आणि बाजारात ब्रॅन्डेड एका व्हॅटची किंमत फक्त २० ते २५ रु आहे. एवढा तफावत असलेला विषय या कंपनीच्या करारनाम्यात आहे. त्याकरीता आपण अगोदर प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला पाहिजे. प्रोजेक्टरिपोर्ट तयार करुनच हा विषय महासभेसमोर सादर करा. आणि जळगाव महानगरपालिकेमध्ये ७० व्हॅटचे लाईट लावयचे तेथे ५० व्हॅटचे लाईट लावले त्यांनीही ईएसएल कंपनीशीच करार केलेला आहे. निकृष्ट दजा्रचे ब्रँनडेड नसलेल्या कंपनीचे लाईट लावले. हा खुप गंभीर विषय आहे या वरुन जळगाव महापालिकेत महासभेत यावरुन वाद ही झाला. आणि नगरपालिका संचालनालयाला त्यांनी तक्रार ही दिली तर आपण हा विषय विषयपत्रीकेवर आणन्यापेक्षा नगरपालिका संचालनालय मुबंई त्यांच्याकडुन या कंपनी विरुध्द कोणी कोणी तक्रारी केल्या आणि काय अडचणी आहेत त्याची माहिती आपण मागवीली तर बरे होईल. आपल्याला माहिती आहे. १ व्हॅट ८५ रु आणि २० ते २५ रुपये केवढी मोठी तफावत आहे. विचार करण्यासारखी बाब आहे. जर ७० व्हॅटचा लाईट लावला तर पाच हजारापर्यंत जावु शकतो. आणि लोकल कंपनीकडुन घेतला तर तो चौदाशे तर अठराशे पर्यंत जातो. असेच २००५ मध्ये आपण एका मायक्रोव्हिजल कंपनीशी असा करार केला होता. त्या कंपनीने देखील असे सांगीतले होते की आम्ही एनर्जी सेव्हींग करतो वैगरे तेव्हा चार झोन दिले होते त्याप्रमाणे आपण वीज बचत करत होतो. पण त्या कंपनीने आपल्याला असे खोटे दर्शवीले की प्रत्येक दिवशी २ तास एक झोन बंद असायचा म्हणजे दररोज २तास बंद असलेल्या एका झोन मध्ये तीच विज एनर्जी दाखवुन पैसे वसुल केले आणि त्याबाबत उच्चन्यायालयात आपली केस सुरु आहे. आणि उच्च न्यायालयाने आपल्याला नव्वद लाख रुपये भरायला सांगीतले आहे. पण त्यांनी त्यातुन ७५% रक्कम काढुन घेतली. त्यानंतर परत त्यांनी उच्च न्यायालयात सांगीतले की आम्हाला १८%व्याज पाहीजे. म्हणुन महानगरपालिका संचालनालयाला कडुन या कंपनीची पुर्ण माहिती घेवुन करार करणेत यावा. तरी सदरचा विषय योग्य त्या अटी व शर्ती नुसार मंजुर करणेत यावा.

म. शितल नवले — महापौर महोदय, या विषयामध्ये ही ईएसएल कंपनी शासनाची कंपनी आहे. पंतप्रधान साहेबांनी ही कंपनी स्थापन केली आहे. आपण अधिकारी लोक यांच्या पर्यंत पोहचण्यात कमी पडलो आहोत. ही कंपनी ४ मोठया कंपन्या म्हणजे पॉवर ग्रीड ऑफ इंडिया, एन.टी.पी.सी., आर.ए.सी, अजुन एक अश्या चार मोठया कंपन्या याचे ४९% खाजगी शेअर्स आणि ५१% शासकिय आहेत. आणि ही एक कंपनी या मुळे स्थापन केली होती की, आजआपण एनर्जी

इन्डस्ट्री मध्ये भारतात ते एल.ई.डी. पुर्ण भारतात बसविले गेले पाहिजे. एकाच कंपनीकडुन बसविले गेले पाहिजे. चांगल्या प्रतिच्या बसविल्या गेल्या पाहिजे. आणि आपल्याला यांना ७ ते ८ वर्षात पेमेंन्ट करावयाचे आहे. आणि ते सेव्हींग ऑफ पॉवर वर असणार आहे. परंतु आपले आधिकारी वर्ग पुर्ण माहीती घेत नाही. सभागृहात सांगत नाहीत. दुसरी गोष्ट अशी होती की, हे प्रोजेक्ट रिपोर्ट कधी तयार करतील ज्या अटी शर्ती आहेत की १५ मीटरचा रोड या इनिव्हेशन साठी इंडीयन लाईट कोड मध्ये जे काही अटी शर्ती दिल्या आहेत त्याप्रमाणे करतील त्यांच्या मर्जी प्रमाणे बसविणार नाहीत. ते इंडीयन लाईट कोड इनोव्हेशन पॉवर मध्ये ते लाईट बसविणार आहेत. यामध्ये दुसरी गोष्ट गव्हर्टमेंन्ट ने स्पेसिफीकेशन दिले आहे. तुम्ही तुमच्या १४व्या वित्त आयोगातुन आपण हप्ता भरु शकतो. समजा आपल्या कडुन हप्ता भरला नाही गेला तर तो आपण १४ व्या वित्त आयोगाच्या रकमेतुन भरु शकतो आणि जर कदाचीत आपण या कंपनीला करार नाही केला. समजा आपण हप्ता नाही भरु शकलो आपला आस्थापना खर्च वाढला आणि ८ वर्षांनी ते पैसे द्यावयाचे आहेत आपल्याला माझी सभागृहाला विनंती आहे. की विषयाची पुर्ण माहिती घ्यावी. ती माहिती माझ्या कडे उपलब्ध आहे. हा कररा रद्द करण्याची घाई करु नका. आपण जर खाजगी कंपनीला हा करार केला तर आपण १४ व्या वित्त आयोगाचे पैसे वापरु शकत नाहीत ते मनपा फंडातुनच द्यावे लागतील आणि याची कुठलीही गॅरेन्टी नाही की प्रायव्हटे कंपनी आपली एनर्जी सेव्हींग करेल. कमीत —कमी ही शासकीय कंपनी आहे यांना आपण लेखी माहिती विचारु शकतो. प्रोजक्ट रिपोर्ट मध्ये असे म्हटले आहे की, ज्या वेळेस तुम्ही करार नामा करणार त्या वेळेस ते ठरवतील किती लाईट बदल करणार आहोत किती तुमचे एल.ई.डी आहेत रोडच्या हिशोबाने इतके लाईट बसविणार आहेत. त्यानंतर पुढची प्रोसेस ठरविली जाणार आहे. जर आपल्याकडे सर्वेच नाही की आपल्याकडे किती एल.ई.डी आहेत शहरामध्ये किंवा आपले रोड कीती मीटरचे आहेत. याची माहिती दिल्यानंतर ते प्राजेक्ट रिपोर्ट देतील पण जर तुम्ही करारनामाच करणार नाहीत तर ते प्रोजेक्ट रिपोर्ट कसे तयार करतील. ठीक आहे जर प्रोजेक्ट रिपोर्ट आल्यानंतर तो योग्य वाटत नसेल तर एखादी सल्लागार एजन्सी नेमुन जर आपले खरच नुकसान होते आहे किंवा नाही यावर जर काम केले तर आपण पण शासनाला कळवु शकतो की तुम्ही चुकीची कंपनी सुचविली आहे असे सांगु शकतो म्हणुन अभ्यास करुन प्रस्ताव सादर करावा आणि हा विषय मंजुर करणेत यावा.

म. अमोल मासुळे महापौर महोदय, जो ईएसएल कंपनीचा विषय घेण्यात आलेला आहे. गेल्या महासभेत आपण या विषयाचा ठराव करुन शासनाला पाठविला होता. परंतु तुमच्या पत्रानुसार या ठिकाणी फेर विचार करण्यासाठी हा विषय महासभेपुढे घेण्यात आलेला आहे. मी या विषयासंदर्भात आपले विद्युत अभियंता यांचे कडुन अनेक वेळा पाठपुराव केलेला आहे. ईएसएल कंपनी ठराव झालाय त्या संदर्भात काय झाले. तेव्हा बागुल साहेबांनी वारंवार एकाच प्रकारचे उत्तर दिलेले आहे. तत्कालीन आयुक्त श्री. सुधाकरजी देशमुख साहेबांनी देखील पाठपुरावा केला होता त्यांनी सांगीतले या चर्चा करा पण त्यांनी कुठलेही पॉझीटीव उत्तर या ठिकाणी दिलेली नाही. महापौर महोदय सन्मा. सदस्य कर्पे साहेबांनी जळगाव महापालिकेत जी समस्या आहे एलईडी लाईट संदर्भात ती ईएसएल कंपनी मार्फतच या एलईडी बसविण्यात आल्या आहेत. पण त्या ठिकाणी आमचे जे सन्मा. नगरसेवक मित्र आहेत त्यांच्याकडुन अतिशय निकृष्ट दजा्रची लाईट तेथे वापरली आहेत. त्याचप्रमाणे नाशिक महापालिकेतही ईएसएल कंपनी मार्फतच कामे करण्यात आली आहेत. त्या महापालिकेत संपुर्ण नगरसेवकांनी ठराव करुन ईएसएल कंपनी मार्फत तक्रार केलेली आहे. आपण महापालिकेत करोडो रुपये खर्च करुन या ठिकाणी

टेंडर काढुन लाईटांचे काम आपण करुन घेतोय. पुन्हा आपण तेच कराव आपल्याला आता अनुभव येत आहेत शेजारील जिल्ह्यातील महापालिकांचे तर आपण अधिकारी वर्ग बसुन चर्चा करुन निर्णय घेवुन आपण जर ईएसएल कंपनी पेक्षा बाहेर टेंडर काढले तर आपल्याला कायमस्वरुपी मुक्तता होईल अशी मी विनंती करतो.

म. नागसेन बोरसे महापौर महोदय,आपण हा जो १३ हजार लाईटांचा सर्वे केला आहे तो फक्त शहराचा आहे का?

म. विद्युत अभियंता हद्दवाढ होण्या पुर्वीचा आहे.

म. नागसेन बोरसे ज्या नवीन वसाहती झाल्या आहेत. त्या ठिकाणी लाईट नाहीत मग त्या ठिकाणी आपण पोल बसविणार आहेत की काय त्याची माहिती सांगा.

म. विद्युत अभियंता नविन वसाहती आहेत त्या ठिकाणी पोल नाहीत त्यासाठी आपण शासनाकडे निधीची मागणी करणार आहोत त्याचा सर्वे सुरु आहे.

म. नागसेन बोरसे ईएसएल कंपनीचा ठराव करु परंतु अस्तित्वात असलेल्या पोलवरच लाईट बसवुन देणार आहेत. नविन वसाहतीत आपल्याला अजुन पथदिवे बसवायचे आहेत. त्याठीकाणी मग पालिकेच्या माध्यमातुन आपण काही करु शकतो का?

म. विद्युत अभियंता आपण निधीची मागणी करणार आहोत त्यातुन आपण करु शकतो.

म. महापौर मा.जिल्हाधिकारी साहेबांशी माझी सविस्तर चर्चा झाली आहे. सदर विषयाबाबत जिल्हाधिकारी साहेब सभागृहाला माहिती देतील.

म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळे.

सन्मा. सभागृहाला मी माहिती देवु इच्छितो. ईएसएल कंपनी ही शासनाची कंपनी आहे. आणि संपुर्ण राज्यात नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये त्यांचे काम सुरु झाले आहे. महाराष्ट्रातील २७ महानगरपालिकांपैकी १९ महानगरपालिकांमध्ये त्यांचे काम यापुर्वीच झालेले आहे. या कंपनीची जी पॉलीसी आहे आपण टिपणी मधील २१ मुद्दे वाचले तर लक्षात येईल. पहिली गोष्ट एलईडी वरील खर्च संपुर्ण पणे निघुन जाईल, दुसरे म्हणजे या लाईटचे मेंन्टेन करणेसाठी जेवढा स्टाफ आणि जेवढी शक्ती खर्च करतो ती सगळी निघुन जाईल.एक एलईडी लाईट बसविल्यानंतर तो किमान पाच वर्ष गॅरेंटीचा राहतो. आपल्याला पाच वर्ष बघावे लागणार नाही. म्हणजे शहरातील स्ट्रीट लाईटविषयी जेवढी तक्रार आहे ती सर्व निघुन जाईल आणि तिसरे म्हणजे या लाईट दुरुस्ती साठी जे काही छोटे मोठे वायरींग साहित्य लागते. चौथी गोष्ट स्ट्रीट लाईच्याबीलामध्ये बचत होणार आहे. कंपनी अॅग्रीमेंन्ट मध्येच सांगते की, ५० टक्के बचत आम्ही शंभर टक्के करुन देवु त्यामुळे स्ट्रीटलाईट च्या बीलाची बचत होईल. आपण जर २०१७-१८ चा आकडा बघीतला तर शहराच्या हद्दीसाठी दिलेला आहे. तर तो ३.५० कोटी आहे. म्हणजे आपण जर दर वर्षी १.७५ कोटी जर वाचवतच आहोत. त्यानंतर आपण जर खाजगी निवीदा काढुन जर लाईट लावुन घेतले तर सिस्टम सुरु झाल्या नंतर आपल्याला त्याला पुर्ण पेमेंन्ट द्यावे लागेल. जी खुप मोठी रक्कम असेल जी कदाचीत पेलवनार सुध्दा नाही एकाच वर्षामध्ये पेमेंन्ट करण्यासाठी मग नंतर उपाय येईल की टप्या-टप्याने लावु मग टप्या-टप्याने लावण्यात यात पहिले, दुसरे मग याला खुपच उशीर झाला महापालिकेची आर्थिक स्थिती खराब झाली तर कदाचीत काही भाग राहुनही जाईल. मग परत शहरामध्ये असंतोष निर्माण होईल. त्यापेक्षा या कंपनीची जी पॉलीसी आहे ती चांगली आहे. म्हणजे टप्या-टप्याने पेमेंन्ट द्या संपुर्ण सात वर्षाचे लाईट लावणे खराब झालेला लाईट रिप्लेस करणे, दुरुस्ती करणे त्यासाठी जे काही साहित्य लागेल ते पुरवीणे या सगळया गोष्टी त्यांच्याकडेच आहेत. त्यामुळे आपली फार मोठी बचत या कंपनी कडुन होणार आहे. आर्थिक दृष्टी पण एकदमच लोड महापालिकेवर येणार नाही. याची सुध्दा या मध्ये तरतुद करणेत आली आहे. त्यामुळे या कंपनी

सोबत जसे आता सांगण्यात आले की शासनाने आदेशच आहेत की ते बंधनकार करणेत आलेले आहे. त्यामुळे या कंपनीशी करार करण्याने धोका महापालिकेला निश्चितच नाही. आपल्याला हे सांगणे ही मला महात्वाचे वाटते की, एलईडी लाईट हो दिसतो तेवढा साधा, सोपा, सरळ विषय नाहीय आपण बाजारात जर का २०व्हॅट चा लाईट जरी खरेदी करायचा म्हटला तर ७ ते ८ प्रतीचे लाईट तुम्हांला दाखविण्यात येतात. एक लाईच्या किंमतीपेक्षा ७-८ प्रतीने जास्त किंमतीचा लाईट सुध्दा तुम्हांला भेटेल त्यामुळे या सगळया लाईचे सर्टिफिकेशन आणि आपल्याला जो लाईट पुरवीतो तो योग्य दर्जाच्या योग्य प्रतिचा आहे किंवा नाही ही गोष्ट आपल्या महापालिकेसाठी तपासने अतिशय महत्वाचे आहे. खात्रीचे लाईट बसविले असतील तरच योग्य असते अन्यथा एका लाईटसाठी आपण मागे जाऊ शकत नाही. एखादया सफ्लायर्स ने जर १०-१५ लाईट जर असेच कमी प्रतिचे लावुन दिले तर ते आपल्याला कळणार सुध्दा नाही. पंरतु ही शासनाची कंपनी असल्यामुळे यांच्याकडुन अशी काही गोष्ट होण्याची मुळीच शक्यता नाही. यामध्ये अजुन महत्वाची गोष्ट म्हणजे शहरांमध्ये अनावश्यक मोठे –मोठे लाईट्स भरपुर ठिकाणी लावलेले असतात. छोटया-छोट्या चौकांमध्ये २०० ते २५० व्हॅट चे लाईट लावलेले असतात. हे महापालिकेचे खरे नुकसान आहे. आपण मोठा लाईटलावणेसाठी पण खुप खर्च करतो आणि त्या नंतर लाईटचे बील भरण्यासाठी पण खुप खर्च करतो. आणि या लाईट्स ला काही उनाडटप्पु मुले दगड मारुन फोडतात मग आपल्याला ते परत रिप्लेस करावे लागतात. परंतु या मध्ये इंन्शुरन्स सुध्दा या लाईटचा या कंपनीने काढला आहे. त्यामुळे त्याचा जो काही खर्च आहे तो समजा एखादा लाईट फुटला किंवा फोडला वादळवाऱ्यांने पडला यामुळे जो काही खर्च येणार आहे तो सुध्दा महापालिकेला येणार नाही तो इन्शुरन्स काढल्यामुळे इन्शुरन्स कंपनी ते देणार आहे. बऱ्याच वेळेस लाईट चोरीला पण जातात तर चोरीचा विषय पण आपला यातुन वगळला जातो. म्हणजे अनेक गोष्टींने जरी बघीतल तरी यातील तरतुदी आपल्या महापालिकेच्या फायद्याच्या आहेत. त्यामुळे मा. महापौर यांनी निवीदेच्या सुचनेप्रमाणे या एजन्सीचे जे मॅनेजर आहेत त्यांच्याशी पण चर्चा झाली आहेत ते स्वत: पण येथे यायला आणि नगरसेवकांचे आणि पदाधिकाऱ्यांचे समाधान करण्याची पण त्यांची तयारी आहे. या टिपणी मध्ये १ ते २१ मुद्दे नमुद आहे. त्यात कंपनीने काय काय करायचे आहे ते महत्वाचे आहे. मा. महापौर साहेबांची वेळ घेवुन मी त्यांना बोलावुन घेईल त्यांच्याशी परत या विषयी एकदा सवीस्तर चर्चा करु. महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी मला पुर्ण पणे आहे. परंतु अधिक चांगल्या पध्दतीने एकदा चर्चा करुन, समाधान करुन आपल्याल हा करार करुन घ्यायचा आहे. आणि ही प्रक्रिया सुरु करणेत यावी अशी मान्यता सभागृहाने द्यावी अशी मी विनंती करतो.

म. महापौर

धुळे महानगरपालिकेमार्फत संपुर्ण शहरात एल.ई.डी पथदिवे बसविणेसाठी ई.एस.एल कंपनीशी करारनामा करणे बाबत यापुर्वी ठराव पारित करणेत आलेला होता. सदर संस्थेस एकुण १८ कोटी रुपये सात वर्षाच्या कालावधीत हपत्याने द्यावयाची आहे. सदर कंपनी ही शासनामार्फत निश्चित झालेली असुन विज बचतीच्या होणाऱ्या रकमेतुन सदर खर्च करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.तथापी सदर कंपनीने अद्यापपावेतो करारनामा केलेला नाही. तसेच सदर कंपनीने इतर महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात केलेल्या कामांचा आढावा घेतला असता सदर कंपनीचे काम असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच इतर कंपनींच्या दराचा तुलनात्मक विचार करता सदर कंपनीचे दर व अटी शर्ती मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने योग्य वाटत नसल्याने सदर प्रस्तावाबाबत फेर विचार करणेसाठी सदर प्रस्ताव सभा पटलावर आलेला आहे. तथापि याबाबत मा.जिल्हाधिकारी सो., तथा आयुक्त यांनी

दिलेल्या माहितीनुसार याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असल्याने पुनश्च: संबंधीत कंपनीच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन माहिती घेतली असता ईईएसएल कंपनी कडून सप्लाय मोडवर प्रस्ताव मागविण्यांस या कंपनीच्या मानांकनाप्रमाणे एलईडी पथदिवे घेणे व मनपा स्तरावर बसविणे बाबतचा पर्याय उपलब्ध आहे या अनुषंगाने ईईएसएल कंपनीशी निगोसिएशन करुन मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने उचित व आवश्यक अटी शर्ती नुसार निर्णय घेवून ईईएसएल कंपनीशी तांतडीने करारनामा करणेस मान्यता देण्यांत येत आहे. यानुसार ईईएसएल कंपनी कडून सप्लाय मोडवर एलईडी पथदिवे घेणे व या करिता इईएसएल कंपनली कडून आवश्यक सर्वेक्षण करुन घेणे व मनपा स्तरावर विभागात कंत्राटदार नेमणेकरिता रेट कॉन्ट्रक्ट, तसेच शहरातील स्ट्रीट लाईट संरचनेत आवश्यक सुधारणा करणे टाईमर बसविणेची कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.सदरच्या कामात मनपा हद्दवाढ क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रात एलईडी पथदिवे बसविणेकरिता पुढील कार्यालयीन कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.तसेच अनावश्यक विज कनेक्शन (मिटर)बंद करण्यांत यावेत.तसेच विज कनेक्शनची संख्या कमी करणे व कनेक्शन मनपाच्या नावावर करणे याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४१ दिनांक २९/०६/२०१९

धुळे महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. पथदिवे बसविण्याकरीता ई.ई.एस.एल.या कंपनीशी करारनामा करण्याऐवजी जाहीर ई- निविदा कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव करणेचे निर्देष आहे.याबाबत सविस्तर निवेदनही करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/ प्र.क्र./१८३/न.वि.-२० दिनांक १२ जानेवारी २०१८ नुसार नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थांनी एलईडी पथदिवे बसविण्यासाठी वैशिष्टपुर्ण योजना किंवा अन्य योजनेतून खर्च न करणेबाबत निर्देश आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/प्र.क्र./१८३/न.वि.-२० दिनांक ४ जुन २०१८नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ऊर्जा बचतीसाठी एल.ई.डी. पथदिवे बसविणेसाठी ई.ई.एस.एल. कंपनीशी करारनामा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात ई.ई.एस.एल.कंपनीच्या माध्यमातून इस्क्रो तत्वावर एल.ई.डी.पथदिवे बसविणेसाठी राज्य शासनाने करारनामा केलेला आहे. त्याअनुंषगाने महानगरपालिका क्षेत्रात जुने पथदिवे काढून नविन पथदिवे बसविणेकरीता ई.ई. एस.एल. कंपनीशी करारनामा करणेबाबत प्रस्तावित करणेत आलेले होते.

सदरील प्रस्ताव शासन निर्देशाप्रमाणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नियमाप्रमाणे महानगरपालिका मे.महासभेकडे सादर करणेत आला असता, महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. पथदिवे बसविणे व त्याकरीता ई.ई.एस.एल.कंपनीशी करारनामा करणे करीता महानगरपालिका ठराव नं.१२५ दिनांक २७/०८/२०१८ नुसार मान्यता देण्यात आली होती.या संदर्भात इतर महानगरपालिकांमध्ये सदर कंपनीच्या कामाबाबत चौकशी केली असता कंपनीच्या कामाबाबत असमाधान व्यक्त केल्याने मा. महापौर साहेब यांच्या दिनांक 10/6/2019 च्या पत्रानुसार धुळे शहरात एलईडी पथदिवे बसविण्यासाठी ईईएसएल कंपनी ऐवजी खुली निविदा मागविणेसाठी फेर विचार करणेबाबत मे. महासभेत प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व म.आयुक्त यांचा अभिप्राय लक्षात घेता धुळे महानगरपालिकेमार्फत संपुर्ण शहरात एल.ई.डी पथदिवे बसविणेसाठी ई.एस.एल कंपनीशी करारनामा करणे बाबत यापुर्वी ठराव पारित करणेत आलेला होता. सदर संस्थेस एकुण १८ कोटी रुपये सात वर्षाच्या कालावधीत हपत्याने द्यावयाची आहे. सदर कंपनी ही शासनामार्फत

निश्चित झालेली असुन विज बचतीच्या होणाऱ्या रकमेतुन सदर खर्च करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.तथापी सदर कंपनीने अद्यापपावेतो करारनामा केलेला नाही. तसेच सदर कंपनीने इतर महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात केलेल्या कामांचा आढावा घेतला असता सदर कंपनीचे काम असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच इतर कंपनींच्या दराचा तुलनात्मक विचार करता सदर कंपनीचे दर व अटी शर्ती मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने योग्य वाटत नसल्याने सदर प्रस्तावाबाबत फेर विचार करणेसाठी सदर प्रस्ताव सभा पटलावर आलेला आहे. तथापि याबाबत मा.जिल्हाधिकारी सो.,तथा आयुक्त यांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असल्याने पुनश्च: संबंधीत कंपनीच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन माहिती घेतली असता ईईएसएल कंपनी कडून सप्लाय मोडवर प्रस्ताव मागविण्यांस या कंपनीच्या मानांकनाप्रमाणे एलईडी पथदिवे घेणे व मनपा स्तरावर बसविणे बाबतचा पर्याय उपलब्ध आहे या अनुषंगाने ईईएसएल कंपनीशी निगोसिएशन करुन मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने उचित व आवश्यक अटी शर्ती नुसार निर्णय घेवून ईईएसएल कंपनीशी तांतडीने करारनामा करणेस मान्यता देण्यांत येत आहे. यानुसार ईईएसएल कंपनी कडून सप्लाय मोडवर एलईडी पथदिवे घेणे व या करिता ईईएसएल कंपनली कडून आवश्यक सर्वेक्षण करुन घेणे व मनपा स्तरावर विभागात कंत्राटदार नेमणेकरिता रेट कॉन्ट्रक्ट करणे, तसेच शहरातील स्ट्रीट लाईट संरचनेत आवश्यक सुधारणा करणे टाईमर बसविणेची कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.सदरच्या कामात मनपा हद्दवाढ क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रात एलईडी पथदिवे बसविणेकरिता पुढील कार्यालयीन कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यात येत आहे. तसेचअनावश्यक विज कनेक्शन (मिटर) बंद करण्यांत यावेत.तसेच विज कनेक्शनची संख्या कमी करणे व कनेक्शन मनपाच्या नावावर करणे याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ३३ म.महापौर सो यांच्या पत्रानुसार धुळे मनपाची अत्याधुनिक जीम उभारणे बाबतचा प्रस्तावावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रदीप कर्पे प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

म. महापौर मनपाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी तसेच कामकाजात गतिमानता यावी यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांचे शारिरीक आरोग्य सुस्थितीत राहणे आवश्यक आहे. यापुर्वी नगरपालिका असतांना सन मध्ये नगरपालिका अधिकारी कर्मचारी व पदाधिकारी यांचे क्रिडा मंडळ स्थापन केलेले असुन त्यामार्फत विविध उपक्रम राबविले जात असल्याचे मनपा दत्परी नोंद आहे. त्याच धर्तीवर सध्याच्या धावपळीच्या युगात शारिरीक क्षमता वाढावी यासाठी पदाधिकारी, नगरसेवक तसेच अधिकारी कर्मचारी यांचेसाठी धुळे महानगरपालिकेच्या नुतन प्रशासकिय इमारतीच्या वरील भागात अत्याधुनिक जिम प्रस्तावित करण्यास तसेच मनपा मालकिच्या जागेत बंदीस्त खेळाचे मैदान (TURF GROUND) मान्यता देण्यात येत असुन येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व शासकीय मान्यता देण्यात येत आहे. याबाबत सन 19-20 च्या अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत यावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४२ दिनांक २९/०६/२०१९

तत्कालीन धुळे नगरपालिका अस्तित्वात असतांना पदाधिकारी,नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता स्पोर्ट क्लब व जीम अस्तित्वात असल्याचे जुन्या अभिलेखात नोंद असल्याचे दिसून येते.

अधिकारी व कर्मचारी यांची कार्यक्षमता वाढावी तसेच आंनदी व निरोगी आयुष्यमान रहावे यासाठी व्यायामाची आवश्यकता आहे.धुळे मनपा मालकीची जीम तयार झाल्यास यात पदाधिकारी,अधिकारी व कर्मचारी यांना मोठा फायदा होणार आहे.

त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिकेच्या नूतन प्रशासकीयइमारतीच्या वरील भागात किंवा मनपा मालकीच्या अन्यत्र जागेत अत्याधुनिक जीम करावयाची आहे.यासाठी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मनपा मालकिच्या जागेत बंदीस्त खेळाचे मैदान (TURF GROUND) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी आर्किटेक नियुक्ती व अनुषंगिक कार्यवाही प्रशासनाने करावी व याबाबत सन 2019-20 च्या अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ३४ म.महापौर सो यांच्या पत्रानुसार धुळे मनपामार्फत सामाजिक भुवन उभारणेबाबतचा प्रस्तावावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले महापौर महोदय, आपल्या प्रभागात सामाजिक भुवन उभारत असतांना आमच्या प्रभागाचा ही विचार करणेत यावा. आमच्या कडे मनपा २८ नं शाळेत खुप मोठी जागा उपलब्ध आहे. त्याठीकाणी ही सामाजिक भुवन उभारण्यात यावे ही विनंती.

म. महापौर धुळे महानगरपालिका मालकीच्या नवी भिलाटी व एकविरा देवी बगीचा मधील असलेल्या मनपा मालकीच्या जागेत सामाजिक भवन उभारण्याबाबत प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे. सदर भाग हा अल्प उत्पन्न गटातील नागरींकाच्या संमिश्र वस्तीचा भाग आहे. सदर भागातील नागरीकांच्या सोयी साठी समाजिक भवनांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे त्या भागातील नागरीकांना फार मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी समाजिक भवन बांधण्यास व संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या बाबत म.नगररचनाकार यांनी जागेची स्थिती, क्षेत्र व जागेचा नकाशा तयार करणे संदर्भात तातडीने कार्यवाही करावी. याबाबत सन 19-20 च्या अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत यावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४३ दिनांक २९/०६/२०१९

धुळे शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता तसेच जुने धुळे भागातील सामाजिक भुवनाची संख्या विचारात घेता त्याचप्रमाणे जुने धुळे भागातील नागरीकांना विविध धार्मिक, सामाजिक,वैचारीक कार्यक्रम घेण्यासाठी सामाजिक भुवनांची निर्मिती करण्याची नितांत आवश्यकता व गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने १) श्री. एकविरा देवी मंदीराजवळील बगिच्या मधील मोकळया जागेत.२) नवी भिलाटी जवळ असलेल्या मनपा मालकीच्या जागेत ३) मनपा शाळा नं. २८ मध्ये अनुज्ञेय असलेल्या जागेत 4) जयशंकर नगर चाळीगसांवरोड परिसर 5) नटराज टॉकीज

परिसर या ठिकाणी असलेल्या मनपा मालकीच्या जागेत सामाजिक भूवन बांधण्याच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्यांनी सूचविलेल्या अन्य जागांबाबतही तपासणी करुन त्याठिकाणीही सामाजिक भूवन बांधण्यांच्या कामाबाबत प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ३५ मा. महापौर सो . यांच्या पत्रानुसार महापौर व आयुक्त निवास स्थान उभारणेकामी आलेल्या प्रस्तावावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे महापौर महोदय, महापौर निवास आणि आयुक्त निवास हा खुप महत्वाचा विषय होता. परंतु खुप उशिरा हा विषय विषयपत्रीकेवर घेणेत आला असे मला वाटते. मी २०१३ मध्ये शेवटच्या महासभेत एक पत्र दिले होते. की, जसे नाशिक महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पिप्रीं चिंचवड महानगरपालिका जेवढ्या महानगरपालिका आहेत त्या सर्व महानगरपालिंकामध्ये निळ्या बोर्डवर नगरसेवकांच्या निवासस्थानाकडे जाण्याचा मार्ग तसेच महापौर निवासाकडे जाण्याचा मार्ग असे फलक लावलेले आहेत.त्यामुळे नागरीकांना अडचणी येत नाहीत. आपल्याही महानगरपालिके मार्फत असे फलक लावावेत अशी माझी सुचना आहे.

म. महापौर आयुक्त यांचे साठी सद्यस्थितीत मयुर कॉलनीत असलेल्या बगीचा मध्ये निवासस्थान आहे. सदर निवासस्थान रहिवास दृष्टया अपुरे व अयोग्य आहे. आयुक्त हे अन्य शहरांमधुन बदली होवुन येत असतात.त्यांच्या साठी महानगरपालिका मालकीचे स्वतंत्र निवास स्थानाची व्यवस्था कायमस्वरुपी असणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या मा. महापौर सो., (पदसिध्द) यांचे साठी देखील अन्य महानगरपालिका क्षेत्रात निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. त्यासाठी धुळे महानगरपालिकेमार्फत देवपुर नवरंग जलकुंभा जवळील मनपाच्या आराक्षीत जागेत तसेच फायनल प्लॉट नं.१५३ मधील असलेल्या मनपा मालकीच्या जागेत आयुक्त व महापौर यांचेसाठी निवासस्थान बांधणे व संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. या बाबत म. नगररचनाकार यांनी जागेची स्थिती, क्षेत्र व जागेचा नकाशा तयार करणे संदर्भात तातडीने कार्यवाही करावी. व यासाठी खाजगी वास्तुतज्ञ यश आर्कीटेक व इंटेरीअर प्रो.रश्मी आनंद जोशी धुळे यांची वास्तुतज्ञ म्हणुन नियुक्ती करण्यास तसेच शासना कडील दि. ०४/०६/२०१८ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व अन्य अनुज्ञेय फी अदा करण्यास व अन्य आवश्यक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.याबाबत सन 19-20च्या अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत यावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४४ दिनांक २९/०६/२०१९

मा.महापौर व मा.आयुक्त यांचेकरिता बहुतांशी महानगरपालिकेमध्ये स्वमालकीच्या जागेत निवास स्थान बांधण्यांत आलेली आहेत.आयुक्त हे अन्य शहरातून नियुक्त होत असतात. त्यांच्यासाठी निवास स्थान नसल्याने अडचणी निर्माण होतात.

त्यामुळे कायम स्वरुपी मा. महापौर व मा.आयुक्त यांचेकरिता निवासस्थान होणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत नवरंग जलकुंभाजवळील देवपूर स.नं. 28 येथे मंजूर विकास योजना आराखडयात आयुक्त यांचे निवासस्थानासाठी जागा आरक्षित आहेत व धुळे फायनल प्लॉट नं. 153 येथे मनपा मालकीची जागा असून सदर जागेत मा. महापौर निवास स्थान बांधणेसाठी

सदरच्या प्रस्ताव आर्थिक व प्रशसकीय मान्यतेस्तव मे.महासभेच्या विषय पटलावर सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावाचा विचार करता आयुक्त यांचे साठी सद्यस्थितीत मयुर कॉलनीत असलेल्या बगीचा मध्ये निवासस्थान आहे.सदर निवासस्थान रहिवास दृष्टया अपुरे व अयोग्य आहे.आयुक्त हेअन्य शहरांमधुन बदली होवुन येत असतात.त्यांच्यासाठी महानगरपालिका मालकीचे स्वतंत्र निवास स्थानाची व्यवस्था कायमस्वरुपी असणे आवश्यक आहे.तसेच महानगरपालिकेच्या मा.महापौर सो.,(पदसिध्द) यांचे साठी देखील अन्य महानगरपालिका क्षेत्रात निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. त्यासाठी धुळे महानगरपालिकेमार्फत देवपुर नवरंग जलकुंभा जवळील मनपाच्या आराक्षीत जागेत तसेच फायनल प्लॉट नं.१५३ मधील असलेल्या मनपा मालकीच्या जागेत आयुक्त व महापौर यांचेसाठी निवासस्थान बांधणे व संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. या बाबत म. नगररचनाकार यांनी जागेची स्थिती,क्षेत्र व जागेचा नकाशा तयार करणे संदर्भात तातडीने कार्यवाही करावी. व यासाठी खाजगी वास्तुतज्ञ यश आर्कीटेक व इंटेरीअर प्रो. रश्मी आनंद जोशी धुळे यांची वास्तुतज्ञ म्हणुन नियुक्ती करण्यास तसेच शासनाकडील दि.०४/०६/२०१८च्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व अन्य अनुज्ञेय फी अदा करण्यास व अन्य आवश्यककार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.याबाबत सन19-20 च्या अंदाज पत्रकात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ३६

मा. महापौर सो., मनपा धुळे यांचेकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ मधील नियम क्र. १(ज) च्या तरतुदीनुसार मनपा शाळा नं.५ येथे बीओटी तत्वावर अथवा मनपा मार्फत व्यापारी संकुल उभारणेकामी विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव

म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे

महापौर महोदय, विषय क्रमांक ३६ हा विषया आपल्या पत्रानुसार घेण्यात आलेला आहे. महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढले पाहिजे या अनुषंगाने आपण यात शिथील जागा व्यापारी संकुलासाठी मंजुर करणेसाठी हा विषय आलेला आहे. महापौर साहेब आपले लक्ष वेधु इच्छितो की, आपण मागे शाळा क्रमांक २१ आणि २२ या ठिकाणी व्यापारी संकुल उभारलेले आहे. आणि आजच्या स्थितीत ते कार्यरत आहे. तसेच आपण उत्पन्न वाढावे या उद्देशाने ५ नं शाळेतही व्यापारी संकुल उभारणेबाबत विषय मांडलेला आहे. मला या ठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे की, शाळा क्रमांक २१ आणि २३ या १०० वर्षांपुर्वीच्या शाळा असतांना शासनाच्या नियमांचे पायमल्ली करुन तेथे व्यापारी संकुल उभारले. पवनपुत्र व्यायाम शाळेजवळच्या २३ नं च्या शाळेच्या अनुषंगानेच माझा प्रश्न आहे. सदरची शाळा मी शिक्षण मंडळ सदस्य असतांना मी मनपाच्या शिक्षण मंडळ सदस्यांना पहिल्याच शिक्षण मंडळाच्या सभेमध्ये विषय मांडला होता की, शाळेचे व्यापारी करण व्हायला नको. पुरातत्व विभागाची १०० वर्षापुर्वीची दगडी शाळा जर असेल त्याला कुठलेही आपण व्यापारी संकुल करु शकत नाही. परंतु ते देखील झालेले आहे. व्यापारी संकुल उभारुन आपला उद्देश जरी चांगला असेल मग बीओटी तत्वावर न करता मनपाकडुनच जर व्यापारी संकुल उभारले आपल्या उत्पन्नात वाढ होईल. आपण मनोहर टॉकीजच्या समोर असलेल्या जागेत जे व्यापारी संकुल केले आहे. त्यातुन मनपाला किती उत्पन्न मिळते याचा देखील आपण विचार केला पाहिजे. आपण दोन ठिकाणी जे व्यापारी संकुल उभारलेले आहे. मनपाच्या मध्यवर्ती ठिकाणच्या त्या जागा आहेत.

येणाऱ्या काळामध्ये जर आपल्याला महानगरपालिकेच्या प्रभाग समित्या नेमण्याची वेळ आली तर त्यासाठी आपल्याला महत्वाच्या जागा उपलब्ध होणार नाहीत. आपला उद्देश जरी चांगला आहे पालिकेचे उत्पन्न वाढीचे बाबत आहे. माझा याला विरोध नाही. परंतु आपण हे सर्व करत असतांना आपली मनपा च्या वेळेस अ वर्ग ब वगा्रत ज्या वेळेस येईल आपल्याला प्रभाग समित्या नेमणे क्रमप्राप्त राहील. आणि प्रभाग समित्या नेमत असतांना त्यांना काया्रलय अत्यावश्यक असतात. आणि त्यावेळेस आपल्याला ज्या मध्यवर्ती जागा आहेत त्या अनुषंगाने व्यापारी संकुल करावे.

म. हर्षकुमार रेलन — महापौर महोदय, आपण जी शाळा बंद करुन व्यापारी संकुल उभारत आहात.

म. महापौर — शाळा बंदच आहेत. मनपाच्या कोणत्याच शाळा सुरु नाहीत.

म. हर्षकुमार रेलन — बंद शाळेमध्ये ज्या ठीकाणी आपण व्यापारी संकुल उभारणार आहोत. तर माझे असे मत आहे की शिक्षण ही फारच गरजेची गोष्ट आहे. गरीब लोकांना कुठल्याही चांगल्या शाळेत प्रवेश घेता येत नाही. मिळत नाहीत, किंवा त्यांना ते पेलवत नाहीत. शिक्षण महाग झालेले आहे. आपण त्यांना पालिकेमार्फत मोफत शिक्षण देतो. परंतु तेथे विद्यार्थी तेथे येत नाहीत किंवा आपण तेथे तसे इन्व्हासट्रक्चर डेव्हलप केलेले नाही. शाळा का बंदपडल्याय कारण आपण तेथे कुठल्याही प्रकारचे नियोजन केलेले नाही. विद्यार्थी येवु शकतील, बसु शकतील आपण अशी परिस्थिती निर्माण केली आहे की तेथे विद्यार्थी यायलाच नको म्हणुन आपल्याला माझी एकच विनंती आहे.जर आपल्याला ते संकुल उभारायचे असेल तर ते उभारु पण विद्यार्थ्यांसाठी सुध्दा जागा शिल्लक ठेवली पाहिजे. जेणेकरुन गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल अशी सुविधा आपण तेथे निर्माण करुन शाळेची जितक्या स्क्वेअर फुट जागा आहे तेवढी जागा शाळेकरीता आरक्षित ठेवुन बाकीच्या जागेवर संकुल बांधावे अशी माझी विनंती आहे.

म. शितल नवले — आपण आज विषय क्रमांक ३६ वरती चर्चा करण्यासाठी वरील विषय महासभेपूढे आणला असून त्याबाबत माझे म्हणणे असे आहे. महोदय शाळा क्रमांक 5 ही अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे.सदर जागा ही सिटि सर्वे क्रमांक 14 प्लॉट नं. 2998 असून त्याचे क्षेत्रफळ 1924.8 इतके चौरस मीटर (20710 चौरस फूट). महोदय वरील जागेवर बांधकामाचे रेडी रेकनर प्रमाणे 84840/- प्रति चौरस मीटर इतका दर आहे व बाजार मूल्यांकन याप्रमाणे अंदाजे 120000/- प्रति चौरस मीटर इतका दर आहे. महोदय वरील जागेवरती नवीन बांधकाम नियमावली नुसार २ इतका FSI वापरू शकतो व महापालिकेच्या विशेष अधिकाराखाली हा FSI ३.५ पर्यंत वापरू शकतो. महोदय वरील ३.५ चा FSI गृहीत धरल्यास साधारणता 6736 चौरस मीटर (72484 चौरस फूट) इतके बांधकाम करता येऊ शकते. महोदय आजच्या चालू जिल्हा दर सूची प्रमाणे 2200 रुपये स्क्वेअर फुट प्रमाणे साधारणता 15,94,00,000/- इतक्या किमतीत अगदी मुंबई-पुण्याच्या कॉलिटीने काम करू शकतो. महोदय आज तिथे साधारणता 12000 हजार ते 12500 हजार रु. स्क्वेअर फुट बांधलेल्या प्रॉपर्टीचे दर आहेत. जर आपण महापालिकेतर्फे बांधकाम करून सदर इमारत रेडी रेकनर प्रमाणे जरी लीज केल्यास महापालिकेला 57 कोटी रुपये उत्पन्न मिळू शकत. त्यात बांधकामचा खर्च 15 कोटी रुपये जरी वजा केला तरी देखील 42 कोटी रुपये महापालिकेला उत्पन्न प्राप्त होऊ शकते.महोदय यापूर्वी धुळे येथील गरुड कॉम्प्लेक्समध्ये कलेक्टर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून सदर कॉम्प्लेक्सचे काम करण्यात आले होते. सदरील दुकान ही सर्व काम चालू होण्याआधी फक्त मंजूर प्लॅन वरती लीज करण्यात आले होते व या दुकानांमधून मिळालेल्या उत्पन्नामध्ये अतिशय सुरेख असे दोन क्रीडा संकुल उभारण्यात आले होते. महोदय वरील क्रीडा संकुल उभारतांना बांधकामाची निविदा ही वेगळी काढण्यात आली होती ती त्यावेळेस १४% टक्के

कमी दराने देण्यात आली होती व दुकानांचा लिलाव हा वेगळा काढण्यात आला होता. त्याच्यात शासनाने ठरवलेल्या किमतीपेक्षा 25 ते 30% टक्के जास्त दराने लिलाव बोली लावण्यात आली. त्यामुळे शासनाचा ४० ते ४५% टक्क्याचा फायदा झाला. महोदय यापूर्वी महापालिकेमार्फत 2 प्रकल्प 1) 6 नं. गल्ली २) भंगार बाजार ते BOT तत्त्वावरती करण्यात आले होते. सदर BOT तत्त्वावरती अतिशय अल्प मोबदला महापालिकेला मिळाला असून महापालिकेचे खूप मोठे नुकसान करण्यात आले होते.महोदय आपल्याला कल्पना असेल गल्ली क्रं. 6 मध्ये जे BOT तत्त्वावरती बांधकाम करण्यात आले त्या वास्तूला 60 ते 65 रुपये स्क्वेअर फुट भाडे हे बँकानकडून प्राप्त होत आहे. म्हणजे 100 स्क्वेअर फुटला म्हणजेच 10 * 10 स्क्वेअर फुटच्या खोलीला 6000/- रुपये प्रति महिना इतके भाडे प्राप्त होते. यावरून आपल्याला लक्षात येईल की यापूर्वी महापालिकेचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान करण्यात आले आहे. महोदय आज BOT चे जनक म्हटले जाणारे Highway Man माननीय. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांनी देखील मागील 5 वर्षात कुठलेही BOT प्रकल्प केले नाही. महोदय महाराष्ट्रसाठी अतिशय महत्त्वाचा प्रकल्प समृद्धी महामार्ग ज्याची किंमत ५५ हजार कोटी असून याची देखील बांधकामाची व टोल कलेक्शनचे अश्या वेग वेगळ्या निविदा काढण्यात आल्या. त्याचा फायदा असा झाला की सदर ५५ हजार कोटीच्या निविदा ह्या १८ ते २०% टक्के कमी दराने देण्यात आल्या व टोल कलेक्शनच्या निविदा 25 ते 30% टक्के जास्त दराने देण्यात आल्या. वरील प्रकल्पाचा पूर्ण हिशोब केल्यास ज्या प्रकल्पाची किंमत 20 वर्षात वसूल होणार होती ती अगदी 12 वर्षावर आली. महोदय आत्तापर्यंत मागील पंधरा वर्षात महापालिकेला BOT तत्वावर अक्षरश्या बिल्डरसने लुटले आहे व आज देखील सदर BOT बाबत बरीच लोक महापालिके विरुद्ध न्यायालयात गेले आहे. महोदय आपण जर चांगल्या आर्किटेक लावून सदर जागेचा आराखडा तयार करून सदर प्रकल्प महापालिकेमार्फत विक्री केल्यास महापालिकेला 42 कोटी इतक्या रकमेचा फायदा होईल व मिळालेल्या मोबदल्यातून प्रत्येक प्रभागात किमान 2 कोटी इतक्या रकमेचे मनपा फंडातून काम करण्यात येतील. आज संपूर्ण धुळे शहरांमध्ये गटारीच्या समस्या भेडसावत आहेत. गटारीचे काम हे नगरोत्थान किंवा अन्य कुठल्या शासन अनुदानामध्ये करता येत नाही. तरी सदर गटारींचे सर्व काम ही मनपा फंडातूनच करता येतात. महोदय आज धुळे शहरात अतिशय चांगल्या ठिकाणी महापालिकेच्या जागा असून महापालिका स्वतः 500 ते 600कोटीचा महसूल उभारू शकतात. वरील शाळा क्रं.5चे काम हे महापालिकेमार्फतच करण्यात यावे व महोदय वरील विषयावरती BOT ला माझा विरोध असून हा विरोध आपण आपल्या Proceedingमध्ये नोंदवावे म्हणून मी लेखी स्वरूपात देत आहे.

म. हिरामण गवळी

महापौर महोदय,पंतप्रधान साहेबांनी प्रत्येकाला शिक्षण हे मोफत शिक्षण अशी व्यवस्था केलेली आहे.धुळे मनपाच्या अनेक शाळा का बंद पडल्या त्याचा उहापोह करण्यापेक्षा आता सन्मा. सदस्य शितल भाऊंनी जो प्रश्न मांडला त्या वेळेस आम्ही त्या २१नं शाळेच्या जागेला असाच विरोध केला होता बीओटी तत्वावर पण ते आता झाले त्या विषयी काही चर्चा नाही.पण ५ नं.शाळेच्या मागे मी एक सुचना करु इच्छितो की जे वनविभागाचे कार्यालय आहे ती जागा कोणाच्या नावावर आहे.ती जागा आपल्या महापालिकेची जागा आहे.आणि आता वनविभागाच्या तिथे काही इतके वाहन लागत नाहीत. किंवा तेवढे कर्मचारी नाहीत, किंवा झाडे तोडुन आणत नाहीत आणि म्हणुन ती जागा जर आपली असेल तर ती जागा आणि ही ५ नं शाळेची असे एकुण जागेचे चांगल्या प्रकारचे संकुल उभे राहु शकते.त्या जागेची तपासणी करणेत यावी. कारण मी मागेही धुळे मनपाच्या हद्दीतील हॉस्पिटल ची जागा ही कोणाची म्हणुन

मी नगरपालिकेची जागा असतांना ती जागा दुसऱ्यांच्या नावावर आहे. ही जागा चोरीला गेली अशी तक्रार मी धुळे शहर पोलिस स्टेशन ला केली होती.आणि ती नोंद सुध्दा त्या ठिकाणी झालेली आहे.मला असे वाटते की ती वनविभागाची जागा ही आपल्या मालकीची आहे.आणि तीजागा जरआपली असेल तर आपल्याला चांगल्या प्रकारचे संकुल त्या ठिकाणी उभारता येईल.

म. महापौर — धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता यामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत शोधणे आवश्यक आहे.मनपा मालकीच्या अनेक मोक्याच्या जागा शहरात उपलब्ध आहेत. याठीकाणी व्यापारी संकुलाची निर्मीती केल्यास मनपाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होणार आहे. मनोहर टॉकीज शेजारी असलेल्या शाळा नं.५येथे मनपा मालकीची जागा असुन सदर जागा ही व्यापारी दृष्टया अत्यंत महत्वाची आहे. यासाठी सदर ठिकाणी बी.ओ.टी. मधुन अथवा मनपा मार्फत व्यापारी सकुंल उभारण्यासाठी व याबाबत आवश्यक ती पुढील कार्यालयीन प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.सदर ठिकाणी सद्यस्थितीत असलेल्या व्यावसायिकांना नवीन व्यापारी संकुलात प्राधान्याने पुर्नवसन करण्यांस मान्यता देण्यांत आहे.

म. शितल नवले — महापौर महोदय, थोडे मागच्या विषयाबाबत बोलतो विषयांतर होईल आपण म्हटले महापालिकेच्या हिताच्या निर्णय घेतला जाईल तर कुठला निर्णय आपण घेणारे त्या बाबत सभागृहाला आपण माहिती दिली तर बरे होईल.आपण बीओटी करणार कि नाही करणार.

म. महापौर — महानगरपालिकेचा फायदा ज्यात असेल तो बीओटी तत्वावर करण्यात असेल किंवा मनपा फंडातुन जर करण्यात असेल तर त्यातुन करण्यात येईल.

म. शितल नवले — याचा अर्थ मग आपण असे समजायचे का की, पुढच्या महासभेत परत हा विषय येईल मग तेव्हा सांगणार का की, हा आपल्या हिताचा आहे किंवा नाही.बीओटी वर व्यापारी संकुल बांधण्यांस आमचा विरोध आहे.

म. हर्ष रेलन — आमचाही विरोध नोंदविण्यांत यावा.

म. संतोष खताळ — महापौर महोदय, आमचा बीओटी तत्वाला विरोध आहे.

म. महापौर — धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता यामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत शोधणे आवश्यक आहे.मनपा मालकीच्या अनेक मोक्याच्या जागा शहरात उपलब्ध आहेत. याठीकाणी व्यापारी संकुलाची निर्मीती केल्यास मनपाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होणार आहे. मनोहर टॉकीज शेजारी असलेल्या शाळा नं. ५ येथे मनपा मालकीची जागा असुन सदर जागा ही व्यापारी दृष्टया अत्यंत महत्वाची आहे. यासाठी सदर ठिकाणी बांधकामासाठी अनुज्ञेय असलेल्या जागेत व्यापारी संकुल उभारणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर व्यापारी संकुल बी.ओ.टी.तत्वावर अथवा मनपाने स्वत: बांधुन नियमाप्रमाणे विक्री तथा लिलाव करणे या दोन्ही पर्यायाचा विचार करुन मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने जो पर्याय योग्य राहील त्या पर्याया नुसार आवश्यक ती पुढील कार्यालयीन प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सद्यस्थितीत असलेल्या व्यावसायिकांना नवीन व्यापारी संकुलात प्राधान्याने पूर्नवसन करण्यांस मान्यता देण्यांत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४५ दिनांक २९/०६/२०१९

जा.क्रं मनपा/स्विस/63 दिनाक 27/6/2019 अन्वये मनपा शाळा क्रं. 5 येथे बी ओ.टी.तत्वावर अथवा मनपा मार्फत व्यापारी संकुल उभारणेकामीचा विषय मे.महासभेच्या विषय पटलावर घेणेबाबत मा. महापौर साहेब यांनी पत्र सादर करुन धुळे महानगरपालिकेची मनोहर टॉकीज समोर असलेली मनपा शाळा नं. 5 सद्यस्थितीत पुरेसे विद्यार्थी नसल्याने बंद अवस्थेत आहे. सदरची शाळा ही धुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असून आजुबाजूस मोठया

प्रमाणात व्यापारी बाजारपेठ आहे. धुळे महानगरपालिकेची सद्यस्थितीची आर्थिक स्थिती लक्षात घेता तसेच शहराचा वाढता विस्तार व नव्याने 11 गावांचा मनपा हद्दीत समावेश झाल्याने मनपा आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सदरच्या मनपा शाळा नं. 5 येथे बीओटी तत्वावर अथवा मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करुन शक्य झाल्यास मनपा मार्फत व्यापारी संकुल उभारणेकामी सदरचा विषय मान्यतेसाठी मे.महासभेच्या विषय पटलावर घेण्यांत आलेला होता.

सादर झालेला प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता यामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत शोधणे आवश्यक आहे.मनपा मालकीच्या अनेक मोक्याच्या जागा शहरात उपलब्ध आहेत. याठीकाणी व्यापारी संकुलाची निर्मीती केल्यास मनपाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होणार आहे. मनोहर टॉकीज शेजारी असलेल्या शाळा नं. ५ येथे मनपा मालकीची जागा असुन सदर जागा ही व्यापारी दृष्टया अत्यंत महत्वाची आहे. यासाठी सदर ठिकाणी बांधकामासाठी अनुज्ञेय असलेल्या जागेत व्यापारी संकुल उभारणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर व्यापारी संकुल बी.ओ.टी.तत्वावर अथवा मनपाने स्वत: बांधुन नियमाप्रमाणे विक्री तथा लिलाव करणे या दोन्ही पर्यायाचा विचार करुन मनपा आथिक हिताच्या दृष्टीने जो पर्याय योग्य राहील त्या पर्याया नुसार आवश्यक ती पुढील कार्यालयीन प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सद्यस्थितीत असलेल्या व्यावसायिकांना नवीन व्यापारी संकुलात प्राधान्याने पूर्नवसन करण्यांस मान्यता देण्यांत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ३७ मा.महापौर सो.,धुळे मनपा धुळे यांचेकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ मधील नियम क्र. १(ज) च्या तरतुदीनुसार घनकचऱ्यापासुन वीज निर्मिती करणे बाबत विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रतिभा चौधरी महापौर महोदय,प्रशासनाकडुन आम्हांला घनकचऱ्यापासुन विजनिर्मीती कशी करणार याविषयी थोडी माहिती द्या.

म. आयुक्त सन्मा. सभागृहाला मी माहिती देवु इच्छितो. घनकचरा म्हणजे आपल्या घरा-घरातुन जमा होणारा कचरा किंवा रस्त्यावरुन आपण गोळा करतो तो कचरा. या घनकचऱ्याचे काय करायचे हा संपुर्ण जगा समोर असलेला प्रश्न आहे. हा कचरा काही टाकाऊ कचरा नसतो त्यापासुन पण आपल्याला उत्पन्न मिळवता येते हे केंद्रशासनाने आपल्याला दाखवुन दिले आहे. तर त्या दृष्टीने घनकचऱ्याचे काय करायचे, या पासुन उत्पन्न कसे मिळवायचे, यापासुन विज निर्मीती कशी करायची या पध्दतीचे अनेक गाईडलाईन्स केंद्रशासनाने सगळ्यांना दिलेली आहेत. या घनकचऱ्यापासुन आपल्याला जर उत्पन्न मिळवायचे असेल तर या कचऱ्यांचे सर्वप्रथम ओला कचरा आणि सुका कचरा असे दोन भांगामध्ये वर्गीकरण होणे अतिशय आवश्यक आहे. ज्या प्रमाणे अनेक वर्षापासुन कचरा गोळा होतोय त्या प्रमाणेच आताही होत राहीला तर त्यामधुन आपल्याला एक रुपयाही उत्पन्न मिळत नाही. उलट त्यातुन दुर्गंधी वाढते आणि महापालिकेत तक्रारी सुरु होतात. परंतु या घनकचऱ्याला आपण जर ओला कचरा आणि सुका कचरा असे जर वेगळे करु शकलो घरा-घरांच्या स्तरावरुन तर ओला कचरा

सुध्दा आपल्याला उत्पादन देतो आणि सुका कचरा सुध्दा आपल्याला उत्पन्न मिळवुन देतो. आपल्या माहितीस्तव हे सांगु इच्छितो आपल्या जिल्ह्यातील शिंदखेडा नगरपालिका आहे. तेथे मागील सहा महिन्यात अतिशय मन लावुन काम करुन १०० टक्के घरो-घरीच्या स्तरावर ओला कचरा सुका कचरा वर्गीकरण करण्याची नागरीकांची मानसिक तयारी केली त्यांच्याकडुन करुन घेताय आणि ओला कचरा एक कंपनी खरेदी करतेय आणि कंपनीने कचरा खरेदी केल्यामुळे शिंदखेडा नगरपालिकेला उत्पन्न सुध्दा मिळतेय. या व्यतिरीक्त जो सुका कचरा आहे त्याचे पुर्ण कंपोस्टींग फिल्टर नगरपालिका करतेय आणि त्यातुन सुध्दा शिंदखेडा नगरपालिकेला उत्पन्न मिळण्यास सुरवात होत आहे. सांगायचा उद्देश हाच की आपण जर आपल्या पालिकेमध्ये शिंदखेडा नगरपालिका जी ग्रामपंचायतीची नगरपालिका नुकतीच झालेली आहे. तिथले लोक जर इतकी जागृकता ठेवु शकतात आणि शहरात बदल घडवु शकतात तर २००३-०४ मध्ये रुपांतरीत झालेली जी आधीच नगरपालिका सुध्दा होती तेथील लोकांना सुध्दा आपल्याला काम करुन घरोघरी तयार होणारा कचरा ओला आणि सुका मध्ये वेगळे करण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. आणि जर आपण हे करु शकलो तर त्यातुन महानगरपालिकेचा कचरा दुर होईल आणि उत्पन्न ही मिळेल. तर या सर्व बाबींचे आपल्याला मार्गदर्शन करणेसाठी आणि त्यातुन महापालिकेचे उत्पन्न कसे तयार होईल ते मार्गदर्शन करण्यासाठी फक्त उर्जानिर्मीती म्हणुनच नाही तर संपुर्ण कचऱ्याची शास्त्र शुध्द पध्दतीने विल्लेवाट लावुन महापालिकेचे उत्पन्न वाढवुन महापालिकेला कचरा मुक्त कसे करता येईल यासाठी संस्था नेमण्यासाठीचा आणि त्याकडुन ही संपुर्ण प्रक्रिया करुन घेण्यासाठीचा संस्था नेमण्यासाठीचा हा ठराव आहे. यासाठी जो पण खर्च होणार आहे तो १४ व्या वित्त आयोगाच्या पहिला जो ५० टक्के माल जो स्वच्छ भारत मोहिमेवर आपल्याला खर्च करावयाचा आहे त्यातुनच होणार आहे. म्हणुन मनपा निधीचीही यात काही तरतुद करण्याची आवश्यकता नाही. तर ही प्रक्रिया करुन योग्य संघटना नेमुण आपल्या शहरातील प्रत्येक घराघराच्या स्तरावर त्यांचे मार्गदर्शन करुन लोकांना ओला करचा म्हणजे काय सुका कचरा म्हणजे काय हे शिकवुन या अनुषंगाने याची पुढील कायर्वाही होईल. हा तातडीचा विषय असल्यामुळे आपल्या सर्वांची मान्यता घेतल्यानंतरच याची पुढची प्रक्रिया होईल.

म. महापौर महानगरपालिका क्षेत्रात वरखेडी रोड येथील कंपोस्ट डेपो येथे बऱ्याच वर्षापासुन कचरा संकलन केला जात आहे. तथापी त्याचा पुनश्च: वापर झाल्याने वेगवेगळया समस्यांना व अडचणींना महानगरपालिकेला सामोरे जावे लागत आहे. यासाठी कचऱ्याचा पुनश्च:वापर करणे बाबत शासनाने यापुर्वीत विविध निर्देश दिलेले आहेत. याबाबत केंद्र शासनाच्या ही उर्जा निर्मीती बाबत मार्गदर्शक सुचना आहेत. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा पुर्नवापर करुन शुध्द पाणी तयार करणे हे संभाव्य परिस्थितीनुसार गरजेचे आहे. यासाठी धुळे महानगरपालिकमार्फतही कचऱ्यावर प्रक्रिया करुन विज निर्मीती करणे, गॅस निर्मीती करणे व अनुषंगीक बाबींसाठी तसेच सांडपाणी व पावसाच्या पाण्यांचा पुर्नवापर करण्यासाठी आवश्यक तो प्रकल्पआराखडा तयार करणे त्यासाठी तांत्रीक सल्लागार नियुक्ती करणेस यासाठी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

सदरअनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४६ दिनांक २९/०६/२०१९

मा.महापौर साहेब यांचे कडील जा.क्रं मनपा/स्विस/62 दिनाक 27/6/2019 चे पत्रानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात 160 मे टन कच-याची निर्मिती होत आहे. यापैकी

सुमारे 40 मे. टन कचरा वीज निर्मिती साठी वापरणे शक्य आहे. तसेच स.न . 165, वरखेडी रोड येथे सुमारे 10,000 मे टन कचरा संकलीत आहे.

केंद्र शासनाने व राज्यशासनाने महानगरपालिकांनी कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प राबविणेकरिता निधी तथा भांडवली खर्च अर्थसहाय्यची योजना निश्चित केली आहे. औरंगाबाद व नाशिक मनपा यांनी प्रकल्पाची उभारणी केली आहे.

एफ.नं. 20/222/2016-17 WTE, केंद्र शासन, नवी दिल्ली, Ministry of Renewable energy यांचेकडील दि.30-7-2018 चे परिपत्रकनुसार उर्जा निर्मितीबाबत मार्गदर्शक सूचना आहेत.

उक्त प्रमाणे धुळे महानगरपालिके करिता कचऱ्यापासून वीज निर्मिती करणे प्रकल्प आराखडा तयार करणे,व त्या अनुषंगाने प्रस्ताव,अनुदान,अर्थसहाय्य बाबत कामे करणेकरिता तज्ञ सल्लागार नेमणेची आवश्यकता आहे. असा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चे नुसार व मा. आयुक्त साहेब यांच्या अभिप्रायानुसार महानगरपालिका क्षेत्रात वरखेडी रोड येथील कंपोस्ट डेपो येथे बऱ्याच वर्षापासुन कचरा संकलन केला जात आहे.तथापी त्याचा पुनश्च: वापर झाल्याने वेगवेगळया समस्यांना व अडचणींना महानगरपालिकेला सामोरे जावे लागत आहे. यासाठी कचऱ्याचा पुनश्च:वापर करणे बाबत शासनाने यापुर्वीत विविध निर्देश दिलेले आहेत. याबाबत केंद्र शासनाच्या ही उर्जा निर्मीती बाबत मार्गदर्शक सुचना आहेत. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा पुर्नवापर करुन शुध्द पाणी तयार करणे हे संभाव्य परिस्थितीनुसार गरजेचे आहे. यासाठी धुळे महानगरपालिकमार्फतही कचऱ्यावर प्रक्रिया करुन विज निर्मीती करणे, गॅस निर्मीती करणे व अनुषंगीक बाबींसाठी तसेच सांडपाणी व पावसाच्या पाण्यांचा पुर्नवापर करण्यासाठी आवश्यक तो प्रकल्पआराखडा तयार करणे त्यासाठी तांत्रीक सल्लागार नियुक्ती करणेस यासाठी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

सदरअनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक -३८ मा.आयुक्त साहेब यांच्या कडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण -२ नियम १ के नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्वे नं.४३६/३ मधील आरक्षित जागेचे भुसंपादन करणे कामी मे. उच्च न्यायालयाच्या निर्णया नुसार निगोसिएशन अंती वाढीव मोबदला देणेबाबत विषय पटलावर दाखल झालेला प्रस्ताव.

म. नगरसचिव मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी साहेब यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण -२ नियम १ के नुसार मे. महासभे समोर प्रस्ताव दाखल करणे बाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार याबाबत मा. आयुक्त साहेब यांना प्रस्ताव सादर करणे बाबत विनंती करणेत येत आहे.

म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळे.सन्मा. सभागृहासमोर मी नगररचना विभाग विभागाशी संबंधीत व मे. उच्च न्यायालयाशी निगडीत असा विषय आहे. सदरचा विषय तातडीने सभागृहासमोर ठेवणेसाठी मान्यता लागते. सभागृहाची मान्यता घेवुन पुढे यावर कार्यवाही करण्यात येईल. याबाबत प्रस्तावाची माहिती मा. नगररचनाकार यांनी सभागृहास द्यावी.

म. नगररचनाकार मेहमुद शेख सुभान यांची धुळे महानगरपालिका हद्दीतील स.क्र. ४३६/३ पै. जमिन खेळाचे मैदान व विकास योजना रस्ता यासाठी संपादित करणेत आली होती. त्यावर वाढीव मोबदल्यासाठी दाखल दाव्यात धुळे येथील मे. दिवाणी न्यायालयाने एलएआर ८२/२००९ मध्ये दि. १६/०७/२०१८रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे. मात्र सदर न्यायनिर्णयात देण्यात आलेल्या मोबदल्याची रक्कम जास्त असल्याने त्याविरुध्द मे.उच्च न्यायालयऔरंगाबाद खंडपिठात अपील दाखल केले होते.

त्यावर मे. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठाने दि. ०८/०३/२०१९ चे आदेशान्वये ८ आठवडयाचे आत खालील न्यायालयाने न्यायनिर्णयात सुचविलेली मोबदला रक्कम जमा करण्याचे आदेशित केले आहे. तसेच धुळे येथील २ रे दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर यांनी दि. ०२/०३/२०१९ रोजी जप्ती वारंट दिले होते. त्यात एकुण मोबदला रक्कम २,९०,७७,००५/- + व्याजाची रकमेकरीता सदर वारंट देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने वरील रकमेबाबत सादर करणेत येते की,

भुसंपादीत क्षेत्र (9774 चौ.मी.) X न्यायालयाने दिलेला दर (रुपये ८५५/-)
= ८३,५६,७७०/- (एकुण मोबदला)

भुसंपादन कायद्यानुसार देण्यात येणारी दिलासा रक्कम (मोबदल्याचे ३०%)= २५,०७,०३१/-

कंम्पोनंट १२% (दि. १८/११/२००४ ते १७/११/२००७) = ३०,०८,४३७/

एकुण मोबदला = १,३८,७२,२३८/-

यापूर्वी दिलेली मोबदला रक्कम = ३६,३३,९४५/-

दिलेला मोबदला वजा जाता उर्वरित देय रक्कम = १,०२,३८,२९२/-

प्रथम वर्षासाठी व्याजाची रक्कम (दि. १८/११/२००४ ते १७/११/२००५) = ९,२१,४४६/-

त्यानंतर व्याजाची रक्कम (एकुण ४९१२ दिवसांकरीता) = २,०६,६७,३२५/-

एकुण देय रक्कम (दि. ३०/४/२०१९ पर्यंत) = ३,१८,२७,०६४/-

सदर मिळकतीचा आजचा रेडीरेकनरचा दर रुपये ३६३०/- असुन एकुण ९७७४ चौ.मी. क्षेत्रासाठी शासकीय मुल्य रुपये **३,५४,७९,६२०/-** याप्रमाणे आहे. तसेच भुसंपदान अधिनियम १८९४ चे कलम १८ अन्वये दाखल दाव्याचे निकालानुसार देय रक्कम रुपये **३,१८,२७,०६४/-** आहे.

सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी,धुळे तथा आयुक्त (प्र), धुळे महानगरपालिका,धुळे यांचे दालनात मुळ जागा मालक श्री. मेहमुद शे. सुभान यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार तसेच वरील रकमेबाबत झालेल्या तडजोडीअंती मेहमुद शे.सुभान यांनी दि. २९/६/२०१९ रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांना जर दि. ५/७/२०१९ रोजी किंवा तत्पुर्वी एलएआर ८२/२००९ नुसार हुकुमनाम्यापोटी एक रकमी रक्कम रुपये २,५०,००,०००/- अदा केले तर सदर रक्कम तडजोड रक्कम म्हणुन स्विकारण्यास व त्याबदल्यात हुकुमनाम्याची अंमलबजाणी व्हावी म्हणुन दाखल दरखास्त तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रकरण काढुन घेणेबाबत तयारी दर्शविलेली आहे व भविष्यात याबाबत कोणतेही न्यायसंदर्भ करणार नाही असे नमुद केले आहे. तरी सदर बाबत तडजोडीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (एच) नुसार कार्यवाही करता येईल.

वरील प्रकरणी या कार्यालयाने दि. ०१/०६/२०१९ चे पत्रान्वये मे. उच्च न्यायालयात दि. ०८/०३/२०१९ चे निर्देशानुसार किती रकमेचा भरणा न्यायालयात करावा याबाबत मनपा अभियोक्ता यांना विचारणा केली असता त्यांनी त्याचे दि.०५/०६/२०१९ चे ईमेलद्वारे

पाठविलेल्या पत्रात रक्कम रुपये३,१८,९२,२८०/- चा भरणा मे.उच्च न्यायालयात त्वरीत करणेबाबत कळविले आहे.

तरी एलएआर८२/२००९नुसार मुळ जागा मालकास भुसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत रक्कम रुपये ३,१८,२७,०६४/-मोबदला देय आहे. मनपा अभियोक्ता यांनी रक्कम रुपये३,१८,९२,२८०/-चा भरणा मे. उच्च न्यायालय त्वरीत करणेबाबत कळविले आहे. तसेच रेडी रेकनरनुसार सदर जागेची शासकीय किंमत रुपये ३,५४,७९,६२०/- असल्याने मुळ जागा मालकाने वरीलप्रमाणे तडजोडअंती अपेक्षिलेली रक्कम रुपये २,५०,००,०००/- देणेस योग्य राहील असे मत आहे.

म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळेसन २००८ मध्ये जागा मालकाकडुन जागा अद्याप घेतली आहे. जागा मालकाच्या पेमेन्टं करुन व्यवहार पुर्ण करावा लागणार आहे. मे. उच्च न्यायालयाने एकुण ३ कोटी १८ लाख मात्र रक्कम जागेच्या मोबदल्यापोटी मे. न्यायालयात भरणेबाबत आदेशीत केलेले आहे. सदर रक्कम एकुण व्याजासह ३ कोटी १८ लाख मात्र येत आहे. जागा मालकाला निगोसिऐशन करुन पैसे देणे मनपाच्या हिताचे आहे.मे. उच्च न्यायालयाने ५ जुन २०१९ पर्यंत पैसे भरणे बाबत मुदत दिली होती.-तथापी तत्कालीन आयुक्त यांची बदली झाल्याने प्रस्तावाबाबत निर्णय प्रलंबित होता.याबाबतीत मे.उच्च न्यायालयात आपण पैसे भरण्या बाबतची मुदत ५जुलै पर्यंत वाढवुन घेतली आहे.मे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपण जागा मालकाची निगीसिऐशन करुन द्यावयाची रक्कम कमी करुन हा व्यवहास संपवु शकतो तसेच जे १५ % व्याज रकमेवर चालु आहे. ते मनपाचे वाचनार आहे. तत्कालीन आयुक्त श्री. देशमुख साहेब यांनी या विषयाबाबत पाठपुरावा केला होता. तोच विषय आपणांस पुर्णत्वास न्यावयाचा आहे.जागा मालक हा हुकुमनाम्यापोटी २ कोटी ५० लाख रुपये तडजोड रक्कम स्विकारण्यास तयार झाला आहे. आपण तडजोडअंती रक्कम अदा केली तर फायद्यात राहणार आहे. या विषयावर ५ दिवसात प्रक्रिया करुन तातडीचा प्रस्ताव समजुन तातडीने अजेंड्यावर घेणेस सभागृहाला मंजुरी द्यावी लागेल. ठरावाला मंजुरी मिळाल्यानंतर मे.स्थायी समिती समोर विषय ठरावासाठी घ्यावा लागेल. तरी अनुसूचि ड, प्रकरण -२ नियम १ के नुसार मे.महासभेसमोर प्रस्ताव दाखल करण्यास मान्यता द्यावी व निगोसिऐशन अंती जमीन मालकास २ कोटी ५० लाख रुपये अदा करणेस सभागृहाने मान्यता द्यावी ही विनंती आहे.

म. महापौर मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने जागा मालकास तडजोडी अंती निश्चित झालेली रक्कम देणेस्तव कार्यालयीन अहवाल व मा.आयुक्त यांनी दाखल केलेल्या प्रस्ताव मे. महासभेच्या विषय पटलावर दाखल करुन घेण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४७ दिनांक २९/०६/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण -२ नियम १ के नुसार मा. आयुक्त यांनी प्रस्ताव दाखल केलेला असुन यात मेहमुद शेख सुभान यांची धुळे महानगरपालिका हद्दीतील स.क्र. ४३६/३ पै. जमिन खेळाचे मैदान व विकास योजना रस्ता यासाठी संपादित करणेत आली होती. त्यावर वाढीव मोबदल्यासाठी दाखल दाव्यात धुळे येथील मे. दिवाणी न्यायालयाने एलएआर८२/२००९ मध्ये दि.१६/०७/२०१८ रोजी न्याय निर्णय दिलेला आहे. मात्र सदर न्यायनिर्णयात देण्यात आलेल्या मोबदल्याची रक्कम जास्त असल्याने त्याविरुध्द मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठात अपील दाखल केले होते.

त्यावर मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठाने दि.०८/०३/२०१९ चे आदेशान्वये ८ आठवडयाचे आत खालील न्यायालयाने न्यायनिर्णयात सुचविलेली मोबदला रक्कम जमा करण्याचे आदेशित केले आहे.तसेच धुळे येथील २ रे दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर यांनी

दि. ०२/०३/२०१९ रोजी जप्ती वारंट दिले होते. त्यात एकुण मोबदला रक्कम २,९०,७७,००५/- + व्याजाची रकमेकरीता सदर वारंट देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने वरील रकमेबाबत सादर करणेत येते की,

भुसंपादीत क्षेत्र (9774 चौ.मी.) X न्यायालयाने दिलेला दर (रुपये ८५५/-)
= ८३,५६,७७०/- (एकुण मोबदला)

भुसंपादन कायद्यानुसार देण्यात येणारी दिलासा रक्कम (मोबदल्याचे ३०%)
= २५,०७,०३१/-

कंम्पोनंट १२% (दि. १८/११/२००४ ते १७/११/२००७) = ३०,०८,४३७/

एकुण मोबदला = १,३८,७२,२३८/-

यापूर्वी दिलेली मोबदला रक्कम = ३६,३३,९४५/-

दिलेला मोबदला वजा जाता उर्वरित देय रक्कम = १,०२,३८,२९२/-

प्रथम वर्षासाठी व्याजाची रक्कम (दि. १८/११/२००४ ते १७/११/२००५) = ९,२१,४४६/-

त्यानंतर व्याजाची रक्कम (एकुण ४९१२ दिवसांकरीता) = २,०६,६७,३२५/-

एकुण देय रक्कम (दि. ३०/४/२०१९ पर्यंत) = ३,१८,२७,०६४/-

सदर मिळकतीचा आजचा रेडीरेकनरचा दर रुपये ३६३०/-असुन एकुण ९७७४ चौ.मी. क्षेत्रासाठी शासकीय मुल्य रुपये **३,५४,७९,६२०/-** याप्रमाणे आहे. तसेच भुसंपादन अधिनियम१८९४चे कलम १८अन्वये दाखल दाव्याचे निकालानुसार देय रक्कम रुपये **३,१८,२७,०६४/-** आहे.

सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी,धुळे तथा आयुक्त सो. धुळे महानगरपालिका, धुळे यांचे दालनात मुळ जागा मालक श्री. मेहमुद शे. सुभान यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार तसेच वरील रकमेबाबत झालेल्या तडजोडीअंती मेहमुद शे. सुभान यांनी दि.२९/६/२०१९ रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांना जर दि.५/७/२०१९ रोजी किंवा तत्पुर्वी एलएआर ८२/२००९ नुसार हुकुमनाम्यापोटी एक रकमी रक्कम रुपये २,५०,००,०००/-अदा केले तर सदर रक्कम तडजोड रक्कम म्हणुन स्विकारण्यास व त्याबदल्यात हुकुमनाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणुन दाखल दरखास्त तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रकरण काढुन घेणेबाबत तयारी दर्शविलेली आहे व भविष्यात याबाबत कोणतेही न्यायसंदर्भ करणार नाही असे नमुद केले आहे.तरी सदर बाबत तडजोडीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (एच) नुसार कार्यवाही करता येईल.

वरील प्रकरणी या कार्यालयाने दि.०१/०६/२०१९ चे पत्रान्वये मे. उच्च न्यायालयात दि.०८/०३/२०१९ चे निर्देशानुसार किती रकमेचा भरणा न्यायालयात करावा याबाबत मनपा अभियोक्ता यांना विचारणा केली असता त्यांनी त्याचे दि.०५/०६/२०१९चे ईमेलद्वारे पाठविलेल्या पत्रात रक्कम रुपये ३,१८,९२,२८०/- चा भरणा मे. उच्च न्यायालयात त्वरीत करणेबाबत कळविले आहे.

तरी एलएआर ८२/२००९ नुसार मुळ जागा मालकास भुसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत रक्कम रुपये ३,१८,२७,०६४/-मोबदला देय आहे. मनपा अभियोक्ता यांनी रक्कम रुपये ३,१८,९२,२८०/-चा भरणा मे.उच्च न्यायालय त्वरीत करणेबाबत कळविले आहे. तसेच रेडी रेकनरनुसार सदर जागेची शासकीय किंमत रुपये ३,५४,७९,६२०/- असल्याने मुळ जागा मालकाने वरीलप्रमाणे तडजोडअंती अपेक्षिलेली रक्कम रुपये २,५०,००,०००/- देणेस योग्य राहील असे मत आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व मा.आयुक्त सो.,यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड,प्रकरण -२ नियम १ के नुसार दाखल केलेला प्रस्ताव विचारात घेता मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने जागा मालकास तडजोडी अंती निश्चित झालेली रक्कम देणेस्तव आलेला कार्यालयीन अहवाल विषय पटलावर दाखल करुन घेण्यांत येत आहे.

सही/-x x x
नगरसचिव,
धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२६ जुलै २०१९ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय महासभेचे इतिवृत्त

धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत सभागृह,धुळे
शनिवार दिनांक २६ जुलै २०१९
वेळ दुपारी ३-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय महासभा आज **शुक्रवार दिनांक २६/०७/२०१९ रोजी दुपारी ३-०० मा. श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	दुपारी ३-०० वाजतां
२	मा. सौ. अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
६	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
७	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
८	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
९	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१०	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
११	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१३	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१४	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१५	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१६	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१७	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१८	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१९	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२०	श्री. अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्या	----------" ---------
२१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------

२२	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२३	श्रीमती.कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
२४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२५	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२६	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
२७	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२९	श्रीमती.मंडोरे बालीबेन प्रकाशचंद्र	सदस्य	----------" ---------
३०	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३१	श्रीमती.जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३२	श्रीमती.वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३३	श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
३४	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३५	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३७	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३८	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
३९	श्रीमती. शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
४०	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
४१	श्रीमती.जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
४२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
४३	श्री. खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
४४	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
४५	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४६	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
४७	श्री. जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
४८	श्रीमती. बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
४९	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
५०	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
५१	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
५२	श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
५३	श्रीमती. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
५४	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
५५	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
५६	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
५७	श्रीमती. अग्रवाल सारिका प्रविन	सदस्या	----------" ---------
५८	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५९	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------

६०	श्रीमती. पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
६१	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
६२	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
६३	श्री. मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६४	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६५	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६६	श्री. शिंदे सोनल दिलीप	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	----------" ---------
२	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा.आयुक्त	----------" ---------
३	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
७	श्री.नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
९	श्री. मधुकर पवार	आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१३	श्री. रविंद्र सोनवणे	लिपीक परवाना विभाग	----------" ---------
१४	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१६	श्री. महेंर्द जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ---------
१७	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
१८	श्री. के.आर. चव्हाण	लिपीक अधिलेख विभाग	----------" ---------
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२०	श्री. राजेश वसावे	मलेरिया विभाग	----------" ---------
२१	श्री. मनिष शेंद्रे	आस्थापना विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस मा.श्री. गणेश गिरी साहेब तसेच सौ.पल्लवी शिरसाठ यांची अनुक्रमे उपायुक्त व सहा. आयुक्त पदी धुळे महानगरपालिकेत नियुक्ती झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने दोघा अधिका-यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले.

तसेच श्री.दाळेवाले कांतिलाल माणिकराव यांची सभागृह नेतेपदी नियुक्ती झाल्याबद्दल सभागृहास माहिती देणयांत आली.उपस्थित सदस्यांचे त्यांचे अभिनंदन केले. तसेच सभागृहाच्या वतीने

मा. महापौर उपमहापौर, सभापती, व सर्व गटनेते यांनी श्री. दाळेवाले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले.

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या याद्या :-

१) सन १९९९ मध्ये पाकिस्तानकडुन घुसखोरी झाल्याची माहिती भारतीय लष्कराला मिळाली होती. या माहितीच्या आधारे भारताने पाकिस्तानविरोधात ऑपरेशन विजय ही कारवाई केली. मे १९९९ मध्ये सुरु झालेले कारगिर युध्द 77 दिवस चालले. नियंत्रण रेषेपलीकडे घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैनिकांना भारतील जवानांनी सडेतोड प्रतिउत्तर दिले. त्यामुळे दि. २६जुलै, १९९९ रोजी पाकिस्तानला नेहमीप्रमाणे या युध्दात देखील हार पत्करावी लागली. तेव्हापासुन २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस संपुर्ण देशात अभिमानाने साजरा करण्यात येतो. तसेच या दिवशी युध्दात शहिद झालेल्या सैनिकांना त्यांनी केलेल्या बलिदानाबद्दल आदरांजली वाहण्यात येते. आजच्या महासभेत देखील शहिद झालेल्या सैनिकांना श्रध्दांजली वाहुन तसा ठराव पारीत करण्यात यावा.

सुचक : अमोल पावबा मासुळे.

२) २६ जुलै कारगिल विजय दिन आहे. कारगिल युध्दा मध्ये ५०० हुन अधिक भारतीय जवान शहीद झाले होते. माझी आपल्याला व सभागृहाला एक विनंती आहे. की आपण सर्वांनी २ मिनिट उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सुचक : शितलकुमार मोहन नवले.

३) २६ जुलै कारगिल विजय दिन आहे. कारगिल युध्दा मध्ये ५०० हुन अधिक भारतीय जवान शहीद झाले होते. माझी आपल्याला व सभागृहाला एक विनंती आहे. की आपण सर्वांनी २ मिनिट उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सुचक : सुरेखा चंद्रकांत उगले.

४) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री स्व. शिला दिक्षीतजी (जेष्ठ काँग्रेस नेत्या व दिल्ली मेट्रो ट्रेन ची जननी) या दिनांक २० जुलै २०१९ रोजी स्वर्गवासी झाल्या. या दु:खद घटने मुळे आपण सभागृहात दोन मिनिट मौन धारण करुन श्रध्दांजली अर्पण करावी.

सुचक : मदिना समशेर पिंजारी

अनुमोदक : खान साबीर मुहिबुल्लाह

५) दि. २५/०७/२०१९ रोजी झालेल्या भिषण अपघातात गुंजन देविदास पाटील हि १४ वर्षीय विद्यार्थिनीचे निधन झाले असल्याने (रा. कुमार नगर, साक्री रोड, धुळे.) हीस सभागृहात दोन मि. मौन धारण करुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी ही विनंती.

सुचक : किरण राकेश कुलेवार

म.महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना आजच्या महासभेत श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४८ दिनांक २६/०७/२०१९

सन्मा. सदस्याच्या यादीनुसार सन १९९९ मध्ये पाकिस्तानकडुन घुसखोरी झाल्याची माहिती भारतीय लष्कराला मिळाली होती. या माहितीच्या आधारे भारताने पाकिस्तानविरोधात ऑपरेशन विजय ही कारवाई केली. मे. १९९९ मध्ये सुरु झालेले कारगिर युध्द 77 दिवस चालले. नियंत्रण रेषेपलीकडे घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैनिकांना भारतील जवानांनी सडेतोड प्रतिउत्तर दिले. त्यामुळे दि. २६ जुलै १९९९ रोजी पाकिस्तानला नेहमीप्रमाणे या युध्दात देखील हार पत्करावी लागली. तेव्हापासुन २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस संपुर्ण देशात अभिमानाने साजरा करण्यात येतो. तसेच या दिवशी युध्दात शहिद झालेल्या सैनिकांना त्यांनी केलेल्या बलिदानाबद्दल आदरांजली वाहण्यात येते.आजच्या महासभेत देखील शहिद झालेल्या सैनिकांना श्रध्दांजली वाहुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

तसेच दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री स्व. शिला दिक्षीतजी (जेष्ठ काँग्रेस नेत्या व दिल्ली मेट्रो ट्रेन ची जननी) या दिनांक २० जुलै २०१९ रोजी स्वर्गवासी झाल्या.

दि.२५/०७/२०१९ रोजी झालेल्या भिषण अपघातात गुंजन देविदास पाटील (रा. कुमार नगर, साक्री रोड, धुळे.) या १४ वर्षीय विद्यार्थिनीचे निधन झाले आहे.

वरील सर्व मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत असून ही सभा त्यांचे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निमित्त दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

अभिनंदनाची आलेली यादी.

1) धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी रु.100 कोटीचा निधी मंजूर केला. याकामी मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना. श्री गिरीषाजी महाजन साहेब जलसंपदा मंत्री, मा. ना. श्री.जयकुमारभाऊ रावल साहेब,मा. खा. श्री. सुभाषबाबा भामरे साहेब, तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल, मा. श्री. चंदुबापू सोनार, महापौर, मनपा यांचे सहकार्य लाभले.

तरी मा. ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना. श्री गिरीषाजी महाजन साहेब जलसंपदा मंत्री, मा. ना. श्री.जयकुमारभाऊ रावल साहेब,मा. खा.श्री. सुभाषबाबा भामरे साहेब, तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल, मा.श्री.चंदुबापू सोनार, महापौर, मनपा यांच्या अभिनंदनाचा आजच्या महासभेत ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा धुळे

2) दिनांक 9 जानेवारी 2000 या वर्षी जन्म झालेली 19 वर्षीय वय असलेली हिमा दास हिने 19 दिवसात 5 आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदके जिंकण्याचा भिम पराक्रम केला आहे. आसाम मधील एका सामान्य शेतक-याची मुलगी असणा-या तसेच स्वस्तातले बुट वापरुन भाताच्या शेतात धावण्याचा सराव करणा-या परंतु प्रचंड इच्छाशक्ती व मेहनतीच्या बळावर ती आज आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख झालेली तांराकित खेळाडू बनलेली आहे.भारताची गोल्डनगर्ल हिमा दास हिच्याअभिनंदनाचा आजच्या महासभेत ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक :- श्री. अमोल पावबा मासुळे , नगरसेवक, मनपा धुळे

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचे ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ४९ दिनांक२६/०७/२०१९

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी रु.100 कोटीचा निधी मंजूर केला.याकामी मा. ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना. श्री गिरीषाजी महाजन साहेब जलसंपदा मंत्री, मा. ना.श्री.जयकुमारभाऊ रावल साहेब,मा.खा. श्री. सुभाषबाबा भामरे साहेब, तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष मा. श्री.अनुपभैय्या अग्रवाल, मा. श्री.चंदुबापू सोनार, महापौर, मनपा यांचे सहकार्य लाभले.

तरी मा. ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना. श्री गिरीषाजी महाजन साहेब जलसंपदा मंत्री, मा. ना. श्री.जयकुमारभाऊ रावल साहेब,मा. खा.श्री. सुभाषबाबा भामरे साहेब, तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल, मा.श्री.चंदुबापू सोनार, महापौर, मनपा यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक 9 जानेवारी 2000 या वर्षी जन्म झालेली 19 वर्षीय वय असलेली हिमा दास हिने 19 दिवसात 5 आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदके जिंकण्याचा भिम पराक्रम केला आहे. आसाम मधील एका

सामान्य शेतक-याची मुलगी असणा-या तसेच स्वस्तातले बुट वापरुन भाताच्या शेतात धावण्याचा सराव करणा-या परंतु प्रचंड इच्छाशक्ती व मेहनतीच्या बळावर ती आज आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख झालेली तांराकित खेळाडू बनलेली आहे.तरी धुळे महानगरपालिकेच्या वतीने भारताची गोल्डनगर्ल हिमा दास हिच्याअभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार, सदस्या सौ. ज्योस्त्ना प्रफुल्ल पाटील, सौ. हेमा अनिल गोटे, श्री. प्रदीप बाळासाहेब कर्पे, श्री.संजय रामदास पाटील, श्रीमती फातमा बी नुरुल अमीन, श्री. संदिप दत्तात्रय महाले इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. हिरामण गवळी मागील महासभेत मी पत्र आणि प्रश्न केला होता. जर एखादा सदस्य सभांना गैरहजर राहत असेल तर त्या सदस्यानं प्रभागातील नागरीकांचा अपमान केलेला असुन तसेच त्या प्रभागातील विकास कामे होत नाहीत. किती वेळा सदस्य गैरहजर राहत असेल तर अपात्र केले जाते. अथवा सदस्यत्व रद्द केले जाते याचा खुलासा करावा.

म. नगरसचिव सदस्य सभेस गैरहजर बाबत अधीनियमातील नियमाचे वाचन मागील सभेत करणेत आले आहे. त्या नियमानुसार आमचा अहवाल तयार करणेत आला असुन तो महापौर यांचेकडेस लवकरच सादर करणेत येणार आहे.

म. महापौर अहवालप्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करणेत येईल. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५० दिनांक२६/०७/२०१९

सन्मा. सदस्या सौ. हेमा अनिल गोटे, श्री.नरेंद्र रुपला चौधरी,अन्सारी सईदा मो. इकबाल, श्री सुभाष सुकलाल जगताप, सौ.कल्पना सुनिल महाले, श्री.अन्सारी अ. लतीफ अ. हमीद,श्रीमती वालिबेन प्रकाशचंद्र मंडोरे,सौ.वैशाली भिकन वराडे, श्री. संजय रामदास पाटील, श्री. खान महोहम्मद साबीर मुहिबुल्लाह, पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम, श्रीमती अन्सारी फातेमा बी नुरुल अमीन, सौ. सारिका प्रवीण अग्रवाल,श्री. शशी सुधाकर मोगलाईकर, इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-३९ धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक १८/०६/२०१९ अन्वये शिफारस केल्यानुसार धुळे महानगरपालिकचे सन२०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नगरसचिव अर्थसंकल्पाबाबत मा. महापौर साहेब विवेचन करतील त्यानंतर चर्चेस सुरवात होईल.

म. महापौर प्रशासनामार्फत तसेच स्थायी समिती मार्फत संतुलित अंदाजपत्रक सादर करण्यांत आलेले आहे.आचार संहितेमुळे अंदाजपत्रक मान्यतेस विलंब झालेला आहे. आपल्या धुळे शहरास मोठा इतिहास आहे. आपले शहर जरी रचनाबध्द असले तरीही शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रितीने राखण्यासाठी शहर कमी पडलेले आहे.परंतु भाजपाची सत्ता महानगरपालिकेवर प्रथमच आलेली आहे.आम्ही आमच्या वचननाम्यात शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना प्रस्तावित केलेल्या होत्या व त्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडवणीस तसेच जलसंपदा मंत्री मा.ना. श्री. गिरीषजी महाजन, आपले खासदार श्री. सुभाषबाबा भामरे, पर्यटन मंत्री मा. ना. श्री.जयकुमारजी रावल, भाजपा महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांच्या सहकार्याने धुळे महानगरपालिकेस शासनामार्फत विविध योजना व अनुदान प्राप्त झालेले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे असलेले मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत व उत्पन्न वाढीस पडणा-या मर्यादा यामुळे अनेक विकास कामे करण्यांस अडचणी निर्माण होतात. धुळे मनपाकडेस सुमारे 22 कोटी मात्रचे विकास कामांचे देयके प्रलंबीत आहेत.तसेच तापी पाणीपुरवठा योजनेचे कर्ज व व्याजाचा बोजा आहे.तथापि शासनाकडील विविध अनुदानाव्दारे यावर मात करण्यांचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

शहराचे एकुणच मूल्याकन पाहता या अंदाजपत्रकात नागरीकांवर कोणत्याही प्रकारची कर वाढ सुचविण्यांतआलेली नाही. महानगरपालिकेचा अत्यावश्यक बाधील खर्च वजा जाता मिळणारे उत्पन्न अत्यंत मर्यादित असल्याने सद्यस्थितीत स्थायी समिती मार्फत प्रस्तावित करण्यांत आलेली नगरसेवक निधीसाठी प्रत्येकी 10 लक्ष मात्र तरतूद कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शहराच्या मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांबरोबरच शहराचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक असल्याने क्रिडा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमासाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रभागातील विकास कामे मनपा निधीतून करणे शक्य होत नसल्याने राज्य स्तरीय सुवर्णजयंती नगरोत्थान योजना,जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक योजना,तसेच शासनाच्या विविध विकास योजनांच्या अनुदानातून विकास कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.तसेच हद्दवाढ झालेल्या गावांसाठीही सुमारे 150 कोटी रुपयांच्या मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला आहे.या सर्वबाबींसाठी आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करावा लागणार आहे. सदर हिस्सा भरण्यासाठी आवश्यक ती तरतूद मनपा अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.यासाठी दैनंदिन उत्पन्नातून ठरावीक रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करणेबाबत मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

शहरासाठी जिवनदायी ठरणारी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना,तसेच शहरासाठी महत्वपूर्ण असणारी भूमिगत गटार योजना या महत्वाकांक्षी योजनां साठीही मनपा हिस्साअदा

करावा लागणार आहे.त्यासाठीही अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

भविष्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर नकाणे व डेडरगांव तलाव येथील पाणी साठा संपुष्टात आल्यास भविष्यात शहरास तापी नदीव्दारे पाणी पुरवठा करण्यांचे नियोजन करावे लागणार आहे. यासाठीही आवश्यक ती तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शहरात शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण शहरातील विद्युत पोलवर एलईडी पथदिवे बसविण्यांची कार्यवाही प्रस्तावित आहे यामुळे मनपाच्या विद्युत देयकात 50 टक्के बचत होणार आहे व शहराच्या सौदर्यातही वाढ होणार आहे. तसेच शासन मान्य संस्थेव्दारे साहित्य खरेदीमुळे आर्थिक बचतही होणार आहे.त्यामुळे सदर कार्यवाहीसाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात पथदिवे देखभाल दुरुस्ती साठी 2 कोटी मात्र तरतुद केलेली आहे. तथापी ईएसएल कंपनी मार्फत शहरात एलईडी पथदिवे बसविण्याची कार्यवाही प्रस्तावीत असल्याने सदर तरतुद 1 कोटी मात्रने कमी करणेत येत आहे.

त्याच बरोबर धुळे महानगरपालिका कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग लागू करण्यांचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने आवश्यक तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

याच बरोबर ईगर्व्हनर्स,विकास कामांची प्रलंबीत देयके,आपत्ती व्यवस्थापन,वृक्ष निधी, महिला व बालकल्याण निधी,आर्थिक व दुर्बल घटकांसाठी असणारा निधी,अपंग व दिव्यांग यांच्यासाठी असणारा राखीव निधी यासाठीही अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

14 व्या वित्त आयोग योजनेतील प्रस्तावित कामे:- स्वच्छ व सुंदर धुळे शहरासाठी मनपा मार्फत विविध उपक्रम राबविण्यांत येत आहेत. यासाठी 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत 2 जे.सी.बी. मशिन घेणे तसेच पोकलॅन्ड, स्विपर मशिन,हातगाडया, डस्टबीन तसेच पाण्याचे टॅकर घेणे व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मान्यता देण्यात येत असुन सदरचा खर्च 14व्या वित्त आयोगातुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच 14व्या वित्त आयोगाच्या निधीतुन शासन निर्देशानुसार वृक्ष लागवड व अन्य बाबींसाठी करावयाची अनुषंगीक कामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आरएफआयडी प्रणाली कार्यान्वीत करणे:- यामध्ये संगणकीय प्रणाली अंतर्भूत असून यात प्रत्येक घरामध्ये संगणकीय चीप बसविण्यात येणार आहे. सदर चीपमध्ये शासनाच्या विविध योजनेची माहिती संग्रहीत केली जाणार असून त्या माध्यमातून प्रशासनाच्या विविध सेवांवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. सदर सेवामध्ये घंटागाडीचे घरस्तरावरील नियंत्रण, आरोग्याच्या विविध योजन कर संकलन,कर आकारणी व तसेच अनुषंगाने असणा-या योजनांवर संगणकीय प्रणालीव्दारे मदत होणार आहे.सदरचा उपक्रम तत्कालीन प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी श्री.राहुल रेखावार यांच्या संकल्पनेनुसार कार्यान्वीत करण्यांत येत असून त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मागील 3 वर्षातील झालेल्या तरतूदी व प्रत्यक्ष मिळालेले महसूली उत्पन्न याचा अभ्यास केला असता हा अर्थसंकल्प वस्तूनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा आहे.त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी प्रशासनाकडूनही सक्षमतेने व प्रामाणिकपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे.एकत्रित मालमत्ता कर, वाढीव मालमत्तावरील कर आकारणी, दुकान भाडे, दुकान हस्तांतरण फी, पाणीपट्टी वसुली,

विकास शुल्क, अनाधिकृत टॉवर दंड आकारणी हे धुळे महानगरपालिकेचे प्रमख्य उत्पन्नाची साधने आहेत.या उत्पन्न वाढीसाठी अधिकारी कर्मचारी तसेच पदाधिकारी व नगरसेवक बंधु भगिंनी यांनी एकत्रित व समन्वयाने प्रयत्न करणे गरजेचे आहे व यासाठी नागरीकांचे सहकार्य महत्वाचे आहे.

मनपाचे आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी प्रभावीपणे व कार्यक्षमपणे कार्यवाही प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे.यासाठी मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळयांचे सर्व्हेक्षण करुन भाडे आकारणी तांतडीने कार्यवाही करावी. तसेच मुदत संपलेल्या गाळयांचे नियमाप्रमाणे फेर लिलाव केल्यास मनपाच्या आर्थिक स्त्रोत वाढ होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत तांतडीने कार्यवाही करावी. मनपाच्या मोकळया जागा ताब्यात घेणे, नवीन वाढीव बांधकामझालेल्या मालमत्तांना कर आकारणी करणे,कमर्शियल वापर असलेल्या दुकान व घरांना कमर्शियल तत्वाने कर आकारणी करणे, मोबाईल टॉवर वरील दंड व व्याज आकारणी,शहरातील मनपा जागांवरील प्रस्तावित व्यापारी संकुलांबाबत जलद गतीने कार्यवाही या सारख्या बाबींमधून मनपाच्या आर्थिक स्त्रोतात निश्चितच वाढ होणार आहे.त्याच प्रमाणे बखळ जागाचा शोध घेवून त्यावर नियमाप्रमाणे का आकारणी झाल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होवू शकते.

तसेच शहरात दैनंदिन प्रवासासाठी अनेक ट्रॅव्हल्स प्रवेश करतात मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने या ट्रॅव्हल्सवर प्रवेश फी आकारल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शौचालय देखभाल दुरुस्तासाठी अंदाजपत्रकात 25 लक्ष मात्र तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तथापी सदरचा खर्च 14व्या वित्त आयोगा अंतर्गत होत असल्याने सदरची तरतुद 20 लक्ष मात्र ने कमी करण्यात येत आहे.

याच बरोबर ट्रक टर्मिनस सुरु करणे,अनधिकृत नळ कनेक्शन धारकांवर दंडात्मक कार्यवाही करणे, नवीन बांधकामांवर विकास शुल्क वसुलीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, मोबाईल टॉवर तपासणी करणे, महानगरपालिकेच्या भंगार साहित्यांचा लिलाव करणे या सारख्या माध्यमातूनही मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे.

सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षात धुळे शहर विकासाच्या दृष्टीने विविध शासकीय योजना व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी पाणीपुरवठा योजना.
२) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा राबविणे.
३) हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत विकास कामे करणे.
४) धूळमुक्त धुळे शहर ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे.
५) धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांकावर राहण्यात यशस्वी झाली असून माता बालसंगोपन, क्षयरोग निर्मूलन,एनयुएचएम व विविध लसीकरण यासारख्या कार्यक्रमांमध्ये भविष्यातही आघाडीवर राहण्याचा संकल्प आहे.
६) एनयुएचएम अंतर्गत नवीन दवाखाने विकसित करणे.
७) राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत महिलांच्या बचत गटांचे बळकटीकरण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

८) नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत तसेच दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व विशेष घटक योजनेचे प्रकल्प राबविणे.

९) शहरातील वितरण व्यवस्था नियोजनासाठी खासगी सल्लागार नियुक्त करून संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्याचे री-इंजीनियरिंग करणे.

१०) शहरात हरित क्षेत्रांचा विकास करणे.

११) कॅन्सर सारख्या दुर्धर रोगास बळी पडणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी व्यसनमुक्तीसाठी भरीव काम करणे.

१२) धुळे शहरात संपूर्ण एलईडी पथदिवे बसविणे.

१३) जवाहर स्टेडियम नुतनीकरण करणे.

१४) मनपा शाळा मॉडेल स्कुल बनविणे.

१५) वॉटर पार्क व अवधान येथे विज्ञान प्रदर्शन केंद्र निर्माण करणे.

१६) ईगव्हर्नस प्रणाली बळकटीकरण करणे व कर वसुली प्रणाली ऑनलाईन करणे .

१७) अमृत योजने अंतर्गत शहरातील हरित क्षेत्राचा विकास करणे.(पिराची टेकडी, अवधान येथील क्षेत्र,डेडरगांव तलाव जवळील क्षेत्र, तसेच मनपा मालकीच्या विविध जागावर)

१८) आरएफआयडी प्रणाली कार्यान्वीत करणे.

१९) 14 व्या वित्त आयोग योजने अंतर्गत नवीन जे.सी.बी. मशिन, पोकलॅन्ड,स्वीपर मशिन,हातगाडया, डस्टबीन तसेच पाण्याचे टँकर व अनुषंगिक साहित्य खरेदी करणे.

यासाठी सर्व पदाधिकारी गटनेते आणि अधिकारी आपल्याला येत्या हप्त्यामध्ये इंदौर दौऱ्यांला जावयाचे आहे. इंदौर शहर आज भारतात स्वच्छतेच्या बाबतीत एक नंबरवर असल्याने तेथे गेल्यावर आपल्याला कळेल की, धुळे शहर कसे स्वच्छ व सुंदर करण्यासाठी कोणत्या पध्दतीने व कोणत्या गोष्टींचा वापर करता येईल. तेथील नागरीक कसे जागृत आहेत, अधिकारी - कर्मचारी कशा पध्दतीने वागतात त्यामुळे आपण तो दौरा घोषीत केलेला आहे. शहराची विकास उंची गाठुण इंदौर शहराप्रमाणे एक नामांकित शहर बनु शकते. यासाठी सर्व पदाधिकारी, अधिकारी सन्मा. सदस्य यांचा सहवास लाभेल असा मला विश्वास आहे.

म. हर्षकुमार रेलन — महापौर महोदय, आजची आपली बजेट सभा आहे. या सभेसंदर्भात अ,ब,क बजेट अंदाजपत्रक अगोदरच आम्हांला अभ्यासासाठी देण्यात आलेले आहे. आणि त्या संदर्भात आपण जे विवेचन केले.आपल्या धुळे शहरासाठी फार चांगल्या योजना आहेत. मात्र मला एक सुचवावेसे वाटते. या अंदाजपत्रकात बॅलेन्सशिटच जोडले गेले नाही. कुणी कसा अभ्यास करेल याचा आणि ही सभा आज कशी काय घेतली गेली. बॅलेसशिट नसल्यामुळे आपण कुठे आहोत. आपले शहर मागच्या वर्षी कुठे होते. आपले ॲसेस किती वाढल्या किंवा किती कमी झाल्या कामे झालेत की नाही? आणि दुसरा प्रश्न याच अनुषंगाने सांगतो कि, आपण हे महसुली जमा जे दिलेले आहे. त्यामध्ये २०१८-१९ चा जो महसुली जमा आहे त्यामध्ये १० लाखाची तरतुद असतांना सुध्दा आपण २१ कोर्टीच्या मुदतठेवीज्या होत्या त्या आपण कॅश केल्या आहेत.

म. उप.मु.ले.प. — २०१८-१९ मध्ये आपल्याला १० लाखांचीच तरतुद होती.

म. लेखा परिक्षक — काढुन घेतले नाही. त्याची पुर्नगुतंवणुक केली जाते.

म. हर्षकुमार रेलन — पुर्नगुंतवणुक केली जाते मग आपल्याला जे ३ कोटी व्याज मिळते त्याची तरतुद २०१९-२० मध्ये शुन्य का केलेली आहे. त्याला आपण रिनिवल केले तर १९-२० मध्ये ते कायम दिसले पाहिजे. २०१८-१९ मध्ये ते ३ कोटी रुपये दर वर्षीव्याज दिसत आहे. मग २०१९-२० ला ते शुन्य का? याचा अर्थ ते कुठे तरी वापरले गेले. ते वापरा बरोबर कायद्याने असतील पण तरतुद १०

लाखाची असतांना आपण २१ कोटी रुपये कसे काय काढुन घेतले किंवा रिनिवल केले असेल तर यात व्याज दिसले पाहिजे.

म. उप.मु.ले.प. सर आपण जे आपले इतर निधी आहेत. त्यासाठी आपण ती गुतंवणुक केलेली असते. आणि शासनाने बंधनकारक केले आहे.म्हणुन निर्गुंतंवणुक केली आहे. जेव्हा दरवर्षी आपली मुदतठेव पुर्ण होते .त्या वेळेला जो व्याजदर असेल त्याप्रमाणे ती वाढ पुढे जाऊन पुर्नगुंतवणुक केली जाते. आपल्याला बँक कोणता व्याज दर देईल हे माहिती नसते म्हणुन टोकण म्हणुन आपण रक्कम ठेवलेली असते. आणि ती रक्कम आपण डिसेंबर महिन्यामध्ये दाखवितो.

म. हर्षकुमार रेलन आपल्याकडे त्या ठेवी आहेत का?

म. उप.मु.ले.प. होय त्या ठेवी आपल्याकडे आहेत.

म. हर्षकुमार रेलन आपण ठेवीचे रोखीकरण केले आहे.

म. उप.मु.ले.प. रोखीकरणाशिवाय गुंतवणुक होत नाही. पहिले आपण मा. आयुक्तांची मान्यता घेतो. आणि गुंतवणुकीची पण त्याच वेळेला मान्यता घेतो. हे ऑडीटच्या पध्दतीने आणि शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

म. हर्षकुमार रेलन मग यामध्ये व्याजाची तरतुद का केली गेली नाही? म्हणजे कमी व्याज दर ठेवलेला आहे का ?

म. उप.मु.ले.प. शासनाच्या नियमानुसार बँकेच्या धोरणानुसार हे दर दिलेले असतात.आपण त्यात कॉम्पीटेशन बसवितो. आपल्याला जी बँक जास्त व्याज देते त्याठीकाणीच आपण गुंतवणुक करतो.आणि त्यांची रितसर मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात येत असते. वेळोवळी त्याच्याबाबतची कार्यवाही सर्व नियमाप्रमाणे करण्यात आलेली असते.

म. हर्षकुमार रेलन पहिला माझा प्रश्न होता. बँलेन्सशीट आपण जोडलेली नाही. मला तर उत्तर माहित आहे तुमचे. डबल अकाँन्टींग करत असतांना तीन वर्षा पुर्वी आपल्याला जेव्हा २० लाख रुपये मान्य केले या सभागृहाने मग ते का करण्यात आले नाही. येथे बँलेन्सशीट नाही कोणत्याही नगरसेवकाला अभ्यासच करता येणार नाही. तुम्हांला ती एन्ट्री करण्यासाठी बँलेनशिट तयार होईल त्याकरीता २० लाख रुपये अगोदरच अदा केलेले आहे. २०१७-१८ पासुन ते मान्य करणेत आले आहेत याच बजेट मध्ये मग ते का झाले नाही. तीन वर्षात इतके साधे काम आपल्याला का जमले नाही ?

म. उप.मु.ले.प. २०१३ पासुन आपल्याला डबल एन्ट्रीं सिस्टीम ठेवण्याचा १३ वा वित्त आयोग होता. त्याच्या शिफारशी पैंकी एक महत्वाची अट महानगरपालिकेसाठी होती. परंतु शासनाने ते निर्देश देत असतांना जी प्रचलीत आताची आपली सिंगल एन्ट्रीं सिस्टीम म्हणजे आपले जे लेखे ठेवले जातात ते आपण ऐकेरी नोंद पध्दतीने ठेवतो. म्हणजेच सिंगल एन्ट्रीं सिस्टीमनुसार ठेवतो. परंतु त्याची डबल एन्ट्रींची पण नोंद सुरवात करावी आणि ते पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी त्या-त्या महानगरपालिकेची असेल. या हिशोबाने कार्यवाहीला प्रस्तावीत केले. आणि आपण महानगरपालिकेत त्याला सुरवात पण केली. त्यासाठी आपण एक रितसर सावता & सावता एक नाशिकची कंपनी आहे. त्यांची नेमणुक केली. त्यांच्या नेमणुकीप्रमाणे त्यांनी कामाला सुरवातही केली. साधारणत: २०१६-१७ते १७-१८पर्यंत त्यांनी याचे कामही पुर्ण केले आहे. पंरतु मी आपल्या निदर्शनासआणुन देतो. की त्यांनी आपल्याला स्मरण पत्र क्रमांक ११ दि. १४/०५/२०१९ रोजी दिले आहे. त्यात लिहले आहे की, द्विनोंद पध्दतीकरीता खालील माहिती मिळणे बाबत. त्यांनी १ ते २९ जे फॉर्म दिले आहेत ते अद्याप पर्यंत संबंधीत कार्यालयाकंडुन भरुन झालेले नाहीत. त्यातील महत्वाचे म्हणजे ज्या भागात विविध भौगोलिक मालमत्ता व इतर मालमत्ता यांची मुल्यांकनाची रक्कम फॉर्म क्रंमाक १ ते २९ स्वरुपात मागणी करण्यात आलेली असुन अद्याप तरी त्याची पुर्तता करण्यात आलेली नाही. त्यामुळे बेरीज पत्रकात

रक्कम घेण्यात अडचणी येत असुन अंतिम अहवाल तयार करण्यास विलंब होत आहे असे त्यांनी स्पष्ट आपल्या महानगरपालिकेला कळविलेले आहे. याबाबत लेखा विभागाने संबंधीत विभागांकडुन हे विवरण पत्र तात्काळ भरुन मागविले आहे.परंतु त्याची कार्यवाही अद्याप प्रलंबीत राहिल्यामुळे डबल एन्ट्री सिस्टीमचे बॅलेन्सशिट आपल्यापुढे देता आले नाही.

म. हर्षकुमार रेलन — महापौर महोदय,या बॅलेन्सशिट मुळे आपल्याला कळेल की, शहरात मालमत्ता किती आहेत आणि विकासाकरीता आपण किती पैसा देणार आहोत,आपली इस्टेट किती आहे त्याशिवाय आपल्याला बजेट मिर्टींग मध्ये फारशे काही ठोस करता येणार नाहीत.

म. महापौर — कोणते कोणत्या विभागाकडुन बाकी आहेत?

म. उप.मु.ले.प. — नगररचना विभागाने आपल्या महानगरपालिकेच्या जेवढया स्तावर मालमत्ता आहेत. त्यांचे, या इमारतीचे मुल्यांकन सादर करणे आवश्यक आहे.आणि याचा फायदा म्हणजे शासनाकडुन जेव्हा आपण विविध योजना,निधी उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करतो. आणि साहेबांनी सांगीतल्या प्रमाणे जर बॅलेन्सशिटला ॲसेस्ट वाढत असतील तर शासनाकडुन मिळणाऱ्या निर्धीमध्ये प्रंचड प्रमाणात वाढ होवु शकते.

म. हर्षकुमार रेलन — महापौर महोदय, यातुन आपल्याला १०० कोटींचे लोन सहज मिळु शकेल. साधेशे बॅलेन्सशिट बनविले गेले नाही. म्हणुन आपण महापालिकेचे किती मोठे नुकसान करित आहोत.

म. महापौर — सर्वात महत्वाचे धुळे शहरामध्ये महानगरपालिकेच्या जेवढया मालमत्ता आहेत. त्या जर महानगरपालिकेच्या ताब्यातआल्या आणि त्यांचे अंदाज तयार केले तर धुळे महानगरपालिका ही सर्वात श्रीमंत महापालिका होवु शकते. या गोष्टीला दुर्लक्ष केल्यामुळे आपली मालमत्ता काय आहे. त्यांची किंमत काय हे आपल्याला कळु शकले नाही. यासाठी जी उपाययोजना करता येईल ती त्वरीत करावी. मा.आयुक्तांना सांगण्यात येते की, महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत. त्यांचे मुल्यांकन करुन ॲसेस्ट तयार करावे.

म. सुनिल बैसाणे — महापौर महोदय,सन्मा.सदस्यांनी आताच सांगितले बजेटमध्ये बॅलेन्सशीट जोडले गेले नाही. बॅलेन्सशीट नसल्याने आपण नमुद केलेल्या बाबी लक्षात घेता येणाऱ्या काळात अडचणींचे निरसण संबधीत अधिकाऱ्यांनी करुन देणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे. मी आपले अभिनंदन करतो आपण या अंदाजपत्रकात धुळे महापालिकेचे करदात्यांवर बोजा पडणार नाही यासाठी प्रयत्न केलेत. महापालिकेच्या विविध विभागांमध्ये जी आपण दुरुस्ती करतो त्यातुन जे भंगार जमा होते. त्या जमा झालेल्या भंगाराची लिलाव पध्दत असते आणि त्यातुन उत्पन्न मिळत असते. परंतु माझ्या निदर्शनास आले आहे की, भंगार जमा एका ठिकाणी होते. त्यात मनपाचे हित जपले जात नाही. त्याचे कारण असे की १७/०९/२०१८ मध्ये पुण्य नगरी आणि मर्डर या वृत्तपत्रांमध्ये होते की, भंगार लिलाव झाला, त्यात भंगारचे एकत्रीकरण हे किती वर्षाचे होते याची माहिती दिसत नाही. आणि त्यातुन २८,६,७२८/- हे मनपाच्या तिजोरीमध्ये जमा झाले आहेत. ती रक्कम कुठे जमा आहे किंवा त्यातुन कोणते विकास कामे करण्यात आले याचा उल्लेख कुठे ही दिसत नाही. नगरपालिका असतांना महापालिकेच्या अधिरेख्यात असणाऱ्या ज्या पाणी पुरवठयाच्या योजना होत्या त्यामध्ये बीड जिल्हयात ज्या पाईपलाईन चा वापर केला जातो त्या पाईपलाईन धुळे जिल्ह्यात होत्या त्या पाईपलाईन्स् ला अनेक वर्ष झाल्याने त्या नादुरुस्त केल्या गेल्या. तसेच जी लिलाव प्रक्रिया १ वर्षासाठी किंवा किती याची स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. यामध्ये भंगाराचे साहित्य जुन्या मोटर्स, पाईपहिल किंवा नादुरुस्त पाण्याचे ट्रँक्टर त्यामध्ये नमुद केले आहे. त्या भंगाराच्या माध्यमातुन पन्नास लाखांचे उत्पन्न आपल्याला अपेक्षित आहे परंतु ते दिसत नाही. तसेच मनपा हद्दीत अनेक मोबाईल टॉवर्स आहेत. त्यांच्या माध्यमातुनही मनपाला भरपुर उत्पन्न मिळु शकते परंतु त्यातही आपल्याला

भरपुर त्रुटी आढळुन येतात. साधारणत: ८ ते ९ लाखांचे उत्पन्न दर महिन्याला यातुन मिळेल असे माझे प्राथमिक मत आहे. परंतु वृत्तपत्रात आलेल्या माहिती नुसार टॉवर धारकांकडे कोटयावधी रुपयांची थकबाकी असल्याचे समजते. मनपा कडे फक्त १२५ ते १३० टॉवर्सची नोंद आहे. एका मोबाईल टॉवर्सकडुन अनेक कंपन्या कनेक्शन घेतात. उदा. म्हणजे वोडाफोन कंपनी म्हणजेच अधिकृत नोंद असल्याने आपण त्यांच्याकडुन कर घेत असतो पंरतु त्यातुन तीन ते चार कंपन्यांनी कनेक्शन घेत असतात. यांचा शोध घेण्याचे काम मनपा करण्याचे काम मनपा कर्मचाऱ्यांचे आहे. मी संबंधीत वसुली विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना सांगु इच्छितो की, कोणकोणत्या मोबाईल्स टॉवर ची अधिकृत नोंद आहे याची माहिती जमा करावी. महापौर महोदय, टॉवर्स च्या मध्यमातुन दर वर्षी कमीत-कमी २ कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेच्या तिजोरीत जमा होईल याची नोंद घेतली पाहिजे. तसेच मनपा मालकिच्या ज्या ओपन स्पेस आहेत त्या आपण काही संस्थाना नाममात्र दराने दिलेल्या आहेत. संस्थानी ज्या उद्देशाने मनपा मालकीचे ओपन स्पेस घेतले होते त्या माध्यमातुन उत्पन्न मिळणे आवश्यक होते पंरतु यात अटी व शर्तीं चे उल्लंघन होत आहे. ग.न. १ ते ६ मधील ज्या जागा आहेत त्या कमरशियल गाळे तेथे झालेले आहे. हे संबधीत कर्मचाऱ्यांच्या लक्षात येत नाही का ? कार्हीच्या लक्षात आल्या तरीही कार्यवाही केलेली नाही.तसेच आपण मनपा तर्फे गांडुळ खत प्रकल्प आपण राबवित असतो. गांडुळ खत प्रकल्पासाठी मनपाचा खर्च जास्त प्रमाणात होतो पण त्यातुन योग्य ते उत्पन्न मिळत नाही. या गांडुळ प्रकल्पामध्ये ७ कर्मचारी ठेकेदारचे काम करतात. त्या कर्मचाऱ्यांना आपण मनपा कडुन ३७७ रु रोजाप्रमाणे आपण पगार देतो. येथे मनपा ची विज वापरण्यात येते. मनपाचे ३ कर्मचारी काम करतात. जे गांडुळ खत तयार झाले त्यातुन पंधरा ते वीस लाख रुपयांचे आहे. पंरतु आपण त्याची जाहीरात करत नाही. म्हणुन आपले ते पंधरा ते वीस लाखांचे आपले नुकसान होत आहे. महापौर महोदय तुम्हांला एक सांगावेसे वाटते दर वर्षी जो कचऱ्याचा भाग आहे त्याला आग लागते ती कुणा विरोधक किंवा कर्मचाऱ्यांकडून लावली जाते असा समज असतो परंतु आपण कचरा जमा करतो त्या ठिकाणी नॅचरल गॅस तयार होतो. आणि ओला व सुका कचऱ्याचे मिश्रण झाल्या नंतर पासळयातही तेथे आग लागण्याची शक्यता असते. त्याचे कारण तेथे मिथेन गॅस तयार झालेला असतो. तसेच जो कचरा दिवसभरातुन संकलन करुन एका ठिकाणी जमा होत असतो. तेथे एक जेसीबी २४ तास असणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठ्याच्या अनेक तक्रारी येत असतात आपल्या धुळे मनपा मध्ये चंद्रपुर मनपा प्रमाणे प्रकल्प तयार करा त्याचे कारण म्हणजे गळती, अवैध कनेक्शन त्यांची दुरुस्ती त्या प्रकल्पात नमुद आहेत. त्यामध्ये जी वसुल होणारी रक्कम आहे. तीच्या २ टक्के रक्कम जी एजन्सी शासनमान्य आणि कायदेशीर असेल अशा एजन्सीला पाचारण केले तर ते महापालिकेचे हिताचे होणार आहे. तसेच जे व्यापारी गाळे यांच्या कडुनही महापालिकेला उत्पन्न मिळणार आहे. तसेच उत्पन्ना बाबत सांगत असतांना काही तरतुदी कमी देखील केल्या पाहिजेत. यामध्ये पायाभुत सुविधा अंतर्गत २५ लाखांची तरतुद कमी करुन ५ लाख करावी. या तरतुदी मध्ये शौचालयांचे मेन्टंनन्स असतो आणि आपण हे ठेकेदारांच्या माध्यमातुन करीत असतो. १४ व्या वित्त आयोगातुन त्याचा खर्च देखील होतो. सद्य स्थितीत विद्युत विभागाची तक्रार जास्त येत आहे. यासाठी आपण २ कोर्टीची तरतुद आपण २०१९-२० च्या अंदाजपत्रकात केली आहे. ती एक खाजगी ठेकेदाराला दिलेली आहे. त्या ठेकेदारा संदर्भात अनेक तक्रारी झालेल्या आहेत. महापालिकेचे हित जपण्यासाठी आपण ईएसएल कंपनीला ठेका दिलेला आहे. आणि त्याकंपनी मार्फत धुळे शहराचे मेंन्टनन्सं आपण करणार आहे. आता जी तरतुद केली आहे. ती कमी करुन १ कोटी

करण्यात यावी. आणि ऐनवेळी सभेत जो विषय येतो त्या विषयासाठी आणि महापौरांनी एखाद्या दुर्गम भागात दौरा केला आणि मागणी केली तर त्यासाठी कोणतीही तरतुद यात केलेली नाही. तसेच मनपाच्या विकासासाठी जसे नगरसेवक महत्वाचे आहेत. तसेच अधिकारी वर्ग देखील महत्वाचे आहेत. तुमच्या पध्दतीशिवाय आम्ही विकासकामे करु शकत नाही. आम्ही पाच वर्षानंतरही सभागृहात सदस्य राहु याची खात्री आम्ही देत नाही. परंतु धुळे शहरही तुमचे काही देणे लागते. महापालिकेचे हित जपत असतांना नगरसेवकांचा ही मान-सन्मान झाला पाहिजे. अशी मी विनंती करतो.

म. संजय जाधव — महापौर महोदय, बजेटचा विषय आहे. मी मागे ही सुचविले होते की, अर्थसंकल्प तयार करतांना एखाद्या C.A.ची मदत आपण घेतली पाहिजे होती. परंतु पुढील वर्षा पासुन C.A च्या मदतीने आपला अर्थसंकल्प तयार करण्यात यावा. शहर हद्दवाढी मुळे रस्ते, गटारी, पथदिवे अशा सुविधा देण्याची जबाबदारी वाढलेली आहे. मागच्या पंचवार्षीकला धुळे महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत त्यांचा मी गोषवारा तयार करुन मी महासभेपुढे मांडला होता. मनपा मालकीच्या शेकडो कोटींच्या जागा आहेत ताब्यात घेतल्या तर दरमहा कोटयावधी रुपयांचे उत्पन्न मिळेल आणि विकासासाठी लागणारा पैसा उपलब्ध होईल.तसेच मोहाडी भागातील आपल्या मालकीचे ट्रॅकटर्मिनल बांधुन आज दोन वर्ष पुर्ण झाले आहेत. त्यातुनही उत्पन्न मिळेल परंतु मला खुलासा पाहिजे की, ट्रॅक टर्मिनलचा विषय अजुन पेंडींग का आहे. उत्पन्न वाढीचे विषय असे पेंडींग राहीले तर आपल्याला अडचणी सुटणार नाहीत. तरी उत्पन्न वाढीच्या दृष्टीने कार्यवाही करणेत यावी.

म. महापौर — ट्रॅक टर्मिनल बीओटी किंवा लिलाव पध्दतीवर आपल्याला द्यावयाचे आहे. कालच या विषयावर चर्चा झाली असुन मा. उपायुक्तांकडे त्या विषयाची फाईल्स देण्यात आली आहे.

म. संजय जाधव — मनपा मालकीचे शॉपिंग सेंटर भाडेपोटी थकबाकी जवळ-जवळ दोन ते अडीच कोटीं आहे. त्याविषयावरही आपण थोडे लक्ष द्यावे. तसेच शासनाने सातवा वेतन आयोग मंजुर केलेला आहे. कर्मचाऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे. परंतु कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ही योग्य पध्दतीने पार पाडली पाहिजे.आपण शिष्टमंडळासोबत इंदौर शहरात जाणार आहोत परंतु मला वाटते आपण मुंबई महापालिकेलाही भेट दिली पाहिजे तिथे लाखांच्या वर कर्मचारी असतांना सुध्दा नियोजन बध्द साफ-सफाईचे काम होत असते. परंतु आपल्याकडे कमी कर्मचारी असुनही साफ-सफाई योग्य प्रकारे होत नाही. शॉपिंग सेंटर, थकबाकी वसुली का होत नाही या विषयांचा गांभिर्याने विचार करावा अशी सुचना करतो.

म. साबिर शेख — महापौर महोदय, पालिकेच्या उत्पन्ना विषयी सर्व सन्मा. सदस्यांनी सुचना केल्यात त्यांचे मी अभिनंदन करतो. माझी एक विनंती आहे हा कचरा संकलन करणारा ठेकेदार कुठला आहे काय आहे त्याला माती उचलण्याचा ठेका दिला आहे का ? करारात दिलेल्या अटीं आणि शर्तींचे तो उल्लघंन करत आहे. याबाबत खुलासा करणेत यावा.

म. शितल नवले — महापौर महोदय, आपल्या महापालिकेला विभागीय आयुक्त आणि मा. कलेक्टर साहेबांनी पत्र दिले आहे. त्यामध्ये स्पष्ट देण्यात आले आहे मागचे जे ठेकादारांचे पेमेंन्ट आहे ते दिल्याशिवाय पुढील कोणतीही कामे करावयाचे नाही. आज आपण या बजेट मध्ये नगरसेवक विकास निधी १० लाख उपलब्ध करुन दिला आहे. माझी अशी एक सुचना होती दर महिन्याला आपले जे कलेक्शन होते आपल्या जर ६ ते ६.५ कोटींचे समजा पालिकेकडुन काम करावयाचे असेल तर प्रत्येक महिन्यातुन निश्चित असा काही हिस्सा त्यात टाकला पाहिजे आणि त्यातुन ठेकेदारांचे बिल अदा झाली तरच यापुढे आपल्याकडे विकास कामे होतील. जे पाच सहा वर्षांची जुनी बिले आहेत नविन आयुक्त साहेब आले की ते सांगतात

आमच्या काळातील बिले निघतील मागची निघणार नाहीत हे कुठ पर्यंत चालणार आहे तर या वर्षापासुन आपण एक वेगळे अकाऊक्टं तयार करुन त्यातुन प्रत्येक ठेकेदाराला दरमहा त्यांची बिले अदा केले तर आपले विकास कामे होतील ते रखडले जाणार नाहीत. तसेच आपण या वर्षी बीओटी माध्यमातुन उत्पन्न जे आपल्याला प्रस्तावित आहे. फक्त ७५ लाख तरतुद दिसते आणि माझ्या हिशोबाने मागच्या महासभेत ४० कोटींचे एक प्रपोझल दिले होते. असे प्रपोझल वर्कआऊट करुन आपले उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील याची आपण नोंद घेतली तर निश्चितच करोडोंचे उत्पन्न मिळु शकते. तसेच केंद्र शासनाकडुन नुकताच जी.आर. प्राप्त झाला आहे की, नोव्हेंबर महिन्यापर्यंत १९ लाख कुटुंबांना घरकुल द्यावयाचे आहेत ज्यांच्याकडे घर नाहीत. परंतु या बजेट मध्ये तशी काही तरतुद दिसत नाही. तसेच आपल्याकडे टी.डी.आर कायदा लागु झाला आहे. आणि आपल्याकडे हौसिंग सोसायटी साठी रिझर्वेशन आले आहे. मी महापौर साहेब आपल्या माध्यमातुन एक अवाहन करतो. आपल्याकडील सर्व्हे नं आपल्यासगळयांना माहित आहे. अजुन लोकांपर्यंत हा प्रचार प्रसार झालेला नाहीय. तर आपण ते सर्व्हे नं मार्क आऊट करुन त्या लोकांना बोलावुन त्या जागा आपल्याकडे हस्तांतरण करा ज्यातुन आपल्याला चांगले उत्पन्न मिळेल. जी.आर मध्ये असे म्हटले आहे की, शासकिय, निमशासकिय म्हणजे म्हाडा, सिडको किंवा प्रायव्हेट बिल्डर्सला १ रु. दराने जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. जेणेकरुन आपल्या मा. पंतप्रधान महोदयांचे स्वप्न आहे प्रत्येकाला घर मिळाले पाहिजे तर आपल्या धुळे शहरातुन त्याचा हातभार लागेल. महापौर महोदय मी आपल्याला विनंती करतो अश्या जागांचा सर्व्हे करा नगररचनाकार साहेबांना आपण जर आदेशीत केले तर लवकरात –लवकर ते विषय मार्गी लागू शकतात.

म. अमिन पटेल — महापौर महोदय,मी स्थायी समिती सभेत सांगीतले होते की जेवढे बाहेरील प्रभाग आहेत. म्हणजेच जामचा मळा, अंबिका नगर , मिल परिसर, सुरत बायपास या भांगामध्ये विकास कामे झाले नाहीत. आता पाऊस सुरु झाला आहे. आपण स्वत: जावुन बघा तिथे चालायला रस्ता नाहीय. १० लाख निधीमधुन एक रस्ता देखील होवु शकत नाही. तर प्रभागाचा विकास कसा होणार. महापौर महोदय, जेवढे शहरातील बाहेरचे भाग आहेत त्या भागांसाठी २५ ते ३० लाख रु. नगरसेवक निधी द्यायला पाहीजे. तेथील लोक २५ ते ३० वर्षापासुन तेथे वास्तव्य करत आहेत. त्या भागात गटारीची व्यवस्था नाही. तेथील लोक गटारीतील सांडपाणी हाताने बाहेर काढतात अशी परिस्थिती आहे. नगरोत्थान निधी आली तर आप-आपल्या वार्डात खर्च केला जाईल. मग या भागांचा विकास कसा होणार? तसेच १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत जेसीबी, सर्व स्वच्छता अभियान, हागणदारी मुक्त या मध्ये ५० % शौचालयांचे काम झालेले आहे. सबका साथ सबका विकास परंतु असे असतांना अल्पसंख्यांक निधी फक्त १० लाख रु.मिळणार आहे ही अतिशय अपमानाची बाब आहे. महापौर महोदय अल्पसंख्याक निधी साठी मनपाचा ठराव करुन ती ५० लाखापर्यंत करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. तसेच स्मशान भुमी आणि कब्रस्तान मी मागे पण मोमीन कब्रस्तान साठी १० ते २० लांखची तरतुद झाली होती. ती तरतुद होवुनही ते काम झाले नाही. तेथील लोकांनी वर्गणी जमा करुन कब्रस्तानाचे काम पुर्ण केले. तसेच आमच्या मोमीन कब्रस्तानाचा दरवाजा तुटला आहे त्यासाठी कमीत कमी २० लाख रुपयांची तरतुद अंदाजपत्रकात केली पाहिजे. म. नगरसचिव साहेब २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात नगरसेवक निधी किती होती याचा खुलासा करणेत यावा.

म. नगरसचिव — पहिल्या टप्यात १० लाख नतंर उत्पन्नाचा आढावा घेवुन १० लाख रु. देणार होतो.

म. अमिन पटेल — अंदाज पत्रक चार महिने उशिराने सादर झाले आहे. आता विधानसभा आचारसंहिता लागेल तीन महिने आमचे विकास कामे थांबतील त्यानंतर आम्हांला ही निधी मिळेलच याचा ठोस पुरावा पाहिजे.

म. महापौर — १० लाख निधीसाठी स्पेशल अकाऊन्टं तयार करुन त्यात ती निधी जमा करणेत येईल.

म. अमोल मासुळे — महापौर महोदय, मनपाच्या उत्पन्न वाढी बाबत मनपा हद्दीत व आग्रा रोड संपुर्ण परिसरात जे हॉकर्स धारक आहेत त्यांच्या कडुन आपण १० रु. दररोज वसुल करीत असतो. तसेच नदीकाठी दररोज १३० ते १४५ ट्रॅव्हल्स ट्रॅव्हल्सपॉईंटला उभ्या राहतात ते एका पॅसेंजरचे प्रवास भाडे ६०० ते ७०० रु. वसुल करीत असतात. आपण सामान्य कुटुंबातील हॉकर्स धारकांकडुन जर मनपा कर वसुल करते तर या ट्रॅव्हल्स मनपा हद्दीतुन पास होत असतात त्यांचे एका दिवसाचे उत्पन्न ४० ते ५० हजारा पर्यंत असते. तर त्यांच्याकडुन देखील मनपा करा पोटी एक ट्रॅव्हल्स धारकाकडुन ३०० ते ४०० रु वसुल केले तर ३० ते ४० हजाराचे उत्पन्न एका दिवसासाठी महापालिकेला मिळेल. तसेच वर्षाला १ ते १.५ कोटी कायम स्वरुपी मिळणार आहे. याबाबत माहितीचे संकलन करुन उत्पन्न वाढीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच मनपा हद्दीत अनेक मंगलकार्यालय आहेत ते सर्वसामान्य नागरिकांकडुन क्रार्यक्रमांची न पेलवणारी रक्कम वसुल करत असतात. आणि कार्यक्रम संपल्यानंतर उरलेले, उष्टे अन्न मनपाच्या एखाद्या मोकळया जागी टाकतात. आणि ते उचलण्याचे कार्य मनपा माध्यमातुन करावे लागते तर याची देखील माहिती घेवुन त्यांना जर ५०० ते १००० रु. पर्यंत मनपा कर लावला तर तेही उत्पन्न वाढीसाठी उपयोगी ठरणार आहे.तसेच आग्रारोड, देवपुर जे कमर्शियल भाग आहेत या ठिकाणी अनेक मोठ मोठे व्यापारी लोक राहत असतात त्याठिकाणी २ ते ३ मजली इमारती आहेत. ते ३ मजल्यावर राहतात आणि २ मजले एक ते दिड लाखापर्यंत भाडयाने दिले आहेत. पण त्यांना आकारलेली घरपट्टी ही त्यांनी रेसीडेन्शल लावुन घेतली आहे. याचा सर्व्हे आपण केला या माध्यमातुन करोडो रुपयांचे वार्षिक उत्पन्न मनपाला मिळु शकेल. महापौर महोदय माझी विनंती असेल मी सुचविलेल्या मुद्दयांवर विचार करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

म. हिरामण गवळी — महापौर महोदय, वर्षभरामध्ये आपण आपल्या शहरासाठी काय करु शकतो या संदर्भात सन्मा. सदस्य श्री. संजय जाधव आणि श्री. हर्षकुमार रेलन यांनी अभ्यासपुर्वक मुद्दे मांडले आहेत. मी मागच्या सभेत सांगितले होते की, मनोहर टॉकीज च्या मागची जागा ही मनपा मालकीची आहे ती शासनाला भाडेतत्वावर दिली आहे किंवा कसे याची माहिती घेण्यात यावी. ती जर मनपाला परत मिळाली तर त्याठिकाणी आपण चांगले शॉपिंग कॉम्पलेक्स करण्यासाठी आणि तसेच ५ नं शाळेचे उभारणार आहोत त्याला जर जोडले तर त्या माध्यमातुन मनपाला चांगले उत्पन्न मिळु शकेल. तसेच आपण ठराव करुन एकविरा देवीजवळचे सामाजिक भवन ४ हजार रुपये भाडयाने दिले आहे. आणि ते एका लग्नाचे २० ते २५ हजार भाडे घेतात. यामुळे महापालिकेचे उत्पन्न घटत आहे. तसेच धुळे महापालिकेत कधीच भंगार निघत नाही ? आज पर्यंत गाड्यांचे भंगार नाही, पाईप नाही कोणतीच वस्तु भंगार मध्ये जात नाही. तरी याबाबत चौकशी करुन कार्यवाही करणेत यावी. तसेच मा. पंतप्रधान आणि मा. मुख्यमंत्री साहेबांनी सांगीतले आहे. जिथे तुम्ही राहत असाल अतिक्रमण चे घरे असतील उदा. मनमाड जीन, काझीप्लॉट, सुभाष पुतळयाच्या मागच्या बाजुपासुन ते मेहबुब सुबानी हा अतिक्रमीत पट्टा आहे. या ठीकाणी राहणारे हे जुने अतिक्रमक धारक हे जुने अतिक्रमक धारक नसुन त्यांनी त्या काळात घेतलेले घरे आजही त्यांच्या नावावर होवु शकले नाही. फक्त इमारत त्यांच्या नावावर आहे. जी व्यक्ती राहत असेल त्याला जर आपण

कायमस्वरुपी नावावर करुन दिले तर आपल्या घरपट्टीच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच संपुर्ण भारत देशामध्ये महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात सर्वात जास्त घरकुल योजना मंजुर झालेल्या आहेत.१८९०० घरकुल धुळे जिल्ह्यात मंजुर झाले आहे. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्याकडे पाण्याच्या, स्वच्छतेचा, आरोग्याचा प्रश्न आहे त्यासाठी समित्या नेमण्यात येवुन कार्यवाही करण्यात यावी.

म. वंदना भामरे — महापौर महोदय, काल आपल्या धुळे शहरात एक विद्यार्थीनिचा अमानुष बळी गेला याला कारण असे की वाहतुकीच्या नियमांचे पालन होत नाही. ज्या ठिकाणी आवश्यक आणि योग्य वाटेल त्या ठिकाणी सिग्नल ची व्यवस्था करणेत यावी. ट्रॅव्हल्स पॉईन्ट आणि ट्रॅक टर्मिनल एका ठिकाणी उभारले गेले पाहिजे. म्हणजे हे वाहने एका ठिकाणी येतील आणि त्यांना कर आकारला जाईल याचा मनपाला फायदा होईलच आणि नागरीकांनाही त्रास होणार नाही. तसेच सन्मा. सदस्यांनी ट्रॅव्हल्सला कर आकारण्याचा प्रश्न उपस्थित केला तो योग्य आहे परंतु त्याचा कोणताही बोजा प्रवार्सीवर येणार नाही याची दक्षता घ्यावी. भाग ३ क चे साधारण निलंबन लेखे मुळ अंदाजपत्रक जे आपण जाहिर केले आहे. अ व ब भांडवली कामे त्यात ३ मुद्दा जो आहे. नविन अथवा हद्दवाढ कामे इथे शासनाने सुचविलेला अंदाज ०० आणि मे. स्थायी समिती शिफारस ०० असे दिसत आहे. याचा खुलासा करणेत यावा.

म. संजय भिल — महापौर महोदय, अदिवासी समाजासाठी जी ५% निधी आहे त्याबाबत शासननिर्णया नुसार तरतुद करणेत यावी.

म. उप.मु. ले.प. — स्वतंत्र अदिवासी समाजासाठी नाही पंरतु निर्णयात आर्थिक दुर्बल घटकांसाठी ५% निधी असा उल्लेख आहे. म. महापौरांनी ठरविले तर होऊ शकते.

म. प्रतिभा चौधरी — महापौर महोदय, प्रत्येक वेळेला तरतुदी केल्या जातात. परंतु अंमलबजावणी होतांना दिसुन येत नसते. २०१८-१९ मध्ये सभापती बालीबेन मंडोरे यांनी थोर महापुरुषांच्या स्मारक जिथे-जिथे असतील त्या ठिकाणी शीडी लावण्यासाठी २५ लाखाची तरतुद केली होती परंतु अंमलबजावणी अजुन झालेली नाही. २०१९-२० मध्ये ही तरतुद परत करण्यात यावी. तसेच माझ्या प्रभागात संभाजी गार्डन मध्ये संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी मी तसेच सन्मा. सदस्य श्री. संजय जाधव यांनी ही पत्र दिले होते. तसेच मराठा समाजाचे नेते श्री. मनोज मोरे, श्री. राणा कदम यांनी देखील त्यासाठी पाठपुरावा केलेला आहे. संभाजी महाराजांचा पुतळा बनविण्याचा प्रश्न शासन दरबारात अंतिम टप्यावर आहे. मान्यता मिळाल्यावर ते काम करणार आहोत त्यासाठी ५० लाखांची तरतुद करण्यात बजेट मध्ये करण्यात यावी तसे पत्र देखील मी दिलेले आहे. तसेच एकविरा मातेच्या स्वागत कमान मागे आहे ती मागे असल्याने बाहेरुन येणाऱ्या नागरीकांना लवकर लक्षात येत नाही त्यासाठी साईबाबा मंदिराजवळ भव्य दिव्य असे स्वागत कमान उभारण्यात यावे यासाठी ५० लाखाची तरतुद करणेत यावी. तसेच एकविरा मातेच्या मंदिराजवळ जी जागा आहे तेथे मंगल कार्यालय होणे गरजेचे होते. परंतु तेथे गार्डन तयार झालेले आहे तेथे शेड टाकुन मनपाचे उत्पन्न वाढणार आहे. आणि त्या प्रभागातील नागरीकांची सोय देखील होणार आहे. तसेच माझ्या प्रभागातील भांडपुरा भाग हा अल्पसंख्यांक नागरीकांचा आहे. तेथे अजुन पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन सुध्दा झालेली नाही. आणि अंदाजपत्रकात पाईप लाईनसाठी कुठलीही तरतुद केलेली नाही. तसेच आपण मुन्सीपल कॉलनी भागात नवीन पाईपलाईन करणे खुप गरजेचे आहे. आणि तसे मी पत्र देखील दिलेले आहे. माझी विनंती आहे अल्पसंख्याक निधी १० लाखांच्या ऐवजी २५ लाख रु. आणि नवीन पाईपलाईनसाठी २५ लाख रु. तरतुद करणेत यावी.

म. महापौर — सन्मा. सदस्यांना सांगु इच्छितो की, आपण महत्वाचे विषय सुचविले आहे. त्यात एकविरा मातेजवळ सामाजिक भुवन उभारण्यासाठी इस्टीमेट तयार झाले आहे. तसेच संभाजी पुतळया संदर्भात मंत्रालय मुंबई येथील कार्यालयातुन येत्या दोन दिवसात परवानगी मिळणार आहे. आणि त्या नंतर जिल्हाधिकारी साहेबांचीही परवानगी मिळणार आहे. आणि संभाजी महाराजांचा भव्य प्रमाणात पुतळा उभारला जाणार आहे. तसेच महत्वाचे म्हणजे सर्वसाधारण आणि मध्यमवर्गीयांना एखादे मंगल कार्यालय भाड्याने घ्यावयाचे असेल तर त्यांची रक्कम त्यानां न पेलवणारी असते म्हणुन मनपा मालकीच्या ज्या मोक्याच्या जागा आहेत ज्या पडुन आहेत त्या जागेवर आपल्याला सामाजिक भवन उभारावयाचे आहेत. अधिकाऱ्यांसोबत देखील याबाबत चर्चा झालेली आहे. तरी याबाबत कार्यवाही करणेत येईल.

म. रावसाहेब पवार — महापौर महोदय, शहराच्या हद्दीमध्ये मोठ मोठया हॉटेल्स आहेत आणि त्यांचे शेड आहेत आणि त्याचा वापर कमर्शियल रित्या करीत आहेत. त्यांचे रुपांतर टॅक्स मध्ये कसे करता येईल कृपया याची नोंद घ्यावी.

म. किरण कुलेवार — महापौर महोदय, माझ्या प्रभागात सिंचन भवन समोर गुंजन पाटील नावाच्या एका शाळेकरी विद्यार्थीनीचा अपघाती मृत्यु झाला आहे.सदरचा रस्ता चांगला झाला आहे. परंतु माझी अशी मागणी आहे की, या रस्त्यावर टप्या-टप्यांने गतिरोधक टाकण्यात यावे.आणि जे जड वाहने आहेत त्यांना शहर हद्दीत येण्यात बंदी घालण्यात यावी.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय,आज कारगील विजय दिन साजरा होत आहे. त्या निमित्त सर्व सन्मा.सदस्यांना शुभेच्छा आणि शहीद झालेल्या जवानांना अभिवादन. जो बजेट सादर झालेला आहे त्यामध्ये स्थायी समितीने १०१ कोटी ५७ लाखाचा शिलकी बजेट सादर केला आहे. हा बजेट सादर करत असतांना १२ कोटींच्या उत्पन्नाच्या बाजु सुचविलेल्या आहेत व खर्चाच्या बाबी या ११ कोटीं ३६ लाख सुचविलेल्या आहेत. तसेच २० लाखाची तरतुद ही कमी करण्यात आली आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी उत्पन्नाच्या बाजु आणि तरतुदी सुचविल्या आहेत. माझी अशी विनंती आहे. की उत्पन्नाच्या बाजु जास्त सुचविल्या गेल्या पाहिजेत. त्यामध्ये अग्नीशामक दलाचे जे कार्य असेल कलम ३८६ (२) महाराष्ट्र प्रतिबंधक जिवनावश्यक उपाययोजना इमारत व बंदइमारत कंपनी, हॉटेल, गोदाम, फटाके कारखाने, रॉकेल एजन्सी, पेट्रोल पंप, दारुचे कारखाने, व्यापारी संकुल इ. ठिकाणी अग्निशामक सेवा पुरविणे. सेवा पुरवीत असतांना त्यांना नाहरकत दाखला देणे व जे चार्जेस आहेत ते कार्यालयाने वसुल केले आहेत की नाही याचीही माहीती द्यावी. जेणेकरुन उत्पन्नाची बाजु आपल्याला समजेल. तसेच आपण मालमत्ता मॅनेजर म्हणुन श्री. सोनार साहेब यांची नेमणुक केली होती. त्यांनी आता पर्यत किती मालमत्ता शोधुन काढल्या याचीही सविस्तर माहिती द्यावी. तसेच विविध विभागातील अधिकारी यांनी आतापर्यंत किती उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केले आहेत याचीही माहिती द्यावी.

म. महापौर — सोनार साहेब शासकिय माहिती देण्यासाठी बाहेरगावी गेलेले आहेत. सदरची माहिती पुढील वेळेस देण्यात येईल.

म. नागसेन बोरसे — सर्वसाधारण व्यवसाय कर हा प्रत्येक दुकानाला लागु असतो तो ५०० रु. च्या स्वरुपात असेल किंवा ३०० रु. च्या स्वरुपात असेल.सन्मा. सदस्यांनी सुचविले आहे की, शहरात थांबा घेणाऱ्या ट्रॅव्हल्सला कर आकारण्यात यावा पण मी त्यांना सांगु इच्छितो जनरल व्यवसाय कर या माध्यमाने ट्रव्हल्स वाल्यांना १३०० रु. फी दरवर्षाला आकारली जाते ती आकारली गेली नाही. ती आकारण्यात यावी. तसेच धुळे मनपा मध्ये ७० हजारापेंक्षा जास्त मालमत्ता आहेत आता पर्यंत किती मालमत्तांना टॅक्स लावणेत आला आहे ? याचीही माहिती देण्यात यावी.

तत्कालीन उपायुक्त श्री. पठारे साहेब असतांना रोजनिशी बिलींग वाटप होते त्यावेळेस भरणा कमी आल्यामुळे कर्मचाऱ्यांना दंड आकारण्यात आला होता. आणि तो कर्मचाऱ्यांच्या पगारातुन वसुल करणेत आला होता.आज वसुली विभागातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे महानगरपालिकेचे १५ ते २० कोटींचे दर वर्षी नुकसान होत आहे. तसेच मी. स्थायी समितीला उत्पन्नची बाजु सुचविली होती. पेठ भागात जे गाळे, दुकाने, मॉल असतील यांच्या वसुली साठी २५ लोकांची टीम तयार करुन सर्वे करण्यात यावा परंतु यासाठी खाजगी ठेकेदाराला काम न देता कायम कर्मचाऱ्यांची नेमणुक करुन मदतीसाठी मानधनतत्वावर भरती करणेत यावी कारण मागच्या वेळेस एजन्सीला काम दिल्यामुळे त्यांनी नागरीकांकडुन पैसे घेवुन चुकीची आकारणी केलेली आहे. यात स्थानिक नागरीकांची पिळवणुक केली होती.त्यावेळेस असे झाले नसते तर १५ते २० कोटी रु. आपल्याला त्या वेळेस उत्पन्न मिळाले असते. महिन्या भराच्या आत कर्मचाऱ्यांनी कार्यवाही केली नाही तर यांनीही दंड लावण्यात यावा. तसेच महापौर महोदयांना तरतुदीसाठी जे पत्र दिले आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

म. महापौर सन्मा. सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारच्या सुचना व उत्पन्नवाढीच्या बाबी सुचविल्या या सुचनांचा आदर ठेवुन सर्व सामान्यजनता आणि धुळेकर नागरीक यांच्यावर भार पडणार नाही. यादृष्टीने उत्पन्नवाढीसाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत व याबाबत प्रशासनाशी चर्चा करुन जमा व खर्चाचा ताळमेळ लक्षात घेवुन अंदाजपत्रक तरतुदीबाबत विचार करणेत येईल. उक्त नुसार सन २०१८-१९ चे सुधारीत व २०१९-२०२० चे अंदाज पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५१ दिनांक २६/०७/२०१९

प्रशासनामार्फत तसेच स्थायी समिती मार्फत संतुलित अंदाजपत्रक सादर करण्यांत आलेले आहे.आचार संहितेमुळे अंदाजपत्रक मान्यतेस विलंब झालेला आहे.

आपल्या धुळे शहरास मोठा इतिहास आहे.आपले शहर जरी रचनाबध्द असले तरीही शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रितीने राखण्यासाठी शहर कमी पडलेले आहे.परंतु भाजपाची सत्ता महानगरपालिकेवर प्रथमच आलेली आहे.आम्ही आमच्या वचननाम्यात शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना प्रस्तावित केलेल्या होत्या व त्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडवणीस तसेच जलसंपदा मंत्रा मा.ना. श्री. गिरीषजी महाजन, आपले खासदार श्री. सुभाषबाबा भामरे, पर्यटन मंत्री मा.ना. श्री.जयकुमारजी रावल, भाजपा महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांच्या सहकार्याने धुळे महानगरपालिकेस शासनामार्फत विविध योजना व अनुदान प्राप्त झालेले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे असलेले मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत व उत्पन्न वाढीस पडणा-या मर्यादा यामुळे अनेक विकास कामे करण्यांस अडचणी निर्माण होतात. धुळे मनपाकडेस सुमारे22 कोटी मात्रचे विकास कामांचे देयके प्रलंबीत आहेत.तसेच तापी पाणीपुरवठा योजनेचे कर्ज व व्याजाचा बोजा आहे.तथापि शासनाकडील विविध अनुदानाव्दारे यावर मात करण्यांचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

शहराचे एकुणच मूल्याकन पाहता या अंदाजपत्रकात नागरीकांवर कोणत्याही प्रकारची कर वाढ सुचविण्यांतआलेली नाही. महानगरपालिकेचा अत्यावश्यक बाधील खर्च वजा जाता मिळणारे उत्पन्न अत्यंत मर्यादितअसल्याने सद्यस्थितीत स्थायी समिती मार्फत प्रस्तावित

करण्यांत आलेली नगरसेवक निधीसाठी प्रत्येकी 10 लक्ष मात्र तरतूद कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शहराच्या मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांबरोबरच शहराचा सर्वांगिण विकास होणे आवश्यकअसल्याने क्रिडा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमासाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रभागातील विकास कामे मनपा निधीतून करणे शक्य होत नसल्याने राज्य स्तरीय सुवर्णजयंती नगरोत्थान योजना,जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक योजना,तसेच शासनाच्या विविध विकास योजनांच्या अनुदानातून विकास कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.तसेच हद्दवाढ झालेल्या गावांसाठीही सुमारे 150 कोटी रुपयांच्या मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला आहे. या सर्वबाबींसाठी आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करावा लागणार आहे. सदर हिस्सा भरण्यासाठी आवश्यक ती तरतूद मनपा अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी दैनंदिन उत्पन्नातून ठरावीक रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करणेबाबत मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

शहरासाठी जिवनदायी ठरणारी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना,तसेच शहरासाठी महत्वपूर्ण असणारी भूमिगत गटार योजना या महत्वाकांक्षी योजनां साठीही मनपा हिस्साअदा करावा लागणार आहे.त्यासाठीही अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

भविष्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर नकाणे व डेडरगांव तलाव येथील पाणी साठा संपुष्टात आल्यास भविष्यात शहरास तापी नदीव्दारे पाणी पुरवठा करण्यांचे नियोजन करावे लागणार आहे. यासाठीही आवश्यक ती तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शहरात शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण शहरातील विद्युत पोलवर एलईडी पथदिवे बसविण्यांची कार्यवाही प्रस्तावित आहे यामुळे मनपाच्या विद्युत देयकात 50 टक्के बचत होणार आहे व शहराच्या सौदर्यातही वाढ होणार आहे. तसेच शासन मान्य संस्थेव्दारे साहित्य खरेदीमुळे आर्थिक बचतही होणार आहे.त्यामुळे सदर कार्यवाहीसाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात पथदिवे देखभाल दुरुस्ती साठी 2 कोटी मात्र तरतुद केलेली आहे. तथापी ईएसएल कंपनी मार्फत शहरात एलईडी पथदिवे बसविण्याची कार्यवाही प्रस्तावीत असल्याने सदर तरतुद 1 कोटी मात्रने कमी करणेत येत आहे.

त्याच बरोबर धुळे महानगरपालिका कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग लागू करण्यांचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.त्याअनुषंगाने आवश्यक तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

याच बरोबर इंगर्व्हनर्स,विकास कामांची प्रलंबीत देयके,आपत्ती व्यवस्थापन,वृक्ष निधी, महिला व बालकल्याण निधी,आर्थिक व दुर्बल घटकांसाठी असणारा निधी,अपंग व दिव्यांग यांच्यासाठी असणारा राखीव निधी यासाठीही अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

14 व्या वित्त आयोग योजनेतील प्रस्तावित कामे:- स्वच्छ व सुंदर धुळे शहरासाठी मनपा मार्फत विविध उपक्रम राबविण्यांत येत आहेत. यासाठी 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत 2 जे.सी.बी. मशिन घेणे तसेच पोकलॅन्ड, स्विपर मशिन,हातगाडया, डस्टबीन तसेच पाण्याचे टॅकर घेणे व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मान्यता देण्यात येत असुन सदरचा खर्च 14व्या वित्त आयोगातुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच 14 व्या वित्त

आयोगाच्या निधीतुन शासन निर्देशानुसार वृक्ष लागवड व अन्य बाबींसाठी करावयाची अनुषंगीक कामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच 14 व्या वित्त आयोग योजनेतून शहरात महत्वाच्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छता गृह बांधणे, व हद्दवाढ झालेल्या गावात सार्वजनिक शौचालय उभारणे,हद्दवाढ झालेल्या गावातील 14 व्या वित्त आयोगाच्या शिल्लक निधीमधून विकास कामे करणे याबाबींना मान्यता देण्यांत येत आहे.

आरएफआयडी प्रणाली कार्यान्वीत करणे:- यामध्ये संगणकीय प्रणाली अंतर्भूत असून यात प्रत्येक घरामध्ये संगणकीय चीप बसविण्यात येणार आहे. सदर चीपमध्ये शासनाच्या विविध योजनेची माहिती संग्रहीत केली जाणार असून त्या माध्यमातून प्रशासनाच्या विविध सेवांवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.सदर सेवामध्ये घंटागाडीचे घरस्तरावरील नियंत्रण, आरोग्याच्या विविध योजन कर संकलन,करआकारणी वतसेच अनुषंगाने असणा-या योजनांवर संगणकीय प्रणालीव्दारे मदत होणार आहे.सदरचा उपक्रम तत्कालीन प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी श्री.राहुल रेखावार यांच्या संकल्पनेनुसार कार्यान्वीत करण्यांत येत असून त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मागील 3 वर्षातील झालेल्या तरतूदी व प्रत्यक्ष मिळालेले महसूली उत्पन्न याचा अभ्यास केला असता हा अर्थसंकल्प वस्तूनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा आहे.त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी प्रशासनाकडूनही सक्षमतेने व प्रामाणिकपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे.एकत्रित मालमत्ता कर, वाढीव मालमत्ता वरील कर आकारणी, दुकान भाडे, दुकान हस्तांतरण फी, पाणीपट्टी वसुली, विकास शुल्क, अनाधिकृत टॉवर दंड आकारणी हे धुळे महानगरपालिकेचे प्रमख्य उत्पन्नाची साधने आहेत.या उत्पन्न वाढीसाठी अधिकारी कर्मचारी तसेच पदाधिकारी व नगरसेवक बंधु भगिंनी यांनी एकत्रितव समन्वयाने प्रयत्न करणे गरजेचे आहे व यासाठी नागरीकांचे सहकार्य महत्वाचे आहे.

मनपाचे आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी प्रभावीपणे व कार्यक्षमपणे कार्यवाही प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे.यासाठी मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळयांचे सर्व्हेक्षण करुन भाडे आकारणी तांतडीने कार्यवाही करावी. तसेच मुदत संपलेल्या गाळयांचे नियमाप्रमाणे फेर लिलाव केल्यास मनपाच्या आर्थिक स्त्रोत वाढ होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत तांतडीने कार्यवाही करावी. मनपाच्या मोकळया जागा ताब्यात घेणे, नवीन वाढीव बांधकामझालेल्या मालमत्तांना कर आकारणी करणे,कमर्शियल वापर असलेल्या दुकान व घरांना कमर्शियल तत्वाने कर आकारणी करणे,मोबाईल टॉवर वरील दंड व व्याज आकारणी, शहरातील मनपा जागांवरील प्रस्तावित व्यापारी संकुलांबाबत जलद गतीने कार्यवाही या सारख्या बाबींमधून मनपाच्या आर्थिक स्त्रोतात निश्चितच वाढ होणार आहे.त्याच प्रमाणे बखळ जागाचा शोध घेवून त्यावर नियमाप्रमाणे का आकारणी झाल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होवू शकते.

तसेच महानगरपालिकेस शासनाकडून जीएसटी अनुदान प्राप्त होते. यात प्रशासनाने 92 कोटी 92 लक्ष रुपये अनुदानाचे उत्पन्न दर्शविलेले आहे. तथापि शासनाकडून दरमहा 8.34 कोटी मात्र अनुदान प्राप्त होत आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात 100.08 कोटी मात्र उत्पन्न प्राप्त होणार आहे.त्या अनुषंगाने या अंदाजपत्रकात 7 कोटी 16 लक्ष मात्रने वाढ दर्शविण्यांत येत आहे.

तसेच शहरात दैनंदिन प्रवासासाठी अनेक ट्रॅव्हल्स प्रवेश करतात मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने या ट्रॅव्हल्सवर प्रवेश फी आकारल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शौचालय देखभाल दुरुस्तासाठी अंदाजपत्रकात25 लक्ष मात्र तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तथापी सदरचा खर्च 14व्या वित्त आयोगा अंतर्गत होत असल्याने सदरची तरतुद 20 लक्ष मात्र ने कमी करण्यात येत आहे.

याच बरोबर ट्रक टर्मिनस सुरु करणे,अनधिकृत नळ कनेक्शन धारकांवर दंडात्मक कार्यवाही करणे,नवीन बांधकामांवर विकास शुल्क वसुलीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, मोबाईल टॉवर तपासणी करणे, महानगरपालिकेच्या भंगार साहित्यांचा लिलाव करणे या सारख्या माध्यमातूनही मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे.

सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षात धुळे शहर विकासाच्या दृष्टीने विविध शासकीय योजना व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी पाणीपुरवठा योजना.

२) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा राबविणे.

३) हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत विकास कामे करणे.

४) धूळमुक्त धुळे शहर ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे.

५) धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांकावर राहण्यात यशस्वी झाली असून माता बालसंगोपन, क्षयरोग निर्मूलन, एनयुएचएम व विविध लसीकरण यासारख्या कार्यक्रमांमध्ये भविष्यातही आघाडीवर राहण्याचा संकल्प आहे.

६) एनयुएचएम अंतर्गत नवीन दवाखाने विकसित करणे.

७) राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत महिलांच्या बचत गटांचे बळकटीकरण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

८) नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत तसेच दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व विशेष घटक योजनेचे प्रकल्प राबविणे.

९) शहरातील वितरण व्यवस्था नियोजनासाठी खासगी सल्लागार नियुक्त करून संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्याचे री-इंजीनियरिंग करणे.

१०) शहरात हरित क्षेत्रांचा विकास करणे.

११) कॅन्सर सारख्या दुर्धर रोगास बळी पडणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी व्यसनमुक्तीसाठी भरीव काम करणे.

१२)धुळे शहरात संपूर्ण एलईडी पथदिवे बसविणे.

१३) जवाहर स्टेडियम नुतनीकरण करणे.

१४) मनपा शाळा मॉडेल स्कुल बनविणे.

१५) वॉटर पार्क व अवधान येथे विज्ञान प्रदर्शन केंद्र निर्माण करणे.

१६) ईगव्हर्नस प्रणाली बळकटीकरण करणे व कर वसुली प्रणाली ऑनलाईन करणे .

१७) अमृत योजने अंतर्गत शहरातील हरित क्षेत्राचा विकास करणे.(पिराची टेकडी, अवधान येथील क्षेत्र,डेडरगांव तलाव जवळील क्षेत्र, तसेच मनपा मालकीच्या विविध जागावर)

१८) आरएफआयडी प्रणाली कार्यान्वीत करणे.

१९) 14व्या वित्त आयोग योजने अंतर्गत नवीन जे.सी.बी. मशिन, पोकलॅन्ड, स्वीपर मशिन, हातगाडया, डस्टबीन तसेच पाण्याचे टँकर व अनुषंगिक साहित्य खरेदी करणे.

जमा बाजू

अ.नं.	लेखाशिर्ष	मे.स्थायीसमितीने सुचविलेल्या शिफारसी	मे. महासभेने सुचविलेल्या शिफारसी	वाढ	घट
१	जीएसटी अनुदान	९२,९२,००,०००	१००,००,०८,०००	७,१६,००,०००	
२	अवैध नळ कनेक्शन दंड वसुली	०	२,००,००,०००	२,००,००,०००	
३	जमीन विकास शुल्क	५,००,००,०००	६,००,००,०००	१,००,००,०००	
४	नवीन मालमत्ता कर आकारणी व नवीन हद्दीवाढ गांवातील नवीन दर	१०,००,००,०००	१२,७६,००,०००	२,७६,००,०००	
५	अवधान येथील ७५एकर जागेवर विज्ञान प्रदर्शन व अद्ययावत सामाजिक भुवन उभारणे.(शासन अनुदान)	०	१,००,००,०००	१,००,००,०००	

खर्च बाजू

अ.नं.	लेखाशिर्ष	मे.स्थायीसमितीने सुचविलेल्या शिफारसी	मे.महासभेने सुचविलेल्या शिफारसी	वाढ	घट
१	आरएफआयडी यंत्रणा कार्यान्वीत करणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
२	अवधान येथील ७५एकर जागेवर विज्ञान प्रदर्शन व अद्ययावत सामाजिक भुवन उभारणे.(शासन अनुदान)	०	१,००,००,०००	१,००,००,०००	
३	मनपा जीम व टर्फग्राऊंड (बंदिस्त खेळाचे मैदान) तयार करणे ,	०	५०,००,०००	५०,००,०००	
४	वॉटर पार्क तयार करणे	०	५०,००,०००	५०,००,०००	
५	इंग्रजी शाळा शिक्षक / सेवक मानधन	०	२०,००,०००	२०,००,०००	
६	महापौर व आयुक्त निवास स्थान उभारणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
७	सामाजिक भुवन उभारणे	०	७५,००,०००	७५,००,०००	
८	व्यापारी संकुल उभारणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
९	विविध योजनासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्ती	५०,००,०००	१,००,००,०००	५०,००,०००	
१०	शहरातील जवाहर स्टेडियम नुतनीकरण करणे	०	१५,००,०००	१५,००,०००	
११	प्रभाग समित्या व विषय समित्यांसाठी तरतूद	०	२०,००,०००	२०,००,०००	
१२	बाहययंत्रणेमार्फत कर्मचारी नियुक्ती	०	२५,००,०००	२५,००,०००	
१३	ओपन स्पेसच्या बाजूला चर खोदणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
१४	भविष्यातील पाणी टंचाईसाठी तरतूद	०	१५,००,०००	१५,००,०००	
१५	अग्नीशमन विभाग इंधन खरेदी	११,००,०००	२०,००,०००	९,००,०००	
१६	अतिक्रमण विभाग पोलीस बंदोबस्त	५,००,०००	१०,००,०००	५,००,०००	
१७	शहरातील मनपा शाळा मॉडेल स्कूल तयार करणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
१८	जेसीबी भाडे तरतूद	५,००,०००	२०,००,०००	१५,००,०००	
१९	महापौर केसरी कुस्ती स्पर्धा	०	३०,००,०००	३०,००,०००	
२०	शहरात एलईडी पथदिवे बसविणे	०	५०,००,०००	५०,००,०००	
२१	नवीन जलकुंभ बांधणे	०	२०,००,०००	२०,००,०००	

२२	संत नरहरी महाराज व राजे संभाजी पुतळयांच्या चबुतरा बांधणे	०	७५,००,०००	७५,००,०००	
२३	चौक सुशोभिकरण व नुतनीकरण करणे राणा प्रताप चौक, बसवेश्वर चौक इ.	०	२५,००,०००	२५,००,०००	
२४	मागील विकास कामांचे प्रलंबीत देयके	१,००,००,०००	३,००,००,०००	२,००,००,०००	
२५	मागील आर्थिक वर्षात कार्यादेश दिलेल्या कामांचे देयके अदा करणे (स्पील ओव्हर)	०	१,००,००,०००	१,००,००,०००	
२६	शहरातील व नेहरु नगर भागात अंतर्गत रस्ते तयार करणे	३०,००,०००	८०,००,०००	५०,००,०००	
२७	शहरात नवीन विद्युत पोल बसविणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
२८	एकविरा देवी मंदिर गांधी चौक,शिवाजीरोड येथे प्रवेशव्दार उभारणे	०	७५,००,०००	७५,००,०००	
२९	नवीन चेंबर बसविणे व चेंबर दुरुस्ती	०	२०,००,०००	२०,००,०००	
३०	सांस्कृतिक उपक्रम कार्यक्रम	०	२०,००,०००	२०,००,०००	
३१	भाजी मार्केट विकसीत करणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
३२	महात्मा गांधी चौक येथे ध्वजस्तंभ उभारणे	०	७०,००,०००	७०,००,०००	
३३	पथदिवे व साहित्य खरेदी	२,००,००,०००	१,००,००,०००		१,००,००,०००
३४	शौचालय निगा व दुरुस्ती	२५,००,०००	५,००,०००		२०,००,०००

उक्त नमूद केलेल्या बाबींसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दर्शविण्यांत आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरुपाची तरतूद असून सर्बंधित विभागांनी याबाबत मार्च २०२०अखेर प्रत्यक्ष होणा-या रकमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करुन सुधारीत अंदाजपत्रक माहे डिसेंबर २०१९ च्या सुधारीत अंदाजपत्रकात करुन घेणे आवश्यक असेल या अटीवर नमूद तरतूदी करण्यांत येत आहेत.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व उत्पन्न वाढीच्या मुद्दयांची नोंद घेवून तसेच जमा व खर्च यांचा ताळमेळ लक्षात घेवून त्यानुसार वरील प्रमाणे अंदाजपत्रकात वाढ व घट करण्यांत आलेली असून सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२०२०चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.०७ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
शनिवार दिनांक ७ सप्टेंबर २०१९
वेळ -सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा आज शनिवार **दिनांक ०७/०९/२०१९ रोजी सकाळी ११-०० मा.श्री.चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यंत आली.त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
३	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
४	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
५	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
७	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
८	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
९	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१०	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
११	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१२	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१३	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१४	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१५	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१६	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१७	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१८	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
१९	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२०	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२१	श्रीमती महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
२२	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------

२३	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२४	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२५	श्रीमती.मंडोरे वालीबेन प्रकाशचंद्र	सदस्य	----------" ---------
२६	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
२७	श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
२८	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
२९	श्री. कर्पे प्रदिप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३०	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
३१	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३२	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३४	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
३५	श्रीमती. अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
३६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
३७	श्रीमती.जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
३८	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
३९	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
४०	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४१	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
४२	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
४३	श्री. मासुळे अमोल पाववा	सदस्य	----------" ---------
४४	श्रीमती. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
४५	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
४६	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
४७	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
४८	श्रीमती. अग्रवाल सारिका प्रविन	सदस्या	----------" ---------
४९	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५०	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
५१	श्रीमती. पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
५२	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५३	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५४	श्री. मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५५	श्री. महाले संदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५६	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा. आयुक्त	----------" ---------

३	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
७	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
८	श्री. मधुकर पवार	आरोग्याधिकारी	----------" ---------
९	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१२	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ---------
१३	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
१४	श्री गितेश सोनार	विद्युत विभाग	----------" ---------
१५	श्री. महेंर्द जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ---------
१६	श्री.भटू महानर	लिपीक भांडार विभाग	----------" ---------
१७	श्री. के.आर. चव्हाण	लिपीक अभिलेख विभाग	----------" ---------
१८	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
१९	श्री. राजेश वसावे	मलेरिया विभाग	----------" ---------
२०	श्री. विशाल निंबाळकर	वृक्ष प्राधिकरण विभाग	----------" ---------
२१	श्री. गणेश खोडे	एन.यु.एच.एम. व्यवस्थापक	----------" ---------
२२	श्री. रमजान अन्सारी	आस्थापना प्रमुख	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा. उपमहापौर सौ.कल्याणीताई सतिष अंपळकर, सभागृह नेते श्री. कांतीलाल माणिकराव दाळवाले, सन्मा.सदस्या सौ.ज्योस्त्ना प्रफुल्ल पाटील, सौ.विमलबाई गोपीचंद पाटील, सौ. हेमा अनिल गोटे,सौ.स्नेहल मनोज जाधव, सौ.वैशाली भिकन वराडे,सौ. किरण राकेश कुलेवार,सौ.योगिता प्रशांत बागुल, सौ.सुरेखा चंद्रकांत उगले, श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे,श्री.संजय सुधाकर जाधव श्री. बान्सीलाल माणिक जाधव, शशी सुधाकर मोगलाईकर, सोनल दिलीप शिंदे इ. सदस्यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्जा सादर केले आहेत.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५२ दिनांक ०७/०९/२०१९

सन्मा.उपमहापौर सौ. कल्याणीताई सतिष अंपळकर,सभागृह नेते श्री. कांतीलाल माणिकराव दाळवाले,सन्मा.सदस्या सौ.ज्योस्त्ना प्रफुल्ल पाटील,सौ. विमलबाई गोपीचंद पाटील, सौ. हेमा अनिल गोटे, सौ.स्नेहल मनोज जाधव, सौ.वैशाली भिकन वराडे,सौ. किरण राकेश कुलेवार,सौ.योगिता प्रशांत बागुल, सौ.सुरेखा चंद्रकांत उगले, श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे, श्री.संजय सुधाकर जाधव श्री. बान्सीलाल माणिक जाधव, शशी सुधाकर मोगलाईकर, सोनल दिलीप शिंदे इ. सदस्यांनी त्यांचे अर्जात

नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्जा सादर केले आहेत. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

सन्मा.सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी.

लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा देशात एनडीए अर्थात भाजपा प्रणीत सरकार आले आहे. यात देशाचे पंतप्रधान मा. श्री.नरेंद्रजी मोदी यांनी देशातील जनतेला दिलेल्या वचनाची पूर्तता केली असून अखंड भारत देशासाठी केंद्रीय गृहमंत्री मा.श्री. अमित भाई शाह यांनी लोकसभेत जम्मू काश्मीर या राज्याला दिलेला विशेष दर्जा देणारे कलम ३७० आणि ३५अ रद्द करुन नवीन केंद्रशासीत प्रदेशाची घोषणा केली. यामुळे देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र भाई मोदी आणि सर्व मंत्री मंडळ तसेच या विशेष ठरावासाठी पाठींबा देणा-या सर्व राज्यसभा आणि लोकसभा सदस्य यांचे मनपूर्वक हार्दीक अभिनंदन करण्यांत यावे.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

महापौर सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार जम्मू काश्मीर या राज्याला दिलेला विशेष दर्जा देणारे कलम ३७० आणि ३५अ रद्द करुन नवीन केंद्रशासीत प्रदेशाची घोषणा केली. याबद्दल मा. पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी व केंद्रीय गृहमंत्री मा. श्री. अमितजी शाह व लोकसभा व राज्यसभा सदस्यांचे अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५३ दिनांक ०७/०९/२०१९

लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये पुन्हा देशात एनडीए अर्थात भाजपा प्रणीत सरकार आले आहे. यात देशाचे पंतप्रधान मा. श्री.नरेंद्रजी मोदी यांनी देशातील जनतेला दिलेल्या वचनाची पूर्तता केली असून अखंड भारत देशासाठी केंद्रीय गृहमंत्री मा.श्री.अमित भाई शाह यांनी लोकसभेत जम्मू काश्मीर या राज्याला दिलेला विशेष दर्जा देणारे कलम ३७०आणि ३५अ रद्द करुन नवीन केंद्रशासीत प्रदेशाची घोषणा केली.

याबद्दल देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र भाई मोदी आणि सर्व मंत्री मंडळ तसेच या विशेष ठरावासाठी पाठींबा देणा-या सर्व राज्यसभा आणि लोकसभा सदस्य यांचे हादीक अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

भारतीय राजकारणातील रणरागिनी श्रीमती सुषमा स्वराज कौशल यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५२ रोजी झाला होता. त्या सर्वोच्च न्यायालयाच्या माजी वकील व भारतीय जनता पार्टीच्या एक वरिष्ठ नेत्या होंत्या.त्या २६ मे २०१४ पासून ते २०१९ पर्यंत भारताच्या परराष्ट्र मंत्री होत्या. इंदिरा गांधी नंतर हे पद घेणा-या त्या दुस-या महिला होत्या. त्या संसदेच्या सदस्य म्हणून सात वेळा आणि विधानसभेच्या सदस्य म्हणूनतीन वेळा निवडून आल्या होत्या. त्या संसदेच्या सदस्य म्हणून 7 वेळा आणि विधानसभेच्या सदस्य म्हणून तीन वेळा निवडून आल्याहोत्या सन 1977 मध्ये वयाच्या 25 व्या वर्षी त्या भारताच्या उत्तरेकडील राज्य असणा-या हरियाणातील सर्वात तरुण कॅबीनेट मंत्री बनल्या.

त्यांनी 13 ऑक्टोबर1998 पासून 3 डिसेंबर1998 पर्यत दिल्लीच्या 5 व्या मुख्यमंत्री म्हणून काम केले होते. इ.स. 1996 आणि इ.स. 1998 च्या लोकसभा निवडणूकामध्ये त्या दिल्ली राज्यातील दक्षिण दिल्ली लोकसभा मतदार संघातून तर इ.स. 2009 सालातील निवडणूकामध्ये मध्य प्रदेश राज्यातील विदिश लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेल्या. त्या इ.स. 2000-2009 या काळात राज्यसभेच्या सदस्या होत्या.त्यांनी अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये माहिती आणि प्रसारमंत्री दूरसंचारमंत्री आणि संसदीयकार्यमंत्री ही मंत्रिपदे सांभाळली.त्या डिसेंबर इ.स. 2009 ते मे 2014 दरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या होत्या. तसेच 2014 च्या भारतीय सार्वत्रिक निवडणूकीत त्या दुस-यांदा मध्य प्रदेशातील विदिशा मतदार संघातून 400000 पेक्षा अधिक मताच्या फरकाने जिंकून आल्या होत्या. 26 मे 2014 रोजी केंद्रीय कॅबिनेटमध्ये त्या परराष्ट्रमंत्री म्हणून काम पाहिले होते. आजारपणामुळे त्यांचे निधन 6 ऑगस्ट 2019 रोजी झाले होते.

2)भारताचे माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांचा जन्म 28 डिसेंबर 1952 मध्ये झाला होता. हे भारतीय जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते होते. ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळात कायदेमंत्री आणि जलवाहतूक मंत्री होते. इ.स. 2000 पासून ते राज्यसभेचे सदस्य होते. 3 जून 2009 रोजी त्यांची राज्यसभेतील विरोधीपक्षनेते म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांचे 1960-69 दरम्यान सेंट झेवियर्स स्कूल नवी दिल्ली येथे त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले 1973 मध्ये श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स मधून वाणिज्य विषयात पदवी संपादन केली आणि 1977 मध्ये दिल्ली विद्यापिठातून त्यांनी कायदयाची पदवी पास केली. सत्तरच्या दशकात ते दिल्ली विद्यापिठात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) विद्यार्थी कार्यकर्ते होते. ते 1974 मध्ये विद्यापिठ विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष झाले होते. 16 व्या लोकसभेच्या कारकिर्दीत सन 2014 ते 2019 या काळात अरुण जेटली हे केंद्रीय मंत्रिमंडळात अर्थमंत्री तसेच काही काळ संरक्षण मंत्री म्हणून ही काम पाहिले होते. आजारपणामुळे त्यांचे निधन 24 ऑगस्ट 2019 रोजी झाले होते.

3)दिनांक18ऑगस्ट 2019 रविवार रोजी रात्री साडेदहा ते पावणे अकराच्या सुमारास औरंगाबादहून शहादयाकडे निघालेल्या एस.टी.बसचा निमगुळ गावाजवळ भिषण अपघात झाला होता. या अपघातात 14 प्रवासी जागीच ठार झाले होते.

4) धुळे जिल्हयातील शिरपुर तालुक्यातील वाघाडी येथे असलेल्या रुमिस्त केमीकल्स या खाजगी केमिकल्स फॅक्टरीमध्ये दिनांक 31 ऑगस्ट 2019 शनिवार रोजी सकाळी दहाच्या सुमारास फार भीषण स्फोट झाले यात 13 जण ठार झाले होते.

वरील प्रमाणे सर्वाना आजच्या महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, सदस्या. मनपा धुळे

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सर्व मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५४ दिनांक ०७/०९/२०१९

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार भारतीय राजकारणातील रणरागिनी श्रीमती सुषमा स्वराज कौशल यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५२ रोजी झाला होता. त्या सर्वोच्च न्यायालयाच्या माजी वकील व भारतीय जनता पार्टीच्या एक वरिष्ठ नेत्या होत्या.त्या २६ मे २०१४ पासून ते २०१९ पर्यत भारताच्या परराष्ट्र मंत्री होत्या. इंदिरा गांधीनंतर हे पद घेणा-या तया दुस-या महिला होत्या. त्या संसदेच्या सदस्य म्हणून सात वेळा आणि विधानसभेच्या सदस्य म्हणूनतीन वेळा निवडून आल्या होत्या. त्या संसदेच्या सदस्य म्हणून 7 वेळा आणि विधानसभेच्या सदस्य म्हणून तीन वेळा निवडून आल्याहोत्या सन 1977 मध्ये वयाच्या 25 व्या वर्षी त्या भारताच्या उत्तरेकडील राज्य असणा-या हरियाणातील सर्वात तरुण कॅबीनेट मंत्री बनल्या. त्यांनी 13 ऑक्टोबर1998 पासून 3 डिसेंबर1998 पर्यत दिल्लीच्या 5 व्या

मुख्यमंत्री म्हणून काम केले होते. इ.स. 1996 आणि इ.स. 1998 च्या लोकसभा निवडणूकामध्ये त्या दिल्ली राज्यातील दक्षिण दिल्ली लोकसभा मतदार संघातून तर इ.स. 2009 सालातील निवडणूकामध्ये मध्य प्रदेश राज्यातील विदिश लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेल्या. त्या इ.स. 2000-2009 या काळात राज्यसभेच्या सदस्या होत्या.त्या डिसेंबर इ.स. 2009 ते मे 2014 दरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या होत्या. तसेच 2014 च्या भारतीय सार्वत्रिक निवडणूकीत त्या दुस-यांदा मध्य प्रदेशातील विदिशा मतदार संघातून 400000 पेक्षा अधिक मताच्या फरकाने जिंकून आल्या होत्या.26 मे 2014 रोजी केंद्रीय कॅबिनेटमध्ये त्या परराष्ट्रमंत्री म्हणून काम पाहिले होते. आजारपणामुळे त्यांचे निधन 6 ऑगस्ट 2019 रोजी झाले होते. तसेच भारताचे माजी अर्थमंत्री अरुण् जेटली यांचा जन्म 28 डिसेंबर 1952 मध्ये झाला होता. हे भारतीय जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते होते. ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळात कायदेमंत्री आणि जलवाहतूक मंत्री होते. इ.स. 2000 पासून ते राज्यसभेचे सदस्य होते. 3 जून 2009 रोजी त्यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांचे 1960-69 दरम्यान सेंट झेवियर्स स्कूल नवी दिल्ली येथे त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. सत्तरच्या दशकात ते दिल्ली विद्यापिठात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) विद्यार्थी कार्यकर्ते होते. ते 1974 मध्ये विद्यापिठ विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष झाले होते. 16 व्या लोकसभेच्या कारकिर्दीत सन 2014 ते 2019 या काळात अरुण जेटली हे केंद्रीय मंत्रिमंडळात अर्थमंत्री तसेच काही काळ संरक्षण मंत्री म्हणून ही काम पाहिले होते. आजारपणामुळे त्यांचे निधन 24 ऑगस्ट 2019 रोजी झाले होते.

तसेच दिनांक 18 आॅगस्ट 2019 रविवार रोजी रात्री साडेदहा ते पावणे अकराच्या सुमारास औरंगाबादहूनशहादयाकडे निघालेल्या एस.टी. बसचा निमगुळ गावाजवळ भिषण अपघात झाला होता. या अपघातात 14 प्रवासी जागीच ठार झाले होते.

तसेच धुळे जिल्हयातील शिरपुर तालुक्यातील वाघाडी येथे असलेल्या रुमिस्त केमीकल्स या खाजगी केमिकल्स फॅक्टरीमध्ये दिनांक 31 ऑगस्ट 2019 शनिवार रोजी सकाळी दहाच्या सुमारास फार भीषण स्फोट झाले यात 13 जण ठार झाले होते.

वरील सर्व मान्वरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतिव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन राहून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-४० मे.महासभेत प्रश्नोत्तराचा तास घेणेसाठी धोरण ठरविणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे महापौर महोदय, सदरचा विषय अतिशय महत्वाचा विषय आहे.आपण नेहमी बोलत असतो. सभा सुरु असतांना मध्येच काही सन्मा. सदस्य वेगळे विषय घेतात आणि त्यामुळे वादविवाद निर्माण होतात. आणि रोष निर्माण होतो. असे घडु नये म्हणुन महासभेत प्रश्नोत्तराचा तास घेणे अतिशय महत्वाचे आहे. या संदर्भात दि.२१/०५/२०१९ च्या पत्रानुसार सर्व सन्मा. सदस्यांना कळविले आहे. त्यामुळे सन्मा. सदस्यांना काही विषय मांडावयाचे असतील ते अगोदर मांडले तर आपल्याला अधिकारी वर्गालाही प्रश्नाबाबत योग्य माहिती विचारता येईल. ही अशीच पध्दत विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सभागृहात सुध्दा असे प्रश्न मांडले जातात तेथे या प्रश्नांना तारांकित प्रश्न म्हणतात. यामुळे आपल्या सभेला सुसुत्रता येईल आणि सभागृहाची प्रतिष्ठा वाढेल. यापुढे सर्व सन्मा. सदस्य या प्रश्नोत्तराच्या तासाचे गांर्भीर्य लक्षात घेवुन

आमच्या ज्या काही सुचना असतील त्या एक दिवस अगोदर महापौरांपर्यंत पोहचवु. आणि नंतर तुम्हांला योग्य वाटतील ते प्रश्न तुम्ही निवडणारच आणि त्यावर आम्हांला योग्य त्या सुचना करता येतील. हा अतिशय चांगला विषय आहे सदरच्या विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. अमिन पटेल महापौर महोदय, कलम ४४ अन्वये सदस्याला अधिकार आहे की, सभा सुरु होणे अगोदर प्रश्न उपस्थित करु शकतात.परंतु आपल्या टिपणीत देण्यात आले आहे दोन –तिन दिवसांअगोदर महापौर यांना पत्राद्वारे कळविण्यात यावे आणि विषयाचे त्याचे महत्व ओळखुन बोलु देण्याचे अधिकार महापौरांना असतील. पण मला विचारावयाचे आहे जर भागातील घंडा गाडीचा किंवा एखादा तातडीचा विषय असेल तर अश्या विषयाला तर आपण सादर करु शकतो ना. शहरात जर एखादी घटना घडली ते तर आपण पत्राद्वारे आधी कळवु शकत नाही. काही तातडीचे विषय असतात उदा.महापुर, पाईपलाईन लिकेजेस. कलम ४४ अनुसार सदस्य असे तातडीचे विषय मांडु शकतात.

म. महापौर तातडीचे जे विषय असतील ते सदस्य सभागृहात लक्षवेधीव्दारे सादर करु शकतील. त्याबाबत विषयाच्या गांभिर्यानुसार महापौर याबाबत निर्णय घेतील. सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत असून याबाबत अंमलबजावणी करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५५ दिनांक ०७/०९/२०१९

धुळे महानगरपालिकेत सन्मा.सदस्यांकडून सभेच्या दिवशी प्रभागातील नागरीकांच्या सोयी सुविधा बाबत तसेच मनपाच्या कामकाजाबाबत व सुरु असलेल्या कार्यवाही तथा अंमलबजावणी बाबत सभेच्या प्रारंभी प्रश्न उपस्थित होतात.अचानक वेळी उपस्थित झालेल्या प्रश्नाबाबत आवश्यक तो समाधानकारक खुलासा संबंधित अधिकारी तथा प्रशासनाकडून प्राप्त न झाल्याने तसेच याबाबत आवश्यक ती माहिती नसल्याने सभेच्या कामकाजात अडचणी निर्माण होतात.त्यामुळे सहाजिकच रोष निर्माण होऊन सभेच्या कामकाजात व्यत्यय व सभेच्या कामकाजासही विलंब निर्माण होतो.यासंदर्भात सदर बाब टाळण्यासाठी सभा कामकाज नियमावली नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४४ अन्वये सन्मा.सदस्यांना सभा कामकाज सुरु होण्यापूर्वी विहीत वेळेत व विहीत पध्दतीने प्रश्न विचारणेचाअधिकार प्राप्त आहे.याबाबतची अंमलबजावणी पुढील महासभे पासून अवलंबण्यात येत असून त्यानुसार असलेल्या नियमाचे अवलंबन करुन प्रश्न उपस्थित करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

यासंदर्भात यापूर्वीच सर्व सन्मा.सदस्यांना जा.क्रं. धुमपा/ न.स./18 दिनांक21/5/2019 अन्वये महासभा व स्थायी समितीच्या कामकाजासंदर्भात सुलभता येण्याच्या दृष्टीने नियमावलीचा अवलंब करण्याबाबत पत्र सादर केलेले आहे. तसेच यासंदर्भातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 नियम 5 च्या तरतुदीबाबत कळविलेले आहे.

महासभा तथा स्थायी समितीच्या कामकाजास सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने महासभेपूर्वी अधिनियमातील तरतूदीप्रमाणे प्रश्नोत्तराचा तास घेणेसाठीखालील प्रमाणे सर्वसाधारण नियमाना मान्यता देण्यांत येत आहे.

सभा कामकाज नियमावलीनुसार विनिर्दिष्ट असलेले सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे असतील.

1) सभासदाला एकुण तीन प्रश्नाहुन अधिक प्रश्न विचारता येणार नाहीत.
2) प्रश्न विनिर्दिष्ट करणारी सात पूर्ण दिवसांची लेखी नोटीस नगरपालिका सचिवास देण्यात आली पाहिजे.

3) आलेले प्रश्न स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार मा. महापौर सो./ मा. सभापती यांना राहतील.
4) प्रश्न नमूद केलेल्या सर्व सुचनेत ते कोणत्या सभेत विचारण्याचा मनोदय आहे हेही स्पष्ट असावे.
5) ज्यांची योग्य पूर्व सुचना आलेली आहे आणि महापौरांना असलेल्या अधिकारान्वये, जे त्यांनी अमान्य केलेले नाहीत.अशा प्रश्नांची ते ज्या अनुक्रमाने आले असतील, त्या अनुक्रमांकानुसार नगरसचिव यांनी एक यादी तयार करावी आणि ही यादी प्रश्न विचारणा-या सभासदांनी प्रश्नासमोर लिहून सभासदांकडे पाठवावी.
6) अशा सभेच्या सुरुवातीस महापौर, सभापती सूचित करतील त्याप्रमाणे प्रश्नाचा क्रम लावावा. प्रश्न विचारण्याबाबत पूर्व सुचना दिलेली आहे.त्या सभासदांना,प्रश्नांच्या यादीतील अनुक्रमांकानुसार प्रश्न विचारण्यास सांगतील.
7) असा आदेश मिळालेल्या सभासदांने आपल्या जागेवरुन उठावे आणि त्याची इच्छा असल्यास, त्याच्या नावावर असलेल्या आणि एकापेक्षा अनेक प्रश्न असतील, तर प्रश्नांच्या यादीत ते ज्या अनुक्रमाने असतील त्या अनुक्रमाने आपले प्रश्न विचारावेत.
8) प्रश्न विचारण्याची ज्याने पूर्व सुचना पाठविली आहे परंतु ज्यावेळी, त्यांचे नांव सभापती पुकारतील, त्यावेळी तो सभासद उपस्थित नसेल तर तो प्रश्न लेखी अधिकार पत्र असलेल्या दुसरा कोणताही सभासद विचारु शकेल. मात्र प्रश्न विचारण्यापूर्वी असे लेखी अधिकार पत्र नगरसचिव यांजकडे आले असले पाहिजे. तथापि पूर्व सुचना दिलेल्या सभासदाने अथवा लेखी अधिकारपत्र दिलेल्या सभासदाने प्रश्न विचारला नाही अथवा पूर्व सुचना देणारा सभासद सभाध्याक्षांनी पुकारले असता उपस्थित नसेल, तर प्रश्न वगळण्यांत आला असे समजण्यात येईल.
9) **महापौर यांनी खालील प्रकारचे प्रश्न विचारु देऊ नयेत.**

अे) मुद्देसुद नसलेला प्रश्न

बी) विवेचन, निष्कर्ष, हेत्वारोप, चेष्टा अथवा उपहासात्मक विधान ज्यात आहेअसा प्रश्न.

सी) ज्यांची चर्चा होऊन गेली आहे, त्याबद्दल अथवा आधीच्या तीन महिन्यात ज्यांचे उत्तर दिले गेले आहे असा प्रश्न.

डी) एखादया समितीच्या जे महानगरपालिकेपुढे ठेवण्यांत आलेले नाही असा असलेला प्रश्न.

ई)जो प्रश्न बेअब्रुकारक, अपमानास्पद अथवा इतर कारणास्तव आक्षेपार्ह आहे असा प्रश्न जर सभेमध्ये असा प्रश्न प्रत्यक्ष विचारला गेला तर त्याचवेळी सभेची संमती घेवून तो प्रश्न अथवा त्या प्रश्नातील आक्षेपार्ह भाग सभेच्या वृत्तातून काढून टाकण्याचा सभापतींना / महापौरांना अधिकार आहे.

एफ)प्रश्न विचारणा-या सभासदाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या स्वत:च्या अथवा त्याच्या भागीदाराव्दारे भाग किंवा हितसंबंध आहे अशा बाबी संबंधी अथवा ज्या बाबतीत त्याचा पक्षकाराचा मुख्याचा किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायीक दृष्टयाहित संबंधी आहे अशा बाबीसंबंधी प्रश्न.

जी) ज्या कथनाच्या खरेपणाबद्दलची जबाबदारी प्रश्न विचाराणारा सभासद घ्यावयास तयार नाही असे कथन असलेला प्रश्न.

एच) कोणत्या तरी वृत्तपत्रातून आलेले लिखाण बरोबर आहे किंवा कसे, असा प्रश्न

आय) ज्या प्रश्नाचे उत्तर महापालिका किंवा तिच्या विविध समित्यांचे मुद्रीत वृत्तांत पाहिले असता मिळू शकेल असा प्रश्न

जे) अधिकारी / कर्मचारी वा अन्य सदस्यांबाबत वैयक्तीक/ खाजगी माहिती असलेला प्रश्न

10) कोणत्याही प्रश्नावर चर्चा करु दिली जाणार नाही.

11) प्रश्नाचे लेखी उत्तर मिळाल्यानंतर त्या उत्तरातून उपस्थित होणारा कोणताही उपप्रश्न ज्या घटनेसंबंधी उत्तर दिले गेलेले आहे तिच्या बाबत जास्त स्पष्टीकरण करुन घेण्याकरिता कोणताही सभासद विचार करु शकेल, परंतु महापौरांच्या मते ज्या उपप्रश्नांने नियमांनी घातलेल्या बंधनाचा भंग होत आहे तो ते फेटाळून लावतील उपप्रश्नांचे उत्तर तोंडी देता येईल.

12) पूर्व सुचना मिळाल्याशिवाय आलेल्या पुरवणी प्रश्नाचे उत्तर देण्याचे महापालिका आयुक्त नाकारु शकतील असे झाल्यास पुढील सर्वसाधारण सभेत योग्य ती पूर्वसुचना देऊन असा प्रश्न नवीन प्रश्नाच्या रुपाने विचारता येईल.

13) तोंडी अथवा लेखी संपूर्णपणे उत्तर देण्यांत आलेला प्रश्न पुन्हा विचारता येणार नाही.

14) ज्या सर्वसाधारण सभेत प्रश्न विचारला जाईल अशी पूर्वसुचना आलेली आहे अशा सभेच्या पहिल्याच दिवशी प्रश्नाचे उत्तरे दिले जाईल. परंतु जर महापालिका आयुक्त यांनी सांगितले की, एखादया प्रश्नाचे उत्तर तयार नाही, तर तो प्रश्न महापालिका आयुक्त यांचे उत्तर आल्यानंतर महापौर ठरवतील अशा दिनांकास होणा-या त्या सर्वसाधारण सभेच्या स्थगीत सभेपर्यत (राखीव) ठेवला जाईल आणि त्या सभेत महापालिका आयुक्त उत्तर देतील, तथापि जर तो प्रश्न विचारण्याची पूर्व सुचना ज्याने दिली आहे तो सभासद अशा स्थगित सभेच्या वेळी सभेच्या पिठासीन अधिकारी यांनी पुकारले असता उपस्थित नसेल, किंवा त्याने उपस्थित असलेल्या दुस-या सभासदाला अधिकारपत्र दिलेले नसेल अथवा स्थगित सभाच नसेल, तर प्रश्न आणि त्यांचे उत्तर हे त्या दिवसाच्या प्रश्नोत्तरांच्या अधिकार वृत्तांतात नमूद केले जाईल.

15) प्रत्येक सभेत कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी प्रश्नोत्तरांकरिता अर्ध्या तासाहून जास्त वेळ दिला जाणार नाही. या अर्ध्या तासात ज्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नसतील ते प्रश्न पुढील सभेकरिता शिल्लक ठेवण्यांत येतील. किंवा त्यांची लेखी उत्तरे दिले जातील.

16) सभेच्या वृत्तांतामध्ये प्रश्न आणि त्यांची उत्तरे यांची नोंद नगरसचिव करतील.

17) तसेच याव्यतिरिक्त असणारे प्रश्न व प्रभागातील वैयक्तीक समस्या प्रत्यक्ष आयुक्त तथा महापौर / सभापती यांच्या कार्यालयात समक्ष भेटून सादर कराव्यात.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 454आणि कलम 457 चे परिच्छेद (2)(17) अन्वये धुळे महानगरपालिका सभा कामकाज व समित्यांचे कामकाजा संबंधी तयार केलेले प्रस्तावित नियमामधील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

१) **प्रस्तावाच्या सुचनेतून अथवा प्रस्तावाच्या आक्षेपार्ह लिखाण (मजकूर)/ संभाषण वगळण्याबाबतचे महापौर यांचे अधिकार:**-प्रस्तावाच्या सुचनेत आलेले लिखाण अब्रु हानिकारक अथवा अतिशय अपमानास्पद आहे असे महापौर यांना वाटल्यास त्यांना ते सदर सुचनेतून गाळून टाकता येईल आणि त्यांना उचित वाटले तर या कारणाकरिता ते असा कोणताही प्रस्ताव अजिबात फेटाळू शकतील. जर अशा प्रकारचे आक्षेपार्ह लिखाण असलेला प्रस्ताव सभेपुढे प्रत्यक्ष मांडण्यांत आला तर सभापतींना, त्यावेळी सभेची संमती घेवून सभेच्या वृत्तांतून असे आक्षेपार्ह लिखाण वगळण्यात येईल.

तसेच चर्चेतील असंसदीय भाषा व संभाषण वगळणेत येईल.

२) **सभेचे काम मराठीतून चालेल:**- सभेचे सर्व काम पूर्णपणे मराठीतून चालेल. परंतु जर एखादा सभासद प्रसंगी मराठीतून बोलण्यास असमर्थ असेल तर सभापतींनी अनुमती दिल्यास इंग्रजीतून किंवा हिंदीतून बोलण्याची त्या मोकळीक राहील.

३) **वृत्तांत वाचण्यात आले असे समजण्यात येईल:**- आधिच्या सभेचे वृत्तांत तर सभासदांकडे ते कायम करण्यापूर्वी आधीच पाठविण्यात आले असतील तर ते सभेपुढे वाचण्यात आले असे समजण्यात येईल.

४) **भाषण करतांना सभासदाने उभे राहिले पाहिजे आणि सभापतीनी विनंती केल्यास खाली बसले पाहिजे:**-भाषण करतांना सभासदाने उभे राहिले पाहिजे आणि सभापतींना उद्देशून भाषण केले पाहिजे. सभापतीनी बसण्याची विनंती केल्यास सभासदाने ताबडतोब बसले पाहिजे.

५) **भाषण काल मर्यादा:**-प्रस्ताव मांडणा-या सभासदाला पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ बोलू देणे किंवा न बोलू देणे आणि उपसूचना मांडणा-या सभासदाला किंवा चर्चेत भाग घेणा-या सभासदाला तीन मिनिटापेक्षा जास्त वेळ बोलु देणे किंवा न देणे हे महापौर/सभापतीं यांच्या निर्णयानुसार अवलंबून राहील.

६) **ठराव मांडणारा आणि अनुमोदन देणारा यांना दोन वेळा आणि इतर सभासदांना फक्त एकदाच बोलता येईल परंतु सभापती कोणत्याही सभासदाला वैयक्तीक खुलासा करण्यास अनुमती देऊ शकतील:**- सभासदांना फक्त एकदा बोलता येईल परंतु प्रस्ताव मांडणा-याला अथवा त्यांचे उत्तर दिले नाही तर अनुमोदन देणा-याला प्रस्तावा वरील चर्चेच्या शेवटी उत्तर देता येईल.आधी भाषण केलेल्या सभासदाला, दुसरा सभासद प्रत्यक्ष बोलत असतांना त्यांने संधी दिली तर लगेच मध्येच, आणि त्या तशी संधी मिळाली नाही तर बोलणा-या सभासदाचे भाषण संपल्यावर आपल्या आधीच्या भाषणातील एखादया महत्वाच्या भागासंबंधी झालेल्या अपसमज दूर करण्याकरिता पुन्हा थोडक्यात बोलता येईल.

७) **सभासदाचे भाषण चालू असतांना सभापतींना सभा स्थगित करता येईल :-** सभासदाने एखाद्या प्रस्तावावर भाषण चालू असतांनाही, सभापतींना, उचित वाटले तर बहुसंख्य सभासदांच्या संमतीने सभा स्थगित करता येईल.

८) **(कार्यपत्रिकेवरील) विषय वगळणे :-** एखाद्या सभासदाने भाषण संपल्याबरोबर दुस-या कोणत्याही सभासदाला सभेने आता पुढील बाब घ्यावी. असा प्रस्ताव मांडता येईल. आणि या प्रस्तावाला जर अनुमोदन मिळाले तर त्यावर चर्चा न करता तो मताला टाकण्यात येईल आणि तो मान्य झाला तर सभेपुढे जिचा विचार चालू होता ती बाब कार्यपत्रिकेवरुन वगळण्यात आली असे समजण्यात येईल.

९) **ज्याप्रश्नाचा एकदा निर्णय लागला आहे त्याचा तीन महिन्यात पुर्नविचार करता येणार नाही:**- ज्या प्रश्नांचा निर्णय लागला आहे त्याबाबत कोणताही प्रस्ताव निर्णयाच्या दिनाकांपासून तीन महिन्यांच्या आंत विचारार्थ घेता येणार नाही.

१०) **भाषण करणा-यांचा अनुक्रम सभापतीनी ठरवावा:**-जर एकाच वेळी एकापेक्षा अनेक सभासद सभेला उद्देशून भाषण करावयाला उठवतील तर सभापती त्या सभासदांनी कोणत्या क्रमाने बोलावे हे त्या बाबत बिलकुल चर्चा न होऊ देता ठरवतील व त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

११) **चर्चेला किंवा वादविवादाला अनुज्ञा दिली जाणार नाही.**

१२) पुर्व सुचना मिळाल्याशिवाय आलेल्या पुरवणी प्रश्नाचे उत्तर देण्याचे महापालिका आयुक्त नाकारु शकतील असे झाल्यास पुढील सर्वसाधारण सभेत योग्य ती पूर्वसुचना देऊन असा प्रश्न नवीन प्रश्नाच्या रुपाने विचारता येईल.

१३) ज्या सर्वसाधारण सभेत प्रश्न विचारला जाईल अशी पुर्वसुचना आलेली आहे अशा सभेच्या पहिल्याच दिवशी प्रश्नाचे उत्तरे दिले जाईल. परंतु जर महापालिका आयुक्त यांनी सांगितले की, एखाद्या प्रश्नाचे उत्तर तयार नाही तर तो प्रश्न महापालिका आयुक्त यांचे उत्तर आल्यानंतर महापौर ठरवतील अशा दिनांकास होणा-या त्या सर्वसाधारण सभेच्या स्थगीत सभेपर्यत शिल्लक ठेवला जाईल. आणि त्या सभेत महापालिका आयुक्त उत्तर देतील, तथापि जर तो प्रश्न विचारण्याची पूर्व सुचना ज्याने दिली आहे. तो सभासद अशा स्थगीत सभेच्या वेळी सभेच्या अध्यक्षांनी पुकारले असता उपस्थित नसेल,किंवा त्यांचे, उपस्थित असलेल्या दुस-या सभासदाला अधिकार पत्र दिलेले नसेलअथवा स्थगित सभेचा नसेल,तर प्रश्न आणि त्यांचे उत्तर हे त्या दिवसाच्या प्रश्नात्रांच्या अधिकार वृत्तांतात नमूद केले जाईल.

१४) प्रत्येक सभेत कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी प्रश्नोत्तरांकरिता अर्ध्या तासाहून जास्त वेळ दिला जाणार नाही या अर्ध्या तासात ज्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नसतील ते प्रश्न पुढील सभेकरिता शिल्लक ठेवण्यांत येतील.

महापौर तथा सभापती यांच्या सभेत दाखल असलेल्या प्रस्तावावरील निर्णयानंतर (रोलींग) सदस्यास चर्चा किंवा मत मांडता येणार नाही.

उक्त प्रस्तावसभागृहासमोर सादर झालेला असून सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व प्रस्तावातील बाबी लक्षात घेवून प्रस्तावातील नमूद नियमानुसार सभा कामकाज पध्दती सुरु करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४१ धुळे महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समित्यांची निर्मिती करणेसाठी धोरण ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे महापौर महोदय, प्रभाग समितींची निर्मिती करण्यासाठी जे धोरण आखण्यात आले आहे. धुळे शहराचा महानगरपालिकोचा जो व्यास आहे. तो ११ गावे समाविष्ट झाल्यामुळे वाढलेला आहे. महापालिकेतील कामे वाढलेली आहेत. ११ गांवाचा प्रत्येक नागरिक महापालिकेत येवुन कामे करु शकत नाही. सुरवातीला त्यांना महानगरपालिकेचे कामकाज समजत नाही. म्हणुन जर प्रभागसमित्यांची निर्मिती केली आणि तर जवळचे नागरिक प्रभागसमिती मध्ये जावुन आपले काम करु शकतो. पण मागेही एकदा आपण प्रभागसमिती स्थापनेविषयी प्रयत्न केले आहेत परंतु त्यावेळेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नव्हता. कदाचीत त्यावेळेस मनुष्यबळ अपुर्ण असल्यामुळे तसे घडले असेल परंतु आपल्याला या वेळेस आपल्याला हा प्रयत्न पुर्ण करावयाचा आहे. आणि आता सक्षम अधिकारी सक्षम मनुष्यबळ दिले तर प्रयत्न नक्कीच पुर्णत्वास जातील. वरिल सर्व बाबी लक्षात घेता सदरचा विषय मंजुर करावा.

म. खान मो. साबीर मुहिबुल्लाह महापौर महोदय, प्रभाग समितींची निर्मीती करुन नगरसेवकांचे काम योग्य रितीने करण्यात येईल का याबाबत आम्हांला शंका आहे. प्रभाग समितींची निर्मिती करते वेळी त्या मध्यवर्ती ठिकाणी निर्मिती करणेत यावी. नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

तसेच प्रभाग समितीच्या कार्यालयात जन्म-मृत्यु दाखले,वसुली, घरपट्टी, पाणीपट्टी बिल, वसुलीसाठी प्रभागानुसार कर्मचारींची नियुक्ती करणेत यावी. तक्रारींच्या सर्व बाबींची योग्य ती काळजी घेण्यात यावी. तसेच शॉपिंग सेंटर, जाहिरात विभाग हे कामे जे बाजार विभागामार्फत चालतात त्यांचे ठेकेदार कोण? आज पर्यंत रोजचे २५ ते ३० हजारांचे नुकसान यामुळे होत आहे त्याला जबाबदार कोण याची चौकशी करावी व योग्य ती कार्यवाही करावी. तसेच महानगरपलिकांच्या चौकांमध्येजाहिरात फलक लावले जातात. फलक लावणेसंदर्भात परवानी देते वेळेस काय धोरण ठरविण्यात आले. आणि नियमानुसार परवानगी देण्यात येते का? त्यांचा दर काय याबाबत सभागृहाला माहिती देणेत यावी. तसेच मागील सभेत महानगरपालिकेच्या ओपन स्पेस जागेंचे सर्वेक्षण करणेकामी एका वेगळया विभागाची स्थापना करणेत यावी आणि त्यासाठी एका प्रसाकिय अधिका-याची नियुक्ती करणेत यावी असे ठरले होते. त्या धोरणाचे काय झाले तेथे अधिकारी म्हणुन कुणाची नियुक्ती करणेत आली याबाबतही माहिती सभागृहात देणेत यावी. तसेच एल.ई.डी. लाईट संदर्भात किती लाईट बदलणार किती नविन लावणार किती दुरुस्त करणार आणि बदल केलेले लाईटचे काय करणार याबाबत ची माहिती सभागृहात देणेत यावी.

म. नगरसचिव — म. विरोधी पक्षनेते यांनी आत्ताच प्रभाग समिती स्थापने विषयी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यात घरपट्टी पाणीपट्टी वसुली, जन्म मृत्यु दाखले, लाईट, लिकेजेस यासारख्या सर्व विभागांची कार्यालये तेथे स्थापन करावीत तरच प्रभाग समित्यांची निर्मिती करावी.

म. महापौर — प्रभाग समिती संदर्भात याअगोदर सुरु केल्या होत्या परंतु त्या प्रभाग समित्यांमध्ये सुविधा देत नसल्याने आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण होत नसल्याने सदर समित्या बंद करण्यात आल्या होत्या. परंतु आता ज्या वेळेस आपण या समित्या स्थापन करु त्या समिती दाट लोकवस्ती, मिल परिसर, जुने धुळे, मुस्लीम लोकवस्ती जेथे जास्त तक्रारी आहेत अश्या भागांमध्ये नगरसेवकांच्या मागणी नुसार जेथे नागरिकांना सोयीस्कर असेल त्या ठिकाणी समिती कार्यालय स्थापन करणेत येतील. समित्या निर्माण करत असतांना अधिकारीवर्गाला ही सुचीत करण्यात येते की, या कार्यालयांमध्ये सर्व सुविधा द्या. जेणेकरुण महानगरपालिकेमध्ये कामासाठी लांबुन येणा-या नागरिकांचा खर्च वाचेल आणि त्यांचे काम तेथील प्रभाग समिती मध्येच होईल. त्याठिकाणी लाईट, पाणीपुरवठा, लिकेज, छोट्या-मोठ्या परवानगी हे कामे तेथे व्हायला पाहिजे. नागरिकांच्या छोटया अडचणींचे निवारण तेथे व्हायला पाहिजे. तेथील अधिका-याला त्यानुसार अधिकर प्रदान करणेत यावे. जेणेकरुन अधिकार असेल तर तेथील कामे मार्गी लागतील. प्रभाग समितींचा विषय सर्व सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार मंजुर करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५६ दिनांक ०७/०९/२०१९

दिनांक 9/07/2019 रोजी मा. महापौर साहेब तसेच मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी साहेब धुळे यांच्या उपस्थितीत असलेल्या आढावा बैठकीत प्रभाग समित्या स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यांत आलेला असून सदरचा प्रस्ताव मे.महासभेत सादर करण्यांचे आदेशित झालेले आहे.त्यानुसार खालील प्रमाणे कार्यालयीन अहवाल सादर करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात खालील प्रमाणे तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 29 -अ प्रभाग समित्यांची स्थापना :-

१) प्रत्येक शहरात पुढील तक्त्यानुससार महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागाचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यांत येईल.

लोकसंख्या	प्रभाग समित्यांची किमान संख्या	अतिरिक्त लोक संख्येसाठी अतिरिक्त प्रभाग समित्या	प्रभाग समित्यांची कमाल संख्या
3 लाखापेक्षा अधिक व 4.5 लाखांपर्यत	3	-	4

उक्त तरतूदीनुसार प्रभाग समित्यांची किमान संख्या 3 निश्चित असून त्यानुसार 3 प्रभाग समित्या स्थापन करण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यांत आलेला आहे. सदर प्रभाग समित्यासाठी लगतच्या प्रभागाचा समावेश करुन क्षेत्र रचना निश्चित करणे आवश्यक आहे..त्यानुसार क्षेत्र निश्चितीकरणासाठी मा. नगररचनाकार यांना जा.क्रं. धुमपा / न.स./164 दि. 16/1/2019 व जा.क्रं. धुमपा / न.स./49 दिनांक 10/7/2019 अन्वये पत्र सादर करण्यांत आलेले आहे.

सदर क्षेत्र निश्चितीनंतर धुळे महानगरपालिकेसाठी तीन प्रभाग समित्या निश्चित करावयाच्या आहेत.प्रभाग समित्या निश्चितीनंतर प्रभाग समित्यांसाठी कार्यालयांची उपलब्धता आवश्यक ते मनुष्यबळ व यंत्रणा आदि बाबी उपलब्ध करुन द्याव्या लागतील. तसेच प्रभाग समित्यांचा सचिव म्हणून सहा. आयुक्त दर्जाचा तथा सक्षम प्रभाग अधिकारी नियुक्ती करणे आवश्यक असेल.

यापूर्वी मनपा मार्फत प्रायोगिक तत्वावर 4 विभागात प्रभाग कार्यालय सुरु करण्यांत आलेली होती. तथापि सदर प्रभाग कार्यालयांस आवश्यक तो प्रतिसाद न मिळाल्याने सुमारे 3 वर्षापासून प्रभाग कार्यालय बंद करण्यांत आलेली आहेत. मनपाची सद्याची आर्थिक स्थिती , तांत्रिक व आवश्यक त्या मनुष्यबळाची कमतरतरता तसेच उपलब्ध यंत्रणा यांचा विचार करता प्रभाग समित्यांची नियुक्ती सद्यस्थितीत उचित नसल्याने तत्कालीन महापौर व तत्कालीन आयुक्त यांनी सदरचा प्रस्ताव महासभेच्या मान्यता घेण्यासाठी अनुकुलता दर्शविलेली नव्हती. या सर्व बाबींचा विचार प्रभाग समित्या निश्चित करतांना होणे आवश्यक आहे.

तसेच सद्यस्थितीत धुळे महानगरपालिका क्षेत्रात नव्याने 11गावांचा समावेश झालेला आहे.त्यामुळे महानगरपालिकेचे क्षेत्र व कामकाजाच्या व्याप्तीतही वाढ झालेली आहे.त्यामुळे कामकाजाचे विकेंद्रीकरण होवून नागरीकांना प्रभाग कार्यालयाव्दारे आवश्यक त्या सुविधा व सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे.त्यासाठी प्रभाग कार्यालयाच्या ठिकाणीच आवश्यक ती कार्यालयीन यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

तरी उक्त वस्तुस्थिती व महानगरपालिका अधिनियम कलम 29 (अ) ची तरतूद लक्षात घेता धुळे महानगरपालिका क्षेत्रात ४ प्रभाग समित्या स्थापन करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. यामध्ये नगररचनाकार यांनी ४ प्रभागांची रचना करावी. तसेच प्रत्येक प्रभागाच्या भौगोलिक क्षेत्रामध्येच प्रभाग समितीचे कार्यालय बनविण्यासाठी मनपाच्या मालकीची इमारत असेल व पुरेशा आकाराची असेलयांची दक्षता घ्यावी. तसेच या प्रभाग समित्यांच्या कार्यालयामध्येच बिल कलेक्टर, सुपरवाययझर,वायरमन, व्हॉलमन,प्लंबर,सफाई कामगार साहित्य व वाहने इ.सुविधा उपलब्ध करण्यांत याव्यात व अत्यावश्यक दैनंदिन सेवा देण्यांत याव्यात तसेच प्रभाग समिती सभापती कार्यालय सुध्दा तेथेच राहील अशी प्रभाग समित्यांची रचना तांतडीने करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४२ धुळे महानगरपालिकेअंतर्गत विषय समित्या नियुक्त करणेसाठी धोरण ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. शितल नवले महापौर महोदय,सदरच्या विषयामध्ये समाजकल्याण, बांधकाम आरोग्य, क्रिडा, मालमत्ता व्यवस्थापन व उत्पन्न या समित्यांची नेमणुक करणे निश्चित झालेले आहे. यामध्ये प्रत्येक समितीसाठी किमान ९ पालिका सदस्य असणार आहेत त्यात २ तज्ञ मार्गदर्शक निमंत्रीत सदस्य म्हणुन घ्यावयाचे आहेत. महोदय या समित्या स्थापन केल्यानंतर जे विराधक आहेत त्यांनाही समितीमध्ये नियुक्त करणेत यावे. टिपणीत सांगण्यात आलेले आहे की, मनुष्य बळ नाही परंतु यात ९ पालिका सदस्य,२ तज्ञ म्हणजे यात डॉक्टर, इंजीनियर, सी.ए.असतील यामुळे मनुष्यबळाची फार मोठी अडचण आपल्याला येणार नाही. तसेच महानगरपालिका नगरसेवक/ सदस्य नेमताना एकही सी.ए यात घेण्यात आलेला नाही. कदाचीत या समित्या स्थापन होतांना त्यात सी.ए. घेण्यात येतील आणि त्यामुळे आपल्या पालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी मार्गदर्शन करतील आणि कदाचीत फायदा होईल.कार्यालयीन टिपणीचा फार विचार न करता सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. महापौर सदरचा विषय मंजुर करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५७ दिनांक ०७/०९/२०१९

धुळे महानगरपालिकेत कामकाजाच्या दृष्टीने नियत्रंण रहावे तसेच कामकाजात आवश्यक त्या सुधारणा व गतीमानता निर्माण व्हावी यासाठी विशेष समित्यांची नेमणूक करण्याबाबत मा. महापौर तसेच मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी साहेब धुळे यांनी दिनांक ०९-०७-२०१९ च्या बैठकीत आदेशीत केलेले आहे.

विशेष व तद्र्थ समित्यांच्या नेमणुका करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३०(१) अन्वये तरतुद असुन यात महापालिकेस वेळावेळी आपल्या पालिका सदस्यांमधुन विशेष समित्यांची नेमणुक करता येईल. व अशा समित्यांनी महापालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत अशी तरतुद आहे.

उक्त बैठकीत सद्य स्थितीत बांधकाम, आरोग्य व स्वच्छता, पाणीपुरवठा व विद्युत, शिक्षण, नगररचना,मालमत्ता व्यवस्थापन व उत्पन्न वर्धन या ६ समित्यांची नेमणुक करण्याचे निश्चित झालेले आहे. तसेच सदर बैठकीत प्रत्येक समिती साठी किमान एकुण ९ सदस्य पालिका सदस्य संख्या निश्चित करावयाची आहे. यात या समित्यांसाठी त्या क्षेत्रातील २ तज्ञ मार्गदर्शक निमंत्रीत सदस्य म्हणुन घ्यावयाचे आहेत. सदर २तज्ञ मार्गदर्शक सदस्यांना महापालिकेच्या विषय समित्यांच्या सभेत मत देण्याचा हक्क असणार नाही. तसेच सदर विषय समित्यांसाठी त्या विभागाच्या विभाग प्रमुखांची सचिव म्हणुन नियुक्ती असेल.

उक्त विषय समित्या नेमणूक करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम कलम३०(१) अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. विषय समित्यांचे कार्यक्षेत्र संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख यांच्या अंतर्गत असेल.याबाबत संबंधित विभागाने विषय समित्यांची रचना व नियुक्ती संबंधित विभागामार्फत करण्यांत यावी.या समित्यांच्या सदस्यांचेनामनिर्देशन करण्यासाठी गटनेत्यांकडून पक्षीय बलाबलानुसार नांवे घेण्यांत यावीत.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४३ छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा संभाजी महाराज उद्यान येथे उभारणे बाबत आलेल्या फेर प्रस्तावावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा संभाजी महाराज उद्यान येथे उभारणेचा फेर ठराव करीत असतांना संत गाडगे महाराज यांच्या पुतळयाच्या प्रस्तावाचा देखील फेर ठराव यात करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळया संभाजी महाराज उद्यान येथे उभारणेस मंजुरी देण्यांत यावी. याच विषयांस अनुसरुन संत रविदास महाराज यांचा देखील पुतळा उभारणेस मान्यता देण्यांत यावी.

म.राजेश पवार छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळया संभाजी महाराज उद्यान येथे उभारणेस मंजुरी देण्यांत यावी.

म. महापौर सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षात घेवून संभाजी महाराज उद्यानात छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेचा यापूर्वी ठराव झालेला होता त्याला एक वर्ष झाले आहे. शासनाच्या नवीन अटी नुसार फेर ठरावाची आवश्यकता आहे.त्याअनुषंगाने संभाजी महाराज उद्यानात छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे फेर ठराव करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच संत गाडगे महाराज यांच्या पुतळा तसेच संत रविदास महाराज यांचा देखील पुतळा उभारणेचा फेर ठराव करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **शासनाच्या अटी व नियमाची पूर्तता करण्याबाबत दक्षता घेण्यांत यावी.**

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५८ दिनांक ०७/०९/२०१९

धुळे मनपा मालकीच्या संभाजी महाराज उद्यान येथे छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे बाबत मनपा ठराव क्र.143 दि.02/07/2015 व ठराव क्र.101 दि.21/03/2018 अन्वये पारित करण्यात आलेला आहे.सदर पुतळा संदर्भात आवश्यक ती परवानगी व ना-हरकत दाखला मिळणेबाबत मनपा मार्फत शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.सदरची कार्यवाही अंतिम टप्यात आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र./पुतळा-3116/प्र.क्र.308/29 दि.2 मे 2017 मधील मार्गदर्शक तत्वानुसार व क्रमांक 20 मधील अटीनुसार पुतळा उभारणेसाठी पारित केलेला ठराव १ वर्षापेक्षा जुना असु नये अशी तरतूद समाविष्ट आहे.

उक्त बाबत या संदर्भात नवीन ठराव करावा म्हणून श्री.नानासाहेब कदम जिल्हा प्रमुख - छावा व अध्यक्ष पुतळा समिती यांनी विनंती पत्र दिलेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेऊन धुळे मनपा मालकीच्या संभाजी महाराज उद्यान येथे छत्रपती संभाजी राजे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेसाठी फेर ठराव करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच संत गाडगे महाराज यांच्या पुतळा तसेच संत रविदास महाराज यांचा देखील पुतळा उभारणेचा फेर ठराव करणेस मान्यता देण्यांत येत आहे.शासनाच्या अटी व नियमाची पूर्तता करण्याबाबत दक्षता घेण्यांत यावी.'

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४४ मा.महापौर सो.यांच्या पत्रानुसार संत नरहरी महाराज पुतळयासंदर्भात झालेल्या ठरावाबाबत फेर विचार करणे.

म. नगरसचिव म.नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. या संदर्भात शितलजी नवले यांनी पत्र सादर केलेले आहे.

म. शितल नवले महापौर महोदय, महापौर यांच्या पत्रानुसार संत नरहरी महाराज यांच्या पुतळा उभारणीसाठी जागेचा फेर विचार करणे संदर्भात पत्र सादर करणेत आले आहे.त्यात ७०×२५ जागा कमी पडते असे सांगण्यात आले आहे. माझे असे म्हणने आहे जेष्ठ संत आहेत १००×१०० किंवा २००×२०० जरी लागत असेल घेण्यात यावे आणि छान सुशोभिकरण करुन उभारणार असाल तर निश्चित जागा उपलब्ध करण्यात आली पाहिजे.परंतु एक विनंती आहे. नियमांचे पालन करुन करणेत यावे. तसेच आयुक्त साहेब व नगररचनाकार यांच्या कडून जागेबाबत अभिप्राय घेण्यांत यावा.

म. महापौर याबाबत म. नगररचनाकार यांच्या कडून अभिप्राय घेऊन आवश्यक त्या फेरफारासह जागा वाढीचा प्रस्तावास व इतर अनुषंगिक बाबी बाबत कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५९ दिनांक ०७/०९/२०१९

मा.महापौर सो.यांच्याकडील पत्र क्रं.मनपा स्वी/ ११४ दिनांक २९/८/२०१९ च्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेच्या नुतन इमारतीच्या प्रांगणात साक्रीरोड लगतच्या दर्शनी भागात ७० X २५ च्या जागेत संतश्रेष्ठ श्री नरहरी महाराज पुतळा उभारणेसाठी मनपा ठराव क्रं. १०२ दि.२७/३/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि सदर ठिकाणी पुतळा व चबुत-याचे आराखडे व क्षेत्र लक्षांत घेता सदर जागा कमी पडणार आहे. तरी सदर क्षेत्राबाबत फेर विचार करणेसाठी सदरचा विषय मे.महासभेच्या विषयसूचीवर घेण्यांत आला आहे. याबाबत धुळे महानगरपालिका नवीन इमारतीच्या साक्रीरोडकडील दर्शनी भागात पश्चिम कोप-यातील ५० x ५० चौरस फूटाची जागा संत नरहरी महाराज पुतळयासाठी 30 वर्ष मुदतीच्या कराराने देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत संबंधित संस्थेशी आवश्यक तो कायदेशीर अटी शर्तींचा करारनामा व ताबा पावती करण्यांत यावी.तसेच पुतळया परिसरातील हॉलमध्ये संत नरहरी महाराजाच्या जिवन पटावरील शिल्पाचे संग्रहालय पुतळा समिती मार्फत उभारण्यांत यावे. पुतळा व पुतळा परिसर स्वच्छ ठेवणे तसेच कायदा व सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर ठिकाणी कायम स्वरुपी पुतळा समिती मार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यांत यावा. याबाबत संपूर्ण जबाबदारी पुतळा समितीची राहील.पुतळा समिती कार्यालय व सुरक्षारक्षक निवास यासाठी मनपा इमारतीच्या पार्किग क्षेत्रातील पश्चिम उत्तर कोपऱ्यातील (वाहन कार्यालयाच्या लगत असलेली) 20 फुट x १० फुट जागा निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पुतळयाच्या संपूर्ण देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थेची जबाबदारी पुतळा समितीची राहील.त्यानुसार सदर समितीशी आवश्यक तो 30 वर्षाचा करारनामा व ताबा पावती करण्यांत यावा. प्रशासनामार्फत याबाबत नियमाप्रमाणे आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही व पुर्तता करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ४५ धुळे महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले शासकीय योजनेतील कामांबाबत कन्सलटंट (COUNSULTANT) नेमणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. शितल नवले महापौर महोदय, आपल्या विषय पत्रीकेत कन्सलटंट नेमणेबाबत विषय आला आहे त्यामध्ये मला एक सुचना सुचवावीशी वाटते याच बरोबर मागे जेष्ठ नगरसेवक यांनी उत्पन्न आणि व्हॅल्युवेशन बाबत विचार केला होता. याच्यात व्हॅल्युअर पण वाढवुन घ्यावे असे मला वाटते कारण एकच कन्सलटंट आपल्याकडे आहे आणि त्यांच्याकडुन एवढे होणे शक्य नाही. आणि हा ठराव पारीत करत असतांना ही दुरुस्ती त्यात अॅड करुन घ्यावे आज आपल्याकडे १५०-१७५ व्हॅल्युअर्स उपलब्ध आहेत. बँकेच्या स्फुर्टी प्रमाणे त्यांचे अर्ज मागवुन घ्या. नियमाप्रमाणे जे बसतील तेवढे आपल्या प्लॅटफॉर्म वर घेवुन त्यांनाही एक चालना मिळेल आणि जे काम आपले अपुर्ण आहे ते पुर्णत्वास जाईल एवढी विनंती करतो विषय मंजुर करावा.

म. महापौर धुळे महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शासकीय योजनेतील कामांसाठी कन्संलटंट नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे. सदर नियुक्ती करतांना शासन निर्देशांची व प्रस्तावात नमूद म. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार उचित कार्यवाही व अंमलबजावणी करण्यांत यावी. तसेच शहरातील मनपा मालमत्तेच्या सर्व्हेक्षण व मूल्यांकनासाठी नियमाप्रमाणे कसंलटंट नेमणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६० दिनांक ०७/०९/२०१९

30 जून 2003 रोजी अस्तित्वातील नगरपालिकेचे मनपात रुपांतर झालेले आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपालिकेची 1986 मध्ये हद्दवाढ झालेली होती त्यावेळेला नगरपालिकेचे क्षेत्र 46.46 चौ.मी. व लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3,76,475 मात्र होती. तसेच सध्यास्थितीत शहरात 262.29कि.मी. लांबीचे कॉक्रीट, डांबरी, कच्चे असे एकून 552.79कि.मी लांबीचे रस्ते अतित्वात आहेत.तसेच नवीन कॉलनी परिसरातील 300 कि.मी. लांबीचे कच्चे रस्ते पक्के करणे आवश्यक आहेत. तसेच शहरातील 20% भागात भूमिगत गटारी व 30% भागात खुल्या गटारी आहेत. शहरात प्रमुख नाले असून शहराच्या माध्यमातून 6.00कि.मी. लांबीची पांझरा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते, शहरात 3 राष्ट्रीय महामार्ग 1)मुंबई आग्रा 2)नागपूर सुरत 3)धुळे सोलापूर महामार्ग जातात तसेच शहरात बहु संस्थेने शैक्षणिक संस्था अस्तित्वात आहेत. तसेच एकविरा देवी प्राचीन देवस्थान, लळिंग किल्ला व लळिंगचे वनक्षेत्र आहे.

दि.05 जाने. 2018 च्या शासन निर्णयानुसार धुळे मनपाची हद्दवाढ झालेली असून त्यात 10 महसुली पूर्ण गावे व एक गाव गावठाण व्यतिरिक्त क्षेत्र मनपा हद्दीत समाविष्ठ झालेले आहेत. सध्यस्थितीत धुळे मनपाची क्षेत्र 50.22 चौ.मी. असून लोकसंख्या 110515 मात्र आहे. त्यामुळे शहराचे एकूण क्षेत्र 102 चौ.मी. झाले आहे. व 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 486990 मात्र झाली आहे.या बाबत नॅचरल ग्रोथ गृहीत धरता लोकसंख्या 650000 होईल. धुळे शहरासाठी विविध योजने अंतर्गत उदा. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती योजना ,अल्प संख्यांक योजना, रस्ता अनुदान , मुलभूत सेवासुविधा अंतर्गत ई. योजने साठी आर्कीटेक्ट यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

१)stoctural consultant with/ without supervision

२) Road/pavement design as per IRC with/ without supervision

३) Building Design with/ without supervision

४)Green space development and beautification works with/without supervision
५) Electrical design with /without supervision

या बाबीसाठी March पर्यंत consultant नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी प्रस्ताव मे महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता धुळे महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शासकीय योजनेतील कामांसाठी कन्संलटंट नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे.सदर नियुक्ती करतांना शासन निर्देशांची व प्रस्तावात नमूद म. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार उचित कार्यवाही व अंमलबजावणी करण्यांत यावी. तसेच शहरातील मनपा मालमत्तेच्या सर्व्हेक्षण व मूल्यांकनासाठी नियमाप्रमाणे कसंलटंट नेमणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४६ धुळे महानगरपलिकेच्या अंतर्गत असलेल ओपनस्पेस (मोकळया जागा) चर खोदणेसाठी निविदा प्रक्रिया राबविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे मला एक विचारावयाचे आहे की, चर म्हणजे नेकमे काय करणार आहात?

म. अभियंता म. महापौर यांच्या वतीने खुलासा करतो, ही संकल्पना म. राहुल रेखावार साहेबांनी मांडली होती. आपल्या धुळे शहरात ज्या आपेन स्पेस आहेत महानगरपालिकेचे ओपन भुखंड आहेत त्या सर्वच ठिकाणी कुंपन भिंत बांधण्यासाठी आपल्याकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. आपली जी जागा आहे तीची पार्किंग व्हावी व आपण जसे शेताला बांध करतो त्याप्रमाणे बांध करण्याचे काम कमी खर्चात होते म्हणुन हा विषय आलेला आहे.

म. प्रदिप कर्पे चर खोदतांना सर्व्हे नं आणि जागेच्या क्षेत्रफळाचे एक फलक त्या ठिकाणी लावण्यात यावे. तसेच ओपन स्पेस च्या बाजुला सामाजिक कार्यकर्ते असतात ते स्वताचे ऑफिस टाकतात आणि मालकी दाखविण्याचा प्रयत्न करतात तसे व्हायला नको.

म. महापौर मा. जिल्हाधिकारी रेखावार साहेब आणि आमची बैठक झाली त्या बैठकीत आपली जी महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे तिला ओपन स्पेस म्हणुन संबोधण्यात येते ती लक्षात राहण्यासाठी हा चर खोदण्यात येईल. म. विरोधीपक्ष नेता महापौर महोदय, पहिले माहिती मागवा की, आपल्याकडे ओपन स्पेस चा महानगरपालिकेच्या नावाचा उतारा आहे का? हस्तांतरण करतांना त्याची फी भरली आहे का? काही जागा अशा आहेत जिथे जागेवर कब्जा झाला आहे, तिथे इमारत बांधली आहे. अश्या ठिकाणी आपले मालकी हक्क आहे का पहिले ती माहीती घेण्यात यावी.

म. महापौर कमीत कमी ९०% ओपन स्पेस आपल्या मालकीचे आहेत. बाकींची यादी मागविली आहे.

म. वंदना भामरे महापौर महोदय, मला यात एक शंका आहे. की आपण यात हद्दवाढी बाबत जे गुरे चराई म्हणुन आरक्षीत आहेत तर आपण जो ओपन स्पेस जी मनपा कडे आलेली जी जागा असेल तर तिथे आपण गुरेचरा साठी करणार आहोत त्यासाठी आमच्या ज्या काही हद्दवाढीच्या सुखसोयींसाठी आम्हांला जी जागा लागणार आहे त्यासाठी आम्हांला उपलब्ध होईल का?

म. महापौर आवश्यकता असेल तर करायचे जर एखाद्या जागेवर अतिक्रमण होत असेल किंवा कुणी मालकी दाखविण्याचा प्रयत्न करत असेल तर एका प्रकारे हद्द आखण्यात येणार आहे. तसेच चर खोदलेल्या ठिकाणी वृक्ष रोपण करता येईल, वॉलकंपाऊन्ड करता येईल.

म. वंदना भामरे समजा माझा हद्दवाढीचा भाग आहे माझ्या भागातील घरकुल योजनेमध्ये किंवा पंतप्रधान आवास योजनेमध्ये अंतर्गत घरे बांधण्यासाठी जागा नसेल तर आम्ही त्यांना आमच्या प्रभागात जागा उपलब्ध करुन देणार.

म. महापौर मोकळी जागा मध्ये काय तर एखादे शेत असेल त्याचा प्लास वेगळा आणि जी मोकळी जागा जी सोडलेली असते त्या जागेमध्ये क्रिडांगण, बगीचा किंवा खेळण्यासाठी मैदान करायचे असेल ते आपण करु शकतो पण त्यात कोणत्याही प्रकारचे घरकुलचे घरे बांधता येत नाहीत. आणि स्थायी कनर्डीशन करता येणार नाही.

म. वंदना भामरे म्हणजे जे गावठान वैगरे आहेत तेथे का? तसेच प्रस्ताव करतांना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेवुन जागेत कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घेवुन करणेत यावे.

म. महापौर ओपन स्पेस ही प्लॉट धारंकासाठी सोडलेली जागा असते. ती आपल्या मालकीची असते तीचा वापर संमंती घेवुन करता येतो पंरतु सुप्रीम कोर्टात जाता येत नाही.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय, हा जो चर खोदण्याबाबत विषय आलेला आहे मला असे वाटते काही वर्षांनी किंवा काही काळांनी चर पुर्ण पणे भरला जाईल किंवा लोक बुजुन टाकतील भरला गेला नंतर झालेल्या खर्चाचा अर्थ राहणार नाही. त्या ऐवजी यात थोडा बदल वॉलकंपाऊन्ड बांधले तर त्याला काही फारसा खर्च येणार नाही. फारसे महाग पडत नाही ५० ते ७५ रु फुटांपर्यंत रनींग काम करतात त्यापेक्षा जास्त खर्च येत नाही. खड्डे करुन काहीही उपयोग होणार नाही. त्यापेक्षा तार कंपाऊंन्ड केल्यावर निश्चित होऊन जाईल की ही जागा आपली आहे. म्हणुन चर खोदण्याऐवजी तार कंपाऊन्ड केले तर ते जास्त चांगले राहील असे मला वाटते.

म. शितल नवले महापौर महोदय, मी विषय क्रमांक ४२ वर बोलत आहे प्रभाग समित्या. परंतु हा आपल्या शहराशी निगडीत खुप मोठी अडचण आहे. आपल्याकडे पाणी वितरणासाठी कोणतेही तंत्रज्ञान किंवा समिती, कंन्सलटंट नाहीय. माझी आपल्याला विनंती आहे की, जर टाटा कन्सलंटंट ची नेमणुक केली तर जो आपल्याला ४ दिवस ८ दिवस पाणी येण्याची जी अडचण आहे ती कमी होईल. जसे आपण कन्सलटंट नेमत आहात त्यात हा एक विषय घेण्यात यावा. जेणेकरुण पुढे कन्संलटंट नेमताना आपल्याला कुठली परवानगी लागणार नाही.

म. महापौर हा जो मुद्दा आहे टाटा कन्सलटंट चा याविषयावर सुरवातीपासुन चर्चा आहे. याबाबत म. अभियंता यांनी सभागृहाला माहीती द्यावी. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्याला वॉटर ऑडीट करायचे आहे. वॉटर ऑडीज जर आपण केले आणि कन्सलटंट जर नेमला तर आपल्या जे वेळेवर पाणी मिळत नाही आणि एका भागात पाणी सोडल्यानंतर दुसऱ्या भागाला पाणी मिळणेसाठी थांबावे लागते अश्या अडचणी यामुळे संपणार आहेत. टाटा कन्सलर्टींग किंवा अन्य गुणवत्ताधारक प्रशिक्षित संस्था यांची शासकीय दराप्रमाणे तथा नियमानुसार निविदा पध्दतीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विषयाचा त्यात समावेश करुन विषयाला मंजुरी देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६१ दिनांक ०७/०९/२०१९

30 जून 2003 रोजी अस्तित्वातील नगरपालिकेचे मनपात रुपांतर झालेले आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपालिकेची 1986 मध्ये हद्दवाढ झालेली होती त्यावेळेला नगरपालिकेचे क्षेत्र 46.46 चौ.मी. व लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3,76,475 मात्र होती. तसेच सध्यास्थितीत शहरात 262.29कि.मी. लांबीचे कॉंक्रीट, डांबरी, कच्चे असे एकून

552.79कि.मी लांबीचे रस्ते अतित्वात आहेत.तसेच नवीन कॉलनी परिसरातील 300 कि.मी. लांबीचे कच्चे रस्ते पक्के करणे आवश्यक आहेत. तसेच शहरातील 20% भागात भूमिगत गटारी व 30% भागात खुल्या गटारी आहेत. शहरात प्रमुख नाले असून शहराच्या माध्यमातून 6.00कि.मी. लांबीची पांझरा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते, शहरात 3 राष्ट्रीय महामार्ग 1)मुंबई आग्रा 2)नागपूर सुरत 3)धुळे सोलापूर महामार्ग जातात तसेच शहरात बहु संस्थेने शैक्षणिक संस्था अस्तित्वात आहेत. तसेच एकविरा देवी प्राचीन देवस्थान, लळिंग किल्ला व लळिंगचे वनक्षेत्र आहे.

दि.05 जाने. 2018 च्या शासन निर्णयानुसार धुळे मनपाची हद्दवाढ झालेली असून त्यात 10 महसुली पूर्ण गावे व एक गाव गावठाण व्यतिरिक्त क्षेत्र मनपा हद्दीत समाविष्ठ झालेले आहेत. सध्यस्थितीत धुळे मनपाची क्षेत्र 50.22 चौ.मी. असून लोकसंख्या 110515 मात्र आहे. त्यामुळे शहराचे एकूण क्षेत्र 102 चौ.मी. झाले आहे. व 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 486990 मात्र झाली आहे.या बाबत नॅचरल ग्रोथ गृहीत धरता लोकसंख्या 650000 होईल.

शहरामध्ये साधारणतः 1110 मंजूर उपलब्ध अभिन्यास आहे. त्यात साधारणतः 50% भागात कुंपण भिंत झालेली आहे. 50% भागात झाडे लावणेसाठी गुरे यांना अडथळा आणण्यासाठी धुळे शहरात हद्दवाढ झालेले गावातील काही जागा गुरचरण म्हणून आरक्षित आहेत. त्यासाठी चारही बाजूस चर खोदणे आवश्यक आहे.

सदर अभिन्यासाच्या आजूबाजूस चर खोदण्यासाठी निविदा मागविणे योग्य राहील. असा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व सादर झालेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपलिकेच्या अंतर्गत असलेल ओपनस्पेस (मोकळया जागा) चर खोदणेसाठी निविदा प्रक्रिया राबविणेसाठी व कन्सं्टंट नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे. सदर निविदा प्रक्रिया राबवितांना Cubic meter चा दर BOQ मध्ये ठेवून निविदा काढण्यांत यावी. तसेच rent वर JCB व Tipper लावण्यासाठी प्रतितास प्रति दिवसच्या निविदा काढण्यासाठी वार्षिक पध्दतीने निविदा प्रक्रिया करावी.

तसेच धुळे शहरातील पाणीपुरवठयांचा प्रश्न लक्षांत घेता याकामी नियोजन बध्द आराखडा व वॉटर ऑडीट इत्यादी कामे करण्यांसाठी टाटा कन्संटटंन्सी किंवा अन्य गुणवत्ताधारक प्रशिक्षित संस्था यांची शासकीय दराप्रमाणे तथा नियमानुसार निविदा पध्दतीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाने नियमानुसार तांतडीने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ४७ — धुळे शहरात हॉकर्स झोन तयार करणे बाबत आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रतिभा चौधरी — महापौर महोदय, सदरचा विषय अतिशय महत्वाचा असुन याविषयाबाबत बऱ्याच वेळा चर्चा देखील झाली आहे.नवरंग पाण्याच्या टाकीजवळ म.अभियंता यांनी देवपुर विभागातील नगरसेवकांची बैठक देखील घेतली होती. हॉकर्स झोन कुठे असावेत किंवा नसावेत तसेच

शहरातील कोणत्या भागात हॉकर्स झोन करण्यात यावे याबाबत सविस्तर चर्चा होवुन तसा ठराव देखील झालेला आहे. परंतु त्या ठरावाची अजुन पर्यत अंमलबजावणी झालेली नाही. शहरामधील जे.बी.रोड, आग्रा रोड,पारोळा रोड किंवा देवपुर मधील जयहिंद कॉलनी असेल अश्या परिसरात ज्या लॉऱ्या लागतात त्या लॉरींनमुळे महाविद्यालयात येणारे विद्यार्थी तसेच रस्त्यावरुन वावरणारे नागरिक यांना अडचणी येतात. देवपुर भागात खेडयांवरील नागरीक रस्त्यावर सतरंजी मांडुन भाजीपाला, फळे विक्रीसाठी विना परवानगी बसत असतात. माझी विनंती आहे आर्किटेकची लवकरात लवकर नेमणुक करा व झालेल्या ठरावाची अमंल बजावणी लवकरात लवकर करणेत यावी.

म. हर्षकुमार रेलन — महापौर महोदय, हॉकर्स झोन बाबत आर्किटेक नियुक्ती करणेबाबतचा जो विषय आहे. ज्या-ज्या वेळी हा विषय विषयपत्रिकेवर आलेला आहे. त्या प्रत्येक वेळी मी सांगितले आहे. तसेच आज पर्यंत या विषयावर प्रशासनाने कुठलीही कार्यवाही केलेली नाही. नेहमी मुख्य रस्त्यावर लॉरी धारक, व पथारी टाकुन भाजीपाला विक्रेते बसत असतात. तसेच हजारो बाहेरगावाचे लोक रोज शहरात येत असतात. बाजारात आपण आत पर्यंत जावु शकत नाही एतकी जास्त संख्या लॉरी धारकांची त्या ठिकाणी असते या बाबत मनपाचे अतिक्रमण विभाग कुठलीही कार्यवाही करत नाही. त्यामुळे शहर एकदम भकास झाले आहे. यासंदर्भात मी अनेक वेळा पत्र दिले आहे. तत्कालीन आयुक्त श्री. भोसले साहेब असतांना हॉकर्स झोन चा विषय सुरु झाला होता. त्यादिवसापासुन हॉकर्सच्या संख्येत वाढ झालेली आहे. आणि आपण त्यांना होकर्स घोषित केले आहे. आपण त्यांना जागा देणार असल्याणे लोकांनी खेड्या-पांड्यातुन नातेवाईक बोलावुन त्यांनाही व्यवसायास लावले आहे. आज रस्त्यावरुन चालणे अवघड झाले आहे. आग्रारोड ला कुठल्याही दुकानात मोटारसाईकल लावुन जाता येत नाही. चार-चाकी वाहन अश्या परिस्थितीमुळे बाजारात प्रवेश करु शकत नाही. साक्री, मालेगाव, चाळीसगांव या भागतील अनेक नागरिक बाजारातील या परिस्थितीमुळे मार्केटींग साठी येत नाहीत. हॉकर्स झोन आणि नो हॉकर्स झोन जे निश्चित केले आहेत त्या भागात जे मनपाचे भुखंड रिकामे केले आहे. त्याठिकाणी हॉकर्स धारकांचे पुनर्वसन करणेत यावे. आणि या लोकांना फुट-पाथांवर माल विक्रीस परवानगी देण्यात येवु नये. तसेच आग्रा रोड वर जे हॉकर्स धारकयांना दुकाणासमोरील जागा भाड्याने दिली जाते म्हणुन त्यांना त्याठिकाणावरुन लवकरात लवकर हटविण्यात यावे व या विषयाला मंजुरी देण्यात यावी.

म. शितल नवले — महापौर महोदय, या विषयात फक्त आर्किटेक नेमुन चालणार नाही. तर यात आपण काही शाळा, महाविद्यालय यांना काही जागा दत्तक जर दिले तर तेथे ते काही स्पर्धा, कार्यक्रम घेवु शकतील आणि निश्चितच ग्रीन धुळे, क्लिन धुळे व्हायला वेळ लागणार नाही.

म. उपायुक्त — सन्मा.सभागृहांच्या माहितीसाठी सांगतो की,शासनाने एक मोबाईल ॲप सुरु केले आहे त्यानुसार आपण सर्व हॉकर्स चा सर्व्हे करणार आहोत. आणि या ॲपनूसार सर्व्हे केल्यानंतर हॉकर्स झोन प्रश्नाबाबतच्या बऱ्याचश्या अडचणी दुर होणार आहेत.

म. महापौर — सर्व नगरसेवकांचे निर्णय लक्षात घेवुन आणि त्यातील काही चुका दुरुस्त करुन विषयाला मंजुरी देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६२ दिनांक ०७/०९/२०१९

30 जून 2003 रोजी अस्तित्वातील नगरपालिकेचे मनपात रुपांतर झालेले आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपालिकेची 1986 मध्ये हद्दवाढ झालेली होती त्यावेळेला नगरपालिकेचे क्षेत्र 46.46 चौ.मी. व लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3,76,475 मात्र होती. तसेच सध्यास्थितीत शहरात 262.29कि.मी. लांबीचे कॉंक्रीट, डांबरी, कच्चे असे एकून 552.79

कि.मी लांबीचे रस्ते अतित्वात आहेत.तसेच नवीन कॉलनी परिसरातील 300 कि .मी. लांबीचे कच्चे रस्ते पक्के करणे आवश्यक आहेत. तसेच शहरातील 20% भागात भूमिगत गटारी व 30% भागात खुल्या गटारी आहेत. शहरात प्रमुख नाले असून शहराच्या माध्यमातून 6.00कि.मी. लांबीची पांझरा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते, शहरात 3 राष्ट्रीय महामार्ग 1)मुंबई आग्रा 2)नागपूर सुरत3)धुळे सोलापूर महामार्ग जातात तसेच शहरात बहु संस्थेने शैक्षणिक संस्था अस्तित्वात आहेत. तसेच एकविरा देवी प्राचीन देवस्थान, लळिंग किल्ला व लळिंगचे वनक्षेत्र आहे.

दि.05 जाने. 2018 च्या शासन निर्णयानुसार धुळे मनपाची हद्दवाढ झालेली असून त्यात 10 महसुली पूर्ण गावे व एक गाव गावठाण व्यतिरिक्त क्षेत्र मनपा हद्दीत समाविष्ठ झालेले आहेत. सध्यस्थितीत धुळे मनपाची क्षेत्र 50.22 चौ.मी. असून लोकसंख्या 110515 मात्र आहे. त्यामुळे शहराचे एकूण क्षेत्र 102 चौ.मी. झाले आहे . व 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 486990 मात्र झाली आहे.या बाबत नॅचरल ग्रोथ गृहीत धरता लोकसंख्या 650000 होईल.

धुळे शहरामध्ये मुख्यतः आग्रा रोड,जे.बी. रोड ,पारोळा रोड, मौलवीगंज या भागा मध्ये रस्त्यावरती लोडगाड्या लागत असतात.सदर लोडगाड्यासाठी पर्यायी हॉकर्स झोन करण्यासाठी आर्कीटेक्ट यांची नेमणूक होणे आवश्यक आहे.त्यासाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे ठेवणे आवश्यक असल्याने मंजुरीस्तव सादर.

शहरात सर्वत्र शासनाच्या हॉकर्स झोनच्या गाईड लाईन्स प्रमाणे पूर्ण काम करण्यासाठी consultant नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यांत यावा असे अभिप्राय म. आयुक्त सो तथा जिल्हाधिकारी धुळे यांनी नोंदविले आहे.

सदरचा प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार शासनाच्या निर्देशानुसार शहरात हॉकर्स झोनची निर्मिती करण्यासाठी आवश्यक तो आराखडा तयार करणेसाठी आर्किटेक्ट तथा कन्सलटंट नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे. यासाठी प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ४८ धुळे शहरातील ओपन स्पेसमध्ये ग्रीन स्पेस तयार करणेबाबत आकिटेक्ट यांची नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६३ दिनांक ०७/०९/२०१९

30 जून 2003 रोजी अस्तित्वातील नगरपालिकेचे मनपात रुपांतर झालेले आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपालिकेची 1986 मध्ये हद्दवाढ झालेली होती त्यावेळेला नगरपालिकेचे क्षेत्र 46.46 चौ.मी. व लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3,76,475 मात्र होती. तसेच सध्यास्थितीत शहरात 262.29कि.मी. लांबीचे कॉक्रीट, डांबरी, कच्चे असे एकून 552.79कि.मी लांबीचे रस्ते अतित्वात आहेत.तसेच नवीन कॉलनी परिसरातील 300 कि .मी. लांबीचे कच्चे रस्ते पक्के करणे आवश्यक आहेत. तसेच शहरातील 20% भागात भूमिगत गटारी व 30% भागात खुल्या गटारी आहेत. शहरात प्रमुख नाले असून शहराच्या माध्यमातून

6.00कि.मी. लांबीची पांझरा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते, शहरात 3 राष्ट्रीय महामार्ग 1)मुंबई आग्रा 2)नागपूर सुरत3)धुळे सोलापूर महामार्ग जातात तसेच शहरात बहु संस्थेने शैक्षणिक संस्था अस्तित्वात आहेत. तसेच एकविरा देवी प्राचीन देवस्थान, लळिंग किल्ला व लळिंगचे वनक्षेत्र आहे.

दि.05 जाने. 2018 च्या शासन निर्णयानुसार धुळे मनपाची हद्दवाढ झालेली असून त्यात 10 महसुली पूर्ण गावे व एक गाव गावठाण व्यतिरिक्त क्षेत्र मनपा हद्दीत समाविष्ठ झालेले आहेत. सध्यस्थितीत धुळे मनपाची क्षेत्र 50.22 चौ.मी. असून लोकसंख्या 110515 मात्र आहे. त्यामुळे शहराचे एकूण क्षेत्र 102 चौ.मी. झाले आहे. व 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 486990 मात्र झाली आहे.या बाबत नॅचरल ग्रोथ गृहीत धरता लोकसंख्या 650000 होईल.

शहरामध्ये साधारणतः 1110 मंजूर उपलब्ध अभिन्यास आहे. त्यात साधारणतः 50% भागात कुंपण भिंत झालेली आहे. सदर कुंपण भिंतीच्या आत ग्रीन स्पेस तयार करण्यासाठी आर्कीटेक्ट यांची नेमणूक होणे आवश्यक आहे.

शहरात जिथे जिथे वृक्षारोपण व ग्रीन स्पेस डेव्हलपमेंट शक्य आहे त्या सर्व ठिकाणी आवश्यक व गरजेप्रमाणे कामाचा आराखडा करण्यासाठी व monitoring साठी cousaltant नेमणेसाठी निविदा पक्रिया करण्यांस मान्यता घेण्यांत यावी असा अभिप्राय म. आयुक्तांनी सादर केलेला आहे.

उक्त प्रस्ताव विचार घेता शहरातील ज्या मोकळया जागांना संरक्षण भिंत उपलब्ध आहे अशा ठिकाणी ग्रीन स्पेस तयार करणे व monitoring साठी cousaltant नेमणेसाठी निविदा पक्रिया करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-४९ अवधान येथील एम.आय.डी.सी. तलावाजवळील 75 एकर जागेवर विज्ञान प्रदर्शन व जागा विकसीत करणेसाठी धोरण ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर महत्वाचे म्हणजे अवधान ग्रामपंचाय ज्या वेळेस महापालिका हद्दीत आली ती जागा ग्रामपंचायतीची असतांना सुध्दा ती जागा कोणत्यातरी संस्थेला देण्यात येणार होती. परंतु आज जी ७५ ऐकर जागा मनपा ला मिळाली आहे ती फक्त भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. अनुपभाऊ अग्रवाल यांच्या प्रयत्नांनी मिळाली आहे. म्हणुन या महासभेत श्री अनुपभाऊ अग्रवाल यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करणेत यावा. सदरचा विषय मंजुर करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६४ दिनांक ०७/०९/२०१९

30 जून 2003 रोजी अस्तित्वातील नगरपालिकेचे मनपात रुपांतर झालेले आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपालिकेची 1986 मध्ये हद्दवाढ झालेली होती त्यावेळेला नगरपालिकेचे क्षेत्र 46.46 चौ.मी. व लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3,76,475 मात्र होती. तसेच सध्यास्थितीत शहरात 262.29कि.मी. लांबीचे कॉक्रीट, डांबरी, कच्चे असे एकून 552.79कि.मी लांबीचे रस्ते अतित्वात आहेत.तसेच नवीन कॉलनी परिसरातील 300 कि .मी. लांबीचे कच्चे रस्ते पक्के करणे आवश्यक आहेत. तसेच शहरातील 20% भागात भूमिगत गटारी व 30% भागात खुल्या गटारी आहेत. शहरात प्रमुख नाले असून शहराच्या माध्यमातून 6.00कि.मी. लांबीची पांझरा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते, शहरात 3 राष्ट्रीय महामार्ग

1)मुंबई आग्रा 2)नागपूर सुरत3)धुळे सोलापूर महामार्ग जातात तसेच शहरात बहु संस्थेने शैक्षणिक संस्था अस्तित्वात आहेत. तसेच एकविरा देवी प्राचीन देवस्थान, लळिंग किल्ला व लळिंगचे वनक्षेत्र आहे.

दि.05 जाने. 2018 च्या शासन निर्णयानुसार धुळे मनपाची हद्दवाढ झालेली असून त्यात 10 महसुली पूर्ण गावे व एक गाव गावठाण व्यतिरिक्त क्षेत्र मनपा हद्दीत समाविष्ठ झालेले आहेत.सध्यस्थितीत धुळे मनपाची क्षेत्र 50.22 चौ.मी. असून लोकसंख्या 110515 मात्र आहे. त्यामुळे शहराचे एकूण क्षेत्र 102 चौ.मी. झाले आहे. व 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 486990 मात्र झाली आहे.या बाबत नॅचरल ग्रोथ गृहीत धरता लोकसंख्या 650000 होईल.

धुळे शहरालगत अवधान भागातील गट क्र. 179/2 , गट क्र. 62/1 , गट क्र. 172/1 , गट क्र. 172/2 या ठिकाणी साधारणत: 75 एकर ओपन स्पेस जागा उपलब्ध आहे. सदरच्या जागेत विज्ञान प्रदर्शन केंद्र उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र स्तरावरील आर्कीटेक्ट यांची नेमणूक होणे आवश्यक आहे.

कलकत्ता येथील science city व बंगलूरु येथील विवेश्यरय्या सेंटर बनविण्यासाठी सदरील जागा वापरण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव व यासाठी निविदा प्रक्रिया करण्यासाठी consultant नेमण्यासाठीची निविदा प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यांत यावा.असे अभिप्राय म. आयुक्त सो तथा जिल्हाधिकारी धुळे यांनी नोंदविले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे शहरालगत अवधान भागातील गट क्र.179/2, गट क्र. 62/1 , गट क्र. 172/1 , गट क्र. 172/2 या ठिकाणी साधारणत: 75 एकर ओपन स्पेस जागेवर विज्ञान प्रदर्शन केंद्र उभारण्यांसाठी तसेच यासाठी आर्किटेक्ट किंवा तज्ञ सल्लागार नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर जागेच्या काही भागात अद्ययावत सामाजिक भवन तथा मंगल कार्यालय उभारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-५० प्लास्टीक बंदी बाबत महासभेला अवगत करणे व दंड आकारणीचा अधिकार मा.आयुक्त सो यांना ठरविणेचा अधिकार बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन महापौर महोदय,शेजारचे गुजरात राज्यात फक्त ५० मॅक्रमवरच बंदी करण्यात आली आहे आणि आपल्याकडे २०० मॅक्रम आहे तरी बंदी आहे. मा. पंतप्रधान साहेबांनी स्वतंत्रदिनी लालकिल्यावर भाषण करतांना स्पष्ट पणे सांगितले आहे. एका वेळस ज्या कॅरीबॅगचा वापर होतो त्यापासुन आपल्याला भारताला मुक्त करावयाचे आहे. म्हणजे ५० मॅक्रम च्या खाली . २०० मॅक्रमची जी प्लास्टिकची कॅरीबॅग असते ती कमीत-कमी १० वर्ष खराब होत नाही पंरतु त्यावर ही आपण बंदी आणली आहे. सध्या पावसाळा सुरु आहे कागदी पिशव्या त्यात जास्त काळ टिकु शकत नाही. त्यामुळे मालाचे नुकसान होते म्हणुन ग्राहक काही वेळेस माल सुध्दा सोडुन जातात. प्लास्टीक बंदी व्हायलाच पाहिजे पण पंतप्रधान महोदयांच्या सुचनेप्रमाणे व्हायला पाहिजे. संपुर्ण देशात बंदी केली पाहिजे अशी आपण मागणी केली पाहिजे. गुजरात राज्यातुन रोज माल येतो त्याला आपण बंदी करत नाही. आणि व्यापारी लोकांना दंड लावण्यात येतो. दुकानदार मजबुर असतो ग्राहकाने मागितली तर दुकानदाराला द्यावेच लागते.

माझी महापौर महादयांना एकच सुचना आहे बंदी करा पण ५० मॅक्रमच्या खाली किंवा राष्ट्रीय धोरणानुसार करण्यात यावी.

सन्मा. सदस्य तहकुब

म. महापौर सदर विषय सर्व सन्मा. सदस्यांच्या मान्यतेने विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.
धुळे शहरात ज्या पध्दतीने दंड आकारला जातो काही गरीब व्यापारी असतील मोठे व्यापारी असतील या सर्वांना पेलविले जाईल अश्या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन, व्यापारी वर्गाशी चर्चा करुन हा विषय पुढच्या सभेत घेण्यात येईल.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६५ दिनांक ०७/०९/२०१९

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-ब असाधारण क्र.८१ दिनांक २३ मार्च २०१८ च्या अधिसुचनेनुसार प्लॅस्टीक पासुन बनविल्या जाणाऱ्या पिशव्या (हँडल असलेल्या व नसलेल्या), थर्माकॉल, एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजल वस्तु उदा.ताट, कप, प्लेट्स, ग्लास, भांडे, काटे, चमचे, हॉटेल मध्ये पॅकींगसाठी वापरले जाणारे भांडे, वाटी, स्ट्रॉ, नॉन ओहन पॉलीपॉलीलेन बॅग्ज, द्रव पदार्थ साठविण्याची व वापरात येणारे प्लास्टीक पाऊच व प्लास्टीक वेस्टन इ. उत्पादन, वापर, साठवणुक, वितरण घाऊक व किरकोळ विक्री, आयात व वाहतुक करण्यास राज्यात संपुर्ण बंदी करण्यात आली आहे.

सदर अधिसुचना राज्यातील कोणतीही व्यक्ती, व्यक्तीचा समुह, शासकीय व अशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था, क्रिडा संकुल, क्लब, चित्रपटगृह, नाट्यगृहे, औद्योगीक घटक, समारंभाचे हॉल, वाणीज्य संस्था, कार्यालये, धार्मीक स्थळे, धार्मीक संस्था, हॉटेल, ढाबे, दुकानदार, मॉल, विक्रेता, केटरर्स, घाऊक विक्रेता, व्यापारी, फेरीवाला, वितरक, वाहतुकदार, सेल्समन, मंडई, उत्पादक, स्टॉल्स, पर्यटन क्षेत्रे, वने व संरक्षित वने, इको.सेसेंटीव्ह क्षेत्रे, सर्व सागरी किनारे व सर्व सार्व.ठिकाणे बस स्थानके, रेल्वे स्थानके इ.ठिकाणी लागु आहे. त्या अनुषंगाने शहरात प्लॅस्टीक मुक्त करणेकामी प्लास्टीक विक्रेते, उत्पादक, किरकोळ विक्रेते,वितरक व वापरकर्ते यांच्यावर पहिल्या गुन्ह्यासाठी रु.५०००/-, दुसऱ्या गुन्ह्यासाठी रु.१०,०००/- व वारंवार गुन्हा केल्यास पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होऊन ३ महिन्यापर्यंत शिक्षा व रु.२५,०००/- दंड होऊ शकतो. जुन-२०१८ पासुन ते आजपावेतो रु.२,४४,५००/- दंड वसुल करण्यात आला आहे. तरी यावर प्रभावी उपाययोजना करण्याकामी मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडे झालेल्या बैठकीत उक्त संदर्भ क्र.१ च्या शासननिर्देशानुसार धुळे महानगरपालिकेचे क्षेत्र प्लास्टीक मुक्त होणेकामी कार्यक्षेत्रात नियमांचे उल्लंघन करणारे उत्पादक,विक्रेते, किरकोळ विक्रेते व व्यापारी, वितरक, वापरकर्ते, यांच्यावर पहिला गुन्हा रु.१०,०००/- दुसरा गुन्हा रु.२५,०००/-तीसरा गुन्हा रु.५०,०००/- व वारंवार गुन्हा केल्यास पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होऊन ३ महिन्यापर्यंत शिक्षा व रु.१,००,०००/- दंड आकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेबाबत निर्देश दिले आहे.

त्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेचे क्षेत्र प्लास्टीक मुक्त होणेकामी कार्यक्षेत्रात नियमांचे उल्लंघन करणारे उत्पादक, विक्रेते, किरकोळ विक्रेते व व्यापारी, वितरक, वापरकर्ते, यांच्यावर किमान रु.१०,०००/- (दहा हजार) ते रु.१,००,०००/- (एक लाख) दंड आकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणे बाबतचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा विचारात घेता प्लॉस्टीक वापराबाबत नागरीकांना व व्यापा-यांना पर्याय उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तसेच या संदर्भात जनजागृती व प्रबोधनाबरोबरच व्यापारी व नागरीकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे यासाठी प्रथमत: सर्वस्तरातील व्यापा-यासमवेत बैठक घेण्यांत येईल व त्यानंतर सदर प्रस्तावाच्या

कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यांत येईल तोपावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-५१ सर्व विभागातील महत्वाचा कुठलाही आर्थिक विषय महासभेत घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय, सदरचा जो विषय आहे त्यातुन काही लाईटचे कामे, दुरुस्तीचे कामे असतील ते आम्ही नगरसेवक अधिकाऱ्यांना सुचीत करतो.आणि अधिकारी ते कामे करुन घेतात वर्गाकडुन कामे होतोत काही वेळेत होतात काही वेळेस उशीरही होतो. यात जी आर्थिक बाब आहे माझ्या एका भागात लिकेज झालेला आहे आणि तो दुरुस्तही करुन दिला पंरतु आम्हाला नगरसेवक म्हणुन किंवा महापालिकेचा एक भाग म्हणुन आम्हांला कधीच समजत नाही की बिल कितीचे टाकण्यात आले आहे. जर आम्ही लाईटचे सांगितले तर लाईट सुरु केली जाते दुरुस्ती असेल तर दुरुस्ती केली जाते पण बिलाचे कधीच समजत नाही. यातली आर्थिक बाब आम्हा नगरसेवकांना कधीच कळत नाही. म्हणुन महापौर महोदयांना माझी विनंती आहे. की आमच्या प्रभागात जे काही कामे होतील त्यांचे जे काही बिल अदा केले जातात याची सुचना प्रत्येक नगरसेवकाला देण्यात यावी.

म. महापौर सदरचा प्रस्ताव मे. महासभेपुढे प्रशासनामार्फत सादर करण्यांत आलेला आहे. प्रशासनाने प्रस्तावात नमूद अधिनियमानुसार उचित कार्यवाही व अंमलबजावणी करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६६ दिनांक ०७/०९/२०१९

मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व विभागातील महत्वाचा कुठलाही आर्थिक विषय महासभेत घेणेबाबत कार्यवाही लेखापाल यांचेमार्फत करणेबाबत सूचीत केलेले आहे.

उक्तबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ संविदा मधील ७.३ नुसार महानगरपालिकेच्या वतीने संविदा करून देण्याचा आयुक्तांना अधिकार अंतर्गत स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरून,या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतूदी लागू होतील त्या अशा

(अ) आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा प्रत्येक संविदा करील

(ब)आयुक्ताला दुस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-याची मान्यता किंवा मंजूरी मिळाल्या वाचून जे प्रयोजन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये पार पाडता येणार नाहीत. अशा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रथमत: रितसर अशी मान्यता किंवा मंजूरी देण्यात येईपर्यंत किंवा देण्यात आली नसेल तर, त्यास अशी कोणत्याही संविदा करता येणार नाही.

[क] स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्याशी संबंधित कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधीच्या संविदाखेरीज,ज्यात पंचवीस लाख रूपयांहून

अधिक परंतू पन्नास लाख रूपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा खर्च अंतर्भुत असले अशी कोणतीही संविदा महापौराने पुर्व मान्यता दिल्याशिवाय आयुक्ताने करता कामा नये. तथापी महापौराने मान्यता दिलेल्या सर्व संविदांची एकूण रक्कम वर्षभरात दोन कोटी पन्नास लाख रूपयांपेक्षा अधिक असता कामा नये. वरील तरतुदींच्या अधिनतेने पंचवीस लाख रूपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भुत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असेल.

(ड) ज्यात [पाच लाख] रूपयांपेक्षा अधिक परंतू [पंचवीस लाख] रूपये किंवा खंड (क) अन्वये त्यावेळी विहित करण्यात येईल अशी त्याहून अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भुत असेल अशा,आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविली पाहिजे.

७.४ **संविदा करण्याची पध्दत -**

(१)या अधिनियमान्वये संविदा करण्याची पध्दत नियमांव्दारे विहीत करण्यात येईल अशी असेल.

(२) जी संविदा या अधिनियमाच्या तरतुदी व नियम यांस अनुसरून केली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असणार नाही.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ संविदा अंतर्गत

१. संविदा करण्याची पध्दत -

(१) आयुक्ताने महानगरपालिकेच्या वतीने केलेली प्रत्येक संविदा ही आयुक्ताने आपल्या स्वत:च्या वतीने ती केली असती तर , ज्या रितीने व ज्या नमुन्यात केल्याने ती त्याच्यावर बंधनकारक झाली असती त्या रीतीने व त्या नमुन्यात केली पहिजे आणि तशाच रितीने व तशाच नमुन्यात तीत बदल करता येईल व ती पुरी करता येईल परंतू

(अ) अशी जी कोणतीही संविदा , जर ती आयुक्ताने केली असती तर ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे.

(ब) कोणतेही काम करण्याबाबत किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरवण्याबाबत केलेल्या ज्या संविदेमुळे , पाचशे रूपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका (राज्य) शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी विहित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा , अधिक खर्च होणार असेल अशी प्रत्येक संविदा लेखी असली पाहिजे आणि तीवर पोट-नियम (२) मध्ये विहीत केलेल्या रीतीने महानगरपालिकेची सामान्य मुद्रा लावली पाहिजे ; मात्र अशी संविदा , आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने पुर्वीच करण्यात आलेल्या कामांसंबंधी किंवा पुर्वीच पुरवण्यात आलेल्या सामग्रीसंबंधी किंवा मालासंबंधी असेल आणि आयुक्त , लेखी आदेशाव्दारे असा लेख लेखी करण्याची आवश्यकता नाही असे ठरवील तर, असा लेख लेखी करण्याची व त्यावर वर सांगितल्याप्रमाणे मुद्रा लावण्याची आवश्यकता भासणार नाही.

(२)महानगरपालिकेची सामान्य मुद्रा नगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे आणि ती ज्या संविदेवर किंवा अन्य लेखावर[स्थावर मालमत्तेच्या किंवा तीमधील हितसंबंधाच्या किंवा तिच्या बाबतच्या हक्कांच्या संपादनाशी संबधित असलेल्या

संविदेव्यतिरीक्त] लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर [स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य,नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा, महानगरपालिका उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी , त्यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या] उपस्थितीत लावण्यात आली पाहिजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखांवर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून स्थायी [उक्त दोन व्यक्तीनी] त्यावर सहया केल्या पाहिजेत [उक्त व्यक्तीच्या] सहया या,अशी कोणतीही संविदा किंवा लेख केल्याबद्दल कोणत्याही साक्षीदारांनी केलेल्या सहयांपासून वेगळया असल्या पाहिजेत.

शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ व GM Portal बाबत दिनांक १४/०८/२०१७ नुसार मार्गदर्शक तत्वे यांच्या अनुषंगाने संबंधित विभाग विहीत पध्दतीचा अवलंब करून निविदा प्रक्रिया मार्फत मक्तेदार / पुरवठादार इ निश्चीत करणे. लेखासंहिता १९७१ चे तरतुदीनुसार सादर देयके तपासून कार्यवाही करणेत येते.

सदरचा प्रस्ताव मे. महासभेपुढे प्रशासनामार्फत सादर करण्यांत आलेला आहे. प्रशासनाने प्रस्तावात नमूद अधिनियमानुसार उचित कार्यवाही व अंमलबजावणी करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-५२ महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र एमसीओ २०१९/ प्र क्र १०२ / नवि १४ दि.२ ऑगस्ट २०१९अन्वये धुळे महानगरपालिकेतील कायम कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सुनिल सोनार विषय मंजुर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालस अधिन राहून सदर प्रस्ताव शासनाकडेस पाठविण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६७ दिनांक ०७/०९/२०१९

शासन अधिसूचना वित्त विभाग दिनांक ३०/०१/२०१९ अन्वये शासकीय/ निम शासकीय कर्मचा-यांना ७ वेतन लागू करणेबाबत अधीसूचना प्रसिध्द करणेत आलेली आहे.

दि.२० फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकानुसार शासन अधीसूचना वित्त विभाग क्र वेपुर २०१९ / प्र क्र १/सेवा ९ दि ३० जानेवारी २०१९ अन्वये दि १ जानेवारी २०१६ पासून सुधारीत वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतन निश्चीती बाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतननियम २०१९, प्रसिध्द करण्यात आले आहेत या नियमांमधील नियम ६ नुसार शासकीय कर्मचा-यांना सुधारीत वेतन संरचना कोणत्या दिनांकापासून स्विकारायची आहे, याबाबत विकल्प देता येईल. असे नमुद केलेले आहे.

दि.२ ऑगस्ट २०१९च्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) अधिकारी / कर्मचारी ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी नुसार वेतन श्रेणी लागू करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

धुळे महनगरपालिकेचे सन २०१८-१९ चे उत्पन्नामध्ये मालमत्ता कर, विकास शुल्क , सेवा शुल्क,फी व अन्य महसुली उत्पन्न तसेच, वस्तु व सेवा कर भरपाई अनुदान व १% मुद्रांक शुल्क अनुदान इ.बाबी खालील प्रमाणे असुन यामध्ये शासनाने विकास कामांसाठी दिलेला निधी व अनुदान, केंद्र व राज्यामार्फत देण्यात आलेला योजनांमधील हिस्सा,धुळे महानगरपालिकेचे घेतलेले कर्ज व व्याजाच्या परतफेडीसाठी आवश्यक रक्कम याबाबींचा समावेश केलेला नाही.त्यानुसार सन२०१८-१९ मधील उत्पन्नाच्या समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी तसेच सन२०१९-२० मधील संभाव्य जमा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

(रुपये लाखात)

अ.क्रं.	तपशिल	सन २०१८-१९ प्रत्यक्ष जमा रकमा	सन २०१९-२० संभाव्य जमा रकमा
१	मालमत्ता व इतर कर	३२७९.८९	५७५७.५१
२	विकास शुल्क	५२०.०८	७६७.००
३	सेवा शुल्क व फी	२२९.२८	३८१.५२
४	अन्य महसुली उत्पन्न	७३०.७५	२३.७५
५	वस्तु व सेवा कर भरपाई अनुदान	९११८.१९	१०००८.००
६	१% मुद्रांक शुल्क भरपाई अनुदान व अन्य	८४.०२	४३०.७३
	एकुण	१४०४२.२१	१७३६८.५१

सन २०१८-१९ मध्ये एकुण जमा उत्पन्नामध्ये व सन २०१९-२० मधील संभाव्य जमा उत्पन्नामध्ये समाविष्ट न करण्यांत आलेल्या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपये लाखात)

अ.क्रं.	तपशिल	सन २०१८-१९ प्रत्यक्ष जमा रकमा	सन २०१९-२० संभाव्य जमा रकमा
१	शासनाकडून प्राप्त अनुदान	६९२८.६०	१३७२१.२२
२	मुदतठेवीचे रोखीकरण	२०६६.०८	०.००
३	इतर किरकोळ रकमा	१६५०.३९	०.००
४	केंद्र व राज्यामार्फत देण्यांत आलेल्या योजनांमधील मनपा हिस्सा रक्कम	२७७०.१५	४००.००
५	आगाऊ व अनामत रकमा	४५९.७५	६१.००
		१३८७४.९७	१४१८२.००

सन २०१८-१९ चे बांधील खर्च बाबतचा तपशील
व सन २०१९-२० संभाव्य बांधील खर्चबाबतचा तपशील
बांधील खर्च

(रुपये लाखात)

अ.क्रं.	तपशिल	सप २०१८-१९ प्रत्यक्ष खर्च रकमा	सन २०१९-२० संभाव्य खर्च रकमा
१	आस्थापना खर्च	७८९८.४१	८८७१.८४
२	प्रशासकीय खर्च	२२३६.९०	३३०८.३३

३	कर्ज व त्यावरील परतफेडीसाठी खर्च	०.००	०.००
४	न्यायालयीन दावा रक्कम	१२.९३	३५.००
५	विद्युत देयके (स्ट्रीट लाईट व इतर)	५७०.२७	६००.००
६	पाणीपुरवठा देयके		
	१.रसायने	२१२.८०	१५०.००
	२.देखभाल दुरुस्ती	१४६.९७	२००.००
	३.पाणीपुरवठा विद्युत देयके	१५४७.८५	१७५०.००
		१२६२६.१३	१४९१५.१७

शासकीय अनुदाने व इतर खर्च तपशील

अ.क्रं.	तपशिल	सन २०१८-१९ प्रत्यक्ष खर्च रकमा	सन २०१९-२० संभाव्य खर्च रकमा
१	शासनाकडून प्राप्त अनुदान व मनपा निधी अंतर्गत भांडवली खर्च	८६२९.९५	२२८८७.४६
२	गुंतवणूक	३८५३.३४	०.००
३	इतर किरकोळ रकमा	६७७.३२	०.००
४	केंद्र व राज्यामार्फत देण्यांत आलेल्या योजनांमधील मनपा हिस्सा रक्कम	९११.५४	५९४.००
५	आगाऊ व अनामत रकमा	७९.०१	६०.००
	एकुण	१४१५१.१६	२३५४१.४६

एकुण खर्च रकमा (अ +ब)

	एकुण खर्च रकमा	२६७७७.२९	३८४५६.६३

आस्थापना खर्च टक्केवारीच्या तक्त्यामध्ये वेतन, निवृत्ती वेतन, कार्यालयीन खर्च, वाहन इंधन,स्टेशनरी, बैठकांवरील खर्च, दुरुस्ती खर्च व महानगरपालिकेतील बाहयसेवा उपलब्धता तत्वावर होणारी काम(आऊट सोर्सींग) यासाठी होणारा खर्च समाविष्ट करणेत आलेला आहे. सन 2018-19 धुळे महानगरपालिकेची आस्थापना खर्च टक्केवारी ५६.२४ % आहे. सदर तक्त्यानुसार मंजुर असलेल्या आस्थापना पदावरील पगारावर ४१८२.०२ लक्ष खर्च झालेला असून त्याअनुषंगाने सन 2019-20 चे अंदाजपत्रक तयार करतांना कायम कर्मचा-यांच्या पगारावरील होणारा संभाव्य खर्च हा ७ वे वेतन आयोगानुसार वाढीव देय रकमेनुसारच तरतूद करणेत आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने ७ वे वतन आयोगानुसार होणा-या संभाव्य खर्च ४५५६.११ लक्ष आहे. मागील वर्षाच्या तुलनेत साधारणत: ३७४.०९+ लक्ष मात्रने वाढ होणार असून मागील वषाच्या आस्थापना खर्च टक्केवारीनुसार वाढ केल्यास साधारणत:२.६७% मात्रने वाढ होवू शकते. परंतु सन २०१९-२० चे अंदाजपत्रक तयार करुन त्यामध्ये आस्थापना खर्चात कपात करणेकामी मनपाच्या उत्पन्नात वाढ करण्याचे नियोजनानुसार संभाव्य वाढ दर्शवून त्यानुसार आस्थापना टक्केवारी काढण्यात आली असून ती ५१.०८%पर्यत आणण्याचे लक्ष केंद्रीत केले असून भविष्यात उत्पन्न वृध्दीचे स्त्रोत नुसार उत्पन्न वाढविणेकामी उपाययोजना प्रस्तावित केलेल्या असून त्यानुसार कार्यवाही व अंमलबजावणी करण्यांत येत आहे.त्यानुसार पुढील ३ वर्षात शासनाच्या निर्णयानुसार सदर टक्केवारी आटोक्यात आणणेकामी प्रयत्न करणेत येतील.

धुळे महानगरपालिकेने १५२ विविध पदांच्य वेतनश्रेण्या निश्चीत केलेल्या आहे सदर पदांच्या वेतन श्रेण्या ह्या ६ व्या वेतन आयोगाच्या शासनाने विहित केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेण्या लागू केलेली नाही. सदर वेतनश्रेणींना मे.महासभेने मान्यता दिलेली आहे.

धुळे महानगरपालिकेने विकास कामांसाठी आजतागायत कुठल्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नसूल सद्यस्थितीत कुठलेही मोठे पायाभूत प्रकल्प कार्यान्वीत नाहीत. सद्यस्थितीत जे प्रकल्प प्रस्तावित व कार्यान्वीत आहेत ते शासनाकडून उपलब्ध होणा-या निधीच्या अधिन असून त्यासाठी देय मनपा हिस्सा १४ वा वित्त आयोग या शासकीय निधीतून वापरण्यात येणार आहे. त्यामुळे कोणतेही अतिरिक्त दायीत्व मनपावर निर्माण होणार नाही.

सदयस्थितीत शासनाकडून जीएसटी अनुदान पोटी ८.२८कोटी मात्र अनुदान प्राप्त होत असून त्यातून कर्मचारी पगार, पेन्शन व इतर देयके अदा करण्यात येत असतात.७वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्यामुळे येणारे अतिरिक्त वित्तीय दायित्व कामी प्राप्त अनुदान व महानगरपालिकेच्या स्व उत्पन्नातून भागविता येईल तसेच फरकाच्या रकमा मनपा आर्थिक परिस्थितीनुसार टप्याटप्याने अदा करण्यांत येतील.

धुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मे. महासभा व स्थायी समिती मार्फत अनेकविध उत्पन्नाचे स्त्रोत सुचविण्यांत आलेले असून त्याव्दारे उत्पन्न वाढीसाठी आवश्यक ती अंमलबजावणी तथा कार्यवाही करण्यांत येत आहे. यात मनपा मालकीच्या हस्तांतरीत झालेल्या गाळे,ओटे, दुकाने, धारकांकडून हस्तांतरण फी वसूल करणे,तसेच मनपा हद्दवाढ झाल्याने जुन्या व नव्या हद्दीतील वाढीव मालमत्तांचे मूल्यांकन करुन मालमत्ता कर आकारणी करणे, वापरात बदल असलेल्या मालमत्तांना व्यावसायिक कर आकारणी करणे, वापरात बदल झालेल्या मालमत्तांची नोंद घेवून त्यांना नवीन दराप्रमाणे आकारणी करणे, व्यापारी संकुलातील गाळयांना नियमाप्रमाणे शासन दराप्रमाणे भाडे आकारणी व अनामत वसूली करणे,अनधिकृत नळ कनेक्शन शोधून दंडात्मक कार्यवाही करणे तसेच अनाधिकृत मोबाईल टॉवर दंड वसुली, अनाधिकृत बांधकाम दंड वसूली, फायर ऑडीट व्दारे मिळणारे उत्पन्न या सारख्या बाबीची प्रभावी व सक्षमतेने अंमलबजावणी व कार्यवाही करण्यांत येणार आहे.त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात फार मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे.

७ वा वेतन आयोग लागू करणेसाठी अंदाजपत्रकात ५ कोटी मात्र तरतूद करण्यात आलेली आहे. ५ व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या सर्व रकमा कर्मचा-यांना अदा करण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयास राज्यातील महानगरपालिकांमधील अधिकारी/ कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती तसेच अटी व शर्ती विहित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

धुळे महानगरपालिकेत सुधारीत आकृतीबंधानुसार खालीलप्रमाणें कायम आस्थापने वरील एकुण मंजुर पदे, कार्यरत पदे व रिक्त पदे आहेत.

अ.क्र.	मंजुर पदे	कार्यरत पदे	रिक्त् पदे
१	२२७४	११२६	११४८
एकुण	२२७४	११२६	११४८

तसेच सुधारीत आकृतीबंधानुसार धुळे महानगरपालिकेत १५२ विविध संवर्गातील पदे मंजुर आहेत.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार धुळे महानगरपालिकेच्या मंजूर आस्थापनेवरील दि. १/१/२०१६ रोजी कार्यरत कायम अधिकारी / कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यांचा प्रस्ताव शासनाकडेस विहीत नियम व पध्दतीनुसार सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमा मनपाच्या उपलब्ध निधी व आर्थिक परिस्थितीनुसार टप्याटप्याने अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-५३ धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास वेंतनश्रेणी सह व सन २०१६ मध्ये शासन मान्य सेवा प्रवेश, प्रवेश नियमावलीत फेरबदलासह प्रस्ताव शासनाकडेस मान्यतेस्तव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे मागील वेळी हा विषय महासभेत आला होता. मला या विषयाची माहिती मिळावी.

म. नगरसचिव मागील वेळी हा विषय मंजुरीसाठी आला होता. प्रस्तावाची टिपणी ठेवण्यांत आली होती. ज्या वेतनश्रेण्यांवरील बदल करावयाचे होते ते सादर केलेले नव्हते. त्यामुळ परिशिष्ट अ आणि ब टिपणी सोबत सादर केलेले नसल्यामुळे आपण काही सन्मा. सदस्यांनी मागणी केली होती. ती माहिती देणेत यावी त्यानुसार हे परिशिष्ट जोडून हा विषय परत सादर करणेत आलाआहे.

म. नागसेन बोरसे या विषयाबाबत काय होत आहे की आपआपल्या पध्दतीने पदे मंजूर करुन घेतात आणि मागासवर्गीय जे एस. सी .एस. टी. ओ.बी.सी. काय असतील त्यांच्यावर अन्याय होतो आहे. मागासवर्गीय कर्मचारी दिसत नाहीत.

म.महापौर सर्व कर्मचारी व अधिका-यांसाठी प्रस्ताव महत्वाचा आहे.

म. नागसेन बोरसे विषय असा आहे काही पदे अशी भरली आहे ती त्यांच्या त्यांच्या मध्येच आरक्षीत करुन घेतले कायम स्वरुपी ज्या पदावर एस.सी.एस.टी. कर्मचारी दिसत नाही ते झालेले नाही. भविष्यात कुठलाही प्रकारचा कोर्टात वाद उद्भवू शकतो माझा या विषयास माझा विरोध नोंदवून घ्यावा.

म. शितल नवले हा जो विषय विषय पटलावर आली आहे.आपण् हा शासनाला सादर करतो आहे. आपल्याला फक्त ठराव करुन घ्यावयाचा आहे. माझी सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, काही पद जी आहे त्यांना जर पदोन्नती दिली तर कामाचा वेग वाढणार आहे आणि काम लवकर होणार आहे. माझी विनंती आहे. की, हा विषय मंजूर करणेत यावा.

म. नागसेन बोरसे विषय असा आहे की, ठरावासाठी पत्र दिले आहे. आस्थापना खर्चाच्या ठराव करणेबाबत विषय असा आहे की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील जेवढया नगरपालिका आहे त्यांना अट टाकली आहे. आस्थापना खर्च हा त्या पालिकेने करावयाचा आहे तर माझे असे म्हणणे आहे की धुळे महानगरपालिकेला उत्पन्न नासिक, पुणे,पिंपरी चिंचवड ठाणे, नवी मुंबई या सर्व मनपांना यांच्या उत्पन्नाच्या समोर आपले जे उत्पन्न आहे ते कमी आहे. त्यासाठी हा ठराव करायला सांगितला होता. महासभेत विषय घ्यायला सांगितला होता. की आम्हाला या अटी शर्ती मधून वगळणेत यावे कारण आमची आजची आर्थिक परिस्थिती ही सक्षम नाही. तो विषय विषय पटलावर का आला नाही. याची माहिती मिळावी. ती उत्पन्नाची बाब आहे. शासनाने आपल्याला आस्थापना खर्चापोटी पैसे दिले आहे आपण आस्थापना खर्च ३५ टक्क्यावर येईल. त्यानंतरच आपल्याला भरती करता येईल. आपण हे पदे मंजुरीला पाठवित

आहे. मंजूर करीत आहे. परंतु आपण शासनाला पाठवून सुध्दा आपण ती पद भरु श्कत नाही. पदाला मंजुरी घेऊ शकत नाही कारण आस्थापना खर्च हा ३५ टक्क्यापेक्षा जास्त असू नये शासनाची अट आहे म्हणून ठरावाची मागणी केली आहे परंतु तो विषय विषय पटलावर घेणेत आला नाही याची माहिती मिळावी.

म. महापौर — आपण पहिल्यांदा हा विषय सभेत घेतला आहे. आपण या विषयावर चर्चा करु.

म.नागसेन बोरसे — विषय असा आहे आपले उत्पन्न इतर महानगरपालिकापेक्षा खूपच कमी आहे. मनपाचे नियम आहे. आणि या अटी मधून वगळणेसाठी आपल्याला शासनाला ठराव करुन पाठवावयाचा आहे. जेणे करुन आपल्याला मनपात याचे कारण आपले पद रिक्त आहे पदांवर भरती करता येत नाही. यासाठी आपण काहीही करु शकत नाही माझी विनंती आहे सभागृहाला ठराव करुन शासनाला पाठवावा महापौरांनी यावर निर्णय घ्यावा.

म. प्रदीप कर्पे — सन्मा.सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी म्हटले आहे की ३५ ते ४२ टक्के आस्थापना खर्च पाहिजे आहे आणि आपला आस्थापना खर्च ६० टक्केच्या जवळपास आहे. यासाठी आपली आर्थिक उत्पन्न वाढविले पाहिजे जो पर्यत आपण उत्पन्न वाढवत नाही आपला आस्थापना खर्च ४२ ते ४५ टक्क्यार्पत येत नाही तरी हा विषय घेणे योग्य वाटत नाही. तरी ही या विषयावर सदस्य बोलत आहे पशासनाकडून या विषयावर माहिती पाहिजे आहे हा विषयाचा बाहर जाणारा विषय आहे हा विषय आता तहकूब करावा याबाबत माहिती घेवून पुनश्च आणावा बरेच सदस्य आज गैरहजर आहेत हा गंभीर विषय आहे.यावर आयुक्त यांनी माहिती द्यावी. माझे मत असे आहे की हा विषय तहकूब करणेत यावा.

म. वंदनाताई भामरे — महापौर महोदय, शहर हद्दवाढीनंतर आमचे वलवाडी गावातील ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांचा समावेश करुन घेतला आहे किंवा नाही हे आज माहिती नाही. परंतु माझ्या प्रभागातील एकाही कर्मचा-याला आतापर्यत वर्षभरात समावेश करण्यांत आला नाही किंवा सामावून घेणेत आले नाही. या अगोदर या विषयासंदर्भात महापौर साहेब व आयुक्त सो. यांचेशी चर्चा झाली आहे. मागे मी सी.ओ. साहेबांना पत्र दिले आहे. किती कर्मचारी ग्रामपंचायतीत व पंचायत समितीत किती कर्मचारी काम करीतहोत याची यादी दिलेली आहे.माझ्या माहितीनुसार लोक संख्येनुसार आकृतिबंध असतो.आकृतिबंध हा ग्रामपंचायतीनुसार की, महानगरपालिके नुसार येईल हे तुम्ही ठरवावयाचे आहे तुम्ही कायदयानुसार तुम्ही करणार आहात आपण जर ठराव केला तर कर्मचा-यांना पूर्ण न्याय मिळेल या विषयामध्ये आमच्याही कर्मचा-यांचा समावेश झाला पाहिजे.जो पर्यत आमच्या कर्मचा-यांचे समायोजन होत नाही तो विषय येथपर्यत येत नाही तो पर्यत हा विषय तहकूब ठेवावा कारण की त्यांनाही न्याय मिळाला पाहिजे ही विनंती आहे.

म. खान मो. साबीर — विषय मंजूर करणेत यावा.

म.महापौर — सदरचा प्रस्ताव अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महत्वाचा प्रस्ताव असल्याने प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६८ दिनांक ०७/०९/२०१९

धुळे महापालिकेच्या सेवा प्रवेश (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ यांस दि १६ फेब्रुवारी २०१६ अन्वयें शासनाने मान्यता देण्यात आली असून सदर नियमास महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४ ब मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यात अ क्र १ ते १५२ पदांचे सेवा नियम परिशिष्ठ २ मध्ये करण्यात येवून शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. व त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणुक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अप्न्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता (नियम ३) अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आली आहे.

सदर सेवा प्रवेश नियमावलीत एका पदासाठी नामनिदेशनाने व पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने पदे भरणेबाबत दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये सेवा प्रवेश नियमावलीतील अ. क्र.६,८,३१,३२,३३,४८,४९,१०६,१०७,१३०,१३६,१३७,१४८ या पदांमध्ये एकाच पदाचा समावेश आहे. सदर पदे एकच असल्याने १०० टक्के प्रतिनियुक्ती पदोन्नती अथवा सरळ सेवेने भरणे सेवा नियमात नमुद करणे आवश्यक आहे.

धुळे महानगरपालिका कर्मचारी अधिका-यांना पदोन्नतीच्या संधी प्रापत व्हाव्यात यासाठी काही पदांच्या सेवा प्रवेश नियमावली अंशत: बदल करणे आवश्यक असल्याने परिशिष्ट ३ मधील अ.क्र६,८,९,१२,२४,२५,२६,३१,३२,३३,४०,४८,४९,५१,५२,५६,७७ १०६, १०७, १३०, १३६,१३७,१४७ या पदासाठी पदोन्नती व सरळ सेवा भरतीसाठी बदल प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत.

तसेच सेवा प्रवेश नियमावलीत पुढील पदांचा सेवा प्रवेश नियमावलीत समावेश नाही. १. विकृतीशास्त्र तज्ञ २. शहर क्षयरोग अधिकारी ३. ड्रेसर ४.शाखा अभियंता(यांत्रिकी) ५.कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)

वरील ३ व २१ पदांच्या संदर्भात सदर बाबतीत परिशिष्ट २ मध्ये व ३ मध्ये बदलांचे विवरणपत्र सोबत सादर करण्यात येत आहे. त्यात आवश्यक ते बदल सादर करण्यात येत

आहे.सदर पदांसाठी शासनाचे व इतर महापालिकेच्या मंजुर सेवा प्रवेश नियमावली वरुन नेमणुकीची/पदोन्नतीची अर्हता व तरतुद घेण्यात आलेली आहे.तसेच धुळे महापालिकेच्या आस्थापना पदांच्या सुधारीत आकृतीबंधास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक धुमपा/ १०१०/ प्र क्र १०३ / नवी २५ दि ४ मार्च २०१६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदर पदांच्या आकृतीबंधात फक्त जुने पदे नव्याने मंजुर करण्यात आलेली पदे व एकुण मंजुर पदे तसेच विविध विभागात दयावयाचे कर्मचा-यांची पदे नमुद करण्यात आली आहेत. तथापी सदर आकृतीबंधात पदांच्या नावासमोर त्यांना दयावयाची वेतनश्रेणी व ग्रेड पे दर्शविण्यात आलेली नाही.

सदर बाबत सुधारीत आकृतीबंधात परिशिष्ठ ३ मध्ये (अ व ब मधील बदलांचे विवरणपत्र) सुधारीत अपेक्षीत पदे व सुधारीत वेतनश्रेण्या दर्शविण्यात आल्या आहेत त्यात सदरच्या वेतनश्रेण्या शासन व इतर मनपातील वेतनश्रेण्या व धुळे मनपा आस्थापना स्वत विचारात घेवून प्रस्तावीत करण्यात आलेल्या आहेत.

प्रस्तावीत वेतनश्रेण्यात १ वैदयकीय आरोग्याधिकारी २ उपायुक्त ३ मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी ४ पशु शल्य चिकित्सक ५ उप अभियंता, (बांधकाम) ६ उप अभियंता (पाणीपुरवठा) ७ उप संचालक (नगररचना) ८ सहा. संचालक, नगररचना ९ वैदयकीय अधिकारी १० नगररचनाकार ११ नगर सचीव १२ सहा. आयुक्त १३ विधी कायदा अधिकारी १४ उप मुख्य लेखा परिक्षक १५ अभियंता जुने पद १६ ओव्हरसियर ,कनिश्ठ अभियंता १७ लेखापाल १८ इमारत निरीक्षक, १९ कनिष्ठ अभियंता २० सहा फायरमन २१ सब ओव्हरसियर इत्यादी पदांच्या वेतनश्रेण्या शासन व इतर मनपातील वेतनश्रेण्या विचारात घेवून सुधारीत वेतनश्रेण्या प्रस्तावीत करणेत आलेल्या आहेत

तसेच खालील पदे नवीन आकृतीबंधात मंजुर करण्यात आलेली आहेत तथापी सदर पदांच्या वेतनश्रेण्या धुळे महानगरपालिकेत आस्थापनेवर मंजुर नसल्याने सदर पद भरतीस अडचणी येतील त्या दृष्टीने सदर वेतनश्रेणी संदर्भात शासनाच्या व इतर महापालिकेच्या वेतनश्रेण्या व धुळे महापालिका आस्थापना स्वत: विचारात घेवून प्रस्तावीत केल्या आहेत. १

सहा. अभियंता,(स्थापत्य) २ किटक संहारक ३ रोड रोलर चालक ४ सहा. अभियंता ५ लघुलेखक (उच्च श्रेणी) ६ लघुलेखक (निम्न श्रेणी) ७ स्विय सहायक ८ प्रभाग अधिकारी ९ उप अधीक्षक १० अंतर्गत लेखा परिक्षक ११ उपनगर सचीव १२ कॅमेरामन १३ शाखा अभियंता (यांत्रीकी) १४ कनिष्ठ अभियंता (यांत्रीकी) १५ कनिष्ठ अभियंता (विदयुत/ पाणीपुरवठा) १६ अभियांत्रीकी सहायक १७ फिल्ट्रेशन इंजीन ड्रायव्हर १८ उप अभीयंता (विदयुत) १९ शाखा अभियंता (विदयुत) २० क. अभियंता (विदयुत) २१ अभियंता अतिक्रमण २२ कनिष्ठ अभियंता (अतिक्रमण) २३ उदयान निरीक्षक २४ उदयान मजुर २५सिस्टीम ॲनलिस्ट २६ नेटवर्किंग ॲडमिनीस्ट्रेटर २७ संगणक प्रोग्रामर २८ जनसंपर्क अधीकारी २९ टेलिफोन ऑपरेटर ३० सहा. विधि अधिकारी ३१ पशु वैंदयकीय अधिकारी ३२ वैदयक शास्त्रतज्ञ ३३ बधीरीकरण तज्ञ ३४ बालरोग तज्ञ ३५ विकृतीशास्त्र तज्ञ ३६ स्त्रीरोग तज्ञ ३७ अन्न्न निरीक्षक ३८ औषध भांडारपाल ३९ ऑक्झलरी नर्स मिडवाईफ ४० सहा. भांडारपाल ४१ लॅब टेकनिशीयन ४२ रेकॉर्ड अभिलेखापाल इत्यादी पदांसाठी शासनाच्या व इतर महा पालिकेच्या वेतनश्रेण्या प्रस्तावीत करणेत येत आहे .

वरील २१ पदांसाठी वेतनश्रेणीत फेर बदल व ४२ पदांसाठी इकडील कार्यालयास वेतनश्रेणी नसल्याने इतर शासनाच्या महापालिकेच्या वेतनश्रेण्या व धुळे मनपा आस्थापना स्वत: विचारात घेवून वेतनश्रेण्या प्रस्तावीत करणेत आलेल्या आहेत.

उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता प्रशासनामार्फत सोबत सादर झालेल्या सेवानियम प्रपत्र ३ तसेच परिशिष्ठ १ व २ मधील बदल तसेच परिशिष्ठ ३ अ व ब मधील बदलांचे विवरणपत्र सुधारीत अपेक्षीत पदे व वेतनश्रेणी तसेच परिशिष्ट ४ मधील पदे समावेशनाचा प्रस्ताव शासनाकडेस मान्यतेस्तव सादर करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. (सोबत परिशिष्ट १,२,३ व ४ इतिवृत्त नोंदवहीत डकविण्यांत आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणुक करावयाची पदासाठी कलम ४५(३) व४५७ (३)अन्वये विविध शैक्षणीक व इतर अर्हतानुसार शासनाकडे सादर करावीत.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-५४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत धुळे शहराच्या रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मान्यताप्रमाणे रस्ते हस्तांतरण करणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. उमैर शव्वाल महापौर महोदय, मला विचारावयाचे आहे की, कामांमधील ज्या अटीं शर्ती दिल्या आहेत त्या सगळया योग्य आहेत पण तरीही सुवर्ण जयंती नगरोत्थानचे काम हस्तांतरण का करणेत आले?

म. महापौर याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

म. उमैर शव्वाल महानगरपालिकेचे अधिकारी इस्टीमेट तयार करतात पुर्ण काम करतात आणि इतके करुनही काम हस्तांतरण केले जोते असे का?तुम्हांला महानगरपालिकेवर येथील कर्मचारी वर्गावर आपला विश्वास नाही का?

म. महापौर धुळे,जळगाव आणि अहमदनगर महानगरपालिकांमधील कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडेस दिलेली आहेत. महानगरपालिका या शासनाच्या नियंत्रणात काम करतात. त्यामुळे शासनाच्या निर्णयाप्रामाणे सदरचे काम देण्यात आलेले

म. शितलकुमार नवले महापौर महोदय, यामध्ये तांत्रीक कारण असे आहे की, कोणतेही नवे काम असेल ते पॅरेंट डिपार्टमेंन्ट कडुन केले जाते. जर वॉटर सप्लाय चे काम असेल ड्रेनेज चे काम आहे तर ते काम पॅरेन्ट डिपार्टमेंन्ट (एन.जी. पी.) कडुनच केले जाते. असा शासन निर्णय आहे. हा शासन निर्णय आत्ताचा नसुन १५ वर्षापासुन आहे. जे काही नवीन डी.पी रोड असतील कॉलनी रोड नाही. जे डी.पी. आपल्याकडे मंजुर असतील, नविन प्रस्तावीत असतील तर हे पॅरेन्ट डिपार्टमेंन्ट कडुनच काम करावयाचे असते. हा शासन निर्णय जुना आहे. फक्त एवढेच की आतापर्यंत याकडे दुर्लक्ष झाले.

म. उमैर शव्वाल महापौर महोदय, यामध्ये अल्पसंख्यांक भागांचे किती रस्ते घेण्यात आले.

म. शितलकुमार नवले तुमचा जसा अल्पसंख्यांक भाग आहे तसा माझा ही भाग अल्पसंख्यांकांचा भाग आहे (मिल परिसर)अतिशय दुर्गम भाग आहे.यामध्ये तुम्हांला सगळे डी.पी.रोड दिसतील माझ्या प्रभागतील फक्त एकच घेण्यात आला आहे मग मी असे म्हटले का की, माझ्याकडे दुर्लक्ष केले.

म. उमैर शव्वाल जर कामांच्या अटी शर्ती, इस्टीमेट आपले अधिकारी करत असतील तर हे काम हस्तांतरण नाही केले पाहिजे असे माझे मत आहे.

म. महापौर तसा शासन निर्णय आहे त्यामध्ये काही बदल होवु शकत नाही.सदर विषयाला कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ६९ दिनांक ०७/०९/२०१९

धुळे शहराच्या रस्ते विकास प्रकल्प कामासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.या प्रशासकीय मान्यता नुसार या प्रकल्प कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यान्वयन यंत्रणा आहे. या मान्यता नुसार सदर प्रकल्पातील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरण करणे आहे.तथापी सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये विद्युतीकरण /नवीन पथदिवे संरचना कामासाठी रक्कम रु.7.57 कोटी मात्र आहे. सदरचे काम हे मनपाशी सद्यस्थितीत असलेल्या संरचनेशी निगडीत असून बहुतांशी कार्यभाग महानगरपालिकेस करावयास असल्याने सदरचे काम करणेबाबत शासनास विनंती करणेत आली आहे. करिता उक्त विद्युतीकरण काम वगळता,मंजूर विकास प्रकल्पाचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे खालील शर्तीस बंधनकारक ठेवून वर्ग करण्यात येत आहे.

1) उक्त बाबत सदर कामांसाठी शासनाकडून जसा निधी उपलब्ध होईल त्यानुसार हस्तांतरण करणेत येईल.
2) शहरात भुयारी गटार योजनेचे काम सुरु झाले. त्यामुळे रस्त्याचे खोदकाम होईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून काम झाले बाबत प्रथमतः खात्री करणे आवश्यक आहे.
3) सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन होणाऱ्या कामांची देखभाल दुरुस्ती हमी तीन वर्ष करिता असावी याबाबत त्रीपक्षीय करारनामा करणे आवश्यक राहील.
4) सदर काम करतेवेळी नगररचनाकार, मनपा धुळे यांचेकडील आवश्यक नकाशे किंवा जागा मोजणी बाबत पूर्तता करणे आवश्यक राहील.
5) प्रकल्पीय रस्ता कामे करते वेळी येथील पाणीपुरवठा मुख्य व वितरण वाहिनीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.तथा नुकसानी बाबत दुरुस्ती करून देणेची जबाबदारी त्या मक्तेदाराची राहील अशी अट आवश्यक राहील.

6) अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार PUBLIC UTILITY साठी प्रस्तावित केलेली प्रोव्हिजन नुसार काम करावे म्हणजे सदरचे रस्ते पुन्हा PUBLIC UTILITY साठी खोदावे लागणार नाहीत या बाबत दक्षता घ्यावी.
7) रस्त्यालगत गटारीचे काम करतांना जोड रस्त्यांना असणाऱ्या अस्तित्वातील गटारीचे पाण्याचा निचरा प्रस्तावित मुख्य गटारीत योग्य प्रकारे उताराने होईल याबबत दक्षता घेवूनच प्रत्यक्षात काम करावे.
8) उक्त बाबत अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच शासन परिपत्रकानुसार अंदाजपत्रका पेक्षा कमीने आलेल्या निविदेत बचत झालेली रक्कम जास्तीच्या कामासाठी खर्च करता येणार नाही.
9) याबाबत कामाची गुणवत्ता राखणेची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील. काम पूर्ण झाले नंतर मनपा सक्षम प्राधिकरणाच्या व मा. महापौर यांच्या तपासणीनंतर देयके अदा करणे व हस्तांतरण करणेची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.

उक्त प्रमाणे अटी शर्ती व शासन प्रशासकीय मान्यतेनुसार विद्युतीकरण / नवीन पथदिवे संरचना कामासाठी रक्कम रु.7.57 कोटी मात्रचे काम वगळून उर्वरीत कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण करणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये विद्युतीकरण /नवीन पथदिवे संरचना कामासाठी रक्कम रु.7.57 कोटी मात्र आहे. सदरचे काम हे मनपाशी सद्यस्थितीत असलेल्या संरचनेशी निगडीत असून बहुतांशी कार्यभाग महानगरपालिकेस करावयास असल्याने सदरचे काम मनपा मार्फत करणेबाबत शासनास तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.१७ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर २०१९
वेळ-सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष महासभा आज मंगळवार दिनांक १७/०९/२०१९ रोजी सकाळी ११-०० मा. श्री.चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर, धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	सौ. पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
९	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१०	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
११	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१३	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१४	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१५	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१६	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१७	सौ. पाटील ज्योस्त्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
१८	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१९	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
२०	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२१	श्रीमती अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्या	----------" ---------
२२	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
२३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------

२४	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
२५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२७	श्रीमती.मंडोरे वालीबेन प्रकाशचंद्र	सदस्य	----------" ---------
२८	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
२९	श्रीमती जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३०	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३१	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३२	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३४	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
३५	श्रीमती शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
३६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
३७	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
३८	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
३९	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४०	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
४१	श्रीमती बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
४२	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
४३	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
४४	श्री. मासुळे अमोल पाववा	सदस्य	----------" ---------
४५	श्रीमती उगल सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
४६	श्रीमती. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
४७	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
४८	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
४९	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
५०	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५१	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
५२	श्रीमती. पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
५३	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५४	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५५	श्री. मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५६	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. अजिज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा. आयुक्त	----------" ---------

४	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
८	श्री. मधुकर पवार	आरोग्याधिकारी	----------" ---------
९	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१२	श्री. एन.पी. सोनार	कार्यालय अधिक्षक	
१३	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ---------
१४	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
१५	श्री गितेश सोनार	विद्युत विभाग	----------" ---------
१६	श्री. महेंद्र जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ---------
१७	श्रीमती कल्पना जाधव	लिपीक अभिलेख विभाग	----------" ---------
१८	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
१९	श्री. राजेश वसावे	मलेरिया विभाग	----------" ---------
२०	श्री. विशाल निंबाळकर	वृक्ष प्राधिकरण विभाग	----------" ---------
२१	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग	----------" ---------
२२	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग	

मा. महापौर आजच्या विशेष महासभेस उपस्थित मा.आयुक्त सो.उपमहापौर, सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव धुळ महानगरपालिका विद्यमान आयुक्त श्री.अजिज शेख साहेब हे महानगरपालिकेत हजर झाले आहे. त्यांचा अल्पसा परिचय करुन देतो.

श्री.अजीज शेख साहेब यांनी यापूर्वी अतिरिक्त आयुक्त पदी नागपूर महानगरपालिकेत काम पाहिले आहे.1993 च्या बॅचचे मुख्याधिकारी संवर्गातून नियुक्ती, त्यांनी आय.आय.टी. खारगपूर एम. टेक पदवी प्राप्त केली.सन 1993ते 2004 पर्यत पनवेल चिपळून, सावंतवाडी,भोर या नगरपालिकांमध्ये मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. सन 2004 पासून उपायुक्त म्हणून कार्यरत, मिराभाईदर, कल्याण डोंबविली महानगरपालिका, नवी मुंबई, वसई विरार याठिकाणी उपायुक्त म्हणून कार्यरत, नागपूर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त पदावर मे 2018 पासून कार्यरत, परिवहन व्यवस्थापक म्हणून यशस्वी कामगिरी, आयुक्त यांच्या रजेच्या कालावधीत कल्याण डोंबिवली व वसई विरार येथे प्रभारी आयुक्तांचा यशस्वी कारभार चालविला आहे. त्यांचे धुळे महानगरपालिकेत सर्व सभागृहातर्फे मा. महापौर सो यांचे हस्ते बुके देऊन स्वागत करण्यात आले.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्या, श्रीमती सुमनबाई यशवंत वाघ,श्री.संजय रामदास पाटील, श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे,सौ.वैशाली भिकन वराडे, श्री. दिपक सुरेश खोपडे, श्री.बन्सीलाल माणिक जाधव,श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन,सौ.हेमा अनिल गोटे इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या

कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७० दिनांक १७/०९/२०१९

सन्मा. सदस्या श्रीमती सुमनबाई यशवंत वाघ, श्री. संजय रामदास पाटील,श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सौ.वैशाली भिकन वराडे,श्री. दिपक सुरेश खोपडे,श्री. बन्सीलाल माणिक जाधव, श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन, सौ. हेमा अनिल गोटे इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-५५ — मा.महापौर साहेब यांच्या आदेशानुसार तसेच स्थायी सभापती श्री.युवराज चैत्राम पाटील, सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे, सौ. सुरेखा चंद्रकांत उगले, सौ.सुरेखा भागवत देवरे व श्री. संतोष छगन खताळ यांच्या पत्रानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या दि. ११/०९/२०१९ च्या शासन निर्णयानुसार **सर्वांसाठी घरे २०२२** या धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी व कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. तसेच या विषयांच्या संदर्भात म.न.पाचे घरकुल योजने तांत्रिक सल्लागार श्री.चेतन सोनार यांनी प्रथम या शासन निर्णयाची संपूर्ण सभागृहाला माहिती द्यावी.

म. महापौर — जिल्हाध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल यांचे पत्रानुसार हा विषय घेणेत आला आहे. तसेच सन्मा. स्थायी समिती सदस्य यांनी पत्र दिले आहे. धुळे शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन जे झोपडपट्टी धारक,अतिक्रमण धारक यांच्यावर घरपाडणेची कार्यवाही होवु शकते त्या दृष्टीकोनातुन शासनाचे निर्णयानुसार भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री.अनुपजी अग्रवाल यांच्या पत्रानुसार हा विषय घेणेत आला आहे. तसेच सभापती, सदस्य स्थायी समिती यांचे पत्र आलेले आहे. धुळे शहरातील जे गोर-गरीब नागरिक असतील त्यांची स्वत: ची हक्काची जागा असावी म्हणून मा. श्री. अनुपजी अग्रवाल यांनी सादर केलेल्या पत्रानुसार विशेष सभा घेणेबाबत सुचित केले आहे. त्यानुसार सभा घेणेत येत आहे.

म. चेतन सोनार — महापौर महोदय, प्रधानमंत्री आवास योजना ही महत्वाकांक्षी योजना केंद्रसरकारने २०१५ मध्ये लागु केली आहे. योजना अशी आहे की, सर्वांसाठी पक्की घरे मिळाली पाहिजे. त्यात त्यांनी 4 टप्पे/घटक दिले आहे. त्या वेगवेगळया घटकांमध्ये महाराष्ट्रातील गरजेप्रमाणे वेगवेगळे विभाग केले पाहिजे त्यानुसार पहिला घटक जे झोपडपट्टीत राहतात अशा अतिक्रमण धारकांना तेथेच वस्ती करुन द्यावयाची आहे. सुरवातीला ९ डिसेंबर २०१५चा शासन निर्णय आला आहे त्यात त्यांनी असे म्हटले होते जमीन, संपत्ती वापरुन तेथील झोपडपट्टीवासीयांना तेथेच इमारतीध्ये व्यवस्थित तेथे पुर्नवसन करावयाचे आणि उरलेला भाग हा विकासकाने तो जो बांधुन देणार घर त्यापैकी २/३ वापरावयाची असे सुटसुटीत त्यांनी दिले होते. दुसरा घटक असा की ज्यांचे उत्पन्न १० लाखांच्यावर आहे. अशा लोकांसाठी घटक २ आणि घटक ३ जो आहे त्यात जे शहरात बेघर भाडेकरी आहेत अशा लोकांना शासनाच्या किंवा महानगरपालिकेच्या जागेवर घरकुल बांधुन द्यावयाची आहेत. त्यासाठी अनुदान मिळणार आहे. पहिल्या घटकांसाठी अनुदान मिळणार आहे. आणि चौथा घटक म्हणजे स्वताच्या मालकीच्या जागेवर किंवा कच्या

घरावर, कच्चे घर पाडुन नविन घर बांधणे. यामध्ये केंद्रशासनाने ३०,०००/- व राज्य शासनाने १,००००००/- रु.द्यावायाचे आहेत. त्यात अट अशी आहे की, घटक ४ मध्ये ज्याचे उत्पन्न ३,००००००/-पर्यंत आहे.आणि कमीत-कमी ३६५ चौ. फु. क्षेत्रफळाचे बांधकाम करावयाचे आहे.म्हणजे जे ३५० ते ३७५ चौ.फु. बिल्टअप घर बांधवायाचे असे कमीत कमी २.५ लाखांचे बांधकाम करावयाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकार अनुदान देणार आहे. आपला जो विषय आहे. झोपडपट्टी अतिक्रमीत, झोपडपट्टी पुनर्वसनाचा त्यामध्ये १७ नोव्हेंबर पासुन ७ फेब्रुवारी पर्यंत वेगवेगळे शासनाचे शासन निर्णय व परिपत्रक आले आहेत. पहिला जो निर्णय आहे ती झोपडपट्टी ज्या जागेवर म्हणजे शासनाच्या किंवा नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले असेल त्यांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करावयाचे आहे. बऱ्याच ठिकाणी या प्रकरणात शासनाला अडचणी आल्या आहेत म्हणुन त्यांनी १७ नोव्हेंबर रोजी शासन निर्णय काढला तेथील जे राहणारे लोक आहेत. त्यांच्या ताब्यातील जागा त्यांच्या नावावर भोगवटदाराने करुन द्यावयाची आहे. त्यासाठी ५०० चौ.फु जागा. त्याच्या जवळ जी ५०० चौ.फु जागा आहे ती विनाशुल्क त्याला भाड्याने द्यावयाची ५०० चौ.फु पासुन १००० चौ.फु. पर्यत एवढी जागा असेल ५०१ पासुन १००० चौ.फु पर्यंत एवढी जागा असेल किंवा रेडीरेक्नर च्या १०% पैसे भरावयाचे आहे. नंतर ती जागा नावे होईल. आणि १००० चौ.फु. पासुन ते १५०० चौ.फु पर्यंत त्याच्या नावे जागा असेल तर १५०० चौ.फु पर्यंत रेडीरेक्नर च्या २५% पैसे त्याने शासनाकडे भरावयाचे आहेत. हे केल्यानंतर ३० वर्षाच्या भोगवटाधारकाने हे करीत असतांना १५०० चौ.फुटाच्या वर त्याची जागा असेल तर त्याने ती जागा निष्काशीत करावयाची आहेत. परत द्यावयाची आहेत. नगरपालिकेच्या मालकीची किंवा शासनाच्या मालकिची असेल ती जागा परत करावयाची आहे. आता ही जागा तशीच राहणार आहे. पण तो भुखंड मोकळा करुन मोजावयाचा आहे. त्यांनी त्याचा अभिन्यास/ आराखडा तयार करायला सांगितला आहे. शक्यतो आराखडया मध्ये भौतिक सुविधा म्हणजे रस्ते गटारी या त्या भोगवट धारकांना मिळाल्या पाहिजे अश्या दृष्टीने व्यवस्थीत प्लॅन तयार करुन तो प्लॅन आपल्या नगररचना खात्यांकडुन मंजुर करुन घ्यावयाचा आहे. तो मंजुर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली जी समिती स्थापन केलेली आहे. त्या समितीमधील सभासद त्या झोपडपट्टी धारकांच्या नावांसमोर जेवढी जागा आहे ती संपुर्ण यादी निश्चित करतील आणि ज्याप्रमणे ५०० चौ. फु. ५०० ते १०००, १०००ते १५०० चौ. फु त्यांचे पैसे वसुल करावयाचे त्यानंतर प्रत्येकाने पैसे भरल्यानंतर तो जो भुखंड त्याला मिळेल तो मिळाल्यानंतर घटक क्रमांक ४ त्याचा मालक होईल. त्याला बांधण्यासाठी २,५०,००० शासन देईल असे त्यांनी सुटसुटीत पणे केलेले आहे. ही शासकीय जागांची माहिती सांगितलेली आहे.

म. अमोल मासुळे महापौर महोदय,महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या वतीने दिनांक ११/०९/२०१९ चे शासन निर्णयानुसार सर्वांसाठी घरे हा जो शासन निर्णय लागु करणेत आला आहे. हा ऐतिहासीक निर्णय राज्यशासनाने घेतला आहे. आणि आज महापौरांनी अजेंड्यावर विषय घेणेसाठी आपले धुळे शहर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष श्री. अनुप अग्रवाल यांनी आपले धुळे शहराचे प्रथम नागरीक आदरणीय महापौर श्री. चंद्रकांत बापु सोनार यांना सुचीत करुन हा विषय तातडीने अजेड्यावर घेऊन तो महासभेत घ्यावा यासाठी विनंती सुचना मांडली म्हणुन प्रथम सभागृहाच्या वतीने तसेच संपुर्ण धुळे शहर नागरिकांच्या वतीने आणि आमच्या मिल परिसराच्या नागरिकांच्या वतीने व नगरसेवकांच्या वतीने धुळे शहराचे भाजपचे महानगरप्रमुख मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल तसेच महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांचा अभिनंदनाचा ठराव करावा अशी मी नगरसेवकांनां विनंती करतो आताच महापौरांनी जी माहिती दिली शहरात

एकुण १२४ झोपडपट्टया आहेत त्यापैकी ३९ झोपडपट्टया घोषीत आहे. ३९ झोपडपट्टया या घोषीत झोपडपट्टया असुन त्या खाजगी जागेवर आहेत. मी विनंती करतो की, ज्याप्रमाणे शासनाचा जो आदेश करणेत आला आहे. त्याप्रमाणे शहरातील १२४ झोपडपट्टया आहेत तेथे नागरिकांना लवकरात लवकर जो ठराव पारीत करणेत येत आहे.त्याचा फायदा झाला पाहिजे. मनपाचे वतीने लवकरात लवकर जे वंचीत आहे त्यांना लाभ घेता येईल अशी मी विनंती करतो.

म. विरोधी पक्ष नेता साबीर शेठ महापौर महोदय, आपण दिलेल्या माहिती नुसार किती झोपडपट्टया अतिक्रमीत आहे, किती एरियात आहे. शासन निर्णय आहे.घरकुल योजना राबवुन अतिक्रमीत जागेवर पुनवर्सन करणारआहे.आपण आज ठराव केला आणि अंमलबजावणी करणेसाठी अतिक्रमण काढण्यासाठी गेलो तर आपल्याला कोर्टाकडुन स्थगिती आलेली दिसेल. तर आपण नियमानुसार टप्या-टप्यांने काम करावे. आज मनपाचे ओपन स्पेसवर अतिक्रमण झालेले आहे. आपण योजना घेऊन जाणार परंतु आपली मनपाची मालमत्ता नसतांना आपण त्याठिकाणी खर्च केल्यास नुकसान होणार आहे. खर्च वाया जाणार आहे. आणि काम होणार नाही. माझी विनंती आहे शहरामध्ये काही भागात ८ ते १० दिवस पाणी येत नाही त्याबाबत ही लवकरात–लवकर उपाययोजना करणेत यावी.

म. महापौर शासकिय जागेवर ज्या झोपडपट्टया आहेत.
१)रमाबाईआंबेडकर चौक,देवपूर/नागसेनवाडी, 2) साईबाबा नगर, आंबेडकर नगर, 3) जमनागिरी भिलाटी 4)देवपूर डी.सी.कॉलेज भिलाटी 5) जुनी भिलाटी 6)विटाभ्टटी खाजगी जागेवरील झोपडपट्टी 7) रासकरनगर 8)श्रीरामनगर 9) सिताराम माळी चाळ 10) पिंजारी चाळ 11) नारायण मास्तर चाळ 12) लिलाबाई चाळ 13)विखेनगर 14) इंदिरा नगर 15) नवीन भिलाटी

वरील प्रमाणे 15 झोपडपट्टयांची जी.आय.एस. आधारीत ड्रोन कॅमे-या व्दारे (DGPS) सर्वेक्षण व मॅपिंग करुन मोजमापे घेतली आहे. जवळपास १०,००० अतिक्रमीत लाभार्थ्यांना आपण अतिक्रमण नियमानुकुल करु शकतो तसेच शहरातील इतर अतिक्रमीत झोपडपट्टया असतील त्यात ११,००० लाभार्थ्यांना योजना होती. असे एकुण २१०००अतिक्रमीत लाभार्थ्यांन पर्यंत योजना पोहचाविली आहे.तसेच टप्या-टप्यांने आवेदनपत्र भरुन घेत आहे. आझादनगर,शिवाजीनगर झोपडपट्टी असेल पुर्ण शहराचा विचार आहे. एका भागाचा नाही यामध्ये घोषीत झोपडपट्टीचा विचार आहे.फुटपाथ असतील सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या महानगरपालिकेच्या जागेवर झोपटपट्टी असेल त्या जागेवर आपण आरक्षण टाकू शकतो आणि शासनाकडून मंजुर करुन तेही काम सोपे झालेले आहे. खाजगी जागा असेल तर त्याबदल्यात त्यांना टी.डी.आर.देणार आहोत नंतर एक एकर जागा मनपाने घेतली तर त्याबदल्यात आपण ८०,००० टी.डी.आर देऊ शकतो त्याच भावाने तो टी.डी.आर. विकु शहतो याच दृष्टीकोनातुन आपल्याला धुळे शहराच्या विकासाच्या दृष्टीकोना तुन मांडणी करावी.

म. शितल नवले महापौर महोदय, आज आपण विशेष सभा बोलावली आहे. आणि हा अंत्यत महत्वाचा विषय आहे. विषयाच्या अनुषंगाने व तसेच आजचा दिवस देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेद्रंजी मोदी साहेब यांचा वाढदिवस देखील आहे. आणि या वाढदिवसाच्या दिवशी आपण गोर-गरीब जनतेला मोठा दिलासा देणार आहोत. त्याचप्रमाणे या अभिनंदनास प्राप्त आमचे खासदार श्री. डॉ. सुभाषजी भामरे तसेच भाजपा महानगरप्रमुख श्री. अनुपजी अग्रवाल आणि विशेष म्हणजे ही महासभा ज्यांनी बोलावली ते आमचे महापौर श्री. चंद्रकांत बापु सोनार हे ही अभिनंदनास

प्राप्त आहेत. आमच्या मिल परिसरातुन आणि वैयक्तीक नवले परिवातुन १९८५-८६ पासुन या पालिकेमध्ये कुणी ना कुणी प्रतिनिधित्व असते आणि ते भाग्य आज मला मिळाले आहे. १९८५ सालापासुन हा मुद्दा आहे. की खाजगी जागेवरील अतिक्रमण हे एकत्रित करावयाचे आणि सातबारावर नाव लावुन घ्यावयाचे आमचा जो मिल परिसर आहे. त्यात शेलारनगर, येवलेकरनगर, रासकरनगर, गुरुकृपानगर, विखेनगर, शैलार वाडी, हटकर वाडी, धनगर वाडी, राऊळवाळी, लिलाबाईचाळ, रंगाळी चाळ असे एकुण १७ ते १८ भाग जवळपास ५०,००० हजार लोकवस्तीचा हा भाग आहे. तसेच हे क्षेत्रफळ इतके मोठे आहे की संपुर्ण एक प्रभाग क्रमांक १५ व १६ ची वसाहत होईल आज या लोकांमधील बरेच लोक मिल कामगार होते, मजुर होते तेथे स्थायीक होतांना त्यांना जागा भाड्यापटयाने देण्यात आल्या होत्या ते लोक मिल मध्ये काम करत असतांना तेथे घरे बांधुन वसाहत निर्माण झाली. आणि कालांतराने ती मिल बंद पडली. आज त्यांच्या मुलबाळ त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्यांना रोजगार सुध्दा नाही. आणि विशेष म्हणजे त्याठिकाणी बांधकाम करण्यासाठी सातबा-यावर नाव नाही. त्यांच्याकडे उपजिवीकेचे साधन नाही. ते तेथे व्यवसाय करु शकत नाही. म्हणुन या दृष्टीने हा निर्णय अतिशय उकृष्ट आहे. आताच सन्मा. विरोधी पक्षनेते बोलले की,शिवाजी नगर, लालासरदार नगर, इस्लामपुरा हा जो भाग आहे. याबाबत सन्मा. सदस्य साबीर शेठ म्हणतात की, काही दावे न्यायालयात प्रलंबीत आहेत. परंतु आता शासन निर्णय आलेला आहे. आता पैश्यांच्या मोबदल्यात काहीही मिळत नसते. आता जागेच्या मोबदल्यात जागा मिळणार आहे. आताच म. महापौरांनी टी.डी.आर बाबत माहिती दिली. टी.डी. आर ही जागा नसते ती कागदावर असते. आपल्याला २०१६ साली नविन टी.डी.आर लागु झाला, नविन टी.डी.आर शी आपल्या टी.डी.आर जुळणी झाली नाही. खर तर धुळे शहरासाठी या दुर्भाग्याचा विषय आहे की, २००३ साली आपली महानगरपालिका अस्तित्वात आली. आणि २००३ पासुन ते २०१७-१८ पर्यंत आपण नगरपरिषदेची नियमावली बांधकाम परवानगी साठी वापरत होतो. ज्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री. सुधाकर देशमुख साहेब आपल्या महापालिकेत आयुक्त म्हणुन आले त्यावेळी त्यांनी २०१७ मध्ये टी.डी.आर लागु केला. आणि तो लागु झाल्यानंतर आपल्याला ऑनलाईन परवानगी लागु झाली. मी एक बिल्डर असोशिएशन चा अध्यक्ष असुन बिल्डर व्यवसायीक म्हणुन सांगतो. ज्यावेळस हा कागद गरिब जनतेच्या हातात पडेल तो त्या दिवशी समाधानी झालेला असेल.आज धुळे शहरात ७० ते ८० प्रकरण हे टी.डी.आर साठी थांबलेले आहेत. टी.डी.आर नसल्यामुळे आणि एकच टी.डी.आर आज पर्यंत मंजुर केलेला आहे. ती खाजगी जागा नसल्यामुळे तो टी.डी.आर दिला गेला आहे. टी.डी.आर साठी लोक लाईन लावुन उभे आहेत. जसे खरेदी विक्रीचे व्यवहार लाईन लावुन होतात तसे होतील आणि त्यामुळे शहरात डेव्हलपमेन्टं होणार आहे.

म. प्रतिभा चौधरी — महापौर महोदय, हा जो विषय आलेला आहे. घाषित झोपडपट्टया व अघोषित झोपडपट्टया असा दोन प्रकारचा विषय आहे. याच्यात आपल्याला अघोषित झोपडपट्टयांना घोषीत कसे करता येईल यासाठी हा विषय अजेंडयांवर आलेला आहे. हा जो विषय आहे आपल्या देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब त्यांचा आज वाढदिवस आहे. आणि त्यांचीही संकल्पना आहे. की २०२२ पर्यंत एकही व्यक्ती देशामध्ये बंघर राहता कामा नये त्यामध्ये शोषीत, वंजीत असतील दलीत असतील आर्थिक दृष्टया दुर्बल असतील बेघर असतील असे सगळे सन २०२२ पर्यंत कोणीही बंधर राहता कामा नये आधी ही संकल्पना मा. मोदी साहेबांची आहे. ही संकल्पना प्रभावीपणे कशी राबविता येठल यासाठी मा. खासदार डॉ. सुभाषजी भामरे आणि शहराचे भाजपानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांनी हा विषय अजेंडयावर घेणेसाठी पत्र

दिलेले आहे. आणि श्री. बंटीभाऊ मासुळे यांनी जी सुचना मांडली की यांचे अभिनंदन करणेत यावी आणि त्यांचा विषय तुम्ही अजेंडयावर घेता त्याबद्दल तुमचेही अभिनंदन करणेत यावे. असा जो विषय त्यांनी मांडला या विषयाला माझे अनुमोदन आहे. मला असे सांगावयाचे आहे की, शहरामध्ये अघोषित अशा झोपडपट्टयांमधे वर्षानु वर्ष काही लोक ३० ते ४० वर्षापासुन रहात आहे. ते खाजगी मालकाच्या जागेवर अतिक्रमण करुन राहत आहे. तो खाजगी जमीन अतिक्रमन धारकांना आपण अघोषीत झोपडपट्टी ही घोषीत कशी करता येईल त्यासाठी हा विश आलेला आहे. जे लोक ५० वर्षापासुन राहत आहे. ते जागा खाली करुन देणार नाही. म्हणून ज्याची जागा खाली करुन देणार नाही त्याला पैशाच्या मोबदल्यामध्ये टी. डी.आर देऊन तो व्यक्ती समाधानी होईल आणी त्याला देखील आनंद मिळणार आहे. त्याची जागा गेल्यात जमा होतील परंतु त्याला टी.डी.आर चा फायदा मिळणार आहे. आपल्याला जागा मालकाची संमती देखील महत्वाची आहे. आणि शासनाचे जागेवर झोपडपट्टया घोषीत झालेल्या आहेत. त्याबाबतीत मला विचारावयाचे आहे की, गेल्या जानेवारी महिन्यामध्ये जे लाभार्थि आहेत. त्यांना घरकुल मंजुर झाले आहेत त्याची यादी लागली आहे. त्यांना ४ महिने बांधकामाची मंजूरी देणसाठी विलंब लागला आहे. ३ महिन्यापर्यंत आपल्या मनपा मध्ये आयुक्त नव्हते. त्यांच्यानंतर श्री. गिरी साहेब यांचे हस्ते कार्यादेश वाटप करणेत आला.

म. महापौर — अभियंता श्री. पी.डी. चव्हाण यांनी याबाबत खुलासा करावा.

म.अभियंता — वर्कऑर्डर दिल्यानंतर तीन महिन्यात आपण त्यांना पहिला हप्ता देणार आहे. वर्कऑर्डर देऊन १ महिना झाला आहे. या नंतर पुढील कार्यवाही तात्काळ करणेत येणार आहे.

म. प्रतिभा चौधरी — या विषयाबाबत मी माहिती घेतली आहे. पहिला हप्ता का दिला गेला नाही. याचे कारण सांगते पहिला हप्ता देण्यासाठी लेखा विभागातुन तो पैसा त्यांचे खात्यावर जमा करणेसाठी त्यांना ते ट्रेनींग घ्यावायाचे असते ते ट्रेनींग दिलेले नसल्यामुळे हा हप्ता दिला गेलेला नाही. मला असे म्हणावयाचे आहे की,जे पंतप्रधान आवास योजनेचे काम करतात त्यांना शासन पगार देत आहे.

म. महापौर — लेखा विभागातुन माहिती सांगण्यात येत आहे की यासाठी ट्रेनींग ची गरज नाही.

म. प्रतिभा चौधरी — आवास योजनेसाठी ज्या मनपाच्या लोकांना शासनाकडून नियुक्त केलेले आहे. त्या लोकांकडुन आम्हांला ही माहिती मिळाली आहे. माझ्या प्रभागातील जे लोक आहे. त्यांना घरकुल योजनेचा पहिला हप्ता मिळाला नाही त्यांनी याबाबत माझ्याकडे तक्रार केली तर त्यांना मी विचारायला गेली तर त्यांनी मला ही माहीती दिली आहे.

म. महापौर — मी संबंधीत अधिकाऱ्यांना मिटींग संपल्यानंतर माझ्या दालनात बोलावुन या विषयाबाबत सविस्तर माहीती घेवुन पुढील कार्यवाही तात्काळ करणेत येईल.

म. प्रतिभा चौधरी — फेब्रुवारी महिन्यांमध्ये शासनाचा जी. आर आलेला आहे. त्यामध्ये ज्या अटी आणि नियम आहेत त्या शिथील करणेत आल्या आहेत शासनाकडुन अगोदरचा जो शासन निर्णय होता त्याच्यात असे दिले होते की, प्लिंथ चे बांधकाम झाल्यावर त्याठिकाणी आपले मनपाचे लोक जातील फोटो काढतील त्याच्यानंतर त्यांना ४०,०००/-रुपयांचा पहिला हप्ता मिळेल. परंतु ती अट शिथील करणेत आली आहे. आणि हा नवीन जी. आर आलेला आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये त्यात असे नमुद आहे. की, प्लिथंचे बांधकाम केले नसेल तरी त्यांना पहिला हप्ता देणेत यावा असा शासनाचा जी.आर आलेला आहे.

म. महापौर — आता जो शासनाकडुन नवीन जी.आर.आलेला आहे. त्याप्रमाणे निणर्य घेवुन अंमलबजावणी करणेत येईल.

म. वंदना भामरे — महापौर महोदय, हा जो विषय आलेला आहे. यामध्ये हद्दवाढ झालेल्या गावांचा विचार करणेत आला आहे का? तसेच आमच्या प्रभागातील झोपडपट्ट्या असतील व काही गावठाण भागात अतिक्रमीत ३० ते ४० वर्षा पासुनची जी काही वसाहत आहे त्यांचाही या विषयात विचार करणेत आलेला आहे का? मला वाटते जी काही झोपडपट्टी ची यादी आहे त्यात हद्दवाढीतील गावांचा विचार केलेला नाही.पंतप्रधान आवास योजनेचा शासन निर्णय आहे यामध्ये ज्यांच्याकडे जागा उपलब्ध नाही त्यांचे नावे जागा नाही त्यांचेसाठी काय तरतुद आहे. आमच्याकडे ५०% गांव ही अतिक्रमीत आहे.अशा लोकांचे काय करणार आहे. याचा खुलासा करणेत यावा ही विनंती.

म. अमिन पटेल — खाजगी जागेवर लोकांनी अतिक्रमण केले आहे. आणि त्यांना ३० वर्ष झाली आहे. त्यावर आरक्षण मनपा टाकणार आहे का? आणि जागेवर आरक्षण टाकरणार आहे. त्या जागेचे पैसे मनपा देणार का? शासन देणार आहे. आता मनपाची आर्थिक परिस्थिती नाही.

म. महापौर — आपण जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्यावर मी अगोदरच बोललो आहे. खाजगी जागेवर घरकुल योजना राबवितांना आपण खाजगी जागा मालकास टी.डी.आर देणार आहोत त्या भागातील जे जागेचे टी.डी.आर दर असतील त्या नुसार देण्यात येईल. टी.डी. आर मध्ये जागा मालकाचा फायदा आहे.

म. अमीन पटेल — माझ्या प्रभागामध्ये कमीत कमी ४० ते ५० वर्षापासुन अतिक्रमीत झोपडपट्टी आहे. रस्त्यावर अतिक्रमण आहे. त्यांना तेथुन काढुन रस्त्याच्या बाजुला काही ओपन स्पेस जागेवर आरक्षण टाकण्यात येईल का? शब्बीर नगर, काझी प्लॉट आहे. मुस्लीम नगर अशा भागातील ओपनस्पेसवर २५ वर्षापासुन रहात आहे.आणि त्या लोकांना स्वत:ची घरे नाहीत अश्या लोकांना घरकुल योजनेनुसार आरक्षण टाकुन त्यांचे पुर्नवसन करणेत यावे. मी माझाच भागाचा विचार करीत नाही तर पुर्ण शहरामध्ये यापध्दतीने धोरण ठरविण्यांत यावे ८० फुटी व १०० फुटी रस्ते आहेत त्यावर असलेले अतिक्रमण काढुन त्यांचे पुर्नवसन करुन शहर सुंदर करता येईल. आता शासन निर्णय आला आहे त्यानुसार नियमात बसवुन स्लमएरियात अतिक्रमीत झोपडपट्टीत जे लोक राहतात त्यांना ती जागा आरक्षीत करुन त्यांचे नावावर सातबारा लागला पाहिजे प्लॉट धारक एरिया आहे.आणि त्याठिकाणी असलेल्या ओपनस्पेसवर त्या लोकांना घरकुल योजनेमध्ये पुर्नवसन करणेत यावे यासाठी कोणाचीही हरकत राहणार नाही.

म. महापौर — सन्मा. सदस्य यांना सांगु इच्छितो की प्लॉट पाडल्यानंतर जी ओपनस्पेस असते त्याच्यावर कॉलनीतील प्लॉटधारकांना प्रथम अधिकार असतो आणि त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. त्यामुळे याबाबत विचारकरता येणार नाही. तसेच रस्त्याचा प्रश्न रस्त्यावरील अतिक्रमण काढून आपल्याला अतिक्रमण धारकांना जागा द्यावयाची आहे. त्याच्यासाठी काय करावे लागेल तर आता वडजाई रोड आहे. ८० फुटी रोड झोपडपट्टी तो संपूर्ण पट्टा खजगी मालकाची आहे किंवा तो शासनाचा असेल किंवा मनपाचा असेल तर शासनाचे धोरणानुसार कमीत कमी ५०० चौ. फुट जागा त्यांना आपण विनामुल्य देणार आहोत. ती जागा त्यांच्या ताब्यात असली पाहिजे त्याच्या ताब्यात ३००० चौ. फुट असेल किंवा २००० असेल त्याला वाढवुन १५०० चौ. फुट घ्यावयाचे असेल तर २५% पैसे भरावे लागतील आता काही ठिकाणी २०० स्के. फुट आहे. काही लोकांचे १००स्के.फुटात सुध्दा अतिक्रमण आहे पंरतु शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त १५०० स्के. फुट पेक्षा जास्त घेता येणार नाही. ती अतिक्रमीत जागा त्यांच्या ताब्यात असेल ती जागा आपल्याल ताब्यात घेता येईल आणि जे खाजगी मालक असतील त्यांना

आपण टी. डी. आर देऊन त्या जागेवर आपण घरकुल योजना राबवू शकतो. शासनाची जागा असेल शासनाकडे मागणी करावी लागेल आणि तो विषय सुध्दा तात्काळ मंजुर होईल.

म. हिरामण गवळी — महापौर महोदय, मोहाडी घरकुल योजनेविषयी अनेक तक्रारी आहेत. मी सुध्दा तक्रार केलेली आहे. पंरतु आमच्या धुळे शहरामध्ये काझी प्लॉटला लागुन असलेली व वक्फ बोर्डाची जमीन आहे सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. हा महाराष्ट्राचा नव्हे तर देशाचा प्रश्न होता जेव्हा संस्थानिक खालसा झाल्यात तेव्हापासुनचा व वक्फ बोर्डच्या जागा या सरकारी जमा झालेल्या आहेत परंतु वक्फ बोर्डाचे मेंबर असलेले कोणीही मेंबर आज हयात नाही. उदाहरण सांगतो माझ्या शेजारी असलेले काझींनी त्यांचा मळा काझींनी स्वतंत्रपणे विकला तेथे काही घरकुल खाजगी विकले त्या झोपडपट्टया त्यांची जागा मनपा कडे वर्ग करण्यात याव्यात तसेच धुळे शहरातुन ४ नाले मोठया प्रमाणात वाहतात त्यात हागऱ्यानाला, मोतीनाला, सुशीनाला, अन्वरनाला त्याठिकाणी मुस्लीम बांधव, दलीत बांधव अनेक लोक राहत आहेत. नाल्याला लागुन रमजान नगर बाबा आहे त्याला लागुन काझी प्लॉटची लाईन आहे हे जे घरे त्यांच्या नावावर केल्या गेल्या नंतर काही लोकांची १०० ते २०० स्के. फुटांची घरे आहेत त्या जमिनी जर त्यांच्या नावावर केल्या गेल्या तर मनपाच्या कर उत्पन्नात वाढ होणार आहे. पंतप्रधान आवास योजनेत झोपडपट्टी व नाल्याजवळी अतिक्रमण कायम करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

म. सुरेखा उगले — शहरातील जे काही नागरिक झोपडपट्टीत रहात आहे त्यांचे करीता शासनाने १७ नोव्हेंबर रोजी अंत्यत महत्वाचा निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णय आल्यानंतर भाजपाचे महानगराध्यक्ष श्री. अनुप अग्रवाल, व खासदार डॉ. सुभाषजी भामरे यांनी तसेच स्थायी समिती सदस्य श्री. युवराज पाटील, महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांना पत्राद्वारे तातडीने महासभा काढणेबाबत पत्रदिले त्यानुसार महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांनी महासभेचे आयोजन केले आहे. याबद्दल मी श्री. अनुपजी अग्रवाल, डॉ. श्री. सुभाषजी भामरे आणि महापौर श्री. चंद्रकांत बापु सोनार यांचे अभिनंदन करते. सदस्यांचा विषयामुळे मिलपरिसर भागातील भडक चाळ, यंशवंत नगर, विखे नगर, रासकर नगर, गुरुकृपा नगर, शैलार वाडी, हटकरवाडी, राऊळवाडी, लिलाबाईची चाळ या नागरीकांनी १५ ते २० वर्षापासुन घरे बांधली आहेत आणि तेथे वास्तव्यास आहेत. या आवास योजनेच्या माध्यमातुन त्या ठिकाणी राहणाऱ्या गोर गरीब नागरीकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तरी हा विषय मंजुर करणेत यावा ही विंनती.

म. भगवान गवळी — महापौर महोदय, आम्ही आमचे भाग्य समजतो की, आमच्या काळात गोर-गरीब जनतेला स्वत:ची जागा स्वत:ची घरे मिळणार आहे. ही योजना प्रथम साईबाबा नगर व आंबेडकर नगरपासुन सुरवात केली म्हणुन महापौर व त्यांचे सहकारी यांचे आभार मानतो. या योजनेमध्ये सुरवातीस पाच भागांचा म्हणजेच साईबाबा नगर, आंबेडकर नगर, डी.सी कॉलेज, जुनी भिलाटी, जुने धुळे आणि जमनागीरी या भागांचा सुरवातीलाच या योजनेत समावेश केला आहे त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. राजेश पवार — महापौर महोदय, पंतप्रधान आवास योजनेमध्ये जयशंकर कॉलनी, मोहाडी वरचे गाव, रामनगर भिलाटी, या भागांचा समावेश योजनेत करण्यातयावा या बाबत मी पत्र सादर केले आहे. त्याबाबत विचार करुन या भागांचा समावेश करण्यात यावा ही विनंती.

म. उमैर शव्वाल — महापौर महोदय, सदरचा विषय अंत्यत महत्वाचा आहे परंतु हा विषय चुकीच्या पध्दतीने आणला आहे. कारण शहरातील बहुतेक अतिक्रमण सरकारी अथवा खाजगी जागेवर आहे. सरकारी जागेवर पहिजे पासुन आरक्षण असेल तर ते बदलणे आवश्यक आहे. आणि बाकी

जागेवर सरकारी आरक्षण लावले गेले पाहिजे. यासाठी मनपा अधिनियम ३७(१) नुसार कारवाई करावी लागेल.

म. नरेश चौधरी — मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब यांनी सर्व लोकांना २०२२ पर्यंत घरे देण्याचा निर्णय घेतला आहे.या निर्णयामुळे धुळे शहराच्यचा हद्दीत हद्दवाढ झालेले ११ गावे आहेत त्या गावांमध्ये भरपुर अतिक्रमण धारक आणि गावठाण आहे. आणि त्याठिकाणी अदिवसी वस्ती आहे त्या अदिवासी नागरिकांना आहेत त्याच ठिकाणी घरे द्यावयाची आहेत. अकरा गावातील गोर गरीब जनतेला आपल्या प्रयत्नातुन मा. खासदार डॉ. सुभाषजी भामरे, भाजपा अध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल, महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांचे सर्वांचे प्रयत्नाने गोर-गरिब जनतेला लवकरात लवकर घरे कसे मिळतील या दृष्टीने हा विष्य मंजुर करणेत यावा. मी नगरसेवक या नात्याने ११ गावातील सर्व नागरीकांच्या वतीने आपले अभिनंदन करतो.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय सर्वांसाठी घरे २०२२ हा निर्णय ११ सप्टेंबर रोजी आला आहे. त्यापुर्वी शासनाचे दोन निर्णय घेवुन गेले आहे. आताचा आर्कीटेक श्री. चेतन सोनार यांनी विषयाबाबत आताच माहिती दिली आहे. त्या जागेवर घर आणि त्यांचे उत्पन्न १० लाखापर्यंत असेल त्यांना लोन पध्दतीने घर म्हणजे ६ लाखापर्यंत लोन द्यावयाचे त्यांना २.५० लाख रुपये अनुदान द्यावयाचे आणि बाकी त्यांनी कर्जफेड करावयाची ज्यांचे घर पन्नाशींच्या वर असतील आणि जागा असेल जागा निष्काषित करुन तेथे घरे बांधने या दोन टप्यात ही योजना आहे. तिसरा टप्पा म्हणजे खाजगी जमिनिवर अतिक्रमण ही केली आहे. आणि खाजगी जमीन खाजगी मालकीच्या जागेवर अतिक्रमण केलेल्यांना हक्काची जागा मिळावी म्हणुन शासन निर्णय आहे. शासन निर्णय मुबंई महाप्रदेश विकास प्राधिकरण म्हाडाचे जागा वगळून खाजगी अतिक्रमीत जमिनीवर स्थानिक संस्थेचे महासभेचे मंजरी घेऊन ठराव करुन बेघरांसाठी घरे व जनतेसाठी घरे असा ठराव करुन घ्यावयाचा आहे. ठराव करुन देत असतांना काही अटी शर्ती टाकलेल्या आहेत त्यात मंजूर ठरावाचे आधारे महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमात तरतुद आरक्षण बदल निश्चित करणे म्हणजे जे काही आरक्षण असतील त्याच्यात बदल करणे म्हणजे त्याचा रहिवास क्षेत्रात बदल करणे हा एक ठराव करावयाचा आहे. त्यानंतर मंजुर ठरावाचे आधारे संबंधीत स्थानिक संस्थेने चटईक्षेत्र टी.डी.आर. पॉलीसी म्हणजे प्रयोजनासाठी जमीन संपादीत करणेसाठी कारवाई सुरु करावी. संबंधित शासन निर्णय १७/११/२०१८ तरतुदीची पूर्तता होत असल्यास शासनाचे पट्टे भाडे वसुलीची कार्यवाही करावी हे शासन निर्णय आहे. अटी शर्तीची कार्य कारवाई करीत असतांना उपरोक्त कांय पध्दतीची कारवाई करीत असतांना अशा खाजगी जमिनी व त्या धारणाप्रकारच्या असलेल्या जमिनी विषयक शासनाचे नियम यांची अंमलबजावणी करावयाची आहे.अशा जमिनीसंदर्भात न्यायालयीन प्रकरणेअसल्यास ती विचारात घ्यावी. एकुण काय स्थिती आहे. तीही विचारात घ्यावी याबाबत अंमलबजावणी करुन कार्यवाही करावी.अशा जमिनी संदर्भात न्यायालयात दावा दाखल असल्यास तसेच त्याची स्थिती बघून निर्णय घ्यावा. आणि न्यायालयाने आदेश दिले असल्यास त्याचा अवमान होणार नाही याची काळजी घेणेत यावी याची सर्वस्वी जबाबदारी अधिका-याची राहील. ज्या खाजगी जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे अशा अतिक्रमण धारकांच्या जमिनीवर काय आरक्षण आहे व त्यावरील आरक्षणात बदल करणेसाठी आज महासभेत हा विषय आलेला आहे.हे बदल निश्चित करुन धोरण ठरवून आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे.

म. महापौर — सन्मा.सदस्यांनीकेलेल्या चर्चेनुसार शासन निर्णयातील कार्यपध्दतीनुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील अतिक्रमीत खाजगी जमिनीवर असलेल्या अतिक्रमण धारकाना घरे उपलब्ध करुन

देण्यासाठी अशा अतिक्रमीत खाजगी जमिनीवर बेघरांसाठी घरे (Housing for dis housed) जनतेसाठी घरे (Public Housing) असे सुयोग्य आरक्षण निश्चित करणेस मान्यता देण्यांत येत आहे. धुळे महानगरपालिका हद्दीतील अशा जागांची व क्षेत्राची खात्री व तपासणी करुन त्यानुसारमहाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार आरक्षण फेरबदला बाबत उचित कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच धुळे मनपा हद्दीतील असणा-या अघोषित झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करुन शासन नियमानुसार सदर झोपडपट्टया घोषित असा बदल करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्रशासनाने सदर प्रस्तावाबाबत उचित पूर्तता व कार्यवाही त्वरीत करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७१ दिनांक १७/०९/२०१९

सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या खाजगी जमीनीवरील अतिक्रमण धारकांना पट्टेवाटप करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत दि.११/०९/२०१९अन्वये शासन निर्णय पारीत झालेला असुन यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मालकिच्या अतिक्रमीत जमिनिच्या तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या महसुल विभागाच्या अखत्यारितील जमिनींवरील अतिक्रमाणे नियमानुकूल करुन अतिक्रमणधारकांना पट्टे वाटप करण्याबाबत शासनाने दि. 17/11/2018 रोजीच्या आदेशान्वय पट्टेवाटपाच्या संदर्भात मार्गदशक सूचना निश्चित केल्या असून,त्यानुसार कार्यवाही सुरु झालेली आहे. तदनंतर दि.06/:03/2019च्या शासन निर्णयान्वये हया मार्गदर्शक सूचना नागरी स्थानिक स्वराज संस्थाच्या क्षेत्रात असलेल्या इतर शासकीय विभागाच्या (वनजमिनी वगळून)जमीनीवरील अतिक्रमीत झोपडपट्टीधारकांना पट्टे वाटपासाठी लागू करण्यांत आले आहेत.

परंतु नागरी क्षेत्रातील खाजगी जमिनीवर वर्षानुवर्ष अतिक्रमण करुन रहात असलेल्या अतिक्रमणधारकांना, त्यांची अतिक्रमणे नियमानुकुल करुन भाडेपट्टा देण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने व अशा जमिनी त्यांच्या स्वत: च्या नांवे नसल्याने याबाबतची कार्यवाही सद्यस्थितीत प्रलंबीत होती. परिणामी **सर्वांसाठी घरे** 2022 या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेचा लाभ अशा जमिनीवरील अतिक्रमण धारकांना घेता येत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

तदनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील खाजगी जागेवरील अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण क्षेत्रघोषित झोपडपट्टी म्हणून संबोधले गेले असल्यास, अशा खाजगी जागेवरील अतिक्रमणधारी झोपडपट्टीवासियांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत भाडेपट्टा देण्यांच्या संदर्भात, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत असलेल्या नागरीस्थानिक संस्थाच्या हद्दीतील खाजगी जमिनी वगळून इतर नागरी स्थानिक संस्थाच्या क्षेत्रातील खाजगी जमिनीवरील अतिक्रमीत झोपडपट्टीधारकांना पट्टेवाटप करण्याच्या अनुषंगाने कार्यप्रणाली निश्चित करण्यासंदर्भात मा.मंत्रीमंडळाने दिनांक 20/08/2019च्या बैठकीत निर्णय घेतला आहे.

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत असलेल्या नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील खाजगी जमिनी वगळून इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात असलेल्या अतिक्रमीत खाजगी जमिनींवर संबंधित नागरी संस्थेने महासभेच्या मंजूर

ठरावाव्दारे प्रथमत: बेघरांसाठी घरे (Housing for dis housed) जनतेसाठी घरे (Public Housing) असे सुयोग्य आरक्षण निश्चित करावे .

आ) त्याच वेळी मंजूर ठरावाच्या आधारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार आरक्षण बदल / निश्चितीची कार्यवाही सुरु करावी.

इ) अशी कार्यवाही सुरु असतांना मंजूर ठरावाच्या आधारे, संबंधित नागरी स्थानिक संस्थेने चटई क्षेत्र निर्देशांक धोरणानुसार (टीडीआर पॉलीसीजमिनी वरील "अ "येथील प्रायोजनार्थ अशी जमीन संपादीत करण्यासाठी कार्यवाही सुरु करावी.

ई) यानुसार,संदर्भाधीन शासन निर्णय क्रं.एमयुएन-2018/प्र.क्र.197/ नवि – 18 दिनांक 17/11/2018 मधील तरतुदीची पुर्तता होत असल्यास शासन मान्यतेने पट्टेवाटपाची कार्यवाही करावी.

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करीत असतांना,अशी खाजगी जमीन ज्या धारणा प्रकारातील असेल, त्या धारणाप्रकारानुसार असलेले जमीन विषयक सर्व कायदे / नियम /शासन निर्णय यामधील तरतुदीची अंमलबजावणी होईल याबाबतची संपूर्ण खात्री करण्यांत यावी.

२. अशा जमिनीसंदर्भात, न्यायालयीन प्रकरणे दाखल असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती विचारात घ्यावी.तसेच अशा जमिनीसंदर्भात, मा.न्यायालयाने काही आदेश दिले असल्यास, अशा आदेशांचा भंग होणार नाही, याची जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक संस्थाचे संबंधीत आयुक्त/ मुख्याधिकारी यांची राहील.

उक्त शासन निर्णयाबाबत मे.महासभेत प्रस्ताव विचारार्थ घेण्यांत आलेला असता, सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार उक्त शासन निर्णयातील कार्यपध्दतीनुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील अतिक्रमीत खाजगी जमिनीवर असलेल्या अतिक्रमण धारकाना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी अशा अतिक्रमीत खाजगी जमिनीवर बेघरांसाठी घरे (Housing for dis housed) जनतेसाठी घरे (Public Housing)असे सुयोग्य आरक्षण निश्चित करणेस मान्यता देण्यांत येत आहे. धुळे महानगरपालिका हद्दीतील अशा जागांची व क्षेत्राची खात्री व तपासणी करुन त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार आरक्षण फेरबदलाबाबत उचित कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच धुळे मनपा हद्दीतील असणा-या अघोषित झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करुन शासन नियमानुसार सदर झोपडपट्टया घोषित असा बदल करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्रशासनाने सदर प्रस्तावाबाबत उचित पूर्तता व कार्यवाही त्वरीत करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२५ नोव्हेंबर २०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
सोमवार दिनांक २५ नोव्हेंबर २०१९
वेळ-सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा आज सोमवार **दिनांक २५/११/२०१९ रोजी सकाळी ११-०० मा.श्री.चंद्रकांत मधुकर सोनार,महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" _____
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" _____
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" _____
५	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" _____
६	श्री.नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" _____
७	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" _____
८	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" _____
९	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" _____
१०	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" _____
११	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" _____
१२	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" _____
१३	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" _____
१४	श्री.गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" _____
१५	श्री.देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" _____
१६	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" _____
१७	श्री.पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" _____
१८	श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्या	----------" _____
१९	श्री.बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" _____
२०	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" _____

२१	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ----------
२२	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ----------
२३	श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ----------
२४	श्री.जाधव विजय बापू	सदस्य	----------" ----------
२५	श्री.भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ----------
२६	श्रीमती जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ----------
२७	श्रीमती वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ----------
२८	श्री.सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ----------
२९	श्री पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ----------
३०	श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ----------
३१	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ----------
३२	श्री.कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ----------
३३	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ----------
३४	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ----------
३५	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ----------
३६	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ----------
३७	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ----------
३८	श्रीमती शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ----------
३९	श्रीमती. अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ----------
४०	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ----------
४१	श्रीमती जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ----------
४२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ----------
४३	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ----------
४४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ----------
४५	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ----------
४६	श्रीमती उगल सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ----------
४७	श्रीमती. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ----------
४८	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ----------
४९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ----------
५०	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ----------
५१	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ----------
५२	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ----------
५३	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ----------
५४	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ----------
५५	श्री. मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ----------

५६	श्री. महाले संदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ----------
५७	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ----------
५८	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ----------
५९	श्री. शिंदे सोनल दिलीप	नामनिर्देशित सदस्य	----------" ----------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा.आयुक्त	----------" ----------
३	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ----------
४	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ----------
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ----------
६	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ----------
७	श्री. कैलास शिंदे	अभियंता	----------" ----------
८	डॉ.श्री. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ----------
९	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ----------
१०	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ----------
११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ----------
१२	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ----------
१३	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ----------
१४	श्री. सी. सी. बागुल	ओव्हरसिअर बांधकाम विभाग	----------" ----------
१५	श्री. एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ----------
१६	श्री. महेंद्र जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ----------
१७	श्री. भटू महानर	लिपीक भांडार विभाग	----------" ----------
१८	श्री. किरण पाटकरी	लिपीक अभिलेख विभाग	----------" ----------
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ----------
२०	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग	----------" ----------
२१	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग	----------" ----------
२२	श्री. के.के. मराठे	पी.एम.ए.वाय.	----------" ----------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित मा.उपायुक्त सो.उपमहापौर, सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्रीमती माळी भारती अशोक, श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव, सौ.पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल सौ. गोटे हेमा अनिल (वैद्यकीय दाखल्यासह अर्ज, सौ. किरण राकेश कुलेवार, श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद, श्री. दिपक सुरेश खोपडे, सौ. बागुल योगिता प्रशांत इत्यादीनी

रजेचे अर्ज सादर करुन दिनांक २५/११/२०१९ च्या सभेत अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर सन्मा.सदस्यांचे विनंती अर्जानुसार आजच्या महासभेसाठी रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७२ दिनांक २५/११/२०१९

सन्मा.सदस्य श्रीमती माळी भारती अशोक, श्री.दाळवाले कांतिलाल माणिकराव, सौ. पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल सौ. गोटे हेमा अनिल (वैद्यकीय दाखल्यासह अर्ज), सौ. किरण राकेश कुलेवार, श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद, श्री. दिपक सुरेश खोपडे, सौ. बागुल योगिता प्रशांत इत्यादीनी रजेचे अर्ज सादर करुन दिनांक २५/११/२०१९ च्या सभेत अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांचे विनंती अर्जानुसार आजच्या महासभेसाठी रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी

सुप्रिम कोर्टाने आयोध्या येथील श्री. राम जन्मभूमी व मंदिराचा प्रश्न मार्गी लावला आहे. त्यावेळी न्यासाची स्थापना करुन राम मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. देशातील एका महान संकल्पाच्या कार्यात योगदान असावे यासाठी श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण न्यासाचे अध्यक्ष श्री.म.जनमेजय शरणजी महाराज यांनी धुळे महानगरपालिकेचे ज्येष्ठ नगरसेवक श्री.प्रदीपनाना कर्पे यांची उत्तर प्रदेशातील आयोध्या येथील श्री.रामजन्मभूमी मंदिर निर्माण न्यासाच्या राष्ट्रीय महासचिव पदी स्तुत्य निवड करण्यांत आलेली आहे.

आज रोजीच्या महासभेत ज्येष्ठ नगरसेवक श्री.प्रदीप नाना कर्पे यांचे अभिनंदन करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. देवेद्र चंद्रकांत सोनार
श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक :- विजय बापू माळी (जाधव)

२) मा. सुप्रिम कोर्टाने अयोध्या येथील श्री.राम जन्मभूमी मंदिराचा व बाबरी मशिदीचा प्रश्न मार्गी लावला आहे. या ऐतिहासिक निर्णय लावून देशातील महत्वाचा धार्मिक प्रश्न निकाली काढण्यांत आल्याने देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कारणास्तव मा.सुप्रिम कोर्टाचे मुख्य न्यायाधिश मा. श्री.रंजन गोगई व पिठावरील इतर ४ सर न्यायाधिश यांचा आज रोजीच्या महासभेत अभिनंदन करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

तसेच सद्यस्थितीत दि.२३/११/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्रीमा. देवेंद्रजी फडणवीस यांनी पुनश्च महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असुन त्यांचे देखील आज राजीच्या महासभेत अभिनंदन करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७३ दिनांक २५/११/२०१९

सन्मा. सदस्यांच्या यादयानुसार सुप्रिम कोर्टाने आयोध्या येथील श्री. राम जन्मभूमी व मंदिराचा प्रश्न मार्गी लावला आहे. त्यावेळी न्यासाची स्थापना करुन राम मंदिर उभारणीचा मार्ग

मोकळा झाला आहे. देशातील एका महान संकल्पाच्या कार्यात योगदान असावे यासाठी श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण न्यासाचे अध्यक्ष श्री.म.जनमेजय शरणजी महाराज यांनी धुळे महानगरपालिकेचे ज्येष्ठ नगरसेवक श्री.प्रदीपनाना कर्पे यांची उत्तर प्रदेशातील आयोध्या येथील श्री.रामजन्मभूमी मंदिर निर्माण न्यासाच्या राष्ट्रीय महासचिव पदी स्तुत्य निवड करण्यांत आलेली आहे. त्याबद्दल सर्व सभागृहाच्या वतीने श्री. प्रदीप नाना कर्पे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यांत येत असून त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

तसेच मा.सुप्रिम कोर्टाने अयोध्या येथील श्री.राम जन्मभूमी मंदिराचा व बाबरी मशिदीचा प्रश्न मार्गी लावला आहे. या ऐतिहासिक निर्णय लावून देशातील महत्वाचा धार्मिक प्रश्न निकाली काढण्यांत आल्याने देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कारणास्तव मा.सुप्रिम कोर्टाचे मुख्य न्यायाधिश मा.श्री.रंजन गोगई व पिठावरील इतर ४ सर न्यायाधिश यांचे धुळे महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यांत येवून तसा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

तसेच सद्यस्थितीत दि.२३/११/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी पुनश्च महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असुन त्यांचे देखील महासभेत अभिनंदन करुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया.

धुळे शहरात रहिवास करणारे तसेच माजी जिल्हा सरकारी वकील तसेच बार कौन्सीलचे माजी सचिव ॲड सुनिल जैन यांचे दि.२२/११/२०१९ रोजी दुपारी हृदविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.ॲड सुनिल जैन यांनी सन २०१५-१६ या वर्षात जिल्हा सरकारी वकीलाचा पदभार सांभाळला होता. तसेच आपल्या महाविद्यालयीन जीवनात ॲड जैन यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत अनेक वर्ष काम केले. त्यानंतर ते 22 वर्ष शिवसेनेत कार्यरत होते. एक कडवट हिंदुत्ववादी म्हणुन त्यांची ओळख होती.

आज रोजीच्या महासभेत ॲड सुनिल जैन यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. देवेद्र चंद्रकांत सोनार अनुमोदक :-श्री. विजय बापू माळी (जाधव)
श्री. अमोल पावबा मासुळे
सौ. वैशाली भिकन वराडे

२) दिनांक १९/११/२०१९ रोजी पंढरपूर ते आळंदी जाणा-या संत नामदेव महाराजाच्या पायी दिडीला भिषण अपघात झाला होता.यामध्ये संतश्री.नामदेव महाराज यांचे १७वंश वै.ह.भ.प. सोपान महाराज नामदास आणि अतुल महाराज आळंशी यांचे अपघाती निधन झाले. यामुळे वारकरी संपदायावर मोठा आघात झाला आहे. तरी या दोन्ही संताना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्याबाबत ठराव महासभेमध्ये घेण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- सौ. कल्याणी सतिष अपंळकर, उपमहापौर, धुळे मनपा धुळे

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सर्व मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७४ दिनांक २५/११/२०१९

धुळे शहरात रहिवास करणारे तसेच माजी जिल्हा सरकारी वकील तसेच बार कौन्सीलचे माजी सचिव ॲड सुनिल जैन यांचे दि.२२/११/२०१९ रोजी दुपारी हृदविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

ॲड सुनिल जैन यांनी सन २०१५-१६ या वर्षात जिल्हा सरकारी वकीलाचा पदभार सांभाळला होता. तसेच आपल्या महाविद्यालयीन जीवनात ॲड जैन यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत अनेक वर्ष काम केले. त्यानंतर ते 22 वर्ष शिवसेनेत कार्यरत होते. एक कडवट हिंदुत्ववादी म्हणुन त्यांची ओळख होती.

तसेच दिनांक १९/११/२०१९ रोजी पंढरपूर ते आळंदी जाणा-या संत नामदेव महाराजाच्या पायी दिडीला भिषण अपघात झाला होता. यामध्ये संत श्री.नामदेव महाराज यांचे १७ वंश वै.ह.भ.प.सोपान महाराज नामदास आणि अतुल महाराज आळंशी यांचे अपघाती निधन झाले. यामुळे वारकरी संपदायावर मोठा आघात झाला आहे.

वरील सर्व मान्वरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतिव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन राहून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ५६ मागील सभांचे इतिवृत्त वाचुन कायम करणे. (२८/२/२०१९,२९/०६/२०१९,२६/०७/२०१९)

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रतिभा चौधरी महापौर महोदय, २८/०२/२०१९ च्या इतिवृत्ताला मंजुरी देणेआगोदर मी विनंती करते प्रभाग क्र. ४ येथे जयहिंद जुनियर ते जयहिंद सिनियर व विनोददादा मोराणकर यांचा भाग नोहॉकर्स झोन घोषित करण्यात आलेला आहे. महासभेत सदस्य विषय मांडतात त्याविषयांवर ठराव देखील केले जातात परंतु त्यांची अंमलबजावणी होत नाही. तर मला प्रशासनाला विचारावेसे वाटते की जर ठरावांची अंमलबजावणीच करावयाची नसेल तर सभा बोलवितात कशाला. माझ्या प्रभागात नोहॉकर्स झोन घोषित केलेले असतांना शाळा, कॉलेज, दवाखाने येथे बाहेरील नागरिक येतात आणि रस्त्यावर लॉन्या लावत असतात. अश्या नाशत्यांच्या गाड्यांजवळ लोक गर्दी करतात, गाडया लावुन तेथे थांबतात त्यामुळे तेथील स्थानिक नागरिकांना त्रास होत आहे त्यांना पायी चालणे देखील अवघड झाले आहे. तसेच माझ्या प्रभागत शिरे कॉलनी मधील पाण्याच्या टाकीची पाईपलाईन टाकण्यासाठी जयहिंद कॉलनी मधुन चारी खोदण्यात आली होती त्या रस्त्याने आयुक्त साहेबही जात असतात तेथे शाळेकरी मुलांचे अपघातही होत असतात. परंतु ते खड्डे अजुनही बुजविण्यात आलेले नाहीत. जर येत्या आठ दिवसात खड्डे बुजविण्याचे काम झाले नाही तर मी आंदोलन करेल. तसेच माझ्या प्रभागातील सुधा हॉस्पिटल ते सावरकर पुतळ्या पर्यंत लाईट बंद आहेत याबाबत मी विद्युत अभियंता यांना सांगितले त्यांनी ठेकेदाराला पाठविले परंतु अजुनही लाईट सुरु करणेत आले नाहीत. आणि हॉकर्सझोन बाबत त्वरीत कार्यवाही करावी. विषयाला मंजुरी करणेत यावी.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय, २८/०२/२०१९ च्या सभे मधील विषय क्र. २१ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब क्र. ८१ दि. २३ मार्च २०१८ च्या अधिसुचनेनुसार ५० मायक्रमपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पासुन बनविल्या जाणाऱ्या हॅन्डल असलेल्या किंवा नसलेल्या याला आपण मान्यता दिलेली आहे. आणि मनपा तर्फे ही बॅनर मध्ये सिगंल युज प्लॅस्टिक बंदी असे

लिहलेले आहे. मी यासंदर्भात मा. आयुक्त साहेबांना पत्र दिलेले आहे. सिंगंल युज प्लॅस्टिक म्हणजे काय हे मला सांगा आणि ५० मायक्रमपेक्षा कमी ज्यावर आपण बंदी घातली आहे. आमच्या शोरुमधील पिशव्या २५० ते ३०० मायक्रमच्या आहेत तरीही मनपाचे अधिकारी येतात आणि कार्यवाही करतात. ५ हजार रु. दंड घेतात. आमच्या ३०० मायक्रमच्या पिशव्या जवळ-जवळ १० वर्ष खराब होत नाहीत.

म. सहा. आयुक्त — म. महापौरांच्या वतीने खुलासा करतो. महाराष्ट्र शासनाने प्लास्टीक बंदीचा कायदा लागु केलेला आहे. त्यामळे मायक्रोनचा विषय राहीलेला नाही. २८/०२/२०१९ च्या सभेच्या वेळेस हा कायदा लागु नव्हता त्यामुळे अशा स्वरुपाचे पाऊल टाकण्यात आले. सिंगल युज प्लॉस्टीक याचा अर्थ एकदाच वापरण्यात येणारे प्लॉस्टीक असा होतो. आताच्या कायद्यानुसार प्लॉस्टीकची व्याख्या खुप विस्तृत केली आहे. ज्या पिशव्या इकंपोस्टेबल आहेत त्या वापरता येतात. आपल्याकडे ज्या पिशव्या आहेत त्या केमीकल धाग्यापासुन बनविल्याजातात त्या इ-कंपोस्ट होत नाही.

म. किरण अहिरराव — महापौर महोदय, २८/०२/२०१९ च्या सभेतील विषय क्रमांक १९ अ दलित वस्तीचा हा विषय आहे. यामधील २१ नं चे काम माझ्या प्रभागातील आहे याबाबत ठराव झाला. हा ठराव म.जिल्हाधिकारी साहेबांकडे पाठविला पण त्यांच्याकडुन या कामाला मंजुरी मिळालेली नाही. हे काम शंभर टक्के एस.सी कॅटीगीरीचा भाग आहे. सगळया कामांना मंजुरी मिळालेली आहे. फक्त या कामाला मंजुरी मिळाली नाही ती का मिळाली नाही याबाबत खुलासा करणेत यावा. तसेच माझ्या प्रभाग क्र. ६ मध्ये नकाणे, महिंदळे, मोराणे हे तिनही गावे नदीकिनारी येतात त्यामध्ये महिंदळे गावातील २५० घरे नदिकिनारी आहेत झोपडपट्टी आहे संपुर्ण याबाबत सभागृहाला विनंती आहे याठीकाणी कमीत कमी ६०० मी. लांबीचें संरक्षण भिंतीचे काम घेण्यात यावे.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय, एल.ई.डी लावणेबाबत आता आपण जो ठराव केलेला आहे ईइएसएल कंपनीचा करार रद्द करण्याचा यात माझी विनंती आहे की, पथदिव्यासह पोलचे नविन इस्टीमेट बनवुन मे. स्थायी समिती पुढे सादर करणेत यावे.

म. महापौर — सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांच्या सांगण्यानुसार ईइएसएल कंपनीने करारनाम्यातील अटी शर्ती मान्य केलेल्या नाहीत त्यामुळे सदर कंपनीशी झालेला करारनामा रद्द करावा व मनपा स्तरावर एल.ई.डी बसविण्याबाबत निविदा प्रक्रिया करण्यासाठी सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे सादर करणेत यावा.

इतिवृत्त वाचुन क्रमश: कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७५ दिनांक २५/११/२०१९

मागील महासभा दिनांक२८/०२/२०१९ चे धुळे मनपा ठराव नंबर १० ते ३१ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महासभ दिनांक २९/०६/२०१९ चे धुळे मनपा ठराव नंबर३२ ते ४० क्रमश्: वाचून कायम करण्यांत येत आहे.तसेच धुळे मनपा ठराव नं.४१ चे इतिवृत्त कायम करतांना सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार शहरात एल.ई.डी. पथदिवे बसविण्यांचा प्रस्ताव अत्यंत महत्वपूर्ण असून यामध्ये यापूर्वीच कालअपव्यय झालेला आहे.ई.ई.एस.एल. कंपनीने करारनाम्यातील अटी शर्ती मान्य न केल्याने सदर करारनामा रद्द करणेसाठी व मनपा स्तरावर एल.ई.डी. पथदिवे बसविण्याबाबत निविदा प्रक्रिया करण्यासाठी सदरचा विषय उचित मान्यतेसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच धुळे मनपा ठराव क्रं. ४२ ते ४७ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच विशेष महासभा दिनांक २६/०७/२०१९ धुळे मनपा ठराव नंबर ४८ ते ५१ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ५७ महिला व बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे (१३/०९/२०१९).

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. निशा पाटील विषय मंजुर करणेत यावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १३/०९/२०१९ चे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७६ दिनांक २५/११/२०१९

महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक१३/०९/२०१९ चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठराव नंबर ३ ते ५ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ५८ मनपा शिक्षण मंडळ, धुळे येथील शिक्षक व शिक्षकेत्तर यांना दि. १ सप्टेंबर २०१९ पासुन ७ व्या आयोगानुसार वेतन लागू करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे महापौर महोदय,मनपा शिक्षण मंडळातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सातवा वेतन लावण्याचा विषय हा महासभेत न येता आयुक्त साहेबांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याचा हा विषय होता. कारण या आधी पाचवा व सहावा वेतन आयोग या कर्मचाऱ्यांना लागु करणेत आला आहे तो विषय महासभेपुढे आलेला नाहीय.त्यामुळे या विषयाला तहकुब ठेवुन आयुक्त साहेबांशी चर्चा करुन नंतर मंजुरी देण्यात यावी.

म. उमैर शव्वाल मनपा शिक्षण मंडळ कर्मचाऱ्यांना आपल्याला सातवा वेतन लागु करायचा आहे. ते कर्मचारी खुप मेहनत घेवुन विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतात त्याचा हा विषय महत्वाचा आहे तरी तहकुब न करता मंजुर करणेत यावा ही आमची विनंती आहे.

म. महापौर सदर विषय हा वरील प्रमाणे आयुक्त साहेबांच्या कार्यकक्षेतील असल्याने ह्या विषया बाबत निर्णय आयुक्त साहेबांनी घ्यावे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७७ दिनांक २५/११/२०१९

महाराष्ट्र राज्य शासनाने दि.१जानेवारी २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसारसुधारीत वेतन संरचना लागू केली आहे.त्यानुसार धुळे म.न.पा.शिक्षण मंडळातील सेवेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दि. १ जानेवारी २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसारसुधारीत वेतन संरचना देणे वरील संदर्भ क्र.३ अन्वये आवश्यक असल्याने शासन निर्णयाप्रमाणेत्यांची दि.१/१/२०१६ पासूनसुधारीत वेतन संरचनेत वेतन निश्चितीप्रमाणे माहे सप्टेंबर २०१९ चे वेतन लागू करणेस मंजूरी देण्यात यावी व या सुधारीत वेतनाच्या फरकाची थकबाकी पुढीलप्रमाणे वरील शासननिर्णयप्रमाणेअदा करणे आवश्यक आहे.

सुधारीत संरचनेतील वेतन दि.१ जानेवारी २०१९ पासून रोखीने देय आहे व दि.१ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१८पर्यंतच्या कालावधीतील थकबाकी सन २०१९-२० पासून पाच समान वार्षिक हप्त्यात अनुदान उपलब्धते नुसारदरवर्षी संबंधित कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात दरवर्षी माहे जून या महिन्यामध्येजमा करण्याबाबत निर्देशित केले आहे.

तसेच दि.१/१/२०१९ पासून सुधारीत वेतन फरकाच्या रक्कम रोखीने अदा करणेबाबत परवानगी मिळावी.तसेच जे कर्मचारी दि.१ जानेवारी २०१६ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत मृत्यूझालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्यांच्या मृत्यूच्या दिनांकाच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची अनुज्ञेय असणारी फरकाची रक्कम एकाच हप्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी असे निर्देशित केलेआहे.

त्यानुसार म.न.पाशिक्षण मंडळातील वरील कालावधीत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसास थकबाकीची रक्कम एकाचहप्त्यात अदा करण्यास परवानगी मिळावी

तसेच संदर्भ क्रं.४ नुसार महाराष्ट्र शासनाने दि.१/१/२०१९ पासून घरभाडयाबाबत XYZ असे शहराचे वर्गीकरण केले असून त्याचा तक्ता खालीलप्रमाणे

अ.क्रं.	शहराचे/गावाचे वर्गीकरण	घरभाडे भत्याचे विद्यमान दर (मूळ वेतनाची टक्केवारी)	घरभाडे भत्याचे सुधारीत दर (मूळ वेतनाची टक्केवारी)
१	२	३	४
१	X एक्स	३० टक्के	२४ टक्के
२	Y वाय्	२० टक्के	१६ टक्के
३	Z झेड्	१० टक्के	८ टक्के

तथापि X,Y व Z वर्गीकृत शहरांना अनुक्रमे किमान रु.५४००/- ,३६००/-व रु.१८००/- इतका घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील. ज्यावेळेस ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५% ची मर्यादा ओंलाडेल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना अनुक्रमे २७ टक्के, १८ टक्के व ९ टक्के दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा तसेच ज्यावेळेस ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा ५०% ची मर्यादा ओंलाडेल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना अनुक्रमे ३० टक्के, २० टक्के व १० टक्के अशा वाढीव दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा असे शासन निर्णयात निर्देशित केले आहे.

त्यानुसार मनपा शिक्षण मंडळातील कार्यरत शिक्षक १०२ व शिक्षकेतर ६ असे एकूण १०८ कार्यरत कर्मचा-यांना सद्यस्थितीत ६ व्या वेतन आयोगानुसार ४८,०००००/-(अठ्ठेचाळीस लक्ष) मात्र दरमहाच्या वेतनासाठी लागत आहे. आता ७ वा वेतन आयोगानुसार माहे सप्टेंबर २०१९ पासून वेतन अदा करण्यासाठी रक्कम रुपये ६०,००,०००/-(साठ लक्ष) मात्र दरमहाच्या वेतनासाठी लागणार असूनदरमहा रक्कम रुपये १२,००००००/-(बारा लक्ष) मात्र दरमहाच्या वेतनात वाढ अपेक्षित असून शिक्षण मंडळही स्वायत्त संस्था असल्याने शासनाकडून दरमहा शासन हिस्साहा ५०% प्राप्त होत असल्याने सदर वाढीव रक्कमेचाशासन हिस्सा ५०%असेल व मनपा हिस्सा५०% असेल त्यानुसार ६,००००००/-(सहा लक्ष) मात्र मनपा ५०% हिस्सा आवश्यक राहणारआहे.

दिनांक १/१/२०१९ ते ऑगष्ट २०१९ पासून रोखीने दयावयाचे झाल्यास फरकासाठी रक्कम रु.९६,००००००/-(श्याहण्णव लक्ष)मात्र अपेक्षित आहे.त्यानुसार सदर रक्कमेचा मनपा हिस्सा ५०% व शासन हिस्सा५०%असल्याने म.न.पा. हिस्सा ५०% रक्कम रु.४८,००००००/-(अठ्ठेचाळीस लाख मात्र) आवश्यक आहे.

तसेच दि.१/१/२०१६ रोजी११६ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरतहोते.त्यातील दि.१/१/२०१६नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना फरक अदा करणे आवश्यक राहील आजमितीस कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तरकर्मचा-यांना माहे सप्टेंबर २०१९ मध्ये सुधारीत ७ वा वेतन आयोग लागू करणेसव त्या नुसार ७ वा वेतन प्रमाणे

मनपा५०%हिस्सा मिळणेस्तव सदरचा विषय महासभेमध्ये मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चे नुसार मनपा शिक्षण मंडळातील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे तत्कालीन कार्यपध्दतीने शासनाच्या आस्थापनेवरील पदे आहेत त्यामुळे नियमानुसार त्यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च हा प्रत्यक्षत शासनकडुन अनुज्ञेय ठरत असतो. त्यामुळे त्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत धोरणात्मक होणारे शासन स्तरावरील निर्णय हे शासनाच्या त्या-त्या आदेशानुसार त्यांच्या साठी संपुर्णत: लागु होत असतात. मनपा शिक्षण मंडळावर नियंत्रक म्हणुन म. आयुक्त हे सक्षम अधिकारी म्हणुन शासनाने घोषित केलेले आहे. व म. उपायुक्त यांचेकडेस सदर विभागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. मनपा ही अधिनियमातील तरतुदीप्रमाणे व शासन निर्णय प्रमाणे मनपा शिक्षण मंडळाकरीता ५० टक्के अनुज्ञेय वर्गणी म्हणुन (मनपा हिस्सा) बंधनकारक केल्याने त्या रक्कमांचे दायीत्व स्विकारते. मात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे धोरणात्मक निर्णय आयुक्त यांचे कार्यकक्षेत येतात. त्यातुळे सादर झालेल्या प्रस्तावाबाबत म. आयुक्त यांनी शासनाच्या ध्येय धोरणानुसार योग्य तो निर्णय घेण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ५९ — मनपा शिक्षण मंडळ धुळे कडील दि. १ जानेवारी २०१६ पूर्वीच्या निवृत्ती वेतन धारकांच्या निवृत्ती वेतन धारकांना निवृत्ती वेतनात/कु.नि.वे.त. ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर — सदर विषय हा वरील प्रमाणे आयुक्त साहेबांच्या कार्यकक्षेतील असल्याने ह्या विषया बाबत निर्णय आयुक्त साहेबांनी घ्यावे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७८ दिनांक २५/११/२०१९

महाराष्ट्र शासननिर्णय दि.२४ जानेवारी २०१९ नुसार दि.१जानेवारी २०१६ पूर्वीचे सेवानिवृत्तीवेतन /कु.नि.वे. धारकांना त्यांच्या निवृत्तीवेतनात दि.१/१/२०१६ पासून सुधारणा करावयाची असून सुधारित संरचनेत निवृत्तीवेतनाचा लाभ प्रत्यक्ष दि.१/१/१९पासून द्यावयाचा आहे. तसेच दि.१/१/२०१६ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीची /थकबाकीची रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करावयाची आहे. सन २०१९ मध्ये अदा करावयाचा पहिला हप्त जून १९ च्या मासिक निवृत्तीवेतनासोबत प्रदान करण्यात यावा. तसेच उर्वरीत हप्ते प्रतिवर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तीवेतनासोबत अदा करावेत असे नमूद केलेले आहे.ज्या प्रकरणी निवृत्ती वेतन धारक कुनिवेधारक दि.१जानेवारी २०१६ रोजी हयात असेल व त्या नंतर मृत्यु पावला असेल अशा प्रकरणी त्याचे कायदेशीर वारसदार दि.१ जानेवारी २०१६ पासून निवृत्ती वेतन /कुनिवे धारकाच्या मृत्युच्या दिनांकपर्यतच्या हयातकालीन थकबाकी मिळण्यास पात्र ठरेल /ठरतील यासाठी संबंधीतांनी कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करुन हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातुन प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजीत करुन एकाच हप्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करता यावी त्याच प्रमाणे थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्युपावलेल्या निवृत्ती वेतन धारक /कुनिवे धारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून

प्रलंबीत वसूलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हप्तात कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

तसेच,महाराष्ट्र शासन निर्णय दि.१ मार्च २०१९ नुसार दि.१जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन/कुनिवे धारकांना,त्यांच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करावयाची असून सुधारित संरचनेत निवृत्ती वेतनाचा लाभ प्रत्यक्ष दि.१/१/१९ पासून द्यावयाचा आहे.तसेच दि.१/१/२०१६ ते दि.३१/१२/१८ या कालावधीची थकबाकीची रक्कम ५ वर्षात ५ समान हप्त्यात वसूलीची रक्कम असल्यास ती समायोजित करून रोखीने अदा करावी. सन २०१९ मध्ये अदा करावयाचा पहिला हप्ता माहे जून २०१९ च्या मासिक निवृत्तीवेतनासोबत प्रदान करावा तसेच उर्वरित हप्ते प्रतिवर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तीवेतना सोबत अदा करावेत असे नमूद केले आहे.

निवृत्ती वेतन धारक/कुनिवेधारक यांच्या कायदेशीर वारसदार /वारसदरांना दि.१ जानेवारी २०१६ पासून निवृत्ती वेतन धारक/कुनिवेधारकाच्या मृत्यृच्या दिनांका पर्यतची सुधारित निवृत्ती वेतन तसेच सुधारीत सेवानिवृत्ती उपदान/मृत्युउपदान यांच्या फरकाची हयातकालीन थकबाकी मिळण्याचा अधिकार असेल या साठी संबंधीतांनी कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करुन हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातुन प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजीत करुन एकाच हप्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करता यावी त्याच प्रमाणे थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्यु पावलेल्या निवृत्ती वेतन धारक /कुनिवे धारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबीत वसूलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हप्त्यात कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

म.न.पा.शिक्षण मंडळात शिक्षक-शिक्षकेत्तर निवृत्तीवेतन धारक ३५१, कुटुंब निवृत्तीवेतन धारक ११९ असे एकूण ४७० कर्मचारी आहेत. सदर सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर १९ च्या निवृत्तीवेतनात सुधारीत प्रमाणे ७ वे वेतन आयोगानुसार लागू करावयाचे आहे. तसेच १/१/२०१६ ते ३१/१२/२०१८अखेर थकबाकीची रक्कम समान ५ हप्त्यात रोखीने अदा करणेबाबत कार्यवाही करावयाची आहे.

उपरोक्त शासननिर्णय व म.शिक्षण उपसंचालक कार्यालय नाशिक यांचे दि. २०/९/१९ तसेच से.नि.शिक्षक संघटनेचे दि.१९/९/१९ हे पत्र सप्टेंबर १९ या महिन्यात प्राप्त झालेले आहेत. म.शिक्षण उपसंचालक कार्यालय नाशिक यांच्या दि. २०/०९/१९च्या पत्रात शासन निर्णयातील तरतुदीनुसार या कार्यालयाच्या अधिनस्त म.नपा.अंतर्गत निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणे बाबत कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

यापत्रासोबत उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व पत्रे अवलोकनार्थ जोडलेले आहेत.उपरोक्त सेवानिवृत्त निवृत्ती वेतनधारक/कु.नि.वे.धारकांना त्यांना १/१/१९ ते ३०/९/१९ चा रोखीचा फरक दि.१/१/१६ ते ३१/१२/१८ अखेरची थकबाकी, निवृत्ती उपदान,मृत्यू उपदान या रकमा अदा करणेसाठी म.न.पा.धुळे व शासनाकडे प्रत्येकी ५०% प्रमाणे हिश्याच्या रकमेची मागणी केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अनुदान उपलब्धतेनुसार संबंधितांना रकमा अदा करण्यात येतील व याबाबत म.न.पा.शिक्षण मंडळाचा प्रशासकिय ठराव जोडलेला आहे.
तसेच सदर सेवानिवृत्त निवृत्ती/कुनिवे धारक यांना ७ व्या वेतनाप्रमाणे खालीलप्रमाणे १ महिन्याला अंदाजित रक्कम अपेक्षित आहे.

रु. २५०० प्रमाणे वाढ X २२०(निवृत्त शिक्षक) = ५,५०,०००/-

रु. ३००० प्रमाणे वाढ X२५०(निवृत्त शिक्षक) = ७,५०,०००/- रु १३,००,०००/-

रु.१३,००,०००/-X ५०%= ६,५०,०००/-

एकूण रक्कम रु.१३,००,०००/-मात्र सेवा निवृत्ती/ कुनिवेधारकांना खर्च अपेक्षित असून पैकी सदर रकमेच्या ५०%रु.६,५०,०००/-मात्र(६लक्ष पाच हजार रु.मात्र) म.न.पा हिस्सा अंदाजित १ महिन्याचा खर्च आवश्यक राहील.

सदर सेवानिवृत्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना माहे सप्टेंबर२०१९ मध्ये सुधारीत ७ वा वेतन आयोगा लागू करण्यास व त्यानुसार ७ व्या वेतनाप्रमाणे ५०% म.न.पा.हिस्सा मिळणेस्तव सदर विषय महासभेमध्ये मंजुरीस्तव सादर करणेत आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार मनपा शिक्षण मंडळा कडील निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे तत्कालीन कार्यपध्दतीने शासनाच्या आस्थापनेवरील पदे आहेत त्यामुळे नियमानुसार त्यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च हा प्रत्यक्षत शासनकडुन अनुज्ञेय ठरत असतो. त्यामुळे त्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत धोरणात्मक होणारे शासन स्तरावरील निर्णय हे शासनाच्या त्या-त्या आदेशानुसार त्यांच्या साठी संपुर्णत: लागु होत असतात. मनपा शिक्षण मंडळावर नियंत्रक म्हणुन म. आयुक्त हे सक्षम अधिकारी म्हणुन शासनाने घोषित केलेले आहे. व म. उपायुक्त यांचेकडेस सदर विभागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. मनपा ही अधिनियमातील तरतुदीप्रमाणे व शासन निर्णय प्रमाणे मनपा शिक्षण मंडळाकरीता ५० टक्के अनुज्ञेय वर्गणी म्हणुन (मनपा हिस्सा) बंधनकारक केल्याने त्या रक्कमांचे दायीत्व स्विकारते. मात्र निवृत्ती वेतन धारकांच्या निवृत्ती वेतनात/ कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्याचा धोरणात्मक निर्णय आयुक्त यांचे कार्यकक्षेत येतात. त्यातुळे सादर झालेल्या प्रस्तावाबाबत म. आयुक्त यांनी शासनाच्या ध्येय धोरणानुसार योग्य तो निर्णय घेण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ६० मोहाडी ग. क्र. १४२ ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असुन धुळे शहराच्या मंजुर विकास योजना (दु.स.) नुसार आरक्षण क्र. १७४ (Housing for Urban Poor) या आरक्षणाने बाधीत आहे.तरी सदर आरक्षणात बदल करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. राजेश पवार सदर प्रस्ताव हा मोहाडी भागासाठी अत्यंत महत्वाचा आहे त्यास मंजुरी देण्यांत यावी.

म. महापौर सदर विषय शासनाच्या धोरणानुसार मंजुर करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ७९ दिनांक २५/११/२०१९

मोहाडी ग. क्र.१४२ ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असुन धुळे शहराच्या मंजुर विकास योजना (दु.सु.) नुसार आरक्षण क्र.१७४ (Housing for Urban Poor) या आरक्षणाने बाधीत आहे.

सदर जागेवर स्मशानभुमीची मागणी असल्याने त्यानुसार आरक्षीत Housing for Urban Poor या वापराखलील काही जागा (४५मी ×७५ मी) स्मशानभुमी या वापरात

आरक्षीत करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये वापरात फेरबदल करणे आवश्यक आहे.

त्यानुसार यापूर्वी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे चर्चेकरीता घेतला असता संदर्भिय ठरावानुसार क्र १३२ दि. २६/०६/२०१९ अन्वये सदर जागा आरक्षण बदलास त्या भागातील सन्मा. सदस्यांचा विरोध असुन सदर जागेवर बेघर नागरीकांसाठी घरकुल अभारणेसाठी आरक्षण केलेले असल्याने प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने सन्मा. सदस्य श्री. राजेश पवार यांचे दि. २६/०८/२०१९चे पत्रान्वये सदर ग.क्र. १४२च्या आरक्षणाच्या जागेवर वरीलप्रमाणे स्मशानभुमीचा वापर बदल करणे बाबत कळविले आहे.

उक्त फेर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झाला असता कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी दिलेल्या सहमतीनुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये ग.क्र. १४२च्या आरक्षणात फेरबदल करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ६१ महानगरपालिका हायस्कुल (प्रशाळा) ही मनपा शाळा नं. २९ च्या अस्त्विातील इमारतीमध्ये स्थलांतर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय सदरच्या विषयात जी हायस्कुल स्थलांतरीत करावयाची आहे ती जरुर करा फक्त नगरसेवकांची एक कमीटी बनवुन त्यांना तेथे सुविधा आहेत की नाही हे तपासुन घ्यावे आणि पालकांची मंजुरी ही फार महत्वाची आहे याबाबत पालकांची एक सभा घेणेत यावी. विषय मंजुर करणेत यावा.

म. महापौर तपासणी करुन आवश्यकते नुसार सदर विषयाला मंजुरी देणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८० दिनांक २५/११/२०१९

महानगरपालिका हायस्कूल (प्रशाळा)ही शासन मान्य माध्यमिक शाळा असून सदर शाळेचे कामकाज सद्यस्थितीत धुळे महानगरपालिका इमारतीच्या आवारालगत असलेल्या गुजराथी शाळेसमोरील जागेत करण्यांत येत आहे.

सदर शाळेत सुमारे 5 वी ते 10 वी पर्यंतचे एकुण 6 वर्ग भरीत असून यात एकुण पटसंख्या 110इतकी आहे.तसेच एकुण 6 शिक्षक व 6 शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत.सदर शाळा ही मनपा शाळा नं. 29 च्या अस्त्विातील इमारतीमध्ये स्थलांतर करणेबाबत मा.महापौर तसेच मा. आयुक्त व संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत चर्चा झालेली असून याबाबत मा.महापौर यांनी स्थलांतराबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केलेले आहे.सदर शाळा नं.29 सद्यस्थितीतील शाळेपासून सुमारे 2.3 कि.मी.अंतरावर असून मनपा मालकीची आहे. तसेच शाळेतील सद्यस्थितीत त्या परिसरालगत असलेल्या विद्यार्थ्यांची बहुसंख्य संख्या आहे. तसेच सदर अस्तिवातील शाळेची इमारत मनपा आवारालगतच असून या ठिकाणी मुख्य बाजार पेठ आहे. यामुळे अध्ययन व अध्यापनात व्यत्यय निर्माण होतो. मनपा शाळा नं. 29 येथे प्रशस्त वर्ग खोल्या, प्रशस्त किंडांगण संरक्षण भिंत व शाळेची स्वतंत्रता इत्यादी बाबी RTE च्या मुलभूत गरजांसह व मानांकनानुसार उपलब्ध आहेत.

शाळा स्थलांतराबाबत महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रं. माशास्थ/2008/860-08/ माशि -1 दिनांक 17 फेब्रुवारी 2009 अन्वये धोरण निश्चीत करण्यांत आलेले आहे. सदर निर्णयानुसार शाळा स्थलांतराबाबतचा प्रस्ताव मा.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जिल्हापरिषद धुळेयांचेमार्फत विभागीय शिक्षण उपसंचालक व शासनाकडेस मान्यतेस्तव सादर केलेलाआहे.

धुळे महानगरपालिका हायस्कूल ही धुळे महानगरपालिका संचलित असून महानगरपालिका ही पालक संस्था आहे. यामुळे शाळा स्थलांतराबाबतविहीत कार्पध्दतीनुसार प्रस्ताव सादर केलेला असून शाळा स्थलांतराबाबत धोरण निश्चितीसाठी मे.महासभेपुढे प्रस्ताव सादर होऊन मान्यता होणे आवश्यक आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सहमतीनुसार सद्य स्थितीतील महानगरपालिका हायस्कूल (प्रशाळा) ही महानगरपालिका संचलित असून सदर शाळा मनपा शाळा क्रं. 29 च्या अस्तित्वातील इमारती मध्ये स्थलांतर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. शाळा स्थलांतरापूर्वी शाळा क्रं.29 मधील शाळा खोल्यांची आवश्यक ती दुरुस्ती तथा नुतनीकरण करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक ६२ — जुने धुळे भागातील प्रभाग क्र. १० सर्वोदय कॉलनी मधील स.न. ९/१, ९/२ मधील खुली जागा श्री. चांमुडा माता प्रतिष्ठान धुळे या संस्थेस देणेबाबत आलेल्या कार्यलयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. स्नेहल जाधव — महापौर महोदय, सदर विषयानुसार सर्वोदय कॉलनी प्रभाग क्र. १० मधील ओपन स्पेस ची जागा चामुंडा मात प्रतिष्ठान यांना देण्यात यावी. त्या ओपन स्पेस मध्ये लहान मुलांसाठी बाग-बगीचा, शुशोभिकरण करुन जेष्ठ नागरिकांसाठी उठण्या बसण्याची व्यवस्था करणेत येईल. सदरचा विषय मंजुर करणेत यावा ही विनंती.

म. विरोधी पक्ष नेते — ओपन स्पेस साठी भरपुर लोकांनी मागणी केली आहे. आपले अधिकर आहेत मंजुर करुन देण्याचे याबाबत सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे जर सभागृहाने मंजुरी दिली तर लोक गैरवापर करतील.

म. सुभाष जगताप — महापौर महोदय, मी या आधी शाळेचा पटांगणासाठी मागणी केली होती तेव्हा माझा ठराव रद्द करणेत आला होता.

म. हर्षकुमार रेलन — संबंधीत संस्था त्या जागेवर बांधकाम करणार नसेल तर जागा देता येईल.

म. महापौर — प्र. क्र १० मधील ओपन स्पेस साठी ची मागणी आहे ती संस्था ती जागा विकसीत करणार आहे. परंतु तेथे शासनाच्या ध्येय धोरणानुसार बांधकाम करता येत नाही.

म. विरोधी पक्ष नेते — जर आता या विषयाला मंजुरी दिली तर यानंतर आमच्या ओपन स्पेसच्या विषयांना मंजुरी देणार का? आमच्या कडे १२,१३,१९ प्रभागांमध्ये अनेक ओपन स्पेसच्या जागा आहेत तेव्हा मंजुरी देणार का याबाबत खुलासा करावा.

म. नागसेन बोरसे — सदरच्या विषयात असे सांगीतले आहे की, आम्ही गार्डन विकसीत करणार आहोत माझी विनंती आहे मग पालिकेने का गार्डन विकसीत करु नये, सुविधा पालिकेने का करु नये. आमच्या संभाजी गार्डन चा जो भाग होता माजी नगराध्यक्ष शिनकर आप्पा यांनी गार्डनचा जवळ-जवळ २० हजास स्क्वेअर फुटचा भाग आम्ही हा डेव्हलप करुन देतो असे सांगुण ठराव करुन घेतला, वाचनालय उभे केले त्याच्याच बाजुला गायत्री पीठ म्हणुन खुप मोठे बांधकाम

झाले अटी शर्तींचा भंग झाला पण कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. धुळे शहरामध्ये अश्या किती मालमत्ता आहेत. कस्तुरबा हॉस्पिटल ची जागा असेल श्री स्वामी समर्थ मंदीर ज्या ठिकाणी आहे ती पालिकेची जागा आहे. यामुळे सुप्रीम कोर्टाचा अवमान होत आहे. यासाठी आपण प्रापर्टी मॅनेजर नेमला आहे त्याचे काम होते या प्रॉपर्ट्या शोधुन काढायचे त्यांनी एकही प्रॉपर्टी शोधुन काढली नाही.

म. महापौर ज्या प्रमाणे इतर प्रॉपर्ट्या आहेत तशी ही एक प्रॉपर्टी आहे आणि आपेन स्पेस ची जागा असते ती त्यावेळस ठरविलेली असते की नागरिकांच्या वापरण्यासाठी आहे. त्या क्षेत्रातील सर्वे नं. च्या झोन मधले जेवढे नागरिक असतील त्यांच्या वापरासाठी ही ओपन स्पेस सोडलेली असते आणि त्या भागातील प्लॉट धारक यांनी ती मागणी केलेली आहे.

म.खान मो.साबीर मुहिबुल्लाह मी यादी दिली आहे जयशंकर कॉलनी मधील जागेची तर तो विषय अजुन पर्यंत विषयपत्रीकेवर का आला नाही.

म. सुनिल बैसाणे महापौर महोदय, कायद्याच्या दृष्टीकोनातुन सभासदांना जर अडचण होत असेल विषय तहकुब करणेत यावा.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या सुचना लक्षांत घेता सदरचा विषय तहकुब करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८१ दिनांक २५/११/२०१९

श्री.चामुंडा माता प्रतिष्ठान धुळे यांनी धुळे स.नं. 9/1,9/2 मधील अभिन्यासातील खुली जागा मागणी केली आहे. संस्थेने सोबत सहाय्यक धर्मदाय आयुक्त धुळे यांचे नोंदणीचे प्रमाणपत्र जोडले आहे. तसेच परिशिष्ट ब मध्ये नमूद संस्थेचे विधानपत्र सोबत जोडलेले आहे. तसेच परिशिष्ट क मध्ये संस्थेचे नियम व नियमावली जोडलेली आहे.

धुळे स.क्रं.9/1,9/2मधील अभिन्यासास तात्कलीन धुळे न.पा. पत्र क्रं.PWS/472 दिनांक 16/11/1977अन्वये मंजुर अभिन्यास दिली आहे. त्यात एकुण 1 ते 11 भूखंड आहे. जागेचे एकुण क्षेत्रफळ 56,628 स्क्वेअर फूट आहे. अभिन्यासात खुल्या जागेचे क्षेत्र 5695 स्क्वेअर फूट आहे. प्रस्तावासोबत सर्व 1 ते 11 भूखंडाचे 7/12उतारे जोडले असून भूखंडधारक यांचे स्वाक्षरीचे ना हरकत दाखला जोडला आहे. संस्थेचे श्री. दिनेश प्रल्हाद बडगुजर यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

उक्त बाबत खालील अटी शर्ती पूर्वीच्या ठरावाव्दारे निहीत करण्यांत आलेल्या आहेत.

1) सदरील जागेवर मालकी हक्क मनपाचा राहील.
2) सदर कामासाठी कोणताही मोबदला देय असणार नाही.
3) अटी शर्तीचे उल्लंघन केल्यास तात्काळ जागा मनपास द्यावी लागेल.
4) सदर जागेचा सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार कोणतेही बांधकाम अनुज्ञेय असणार नाही.
5) सदर जागा ही सर्व जाती/ धर्मासाठी खुली ठेवावी.

धुळे मनपा मार्फत यापूर्वी मोकळया जागा विकसीत करणे करिता देणेबाबत धुळे मनपा ठराव नं. 189 दि.13/1/2016 नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच वि.नि.नि.तील तरतूद क्रं.24.2.2मधील तरतुदीनुसार सदर खुल्या जागा अभिन्यासातील रहिवांशाकरिता असते. व तसेच तरतूद कं. 24.3.1 मधील वापराकरिता त्याचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच सदर खुल्या जागेत कोणतेही विकसन करणेपूर्वी परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच सदर जागा देणेबाबत वरीलप्रमाणे यापूर्वी कार्यवाही झाली असल्याने सदर अभिन्यासातील सर्व रहिवाशांच्या पूर्वपरवानगीने विहीत वि.नि.नि.त दर्शविलेल्या वापराकरिता अटी व शर्तीनुसार जागा हस्तांतर करता येईल

दि.5/11/2019 रोजी समक्ष मा.आयुक्त सो.यांच्यासोबत झालेल्या चर्चानुसार श्री.चांमुडा माता प्रतिष्ठान धुळे यांनी मनपा ठराव क्रं. 189 दिनांक 13/1/2016 नुसार आवश्यक त्या अटी शर्तींचा बंधपत्र सादर केलेले आहे.तरी वरील प्रमाणे बंधपत्र सादर केले असल्याने अभिन्यासातील खुली जागा श्री.चामुडा माता प्रतिष्ठान धुळे यांना देणेबाबत मे. महासभेपुढे निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार यापूर्वी मनपा व तत्कालीन नगरपालिकेमार्फत खाजगी संस्थाना देण्यात आलेल्या जागांचा वापर, त्यांची मुदत, अटी शर्तींची पूर्तता याबाबत विवाद आहेत. त्यामुळे खुल्या जागा खाजगी संस्थाना वितरीत करण्यापूर्वी याबाबत मनपाचे पुनश्च धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. सबब श्री.चामुंडा माता प्रतिष्ठान धुळे यांनी धुळे स.नं. 9/1,9/2 मधील अभिन्यासातील खुली जागा देणेबाबतचा प्रस्ताव सद्यस्थितीत तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येतआहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-६३ स्वच्छ सर्व्हेक्षण - २०२० सुरु असुन केंद्र शासनामार्फत स्टार गुणांक पध्दत अवलंबवीली असुन यासाठी ३ स्टार मानांकनासाठी राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

म. सहा. आयुक्त स्वच्छ महाराष्ट्र अभियान या प्रस्तावाबाबत महासभेपुढे प्रस्ताव ठेवलेला आहे.या बाबत मी सभागृहाला थोडक्यात माहिती देवु इच्छितो. की ३स्टार मानांकन जे स्टार रँकीग आहे सर्वसाधारण आपल्याला शासनाकडुन जे काही अनुदान मिळते त्यामध्ये एखाद्या सिस्टीम मध्ये १ स्टार, २ स्टार, ३ स्टार असे २० स्टार आहेत त्यामध्ये ७ स्टार मानांकनात "इंदौर" शहर आहे त्याला ते मानांकन मिळाले आहे. मला माहित आहे की, स्वच्छते बाबत आमच्या ब-याच काही त्रुटी आहेत पंरतु त्या अनुषंगाने आमचा खुप प्रयत्न चालु आहे. आम्ही काय काय प्रयत्न करीत आहोत याबाबत माहिती देवु इच्छितो. पहिली गोष्ट अशी आपण घर स्तरावर कचरा गोळा करण्यात १०० टक्के यशस्वी नाहीत पण काहीना काही प्रमाणात आपली प्रणाली ॲक्टीव झाली आहे. आपण जी.पी.एस सिस्टीम कार्यान्वीत केली आहे. त्यामुळे आपल्या घंटा गाड्या आता ॲक्टीव झाल्या आहेत त्यांना जी. पी. एस सिस्टीम ॲक्टीव केलेली आहे. त्यांच्या मुळे आपल्याला ट्रॅकींग करता येणार आहे. कोणती घंटागाडी किती वाजता कोणत्या भागात गेली ते तात्काळ समजणार आहे. ते कामही ६ ते ७ दिवसात पुर्ण होणार आहे. कचऱ्याचे जे डेफीनेशन आहे ओला आणि सुका कचरा तो जागेवरच वेगळा झाला पाहिजे याबाबत आपली कार्यवाही सुरु आहे अपेक्षा आहे त्यातुन चांगले यश मिळेल नंतर आपल्याला माहीत आहेच आपण सफाई सुरु केली आहे त्यात आपल्याला नागरीकांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे. आम्ही हा प्रस्ताव महापौरापुढे ठेवला आहे. सभागृहाने मान्यता दिल्यानंतर शासनाने एक समीती नेमली आहे ती समिती पाहणी करणार आहे. समितीचे समाधान झाले तर आपल्याला ३ स्टार रँकीक मध्ये आपल्याला स्थान मिळविता येणार आहे. हा प्रस्ताव जसा आम्ही सादर केलेला आहे त्यात आम्ही १०० टक्के प्रयत्न करणार आहोत.

म. नागसेन बोरसे महापौर महोदय आता ३ स्टार रँकींग संदर्भात सहा. आयुक्त साहेबांनी माहिती दिली की, २

महिन्यावर स्वच्छ सर्वेक्षणाचा विषय आलेला आहे जेवढे शौचालय आपले आहेत त्यांची सध्याची स्थिती काय आहे. आणि इस्टीमेट तयार करुन ठेकेदाराला काम दिलेले आहे का? याबाबत माहिती मिळावी. शौचालयाचे जे २ -४ लोक आहेत ते काम बघतात आपण त्यासाठी १००० रु मेंन्टनन्स् दिलेला आहे. त्याचा मेन्टंनन्स् हा पालिकेला द्यावयाचा आहे. दिड ते दोन महिन्याच्या कालवधीवर सर्वेक्षण आलेले आहे. आता पर्यंत कुठल्याही प्रकारचे इस्टीमेट तयार केलेले नाहीय. १३९ शौचालयांचा ठेका जर एका ठेकेदाराला दिला तो दोन महिन्यापर्यंत काम पुर्ण करु शकत नाही. मग का टेंडर निघाले नाही याची माहिती मिळावी.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या माहिती साठी सांगतो ते शौचालय पुर्ण मोडकीस आलेले आहेत. तर त्याला दुरुस्ती काय करणार. दुरुस्ती करण्यापेक्षा ते नविन बांधकाम करा. आणि त्यांची व्याप्ती बघा ज्या जागेवर अगोदर १० शौचालय होते तेथे ५ च शौचालयांचे बांधकाम करा. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे देखभाल दुरुस्तीचा जो ठेका आहे तो रद्द करुन नविन ठेका काढण्यात यावा. विषय मंजुर करण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८२ दिनांक २५/११/२०१९

स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी कचरा मुक्त शहरांना तारांकीत मानांकन देणे बाबत नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडील शासन परिपत्रक क्रमांक स्वमअ २०१८ /प्र.क्र.८२/नवि-३४ दिनांक २ जुन २०१८अन्वये ODF + व Star Rating देण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना नुसार प्रस्ताव विहित पध्दतीने सादर करण्याबाबत निर्देश दिले आहे.केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत खालील प्रमाणे ३ तारांकीत मानांकन ठरविण्यासाठी खालील प्रमाणे १२ निकष आहेत.

१) घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे (Door to Door Collection)

२) निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण करणे (Segregation at source)

३) सार्वजनीक, वाणिज्यक व रहिवाशी भागातील साफसफाई करणे तसेच मलनिस्सारण व नदी नाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे (Sweeping of public, commercial and residential areas (No visible eyesoures on streets) and cleaning of storm drains and surface of water bodies)

४)शहरातील कचरा पेट्या आणि पदार्थ पुनर्प्राप्ती सुविधा (Waste Storage Bins, Litter Bins and Material recovery facility)

५) मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे व रहिवाशी कल्याण संघ यांचेकडुन नियमांचे पालन (Bulk Waste Generators and Residential Welfare Association compliance)

६) कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे, शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपनभुमी तयार करणे आणि बांधकामाचा राडा रोडा (Scientific waste Processing, Scientific Landfilling and C & D Waste)

७) अस्वच्छतेबाबत शिक्षा,दंड व वापरकर्ता शुल्क आकारणीतसेच प्लास्टीक बंदीची अंमल बजावणी (User Fees Penalties, Spot Fines for littering and enforcement of ban on thin plastic)

८) नागरीकांच्या समस्यांचे निराकरण व अभिप्राय प्रणाली (Citizen grievance redressal and feedback system)

९) कचऱ्याचे ढिगांचे निर्मुलन करणे (Eradiction of crude dumping of garbage and dump

remediation)

१०)शहरातील गटारांची व नैसर्गिक जलसाठ्यांची स्वच्छता (Cleaning of storm water drains and surface of water bodies)

११)कालानुरुप कचरा निर्मितीचे प्रमाण घटविणे(Waste reduction application of ३R principles in MSW)

१२)शहर सौंदर्यकरण (City Beautification)

उक्त निकषांची पूर्तता व कार्यवाही प्रशासनाने तांतडीने करावी तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत ३ स्टार मानांकनात धुळे महानगरपालिकेचा सहभाग नोंदविणेसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६४ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ नियम १ के अन्वये जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे व लोक जैवविविधता नोंदवही तयार करणे बाबत प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करणेबाबत..

म. नगरसचिव नगरसचिव यांनी मा.आयुक्तसो.यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत सभागृहात वाचन केले.

म. महापौर शासनाच्या निर्देशानुसार सदर समिती स्थापन करण्यांसाठी मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८३ दिनांक २५/११/२०१९

केंद्र शासनाने संपुर्ण देशामध्ये जैव विविधता कायदा २००२ (Biological Diversity Act, २००२) ची अंमलबजावणी करण्याचा अनुषंगाने श्री.चंद्रभाल सिंग यांनी मा.राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली येथे याचिका क्र.३४७/२०१६ दाखल केलेली आहे. त्यानुसार मा.राष्ट्रीय हरीत लवाद, यानी पारीत केलेला आदेश दि.९/८/२०१९ नुसार, जैवविविधता कायदा २००२ मधील कलम ४१ व महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम, २००८ मधील नियम २३(२) या अंतर्गत प्रत्येक स्थानीक स्वराज्य संस्थेने जैवविविधता व्यवस्थापन समिती (BMC) स्थापन करुन समितीमार्फत लोक जैवविविधता नोंदवही (PBR) दिनांक ३१/१/२०२० पर्यंत तयार करणे बंधनकारक आहे.

जैवविविधता व्यवस्थापन समिती व लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याची कारवाई दिलेल्या अवधीत पुर्ण करणे गरजेचे आहे अन्यथा १ फेब्रुवारी २०२० पासुन दरमहा रु.१० लाख केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे जमा करावयाचे आहे. दिनांक ९/८/२०१९ च्या आदेशाप्रमाणे संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्याकडुन वसुल करुन केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे जमा करावयाची आहे असे आदेशात नमुद आहे.

ह्या समितीमध्ये अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या प्रतिनिधीचे प्रमाण हे जिल्ह्यातील सदर जनजातीचे प्रमाणाचे आधार असावे.सदर समितीचा अध्यक्ष समिती सदस्यांमधुन निवडण्यात यावा. याकरीता आयोजीत करण्यात येणारी बैठक महानगरपालिका महापौरांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात यावी.अशा प्रकारे स्थापन झालेल्या जैवि विविधता व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यकाळा एवढा राहील.

तरी उक्त शासन निर्देशाप्रमाणे जैवविविधता कायदा 2002 मधील कलम 41 व महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम 2008 मधील नियम 23(2) महानगरपालिका स्तरावरील जैवविविधता व्यवस्थापन समितीत खालील सदस्यांची नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं	नांव	कार्यालय	पद
१	मा. महापौर	महानगरपालिका धुळे	पदसिध्द अध्यक्ष
२	मा.आयुक्त	महानगरपलिका धुळे	पदसिध्द आयुक्त
३	मा. आरोग्याधिकारी	महानगरपालिका धुळे	पदसिध्द सदस्य सचिव
४	मा. उपमहापौर	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य
५	मा. स्थायी समिती सभापती	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य
६	मा. सभागृह नेता	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य
७	मा. विरोधी पक्षनेता	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य
८	मा. महिला बालकल्याण सभापती	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य
९	मा. महिला बालकल्याण उपसभापती	महानगरपालिका, धुळे	पदसिध्द सदस्य

जैविक विविधता व्यवस्थापन समिती खालील बाबींकरीता जबाबदार राहील.

१. समितीच्या अधिकारिता क्षेत्रातील जैविक संसाधनांचे संरक्षण आणि त्या संसांधनांची शाश्वत उपयोगिता निश्चित करणे.
२. समितीच्या अधिकारितेमधील जैविक संसाधन क्षेत्रामध्ये बेकायदेशीर प्रवेशावर बंदी घालणे.
३. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण चेन्नई आणि राज्य जैविक विविधता मंडळाला गरज भसेल तेव्हा, विविध विषयावरील माहिती/मते सादर करणे.
४. समितीच्या अधिकारितेमधील जैविक संसाधन क्षेत्रातील संसांधने व्यावसायिक कारणकरता गोळा करण्यासाठी/ तेथे प्रवेश करण्यासाठी नियमानुसार संकलन शुल्क आकारणीची वसुली करणे.
५. स्थानिक वैदु आणि जैविक संसांधनाचा वेद्यक क्षेत्रात वापर करणाऱ्यांची माहिती ठेवणे.
६. जैविक संसाधन असलेल्या क्षेत्रात पोहच आणि पारंपारिक ज्ञान प्राप्त करणे, आकारलेले संकलन शुल्क आणि मिळालेला लाभ आणि त्या लाभाचे वाटपाची पध्दत इत्यादीचा सर्व तपशील असलेली नॉंदवही ठेवणे.
७. जैविक विविधतेचा दस्तावेज तयार करण्यात आणि त्याच्याशी संबंधित पारंपारिक ज्ञान/माहिती मिळवण्यात सुध्दा जैविक विविधता व्यवस्थापन समिती सक्रीय असेल.
८. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व राज्य जैविक विविधता मंडळाने वेळोवेळी दर्शवलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे जैविक विविधता निधीचे व्यवस्थापन व वापर करणे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.३१ डिसेंबर २०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
मंगळवार दिनांक ३१ डिसेंबर २०१९
वेळ-सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा आज **मंगळवार दिनांक ३१/१२/२०१९ रोजी सकाळी ११-०० मा.श्री.चंद्रकांत मधुकर सोनार,महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
1	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
2	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
3	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
4	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
5	श्रीमूती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
6	श्री.नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
7	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
8	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
9	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
10	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
11	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
12	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
13	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
14	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
15	श्रीमती भिल निंबाबाई फुलसिंग	सदस्या	----------" ---------
16	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
17	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
18	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
19	श्रीमती उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
20	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------

21	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
22	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
23	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
24	श्री.जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
25	श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद	सदस्या	----------" ---------
26	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
27	श्रीमती जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
28	श्रीमती वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
29	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
30	श्री पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
31	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
32	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
33	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
34	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
35	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
36	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
37	श्री.अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
38	श्रीमती शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
39	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
40	श्रीमती जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
41	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
42	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
43	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
44	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
45	श्रीमती बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
46	श्रीमती सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
47	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
48	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
49	श्रीमती उगल सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
50	श्रीमती. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
51	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
52	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
53	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
54	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
55	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
56	श्रीमती पिंजारी मदीना समशेर	सदस्या	----------" ---------
57	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
58	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------

59	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
60	श्री. मोगलाईकर शशी सूधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
61	श्री. शिंदे सोनल दिलीप	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
1	श्री. अजिज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
2	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	----------" ---------
3	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
4	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
5	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
6	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
7	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
8	डॉ. श्री. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------
9	श्री. चंद्रकांत जाधव	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
10	श्री. लक्ष्मण पाटील	प्र. सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
11	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
12	श्री. एन. पी. सोनार	कार्यालय अधिक्षक	----------" ---------
13	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ---------
14	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
15	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर बांधकाम विभाग	----------" ---------
16	श्री. एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
17	श्री. राजेश गायकवाड	मुख्य लिपीक मनपा शि.मं.	----------" ---------
18	श्री. राजू माईनकर	भांडारपाल	----------" ---------
19	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल	----------" ---------
20	श्रीमती मिना सातभाई	महिला बालकल्याण विभाग	----------" ---------
२१	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२२	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग	----------" ---------
२३	श्री.गणेश खोंडे	एन.यु.एल.एम.	----------" ---------
२४	श्री. तुषार ढाके	अग्निशमन विभाग	----------" ---------
२५	श्री. राऊत	वाहन विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित मा.उपायुक्त सो.उपमहापौर, सन्मा. पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या अभिनंदनाच्या यादया

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गोवा येथे दि. २८ ते ३० नोव्हेंबर २०१९ या वेळेस वर्कशॉप आयोजित केलेले होते. सदर वर्कशॉप मध्ये धुळे महानगरपालिकेमार्फत श्री. शितलकुमार मोहन नवले व श्री. हर्षकुमार आर. रेलन नगरसेवक यांनी सहभाग घेतला होता. सदर वर्कशॉप दरम्यान भारत देशमधून आलेल्या नगरसेवकांमध्ये श्री. शितलकुमार मोहन नवले व श्री. हर्षकुमारआर. रेलन

नगरसेवक यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले त्यामुळे या दोन्ही नगरसेवकांच्या अभिनंदनाचा ठराव या महासभेत करण्यांत यावा.

सुचक:- सौ. सुरेखा चंद्रकांत उगले, श्री. संतोष छगन खताळ

म. हिरामण गवळी — गोवा येथे धुळे महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता आणि आरोग्य या विषयावर तीन दिवसांच्या बैठकीत महापौर श्री.चंद्रकांत सोनार, आयुक्त श्री. अजिज शेख, उपमहापौर श्रीमती कल्याणीताई अंपळकर, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. अनुपभाऊ अग्रवाल यांच्या संमतीने धुळे महानगरपालिकेतुन दोन अभ्यासु नगरसेवकांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यामध्ये सन्मा. सदस्य श्री शितलकुमार नवले व हर्षकुमार रेलन यांनी अतिशय विद्ववत्तेच्या आणि बुध्दीमत्तेच्या जोरावर ज्याप्रमाणे मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब गेल्या सहा वर्षापासून मार्गदर्शन करत आहेत त्याचप्रमाणे त्यांनी तेथे धुळे मनपाच्या वतीने स्वच्छतेचे महत्व या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले त्याठिकाणी वैयक्तीक आणि संयुक्तीक आशा दोन गटांमध्ये धुळे मनपाचे नाव भारतातील सर्व महापालिकांमध्ये उंचावले आहे. त्याबद्दल त्यांचे मे.महासभेत अभिनंदन करण्यात यावे.

म. महापौर — ज्यावेळेस सदरचा विषय आला तेव्हा म.आयुक्त साहेबांनी सांगीतले की, महापौर ठरवतील ती नावे शासनाला पाठविण्यात यावी.साहेबांशी याबाबत चर्चा केल्या नंतर ही नावे पाठविण्यात आली आणि हे सन्मा.सदस्य श्री.शितलकुमार नवले आणि हर्षकुमार रेलन यांना पाठविल्यावर त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचा सहभाग तेथे त्याबाबत अभ्यास करुन आणि माहिती घेवुन धुळे मनपाचे प्रतिनिधी म्हणुन नोदविला त्याबददल सभागृहाच्या वतीने त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहेत.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८४ दिनांक ३१/१२/२०१९

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता आणि आरोग्य या विषयावर तीन दिवसांच्या बैठकीत महापौर श्री. चंद्रकांत सोनार, आयुक्त श्री. अजिज शेख, उपमहापौर श्रीमती कल्याणीताई अंपळकर, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. अनुपभाऊ अग्रवाल यांच्या संमतीने धुळे महानगरपालिकेतुन दोन अभ्यासु नगरसेवकांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यामध्ये **सन्मा. सदस्य श्री शितलकुमार नवले व हर्षकुमार रेलन** यांनी अतिशय विद्ववत्तेच्या आणि बुध्दीमत्तेच्या जोरावर ज्याप्रमाणे मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब गेल्या सहा वर्षापासून मार्गदर्शन करत आहेत त्याचप्रमाणे त्यांनी तेथे धुळे मनपाच्या वतीने स्वच्छतेचे महत्व या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले त्याठिकाणी वैयक्तीक आणि संयुक्तीक आशा दोन गटांमध्ये धुळे मनपाचे नाव भारतातील सर्व महापालिकांमध्ये उंचावले आहे.त्याबद्दल सर्व सभागृहाच्या वतीने **सन्मा.सदस्य श्री.शितलकुमार मोहन नवले व श्री.हर्षकुमार रेलन** यांचे अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

2) यादी देण्यांत येते की, दिनांक २९/१२/२०१९ रोजी भारतीय जनता पाटीच्या जिल्हाध्यापदी मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांची पुनश्च बिनविरोध निवड करण्यांत आली. वेळोवेळी धुळे शहराच्या विकासासाठी व महानगरपालिकेच्या हितासाठी निस्वार्थपणे काम करणा-या एका सच्च्या कार्याकत्यांला पुनश्च संधी देण्यांत आली हाच त्यांचा गौरव आहे. तरी मा. अनुपभैय्या

अग्रवाल यांचे आज रोजीच्या महासभेत भाजपा महानगर जिल्हाध्यपदी निवड झाल्याबददल त्यांचे अभिनंदन करुन तसा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
श्री. देवेंद्र चंद्रकांत सोनार

म. महापौर धुळे महानगर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष म्हणुन पुनश्च:बिनविरोध निवड अनुपभाऊ अग्रवाल यांची झाली आहे. धुळे शहराच्या विविध विकासकांमाचां निधी मिळवुन देण्यासाठी त्यांचा सिहांचा वाटा आहे. त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८४ (अ) दिनांक ३१/१२/२०१९

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दिनांक २९/१२/२०१९ रोजी भारतीय जनता पाटीच्या जिल्हाध्यापदी मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांची पुनश्च बिनविरोध निवड करण्यांत आली. वेळोवेळी धुळे शहराच्या विकासासाठी व महानगरपालिकेच्या हितासाठी निस्वार्थपणे काम करणा-या एका सच्च्या कार्यकर्त्यांला पुनश्च संधी देण्यांत आली हाच त्यांचा गौरव आहे.

धुळे शहराच्या विविध विकास कांमाना निधी मिळवुन देण्यासाठी श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांचा सिहांचा वाटा आहे. श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांचे अभिनंदनाचा ठराव पारीत करणेत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

अभिनंदनाची आलेली यादी.

या देशाला स्वातंत्रय मिळाल्यापासून सन १९५५ साली तत्तकालीनपंतप्रधान जवाहरलाल नेहरु व पाकिस्तानचे लियाकत करारानुसार नागरीक संशोधन या कायदयाला मंजुरी देण्यांत आलेली होती. परंतु तो अंमलात आला नाही. व त्यामुळे आपल्या देशात घुसखोरी वाढून नागरीक कायदयाला धोका निर्माण झाला आहे. आजतागायत या देशामध्ये अवैधरित्या अफगाणिस्तान, पाकिस्तान व बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांमुळे राष्ट्रहितालाही मोठा धोका निर्माण झालेला आहे. याकरिता वेळोवेळी संसदेमध्ये उदा. सन १९५१ पासून अनेकवेळा तत्कालीन पंतप्रधान कै. इंदिरा गांधी व कै. राजीव गांधी व मा. मनमोहनसिंगजी यांनी आणण्याचा प्रयत्न केला. परंतु राजकीय हितापोटी देश हिताला बाजुला सारुन हा कायदा अंमलात आणला नाही. म्हणूनच भारतीय जनता पार्टी यांनी सन २०१४ व २०१९ च्या जाहिरनाम्यांमध्ये विषय मांडून बहुमताने हे विधयक पास केल्याबद्दल ३१ डिसेंबर २०१९ रोजी होणा-या धुळे महानगरपालिके महासभेतील सभागृहामध्ये विषय पत्रिकेवर अभिनंदनाचा ठराव पास करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. हिरामण विठ्ठल गवळी

नागरीकता संशोधन बिल मंजूर केल्याबद्दल केंद्र शासनाचा अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत.

यादी देण्यांत येते की, नागरीकता संशोधन अधिनियम २०१९ ला दि. ९ डिसेंबर २०१९ लोकसभेने तसेच राज्य सभेचे दि.११ डिसेंबर २०१९ ला मंजुरी दिलेली होती. तदनंतर मा. महामहिम राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांनी दि. १२ डिसेंबर २०१९ ला मंजुरी देण्यांत आली. सदर अधिनियमाची भारतीय इतिहासात स्वर्णअक्षरांनी नोंद घेण्यांत येईल. सदर अधिनियमामुळे परदेशातील ज्या नागरीकांना धार्मिक बाबीमुळे पिडीत होते अशा शरणार्थींनी सुटकेचा श्वास सोडला आहे. अशा धार्मिक बाबीमुळे भारतात आलेल्या हिंदु,सिंधी,शिख,

बौध्द, जैन, पारशी तसेच खिश्चन समाजातील नागरीकांना भारतीय नागरीक होता येणार आहे देशाच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण म्हणावा लागेल. याबद्दल आमच्या सभेत मोदी सरकारचे अभिनंदन करुन तसा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

देशाचे लाडके पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी व गृहमंत्री मा.अमितजी शाह व लाडके खासदार डॉ.सुभाषजी भामरे यांनी देशात सी.ए.ए. लागू केल्याबद्दल धुळे महानगरपालिके तर्फे अभिनंदनाचा ठराव करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- सौ. सुरेखा चंद्रकांत उगले, श्री. संतोष छगन खताळ,श्री. शितलकुमार मोहन नवले

हिरामण गवळी

हा विषय भारत सरकारने पास केलेला विषय एक सुवर्ण क्षण असुन त्यामध्ये १९५१ साली पहिला ठराव हा पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या उपस्थितीत मांडला गेला होता परंतु विकासाची ध्यास किंवा मतदानाचा ध्यास धरुन तो विषय बाजुला ठेवण्यात आला वेळोवेळी म्हणजे १९५१, १९७१, १९८३, १९८५, १९९८,२००५ ,२००९, २०१४ आणि नंतर ३० जुन २०१८ ला ठराव पास झाला हे करतांना मुळात याबाबत प्रदेशाची मुळ त्तवे पंडीत जवाहरलाल नेहरु आणि पाकिस्तानचे पंतप्रधान विहदअली खान यांनी ही फाळणी करतांना हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी फाळणी केली. पाकिस्तान हे धर्माधीत राष्ट्र केले आणि तरीही आमच्या देशाने जे राहतील ते मुस्लीम बांधव आमचे आणि म्हणून या देशात २.५ कोटी जनता मुस्लीम आहे. ही जनगणना करण्याचे कारण असे की सीमा या आपल्या लागुन होत्या पंजाब, पश्चिम बंगाल आणि काश्मीर या तीनही भागांमध्ये त्याकाळी आपले हिंदु बांधव होते. आज काही मंडळी बाबासाहेब अंबेडकरांची प्रतिमा घेवुन मोर्चा मध्ये सहभागी होत आहेत यात दलित बांधव नाहीत मुस्लीमच बांधव ही प्रतिमा घेत आहेत. परंतु बाबासाहेब अंबेडकरांनी विहदअली खान आणि नेहरुंच्या काळी हा विषय मांडला होता की, जर देशाचे दोन तुकडे करावयाचे असतील तर या देशामध्ये एकही मुस्लीम बांधव हिंदुस्तानात ठेवुनका आणि एकही बांधव पाकिस्तानात ठेवुनका तरच फाळणी करा त्यावेळ महात्मा गांधी या विषयासाठी अमरण उपोषणाला बसले होते.म्हणुन या कायद्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा CAA कायद्याला घटनेमध्येच दिलेले आहे. कोणत्याही कामासाठी कागदपत्रांची पुर्तता करावी लागते तसेच यासाठी ही तशाच कागदपत्रांची पुर्तता करावी लागणार आहे. आता २०१८ मध्ये हा विषय भारतीय जनतापार्टी ने घेतलेला नाही सुप्रिम कोर्टामध्ये हा निर्णय गेलेला होता सुप्रिम कोर्टाने या सरकारला आवर्जुन सांगितले एक वर्षाच्या आत हा कायदा या देशामध्ये लागु झाला पाहिजे. भारताचे अनेक लोक विदेशात राहतात परंतु त्यांना अजुन नागरिकत्व दिले गेले नाही. तेथे तिन प्रकारची कार्ड असतात लाल, हिरवे, आणि पाढंरे या प्रमाणे आपण जर तेथे गेलो आणि मुदतीपेक्षा जास्त जर एकदिवसही वाढला तरी आपल्याला दंड भरावा लागतो. एके काळी मनमोहनसिंगने सांगितले होते पंतप्रधान असतांना की एखाद्या वेळेस पश्चिम बंगालला बांगलादेशाचा मुख्यमंत्री पहावा लागेल. हे सर्व धर्म बाजुला ठेवुन पाच कोटी जनता जर आलेली असेल आमचे नागरिक तेथे राहणारे शिख, दलित, पंजाबी पारशी असे सहा प्रकारचे लोक त्याकाळी पाकिस्तानमध्ये २३ टक्के हिंदु होते आज तेथे एक पॉईंट सुध्दा हिंदु राहिलेला नाही. तेथील लोकांवर अत्याचार करुन एक तर धर्मांतर केले जाते त्यांचा छळ केला जातो किंवा त्यांना पळविले जाते. म्हणुन हा कायदा आपल्या देशात सुप्रिम कोर्टाच्या आदेशाने संसंदेत बहुमताने पास झाला राष्ट्रपतींनी त्यावर स्वाक्षरी केली. त्याचवेळी पंतप्रधान मोदी साहेबांनी सांगितले होते ज्यांना अंदोलन करावयाचे असतील त्यांनी शांत पणे आंदोलन करावे त्यांच्या मागण्या मांडण्यात याव्यात परंतु काही लोकांनी याचा गैरउपयोग करुन घेतला.

जावेळेस पत्रकार बांधव प्रश्न विचारतात की तुम्ही का मोर्चामध्ये आलेले आहेत तेव्हा एकही मुस्लीम बांधव CAA कायदा सांगु शकत नाही फक्त संविधानाचे आहे असे सांगतात. भारतातील एकाही नागरिकाला कुठलाही धोका नाही. यामध्ये संविधानाचा अपमान न करता CAA कायदा जेव्हा पास झाला तेव्हा जगातील लोकांना तेव्हा पाठपुरावा करुन अभिनंदन करण्याचा ठराव त्यांनी पास केलेला आहे. याला एका ईन्युज ने त्यांना मिसकॉल च्या माध्यमातुन ३ करोड जनतेने पांठीबा दिलेला आहे. याबाबत नरेंद्र मोदी साहेबांनी सांगितले आहे हा कायदा रद्द होणार नाही. या कायद्याची सुनावणी येत्या १ मार्च पासुन करण्यात येणार आहे. ज्यावेळेस राममंदिराचा प्रश्न आला तेव्हा आम्हांला सांगण्यात आले फटाके फोडु नका त्यावेळेस एकाही हिंदु बांधवाने फटाका फोडला नाही परंतु एकाचवेळेस तुम्ही निघतात आणि जाळपोळ करुन या देशाच्या नागरिकांना धोका निर्माण करतात मग कुठे गेले तुमचे राष्ट्रीयत्व हे जर राष्ट्रीयत्व नसेल तर जे या विरोधात असतील तर त्यांना या देशात राहण्याचा अधिकार सुध्दा नाही. म्हणुन मी याठीकाणी हा ठराव मांडला आहे आणि बहुमताने पास करण्यात यावा अशी सभागृहाला विनंती करतो.

म. खान मो. साबीर मुहिबुल्लाह (विरोधीपक्षनेता)

महापौर महोदय, मला कोणत्याही इतिहासात जावयाचे नाही किंवा हिंदु मुस्लीमांचे नाव घ्यावयाचे आहे. माझे कायदेशीर तुम्हांला निवेदन दिले गेले आहे. तसेच सन्मा. सदस्यांनी जी यादी दिली त्यांनीच आमच्या मुस्लीम बंधुचे अभिनंदन केले आहे.

म. महापौर धुळे शहरात जो मुस्लीम समाजाचा मोर्चा निघाला तो शांतीपुर्वक निघाला तसेच हिंदु समाजाचाही निघाला तो ही शांतीपुर्वकच निघाला आहे.

म. विरोधी पक्षनेता मी आपणा सर्वांना आश्वासन देतो की आमचा मुस्लीम समाज किंवा इतर समाज परिसरात अशांतता पसरविणार नाही आम्ही शांतीपुर्वक निवेदन देवु, निषेध करु, मोर्चा काढु परंतु शातंता पुर्वकच करु. या विषयाला आमचा विरोध आहे निषेध आहे एवढेच नाही तर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षानेही सांगितले आहे आम्ही या शहरातुन एकटेच नाहीत तर महाराष्ट्रातील सत्तापक्षानेही विरोध केला आहे की NRC महाराष्ट्रात लागु होणार नाही. तसेच आमचे धुळे शहराचे मुस्लीम समाजाकडुन या विषयाला निषेध, विरोध आहे.

म. महापौर म.नगरसचिव यांनी सदरचे निवेदन सभागृहाला वाचुन दाखवावे.

म. नगरसचिव आदरणीय महापौर साहेबांच्या आदेशानुसार जे निवेदन मे.महासभेत निषेध करण्याबाबत सादर केलेले आहे. ते पुढील प्रमाणे

भारत सरकारने पारीत केलेला एनआरसी व नागरीक संशोधन बिल 2019CAA,NRC, NPR या जाचक कायदयाचा निषेध करणेबाबत.

महोदय, केंद्रातील भाजपा सरकारने आपल्या बहुमताच्या जोरावर अल्पसंख्यांक समाजाला डावलून भारतीय संविधानाने दिलेल्या समानतेचा अधिकाराच्या विरोधात CAB बील नागरिक संशोधन बिल मंजूर करुन घेतले. हेतुपुरस्कर अल्पसंख्यांक धर्मियांना डावल्याण्यात आल्याने समस्त अल्पसंख्यांक समाजाच्या या विरोधात तीव्र भावना असून अल्पसंख्यांक समाजामध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. या कायदयात प्रामुख्याने अल्पसंख्यांक बांधवांकडून 60 वर्षापूर्वीचे नागरीकत्वा संबंधिचे जुने पुरावे मागण्यात आल्याने अल्पसंख्यांक बांधवांचा या कायदयाविरोधात तिव्र भावना आहेत. त्यामुळे संपूर्ण भारतभर कायदयाविरोधात तिव्र विरोध प्रदर्शन सुरु असुन सदरचे बील हे भारतीय संविधान विरोधी असुन सर्व जाती धर्मांचे लोक आंदोलन करीत आहे. त्या प्रमाणे भारताची राजधानी दिल्ली येथे जामिया विद्यापिठाचे बाहेर शांततेने आंदोलन सुरु होते. परंतु त्यावेळी पोलिसांनी त्यांचेवर अश्रुधुराचा वापर केला.

लाठीचार्ज केला. व तुरळक घटना देखील घडल्या. त्यानंतर फायरींग झाली. अनेक जण जखमी झाले. त्यातील अनेक घायाळ झाले. देशात ठिकठिकाणी आंदोलनस सुरु असतांना अनेक नागरिक मृत्यूमुखी पडले.त्यानंतर पोलिसांनी विद्यापीठात कॉलेजमध्ये घुसून विद्यार्थीनींना मारहाण केली. काही विद्यार्थी हे लायब्रिमध्ये आभ्यास करत होते. त्यांनादेखील क्रुरपणे, निर्दयपणे मारहाण केली. अश्याप्रकारे दिल्ली पोलिसांनी हुकुमशाही पध्दत अवलंबून हिटलर शाहीचा वापर केला. या कायदयाविरोधात काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पार्टी, एमआयम पार्टीतर्फे तिव्र निषेध करत असून ज्यांनी महिला, विद्यार्थीनीं, विद्याथ्यांना मारहाण केली. त्यांना बडतर्फ करावे. शासन करावे तसेच जोपर्यंत हा मुस्लीमांचा विरुध्द असलेला काळा कायदा केंद्रसरकार रदद करत नाही. तोपर्यंत आम्ही आमचे आंदोलन वेळोवेळी सुरु ठेऊ याची आपण नोंद घ्यावी.

म. शितल नवले महापौर महोदय, जो CAA कायदा लागु करण्यात आलेला आहे त्याबाबत जे निवेदन सादर करण्यात आलेले आहे ते एकतर्फी निवेदन आहे. पोलीस कुठे कधी स्वत:हुन जात नसते ज्या पध्दतीने त्या युर्नीव्हसीटीमध्ये त्या विद्याथ्यांने कायदा हातात घेतला तर शेवटी पोलीस बळाचा वापर करावा लागतो. त्यामुळेआपण जे मांडत आहात चुकीचे आहे. तसेच निवेदनात आपण अल्पसंख्यांक असल्याचा उल्लेख केला आहेत. तर आता मुस्लीम समाज आता अल्पसंख्यांकामध्ये राहिलेला नसुन ३०% जनता भारतात मुस्लीम समाजाची आहे. अल्पसंख्यांक म्हणावयाचे असेल तर पाकिस्तानात जाऊन बघा तेथे फक्त ३ टक्के जनता हिंदु आहे त्यांना आपण अल्पसंख्यांक म्हणु शकतो. भारतात मराठा समाजही २० टक्कयांपेक्षा जास्त नाही त्यापेक्षाही जास्त मुस्लीम समाज आहे.तसेच जो CAA कायदा ज्या सभागृहात लागु झालेला आहे तेथे चांगल्या प्रकारे यावर चर्चा झालेली आहे. यावर आता जास्त चर्चा न करता माझे मत आहे मुस्लीम बांधवांनीही या विषयाला समर्थन द्यावे.

म. नाजमा बानो निसीर खाँ महापौर महोदय, आजच्या महासभेत सन्मा.सदस्यांनी NRC, NPR, CAA कायद्याच्या विरोधात निषेध केला आहे त्यांना माझे पुर्ण पणे समर्थन आहे. महोदय सरकार कडुन लागु करण्यात आलेल्या या कायद्यामुळे देशात अशांतता निर्माण झालेली आहे. देशात मोठ्या प्रमाणात आंदोलने होत आहेत त्यामुळे देशातील नागरिकांना खुप त्रास होत आहे. यामुळे किती नुकसान होत आहे याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे परंतु याबाबत सरकारने कोणतेही उत्तर अजुन दिलेले नाही. भारतात असे काही नागरिक आहेत की ज्यांना निवासासाठी घर नाही, रोजगार नाही, अशिक्षीतता आहे. जे विकासासाठी महत्वाचे असते ते शिक्षणच नाही तर ज्यांचे शिक्षण नाही ते कागदपत्र कोठुन आणतील. तसेच येथील तरुणवर्ग बेरोजगार आहेत मला तरी वाटते की, देशात या कायद्याची कोणत्याही प्रकारची आवश्यकता नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान तयार केले आहे त्यात सर्व जाती धर्मातील नागरिकांचा विचार करुन तयार करण्यात आले आहे. तसेच त्याच्यात नवीन कायदा आणणे किंवा त्यात बदल करणे आपल्या संविधानाचा अपमान आहे. या कायद्याशी नागरिक सहमत नाहीत फक्त मुस्लीम समाजच नाही तर अनेक जाती धर्माच्या लोकांना यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. यामध्ये थोड्याच लोकांचे या कायद्याला समर्थन आहे. यामध्ये हिंदु आणि मुस्लीम धर्माचा कोणताही विषय नाही.जे नागरिक भारतात जन्माला आले येथील रहिवासी आहेत त्यांना रोजगार नाही तर नविन येणा-या नागरिकांना सरकार रोजगार कसा देणार आहे त्यांना कोठे निवासीत करणार आहे एका बाजुला सरकार सांगते मुस्लीम समाजाला कोणताही धोका निर्माण होणार नाही. महोदय देशात शेतकरी, बेरोजगारीची समस्या यावर लक्ष देण्याऐवजी सरकार लोकांना रांगेत उभे राहण्यासाठी मजबुर करीत आहे

आपल्या सरकारचा नारा आहे सबका साथ सबका विकास जर जनता या कायद्यापासुन नाराज आहे सहमत नाही तर हा कसा विकास सरकारने जनताचे एकुण घेतले पाहिजे कारण सरकार जनतापासुनच बनली आहे.नागरिकांनी सरकारवर विश्वास ठेवला पाहिजे. मला आशा आहे की, सर्व सन्मा.सदस्य या विषयावर विचार करतील आणि आम्हांला साथ देतील मी NRC,NPR,CAA कायद्याचा विरोध करत आहे.

म. महापौर

महानगरपालिकेचे सभागृह शहराचे महत्वाचे सभागृह आहे येथील प्रत्येक सदस्यांला नागरिकांनी नियुक्त करुन त्यांचा प्रतिनिधी म्हणुन पाठविले आहे. आज मी हिंदु आणि मुस्लीम बांधवांचे आभार मानतो भावनेचा विषय होता तरी कोणत्याही हिंदु संघटनेने रस्त्यावर येवुन आनंद व्यक्त केलला नाही. तसेच मुस्लीम समाजातील बांधव नगरसेवक, तरुण वर्ग कार्यकर्ते यांनी कोणत्याही प्रकारचा निषेध केला नाही आंदोलन केले नाही. त्यानिकालाच्या वेळी मी स्वत मुस्लीम भागांमध्ये फिरलो होतो कारण या निकालानंतर धुळे शहरात जातीय तणाव निर्माण न व्हावा यासाठी मी तेथील तरुणांना बरोबर घेवुन गेलो होतो. त्यानंतर दुसरा निकाल लागला कलम ३७० विषयीचा त्यावेळेसही मुस्लीम बांधव शांततेत होते आता NRC,CAA बाबत संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये हा ठराव पारीत झाला. या ठरावाच्या निषेदार्थ मुस्लीम बांधवांनी मोठया संख्येत उपस्थित राहुन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध नोदंवला हरकती दाखल केल्या. त्याचप्रमाणे समर्थनार्थ रॅली निघाली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ती ही शांततेत झाली.यामुळे धुळे शहरात दोन्ही समाजाची मान उंचावली. त्याचप्रमाणे आपण निषेध केला आपण निवेदनात दिले आहे भारत सरकारने पारीत केलेल्या NRC व CAA कायद्याला निषेध तसेच यात जेनयु विद्यापिठाचा मुद्दा घेतलेला आहे. त्याविद्यापाठाच्या विद्यार्थ्यांकडुन ज्या प्रमाणे पोलीसांवर आक्रमण झाले त्याचे उत्तर म्हणुन पोलीसांनी त्यांना जोम दिला. तसेच सदर कायद्याला राष्ट्रवादी, काँग्रेस, समाजवादी आणि एम आय एम यांनी पाठींबा दिला आहे. तसेच हिंदु समाजात जवळ जवळ ६० टक्के लोकांना हा कायदा समजलेला नाही. आणि मुस्लीम समाजातही ७० ते८० टक्के लोकांना हा कायदा समजलेला नाही. यात फक्त सांगण्यात येते की आपल्या संसंदेच्या विरोधात आहे. भारतामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी असा पक्ष आहे की राजकारण आणि मताच्या लालसेपोटी ते करत असतात आणि पाठीशी उभे राहतात. धुळे शहरात मला तरी वाटते की बांगलादेशी आणि पाकिस्तानी नसतीलच पंरतु काही गावे आहेत की तेथे मोठया प्रमाणात बांगलादेशी यांनी घुसखोरी केलेली आहे. ते भारतात राहुन पाकिस्तानाशी जुळले असतील तर ते कसे भारतीय. हा कायदा जे देशाच्या विरोधात असतील त्यांच्यासाठी हा कायदा आहे. जे मुळात भारतात राहतात ज्यांच्याकडे भारताचे नागरिकत्व आहे त्यांना घाबरण्याची काही गरज नाही. तसेच मुस्लीम बांधवांचा निषेध स्विकारुन अभिनंदनाचा ठराव पारीत करतो. तसेच या विषयात धुळे शहराचे खासदार मा.डॉ.सुभाषजी भामरे यांनी या ठरावाच्या बाजुने संसंदेत मतदान केले त्यांचेही अभिनंदन करतो तसेच हा अभिनंदनाचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८४(ब) दिनांक ३१/१२/२०१९

नागरीकता संशोधन अधिनियम 2019 ला दि. 9 डिसेंबर 2019 लोकसभेने तसेच राज्य सभेचे दि.11 डिसेंबर 2019 ला मंजुरी दिलेली होती. तदनंतर मा. महामहिम राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांनी दि. 12 डिसेंबर 2019 ला मंजुरी देण्यांत आली. सदर अधिनियमाची भारतीय इतिहासात स्वर्णअक्षरांनी नोंद घेण्यांत येईल. सदर अधिनियमामुळे परदेशातील ज्या नागरीकांना धार्मिक बाबीमुळे पिडीत होते अशा शरणार्थींनी सुटकेचा श्वास सोडला आहे. अशा धार्मिक बाबीमुळे भारतात आलेल्या हिंदु,सिंधी,शिख, बौध्द, जैन, पारशी तसेच खिश्चन

समाजातील नागरीकांना भारतीय नागरीक होता येणार आहे देशाच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण म्हणावा लागेल.

उक्त कायदा करण्यांसाठी मा.पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी, गृहमंत्री आ. श्री. अमीतजी शहा, मा. खासदार श्री. सुभाषजी भामरे यांचे अभिनंदनाचा ठराव पारीत करीत असतांना विरोधी पक्ष नेते श्री. खान मो. साबीर मुहिबुललाह यांचे सहसभागृहात उपस्थित 14 मुस्लीम सदस्यांनी या नागरीक संशोधन बिल 2019 CAA NRC या कायदाला विरोध करुन निषेध नोंदविला आहे. त्याचा विरोध नोंदवून सदर अभिनंदन प्रसतावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

बहुमताने मंजुर,
सही-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

धुळे नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष माणिकराव मोतीराम दाळवाले यांचे दु:खद निधन झालेले आहे.आजच्या महासभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. शितलकुमार मोहन नवले
अनुमोदक :- श्री. संतोष छगन खताळ

2) धुळे महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य तथा माजी सभापती स्थायी समिती श्री. नंदुभाऊ सोनार यांच्या मातोश्री प्रमिलाबाई वसंतराव सोनार यांचे दु:खद निधन झालेले आहे.आजच्या महासभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सर्व मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८५ दिनांक ३१/१२/२०१९

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष माणिकराव मोतीराम दाळवाले यांचे दु:खद निधन झालेले आहे.तसेच धुळे महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य तथा माजी सभापती स्थायी समिती श्री.नंदुभाऊ सोनार यांच्या मातोश्री प्रमिलाबाई वसंतराव सोनार यांचे दु:खद निधन झालेले आहे

वरील सर्व मान्वरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतिव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन राहून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्री रंगनाथ ठाकरे, श्री.सुनिल वसंतराव सोनार, सौ. हेमा अनिल गोटे अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद, सौ. वंदना संजय भामरे, श्री. कांतीलाल माणिकराव

दाळवाले इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. हिरामण गवळी — महापौर महोदय, ४ महासभेनंतर महानगरपालिका नियमाप्रमाणे प्र.क्र. ५ च्या नगरसेविका सौ. हेमाताई अनिलराव गोटे या एकही महासभेला आलेल्या नाहीत म्हणुन हा नागरिकांचा आणि सभागृहाचा अपमान आहे.त्यांच्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

म. नगरसचिव — म. महापौर यांच्या आदेशाने खुलासा करतो की, सन्मा. सदस्य श्री हिरामण आप्पा गवळी यांनी यापुर्वीही २९/६/२०१९आणि दि.२६/७/२०१९ रोजी पत्र उपस्थित करुन अनुपस्थित सदस्यांबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात् मागणी केली होती मी मागील सभेत नियम वाचुन दाखविला त्या नियमाप्रमाणे कलम १० अन्वये पालिका सदस्य अनर्हते बाबत नियमात त्याचा उल्लेख येतो त्यासंदर्भाचा सविस्तर अहवाल तयार केलेला आहे तो महापौर साहेबांकडे पाठवित आहे पुढच्या सभेत याबाबत जो निर्णय घ्यावयाचा असतो कलम १२ अन्वये महासभेचा तो निर्णय असतो अनर्हठरवायचे किंवा कसे तो न्यायाधिशाकडे पाठवुन घ्यावयाचा असतो जो महापालिकेला अधिकार आहे ते महापौर साहेबांकडे सादर केलेला आहे तो विषय पुढच्या महासभेत येईल.

म. महापौर — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचे अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८६ दिनांक ३१/१२/२०१९

सन्मा.सदस्य श्री रंगनाथ ठाकरे,श्री.सुनिल वसंतराव सोनार,सौ. हेमा अनिल गोटे अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद, सौ. वंदना संजय भामरे, श्री.कांतीलाल माणिकराव दाळवाले इत्यादी सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आज रोजीच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजेचेअर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक - ६५ — महिला बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दिनांक १६/१२/२०१९)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने महिला बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८७ दिनांक ३१/१२/२०१९

महिला बालकल्याण समिती सभा दिनांक १६/१२/२०१९ चे ठराव नंबर ६ ते १३ तसेच सभेतील सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळ

विषय क्रमांक ६६ — ई.ई.एस.एल कंपनीकडुन LEDपथदिवे पुरवठा करणेकामी मनपाच्या अटी शर्ती मान्य नसल्याने मा. महापौर मनपा धुळे यांनी दि. २५-११-२०१९ च्या महासभेत दिलेल्या निर्देशानुसार

सदर कंपनीशी झालेला करारनामा रद्द करणे व मनपा स्थरावर LED पथदिवे बसविणेकामी निविदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रदिप कर्पे — म. महापौर महोदय, मागच्या सभेत सर्व सभासद बंधुनी आरोग्यच्या पाण्याच्या आणि रस्त्याच्या विषयावर आज सर्व नगरसेवक बंधुनी विषय मांडला पण इलेक्ट्रीक पथदिवे हा विषय आज कुणी मांडला नाही. ज्या प्रमाणे या सर्व समस्या होत्या प्रत्येक भागामध्ये ५० ते ६० टक्के पथदिवे बंद असतात त्यामुळे पुर्ण शहरात चोरीचे प्रमाण वाढलेले आहे. शहरात LED पथदिवे बसविणे साठी तत्कालीन आयुक्त मा. राहुल रेखावार साहेब असतांना सभागृहात विषय आला होता मंजुरी ही देण्यात आली होती पण त्यावेळेस मी आणि सन्मा. सदस्य श्री. अमोल मासुळे यांनी ई.ई.एस.एल कंपनीकडुन महाराष्ट्रातल्या ज्या महापालिकांचे काम देण्यात आले आहे त्या संपुर्ण शहरातुन या कंपनीबाबत तक्रारी आहेत आमही याबाबत सविस्तर माहितीही सांगितली होतो. त्यावेळीच जर हा करार झाला नसता तर शहराता जो आज पथदिव्यांबाबत जो त्रास नागरिकांनाआहे तो राहीला नसता. आणि नागरिकांचा महानगरपालिकेबाबतचा रोष कमी झाला असता. परंतु आता ज्या नविन ठेकेदाराला आपण काम देणार आहोत त्याच्या कडुन आपण दिलेल्या अटीं शर्ती प्रमाणे पोल, पथदिवे तसेच प्रत्येक प्रभागात देखभाल दुरुस्ती सेंटर ज्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेत पथदिव्यांचा विषय त्यांनी ज्या ठेकेदाराला दिला आहे त्यांनी स्पष्ट पणे सांगितले आहे की फिलीप्स कंपनीचे ब्रॅन्डेड पथदिवे लावणे जर धुळे मनपानेही असे केले तर पथदिव्यांचा प्रश्न योग्य प्रकारे सोडविता येवु शकतो. महापौर महोदय आपण हा जो ई.ई.एस.एल कंपनीचा जो ठेका रद्द करण्याचा विषय घेतला तो अतिशय चांगला आहे ई.ई.एस.एल कंपनीच्या ठेकेदाराने जळगाव महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्ती ही त्यांनी पुर्ण केल्या नाहीत. आणि त्यांना ठेका दिल्यावर धुळे महापालिकेतही तसेच घडले असते. परंतु आता आपण जे नविन पध्दतीने करणार आहात त्यामध्ये हद्दवाढ चे ११ गावे त्यांचा समावेश करुन टेडंर काढावे आणि कमी पैश्यात चांगले काम करेल अशा कंपनीला टेंडर द्या आणि विषय मंजुर करा.

म. शितल नवले — महापौर महोदय,ई.ई.एस.एल कंपनी ही चार कंपन्या एकत्र करुन ही कंपनी आलेली आहे. या कंपनीचे फायदे तत्कालीन आयुक्त राहुल रेखावार साहेबांनी सांगितले होते.या कंपनीत ५१%शेअर्स हे गर्व्हमेंन्ट चे आहेत. आज महासभेसमोर हा विषय आलेला आहे की कंपनीला चार अटी मंजुर नाहीत त्यामध्ये ३०टक्के सिक्युरीटी डीपॉझीट हा एक विषय होता. त्यामध्ये असेच चार विषय ठेवण्यात आले होते आणि त्यामुळे आपण हा करार रद्द कराणार आहोत. महापौर महोदय, मला सांगावेसे वाटते की LED पथदिव्यामध्ये २० रु. पासुन तर २०० रुपयांपर्यंत १च व्हॅटचा लाईट मिळतो. आणि तो खरच एलईडी आहे का हे चेक करण्याचे साधन निश्चित आपल्याकडे नसते. आणि आणि ती कंपनी स्पेसीपीक आपल्याला १० लाईट २० लाईट चेक करुन देईल प्रत्येक गोष्ट आपण देखभाल करु शकत नाही. किंवा नियंत्रण करु शकत नाही. त्या वेळेसही हा विषय झाला होता की, कंपनी कोण-कोणत्या अटी शर्ती वर काम करणार आहे. ती कंपनी प्रत्येक कामाचा हिशोब सांगणार होती. आणि यामध्ये लाईचा इन्शुरन्स होता सहा वर्षामध्ये तो लाईट खराब झाला किंवा कुणी लाईट फोडला तरी तो कंपनी इंन्शुरंन्स रिप्लेस करुन मिळणार होता मग असे काय झाले सहा महिन्यात कि आपण करार रद्द करत आहोत. आपण जी कार्यालयीन टिपणी मध्ये नमुद केले आहे की विधीतज्ञांचा सल्ला घेवुन हा करार रद्द करण्यात येत आहे. ही कंपनी शासनाची आहे आणि शासनाने सुचित केली आहे. आपल्याला सात वर्षात पैसे द्यावयाचे होते आणि समजा फंडामधुन पैसे देता आले

नाहीत तर १४व्या वित्त आयोगातुन हप्ता भरु शकतो. जर आपण या कंपनी व्यतिरिक्त दुसऱ्या कंपनीला ठेका दिला तर त्यांचे पेमेन्ट फंडातुनच द्यावे लागणार आहे. म्हणजे आपण १४व्या वित्त आयोगाचे पैसे या योजनेसाठी वापरु शकत नाही. सात वर्षात आपल्याला पैसे द्यावयाचे आहेत केंद्रशासनाने काही तरी विचार केला असेल ना ही कंपनी फक्त महाराष्टासाठी सुचविण्यात आली आहे असे नाहीये. पुर्ण भारतातल्या नगरपालिका महानगरपालिकांना ही कंपनी सुचीत करण्यात आली होती. ज्या चार कंपन्यांचे स्ट्रेट यांच्या कडे आहेत त्या शासकिय कंपन्या आहेत तर शासनाला शासनाकडुन काम करुन घ्यायला अडचण काय आहे. या ज्या अटी शर्ती तुम्ही वाढवल्या हे वाढविण्यासाठी कुणी सुचीत केल्या होत्या. सन्मा. सदस्य श्री. प्रदिप कर्पे यांचे असे मत आहे की, बाकीच्या शहरांमध्ये याकंपनीची तक्रार आहे. तर शेरा टाकतांना आपण याबाबत कुठल्या शहराचा शेरा मागविला का? या कंपनीच्या तक्रारीबाबतचा फक्त तोंडी करुन चालत नाही यासाठी अभिप्राय मागविला पाहिजे होता.

म. महापौर — महत्वाचे म्हणजे सुरुवातीला ई.ई.एस.एल कंपनीला टेडंर देण्याची मानसिकता कुणाचीत नव्हती. परंतु ज्या वेळेस प्रशासनाच्या माध्यमातुन सांगण्यात आले की या कंपनीशी करारनामा करण्याचा शासनाचा आदेश आहे आणि ते करणे गरजेचे आहे आणि त्यावेळेस महाराष्ट्रात भाजप सरकार असल्यामुळे जेनेकरुन इतर गोष्टीवर गदा येऊ नये किंवा आपल्या मागण्या आहेत कमी पडु नये त्यामुळे आपण हा विषय महासभेत मंजुर करुन सदर करारनामा केला. करारनामा महानगरपालिका आणि कंपनी दोन्हींच्या संमतीने झाला त्यात जी अट होती त्याबाबत आपण कंपनीला कळविले होते विधानसभा निवडणुकीच्या अगोदर महत्वाच्या रस्त्यांचे काम जेथे ९० व्हॅट चे लाईट आपण लावुशकतो ते करुन दयायचे त्यांनी मान्य केले नंतर डी.पी.आर तयार करावयाचा होता त्यांनी डी.पी.आर सुध्दा तयार केला नाही. त्यांच्या वारंवार बैठका घेण्यात आल्या बैठकीत त्यांनी सांगितले की करारनाम्यातली अट जी १५ दिवसात LED १५ दिवसात दुरुस्त होऊन न आल्यास कंपनी १०० रु. प्रती दिवस प्रती पथदिवा दंड आकारण्यात येईल असे करारनाम्यात होते असे असतांना कंपनीने ही अट शिथील करण्याची मागणी केली होती यावर म. आयुक्तसाहेबांशी चर्चा केली आणि ही अट शिथील करता येऊ शकत असे कंपनीला कळविण्यात आले.

म. शितल नवले — जर तुमची आणि आयुक्त साहेबांची चर्चा झाली तर टिपणीत असे का नमुद केले की उक्त प्रकरणी लेखाविभागाकडील अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यांनी ई.ई.एस.एल कंपनीने करारनामा अटी शर्ती मान्य न केल्याने सदर प्रकरणी विषय मंजुरीसाठी सादर करण्यांस हरकत नाही असे मत नमुद केले आहे.उक्त बाबत उपमुख्य लेखा परिक्षक यांनी खालील प्रमाणे बाबीचे अवलोकन करुन सदर विषय मंजुरीसाठी सादर करणे उचित होईल असे मत दिलेले आहे. शासन नियुक्त मक्तेदार यांचे करारनामा कामाचे आदेश इ. रद्द करणेपुर्वी विधीतज्ञ यांचे अभिप्राय घेऊनच पुढील कार्यवाही करणेस यावी असे मत आहे. माझे असे मत आहे आपल्याकडे वेळ होता ना मग विधी तज्ञांचा जो अभिप्राय आला आहे तो या विषयात नमुद केला असता आणि सभागृहात अवगत केला असता तर हा प्रश्नच मी उपस्थित केला नसता.

म. महापौर — इतर ठिकाणी ही कंपनी कामात मनमानी करत असते. काम सुरु करुन देते नंतर ते काम बंद करते आणि तेथील अधिकारी-पदाधिकाऱ्यांचे आदेश ऐकत नाही. आपल्याला आपल्या शहरात LED पथदिवे लावणे अत्यंत गरजेचे आहे त्यामुळे तो करार रद्द करुन नविन निविदा आपल्याला काढावयाची आहे.

म. शितल नवले — आपण याबाबत वकीलाकडुन सल्ला घेतला आहे का?

म. विद्युत अभियंता महापौर साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, ई.ई.एस.एल कंपनीशी आपला करार झाला होता. ई. ई. एस.एल कंपनीला आपण सप्लाय मोडवर ऑर्डर केलेली होती. आपण ई.ई.एस.एल कंपनीशी ६ सप्टेंबराला करार केला तो फक्त सप्लाय साठी केला होता आणि त्यांना ११ सप्टेंबर रोजी वर्कऑर्डर दिली डी.पी.आर काढण्यासाठी की ई.ई.एस.एल कंपनीने प्रत्येक रस्त्याचे मोजमाप काढुनत्या रस्त्याच्या लांबी रुंदी विज खांबाची उंची व त्यामधील अंतर याबाबत प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करुन प्रस्तावित पथदिव्यांचा अहवाल द्यावयाचा होता. अशी आपण ऑर्डर केली होती. या करारामध्ये आपली पुर्वी जी चर्चा झाली होती त्याप्रमाणे ईस्कोमोड मध्ये घेण्याऐवजी आपण सप्लाय मोडवर घ्यावे असे ठरले त्याप्रमाणे आपला ठराव पारीत झाला आहे. त्यामुळे सप्लाय मोडची वर्कऑर्डर आपण ई.ई.एस.एल कंपनीला दिली होती आपण सप्लाय मोडवर दिल्यानंतर आपण पर्टीक्युलर कंपनीला फॉलअप केला मुळात आपल्याला माहित होते की 90 व्हॅटचे लाईट आपण लावणार होतो ते सुध्दा कंपनीने दिले नाही. जे आपले मोठे रस्ते आहेत त्याठिकाणी त्यांनी प्रॉपंटेल कंपनीचे पथदिवे लावावे असा करार केला होता परंतु त्यांनी सांगीतले की आमच्याकडे या कंपनीचे एल.ई.डी उपलब्ध नाहीत. त्यावेळे सप्लाय चा आपण विषय सोडला आणि कंपनीला सांगितले की डी.पी.आर. तरी करुन द्या म्हणजे आम्हांला वर्कऑर्डर करता येईल परंतु आज पर्यंत त्यांनी एजन्सी सुध्दा नेमली नाही. व महानगरपालिकेस आज पावेतो कळविलेले नाही. दरम्यानच्या काळात आम्ही ई.ई.एस.एल कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा झाली विजय जाधव यांच्याकडुन त्यांचे जळगाव झोन चे मॅनेजर यांना आपण महापालिकेत चर्चे साठी बोलविले होते तेव्हा त्यांनी मान्य केले १-२ दिवसात डी.पी.आर सुरु करतो या गोष्टीला बरेच दिवस झाले. १६ सप्टेंबर ला मुबंई ला मिटींग होती त्याठीकाणी नगरसविकास विभागाचे सहसचिव .प.जो. जाधव साहेब, महाराष्ट्राचे संचालक श्री. दिपक कोकाटे यांच्याशी चर्चा झाली तेव्हा त्यांनी सांगीतले की ज्या अटी नमुद केल्या आहेत त्या मान्य आहेत. आम्ही तुम्हांला सुर्या कंपनीचे एल.ई.डी देतो असे १६ सप्टेंबर ला त्यांनी मान्य केले परंतु त्यानंतरही त्यांनी पाठविले नाही. यानंतर आपण कंपनीला नोटीस दिली व अंतिमत: तीन दिवसाच्या आंत डी.पी.आर. करणेसाठी एजन्सी नेमावी अन्यथा आपणास या कामाचे स्वारर्यनाही अशी धारणा पक्की करुन करारनामा रद्द करणेत येईल याबाबतही अवगत केले आहे. सदरच्या टिपणी मध्ये मा लेखापरीक्षक यांनी सदर करारनामा रद्द करणेसाठी विधी तश्र यांचे अभिप्राय घेवून कार्यवाही करावी असे मत दिले आहे. याबाबत स्पष्ट करणेत येते की,या ठरावाच्या मान्यतेने ईई एस.एल. कंपनीचा करारनामा रद्द करावयाचा आहे व नवीन निविदा कार्यवाही करावयाची आहे.म्हणून करारनामा रद्द करणेची नोटीस न्यायीक बाबी उद्भवू नये म्हणून विधीतज्ञाकडून त्याबाबतचे प्रारुप करुन घेण्यासाठी तसे नमूद केले आहे.

म. शितल नवले हे टेंडर जर जास्त रेटने गेले तर काय करणार?आपल्याला केंद्रशासनाने सांगितले होते की आम्ही या कंपन्या सुचविल्या होत्या. आपल्याकडे आज विकासासाठी पैसा नाही.

म. महापौर ई.ई.एस.एल कंपनीने महाराष्ट्रातील ३-४ महानगरपालिकेंमध्ये या कंपनीचा करारनामा रद्द केलेला आहे. आपल्या धुळे शहरात एल.ई.डी. पथदिवे लावणे गरजेचे आहे. शहरात चांगले लाईट लावण्यात यावे यादृष्टीकोनातुन तो ठराव रद्द करु. यात पहिला करार फक्त दिवे घेण्याचे होता. आता लॅम्प आणि फिर्टींग याचे टेंडर वेगळे होते. धुळे शहरात तातडीने एल.ई.डी. पथदिवे बसविणे गरजेचे आहे. सदरचा प्रस्ताव सुमारे वर्षभरापासून प्रलंबित आहे. शासनाने ईईएसएल कंपनीमार्फतच एलईडी पथदिवे बसविण्याबाबत निर्देश दिलेले होते. तथापी ईईएसएल कंपनीने मनपाच्या आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती मान्य न केल्याने तसेच सदर

कंपनीच्या इतर महानगरपालिकेतील कामाचा अनुभव योग्य नसल्याने कंपनीशी झालेला करारनामा रद्द करण्याचा यापुर्वीच निर्णय घेण्यात आलेला होता.तसेच कंपनीने मनपाच्या निनिदेतील अटीनुसार गुणवत्तापुर्वक कंपनीचे पथदिवे व साहित्य पुरविण्याबाबतही असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे शहरातील हा महत्वाचा प्रश्न प्रलंबित राहिलेला होता. त्यामुळे पथदिव्याचा प्रश्न लक्षात घेता करारनाम्यानुसार कोणतेही अटी शर्ती कंपनीने पुर्ण न केल्याने व नागरीकांना सुविधेपासून वंचीत ठेवल्याने सदर कंपनीशी यापूर्वी झालेला करारनामा व ठराव रद्द करण्यात येत आहे.तसेच शहरात हद्दवाढीसह संपूर्ण एलईडी पथदिवे बसविणेकरीता ५ वर्षाच्या देखभाल दुरुस्तीसह व गॅरंटीसह मनपा स्तरावर निविदा कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच कामाबाबत विभागणी व्हावी व काम गुणवत्तापुर्वक व्हावे यासाठी शहराचे दोन भाग करुन त्याप्रमाणे निविदा कार्यवाही करावी व इतर कामासाठी वार्षिक दर मागविण्याची कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८८ दिनांक ३१/१२/२०१९

दि.25-11-2019 च्या महासभेप्रसंगी प्रश्नोत्तरांच्या कालावधीत चर्चेमध्ये श्री.नागसेन बोरसे नगरसेवक यांनी मनपा ठराव क्र.41 दि.29-6-2019 नुसार मंजुरी दिल्या प्रमाणे काय कार्यवाही झाली व ई. ई. एस.एल. कंपनी कडून मनपास LED पथदिवे का पुरवठा झाले नाही या बाबत प्रश्न उपस्थित केला. मा.महापौर यांच्या आदेशानुसार आज पावतोच्या कार्यवाही बाबत खालीलप्रमाणे अहवाल देण्यात आला.

मनपा महासभेच्या ठरावानुसार व मंजुरी नुसार ई.ई.एस.एल. कंपनीशी दि.6-9-2019 रोजी सप्लाय मोड प्रमाणे म्हणजे LED पथदिवे ई.ई.एस.एल. कंपनीकडून पुरवठा करणे व शासनाकडील ड्राफ्ट प्रमाणे व त्यामध्ये मनपा हिताच्या दृष्टीने काही शर्ती वाढून करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला.या करारनाम्यामध्ये कंपनीने 1)फक्त एकच कंपनीचे LED पुरवठा करणे.2)ई.ई.एस.एल. कंपनीने DPR तयार करणे.3) ई.ई.एस.एल. कंपनीचे 30% सुरक्षा रक्कम कपात करणे.4)नादुरुस्त LED 15 दिवसात दुरुस्त होऊन न आल्यास कंपनीस प्रती पथदिवा प्रती दिवस रु.100/- दंड आकरण्यात येईल.

वरीलप्रमाणे शर्ती कंपनीस कळवून व त्या मान्य करून कंपनीच्या वतीने त्यांचे वरिष्ठ Assitant Manager यांनी करारनामा स्वाक्षरी केला आहे.तथापि नंतर कंपनीने हि शर्त अमान्य करून बदलणेबाबत मनपास कळविले.मनपाने त्यांना लगेचच करारनामा शर्तीमध्ये कुठलीही बदल करण्यात येणार नाही असे कळविले.कंपनीस वारंवार सूचना देऊनही मनपा कडील पत्र क्र.118 दि.11-9-2019 च्या आदेशाप्रमाणे DPR करण्याचे काम आजपावतो सुरु केलेले नाही.कंपनीस समक्ष चर्चेसाठी बोलविले असता त्यांचे प्रतिनिधी श्री.विजय जाधव दि.11-11-2019 रोजी मनपा कार्यालयात बैठकीस हजर होते.त्यावेळी संयुक्त चर्चेत करारनामा मध्ये कुठलाही बदल होणार नाही व कंपनीने DPR चे काम सुरु करावे असे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

यानंतर दि.16-11-2019 रोजी म.सह.सचिव श्री.प.जो.जाधव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे समवेत संयुक्त बैठक झाली सदर बैठकीस आपले वरिष्ठ अधिकारी,मजिप्राचे वरिष्ठ अधिकारी व मनपा आयुक्त उपस्थित होते.करारनाम्यात नमूद अटी,शर्ती बाबत चर्चा झाली.म.सह सचिव यांनी सदर कारारनाम्यातील अटी व शर्ती नुसार तातडीने कामास सुरवात करावी अशा सूचना ई.ई.एस.एल. कंपनीस दिल्या आहेत.करिता

आता कोणताही विलंब न करता DPR तयार करणे व पथदिवे पुरवठा करणेचे काम तातडीने सुरु करावे हि विनंती केली.याबबत मनपा पत्र क्र. 154 दि.20-11-2019 रोजी लेखी स्वरुपात कंपनीस नोटीस देण्यात आली.तसेच नोटीस क्र.153 दि.19-11-2019 नुसारहि कंपनीस 3 दिवसात DPR करणे बाबतची नोटीस देण्यात आली.

याबाबत चर्चेअंती सभागृहाच्या संमतीने व मनपा ठराव क्र.75 दि.25-11-2019 नुसार मा.महापौर यांनी ई.ई.एस.एल. कंपनीशी झालेला करार रद्द करण्याबाबत निर्णय देऊन मनपा स्थरावर संपूर्ण शहरात LED पथदिवे बसविणेसाठी निविदा मागवावी व आवश्यक ठिकाणी पोल उभे करण्याची बाब समाविष्ट करावी असे आदेश करून मा.स्थायी समितीमध्ये या कमी मान्यता घेण्यासाठी विषय स्थायी समितीपुढे सादर करावा असे निर्देश केले आहे.

उक्त बाबत सा.बा.विभाग विद्युत खाते यांचे कडील सन 2018-19 नुसार धुळे शहर हद्दवाढ क्षेत्रासह म्हणजेच प्रभाग क्र.1 ते19 मध्ये नवीन LED पथदिवे बसविणे व आवश्यकतेप्रमाणे Bracket बदलणेचे अंदाजपत्रकीय बाबींप्रमाणे **खर्च रु.10,65,80,672/-** अपेक्षित आहे.

सन 2019-20 च्या अर्थसंकल्प तरतुदीनुसार LED पथदिवे बसविणे लेखाशीर्षक करिता रु.50 लक्ष मात्र तरतूद आहे.वरील प्रस्तावाप्रमाणे संभाव्य खर्च हा सन 2019-20 ह्या आर्थिक वर्षात पूर्ण होणार नाही तथा सदरचे काम हे टप्प्याटप्याने कामाच्या प्रगतीनुसार त्यावर खर्च होईल.याकरिता प्रस्थावित बाबींकरिता दर मागून उत्पादक कंपनी/पुरवठा दार/मक्तेदार यांच्या कडून दर मागविणे व दर करार करणे उचित होईल.या अंदाजपत्रकानुसार मक्तेदाराकडे 5 वर्षाची संपूर्ण देखभाल दुरुस्ती मजुरी खर्चासह असेल.तसेच या निविदेप्रमाणे कार्यवाही करतांना निघालेले जुने पथदिवे मक्तेदारानेच ठेवणे व त्याचा निश्चित मोबदला रु.200/- मनपाला देणेस बंधनकारक असेल.

धुळे शहरातील बाह्य वसाहतीमध्ये तसेच नवीन हद्दवाढ क्षेत्रासह च्या प्रभागांमध्ये बहुतांश पोलवर पथदिवे असून मुख्यतः वलवाडी,मोराणे,वरखेडी,महिंदळे या भागात काही पोलवर अद्यापही स्ट्रीट लाईट फेज नाही त्यामुळे या खांबांवर पथदिवे नाहीत.तसेच काही नागरी वसाहतीमध्ये अद्याप मीटर कनेक्शन नाही.तसेच सद्यस्थितीत शहरातील पथदिवे चालू बंद करण्याचे काम कांत्रात्दाराकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे.परंतु LED पथदिवे पूर्णतः बसविले नंतर ठेकेदाराचे काम बंद होईल.त्यामुळे पथदिवे चालू बंद करण्यासठी मनपकडे पर्यायी यंत्रणा नसल्याने बहुतांशी मीटर point वर नवीन टायमर बसवावे. त्यामुळे LED बसवितांना या अडचणी प्रामुख्याने येतील.काही भागामध्ये स्ट्रीट लाईट जोडणी सलग्न करण्यासाठी 8.5 मीटर पोल टाकणे आवश्यक राहील.या कामासाठी रु.50 लक्ष मात्रची तरतूद करणे आवश्यक असून या कामासाठी Itam रेट प्रमाणे दर मागवावे लागतील.

धुळे शहरामध्ये सद्यस्थितीत हद्दवाढ क्षेत्र वगळता पूर्वीच्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात सुमारे 7390 नग 150/250/400 watt चे सोडियम व्हेपर पथदिवे आहेत.सद्यस्थितीत धुळे महानगरपालिका सरासरी 38 ते 40 लक्ष प्रतीमहा वीजबिल चा खर्च करीत आहे.धुळे शहरात LED पथदिवे बसविण्याचा मुख्य उद्देश वीज बचतीचा असून,भारतीय स्ट्रीट लाईट कोड नियम नुसार रस्त्यांच्या रुंदी प्रमाणे आव्याश्यक प्रकाश व्यवस्था नियोजन केल्यास त्या-*त्या क्षमतेचे गरजेनुसार LED पथदिवे बसविणे नियोजन करणे आवश्यक राहील.अशा प्रकारच्या अंबलबजावणीनुसारच प्रतीमाहचा वीज खर्च सुमारे 40-50 % पर्यंत कमी करणे शक्य होईल.या साध्यातेने मनपा प्रती वर्ष सुमारे रु.2,00,00,000/-मात्र वीज बिल खर्चात बचत

होणार आहे.सद्यस्थितीत पथदिवे देखभाल दुरुस्ती साठी प्रती वर्ष सुमारे रु.1,00,00,000/- खर्च होत असून LED पथदिवे बसविल्यानंतर 5 वर्षापर्यंत संपूर्ण हमी मक्तेदाराची असल्याने दैनंदिन देखभालसाठी व पथदिवे चालू बंद करण्यासाठीचा खर्च रु.2,13,360/- प्रतीवर्ष अल्प येणार आहे.यामुळे प्रतीवर्ष सुमारे किमान 95,00,000/-मात्र खर्च बचत होणार आहे.

वरीलप्रमाणे मनपा स्थरावर LED पथदिवे बसविणेबाबतचा प्रस्ताव व संभाव्य खर्चाचा तपशील सादर आहे.करिता दि.25-11-2019 च्या महासभेतील ठराव क्र.75 नुसार निर्देशाप्रमाणे ई.ई.एस.एल. कंपनीशी करण्यात आलेला करारनामा रद्द करणे व उक्त अहवालानुसार प्रस्तावित काम मनपा स्थरावर निविदा कार्यवाही करून करणे या करिता मंजुरी होणेस मा.स्थायी समितीकडे मान्यतेस सादर करण्यांत आली.

उक्त बाबत म. अभियंता सो. यांनी धुळे शहरात संपूर्ण एलईडी बसविणेबाबत ची मंजुरी मनपा महासभा ठ.नं. 41 दि. 29/6 /2019 च्या मान्यतेनुसार झालेली असून या मान्यतेने दिनांक 6/9/2019 रोजी ईईएसएल. कंपनीशी करार करण्यांत आलेला आहे. व ईईएसएल कंपनीस दि. 11/9/2019 रोजी डी.पी.आर. करणेचे आदेशही दिलेले आहेत असे अभिप्राय नोंदविले आहेत. तथापि या कंपनीने अद्याप पावेतो कुठलीही कार्यवाही केलेली नसल्याने सदरचा विषय फेर विचारार्थ त्याच सक्षम प्राधिकरणाकडेस सादर करणे उचित राहील असे मत दिलेले आहे. तसेच याकामी झालेला करारनामा रद्द करणेची कार्यवाही विधीतज्ञांचे मत घेऊन करणे आवश्यक राहील असे मत दिलेले आहे.

उक्त प्रकरणी लेखाविभागाकडील अभिप्राय घेण्यांत आलेला असून त्यांनी ईईएसएल कंपनीने करारनामा अटी शर्ती मान्य न केल्याने सदर प्रकरणी विषय मंजुरीसाठी सादर करण्यांस हरकत नाही असे मत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेकडेस फेर निर्णयासाठी सादर झाला असता सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालाचा विचार करता धुळे शहरात तातडीने एल.ई.डी. पथदिवे बसविणे गरजेचे आहे. सदरचा प्रस्ताव सुमारे वर्षभरापासून प्रलंबित आहे. शासनाने ईईएसएल कंपनी मार्फतच एलईडी पथदिवे बसविण्याबाबत निर्देश दिलेले होते.शासनाच्या निर्देशाप्रमाणे महानगरपालिकेने पालन केले असुन ईईएसएल कंपंनी सोबत एल.ई.डी पथदिवे बसविणेसाठी करारनामा केलेला आहे. तथापी ईईएसएल कंपनीने करारनामा करुन सुध्दा त्यातील अट क्रं.३.८-(९) मान्य नसल्याची भुमिका घेतली आहे. महानगरपालिकेने कंपनीच्या प्रतिनिधीसोबत अनेकदा चर्चा केली असुन काम सुरु करण्याचे विनंती व सुचना केलेली आहे. तसेच मा. सहसचिव नगरविकास विभाग यांचे कडील संयुक्त चर्चे मध्ये काम सुरु करणार असल्याचे मान्य केले पुनश्च: मनपामध्ये झालेल्या बैठकांमध्ये सुध्दा याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तथापी कंपनीकडुन कोणताही प्रतिसाद दिला जात नाही व काम सुरु केले जात नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या अतिशय तिव्र भावना निर्माण झालेल्या असुन असंतोष निर्माण झालेला आहे.तसेच कंपनीने मनपाच्या निविदेतील अटीनुसार गुणवत्तापुर्वक कंपनीचे पथदिवे व साहित्य पुरविण्याबाबतही असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे शहरातील हा महत्वाचा प्रश्न प्रलंबित राहिलेला होता. त्यामुळे पथदिव्याचा प्रश्न लक्षात घेता करारनाम्यानुसार अटी शर्ती कंपनीने पुर्ण न केल्याने व नागरीकांना सुविधेपासून वंचीत ठेवल्याने सदर कंपनीशी यापूर्वी झालेला करारनामा व ठराव रद्द करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच शहरात हद्दवाढीसह संपूर्ण एलईडी पथदिवे बसविणेकरीता ५ वर्षाच्या देखभाल दुरुस्तीसह व गॅरेंटीसह मनपा स्तरावर निविदा कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच कामाबाबत विभागणी व्हावी व काम गुणवत्तापुर्वक व्हावे यासाठी शहराचे दोन भाग करुन त्याप्रमाणे निविदा कार्यवाही करावी व इतर कामासाठी वार्षिक दर मागविण्याची कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक -६७ सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना या प्रकल्पात येणाऱ्या तापी पाणीपुरवठा योजनेची पाईप लाईन स्थलांतर करणेकामी PMC म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग यांची नियुक्ती करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालासनुसार सदर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची PMC म्हणून नेमणूक करणेस मान्यता देण्यांत येत आहे

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ८९ दिनांक ३१/१२/२०१९

उपविभागीय अभियंता; महारष्ट्र जीवन प्राधिकरण , उपविभाग , धुळे यांचे कडील पत्र क्र./ ताशा-1 / 407 दि.18/09/2019 नुसार.धुळे मनपाचा तापी पाणीपुरवठा योजना सुलवाडे जामफळ कनोली उपसासिंचन योजना अंतर्गत येणारी पाईप लाईन स्थलांतरण कामासाठी PMC म्हणून या विभागाची नेमणूक केलेली असल्या बाबत या उपविभागास वरिष्ठ कार्यालयाकडून उक्त कामास PMC बाबत कळविलेले नाही. तसेच महानगरपालिका ठराव सुद्धा प्राप्त नाही करिता आपल्या स्तरावरून कार्यवाही होणे बाबत कळविले आहे.

धुळे मनपाचा तापी पाणीपुरवठा योजना सुलवाडे जामफळ कनोली उपसासिंचन योजना अंतर्गत येणारी पाईप लाईन स्थलांतरण करणे कामी PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांची नेमणूक होणेसाठी महासभेपुढे मंजुरीस ठेवणे आवश्यक आहे.

कार्यालयीन अहवालासनुसार सदर कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची PMC म्हणून नेमणूक करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-६८ राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव /सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यास मंजूरी देताना अनुसरावयाची कार्यपध्दती याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालासनुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९० दिनांक ३१/१२/२०१९

शासन परिपत्रक क्र. याचिका-२०१८/प्र.क्र. २५३/नवि-१७ दिनांक १९/०९/२०१९ धुळे महानगरपालिका हद्दीतील कार्यक्षेत्रात विविध उत्सव मंडळाकडुन गणेशात्सव, दहिहंडी,

नवरात्रौत्सव इ.सण-उत्सवांचे निमित्त रस्त्यावरील/सार्वजनिक ठिकाणी मंडप/ स्टेज इ.उभारुन तात्परुता स्वरुपात भोगवटा करण्यात येत असतो.महापालिका हद्दीतील रस्ते/ सार्वजनिक ठिकाणी संबंधीत मंडळांकडुन मंडप / स्टेज इ.उभारण्यासाठी वारंवार रस्ते खोदाई केली जात असल्याने त्याची वेळोवेळी दुरस्ती करणे आवश्यक असते. तसेच सदर मंडप/स्टेज रस्ताअथवा सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आल्याने वाहतुक / रहदारीस अडथळे निर्माण होत असल्याने त्यासंदर्भात धुळे शहरातील नागरीकांकडुन मार्गदर्शन तत्वे निश्चीत करणेत आलेली असुन त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

तथापि राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव / सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यासंदर्भात शसन निर्णय, दि. ०६/०३/२०१६ अन्वये नागरी स्थानिक संस्थांच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनांव्यतिरिक्त सार्वजनिक उत्सव /सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यास मंजूर देतांना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावयाची आहे.

अ) मंडप बांधण्याकरीता/ उभारण्याकरीता अर्ज सादर करण्याची पध्दत-

१. सर्व सणांकरीता मंडप बांधण्याकरीता/उभारणकरीता अर्ज संबंधित सणाच्या ३० दिवसापूर्वी करावा. सणाच्या / समारंभाच्या १० दिवसापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
२. सर्व नागरी स्थानिक संस्थानी सणाच्या ४५ दिवसापूर्वी २ स्थानिक वृत्तपत्रात या संदर्भात सार्वजनिक सूचना प्रसिध्दीस द्यावी.
३. सर्व नागरी स्थानिक संस्थानी मंडप बांधण्याकरीता / उभारण्याकरीता दाखल करावयाच्या अर्जाबाबतची कार्यपध्दती त्यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व ऑनलाईन प्रणालीवर अर्ज सादर करण्यात येईल याची खात्री करावी.
४. नागरी स्थानिक संस्थानी प्राप्त सर्व परवानग्या यथोचितअसल्याची खात्री पटलवर सणांच्या सात दिवस अगोदर मंडपास परवानगी द्यावी.
५. सणाच्या / समारंभाच्या दिवसापूर्वीच्या ०७ दिवसात कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येवू नये.
६.नागरी स्थानिक संस्थांकडे मंडप बांधण्याकरीता / उभारण्याकरीता दाखल करण्यात आलले अर्ज सर्व संबंधित प्राधिकरांकडे पाठवावेत. सर्व संबंधित प्राधिकरणांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर ३ कार्यालयीन दिवसात कार्यवाही करुन त्यांचा अहवाल पदनिर्देशित अधिका-यास सादर करावा.
७.नागरी स्थानिक संस्थानी शक्तो सिंगल विंडो प्रणालीचा वापर करावा.
८.ऑनलाईन प्रणालीवरील अर्जात खालील बाबींचा अंतर्भाव करावा.
९.अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (पुराव्यासह), मोबाईल क्रमांक,आधार कार्ड क्रमांक,ई-मेल
१०.यापूर्वी अर्जदाराविरुध्द तक्रार प्राप्त झाली असल्यास त्याचा तपशिल
११.अर्जदाराने लाऊडस्पिकरची परवानगी प्राप्त केली आहे का ?
१२.आग प्रतिबंधक उपाययोजना निकषांची अंमलबजावणी करण्यात आली आहे का ?
१३.बांधण्यात / उभारण्यात येणा-या मंडपात येणा-या संभवित लोकांना सामावण्याची क्षमता तसेच रस्ता / फुटपाथीच रुंदी आहे का ?
१४.नागरीकांना जाण्यायेण्यासाठी पुरेसा रस्ता / फुटपाथ मोकळा आहे का ?

ब) कागदपत्रांची पडताळणी-

१. अर्जदाराने अर्जासोबत आवश्यक कागदपत्र दाखल केली आहेत किंवा नाही याची खातरजमा संबंधित नागरी स्थानिक संस्थानी करावी व आवश्यकता भासल्यास अर्जदाराशी संपर्क साधून कागदपत्र सादर करण्यातबाबत कळवावे.

२. कागदपत्रांची पडताळणी केल्यावर नागरी स्थानिक संस्थांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ८५/२००७ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १०/०८/२०१६ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद क ९४(xii) नुसार अर्जदाराकडून हमीपत्र घ्यावे.

क) कागदपत्रांची पडताळणी केल्यावर परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दती -

१. अर्जासोबतची कागदपत्रे ,संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या परवानग्या यांची छाननी करुन तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन, परवानगी देण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे / नियम यामधील तरतुदी व मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा सर्वकष विचार करुन पदनिर्देशित अधिकाऱ्याने अंतिम परवानगी द्यावी.

२. ना-हरकत प्रमाणपत्रे देण्याऱ्या विभागापैकी एका विभागाने जरी ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही, तरी पदनिर्देशित अधिकाऱ्याने अंतिम परवानगी देवू नये.

ड) तात्पुरते बांधकाम / मंडप निष्कासित करण्याबाबतची कार्यवाही –

तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या समितीने त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या हद्दीत उभारण्यात आलेल्या मंडपांची सणंच्यापूर्वी तपासणी करावी.सदर मंडप अस्तित्वात असलेले कायदे / नियम यामधील तरतुदी व मा.न्यायालयाने दिनांक १०/०८/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाचा भंग करीत असल्यास, असे मंडप निष्कासित करण्याची कार्यवाही करावी सदर कार्यवाहीसाठभ् संबंधित पोलीस ठाण्याने पुरेसा बंदोबस्त पुरवून कायदा व सुव्यस्था राखावी. नागरी स्थानिक संस्थांनी असे मंडप कोणत्याही परिस्थितीत नियमित करु नयेत. तसेच संबंधित मंडळ /अर्जदार /संस्था यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियामतील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्याची आवश्यक कार्यवाही नागरी स्थानिक संस्थांनी करावी.

इ) नियमभंग करणाऱ्यांवर करावयाची कार्यवाही –

मंडळाची उभारणी करतांना रस्ता /फुटपाथ /कुठलीही सार्वजनिक मालमत्ता याचे नुकसान होणार नाही तसेच नागरी स्थानिक संस्थानी घातलेल्या अटी व शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.असे नुकसान झाल्यास नागरी स्थानिक संस्थांनी संबंधित मंडळ /अर्जदार/ संस्थांवर अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

ई) निर्माल्यावर करावयाची कार्यवाही-

उत्सवाच्या दरम्यान जमा होणाऱ्या निर्माल्यावर केंन्द्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मध्ये नमूद तरतुदीनुसार संबंधित मंडळ /अर्जदार/ संस्थांनी कार्यवाही करावी.

उ) सण कार्यक्रम संपल्यावर तात्काळ मंडप / तत्सम बांधकाम तात्काळ काढण्याची जबाबदारी संबंधित मंडळ /अर्जदार/ संस्था यांची असेल. याकरीता कोणताही अतिरिक्त कालावधी नागरी स्थानिक संस्थांनी देवू नये.

सार्वजनिक उत्सावाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास परवानगी देण्याकरीता एक खिडकी योजना सुरु करण्यात यावी. सार्वजनिक उत्सावाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास ऑनलाईन परवानगी देण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने DSS World,पुणे या कंपनीकडून तयार केलेल्या सॉप्टवेअरचा वापर सर्व नागरी स्थानिक संस्थांनी करावा, त्यानुसार कारवाई करताना तेथील स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल करण्यास वाव असेल.

तरी सार्वजनिक उत्सावाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास ऑनलाईन परवानगी देण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने DSS World,पुणे या कंपनीकडून तयार केलेल्या सॉप्टवेअर उपलब्ध करुन धुळे महानगरपालिका हद्दीत शासन निर्णयानुसार धुळे महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक उत्सवाच्या दरम्यान उभारण्यात येणाऱ्या मंडपा करीता ना-हरकत दाखला देणेसाठी वरील प्रमाणे नियमावली लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-६९ मा.महापौर श्री.चंद्रकात मधुकर सोनार व सन्मा. नगरसेवक श्री. नागसेन बोरसे यांच्या पत्रानुसार नदी किनारी असलेल्या प्रस्तावित बगीच्याच्या आवारात भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी व स्व.पंडीत दिनदयाल उपाध्याय पुतळा उभारणे व प्रवेशद्वारास नामकरण करणेबाबत प्रस्तावमे.महासभेत घेणेबाबत.आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. प्रतिभा चौधरी महापौर महोदय,सदरचा विषय तत्कालीन आयुक्त श्री. सुधाकर देशमुख साहेब असतांना पाझंरानदी काठी उद्यानासाठी २.५ कोटींचा जो प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता परंतु तो शासनाच्या प्रधानसचिव कार्यालयामध्ये तो प्रस्ताव प्रलंबीत होता. आता तो प्रस्ताव भा.ज.प धुळे महानगर प्रमुख श्री. अनुपभाऊ अग्रवाल, आयुक्त साहेब, महापौर महोदय आपल्यामुळे मंजुर होवुन आला मी आपले सगळयांचे अभिनंदन करते. परंतु याबाबत मला एक माहिती हवी होती या उद्यानाला २०१४ मध्ये कल्पना काकु महापौर असतांना या उद्यानाच्या नामकरणाचा ठराव पारीत झालेला आहे. तर या उद्यानाला एकुण किती प्रवेशद्वार राहणार आहेत आणि स्व.उत्तमराव पाटील नामकरणाचा जो ठरावपारित झाला आहे ते नाव कुढे देण्यात येणार आहे?

म. महापौर या उद्यानाला दोन प्रवेशद्वार असणार आहेत.

म. प्रतिभा चौधरी नागरिकांच्या सोयीसाठी हे मोठे उद्यान असणार आहे. तर एका प्रवेशद्वाराला स्व. उत्तमराव पाटील यांच्या नावाचा जो ठराव पारीत झालेला आहे ते नामकरण या उद्यानाला करण्यात यावे आणि तसेच सदरचा विषय आमच्या प्रभागातील असल्याने या उद्यानाचा आराखडा आमच्या प्रभागातील सन्मा. नगरसेवकांना देण्यात यावा व विषय मंजुर करणेत यावा.

म. महापौर सदर उद्यानात भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा उभारण्यांस तसेच उद्यानास असलेल्या पूर्वेकडील प्रवेशव्दारास भारत रत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी प्रवेशव्दार व उद्यानाच्या पश्चिमेकडील प्रवेशव्दारास जेष्ठ समर्पित नेते स्व.पंडीत दिनदयाल उपाध्याय प्रवेशव्दार असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९१ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपलिका हद्दीत विशेष निधी अंतर्गत नदीकिनारी असलेल्या स्व. उत्तमराव पाटील स्मारकाजवळ असलेल्या जागेत नवीन उद्यान प्रस्तावीत झालेले असुन त्या कामाची लवकरच सुरुवात होत आहे. सदर ठिकाणी सुमारे ५ कोटी रुपये मात्र खर्चाचे उद्यान होणार आहे. सदर उद्यान्याच्या ठिकाणी भारताचे माजी पंतप्रधान स्व. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी व जेष्ठ समर्पित नेते स्व. पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचा आदर्श व प्रेरणा भवी पिढीसमोर रहावा या दृष्टीकोनातुन या दोन्ही महनीय नेत्यांचे पुतळे सदर ठिकाणी बसविण्यात यावेत.तसेच सदर ठिकाणी दोन मुख्य प्रवेशद्वारअसुन त्या दोन्ही प्रवेशद्वारास स्व. भारतरत्न

अटलबिहारी वाजपेयी प्रवेशद्वार व स्व.पंडीत दिनदयाल उपाध्याय प्रवेशद्वार असे नामकरण करणेबाबत प्रस्ताव महासभेत घेणेसंदर्भात मा.महापोर साहेब यांनी पत्र सादर केलेले आहे.

सदर प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार स्व. उत्तमराव पाटील स्मारका जवळील विशेष निधीअंतर्गत प्रस्तावित उद्यानात भारत रत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा उभारण्यांस तसेच उद्यानास असलेल्या पूर्वेकडील प्रवेशव्दारास भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी प्रवेशव्दार व उद्यानाच्या पश्चिमेकडील प्रवेशव्दारास जेष्ठ समर्पित नेते स्व पंडीत दिनदयाल उपाध्याय प्रवेशव्दार असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय निर्णय क्र./पुतळा /3116/ प्र.क्र.308/29 मंत्रालय मुंबई दि.02 मे 2017 चे उचित निर्देशानुसार अटी शर्तींची पूर्तता व कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-७० मोहाडी उपनगर भटाई माता रिक्षा स्टॉप येथे गट नं.2/2 पैकी जागेत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीनअहवालासनुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९२ दिनांक ३१/१२/२०१९

मोहाडी उपनगरातील भटाई माता रिक्षा स्टॉप येथे गट नं.2 /2 धुळे मनपा दवाखान्या शेजारी राजे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्या बाबत प्रभागातील नागरिकांची मागणी असून मोहाडी उपनगर भागात धुळे महानगरपालिका दवाखान्या शेजारी छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्या बाबत श्री.राजेश ईश्वर पवार; नगरसेवक प्र.क्र. 18 यांनी पत्रान्वये कळविले आहे.

नगररचना विभागाकडील अभिप्राय:- सदर जागा मनपा धुळे यांचे मालकीची आहे. तसेच सोबत जोडलेल्या धुळे मनपा विस्तारित क्षेत्र म.भु.योजना मोहाडी प्र.ल. आलेख क्र.28 नकाशावर दर्शविलेल्या जागेवर सद्यस्थितीत अस्तित्वातील मोहाडी मनपा दवाखाना , जुने मोहाडी सहकारी सोसायटी इकरार बांधकाम सार्वजनिक शौचालय बांधकाम तसेच नियोजित वाढीव पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम सुरु आहे. सदरचे बांधकामचे मधोमध जागा रिकामी (खुली) आहे.सोबत जागेवरील सद्यस्थितीचा नकाशा जोडत आहे. तरी उक्त जागेवर बांधकाम व पाणीपुरवठा विभागामार्फत आवश्यक अंतर्गत काही कामे प्रस्तावित असल्याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे. तसेच उक्त जागेवर पुतळा धोरण राष्ट्रपुरुष यांचा पुतळा उभारणे परवानगी देणेसाठी महाराष्ट्र शासनाकडील निर्णय क्र. / पुतळा / 3116 / प्र. क्र.308/ 29 मंत्रालय मुंबई दि.02 मे 2017 अन्वये पुतळे उभारणे संदर्भात परवानगी देण्याच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे अध्यक्षतेखाली एक पुतळा स्थायी स्वरुपात गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर पुतळा समितीला विहित 1 ते 21 मार्गदर्शक तत्वे व त्या अनुषंगाने प्रस्तावा सोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून पुतळा उभारणेसाठी मान्यता देण्याचे अधिकार राहतील असे शासन निर्णयात नमूद केलेले आहे. उक्त 1 ते 21 मार्गदर्शक तत्वे मधील अटी व शर्ती नुसार पुतळा उभारणे बाबत नमूद केले आहे.

मंजूर विकास योजना आराखडा नुसार सार्वजनिक व निम सार्वजनिक वापरात आहे. उक्त जागेत सद्यस्थितीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत जलकुंभाचे बांधकाम पूर्ण

झाले बाबत पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार उर्वरित शिल्लक जागेवर (अंदाजे 60X 60 फुट मापाच्या जागेवर) राजे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय निर्णय क्र. / पुतळा / 3116 / प्र. क्र.308/29 मंत्रालय मुंबई दि.02 मे 2017 चे उचित निर्देशानुसार अटी शर्तीस अधीन राहून मंजुरी देणेस पुढील निर्णयास्तव सादर.

म.आयुक्तसो.,यांच्याकडे दि.17/12/2019 रोजी अभियंता नगररचनाकार , कनिष्ठ अभियंता, यांच्या कडे झालेले समक्ष चर्चेनुसार सदर पुतळा संस्थेमार्फत उभारणेत यावा. त्यानुसार छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा स्मारक निर्माण समिती मोहाडी उपनगर यांनी दि.18/12/2019 रोजी पत्र सदर केले. सदर पत्रात छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा ते स्वखर्चाने उभारणार आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय निर्णय क्र./पुतळा /3116/ प्र.क्र.308/29 मंत्रालय मुंबई दि.02 मे 2017 चे उचित निर्देशानुसार अटी शर्तीस अधीन राहून मोहाडी उपनगरातील भटाई माता रिक्षा स्टॉप येथे गट नं.2/2 धुळे मनपा दवाखान्या शेजारी राजे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणेच्या कामास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-७१ मा.महापौर साहेब यांच्या पत्रानुसार मनपा विधीतज्ञांचे नवीन पॅनल तयार करण्यासाठी मे. महासभेत विषय घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालासनुसार मनपा पॅनलवर मा.आयुक्त व मा. महापौर यांच्या सहमतीने विधी तज्ञांची नियुक्ती तथा फेरबदल करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९३ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिकेमार्फत मे.जिल्हा न्यायालय,मे.उच्च न्यायालय तसेच मे. सर्वोच्च न्यायालयांत विविध याचिका दाखल आहेत. याकाकमी विविध विधीतज्ञांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यासंदर्भात महानगरपालिकेच्या संबंधित विधी विभागाकडुन माहिती घेतली असता मनपा पॅनलवरील नियुक्त विधीतज्ञ याचिकेच्या कामकाजाबाबत उदासिन असल्याने परीनामी मनपाच्या विरुध्द याचिकांचे निकाल होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच मनपाला आर्थिक नुकसानही त्यायोगे सोसावे लागत आहे. सदर बाब ही अत्यंत गंभीर स्वरुपाची असून मनपाचे आर्थिक हिताविरुध्द आहे. मे. न्यायालयीन कामकाजात विधीतज्ञांनी आवश्यक ते सहकार्य व दक्षता न घेतल्याने मनपा विधीतज्ञांच्या भुमिकेबाबत सांशकता निर्माण झालेली आहे.

त्यामुळे मनपाच्या हिताच्या दृष्टीने नवीन मनपा विधीतज्ञांची नियुक्तीसाठी प्रस्ताव मे. महासभेसमोर विचारार्थ आला असता, मनपा पॅनलवर मा.आयुक्त व मा. महापौर यांच्या सहमतीने विधी तज्ञांची नियुक्ती तथा फेरबदल करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच ॲडव्होकेट श्री.अनुदिप दिलीप सोनार विधीतज्ञ मे.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद तसेच ॲडव्होकेट श्री.अनिकेत संजय शिंपी विधीतज्ञ मे.धुळे न्यायालय यांनी मनपा

पॅनलवर नियुक्ती साठी अर्ज सादर झालेला असल्याने त्यांना मनपा पॅनलवर नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-७२ अल्पसंख्याकबहुल क्षेत्राकरिता क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत धुळे शहरातील देवपूर भागातील मोमीन कब्रस्थान येथे पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. तसेच याबाबत सन्मा.नगरसेविका अन्सारी सईदा मो. इकबाल व श्री. सईद बेग हाशम बेग श्रीमती पठाण नाजियाबानो नासीरखान यांनी देखील सदर कब्रस्थान मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत पत्र सादर केले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर केला आहे.

म. सईदा अन्सारी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालासनुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९४ दिनांक ३१/१२/२०१९

मा.जिल्हाधिकारी यांनी अल्पसंख्याक बहुल क्षेत्राकरिता क्षेत्रा विकास कार्यक्रम अंतर्गत खुनी मस्जीद ते बहारवाली मशिद या दरम्यान पाईप मोरी बांधकाम करणे या कामासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे क्रं.12/क/कक्ष-5/नपाप्र/कावि/220/2018 दि. 13/2/2018 चा आदेश नुसार रु.30,00,000/- मात्रची प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली होती. तसेच मा.आमदार श्री.अनिल गोटे यांनी सदर काम इतर निधीतून झाल्यामुळे सदर कामाऐवजी देवपूर भागातील मोमीन कब्रस्थान येथे संरक्षण भिंत बांधणे काम प्रस्तावित करावे म्हणून विनंती पत्र दिलेले होते. मा.आमदार श्री.अनिल गोटे यांनी सदर संरक्षण भिंत बांधणे बाबत न्यायालयात वाद असल्याने सदर कामाऐवजी देवपूर भागातील मोमीन कब्रस्थान येथे पेव्हर ब्लॉकचे काम करणेबाबत विनंती पत्र दिलेले आहे.

उक्त कामास शासकीय दरसूची सन 2019-20 नुसारअंदापत्राकीय रक्कम रु. 29,59,432/-मात्र अपेक्षित आहे. सदरचे काम अल्पसंख्याक बहुल क्षेत्राकरिता क्षेत्रविकास कार्यक्रमातंर्गत पस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक -७३ नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना साठी विशेष अनुदान मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे महापौर महोदय नागरी दलीत वस्ती पाणीपुरवठा योजना अंतर्गत विषेश अनुदान मिळणे बाबत विषय आलेला आहे. माझा प्रभाग क्रमांक ७ हा राखीव प्रभाग असल्याने माझ्या प्रभागतील नागरिकांच्या पाणीपुरवठा बाबतच्या वारंवार तक्रार येत असतात माझ्या प्रभागात साधारण: १० ते १२ दिवस पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांचा मनपा प्रशासनावर रोष निर्माण निर्माण

होतो. महोदय विनंती करतो की या योजनेअंतर्गत माझ्या प्रभागातील टाकीबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याबाबत खुलासा करणेत यावा.

म. अभियंता — नवीन जलकुंभ मोगालाई व जोरावरअली सोसायटी भागात घेणे आवश्यक आहे त्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन म.जि.प्रा. विभागाचे घेण्यांत येत आहे.

म. सुनिल बैसाणे — आमची विनंती आहे की, याबाबत तातडीने इस्टीमेट तयार करुन प्रशासनाची मंजुरी घ्यावी आणि लवकरात लवकर पाण्याच्या टाकीबाबत कार्यवाही करावी.

म. महापौर — या विषयाबाबत म.जी.प्र. चे अभिप्राय मागविण्यात यावा. तसेच जेवढया टाक्या आपण तयार केल्या आहेत याबाबतचा विषय सन्मा. सदस्य श्री. अमोल मासुळे यांनी उपस्थित केला होता. टाकी तयार आहे परंतु त्यात पाणी देवु शकत नाही याबाबत योग्य ती चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी.

म. संतोष खताळ — महापौर महोदय, चितोड गावाचा पाण्याचा प्रश्न आहे नागरिकांचा महत्वाचा प्रश्न आहे सदरच्या विषयाला मान्यता देण्यात यावी.

म. नागसेन बोरसे — महापौर महोदय आपण यापुर्वी रोलींग दिलेली आहे.पाण्याच्या टाकी संदर्भात त्यानंतर हा विषय येण्याची गरज नव्हती. त्यावेळेस चितोड, मोगलाई, जवाहर परिसराची ही पाण्याची टाकी पण त्यामध्ये घेतली होती या ५ टाक्यांचे इस्टीमेट तयार करुन आपल्याला जिल्हाधिकारी कार्यालयात पाठवायचे होते. म.जि.प्र. चा यात काहीच विषय नव्हता. नागरीदलित वस्ती योजना अंतर्गत शासनाकडुन मंजुर करुन घ्यावयाचे होते त्यामुळे याचा आणि निधीचा विषय नव्हता आणि एक टाकी नव्हती महापौर महोदय आपण ५ पाण्याच्या टाक्यांना यापुर्वी मंजुरी दिली आहे. तसेच या ठरावाला मान्यता मिळुन ६ ते ७ महिने झाले तरी कुठल्याही प्रकारचे इस्टीमेट झाले नाही. यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.या विषयाबाबत पहिजे जे ठराव झालेले आहेत ते सर्व एकत्र करुन पुढील कार्यवाही करावी.

म. अभियंता — महापौर महोदय आपण 5 पाण्याच्य टाक्यांना यापूर्वी मंजुरी दिली आहे. तसेच य ठरावाला मान्यता देवून 6 ते 7 महिने झाले तरी कुठल्याही प्रकारचे एस्टीमेट तयार झाले नाही. काही कार्यवाही झाली नाही. याआधीचे आणि आताचे जे ठराव झाले आहे ते एकत्र करुन पुढील कार्यवाही करावी.

म. अभियंता — सदर जलकुंभची लेव्हल जलकुंभची उंची,जलकुंभ भरणेसाठी पाणी कोठून घेणे याबाबतचे तांत्रिक अभिप्राय म.जि.प्रा. विभागाकडून घेणे उचित राहील.

म. महापौर — सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा अत्यावश्यक प्रश्न लक्षात घेता प्राधान्यक्रमाने मोगलाई, जोरावरअली सोसायटी ,यासह चितोड येथे नवीन जलकुंभ उभारणेकामी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९५ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिकेच्या हद्दीत जानेवारी 2018 मध्ये धुळे शहरा लगत असलेली 11 खेडीचा समावेश झालेला आहे.माहे डिसेंबर 2018 मध्ये झालेल्या सार्वजनिक निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक 16 (चितोड गाव)हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या प्रभागात अनुसूचित जातीची साधारणत: 9 हजार लोकसंख्या असून या प्रभागात दिनांक 05/01/2018 रोजी हद्दवाढीने समाविष्ठ झालेल्या चितोड गावाचा समावेश असल्याने व या गावासाठी पाणीपुरवठा साठी स्वतंत्र योजना नसल्याने या गावाची पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे.

नागरिकांच्या पिण्याचे पाणी प्रश्न सुटावा यासाठी परीपुर्ण पाणीपुरवठा योजना उभारणे बाबत शासनाच्या नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत मंजुरी मिळणे कामी मे.महासभेचा ठराव आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा अत्यावश्यक प्रश्न लक्षात घेता प्राधान्यक्रमाने मोगलाई,जोरावरअली सोसायटी ,यासह चितोड येथे नवीन जलकुंभ उभारणेकामी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-७४ सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना,नागरी दलित्तेतर योजना,अल्प संख्यांक अनुदान व अग्नीशमन सुरक्षा व बळकटीकरण करणे या अंतर्गत कामे निश्चिती करुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने संपूर्ण शहरातील सर्व प्रभागामध्ये समान विकास होण्याच्या दृष्टीने सदर विकास कामाचा समावेश करुन जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गत सदर प्रस्तावाना मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९६ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिका क्षेत्रात जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत विविध विकास कामे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे. त्यासाठी सन्मा. सदस्यांकडून मागविण्यांत आलेल्या कामांच्या यादीनुसार खालील कामे निश्चिती करुन जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्रं	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्र.क्र. १ मध्ये सरस्वती मंगल कार्यालयापारसून ते भदाणे सर ते राठोड सर यांचे घरापावेतो रस्ता (शिवनेरी कॉलनी) क्रॉकीटीकरण करणे.	१२,४८,८९९/-
२.	प्र.क्र.१ मध्ये जुनी भिलाटी (इंदिरानगर) भुमीगत गटारी करणे.	१२,४८,६०७/-
३.	प्र.क्र.१ मध्ये आदिवासी वस्ती भोकर नाल्यावर मोरी व रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४५,७२१/-
४.	प्र.क्र.१ मध्ये समाधान हॉटेलपासून ते श्री.वैद्य यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४७,१६१/-
५.	प्र.क्र.२ मध्ये जिल्हा परिषद कॉलनी येथे रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,६१९/-
६.	प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी सुर्यवंशी सर प्लॉट नं.५० पासून ते ठाकरे सर यांच्या घरापावेतो क्रॉकीटीकरण करणे.	१२,४७,१८९/-
७.	प्र.क्र.२ मध्ये श्री.गवळे रावसाहेब यांच्या घरापासून ते श्री बडगुजर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४७,५०६/-
८.	प्र.क्र.२ मध्ये पाटकर नगर ते पुजा प्रोव्हिजन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४५,८६२/-
९.	प्र.क्र.३ मध्ये आग्रा रोड मराठ बोर्डींग ते संकलोच्या यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,९०२/-

१०.	प्र.क्र.३ मध्ये देवपूर कब्रस्तान येथे अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	२४,९५,८४९/-
११.	प्र.क्र.३ मध्ये जुनी बॉडी ते जुन्या गेटपावेतो रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,००९/-
१२.	प्र.क्र.४ मध्ये श्री.झेंडे नवकार स्वीट ते गणपती हार्ट केअर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,३१३/-
१३.	प्र.क्र.४मध्ये अँड मिलींद बोरसे यांच्या घरापासून ते रविंद्रनाथ टोगोर नर्सरी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४७,६०८/-
१४.	प्र.क्र.४ मधील चुडामणी बंगला ते सिंधुरत्न अपोर्टमेंटपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४९,७६४/-
१५.	प्र.क्र.४मधील श्री.विशाल साळवे यांच्या घरापासून ते श्री.अनिल वाघ यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४८,५००/-
१६.	प्र.क्र.५ मधील देवपूर आनंद नगर येथे जोगेश्वरी फॅनिर्चरपावेतो ते श्री.शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,६१९/-
१७.	प्र.क्र.५मधील साईबाबा नगर येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार करणे	१२,४९,२३३/-
१८.	प्र.क्र.५मधील एस.आर.पी.रिक्षा स्टॉप ते सुर्यास्त् मुखी वेल्डींग वर्क्स पावेतो खडीकरण व डांबरीकरण करणे.	१२,४७,९९५/-
१९.	प्र.क्र.६मधील मोराणे येथे श्री विशाल पंजाब हॉटेल ते गुप्ता गणेश नगर रस्ता कॉक्रीटीकरण करणे .	१२,५०,०००/-
२०.	प्र.क्र.६मध्ये नकाणे गावात दासभाऊ बागुल यांच्या घरापासून ते श्री.देवराम मोरे यांच्या घरापावेतो पेव्हर ब्लॉक करणे.	१२,५०,३८०/-
२१.	प्र.क्र.६ मधील महिंदळे येथे ईच्छापुर्ती कॉलनी परिसरात रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,१७२/-
२२.	प्र.क्र.६ मधील नकाणे गावत पिर बाबा चौक येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.	१२,४६,१७२/-
२३.	प्र.क्र.६मधील नकाणे येथे आर.सी. पाटील यांच्या घरापासून ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे .	१२,३२,८९५/-
२४.	प्र.क्र.७ मधील मोगलाई भागात श्री. पवार यांच्या घरापासून ते श्री. गायवाड यांचे घर ते मयुर कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	३०,००,०००/-
२५.	प्र.क्र.७मधील कारा चक्की यांच्या दुकानापासून ते श्री देवचंद दुसेजा यांच्या घरापावेतो रसता कॉक्रीटीकरण करणे	१२,४०,९३८/-
२६.	प्र.क्र.७ मध्ये साक्री रोड श्री. तनेजा यांच्या घरापासून ते अमरधाम पावेतो नाल्यावर भराव करून रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
२७.	प्र.क्र.८ मध्ये राजकमल टाकिज ते मौलवी गंज पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	४०,००,०००/-
२८.	प्र.क्र.८ मधील काझी प्लॉट येथे रेशन दुकान ते नेहाळ मोटार गॅरेजपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४०,९४०/-
२९.	प्र.क्र.८ मधील अकबर चौकात रईस हाजी यांच्या घरापासून ते डॉ.काबरे हॉस्पिटल पावेतो बंदिस्त गटार करणे.	२४,९९,८८४/-
३०.	प्र.क्र.९ मध्ये ग.नं.४ व ५ बोळ सुवर्णकार भुवन, राज बियर बार पावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.	२४,९७,१७६/-
३१.	प्रभाग क्रं. ३ श्री. पी.जी. गुप्ता यांच्या घरापासून ते एन.वाय. पाटील यांच्या घरापर्यंत ते दिगंबर चौधरी यांच्या घरापर्यंत ते विजय माळी यांच्या घरापर्यंत ते लक्ष्मीनगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९४,००३/-
३२.	प्र.क्र.१०मध्ये सुपडूअप्पा कॉलनी मध्ये राजू चौधरी ते राज प्रोव्हीजन पावेतो सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे.	२०,२७,७६७/-

३३.	प्र.क्र.१०बाबुलाल जैन यांच्या घरापासून ते मोहन अग्रवाल यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	१४,८४,१०१/-
३४.	प्र.क्र.१०मध्ये वरखेडी रोड येथील रस्ता ते बांबु गोडाऊन ते बर्फ कारखाना व परिसरात बंदिस्त पाईपलाईन व गटार करणे.	२५,००,०००/-
३५.	प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी देविदास कॉलनी परिसरात बंदिस्त पाईप गटार करणे.	२५,००,०००/-
३६.	प्र.क्र.१० मध्ये गुरूदत्त कॉलनी परिसरात बंदिस्त पाईप गटार करणे.	२५,००,०००/-
३७.	प्र.क्र.१० मध्ये सुपडूअप्पा कॉलनीत सुनिल मंडप ते पापा घारु यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२४,९६,१६५/-
३८.	प्र.क्र.९ मध्ये सुभाषनगर भागात शाळा क्रं. 16च्या मागील भागात गढी परिसरात बंदिस्त गटार करणे.	२३,११,८६८/-
३९.	प्र.क्र.१० मध्ये बर्फ कारखाना गुरुदत्त कॉलनीत श्री. राकेश रोकडे यांच्या घराजवळील बंदिस्त गटार करणे.	२५,००,०००/-
४०.	प्र.क्र.१०मध्ये रामनगर (वरखेडी) येथे ड्रेनेज लाईन व निलेश गुजर ते संदिप पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१२,४८,७६८/-
४१.	प्र.क्र. ११ मध्ये बाळापुर येथे यशवंत नवल पाटील ते विजय मिस्तरी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे व गटार करणे	१२,४८,८२६/-
४२.	प्र.क्र.११ मधील रामचंद्र नगर गणपती कारखान्या पाठीमागे कॉक्रीटीकरण करणे	१२,४८,०२४/-
४३.	प्र.क्र.११ मधील नवनाथ नगर अलंकार सो.रस्ता कॉकीटीकरण करणे.	१२,४२,५४३/-
४४.	प्र.क्र.११मधील माणिक नगर मधील रिलायन टॉवर ते बापू चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,००,०००/-
४५.	प्र.क्र.१२ मधील शरीफ हॉटेलपासून ते विलास मिस्तरी घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४२,२२६/-
४६.	प्र.क्र.१२मधील सार्वजनिक हॉस्पिटल मागे फैयान पाटेवाली गल्लीपावेतो रस्ता कॉक्रीटी करण करणे.	१२,४२,८७६/-
४७.	प्र.क्र.१२ मधील जनता सो. मुस्लीम नगर हाजी नगर कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,५२६/-
४८.	प्र.क्र.१२ मधील मस्जिद शेठ, आयशा शेठ जावेद बिल्डर सायजीन पावेतो गटार करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२४,९१,७५१/-
४९.	प्र.क्र.१३ मधील रातराणी हॉटेल जवळ नाल्यावर पुल बांधणे.	१२,४३,२७१/-
५०.	प्र.क्र.१३ मधील शिवाजी नगर झोपडपट्टी भागात पेव्हर ब्लॉक बसविणे.	१२,४४,१५९/-
५१.	प्र.क्र.१३ मधील फिरदोस नगर भागात गटारी करणे .	१२,४८,८३६/-
५२.	प्र.क्र.१३ मधील अन्सारी शेठ यांच्या घरापासून ते जैयय्या यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४१,५७६/-
५३.	प्र.क्र.१४मधील रामवाडी येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,८५२/-
५४.	प्र.क्र.१४मध्ये पश्चिम हुडको व मारोती नगर येथील परिसरात अंतर्गत रस्ते करणे.	२०,००,०००/-
५५.	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर पश्चिम होडको येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,८५२/-
५६.	प्र.क्र.१४ मध्ये गोपाळ नगर येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४६,५६१/-
५७.	प्र.क्र.१४ मध्ये मिरजकर नगर येथे ८० गाळेमध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४३,५२६/-
५८.	प्र.क्र.१५ मध्ये अरुण कुमार वैद्यनगर झुलेलाल अपार्टमेंट ते पंजाबी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे	१२,३२,६९७/-
५९.	प्र.क्र.१५ मध्ये सुशिल नगर येथे रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,३१३/-

६०.	प्र.क्र.१५मध्ये सुरभी कॉलनी येथे श्री सबनीस यांच्या घराजवळ डांबरीकरण करणे.	१२,४५,६६५/-
६१.	प्र.क्र.१५ मध्ये विद्या विहार कॉलनी बोरादकर सर यांच्या घरापासून ते श्री पवार यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४६,७३७/-
६२.	प्र.क्र.१६ मध्ये सिहस्थ नगर भागात आर.सी.सी. गटार करणे	१४,००,०००/-
६३.	प्र.क्र.१६ मध्ये आदिवासी वस्तीमध्ये कॉक्रीटीकरण रस्ता करणे	१४,००,०००/-
६४.	प्र.क्र.१६ मध्ये रमेश नगर मध्ये श्री.जिभाऊ पाटील ते अंबर गवळी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,००,०००/-
६५.	प्र.क्र.१७ मध्ये साई सेवादास वॅर्क शॉपपासून ते बापू खरात यांच्या घरापावेतो रस्ता कॉकीटीकरण करणे.	१२,४९,६८०/-
६६.	प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी नवीन पाण्याची टाकी ते कैलास मराठे यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे.	१२,३०,७८७/-
६७.	प्र.क्र.१७ मध्ये शिवशक्ती कॉलनी अंतर्गत गटार करणे.	१२,५०,०००/-
६८.	प्र.क्र.१७ मध्ये शिवसागर कॉलनी व शिवप्रभु कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९६,९५६/-
६९.	प्र.क्र.१८ मध्ये साईबाबा मंदिर ते गंभीर माणीक गावडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४६,४०१/-
७०.	प्र.क्र.१८ मध्ये गौंड वस्ती मधील गुलाब गौंड ते गणेश गौंड मारूती मंदिर व मेश्राम गौंड ते विजय गौंड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४१,३७४/-
७१.	प्र.क्र.१८ मधील समता नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४४,३९८/-
७२.	प्र.क्र.१९मध्ये फैजाने बरकत मशीद ते उमर मेडिकल पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,३१३/-
७३.	प्र.क्र.१९ दुर्बल घटक सोसायटी येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४७,१८९/-
७४.	प्र.क्र.१५ मध्ये राजहंस कॉलनी वराडे यांच्या घरापासून ते बावीस्कर यांच्या घरापर्यत आर.सी.सी. गटार तयार करणे.	१२,४९,०००/-
७५.	अग्रवाल नगर येथील ओम क्रिटिकल हॉस्पिटल ते श्री.नरेश अग्रवाल यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण व खोपडे अपार्टमेंट ते गणेश अपार्टमेंटपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	७५,००,०००/-
७६.	वलवाडी भागातील नेताजी कॉलनी येथील श्री. कवठळकर यांच्या घरापासुन ते राजेंद्र पाटील यांच्या घरापावेतो व श्री. परदेशी यांच्या घरापासुन ते चंद्रकांत पवार यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१०,९८,५०५/-
७७.	राष्ट्रीय महामार्ग क्रं. ६ ते मातोश्री वृध्दाश्रम पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.	२७,६४,०००/-
७८.	देवपूर भागात विनय कॉलनी मध्ये श्री.राव यांच्या घरापासून ते श्री. जोशी यांच्या घरापर्यत ते यथार्थ बंगल्यापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२४,८९,९५८/-
७९.	प्र.क्र.१९ मध्ये अलेहरा स्कूल येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,४८,९८८/-
८०.	प्र.क्र.१९मध्ये नॅशनल हायवे नं.३ पासून हाजी शब्बीरनगर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,४७,२०२/-
८१.	जवाहर कुस्ती स्टेडियमचे नुतनीकरण व अद्ययावत करणे.	१,००,००,०००/-
८२.	नविन महानगरपालिका ते छोटया पुलापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	७०,००,०००/-
८३.	वरखेडी उपनगर येथील अमरधाम विकसित करणे.	७५,००,०००/-
८४.	मिल परिसरात अमरधाम विकसित करणे.	७५,००,०००/-
८५.	नकाणे गावातील अमरधाम नुतनीकरण करणे.	२९,८३,०५४/-
८६.	साक्री रोड कुमार नगर येथील अमरधाम विकसित करणे.	२८,९९,५०४/-

उक्त कामाचे प्रस्ताव सन २०२०-२१ या वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर योजने अंतर्गत आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-७४ सन 2019-20 या आर्थिक वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना,नागरी दलित्तेतर योजना,अल्प संख्यांक अनुदान व अग्नीशमन सुरक्षा व बळकटीकरण करणे व इतर अनुदानाअंतर्गत कामे निश्चितती करणेकामी विचार करणे.

म.नगरसचिव धुळे मनपा हद्दीत अल्पसंख्याक प्रभागात मनपा निधी अंतर्गत २ कामे निश्चित करणेसाठी प्रस्ताव प्रशासनाकडून प्राप्त झालेला आहे. राज्यस्तरीय नगरोतथान योजनेअंतर्गत प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यांत आलेला होता. तथापि सदर सादर झालेल्या २ कामांना मान्यता मिळाली नसल्याने मनपा निधी अंतर्गत सदर कामे घेणेबाबत सूचित करण्यांत आले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव निर्णयार्थ महासभेपुढे सादर झालेला आहे.

म. अमिन पटेल सदरचे काम अत्यत महत्वपूर्ण असल्याने कामे तांतडीने करणेबाबत कार्यवाही करावी व ठराव मंजूर करावा. तसेच अल्पसख्यांक निधी हा फार कमी प्रमाणात मिळतो. त्यासाठी शासनाकडे वाढीव अनुदानासाठी मागणी करण्यांत यावी.

म. महापौर सदरचे काम व गरजेची असल्याने सदर काम मनपा निधीतून करण्यांस व निधीची आवश्यक ती तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया व अनुषंगिक कार्यवाही तांतडीने सुरु करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९६ (अ) दिनांक ३१/१२/२०१९

धुळे मनपा हद्दीत शासनाच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती महाअभियान नगरोत्थान (राज्यस्तरीय) योजनेअंतर्गत खालील कामास मंजुरी मिळणेसाठी (सन २०१९-२० या वर्षात) शासनाकडे खालील कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला असता उक्त कामास शासनामार्फत मान्यता मिळालेली नाही.

अ.नं.	कामाचे नांव
१	प्रभाग क्रं. १२ मधील १०० फूटीरोड अंजान सायरा हायस्कूल ते सत्तारवाडा पावेतोचा रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे
२	छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते भंगारबाजार ते एंशी फूटी रोड पावेतोचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व कॉक्रीट गटार करणे.

उक्त दोन्ही कामे ही अत्यंत आवश्यक व गरजेची असल्याने सदर काम मनपा निधीतून करण्यांस व निधीची आवश्यक ती तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया व अनुषंगिक कार्यवाही तांतडीने सुरु करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-७४ सन 2019-20 या आर्थिक वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना,नागरी दलित्तेतर योजना,अल्प संख्यांक अनुदान व अग्नीशमन सुरक्षा व बळकटीकरण करणे या अंतर्गत कामे निश्चिती करुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९६ (ब) दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षात जिल्हा नियोजन मंडळामार्फत यु.डी. ६ या सहाय्यक अनुदानातील कामांसाठी रक्कम रु. २५ लक्ष मात्रची तरतूद केलेली आहे. सदरचे अनुदान शहरातील मंजूर विकास योजनेतील रस्ते बांधणे, गटारी बांधणे, आरक्षणातील भूसंपादन करणे इत्यादी कामासाठी असून यात २३.३३ % अनुदान प्राप्त होत असते. याप्रमाणे २५ लक्ष् अनुदान प्रस्तावित करणेकामी सुमारे १.२५ कोटी मात्रची कामे जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदरची कामे मंजूर विकास योजनेतील रस्त्यांची कामे असून खालील कामे सहाय्यक अनुदानाअंतर्गत जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रर्तीपूर्तीसाठी प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम
१.	बहिरम बाबा मंदिर ते सिध्देश्वर मार्बलच्या पश्चिमेस असलेला रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे	98,06,000
२.	वरखेडीगांव दरवाजा पूर्वपासून ते श्री.मोहन चौधरी यांच्या घरापर्यत गटार तयार करणे.	22,09,000
३.	सेवादास नगर येथील रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००

याबाबत उक्त कामे मंजूर विकास योजनेअंतर्गत असल्याबाबत खात्री करुन तांतडीने प्रस्ताव जिल्हा नियोजन मंडळाकडेस सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-७४ महानगरपालिका ठराव क्रं. ९६ (क) दिनांक 31/12/2019 रद्द करण्यांत आलेला आहे.

विषय क्रमांक :-७४ सन २०१९-२० या आर्थिक वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना,नागरी दलित्तेतर योजना,अल्प संख्यांक अनुदान व अग्नीशमन सुरक्षा व बळकटीकरण करणे या अंतर्गत कामे निश्चिती करुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. महापौर धुळे महानगरपालिकेस सन 2019-20 या आर्थिक वर्षात प्राप्त होणा-या सर्वसाधारण रस्ता अनुदानातून कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९६(ड) दिनांक ३१/१२/२०१९

शासनाकडून राज्यातील महानगरपालिकाना दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीतील रस्ताची देखरेख, दुरूस्ती, डांबरीकरण व नुतनीकरण इत्यादी आुषंगीक कामासाठी

दरवर्षी विशेष रस्ता अनुदान व सर्वसाधारण रस्ता अनुदान प्राप्त होते.याअनुदानातून शहरातील विविध भागातील अत्यावश्यक रस्त्यांची कामे घेण्यात येतात.

धुळे महानगरपालिकेस सन 2019-20 या आर्थिक वर्षात एकूण 75 लाख रुपये अनुदान प्राप्त होणार आहे.

या अनुदानातून सन 2019-20 या आर्थिक वर्षात खालील कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव	रुपये
1	सुभाषनगर ग.नं. 9महादू वाणी ते प्रदिप भामरे पर्यत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे	24,98,494/-
2	कोटेचा क्लास ते पोलीस चौकी पर्यत सिमेंट रस्ता करणे	24,99,083/-
3	गांव दरवाजा विजय व्यायामशाळा ते पूर्वेस श्री. मोहन चौधरी यांच्या घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	24,98,000/-

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७५ सन 2019-20 या आर्थिक वर्षात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामांचा प्रस्ताव निश्चित करुन करुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९७ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिका क्षेत्रात सन 2019-20 अंतर्गत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत मनपा हद्दीतील विविध प्रभागात विकास कामांचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो यांच्या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. तरी धुळे मनपा हद्दीतील प्रभाग रचनेनुसार प्रभाग क्र 1,4,7,15,16,18 हे प्रभाग sc राखीव आहेत. त्यानुसार सदर प्रभागात विकास कामे निश्चित करणे आवश्यक आहे.तसेच 50% पेक्षा जास्त sc लोकसंख्या असणारे 25 भाग आहे. त्याभागात सुद्धा सदर योजनेत कामे समाविष्ट करता येईल.त्यानुसार लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामे सन 2019-20 या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे.त्यासाठी खालील कामे निश्चिती करुन लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजित रक्क
१	प्र.क्र १ मध्ये श्री . नथ्यू भामरे ते साप्त्सुंगी कॉलनी वलवाडी बोर्डापासून ते यश ब्युटी पार्लर पर्यत व गवळे पोलीस ते नितीन बैसाणे थाये धारापर्यंत कॉकित रस्ता करणे.	२४,३५,१२७/-
२	प्रभाग क्र.१ मध्ये वलवाडी येथे विद्याधन विद्यालयापासून ते श्री गुरु कॉलनी पर्यंत रास्त डांबरीकरण करणे.	२४,८५,७२८/-
३	प्रभाग क्र. १ मध्ये राजेंद्र नगर वलवाडी येथे गॉदूर रोड डीपी पासून श्री रामकृष्ण सैदाणे याचा घरापासून रस्ता डांबरी करन करणे.	२७,८०,१२७ /-
४	प्र..क्र १मध्ये मनुदेवी पेट्रोल पंपापासून ते सुनिल चौधरी यांच्या घरापर्यत रस्ता करणे	२४,९१,७२४/-

५	प्रभाग क्र ४ मध्ये सावरकर पुतळ्या जवळचा रस्ता कॉक्रीट करणे	७५,००,०००/-
६	प्रभाग क्र ४ सुशील नांल्या जवळील पूल नव्याने करणे	३०,००,०००/-
७	प्रभाग क्र ७जयश्री हौसिंग सोसायटी ते श्रीमती लताबाई याच्या घरापर्यंत रस्ता करणे.	११,००,००० /-
८	प्रभाग क्र ७ श्री प्रवीण विसपुते यांच्या घरापासून ते सुरेश माणिक चव्हान याच्या घरपर्यंत रस्ता डांबरीकरन करणे.	६,००,,०००/-
९	प्रभाग क्र ७ लालखान किरण दुकाना पासून ते दिगंबर सुकलाल याच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करन करणे .	७,००,०००/-
१०	प्र.क्र ७जमिमा हरुलकला मदरशा ते लक्ष्मी गंगा प्रोव्हिजन पर्यंत रस्ता डांबरी करण करणे.	५,००,०००/-
११	प्रभाग क्र ७ श्री दत्तात्रे भिले यांच्या घरापासून ते पंजाबी याच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	७,००,००० /-
१२	प्रभाग क्र७ विद्या विकास प्राथमिक शाळा ते मयूर भाऊ कोळे राकेश कुलेवार घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९,००,००० /-
१३	प्रभाग क्र ७ डॉ . अहिराव ते अशोक टेलर दुकानं पावतो रस्ता डांबरी करण करणे	७,००,०००/-
१४	प्रभाग क्र ७ जामा मझिद ते साहीदशहा याच्या घरापावतो रस्ता कॉकरेट करणे	१०,००,००० /-
१५	प्रभाग क्र७सार्वजनिक सौचालय ते रमापती चौक पर्यंत रस्ता डांबरी करन करणे	४,००,०००/-
१६	प्रभाग क्र ७ मोगलाई जालीवाला पुलास संरक्षण भिंत बांधणे	१७,००,०००/-
१७	प्रभाग क्र ७ यशवंत जोशी ते आबावाणी घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे	६,,००,००० /-
१८	प्रभाग क्र ७ नायर म्याडम यांच्या घर ते संतोष आग्रवाल पाईप कलवर्ट करणे	१०,००,००० /-
१९	प्रभाग क्र १५ मधील उत्कर्ष कॉलनी येथील श्री . पवार याच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे	१०,००,०००/-
२०	प्रभाग क्र ,१५ अरुणकुमार वैद नगर श्री शिंदे यांच्या घरापासून ते शिंदे ते साक्री रोड पावतो कॉंक्रीट रस्ता करणे	१०,००,०००/-
२१	प्रभाग क्र १५ मित्रकुंज कॉलनी श्री ठामरे(सुरेंद्र डेअरी सोमोरील रस्ता) ते बाघ याच्या घरापर्यंत डांबरी करण करणे	१५,००,००० /-
२२	प्रभाग क्र १५मध्ये महात्माजी नगर, अरुणकुमार वैद्यनगर व इतर भागात रस्ते व गटार करणे	२५,००,०००/-
२३	प्र क्र १५ मध्ये एल.आय.सी कॉलोनी व बाळाप्पा कॉलोनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
२४	प्र क्र १५ मध्ये अशोक नगर भागात रस्ते व गटार करणे.	१५,००,०००/-
२५	प्र क्र १५ मध्ये सुरेश पवार ते किसन गवळी यांच्या घरापर्यंत नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे.	३५,००,०००/-
२६	प्रभाग क्र .१६ मधील सत्य साईबाबा सोसायटी भागात उत्कर्ष क्लास ते सूर्यवंशी घरापर्यंत व खैरनार घरापासून ते मोरे घरापर्यंत व महेंद्र पाटील ते स्वामी समर्थ केंद्र पर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे.	२५,००,०००/-
२७	प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये विजय पाटील घरापासून ते परदेशी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१०,००,०००/-
२८	प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये उषा कुलकर्णी यांच्या घरापासून ते	१०,००,०००/-

	भूषण तवर पर्यंत व संजय बैसाणे ते रॉय घरापर्यंत रस्ता करणे.	
२९	प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये उत्कर्ष क्लास ते सूर्यवंशी घरापर्यंत व खैरनार घरापासून ते मोरे घरापर्यंत व महेंद्र पाटील ते स्वामी समर्थ केंद्र व विजय पाटील घरापासून ते परदेशी यांच्या घरापर्यंत गटार करणे.	२५,००,०००/-
३०	प्रभाग क्र १६. देवचंद नगर बोर्डपासून ते नारायण धालवले रस्ता डांबरी करणे.	१५,००,०००/-
३१	प्रभाग क्र १६ . देवचंद नगर मध्ये श्री चागरे ते राजेंद्र पवार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरी व गटार करणे.	१५,००,०००/-
३२	प्रभाग .क्र १८ . सहजीवन नगर ते लक्ष्मी नगर ला नोडणाटा रस्ता करणे	७,००,०००/-
३३	प्रभाग क्र . १८ जयश्री सोसायटी .समतानगर मागील गत दुध डेअरी पावतो r.c.c पाईप गटार करणे	३०,००,०००/-
३४	प्रभाग .क्र १८ . मोहाडी भागात भावसार याचे घटापासून ते अरुण गावडे तसेच अशोक देवभाने ते बापू याच्या घरापर्यंत जयशंकर कॉलनित R.C.C गटार करणे	६,००,०००/-
३५	प्रभाग क्र . १८ मोहाडी भागात गुलाब भाऊ नगर येथे ते राजेंद्र पटील ते पांडुरंग पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता करणे .	१८,००,०००/-
३६	प्रभाग क्र , १८ मोहाडी गुलाबभाऊ नगर येथे श्री गावडे ते नरेंद्र ठाकूर यांच्या घरपावतो रस्ता करणे	२०,००,००० /-
३७	प्रभाग .क्र १८ मोहाडी भागात कल्पेश गावडे ते विजय गावडे ते बापू ते गुणवंत गावडे ते प्रकाश पवार r.c.c गटार करणे	१९,००,०००/-
३८	प्र क्र ९ मध्ये गायकवाड चौक नंदु सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता व बंदिस्त गटार करणे.	४०,००,०००/-
३९	गायकवाड चौक मुतारी पासून ते नवीन भिलाटी पर्यंत रस्ता गटार करणे	३५,००,०००/-
४०	प्र क्र १३ मध्ये मनोहर टॉकीज पाठीमागील भागातील आंबेडकर चौकात धाम्मदीप बौद्ध विहाराच्या तिन्ही बाजूचे रस्ते कॉक्रीट करणे.	१५,००,०००/-
४१	प्र क्र १३ मध्ये मनोहर टॉकीज पाठीमागील भागातील आंबेडकर चौकापासुन ते भंगार बाजार पर्यंत रस्ता करणे.	२०,००,०००/-
४२	अरुणकुमार वैद्यनगर मध्ये जेष्ठ नागरीकांसाठी शेड बांधणे	५,००,०००/-

प्रशासनाने तात्काळ मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडेस सादर करावा. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक ७६ धुळे मनपा क्षेत्रात डास निमुर्लन कार्यवाहीसाठी ॲबेटींग, फवारणी इत्यादी कामे (पेस्ट कंट्रोल) करणे करिता गुणवत्ता धारक, प्रशिक्षीत संस्था नियुक्त करणे बाबत (डी.पी.आर. तयार करणेसह) आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. संजय जाधव महापौर महोदय, पेस्ट कंट्रोलचा विषय आलेला आहे. आरोग्य विभागाकडुन जे विषय येतात त्यांची पुर्णपणे चाचपणी करावी असे मला वाटते मागच्या दहा वर्षा पुर्वी सुध्दा कुत्र्यांचा विषय होता तो अजुन पर्यंत पेडींग पडलेला आहे. आज पेस्ट कंट्रोलचा विषय आलेला आहे. याबाबत संबंधीतांनी प्राथमिक माहिती द्यावी की पेस्ट कंट्रोल म्हणजे नेमके काय आणि

शहरासाठी याचा काय फायदा होणार आहे. मलेरिया विभागात कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविले आहे.

म. महापौर — पेस्ट कंट्रोल म्हणजे काय आणि ते शहराच्या हिताने कसे उपयोगी आहे आणि याला वार्षिक खर्च किती याबाबत आरोग्याधिकारी यांनी माहिती द्यावी.

म. आरोग्याधिकारी — सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेच्या मलेरिया विभागात एकुण २३ फिल्ड वर्कर, आणि औषधवाटप साठी ३०-३५ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. परंतु आपण ते आऊट सोर्सींग ने करत आहोत. ठेकादाराकडुन जे येणारे कर्मचारी आहेत त्यात काही अशिक्षित असतात म्हणुन हा प्रस्ताव आपण दिलेला आहे. याबाबत जर आपण पुर्ण मनपाच्या माध्यमातुन कार्यवाही करवयाची म्हटली तर जो कर्मचारी वर्गासाठी लागणारा खर्च साधारणत: ४ कोटी ७५ लाख होणार आहे. यामध्ये क्षेत्रफळाच्या दृष्टीने आणि शासनाच्या निकषानुसार हे करण्यात येणार आहे.

म. संजय जाधव — यामध्ये प्रति दिवस किती कर्मचारी ठेकेदारचे कर्मचारी कार्यरत आहेत.

म. आरोग्यधिकारी — आता ८० कर्मचारी कार्यरत आहेत आपण त्यांना ३७७ प्रमाणे रोज देत आहोत.आपल्याला जो ठेका द्यावयाचा त्यामध्ये नंतर यामध्ये ऑडीट आक्षेप होईल. यासाठी शासनाकडुन ६० लाख अळीनाशकांसाठी खर्च होत होता.आता साधारणत: यासाठी ४० लाख खर्च येईल यामध्ये दर वर्षी याची जाहिरात किंवा बाबी आहेत त्यानंतर १ कोटी ७७ लाख जो आपल्याला शासनाकडुन येतात. पण इतर कर्मचारी जर आपण भरले ते आपल्याला पुर्णत: याबाबतची ॲक्टीव्हीटीसाठी लागणारे प्रशिक्षित कामगार यामध्ये असणार आहेत. पेस्ट कंट्रोल चे कामे करणारी एजन्सी मार्फत आपण मलेरीया विभागाची ही कार्यवाही करणार आहोत. आणि त्यासाठीचा हा प्रस्ताव आहे. जेणेकरुन प्रशिक्षीत कामगारांकडुन सर्व्हे करुन आवश्यक काय त्यापध्दतीने ॲक्टीव्हीटी आणि कर्मचारी किती लागणार आहेत याचा डी.पी.आर करण्याअगोदर सर्व्हे करावयाचा आहे.ज्यानुसार ऑफर वेंगरे पुढच्या गोष्टींची आपण विचारणा करु. यामध्ये आपण जी ॲक्टीव्हीटी घेणार आहोत त्यात फक्त मनुष्यबळच नाही तर यासाठी लागणारे औषधे आणि उपकरणे सुध्दा आपण काम करणाऱ्या संस्थेकडुन घेणार आहोत.

म. संजय जाधव — कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र जमा केले आहेत का?

म. आरोग्याधिकारी — कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी घेतली आहे.

म. सुनिल बैसाणे — पेस्ट कंट्रोल म्हणजे नेमके काय?

म. आरोग्याधिकारी — पेस्ट कंट्रोल सेवा देणा-या एजन्सीमार्फत आपण मलेरीयाविभागाची जी कार्यवाही करणार आहोत त्या संदर्भाचा हा प्रस्ताव आहे.पेस्ट कंट्रोल म्हणजे यामध्ये घर स्तरावर जी अळीकिड निर्माण होते त्यावर नियंत्रण करावयाची कार्यवाही आहे. यामध्ये आपण प्रशिक्षीत कामगार घेणार आहोत जी तांत्रीक दृष्टया आजारांवर आळा घालण्यासाठी फायदा होणार आहे.

म. संजय जाधव — यामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे ई.पी.एफ कापले जातात का?

म. आरोग्याधिकारी — कर्मचाऱ्यांचे ई.पी.एफ कापले आहेत आणि काही कर्मचाऱ्यांचे राहीले असतील तर आपण त्यासाठी कार्यवाही करत आहोत.

म. संजय जाधव — मी आयुक्त साहेबांना याबाबत पत्र दिलेले आहे.आस्था संस्थेचे जेवढे बीले आहेत तेवढी रोखण्यात यावी.

म. सुनिल बैसाणे — महापौर महोदय यात रजिष्ट्रेशन असणारी संस्थाच यासाठी लायेबल असु शकते कारण यामध्ये आपण वर्षासाठी ३.५ कोटी रुपये खर्च करणार आहोत तर यामध्ये कर्मचारी नियुक्ती कश्या पध्दतीने होणार आहे रजिष्ट्रेशन कराणारी संस्थाच यासाठी लायेबल असु शकते कारण यात

केमिकलचा वापर आहे आणि ते वापरण्यासाठी संबंधीतांकडे परवाना असणे आवश्यक आहे.आणि याची कार्यवाही घर स्तरावर होणे गरजेचे आहे. विषय मंजुर करणेत यावा.

म. महापौर सदरचा प्रस्ताव हा धुळे शहरासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे शहरात परिणामकारक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने डांस निर्मूलन व नियंत्रणद्वारे साथीच्या रोगांचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ॲबेटींग, फवारणी व इत्यादी अनुषंगिक कामे करण्याकरिता शासन निर्णय दि. १ डिसेंबर २०१६ च्या निर्देशाप्रमाणे EOI पध्दतीने गुणवताधारक, प्रशिक्षीत आणि नोंदणीकृत संस्था नियुक्त करणेस (डी.पी.आर. तयार करणेसह) मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत उपमुख्यलेखापरिक्षक यांनी प्रस्तावासंदर्भात १ ते २० मुद्दे निहाय अभिप्राय नोंदविलेले असून सदर अभिप्रायांतील नमूद मार्गदर्शक निर्देशाप्रमाणे कार्यवाहीची पूर्तता करुन नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९८ दिनांक ३१/१२/२०१९

धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरी हिवताप योजने अंतर्गत उपलब्ध कर्मचा-यांकडुन फवारणी,अबेर्टींग,फॉगींग व गप्पी मासे सोडणे इ. कामे करुन घेण्यात येतात, कर्मचारी संख्या पुरेसी नसल्याने शासन निर्देशाप्रमाणे दर ७ दिवसाने फवारणी व दर ७ दिवसाने अबेर्टींग करणे शक्य होत नसल्याने दर वर्षी मोठया प्रमाणावर डासांचा प्रदुर्भा होवुन डेंग्यु,चिकुनगुन्या व मलेरिया सारख्या आजारांचे रुग्ण आढळुन येत असतात.

धुळे शहराचा विस्तार आणि लोकसंख्येत वाढ पहाता इकडील कार्यालयात कामगार पुरेसे नसल्याने मे.स्थायी समितीच्या ठराव क्र.३८ दि.२८/६/२०१७ नुसार खाजगी ठेकेदारामार्फत कामगार पुरविण्यात येतात. त्यात प्रति कामगार प्रति दिवस रु.३७७.१२ या दराप्रमाणे कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेकडुन ७५ कामगार पुरविण्यात येत आहे. सदरचे कामगारांकडुन शहरात नागरी हिवताप योजनेअंतर्गत फवारणी अबेर्टींग व फॉगींग इ. कार्यवाही करण्यात येत आहे.

नागरी हिवताप योजनेसाठी गेल्या ६/७ वर्षा पासुन ठेकेदारांमार्फत कामगार घेण्यात येत आहे. परंतु सदर ठेकेदारामार्फत अप्रशिक्षित व कमी शिकलेले कामगार पुरविण्यात येत असल्याने परिणामकारक व गुणवत्तापुर्ण काम होत नाही. सदरचे कामावर पर्यवेक्षणासाठी इकडील कार्यालयाचे फिल्ड वर्कर यांना प्रभारी SFW चे काम सोपविले आहे परंतु त्यांचेकडुन पर्यवेक्षणाचे काम समाधानकारक होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

आपले शहरात उघडया गटारी असल्याने क्युलेक्स डासांचे प्रमाण जास्त आहे. तसेच पाणी पुरवठा मार्फत नागरीकांना दर ५/८ दिवसाने पाणी पुरवठा होत असल्याने नागरीक मोठया प्रमाणावर पाणी साठवतात. सदर घर स्तरावर साठवलेल्या पाणी साठयात Edes Egypty डासाची निर्मिती होत असल्याने नागरीकांना डेंग्यु/चिकुनगुन्या सारखे आजारांना समोर जावा लागतो. सदर घर स्तरावरील पाणी साठयांचे नियमित तपासणी व औषधोपचार होणे आवश्यक असते.

वरील परिस्थिती व कर्मचा-यांची कमतरता पहाता यादृष्टीने शास्त्रोक्तपध्दतीने (भौतिक, रासायनीक व जैवीक) एकात्मीक डांस नियंत्रण उपाययोजना राबविणे कामी गुणवत्तापुर्ण व परिणामकारक सेवा देणा-या एजंन्सी मार्फत मनपा क्षेत्रात फवारणी, अबेर्टींग,फॉगींग व गप्पी मासे सोडणे व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी संस्था नेमल्यास वरील कार्यवाही गुणवत्तेनुसार होईल. सदर एजंसीकडे तज्ञ निरिक्षक, प्रशिक्षित SFW व फिल्डवर्कर अशी पुर्ण टिम उपलब्ध करुन घेतल्यास डेंग्यु, मलेरिया, चिकुनगुन्या

इ.किटकजन्य साथरोग आजारावर आळा बसेल व भविष्यात त्यामुळे होणारे गंभीर परिणाम व मृत्यु टाळण्यास मदत होईल.

आपल्या मनपा क्षेत्रचे क्षेत्रफळ१०१.०८चौ.कि.मि.आहे. केंद्र शासनाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दिलेल्या निकषा नुसार खालील प्रमाणे कर्मचारी आवश्यक आहे.

केंद्र शासनाचा निकषा खालील प्रमाणे आहे.

अ) अळीनाशक फवारणीसाठी महानगरपालिकेचे क्षेत्रफळ प्रत्येक वार्ड २५.६ चौ.कि. मि. (१० चौ.मैल) असतो.

ब) प्रत्येक वार्ड १० सेक्टरमध्ये विभागलेला असुन प्रत्येक सेक्टर २.५६ चौ.कि.मि. (१ चौ.मैल) असतो.

१) एका सेक्टरसाठी १२ महिन्या करिता लागणारा कर्मचारी वर्ग.वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी -१ (२) क्षेत्र कर्मचारी -२ (अळीनाशक फवारणीसाठी)

(३) क्षेत्र कर्मचारी (किरकोळ अभियांत्रिकी कामासाठी)

धुळे महानगरपालिकेचा एकुण क्षेत्रफळ - १०१.०८ चौ.कि.मी.

२५.६ चौ.कि.मि. प्रमाणे एकुण वार्ड - ०४

२.५६ चौ.कि.मि. प्रमाणे एकुण सेक्टर -३९.४८

धुळे महानगरपालिकेसाठी केंद्र शासनाच्या निकषानुसार खालील प्रमाणे कर्मचारी आवश्यक आहे.

मलेरिया निरिक्षक -४

वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी (SFW)-४०

क्षेत्र कर्मचारी (फिल्ड वर्कर)-१२०

एकुण १४४ कर्मचारी मधुन मनपा चे २३ कर्मचारी वगळुन १२० कर्मचारी घेण्यात येईल.

शहरात या कार्यवाही करिता वरिल निकषनुसार पदे अपेक्षित आहे. सदरची पदे भारणे बाबत म.सह संचालक, आरोग्य सेवा (हिवताप,हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे-६ कार्यालयाकडे मागणीपत्र सादर करण्यात आलेला आहे.अद्याप पावेतो निर्णय नाही. (सोबत प्रस्तावाची प्रत जोडली आहे.)

सदयास्थितीत कर्मचा-यांची कमतरता पहाता शहरात डासांमार्फत पसरणाऱ्या आजारावर आळा घालण्याकामी अत्याधुनिक पध्दतीने परिणामकारक कार्यवाहीची सेवा देणा-या एजंन्सी मार्फत ई-निविदा मागवुन त्यांचेकडुन वरीलनुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

महानगरपालिका कडे सदयास्थितीत शासनाकडुन प्राप्त तसेच स्थानिक स्तरावर खरेदी केलेले आषधे संपल्यानंतर औषध साठा, मशीन/फवारणी पंप, धुराळणी (फॉर्गोंग) साठी लागणारे इंधन इ. सर्व जबाबदारी निविदाधारकावर असेल.

सदयास्थिती जे एजंसी कामगार पुरवित आहे त्याला एकमहिन्याचा खर्च रु.७,००,०००/- ते ७,५०,०००/-असुन वर्षाला ८४ लाख ते ८७ लाख पर्यंत आहे. पेस्ट कंट्रोलची सेवा देणारी एजंसी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार दर देईल.शहरात डासांचे निर्म्रलन व नियंत्रण करण्यासाठी अंदाजीत खर्च वर्षाला खालील प्रमाणे असु शकतो. मनुष्यबळकिमान वेतन कायदयानुसार मनपाकडे असलेया रोजंदारीदरानुसार ५८१=०० दरानुसार १२० कामगारांना अंदाजे वर्ष भरासाठी - रु. २,१७,५२,६४०=०० अळीनाशक खरेदी, जनहितार्थसाठी जाहीरात करणे, हस्तपत्रके छापणे,इत्यादी साठी खर्च-रु.५०,००,०००=०० वाहन लावणे १ वर्षातुन ६ महिन्यासाठी अंदाजीत खर्च

रु४०,००,०००=०० एकुण अंदाजीत खर्च १ वर्षासाठी रु ३,०७,५२,६४०=००असे येणार आहे. सविस्तर माहितीचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

सन २०१९-२० मध्ये मलेरिया कामगार पुरविणे या शिर्षकावर रु. ५२ लाख मात्र तरतुद असुन त्यातील मागील खर्च वजा जाता रु ४,३५,२७३/- मात्र शिल्लक आहे.

मलेरिया विभागांतर्गत डास निमुर्लन व नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत अशा प्रकारची सेवा देणा-या एजन्सी मार्फत दि. १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयातील EOI पध्दतीने कार्यवाही होणे आवश्यक असल्याने त्याकरीता टिपणीत नमुद नुसार अंदाजीत खर्च रु. ३,०७,५२,६४०/- मात्र नमुद केला आहे.

शहरातील अत्याधुनिक पध्दतीने डासांवर आळा बसविण्याकामी एका वर्षासाठी अंदाजीत खर्च रुपये ३ कोटी ते ३.५० कोटी पर्यंत येऊ शकतो..

उक्त अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा विचारात घेता सदरचा प्रस्ताव हा धुळे शहरासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे शहरात परिणामकारक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने डांस निर्मूलन व नियंत्रणद्वारे साथीच्या रोगांचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ॲबेर्टींग, फवारणी व इत्यादी अनुषंगिक कामे करण्याकरिता शासन निर्णय दि. १ डिसेंबर २०१६ च्या निर्देशाप्रमाणे EOI पध्दतीने गुणवताधारक, प्रशिक्षीत आणि नोंदणीकृत संस्था नियुक्त करणेस (डी.पी.आर. तयार करणेसह)मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत उपमुख्यलेखापरिक्षक यांनी प्रस्तावा संदर्भात १ ते २० मुद्दे निहाय अभिप्राय नोंदविलेले असून सदर अभिप्रायांतील नमूद मार्गदर्शक निर्देशाप्रमाणे कार्यवाहीची पूर्तता करुन नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७७ शहर स्वच्छतेकामी मनपा मार्फत १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत विविध वाहने व मशिनरी खरेदी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय, सदर विषयात वाहने व मशीन खरेदी बाबत अहवाल आलेला आहे. यामध्ये आपण एक मशीन खरेदी केले तर शहराचे काम होणार नाही आणि ही मशीन घेतल्यानंतर ती टेक्नीकल मानसाने चालविले पाहिजे. त्यामधील स्पेअर चे मेन्टेनंन्स मला नाही वाटत की महानगरपालिकेला पेलविले जाईल. शहरासाठी कमीत-कमी ४ मशीन तरी खरेदी करावे लागतील. या मशीनचे रोजचे मेन्टेनंन्स,ऑपरेटींग, कॉस्टटाईम ऑपरेटींग या सर्व टेक्नीकल गोष्टी आहेत त्या धुळे महापालिकेकडुन शक्य होतील असे मला वाटत नाही आणि मशीन खरेदीचे ६५ लाख रु.आपले वाया जातील असे मला वाटते.

म. शितल नवले महापौर महोदय मी रोडकॉन्ट्रक्टर मध्ये आहे आणि त्यात काम करतो यामध्ये कमी रेटचे सोल्युशन पण आहे. फक्त २ लाख रुपयांचे स्वीपींग येते ते ट्रॅक्टरला जोडले तर तिनशे मायक्रोन म्हणजे १ ml पेक्षा कमी सुध्दा धुळ त्याच्याने स्वच्छ होणार आहे. त्यामध्ये फक्त ते मशीन ट्रॅक्टरला जोडणे असे २ लाखांचे ४मशीन जरी खरेदी केले आणि यासाठी लागणारे ट्रॅक्टर भाड्याने किंवा रोजंदारीवर घ्यावयाचे नाही. ज्याचे मीटर चालु असेल ते ६ तास जरी चालले तरी रस्ते स्वच्छ होतील हे एक संस्थेच्या वतीने एक मशीन आपण सुचवावे असे मला

वाटते.यामध्ये जर आपण कॉम्प्यांक्टर समाविष्ट करता आले तर घंटागाड्यांचा फेरा वाचेल.आणि आपल्याला पुढे कलेक्शन सेंटरही करावयाचे आहे तर कमीत कमी २ तरी मशीन खरेदी करण्यात यावे म्हणजे मनपाच्या दृष्टीने योग्य होईल.

म. महापौर

सन्मा सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार सद्यस्थितीत 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्वावर 1 रोड स्विपर मशिन व 2 जे.सी.बी. मशिन तसेच 2 छोटे मिनी टॅक्ट्रर व 3 मोठे टॅक्टरर ट्रॉलीसह व 5000 लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर तसेच आवश्यक क्षमतेचे रेफ्युज, कॉम्प्यॅक्टर 2 नग खरेदी करण्यांस व दर मागविण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर साहित्य तथा वाहने शासनाच्या निर्देशाप्रमाणे जी.एम. पोर्टलवरुन तांतडीने खरेदी करावी तसेच जी.एम. पोर्टलवर जे साहित्य तथा वाहने उपलब्ध होणार नाही ते साहित्य तथा वाहने खुल्या बाजारातून खरेदीबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ९९ दिनांक ३१/१२/२०१९

आरोग्य विभागाकडील कार्यालयीन अहवालानुसार शहरात कचरा संकलन करणेकामी तसेच कच-यांच्या संकलना ठिकाणी कच-यांचे निराकरण करणेकरिता 5 नग ट्रॅक्टरची मागणी केलेली आहे.

तसेच कचरा गोळा करणे व रस्ते स्वच्छ करणे यासाठी 1 रोड स्विपर मशिन खरेदी करणेची मागणी केलेली आहे.

सन्मा.सदस्यांची व नागरीकांची वाढती मागणी लक्षांत घता 2 जेसीबी मशिन खरेदी करण्याची मागणी केलेली आहे.सदर मशिनरी या शहराच्या स्वच्छतेबाबत निगडीत आहेत.

या संदर्भात सन्मा.पदाधिकारी व खातेप्रमुखांच्या बैठकीतही सदर मशिनरी वाहने तात्काळ खरेदी करणेबाबत वारंवार आदेशित केलेले आहे. मनपाची आर्थिक स्थिती लक्षांत घेता सदरची वाहने मनपा निधीतून तात्काळ खरेदी करणे शक्य नाही. तथापि सदर वाहनाची व मशिनरीची निकड व गरज लक्षात घेता सदर मशिनरी व वाहनाची खरेदी 14 व्या वित्त आयोगाच्या शासकीय निधीतून खरेदी करावयाची आहे. घनकच-याचे संकलन व वाहतूक व त्यावरील प्रक्रिया यासाठी 14 व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून मुलभूत कामे महानगरपालिका यांना खर्च करण्यास अनुज्ञेय राहील असे नमूद केलेले आहे.त्याच प्रमाणे अशा कार्यवाहीस मे. महासभेची सर्वसाधारण शिफारस आवश्यक आहे.

सदर मशिनरी व वाहने 14 व्या वित्त आयोगाच्या योजनेच्या अनुदानातून खरेदीसाठी मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत आला असता सन्मा सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार सद्यस्थितीत 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्वावर 1 रोड स्विपर मशिन व 2 जे.सी.बी. मशिन तसेच 2 छोटे मिनी टॅक्ट्रर व 3 मोठे टॅक्टरर ट्रॉलीसह व 5000 लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर तसेच आवश्यक क्षमतेचे रेफ्युज कॉम्प्यॅक्टर 2 नग खरेदी करण्यांस व दर मागविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर साहित्य तथा वाहने शासनाच्या निर्देशाप्रमाणे जी.एम. पोर्टलवरुन तांतडीने खरेदी करावी तसेच जी.एम. पोर्टलवर जे साहित्य तथा वाहने उपलब्ध होणार नाही ते साहित्य तथा वाहने खुल्या बाजारातून खरेदीबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-७८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूचि ड, प्रकरण-२, नियम १ के नुसार मा. आयुक्त सो. यांच्या मार्फत धुळे शहराला ODF++ दर्जा प्राप्त होणेसाठी मे.महासभेत प्रस्ताव निर्णयार्थ सादर .

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सूचित करु इच्छितो की, शहरातील सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्ती तथा नुतनीकरणाबाबत सर्व प्रथम आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यांत यावी.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने धुळे शहरास ODF++ दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देणेत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०० दिनांक ३१/१२/२०१९

देशातील सर्व शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता या शहरांना स्वच्छतेची आणि या शहरांमधील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देवुन हे ध्येय गाठण्यासाठी केंद्र शासन, दिनांक २ ऑक्टोंबर २०१४ पासुन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनापर्यंत म्हणजे दिनांक २ ऑक्टोंबर-२०१९ पर्यंत स्वच्छ भारत अभियन (नागरी) संपुर्ण देशामध्ये राबवितआहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियन (नागरी) च्या धर्तीवर क्रमांक १ येथील दिनांक १५ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी करुन राज्याचा नागरी भाग हा दिनांक १ ऑक्टों. २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला असुन या शहरांच्या हागणदारी मुक्त दर्जामध्ये सातत्य रहावे व शहरांतील कुटुंबांना शौचालयाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने आता या सर्व शहरांना ODF+ व ODF++ दर्जा प्राप्त करावयाचा आहे.

शासन निर्णयानुसार दि.२ ऑक्टों.२०१९ पर्यंत ODF+ हा दर्जा मिळविण्यासाठी उद्दीष्ट देण्यात आले होते. त्याअनुषंगाने आपला शहर दि.२ऑगस्ट-२०१९ रोजी ODF+चा दर्जा प्राप्त करण्यात यशस्वी झाले आहे.

यापुढे राज्यातील नागरीकांना शौचालयाचा चांगल्या सुविधांसह शहरांमधील शौचालयाच्या सेप्टीक टँक मधील मैलाचे सुरक्षितता व नियमीत व्यवस्थापन करुन त्यावर प्रक्रिया करुन या शहरांना ODF++ दर्जा प्राप्त करणे आवश्यक आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त करतांना ज्या शहरांमध्ये शौचालय मलनिसा:रण व्यवस्थीत जोडण्यात आले आहे त्या शौचालयमधील मैल्यावर संबंधीत शहरातील मलनिसा:रण प्रक्रिया(STP)होत आहे.परंतु शहरातील ज्या भागांमध्ये/ज्या शहरांमध्ये मलनिस:रण व्यवस्था उपलब्ध नसल्याने जी शौचालये सेप्टीक टँकला जोडण्यात आली आहेत अशा भागातील / शहरांतील शौचालयांच्या सेप्टी टँक मधील मैला सुरक्षित व नियमित व्यवस्थापन व प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने त्यासाठी राज्य शासनातर्फे कमी वेळेत उभारता येईल असे Sludge Dying Bed हे तंत्रज्ञान निवडुन त्याच्या बांधणीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार धुळे महानगरपालिकेने Sludge Dying Bed चे काम सुरु केले आहे.

तसेच ओडीएफ ++ दर्जा प्राप्त करण्यासाठी पुढील प्रमाणे कारवाई सुरु आहे.

अ)शहरातील २५% सार्व.शौचालय बेस्ट टॉयलेट श्रेणीतील सुविधांची उपलब्धता करण्यात आली आहे.

ब)वैयक्तीक व घरगुती शौचालयच (IHHL)चे online पोर्टलवर मंजुर शौचालय पुर्णपणे बांधकाम झाले आहे.

क)शहरात ओडीएफ++दर्जा प्राप्त करण्यासाठी स्थानीक वृत्तपत्रात अधिसुचना देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण२अन्वये नियम १(के) नुसार सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर करण्यांत आलेला असता सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने धुळे शहरास ODF++ दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देणेत येत आहे. या संदर्भातील शासन निर्देशानुसार अंमलबजावणी करणेस व त्या बाबतचे निर्णय घेण्यांचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.१७ जानेवारी २०२० रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
शुक्रवार दिनांक १७ जानेवारी, २०२०
वेळ दुपारी ४-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क) (ड) व (ह) अन्वये मा.महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष महासभा आज शुक्रवार दिनांक १७/०१/२०२० रोजी दुपारी ४-००मा.**श्री.चंद्रकांत मधुकर सोनार महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	दुपारी ४-०० वाजतां
२	मा. सौ.अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
४	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
५	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
७	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
८	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
९	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१०	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
११	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१३	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१४	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१५	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१६	सौ. पाटील ज्योस्त्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
१७	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१८	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१९	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२०	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२२	श्रीमती.उदासी कर्शीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२३	श्रीमती.कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------

२४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२५	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२६	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
२७	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२९	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३०	श्रीमती.जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३१	श्रीमती.बराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३२	श्री. सोनार देवेद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
३४	श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
३५	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३६	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३७	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
३८	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३९	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
४०	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
४१	श्रीमती. शेख मेहरुन्नीसा जाकीर	सदस्या	----------" ---------
४२	श्रीमती. अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
४३	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
४४	श्रीमती.जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
४५	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
४६	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
४७	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४८	श्री. जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
४९	श्रीमती. बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
५०	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
५१	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
५२	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
५३	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
५४	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
५५	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
५६	श्रीमती. अग्रवाल सारिका प्रविन	सदस्या	----------" ---------
५७	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५८	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५९	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
६०	श्री. महाले सिंदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६१	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

६२	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६३	श्री. शिंदे सोनल दिलीप	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	दुपारी ४-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	सहा. आयुक्त	----------" ---------
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------
५	श्री. प्रकाश सोनवणे	नगररचना ओव्हरसिअर	----------" ---------
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
७	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
८	श्री. रजमान अन्सारी	वरिष्ठ सहाय्यक आस्थापना	----------" ---------
९	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ---------
१०	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
११	श्री. गितेश सोनार	विद्युत विभाग	----------" ---------
१२	श्री. एस.एन. देसले	लिपीक मनपा शि.मं.	----------" ---------
१३	श्री. राजू माईनकर	भांडारपाल	----------" ---------
१४	श्री. विशाल निंबाळकर	अभिलेखापाल	----------" ---------
१५	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
१६	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित मा.उपायुक्त सो.उपमहापौर, सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस मा.आयुक्त सो.हे महत्वाच्या कार्यालयीन कामकाजासाठी बाहेरगांवी जात असल्याने आजच्या महासभेसाठी त्यांनी उपायुक्त श्री. गिरी सो. यांना प्राधिकृत केले असल्याचे पत्र नगरसचिव यांनी सभागृहास वाचून दाखविले व उपायुक्त श्री.गिरी सो.यांनी आयुक्तांचे आसन ग्रहन करणेबाबत सूचित केले.

नगरसचिव महासभेच्या प्रारंभी सभागृहासमोर विदीत करु इच्छितो की, धुळे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं. ५ ब च्या सन्मा. सदस्या सौ. हेमा अनिल गोटे यांनी आपल्या सदस्य पदाचा रजिनामा दिनांक १४/०१/२०२० रोजी मा.आयुक्त साहेब यांच्याकडेस सादर केलेला आहे.सदर राजिनामापत्रात वैयक्तीक कारणास्तव राजिनामा देतअसल्याचे नमूद केले आहे. सदर राजिनामापत्र मा.आयुक्त यांनी स्विकृत केलेले असून या बाबत अहवाल म.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडेस सादर करण्यांत आलेला आहे.सदर बाब व माहिती सभागृहाच्या माहितीस्तव सादर करण्यांत येत आहे.

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्या सर्वश्री.भामरे वंदना संजय, सोनार सुनिल वसंतराव, महाले कल्पना सुनिल, खोपडे दिपक सुरेश,पिंजारी मिदीना समशेर इ. यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०१ दिनांक१७/०१/२०२०

सन्मा. सदस्या सर्वश्री. भामरे वंदना संजय, सोनार सुनिल वसंतराव, महाले कल्पना सुनिल, खोपडे दिपक सुरेश, पिंजारी मिदीना समशेर यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

तरी सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :- ७९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(५) मधील तरतुदीनुसार निवृत्त होण-या सदस्यांच्या जागी नवीन(८)आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे.

म. नगरसचिव

नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) मधील तरतूदीनुसार स्थायी समितीचे निम्मे सदस्य (८ सदस्य) दिनांक १/२/२०२० रोजी दुपारी निवृत्त होत आहे. तसेच कलम २० (४) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार दिनांक ०९/०१/२०२० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत **धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७अन्वये** खालील नमूद केलेल्या सदस्याच्या नावाची चिठ्ठी निघाल्याने हे सदस्य०१/०२/२०२० रोजी दुपारी निवृत्त होणार आहेत.

अ.क्रं.	नांव	पक्ष
१	उगले सुरेखा चंद्रकांत	भारतीय जनता पार्टी
२	बोरसे नागसेन दामोदर	भारतीय जनता पार्टी
३	भिल संजय शत्रुघ्न	भारतीय जनता पार्टी
४	अन्सारी सईदा म. इकबाल	एमआयएम
५	शेख शाहजहान बी बिसमिल्ला	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
६	बागुल लक्ष्मी दिनेश	भारतीय जनता पार्टी
७	पाटील रावसाहेब आनंदराव	भारतीय जनता पार्टी
८	जगताप सुभाष सुकलाल	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस

तसेच स्थायी समितीत कायम राहिलेल्या ८ सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे आहे.

अ .क्रं	नांव	पक्ष
१	पाटील विमलबाई गोपीचंद	भारतीय जनता पार्टी
२	सोनार सुनिल वसंतराव	भारतीय जनता पार्टी
३	खताळ संतोष छगन	भारतीय जनता पार्टी
४	देवरे सुरेखा भागवत	भारतीय जनता पार्टी
५	पाटील युवराज चैत्राम	भारतीय जनता पार्टी
६	उबासी कशिश गुलशन	भारतीय जनता पार्टी
७	मन्सुरी मुख्तार कासिम	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी

स्थायी समितीचे ८ सदस्य दिनांक १/२/२०२० रोजी निवृत्त होणार असल्याने स्थायी समितीवर रिक्त होणा-या जागी नवीन ८ सदस्यांची तत्पूर्वी नियुक्ती करणे आवश्यक आहे.

यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम २०(५) नुसार पुढील प्रमाणे तरतूद आहे.

महानगरपालिकेने पोट कलम (३) मध्ये विनिदिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्याच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे अशी तरतूद आहे.

शासन परिपत्रक जा.क्रं.संकिण २००८/२७६ /प्र.क्र. १३/ नवि-३१ दिनांक १५ जुलै २००८ नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या पत्रानुसार स्थायी समिती सदस्यांच्या रिक्त होणा-या जागा भरण्याबाबत जे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यता प्राप्त पक्षांचे, गटाचे आघाडीचे किंवा फ्रंटचे आहेत त्याच मान्यता प्राप्त पक्षांचे नोंदणीकृत पक्षाचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेत पक्षांचे /गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.जेणे करुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुर्दीची पूर्तता होऊ शकेल असे नमूद आहे.

शासन परिपत्रक जा.क्रं.संकिण २००८ /२७६ /प्र.क्र.१३/ नवि-३१ दिनांक १५ जुलै २००८ नुसार ज्या पक्षांचे सदस्य निवृत्त झालेले आहे त्याच पक्षाचे सदस्य समितीवर नियुक्त करणे अद्यारुत असल्याने नवीन ८ सदस्य नियुक्तीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २० (५) नियुक्ती करावयाची आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (५) मधील तरतुदीनुसार निवृत्त होण-या सदस्यांच्या जागी नवीन (८) आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे यासंदर्भात दिनांक १५/०१/२०२० रोजी सकाळी ११-३० वाजतां मा. महापौर सो दालनात सभागृहनेते, विरोधी पक्षनेते व सर्व गटनेत्यांची बेठक घेण्यांत येवून त्यामध्ये अधिनियमातील तरतुदी व शासन परिपत्रकाची माहिती देण्यांत आली व ज्या पक्षाचे जितके सदस्य स्थायी समिती मधून कमी झाले त्याच पक्षाचे तितके सदस्य त्या पक्षाच्या गटनेत्यांनी नामनिर्देशित करणेबाबत सूचित करण्यांत आले. त्यानुसार विविध पक्षाच्या गटनेत्यांकडून स्थायी समितीवर ८ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत पत्र सादर झालेले आहे. ते मा. महापौर सो यांचेकडेस सुपुदर् करण्यांत येत आहे.

मा. महापौर सो. त्यानुसार खालील प्रमाणे गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे .

१) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	पठाण हिना अस्लम

२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	देवरे कमलेश नारायण

३) एम.आय. एम.पक्षाच्या गटनेत्या श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	सईद बेग हाशम बेग

४) भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती वालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ५ सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	माळी भारती अशोक
२	बैसाने सुनिल तुळशिराम

३	पाटील मंगला सुरेश
४	बोरसे पुष्पा प्रकाश
५	मासुळे अमोल पावबा

वरील प्रमाणे स्थायी समिती सदस्य पदासाठी गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या ८ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०२ दिनांक १७/०१/२०२०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(५) मधील तरतुदी नुसार निवृत्त होण-या सदस्यांच्या जागी नवीन (८) आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे करणे यासंदर्भात दिनांक १५/०१/२०२० रोजी सकाळी ११-३० वाजतां मा.महापौर सो दालनात सभागृहनेते, विरोधी पक्षनेते व सर्व गटनेत्यांची बेठक घेण्यांत येवून त्यामध्ये अधिनियमातील तरतुदी व शासन परिपत्रकाची माहिती देण्यांत आली व ज्या पक्षाचे जितके सदस्य स्थायी समिती मधून कमी झाले त्याच पक्षाचे तितके सदस्य त्या पक्षाच्या गटनेत्यांनी नामनिर्देशित करणेबाबत सूचित करण्यांत आले.त्यानुसार विविध पक्षाच्या गटनेत्यांकडून स्थायी समितीवर ८ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत आज दिनांक १७/०१/२०२० रोजी पत्र सादर झालेले आहे.

अ.क्रं	नांव	पक्ष
१	माळी भारती अशोक	भारतीय जनता पार्टी
२	बैसाने सुनिल तुळशिराम	भारतीय जनता पार्टी
३	पाटील मंगला सुरेश	भारतीय जनता पार्टी
४	बोरसे पुष्पा प्रकाश	भारतीय जनता पार्टी
५	मासुळे अमोल पावबा	भारतीय जनता पार्टी
६	देवरे कमलेश नारायण	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
७	पठाण हिना अस्लम	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
८	सईद बेग हाशम बेग	एम.आय.एम

वरील प्रमाणे ८ सदस्य स्थायी समिती सदस्य पदी नामनिर्देशित करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३०(१)व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदी नुसार महिला व बालकल्याण समितीवर मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा(११)महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व टिपणीचे वाचन केले.

धुळे महानगरपालिकेची दिनांक २/२/२०१९ रोजी महासभा होऊन धुळे मनपा ठराव नंबरक ०६ दिनांक२/२/२०१९अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमर्तील कलम ३०(१) नुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेसाठी कलम ३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून खालील अकरा (११)

महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यांत आलेली होती.

यापूर्वी धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५ दिनांक ३१/१/२००९ नुसार समिती गठीत करणेसाठी ११ सदस्यांची संख्या व एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित करण्यांत आलेला आहे.

महिला बालकल्याण समितीच्या वरील ११ सदस्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ दिनांक १/२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका कलम ३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्यावळ लक्षांत घेवून अकरा (११) महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

पक्षीय संख्याबळानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे महिला बालकल्याण समितीवर ११ सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागेल.

१)भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका	८
२)नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी	१
३)भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस	१
४)ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष	१

कलम ३०(१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीच्या ११ सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे आवश्यक आहे.

म.महापौर **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३०(१) व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदी नुसार महिला व बालकल्याण समितीवर मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा(११)महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेसंदर्भात** दिनांक १५/०१/२०२० रोजी झालेल्या गटनेत्यांच्या बैठकी अधिनियमातील तरतूदींची माहिती देण्यांत आली आहे. त्यानुसार महिला बालकल्यण समिती सदस्य पदासाठी गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे

१) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	अन्सारी हमीदाबी निसार अहमद

२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	चौधरी मंगल अर्जून

३) एम. आय. एम. पक्षाच्या गटनेत्या श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	नाजिया बानो निसार खान पठाण

४) भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती वालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ८ सदस्यांची नांवे महिला बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	भिल निंबाबाई फुलसिंग
२	जाधव स्नेहल मनोज
३	वराडे वैशाली भिकन

४	बागुल लक्ष्मी दिनेश
५	जाधव शंकुतला शंकर
६	सोनवणे रेखा नंदु
७	बागुल योगिता प्रशांत
८	थोरात वंदना विक्रम

वरील प्रमाणे महिला बालकल्याणसमिती सदस्य पदासाठी गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या सदस्यांची बालकल्याण् समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०३ दिनांक १७/०१/२०२०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३०(१)चे तरतुदीनुसार महिला बालकल्याण समिती गठीत करुन तसेच कलम ३१(अ(१) व (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवून तसेच दिनांक १५/०१/२०२० रोजी झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आज दिनांक १७/०१/२०२० रोजी विविध पक्षांच्या गटनेत्यांकडून नावे लेखी पत्राव्दारे प्राप्त झालेले आहेत.

अ.क्रं	सदस्यांचे नांव	पक्ष
१	भिल निंबाबाई फुलसिंग	भारतीय जनता पार्टी
२	जाधव स्नेहल मनोज	भारतीय जनता पार्टी
३	वराडे वैशाली भिकन	भारतीय जनता पार्टी
४	बागुल लक्ष्मी दिनेश	भारतीय जनता पार्टी
५	जाधव शंकुतला शंकर	भारतीय जनता पार्टी
६	सोनवणे रेखा नंदु	भारतीय जनता पार्टी
७	बागुल योगिता प्रशांत	भारतीय जनता पार्टी
८	थोरात वंदना विक्रम	भारतीय जनता पार्टी
९	चौधरी मंगल अर्जून	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
१०	अन्सारी हमीदाबी निसार अहमद	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
११	नाजियाबानो नासिर खान पठाण	एम. आय. एम.

वरील प्रमाणे महिला बालकल्याण समितीवर ११ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८१ स्थायी समिती सदस्य श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा सादर केलेला असून सदर राजिनामा मे. सभागृहापुढे अवलोकनार्थ सादर. तसेच श्री. पटेल यांच्या राजिनाम्यामुळे स्थायी समिती सदस्याचे रिक्त झालेल्या पदी नवीन एक सदस्यांची अधिनियमातील तरतूदीनुसार उर्वरीत कालावधीसाठी नियुक्ती करणे

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व टिपणीचे वाचन केले.

स्थायी समितीचे सदस्य श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दिनांक १०/१/२०२० रोजी मा.महापौर सो. यांचेकडेस राजिनामा सादर केला

असून मा.महापौर सो. यांनी श्री. पटेल यांचा स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा मान्य केला असून नगरसचिव यांनी पुढील कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार सदर राजिनामा मे. महासभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती सदस्य श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांची स्थायी स्थायी समिती सदस्य पदी दिनांक २/२/२०१९ रोजी समाजवादी पक्षातर्फे नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यांत आली होती. त्यांचा स्थायी समिती सदस्य पदाचा कालावधी नियमानुसार १/२/२०२१ रोजी पर्यत आहे. तथापि श्री. पटेल यांनी राजिनामा दिल्यामुळे सदर स्थायी समिती सदस्य पद रिक्त झालेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३ नुसार स्थायी समितीतील नैमितीक रिकाम्या जागा कशा भरावयाच्या याबाबत तरतूद नमूद आहे. तसेच शासन परिपत्रक जा.क्रं. संकिण २००८ /२७६ /प्र.क्र.१३/ नवि-३१ दिनांक १५ जुलै २००८ नुसार ज्या पक्षांचे सदस्य निवृत्त झालेले आहे त्याच पक्षाचे सदस्य समितीवर नियुक्त करणे अद्यारुत आहे.

त्यानुसार स्थायी समिती सदस्याच्या रिक्त झालेल्या पदी उर्वरीत कालावधीसाठी कलम ३१ अ नुसार सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव घेण्यांत आलेला आहे.

मा. महापौर समाजवादी पार्टीचे स्थायी समिती सदस्य श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांचा राजिनामा मंजूर करण्यांत आलेला आहे.सदर रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदासाठी समाजवादी पक्षाचे गटनेते श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांनी त्यांच्या पक्षातर्फे श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांची स्थायी समिती सदस्य पदी नियुक्ती करणेबाबत लेखी पत्र सादर केलेले आहे.

त्यानुसार स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या पदी श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांची उर्वरीत कालावधीसाठी नियुक्त करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०४ दिनांक १७/०१/२०२०

स्थायी समिती सदस्य श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा सादर केलेला असून सदर राजिनामा मे.सभागृहापुढे अवलोकनार्थ सादर. तसेच श्री. पटेल यांच्या राजिनाम्यामुळे स्थायी समिती सदस्याचे रिक्त झालेल्या पदी नव्याने उक्त पक्षाच्या सदस्यांची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर झालेला आहे.

समाजवादी पार्टीचे स्थायी समिती सदस्य श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांचा राजिनामा मंजूर करण्यांत आलेला आहे.सदर रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदासाठी समाजवादी पक्षाचे गटनेते श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम यांनी त्यांच्या पक्षातर्फे श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांची स्थायी समिती सदस्य पदी नियुक्ती करणेबाबत लेखी पत्र सादर केलेले आहे.

त्यानुसार स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या पदी श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांची उर्वरीत कालावधीसाठी नियुक्त करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.१० जून २०२० रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाटयमंदिर,धुळे
बुधवार दिनांक १० जून , २०२०
वेळ सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क) (ड) व (ह) अन्वये मा.महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष महासभा **आज बुधवार दिनांक १०/०६/२०२० रोजी सकाळी ११-००मा. श्री.चंद्रकांत मधुकर सोनार महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाटयमंदिर येथे घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
३	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
४	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
५	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
६	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
७	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
८	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
९	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१०	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
११	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१२	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१३	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१४	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
१५	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१६	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१७	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
१८	श्री. अहिरराव किरण हिरश्चंद्र	सदस्य	
१९	श्री. बेसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२०	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२१	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२२	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------

२३	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२४	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
२५	श्रीमती.जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
२६	श्रीमती.वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
२७	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
२८	श्री. पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
२९	श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
३०	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३१	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३२	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
३३	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३४	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३५	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३६	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
३७	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
३८	श्रीमती.जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
३९	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
४०	श्रीमती.ईशी सुशिला यशवंत	सदस्या	----------" ---------
४१	श्रीमती. बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
४२	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
४३	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
४४	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
४५	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
४६	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
४७	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
४८	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
४९	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५०	श्री. मोमीन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
५१	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५२	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५३	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. अजिज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	सहा. आयुक्त	----------" ---------
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखा परीक्षक	----------" ---------

६	श्री.महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
८	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
९	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
१०	डॉ. श्री. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. चंद्रकांत जाधव	सहा. सार्व. आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. लक्ष्मण मोरे	सहा. सार्व. आरोग्याधिकारी	----------" ---------
१३	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१४	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग	----------" ---------
१५	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निर्धारण अधिकरी	----------" ---------
१६	श्री. एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१७	श्री. महेंद्र जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.	----------" ---------
१८	श्री. राजू माईनकर	भांडारपाल	----------" ---------
१९	श्री. विशाल निंबाळकर	अभिलेखापाल	----------" ---------
२०	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२१	श्री. के.जी. सुडके	बाजार विभाग	----------" ---------
२२	श्री. पी.डी. चव्हाण	पा.पु. ओव्हरसिअर	----------" ---------
२३	श्री.एच.पी. पावटे	पा.पु. ओव्हरसिअर	----------" ---------
२४	श्री.सी.सी. बागुल	पा.पु. ओव्हरसिअर	----------" ---------
२५	श्री. संजय गुजर	औषध निर्माता (भांडार)	----------" ---------
२६	श्री. सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस उपस्थित मा.आयुक्त सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

समा. सदस्याकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया.

१) कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या नागरीकांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करणेबाबत.

लॉकडाऊन संचारबंदीसह अनेक उपाययोजना करुनही कोरोनाचा प्रादुर्भाव थांबलेला नाही. संपूर्ण जगात कोरोनाचा विळखा घटट होत आहे. जगभर थैमान घालण्या-या कोरोना रुग्णाची संख्या झपाटयाने वाढत असून संपूर्ण जगात आजमितीला ६८.८० लाख कोरोना रुग्णाची संख्या झालेली आहे. त्यातील बहुसंख्य रुग्ण बरे होवून त्यांनी कोरोनावर मात केलेली आहे. परंतु त्यापैकी सुमारे ४ लाख रुग्ण हे कोरोनामुळे मयत झाले आहेत. तसेच धुळे महानगरपालिका व जिल्हयातील एकुण २६ रुग्ण मयत झालेले आहेत.

तरी आजच्या महासभेत जगभरात मयत झालेल्या कोरोना रुग्णाना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती स्थायी समिती मनपा धुळे

२) जगभर थैमान घालणा-या कोरोना रुग्णांची संख्या जिल्हयात झपाटयाने वाढत असून दोनशेच्या पार कोरोना रुग्णांची संख्या झालेली आहे. त्यातील बहुसंख्य रुग्ण बरे होवून त्यांनी कोरोनावर मात केलेली आहे. परंतु त्यापैकी २५ रुग्ण हे कोरोनामुळे मयत झाले आहेत.

तरी आजच्या महासभेत मयत झालेल्या कोरोना रुग्णांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. युवराज चैत्राम पाटील, माजी सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे

महापौर :- सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार कोरोनामुळे मयत झालेल्या मान्यवरांना आजच्या सभेत दोन मिनिटे मौन उभे राहून श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०५ दिनांक १०/०६/२०२०

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार लॉकडाऊन संचारबंदीसह अनेक उपाययोजना करुनही कोरोनाचा प्रादुर्भाव थांबलेला नाही. संपूर्ण जगात कोरोनाचा विळखा घटट होत आहे. जगभर थैमान घालण्या-या कोरोना रुग्णाची संख्या झपाटयाने वाढत असून संपूर्ण जगात आजमितीला ६८.८० लाख कोरोना रुग्णाची संख्या झालेली आहे. त्यातील बहुसंख्य रुग्ण बरे होवून त्यांनी कोरोनावर मात केलेली आहे. परंतु त्यापैकी सुमारे ४ लाख रुग्ण हे कोरोनामुळे मयत झाले आहेत. तसेच धुळे महानगरपालिका व जिल्हयातील एकुण २६ रुग्ण मयत झालेले आहेत.

जगभरात तसेच जिल्हयातील कोरोनाआजारामुळे मयत झालेल्या सर्व रुग्णांना आजच्या महासभेत दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून कोरोना कालावधीत उत्कृष्ट सेवा बजावल्याने प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत आलेली यादी

लॉकडाऊन संचारबंदीसह अनेक उपाययोजना करुनही कोरोनाचा प्रादुर्भाव थांबलेला नाही. संपूर्ण जगात कोरोनाचा विळखा घटट होत आहे. देशामध्ये कोरोना साथीने माजविलेला हाहाकार कमी होण्याची शक्यता दिसत नाही. संपूर्ण देशात कोरोनाचा विळखा घट्ट होत आहे. महाराष्ट्रातील कोरोना रुग्णांची एकुण संख्या आता सुमारे ८८ हजार असून ४१ हजार रुग्णांना डिस्चार्ज मिळालेला आहे. तसेच धुळे जिल्हयात देखील आजापर्यत ११० रुग्ण कोरोना मुक्त झालेले आहेत. प्रशासनामार्फत तात्काळ योग्य ते औषधोपचार झाल्याने कोरोनामुक्त रुग्णांची संख्या वाढत असल्याने ही समाधानाची बाब आहे. या ३ महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण जिल्हा प्रशासनाने,धुळे महानगरपालिका प्रशासना यांनी अतिशय उत्कृष्ट सेवा बजावल्यानेच हे शक्य झालेले आहे.

तरी आजच्या मे.विशेष महसभेत धुळे जिल्हा प्रशासनाने अतिशय उत्कष्ट सेवा बजावल्या बदल मा. जिल्हाधिकारी श्री. संजयजी यादव सो. धुळे महानरगपालिकेचे महापौर श्री.चंद्रकांत सोनार, आयुक्त श्री. अजिजजी शेख सो. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. चिन्मयजी पंडीत सो. हिरे शासकीय वैद्यकीयमहाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, तसेच संपूर्ण जिल्हा प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, पोलीस प्रशासन व जिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती स्थायी समिती मनपा धुळे

मा. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार लॉकडाऊन काळात प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी अतिशय मेहनत घेतली आहे.त्याबदद्ल अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०६दिनांक १०/०६/२०२०

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार लॉकडाऊन संचारबंदीसह अनेक उपाययोजना करुनही कोरोनाचा प्रादुर्भाव थांबलेला नाही. संपूर्ण जगात कोरोनाचा विळखा घटट होत आहे. देशामध्ये कोरोना

साथीने माजविलेला हाहाकार कमी होण्याची शक्यता दिसत नाही. संपूर्ण देशात कोरोनाचा विळखा घट्ट होत आहे. महाराष्ट्रातील कोरोना रुग्णांची एकुण संख्या आता सुमारे ८८ हजार असून ४१ हजार रुग्णांना डिस्चार्ज मिळालेला आहे. तसेच धुळे जिल्हयात देखील आजापर्यंत ११० रुग्ण कोरोना मुक्त झालेले आहेत. प्रशासनामार्फत तात्काळ योग्य ते औषधोपचार झाल्याने कोरोनामुक्त रुग्णांची संख्या वाढत असल्याने ही समाधानाची बाब आहे. या ३ महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण जिल्हा प्रशासनाने,धुळे महानगरपालिका प्रशासना यांनी अतिशय उत्कृष्ट सेवा बजावल्यानेच हे शक्य झालेले आहे.

तरी आजच्या मे. विशेष महसभेत धुळे जिल्हा प्रशासनाने अतिशय उत्कष्ट सेवा बजावल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी श्री. संजयजी यादव सो. धुळे महानरगपालिकेचे महापौर श्री.चंद्रकांत सोनार,आयुक्त श्री.अजिजजी शेख सो. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. चिन्मयजी पंडीत सो. हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, तसेच संपूर्ण जिल्हा प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, पोलीस प्रशासन व जिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

२) धुळे महानगरपालिकेला थ्री स्टार रॅंकिंग प्राप्त झाल्याने मनपा प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत आलेली सदस्यांची यादी.

केंद्र सरकारच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घेण्यांत आलेल्या या स्पर्धेत दैनंदिन सफाई, सिंगल युज वरील बंदी, नालेसफाई, वेस्ट मॅनेजमेंट यावर केंद्र सरकारचा भर होता. त्यानुसार कचरा व्यवस्थापनामध्ये केलेल्या सुधारणेमुळे तक्रारी सोडविण्यामध्ये आणि कच-यांची योग्य पध्दतीने हाताळणी केल्यामुळे व कचरा मुक्त शहराच्या यादीत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालयाने जाहीर केल्यानुसार धुळे महानगरपालिकेला थ्री स्टार मानांकन मिळाले आहे. धुळे महानगरपालिका प्रशासनाने अतिशय उत्कृष्ट सेवा बजावल्यानेच हे शक्य झालेले आहे.

तरी आजच्या मे. विशेष महासभेत धुळे मनपाचे आयुक्त मा.श्री.अजीजजी शेख सो. अतिरिक्त आयुक्त मा. श्री. गणेशजी गिरी सो.. उपायुक्त मा. श्री. शांताराम गोसावी सो. अरोग्याधिकारी श्री. डॉ. महेश मोरे, तसेच संपूर्ण आरोग्य विभाग व महानगरपालिका प्रशासातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :-श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती स्थायी समिती मनपा धुळे
श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा धुळे

मा.महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२०स्पर्धेत मध्ये मनपा प्रशासनातील सर्व अधिकारी तसेच कर्मचारी यांनी धुळे शहरातअतिशय मेहनत व परिश्रम करुन शहरात थ्री स्टार रॅंकींगमध्ये यश संपादन करुन शहरास थ्री स्टार रॅंकींगमध्ये धुळे शहराचे नांवाचा समावेश झाला आहे. त्यामुळे भविष्यात याचा फायदा महानगरपालिकेस होणार असल्याने मनपा प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०६(अ) दिनांक १०/०६/२०२०

केंद्र सरकारच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घेण्यांत आलेल्या या स्पर्धेत दैनंदिन सफाई, सिंगल युज वरील बंदी, नालेसफाई, वेस्ट मॅनेजमेंट यावर केंद्र सरकारचा भर होता. त्यानुसार कचरा व्यवस्थापनामध्ये केलेल्या सुधारणेमुळे तक्रारी सोडविण्यामध्ये आणि कच-यांची योग्य पध्दतीने हाताळणी केल्यामुळे व कचरा मुक्त शहराच्या यादीत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालयाने जाहीर केल्यानुसार धुळे महानगरपालिकेला थ्री स्टार मानांकन मिळाले आहे. धुळे महानगरपालिका प्रशासनाने अतिशय उत्कृष्ट सेवा बजावल्यानेच हे शक्य झालेले आहे.

याबद्दल धुळे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. अजीजजी शेख सो. अतिरिक्त आयुक्त मा. श्री. गणेशजी गिरी सो..उपायुक्त मा. श्री. शांताराम गोसावी सो. अरोग्याधिकारी श्री. डॉ. महेश मोरे, तसेच संपूर्ण आरोग्य विभाग व महानगरपालिका प्रशासातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

३) सनमा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी

जिल्हयाच्या पालक सचिव पदी मराठी भाषा विभागाच्या सचिव तथा आपल्याधुळे शहराच्या माजी जिल्हाधिकारी श्रीमती प्राजक्ता लवंगारे (वर्मा) यांची निवड झाली. जिल्हयाच्या सचिवपदी प्रथमच महिला अधिका-यांची निव्ड झाली .

त्याबद्दल श्रीमती लवंगारे यांची स्तुत्य निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या महासभेत पारीत करण्यांत याबाही विनंती.

मा. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०६(ब) दिनांक १०/०६/२०२०

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार जिल्हयाच्या पालक सचिव पदी मराठी भाषा विभागाच्या सचिव तथा आपल्याधुळे शहराच्या माजी जिल्हाधिकारी श्रीमती प्राजक्ता लवंगारे (वर्मा) यांची निवड झाली. जिल्हयाच्या सचिवपदी प्रथमच महिला अधिका-यांची निव्ड झाली.

त्याबद्दल श्रीमती लवंगारे यांची स्तुत्य निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा. उपमहापौर सौ. कल्याणीताई अंपळकर, सौ.मंगला सुरेश पाटील,श्री. सुनिल वसंतराव सोनार व श्री. विपक सुरेश खोपडे या सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

मा. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जात नमूद कारणाची शहानिशा करुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०७ दिनांक १०/०६/२०२०

सन्मा.उपमहापौर सौ.कल्याणीताई अंपळकर,सौ.मंगला सुरेश पाटील,श्री.सुनिल वसंतराव सोनार व श्री.दिपक सुरेश खोपडे या सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जात नमूद कारणाची शहानिशा करुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-८२ मा.महापौर सो.यांच्या आदेशानुसार व जा.क्रं. स्वीस/मनपा/१७८ दिनांक ३/६/२०२० च्या लेखी पत्रानुसार सद्यस्थितीत धुळे शहरातील अनियमित पाणीपुरवठा तसेच कोरोना संसर्गाच्या पार्श्व

भूमीवर करण्यांत आलेल्या उपाय योजना व पुढील कार्यवाही या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर — याठिकाणी दोन विषय आहेत. दोन्ही विषय अतिशय महत्वाचे आहे.कोरोनाच्या प्रार्दभावामुळे धुळे महानगरपालिकेमार्फतप्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी आपली सर्व यंत्रणा कार्यरत होती. व त्यास आपण प्रथम प्राधान्य दिले. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा थोडयाफार प्रमाणात विस्कळीता झाला परंतु त्या अडचणी आता प्रशासनाच्या माध्यमातून दूर करण्यांत आलेल्या आहेत.आणि वेळोवेळी बैठकाही घेण्यांत आलेल्या आहेत. पाण्यावर शक्यतो राजकारण होता कामा नये. नगरसेवक असतील सामाजिक कार्यकर्ते असतील, इतर पक्षांचे पदाधिकारी असतील त्यानी मोलाचा सल्ला दिला तर आम्ही त्यांचे स्वागत करु परंतु कृपया पाण्यासंदर्भात कोणीही राजकारण करु नये. आणि सुरुवातीला आपल्याला कोरोना या विषयावर चर्चा करावयाची आहे.कोरोना संदर्भात आपआपले मत मांडावे.

म. सुनिल बैसाणे — सन्मा.व आदरणीय महापौर साहेब, सर्व सन्मा.पदाधिकारी, विरोधी पक्षनेते, आयुक्त सो. , तसेच सभागृहात उपस्थित प्रशासनातील सर्व अधिकारी, छायाचित्रकार बांधव मी याठिकाणी महापौर साहेब मी आपले अभिनंदन व आभार व्यक्त करतो. आपण सर्व नगरसेवकांच्या भावना लक्षांत घेवून नागरीकांच्या समस्यां लक्षात घेवून विशेष महासभा बोलाविली त्याबद्दल सर्वाच्या वतीने आभार व्यक्त करतो. महासभे मध्ये कोरोना व पाण्याच्या प्रश्नावर आपले सर्व सदस्य विचार मांडतील अशी आशा व्यक्त करतो. नागरीकांच्या प्रश्नावर भावना व्यक्त करत असतांना त्या जरी ज्वलंत स्वरुपाच्या असल्या तरी आपल्या भावनांना आवर घावून याठिकाणी अधिकारी कर्मचारी यांना प्रश्न विचारीत असतांना आपण सभा शास्त्राचा अवलंब करुन त्याचा कुठलाही पध्दतीचा अवमान होणार नाही याची प्रत्येकाने दक्षता घ्यावयाची आहे.अधिकारी वर्गालाही याठिकाणी सूचित व विनंती करतो की, सन्मा. नगरसेवक आपल्याला प्रश्न विचारीत असतांना तो त्याच्या घराबद्दल किवा वैयक्तीक स्वरुपाचे प्रश्न विचारीत नसतो. ज्या लोकांनी त्यांना निवडून दिलेले आहे त्या लोकांच्या बाबतच्या समस्यांचे प्रश्न मांडत असतो.अधिका-यांनी देखील याबाबत गांर्भिय घ्यावयाचे आहे.सन्मा. नगरसेवकांच्या प्रश्न उत्तरे देत असतांना ते अभ्यासपूर्ण असले पाहिजे. तुमच्या उत्तरामध्ये तुमचा आत्मविश्वास असला पाहिजे. याचा अर्थ असा होतो की आपण फिल्डवर जावून काम करतो. महापौर साहेब पाण्याचा गंभीर प्रश्न गेल्या महिन्यापासून शहरात भेडसावत आहे. कोरोनाच्या बाबतीत मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली. नुकत्याच महाराष्ट्र शासनाने दिनांक 13/5/2020 रोजी वैद्यकीय आणि त्यामध्ये नमूद केले आहे कोविड 19 या साथीच्या रोगाकरिता आयुर्वेदिक औषधी तसेच होमिओपॅथी औषधी संदर्भात मार्गदर्शक सुचना नगरपालिका, महानगरपालिका यांना शासनाच्या सचिवांच्या मार्फत आपणाला सूचित केल्या आहेत.तुम्हास सांगण्यांस आनंद होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महानगरपालिका नगरपालिकांमध्ये कुठल्याही आयुर्वेदिक दवाखान्याला मंजुरी मिळालेली नाही फक्त आपल्या धुळे महानगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखान्याला मंजुरी प्राप्त आहे. आणि या सर्व गोष्टी असतांना महाराष्ट्र शासनाने जो जी.आर काढलेला आहे त्यात नमूद केले आहे देशाचे आदरणीय पंतप्रधान देखील आयुर्वेदिक उपचाराबाबत आग्रही आहेत. आयुर्वेदीक काढे आहेत ते कोरोनावर अत्यंत उपायकारक आहे.येणा-या काळात कोरोनावर उपाय करतांना त्याचा बहुमोल उपयोग व मार्गदर्शक ठरणार आहे. महाराष्ट्र शासनाने या संदर्भात नमूद केल्यानंतर महापौर साहेब आपला जो आयुर्वेदीक दवाखाना आहे त्याठिकाणी आपण

प्रशिक्षीत डॉक्टर्स मानधन तत्वावर जाहिरात काढावी आणि आयुर्वेदिक उपचार करतात आपण आपले शॉपींग कॉम्प्लेक्स च्या ठिकाणी गाळयांचा लिलाव करतो किंवा व्यापारी गाळे काढत असतांना याठिकाणी महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी आर्थिक बाबीमध्ये काही अडचणी येत असतील त्याबाबत देखील आपण विचार केला पाहिजे. याठिकाणी आपणास सूचित करतो देशांचे आयुष्मान मंत्रालयाचे मंत्री नाईक साहेब आहे त्यांनी आयुर्वेदीक उपचारासाठी 2000 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. काही संस्था आयुर्वेदक दवाखाने उभारत असतील त्यांना ती मदत करणार आहे. आपल्याला अभिमानाची गोष्ट अशी आहे.धुळे लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार बाबासाहेब सुभाषजी भामरे हे डॉक्टर असल्याकारणामुळे त्यांना या प्रश्नाची अधिक चांगली जाण आहे. त्यांच्या माध्यमातून केंद्र शासनाशी पत्रव्यवहार केल्यास आपल्या धुळे महानगरपालिकेतील आयुर्वेदीक दवाखाना सुधारण्यासाठी भरपूर मदत होणार आहे. पंचकर्म दवाखान्यासाठी आधुनिक साधन सामुग्री उपलब्ध होईल यासाठी आयुर्वेदीक मंत्रालयाशी संपर्क साधून याठिकाणी उपाय योजना कराव्यात. याठिकाणी पत्राव्दारे प्रशासनाचे अभिनंदन केलेलेच आहे.परंतु कोरोना या विषाणूवर सर्वानी जागृता ठेवून प्रशासनाने तसेच महापौर साहेब,आयुक्त सो.हे फिरत असतांना आम्ही देखील आमची काळजी घेत होतो. महापौरांच्या बाबतीत विरोधकाकडून अनेक वावडया उठविल्या जात होत्या. त्याची देखील तमा न बाळगता महापौर साहेबांनी आयुक्त सोबत फिरुन कोरोना फैलाव रोखण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आहेत.त्याबद्दल महानगरपालिकेचे सर्व आरोग्यविभागाचे आभार व्यक्त करतो आणि येणा-या काळामध्ये धुळेकर नागरीकांना सर्व सुख्सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. त्याच्या सुखदु:खात मध्ये आपण देखील सामील व्हावे अशी विनंती करतो आणि मी जो मांडलेला विषय आहे.त्यांची गांभिर्याने नोंद घेवून आयुर्वेदीक दवाखान्याच्या माध्यमातून कोरोना या संसर्ग आजाराच्या उपचारासाठी औषधी महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरीकांना उपलब्ध करु या. मला याठिकाणी बोलण्यांची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल महापौर साहेब यांचे आभार व्यक्त करतो.

म. प्रदीप कर्पे

सन्मा.महापौर साहेब,आयुक्त सो.सन्मा.सभागृह अधिकारी व पत्रकार बांधव ब-या दिवसानंतर मा. महापौर साहेब यांनी याठिकाणी विशिष्ट विषयांचे महत्व लक्षांत घेवून विशेष महासभा आयोजित केली त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. देशामध्ये व जगामध्ये अत्यंत कोरोना आजाराचा संसर्ग आहे त्याची दहशत पूर्ण जगामध्ये असतांना आपल्या धुळे महानगरपालिकेच्या महापौर साहेबांनी, आयुक्त सो. यांनी, आरोग्याधिकारी, आणि खासकरुन सर्व आरोग्य कर्मचारी यांनी आपल्या धुळे शहराची चांगली काळजी घेतली. पोलीस प्रशासन जिल्हा प्रशासन यांच्याशी समन्वय ठेवून अत्यंत चांगल्या प्रकारे या शहरामध्ये रासायनिक फवारणी, वैद्यकीय तपासणी,प्रतिबधंक उपाय योजना, जिथे जिथे कंन्टमेंट झोन असेल तिथे तिथे जावून तेथे रोगी सापडला असेल त्याला तात्काळ उपाय योजनेसाठी घेवून जात आहे. आपल्या स्वत:च्या जिवाची परवा न करता सर्व कर्मचारी अत्यंत चांगले काम करीत आहेत. तुमच्या बरोबर आम्ही नगरसेवक मंडळीही त्या त्या ठिकाणी बोलविले तेथे आम्ही उपस्थित होतो. म्हणजे आपल्या महानगरपालिकेच्या सर्व टिमने या शहरासाठी अत्यंत चांगले काम केलेले आहे. त्याबद्दल महापौर साहेब यांचेकौतुक व अभिनंदन आपण सर्वानी केले पाहिजे. आणि अभिनंदन करणे हे गरजेचे आहे सर्वात महत्वाचा विषय आपले सुनिल बैसाणे यांनी सांगितला आयुर्वेदीक दवाखाना. कोरानासाठी आयुर्वेदीक औषध अत्यंत उपयोगी ठरत आहे. आणि धुळेकर जनतेच्या सुदैवाने हा आयुर्वेदीक दवाखाना अगोदर पासूनच महानगरपालिकेला

लाभलेला आहे.त्यासाठी आपणास केंद्र शासनाकडून काही मदत मागता येईल त्यासाठी आपले खासदार साहेब सुभाषजी भामरे यांच्याशी चर्चा केली तर अत्यंत चांगले होईल कारण डॉ. भामरे हे डॉक्टर असल्याने त्यांना त्याचा अभ्यास आहे. आणि अत्यंत चांगल्या पध्दतीने ते आपणास मदत करतील. आणि सर्व नगरसेवक महापौर,अधिकारीआपल्या सोबत राहू. आणि या केारोनावर मात करण्यासाठी आम्ही सर्व तुमच्या बरोबर राहू.आणि पुन्हा या सर्व टीमचे अभिनंदन करतो. याठिकाणी थांबतो जयहिंद जय महाराष्ट्र...

मा.वंदनाताई भामरे — मा. महापौर साहेब,आयुक्त सो.सर्व नगरसेवक बंधू भगिनी, आणि अधिकारी व पदाधिकारी महोदय, सर्व प्रथम मी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महासभा आयोजित केली आहे. या विषयावर फक्त ऐवढे सांगेल आपण विविध ठिकाणी विविध प्रभागामध्ये थर्मल स्कॅनींग उपलब्ध करुन दिले होते. माझ्याही प्रभागात आयुक्त सो. व महापौर साहेब यांनी माझ्या शब्दाला मान देऊन उपलब्ध करुन दिले होते. त्याबद्दल आभार मानतो परंतु ते तात्पुरत्या स्वरुपामध्ये होते. म्हणून माझी विनंती आहे की , सिव्हील हॉस्पीटल ज्या ज्या प्रभागाला लांब पडते कारण लोकांना खाण्याची पडलेली आहे त्यामुळे रिक्षा भाडे खर्च करुन सिव्हील हॉस्पीटल मध्ये जाणे शक्य होत नाही त्यांचेकडे असलेले पैसे देखील आता संपलेले आहे. त्यासाठी लोकांची गरज लक्षांत घेता ज्या ज्या ठिकाणी त्या त्या प्रभागामध्ये ते सेंटर कायम स्वरुपी उपलब्ध करुन द्यावे. प्रथम उपचार म्हणून त्याठिकाणी उपलब्ध करुन द्यावे. मी पुन्हा एकदा आयुक्त सो. महापौर सो. डॉक्टर्स आरोग्यधिकारी श्री. मोरे दादा आणि त्यांची पूर्ण टीम यांचे पुन्हा एकदा आभार व्यक्त करते कारण जेव्हा जेव्हा माझ्या प्रभागामध्ये मला अडचणी आल्या त्या त्या वेळी सर्व सेवा उपलब्ध करुन दिल्या त्याबद्दल पुन्हा एकदा आभार मानते. हे जे सफाई कर्मचारी हे संपूर्ण शहरात साफ सफाई करत आहे. त्यांचेकडेस स्वत:ची सुरक्षिततेसाठी कुठल्याही प्रकारचे कीट उपलब्ध नाही.हॅण्डग्लोज असतील शुज असतील हे अद्याप पर्यत त्यांचेकडे उपलब्ध नाही. त्यांचे आरोग्यही फार महत्वाचे आहे. जेवढे डॉक्टरांची भूमिका महत्वाची आहे जेवढी अधिका-यांची भूमिका महत्वाची आहे.त्याच प्रमाणे सफाई कर्मचा-यांचे आरोग्य देखील तितकेच महत्वाचे आहे. यासंदर्भात ठेकेदारांची देखील तेवढीच जबाबदारी महत्वाची आहे. त्यांचेकडून त्यांना हे साहित्य उपलब्ध झाले पाहिजे. सफाई कामासंदर्भातील ठेकेदाराना प्रशासनाने तसे सुचवून त्या कर्मचा-यांना साहित्य उपलब्ध करुन दिले पाहिजे ऐवढी सुचना मांडते. धन्यवाद...

म.शितल नवले — महापौर सो. आपण आजची विशेष सभा बोलविली त्याबद्दल बआपले आभार. आरोग्याविषयी फार काही समस्या आपल्याकडे उदभवल्या नाही अतिशय शिस्तबध्दपध्दतीने आरोग्य विभागाने चांगले काम केले त्याबद्दल आयुक्त सो. आपले आभार. आणि खास करुन प्रभाग क्रं. 15,16, व 17 चे स्वच्छता निरीक्षक श्री. वसावे यांनी अतिशय चांगले काम केले दिवसरात्र असे न बघता सदैव काम करत होते. मोठयांचेतर सर्वच आभार मानता परंतु सफाई कर्मचा-यांचे नांवे पाठ नाही परंतु आरोग्य विभागातील सर्वच सफाई कर्मचा-यांचे आभार व्यक्त करतो. आपल्या धुळे एम.आय.डी.सी. मध्ये अतिशय चांगले असे कोविड क्लिनीकचे मॅन्यूफक्चरींग सुरु झालेले आहे. फार पटणा पर्यत इथले मॅन्यूफक्चरींग गेले आहे. यासंदर्भात प्रस्ताव डॉ. मोरेकडेस दिलेला आहे. आपले जे काही क्लिनीक सेंटर आहेत त्याठिकाणी ते लावले तर बरे होईल फार महाग नाही.2- 3 लाखापर्यत आहे.ते आपण खरेदी करावे कारण ही महामारी लगेच जाणार नाही. जागतिकआरोग्य संशोधकाचे असे म्हणणे आहे की,पुढील वर्षी ही महामारी चालू राहू शकते.

मा. महापौर — जे मशिन काय आहे त्याची माहिती सांगावी.

म. शितल नवले

सर्व प्रथम क्लिनीक मध्ये एखादा रुग्ण येतो असा आता पावसाळा चालू होणार आहे सर्दी ही पावसाळयांत कॉमन गोष्ट आहे.सर्दीचा पेशंट जरी आला तरी असे वाटेल की याला कोविड झालेला आहे. त्याच्यासाठी खास चेक करण्यासाठी आपले डॉक्टर आहे आपला जो स्टॉप आहे तो बाधीत होऊ नये तो बाधीत न होता आपले जे ओपीडी आहे ते बाधीत न होण्यासाठी ते बनविलेले आहे. साधारणत: 15 मिनिटांची क्लीप आहे मी आयुक्त साहेब यांना फॉरवर्ड करेल.त्याला आयुष्यमंत्रालयाची मान्यता मिळालेली आहे.मिलेटरीवाल्यांनी ती आपल्याकडून खरेदी केलेली आहे. विशेषत: ती आपल्या धुळे एम.आयडी.सी येथे डेव्हलप झालेली आहे. अशा काही गोष्टी आपण घ्यावयात आपण वेळेवरती मशिनरी खरेदी केल्यास परंतु मशिनरी हया कमी आहेत. आपण फवारणीसाठी टॅक्ट्रर मशिनरी घेतली आहे त्यांची क्षमता अतिशय कमी 1000 लिटर आहे.1000 लिटर म्हटले तर दोन कॉलनीमध्ये फवारणी केली तर ते संपूर्ण होत नाही. आपल्याकडे जे 4 ट्रक्टर आहेत 4 टॅक्टर जरी एका प्रभागात फिरविले तरी ते पूर्ण होऊ शकत नाही. फवारणीचे यंत्र वाढविल पाहिजे फार महाग नाही आपल्या मानधनावरील एम.बी.बी.एस डॉक्टर इन्व्हाईट करता आले तरी ते करावे. काही महानगरपालिकेच्या व्यायाम शाळा आहेत, काही ठिकाणी ज्येष्ट नागरी संघाचे भुवन काढले आहेत ते ताब्यात घेवून त्याठिकाणी ओपीडी चालू करावे. याठिकाणी सौ. वंदनताई म्हणाल्या. प्रत्येक गोष्ट जिल्हा प्रशासनावर जबाबदारी न टाकता आपल्या स्तरावर वरील ठिकाणी ओपीडी सुरु करावे जो काही खर्च आहे तो महानगरपालिकेने उचलला पाहिजे. महानगरपालिकेची परिस्थिती लक्षांत घेत खर्च इतरत्र न करता आरोग्यावर खर्च केला पाहिजे. खर्च जास्त झाला तरी चिंता करु नये महापौर साहेब आपण काही तज्ञ मंडळी, जसे आर्किटेक्ट, इंजिनिअरर्स,डॉक्टर अशाची समिती स्थापन करु या. उत्पन्नाचे स्त्रोत वाढले पाहिजे. खर्चाचा बोजा वाढणार आहे. याठिकाणी सुनिल भाऊ बोलले बी.ओ.टी.वर तत्वावर मी पण मागे केल्या 2- 3 मिटींग मध्ये बी.ओ.टी. प्रस्ताव दिला होता. एकाच प्रस्तावात 42 कोटी वाढू शकतात. मी मागे लेखी जरी दिले आहे. शाळा क्रं. 5 च्या जागेत बी.ओ.टी. बाबत प्रस्ताव होता. आणि त्याचे लेखी निवेदन मी महासभेत दिलेले आहे. ते उत्पन्नवाढीचे स्त्रोत वाढू शकतात. लगेच काही राज्य शासनाकडून अनुदान मिळू शकणार नाही. राज्य शासनाच्या बरोशावर राहून चालणार नाही राज्य शासन देऊ शकणार नाही पगारालाच पैसे नाही आपल्याला विकास कामाला व आरोग्याला कुठुन पैसे मिळणार आहे.आणि केंद्र सर्व काही पुरवू शकत नाही निश्चित केंद्र शासनाच्या योजना येतील परंतु त्या याच्यात असतील. आपल्याला आपले उत्पन्नाचे स्त्रोत उभे करावे लागणार आहे. महापौर साहेब आरोग्याच्या कामाच्या बाबतीत कोणाचे ही दुमत नाही अतिशय चांगल्या पध्दतीने हाताळणी केली आहे. आणि दुसरा विषय पाण्याचा आहे तो नंतर बोलेल पहिल्या महासभेपासून पाण्यासंदर्भात उपाय योजना सांगत आलो आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही निश्चत त्यास्वरुपात लेखी दिले आहे. पाणीपुरवठाच्या विषयाच्या वेळी टेक्नीकल स्वरुपाचे मी तुमच्याशी बोलेल. धन्यवाद...

म. अमोल मासुळे

सन्मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, सचिव सो. , उपस्थित सन्मा. सदस्य,अधिकारी वर्ग , कर्मचारी वर्ग, पत्रकार बांधव- महापौर महोदय सन्मा. सदस्यांनी अतिशय महत्वाच्या कोरोना संदर्भात सुचना मांडल्या आहेत. स्थायी समिती मध्ये ही मी काही प्रश्न मांडण्यांचा प्रयत्न केला. पण महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्या पध्दतीने ठोस पावले उचलली गेली पाहिजे ते प्रत्यक्षात दिसत नाही याठिकाणी मी आयुक्त सो. पत्र दिले होते की, आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी सन्मा. सदस्या सौ.वंदनाताई यांनी विषय घेतला याठिकाणी डॉक्टरर्स असतील अधिकारी असतील यांचे जेवढे योगदान आहे तेवढेच योगदान हे सफाई

कर्मचा-यांचे देखील आहे. गलोगल्ली सकाळी आपले सफाई कर्मचारी काम करीत आहे याच्या विषयी मी पत्र दिले होते की, आपले सफाई कर्मचारी, आशा वर्करर्स, फील्ड वर्कर असतील , प्रत्येक विभागाचे कर्मचारी असतील त्यांना सुरक्षा कवच म्हणून एक विमा कवच देण्यांत यावे कारण की, हा जो निर्णय आहे तो अन्य महानगरपालिकांमध्ये घेण्यांत आलेला आहे. आपण तसा निर्णय घेतला तर महानगरपालिका कर्मचा-यांचा हिताचा निर्णय घेतला जाणार आहे. दुसरा विषय आयुष्य मंत्रालायाच्या माध्यमातून अर्सेनिक अलब्म 30 हा होमीओपॅथीक उपचार आहे कोरोना सारख्या आजारावर एक प्रतिबंध म्हणून हे औषध चांगले सिध्द झाले आहे. त्यांचे देण्यांचे प्रमाण सांगता येते मालेगांव महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. नितीन पाटील यांनी स्वत एक पत्र दिलेले होते या ज्या होमिओपॅथीक गोळया आहेत याठिकाणी कोरोना बाधीत जो झोन आहे तेथील नागरीकांना होम टू होम जर दिले तर जे पेशंट वाढीचे प्रमाण आहे त्यावर एक ठोस उपाय म्हणून आपण कमी करु शकतो .शहरामध्ये जवळपास 80 ते 90 हजार घरे असतील या प्रत्येक घराला जर आपण होम टू होम अस्लरीक अलबम ही गोळी आहे प्रत्येक घराला दयावयाचे ठरविले तर 10 ते 15 लाख रुपयांचा बजेट येईल महापौर सो. माझी विनंती आहे प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांना बोलावून त्यांना विश्वासत घेवून आस्थापना विभाग किंवा वसुली विभाग यांच्या माध्यमातून शहरात किती घरपट्टी धारक आहे याचा सर्व्हे करुन त्यांना आपले महानगरपालिकेचे ओपीडी आहे त्याठिकाणी हया गोळया होम टू होम देण्यांचा प्रयत्न केला तर निश्चित चांगला उपाय आणू शकतो . दुसरा एक उपाय असा आहे जे आपले पापर्टी धारक आहे जे ऑन लाईन भरणा करतात. एप्रिल, मे, जून हे तीन महिने उलटून गेले आहेत. कोरोनाच्या साथीमुळे जे ऑन लाईन भरणा करता त्यांना आपण जी मालमत्ता करात सुट देतो माझी विनंती राहील त्यांना पुढील 3 महिने कालावधी वाढविण्यांत यावा याठिकाणी सन्मा.सदस्य श्री. शितलभाऊनी सांगितले महानगरपालिकेकडेस पुरेशी साधने उपलब्ध नाही ही गोष्ट तेवढीच खरी आहे याठिकाणी टॅक्ट्रर ही फार मोठी गोष्ट झाली आपलयाकडेस थर्मल स्कॅनीग मशिन आपल्याकडे किती आहे याची माहिती आम्हाला दिली तर बरे होईल. गेल्या स्टॅन्डींग सभेतही हा प्रश्न उपस्थित केला होता. माझ्या प्र.क्रं. 17 मध्ये नव्याने 3 कोरोना पॉझेटीव्ह पेशंट आढळले आहेत. गुरुकृपानगर मध्ये संतोष लक्ष्मण धोतरे नावाचा पेशंट आढळला त्याला आज 7 वा दिवस आहे पण त्याठिकाणी देखील 4 थ्या दिवशी टर्मल स्कॅनींगसाठी आपले कर्मचारी आले. महानगरपालिका उपाय योजना करते आहे पण या संदर्भात एक ठोस अशी रणनिती आखली गेली पाहिजे. कारण कोरोना पेशंट आढळला तर त्या ठिकाणचे लोक फार भयभीत होतात. त्यावर तांतडीने उपाय योजना केली तर नागरीकांना आपण चांगला दिलासा देऊ शकतो . महापौर सो. आपणास विनंती असेल थर्मल स्कॅनींग मशिन जास्तीत जास्त उपलब्ध करुन द्यावेत. तसेच सॅनिटायर फवारणीसाठीचे टॅक्ट्ररर्स आहे ते प्रत्येक प्रभागासाठी वाढ केली पाहिजे. ऐवढे बोलून याठिकाणी थांबतो.

म. संजय पाटील आताच्या घडीला जे अजमेरा कॉलेज आहे, बाफना कॉलेज आहे मेडिकल कॉलेज आहे यांचीही मदत आपण यासाठी घेवू शकतो. आणि मागे मी आयुक्त सो. यांना विनंती केली होती की अस्लरीक अलबम हया रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी हया होमीओपॅथीक गोळया दिल्या जातात हया आपल्याला 30 दिवसातून महिन्यांला एकदा या गोळया कमप्लसरी घ्याव्या लागतात. यांची वाटप करावयाचेसाठी शहराचे जे आपले मालमत्ता धारक आहे ते अंदाजे 1 लाख धरुन घेऊ. आपण बाहेरुन ऑर्डर देऊन मागविण्यापेक्षा ज्या गोळया साबुदाण्यासारख्या असतात त्या साधारणत: 120 रु. किलो असतात. त्यामध्ये 4-5 थेंब औषध टाकले जाते.

आपल्याकडे आशा वर्करर्स आहेत तसेच अन्य कर्मचारी वर्ग आहे त्याच्या माध्यमातून आपण औषधी गोळया पोहचवू शकतो आजच्या परिस्थितीत काही ठिकाणी हया गोळया वाटल्या जात आहे परंतु संपूर्ण शहरात त्या पोहचत नाही. ज्या ठिकाणी हया गोळया वाटल्या गेल्या आहेत त्याठिकाणी 30 दिवसानंतर परत हया गोळया घेतल्या पाहिजे यांचे प्रबोधन झालेले नाही. त्या गोळयांना आयुष्यमंत्रालयाने देखील मान्यता दिलेली आहे असे आपल्या कोणत्या तरीतिस-या व्यक्तीने सांगितले आणि आपण ते औषध रेक्रमेंट करतो आहे महानगरपालिकेचे तेवढा खर्च भार हा उचललाच पाहिजे त्यासाठी ज्या ज्या रोटरी सारख्या स्वयंसेवी संस्था असतील लायन्स क्लब असतील यांनाही आमंत्रीत करुन त्यांची मदत घेवू या. लॉक डाऊन उठलेले आहे लोकांना आजही हयांचे गांर्भिय कळलेले नाही.पेशंट आजही कमी आहे हे आपल्या धुळे शहराचे भाग्य आहे. आपल्या आरोग्य खात्यांचे खरोख्र आभार मानले पाहिजे, आपले डॉ. मोरे असतील लक्ष्मण पाटील असतील, याचे खरोखर आभार मानतो या लोकांनी अतिशय चांगले कामे केली आहेत.आता आपल्याला सर्व लोकांपर्यत हे औषध पोहचविणे गरजेचे आहे.त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. आणि जो पर्यत ही महामारी सुरु आहे डब्ल्यू एचओने सांगितले आहे ही महामारी वर्ष दोन वर्ष चालणार आहे व्हॅक्सीन यायला किती काळ लागेल हे कोणी सांगत नाही. त्यासाठी हा अस्लर्रींग अलबममुळे आपली रोगप्रतिकार शक्ती वाढते.काही लोकांना कोरोना होईलही परंतु त्याचा माईल्ड स्वरुपात होवून त्याला आजार झाल्याचे कळणारही नाही.त्यासाठी महानगरपालिकेने यासाठी उपाय योजना कराव्यात. याठिकाणी प्रथम लोकांना वाचविणे गरजे आहे. 30 दिवसाच्या हिशोबाने हया गोळया घरोघरी दिल्या जाव्यात. सन्मा. सदस्य यांनी सांगितले की 10 लाख खर्च येईल परंतु मला नाही वाटत की यासाठी इतका खर्च येईल साधारणत: 1 ते 2 लाख रुपये खर्च हया गोळयासाठी येऊ शकतो. इतर संस्थाही हे औषध वाटप करीत आहे. आयुर्वेदीक काढा, युनॉनिक काढा याला देखील आयुष्य मंत्रालयाने मान्यता दिलेली आहे हे काढे देखील लोकांना पर्यत आपण पोहचविले पाहिजे. मालेगांवच्या ठिकाणी तर युनॉनी काढयाने फार मोठे काम केले आहे तेथे पेशंट कमी झाले आहेत. कारण तो सर्वात मोठा हॉस्टस्पॉट ठरलेला होता. परंतु आता तेथे पेशंट दिसत नाही. या काढयाचा तेथे चांगला रिझल्टर्स आलेला आहे. त्या काढया विषयी संपूर्ण जागृती केली जावी माहिती दिली जावी जी साधन सामुग्री मिळत नसेल तर त्यासाठी प्रयत्न करावे अस्लर्रींग अलबम हया गोळया मी स्वत: घेतो आहे परिवारालाही देत आहे. मला बोलावयाची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो. मी ज्या सुचना केल्या आहेत त्यांची नोद घेण्यांत यावी.

मा. महापौर
अतिशय चांगल्या सुचना आपण केलेल्या आहेत याची नोंद घेण्यांत येईल.

म. हर्षकुमार रेलन
मा. महापौर साहेब मा.आयुक्त साहेब,प्रशासनातील सर्व अधिकारी वर्ग, नगरसेवक, पत्रकार बांधव,आज आपण ही जी विशेष महासभा कोरोना या विषयासाठी आणि पाणीपुरवठा या साठी घेतली. सर्व प्रथम मी आपले अभिनंदन करतो कारण ही सभा घेण्यांची गरज होती. आपण या कोरोनाच्या आपण सर्व जिल्हा प्रशासन, महापालिका प्रशासन ,पोलीस प्रशासन, आरोग्य प्रशासन या सर्वांनी अतिशय चांगले काम आता पर्यत केलेले आहे. म्हणून सर्वांनी अभिनंदन केले मला वाटते की मी अभिनंदन करावे म्हणून मी देखील अभिनंदन करतो. तसेच आपल्या मतदार संघाचे खासदार डॉ. बाबासाहेब भामरे हे स्वत: गल्लोगल्ली फिरलेले आहेत. आमचे भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल यांनी गोरगरीबांना दररोज 10 हजार फूड पॅकेटचे वाटप केले आहे. तसेच सर्व पक्षीय नगरसेवक यांनी कोरोनाच्या कालावधीत जे काम केलेले आहे त्या अनुषंगाने आपले धुळे शहर महामारी पासून चांगले

वाचलेले आहे असे मला वाटते म्हणून या सर्वांचे अभिनंदन करतो. याप्रसंगी अभिनंदन करीत असतांना काही सुचना देखील करणे महत्वाचे समजतो कारण कोणी चूकत असेल तर त्या सुधारण्यासाठी सुचना मदत ठरतील त्याचा अन्य अर्थ समजू नये. याठिकाणी सांगण्यांत आले आहे की, विषयांतर बोलू नये. याठिकाणी सुचना करतो की, १ मे महाराष्ट्र दिनी आमच्या प्रभाग क्रं.७ येथे मध्ये कोविड थर्मल सेंटरचे उद्घाटन केले. त्याठिकाणी मा.जिल्हाधिकारी सो. मा.महापौर सो. व मा. आयुक्त सो. हजर होते त्याठिकाणी आम्हा एकाही नगरसेवकाला बोलाविण्यांत आले नव्हते.ते शासकीय काम असतांना नगरसेवकांना का बोलाविण्यांत आले नाही. त्याबद्दल आम्हाला वाईट वाटले त्याबद्दल मी आपणास तसे कळविले देखील आहे. मला असे सांगावयाचे आहे की, तेथे सेंटर उभारल्यानंतर तेथे कोणीही लक्ष दिलेले नाही.असा स्पष्ट आरोप करीत आहे. तेथे मी दररोज जावून व्हिजीट करीत आहे.मी दररोज समन्वय ग्रुप मध्ये त्याबद्दल लिहितो आहे. त्याठिकाणी आज 5 पेशंट, आज 4 पेशंट आले, आज 13,12,10 पेशंट आले त्याबद्दल आपणजनजागृती करावयास पाहिजे महानगरपालिका प्रशासनाने कोणाची जबाबदारी निश्चित केली पाहिजे.घरोघरी जावून थर्मल स्कॅनींग केले होते ते 200 ते 250 पेशंट होऊ शकतात. 1 मे पासून आज 10 जून पर्यत 40 दिवस झाले तेथील आकडे पाहिजे तर माझ्या माहितीप्रमाणे 217 पेशंट तेथे तपासले गेले आहेत. म्हणजे रोजचा ॲव्हरेज 4 पेशंट तेथे तपासले गेले असा होतो. ऐवढी मोठी सुविधा तेथे निर्माण केली आहे सुविधा निर्माण करुन दिल्यानंतर तेथे कोणीही लक्ष दिलेले नाही. लक्ष कसे दिले नाही हे मी रोज आपल्याला रिर्पोटींग करीत आहे सर आज 4 पेशंट तपासले,आज 5 पेशंट तपासले गेले.असे एकही दिवस झाले नसेल मी आपणास सूचीत केले नसेल. मला असे वाटते की आपणास अशा काही गुप्त सुचना आहेत का की जास्त चेकअप करु नये.कारण रोज सांगून सुध्दा साधे एक उत्तरही मला दिलेले नाही. फक्त एकदा डॉ.मोरेचा फोन आला होता की भाऊ पेशंट कमी येत आहे असा आपला मेसेज येत आहे आपले म्हणणे काय असे त्यांनी फोन वरुन विचारले. मी त्यांना सांगितले की, आपण जनजागृती करावी. नाही मग त्यापेक्षा आपण सेंटर बंद करुन द्यावे का, मी म्हटले की हे चूकीचे होईल. ते मला उलट प्रश्न विचारता की आपण सेंटर बंद करुन देऊ का? उलट मी आपणास सुचित करतो आहे की 3 जून पासून 10 जून पर्यत एकही पेशंट आलेले नाही. दुसरा एक मुद्दा आहे तेथे जे डॉक्टर आहे त्यांनी विनामुल्य सेवा देण्यांचे मान्य केले होते. आपण त्यांना रोज एक पीपीई किट द्यावयास हवी होती. माझ्या माहिती प्रमाणे फक्त 6 पीपीई किट त्याठिकाणी उपलब्ध करुन दिले आहेत. त्यानंतर उपलब्ध केलेले नाही.मी सवत:आपणास कळविले आहे. त्यानंतरही तेथे पीपीई किट उपलब्ध करुन दिले नाही डॉक्टरांनी तेथे येणे बंद केले आहे. तुमच्या माहिती करता सांगतो की तेथे कुठलाही डॉक्टर येत नाही. 3 तारखेनंतर तेथे डॉक्टर आलेले नाही. नर्स येते ती देखील म्हणते मला कुठलेही साहित्य दिलेले नाही. एवढे मोठे दुर्लक्ष कशामुळे होत आहे. मला असे वाटते त्याठिकाणी अशा काही सुचना दिलेल्या आहेत का की येथे कमीत कमी टेस्ट करा. जास्त टेस्ट व्हावयास नको, जास्त टेस्ट केल्या तर रिझल्ट जास्त दिसतील. असे न करता कोरोनाचा पेशंट सापडल्यानंतर उपाय योजना करण्यापूर्वीच जर काळजी घेवून टेस्ट केल्या तर बरे होईल. तसेच डॉक्टरांना वेळोवेळी पीपीई कीटस उपलब्ध करुन द्यावे.तसेच जे सेंटर सुरु केले आहे त्यांची शहरात व प्रभागामध्ये नागरीकांसाठी जनजागृती करावी. लोकांना सांगितले नाही तर लोकांना कसे समजेल. मला स्वत:लाही वाटते आपण सर्व हे चांगले काम करीत आहे.मला स्वत:ला वाटते असे सांगावयास नको. परंतु जर सांगितले नाही प्रशासनाच्या चूका निदर्शनास कशा येतील याची नोंद घेण्यांत यावी व त्यात सुधारणा करण्यांत याव्यात.

म. अमीन पटेल

मा. महापौर सो. आयुक्त सो. सन्मा.नगरसेवक, अधिकारी, पत्रकार, छायाचित्रकारबांधव ज्या दिवसापासून कोविड 19 व पाणीपुरवठयाच्या विषयावर विशेष सभा आयोजित केली आहे. सर्वात प्रथम मी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना धन्यवाद देतो ज्या दिवसापासून कोरोनाची सुरुवात झाली आहे त्या दिवसापासून जमीन लेव्हलवर महानगरपालिकेचे सर्व कर्मचारी अहोरात्र काम करीत आहेत. आज धुळे जिल्हयामध्ये जोही कोरोनामुळे मयत होत त्या प्रेतासाठी लाकडे धुळे महानगरपालिके मार्फत पुरविण्यांत येत आहे. आपले मनपाचे डॉ. मोरे सो. व चंद्रकांत जाधव सो. यांना कोरोनामुळे मयत झालेल्या पेशंटची बॉडी ताब्यात घेण्यांसाठी चंद्रकांत जाधव साहेब यांना सही करण्यासाठी समक्ष जावे लागत आहे. दुसरी गोष्ट आपले हिरे मेडिकल कॉलेजचे सर्व डॉक्टर अतिशय मेहनत करीत आहे. काही चुका होतात. परंतु याही पेक्षा जास्त चांगले काम झाले पाहिजे. तसेच जुने सिव्हील हॉस्पीटलआहे तेथील डॉक्टरही चांगले काम करीत आहे. परंतु जे काम शहरात झाले पाहिजे तसे काम होत नाही. सर्वात प्रथम नागरीकांच्या मनात जी भिती निर्माण झालेली आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो. सर्वात प्रथम लोकांना अशी भिती निर्माण झाली आहे ज्याला कोरोना झाला की तो पेशंट मरतो ही भिती नाहीशी झाली पाहिजे. हे अत्यंत चूकीचे आहे. माझ्या मते टी.बी. / कन्सर पेक्षा कमी पेशंट कोरोनामुळे मयत होत आहे तरुण वर्गातील पेशंट फक्त भितीने मरत आहेत. आज 3 महिन्यांपासून जगातील व देशातील डॉक्टर कोरोना मध्ये काम करत आहेत. मग सर्व डॉक्टर मरत आहेत का? बरेच डॉक्टर पीपीई किट न घालता काम करत आहे ते मरत आहेत का? ब-याच डॉक्टरांना कोरोना झाला ते सर्व मरत आहेत का? लोकांच्या मनातील भिती कमी झाली तर हे प्रमाण कमी होणार आहे.शहरातील अनेकांना कोरोना झालेला असेलही परंतु ज्या लोकांची प्रतिकार शक्ती चांगली पॉवरफुल आहे त्यांचा कोरोना मुळे काहीच त्रास झाला नसेल.कोरोना हा आयुष्यभर राहील असे नाही.लोकांची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी सर्व नागरीकाच्या मनातील भय नाहीसे झाले पाहिजे. शरीरातील प्रतिकार शक्ती वाढण्यासाठी सकाळी एक अंडे खाल्ले पाहिजे. संत्री खाली पाहिजे आराम केला पाहिजे. चांगल्यात चांगले जेवण केले पाहिजे हे डॉक्टरांचे सांगणे आहे. संपूर्ण देशात याची जनजागृती झाली पाहिजे त्यामुळे नागरीकांच्या मनातील भय कमी झाला तर कोरोनावर मात करता येणे शक्य आहे.माझ्या घराचा पेशंट आहे त्यांचे निधन झाले तर त्यांचे घरचे नातेवाईक मयताला हात लावत नाही.आज आमच्या महानगरपालिकेचे कर्मचारी त्या प्रेताला उचलून कबर मध्ये टाकत आहेत/जाळत आहेत.माझ्या बरोबर राहणारा माझा मित्र आहे एक महिना अगोदर त्यांच्या मुलीचे डायलीसीस सुरु झाले तिला सिव्हील हॉस्पीटल मध्ये दाखल केले गेले. मी रात्रीच सांगितले होते की, तिची रोग प्रतिकार शक्ती कमी झालेली आहे हिला कोरोना होईल म्हणून ही सांगावयाची गोष्ट नाही परंतु सांगावी लागत आहे. ती कोरोना तपासणीत पॉझेटीव्ह रिपोर्ट आला. तिचे वडील, आई, बहिण यांची देखील टेस्ट केली गेली. सर्वात जास्त तिची आई जवळ असते तिचा रिपोर्ट निगेटीव्ह आला व दुस-यांचे पॉझेटीव्ह रिपोर्ट आले असे ही होत आहे.त्यासाठी आपण सोशल डिस्टसिंग ठेवले पाहिजे चांगले जेवण जेवले पाहिजे. मास्क लावावे.मी वर्तमान पत्रात वाचले हिरे मेडिकल कॉलेज जे आहे ते जवाहर मेडिकल कॉलेजच्या जागेत जात आहे असे वाचले.मी या संदर्भात निवेदन दिले की नॉन कोविड वार्ड हे हिरे मेडिकल कॉलेज येथे ठेवले पाहिजे.आणि कोविड वार्ड शहराच्या फायदयासाठी जुने सिव्हील हॉस्पीटलच्या जागेत ठेवले पाहिजे. त्याठिकाणी 400 बेडचे हॉस्पीटल सुरु होते. 400 बेडच्या जागेत आपले कोविड सेंटर सुरु करता येऊ शकते. आणि कोविडसाठी चांगल्यातले चांगले उपचार त्याठिकाणी करु शकतो. हे शहराच्या फायदयाची गोष्ट आहे. माझ्या प्रभागात मुंबई

येथून एक पेशंट आला तो कोरोना मध्ये 1 महिना अगोदर मयत झाला रमजान महिन्यांच्या 20 दिवस अगोदर मयत झाला. त्याच्या फॅमीलीतील लोकांची टेस्ट करण्यासाठी मी मोरे साहेबांना फोन करुन गाडी बोलविली. त्यांना जुन्या सिव्हील हॉस्पीटल मध्ये दाखल केले.6 लोक होते 6 लोकांपैकी एक व्यक्ती पॉझेटीव्ह निघाला. त्या व्यक्तीला महानगरपालिकेच्या गाडीने सिव्हील हॉस्पीटल मध्ये सोडले. तर तेथील त्या व्यक्तीचा मला फोन आला की, मला सिव्हील हॉस्पीटल मध्ये दाखल करुन घेत नाही. 4 तासानी मी स्वत: सिव्हील हॉस्पीटल मध्यें पोहचलो व विचारले की, हा पॉझेटीव्ह पेशंट आहे याला ॲडमिट का करुन घेत नाही. मला सांगितले की, हा जुन्या सव्हील मधील पेशंट आहे त्याला मी स्वत: जुन्या सिव्हील हॉस्पीटल मध्ये घेवून आलो. तेथे मला सांगितले की, याठिकाणी जागा नाही शिरपूरचे पेशंट येत आहेत तरी मी त्यांला त्या ठिकाणी ॲडमिट केले व स्पष्ट सांगितले की, हा कोविड पेशंट आहे. परंतु तेथील कर्मचा-यांनी त्याला ऑशुलेशन वॉर्ड मध्ये टाकून दिले. त्यावेळी त्याचा पुन्हा शॉब (नमुना) घेतला तर जो निगेटीव्ह आला आहे. त्यांचे घरातील लोक लगेच म्हणू लागले आमच्या मुलाची टेस्ट निगेटीव्ह आली आहे मग कसे पॉझेटीव्ह म्हणून सांगितले होते. त्यामुळे घरातील सर्व व्यक्ती घाबरुन गेलो होतो. म्हणून माझे म्हणणे आहे की रिपोर्ट निगेटीव्ह येवू शकतो, पॉझेटीव्ह येऊ शकतो. त्यामुळे लोकांच्या मनातील जी भिती निर्माण झालेली आहे. ती नाहीशी झाली पाहिजे. आपल्या महानगरपालिकेची टीम अतिशय चांगले काम करीत आहे. या बाबत मा. जिल्हाधिकारी सो. यांनी देखील जुने सिव्हील हॉस्पीटल येथे ठेवणेबाबत सांगितले आहे. नुकत्याच झालेल्या मिटींग मध्ये ठरले आहे की, जनरल पेशंट हे जवाहर मेडिकल कॉलेज येथे ठेवण्यांत येणार असून कोविड पेशंट हिरे मेडिकल कॉलेज येथे ठेवण्यांत येणार आहे. हिरे मेडिकल कॉलेज येथे सर्व प्रकारचे डॉक्टरर्स आहेत महाराष्ट्रात 2 नंबरचे हॉस्पीटल आहे.सदर ठिकाणी डिलेव्हरी सर्जन आहे, डेंन्टल सर्जन आहेत, अर्थो सर्जन आहेत. नॉन कोविड वॉर्ड जर जवाहर मेडिकल येथे केले तर शहरातील नागरीकांचे फार मोठया प्रमाणावर हाल होणार आहे. जवळ आपले पूर्वी हॉस्पीटल चालत होते त्याठिकाणी 400 बेडचे हॉस्पीटल चालत होते. नवीन जागा शोधत आहेत.परंतु जुने सिव्हीलच्या ठिकाणी आपले हॉस्पीटल आहे. तेथील रुम उघडले व साफसफाई केली तर शहराच्या मध्यवती ठिकाणी कोविड 19 चा इलाज होऊ शकतो.कोविड 19 साठी फारच सिरियर्स पेशंट राहिला तर त्याला ऑक्सीजन लागेल, व्हेटीलेटर लागेल, आज 70 ते 90 टक्के पेशंट नॉर्मल पेशंट निघत आहेत. त्यांना टॅब्लेट देऊन बरे होऊ शकतात. नार्मल पेशंटसाठी 400 बेड चे हॉस्पीटल जनु सिव्हील येथे सुरु होऊ शकते. चांगल्या उपचार करणेसाठी हिरे मेडिकल कॉलेज येथे 30 बेड टाकून त्याठिकाणी चांगला उपचार करता येऊ शकतो आय.सी.यु. फक्त हिरे मेडिकल कॉलेज येथे सुरु ठेवण्यांत यावे.कोविड उपचार करणेसाठी सिव्हील हॉस्पीटल,हिरे मेडिकल कॉलेज तसेच महानगरपालिका यांचा आपसात ताळमेळ असणे फारच आवश्यक आहे. तसेच शिरपूर व आजू बाजूचे पेशंट येथे येत आहे त्यांचा मृत्यू झाला तर त्यांचा अंत्यविधीसाठी आवश्यक असलेले लाकडे व इतर साहित्यासाठी तहसिलदार व नगरपालिकेतून फोन येतात. त्याना देखील लाकडे व साहित्य आपले महानगरपालिकेमार्फत पुरविण्यांत येतात.परंतु सहा.आरोग्याधिकारी श्री. चंद्रकांत जाधव यांचे म्हणणे आहे की, आम्हाला तसे ऑर्डरर्स नाही. आपण त्यांचेकडून लाकडे मागितले तर आरोप होतील. आजही दोन पेशंटचा मृत्यू झाला आहे बाहेरगावावरुन लाकडे ते आणू शकत नाही. पीपीई किट त्यांना दयावे लागेल . जाधव साहेब यांना सांगितले की, बाहेरुन लाकडे आणून दयावे तर आपल्या महानगरपालिकेची बदनामी होईल. आज बाहेरगांवावरुन येणा-या पेशंटसाठी लाकडे आपल्या मनपातर्फे

लाकडे देण्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. आज आमचे चंद्रकांत जाधव, आयुक्त साहेब, गिरी साहेब, गोसावी साहेब हे सर्व अधिकारी रात्री जरी फोन लावला तरी फोन उचलत आहेत. व फारच चांगले काम करीत आहेत. रात्री बे रात्री येवून साहित्य पुरवित आहेत.महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी काम अहोरात्र करत आहेत. ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. ऐवढे बोलून माझे भाषण संपतो. धन्यवाद...

म.महापौर अमिन भैय्या आपण सुरुवातीपासून सिव्हील हॉस्पीटल येथील पेशंटासाठी सेवाभावी वृत्तीने चांगले काम करीत आले आहांत.आमच्या मराठी मध्ये जसे कर्मभूमी अशी म्हण आहे. आपल्यामुळे या सभागृहाला अतिशय महत्वपूर्ण माहिती मिळाली आहे. त्याबद्दल आपले आभार. आपल्या सुचनांचा विचार करण्यांत येईल.

म. हिरामण गवळी सन्मा.महापौर साहेब आयुक्त सो.सर्व अधिकारी गण,नगरसेवक, पत्रकार बांधव, कोविडच्या विषयामध्ये जगभरामध्ये समस्या निर्माण झाली आहे. आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी साहेब यांनी 25 मार्च रोजी लाकडाऊनची घोषणा केली जगामध्ये 2 नंबर लोकसंख्या असलेल्या भारत देश, परंतु त्यांनी घेतलेल्या निर्णयावर आजपर्यत अनेक पेशंट कमी प्रमाणांत होते. 45 ते 48 टक्के पेशंट परंतु धुळे शहराच्या विषयामध्ये आपण सर्व अधिकारी, कर्मचारी , नगरसेवक सामाजिक संस्था या सर्वांनी या देशामध्ये चांगले काम केलेले आहे.आता जो विषय आलेला आहे. हर्षकुमार रेलन यांनी विषय घेतलेला आहे तो खरोखर बरोबर आहे. आपण लोकांसाठी तपासणी केंद्र सुरु केले आहे, परंतु लोक खरच येत नाही 9 नंबर शाळेजवळ पाचशे रुपये घेण्यासाठी रांगेत लोक बॅकेमध्ये येतात. त्यांना बळजबरीने तपासणीसाठी नेले. माझी अशी विनंती आहे लोकांना फुकटचे राहिलेकी लगेच जातील. आणि सांगायला गेलो, नगरसेवकाने सांगू द्या किंवा कोणी सांगू येणार नाही. जोपर्यत त्याला आजार होत नाही तो पर्यत जात नाही. माझी अशी विनंती आहे की, सरकार फूकटच धान्य देत आहे. काही 3 रुपये किलोने देत आहे काही 2 रु. किलोने देत आहे. माझी विनंती आहे आयुक्त सो. आपण असा प्रयत्न केला जिल्हाधिकारी साहेब यांना सांगून की, ज्याने जोपर्यत सदर आजाराची तपासणी केली आहे असा शिक्का असल्याशिवाय त्याला रेशन देऊ नये.सर्व लोक रांगा लावतील. आणि ती करणे गरजेचे आहे कारण लोक येथे रांग लावत नाही आणि जुन्या सिव्हील मध्ये ज्यांना वाटते की, आपण तपासणी केली पाहिजे ते सायंकाळी 5 वाजे पर्यत रांगत उभे राहतात. आणि हे जे कर्मचारी लावून आपण जी सोय केली आहे. तेथे तपासणी करणेस येत नाही. आयुक्त सो. तपासणी करणे गरजेचे आहे. असे आपण केले तर 15 दिवसांत संपूर्ण शहराची तपासणी होऊ शकते. ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. लोकांवर ज्या वेळेस वेळ येते त्यावेळेस लोक तपासणीसाठी पळापळ करतात. कारण त्याला माहित पडते एकाला आजार झाला तर सर्व कुटुंबाला होईल. त्यासाठी अगोदरच तपासणी केली तर चांगले होईल. तसेच आरोग्य ॲप सेतू आहे भारतीय जनता पार्टी पंतप्रधानांनी काढलेला त्यामध्ये सुध्दा तुमच्या आजू बाजूला 300 कि.मी. 500 कि.मी पर्यत किती पेशंट आहे याबाबत देखील माहिती कळू शकते.सदर ॲप भाजपाचा जरी असला तरी आरोग्याच्या दृष्टीकोनातून पंतप्रधान ॲप असल्याने तो सर्वांनी डाऊन लोड करावयास सांगावे.अशी विनंती करतो. कोविडच्या विषयामध्ये चांगले काम सुरु होते.परंतु लॉकडाऊन उघडलाआणि लोकांची गर्दी दुपार पर्यत चालू झाली. पेशंट सापडत आहे आपल्याला काही वेळा स्वतंत्र महापालिकेच्या आयुक्तांना किंवा महापौरांना हा लॉकडाऊन पुन्हा 2-3 दिवस सुरु करावा लागेल अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. कारण दररोज 15-20 पेशंट सापडत आहे ते तपासणीसाठी जात आहे म्हणून सापडत आहे.जर सर्वांची तपासणी केली तर आपल्याला पेशंटसाठी

दवाखाने पूरणार नाही अशी अवस्था येणार आहे म्हणून त्यासाठी या दोघी गोष्टी करणे आवश्यक आहे अशी सुचना मांडतो धन्यवाद...

म. प्रतिभाताई चौधरी — मा. महापौर सो. आपण कोरोना या विषयावर महासभा लावली त्याबद्दल आपले अभिनंदन. काही दिवसापूर्वी माझ्या प्रभागात कोरोना रुग्ण आढळला. जयहिंद कॉलनी परिसरात सदर रुगण वास्तव्यास होता. तथापि सदर रुग्ण राहत असलेल्या भागातच फावरणी करण्यांत आली. परिसरातील नागरीक भयभीत होतात त्यामुळे संपूर्ण गल्ली कॉलनी मध्ये व आजू बाजूच्या भागात फावरणी करणे आवश्यक आहे. त्याच परिसराच्या जवळ सायंकाळी डोसा विकीची गाडी सुरु असते. तेथे लोकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. कंन्टेनमेट झोन मध्ये अशा प्रकारे गाडी लावणे कायदेशीर आहे का? यावर कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच विवाह समारंभासाठी 50 लोकांची परवानगी देत आहोत. अनेक ठिकाणी 50 पेक्षा जास्त लोक उपस्थित असतात. अनेकदा त्याठिकाणी बाहेरगांवचे नागरीकही उपस्थित असतात त्यामुळे संसर्गाचा धोका मोठया प्रमाणावर वाढू शकतो त्यासाठी 50 पेक्षा जास्त लोक राहिले तर दंड करावा. कंन्टेमेट क्षेत्रात व शहरात वैद्यकीय तपासणीसाठी कर्मचारी नियुक्त केलेले आहेत त्यांना सवसंरक्षणार्थ साहित्य देण्यांत यावे. तसेच त्यांचा व मनपाच्या सर्व कर्मचा-यांचा विमा काढण्यांत यावा.

म. संतोष खताळ — प्र.क्रं. 16 मध्ये पॉझेटीव्ह रुग्ण सापलेले आहेत. फावरणी अधिक गतीने होण्यासाठी फावरणी टॅक्टरची संख्या वाढविण्यात यावी. आमच्या भागातील माजी नगरसेविका सौ. माधवी नेंमाने यांनी स्वखर्चाने फावरणीसाठी पंप उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यांचे मी या ठिकाणी आभार व्यक्त करतो. ज्या भागात पेशंट सापडले त्या भागात सॅनिटायझेशन करण्यांत येते. त्याठिकाणी 2-3 वेळेस फावरणी होणे आवश्यक आहे.आपण वैद्यकीय तपासणीसाठी ऑक्सीमिटर दिलेले आहे. त्यांची संख्या वाढविण्यांत यावी. तसेच शाळा नं. 28 येथे मनपा दवाखाना आहे. त्याच प्रमाणे चितोड गावातही दवाखाना सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी.

म. महापौर — याठिकाणी माजी नगरसेविका सौ. माधवी नेमाणे यांनी खरोखरीच चांगले काम केलेले आहे. त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो.

म. उमेर अन्सारी — कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजना महानगरपालिकेमार्फत चांगल्या रितीने करण्यांत येत आहे. परंतु भागात एकदा फावरणी झाल्यानंतर दुसरेदा होत नाही यासाठी 2-3 वेळेस फवारणी झाली पाहिजे.परत संसर्ग वाढून रुग्ण सापडणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच कोरोना परिस्थितीमुळे संपूर्ण देशाची व शहराची आर्थिक परिस्थिती बिघडलेली आहे. अल्पउत्पन्न गटातील नागरीक हालाखीचे दिवस काढीत आहेत.अशा परिसिथतीत आपण मालमत्ता कर माफ करावा किंवां त्यात 50 टक्के सवलत द्यावी जेणे करुन लोकांना दिलासा मिळू शकेल.

म. महापौर — सर्व प्रथम श्री.सुनिल भाऊ बैसाणे यांनी अतिशय चांगला विषय घेतला की,आयुर्वेदिक दवाखाना आपला सुरुवाती पासून सुरु आहे.परंतु आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून तेथे चांगल्या सुविधा देण्यासाठी त्यांनी शासनाचे जे जी.आर. आलेले आहेत. त्यांची प्रत दाखविली आहे. त्या शासन निर्णयाच्या माध्यमातून सदर दवाखान्याच्या ठिकाणी चांगला निधी प्राप्त होऊ शकतो. चांगलया सुविधा देता येतील. या विषयावर आयुक्त साहेब बोलल्यावर मी सविस्तर बोलणार आहे. कोरोना संदर्भात महानगरपालिका प्रशासनाने तसेच महापौर, नगरसेवक अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी कशा प्रकारे सेवा - सुविधा उपलब्ध दिल्या याबाबत सविस्तर माहिती उपायुक्त श्री. गोसावी साहेबांनी सभागृहास द्यावी.

म. उपायुक्त गोसावी — मा.महापौर साहेब यांच्या आदेशानुसार धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत कोविड 19 या आजाराच्या प्रतिबध्दासाठी व त्याचा प्रसार रोखण्यासाठी जी काही कार्यवाही

केलेली त्याबाबतचा थोडक्यात गोषवारा आपणास सांगतो.आपणास माहित असेल की सर्वसाधारणस जानेवारी महिन्यामध्ये या आजाराचा प्रादुर्भाव आहे तो आपल्या लगतच्या चीन या देशामध्ये चालू झाला आणि हळू हळू त्यांचे स्वरुप संपूर्ण जगभरात पसरत गेले. मला सांगावयास खूप आनंद वाटतो की, साधारणत: फेब्रुवारी महिन्याचा पहिला आठवडा असेल या विषयावर पेपर मध्ये बातम्या छापून येत होत्या की चीन असे आहे त्यावेळेस आमचे आदरणीय आयुक्त महोदयांनी या आजाराचा थोडा अंदाज बांधला होता आणि त्यावेळेस आपले आयएमए चे जे काही डॉक्टर्स असतील आमचे मेडिकल ऑफिसर्स आणि आपली आरोग्य यंत्रणा वास्तविक त्यावेळेस आपल्या भारतात या रोगाचा एकही पेशंट नव्हता. अशा वेळी मा.आयुक्त महोदयांनी एक समन्वय बैठक बोलाविली आणि त्या आजाराचे काय स्वरुप आहे आणि हा आजार भारतात आला किंवा धुळयांत आला तर त्यांची काय खबरदारी घ्यावी लागेल त्याबाबत उहापोह व चर्चा त्यावेळी केली होती.मला सांगायला आनंद वाटतो की, पहिल्यापासूनच अतिशय चांगले दूरदृष्टीने निर्णय घेतले. कठोर निर्णय घेतले आणि त्याचा फायदा असा झाला की, 20 एप्रिल पर्यत आपले शहर कोरोना मुक्त होते. आम्हाला सांगायला खूप आनंद वाटायचा बाकीच्या नगरपालिका, महानगरपालिका यांचे फोन यावयाचे की, 20 एप्रिल पर्यत तुमचे शहर कोरोना मुक्त होते तर त्यासाठी तुम्ही काय करीत आहांत. आम्ही आपल्याकडे ज्या काही उपाय योजना करत होतो.आपण जे काही लॉकडाऊन स्टीकली पाळत होतो.कन्टेंमेटची जी काही व्यवस्था असेल ते आपण प्रभावीपणे राबवित होतो. आणि लोकांमध्ये या विषयावर खूप जनजागृती झाली होती. विशेषत: जी काही प्रिंट मिडिया, आणि इलेक्ट्रानिक मिडिया यांचे आभार मानेल. त्यांनी अतिशय सकारात्मक संदेश लोकांमध्ये पोहचविला. त्यामुळे आपण २० एप्रिल पर्यत लॉकडाऊन मध्ये यशस्वी ठरलो होतो. आपण या विषयावर बोलणे चूकी होईल परंतु काही लोकांचा या आजाराच्या संपर्कात आल्यामुळे ही पेशंटची संख्या वाढयला लागली. आणि ज्यावेळी आम्हाला असे जाणवू लागले की पेशंटची संख्या वाढत आहेत त्यावेळी आम्ही आमची कार्यक्षमता दुपटीने वाढविली. त्यामध्ये आपली कंन्टेन्मेंटची जी काही रचना असेल कंन्टेन्मेंट मधला सर्व्हे असेल, पेशंटच्या संपर्कात आलेले हाय रिस्क लो रिस्क व्यक्ती असतील हाय रिक्स मधील लोकांना मेडिकल कॉलेज आहे सिव्हील हॉस्पीटल आहे येथे सॉब टेस्टींगसाठी पाठविणे सॉब टेस्टींग मध्ये तो जर पॉझेटीव्ह आला तर त्यांची पुढची उपचार यंत्रणा याबाबत आमची संपूर्ण आरोग्य यंत्रणा आरोग्याधिकारी, आमचे स्वच्छता निरीक्षक सहा. आरोग्याधिकारी , हे सर्व अलर्ट होतो महापौर साहेब अजून एक बाब सांगायला आनंद होतो की, विशेषत: एसआरपी मधील एक व्यकती पॉझेटीव्ह आढळला जे काही ५०० क्वॉर्टस, २०० रुम क्वॉटर्स होते त्यावेळी आम्हा भिती वाटायला लागली जे कर्मचारी आपल्या सर्वाचे संरक्षणाची जबाबदारी घेत आहे त्याठिकाणी असे झाले त्यावेळी आमच्या आयुक्त साहेब यांनी त्यांचे कमॉनडींग आफिसरर्स यांची भेट घेतली आणि तेथील मेडिकल ऑपिसर्सची सेवा आपण अधिगहित केली जेणे करुन एसआरपीच्या अधिक प्रोटेक्ट कसे करता येईल याची खबरदारी आपण घेतली. तेथे जो काही प्रादुर्भाव वाढलेला होता तो आता कमी झालेला आहे. त्याबाबत आपण जी काही यंत्रणा उभी केली आहे. थर्मल स्क्रेनींग, ऑक्सीमिटर, हे ब-यापैकी विकत घेतले आहे. जवळपास २८८ कर्मचारी आणि ७८ युनिट काम करीत आहे. तसेच सॅनिटायझरसाठी आपल्याकडे ३ वाहने आहे त्यासाठी आरोग्य यंत्रणा स्वतंत्रपणे काम पहात आहे. आणि जे जे काही साहित्य आरोग्य विभागाला आवश्यक आहे ते आयुक्त महोदयांनी तांतडीने उपलब्ध करुन दिले आहे. महापौर सो. आता जे काही नगरसेवकांनी प्रशासनाच्या बाबतीत काही प्रश्न

उपस्थित केले आहेत.त्याबद्दलही मी थोडी फार माहिती देऊ इच्छितो,मा.स्थायी समिती सभापती श्री. सुनिल भाऊ बैसाणे यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला आहे, आपल्याकडे जे आयुर्वेदीक हॉस्पीटल आहे त्याबाबत आपण जो प्रस्ताव सूचविला आहे त्याबद्दल प्रशासन अंत्यत जागृक आहे. आम्ही तांतडीने याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांचेकडेस ठेवू आणि मला खात्री आहे मा. आयुक्त सो. हे त्या प्रस्तावास तांतडीने मान्यता देतील. आणि योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविण्याची व्यवस्था करु. तसोच सन्मा. नगरसेविका सौ. वंदनाताई भामरे यांनी हा विषय मांडला की,सफाई कर्मचारी यांना सुरक्षिततेसाठी पीपीई किट उपलब्ध झालेले नाही.ताई मी आपणास आवर्जून सांगतो की, आम्ही आरोग्य कर्मचा-यांना साहित्य दिलेले आहे. ते वापराबाबत ते तेवढे जागृक नसावे. किंवा दिलेले नसेल तर ते तांतडीने देण्याबाबत व्यवस्था करु.कर्मचारी वापर आहेत किंवा नाही याबाबत आरोग्याधिकारी यांनी खात्री करावयाची आहे. तसेच शितलभाऊ यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला होता की, एम.आय.डी.सी. मध्ये जे काही अद्ययावत युनिट आहे. त्यामध्ये आपल्याला कोरोना १९ च्या युध्दामध्ये लढण्यासाठी आहे ते बनविले आहे डॉ. मोरे यांनी याबाबत जी खरेदी प्रक्रिया राबवावयाची आहे त्यास आयुक्त सो. यांची मान्यता घेवुन त्याबाबत तांतडीने कार्यवाही सुरु करु. एम.बी.बी.एस. डॉक्टरांची बदली करणे , नवीन ठिकाणी ओपीडी चालू करणेबाबत आणि बजेट यासाठी आरोग्यावर जास्तीत जास्त खर्च करण्यांबाबत दखल घेवू, प्रशासन तांतडीने कार्यवाही करेल. आणि बंदीभाऊ मासुळे यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला की, कर्मचा-यांना सुरक्षा विषय कवच देणे , याबाबत आम्ही फाईल पुटअप् केली आहे.जीआर पण आहे. परंतु जीआर बाबत थोडी अस्ण्ष्टता असल्यामुळे याबाबत आम्ही पत्रव्यवहार करु आणि आरोग्य कर्मचा-यांना विमाचे कवच देण्यासाठी सर्तक राहू. तसेच होमीओपॅथी गोळया आहेत त्या सर्वानापर्यंत पोहचविण्याचा प्रयतन करु.महिला नगरसेवकांनी जो काही मुद्दा मांडला आहे. तेथे व्यवस्थित सुरु आहे परंतु तेथे नागरीक येत नाही आहेत कदाचित - कमी पडत असेल तर मी त्या भागातील आरोग्याधिकारी व कर्मचारी यांना मी त्याबाबत सुचना देईल. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की आपली आरोग्य यंत्रणा इतकी सर्तक आहे आरोग्यासंबंधी ते काही काम करतो आहे आपल्याकडे आस्थापनावरील कर्मचारी कमी आहेत या परिसिथतीतही आम्ही नागरीकांना चांगल्यात चांगल्या प्रकारे सेवा कशी दिली जाईल आणि आपल्या विश्वासास पात्र ठरेल असे आम्ही अहोरात्र काम करत आहोत.उलट आम्ही शासकीय सुटी देखील घेतलेली नाही.शनिवार रविवार सुटी पाहिजे असे ही कोणी म्हणत नाही २४ तास आमचे काम सुरु आहे. हे करत असतांनाही आमच्यातील काही त्रुटी असतील तर त्या सुधविणेची दक्षता घेण्यांत येईल. आमच्या कामाच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करु आणि आपल्याला समाधान होईल आणि एकुणच धुळे शहरातील नागरीकांचे आरोग्य कसे अबाधीत राहील याबाबत अत्यंत कार्यक्षमपणे काम करण्यांचा प्रशासनाकडून प्रयत्न करु.

म. महापौर यासंदर्भात मा. आयुक्त सो. बोलतील.

म. आयुक्त सो. जवळपास कोरोनाच्या विषयासंदर्भात आपण १- १.५ तासापासून चर्चा करतो आहे.सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चेत सक्रीय सहभाग घेतलेला आहे.अनेक चांगले मुद्दे याठिकाणी उपस्थित झाले आहेत. सभेच्या सुरुवातीला काही सन्मा. सदस्यांनी प्रशासनाचे, जिल्हा प्रशासनाचे, पोलीस प्रशासनाचे आभाराचे ठराव त्यांनी मांडलेले आहेत. त्याबद्दल मी प्रशासनाच्या वतीने आभार मानतो. महापौर महोदय मला त्यामध्ये असे वाटते आहे की, आपण तो ठराव मांडलेला आहे तो थोडा अपूर्ण आहे कारण या युध्दामध्ये आपल्या सभागृहामधील सर्व सन्मा. पदाधिकारी आहे आपण स्वत:आहांत, सभापती महोदय आहेत,उपमहापौर आज आलेल्या नाही.

सभापती मॅडम, विरोधी पक्ष,आणि सर्वच सन्मा. सदस्य आहे यांनी अतिशय हिरीरीने असा सक्रीय सहभाग घेतलेला आहे.शहरामधील एनजीओ यांनी अतिशय चांगला सहभाग घेतलेला आहे.जवळपास सर्वच राजकीय पक्षानी आणि त्यांच्या पदाधिका-यांनी सहभाग घेतलेला आहे. त्यामुळे आपण सगळयांचे निश्चितपणे आभार मानू व धन्यवाद देऊ. आता आमच्या प्रशासनाच्या वतीने काही मुद्दयांवर आमचे डेप्युटी कमिशनर यांनी उत्तर दिले आहे. आणि या महामारीवर कशा पध्दतीने उपाय योजना करत आहोत. याबाबत आमचे सर्व पत्रकार बांधव यांनी आपल्यापर्यंत चांगल्या पध्दतीने पोहचविले आहे. त्यांचे पुन्हा रेप्युटेशन मी करणार नाही. खरे म्हणजे आपल्या जनरल बॉडीची मिटींग जवळपास अडीच ते तीन महिन्यांनंतर होत आाहे. ब-याच वेळा अधिका-यांचे असे असते की, मिटींग न झालेली बरी परंतु माझे वैयक्तीक मत असते की, मिटींग वेळच्या वेळी झाल्या पाहिजे.ज्या वेळी मिटींगा होतात त्यावेळी चार गोष्टी आमच्याही आम्हाला कळतात. काही सुचना आम्हाला त्यामधून प्राप्त होत असतात.आणि त्यामुळे आपली प्रक्रिया त्यामुळे अतिशय पारदर्शक होत असते. आम्ही जास्त इन्फ्रुड होत असते असे माझे व्हिजन आहें. आणि त्यामुळे आपण आज ही बैठक घेत आहोत.महापौरांना प्रशासनाच्या वतीने धन्यवाद देतो कारण आपल्याकडे एक अडचण आली होती कारण आपला जो मनपाचा हॉल आहे त्याठिकाणी सोशल डिन्टर्सींगचा विचार करता तेथे जागा अपूर्ण होती.त्यामुळे आम्ही थोडेसे विचारामध्ये होतो आणि महापौर महोदया व आम्ही सर्वानुमते याठिकाणी मिटींग घ्यावयाचे ठरविण्यांत आले. हा हॉल २-३ वेळेस सॅनिटायझींट केंलेला आहे.आपण याठिकाणी सर्व दक्षता घेतलेली आहे. तरी पण सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करीन आपण यापुढे सुध्दा सार्वजनिक ठिकाणी जातांना किंवा आपल्या हद्दीमध्ये काम करतांना दक्षता घ्यावी .आपण सुरक्षित राहणे गरजेचे आहे तसेच दुस-यांनाही सुरक्षित ठेवणे तेवढच गरजेचे आहे. या सभागृहात काही जे मुद्दे उपस्थित झालेले आहे. गोसावी साहेबांनी त्याबाबत माहिती दिलेली आहे त्याबाबत थोडासा आढावा घेतो.बैसाणे साहेब यानी हॉस्पीटलचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.त्यावर पण चर्चा झालेली आहे जो जीआर आणला होता तो आम्ही वाचलेला नव्हता तो आपण आमच्या निदर्शनास आणून दिला.त्या जी.आर. प्रमाणे मा.खासदार महोदयांची सुध्दा भेट घेवू आणि एक प्रस्ताव तयार करु त्यामध्ये आपणाला शासनाकडून अद्ययावतीकरणासाठी मदत मिळत असेल नक्कीच घेवू.तो प्रस्ताव लवकरच तयार करुन घेतो. नंतर नाना कर्पे यांनी कर्मचा-यांचे कौतुक केले. आपले लक्ष्मण पाटील व इतर कर्मचारी खरोखरच कौतुकास पात्र आहेत.कारण आपण सुरवातीपासून फवारणी वगैरे कामास प्राधान्य दिले आहे. तसेच उमेर भाई यांनी केलेली सुचनेनुसार फवारणीचे शेडयुल तयार केले पाहिजे. आपण फवारणीचे शेडयुल तयार केले होते.ज्यावेळी आपल्याकडे कोरोना नव्हता त्यावेळी शेडयुल प्रमाणे फवारणी केली जात होती. परंतु नंतर कोरोनाच्या केसेस दिसू लागल्या व त्याप्रमाणे कंन्टेमेंट क्षेत्र घोषित केले जावू लागले त्याप्रमाणे त्या त्या कंन्टेमेंट क्षेत्रात फवारणीस प्राधान्य दयावे लागले. तरी आपल्या सूचनेप्रमाणे फवारणीचे शेडयुल तयार केले जाईल. तसेच सर्व सदस्यांना माझी विनंती असेल की, जेथे कंन्टेमेंट क्षेत्र असेल त्याठिकाणी फवारणीस प्राधान्य दिले जाईल. एक दोन सदस्यांनी तसेच प्रतिभाताई चौधरी आपण देखील सांगितले की, कंन्टेमेंट क्षेत्रात अद्याप फवारणी होत नाही .लक्ष्मण पाटील याठिकाणी असतील तर त्यांनी एक फावरणीचा कार्यक्रम ठरवून घ्यावा मोरे सो.यांनी ज्याठिकाणी पेशंट सापडत आहेत. त्याठिकाणी तांतडीने तपासणी करणे बाबत आपल्या कर्मचा-यांना सुचना कराव्यात.आणि तो भाग तांतडीने सिलींग करुन घेतला पाहिजे तसेच कंन्टमेंट क्षेत्र म्हणून जाहीर केले गेले पाहिजे.आणि त्या ठिकाणी फवारणीही केली गेली

पाहिजे. तसेच एक घर फवारणी न करता संपूर्ण ती गल्ली फवारणी केली पाहिजे. साधारण १५० ते २०० घरांचा परिसर तांतडीने फवारणी करुन घ्यावा. आपल्याकडे ब-यापैकी यंत्रणा आहे आपण ब-यापैकी यंत्रणा सक्षम करण्यांचा प्रयत्न केला आहे. तरी काही सन्मा. सदस्यांनी सुचना केलेल्या आहेत. की जास्त क्षमतेचे मशिन घेणे आवश्यक आहे. आपण त्याचाही विचार करु. आणि जास्त क्षमतेचे मशिनरी बाजारात उपलब्ध असतील तर तेही खरेदी करु. कारण सध्या आपल्याकडे पेशंटस वाढत आहेत. आपण सुरुवातीस ब-यापैकी जरी कंट्रोल केले होते. परंतु त्यानंतरही लागण झालेली आहे. तसेच लॉकडाऊन घडणेत आलेले आहे. त्यामुळे पेशंटची संख्या वाढत आहे. आपण ब-यापैकी प्रयत्न करत आहोत. तरी सुध्दा आपण आपली यंत्रणा सक्षम करण्यांचा प्रयत्न केला पाहिजे. आयुर्वेदीक दवाखान्याबाबत प्रदीप कर्पेबोलले तो मुद्दा मी परत रिपीट करीत नाही. सभापती साहेब सुध्दा बोलले आहेत. धामरे मॅडम यांनी क्युवड क्लिनीकचे आपण एक क्युवड क्लिनीकचे उद्घाटन केले होते. आपल्याकडे मेडिकल ऑफिसरांची संख्या अपूर्ण असल्यामुळे आपण शहरातील निमा किंवा आयएमए संस्था आहे यांना विनंती केलेली आहे. की आमच्या ज्या शाळा आहेत त्याठिकाणी आम्हाला स्टेज देऊ, इन्फास्ट्रक्चर देऊ, परंतु मेडिकल ऑफिसरर्स वगैरे जो काही स्टाप लागणार आहे तो निमाने द्यावा अथवा आयएमए ने दयावा अशी आपण त्यांना विनंती केली होती त्याप्रमाणे त्यांनी आपणास सकारात्मक प्रतिसाद दिलेला होता. त्याप्रमाणे आपण १० क्युवड क्लिनीक सुरु केलेले होते.आणि अजून सुरु करावयाचे आहेत. परंतु जे क्युवड क्लिनीक बंद झालेले असतील ते पुन्हा सुरु करण्यासाठी डॉ. मोरे यांनी निमाचे व आयएमएचे अधिका-यांना माझ्याकडे बोलावून घ्यावे महापौर साहेब आपण पुन्हा त्यांची बैठक घेवून ते सेंटर सुरु करु.जे अदर ऑपरेशन असतील ते पुन्हा चालू करुन घेणे गरजेचे आहे. आणि प्लूवर क्लिनीक चालू करुन घेणे गरजेचे आहे.रेलन साहेब आपण दवाखान्याच्या उद्घाटनाला न बोलविल्याचा मुद्दा उपस्थित केला होतो.सदर कार्यक्रम अत्यंत घाई मध्ये केल्या असल्यामुळे सदस्यांना कळविले गेले नाही त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो.आपण जुने व जानते नगरसेवक आहांत आमची आपणास नम्र विनंती आहेआपल्या प्रभागामध्ये आपला लोकांशी चांगला संपर्क आहे. जास्तीत जास्त नागरीकांना प्युवर क्लिनीक पर्यंत पोहचवावे अशी मी आपणास विनंती करतो आणि सर्व सन्मा. सदस्यांनाही विनंती करतो. नंतर आपण दुसरा मुद्दा उपस्थित केला होता त्यांना पीपीई किट वगैरे बाबत तर मोरे साहेब आपण पीपीई किट व इतर साहित्याबाबत त्यांची तक्रार येणार नाही यांची दक्षता घ्यावी. कारण आपणही काही पीपीई किट घेतलेले आहेत बरेचसे एनजीओ मार्फत आपणास उपलब्ध झाले आहे. एनजीओनी सुरुवातीच्या काळात पीपीई किट उपलब्ध करुन दिले आहेत तसेच काल एकनाथजी शिंदे साहेब यांनी काही फॅक्टर पाठविलेले आहे. महापालिकेच्या वतीने आपण सर्व एनजीओ तसेच हे जे दाते आहे त्यांचे आभार व्यक्त करुया. नंतर नवले साहेब आपण मुद्दा उपस्थित केला ते क्लिनीकच्या संदर्भात ते लिनियनचे आहे का. ३-४ दिवसापूर्वी ते माझ्याकडे आलेले होते. त्यांनी त्यांच्या युनिटच्याबाबत माहिती दिलेली आहे. मी गोसावी साहेब व मोरे साहेब यांना त्याच दिवशी सुचना दिल्या की, एमआयडीमध्ये जावून ते प्रॉडक्टची पहाणी करुन या. माझ्या वाटते आमचे अधिकारी जावून आलेले आहेत. ते युनिट आपण बघितलेले आहे त्यामध्ये वेगळे वेगळे प्रॉडक्ट त्यांनी तयार केलेले आहे. ते आपल्या शहरातले आहेत जरी त्यांचा व्यवसाय वगळया असला तरी कोविडच्या दृष्टीने काही युनिट बनविलेले आहेत. विशेषत: त्यामध्ये ओपीडी जे आहेत ओपीडी मध्ये ब-याचशा ठिकाणी लोक कोरोना सदृष्ट होवून जातात ते टाळण्यासाठी त्यांनी दक्षता ठेवून ते ओपीडी युनिट बनविलेले आहेत. ते घेण्यांचा

आपण निर्णय घेतलेला आहे.त्यांची फाईल तयार करण्यांस सांगितले आहे त्या फाईला गती देतो. फवारणीसंदर्भात बोललो आहे. तसेच व्यायाम शाळेच्या ठिकाणी ओपीडी सुरु करण्याबाबत सुचविलेले आहे. आपल्या ज्या शाळा आहेत त्याठिकाणी आपण प्युवर क्लिनीक सध्या सुरु करण्यांचा निर्णय घेतलेला आहे. सध्या आपण त्यावरच भर देऊ. सॉप कलेक्शनची यंत्रणा महापालिकेची असावयास पाहिजे यात दुमत नाही. त्यांची आपण तयारी सुध्दा केलेली आहे. आपण आपले मेडिकल ऑफिसरर्स आणि स्टॉपला हिरे मेडिकल कॉलेज येथे पाठवून तेथे त्यांचे ट्रेनिंगही घेतलेले आहे. काल आमची कलेक्टर साहेबांशी चर्चा झालेली आहे तसे पेशंट पूर्णा जिल्हयामध्ये वाढतात आहेत आज पर्यत आपणास अडचण नव्हती. जिल्हयामध्ये केसेस कमी होत्या शहरातही केसेस कमी होत्या. परंतु आता केसेस वाढल्यामुळे त्यांचा लोड शासकीय यंत्रणेवर आलेला आहे.त्यामुळे शॉप घेण्यांची यंत्रणा आज पर्यत हॉस्पीटलची होती किंवा सिव्हील हॉस्पीटलची होती त्यावरही मर्यादा पडावयास लागल्या आहेत. महानगरपालिका म्हणून आपणास त्यात लक्ष घालावे लागणार आहे. सॉप चेकींग यंत्रणा लवकरच आपण कार्यान्वीत करणार आहोत. साधारण ती ७-८ दिवसांत ती कार्यान्वीत होईल असे मी आपणास आश्वासीत करतो. खर्चाच्या बाबतीत आपणास जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्य शासनामार्फत सुरुवातीस २० लाखाचा निधी प्राप्त झालेला आहे. त्याच्यानंतरही ५० लाखाचा निधी देण्यांत आलेला आहे. त्याच्या नंतर ३-४ दिवसापूर्वी राज्य शासनाकडुन आपणास एक पत्र आलेले होते. तुम्हाला तुमच्या शहरातील यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने तुम्ही तुमचा प्रस्ताव तयार करावयास सांगितले होते आणि सदर प्रस्ताव अत्यंत तांतडीने मागविला होता. मला साधारणत: ४ ते ५ वाजेच्या दरम्यान फोन आलेला होता. तुम्ही रात्री ८-९ वाजेपर्यत तुमचा प्रस्ताव सादर करा म्हणून साधारण परवाची गोष्ट आहे आम्ही आपले सर्व अधिकारी ऑफीसात बसलो आणि साधारणत: ५.५० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करुन पाठविलेला आहे. दुदैवाने काल त्या विषयासंदर्भात आपले बोलणे झालेले नाही. आता मिटींग संपल्यानंतर महापौर, सभापती वगैरे आपण बसू व त्या प्रस्तावात आपण काय काय घेतले आहे त्यांची माहिती देऊ. त्याच्यात काही चेजेंस काही करावयाचे असतील तर ते आपण करु. शासनाकडुन आपणा निधी मिळत आहे. आता आपण ५. ५० कोटींचा प्रस्ताव पाठविलेला आहे. महापौर साहेंब आपण सफाई कर्मचा-यांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला.विमा कवच संदर्भात ज्यावेळी आपणाकडेस कोणतेही सक्युलर आलेले नव्हते त्यावेळी आपण महापालिका स्तरावर त्यांची सुरुवात केलेली होती. या शहरातील काही विमा कंपन्या आहेत त्यांच्याशी आमचे कैलास शिंदे अभियंता यांनी संपर्क साधून त्यांचेकडुन प्रस्ताव सुध्दा मागविले होते. परंतु त्यानंतर शासनाकडुन एक जीआर आला की, याक्षेत्रामध्ये जे काम करतात आहेत त्या लोकांना ५० लाखाचे कवच असल्याचा जीआर काढलेला आहे. त्यांची त्यांनी माहिती देखील मागविलेली आहे. अशा क्षेत्रात जे काम करीत आहेत त्यांची माहिती नांवे मागविलेली आहेत. जी लिस्ट आपण तयार करीत असून त्यांची माहिती शासनाकडेस पाठविण्यांत येईल. शासन स्तरावर याची दक्षता घेत असल्यामुळे आपण जो विम्यांचा प्रस्ताव तयार करत होंतो तो सध्या बंद करीत आहोत.शासनाच्या योजनेचा लाभ संबंधित व्यक्तींना मिळविण्यांची आपण दक्षता घेत आहोत. नंतर घरोघरी औषध देण्यांची जी सुचना आहे ती अत्यंत चांगली सुचना आहे. संजय पाटील साहेब आपणही त्यासंदर्भात माझ्याशी चर्चा केलेली होती. त्यासंदर्भात आमच्या २-३ मेडिकल ऑफिसरांबरोबर चर्चा केलेली आहे. आपणास थोडी माहिती देऊ इच्छितो आपल्या शहरातील काही सेवाभावी सेंस्थानी अलसरीक अल्बम चा पुरवठा केलेला होता तो आपण आपल्या

कर्मचा-यांना वाटप देखील केलेला होता. आपल्या सफाई कर्मचारी, मेडिकल ऑफिसर, नर्ससेस व इतर कर्मचा-यांना आपण तो दिलेला आहे. परंतु आपली जी सुचना आहे की घरोघरी वितरीत करावे. त्याबाबत मी यांच्याशी चर्चा केलेली आहे. आपल्याकडे सुदैवाने एनयुएचएम अंतर्गत एक डॉक्टर आलेले आहेत. त्यांची होमीओ पॅथीक केलेले आहे. त्यांना अशाप्रकारे मिश्रण बनविण्यांचा चांगला अनुभव आहे.आपण त्यांच्या अनुभवाचा वापर करावयाचे ठरविले आहे.मोरे साहेब तुम्ही त्याला गती द्या.आपल्या शहरामध्ये किती आवश्यकता आहे. त्याचा अंदाज घ्या. त्याला किती खर्च येणार आहे यांचा देखील अंदाज घ्या. आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात करा. जे कंन्टेन्मेंट झोन आहे त्यापासून तरी आपण सुरुवात करु. कंन्टेन्मेंट झोन मधील नागरीकांना आपण ते देऊ. कंन्टेन्मेंट क्षेत्राच्या बाहेरील बर्फरर्स झोन आहे तेथे देऊ. त्यानंतर इतरांना देऊ अशा प्रकारे औषधे देण्यांस हरकत नाही. त्याला फार खर्चही येत नाही. आणि खर्च आला तरी तो करणे गरजेचे आहे. गोसावी साहेब तुम्ही या विषयामध्ये लक्ष द्यावे. ऑनलाईन भरणा घेण्याच्या संदर्भात एक विषय याठिकाणी उपस्थित झाला होता. सद्या आपण ऑनलाईन टॅक्स घेत आहोत. टॅक्सची आपणास गरज असते. शेवटी मिशन चालविण्यासाठी आणि महानगरपालिका चालविण्यासाठी आपणास टॅक्सची गरज असते. त्यामुळे टॅक्स माफी असा निर्णय आपण करु शकत नाही. टॅक्स घ्यावा लागेल परंतु टॅक्सच्या संदर्भात लोकांना त्रास होणार नाही याची आपण दक्षता घेत आहोत. उमेर भैय्या

म. खान मो. साबीर — साहेब असे नाही. सभागृह ठराव करु शकते. आणि तो ठराव शासनाकडेस पाठविण्यांत यावा. आपणास शहरात गोळया वाटवयाच्या तर वाटावा. परंतु ८-८ दिवस नागरीकांनी अन्न शिवाय रहावे लागले आहे. याचा देखील विचार करावा. शहरात दररोज पाणी मिळत नाही. आणि आपण टॅक्स भरणेबाबत गोष्टी करतात. सभागृह हे सार्वभौम आहे. सभागृहाने ठराव करावा. आणि शासनाकडे पाठवावा. शासन जो निर्णय देईल तो आम्हाला मान्य राहील. असा खुलासा महापौर साहेब आपण करावा. त्यासाठी विशेष सभा घ्यावी. शासनाकडे ठराव पाठवावा व शासन निर्णय आम्हास मान्य राहील.

म. महापौर — आपण या संदर्भात बैठक घेऊ.ठराव करण्यांचा अधिकार आपला आहे. आपण त्याप्रमाणे विशेष बोलवू.

म. खान मो. साबीर — यासंदर्भात आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

म. नगरसचिव — सदर विषयासाठी स्वतंत्र मिटींग बोलवावी लागेल. अजेंडयावर तसा विषय घ्यावा लागेल.

म.सुनिल बैसाणे — हा जरी विषय त्यांचा असला तरी त्यासाठी स्वतंत्र बैठक बोलवावी लागेल आपण आज ज्या विषयासाठी विशेष बोलविली आहे त्याच विषयावर सभेत बोलण्यांत यावे. विषयांतर करु नका.

म. खान मो. साबीर — सदस्यांनी ज्या वेळी प्रश्न उपस्थित केला त्याच वेळी त्यांचे उत्तर महापौरांनी दिले पाहिजे होते.

म. शितल नवले — टॅक्स भरणेसाठी नागरीकांना थोडा कालावधी वाढवून द्यावा. शास्ती लावू नका.

म.आयुक्त — बरोबर आहे त्याच मुद्दयावर मी खुलासा करणार होतो. महापौर महोदय ठराव करण्यांचा अधिकार आपलाच आहे. त्याबाबत प्रशासनाचे दुमत नाही. तो जगातला कायदा आहे त्यात मी वेगळे काही सांगत नाही. प्रशासन म्हणून मला माझे मत मांडण्यांचा १०० टक्के अधिकार आहे. ते मांडलेले आहे. त्याव्यतिरिक्त आपणास ठराव करावयाचा असेल तर हे सभागृह करु शकते. ठराव झाल्यानंतर याबाबत काय कार्यवाही करावयाची त्याबाबतही प्रशासनाला अधिकार आहे. महापौर महोदय टॅक्सच्या संदर्भात याठिकाणी विषय आला होतो तो कोरोनाच्या विषयांत आला होता म्हणून मी याठिकाणी खुलासा केला . शितल नवले यांनी

सांगितले आहे की लोकांवर एक्सेस होणार नाही याची दक्षता घ्यावी. लोकांवर एक्सेस होणार नाही दक्षता घेतली जाईल हे मी सभागृहाला आश्वासीत करतो. की त्यांचेवरती जप्तीची कारवाई करतो, इतर कारवाया करतो किंवा पेपर मध्ये नांवे देतो या कारवाया सध्या आपण करणार नाही. जो टॅक्स आपल्याकडे भरणा होईल तो आपण घेवू. संजय पाटील साहेब यांनी २-३ मुद्दे उपस्थित केले की अजमेरा कॉलेज, बाफना कॉलेज यांची मदत घ्यावी अॅरेसेनीक गोळया या विषयावर आता बोललो म्हणून हे विषय पुन्हा रिपीट करत नाही. तसेच रेलन साहेब आपणही बोलले आहे ते पुन्हा रिपीट करत नाही. नंतर अमीन पटेल यांनी २-३ चांगले मुद्दे उपस्थित केले त्याबद्दल मी थोडीशी माहिती सभागृहात देतो. महापौर महोदय आपल्या शहरा मध्ये २ मेडिकल कॉलेज आहे एक शासकीय आहे आणि एक प्राव्हेट आहे. जे शासनाचे आहे त्याठिकाणी सद्या कोरोना विषयीची ट्रिटमेंट व तपासण्या करत आहोत. तसेच सिव्हील हॉस्पीटल मध्ये डीसीएसी स्वरुपामध्ये काम सुरु आहे. बाकी ठिकाणी तसे काम चालू नाही. मध्यंतरी असा एक विषय झालेला होता. कलेक्टर साहेब आणि आमच्या बैठका होत असतात. मा. पालक मंत्र्यांनीही बैठका घेतल्या आहेत. खासदार साहेबांनीही बैठक घेतली आहे. ब-याच वेळा हिरे कॉलेज मध्ये दोन्ही ट्रिटमेट सुरु आहे. कोविडही तपासणी होत आहे आणि नॉन कोविडची तपासणी होत आहे. त्यामुळे तेथे रिक्स ऑफ फॅक्टर तयार होत आहे. त्यामुळे आमचे प्रशासनाचे असे मत झालेले होते की कोविड आणि नॉन कोविड असे वेगवेगळे करावे. म्हणजे कोविड आणि नॉन कोविड असे कारण एखादा नॉन कोविडही तेथे गेला तर तो कोविड होऊ शकतो. हिरे कॉलेजच्या ठिकाणी जर त्याचा संपर्क आला तर तो कोरोना पॉझेटीव्ह होऊ शकतो. ही त्याच्या पाठीमागची हिस्टी होती. त्या दृष्टीने जिल्हाधिकारी साहेबांनी अतिशय मेहनतीने हा विषय सुरु केलेला आहे. त्यात मध्ये एक प्रस्ताव असा देण्यांत आलेला आहे. नॉन कोविड अॅक्टीव्हीज आहेत मॅटर्निटी, गॅनिक आहे किंवा जे आहे ते जवाहर कॉलेजला द्यायचे आणि कोविड अॅक्टीव्हीज या ठिकाणी ठेवावयाच्या असा तो विषय आहे. आता तो प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे. मध्यंतरी २-३ दिवसापूर्वी बैठक झाली होती दोन्ही पक्षांनी मान्य केले होते की अशा अशा सुविधा आम्ही घेत आहोत. तसे अंतिम टप्प्यामध्ये आहे. दुसरा जो मुद्दा आपण सांगितलेला आहे की, सिव्हील हॉस्पीटल त्याला सक्षम करणे गरजेचे आहे. हा मुद्दा आपला चांगला आहे. कारण त्याठिकाणी जागा आहे. इन्फाक्टङक्चर आहे. आणि अजून खर्च करुन तेथील कॅपेसिटी अजून वाढविता आली तर तो सुध्दा विचार आपण नक्की करु. तसेच आपल्या सिव्हील मध्ये मेडिकल ऑफिसरांची संख्या कमी आहे. कारणही स्टॉप त्यांनी हिरे मेडिकल कॉलेज येथे दिलेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत यांचेकडेस स्टॉप कमी आहे. परंतु शासनाकडुन एनयुएचएम मध्ये फंड मिळालेला आहे. राज्य शासन व केंद्र शासनाकडुन त्याच्या मार्फत यंत्रणा बळकट करता येईल का याबाबत मी कलेक्टर साहेब , संबंधित सर्व जे अधिकारी आहेत त्यांचे बरोबर २-३ दिवसात बैठक होईल त्यात मध्ये याबाबत चर्चा करेल.

म. अमीन पटेल — कोविड वॉर्ड जुने सिव्हील हॉस्पीटल मध्ये आणले तर कोविडसाठीचे जे सिरियस पेशंट आहे त्यांना चांगला उपचार आवश्यक आहे जेथे मेडिकल कॉलेजच्या बाजूला अपघातच्या बाजूला आयसीयु वार्ड आहे तेथे वेगळे आयर्यीयु वॉर्ड चांगल्या प्रकारे तयार करुन तेथे कोविडच्या पेशंटला दाखल करु शकतात जुने सिव्हील हॉस्पीटल मधील लोक म्हणतात की आमच्या येथे आयसीयु नाही तर आपण तेथे आयसीयु ठेवू शकतो. तसेच नॉन कोविड जर जवाहर हॉस्पीटल येथे नेले तर ते शहराबाहेर आहे आणि जवळच हायवे रस्ता आहे त्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. आणि माझ्या मते आपले हिरे मेडिकल हॉस्पीटल मध्ये ज्या

सुविधा मिळत आहेत त्या जवाहर मेडिकल कॉलेज येथे नाहीत मी आरोप करीत नाही परंतु वस्तुस्थिती समोर सांगत आहे. म्हणून जनरल बॉर्ड हा हिरे मेडिकल कॉलेज येथे ठेवला गेला पाहिजे. आणि कोविड बॉर्ड येथे जे जास्त सिरियस पेशंट नाही त्यांना जुने सिव्हील मध्ये ठेवू शकतो ही माझी सुचना आहे. शहराच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. शहरातील नागरीकांना जर टेस्ट करावयाची असेल तर तांतडीने जावून टेस्ट करु शकतात. जुने सिव्हील हॉस्पीटल येथे ४०० बेड टाकू शकतो. तेथील कर्मचारी म्हणतात की येथे खराब झाले तेथे खराब झाले परंतु माझ्या मते तशी परिस्थिती नाही. १०- २० लाख रुपये टाकून व वायरींग करुन तेथे सुरु करु शकतो. तेथे नॉन कोविडही होईल आणि कोविडही होईल अशा दोन्ही सुविधा तेथे करु शकतो. ही सुचना आपण जर कलेक्टर साहेबांना सांगितली तर बरे होईल. जवाहर मेडिकल कॉलेज शहराच्या दृष्टीने लांबही पडेल. ही देखील सुचना साहेबांना सांगा.

म. आयुक्त सो. आपली सुचना योग्य आहे. त्या विषयावर मी चर्चा करणार नाही. डिसीजन बॉडी जी आहे. तिचा मी एक सदस्य आहे. मी एकटा डिसीजन घेवू शकत नाही बॉडी निर्णय घेते. आपण जी सुचना मांडली आहे मी ती समिती मध्ये माडेल. तसेच डेड बॉडीबाबत जी सुचना मांडली आहे. त्यामध्ये दोन संस्था आहे मुस्लीम ट्रस्ट आहे त्यांनी जी कब्रस्तानची जागा सुचविलेली आहे त्याठिकाणी दफन विधी केला जातो. तसेच ज्या ठिकाणी आपणास दहन करावे लागते त्यासाठी आपण दोन जागा निश्चित केलेल्या आहेत. एक आपली जागा आहे. दुसरी खाजगी जागा आहे. जी खाजगी जागा आहे ती अग्रवाल यांनी दिलेली आहे. त्याठिकाणी दहन विधी केला जातो आहे. त्याठिकाणी फक्त शहरातील नव्हे ते आजू बाजूच्या परिसरातील लोकांनी विनंती केली तर त्यांचा दहन विधी तेथे करण्यांत येत आहे. बाहेरच्या गावांतील लोकांना आपण बॉडी ताब्यात देऊन त्यांना त्यांचे गावाकडे दहन विधी करावयास सांगतो परंतु काही वेळेस बाहेरगावचे लोक बॉडी घेवून जाण्यास तयार नसतात व आपणास विनंती करतात त्यावेळेस आपले चंद्रकांत जाधव डॉ. मोरे साहेब, गोसावी साहेब हीह यंत्रणा आपली चांगले काम करीत आहे.

म. अमीन पटेल कोरोना पॉझेटीव्ह बाहेरील बॉडी असतात त्यांचे अंत्यविधी आपल्या शहरातच करावयाचे असतांना अडचणी येतात. कारण बाहेरगांवचे लोकांकडे दहन करणेसाठी लाकडे नसतात. डिझेल नसते. बाहेर गांवावरुन तहसिलदार साहेब यांचे फोन येतात . बॉडी दहन करणेसाठी जो खर्च येतो तो आपल्या मनपाला सद्यस्थितीत करावा लागत आहे. बाहेरगांवच्या लोकांचे अंत्यविधीसाठी लागणारे साहित्य देणेबाबत असे आदेश नाहीत. बाहेरगांवच्या लोकांकडे ऐनवेळी पैसे नसतात. ८- १० हजार रु.लागतात. ३हजाराची लाकडे लागतात, ६-७ किट लागतात.गाडी भाडे लागते. तर चंद्रकांत जाधव साहेब म्हणतात की, यासाठी मला आदेश नाही. अशा अनेक अडचणी असतात. गोरगरीब लोक असतात त्यांचेकडेस पैसे नसतात.

म. आयुक्त सो. यासाठी काही अडचण नाही. लाकडे आपण देत आहोत. तसेच पीपीई किट आपण देतो. आपण फक्त त्यांना विनंती करतो की, बॉडी स्मशान भूमी पर्यत आणून द्यावी. काही वेळेस ते काम देखील मनपाला करावे लागते.आपली महानगरपालिका आहे आपण शहराचे पालकत्व आहोत.आपण असे नाही म्हणू शकत की आम्ही हे देणार नाही आम्ही ते देणार नाही. आपल्याला निश्चित खर्च येत आहे आणि तो खर्च आपण उचलत आहोत.

म. अमीन पटेल आपण शहरातील नागरीकांसाठी खर्च करतो आहे. तसेच इतर बाहेरगांवाच्या लोकांनाचाही खर्च करतो आहे परंतु तसे लेखी आदेश स्वच्छता निरीक्षक श्री. चंद्रकांत जाधव यांना दिलेले नाही.

म. आयुक्त सो. बरोबर आहे. त्यांना जर लेखी आदेश पाहिजे असतील तर त्यांनी तसा लेखी क्राफ तयार करुन आणावा त्यावर मी सही करुन देईल. त्यांना स्टॅन्डींग ऑर्डर मी दिलेल्या आहे. परंतु त्यांचे म्हणणे ही बरोबर आहे पुढील ऑडीटला त्रास होऊ नये यासाठी त्यांना जसे आयुक्तांचे आदेश देण्यांत येतील. यानंतर श्री. हिरामण अप्पा गवळी यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते ते पुन्हा रिपीट होणे गरजेचे नाही. प्रतिभाताई चौधरी आपण विवाह समारंधासाठी ५० लोकांचां जो मुद्दा उपस्थित केला होता सद्या आपण शासकीय जीआर नुसार फक्त ५० लोकांना परवानगी देतो आहे परंतु ५० पेक्षा जास्त लोकांची गर्दी तेथे होणार नाही यांची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण यंत्रणा राबवू. खताळ सो. आपण सूचित केले होते फवारणीचे ट्रक्टर वाढवावे यंत्र वाढवावे. मला वाटते हा मुद्दयाबाबत मी संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. सॅनिट्रायझर वेळेवर होत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भातही मी सुचना दिलेल्या आहेत. तसेच दुसरा एक मुद्दा उपस्थित केला होता ऑक्सीमिटर व कॅस्नर वाढविणेबाबत सूचित केले होते. सद्यस्थिती ब-यापैकी आपल्याकडे थर्मामिटर आहेत आवश्यकता भासल्यास अजून नवीन ५० थर्मार्मिटर व ५०ऑक्सीमिटर खरेदीची ऑर्डर दिली आहे.माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे बरेचशे मुद्दयावर मी बोललो आहे तसेच वेळही ब-याच झालेला आहे तसेच दुसरा विषयही अजून बाकी आहे. त्यामुळे मी येथेच थांबतो माझी सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, प्रशासन ब-यापैकी कोविडच्या कामामध्ये व्यस्त आहे. तसेच नॉन कोविडचे कामे देखील येतात. अधिकारी कर्मचारी यांना देखील कोविडच्या कामामध्ये फार वेळ द्यावा लागतो. तरी माझी विनंती राहील की सद्या आपण कोविडच्या कामांच जास्तीत जास्त प्राधान्य देऊ त्याच्यासाठी आपण आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती करतो. धन्यवाद...

मा. महापौर सर्व प्रथम कोविड संदर्भात धुळे महानगरपालिकेचे प्रशासनातील आयुक्त साहेब, उपायुक्त सो. आणि खास करुन आरोग्य खाते यांच्यामुळे संपूर्ण धुळे शहरात व सभागृहात महानगरपालिकेचे कौतुक होतांना मी पहिल्यांदा पाहत आहे. महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या मार्फत कोविडची जनजागृती असो, त्यासंदर्भातील कार्यवाही असो, थर्मल स्कॅनर असो, प्लस रेट मोजणी यंत्र असो, घरोघरी जावून कंन्टेलमेंट झोन मध्ये जावून करावयाची फवारणी असो हया सर्व गोष्टी धुळे महानगरपालिकेमार्फत अतिशय चांगल्या प्रकारे होत असल्यामुळे आज सभागृहात व संपूर्ण शहरात पत्रकार बांधवांच्या मार्फत माध्यमातून अतिशय कौतुक होत आहे.त्यामुळे सर्व प्रशासनाचे खास करुन आरोग्य विभागाचे जसे फीलड वर्कर आहे जसे चंद्रकांत जाधव असतील लक्ष्मण पाटील असतील यांचे कौतुक करणे प्रशासनाचे प्रमुख अधिकारी व पदाधिकारी म्हणून आमचे कर्तव्य आहे. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप जर पाठीवर पडली तर निश्चित त्यांचा कामाचा उत्साह वाढतो.आरोग्य कर्मचा-यांच्या माध्यमातून परव्याच आपण मशिन आणल्यानंतर जे कर्मचारी घाणीमध्ये उतरुन जे काम करत होते त्याच्या नावाचा उल्लेख मी स्वत: केलेला आहे. आणि जिल्हा पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून वेळोवेळी ज्याही काही गरजा असतील त्यासाठी त्यांचेकडून सहकार्य मिळत असते शहरात जो लॉकडाऊनचा कालावधी असतो शहरातील कायदा व सुव्यवस्था अबादीत राहण्यासाठी त्यांचे सहकार्य फार मौलाचे असते त्याबद्दल जिल्हा पोलीस प्रशासनाचे देखील मी याठिकाणी आभार मानतो. तसेच जिल्हा प्रशासनाचे देखील आपणास वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असते. त्याचे मार्गदर्शनाखालीच धुळे महानगरपालिका प्रशासन काम करीत आहे यासर्व गोष्टी आज घडून येत आहेत. त्याबद्दल त्यांचे देखील आधार मानतो. तसेच जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून धुळे शहरामध्ये सुरुवातीला जनतेमध्ये गैरसमजाचे वातावरण

निर्माण झाले होते. सव्हील मध्ये पेशंट गेले की, पेशंट परत येत नाही असा गैरसमज निर्माण झालेला होता. त्यामुळे बरसेशे लोक पॉझेटीव्ह असतांना उपचार घेत नव्हते. आणि आज चांगल्या प्रकारे पॉझेटीव्ह रुग्णांना चांगले झाल्याने घरी जाण्याचा निरोप देण्यांत येत आहे. त्यामुळे आम्ही स्वत: आयुक्त साहेब, जिल्हाधिकारी साहेब यांचे समवेत सिव्हील हॉस्पीटलला बरे झालेल्या पेशंटांना निरोप देण्यासाठी गेलो होतो. आता परत सिव्हील हॉस्पीटल म्हणून परत बोलविणे होत आहे.आणि आम्ही जातो. कोरोनाचे ५ पेशंट निगेटीव्ह झाले त्यांना निरोप देण्यांसाठी व स्वागतासाठी मी स्वत: गेलो होतो. सुरुवातीस आयुक्त सो. व आम्ही फार फिरलो. धुळे शहरामध्ये नगरसेवक असतील पदाधिकारी असतील फार फिरलो. पुष्कळ माणे मित्र, नातेवाईक, नगरसेवक पुष्कळ जण मला सांगत होते की, फिरु नका .काळजी घ्या. परंतु पदावर असतांना धुळे शहरातील नागरीकांपर्यत पोहचणे आणि आयुक्त सो. अधिकारी, पदाधिकारी आम्ही सर्व जण नागरीकांपर्यत पोहचलो. ज्या ठिकाणी कोणाची जाण्याची हिंमत होत नाही अशा मच्छीबाजार, मौलवीगंज, जुने धुळे असे जे दाट वस्तीचे भाग आहे तेथे एकत्रीत रित्या गर्दी करुन पोहचलो. नागरीकांशी संवाद साधला, सुरुवातीस अनेक हिंदू मुस्लीम बांधवामध्ये गैरसमज पसरले होते ते दूर करण्यांचा प्रयत्न केला . त्या भागातील मुस्लीम नगरसेवक आहे त्यांनी भागातील नागरीकांच्या मनामध्ये इतर लोकांनी जे गैरसमज निर्माण केले होते तो काढण्यासाठी जे आत अस्तित्वातातील मुस्लीम नगरसेवकांनी त्याच्या माध्यमातून तो गैरसमज दूर करुन भागातील कोरोनाचे जे रुग्ण आहे त्यांना ट्रिटमेंट , तसेच उपाय योजना करण्यांस सहकार्य केले . आणि फार कष्ट घेतले सर्वांनी कष्ट घेतले सिव्हील हॉस्पीटल मधील कर्मचारीही फार कष्ट करीत आहेत. आणि पहिल्यांदा महानगरपालिकेचे कौतुल केले जात आहे. महानगरपालिका म्हटली की काही तरी निगेटीव्ह छापून नागरीकांना मेजबानी देण्यांचा प्रयत्न सुरुवाती पासून काही प्रमाणात केला जात आहे. पहिल्यांदा छायाचित्रकार, पत्रकार बांधव यांचे आभार मानतो. महानगरपालिकेच्या संदर्भात जे आम्ही चांगले काम करतो आहे ती वस्तुस्थिती आपल्या माध्यमातून चांगल्या प्रकारे मांडली गेली आणि धुळे शहरातील जनतेपर्यत पोहचविण्यांत आली या सर्वांत सिंहाचा वाटा पत्रकार बांधव यानी घेतलेला आहे. आणि मी काही जास्त बोलत नाही कारण भरपूर वेळ झालेला आहे. आणि ज्याही काही संस्था असतील , त्या सर्वांनी आम्हाला ज्या ज्या प्रकारे मदत केली महानगरपालिकेला त्यांचेही आभार आणि खास करुन माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब यांनी तात्काळ धुळे महानगरपालिकेस १०० पीपीई किट उपलब्ध करुन दिले. तसेच सुभाषजी भामरे साहेब यांच्या माध्यमातून त्यांचेही आभार. तसेच भाजपा जिल्हा अध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल यांनीही सुरुवात पीपीई किट दिलेत, आणि थर्मलस्कॅनर वगैरे त्यावेळेस तुटवडा असतांना आपणास भेटत नव्हते. त्यावेळेस त्यांनीही मदत केली त्यांचेही अभिनंदन आणि सर्व नगरसेवक यांनी कोरोना संदर्भात चांगले काम केले तसेच अधिका-यांनी चांगले काम केले त्याबद्दल त्यांचेही आभार.

आता पुढील विषय पाणीपुरवठासंदर्भात चर्चा करावी.

२)शहरात होणा-या अनियमित पाणीपुरवठया संदर्भातील विषयावर झालेली चर्चा व त्यावरील निर्णय

म.किरण अहिरराव सन्मा.महापौर आज नगरसेवक ना घर का ना घाट का अशी अवस्था झालेली आहे दहा गावांचा प्रश्न मागील सात महिन्यापासून रेंगाळत पडलेला आहे. नगरोत्थान च्या कामाचा ठराव झाला व आठ दिवसात सर्व काम मंजूर झाले परंतु आमच्या हद्दवाढ गावांचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर झालेला नाही मी या गोष्टीचा निषेध व्यक्त करतो. आमच्या गावात पाच ते आठ दिवसात पाणी मिळते आमच्या गावातील पाईप लाईन सुमारे पंचवीस तीस

वर्षापासून ची जुनी पाईपलाईन आहे सद्यस्थितीत कुटुंबांची संख्याही वाढलेली आहे वारंवार पाण्याची समस्या निर्माण होते आमच्या हद्दवाढ गावातील पाईपलाईन साठी या अंदाजपत्रकात तीन कोटी मात्र तरतूद करावी आमच्या प्रभागात ४८ कॉलनी आहेत परंतु पाण्याची अडचण आहे आपण नळ कनेक्शन नसले तरी पाचशे रुपये पाणीपट्टी वसूल करतो आमच्या गावासाठी ५० लक्ष हद्दवाढ गावांसाठी एकूण तीन कोटी मात्र पाईपलाईन साठी तरतूद करण्यात यावी

म. महापौर हद्दवाढ गावांचा जमा होणारा महसूल हद्दवाढ गावांसाठी वापरण्यात यावा असे मी सभागृहात सूचित करतो अक्कलपाडा योजना झाल्यावर या योजनेत हद्दवाढ गावांचा समावेश करता येईल व पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी निकाली निघण्यास मदत होणार आहे ११ गावातील पिण्याच्या पाईपलाईन साठी सद्यस्थितीत अंदाजपत्रकात तीन कोटी मात्र तरतूद करण्यात येईल

सुनील बैसाणे महापौर साहेब मला बोलण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे या ठिकाणी पाण्याचा गंभीर विषय आहे सद्यस्थितीत पाण्याची तीव्र समस्या निर्माण झालेली आहे लोक डाऊन कालावधी मुळे सुदैवाने किंवा दुर्दैवाने आपल्या मनपात मोर्चा आला नाही परंतु माझ्या प्रभागांमध्ये असलेल्या नागरिकांनी पाण्याच्या समस्या साठी मनपा मध्ये मोर्चा आणला होता.त्यांना पाण्याची समस्या असल्याने त्यांनी नगरसेवक व महानगरपालिकेकडे धाव घेतली तर त्यांच्यावर गुन्हा नोंदवला गेला आहे. जर त्यांना पाणी मिळत नसेल तर ती त्यांची चूक आहे का सद्यस्थितीत संचारबंदी चे उल्लंघन झाले परंतु ती त्यांची चूक असेल परंतु पिण्याचे पाणी मिळावे हा त्यांचा हक्क आहे यासाठीच ते या ठिकाणी आले आणि माझ्या प्रभाग क्रमांक सात मधील लोकप्रतिनिधी म्हणून माझी देखील नैतिकता आहे मीदेखील प्रशासनाच्या माध्यमातून यासाठी कमी पडलो म्हणून ते लोक मनपावर मोर्चा घेऊन आले मी विनंती करतो की त्यांच्यावर जो गुन्हा दाखल आहे तो गुन्हा तात्काळ रद्द करणे यासाठी मी स्थायी समिती देखील निर्देशित केलेले होते सदर गुन्हा कशाप्रकारे मागे घेता येईल येईल किंवा रद्द करता येईल याबाबत तातडीने कार्यवाही करावी महापौर साहेब आपल्याकडे पाणीसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना सुद्धा आपण पाणी देऊ शकत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे या सर्व गोष्टींचा विचार करून आपण स्वतंत्रपणे पाणीपुरवठ्याची मिटिंग देखील घेतली त्यामुळे आयुक्त साहेब यांनी देखील पुढाकार घेऊन त्यामध्ये अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात बदल करून सुधारणा केल्या. व त्यांना स्वतंत्र जबाबदाऱ्या वाटून दिल्या. उपलब्ध पाणीसाठा भरपूर असताना केवळ समन्वय नसल्याने आपण पाणी देऊ शकत नाही त्यामुळे जनतेच्या रोषाला सर्व नगरसेवकांना सामोरे जावे लागते आपल्याला महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडून १३६ कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली होती परंतु ती योजना सध्या ८० कोटी मध्ये बंद केलेली आहे आपण शहराला ग्रॅव्हिटी ने पाणी मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत अक्कलपाडा योजना आपल्या नेत्यांच्या माध्यमातून मंजूर केलेली आहे त्यामुळे धुळे शहराचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे..तसेच सद्यस्थितीत जर बिल आपल्याला एक कोटी रुपयापर्यंत येते त्यात ५० टक्कयापर्यंत बचत होणार आहे. मनपाचे दायित्व आहे की नागरिकांना मूलभूत सेवा सुविधा पुरवल्या पाहिजे परंतु नगरसेवकांना वार्डात फिरता येत नाही अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे महापौर साहेब आपणास विनंती की आपण याबाबत उपाययोजना केलेल्या आहेत शहरातील संपूर्ण पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेचे टाटा कन्सल्टन्सी सारख्या तज्ञ संस्थेकडून सर्वेक्षण करावे ही शितलभाऊ नवले यांनी अतिशय चांगले उपाय सांगितले आहेत ते स्वत:इंजिनिअर आहेत

आपण त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करून घेऊ शकतो पाण्याच्या बाबतीत विषय मांडत असताना प्रशासनाच्या माध्यमातून दखल घेतली जात नाही असा माझा आरोप आहे नगरसेवकांच्या भावनांची व विषयाची नोंद घेतली जावी आणि व्यक्तिगत कोणाशी भांडत नाही जनतेने आम्हाला अधिक अधिकाराने निवडून दिलेले आहे जर जनतेच्या आश्वासनांची आम्ही पूर्तता करत नसलो तर आमचे नगरसेवक पद काय कामाचे जर आम्हाला तुमची साथ राहिली तर धुळे शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून चांगले काम होईल महापौर साहेब मनपाच्या निवडणुकीनंतर काही विरोधक असतात आणि त्या विरोधकांना अशा राजकारण करण्याची वेळ येते आपण ती संधी उपलब्ध करून देतो येणाऱ्या काळामध्ये विरोधकांनी विरोधाचे काम करावे जनतेच्या हिताचे काम होत असेल त्या ठिकाणी विरोध न करता सर्व मिळून समन्वयाने काम करावयाचे आहे.या ठिकाणी किरण आहिरराव यांनी पाण्याचा मुद्दा मांडला पाणी प्रश्न भेडसवण्याचे मुख्य कारण म्हणजे आपली आपली लोकसंख्या सहा ते साडेसहा लाख आहे क्षेत्रफळ १०१ चौरस किलोमीटर झालेले आहे. आपल्याकडे यापूर्वी चांगल्या प्रकारे पाणी पुरवठा होत होता परंतु सध्या अडचणी येत आहेत मी ज्यावेळेस स्थायी समितीसभापती पदाचा पदभार घेतला त्यावेळेस पाणीपुरवठा विभागातील उगले साहेब किंवा शिंदे साहेब यांच्यासह आम्ही जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली त्या वेळेस त्या ठिकाणी अनेक वर्षापासून गाळ होता व त्यामुळे दूषित पाणी येण्याची तक्रार होती.आम्ही तो गाळ सर्व काढून घेतला त्यानंतर जो विषय होता नागरीकांना जल स्वृच्छ कसे देऊ त्याठिकाणी सुचनाचे पालन करुन अधिकारी पाणीपुरवठा यांनी ते काम केलेले आहे. हे लक्षात आणून देतो की, धुळे शहरातील हद्दीतील अनेक नळाना दुषित पाणीपुरवठा होत आहे. मी महानगरपालिकेस सूचित करतो की, ज्या वेळेस पाणी नसेल त्या वेळेस टाकीचा गाळ काढण्यात यावा. साथीचे रोग पाण्यामुळे उद्भवण्याची शक्यता आहे. म्हणून शिंदे सो यांना नोंद करावयाची आहे सर्व पाण्याच्या टाकीची साफ सफाई करुन घेण्यांत यावी. आणि जे खाजगी दवाखाने आहेत हा कोरोनाचा विषय आहे. जण कल्याण आरोग्य या मोदी सो. यांच्या योजनामार्फत 500 ते 800 रोगावर उपचार होतो. कोरोनाचे कारण म्हणून आज देखील खाजगी दवाखाने बंद आहेत सदर दवाखान्यामध्ये सदर योजनांचे लाभ घेत आहे त्या माध्यमातून धुळेकर नागरीकांना योजनेचा लाभ घेण्यासाठी मी आरोग्याधिकारी यांना विनंती करतो. धुळे शहरात शासनाच्या योजनेचा जे जे लाभ घेतात त्या दवाखान्यांना नोटीस देऊन तात्काळ सदर योजनेचा लाभ सर्व धुळेकर नागरीकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा असे मी आपणास सूचित करतो.आणि मी आपणास पुनश्च धन्यवाद देतो अनेक नगरसेवक पाण्याच्या विषयावर बोलणार आहे त्यांचया अनेक अडचणी ऐकून घ्याव्या असे मी आपणास विनंती करतो.

म.शितल नवले

मी सर्वप्रथम माननीय महापौर साहेब आयुक्त साहेब यांचे अभिनंदन करतो की त्यांनी आज प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन महासभा आयोजित केली मी पाणी पुरवठा बाबत पहिल्या महासभेत मा. सुधाकर देशमुख आयुक्त असतांना काही उपाययोजना सांगितल्या होत्या परंतु त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही आपले बांधकाम विभागातील अधिकारी इकडून ऐकता तिकडून सोडून देतात. मी सुरुवातीपासून सांगत होतो सुलवाडे येथून पाणी उचलतो तेथून काय काय प्रॉब्लेम होते ते सांगितले सुलवाडयाला आपले २० वर्ष जुने पंप आहेत. कैलास शिंदे सो. आपल्या घरी पाणी येत असेल त्यावेळेस आपण घरी नसाल परंतु आमच्या काकू मागच्या 5-6 वर्षात कधी बोलल्या असतील आपल्या मोटारीला पाण्याची धार कमी येते आपण इंजिनियर आहात त्यामुळे आपल्या तोंडून निघाले असेल आपल्या मोटारीची

क्षमता कमी झालेली आहे आपल्याला मोटार बदलावी लागणार आहे त्यामुळे आपण लगेच १ एचपी ऐवजी दीड एचपी मोटर बसवा. सर्व पंपसेट बदलण्यासाठी 6-7 महिन्यापासून पैसे येऊन पडले आहेत ते पंपसेट 20 वर्ष जुने झाले आहे त्यांची कार्यक्षमता अक्षरश: ४० ते ४५ टक्के झाली आहे 450 एचपी मोटारीतून 250 एच.पीही पाणी फेकत नाही त्यावरही आपण काही ऑडिट केले नाही त्यावेळेस देशमुख साहेबांनी कुठलाही कागदाचा आधार न घेता त्यांनी सांगितले की, आपली कार्यक्षमता 99 टक्के आहे मी सांगतो अमेरिका सारख्या प्रगत देशातही 99 टक्के कार्यक्षमता नाही.कोणीही पंपाना मिटर लावून चेक केले नाही. बांभळे पंपिंग स्टेशनवर जे पंप आहे त्याचीही तीच परिस्थिती आहे आपण हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्रावरील कॅपिसिटी वाढवून १८ एमएलडी वरून २८ एमएलडी केले ती पुन्हा १८एमएलडी वर गेले त्याला रिपेरिंग करण्यास काय अडचण होती.तापी योजने वरील जलशुध्दीकरणाची क्षमता ४० एमएलडी चा आहे तो आज तीस एमएलडी वर आला आहे. वास्तवितक रित्याजर 50 एमएलडीची आवश्यकता असता 50 लाख लिटर पाणी आपण फिल्टरेशन करतो. याचा अर्थ 50 लाख लिटर पाणी शहरास मिळते आहे. आपण 135 लिटर दर माणसी जरी धरले तरी आपण दर 2 दिवसा आड पाणी देऊ शकत होतो. मी यांना सांगता होतो जेथून उगम आहे तेथून ऑडीट चालू करा. प्रायव्हेट कंपनीला ऑडीट द्या टाटा कन्सल्टींगला काम देण्याचा ठराव केला होता मी बोलतांना असे ही बोललो होतो की, आपण जेव्हा एखादया भागाला पाणी सोडतो पूर्वी असे होते चार-पाच कॉलनी होत्या त्या कॉलनीमध्ये 8-10 घरे होती आता घरांची संख्या वाढली आहेत. त्यामुळे काय होते पहिल्या माणसाला अडीच तास पाणी येते आणि शेवटच्या माणसाला अर्धा तासच पाणी मिळते यासाठी काय करावे लागेल त्यासाठी दहा वीस हजार रुपयामध्ये व्हॉल्स येतात तेही जुनी आहेत त्याचे जर तुम्ही झोनींग नाही केले तर प्रॉब्लेम वाढत जाणार आहे. म्हणजे वेळेची जी स्क्रीम ८० कोटीमध्ये आटपली हसावे का रडावे हाच मोठा प्रश्न आहे आयुक्त साहेब आपल्याला आश्चर्य वाटेल चव्हाण आमच्या भागात इंजिनिअर होते त्यावेळेस आई नगरसेविका होती त्यावेळेस चव्हाण आमच्याकडे आले ते म्हणाले पाईपलाईन कुठे टाकायची त्यावर मी म्हणालो तुम्ही आम्हाला कसे विचारता पाईप लाईन कुठे टाकायची? नगरसेवक टेक्निकल माणूस आहे का? याला जसे वाटेल तसे त्यांनी टाकली म.जि.प्रा. कडील नकाशा बघावा भागांमध्ये आधीच्या पाईपलाईनला १२ इंची पाईप लाईन करून ठेवले अशाने मनपाला कलंक लागला आहे. साहेब अख्खा उन्हाळा निघून गेला आतापर्यंत आपण जॅकवेलचे काम केले नाही साधी टेक्नीकल बाब आहे तुम्ही अगोदर पाईप लाईनचे काम हातात घेतले. फिल्टस्टेशन प्लॅन्टची जागा निश्चित नाही. कसे काय प्रपोजल करतात व टेडरींग करतात हे मला समजत नाही. आपण एमजीपीकडून बार चार्ट घेतला आहे का? बार चार्ट घेतला असता तर कामाची स्थिती लक्षांत आली असती.

प्रथम फिल्ट्रेशन प्लांट करणे गरजेचे होते त्यासाठी आपण डे टू डे एक इंजिनीअर नेमून आढावा घेणे आवश्यक होते जर आपण डे टुडे आढावा घेतला असता व त्याला निश्चित माइलस्टोन कार्यक्रम करून दिला असता तर कामाची प्रगती कळली असती जर त्याने मुदतीत काम केले नसल्यास त्याला आपण दंड करू शकलो असतो आपल्यात समन्वय नसल्यानेआपण चांगला उन्हाळ्याचा काळ घालून दिलेला आहे आपण एक इंजिनियर एमजीपी बरोबर समन्वयासाठी ठेवून फिल्ट्रेशन प्लांट सहा महिन्यात उभा केला असता लॉक डाऊन नंतर शासनाने आपल्याला काम करण्याची सूट दिली होती परंतु केवळ पाईपलाईनचे काम सुरू आहे आणि फिल्टरेशन प्लांट चे काम मंदगतीने सुरू आहे आपल्याकडे तापी योजनेच्या रिपेरींग साठी व दुरुस्ती साठी या टेंडरमध्ये प्रयोजन आहे आपण त्याचे काम देखील

करू शकलो नाही ही कामे घेणे गरजेचे होते साहेब आपण पहिल्या दिवशी पदभार स्वीकारला त्या दिवशीही मी आपणास बोललो होतो की आपण पाण्यावर लक्ष केंद्रित करावे सुदैवाने या आठ दिवसापासून पाणीपुरवठ्याची वितरण व्यवस्थित सुरू आहे म्हणजेच नियोजन केले तर काम होऊ शकते आम्ही ओरडला नंतर नियोजन हातात घेणे चुकीचे आहे आपण जनतेला रस्ते देऊ शकत नाही सुविधा देऊ शकत नाही किमान पाणी तरी द्या माझ्याबद्दल सांगायचं ठरलं तर आमचा मिल परिसर व तो भाग सर्वात शेवटचा भाग आहे शहराला चार दिवसांनी पाणी मिळते तर आमच्या भागाला सहा ते आठ दिवसांनी पाणी मिळते कधी पंप बंद असतात तर कधी वितरणातअडचणी येतात यावर पर्याय म्हणून दोन चांगले मानधनावरील इंजिनीयर नियुक्त करा शिंदे साहेब मला वाटते आपले चार ते पाच वर्ष रिटायरमेंट राहिली असतील केवळ आपण या शहरातील जनतेसाठी पाण्यावर लक्ष केंद्रित करून चांगले पुण्याचे काम करावे अशी मी आपणास विनंती करतो साहेब खरंच आपण नियोजन करून उपायोजना करा व पाणीपुरवठा सुरळीत करा महापौर साहेब पाणी पुरवठा बाबत समितीने याबाबत यापूर्वी ठराव केला होता जर आज समिती असती तर आपल्याला काहीतरी चांगले मार्ग समितीमार्फत काढता येऊ शकले असते परंतु त्यावरही लक्ष दिले नाही कृपया माझ्या सूचनांचा विचार करावा ही विनंती.

म.प्रदीप कर्पे आपण किती वर्षांपासून या सभागृहात हवं बरेच ज्येष्ठ नगरसेवक या सभागृहात आहे पाणी प्रश्नाची समस्या आजपर्यंत सुटलेली नाही ही पाणी प्रश्न समस्या का सुटलेला नाही त्याचा अभ्यास आतापर्यंत अधिकाऱ्यांनीही झाला नाही आणि नगरसेवक आपल्या एवढ्या समस्या मांडून तुमच्या पर्यंतही पोचलीच नाही सर्वात महत्वाचा विषय असा आहे शितल भाऊ नवले बोलले जलशुद्धीकरण केंद्र त्याचे काम होणे महत्त्वाचे आहे आपल्या धुळे शहराला शंभर एम एल टी पाणी लागतं आणि आपण एका दिवसात किती पाणी तयार करतो ते तयार करत असताना तीन दिवस लागतात ते पण ठीक आहे पण तरी दोन-तीन दिवसात पाणी का मिळत नाही आठ दिवसात पाणी मिळते यासाठी आपण त्या संस्थेची निवड करावी त्याच्यामध्ये काही तांत्रिक अडचणी असतील पाण्याचा पुरवठा संदर्भात काही निवेदन असतील त्याचा सल्ला घेऊन पाणीपुरवठा या शहराचा कसा करता येईल यासाठी महापौर यांनी लक्ष घालावे ज्या काही नगरसेवकांचा तुम्हाला सहभाग लागेल की सर्व नगरसेवक तुमच्या सोबत आहेत शहराचा प्रश्न आहे अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे त्याचबरोबर तांत्रिक अडचणी आपल्या आहेत पंचवीस-तीस वर्षांपूर्वी तापी पाणीपुरवठा योजना झाली आता ती योजना अतिशय जीर्ण झालेली योजना आहे तेव्हाही आठ पंधरा दिवसात लिकेज होते पुढचे काम करत असताना पाच दिवस लागतात आणि पाईप लाईन दुरुस्ती होत नाही तोपर्यंत पाणीपुरवठा करता येत नाही त्याचीही अभ्यास करून त्यामुळे पाण्याचे प्रश्न थांबतात त्यामुळे एमेसिबी च्या अधिकाऱ्यांशी बोलले पाहिजे वीज पुरवठा खंडित झाला म्हणजे पाणी येत नाही टाकी भरायला एक दिवस उशीर होतो त्यामुळे आपण लक्ष घातले पाहिजे सर्वात महत्वाचा विषय असा आहे अक्कलपाडयाच्या पाईपलाईनचे काम सुरू झाले आहे केव्हा सुरू झाले माहीत नाही पेपरमध्ये वाचले पाईपलाईनचे काम चालू आहे .वेळेवर आपण शंभर टक्के पाणी शुद्ध केले तर नागरिकांना शंभर टक्के पाणी वेळेवर देऊ शकतो कुठल्याही प्रकारचे अडचणी कुठल्याही प्रकारचे मोर्चे नगरसेवकांच्या घरी येतात तेही बरोबर आहे त्यांना वेळेवर पाणी मिळत नाही आम्ही सर्व जण तुम्हाला त्रास देतो तो त्रास बंद होईल किरण भाऊंनी सांगितले आमच्या वाडा वार्ड क्रमांक ११ गावात गावाच्या वार्डातील पाण्याचे प्रश्न खूप गंभीर आहे बाळापूरला पाण्यावरून भांडणे झाली आहेत पोलिस केस झाली आहे महापौरांनी सांगितले होते तापी

पाणीपुरवठा करून करून त्याच्यासाठी पत्र दिले होते त्या गावात सात हजार मतदार आहेत त्यांची लोकसंख्या वीस हजारआहे दहा गावांचे प्रश्न सुटले पाहिजे बाळापुर गावाचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे आणि महापौर तुमची जबाबदारी आमचीही जबाबदारी आहे तर धुळ्याची जनता आपल्या डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही आणि सर्वांना विनंती आहे अत्यंत ज्वलंत विषय आहे पाण्याचा आपले वोलमन कर्मचारी यांना रागवण्याचा प्रश्नच राहत नाही जर व्हॉलमनच्या चुकीमुळे पाण्याला उशीर होत असेल तर साहेब यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे आणि अधिकाऱ्यांना सूचना दिल्या पाहिजे शहरात मोठे मोठे लिकेज आहेत आपल्याकडे दोनच कामगार आहे ते फक्त तेच करतात प्रत्येक प्रभागात ५५६ लिकेज काय करेल त्यामुळे पाच हजार रुपये मानधनावर कामगार ठेवले पाहिजेत त्यामुळे लिकेज वर होणारा पाणीपुरवठा सुरळीत होईल याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

म. वसीम बारी — माझ्या प्रभाग क्रमांक आठ या भागात दाट वस्ती आहे तिथे पाण्याची समस्या फार मोठी आहे परिसर महादेव गल्ली नंबर सहा भागात पाण्याची समस्या आहे पाणी ७ घंटे दिल्यानंतर शेवटच्या भागापर्यंत पोहोचत नाही दोन-तीन गल्लीमध्ये आधा घंटा पर्यंत पाणी येते माझ्या वाड्यात बारा इंची पाईप लाईन चे उद्घाटन झालेले आहे त्यामुळे जोडण्यात यावे व समस्या दूर करावी ही विनंती.

म.महापौर — संबंधित ओव्हरसिअर यांनी सदरची नोंद घ्यावी व नंतर आयुक्त व माझ्याशी चर्चा करावी .

युवराज पाटील — आठ दिवस आमच्या भागात पाणी येत नाही पाणी जर आले तर शेवटच्या भागात पोहोचत नाही आणि आमच्या भागात तीन-तीन लिकेज आहे पंधरा दिवसात चार काढले व तीन दिवसात एक लिकेज सापडत नाही तीन दिवस लागून गेले अग्रवाल चौकात आठ दिवसाला पाणी येते पहिल्या गल्लीला पाणी मिळते तर शेवटच्या गल्लीला पाणी मिळत नाही .पहिल्या घराला पाणी येते चौथ्या घराला पाणी येत नाही पाणी येते त्या वेळेला पाणी येत नाही मी शिंदे यांना सांगितले हे काय आहे सदर भागात ८० टक्के लोक घरपट्टी भरलेली आहे काय ८० टक्के घरपट्टी भरून जर पाणी येत नसेल तर उपयोग काय आहे मनपाला तीन चार चार वेळेस सांगून प्रश्न सुटत नसेल तर नागरिक आमच्या घरी आंदोलन करतात.

म.सुशिलाबाई ईशी — प्रभाग क्रमांक १५ दहा दिवस घंटागाडी येत नाही पाणी येत नाही यावर काहीतरी उपाय योजना करायला पाहिजे तुम्हाला विनंती आहे.

म. महापौर — आरोग्य अधिकारी यांच्या भागात लक्ष द्या.

म. प्रतिभाताई चौधरी — महापूर असो मीटिंग सुरू होण्याअगोदर जो कोरोना व पाण्याच्या संबंधी अहवाल देण्यात आला तो आम्हाला मिटिंगच्या अजेंडा सोबत द्यायला पाहिजे होता तो अहवाल आमच्या हातात पडला आम्ही तो केव्हा वाचायचा व अभ्यास करायचा आपल्या धुळे शहराला पाणीपुरवठा होत असतो मी सतत तीन टर्म आहे १३ वर्षे झाली मला असे आठवत नाही की धुळे शहराला पाचव्या दिवशी पाणी मिळते आहे पाणी प्रश्न हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे दिवस उगवला की प्रत्येकाच्या पाण्याची पाण्याची संबंध येत असतो या कोरोनाच्या महामारी मुळे आठ दिवसात दिवसातून पाणीपुरवठा होत आहे तो जवळजवळ एक-दीड वर्षापासून आठ दिवसांनंतर पाणी पुरवठा केला जातो त्याचे खात्यातील अनेक आहेत कोरोनाच्या काळात लोकांनी आम्हाला फोन करून विचारले मोदी साहेब सांगतात हात धुवा हात धुवा तुमची मनपा आठ दिवसांनी पाणी देते महापौर आमच्या भागातून देवपूर मधून सर्वात जास्त घरपट्टी आणि पाणीपट्टी भरली जाते त्यातून मनपाला उत्पन्न मिळत असते माझ्या प्रभाग क्रमांक चार नगरसेवक सुशिक्षित एज्युकेटेड लोक राहतात आपण घरपट्टी पाणीपट्टी का भरतो ही मनपाला मूलभूत सुविधा मिळायला पाहिजे रस्ते गटार लाईट साफसफाई या सुविधा आपण लोकांना

देतो म्हणून त्यांच्याकडून कर वसुली करते ज्या प्रमाणात आपण त्यांच्याकडून कर वसूल करतो त्याप्रमाणे त्यांना आपण सुख सुविधा देत आहोत का हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे बापूसाहेब हा पेपर आहे आजचा यात पेपर मध्ये सर्वस्वी प्रशासनाला जबाबदार धरण्यात आले आहे पाणीपुरवठा आठ दिवसांनी का होतो याला प्रशासन जबाबदार आहे प्रशासनाचा अभाव आमच्याकडे जलसाठा भरपूर प्रमाणात असून फक्त प्रशासनाच्या अभावामुळे पाणी मिळत नाही जनतेचे हाल करत आहात जनतेला सुख नाही देऊ शकत नाही आपण पेपर मधे वाचा बापुसो आपल्या धुळे शहरांमध्ये जानेवारीपासून सहा जुलकुंभ बांधुन तयार आहेत अजून पाईपलाईन का झाली नाही टाक्यांमध्ये पाणी का आले नाही म्हणजे प्रशासनाचा अभाव जलकुंभ उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती झालेली आहे त्यामुळे धुळे शहरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे मी तुम्हाला विनंती करते एक महिन्यापासून आमच्याकडे घंटागाडी बंद आहे मी त्यांना फोन केला की मी प्रभागाची प्रमुख आहे कधी चालू व्हायला पाहिजे की नाही एक महिना लागला आता सर्व लोकप्रतिनिधी मी त्यांच्या कामाचे कौतुक केले २४ हजार नागरिकांनी निवडून पाठविले आहे त्यांच्या समस्या साठी पाठवले आहे शितल भाऊ मला म्हटले की ताई संध्याकाळ झाली तरी चालेल पाण्याचा प्रश्न आहे शितल भाऊ आम्ही संध्याकाळ नव्हे रात्रभर बसायला तयार आहे आम्ही घसा कोरडा करतो आमच्या प्रभागाच्या समस्या सांगतो त्यावर कुठलीही कारवाई केली जात नाही समस्या सोडविण्यासाठी प्रशासन अकार्यक्षम आहे असा माझा आरोप आहे आठ दिवसांनी पाणी येते त्यात आम्हाला आंदोलन करायला भाग पाडू नका तेरा वर्षांमध्ये अनेक पक्षाच्या सत्ता येऊन गेल्या तेरा वर्षांमध्ये आठ दिवशी पाणी मिळत नाही बापुसो आपल्या भाजपचा अजेंडा होता एक दिवस आड पाणी देऊ खूप विश्वासाने धुळे मनपा मध्ये ५० नगरसेवक निवडून दिले या महासभा मध्ये पाठवले आहे माझी विनंती आहे की धुळेकरांचे विश्वासाला तडा जाऊ देऊ नका चारशे वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांना एका फिरंग्यांनी विचारले होते की महाराज राजाचा प्राण कशात असतो यावेळी शिवाजी महाराजांच्या फिरंगे विचारले त्यावेळी शिवाजी महाराजांनी सांगितले राजाचा प्राण हा रयतेत असतो परत म्हणजे राजाचा प्राण म्हणजे विचार करा ज्या जनतेने आपल्याला इथे पाठवली आहे ती जनता आपल्याला खाली उतरणार अशा परिस्थिती मध्ये आम्हाला आंदोलन करायला भाग पाडू नका दुसरी गोष्ट म्हणजे ज्या दोन वर्षापासून पाइपलाइन टाकले गेले आहेत त्यानंतर खड्डे बुजले आहेत त्यावर रस्ता तयार करणे आवश्यक होते अजून पर्यंत मुरूम देखील टाकला नाही अनेकांच्या गाडी असले होतात प्रभागांमध्ये पाईपलाईनचे काम देण्याचे काम जिथे जिथे झाले असेल ते खड्डे बुजवण्यात यावे मी चार दिवस वाट पाहिल मी त्यांच्या केबिन कुलूप लावेल लक्षात ठेवा.

म. वंदनाताई भामरे महापौर सो मी काही प्रश्न विचारणार आहे व मला संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्तर अपेक्षित आहे माझे प्रश्न एकदम बारीक आहे लहान मुले विचारतात असे आहे कारण काय की आम्ही पहिल्यांदाच निवडून आलो आहोत अधिकाऱ्यांचे अशी थिंकिंग झाली आहे की नगर सेवक पर्यंत निवडून आले आहेत त्यांना काहीच काम जमत नाही आम्ही अपुरे ठरत आहोत अशी लोकांची थिंकिंग झालेली आहे आपण काम करत असताना किंवा कुठलीही समस्या मांडत असताना बालिशपणाचे छोटे छोटे प्रश्न तयार करायचे व ते सभागृहासमोर मांडायची मी जे प्रश्न विचारणार आहे ते असे आहेत.1) हद्दवाढ प्रभागाची जबाबदारी कोणाची असते.? 2) ग्रामपंचायतीतील गावे हद्दवाढ म्हणून जेव्हा मनपा मध्ये येतात तेव्हा मनपाच्या नियमानुसार पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन विषयी कोणती तरतूद केली जाते. आपण कोणती तरतूद केली आहे.3) जर मनपाची आहे तर 100 कोटी निधीतजून आमची हद्दवाढ गावे कोणत्या

नियमाच्या आधारावर वगळण्यांत आली.? 4) पंपींग स्टेशन वरील लाईटची जबाबदारी कोणाची असते? 5) वलवाडी पंपींग स्टेशनचे कोणते लाईट बील भरले जात आहे? सध्या 24 तास एक्सप्रेसफिटरची? 6) प्र.क्र.1 मध्ये किती पाण्याच्या टाक्यांना झाकणे आहेत? किती टाक्यांना संरक्षण भिंत आहेत? किती टाक्यांना किल्ली कुलुप आहेत? 7) या संदर्भात मी दिलेल्या पत्रावर आपण काय कार्यवाही केली आहे? 8)जलव्यवस्था केंद्राला संरक्षणविषयी नियमानुसार कोण कोणत्या सुविधा असतात.9) दि. 1/11/2019 रोजीच्या मी दिलेल्या पत्रावर आपण कोणती कार्यवाही केली? 10) नेमून दिलेल्या इंजिनिअरची जबाबदारी काय असते? 11) सार्वजनिक शौचालये किती दिवसातून / महिन्यातून स्वच्छ केले पाहिजे. 12) सार्वजनिक शौचालयाची देखरेख कोणाची जबाबदारी असते. 13) सार्वजनिक शौचालय दुरुस्तीची जबाबदारी कोणाची असते? 14) कोविड 19 चा प्रादुर्भाव लक्षांत घेता त्या त्या प्रभागासाठी आपण काय काय तरतूद केली आहे. सब्जीमंडी असेल, आरोग्य सेवा असेल, पंपिंग स्टेशनला लाईटचे व्यवस्थापन मनपाची असते का एमएसईबीची असते प्रभाग क्रमांक एक मध्ये आधी ग्रामपंचायत होती तेथे आम्ही २४ तास एक्सप्रेस फिडरची लाईन वापरत होतो नंतर काय झाले हायवेची कामे सुरू झाली त्यामुळे तिलाही तोडण्यात आली आणि महिंदळे अजिंक्य तारेची लाईट जोडण्यात आली त्या अजिंक्यताऱ्यावर लोड वाढल्याने पुन्हापुन्हा लाईट खंडित होते त्यामुळे पाणीपुरवठा खंडित होतो पंधरा-पंधरा दिवस पाण्याची आम्हाला सामोरे जावे लागते मग मी हे निवेदन दिले मनपाला व एमेसिबी लाही दिले होते त्यांनी सांगितले रस्त्याचे ठेकेदार आहे ते पळून गेले आहे त्यावर मी म्हटले त्यांच्यावर गुन्हा दाखल करा त्यावर त्यांनी पत्रव्यवहार केला मी मनपात आले त्यावेळी लाईट बिल कोणत्या पद्धतीने भरले जाते ही मनपाची जबाबदारी नाही का विद्युत पुरवठा नसेल तर पाणी पुरवठा होणार कसा नगरसेवकांनी पुन्हापुन्हा आटापिटा माराव्यात का ही मनपाची जबाबदारी नाही का लाईट चे नियोजन नसेल तर पाणी पुरवठा होणार कसा तीन दिवस चार दिवस पाणीपुरवठा माझ्या भागाला प्रोव्हाइड करू शकत नाही ही जबाबदारी प्रशासनाची आहे मनपावर मोर्चा आला की गुन्हा दाखल होतात माझ्या भागातील पाणीपुरवठा फक्त चोवीस तास एक्सप्रेस फिडर वर अवलंबून आहे आमच्या ग्रामपंचायतीची पंपिंग स्टेशन आहे तो तिथे जॉईंट आहे मनपात आल्यापासून त्यांची जबाबदारी आहे मनपा अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे का आमच्या ग्रामपंचायतीमध्ये पाण्यासाठी ग्रामपंचायतीचा नियमानुसार पाण्याची यांची व्यवस्था केली होती मला असे वाटते की ग्रामपंचायतीचे नियम व मनपा चे नियम वेगळे असतात का आमच्या वार्डात काय तरतूद केली आहे पाणीपुरवठा बाबत पहिले दहा घरे पाणी मिळते ते पाच घरे राहून जातात असे का होते हेही आपल्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे का आपण जर नळांना मीटर लावले तर चोरीचे पाणी वाया जाते काही लोक मोटारी लावून विहिरीमध्ये पाणी टाकतात हे रोखले जाईल माझा महत्वाचा प्रश्न सार्वजनिक शौचालय किती महिन्यांनी किती दिवसांनी स्वच्छ केले जातात ही जबाबदारी कोणाची माझे निवेदन द्यायचे आहे मी आयुक्त सो यांना दिले आहे महासभेमध्ये महापौर यांना द्यायची आहे महापूर असो अथवा गावांमध्ये सार्वजनीक शौचालयाचे काम सेवा फाउंडेशन ला दिले आहे तिथे चाललेले काम व्यवस्थित आहे किंवा नाही याची पाण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची आहे किंवा नाही फक्त नगरसेवकांनी केली पाहिजे अत्यंत तकलादू पद्धतीने काम सुरू आहे माझ्याकडे फोटो आहेत ते मी असो नसो यांना सेंड केले आहे तुम्हालाही देणार आहे रेती आणि सिमेंट अत्यंत खराब वापरलेले आहे ही पाहणी कोण करेल संबंधित अधिकारी ठेकेदाराला जर पाठीशी घालत असेल तर त्यांचीही चौकशी केली पाहिजे.हद्दवाढ गावासाठी विशेष योजना करणे आवश्यक

आहे.त्यासाठी हद्दवाढ गावातील जमा होणारा घरपट्टी व पाणीपट्टीचा महसूलातून त्याच गावासाठी विकास कामांवर खर्च करावा व त्यासाठी स्वतंत्र खाते उघडण्यांत यावे तसेच पाईप लाईनच्या कामासाठी स्वतंत्र तरतूद करण्यांत यावी ही विनंती.

म. पी डी चव्हाण — प्रभाग क्रमांक १ चा भाग पाणीपुरवठा संबंधी माझ्याकडे आहे आपली हद्दवाढ दि. ५ जानेवारी २०१८ झाली हद्दवाढीचे स्कीम मनपाला हस्तांतर झाली गावाचा जो प्लॅन होता त्यानुसार पाणी पुरवठा चालू आहेपाईप लाईनसाठी कामाचे प्रपोजल केले. वर्कऑर्डर देऊन कामही सुरू केले आहे वलवाडी गावात 150 ते 200 कॉलन्या आहेत त्यामध्ये केवळ 2.50 कोटीच्या पाईप लाईन टाकल्या आहेत. त्याचा यादी एस्टीमेट तयार केले व तेथील पाणी प्रश्न सुटणार आहे आपली जी स्कीम होती ती नकाणे तलावावरअवलंबून होती.वलवाडी गावाचे पंपींग स्टेशन येथील व्हॉल दुरुस्त केला.

म. शत्रुघ्न भिल — माझे गाव मनपा पासून तीन किलोमीटर लांब आहे येथील पाईप लाईन तीन इंची आहे तर काही ठिकाणी दोन्हींची पाईपलाईन आहे एकूण ४५व्हॉल आहेत इथला व्हॉलमन ४५ व्हॉल सोडतो व बंद करतो गावातील मोठ्या भागात पाणी पोहोचत नाही रोज पाण्यावरून भानगडी होतात पाईप लाईन पूर्ण बदलावी लागणार आहे यांनी पाहणी करून घेतली आहे व त्या ठिकाणी मानधनावर व्हॉलमन लावला पाहिजे.

म. रावसाहेब नांद्रे — हद्दवाढ गावचा कर त्याच गावत खर्च करण्यात येईल असे आपण सांगितले त्याबद्दल आम्ही अभिनंदन करतो. मोराणे गावचे 76 लाख रुपये जमा आहे.१४ वा वित्त आयोग जी कहाणी होती तरी व्हावयास नको. १४ वित्त आयोगाची फाईल १८महिन्यापासून फिरते आहे पाईपलाईनचे काम झाले तरी आम्ही समाधानी होऊ. पाण्याची व्यवस्था भरपूर आहे फक्त गटारांची व्यवस्था करावी लागणार आहे.

म अमोल मासुळे — नागरीकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न या ठिकाणी सदस्यांनी मांडला आहे महापौर सो गेल्या महिन्याला २८ तारखेला समितीची बैठक झाली होती त्यात यांनी पाणीपुरवठ्याला एक आदेश पारित केला होता धुळे शहरातील जे मेन लाईन वरचे कनेक्शन आहे ते शोधून त्यावर कठोर कार्यवाही करावी मी त्यांना विचारतो 13-14 दिवसात मनपाने धुळे शहरात किंवा मी किती मिळेल लाईन वरील कनेक्शन शोधून काढले व काय कार्यवाही झाली याची माहिती मला मिळावी तसेच महापौर आमच्या प्रभागात चार नगरसेवकांचा आहे आमच्या प्रभागाला येथून पाणीपुरवठा होतो तेथून शेवटच्या त्यांना खूप कमी दाबाने पाणीपुरवठा होतो चक्करबर्डी जलकुंभावर पाणीपुरवठा होतो त्या मेन लाईनवर कनेक्शन आहेत आणि मी स्वतः मनपा अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत त्या ठिकाणी जातो मी वाईटपणा घ्यायला तयार आहे जर हे 50-100 कनेक्शन बंद करून पुढील पाच-दहा कॉलन्यांना पाणी मिळेल तर आम्हाला आनंद होईल महापौर व आयुक्त सो यांनी नियमावर त्वरित कार्यवाही करावी पाणीपुरवठा आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती कुठले कुठले आहेत चक्करबर्डी मालेगाव टाकी व अनेक कर्मचारी आहेत ते त्या ठिकाणी कामाला जात नाही मी विनंती करतो हे महाभाग कोण जे मनपाचा पगार घेतात पण ड्युटीला जात नाही त्यामुळे मनपाला स्वतंत्र टेंडर काढावे लागते त्यामुळे मनुष्यबळ लागते त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे ते पण आपल्याला शोधून काढायचे आहे धुळे शहराला पाणीपुरवठा करणारे बांभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे आम्ही सभापती यांच्याबरोबर पाहणी करण्यास गेलो असता अनेक मोठ मोठे प्रकार त्या ठिकाणी निदर्शनास आले गेल्या पंधरा वीस वर्षापासून त्या ठिकाणी सातवी आठवी वाले कर्मचारी लावून काम करुन घेतो धुळे शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची सुविधा नाही त्या ठिकाणी आपली जागा खुप मोठी आहे. त्या

ठिकाणी दुसरे लोक वापर करत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी कंपाऊड करणे गरजेचे आहे. सि.सि. टि.व्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे आणि त्या ठिकाणी एक रसायन तज्ञ नेमणे खुप गरजेचे आहे. महापौर सो. मिल परिसरातील नागरीकांचा अत्यंत महत्वाचा जिव्हाळ्याचा प्रश्न २० जुन २०१९ रोजी मी महासभेमध्ये तो विषय घेतला होता मला असे वाटायला लागले आहे की कशा प्रकारे मुद्दे उपस्थित करायला पाहिजे व अधिकाऱ्यांना समजून सांगितले पाहिजे महापौर निवड होते अडीच वर्षाचा कार्यकाळ असतो सभापती निवड होते एक वर्षाचा कार्यकाळ असतो आयुक्त सो. हे शासन नियुक्त असतात एक, दोन, तिन वर्ष असतात अधिकारी येतात जातात पण मनपाचे कर्मचारी एकाच जागेवर बऱ्याच वर्षापासून आहेत धुळे शहराचा पाणीप्रश्न का सोडवू शकले नाहीत महापौर सौ. मी स्थायी समितीमध्ये प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी शिंदे सो. यांनी जे उत्तर दिले त्यानी मी समाधानी नाही. लॉकडाऊन मुळे असे करता आले नाही. आता लॉकडाऊन संपले आहे. नागरीकांनी आम्हाला निवडून मनपात प्रश्न मांडण्यासाठी पाठविले आहे. जर ते प्रश्न सुटत नसतील तर नागरीक म्हणतात आम्ही मोर्चे आंदोलन घेऊन मनपावर जाऊ २०१९ ला पण हाच प्रश्न मी उपस्थित केला होता त्यावर अजुन काहीच कार्यवाही नाही झाली २८ नंबर शाळेमध्ये जी टाकी आहे त्यावरुन तेथील ३०/४० कॉलन्यांना उच्च दाबाने पाणी मीळू शकते. आणि त्या ठिकाणी पाईप लाईन जोडली आहे . त्या टाकीचे लोकार्पण झाले त्यावेळी असेच सुर्यवंशी साहेब यांना घेऊन मनपाचे अधिकारीना घेऊन सदर टाकी भरली व कुठे लिकेज आहे का गळती आहे का तपासले आपण जर पाण्याची टाकी भरु शकतो तर लोकांना पाणी पुरवठा का करु शकत नाही धुळे शहराचा गंभीर प्रश्न आहे हा पाण्याचा. आयुक्त सो. आपण धुळे शहराचा पाण्याचा प्रश्न सोडवून द्या धुळे शहरातील नागरीक आपले कायम नाव काढतील शिंदे सो. धुळे मनपात पाण्याचा पुरवठा बाबत जेवढे ज्ञान कोणाला नसेल तेवढे आपल्याला आहे. त्यामुळे तुम्ही संपूर्ण धुळे शहराचा पाणी पुरवठा करुन द्या अजेंडा सोबत टिपणी का दिली नाही हे काय कारस्थान आहे ते थांबवा मनपात पाणी मिळत नाही म्हणून गुन्हा दाखल होतात आयुक्त सो. नगर सेवकांनी अति महत्वाचे मुद्यावर माहिती सांगीतली

म.हिना पठाण — महापौर साहेब आपण महत्वपुर्ण विशेष महासभा घेतली त्यात कोरोनात पाणी प्रश्नाचा विषय आहे. त्या बद्दल मी आपले आभारी आहे. माझा वार्ड क्र. ३ देवपूर हा ५ व ५ ची बोळ तेथे पाणी पोहचत नाही. दररोज नागरीक आमच्या घरी येतात. तक्रार करतात आंदोलन करतात येथे पाणी पोहचत नाही आम्ही नगरसेवक निवडून दिले आहे आमच्या समस्यांचे समाधान करावे सर्व नगर सेवक तक्रार करत आहे. यावर उपाय योजना कराव्यात आमच्या प्रभाग क्र. ३ मध्ये १ इंची पाईप लाईन टाकली असून त्यातून अजून पर्यंत पाणी सोडण्यात आले नाही. महापौर सो. हि समस्या केव्हा सुटणार.

म.पी.डी. चव्हाण — या भागात लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

म.अमीन पटेल — मी आणी पावटे सो. बडगुजर जलकुंभावर गेलो त्यावेळेस व्हॉलमन आम्हाला पाहून व्हॉल खोलत होता अशी सिस्टीम आपल्या मनपात आहे. त्या टाकीवरून पाणी सोडले जाते. तीथे कोणी नगर सेवक दमदाटी करतात. त्यामुळे तेथे cctv कॅमेरे लावले पाहिजे. महापौर सो. आपण धुळे शहराला पाणी पुरवठा देऊ शकतो पाणी मिळत नाही. कारण मध्ये मध्ये दुसरे व्हॉल सोडण्यात येतात. Cctv लावले पाहिजे. व त्या ठिकाणी जो कर्मचारी आहे. अधिकारी आहे त्यावर कार्यवाही झाली पाहिजे. त्या नंतरच दुसऱ्या भागाला पाणी सोडले गेले पाहिजे. Cctv कॅमेरे साठी मनपाने ३ लाख खर्च केले पाहिजे. उन्हाळ्याच्या दिवसात आपल्या साठी पाणी पुरवठ्याची गरज भासणार नाही आपल्याला इतर तलावातून पाणी मीळू शकते.

कर्मचारी गलत काम करत आहे. त्यामुळे धुळे शहराला पाणी मिळत नाही. काही भागात २४ तास पाणी मिळत आहे. परंतु शेजारी वार्डात नगरसेवक बोलत नाही. म्हणून त्याच्या वार्डाला पाणी मिळत नाही. आमच्या वार्डात गर्भवती महिलांना मनपाच्या दवाखान्यात जाताना नंतर चा सिव्हीलला जा असे सांगितले जाते तसेच सरफराज अन्सारी यांच्या आईने निवेदन दिले आहे. की आठ घंटे एका विभागाला पाणी द्यावे लागते. गरीब नवाज नगर मध्ये पाणी मिळत नाही. त्या ठिकाणी पाईप लाईन करण्यात आली असून ती जोडली गेलेली नाही.टॅक्स तर सर्वच नागरीक भरतात हाजी नगरला व गजानन कॉलनी तून डबल् पाणी द्यावे लागते. सर्व टाक्यांचा सर्व्हे चालू आहे. त्यानंतर सर्व व्हॉल चालू होतील असे शिंदे यांनी सांगितले परंतु अजुनही चालू झाले नाही. हाजी नगर गफुर नगर मध्ये टाकीला पाईपलाईन जोडली गेली आहे. व्हॉल लावला गेला आहे.फक्त त्या ठिकाणी व्हॉल खोलून पाणी देणे बाकी आहे. त्यामुळे हाजी नगर गफुर नगर चा पाणी पुरवठा सुरळीत होईल आम्हाला बडगुजर टाकीचे पाणी येणे आमच्या बाजुला टाकी तयार आहे. परंतु त्या ठिकाणाहून पाणी मिळत नाही. ज्या भागात टाकी आहे त्या टाकीचे पाणी त्या भागाला दिले तर चांगल्या प्रेशरने सर्वांना पाणी मिळेल.

म. हेमंत पावटे — लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

म.अमीन पटेल — माझ्या वार्डात एक दवाखाना आहे. त्या ठिकाणी ६० वयाचे डॉक्टर आहे. तेथे पेशंट भरपूर येतात त्या ठिकाणी मनपाच्या दवाखान्याला १ डॉक्टर नेमण्यांत यावा तसेच माझ्या भागातला कचरा ठेकेदार लक्ष देत नाही. त्यावर लक्ष देण्यात यावे.

म. हर्षकुमार रेलन — मी २००० साली नगरसेवक होतो त्यावेळी माझे गुरु मोहनभाऊ नवले त्यावेळेस आम्हाला १ विषय घेऊन पास करण्याचा होतो त्यावेळी आपल्याकडे ५२ नगरसेवक होते. आपण सभापती होते. मी विरोधक होतो आम्ही दिड वाजेपर्यंत सभा चालवली होती. तो विषय त्या वेळेस तहकूब होता. व नंतर तो पास केला होता. आज त्या वेळची आठवण येते.आपल्या नगर सेवकांना सुचना द्याव्यात की पाणी पुरवठ्याचा महत्वाच्या प्रश्न असतांना सदस्यासंनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. महापौर सो. २००० मध्ये आम्ही ज्या विषयावर बोलत होतो. त्याच विषयावर म्हणजे २०२० वर्षानंतरही त्याच विषयावर बोलत आहे.आपण कितीही आरडा-ओरड करत असतांना आपल्याला धुळे शहराला ४० ज्यु. इंजि १ पाणीपुरठा बघतो. लाईट विभागात बघतो. लोकांना पाण्याची गरज आहे. लोक रिटायर्ड होत आहे. भरती करत नाही. माणसे मानधनावर लावले जात आहे. मी विचारले भरती का करत नाही तर म्हणाले आपला आस्थापना खर्च जास्त आहे. व आकृती बंधानुसार नागरीक मनपामध्ये कर भरतात. मी माहिती मागवली होती. कि किती कर वसुल झाला व मागणी किती होती. नागरीक मालमत्ता कर भरतात त्यानुसार त्याना सेवा दिल्या पाहिजे. ज्या भागातून कर वसुल होतो. त्या भागाला सुविधा द्या असे महापौर यांनी सांगितले त्यावर मी म्हणालो कि माझ्या भागात सुविधा द्या असे महापौर यांनी सांगितले त्यावर मी म्हणालो कि माझ्या भागात सर्व व्यापारी राहतात. त्या नुसार माझ्या भागाला जास्त सुविधा मिळाल्या पाहिजे फुलेनगर भागातील लोकांना मी स्वत: ६ टँकर द्वारे पाणी पुरवठा केला आहे. स्वखर्चाने दिली आपल्याला पाणी मिळत नाही. परंतु जे लिकेज असते त्यांचे २४ तास लाखो लिटर पाणी गटारात जात असते. महापौर सो. लिकेजवर लक्ष द्या. मी बागुल यांना लिकेजचे लिस्ट दिली आहे. ५२ लिकेज आत्तापर्यंत पुर्ण झाले नाही. तसेच खड्डे बुजवीणे बाबत ओगले यांच्याशी बोलणे झाले आहे. पावसाळा चालू असुन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे धुळे शहरात असे मोठ मोठे बंगले बांधले गेले आहेत. परंतु त्यांना टॅक्स लावला नसून ते अजुनही २५ / ३० वर्षा पुर्वी जर चांगले नियोजन केले तर धुळे शहराची मालमत्ता कर वसुली १०० कोटी व्हायला पाहिजे ते आज ३० कोटी

आहे. ३० कोटी मध्ये आपण दंड हे करुन करुन १२ कोटी येतात. किती लोकांना घरपट्टी किती येते त्याचे ऑडीट करा व त्यानुसार घरपट्टी लावा त्यामुळे उत्पन्न वाढेल. व लोकांना सुविधा देता येतील. पण या गोष्टी कडे लक्ष देत नाही.

म.किरण अहिरराव बापूसो. विद्युत चा प्रश्न आहे. माझ्या हद्दवाढ महिंदळे मध्ये ४०० पोल आहे.मागील वर्षी पावसाळा ते दिवाळी पर्यंत दिवाळी पूर्ण अंधारात गेली. होती कारण पोलवर सिएफएल बंद होते तरी लाईटची दुरुस्ती करावी.

म.महापौर आज बऱ्याच दिवसांनंतर विशेष महासभा घेण्यात आली. त्यामध्ये कोरोना विषयी चांगले विचार मांडण्यात आले. अधिकारी कर्मचाऱ्या मार्फत चांगले काम होत आहे. दुसरा जो विषय होता पाणी पुरवठा संदर्भात पाणी पुरवठा सर्वात जास्त जबाबदार जर कोणी असेल तर ओव्हरसियर व्हॉलमन ग्राऊंड लेव्हलला व्हॉलमन काम करतात. ओव्हरसियर यांना माहित असते की कोणत्या ठिकाणी कमी जास्त दाबाने पाणी पुरवठा होतो काही भागात पाणी पोहजचत नाही. त्या बाबत संबंधीत ओव्हरसियर यांनी या संदर्भात कित्येक वर्षापासून तक्रारी येतात त्या तक्रारीचे नियोजन होत नाही. ओव्हर सिअर यांनी तक्रारीचे पूर्तता केली असती तर तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन काम केले असते तर आता अशी वेळ आली नसती. धुळे शहराचे क्षेत्रफळ पाहता काही भागात वेळेवर पाणी मिळत नाही. हा फक्त् ओव्हर सिअर यांचा कामचुकार पणा व नाकर्तेपणा आहे. या सर्व गोष्टी पाहता आम्ही महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या माध्यमातून अक्क्लपाडा योजना कार्यन्वीत केली. १३६ कोटीची योजना ही जवळ जवळ पूर्णत्वास आली आहे. १३६ कोटी पाणीपूरवठा योजना ७ जलकुंभ ज्या गोष्टी १ वर्षामध्ये या योजना झाल्याशिवाय पाणी देता येणार नाही. अक्क्लपाड्यामुळे पाण्याची क्षमता वाढली मोठे पाईप टाकले गेले. १ वर्षा भराच्या आत आपण धुळेकर नागरीकांना १ दिवसाआड पाणी देऊ शकतो. आम्ही दर वेळेस मिटींगा घेत असतो. कामे निदर्शनास आणून देतो. प्रशासन त्या प्रमाणे काम करत असते त्या १- २ महिन्यामध्ये आयुक्त सो. आपण बऱ्याचदा मिटींगा घेतल्या. सभापती यांच्या माध्यमातून १ मिटींग घेण्यात आली. त्याबाबत अधिकारी गांभीर्याने घेत नाही. आता पाण्यासंदर्भात हलगर्जीपणा करणा-याची गय केली जाणार नाही. कोणीही असो त्यांच्यावर कार्यवाही १०० टक्के होईल. धुळे शहरात पाण्याची कमतरता भासणार नाही अशी मी ग्वाही देतो. अक्कलपाडा माध्यमातून कामाची सुरुवात केली आहे. अक्क्लपाडा योजनेवरुन धुळे शहरात पाणी पुरवठा होईल विज बिलाचा खर्च कमी येईल. अक्कलपाड्यातून हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी येईल.त्या ठिकाणाहून कुमारनगर मालेगाव रोड दसेरा मैदान व इतर टाकीवर पाणी पुरवठा होऊ शकतो. अक्क्लपाडा योजना पुर्ण झाल्यानंतर तापी पाणीपुरवठा योजनेवरुन ५० टक्के पाणी उचलण्यात आले आहे. अक्क्लपाडा योजना पूर्ण झाल्यानंतर त्यातून पाणी पुरवठा करण्यात येईल. ओव्हरसिअर यांना सांगणे आहे की. लिकेज मुळे जे पाणी वाया जाते लाखो रुपये खर्च करतो त्यावर लक्ष द्यावे या कामात कन्सल्टंट नेमणे आवश्यक आहे. त्या बाबत शिंदे सो. यांनी माहिती द्यावी.

म.कैलास शिंदे अभियंता धुळे शहराला पाणीपुरवठा करण्याचे दोन स्त्रोत आहे. एक तापी आणी २ अक्कलपाडा या दोन योजनेवरुन धुळे शहरात पिण्याचा पाण्याचा पुरवठा होतो. आपल्या धुळे श्हाराची हद्दवाढ होणे पूर्वी हद्दवाढ गावामध्ये पाईपलाईन आहेत त्या अगदी छोट्या छोट्या आहेत. १ जानेवारी हद्दवाढ होण्यापुर्वी लोकसंख्या ही साडे सहा लाखापर्यंत झाली आहे. त्यानंतर मोराणे महिंदळे , बाळापूर सर्व हद्दवाढ गावे धरुन १०३ एमएफटी पाणी लागेल आपल्याकडे जे सध्या मनुष्य बळ आहे त्या आपल्या मंजुर आस्थापनेच्या २० टक्के आहे त्यातपण साधाणत: ५ टकके कंत्राटी

कर्मचारी आहे. आजच्या सभेमध्ये ज्या ज्या सदस्यांनी भाग घेतला किरण अहिरराव यांनी मुद्दा मांडला त्यांच्या म्हणणे आहे की हद्दवाढ झाल्यानंतर जेवढी गावे धुळे शहरात सामाविष्ट झाली त्या गावामध्ये अस्तित्वात ज्या पाईपलाईन आहेत त्या सर्व पीव्हीसी आहे व छोट्या आहेत. वास्तीवक त्या पाईपलाईनवर जे कनेक्शन होते ते कमी होते व त्या नंतर कॉलन्या वाढल्यामुळे त्यावर नळ कनेक्शन ही वाढले व पाईपलाईन ही जीर्ण झाली आहे. उन्हाळ्यात शहरासाठी प्रति माणसे २० लिटर व ग्रामीण भागासाठी ७५ पर डे असा होतो त्यामुळे १३५ प्रति माणसे आपल्याला पाणी द्यावे लागणार आहे.त्यासाठी सर्व जलवाहिन्या बदलणे आवश्यक असलयाने त्यासाठी स्वतंत्र कन्सर्टींग ची नेमणुक करुनच हा प्रस्ताव तयार करावा लागेल पुर्वी अग्रवाल साहेबांच्या वेळी कुठे पाईपलाईन टाका तसेच आजपण चालू आहे. आपण एका जलकुंभावरुन आठ आठ किमी ची पाईपलाईन ३० एमएम ला १८ एमएम पाईप लाईन जोडून दिली. पुर्वी चे जे व्हॉल ऑपरेटकरत होते टाकीवरुन व्हॉल सोडून त्यामुळे संपुर्ण देवपूर भागाला पाणी मिळते. त्या त्या भागातील तांत्रीक बळ किंवा कर्मचाऱ्यांनी लक्ष न दिल्यामुळे एकाच दिवसात झालेली नाही सुमारे बारा वर्षापुर्वी झालेली आहे त्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याने असे झाले आहे. हद्दवाढ गावासाठी आपल्याला सर्वेक्षण करणे टाक्या व पाईपलाईन दुरुस्त करुन घेणे त्यासाठी आपल्याला ३ कोटी खर्च येईल असे अंदाजपत्रक तयार आहे. दुसरे असे की कन्सल्टींग नेमल्याने खर्चकमी होईल. दुसरे असे की शितल भाऊंनी प्रश्न उपस्थित केले त्यावर देशमुख सो यांच्यावेळेस कंन्सल्ट नेमणे बाबत पीसी ही तयार केली होती. त्यावर तत्कालीन आयुक्त यांनी निर्णय घेणे आवश्यक होते व त्या बाबत आम्हाला काही सुचना व आदेश दिले नव्हते. आपल्या तापी योजनेमधील पंप ३० वर्ष जुने आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे साधारणत: पंप लावून ३० ३२ वर्ष झाली हनुमान टेकडी वरची पण जुनी झाली आहे. टेंडर एवढ्या आठ दिवसाच्या आत महापौर सो आयुक्त सो यांच्या मार्गदर्शनाखाली वृत्तपत्रात व वेबसाईटवर प्रसिध्द करु त्याच्यामध्ये काय काय समाविष्ट करणार आहोत त्या बाबत आजच्या आज शितल भाऊंना मेल करतो व त्यात आपल्याला काही चेंजेस करायचे असल्यास ते पण करु व फायनल केल्यानंतर आपण निविदा प्रसिध्द करु अक्कलपाड्याचे काम चालू आहे त्याचा भूसंपादनाचा प्रश्न होता तो प्रश्न मा. गिरीष महाजन यांनी मध्यस्थिती करुन जागा हस्तांतरण करुन कामाला सुरुवात देखील झाल आहे.आयुक्त सो.सभापती व सदस्यांनी आठवडयातुन एकदा एमजीपी व मनपा अधिकाऱ्यांची दर आठवड्याला मिटींग घेतली तर हे काम स्पिड अप होऊ शकते. त्याचे आता फिल्टरेशन प्लांट व इतर कामे आता करता येतील पाण्याचा साठा कमी झाल्या नंतर जानेवारी ते जुन पर्यंत अडीच ते तीन महिन्याचे काम आहे. हे जर काम पुर्ण झाले तर याप्रमाणे आपल्याला उपाययोजना करता येतील. त्याचप्रमाणे आपल्याला तापी पाणीपुरवठ्याचे पाईप बदलणे दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रकात तरतुद आहे. इलेक्ट्रीक इंजीनिअर व सचिव यांच्या कडेही बैठक झाली होती शासनाने असे धोरण ठरवले होते की, नगरपालिका व महानगरपालिका यांचे पंप जर विकत घ्यायचे असतील तर पावर फंक्शनमध्ये घेणार होते. नंतर निर्णय झाला एमजीपी चे अधिकारी आहेत नाशिक नगर साठी एकच मनुष्य आहे. त्याच्या कडे डाटा दिला होता आपण त्यांना पत्र देखील दिले आहे. नाना कर्पेयांनी प्रश्न उपस्थिती केला होता दोन तिन दिवसात पाणी यायला पाहिजे सात आढ दिवसात पाणी येते. धुळे शहर पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन तिस वर्ष जुनी आहे व हद्दवाढ गावाची तिच परिस्थिती आहे. ग.नं ६ मध्ये १२ इंची पाईपलाईन एमजीपी ने टाकली आहे तेथेही पाणी येत नाही. संबंधीत ओव्हरसीअर यांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी तसेच प्रतिभाताई चौधरी यांनी प्र.क्र. ४ मध्ये आठ दिवस

आड पाणी येते. पण मात्र देवपुर भागात ८ दिवसाआड पाणी येते यांच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. वंदनाताई यांनी ही प्रश्न उपस्थित केला होता त्याप्रमाणे हद्दवाढ गावात आपण घेऊ युवराज अण्णानी सांगितले होते की, आमच्या भागात ६ दिवसाआड पाणी येते २६ भागात लिकेज आहे. त्यावर एक एजन्सी नेमुन १५ दिवसाच्या आत लिकेज काढले जातील पावटे सो. या भागात तुमची एजन्सी त्वरीत कार्यवाही करा. धुळे शहरात नियमीत पाणीपुरवठा कसा होईल याबाबत आयुक्त महापौर सभापती यांनी चर्चा करुन पाणी पुरवठा सुरळीत करणे कठीण आहेत.बंटी भाऊंनी प्रश्न उपस्थित केला होता शाळा नं. २८ मध्ये सध्या आपल्याला जे पाणी मिळणार आहे ते तापी वरुन मिळणार आहे.सध्या हनुमान टेकडी वरुन आता फक्त १८ पाणी मिळत आहे. त्याच्यात मोगलाई परीसर अशोक नगर चा पट्टा साक्रीरोड कडील दक्षिण भाग १.२५ लाख लोकसंख्येला पाणी दिले जात आहे. त्यामुळे त्या भागामध्ये आजच त्या टाकीला पाईप लाईन जोडणी तर आज वरील भागात डिस्ट्रब होईल. रामनगर ला जे पाण देतो आहे तेथे २४ तास १ पंप चालू आहे. रामनगर चा पाणीपूरवठा तापीवरुन कराचा व ते पाणी सेव करुन इकडे द्यायचे या साठी १ महिना फार वेळ लागणार आहे. जर तेथून पाणी देऊ शकलो तर १०० टक्के आपण भरु तुमच्या भागाला पाणी मिळत आहे.परंतु कमी दाबाने मिळत आहे. सदरचे लोक व आम्ही डिस्कस करुन त्यावर कार्यवाही करु ते बेकायदेशीर नळ कनेक्शन मुळे पाणी मिळत नाही.तर बेकायदेशीर नळ कनेक्शन शोधण्यासाठी आपण ठेका नेमतो आहे. त्या ठेक्याची कार्यवाही १ महिन्यामध्ये करु.

म.सुनिल बैसाणे संतोषी माता चौक ते अब्दुल हमीद स्मारक येथे डांबरी रस्ता तयार झाल्यावर त्या ठिकाणी पाईपलाईनचे कामे होतात. त्यामुळे सदर ठिकाणी खड्डे पडतात. त्यामुळे गाड्या स्लिप होतात संबंधीत ठेकेदाराने आपल्या कडून परवानगी घेतली आहे काय तरी त्यांना आदेशीत करा की त्या ठिकाणाचे काम चांगले होईल. संबंधीत ठेकेदार असेल जो कुणी असेल त्यावर आपण तात्काळ कार्यवाही करावी.

म.महापौर आपण विशेष महासभेच्या माध्यामातुन सर्व एकत्र आलो अधिकाऱ्यांनी पाण्याच्या प्रश्नावर लक्ष द्या. किरकोळ गोष्टी मुळे पदाधिकाऱ्यांना त्रास होतो. पाण्याच्या समस्या सोडविण्यासाठी आयुक्त सो. तत्पर असतात. व आपण सर्व मिळून यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत.

सर्व सन्मा. सदस्य मिळून विविध मुद्दयांवर आपले समय सुचक विचार व्यक्त केले. या सर्व बाबींचा विचार करुन व मुद्दयांचा समावेश करुन ठराव पारीत करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०८ दिनांक १०/०६/२०२०

धुळे शहरातील अनियमित पाणीपुरवठा तसेच कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आयोजित विशेष महासभेत सर्व सन्माननीय सदस्यांनी विविध मुद्दयावर विचार व्यक्त केले त्या अनुषंगाने आजच्या महासभेत खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

१. धुळे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकासाचा अनुशेष लक्षात घेता व त्यातील मूलभूत नागरी सुविधांची प्रलंबित कामे लक्षात घेता सद्यस्थितीत हद्दवाढ गावातील पाणीपट्टी व घरपट्टी तसेच धुळे महानगरपालिकेत जमा होणाऱ्या सर्व प्रकारच्या महसुलातून त्या त्या भागातील विकास कामे व मूलभूत नागरी सुविधांची कामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.यासाठी स्वतंत्र खाते करण्याबाबत कार्यवाही करावी.

२. तसेच हद्दवाढ गावातील पिण्याच्या पाण्याची समस्या लक्षात घेता तात्पुरत्या स्वरूपात सन 2020-21 या वित्तीय वर्षाच्याअंदाजपत्रकात 3 कोटी रुपये मात्र तरतूद पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनसाठी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. कोरोना आपत्तीच्या काळात कार्यरत सर्व कर्मचारी तसेच कार्यरत पदाधिकारी यांचा आरोग्य विमा काढण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रत्यक्षात फिल्डवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना आवश्यक ते संरक्षणात्मक साहित्य पुरविणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

५. धुळेकर नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी प्रतिकार क्षमता वाढवण्यासाठी सर्व मनपा हद्दीतील नागरिकांना अर्सेनिक अल्बम30 या होमिओपॅथी गोळ्यांचा व युनानी औषधीचा पुरवठा करण्यास व त्यासाठी येणारा खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

६. आयुष्यमानमंत्रालयाच्यानिर्देशानुसार महानगरपालिकेचा सध्या स्थिती असलेला आयुर्वेदिक दवाखाना अद्ययावत नूतनीकरणासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे व covid-१९ अंतर्गत आवश्यक ते साहित्य उपकरणे तसेच आवश्यक ती कर्मचारी नियुक्ती नवीन दवाखान्यांची उभारणी यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे आर्थिक अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. धुळे शहरातील पाणी वितरणातील अडचणी समस्या लक्षात घेता यासाठी उपलब्ध पाणी साहित्य मशिनरी यांचे वॉटर ऑडिट करण्यासाठी तसेच आवश्यक ते तांत्रिक मार्गदर्शन घेण्यासाठी तज्ञ सल्लागार संस्था नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच जुने धुळे भागातील पाण्याची तीव्र समस्या लक्षांत घेता संपूर्ण जुने धुळे तसेच वरखेडी यासाठी स्वतंत्र वॉटर ऑडीट व तांत्रिक सल्लागार नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. यात धुळे महानगरपालिकेच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबी व अटी शर्ती यांचा समावेश करुन व याबाबत तांत्रिक मार्गदर्शन घेवून तातडीने जलद गतीने प्रशासनाने निविदा प्रक्रिया व पुढील कार्यवाही करावी.

८. अक्कलपाडा योजनेच्या कामास गती देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ सोबत समन्वय ठेवून व त्यासाठी एक स्वतंत्र अभियंता नियुक्त करून कामाचा आढावा घेण्यात यावा तसेच यासाठी महापौर,आयुक्त व अभियंता यांची त्रिसदस्यीय दक्षता समिती नेमण्यास मान्यता देण्यांत येत आहे समितीने कामाची प्रगती तपासून तसा अहवाल दरमहा सादर करावा.व कामाच्या प्रगतीकडे प्राधान्याने लक्ष देण्याबाबत कार्यवाही करावी.

९. अक्कलपाडा योजनेअंतर्गत एम.बी.आर जलकुंभ भरणेसाठी 800 एम.एम. ची पाईप लाईन टाकण्यांत येणार आहे. सदर पाईप लाईन नगाव गट कं. 292 व भोकर गट क्रं. 137या वन परिक्षेत्राच्या शिवारातून जाणार आहे. सदर पाईप लाईन टाकण्यासाठी वनविभागाची परवानगी आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव प्रशासनाने वन विभागाकडेस तात्काळ सादर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

१०. तापी योजनेचे पंप बदलणे तसेच पाईपलाईन कलरिंग करणे इत्यादी कामाबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

११. पाणी वितरणात समन्वय राहावा यासाठी मनपा स्तरावर समन्वय ठेवून कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खडक कार्यवाही प्रशासनाने करावी.

१२. कोरोनाआपत्तीच्या काळात नागरीकांना मालमत्ता करभरण्यास अडचणी निर्माण झाल्याने थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफी बाबत प्रशासनाने तांतडीने निर्णय घ्यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.१२ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत सभागृह,धुळे
गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२०
वेळ सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 2 मधील नियम क्रं. 1(क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय महासभा आज **गुरुवार दिनांक १२/११/२०२० रोजी सकाळी ११-०० मा. श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
1	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी 11- 00 वाजतां
2	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
3	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
4	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
5	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
6	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
7	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
8	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
9	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
10	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
11	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
12	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
13	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
14	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
15	श्रीमती.बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
16	सौ. पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
17	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
18	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
19	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
20	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्या	----------" ---------
21	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
22	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------

23	श्रीमती.कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
24	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
25	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
26	श्रीमती महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
27	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
28	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
29	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
30	श्रीमती.मंडोरे वालीबेन प्रकाशचंद्र	सदस्य	----------" ---------
31	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
32	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
33	श्रीमती.वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
34	श्री.पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
35	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
36	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
37	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
38	श्रीमती.शेख शाहजहान बी. बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
39	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
40	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
41	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
42	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
43	श्रीमती.जाधव शकुंतला शंकर	सदस्या	----------" ---------
44	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
45	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
46	श्रीमती. बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
47	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
48	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
49	श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
50	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
51	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
52	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
53	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
54	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
55	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
56	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
57	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
58	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
59	श्री. महाले संदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
1	श्री. अजीज शेख	आयुक्त	सकाळी 11-00 वाजतां
2	श्री. गणेश गिरी	अति.आयुक्त	----------" ---------
3	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा.आयुक्त	----------" ---------
4	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
5	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त	----------" ---------
6	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
7	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
8	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
9	श्री.नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------
10	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
11	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------
12	श्री. चंद्रकांत जाधव	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
13	श्री. लक्ष्मण पाटील	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
14	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
15	श्री. रविंद्र सोनवणे	लिपीक परवाना विभाग	----------" ---------
16	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मू.निर्धारण अधिकरी तथा प्र. मु. लेखाधिकारी	----------" ---------
17	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
18	श्री. राजेश गायकवाड	व.सहा. मनपा शि.मं.	----------" ---------
19	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
20	श्री. विशाल निंबाळकर	लिपीक अभिलेख विभाग	----------" ---------
21	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
22	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. वि.	----------" ---------
23	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. वि.	----------" ---------
24	श्री.कमलेश सोनवणे	ओव्हरसिअर न.र. वि.	----------" ---------
25	श्री. तुषार ढाके	अग्नीशमन अधिकारी	----------" ---------

मा.महापौर आजच्या महासभेस उपस्थित सन्मा.पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी,अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो.नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया.

१) धुळे शहरातील नामवंत मल्ल तसेच महाराष्ट्र चॅम्पीयन पहेलवान मा. राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच निधन झाले आहे, तसेच महापौर श्री.चंद्रकांत बापू सोनार यांचे लहान बंधु भैय्या भाऊ सोनार यांचे कोरोना काळात दु:खद निधन झाले आहे.तसेच माजी नगराध्यक्ष तथा माजी स्थायी समिती सभापती मा. चंद्रकांत (काका) केले यांचे दु:खद निधन झाले आहे. तसेच जुने धुळे परिसरातील श्री.भोलेबाबा यांचे शिष्य प.पू.श्री.वाल्मीक दादा बोडके यांचे देखील नुकतेच निधन झाले आहे.

सदर मान्यवरांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक श्री. देवेंद्र चंद्रकांत सोनार, नगरसेवक मनपा धुळे

२) धुळे शहरातील प्रसिध्द उद्योजक, तत्कालीन नगरपालिकेचे नगराध्यक्ष, तसेच महानगरपालिकेचे माजी स्थायी समितीचे सभापती मा. चंद्रकांत (काका) काशिनाथ केले, तत्कालीन महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मा. विलासभाऊ रतन खोपडें, तसेच धुळे शहरातील नामवंत मल्ल मा.राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. तसेच कोरोना काळात सेवा देत असतांना बहुतांश कोरोना योध्दा (वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय कर्मचारी, शासकीय कर्मचारी तसेच शहरातील नागरीकांचे दु:खद निधन झाले.

आज रोजीच्या महासभेत मा. चंद्रकांत (काका) काशिनाथ केले, मा. विलासभाऊ रतन खोपडे,तसेच मा.राजधर एलजी कोळी तसेच कोरोना काळात सेवा देत असतांना बहुताश कोरोना योध्दा (वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय कर्मचारी, शासकीय कर्मचारी तसेच शहरातील नागरीक) यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल भाऊ बैसाणे सभापती , स्थायी समिती

३) कुस्तीची पंढरी असलेल्या धुळे शहरासह जिल्हयाचे नाव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नेऊन पोहचविणारे ख्यातनाम मल्ल कै.राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच तीव्र हददय विकाराच्या झटक्याने निधन झाले.जुने धुळे येथील बालगोपाल तालमीचे आधार स्तंभ तथा शानअसलेले नामांकित पैहवान म्हणून ओळख निर्माण करुन आपल्या कुस्तीच्या कार्य कौशल्याच्या जोरावर संपूर्ण धुळे जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात धुळे जिल्हयाचे नांव लौकीक करणारे धुळे शहराला प्रथम महाराष्ट्र चॅम्पियन पद मिळवून देणारे आज आपल्यातून काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांचे नांव धुळे जिल्हा कदापीही विसरु शकत नाही.

तरी मे.महासभेत कै.राजधर एलजी कोळी यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत रण्यांत यावा ही विनंती.

सूचक :- विजय बापू जाधव , नगरसेवक, मनपा धुळे

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार सर्व मान्यवरांना आजच्या महासभेत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यासाठी दोन मिनिटे मौन उभे राहावे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १०९ दिनांक १२/११/२०२०

सन्मा. स्थायी समिती सभापती व सन्मा.नगरसेवकांच्या आलेल्या यादीनुसार धुळे शहरातील प्रसिध्द उद्योजक, तत्कालीन नगरपालिकेचे नगराध्यक्ष, तसेच महानगरपालिचे माजी स्थायी समितीचे सभापती मा. चंद्रकांत (काका) काशिनाथ केले, तत्कालीन महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मा. विलासभाऊ रतन खोपडें, तसेच धुळे शहरातील नामवंत मल्ल मा. राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. तसेच कोरोना काळात सेवा देत असतांना बहुतांश कोरोनायोध्दा (वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय कर्मचारी, शासकीय कर्मचारी) तसेच शहरातील नागरीकांचे दु:खद निधन झाले.

तसेच कुस्तीची पंढरी असलेल्या धुळे शहरासह जिल्हयाचे नाव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नेऊन पोहचविणारे ख्यातनाम मल्ल कै. राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच तीव्र हददयविकाराच्या झटक्याने निधन झाले.जुने धुळे येथील बालगोपाल तालमीचे आधार स्तंभ तथा शान असलेले नामांकित पैहवान म्हणून ओळख निर्माण करुन आपल्या कुस्तीच्या कार्यकौशल्याच्या जोरावर संपूर्ण धुळे जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात धुळे जिल्हयाचे नांव लौकीक करणारे धुळे शहराला प्रथम महाराष्ट्र चॅम्पियन पद मिळवून देणारे आज

आपल्यातून काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांचे नांव धुळे जिल्हा कदापीही विसरु शकत नाही.

तसेच जुने धुळे परिसरातील श्री.भोलेबाबा यांचे शिष्य प.पू.श्री.वाल्मीक दादा बोडके यांचे देखील नुकतेच निधन झाले आहे.

तसेच तसेच मा.महापौर श्री.चंद्रकांत बापू सोनार यांचे लहान बंधु भैय्या भाऊ मधुकर सोनार यांचे कोरोना काळात दु:खद निधन झाले आहे.

वरील सर्व मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांचे आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत असून तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेला अभिनंदनाचा ठराव.

स्वच्छ सर्वेक्षण अभियानात धुळे महानगरपालिकेने या वर्षी थ्री स्टार मानांकन प्राप्त केले. तसेच देशात नववा तर राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. सदरची बाब अत्यंत कौस्तुकास्पद व गौरवास्पद आहे. धुळे महानगरपालिकेचे शिरपेचात अजून तुरा खोचला गेला आहे. मनपा अधिकारी व स्वच्छता कर्मचारी यांनी कोरोना काळात व स्वच्छ सर्वेक्षण 2020 मध्ये केलेल्या कामाचा व दिलेले योगदान महत्वाचे आहे.

सदरच्या कौतुकास्पाद कामगिरी बद्दल महानगरपालिका आयुक्त मा. श्री. अजीजजी शेख सो.अति.आयुक्त मा.श्री.गणेशजी गिरी सो. उपायुक्त मा.श्री.शांताराम गोसावी सो., सहा.आयुक्त श्रीमती पल्लवी शिरसाठ,श्री. विनायक कोते, श्री.तुषार नेरकर, आरोग्याधिकारी डॉ. महेश मोरे,अभियंता श्री. कैलास शिंदे, तसेच सदर कामात सहभागी मनपाचे सर्व नगरसेवक,नगरसेविका, इतर अधिकारी / कर्मचारी व विशेषत: आरोग्य विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती स्थायी समिती मनपा धुळे

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११० दिनांक १२/११/२०२०

सन्मा. स्थायी समिती सभापती यांच्या यादीनुसार स्वच्छ सर्वेक्षण अभियानात धुळे महानगरपालिकेने या वर्षी थ्री स्टार मानांकन प्राप्त केले. तसेच देशात नववा तर राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.सदरची बाब अत्यंत कौस्तुकास्पद व गौरवास्पद आहे. धुळे महानगरपालिकेचे शिरपेचात अजून तुरा खोचला गेला आहे.मनपा अधिकारी व स्वच्छता कर्मचारी यांनी कोरोना काळात व स्वच्छ सर्वेक्षण 2020 मध्ये केलेल्या कामाचा व दिलेले योगदान महत्वाचे आहे.

सदरच्या कौतुकास्पाद कामगिरी बद्दल महानगरपालिका आयुक्त मा. श्री. अजीजजी शेख सो.अति.आयुक्त मा.श्री.गणेशजी गिरी सो. उपायुक्त मा.श्री.शांताराम गोसावी सो., सहा.आयुक्त श्रीमती पल्लवी शिरसाठ,श्री. विनायक कोते, श्री.तुषार नेरकर, आरोग्याधिकारी डॉ. महेश मोरे, अभियंता श्री. कैलास शिंदे, तसेच सदर कामात सहभागी मनपाचे सर्व

नगरसेवक,नगरसेविका, इतर अधिकारी / कर्मचारी व विशेषत:आरोग्य विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्या श्रीमती.मदिना समशेर पिंजारी यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १११ दिनांक १२/११/२०२०

सन्मा. सदस्य श्रीमती. मदिना समशेर पिंजारी यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८३ धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक २२/१०/२०२० अन्वये शिफारस केल्यानुसार धुळे महानगरपालिकेचे सन२०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नगरसचिव अर्थसंकल्पाबाबत मा. महापौर साहेब विवेचन करतील त्यानंतर चर्चेस सुरवात होईल.

मा. महापौर प्रशासनामार्फत व स्थायी समिती मार्फत संकल्पीय अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. कोरोनाच्या आपत्तीमुळे अंदाजपत्रकास विलंब झालेला आहे. आपल्या धुळे शहराचा मोठा इतिहास आहे.आपले शहर जरी रचनाबद्ध असले तरी नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची उद्दिष्टे राखण्यासाठी मनपात भाजपची सत्ता आली आहे आम्ही धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी योजना प्रस्तावित केल्या होत्या त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत महाराष्ट्राचेआदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आमचे नेते आदरणीय गिरीश भाऊ महाजन आमचे नेते खासदार आ. डॉक्टर सुभाष जी भामरे धुळे शहराचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आदरणीय अनुपजी अग्रवाल तसेच मनपाचे आयुक्त व सर्व अधिकारी आणि मी महापौर या नात्याने ज्या वेळेस धुळे शहरात निवडणुकीच्या दरम्यान या आमच्या नेत्यांनी शब्द दिला होता विकासा संदर्भात धुळे शहरात सत्ता आल्यानंतर भाजपचा महापौर बसल्या नंतर सर्वप्रथम त्यांनी १०१ कोटी रुपये धुळे शहराच्या रस्त्यांसाठी दिले त्या रस्त्याचे कामे चालू आहेत त्याचप्रमाणे बऱ्याच वर्षापासून धुळे शहराला पाण्याची टंचाई भासत आहे सर्वात जिव्हाळ्याचा प्रश्न जनतेसाठी आम्हाला सोडवायचा होता तो पाण्याचा प्रश्न धुळे शहराला दररोज व नियमित उच्च दाबाने पाणी मिळण्यासाठी या दृष्टीने जीवनदायी अक्कलपाडा योजना १७८ कोटीची आमच्या नेत्यांनी मंजुरी दिली आहे अक्कलपाडा योजनेचे आपल्या शहराचे भाग्य असे आहे की देशाचे पंतप्रधान आदरणीय मोदी साहेब यांच्या हस्ते भूमिपूजन व उद्घाटन यांच्या हस्ते पार पडला आदरणीय मोदी जी साहेब यांच्या हस्ते जीवनदायी योजना

अक्कलपाडाचे उद्घाटन झाले त्यावेळेस मी महापौर असताना मोदी साहेबासोबत मी स्वतः असताना हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण होता आयुष्यात असा क्षण व दिवस कधी आला नाही व येणार नाही दुसरा महत्वाचा विषय असा की धुळे शहरांमध्ये ४०-५० वर्षांपूर्वी काही ठिकाणी अंडरग्राउंड ड्रेनेज झालेले आहे त्या दृष्टीकोनातून मनपाच्या माध्यमातून आमचे अधिकारी खास करून बांधकाम विभागाची शिंदे सो. सर्व अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्यावेळी धुळे शहराचे मलनिस्सारण योग्य पद्धतीने व्हावे या दृष्टीकोनातून योजना आम्ही मंजूर केली पहिला टप्पा होता तो पहिले संपूर्ण देवपूर भागात केला देवपूर भागासाठी १३६ कोटीची अंडरग्राउंड ड्रेनेज योजना आज कार्यरत आहे काम करीत असताना त्या त्या भागातील नागरिकांना त्रास झाला त्याच्या वेदना आम्हाला फार होत असतात परंतु दुर्दैव असे की सदर योजना शासनाच्या माध्यमातून एमजीपी (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण)कडे वर्ग झालेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडे वर्ग झाल्यामुळे त्यांचे देखभाल-दुरुस्ती चे सर्व अधिकार एम. जी. पी. लाअसल्यामुळे सदर योजना महाराष्ट्र शासनाच्या अधीन आहे आणि त्या पद्धतीने ते काम करीत असतात ज्यावेळेस पाईपलाईन टाकताना नागरिकांना त्रास झाला कारण की त्यावेळेस पावसाळ्याचे दिवस असल्याने देवपूर भागातील जनतेला फार मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागला त्या संदर्भात आयुक्त सो मा. खासदार डॉ सुभाषजी भामरे मा. अनुपभाऊअग्रवाल व मी पुष्कळ वेळा बैठका घेतल्या त्यासंदर्भात ठेकेदाराला दंड करण्यात आलेला आहे ठेकेदाराकडून दुरुस्ती करण्यात आली आहे परंतु हे सर्व होत असताना देवपूरसाठी एवढे मोठे काम होत आहे त्याच्या अगोदर भरपूर सत्ता आली पण ते हे भाग्य मला लाभल्याने देवपूरचा कायापालट होणार अंडरग्राउंड ड्रेनेजमुळे सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होणार आहे परंतु काम होत असताना थोड्या फार त्रास सहन करावा लागणार आणि आता जे जे रस्ते खराब झाले आहेत ते सर्व रस्ते शासनाच्या व मनपाच्या माध्यमातून आम्ही करणार आहोत गोंदूर रोड दत्त मंदिर ते वाडीभोकर रस्त्याचे काम चालू आहे नेहरूनगर चौकापासून ते वलवाडी व वाडीभोकर रस्त्याचे कामे १०० कोटी रस्त्याच्या माध्यमातून चालू आहेत सावरकर पुतळा ते मोराणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कामे चालू आहेत या सर्व गोष्टी करत असताना धुळे शहरांमध्ये नागरिकांसाठी व माता-भगिनी साठी चांगल्याप्रकारे पर्यटन स्थळ व्हावे या दृष्टिकोनातून आमच्या नेत्यांनी मा.खासदार डॉ. सुभाष जी भामरे, अनुपजी अग्रवाल मा.आ. गिरीशभाऊ महाजन आम्ही माजी मुख्यमंत्री साहेबांच्या माध्यमातून जे धुळे शहरांमध्ये बेकायदेशीर बांधकाम झाले होते त्या ठिकाणी ५ कोटी रुपये शासनाच्या माध्यमातून आले त्या ठिकाणी नदीकिनारी ज्या ठिकाणी चौपाटी होते तेथे अतिशय सुंदर बगीच्याचे काम प्रशासनामार्फत चालू आहे त्याचप्रमाणे आ. जयकुमारजी रावळ सो. हे पर्यटन मंत्री असताना त्यांच्या निधीतून जवळजवळ १५० ते २०० वर्षांपूर्वीचा आपल्या धुळे शहराचा मानाचा तुरा असलेल्या टॉवर गार्डन त्यासाठी ५ कोटी रुपये शासनाच्या माध्यमातून आणले ते काम देखील पूर्णपणे सुरू होते पहिला टप्पा १५० लक्ष आहे परंतु बीजेपीचे सरकार चेंज झाल्यामुळे टॉवर गार्डनची उर्वरित ३५० लक्षाची निधी गोठवण्यात आले परंतु शासनाकडून निधी येवो अथवा नाही यावर गार्डनचे रखडलेले काम पूर्ण करण्याचा मानस आहे वरील जो निधी आहे तो मनपाच्या माध्यमातून करण्याचा आमचा मानस आहे धुळे शहरातील अतिशय महत्त्वाचा रस्ता म्हणजे स्टेशन रोड चौक ते दसरा मैदान पर्यंतचा रस्ता आहे त्या ठिकाणी भरपूर अतिक्रमणे होते भरपूर वर्दळ होती आणि तो रस्ता वाहतुकीचा असल्याने नागरिकांना वापरत असताना त्रास व्हायचा त्यामुळे १०कोटीचा निधी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून आमच्या नेत्यांनी आणला तो रोड आज चांगल्या प्रमाणात होत आहे

रेल्वे स्टेशनच्या येथे जो चौक आहे तो चौक सुशोभिकरण करण्यासाठी ५० लाखाचा निधी कालचा मी दिलेला आहे अनुपजीअग्रवाल खासदार डॉक्टर सुभाषजी भामरे यांच्या सांगण्यानुसार एवढा मोठा रस्ता झाला आहे तर चौक सुशोभिकरण झाले पाहिजे या दृष्टिकोनातून ५० लक्ष रुपये निधी त्या ठिकाणी देण्यात आला आहे त्याचप्रमाणे संपूर्ण मिल परिसर भागजो शेवटच्या काळात आपल्याला जो अंतिम क्षण येतो त्या ठिकाणी मनुष्य विसावा घेतो ते म्हणजे अमरधाम त्या अमरधामची कल्पना ज्या वेळी आम्ही तेथे जायचं त्या भागातील आमचे सर्व नगरसेवक पदाधिकारी या भागातील नागरिक बऱ्याच दिवसापासून तीन - चार महिन्यापासून गेल्या मागील पंचवार्षिक पासून या भागाचा पाठपुरावा चालू होता या सर्व गोष्टी पाहता मिल परिसर धुळे शहरातील सर्वात मोठा भाग असल्याने कष्टकरी श्रमजीवी व सर्व समाजाचे लोक इथे राहतातआणि त्या ठिकाणी सुसज्ज आणि अत्याधुनिक अमरधाम असावा या दृष्टीकोनातून १ कोटीचा निधी आमच्या नेत्यांच्या सांगण्यावरून देण्यात आला ज्या ज्या ठिकाणी आवश्यक होते नकाने अमरधामसाठी आम्ही निधी दिला इकडे वरखेडी गावाला आम्ही ज्या वेळेस गेलो तेथे त्या भागातील नागरिक म्हणतात आम्हाला काही नको त्या भागातील नगरसेवक देवादादा सोनार, वैशाली भिकन वराडे आमच्या नगरसेविका स्नेहल ताई जाधव यांच्या प्रभाग असल्याने त्या नगरसेवकांच्या व नागरिकांच्या मागणीनुसार त्या ठिकाणी अमरधाम होण्यासाठी जिल्हा नगरोत्थान योजनेतून ५०लक्ष तरतूद करून दिली तसेच मोगलाई मध्ये आमचे नगरसेवक सभापती सुनीलभाऊ बैसाणे, कुलेवार, हर्षजी रेलन, कशिश उदासी यांच्या मागणीनुसार त्या भागातील नागरिकांची मागणी होती त्या ठिकाणी दशक्रिया विधी साठी निधी दिला आणि सर्वात महत्त्वाचे कुस्तीगीर क्षेत्रांमध्ये सांगली सातारा सोलापूर यांच्यानंतर कुस्तीची पंढरी समजली जायची ते धुळे शहर धुळे शहरात पूर्ण भारताचे मल्ल येऊन आपले कर्तृत्व कुस्ती या शहराला पाहायला मिळाली आहे. या शहरात अक्रम बिजली हरिचंद्र बिराजदार इतर अनेक नामवंत पैलवान धुळे शहरात येऊन त्यांचे कसरत दाखवली आहे धुळे शहरात जेवढे व्यायामशाळा आहेत तेवढ्या महाराष्ट्रात कुठेही नसतील धुळ्याच्या प्रत्येक भागात गल्लीत उत्कृष्ट व्यायामशाळा आहेत आणि त्या दृष्टिकोनातून ओस पडलेले स्टेडियम अत्याधुनिक व्हावा या दृष्टीने त्या भागातील नगरसेवक नागसेनभाऊ बोरसे कांतीलाल दाळवाले प्रतिभाताई चौधरी आणि संपूर्ण जिल्हा तालीम संघ आणि जे कुस्तीगीर असेल प्रेमी जुने मल्ल नवीन मल्ल यांच्या मागणीनुसार आमच्या नेत्यांच्या सांगण्यानुसार अतिशय भव्य असे बंदीस्त स्टेडियम करण्यात येणार आहे त्यासाठी आमच्या नेत्यांनी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे आणि आमचे सभागृहाचे ज्येष्ठ नगरसेवक विरोधी पक्ष नेते भैया आमचे सर्व नगरसेवक मुस्लिम नगरसेवकांच्या सांगण्यानुसार त्यांना एक कोटीची तरतूद देण्यात आली आहे आणि ते काम त्यांनी सुचवायचे आणि या गोष्टी करत असताना हद्दवाढ गावासाठी खास करून त्यांचे आयुक्त साहेब यांचे अभिनंदन करतो की श्री अनुप भाऊ अग्रवाल मी गावातील नगरसेवक आम्ही बसलो असता त्यांनी या गोष्टीला मान्यता दिली की गावाचा प्रॉपर्टी टॅक्स येत असेल तो हदवाढ गाव गावांसाठी वापरण्यात यावा तसेच हद्दवाढ गावांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी तीन कोटी रुपयाची तरतूद करण्यात येत आहे हद्दवाढ गावातील चे नगरसेवक आहेत किरण भाऊ वंदनाताई संजूभाऊ पाटील रावसाहेब नांद्रे नरेंद्र भाऊ चौधरी संजूभाऊ देवा दादा भिकन आप्पा वराडे स्नेहल ताई जाधव आणि मोराने गावचे नगरसेवक त्यांच्या मागणीनुसार या गोष्टीला आम्ही मान्यता दिली आहे मी मागच्या सभेला बोललो होतो की आमची सत्ता आल्यानंतर माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी सांगितले ज्या वेळेस पहिली बैठक झाली त्यावेळी गिरीश भाऊ महाजन होते माननीय रावळ

साहेब खासदार डॉक्टर सुभाष भामरे आणि मी असताना त्यांनी त्या वेळेस सांगितले तात्काळ धुळे शहरासाठी १०० कोटी व हद्दवाढ गावांसाठी १५० कोटी रस्त्याचा प्रस्तावआम्हाला ताबडतोब पाठवा शंभर कोटीचा प्रस्ताव तिथे गेले असता तो मंजूर होऊन आला आमचे दुर्दैव असे की एजन्सी लावली होती (निसर्ग कन्सल्ट)म्हणून त्यांच्या हलगर्जीपणामुळे व आपल्या मनपाच्या हलगर्जीपणामुळे हद्दवाढ गावातील कामे प्रस्ताव न गेल्याने वंचित राहिली आहे त्यामुळे आजही आम्हाला दुख: व्यक्त करतो ज्यांच्यामुळे ही दिरंगाई झाली त्याचा निषेधही मी येथे करतोया सर्व गोष्टी होत असताना संभाजी गार्डन येथे छोटा पुतळा होता त्या ठिकाणी संभाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यासाठी या कामाला आठ ते दहा दिवसात सुरुवात होणार आहे या सर्व गोष्टी करत असताना आपल्या गजानन कॉलनी वाखारकर नगर भागांमध्ये तणाव होता जातीय दंगली होते दोन्ही समाजाच्या नागरिकांच्या मागणीनुसार त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्यासाठी दहा लक्ष रुपये निधी आल्यानंतर त्या ठिकाणी कामाला सुरुवात केली कामे सुरू आहे धुळे शहरात अक्कलपाडयाचे पाण्याचे काम सुरू आहे अंडरग्राउंड ड्रेनेज चे कामे सुरू आहेत शंभर कोटी रुपये रस्त्याचे कामे सुरू आहेत बगीच्याचे काम चालू आहे नदीकिनारी पाच कोटीची काम चालू आहे धुळे शहरात नगरोत्थान योजना दलित वस्ती योजना भरपूर कामे चालू आहेत माझ्या जवळ जवळ तीस वर्षांच्या इतिहासात या एक-दोन वर्षात धुळे शहराचे विकासाचे कामे होत आहेत ते तीस वर्षाच्या कारकिर्दीत बघितले नाही परंतु आमचे दुर्दैव असे आहे की आम्हाला प्रसिद्धीचा शोक नाही पेपर बाजी करणे हे मला पटत नाही त्याच्यामुळे लोकांपर्यंत त्या गोष्टी गेलेल्या नाहीत या सर्व गोष्टी झाल्यानंतर कामाची पाहणी होईल आयुक्त साहेबांचा आमच्या मार्फत कामाला चालना मिळेल धुळे शहरांमध्ये काम करीत असताना आम्हाला नागरिकांकडून प्रशंसा पाहिजे राजकीय पुढारी असेल पक्षाच्या दृष्टिकोनातून त्ताधार्यांना विरोध करावा या दृष्टिकोनातून काम करत असतात त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी माझ्याकडे वेळ नाही कारण धुळे शहरासाठी मला काम करायचे आहे आणि सर्वात महत्त्वाचे सांगू इच्छितो ज्या दिवशी करोना ला सुरुवात झाली धुळे शहरांमध्ये मी स्वत:आणि आमचे आयुक्त साहेब गिरी साहेब गोसावी साहेब होते साहेब आणि सर्व अधिकारी पदाधिकारी नगरसेवक यांनी जिवाची पर्वा न करता संपूर्ण धुळे शहर पिंजून काढले धुळे शहरात करुणा चा प्रादुर्भाव कमी व्हावा लागण कमी व्हावी या दृष्टिकोनातून आम्ही गल्ली गल्ली फिरत होतो मुस्लिम भागात जास्त प्रमाणावर कोणाची लागत होती त्या ठिकाणी मी स्वत: गेलो त्या ठिकाणी लोक फोन करून सांगायचे बापू तुम्ही काय करता आहे तिथे आयुक्त साहेब यांना देखील त्यांच्या नातेवाईक कडून फोन यायचा की साब तुम खुलेमे मत जाव परंतु अधिकारी आणि आम्ही या गोष्टीची पर्वा केली नाही आम्ही नागरिकांपर्यंत गेलो व्यापाऱ्यांनी पर्यंत गेलो त्यावेळी मुस्लिम भागात अशी परिस्थिती होती त्या ठिकाणी लोक जायला घाबरत त्या ठिकाणी आम्ही फिरलो रॅल्या काढल्या ही साधी गोष्ट नाही महाराष्ट्र मध्ये अव्वल नंबर दुसरा क्रमांक आपल्या येणार तेथे काय अधिकारी पदाधिकाऱ्यांनी फिल्डिंग लावली नाही आपण राबलो आपले अधिकारी पदाधिकारी रात्रंदिवस आपले नेते राबले करोना संपल्यानंतर आमच्या मोदी साहेबांनी सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार केला त्याच पद्धतीने आयुक्त साहेब आणि महापौर या नात्याने आम्ही त्यांचा सन्मान करणार आहोत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अधिकारी पदाधिकारी काहीतरी बहाना दाखवून रजेवर गेले आहेत धुळे शहरांमध्ये एकही अधिकारी पदाधिकारी रजेवर गेला नाही आणि एकही अधिकारी आणि कर्मचारी पॉझिटिव आलेले नाहीत फक्त महापौर पॉझिटिव आलेले आहेत याचे कारण बी तसा आहे मी खड्ड्यात जाताजाता जास्त खड्ड्यात गेले धुळे शहरात सर्वात जास्त करोना मी

अनुभवला आहे माझा भाऊ गेला माझ्या घरातील सर्व पॉझिटिव्ह आले माझा नातू देवा, दादा चा मुलगा दीड वर्षाचा होतो तोदेखील पॉझिटिव्ह आला एवढे आमचे दुर्दैव आहे चार महिने आमचे दवाखान्यात गेले त्यामुळे धुळे शहराच्या व खासकरून आरोग्य आणि पाणीपुरवठा याकडे लक्ष देता आले नाही त्यामुळे पाणीपुरवठा काही दिवस कमी दाबाने आला असेल ते मूळ कारण विज मंडळाला आम्ही दोष देतो कारण की आमची यंत्रणा पाणीसाठा आमचे अधिकारी आमचे कर्मचारी वेळेवर टाकी भरण्यास सज्ज आहेत परंतु टाकी भरण्याच्या वेळेस एम.एस.ई. बी. च्या माध्यमातून दिवसातून दोन वेळा वीजपुरवठा खंडित होतो त्याचा दुष्परिणाम पुन्हा टाक्या भरावे लागतात पुन्हा पाणी सोडावे लागते त्याच्यामुळे धुळे शहरातील नागरिकांना आठ दिवस पाणी मिळाले नाही धुळे शहराची माफी मागतो आम्ही आणि आयुक्त साहेब वारंवार या संदर्भात बैठक घेत आहेत खास करून जी यंत्रणा महाराष्ट्र शासनाच्या अधीन आहे त्याच्यामुळे पाण्याला वंचित राहावे लागलेआहेत करुणा काळात जे कामे आमच्या अधिकाऱ्यांनी केली खासकरून सेनापती थोडा जरी डगमगला आत्मविश्वास कमी झाला अधिकारी घरी बसून राहिले तर व्यवस्थित काम करीत नाही त्यांच्यामुळे प्रश्नाचे सेनापती माननीय आयुक्तसाहेब स्वता फिल्डवर होते भागात फिरायचे इतर काहीच काम केले नाही फक्त करुणा करुणा या वर सर्व अधिकारी पदाधिकारी कर्मचारी महापौर यांनी सर्वांनी कष्ट घेतल्यानंतर धुळे शहरातील जनतेने व्यापाऱ्यांनी मागणी केल्या होत्याया सर्वांनी मदत केल्यानेआज करणाचेकमी आणि नामांकन यामध्ये पुढे आलेली आहे सर्व मानसन्मान आपले अधिकारी पदाधिकारी नगरसेवक व या जनतेला देऊ इच्छितो धुळे शहरांमध्ये बऱ्याच वर्षापासून एलईडी चा जो प्रस्ताव होता त्याचे दोन वेळा टेंडर निघाले ते काही कारणास्तव राहुन गेले परंतु आता संपूर्ण धुळे शहर हद्द वाडी सह एलईडी चा हा विषय मंजूर झालेला आहे रोहित रोचे चे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे त्यामुळेसंपूर्ण धुळे शहरात नवीन दिवे लावले जातील ज्या भागातील तक्रारी असेल संपूर्ण धुळे शहर हद्द वाढीसह नवीन दिवे लावण्यात येईलत्यामुळे धुळे शहरातील मनपाचे वीज पुरवठाही कमी होईल त्याचप्रमाणे पेस्ट कंट्रोल मुळे धुळे शहरांमध्ये गावात कुठेही जावा तिकडे डास च डास त्रास देतात संपूर्ण गोष्टींवर आळा घालण्यासाठी बेस्ट अँड कंट्रोल ला मान्यता देण्यात आलेली आहे आणि धुळे शहरांमध्ये ज्या पद्धतीने एम. टी. एफ.टी. पाणी लागतं त्याच्यामुळे कारण एवढे पाणी लागण्यासाठी आपली पाणीपुरवठा वितरण व्यवस्था मुळे लागणाऱ्या पाण्यापेक्षा डबल चे पाणी लागते हे फक्त वितरण व्यवस्थेमुळे त्यासाठी अनुप शेठ अग्रवाल यांच्या सांगण्यानुसार माननीय आयुक्त सो सर्व अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आपण टाटा कन्सल्टिंगला काम देण्याचे ठरविले आहे ज्या वेळेस कुठे शहरांमध्ये सर्वे होईल सर्वे होत असताना येणारे पाणी किती आहे साठा किती आहे विकरण कशा पद्धतीने होते आपले पाणी शुद्ध करण्याची क्षमता किती आहे आपल्या जलकुंभ किती आहेत आपले पाईपलाईन किती व्यासाची आहेत या सर्व गोष्टीचा अभ्यास केल्यानंतर कन्सल्टिंग त्याचा आराखडा तयार करून मनपा प्रशासनाला समृद्ध करेल आणि त्या माध्यमातून धुळे शहराची वितरण व्यवस्था ठरविण्यात येईलआज मी धुळे शहराच्या नागरिकांना सर्व नगरसेवकांना पदाधिकाऱ्यांना व आमच्या नेत्यांच्या माध्यमातून सांगू इच्छितो की येत्या एक वर्षाच्या आत अक्कलपाडा १३६ कोटीची पाणी वितरणासाठी नेमलेली एजन्सी या गोष्टी आज दिसत नाही परंतु भविष्यात एक वर्षानंतर या आमच्या धुळेकर जनतेला रोज पाणी मिळणार आहे उच्च दाबाने पाणी रोज मिळेल मी आमच्या नेत्यांनी आमच्या अधिकाऱ्यांनी ज्या योजना प्रस्तावित केल्या त्याचे काम चालू आहे त्याचे काम संपल्यानंतर धुळे शहराला रोज उच्च दाबाने पाणी मिळेल या नगरपालिकेत पदाधिकाऱ्यांसंदर्भात

नगरसेवकांसंदर्भात जो गैरसमज झालेला आहे तो एक वर्षा नंतर गैरसमज दूर होईल पाण्याचा पन्नास वर्षाचा प्रश्न धुळेकरांचा मिटणार आहे आणि एक वर्षानंतर धुळे शहरातील जनता नगरसेवक व पदाधिकारी आणि महापौर आणि आमच्या नेत्यांना डोक्यावर घेतल्या शिवाय राहणार नाही अशी मला खात्री आहे या गोष्टी आम्ही करतो आहे आमचं दुर्दैव आमची चूक आहे काम चालू असतांना तिथे जात नाही प्रसिद्धी करत नाही लोकांना सांगत नाही धुळे शहरात एवढे कामे चालू आहेत रस्त्याचे कामे चालू आहेत महापौर या नात्याने एकाही कामावर गेलो नाही काम योग्य रीतीने चालू आहे ज्या ठिकाणी अडचणी येतात त्या ठिकाणी आयुक्त सो आणि आम्ही चर्चा करतो त्या आपण आणला तरी मी तुमचे स्वागत करेल सत्ता तुमची आहे हद्दवाढ गावाला १५०कोटींचा प्रस्ताव आमच्याकडे तयार आहे तुम्ही शासन दरबारी जा शासन या नात्याने आयुक्त साहेब व मी स्वत: शासनाकडे यायला तयार आहे हद्दवाढ गावातील नागरिकांना साठी आम्हीकुठेही जायला तयार आहोत त्यासाठी सत्तेत असणा-यांनी धुळेकरासाठी काही तरी द्यावे आम्ही दहा रुपये आणले असतील तर तुम्ही धुळेकर जनतेसाठी दहा पैसे आणले तरी महापौर या नात्याने मी तुमचे स्वागत करेल धुळे शहराच्या विकासासाठी काहीतरी निधी आणा त्यानंतर तुम्ही बोला धुळे शहरासाठी तुम्ही काही केले नसणार पुष्कळ वेळा सत्ता होती सर्व गोष्टी होत्या धुळे शहरासाठी मुरूमची गाडी टाकली नसणार पाणीपुरवठ्यासाठी काही केले नसलात तर तुम्हाला धुळे शहरासाठी बोलण्याच्या काही अधिकार नाही अगोदर तुम्ही शहरासाठी काही तरी करा नंतर बोला सत्ता तुमची आहे सत्तेचा वापर धुळेकर जनतेसाठी करा जनतेच्या हितासाठी ज्या-ज्या योजना असतील कामे असतील महत्वाचे जिव्हाळ्याचे प्रश्न असतील त्यासाठी निधी आणून शहराचा जो राहिला भाग आहे पूर्ण करा सत्ता असताना विरोध करणे सोपे आहे तुमचे काम तुम्ही करत कहा आमचे काम आम्ही करू प्रसिद्धी न घेता आमचे कामे चांगल्या संथगतीने चालू आहे येत्या वर्षभरात सर्व कामे दिसतील हे सर्व करीत असताना ज्या काही गोष्टी अपूर्ण असतील त्या आम्ही पूर्ण करू पुन्हा एकदा सांगतो धुळे शहरातील जनतेने आम्हाला भारतीय जनता पार्टीचे पन्नास नगरसेवक निवडून दिले आहेत त्याबद्दल मी त्यांचे शतश:आभार मानतो आणि जो विश्वास दाखवला आहे आमच्या नेत्यांवर आम्हाला निवडून दिले त्याप्रमाणे त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही हे खात्रीपूर्वक सांगतो आणि स्थायी समितीच्या माध्यमातून आमचे लहान बंधू सुनील भाऊ बैसाने यांनी कमी अनुभव असताना चांगला अर्थसंकल्प सादर केला आहे त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो.

म. नागसेन बोरसे

या अर्थसंकल्पात संदर्भात माझे काही आक्षेप आहेत ७२७ कोटी रुपयांचा हा अर्थसंकल्प होता. स्थायी समितीने प्रशासनाला दायित्व दिलेले आहे प्रशासनाने हे दायित्व स्वीकारले आहे किंवा नाही याचा प्रथम खुलासा करावा नंतर मी बाकीचे प्रश्न विचारतो ७२७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. स्थायी समितीने आरोप केला आहे सोळा कोटींचे प्रि बजेट चे कामे घेतलेले आहेत त्याचे दायित्व प्रशासनाला स्विकारावे लागेल. ते बिले कसे काय दिले जातील जर दायित्व स्वीकारले नाही तर हा फेक बजेट आहे. २८ फेब्रुवारीला मा. आयुक्तांनी बजेट सादर केला तो आज महासभेत आलेला आहे. आता २८ फेब्रुवारी २०२१ ला प्रशासनाचा बजेट येईल. हा फक्त तीन महिन्याचा बजेट आहे. यात काही उत्पन्न वाढीच्या सूचना स्थायी समितीने दिलेल्या आहेत. त्या तीन महिन्यात पूर्ण होणार नाहीत आपण बजेटमध्ये तरतूद केलेली आहे ते काम तर होणारच आहेत. उत्पन्न व खर्चाचा मेळ बसणार नाही देवपूर भागातील सर्वे नंबर ७७ शॉपिंग कॉम्प्लेक्स मधून पाच कोटी उत्पन्न अपेक्षित धरलेले आहे नंतर मनपा शॉपिंग सेंटर मधील गाळे हस्तांतरण फी पाच कोटी धरलेले आहे. ते अपेक्षित आहे का व सदर उत्पन्न

नव्वद दिवसांच्या आत अपेक्षित आहे का हे माझे म्हणणे आहे . स्पिल ओव्हर मध्ये एक कोटी दाखवले आहे स्पील ओव्हरमध्ये किती कामे आहेत याची माहिती मिळावी आपण आठ ते दहा कोटीचे स्पिल ओव्हर मध्ये वॅर्कऑर्डर दिलेल्या आहेत.१६ कोटी प्रि बजेटचे काम आहेत. स्थायी समितीने सुचवलेल्या आहे त्याप्रमाणे प्रशासनाने दायित्व स्विकारावे आणि हा बजेट मंजूर करावा आमची हरकत नाही.

मा. महापौर:- ज्यावेळेस अंदाजपत्रक तयार होते ते प्रशासनाच्या माध्यमातून तयार होऊन स्थायी समितीपुढे येते व स्थायी समितीच्या माध्यमातून महासभेत येते त्यावर प्रशासनाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

म. नागसेन बोरसे मनपा राधाकृष्णन शॉपिंगच्या वरच्या भागात शॉपिंग बांधायचे आणि त्यातून उत्पन्न मिळवायचे हे तीन महिन्यात होणार आहे का जर उत्पन्न येणार नाही तर खर्च कशाला करावयाचा.

मा.महापौर मनपाच्या बाजूला असलेल्या गुजराती शाळेच्या जागेत आपण व्यापारी संकुल बांधतो आहे कामाची निविदा झालेली आहे यात आपण लगेच बुकिंग करू शकतो अशाप्रकारे निश्चितच उत्पन्नात वाढ होईल.

म. नागसेन बोरसे कामाची निविदा देणे म्हणजे स्पिल ओव्हर आले येथे फक्त एक कोटी रुपये ची स्पिल ओव्हरची तरतूद केलेली आहे.स्पील ओव्हरला जेवढ्या वर्कऑर्डर दिले आहेत तेवढ्या आल्या पाहिजेत मला फक्त स्थायी समितीने सुचवलेल्या तरतुदी या प्रशासनाने स्वीकारल्या आहेत का याचे उत्तर पाहिजे.

म.महापौर या संदर्भात आयुक्त सो.सर्व सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांचे एकत्रित उत्तर देणार आहेत. तसेच धुळे शहरातील वलवाडी वाडी भोकर गावातील चौका मोठा चौक आहे तो चौक सुशोभिकरण करण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे आणि यासाठी वंदनाताई व सर्व नगरसेवकांनी या ठिकाणी माता जीजा माता व बाल शिवाजी यांचा पुतळा उभारण्याचे सुचवले आहे व त्याबाबत आमच्या बैठकाही झालेले आहेत या सर्व भागातील नगरसेवकांच्या मागणीनुसार सदर पुतळा साठी तरतूद करण्यात येत आहे.

म. वंदनाताई भामरे 3 कोटी पाईप लाईनसाठी मंजूर केलेले आहे व 1 कोटी स्मारकासाठी मंजूर केले आहे त्या बद्दल मी आपले आभरी आहे. महापौर सो.आम्हाला जी बजेट पुस्तिका दिलेली आहे त्यामध्ये बॅलन्सशीट का नाही बॅलन्सशीट असते तर आम्हाला अभ्यास करता आला असता.

म. प्रदीप कर्पे सन्मा.महापौर सो.आपण चांगल्या प्रकारे बजेट मांडले आहेत. मी या मनपात गेल्या 25/30 वर्षापासून नगरसेवक आहेत माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडवणीस, मा. आ. गिरीषजी महाजन, मा.आ.जयकुमारजी रावल, मा.अनुपभैय्या अग्रवाल यांचेवतीने या मनपाला इतका मोठा निधी मिळालेला आहे.

यंदाचा अर्थसंकल्प कोरोना आपत्तीमुळे उशिराने सादर होत आहे या अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीसाठी अवघे चार महिने राहिलेले आहे आपण नेहमी अनेक चांगल्या तरतुदी या शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुचवतो पण त्याची अंमलबजावणी होणेही गरजेचे आहे. आपण फक्त कागदावरच आकडेमोड करतो योजना फक्त कागदावरच राहतात त्या योजना या आर्थिक वर्षात पूर्ण झाल्यास खरोखरच शहराचा सर्वांगीण विकास होऊ शकतो यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांची मानसिकता ही महत्त्वाची आहे त्याचबरोबर उत्पन्नाचे स्त्रोत वाढण्याच्या दृष्टीने याही काही बाबी सुचवलेले आहे त्यावर कडक व सकारात्मक पद्धतीने अंमलबजावणी झाल्यास मनपाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढू शकते मला माहित आहे आपल्याकडे मनुष्यबळाची कमतरता आहे परंतु त्या स्थितीत

बाहेरील स्तोत्र द्वारे आपण एजन्सी नियुक्त करून या उत्पन्न वाढीचा दृष्टीला महत्व देणे गरजेचे आहे..महापौर आयुक्त हे सर्व त्यांच्या परीने काम करीत आहेत तो चांगल्या प्रकारे काम करीत आहे त्यांच्या कामात सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे अंदाजपत्रके केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाल्यास या शहराचा चेहरामोहरा नक्कीच बदलणार आहे आम्ही सर्व या कामात आपल्या पाठीशी आहोत व संपूर्ण सहकार्य करणार आहोत

म. हर्षकुमार रेलन — मागील वर्षीच्या अर्थसंकल्पीय विशेष महासभेत आपण अजेंडयाबरोबर बॅलन्सशीट दिले नव्हते व माझ्या पत्रावर लेखी उत्तर देतांना डबल एन्ट्री अकाऊंड सिस्टमचे कार्य सुरु आहे व ते लवकरच पूर्ण होईल असे लेखाधिका-यांकडून सांगण्यांत आले होते. खरे तर बॅलन्सशीटच् नसल्याने अर्थ संकल्पावर चर्चा निरर्थक आहे असे मला वाटते आणि त्याशिवाय मागच्या वर्षीचे तरतुदी आणि झालेले खर्च आपल उत्पन्न, नफा- तोटा, मालमत्ता त्यांचे मूल्य आणि पुढचे नियोजन हे होऊ शकत नाही. तरी ही आपण बॅलेन्सशीट शिवाय सभा घेत आहोत. मला याचा खुलासा करावा.

म. सचिव — मा. रेलन सो. यांनी लेखी स्वरुपात पत्र सादर केलेले आहे. त्यांची नोंद चर्चेत घेण्यांत येणार आहे.

म. शितल नवले — अतिशय कठीण काळात हे बजेट तयार झालेले आहे मागील १७ वर्षात ७०० कोटींचा बजेट आपण तयार केलेला आहे मा. महापौर साहेब आपले अभिनंदन करतो आपण चितोड स्मशानभूमी साठी आम्ही वारंवार पाठपुरावा केलेला होता आणि त्यासाठी आपण ९६ लाख रुपये दिलेले आहेत. लवकर त्याची निविदा प्रसिद्ध होईल यासाठी परिसरातील सर्व मिल परिसरातील नागरीकांतर्फे व वॉर्डतील नगरसेवकांतर्फे आपले आभार व्यक्त करतो स्थायी समितीने उत्पन्न वाढीच्या बाबी सुचवलेले आहेत. त्या कौतुकास्पद आहेत परंतु ज्या बाबी सुचवले आहेत ते मागील १७ वर्षांपासून अशाच प्रकारचे आहेत त्यात अवैध नळ कनेक्शन, मोबाईल टॉवर दंडवसुली, शॉपिंग सेंटर हस्तांतरण फी, नवीन मालमत्ताधारकांना वर कर आकारणी याच तरतूदी आहेत. नवीन तरतूदीचा व उत्पन्न वाढीचा कोणीच विचार करत नाही यात काही चूक नगर सचिव कार्यालयाची आहे मागच्या बजेट पासून ते आतापर्यंत आम्ही काही चांगल्या गोष्टी सभागृहात मांडतो. त्या इतिवृत्ताचे वाचन होत नाही त्यामुळे नवीन अधिका-यांना आम्ही उत्पन्न वाढीसाठी काय सुचले होते ते कळत नाही मी लेखी स्वरूपात रेखावर साहेब असताना शाळा नंबर ५ येथे शॉपिंग कॉम्प्लेक्स मधून ४० कोटींचे उत्पन्न वाढेल हे लिखित स्वरूपात दिले होते पण हे उपाय कोणी आमलात आणत नाही यावर कारवाई झाली असती तर ४० कोटी उत्पन्न वाढले असते हे कोणी करत नाही ही प्रशासनाची चूक आहे प्रशासन बजेट तयार करते आणि ते स्थायी समितीसमोर येते स्थायी समितीला सर्व गोष्टी माहिती नसतात. या गोष्टी अंतर्भूत होणे गरजेचे होते मी काही उत्पन्न वाढीच्या बाबी सुचवितो आहे पण त्या अमलात आणल्या पाहिजेत व गांभीर्याने घेतल्या पाहिजेत आपण फक्त मोबाईल टॉवरच्या मागे लागतो उत्पन्न वाढीच्या अनेक बाबी आहेत मध्यंतरीच्या काळात महासभा होऊ शकली नाही तर त्यात अजून उत्पन्न वाढीच्या बाबी सुचवू शकलो असतो. मी मध्यंतरीच्या काळात सुरत येथे गेलो होतो आपण शहरात जसे हाय मॉस्ट लावले आहेत तसे आपण टॉवर उभे करू शकतो व ते भाड्याने देऊ शकतो त्याचे दीर्घकालीन पन्नास साठ वर्षाचे भाडे मिळेल आणि याचा खर्च आपल्याला येणार नाही सदर खर्च ते कंपन्या करतील तसेच सर्वे नंबर ७७ वलवाडी या जागेचा व्यवस्थितीत विकास झाल्यास सुमारे शंभर कोटी उत्पन्न येऊ शकते मोठी जागा आहे मी स्वतः पाहिली आहे. आपण नक्कीच त्यातून

उत्पन्न मिळू शकतो आपण मागे गुजराती शाळेचा जागेतील व्यापारी संकुलाच्या असलेल्या ड्रॉईंग बाबत अभ्यास केला होता अतिशय चुकीच्या पद्धतीने ड्रॉइंग काढले होते व टेंडर काढले होते आपल्या काळात ते टेंडर झालेले नाही ते मागच्या काळात झालेला आहे आपण ते रद्द पण केले.

मा. महापौर शीतल भाऊ आपण तेथे बदल केलेले आहेत

म. शितल नवले आपण तेथे दोन कोटी टाकण्याची गरज नाही एक रुपयाही न टाकता तेथे आपल्याला १५ ते १८ कोटी रुपये उत्पन्न मिळणार आहे या गोष्टी बजेटमध्ये अंतर्भूत करा आपणास उशीर झालेला आहे. पण आजपासून आपण या गोष्टींना सुरुवात केली आपण एक वर्षात तुम्ही तुमच्या निवेदनात सांगितलेल्या स्वप्नाप्रमाणे या शहराला एक वेगळी ओळख देऊ शकू उत्पन्न वाढीबाबत आपण सर्व शहरातील प्रॉपर्टीच्या मूल्यांकना बाबत एजन्सी नेमणार होतो पण त्याचे टेंडर प्रोसेस कुठपर्यंत आलेले आहे. मला माहित नाही पण पण ते काम करावे लागेल ते काम तातडीने सुरू करा आपल्याकडे वर्षभर टेंडर ओपन होत नाही. यात प्रशासनाची चूक आहे आपण सध्या वीस लाख रुपये नगरसेवक निधीसाठी भांडतो आहोत आपण जर या उत्पन्न वाढीच्या बाबी केल्या तर वीस कोटी नगरसेवक निधी मिळू शकेल. राज्यशासन आपले नाही सर्व गोष्टी आपल्या विरोधात जाणार आहे परवाच वित्त विभागाने एक नवीन शासन निर्णय काढलेला आहे अनुसूचित जाती जमाती साठी शंभर टक्के निधी देणार आहेत परंतु बाकीच्या बाबींसाठी कार्यक्रम ठरवून पैसे देणार आहेत त्यामुळे पुढचे पैसे कधी मिळतील यावर अवलंबून राहता येणार नाही आपण या शहरासाठी मोठ्या योजना कार्यरत केले आहेत यात अक्कलपाडा योजना भूमिगत गटार योजना शंभर कोटी नगरोत्थान योजना पण यांना राज्य शासन ब्रेक लावल्याशिवाय राहणार नाही राज्य शासनाच्या मताप्रमाणे प्राधान्य ठरवून निधी देणार आहेत त्यामुळे त्यावर अवलंबून राहू नका उत्पन्नाबाबत सर्वांनी विचार करावा ही विनंती.

म. सुनिल बैसाणे सन्मा.महापौर साहेब मी आपले अभिनंदन करेन.अर्थसंकल्पाच्या प्रस्तावना मध्ये धुळे शहराच्या हितासाठी व भाजपाने निर्देशित केलेले आश्वासनासाठी आपल्या प्रस्तावना मध्ये उल्लेख केला आहे तो साकारण्यासाठी धुळे मनपाचे सर्व अधिकारी पदाधिकारी यांची मोलाची साथ वेळोवेळी लाभत असते.महापौर सो. पक्षाने मला ज्या वेळेस सभापती पदाची धुरा दिली आणि त्यांच्या नंतर कामकाजाला सुरु केली त्याच वेळी संपूर्ण जगावर व देशावर कोरोना पसरला आणि प्रशासनाने बजेट मला सादर केला आणि कारोनामुळे कार्यालयीन कामकाज करु शकलो नव्हतो. त्यामुळे स्थायी समितीला बजेट सादर करण्यास उशीर झाला आणि बजेट सादर करत असतांना धुळे शहरातील सर्व जाती धर्माचे नागरीक असतील किंवा धुळे शहरातील मालमत्ताधारक जे आपल्याला कर रुपी उत्पन्न देत असतील त्या सर्वांचा विचार करुन सर्व स्थायी समिती सदस्य अधिकारी आणि तुमच्या सर्वांच्या मार्गदर्शनाने बजेट सादर केला. बजेट सादर करण्याच्या पूर्वी कोरोनाच्या कार्यकाळात धुळेकर नागरीकांचे हित जपण्यासाठी मनपाच्या वतीने जी शास्ती लावली होती त्यांची म.आयुक्त सो. यांनी अंमलबजावणी केली आयुक्त सो. संबंध धुळेकर जनतेच्या वतीने आपले आभार मनतो. धुळे मनपाच्या उत्पन्नामध्ये जरी वाढ होत असली ख-या अर्थाने धुळेकर नागरीकांचे हित आपण पहात असतांना शास्ती माफीसाठी आपण जो प्रस्ताव शासन स्तरावर पाठविला प्रयत्न केला त्या बद्दल सर्व नगरसेवक मनपाच्या वतीने मी आपले आभार व्यक्त करतो. बजेट सादर करीत असतांना उत्पन्नाचे स्त्रोत आणि त्यांची अंमलबजावणी जी काही प्रशासनावर आली आहे येणा-या काळामध्ये आपण सभागृहाला मध्ये आहे यांची अंमलबजावणी करुन घ्यावी कोण

कसे काम करतो कोण कसे काम करत नाही यांची आपणाला ज्ञान आहे महापौर आहेत अभियंता आहेत व धुळे मनपा प्रशासनाकडून कसे काम करुन घ्यावयाचे आयुक्त सो. तुमच्या कामाचा लेखाजोखा जर पाहिला तर आपण येणा-या काळामध्ये धुळे शहराचे हित जपसले आहे. तसेचआपल्याला गोसावी साहेब सहकार्य करतात गिरी साहेब यांच्याकडे कामाचा अनुभव आहे तसेच अनेक वर्षापासून बांधकाम विभाग सांभाळणारे शिंदे साहेब, आयुक्त सो. शितलभाऊनी जी खंत व्यक्त केली त्याबदद्दल आम्हाला फार आशा आहे. महापौर सो. आपण ज्या ज्या सुचना धुळे मनपाच्या अधिका-यांना देतात महासभेला बजेट सादर करीत असतांना नगरसेवकांच्या हितासाठी 20 लक्ष तरतुद केली आहे. शितल भाऊनी सुचविलेल्या सुचना आहेत त्यांचा ही विचार करण्याची गरज आहे.आता जर आपण शासनाच्या गाईड लाईन बघितल्या तर शासनाच्या कुठलाही निधी मिळेल यांची शाश्वती आपल्याला मिळणार नाही म्हणून उत्पन्नाचे स्त्रोत मनपाने सुचवायचे आहे येणा-या काळामध्ये अंमलबजावणी करायची आहे अधिकारी काम करीत असतांना त्यांच्या चुकांवर बोट न ठेवताआपण त्यांच्या कडून कशा पध्दतीने काम करुन घेवू शकतो. हा आपल्या घरातील अंतर्गत विषय आहे. तो घरात बसवून सोडू शकतो. प्रॉपर्टीचे मुल्यांकन झाले तर मनपाच्या बजेट मध्ये वाढ होणार आहे. आणि येणा-या काळामध्ये आपली ही ड वर्ग मनपा अ वर्गात येवू शकते.जर शासनाकडून कर्ज घ्यावयाचे असेल व खर्चकरायचा असेल त्यामध्ये सुध्दा आपली पत आवश्यक असते जर राज्य शासन, केंद्र सरकार कडे कर्ज मागते किंवा राष्ट्रीयकृत बँके कर्ज देतांना कर्ज कशा प्रकारे फेडणार या बाबत तुमच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत आहेत का या बाबत विचारणा करते. उत्पन्नाचे स्त्रोत वाढविले तर आपली मनपा श्रीमंत मनपात येणार आहे. मनपाला एमएसईबीचे बील जास्त येते त्यात जर आपण काळानुसार सुधारणा केली तर जर सोलर सिस्टीमची मागणी केली तर धुळे मनपाचे सुकवद ,बांभळे, हनुमान टेकडी,मालेगांव टाकी, पाणीपुरवठाचे बील 1.25 कोंटी रु. व स्ट्रीट लाईट 25 लाख येते व इतर असे एकुण 3.50कोटी रुये जर मनपाने टप्प्याटप्याने वीज निर्मिती करुन सोलर सिस्टीम बसविली तर शासनाच्या माध्यमातून येणारा जो निधी आहे त्यात वसुंधरा योजने मध्ये सुध्दा हा कार्यक्रम आलेला आहे यांची जर अंमलबजावणी केली तर आपले जे नामाकंन आहे त्यात आपण देशामध्ये 9 नंबर व राज्यात 2 नंबर घेतला आहे त्यांच्या मध्ये आपण देशात किमान 5 नंबर मध्ये येवू व राज्यात पहिल्या नंबरवर येऊ. महापौर सो. आपल्या बजेट मध्ये घेतलेल्या तरतुदीमध्ये सोलरबाबत तरतुद करावी मी आपले अभिनंदन करतो की मीलपरिसरातील स्मशान भूमीसाठी पैसा उपलब्ध करुन दिला दसेरा मैदानावरील गार्डनसाठी पैसा उपलब्ध करुन दिला त्याबद्द्वदल धुळेकर नागरीकांच्या वतीने खूप खूप शुभेच्छा.....

म. अमोल मासुळे

मा. महापौर सो.आजच्या बजेटमध्ये चारही भागासह हद्दवाढ गावाच्या हितासाठी बजेटमध्ये तरतूद केली महापौर सो.आपणआपल्या मनोगतात सांगितले धुळे शहरातील सर्वात मोठा भाग मिल परिसराचा आहे. सदरचा भाग मिल परिसरातील आमरधाम हा विषय रेंगाळत होता. चारीधाम जरी केले तरी शेवटी अमरधामला जावेच लागते.मील परिसर 70-80 हजार लोकवस्तीचा भाग प्रभाग क्रं.16,17,18 या ठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था असतांना त्याठिकाणी शितलभाऊ नवले व भागातील सर्व नगरसेवकांनी व्यथा मांडली त्यात आपले पक्षाचे नेते श्री. सुभाषजी भामरे,अनुपजी अग्रवाल महापौर यांनी मिल परिसरासाठी 1 कोटीची भरीव तरतूद केली आहे. त्याबद्दल अभिनंदन करतो. सुनिलभाऊ बैसाणे यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाबाकत सांगितले या ठिकाणी दर महिन्याला 1 ते 1.50 कोटी लाईट बील दयावे लागते. यापूर्वी साक्री तालुक्यातील चिलाणे गांव त्याठिकाणी जावून शासनाकडे 16 एकर जमिनीची

मागणी केली होती. 2 मेगावॅटचे विंडमिल प्रकल्प त्या ठिकाणी उभारणार होतो.परंतु ते शक्य झाले नाही. आपले सुकवद, बांभळे, हनुमान टेकडी असेल मालेगांव पाण्याची टाकी इतर या सर्व टाक्याचे लाईट बील येते ते 1 ते 1.50 कोटी रु. येते धुळे शहरात स्ट्रीट लाईटवर 35 लाख रुपये खर्च होतात. तसेच जुनी महानगरपालिकेचे 8 ते 10 लक्ष लाईट बील दयावे लागते. मी असे सुचवू इच्छितो की मनपाच्या मालकीच्या अनेक जागा आहेत. त्या ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प किंवा विंडमिल प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारले तर त्या ठिकाणी फायदा होईल.

म. अमीन पटेल — सन्माननीय महापुरुष साहेब आजच्या बजेटच्या विशेष सभेत मुस्लिम समाजासाठी एक कोटी ८० लक्ष मिळावे प्रत्येक नगरसेवकाला ३० लक्ष नगरसेवक निधी मिळावा मुस्लिम बहुल भागात कचऱ्याची समस्या जास्त प्रमाणात वाढले असून त्यावर उपाय योजना करावी तसेच मुस्लीम भागात रस्ता दुरुस्तीसाठी दीड कोटीची तरतूद करावी गटात दुरुस्तीसाठी तीन कोटीची तरतूद करावी आणि अल्पसंख्यांक भागात विकासकामांसाठी दोन कोटीची बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी झोपडपट्टी भागात गटार करण्यास अडचणी येतात ड्रेनेज लाईन नसल्याने फार मोठ्या समस्या उद्भवतात १४ वा वित्त आयोगाचा निधी जॉगर पट्टीतील भागासाठी वापरला जावा जर दुसरीकडे वापरला गेला तर आंदोलन करण्यात येईल

म.प्रतिभाताई चौधरी — सन्माननीय महापौर साहेब सन्माननीय नगरसेवक सदर अंदाजपत्रकात तरतूद केली आहे त्याची अंमलबजावणी होणार आहे का ठरावाची प्रत जोपर्यंत येत नाही तोपर्यंत हा निधी वापरता येणार नाही स्वागत गेटसाठी मागील वर्षी तरतूद केली आहे त्याची अंमलबजावणी झाली नाही ७५ लक्ष रुपये रस्ते दुरुस्तीसाठी दाखविली आहे देवपूर परिसरात जय हिंद कॉलनी भागात हजारो पालक ये-जा करतात सदर भागासाठी तरतूद केली असताना रस्तेदुरुस्ती का केले नाही जय हिंद जुनिअर कॉलेज ते जयहिंद सीनियर कॉलेज व देवपुर भागातील इतर रस्ते साठी तरतूद करावे या अर्थसंकल्पात अभ्यासिका साठी २५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे ती कोणत्या भागात आहे व त्याची गरज आहे का शहरातील कोपऱ्यांना अभ्यासिका उत्पन्नानुसार तरतूद करण्यात यावी व जय हिंद कॉलनी मधील रस्तेदुरुस्ती करावे

म.भगवान गवळी — सन्माननीय महापौर सन्माननीय नगरसेवक आमच्या प्रभाग क्रमांक पाच मध्ये केले नगर भागात पाण्याची अत्यंत भीषण समस्या असून पावसाच्या दिवसात येथील नागरिकांच्या घरात पाणी शिरते त्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्यास फार मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे या कामाचा योग्य प्रकारे निचरा होत नसल्याने व पाणी वारंवार तुंबत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते तरी सदर भागातील गटारीची समस्या लक्षात घेता या कामाची २५ लक्ष मात्र अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी

म. संजय पाटील — सन्माननीय महापौर साहेब सन्माननीय नगरसेवक पत्रकार बंधु सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देतो धुळे शहराचे स्ट्रीट लाईट बिल जास्त प्रमाणात येते जर उत्पन्न वाढीसाठी आपण देखील एम एस सी.बी.चे पोल व डी.पी. ला चार्ज लावून मनपाचे उत्पन्न वाढवू शकतो जीएम पोर्टल वर आपण त्याचे जीआर वाचले आहेत का १४ वा वित्त आयोगाचा पैसा खर्च होत नाही

म.सद्दाम खान — माझा वार्ड क्रमांक एकोणवीस येथे आले होते या ठिकाणी धार्मिक स्थळाचे रोड हापिस सिद्दिकी नगर या भागात विकास कामे होत नाही माझ्या वार्डातील नगरसेवक आयुक्तांकडे घेऊन जातात व रस्ते तयार करा इतर कामे तयार करा गटारी तयार करा असे सांगतात नंतर ते स्वतः कामे करून घेतात

म. कल्पनाताई महाले — म. कल्पनाताई महाले यंदाचा अर्थसंकल्प कोरोना आपत्तीमुळे उशिराने सादर होत आहे या अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीसाठी अवघे चार महिने राहिलेले आहे आपण नेहमी अनेक चांगल्या तरतुदी या शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुचवतोपण त्याची अंमलबजावणी

होणेही गरजेचे आहे. आपण फक्त कागदावरच आकडेमोड करतो योजना फक्त कागदावरच राहतात त्या योजना या आर्थिक वर्षात पूर्ण झाल्यास खरोखरच शहराचा सर्वांगीण विकास होऊ शकतो यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांची मानसिकता ही महत्त्वाची आहे त्याचबरोबर उत्पन्नाचे स्त्रोत वाढण्याच्या दृष्टीने याही काही बाबी सुचवलेले आहे त्यावर कडक व सकारात्मक पद्धतीने अंमलबजावणी झाल्यास मनपाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढू शकते मला माहित आहे आपल्याकडे मनुष्यबळाची कमतरता आहे परंतु त्या स्थितीत बाहेरील स्तोत्र द्वारे आपण एजन्सी नियुक्त करून या उत्पन्न वाढीचा दृष्टीला महत्व देणे गरजेचे आहे.महापौर, आयुक्त हे सर्व त्यांच्या परीने काम करीत आहेत तो चांगल्या प्रकारे काम करीत आहे त्यांच्या कामात सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे अंदाजपत्रके केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाल्यास या शहराचा चेहरामोहरा नक्कीच बदलणार आहे आम्ही सर्व या कामात आपल्या पाठीशी आहोत व संपूर्ण सहकार्य करणार आहोत.

म.हर्षकुमार रेलन महापौर सो. भाजपाच्या वतीने धुळे शहरातील नागरीकांनाच्या हितासाठी चांगल्या प्रकारे बजेट सादर केला आहे. तुमचे अभिनंदन करतो

२)मागील वर्षात कुठल्याही सभागृहाची परवानगी न घेता 16 कोटीची कामे हयावर्षीच्या बजेट मध्ये घेवून समायोजित करण्यांचे आपण प्रस्तावित केले आहे. त्यावर माझे म्हणणे आहे की, अगोदर सर्व सन्माननीय नगरसेवकांसमोर त्या विषयीची यादी प्रस्तुत करावी, खर्च झालेल्या कामांना मंजुरी मिळवूनच सदर 16 कोटीची इन्ट्री करावी. मात्र झालेल्या कामाची यादी न दिल्यास हा विषय तहकूब ठेवावा, जर आपणास तो पास करायचा असेल तर माझा विरोध नोंदवून पास करावा.

३)ई गर्व्हेनस करिता 1 कोटीची तरतूद जास्त वाटते त्यावर चर्चा करुन निर्णय घ्यावा.

४) खर्च भाग 1 मध्ये घसारा निधी 1 लाख रुपये प्रस्तावित केला आहे खर तर घसारा हा खर्च नसतो, मग त्यास्तव निधीची तरतूद का केलेली आहे. हयांचे उत्तर द्यावे.

५) मागील वर्षात बीओटी मार्केट मधून उत्पन्न शुन्य दाखविले आहे मात्र हया वर्षी 25 लाखाचे उत्पन्न गृहीत धरलेले आहे.

तरी मला माहिती द्यावी की आपल्याकडे बीओटी तत्वावर बांधलेल्या किती मार्केट आहेत, त्यात किती एकुण दुकाने आहेत व त्यातून महापालिकेला किती उत्पन्न मिळत आहे. आणि महापालिकेने बांधलेल्या मार्केटचे भाडे व बीओटी तत्वावर बांधलेल्या मार्केटच्या भाडयात तफावत का आहे?

६) धुळे शहरातील सर्व धर्मीय प्रार्थना स्थळांवर जेष्ठ नागरीकाच्या सोयीसाठी सिमेंट बाक बसविणे साठीची तरतूद अत्यंत तोकडी आहे.प्रत्येक नगरसेवकाला 1लाख प्रमाणे 75 लाखाची तरतूद करावी ही माझी विनंती आहे.

७) शहरातील विविध भागात स्वागत कमानी प्रवेशव्दारे बसविणेची संकल्पना चांगली आहे. त्यात सिंधी समाजाचे दैवत पुज्य झुलेलाल मंदिर समोर , कुमारनगर येथे व डॉ. जे.के. ठाकरे हॉस्पीटल चौकात स्वामी समर्थ मंदिराजवळ अशा दोन स्वागत कमानी मी सूचित करत आहे, आपण तरतूद मध्ये थोडी वाढ करावी ही नम्र विनंती.

८) मनपा हद्दीतील नागरीकांना विमा बद्दल आपण चांगला निर्णय घेतलेला आहे. मात्र तो पहिल्यांदा घेत आहात किंवा मागेही कधी आपण नागरीकांचा विमा काढला होता. हयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

९) मनपा इंग्रजी माध्यामाच्या शाळांच्या शिक्षकांच्या पगाराबाबत प्रस्तावनमध्ये आपण विषय घेतला आहे, मात्र बजेट मध्ये पगाराबाबत काहीच उल्लेख दिसत नाही, खरे तर हया विषयात मी मा.आयुक्त साहेबांना सुचना दिलेल्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा हया शासनाच्या नियमानुसार असतील तरच ठिक किंवा त्यावर धोरणात्मक निर्णय शासनाककडून मान्य करुनच पगार नियमित व्हावा,अन्यथा हा विषय तहकूब ठेवून शासनाकडून मान्यता घेण्यासाठी प्रयत्न करावे.

१०) महिला उद्योजकता केंद्र हा विषय मा. स्थायी समिती सभापती श्री. सुनिलभाऊ बैसाणे यांनी सूचविलेला चांगला असून I कोटीची तरतूद केली आहे मात्र ही तरतूद एका वर्षाकरिता आहे की पाच वर्षासाठी हे स्पष्ट करावे.

माझे लेखी म्हणणे आपणांकडे सभेपूर्वी सादर केले असून त्यावर निर्णय घ्यावा व त्याबाबत नोंद ठरावात घ्यावी.

म. शितल नवले — मशिनरी खरेदी चा विषय झाला त्याला अनुसरून विनंती आहे आता आपण सध्या जी प्लस वन सिस्टीम पर्यंत बांधकाम परवानगी देत आहोत आपल्याकडे ॲमीनेटेड फायरफायटर ची व्यवस्था नाही उद्या जर चौथ्या-पाचव्या मजल्याला आग लागली तर आग विझवायला शिडी लावावी लागेल आणि शिडी लावून आगवणे शक्य होणार नाही तर यासाठी या बजेटमध्ये तरतूद करा भलेही या वर्षी विकत घेऊ नका पुढच्या वर्षी मार्चमध्ये खरेदी करा उद्या जर आग लागली तर भीषण परिस्थिती होऊ शकते.

म.किरण अहिरराव — यापूर्वी हद्दवाढीचा गावांसाठी तरतूद केली नाही आज महासभेच्या वतीने हद्द वाडीतील पाणीपुरवठ्यासाठी तीन कोटीची तरतूद केली त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो वलवाडी गावात एक कोटी चौक सुशोभीकरणासाठी दिलेले आहेत आणि प्रत्येक नगरसेवकाला वीस लाख नगरसेवक निधी दिला आहे परंतु हद्दवाढीच्या समस्या फार मोठ्या प्रमाणावर आहेत.

म. महापौर — आयुक्त साहेबांनी हद्दवाढीचा गावातील विकासासाठी संपूर्ण घरपट्टी व पाणीपट्टी चा टॅक्स भागातील विकासकामांसाठी देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

म.किरण अहिरराव — हद्दवाढ होण्यापूर्वी धुळे महानगराचे क्षेत्रफळ ४६.४६ चौरस किलोमीटर होते हद्दवाढ नंतर शेत्रफळ सुमारे १०१चौरस किलोमीटर झालेले आहे म्हणजे सुमारे ५४ चौरस किलोमीटर वाढलेला आहे शहरापेक्षा दुप्पट भाग झालेला आहे या चोपन्न किलोमीटरच्या साठी आपण एकंदरीत पाच कोटी २० लाख रुपये देत आहात यामध्ये आम्ही कोणती कामे करणार आहोत प्रशासनाला विनंती आहे आपल्या अंदाजपत्रकातील प्रत्येक हेड मध्ये व तरतुदीमध्ये हद्द वाडीतील गावांच्या कामांसाठी २० टक्के निधी राखीव ठेवावा तसेच नगरसेवक निधी ३० लक्ष रुपये द्यावा नकाने गावात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा हे त्याच्या सुशोभीकरणासाठी ३० लक्ष रुपयांची तरतूद करावी तसेच महिंद्रळे गावात प्रती शिर्डी साईबाबा मंदिर असून अनेक भाविकांचे श्रद्धास्थान आहे या मंदिराच्या सुशोभीकरणासाठी ३०लक्ष मात्र तरतूद करावी तसेच महिंदळे भागात कॉलनी मधील रस्त्यांची स्थिती फार खराब आहे त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी.

म. अमीन पटेल — स्थायी समितीने स्वागत कमानीसाठी 5 कोटी तरतूद केली आहे. आमच्या इथे वडजाईरोड 100 फूटी रस्त्यावर अबु हलीफा मार्ग करुन नामकरण झालेले आहे तो एरिया महत्वाचा आहे त्याठिकाणी 1 स्वागत कमानचे काम अंतर्भूत करण्यांत यावे.

म. नागसेन बोरसे — सदरचा खर्च करणे आवश्यक आहे का स्वागत कमानीच्या सर्व तरतुदी रद्द करा.

म. वंदनाताई भामरे — मा.महापौर महोदय, वलवाडी हद्दवाढ गावातील ग्रामपंचायतीच्या ठरावाप्रमाणे डी.पी. रस्ते, ओपन स्पेस इतर प्रॉपर्टीजला महानगरपालिकेचे नांव लावल्याशिवायआम्ही आमच्या

भागातील जमा होणारा विकास शुल्क वापरु शकत नाही असे आयुक्त महोदयांनी सांगितले होते. त्या अनुषंगाने प्रशासनाने काय कार्यवाही केली. हद्दवाढ होवून 2 वर्ष झालेले आहेत.हे काम होणे अपेक्षित होते.जो पर्यत हे काम होत नाही तो पर्यत हद्दवाढ गावातील विकासाचा अनुशेष लक्षांत घेता हद्दवाढ भागातील विकास शुल्काचा जमा होणारा निधी कोठेही वापरण्यांत येऊ नये ही विनंती.

म. आयुक्त सन्मा. महापौर सो. तसेच सर्व सन्मा.सदस्य मी प्रथमत: आपल्या सर्वाना दिवाळीच्या शुभेच्छा देतो. या ठिकाणी आज या बजेटवर सुंदर चर्चा झालेली आहे. प्रशासनाने हे अंदाज पत्रक फेब्रुवारी मध्ये सादर केले होते. परंतु नंतरच्या काळात कोरोना परिस्थितीमुळे महासभेपुढे बजेट सादर होण्यास उशिर झालेला आहे. आज काही चांगल्या सुचना आलेल्या आहेत. काही महत्वाच्या बाबी याठिकाणी सांगू इच्छितो. प्रशासनाने फेब्रुवारी मध्ये बजेट सादर केलेले होते. त्या वेळेस जे उत्पन्न अपेक्षित होते ते आपण बजेट मध्ये धरलेले आहे. पण आता जर बघितले तर त्यामध्ये तफावत आहे. आपल्याकडे प्रॉपर्टी टॅक्स व इतर महसूली उत्पन्न डिसेंबर ते मार्च या कालावधीत जास्त अपेक्षित असते. कोरोनाच्या कालावधीत जितके उत्पन्न अपेक्षित होते तेवढे मिळाले नाही ही वस्तुस्थिती आहे.आता त्या दृष्टीने आपण काही उत्पन्न वाढीच्या सुचना दिलेल्या आहेत. आपण या वर्षामध्ये त्यासाठी ठोस असे प्रयत्न सुरु केलेले होते व त्याप्रमाणे आपण ते बजेट मध्ये अंतर्भूत केलेले होते.त्यात एक महत्वाचा भाग म्हणजे प्रॉपर्टी टॅक्स. प्रॉपटीर् टॅक्स हे आपले महत्वाचे स्त्रोत आहे. जो आपल्याला आज टॅक्स मिळतो. तो निश्चितपणे कमी आहे. त्यासाठी आपले ॲसेसमेंट शास्त्राशुध्द पध्दतीने होणे गरजेचे आहे. ते कित्येक वर्षापासून झालेले नाही. आज अनेक प्रॉपटी रेकॉर्डवर नाही अनेक प्रॉपटीच्या आकारणीत चूका आहेत. यासाठी आपण स्वतंत्र एजन्सी नियुक्त करण्यांचे निश्चित केलेले आहे. त्यांच्या मार्फत आपण सर्व शहरातील मालमत्तांचे ॲसेसमेंट करणार आहोत. तसेच त्यांची सुनावणी, बिले जनरेट करणे, याप्रमाणे कार्यवाही होणार आहे. प्रशासनाने टेंडरची प्रक्रिया केलेली आहे. येत्या 8 ते 10 दिवसांत ती प्रक्रिया आपण पूर्ण करणार आहोत. जरी आपण टेंडर दिले तरी ॲसेसमेंट करणे, आकारणी करणे, या प्रक्रिया कालावधी लागणार आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात फार जास्त उत्पन्न वाढेल असे आपण गृहित धरु शकत नाही. परंतु पुढच्या वर्षात निश्चत याचा मोठया प्रमाणावर फायदा होणार आहे. आता या बजेट मध्ये काही तरतुदी धरलेल्या आहेत. एका वर्षात आपण साधारणत: दोन प्रकारचे बजेट करतो प्रथम सुधारीत अंदाजपत्रक असते. आपण साधारणत: नोव्हेंबर नंतर त्या प्रक्रियेला सुरुवात करतो.आणि एक बजेट आर्थिक वर्षाचे असते. या वर्षामध्ये आपले 8 महिन्यांचे उत्पन्न व खर्चावर आधारीत आपण 4 महिन्यांचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करतो. आज आपण या बजेटला मान्यता देत आहोत. व काही दिवसांत आपल्याला सुधारीत बजेटची तयारी करावी लागणार आहे. सुधारीत बजेट तयार करतांना आपल्याला या 8 महिन्यांत महसूली स्वरुपाचे तसेच भांडवली स्वरुपाचे किती उत्पन्न प्राप्त झाले याचा आढावा घेवून पुढील 4 महिन्यांचे व नंतर पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक करावे लागते. व अशा प्रकारे आपल्याला प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. आजच्या बैठकीत चर्चेत महत्वाच्या सुचना आलेल्या आहेत. यांत सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी 16 कोटी रु. दायीत्वाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपल्याला माहित आहे प्रशासनाने फेब्रुवारी मध्ये बजेट सादर केले परंतु पुढे कोरोना परिस्थिती आली. परंतु आपल्याला काही कामे करणे गरजेचे होते. आपण कोणताही खर्च क्षमतेपेक्षा जास्त केलेला नाही. आपल्याकडील जी वसुली आहे त्याच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च

नाही.आपण ॲडव्हान्स कोणाला देत नाही. आपण उत्पन्न वाढविण्यांचा प्रयत्न करीत आहेत. दायीत्वाच्या संदर्भात आपली शंका होती. त्यांचे निश्चित पालन केले जाईल.

या ठिकाणी शॉपींग कॉम्प्लेक्स संदर्भातही काही मुद्दे होते. अनेकांनी चांगल्या सुचना मांडल्या आहेत. त्या सुचनांचा निश्चितच बजेट मध्ये समावेश होईल व प्रशासनामार्फत त्याची अंमलबजावणी होईल. सन्मा. सदस्य श्री. संजय पाटील यांनी एम.एस.ई.बी. च्या पोल संदर्भात सुचना दिलेली आहे. पण माझ्या मते त्यासंदर्भात त्यांच्यावर कर लावता येणार नाही याबाबत काही नगरपालिकांनी प्रयत्न केलेले होते.परंतु न्यायालयाने नगरपालिकांच्या विरोधात निकाल दिलेला आहे.तरी मी याबाबत तपासणी करुन माहिती घेतो जर आपल्याला या पध्दतीने अंमलबजावणी करता आली तर निश्चितच मोठया प्रमाणावर उत्पन्न वाढणार आहे. आपण याबाबत खात्री करुन निर्णय घेवू.

सन्मा. सदस्य श्री. शितलभाऊ नवले यांनीही उत्पन्न् वाढीच्या चांगल्या सुचना केलेल्या आहेत त्याची निश्चितच प्रशासनामार्फत अंमलबजावणी केली जाईल. अक्कलपाडा योजना तसेच भूमिगत गटार योजना याबाबत मी सांगू इच्छितो की, या योजना माननीय पंतप्रधान महोदयांच्या योजना आहेत. त्यांनी या योजनेचे उदद्घाटन केलेले आहे आणि पंतप्रधान कार्यालयामार्फत व राज्य शासनामार्फत या योजनेच्या पंगती विषयी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. शासनाने या योजनांसाठी कोणताही प्रकारचा निधी कमी पडणार नाही असे आश्वासित केलेले आहे. फक्त योजनेचा कालावधी निश्चित केलेला असून त्याचे पालन होणे गरजेचे आहे. आपली कामे सुरु आहेत साधारणत: 1 ते 2 महिन्यांचा फरक पडेल पण कामे निश्चित पूर्ण होतील.

आपल्या आलेल्या तरतुदीच्या सुचनाबाबत सभागृह व मा. महापौर निर्णय घेतीलच सदर अंदाजपत्रक मंजूर करावे अशी सभागृहाला विनंती करतो.

म. नागसेन बोरसे मा.आयुक्तांनी खुलासा केला आहे की, आपण दायित्व स्विकारलेले आहे.५६ कोटीचे दायित्व आहे. ८ कोटी स्पिल ओव्हर आहे. ते १ कोटी दाखविले आहे. १६ कोटी प्री बजेटचे आहे. ते तरतूदीत नमुद नाहीत. त्यांची तरतूद होणार आहे. २८ कोटीचे तरतूदी स्थायी समितीने सुचविलेल्या आहेत. नगरसेवक निधीसह आणि ४.२० कोटीची तरतूद स्थायी समिती सदस्यांसाठी करण्यात आलेली आहे.

म.सुनिल बैसाणे सदर तरतूद केलेली नाही.

म. नागसेन बोरसे याबाबत सभागृह निर्णय घेईल.

म.सुनिल बैसाणे सदर बाब फक्त चर्चेत होती. ती तरतूद करण्यात आलेली नाही.

म. नागसेन बोरसे मला प्रथम दायित्व स्विकारले आहे किंवा नाही ते सांगावे. ५६ कोटी रूपये कूठून येणार आहे. ठेकेदारांच्या बिलांची जबाबदारी घ्या. स्थायी समितीने नविन सिग्नंलसाठी ५० लाख तरतूद केलेली आहे. त्यांची आवश्यकता आहे का. अशा अनेक तरतूदी आहेत. आपण दायित्व स्विकारणार असाल तर मी यासाठी २.५ कोटीची तरतूद सुचवितो आहे.ती मान्य करा तरच बजेट मंजुर करा. हा तुटीचा अर्थसंकल्प आहे शिल्लकी अर्थसंकल्प नाही.

मा. महापौर याबाबत आपले लेखी म्हणणे सादर करा त्यानुसार त्यांची नोंद घेतली जाईल.

म.शितल नवले मा.आयुक्त सो.आपण जो खुलासा केला त्यावर आम्ही विश्वास ठेवतो. पण आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी तीतक्याच तत्परतेने काम करीत नाही. तुमची प्रामाणिक इच्छा आहे. पण आम्ही जे काही गोष्टी सुचवितो त्याची अंमलबजावणी व्हावी हीच अपेक्षा आहे.आम्ही ज्या गोष्टी सुचवितो त्या विभागाला कळल्या पाहिजे हि जबाबदारी नगरसचिव यांची देखील आहे.

म. नगरसचिव:- सभागृहात झालेला ठराव ज्या विभागांशी संबंधित असतो. तेथे लगेच पाठविण्यात येतो .आज माझ्या कार्यालयाकडे कोणताही ठराव प्रलंबित नाही. सर्व ठराव चर्चासह संबंधित विभागाना पाठविण्यात आलेले आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारच्या सुचना व उत्पन्नवाढीच्या बाबी सुचविल्या या सुचनांचा आदर ठेवुन सर्व सामान्यजनताआणि धुळेकर नागरीक यांच्यावर भार पडणार नाही. यादृष्टीने उत्पन्नवाढीसाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत व याबाबत प्रशासनाशी चर्चा करुन जमा व खर्चाचा ताळमेळ लक्षात घेवुन अंदाजपत्रक तरतुदीबाबत विचार करणेत येईल. उक्त नुसार सन २०१९-२० चे सुधारीत व २०२०-२०२१ चे अंदाज पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११२ दिनांक १२/११/२०२०

प्रशासनामार्फत तसेच स्थायी समिती मार्फत अंदाजपत्रक सादर करण्यांत आलेले आहे.कोरोनाच्या आपत्तीमुळै अंदाजपत्रक मान्यतेस विलंब झालेला आहे. आपल्या धुळे शहरास मोठा इतिहास आहे. आपले शहर जरी रचनाबध्द असले तरीही शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रितीने राखण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. आज भाजपाची सत्ता महानगरपालिकेवर आलेली आहे.आम्ही शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना प्रस्तावित केलेल्या होत्या व त्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडवणीस तसेच माजी जलसंपदा मंत्री मा.ना. श्री. गिरीषजी महाजन, आपले खासदार श्री.सुभाषबाबा भामरे, माजी पर्यटन मंत्री मा. ना. श्री.जयकुमारजी रावल, भाजपा महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांच्या सहकार्याने धुळे महानगरपालिकेस शासनामार्फत विविध योजना व अनुदान प्राप्त झालेले आहे.

आपण सद्यस्थितीत कोरोनाच्या भयंकर आपत्तीतून मार्गक्रमण केलेले आहे. आज आपण कोरोनाच्या संसर्गावर ब-यापैकी मात करण्यांत यशस्वी झालेलो आहोत. यासाठी आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या संपूर्ण अधिकारी व कर्मचारी वर्गाने अहोरात्र परिश्रम करुन या आपत्तीला अटोक्यांत आणण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. हे खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. यात अति. आयुक्त श्री. गणेश गिरी,उपायुक्त श्री. शांताराम गोसावी,आरोग्याधिकारी डॉ.महेश मोरे,तसेच महानगरपालिकेचे सर्व स्वच्छता निरीक्षक, ओव्हरसिअर, स्वच्छता कर्मचारी व सर्व खातेप्रमुख यांचे महत्वांचे योगदान राहिलेले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे असलेले मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत व उत्पन्न वाढीस पडणा-या मर्यादा यामुळे अनेक विकास कामे करण्यांस अडचणी निर्माण होतात. धुळे मनपाकडेस सुमारे 18 कोटी मात्रचे विकास कामांचे देयके प्रलंबीत आहेत. तापी पाणीपुरवठा योजनेचे कर्ज व व्याजाचा बोजा आहे.तथापि शासनाकडील विविध अनुदानाव्दारे यावर मात करण्यांचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.आपल्या सर्वाच्या प्रयत्नाने आपण या सर्व अडचणींवर मात करुन विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहोत.

शहराचे एकुणच मूल्याकन पाहता या अंदाजपत्रकात नागरीकांवर कोणत्याही प्रकारची कर वाढ सुचविण्यांतआलेली नाही.महानगरपालिकेचा अत्यावश्यक बाधील खर्च वजा जाता मिळणारे उत्पन्न अत्यंत मर्यादित असल्याने सद्यस्थितीत स्थायी समिती मार्फत प्रस्तावित करण्यांत आलेली नगरसेवक निधीसाठी प्रत्येकी 20 लक्ष मात्र तरतूद कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शहराच्या मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांबरोबरच शहराचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक असल्याने क्रिडा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमासाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रभागातील विकास कामे मनपा निधीतून करणे शक्य होत नसल्याने राज्य स्तरीय सुवर्णजयंती नगरोत्थान योजना,जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, नागरी दलित वस्ती योजना, अल्पसंख्याक योजना,तसेच शासनाच्या विविध विकास योजनांच्या अनुदानातून विकास कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.तसेच हद्दवाढ झालेल्या गावांसाठीही मुलभूत सेवा सुविधा व विकास कामांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला आहे.या सर्वबाबींसाठी आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करावा लागणार आहे. सदर हिस्सा भरण्यासाठी आवश्यक ती तरतूद मनपा अंदाजपत्रकात तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

शहरासाठी जिवनदायी ठरणारी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना, तसेच शहरासाठी महत्वपूर्ण असणारी भूमिगत गटार योजना या महत्वाकांक्षी योजनां साठीही मनपा हिस्साअदा करावा लागणार आहे. त्यासाठीही अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

त्याच बरोबर धुळे महानगरपालिका कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग लागू करण्यांचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने आवश्यक तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

याच बरोबर ईगर्व्हनर्स,विकास कामांची प्रलंबीत देयके,आपत्ती व्यवस्थापन,वृक्ष निधी, महिला व बालकल्याण निधी,आर्थिक व दुर्बल घटकांसाठी असणारा निधी,अपंग व दिव्यांग यांच्यासाठी असणारा राखीव निधी यासाठीही अंदाजपत्रकात तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

1) शासनाच्या ध्येय व धोरणानुसार महिलांचे सक्षमीकरण करणेसाठी व महिलांकरिता विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेसाठी महिला व मुले यांना केंद्रस्थानी ठेवून महिला व बालकल्याण समिती अंतर्गत अंदाजपत्रकात जेंडर बजेट अंतर्गत एकुण अंदाजपत्रकाच्या 5 टक्के मात्र तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.
2) तसेच मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटकांचा सामाजिक स्तर उंचावणेसाठी व त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरिता अंदाजपत्रकात 5 टक्के तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.
3) राखीव निधी (अपंग दिव्यांग):- नगरविकास विभागाकडील दिनांक 30/10/2010 चे परिपत्रकानुसार मनपा क्षेत्रात दिव्यांग(अपंग) नागरीकांना त्यांच्या पुर्नवर्सन व विकास करणेसाठी बांधील खर्च वजा जाता शिल्लक रकमेच्या 5 टक्के एवढा राखीव निधीसाठी तरतूद करण्यांत येत असून अंध अपंग व दिव्यांगासाठी विविध योजना राबविण्यांत येणार आहेत. यांत शिष्यवृत्ती शैक्षणिक कामांचे शुल्क,प्रशिक्षण विमा तसेच विरंगुळा केंद्र या योजनांचा समावेश आहे. यामुळे दिव्यांग नागरीक स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.
4) नव्याने हद्दवाढ झालेल्या 11 गावांचा जमीन वापर नकाशा (डीपी) तयार करण्यासाठी रु. 1 कोटी मात्र तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.
5) नवीन हद्दवाढ गावातील पिण्याच्या पाण्याची बिकट व्यवस्था लक्षांत घेता सदर कामासाठी 3 कोटी मात्र तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपामध्ये समाविष्ठ झालेल्या हद्दवाढ गावातील पाणी पुरवठयाच्या कामासाठी ३ कोटी मात्र तरतुद अंदाजपत्रकात प्रस्तावित केलेली आहे. तरी सर्व हद्दवाढ गावात सदर

निधी त्या त्यागावातील एकूण मालमत्तांची संख्या लक्षात घेता टक्केवारी नुसार निधी वितरित कामास मान्यता देण्यात येत आहे. यात सदर हद्दवाढ गावात खालील प्रमाणे 3 कोटी निधी अंतर्गत तरतूद करावी.

अ.क्र.	हद्दवाढ गावांचे नाव	निधी वितरण (लाखात)
१	महिंदळे	२७.३०
२	मोराणे	२२.४७
३	भोकर	११.६४
४	वलवाडी	१३८.००
५	नकाणे	१६.५६
६	नगांव	०
७	अवधान	२०.८८
८	चितोड	२०.०१
९	वरखेडी	२३.१३
१०	बाळापूर	१७.०१
११	पिंप्री	३.००
	एकुण	३००.००

प्रशासनाने हद्दवाढ भागातील पाणी पुरवठयाच्या कामांची आवश्यकता लक्षात घेवून प्राधान्यक्रमानुसार कामाबाबत कार्यवाही करावी. तसेच ज्या नवीन वसाहतीत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईनची आवश्यकता आहे त्याच ठिकाणी पाईप लाईनची कामे घेण्यांत यावी. तसेच ज्या गावात आवश्यकता नाही त्या ठिकाणचा निधी अन्य आवश्यकता असलेल्या गावात वापरण्यांत यावा.

6) धुळेमहानगरचा सर्वांगीण विकास होणेही आवश्यक आहे.यासाठी शहरातील विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत अभ्यासिका, सांस्कृतिक उपक्रम व कार्यक्रम तसेच महापौर केसरी कुस्ती स्पर्धा, चौक सुशोभिकरण करणेसाठी आवश्यक ती तरतूद या अर्थसंकल्पात तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

7) धुळे शहरातील (हद्दवाढ गावांसह) संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण व मोजणी करुन त्याप्रमाणे वर्ग निहाय कर आकारणी GSI मॅपींगव्दारें करण्यांत येणार असून या व्दारे सर्व मालमत्ता मनपाच्या रेकॉर्डवर येवून मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे यासाठी 2 कोटी मात्र तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

8) शहरात सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने व नागरीकांच्या आरोग्य रुग्णासाठी डास निर्मुलन अंमलबजावणी करण्यात येत असून रासायनिक व सुयोग्य शास्त्रोक्त पध्दतीने कायम स्वरुपात संपूर्ण डांस निर्मुलन मोहिम हाती घेण्यांत येणार आहे. त्यासाठी 4 कोटी मात्र तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

9) सौर ऊर्जा:-मनपा सुकवद, बांभळे, हनुमान टेकडी, डेडरगांव पाणीपुरवठा जलशुध्दीकरण केंद्राच्या उपलब्ध जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत करणे प्रस्तावित असून या कामामुळे मनपाच्या वीज बील खर्चामध्ये 35 ते 40 टक्के खर्चात बचत होणार आहे. या प्रकल्पीय कामाकरिता महाराष्ट्र शासन व केंद्र शासन तसेच अपांरपारीक ऊर्जा मंत्रालय या शासन उपक्रमाकडून निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. याकरिता मनपाचा स्वनिधी करणे आवश्यक आहे.

10) LED:- धुळे शहरात संपूर्ण LED पथदिवे बसविणे कामाची निविदा कार्यवाही झालेली आहे व दर मंजूरी अंतिम टप्प्यात आहे. संपूर्ण शहरात LED पथदिवे बसविल्यामुळे स्ट्रीट लाईट वील बीलामध्ये 40 टक्के बचत होणार आहे. संपूर्णत पथदिवे बसविण्यांचे कामाकरिता सुमारे 8 ते 10 कोटी खर्च अपेक्षित आहे. तथापि 31 मार्च 2021 पर्यत या कामासाठी किमान रक्कम रु. 2.50 कोटी तरतूद करणे आवश्यक आहे.

11) या अर्थसंकल्पात सन 2020- 21 मधील विकास कामे याअंतर्गत 15 कोटी मात्र तरतूद प्रसतावित करण्यांत आलेली आहे. यात बांधकाम विभागामार्फत सदर विकास कामाची यादी स्वाक्षरीसह प्रमाणित करण्यांत आलेली असून सदर कामेच या तरतुदीअंतर्गत घेण्यांत यावीत.

मागील ३ वर्षातील झालेल्या तरतूदी व प्रत्यक्ष मिळालेले महसूली उत्पन्न याचा अभ्यास केला असता हा अर्थसंकल्प वस्तूनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा आहे.त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी प्रशासना कडूनही सक्षमतेने व प्रामाणिकपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे.एकत्रित मालमत्ता कर, वाढीव मालमत्तावरील कर आकारणी, दुकान भाडे, दुकान हस्तांतरण फी, पाणीपट्टी वसुली, विकास शुल्क, अनाधिकृत टॉवर दंड आकारणी हे धुळे महानगरपालिकेचे प्रमख्य उत्पन्नाची साधने आहेत.या उत्पन्न वाढीसाठी अधिकारी कर्मचारी तसेच पदाधिकारी व नगरसेवक बंधु भगिंनी यांनी एकत्रित व समन्वयाने प्रयत्न करणे गरजेचे आहे व यासाठी नागरीकांचे सहकार्य महत्वाचे आहे.

मनपाचे आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी प्रभावीपणे व कार्यक्षमपणे कार्यवाही प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे.यासाठी मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळयांचे सर्व्हेक्षण करुन भाडे आकारणी तांतडीने कार्यवाही करावी. तसेच मुदत संपलेल्या गाळयांचे नियमाप्रमाणे फेर लिलाव केल्यास मनपाच्या आर्थिक स्त्रोत वाढ होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत तांतडीने कार्यवाही करावी. मनपाच्या मोकळया जागा ताब्यात घेणे, नवीन वाढीव बांधकाम झालेल्या मालमत्तांना कर आकारणी करणे,कर्मशियल वापर असलेल्या दुकान व घरांना कर्मशियल तत्वाने कर आकारणी करणे, मोबाईल टॉवर वरील दंड व व्याज आकारणी,शहरातील मनपा जागांवरील प्रस्तावित व्यापारी संकुलाबाबत जलद गतीने कार्यवाही या सारख्या बाबींमधून मनपाच्या आर्थिक स्त्रोतात निश्चितच वाढ होणार आहे.त्याच प्रमाणे बखळ जागाचा शोध घेवून त्यावर नियमाप्रमाणे का आकारणी झाल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होवू शकते.

आपण शहराच्या महत्वाच्या ठिकाणी शहर सौदर्यीकरणाबरोबरच मनपाच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून बीओटी तत्वावर व्यापारी संकुल बांधण्यांचे निर्णय घेतलेला आहे. यात शाळा नं. 5,28,17 नवरंग जलकुंभ, दसेरा मैदान, वलवाडी सर्व्हे नं.73येथे भाजी मंडई व्यापारी संकुल उभारणे याव्दारे मनपास भरीव उत्पन्न प्राप्त होणार आहे.

याच बरोबर ट्रक टर्मिनस सुरु करणे,अनधिकृत नळ कनेक्शन धारकांवर दंडात्मक कार्यवाही करणे, नवीन बांधकामांवर विकास शुल्क वसुलीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, मोबाईल टॉवर तपासणी करणे, महानगरपालिकेच्या भंगार साहित्यांचा लिलाव करणे या सारख्या माध्यमातूनही मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे.

सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षात धुळे शहर विकासाच्या दृष्टीने विविध शासकीय योजना व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी पाणी पुरवठा योजना.
२) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा राबविणे.
३) हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत विकास कामे करणे.
४) धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांकावर राहण्यात यशस्वी झाली असून माता बालसंगोपन, क्षयरोग निर्मूलन,एनयुएचएम व विविध लसीकरण यासारख्या कार्यक्रमांमध्ये भविष्यातही आघाडीवर राहण्याचा संकल्प आहे.
५) एनयुएचएम अंतर्गत नवीन दवाखाने विकसित करणे.
६) राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत महिलांच्या बचत गटांचे बळकटीकरण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
७) नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत तसेच दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व विशेष घटक योजनेचे प्रकल्प राबविणे.
८) शहरातील वितरण व्यवस्था नियोजनासाठी खासगी सल्लागार नियुक्त करून संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्याचे री-इंजीनियरिंग करणे.
९) शहरात हरित क्षेत्रांचा विकास करणे.
१०) धुळे शहरात संपूर्ण एलईडी पथदिवे बसविणे.
११) जवाहर स्टेडियम नुतनीकरण करणे..
१२) ईगव्हर्नस प्रणाली बळकटीकरण करणे व कर वसुली प्रणाली ऑनलाईन करणे .
१३) अमृत योजने अंतर्गत शहरातील हरित क्षेत्राचा विकास करणे. (पिराची टेकडी, अवधान येथील
क्षेत्र,डेडरगांव तलाव जवळील क्षेत्र, तसेच मनपा मालकीच्या विविध जागावर)
१४) आरएफआयडी प्रणाली कार्यान्वीत करणे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सुचना तथा लेखी पत्रांचा विचार करुन व यासंदर्भात प्रशासनाशी चर्चा करुन अंदाजपत्रकात आवश्यक ते फेरबदल करुन अंतिम करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

याप्रमाणे उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेवून मे. महासभेमार्फत खालील प्रमाणे तरतुदी तथा उत्पन्नाच्या बाबी प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी	मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	मे. महासभेने सुचविलेल्या तरतुदी	वाढ	घट
	जमा बाजू					
१	धुळे मनपा मार्फत प्रस्तावित देवपूर शाळा नंबर १७ , शाळा नं. २८, शाळा नं. २,तसेच नवरंग जलकुंभाजवळील जागेत तसेच दसेरा मैदान व शाळा क्रं. ५ येथे व्यापारी संकुल बांधणे तसेच जुन्या गुजराथी शाळेच्या जागेवर व्यापारी संकुल बांधणे	२५०००००	२५०००००	२७५०००००	२७२५०००००	

मे.स्थायी समितीने सन 2020-21 च्या अंदाजपत्रकात शहरासाठी अनेक चांगल्या योजना विकासाच्या दृष्टीने प्रस्तावित केलेल्या आहेत. तथापि या आर्थिक वर्षात कोविड नैसर्गिक आपत्तीमुळे अंदाजपत्रक मान्यतेसाठी झालेला विलंब व या आर्थिक वर्षाचा कालावधी लक्षांत घेता सदर योजना याआर्थिक वर्षात पूर्णपणे राबविणे शक्य होणार नाही. त्यामुळे मे. स्थायी समितीने प्रस्तावित केलेल्या तरतुदीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे. यातील काही तरतुदी प्राथमिक स्वरुपात दर्शविण्यांत येत आहेत.

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	मे. महासभेने सुचविलेल्या तरतुदी	वाढ	घट
१	छत्रपती शिवाजी महाराज स्वप्नपुर्ती महिला (हिरकणी) आत्मनिर्भर योजना	१००००००	१०००००		९०००००
२	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना	१५०००००	५,००,०००		१०००००
३	डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती योजना	१०००००	५,००,०००		५,००,०००
४	सावरकर पुतळा स्थलांतर	५०००००	५,००,०००		४५,००,०००
५	दाता सरकार चौक सुशोभिकरण	१५,००,०००	०		१५,००,०००
६	मनपा इंग्रजी शाळा शिक्षक मानधन व इतर शालेय सुविधा	२५,००,०००	५,००,०००		२०००००
७	सांस्कृतिक कार्यक्रम	२५,००,०००	१,००,०००		२४०००००
८	अभ्यासिका	२५,००,०००	०		२५,००,०००
९	ग्रुप इन्शुरन्स कर्मचा-यांसाठी	१०,००,०००	०		१०,००,०००
१०	मनपा हद्दीतील नागरीक विमा	२५,००,०००	०		२५,००,०००
११	महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरण 1.राजर्षी शाहु महाराज पुतळा उभारणे 2.देवपूर साईबाबानगर नकाणेरोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण करणे. 3.देवपूर संत रोहिदास महाराज पुतळा उभारणे. 4.शहरातील महापुरुषांचे पुतळे नुतनीकरण व दुरुस्ती	 ३००००० १००००० १००००० १०००००	३०,००,०००		३०,००,०००
१२	शहरातील विविध भागात प्रवेशव्दार उभारणे. 1.एकविरा देवीमंदिर येथे स्वागत कमान 2)संतोषीमाता मंदिर येथे स्वागत कमान 3)फाशीपुल लेनिन चौक येथे स्वागत	 ४००००० ३००००० ३०००००	२००००० (प्रत्येकी ५ लाख)		

	कमान. 4)मोगलाई नेहरु पुतळा येथे स्वागत कमान	३००००००			११०००००००
१३	आयुर्वेदिक दवाखाना दुरुस्ती	३५०००००	०		३५०००००
१४	धुळे शहरातील सर्व धर्मिय धार्मिक स्थळांवर ज्येष्ठ नागरीकांच्या सोयीसाठी सिमेंट बाक बसविणे	२५०००००	५,००,०००		२००००००
१५	जवाहर स्टेडीयम दुरुस्ती	१५०००००	७०००००		८०००००
१६	चितोडरोड अमरधाम येथे विद्युत शववाहिनी करणे	२००००००	०		२००००००
१७	ईएसएल अंतर्गत एलईडी बसविणे	५००००००	०	०	५००००००
१८	वेतन राखीव निधी	१४००००००	२००००००		१२००००००

मे. महासभेने प्रस्तावित केलेल्या तरतुदी

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी	मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	मे. महासभेने सुचविलेल्या तरतुदी	वाढ	घट
	खर्च बाजू					
1	शहरात एलईडी दिवे बसविणे	0	0	2500000	2500000	
2	हद्दवाढ गावात पाणीपुरवठासाठी	0	0	30000000	30000000	
3	वाडीभोकर/वलवाडी चौक सुशोभिकरण व पुतळयासाठी चबुतरा बनविणे	0	0	10000000	10000000	
4	नवीन सोलर सिस्टीम बसविणे	0	0	2500000	2500000	
5	स्पील ओव्हर	10000000	10000000	100000000	90000000	
6	शिवाजीरोड रस्त्याच्या दुतर्फा सुशोभिकरण करणे व गणपती मंदिर परिसर सुशोभिकरण करणे	0	0	5000000	5000000	
7	जुने महापालिका सभागृहात कला दालन निमिर्ती करणे	0	0	500000	500000	
8	शाळा नं. 20 परिसरात वॉल कपौड करणे	0	0	4000000	4000000	
9	नदी किनारी गणेश विसर्जनासाठी गणेश कुंडाची निमिर्ती करणे	0	0	5000000	5000000	
10	छत्रापती शिवाजी महाराज अर्ध पुतळा पूर्णाकृती करणे	0	0	5000000	5000000	
11	अटलबिहारी वाजपेयी स्मारक व परिसर सुशोभिकरण करणे	0	0	500000	500000	
12	संभाजी बगिचा येथील छत्रपती संभाजी पुतळा चबुतरा व नुतनीकरण करणे	0	0	2000000	2000000	

13	शहरातील विहिरीचा गाळ काढणे व जाळी बसविणे	0	0	2500000	2500000	
14	महापौर केशरी कुस्ती स्पर्धा	0	0	500000	500000	
15	हवामान मापन यंत्र बसाविणे	0	0	500000	500000	
16	सन 2019- 20 ची प्रलंबीत देयके	0	0	80000000	80000000	
17	महापौर , आयुक्त निवास स्थान			500000	500000	
18	हनुमान टेकडी परिसर विकसीत करणे			5000000	5000000	
19	गांधी पुतळा चौक येथे राष्ट्रीय ध्वज बसविणे व परिसर सुशोभित करणे			7500000	7500000	
20	मोहाडी येथे शिवाजी पुतळयासाठी चबुतरा बांधणे			500000	500000	
21	एकलव्य पुतळयासाठी चबुतरा उभारणे.			500000	500000	
22	विद्यावर्धिनी कॉलेज मागे रमाई स्मारक उभारणे.			1000000	1000000	
23	मच्छीबाजार दवाखाना नुतनीकरण करणे			3000000	3000000	
24	वरखेडी अमरधाम नुतीनकरण उर्वारीत टप्पा क्रमांक 2			8000000	8000000	
25	शहरात कमान तथा प्रवेदव्दार करणे. 1.गांधी चौक 2.शिवाजीरोडगणपती मंदिर चौक 3.नटराज टॉकीज जलाराम मंदिराकडील चौक ,4.गांधीनगर प्रकाश टॉकीज जवळील चौक 5.दसेरा मैदान दूध डेअरी रस्ता चौक (प्रत्येकी 5 लाख रुपये)	0	0	2500000 (प्रत्येकी 5 लाख रुपये)	2500000	
26	जवाहर स्टेडियम उर्वरीत भाग नुतनीकरण करणे (टप्पा क्रं. २)	0	0	10000000	10000000	
27	सर्वसाधारण सादील	4500000	4500000	5500000	1000000	
28	गटार दुरुस्ती	5000000	5000000	9500000	4500000	
29	संत नरहरी महाराज पुतळा परिसरात संत दालन तयार करणे.	0	0	1000000	1000000	
30	अग्रवाल नगर येथील उदयानात साहित्य बसविणे.	0	0	4000000	4000000	
31	एकनाथ व्यायाम शाळा व हरहर महादेव व्यायाम शाळा विकसीत करणे	0	0	6000000	6000000	
32	नैसार्गिक आपत्ती	0	0	10000000	10000000	
33	सन 2020-21 ची विकास कामे	0	0	150000000	150000000	

उक्त नमूद केलेल्या बाबींसाठी सन 2020-21 या आर्थिक वर्षात दर्शविण्यांत आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरुपाची तरतूद असून सबंधित विभागांनी याबाबत मार्च 2021 अखेर प्रत्यक्ष होणा-या रकमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करुन सुधारीत अंदाजपत्रक माहे

डिसेंबर2020 च्या सुधारीत अंदाजपत्रकात करुन घेणे आवश्यक असेल या अटीवर नमूद तरतूदी करण्यांत येत आहेत.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व उत्पन्न वाढीच्या मुद्दयांची नोंद घेवून तसेच जमा व खर्च यांचा ताळमेळ लक्षात घेवून त्यानुसार वरील प्रमाणे अंदाजपत्रकात वाढ व घट करण्यांत आलेली असून सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-2021 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. तसेच प्रशासनाने या आर्थिक वर्षातील उत्पन्नाच्या बाबीचा स्त्रोत व प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न याचा आढावा घेवून प्रस्तावित तरतुदीबाबत उचित कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.३० डिसेंबर २०२० रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
बुधवार दिनांक ३०/१२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन सर्वसाधारण महासभा आज बुधवार दिनांक ३०/१२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री.चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर, धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेच्या हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी करुन खालील सदस्य सभेस उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री. सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११- ०० वाजतां
२	मा. सौ. अंपळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
८	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
९	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१०	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
११	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१२	श्री. वाळवाले कांतीलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१३	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१४	श्रीमती पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१५	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
१६	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्या	----------" ---------
१७	श्रीमती.कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
१८	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
१९	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२०	श्रीमती महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
२१	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
२२	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२३	श्री.जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------

२४	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
२५	श्रीमती जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
२६	श्रीमती.वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
२७	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
२८	श्री.पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
२९	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३०	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३१	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
३२	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३४	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
३५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
३६	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
३७	श्री. खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
३८	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
३९	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
४०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
४१	श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
४२	श्रीमती मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
४३	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
४४	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
४५	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
४६	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
४७	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
४८	श्री. पिंजारी मदिना समशेर	सदस्या	----------" ---------
४९	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
५०	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५१	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५२	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५३	श्री. महाले संदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. अजीज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा.आयुक्त	----------" ---------
३	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------

७	श्री. मनोज अरविंद बाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
९	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------
१०	श्री. चंद्रकांत जाधव	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
११	श्री. लक्ष्मण पाटील	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१३	श्री.एन.पी. सोनार	इस्टेट मॅनेजर	----------" ---------
१४	श्री. रजमान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक	----------" ---------
१५	श्री. रविंद्र सोनवणे	लिपीक परवाना विभाग	----------" ---------
१६	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मु.निर्धारण अधिकरी तथा प्र. मु. लेखाधिकारी	----------" ---------
१७	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१८	श्री. राजेश गायकवाड	व.सहा. मनपा शि.मं.	----------" ---------
१९	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
२०	श्री.किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख	----------" ---------
२१	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२२	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. वि.	----------" ---------
२३	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम	----------" ---------
२४	श्री.कमलेश सोनवणे	ओव्हरसिअर न.र. वि.	----------" ---------
२५	श्री. आत्या राऊत	वाहन विभाग	----------" ---------

मा.महापौर आजच्या ऑनलाईन महासभेस उपस्थित मा.आयुक्त सो. सन्मा. पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया.

१) धुळे शहरातील नामवंत मल्ल तसेच महाराष्ट्र चॅम्पीयन पहेलवान मा. राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच निधन झाले आहे, आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक श्री. देवेंद्र चंद्रकांत सोनार, नगरसेवक मनपा धुळे

२) धुळे महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्या मंगला अर्जून चौधरी यांचे पती अर्जुन चौधरी यांचे दु:खद निधन झाले आहे. तरी आजच्या महासभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन तसा शोक प्रस्ताव पारीत करावा ही विनंती.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर११३ दिनांक ३०/ १२/२०२०

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे शहरातील नामवंत मल्ल तसेच महाराष्ट्र चॅम्पीयन पहेलवान मा. राजधर एलजी कोळी यांचे नुकतेच निधन झाले आहे,तसेच धुळे महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्या मंगला अर्जून चौधरी यांचे पती अर्जुन चौधरी यांचे दु:खद निधन झाले आहे.

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज .

सन्मा.सदस्या सर्वश्री. सोनार सुनिल वसंतराव, श्री. अनिल रघुनाथ नागमोते, सौ. भारती अशोक माळी, श्री. सुभाष सुकलाल जगताप,श्री. भगवान शंकर गवळी,श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सौ. कशिश गुलशन उदासी, श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद,सौ. मंगला सुरेश पाटील, श्री. जाधव बान्सीलाल माणिक,सौ. बागुल गोगिता प्रशांत, इ. यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११४ दिनांक ३०/ १२/२०२०

सन्मा.सदस्या सर्वश्री.सोनार सुनिल वसंतराव,श्री.अनिल रघुनाथ नागमोते,सौ. भारती अशोक माळी, श्री. सुभाष सुकलाल जगताप,श्री. भगवान शंकर गवळी,श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सौ. कशिश गुलशन उदासी, श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद,सौ. मंगला सुरेश पाटील, श्री. जाधव बान्सीलाल माणिक, सौ. बागुल गोगिता प्रशांत, इ.यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

तरी सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेले अभिनंदनाचा प्रस्ताव

धुळे महानगरपालिका सिल्वर अवॉर्डने सन्मानीत झाल्याबद्दल मा. महापौर श्री. चंद्रकांत बापू सोनार, उपमहापौर सौ. कल्याणीताई अंपळकर, मा. आयुक्त अजीज शेख, स्थायी समिती सभापती सुनिलभाऊ बैसाणे, महिला बालकल्याण सभापती सौ. स्नेहल जाधव व सर्व सन्मा. नगरसेवक, अधिकारी पदाधिकारी सर्वांचे हार्दीक अभिनंदन. कारण सिल्वर अवॉर्ड मिळण्यासाठी सर्वांचा सिंहाचा वाटा आहे. सर्वांची मेहनत आहे. अशी प्रगती आपल्या महानगरपालिकेची होत राहो. व हद्दवाढ भागासह धुळे शहराची भरभरुन प्रगती व विकास होंत राहो. याबद्दल आजच्या महासभेत अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- सौ. वंदना संजय भामरे,

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर११५ दिनांक ३०/ १२/२०२०

सन्मा.सदस्यांच्या धुळे महानगरपालिका सिल्वर अवॉर्डने सन्मानीत झाल्याबद्दल मा. महापौर श्री. चंद्रकांत बापू सोनार, उपमहापौर सौ. कल्याणीताई अंपळकर, मा. आयुक्त अजीज शेख, स्थायी समिती सभापती सुनिलभाऊ बैसाणे, महिला बालकल्याण सभापती सौ. स्नेहल जाधव व सर्व सन्मा.नगरसेवक,अधिकारी पदाधिकारी सर्वांचे हार्दीक अभिनंदन.कारण सिल्वर अवॉर्ड मिळण्यासाठी सर्वांचा सिंहाचा वाटा आहे.सर्वांची मेहनत आहे.अशी प्रगती आपल्या महानगरपालिकेची होत राहो. व हद्दवाढ भागासह धुळे शहराची भरभरुन प्रगती व विकास होंत राहो या अपेक्षेसह अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ८४ महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेचे भाडेपट्टयाचे नुतनीकरण व हस्तांतरण सुधारीत अधिनियम 2019 मे. महासभेत अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव **नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.**

म.प्रदीप कर्पे सदरचा विषय अवलोकनार्थ सादर झालेला आहे आपल्याला माहित आहे सन 2020 हे पूर्ण वर्ष कोविड आपत्ती मध्ये गेलेले आहे त्यामुळे सर्वच देशांची व सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची किती झालेली आहे पूर्ण देशाच्या व जनतेच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झालेला आहे अशा परिस्थितीमध्ये आपण प्रथम नागरिकांचा विचार केला पाहिजे आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी या काळात अनेक लोकांपर्यंत विविध माध्यमातून आर्थिक सहाय्य मदत पोहोचलेली आहे सदर बाबतीत हा प्रस्ताव अशा परिस्थितीत जनतेवर लागू करणे योग्य होणार नाही सदर टिप्पणीही व्यवस्थित सादर केलेली नाही त्यामुळे या नियमात बदल करू नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे. सर्वसामान्य नागरिकांवर जर आर्थिक भाग येत असेल तर हा विषय तहकुब ठेवावा अशी विनंती करतो.

म.नगरसचिव सदरचा प्रस्ताव हा अवलोकनार्थ महासभेपुढे सादर झालेला आहे शासनामार्फत मनपा गाळे हस्तांतरणाचा शासन आदेश निघाला असून तो सर्वांना अवगत व्हावा यासाठी सदर प्रस्ताव अवलोकनार्थ सादर झालेला आहे.

म.महापौर सदरचा प्रस्ताव हा मनपा मालकीच्या जागा हस्तांतरण संदर्भात शासनामार्फत नवीन नियम केलेले आहे याबाबत शासनाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे व त्या समितीच्या माध्यमातून याबाबत निर्णय होणार आहे सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे. याबाबत आयुक्त महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी.

म.आयुक्त धुळे महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता आहेत ते आपण भाड्याने देतो किंवा जे व्यापारी गाळे आहेत त्यातील मालमत्ता विविध कारणाने हस्तांतरित होतात याबाबत ठरवतांना यापूर्वी अडचणी आलेल्या होत्या त्यामुळे शासनाने सर्व महानगरपालिकासाठी नवीन आदेश पारित केलेले आहेत यात आदेशात शासनामार्फत एक समिती स्थापन केली आहे त्यामध्ये जिल्हाधिकारी,उपनिबंधक व इतर सदस्य आहे सदर समितीमार्फत हस्तांतरणाचे दर भाडे पट्टयांचे दर ठरवण्यात येतील व त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल कोरोना काळात या बाबत कोणतेही काम झालेले नाही परंतु समितीमार्फतजे काही निर्णय होतील ते सभागृहासमोर अवलोकनार्थ ठेवण्यात येतील सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ महासभेपुढे सादर झालेला आहे.

म. महापौर सदर प्रस्तावाची वाचून सभागृहास माहिती देण्यांत आली.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११६ दिनांक ३०/१२/२०२०

महाराष्ट्र शासन अधिसुचना (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम) दि. १३ सप्टेंबर २०१९ (३) मध्ये दर्शविल्यानुसार महानगरपालिकेच्या मालमत्तेचे/भाडेपट्टयाचे नुतनीकरण व हस्तांतरण (१) अशा मालमत्तेच्या मुल्यांकनासाठी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि सहा.जिल्हा निबंधक (मुद्रांक) यांची समिती असेल ही समिती अशा मालमत्तेचे मुल्यांकन महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजार मुल्य निर्धारीत करणे) नियम १९९५ नुसार बाजार मुल्याच्या अनुषंगाने निश्चित करेल. सुधारीत अधिनियमानुसार दि.२२/९/२०२० रोजी समितीची प्रथम मिटींग घेणेत आली. कोरोना काळात या बाबत कोणतेही काम झालेले नाही परंतु समितीमार्फत जे काही निर्णय होतील ते सभागृहासमोर अवलोकनार्थ ठेवण्यात येतील सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ महासभेपुढे सादर झालेला आहे.याबाबत सभागृहास अवगत करण्यांत आले आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ८५ श्री.संत शिरोमणी गुरु रविदास पुतळा उभारणे बाबत फेर ठराव करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

मा. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर श्री.संत शिरोमणी गुरु रविदास पुतळा उभारणेबाबत फेर ठराव करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११७ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीत चर्मकार समाजाचे अराध्य दैवत श्री.संत रविदास यांचा पुतळा उभारणे बाबतचा ठराव नं.104 दि.15/09/2012हा ठराव पुन्हा नव्याने करणे आवश्यक आहे.

तरी धुळे मनपा ठराव नं. 104 दि.15/09/2012 ने देवपूर अंडाकृती बगीच्याच्या पश्चिम बाजूस महान संत श्री. संत शिरोमणी गुरु रविदास यांचा पुतळा उभारणे कामी ठराव करणेत आलेला होता. परंतु सदरचा ठराव होवून सुमारे 8वर्षे झालेला आहे. परंतु या दरम्यान प्रशासनामार्फत कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने सदरचा ठराव हा 1 वर्षपेक्षा जास्त कालावधीचा असल्याने सदर कामी पुन्हा महासभेपुढे मंजुरी घेवून सदर कामाचा नव्याने ठराव करणेसाठी महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपा हद्दीत चर्मकार समाजाचे अराध्य दैवत श्री.संत रविदास यांचा पुतळा देवपूर अंडाकृती बगीच्याच्या पश्चिम बाजूस उभारणेच्या प्रस्तावास फेर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-८६ मोहाडी उपनगर गट नं.2/2 चे जागेत मनपा दवाखान्याजवळ श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे कामी यापूर्वी ठराव पारित करण्यात आलेला आहे शासना निर्देशाप्रमाणे फेर ठराव करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.राजेश पवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

मा. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर मोहाडी उपनगर गट नं.२ / २ चे जागेत मनपा दवाखान्याजवळ श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेबाबत फेर ठराव करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११८ दिनांक ३०/१२/२०२०

शासन निर्णय क्र. पुतळा/ ३०१६/ प्र.क्र. ३०८/२९ दि.०२/०५/२०१७ अन्वये मार्गदर्शक तत्व क्र. २० नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठराव हा १ वर्षापेक्षा जुना असू नये असे सूचित केले नुसार सदर पुतळा उभारणी कामीचा धुळे मनपा ठराव नं. ९२ दि. २१/१२/२०१९ असून सदरचा ठराव हा एक वर्ष होत असल्याने सदरचा ठराव हा नव्याने करणे आवश्यक आहे.

तरी मोहाडी उपनगर भागात गट नं. २/२ जागेत मनपा दवाखान्य जवळ श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे कमीचा ठराव नव्याने करणे कामी मे.महासभेपुढे ठेवणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय निर्णय क्र./पुतळा /३११६/ प्र.क्र.३०८/२९ मंत्रालय मुंबई दि.०२ मे २०१७ चे उचित निर्देशानुसार अटी शर्तीस अधीन राहून मोहाडी उपनगरातील भटाई माता रिक्षा स्टॉप येथे गट नं.२/२ धुळे मनपा दवाखान्या शेजारी राजे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणेच्या कामास फेर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक :-८७ धुळे मनपा हद्दीत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत जुने मालेगाव टाकीसमोर जुन्या जकात नाक्याजवळील जागेत किंवा इतर जागेत निवारा बांधणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संजय पाटील मला या ठिकाणी माहिती हवी आहे आपल्याकडे किती निवारा केंद्र आहेत सदर निवारा केंद्र कोणाच्या ताब्यात आहे.

म.गणेश खोडे धुळे मनपामार्फत शासन अनुदानातून आई एकविरा देवी मंदिर समोरील बगीच्यात केंद्र बांधले असून ते सध्या कार्यरत आहे व त्या ठिकाणी हरी ओम संस्थेला ते चालवण्यासाठी देण्यात आलेले आहे.

म.संजय पाटील:- सदर संस्था जरी नेमलेली आहे तरी सदर संस्था त्यांच्या फायद्यासाठी सदर निवारा केंद्राचा उपयोग करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे आपण त्यावर नियंत्रण आहे का याबाबत आजची परिस्थिती काय याबाबत खुलासा करावा.

म.आयुक्त:- धुळे महानगरपालिका मार्फत शासन अनुदानातून एक निवारा केंद्र आहे त्यांचे देखभाल दुरुस्तीसाठी त्या संस्थेला दिलेले आहे ती संस्था अत्यंत चांगल्या प्रकारे त्या ठिकाणी काम करीत आहे मी स्वत: त्या ठिकाणी वेळोवेळी भेट दिलेली आहे व समक्ष पाहणी केली आहे चांगल्या प्रकारचे जेवण त्याठिकाणी दाखल झालेल्या नागरिक वयोवृद्ध नागरिकांना मिळत असल्याचे मी स्वत: बघितलेले आहे त्या ठिकाणी आणि असणार निवा-याची संख्या मर्यादित स्वरूपाची आहे म्हणून शहरात इतर ठिकाणी शासन निकषानुसार निवारा केंद्र बांधणे गरजेचे आहे व त्यासाठी शासन अनुदान देण्यास तयार आहे फक्त आपल्याला जागेची निवड करावयाची आहे.

म. शितल नवले हा अत्यंत चांगला प्रस्ताव या ठिकाणी सादर झालेला आहे परंतु मालेगाव रोडला पाण्याची टाकी आहे त्याठिकाणी जागा मर्यादित स्वरूपाची आहे ती जागा माझ्या ऑफिस समोर असून मला त्या जागेची माहिती आहे त्यामुळे मला वाटते की बांधकाम विभागाने त्या जागेची फेर पाहणी व तपासणी करावी व आपल्याला आवश्यक असणारी जागा त्या ठिकाणी उपलब्ध आहे का याचा पुनर्विचार करावा.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. मालेगांवरोड येथील जागा मुख्य महामार्गावर तेथे पालिकेच्या माध्यमातून व्यापारी संकुलाची निर्मिती केल्यास मनपास मोठया प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होणार आहे. तसेच निवारा बांधकामासाठी आवश्यक ते क्षेत्रही

त्याठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे सदर जागा व्यापारी संकुलासाठी राखीव ठेवण्यांत येत आहे. त्या जागेऐवजी शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मनपा शाळा क्रं. २ येथे मनपा मालकीची रहिवास क्षेत्र असलेली आवश्यक ती ५००० चौ. फूट जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी हद्दीत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र उभारण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.प्रशासनाने शासन निकष तपासून पुढील उचित कार्यवाही तांतडीने करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर ११९ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहराची लोकसंख्या पाहता निवारा क्षमता कमी आहे.

तरी नवीन निवारा बांधकाम सबंधी महानगरपालिकेच्या नावाची जागा असणे आवश्यक आहे. प्रती व्यक्ती किमान ५० चौ. फुट जागा अपेक्षित आहे. तरी १०० ते १२५ व्यक्तीची क्षमता असणारे शहरी बेघर निवारा बांधकामा सबंधी जागेचा म.महासभेची मंजुरी घेवून उपलब्ध करून द्यावी असे कळविले आहे.

तरी धुळे शहरात मालेगाव रोड दसेरा मैदान जलकुंभाचा बाजूला असलेल्या जागेत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत १०० ते १२५ लाभार्थींची क्षमता असणारे शहरी बेघर निवारा बांधणेसाठी सदर जागा बाबत म.नगररचना विभागाचा अभिप्राय घेणेत आले असून सदर अभिप्रायानुसार जुने मालेगाव टाकीसमोर जुन्या जकात नाक्याजवळील येथे जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी बेघर निवारा बांधणे कामी मे.महासभेची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार मालेगांवरोड येथील जागा मुख्य महामार्गावर तेथे पालिकेच्या माध्यमातून व्यापारी संकुलाची निर्मिती केल्यास मनपास मोठया प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होणार आहे. तसेच निवारा बांधकामासाठी आवश्यक ते क्षेत्रही त्याठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे सदर जागा व्यापारी संकुलासाठी राखीव ठेवण्यांत येत आहे. त्या जागेऐवजी शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मनपा शाळा क्रं. २ येथे मनपा मालकीची रहिवास क्षेत्र असलेली आवश्यक ती ५००० चौ. फूट जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी हद्दीत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र उभारण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.प्रशासनाने शासन निकष तपासून पुढील उचित कार्यवाही तांतडीने करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ८८ धुळे महानगरपालिकेतील दिव्यागांसाठी ५ टक्के राखीव तरतुद खर्च करणे बाबत सुधारीत धोरण ठरविणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले अतिशय चांगला विषय आलेला आहे परंतु यात अजून काही सुधारणा करता येईल का हे पहावे साक्री रोड येथे हनुमान टेकडी जवळ कुष्ठरोग आश्रम आहे त्या ठिकाणी बरेच अपंग नागरिक वास्तव्यास आहेत त्यामुळे त्यांना अपंगत्व आलेले आहे त्यांना या योजनेत बसवता आले तर त्यांचाही विचार करावा व शासनाच्या धोरणानुसार निकष तपासून त्यांच्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी ही विनंती

म. हर्षकुमार रेलन याच अनुषंगाने एक विषय याठिकाणी आलेला आहे यात विशेष शाळेत किंवा मनपा शाळेत एक ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याचा उल्लेख आहे परंतु यात माझे असे म्हणणे आहे की यामध्ये आपण मनपाच्या शाळा विशेष शाळा फक्त घेतलेले आहेत अन्य शाळेतही असे दिव्यांग विद्यार्थी आहेत त्यांचा देखील विचार करावा व त्यांच्यासाठी देखील शिष्यवृत्ती योजना लागू करावी अशी मी विनंती करतो.

म. महापौर कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेत अतिशय चांगल्या सूचना मांडलेल्या आहेत.यांत साक्री रोड येथील कुष्ठरोग आश्रमातील दाखल दिव्यांगासाठी तरतूद व विशेष शाळा व मनपा शाळा व्यतिरिक्त शहरातील अन्य शाळामधील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ देणे हे सूचित केलेले असून प्रशासनाने या दोन्ही सूचनांबाबत शासन निकष तपासुन या साठी आवश्य ती तरतूद करावी व त्यानुसार धुळे शहरातील दिव्यागांसाठी ५ टक्के राखीव तरतुदीतून खर्च करण्यांस कार्यालयीन अहवालात नमूद सुधारीत धोरणानुसार अंमलबजावणी करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२० दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिकेतील दिव्यागांसाठी ५टक्के राखीव तरतुद खर्च करणे बाबत सुधारीत धोरण ठरविणे बाबत नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५च्या शासन निर्णयानुसार १ ते १७ योजना दिव्यागांसाठी राबविण्या बाबत मार्गदर्शन सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार धुळे महानगरपालिका मनपा ठराव क्र.८२ दि.२८नोवहेंबर २०१७ नुसार धुळे शहरातील दिव्यागांसाठी खालील प्रमाणे योजनांचे धोरण ठरविण्यात आले आहे.

अ) अपंग कल्याणकारी योजना

१. इयत्ता ५ वी ते १० वी व इयत्ता ११ वी ते १२ मध्ये शिक्षण घेत असेलेले अंध/अपंग/कर्णबंधीरविदयार्थांना शिष्यवृती देणे

२. अपंग व्यक्तींना एम.एस.सी.आय.टी. टॅली या संगणक प्रशिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती योजना

३. अपंग व्यक्तींच्या मेडिक्लेम पॉलिसीचा प्रिमियम भरण्याबाबत योजना ऐवजी अपंग सहायक योजना

४.अपंग विदयार्थ्यांना वैदयकिय व इंजिनिरींग शिक्षण घेण्यासाठी अर्थसहायय योजना.

५.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाकरीताअर्थसहाय योजना.

ब) अपंग व्यक्तीच्या पुर्नवर्सनासाठी पायाभूत सुविधा

१) अपंग कल्याण केंद्र

२. अपंग विरंगुळा केंद्र

उक्त ठरावानुसार मागील तीन वर्षात आजपावेतो अर्जाव्दारे १८०० दिव्यांगानी इकडील कार्याकडेस नोंदणी करण्यात आलेली आहे. व सदर दिव्यांगाना खालील प्रमाणे सन २०१७-२०१८ ते सन २०१९-२०२० पावेतो आर्थीक व भौतीक खर्च करण्यात आला आहे.

अ.क्र.	सन	आर्थीक एकूण खर्च	भौतीक एकूण लाभ दिलेले दिव्यांग लाभार्थी
१	२०१७-२०१८	७,२७,०००/-	१८२
२	२०१८-२०१९	२३,३६,०००/-	५८४
३	२०१९-२०२०	११,३७,९८०/-	६२८

दिव्याग कल्याण समितीची बैठक दिनांक १४/०७/२०२० रोजी म. आयुक्त सो यांचे दालनात घेण्यात आली होती. सदर बैठकीत म.आयुक्त सो यांनी इतर महानगरपालिकेतून दिव्यागांसाठी ५ टक्के राखीव तरतुद खर्च करण्याबाबत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती मागवून त्यानुसार सुधारीत धोरण महासभेपूढे सादर करणे बाबत निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार इकडील कार्यालयामार्फत जा.क्र./धुमपा/अपंग कल्याण/ ०६ दि. ९/६/२०२० अन्वये, नागपुर,वसई विरार,पिंपरी चिंचवड,नवि मुंबई व पनवेल महानगरपालिकेकडून माहिती मागविण्यात आलेली होती.

सदर पत्राच्या अनुषंगाने नागपूर व पनवेल महानगरपालिकेत दिव्यागांसाठी ५ टक्के राखीव तरतुद खर्च करणे बाबत खालील प्रमाणे दिव्यागांसाठी योजना राबविण्यात येत आहे.

अनेक दिव्यांग व्यक्ती बऱ्याच वेळा दिव्यांगत्वामुळे अथवा बिकट परिस्थितीमुळे स्वत: चे शिक्षण पूर्ण करु शकत नाही किंवा शारिरीक मर्यामुळे नोकरी करु शकत नाही तसेच दिव्यांगाकरीता उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा वेळी एखादे लघू उदयोग सुरु करुन दिव्यांग व्यक्ती स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकता परंतु आर्थीक परिस्थी बिकट असल्यामुळे त्यांना भांडवल उभे करणे शक्य नसते. या कारणास्तव धुळे शहरातील दिव्यांग हा कायम स्वरुपी स्वयंम रोजगार निर्माण होवून त्यांने स्वताचा उदरनिर्वाह स्वत:केला तरच दिव्यांग कल्याण योजनांचे उदिष्टय खऱ्या अर्थाने पूणे होईल यासाठी दिव्यांगांसाठी ५ टक्के राखीव असलेला निधी १०० टक्के खर्च करणे कामी धुळे महानगरपालिकेचे धोरणामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

त्यानुसार नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडील शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण-२०१५/प्र.क्र. ११८/नवि-२० दि.२८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये मार्गदर्शन सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार व सदर शासन निर्यानुसार इतर महानगरपालिकेने अवलंबिवीलेल्या योजनांची माहिती विचारात घेवून धुळे शहरातील दिव्यांगासाठी सदर शासन निर्णयामधील मार्गदर्शन सुचनानुसार लाभ मिळणे कामी सुधारीत धोरण होणे कामी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

दिव्यांग कल्याणकारी योजना

अ) दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी वैयक्तींक लाभाच्या योजना

१. दिव्यांग विदयार्थ्यांना शिष्यवृती देणे बाबत.

योजनेचे स्वरुप - दिव्यांग विदयार्थी स्वत:च्या दिव्यांगत्वावर मात करण्याचा प्रयत्न करुन जिदीने व चिकाटीने शिक्षण/उच्च शिक्षण/ तसेच खेळात प्राविण्य मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या धुळे हदीतील अत्यंत गरजु व होतकरु नि: समर्थ(दिव्यांग) विदयार्थांना शिष्यवृतीचा लाभ देवून त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

धुळे महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या अथवा शासनमान्य विशेश गरजा असलेल्या मुलांकरीता असलेल्या मुलांकरीता विशेष शाळेत इयत्ता १ ते १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेले दिव्यांग विदयार्थांना शिष्यवृती देणे

इयत्ता	इ.१ ली ते ४ थी	इ.५ वी ते ७ वी	इ.८ वी ते १० वी	इ.११ वी ते १२वी	पदवीधर
मासिक रु.	प्रति माहे रु.१००/-	प्रति माहे रु.१५०/	प्रति माहे रु.२००/	प्रति माहे रु.३००/	प्रति माहे रु.४००/
दहा महिन्यासाठी	रु. १०००/-	रु. १५००/-	रु. २०००/-	रु. ३०००/-	रु. ४०००/-

खेळात प्राविण्य मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या विदयार्थांना शिष्यवृती देणे

इतर	राज्य स्तर	राष्टीय स्तर	आंतरराष्टीय स्तर
एक रक्कमी शिष्यवृत्ती	१०,०००/-	१५,०००/	२०,०००/

२) दिव्यांगाच्या गरजेनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय /साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/RTGS) व्दारे जमा करणे.

२.१) दिव्यांग व्यक्तींना वैयक्तीक सहायभूत व तंत्रज्ञान खरेदी करण्याकरीता अर्थसहाय देणे.

नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वावर मात करुन आयुष्य स्वावलंबी बनविण्याकरीता चलनवल साहित्याची नितांत आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील प्रमाणे साधनांचा समावेश आहे, परंतु उत्तम दर्जाचे चलनवलन साहित्य व सहायक उपकरणेआर्थीक दृष्टया दुर्बल दिव्यांगाना परवडत नाहीत. याकरीता उपरोक्त साहित्य खरेदी करण्याकरीता खालील प्रमाणे आर्थीक सहाय्य देणे.

१) अंध व्यक्तींसाठी –

अंधासाठीकाठी,लॅपटॉप/संगणक(जॉससॉफ्टवेर)बेरल नोट वेअर, Commuciaction equipment Braill attachment Telephone Adapted Walkers. बेल लेखन साहित्य ब्रेल, टाईपरायटर टॉकींग टाईपरायटर लार्ज, प्रिंट बुक सहाय्यभुत साधने व उपकरणाकरीता अर्थसहाय करणे.

२) कर्णबंधीर व्यक्तीसाठी

विविध प्रकारची वैयक्तीकश्रवणयंत्रे(बीटीईसह)शैक्षणिक संच संवेदन उपकरणे संगणकासाठीचे सहाय्यभुत उपकरणे

३) अस्थिव्यंग व्यक्तींसाठी

कॅलीपर्स,व्हिलचेअर, तीनचाकी सायकल,स्वयंचलीत तीन चाकी सायकल, कुबडया,कृत्रिम अवयव, प्रोजेक्ट अॅण्ड नील वॉकी ब्रेस, इत्यादी

४) मतिमंद व्यक्तींसाठी

मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य संच (MR Kits) बुध्दीमत्ता चाचणी संच सहाय्यभुत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभुत साधने.

५) बहुविकलांग व्यक्तींसाठी

संबंधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभुत साधने व उपकरणे, सी.पी. चेअर, स्वयंचलीत सायकल व खर्ची संगणक वापरण्यासाठीची साहाय्यभुत साधणे.

६) कुष्ठरोग मुक्ती दिव्यांग व्यक्ती

कुष्ठरोगमुक्त दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व साधने सर्जीकल अॅड करेक्टीव्ह फुटवेअर्स सर्जीकल अप्लांसेस मोबालिटी एंड इत्यादी

उपरोक्त अ.क्र. १ ते ६ केल्याप्रमाणे वैयक्तीक लाभासाठी वरील प्रमाणे साहित्य व इतर दिव्यांग सहाय्यभुत साधनांसाठी कमाल रक्कम रुपये १५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रुपये) पर्यंत अर्थसहाय देणे.

२.२) दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरिता अर्थ सहाय्य योजना.

अनेक दिव्यांग व्यक्ती बऱ्याच वेळा दिव्यांगत्वामुळे अथवा बिकट परिस्थितीमुळे स्वत: चे शिक्षण पूर्ण करु शकत नाही किंवा शारिरीक मर्यामुळे नोकरी करु शकत नाही तसेच

दिव्यांगाकरीता उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा वेळी एखादे लघू उदयोग सुरु करुन दिव्यांग व्यक्ती स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकता परंतु आर्थीक परिस्थी बिकट असल्यामुळे त्यांना भांडवल उभे करणे शक्य नसते. या कारणास्तव धुळे शहरातील दिव्यांग हा कायम स्वरुपी स्वयंम रोजगार निर्माण होवून त्यांने स्वताचा उदरनिर्वाह स्वता करणे, केला तरच दिव्यांग कल्याण योजनांचे उदिष्टय खऱ्या अर्थाने पूणे होईल या कारणास्तव अशा दिव्यांग व्यकतींना स्वयंरोजगाकरिता आर्थीक सहाय्य अंतर्गत प्राप्त अर्जानुसार प्राप्त लाभार्थ्यांस कमाल रु.२५,०००/-(अक्षरी पंचवीस हजार मात्र केवळ) आर्थीक सहाय्य देणे व्यवसायाची नावे- झेरॉक्स सेंटर, पिठ गिरणी, मिरची कांडप, साडी सेंटर, फुटवेअर, मोबाईल स्पेअर पार्ट , किराणा दुकाण, इत्यादी.

३.दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे

धुळे महानगरपालिकेच्या आर्थीक दुष्टया दुर्बल असेलेल्या दिव्यांग नागरीकांना त्यांचे लग्नासाठी / पुढील जीवन सुखी जगण्यासाठी व जीवनाआश्यक वस्तु सामग्री खरेदी करण्यासाठी रु.१५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रुपये केवळ) देणे बाबत. व दिव्यांग व्यक्ती सोबत सुदृढ व्यक्तीने लग्न केल्यास त्या व्यक्तीस महानगरपालिकेकडून सन्मानचिन्ह व नमुद केल्याप्रमाणे मानधन देणे बाबत. तसेच सामुदायीक विवाह योजना राबविणाऱ्या संस्थांना प्रोत्साहनात्मक म्हणून प्रती वधु-वर जोडी करीता अधिकचे रुपये ५०००/-अनुदान देणे बाबत.

४. दिव्यांगांच्या दिव्यांग क्रिडा चित्रकला हस्तकला इ. स्पर्धा आयोजीत करणे.

धुळे महानगरपालिकेच्या हदीतील दिव्यागांना त्यांच्या कला गुणाना वाव मिळण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी धुळे महानगरपालिकेकडून दिव्यांग क्रिडा, चित्रकला, हस्तकला, इ. स्पर्धचे आयोजन करुन विजेत्या स्पर्धकास सन्मान चिन्ह /प्रशस्तीपत्र व रोख रु. ५०००/-, रु ३०००/- व २०००/- या प्रमाणे प्रथम व्दितीय आणि तृतीय बक्षीस म्हणून देवून त्यांचा गौरव करणे बाबत. तसेच स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या दिव्यांग स्पर्धेकास प्रत्येकी रुपये ३००/-प्रोत्साहन उत्तेजनार्थ देणे बाबत.

५.दिव्यांग व्यक्तींना एम.एस.सी. आय.टी.,टॅली या संगणक प्रशिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती योजना

महानगरपालिका हदीतील लाभार्थी विदयार्थी/व्यक्तीने उक्त नमुद संगणकीय प्रशिक्षण एखादया खाजगी संस्थेतून घेतल्यास व सदरचा कोर्स यशस्वी पूर्ण केल्यास व तसेच प्रमाणपत्र सादर केल्यास त्या संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून रक्कम रु. ३०००/- पर्यंत अनुदान देणे बाबत.

६.दिव्यांग व्यक्तींच्या मेडिक्लेम पॉलिसीचा प्रिमियमभरण्याबाबत ऐवजी अपंग सहायक योजना

धुळे महानगरपालिका हदीतील दिव्यांग व्यक्ती बऱ्याच वेळा दिव्यांगत्वामुळे अथवा बिकट परिस्थितीमुळे स्वत: चे शिक्षण पूर्ण करु शकत नाही किंवा शारिरीक मर्यामुळे नोकरी करु शकत नाही तसेच दिव्यांगाकरीता उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे परिणामी दिव्यांगाला स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतांना त्यांना अनेक अडचणी निर्माण होतात त्यामुळे दिव्यांग व्यक्ती यांना त्यांचा गरजा भागविण्यासाठी प्रति दिव्यांग लाभार्थी यांना रु.४०००/- प्रमाणे बेरोजगार भत्ता देणे बाबत.

ब) अपंग व्यक्तीच्या पुर्नवर्सनासाठी पायाभूत सुविधा

1. दिव्यांग कल्याण केंद्र

धुळे शहरातील दिव्यागांना विचाराचे अदान प्रदान करण्यासाठी कायमस्वरुपी व्यासपिठ उपलब्ध करुन देण्यासाठी अत्याधुनिक सर्व सोयीयुक्त दिव्यांग कल्याण केंद्र महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत रक्कम रु.25 लक्ष पर्यंत खर्च करण्यात येईल दिव्यांग कल्याण केंद्रामध्ये दिव्यांगासाठी उपलब्ध असलेली नोकरी, व्यावसायिक संधी बाबत मार्गदर्शन तसेच वेळोवेळी कार्यशाळा घेण्याकरीता कायम स्वरुपीचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे बाबत.

2. दिव्यांग विरंगुळा केंद्र.

धुळे शहरातील दिव्यांग व्यक्तीना त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच त्यांच्यातील कला कौशल्य वाढीस लावण्यासाठी शहरातील महानगरपालिका मालकीच्या जागेवर रक्कम रु.20 लक्ष पर्यंत खर्च करुन दिव्यांग विरंगुळा केंद्र बांधण्यात येईल.

३. दिव्यांगाना प्रवर्गासाठी संवेदना उदयान (Sensory Garden) निर्माण करणे

धुळे शहरातील दिव्यांगासाठी त्यांच्या संवेदना जागृत होणेसाठी व स्पर्शाने त्यांना ज्ञान मिळण्याच्या दृष्टीने संवेदना उदयान (Sensory Garden) उपयुक्त आहे. संवेदना उदयानाची रचना कशी असावी व्यासाठीचे मॉडेल गार्डन नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड,युनिट महाराष्ट्रच्या जागेवर निर्माण केले आहे.हे उदयान पथदर्शिनी मॉडल म्हणून संस्थेने नाशिक येथे उभारले आहे. असे उदयान धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर रक्कम रु.50 लक्ष पर्यंत खर्च करुन संवेदना उदयान(Sensory Garden) निर्माण करणे बाबत.

तरी वरील प्रमाणे सुधारीत धोरण धुळे शहरातील दिव्यांग लाभार्थी यांचेकरीता अंमलबजावणी करणे कामी सदरचा विषय महासभेपुढे ठेवणे बाबत सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेत अतिशय चांगल्या सूचना मांडलेल्या आहेत. यांत साक्री रोड येथील कुष्ठरोग आश्रमातील दाखल दिव्यांगासाठी तरतूद व विशेष शाळा व मनपा शाळा व्यतिरिक्त शहरातील अन्य शाळामधील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ देणे हे सूचित केलेले असून प्रशासनाने या दोन्ही सूचनांबाबत शासन निकष तपासुन या साठी आवश्य ती तरतूद करावी व त्यानुसार धुळे शहरातील दिव्यागांसाठी ५ टक्के राखीव तरतुदीतून खर्च करण्यांस कार्यालयीन अहवालात नमूद सुधारीत धोरणानुसार अंमलबजावणी करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ८९ धुळे महानगरपालिका धुळे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातंर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना कोविड 19 करिता प्रोत्साहनपर रक्कम देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. साबीर शेठ या कर्मचा-यांनी कोरोना काळात रात्रंदिवस सेवा केलेली आहे त्यांच्या सेवेचा विचार करता त्यांना मानधन देणे गरजेचे आहे कृपया हा विषय मंजूर करावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त धुळे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातंर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना एक रक्कम रु.५०००/-मात्र प्रोत्साहन भत्ता देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२१ दिनांक ३०/१२/२०२०

एनयुएचएम अंतर्गत राष्ट्रीय कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया,राष्ट्रीय जननी सुरक्षा योजना, जंतनाशक मोहिम,गरोदर मातांची तपासणी,बालकांचे लसीकरण,प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना,राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम, मिशन इंद्रधनुष्य, मिझल्स रुबेला, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम तसेच इतर सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत राबविले जाते.

एनयुएचएम अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या मानधनात व नियमित काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या मानधनात खुप मोठी तफावत आहे. कोरोना चा वाढता प्रादुर्भाव पाहता एनयुएचएम अंतर्गत कर्मचारी त्यांच्या कर्तव्यावर हजर असुन काम करीत आहे.

बृहन्मुंबई येथील कर्मचारी यांना कोविड-१९ करीता रु.१५०००/-व रु.३००/- प्रति दिवस नुसार प्रोत्साहन भत्ता मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकेत देखील एनयुएचएम अंतर्गत ५९ कर्मचारी, आरसीएच अंतर्गत १२, आरएनटीसीपी अंतर्गत १६ कर्मचारी आरसीएच असे एकुण ८७ कर्मचारी असुन कोविड - १९ करीता सदर कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता रु.१५०००/-किंवा रु.३००/- प्रति दिवस ६महिन्याकरीता) महानगरपालिका आपतकालीन फंडातुन मिळणेबाबत प्रशासकिय मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत मा.आयुक्त सो. यांनी उक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना एक रक्कम रु.५०००/- मात्र प्रोत्साहन भत्ता देणेबाबत मान्यता दिलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त धुळे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातंर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना एक रक्कम रु.५०००/-मात्र प्रोत्साहन भत्ता देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९० आर.सी.एच.अधिकारी/कर्मचारी यांचे 20 टक्के प्रमाणे मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे आर.सी.एचचे नियुक्त कर्मचाऱ्यांचा हा विषय आहे यामध्ये पंधरा कर्मचारी आहेत कोरोना काळात त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काम केले असून या आपत्ती आटोक्यात येण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस प्रयत्न केलेले आहेत त्यांना दरवर्षी २० टक्के मानधन वाढ देण्यात येणार आहे. परंतु त्यांना तीन टप्प्यांमध्ये वाढ दिली पाहिजे. आता ४०%, पुढील वर्षी ३०% व त्या पुढील वर्षी ३०% याप्रमाणे वेतन वाढ देण्यांत यावी. हे कर्मचारी परत फिल्डवर काम करणार आहेत सभागृहास विनंती की त्यांना ४० टक्के वाढ देण्यात यावी व पुढील वाढ टप्प्याटप्प्याने देण्यात यावी.

म. नगरसचिव याबाबत आरोग्य अधिकारी यांनी आत्ताच नवीन सुधारित टिपणी सादर केली आहे त्यात आपल्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी नमूद केलेले आहे.

म.महापौर सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा तसेच कार्यालयीन अहवाल व आरोग्य अधिकारी यांच्या सुधारित आलेल्या टिपणी नुसार सदर मानधनवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२२ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका धुळे आरसीएच ०२ अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मानधन वाढवुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.सदर अधिकारी / कर्मचारी यांनी CCC/DCHC करीता प्रसिध्द झालेल्या जाहिरातीत वैद्यकिय अधिकारी यांचे रु.६००००/- व स्टाफ नर्स यांचे रु.२००००/-प्रमाणे मानधन देण्यात येणार असे नमुद आहे.तरी सर्व कर्मचारी यांना पण इतकाच मानधन देण्यात यावे असे अर्जात मागणी केली आहे.

आरसीएच फेज २ अंतर्गत अधिकारी /कर्मचारी हे सन २००७-०८ पासुन धुळे मनपा धुळे येथेकार्यरत आहे.आर. सी. एच. अंतर्गत कार्यरत आहे. आरसीएच अंतर्गत ०३ वैद्यकिय अधिकारी, २ पीएचएन व ०९ ए एन एम कार्यरत आहेत. अधिकारी व कर्मचारी आरोग्य विभागाअंतर्गत सर्व कार्यक्रम राबवित असतात. सदर कर्तव्य बजावित असतांना अधिकारी /कर्मचारी यांना कायमकर्मचारी यांच्या तुलनेत अत्यंत कमी मानधन देण्यात येत आहे.सदयस्थितीत कोविड १९ आजाराच्या साथीमध्ये देखीलसदर वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी हे रुग्णांच्या संपर्कातील व्यक्तिची तपासणी , घसातील स्त्रावांचे नमुणे घेणे,रुग्णांना संदर्भीत करणे ,सव्हेक्षण करणे इ.कामेकरीता आहेत.सदयस्थितीत कोविड १९ करीता घेतलेल्या कर्मचारी, वैद्यकिय अधिकारी व कायम आस्थापना वरिल कर्मचारी यांच्या पेक्षा त्यांना कमी मानधन देण्यात येत आहे.

संदर्भ क्र.२ नुसार झालेल्या बैठकित आरसीएच अंतर्गत कर्मचारी यांना कायमकर्मचारी यांच्या वेतना इतके मानधन होतेतोपर्यत दरवर्षी २० टक्के मानधनवाढ देण्यात यावी अशी चर्चा झाली त्यानुसार सदर कर्मचारी यांना २० टक्के मानधन दिल्यास खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

नाव	मानधन अ	पदसंख्या ब	२० टक्के मानधन वाढ	वाढीवमानधन फरकेची रक्कम (प्रति माह)	वार्षिक खर्च
वैद्यकिय अधिकारी	रु.२५२००/-	०३	रु.५०४०/-	रु.१५१२०/-	रु.१८१४४०/-
स्टाफ नर्स	रु.१२६००/-	०२	रु.२५२०/-	रु.५०४०/-	रु.६०४८०/-
एएनएम	रु.९०७२/-	०९	रु.१८१४/-	रु.१६३२६	रु.१९५९१२/-
एकुण		१५		रु.३६४८६	रु.४३७८३२/-

उक्त नुसार आरएसीएच अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची २० टक्के मानधन वाढ केल्यास प्रति माह रु.३६४८६व वार्षिक रु.४३७८३२ अतिरिक्त खर्च होणार आहे. त्यानुसार आरसीएच अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना कायमकर्मचारी यांच्या समान वेतन होईपर्यत दरवर्षी २० टक्के मानधनवाढ लागु करण्याच्या व सन २०२०-२१ मध्ये माहे एप्रिल २०२० पासुन २० टक्के मानधन वाढ लागु करण्याच्या मान्यतेस्तव व सदरचा विषय मे.महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्याच्या मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

याबाबत मा. आयुक्त सो यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविले आहे.

* RCHकर्मचा-यांचा समावेशाचा प्रस्ताव मंत्रालयात मंजुरीकरिता सादर करण्यांत आलेला आहे.

*नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने सदर कर्मचा-यांचे मानधनात वाढ करणेची मागणी मान्य करणेस हरकत नाही सध्या 20 टक्के प्रमाणे करावे व दरवर्षी 20 टक्के वाढ देवून कायम अंतर्गत कर्मचा-यांचे वेतनाचे at par येईपर्यत दरवर्षी वाढ द्यावी असे प्रस्तावित आहे.

*सदर वाढ दिल्याने मनपा निधीवर वार्षिक रु.4.37 लाख इतका अतिरिक्त भार पडणार आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल तसेच म.आरोग्याधिकारी यांनी दिनांक 29/12/2020 रोजी दिलेल्या सुधारीत अहवालाचा विचार करुन संदर्भ क्र. 2 व 3 नुसार मा. आयुक्त सो. यांचे समवेत झालेल्या बैठकीत आरसीएच अंतर्गत कार्यरत असलेले कर्मचारी हे कायम आस्थापना कर्मचारी यांच्या प्रमाणेच अनेक वर्षापासून कार्यरत असून त्यांना कायम कर्मचारी यांच्या वेतना इतके मानधन देणे हे समान काम समान वेतन या सामाजिक तत्वानुसार न्यायोचित होईल. याकरिता आरसीएच अंतर्गत कार्यरत असलेले कर्मचारी यांना कायम आस्थापना वरील कर्मचारी यांच्या समान वेतन होण्यासाठी ठराव झाल्याच्या दिनांकापासून कायम आस्थापना वरील कर्मचा-यांना देण्यांत येणारे वेतन व सद्यस्थितीत आर.सी.एच. कर्मचा-यांना देण्यांत येणारे मानधन यातील फरकांच्या 40 टक्के मानधन पहिल्या वर्षी म्हणजे १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या वर्षी देण्यांस तसेच माहे. १ जानेवारी २०२२ ते माहे. ३१ डिसेंबर २०२२ पर्यत ३० % तसेच १ जानेवारी २०२३ ते माहे. ३१ डिसेंबर २०२३ पर्यत ३० % वेतन वाढ देण्याबाबत मान्यता देण्यांत येत आहे. नमूद नुसार तीन वर्षात संबंधित आर.सी.एच.कर्मचा-यांना कायम आस्थापना कर्मचारी एवढे वेतन (समान काम समान वेतन) झाल्यानंतर दरवर्षी कायम आस्थापना कर्मचा-यांनुसार वेतन वाढ लागु करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९१ धुळे महानगरपालिका हददवाढ मध्ये समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांना महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना मानधन वाढ करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. वंदना भामरे सन्मा.महापौर सो.धुळे महानगरपालिकेतील हद्दवाढ गावातील कर्मचा-यांचे मानधन वाढ केल्याने आपले अभिनंदन नुसते मानधन वाढ न करता त्यांना दोन वर्ष झाली. त्यांना कायम करण्यांत यावे.

म. निशा पाटील प्रभाग क्रं. 6 मध्ये रिटेनींग वॉल व शौचालयचा विषय महासभेत घेण्यात यावा.

म. संजय पाटील बाळापूर गावातील सर्व कर्मचारी कायम सेवेत होते. धुळे शहराची हद्दवाढ झाल्यानंतर आमच्या कर्मचा-यांना कायम सेवेत का सामावून घेण्यात आले नाही. आमचे गांव हद्दवाढ झाल्याने मनपा हद्दीत आले. आमच्या गावाचे उत्पन्नआणि खर्च यांचा ताळमेळ करावा आमचे कर्मचारी 5 हजार ते 7 हजार रुपयेमानधनावर काम करतात.आमचे कर्मचारी कायम असतांना त्यांना कोणत्या आधारे मानधनावर समावून घेतले आमची मागणीच होती मानधन वाढ न करता आकृतीबंधात आमच्या कर्मचा-यांना कायम सेवेत सामावून घ्यावे कारण त्यांच्यावर कामाचा बोजा तेवढाच आहे.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या आलेल्या सुचना व कार्यालयीन अहवाल अधिन राहून हद्दवाढ मध्ये समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांना मनपा मधील कर्मचा-याप्रमाणे मानधन वाढ लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सफाई कर्मचा-यांच्या कामाचा कालावधी

कायम सफाई कामगारांप्रमाणे निर्धारीत करण्यांत यावा व सदर कर्मचा-यांचा पद निमित्तीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२३ दिनांक ३०/१२/२०२०

शासन अधिसुचना नगरविकास विभाग दिनांक ५जानेवारी २०१८ अन्वये धुळे महानगरपालिकेची हददवाढ करुन खालील एकुण १० ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला आहे.सदर ग्रामपंचायतीमध्ये वेगवेगळे संवर्गनिहाय कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीत कार्यरत असलेले वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी यांना वेगवेगळे मानधन देण्यात येते. (उदा.वर्ग ३ कर्मचारी यांना रुपये १०,२७५/-,९१४४/-,१०५००/-,८८००/- या प्रमाणे तसेच वर्ग ४ कर्मचारी यांना रुपये ३,०००/-,१००१६/-,७५००/-,४०३५/- याप्रमाणे मानधन आहे.) त्यामुळे एक ग्रामपंचायतीमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचा-यांना कमी मानधन आहे. तसेच दुस-या ग्रामपंचायतीत जास्त मानधनआहे. त्यामुळे ग्रामपंचायती मधील कर्मचारी वारंवार मानधन वाढीबाबत मागणी करीत असतात. तसेच म. सरचिटणीस महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन यांचे दिनांक १४ जानेवारी २०१९ रोजीचे पत्रानुसार उक्त कर्मचा-यांच्या मानधन वाढीबाबत मागणी केलेली आहे. तसेच उक्त कर्मचा-यांनी म. सरकारी कामगार अधिकारी धुळे यांच्याकडे तक्रार केलेली आहे.

सध्यास्थितीत धुळे महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा विभागाकडील मानधना वरील व्हॉलमन वर्ग ४ कर्मचारी यांना रुपये ८०००/- एकत्रीत मानधन देण्यात येते. तसेच संगणक लिपीक वर्ग ३ कर्मचारी यांना महानगरपालिका स्थायी सामिती ठराव क्रमांक १६६ दिनांक ३१/१/२०२० अन्वये एकत्रीत मानधन रुपये १००००/- मात्र इतके करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने ग्रामपंचायती मधील वर्ग ३ कर्मचा-यांमधील ज्या कर्मचा-यांना रुपये १००००/- पेक्षा कमी मानधन आहे. त्यांना रुपये १००००/- मानधन देणे योग्य होईल.

तसेच ग्रामपंचायतीमधील वर्ग ४ कर्मचा-यांमधील ज्या कर्मचा-यांना रुपये ८०००/- पेक्षा कमी मानधन आहे. त्यांना रुपये ८०००/- मानधन देणे योग्य होईल.

तरी ग्रामपंचायती मधील कर्मचा-यांना वरील प्रमाणे मानधनात वाढ केल्यास दरमहा रुपये १९२१७१/- इतकी वाढ होणार आहे.तसेच वार्षीक रुपये २३०६०५२/- इतकी वाढ होणार आहे.

तरी ग्रामपंचायती मधील कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत मुख्य लेखा परीक्षक यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे.मुख्य लेखापरीक्षक यांनी हददवाढीमधील ग्रामपंचायतीमधील कर्मचा-यांचे मानधनात वाढ करणेसाठी शिफारस केलेली आहे.त्याकरिता मा स्थायी सामितीची मान्यता घेणे आवश्यक आहे असे मत दिलेले आहे.

त्यावर मा.आयुक्त सो.यांनी सदर विषय हा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मे. महासभेपुढे ठेवण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदरचा विषय मे महासभेपुढे सादर झालेला आहे. तसेच कार्यालयीन अधिक्षक यांनी दिलेल्या सुधारीत टिपणीत नमूद प्रमाणे धुळे महानगरपालिकेतील हद्दवाढ मध्ये समाविष्ट झालेल्या ग्रामपंचातीमधील वर्ग ३ कर्मचा-यांनामधील ज्या कर्मचा-यांना रु.१००००/-पेक्षा कमी मानधन आहे. त्यांना रु. १००००/-मानधन देण्यांबाबत व ग्रामपंचायतीमधील वर्ग ४ कर्मचा-यांनामधील ज्या कर्मचा-यांना रुपये ८०००/- पेक्षा कमी मानधन आहे त्यांना रु. ८०००/-मानधन देण्याबाबत प्रस्ताव मे. मे. महासभेपुढे सादर करण्यांत आलेला होता. त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीमधील ज्या सफाई कामगारांना रुपये ६०००/- पेक्षा कमी मानधन आहे. त्यांना रुपये ६०००/- मानधन देण्याबाबत सूचित करण्यांत येत आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व चर्चेअंती कार्यालयीन अहवालात नमूद ज्यांना १००००/- पेक्षा कमी मानधन आहे त्यांना रु.१००००/-मात्र तसेच वर्ग ४ चे ज्या कर्मचा-यांना ८०००/- पेक्षा कमी मानधन आहे त्यांना रु. ८०००/- व लागु करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सफाई कर्मचा-यांच्या कामाचा कालावधी कायम सफाई कामगारांप्रमाणे निर्धारीत करण्यांत यावा व सदर कर्मचा-यांचा पद निमित्तीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९२ मे न्यायालयाचे आदेशानुसार व अन्य आदेशानुसार मंजुर नसलेल्या पदावर कार्यरत कर्मचा-यांना मंजुर आस्थापनेवरील रिक्त पदांवर सामावुन घेणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे महानगरपालिकेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे.हा विषय प्रशासनामार्फत सादर करण्यांत आला आहे. तो मंजूर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२४ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिकेत विविध विभागात विविध पदावर मे न्यायालयाचे व अन्य आदेशानुसार मंजुर नसलेल्या पदावर सुमारे ३०ते३२वर्षापासून अनेक कर्मचारी कार्यरत आहेत सदर कर्मचारी सद्यस्थितीत ५ वे वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीवर वेतन व भत्ते घेत आहेत.

उक्त कर्मचारी मे.न्यायालयाचे आदेशानुसार कायम कर्मचा-यांच्या सेवा सवलती चा लाभ घेण्यापूर्वी रोजंदारी सेवेत होते.शासनाने दि १०/०३/१९९३ पूर्वीचे रोजंदारीवरील कर्मचा-यांना एक विशेष बाब म्हणुन कायम सेवेत सामावून घेणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तसेच काही कर्मचारी पदाधिकारी / अधिकारी यांचे आदेशानुसार थेटनियुक्त झाले असून ते सुध्दा वेतनश्रेणीवर वेतन व भत्ते घेत आहेत.

मे.न्यायालयाचे व अन्य आदेशानुसार मंजुर नसलेल्या पदावर कार्यरत कर्मचा-यांना सेवा जेष्ठतेनुसार मंजुर रिक्त पदावर पूर्वलक्षीप्रभावाने सामावून घेवून अखंडीत सेवा धरणे बाबत धुळे महानगरपालिका ठराव क्र २१२ दि.१७/०९/२०१० अन्वये मान्यता दिली असून सदर ठरावानुसार काही कर्मचा-यांना मंजुर रिक्त पदावर सामावून घेवून आर्थीक लाभासह त्यांची सेवा पूर्वलक्षीप्रभावाने अखंडीत धरण्यात आली आहे.

मे.न्यायालयाचे आदेशानुसार कार्यरत कर्मचा-यांना मे.न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी करताना मनपाने मे न्यायालयाचे आदेशात नमुद दिनांकापासून सेवा अखंडीत धरली आहे.सदर कर्मचारी सुमारे ३० ते ३२ वर्षापासून मंजूर नसलेल्या पदावर कार्यरत असल्याने त्यांना मंजुर वरिक्त पदावर सामावून घेणे आवश्यक व क्रमप्राप्त ठरत आहे.

मे.औदयोगिक न्यायालयाचे आदेशानुसार कार्यरत कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगाचा लाभ दयावा लागल्यास महानगरपालिकेला करोडो रुपयाचे आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. त्यामुळे संबधित कर्मचाऱ्यांकडुन मागिल आर्थिक फरक सोडण्याच्या अटीवर समावेशन करुन त्यांची सेवा पुर्वलक्षी प्रभावाने धरण्यास हरकत नसावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल.परंतु कायम नेमणुकांच्या बाबत असा अधिकार कलम ५१ (४) अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल असे स्पष्ट नमूद आहे.

धुळे महानगरपालिकेत मे.न्यायालयाचे व अन्य आदेशानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांना यापुर्वी धुळे महानगरपालिका ठराव क्र २१२ दि.१७/०९/२०१० अन्वये धुळे महानगरपालिकेत मंजुर व रिक्त असलेल्या पदावर सेवा जेष्ठतेनुसार सामावून घेवून त्यांची सेवा पुर्वलक्षी प्रभावाने धरण्यास मान्यता दिली आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेत मे.न्यायालयाचे आदेशानुसार व अन्यआदेशानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या ११६ आहे त्यामध्ये मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या ४ असुन मे.औद्योगीक /कामगार न्यायालयाचे आदेशानुसार सद्यस्थितीत कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या ८२ आहे व अन्य आदेशानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या २८ आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्तावानुसार मे.औद्योगिक/कामगार न्यायालयाचे आदेशा नुसार कार्यरत८२कर्मचाऱ्यांचे प्रकरणी महानगरपालिका प्रशासना तर्फे मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी मे.उच्च न्यायालय जो निर्णय देईल त्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही करावी.तसेच २८ कर्मचाऱ्यांचे प्रकरणी त्याची मुळ नियुक्ती व सेवा कालावधी 82 कर्मचा-यांप्रमाणे असून 28 कर्मचा-यांनी न्यायालयांत अथवा कुठल्याही सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागितलेली नाही तथापि मनपा सेवेमध्ये स्थाई सेवेत समाविष्ठ करणेबाबत त्यांनी सतत विनंती व पाठपुरावा केलेला आहे.त्यामुळे 82 कर्मचा-यांच्या बाबतीत घेतला जाणारा निर्णय नैसर्गिक न्यायाच्या व फायदेशीर दृष्टीने सुध्दा 28 कर्मचा-यांनालागू करणे हे क्रमप्राप्त आहे व मनपाचे हिताचे सुध्दा आहे. ८२ कर्मचाऱ्यांचे प्रकरणी मे.उच्च न्यायालय जो निर्णय देईलतो या २८ कर्मचाऱ्यांचे प्रकरणी लागू राहिल.सदर ठरावाची कार्यवाही करतांना प्रशासनाने प्रशासकीय बाबी(बिंदु नामावली, शैक्षणिक पात्रता इ.बाबी) तपासून धुळे महानगरपालिकेत मे.न्यायालयाचे व अन्य आदेशानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांना धुळे महानगरपालिकेतमंजुर व रिक्त असलेल्या पदावर सेवाजेष्ठतेनुसार सामावून घेवून त्यांची सेवा पुर्वलक्षी प्रभावाने धरण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.सदर ठरावाचा लाभ केवळ सद्यस्थितीत मे.न्यायालयाचे आदेशानुसार कार्यरत ८६ व अन्य आदेशानुसार मंजूर नसलेल्या पदावर (म्यु.पल) फंडातील कार्यरत २८ कर्मचाऱ्यांना देण्यात यावा. प्रस्तुत प्रकरणी मे.न्यायालयाचे आदेशानुसार सेवा पुर्वलक्षी प्रभावाने धरावी लागत असल्यास त्यांना मागील कोणताही फरक देय होणार नाही त्याबाबत प्रशासनाने संबंधितांकडून तसे बंधपत्र लिहून घेण्यात यावे.सदर प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९३ श्री. शेख अब्दुल वाहिद मोहम्मद इब्राहिम,उपशिक्षक न.प. उर्दु मुलांची शाळा क्र४चाळीसगांव जि.जळगांव कडून महानगरपालिका शिक्षण मंडळ, धुळे यांचे एक तर्फी आंतर जिल्हा बदली होणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.आयुक्त हा विषय अशा पध्दतीने आला आहे. उर्दू शाळा आहे एकतर्फी बदली बाबत तसा जी.आर. आहे. आपण जी वेटींग लिस्ट ची यादी तयार केली आहे. त्यात त्यांचे नांव राहील.

म. खान मो. साबीर यादीतील सिनॅरिटी नाव डावलून त्यांना पुढे केले आहे.

म. अमीन पटेल विषयाला मंजूरी दया. सदर शाळेत समायोजनासाठी जागा असेल तर विषयाला मंजुरी दया.

म.उमेर शव्वाल अन्सारी 14 लोकांची यादी आहे त्यात 1 पात्र आहे.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व सुचनेनुसार सदर प्रस्ताव हा मनपा शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील असून शासन निर्णय व शिक्षण विभागाचे आदेश लक्षांत घेवून प्रस्तावाबाबत उचित कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२५ दिनांक ३०/१२/२०२०

श्री. शेख अब्दुल वाहिद मोहम्मद इब्राहिम उपशिक्षक, उर्दु मनपा शाळा क्र. १, चाळीसगांव जि. जळगांव यांनी या कार्यालयात एकतर्फी बदली होणेबाबतचा विनंती अर्ज सादर केला होता. सदर प्रस्ताव म. आयुक्त सा◌ो. मनपा धुळे यांच्याकडे अवलोकनार्थ २६/०२/२०१६ रोजी सादर केल्यानंतर महोदयांनी या प्रस्तावाबरोबरच असे एकूण ३१ प्रस्तावातील उमेदवारांचे समुपदेशन कार्यशाळा घेण्यात आली. याबाबत उपस्थित शिक्षकांना व्यक्तिगत समुपदेशन घेऊन तद्नंतर सामुहिक समुपदेशनाची प्रक्रिया म.आयुक्तांमार्फत राबविण्यात आली. त्यानुसार त्यामध्ये १९ उमेदवारांची पात्रता यादी तयार करण्यात आली होती त्यात उर्दू माध्यमाचे १४ शिक्षक, मराठी माध्यमाचे ५ शिक्षक असे एकूण १९ शिक्षक पात्र होते. सदर पात्रता यादी म. शिक्षण उपसंचालक कार्यालय नाशिक येथे मंजूरी साठी प्रस्तावित आहे. या यादीमध्ये श्री. शेख अब्दुल वाहिद मोहम्मद इब्राहिम उपशिक्षक उर्दु मनपा शाळा क्र. १, चाळीसगांव जि. जळगांव यांना अपात्र करण्यात आले. त्यामुळे सदर उमेदवाराचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला नसून याबाबत म. शिक्षण उपसंचालक कार्यालय यांनी सदर उमेदवाराचा पात्रतेसाठी प्रस्ताव कार्यालयात सादर करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. तसेच संबंधित शिक्षकांने दि.२२/१०/२०२० च्या पत्रानुसार धुळे म.न.पा.शिक्षण मंडळाने ठराव करून सदरचा प्रस्ताव मा.शिक्षण उपसंचालक कार्यालय यांच्याकडे सादर करावा अशी विनंती केलेली आहे.

शासनाने सन २०१९-२०,२०२०-२१ च्या संचमान्यतेला पुढील आदेश येईपर्यंत स्थगित देण्यात आलेली असल्याने सन २०१८-१९ ची संचमान्यता ग्राहय धरण्यात आलेली असून त्यानुसार उर्दू माध्यमाच्या १ शिक्षक अतिरिक्त दिसून येत होता. परंतु उर्दू माध्यमाच्या २ शिक्षक अंतरजिल्हा बदली झाली असून १ शिक्षक नियत वयोमानानुसार दि.३१/५/२०२० रोजी सेवानिवृत्त झाला व १ शिक्षक दि. ३१/१०/२०२० रोजी स्वेच्छानिवृत्तीमुळे सेवानिवृत्त झाले आहे असे एकूण ४ जागा रिक्त आहेत. १ शिक्षकाचा कालावधी परीक्षावधीन (३ वर्षाचा) पूर्ण झाला असून त्यांना सेवासातत्य देणे पण गरजेचे आहे. तसेच एक शिक्षक पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत शिरपूर न.पा.शिक्षण मंडळ मधून म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे येथे येण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यामुळे सद्यस्थितीत २ पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे उर्दू माध्यमाची यापूर्वीची १४ उर्दू शिक्षकांची समायोजनाची प्रतिक्षा यादी प्रस्तावित आहे.

तरी श्री. शेख अब्दुल वाहिद मोहम्मद इब्राहिम, म.न.पा. उर्दु मुलांची शाळा क्र.१, चाळीसगांव जि.जळगांव यांना म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे येथे येण्यासाठी शिक्षण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र,ठरावासह प्रस्ताव मा.शिक्षण उपसंचालक सा.नाशिक यांच्याकडे सादर करावयाचे असल्याने धुळे शिक्षण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र,ठराव मिळणे बाबत महासभेत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व सुचनेनुसार सदर प्रस्ताव हा मनपा शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील असून शासन निर्णय व शिक्षण विभागाचे आदेश लक्षांत घेवून प्रस्तावाबाबत उचित कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९४ म.न.पा.शाळा क्रं.९, १४ व २५ धुळे मधील इंग्रजी माध्यमाच्या ज्यु. के. जी. व सिनियर के जी विभागात कार्यरत शिक्षिकांच्या पद मान्यता व आर्थिक तरतुदीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. अमोल मासुळे हा अतिशय महत्वाचा विषय घेण्यात आला आहे. आपल्या मनपाच्या शाळा क्रं. 9,14,25 या ठिकाणी सामान्य कटष्टरी नागरीकांचे पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेत कमी पैशात शिक्षण देण्यांचा प्रयत्न करीत आहे. महापौर सो. 2012- 2020 या आठ वर्षाच्या कालावधीत 20- 25 शिक्षक ज्ञान देण्यांचे कार्य करीत आहे. मनपाची शैक्षणिक गुणवत्ता वाढावयाची असेल तर भविष्यात कमी पैशात आपल्या येणा-या पिढीला चांगल्या प्रकारे ज्ञान देईल त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ते 7 शिक्षिका महापौर सो. तुमच्याकडे येवून गेले आपल्या प्रशासनाने देखील मान्यतेचा प्रस्ताव पाठविला आहे.पुन्हा या विषयावर चर्चा करुन हा विषय शासनाकडे पाठवावा.

म. हर्षकुमार रेलन या विषयाच्या टिपणीमध्ये मनपा प्रशासनातर्फे कमीत कमी 6 वेळा असे लिहले आहे की बेकायदेशीर हा विषय आपल्याकडे आला आहे. कारण शिक्षकांना मानधन दयावयाचे आहे. कारण हे इंग्रजी माध्यम शिकवतात कारण इंग्रजी ही काळाची गरज आहे. या बाबत अजून शाळा उघावयास पाहिजे इंग्रजी माध्यम ही जगाला जोडणारी भाषा आहे. मराठी भाषेकडे आपल काही दुर्लक्ष झाले आहे.असे मला वाटते. हा विषय आहे मानधन देण्याबाबतचा तेव्हाते लाक आले होते. आम्ही त्या शाळेला भेट दिली शिक्षकही चांगल्या प्रकारे शिकतात विद्यार्थी संख्याही चांगली आहे परंतु हा जो प्रश्न आहे की 7- 8 वर्षापासून त्यांना मानधन दिलेले नाही. त्यांच्या प्रशसनानें अशी टिपणी टाकली आहे आयुक्त साहेबानी त्यांना सांगितले आहे की त्या शाळा बंद करा तरी त्यांनी स्वत:च्या रिक्सवर शाळा सुरु ठेवली आहे. ते दर वेळेस येतात मोर्च काढतात त्या ऐवजी पद मंजूर का करत नाही मला एवढीच माहिती द्या की पद मंजूर नसेल तर त्यांना मानधन देऊ शकतो का मानधन देण्याबाबत माझा आक्षेप नाही शासनाने पदे नाकारली त्यांचे कारणे काय आहे.

म.प्रशासन अधिकारी आपण त्यांचा पुन्हा पाठ पुरावा केला नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विनाअनुदानित असतात त्यामुळे त्यांना कुठल्याही ग्रॅड दिली जात नाही सदरचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला आहे ही २४ पदे आहेत परंतु आज पर्यंत मंजुरी मिळाली नाही देशमुख साहेब यांनी त्या शाळा बंद करण्याचे आदेश दिले होते तात्कालीन प्रशासन अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांना शाळा बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या परंतु शाळा बंद झाल्या नाही शाळा अद्याप सुरू आहेत एप्रिल पर्यंत त्यांचा पगार आपल्या स्तरावर दिला आहे ही जी पदे आहेत ती सर्व मनपा करीत आहेत भविष्यात काही अडचण येऊ नये म्हणून नगरविकास विभागाकडून प्रस्ताव सादर केला आहे २०१२ नंतर कुठल्याही माध्यमाची शाळा असो विनाअनुदान तत्त्वावर सुरू आहे

म. शितल नवले इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा अनुदानित आहे एक धुळेचे कॉन्व्हेंट व नाशिकची इंग्रजी माध्यमाची शाळा

संजय पाटील- आपण त्यांना किती मानधन देता माझ्या नगरसेवक मानधना मधून वर्ग करण्यात यावे पण त्या शाळा बंद करू नका

अमीन पटेल- दहा हजार रुपयात कोणाचे घर चालत नाही त्यापेक्षा त्यांना जास्त मानधन देण्यात यावे.

म. महापौर मी तुमच अभिनंदन करतो श्री. संदी महाले हे शिक्षण मंडळाचे सभापती असतांना बरेच वर्ष गरीब विद्यार्थ्यांना गणवेश ,वहया, नास्ता त्यांच्या माध्यमातून देत होते. बरेच वर्ष त्यांनी स्वखर्चाने शिक्षकांना पगार दिला.कालांतराने कल्पनाकाकू महाले महापौर झाल्यानंतर हा विष्य विषय पटलावर आला होता. त्यावेळेस देशमुख साहेब होते मी त्यावेळी चर्चा केली खरच काही गोष्टी अशा असतात शिक्षण मंडळाच्या ज्याही शाळा आहेत त्यात विद्यार्थी नाही ही सर्व परिस्थिती पाहता ही एक शाळा धुळे शहरातील ज्या ठिकाणी गरीब कष्टकरी हाकेच्या अंतरावर आमचे जुने धुळे आहे मच्छीबाजार, माधवपूरा आहे जो स्लम एरिया आहे झोपडपट्टी आहे यांचा लाभ तिथे होतो. आम्ही जेव्हा तिथे कार्यक्रमासाठी गेलो त्यावेळेस गरीबांचे मुले इंग्रजी मध्ये भाषण देतात त्यावेळेस असे वाटते की, मनपाच्या माध्यमातून आज चांगले काम झालेले आहे. आणि धुळे शहराच्या नागरीकांच्या दृष्टीकोनात मनपा ही नागरीकांना सुविधा देण्यासाठी आहे मनपा कर घेते शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक मनपा प्रॉपर्टी धारक हे मनपाचे शेअर होल्डर आहे. त्या दृष्टीकोनातून आपण हया शहरातील गोरगरीब कष्टकरी जनतेच्या मुलांच शिक्षण व भविष्य उज्वल होण्यासाठी असा निर्णय प्रशासनाने कायदा व व्यवहार यांची सांगड घालून सोयीनुसार माझ्या कार्यकाळात हया शिक्षकांना महानगरपालिकेच्या माध्यमातून मानधन देऊन आणि उर्वरीत त्यांच्या काही मागण्या असेल त्या मान्य करण्या आणि ज्या भागात गोरगरीब कष्टकरी जनतेचे मुल असतील अशा भागात शाळा सुरु कराव्या हा सर्व विचार करुन विषयाला मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२६ दिनांक ३०/१२/२०२०

महानगरपालिका शिक्षण मंडळ,धुळे यांचे कार्यक्षेत्रात सुरु असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या ज्यु. केजी./सिनि केजी व १ ते ४ इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळेंमधील शिक्षकांच्या पद मान्यता व आर्थिक तरतुद मंजुरीबाबत महासभेत पुरक टिपणी सविनय सादर करीत आहे.

म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळेने विशेष ठराव करुन धुळे शहरात कार्यरत असणाऱ्या मराठी /उर्दू शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचे ज्यु.केजी./सिनि.केजी व प्राथमिक विभागात १ ते ४ वर्ग सुरु करणेबाबत दि. १३/४/२०१२ ते ८/२/२०१२ च्या विशेष ठरावान्वये मान्यता प्रदान करणेत आली होती. सदर ठराव महासभेत मंजुरीसाठी सविनय सादर करणेत आला व या ठरावास ठराव क्रं.२५ दि. १५/५/२०१४ रोजी महासभेने मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.

मान्यता प्रदानानंतर यासर्व शाळा नियमित सुरु असताना महानगरपालिका धुळे यांनी ज्यु.केजी.मध्ये कार्यरत व १ ते ४ वर्गांना शिकवित असलेल्या २४ शिक्षिकांसहित मान्यता धुळे महानगरपालिका ठराव क्रं.३४ दि.२०/२/२०१७ अन्वये ठराव पारित करण्यात आलेला आहे.

तद्नंतर सदर पदांना मंजुरीबाबत म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे व म.न.पा.स्तरावरून मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्याकडे वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्या प्रस्तावास (पदांना) मंजुरी न मिळाल्याने तत्कालीन आयुक्त सो.धुळे म.न.पा.धुळे यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून दि. ०१/११/२०१७ पासून ते पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रस्तावातील त्यावेळी कार्यरत असलेल्या

शिक्षिकांना मानधन देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे मात्र देय केलेले मानधन म्हणजे या शिक्षिकांच्या नियुक्तीस संमती आहे असे मानले जाणार नाही असे सुचित केले होते. सदर पदांना एप्रिल २०१८अखेर पर्यंत शासनाने पदांना मंजुरी दिली नाही तर भविष्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे प्रशासन अधिकारी यांनी हंगामी शैक्षणिक वर्षापासून म्हणजे सन २०१८-१९ पासून विद्यार्थ्यांना अन्य शाळेमध्ये प्रवेशासाठी कळविण्याची दक्षता घ्यावी असे सूचना केली होती.

शाळा क्रं.९,१४ व २५ हया चालू असलेल्या शाळाची सदयस्थिती

१) शाळा क्रं.९ - मध्ये ज्यु.केजी. ५० व सिनि.केजी.ची ९० असे एकूण १४० व इ.१ ते ४ ची संख्या १५६ आहे. शिक्षक ८ आहेत.

२) शाळा क्रं.१४ - मध्ये ज्यु.केजी.१७ व सिनि.केजी ७ असे एकूण २४ व इ.१ ते ४ ची संख्या १८ आहे. शिक्षक २ आहेत.

३) शाळा क्रं.२५ - मध्ये ज्यु.केजी.६५ व सिनि.केजी ५० असे एकूण व इ.१ ते ४ ची संख्या १०४ आहे. शिक्षक ४ आहेत.

तत्कालिन मा.आयुक्त सो.,यांनी दि.२६/१२/२०१७ च्या मंजूर टिपणीनुसार दि.०६/०६/२०१८ च्या आदेशान्वये शाळा बंद करण्याचे आदेशित करण्यात आले होते. शाळा क्रं.३ यांनी शाळा बंद केली, शाळा क्रं.९,१४ व २५ हया शाळेतील शिक्षकांनी आदेशाचे पालन न करता शाळा चालू ठेवल्या आहे.त्या शाळा सुरु करणे विषयी आपले मंजुरी आदेश आवश्यक आहे असे मत आहे.

मंजुरी आदेश देतांना खालील बाबींवर विचार होणे आवश्यक आहे असे वाटते.

१) कार्यरत शिक्षकांची भरती नियमानुसार करण्यात आलेली नाही. त्यांना या कार्यालयाकडून अथवा म.न.पा.धुळे कडून नेमणूक आदेश देण्यातआलेले नाही.सदर शिक्षक हे लोक प्रतिनिधींच्या तोंडी आदेशान्वये कार्यरत आहे.

२) १ मे २०१८ पासून सदर शाळेवर काम करीत असलेल्या शिक्षकांना मानधन म.न.पा. धुळेमार्फत देय राहील.

३) विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय पुस्तके तसेच शालेय साहित्य व इतर वेतनेत्तर खर्चाचा आर्थिक भार म.न.पा.धुळेस करावा लागेल.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाने परवानगी दिली असली तरी कोणत्याही प्रकारचे वेतन अनुदान व वेतनेत्तर अनुदान उपलब्ध होणार नाही याचा संपूर्ण भार म.न.पा. धुळे यांचेवर राहील.

या सर्व बाबींचा विचार करता या शाळा आज अखेर म.न.पा.शाळा क्रं.९,१४,२५ या शाळा अनधिकृतपणे सुरु असल्याचे दिसते.

सद्यस्थितीत ज्यु.केजी/सिनि.केजी व इ.१ते ४ शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षिकांच्या पदाला मान्यता देण्याचे अधिकार महासभा म.न.पा.स आहे. सद्यस्थितीत ज्यु.केजी./ सिनि. के.जी. व इ.१ ते४वर्गास अध्यापन करणाऱ्या १४ शिक्षिका कार्यरत आहेत.RTE अधिनियमा नुसार कायम विना अनुदान तत्वावर मंजुरी मिळालेल्या या शाळा त्यामधील सोयी सवलती तद्अनुषंगिक साधनांचा पुरवठा उचित शालेय वातावरण व गुणवत्ता याबाबी १००% परिपूर्णत:करणेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची असल्याने विविध कालावधीत सदर कार्यवाही परिपूर्ण करणे गरजेचे आहे असे मत आहे. ही बाब विचारात घेऊन इंग्रजी

माध्यमाच्या क्षेत्रात शिक्षण मंडळाने केलेल्या या विशेष कार्यास पाठबळ दिल्यास धुळे मनपा चे एक वेगळे कार्य जन सामान्यास समजेल. पद मंजुरीनंतर संबंधित शिक्षिकेंच्या जागा महानगरपालिका धुळे आस्थापनेवरील असल्याने नियुक्तीबाबत रितसर व विहीत कामकाज मनपा धुळे आस्थापना स्तरावर करण्यात येईल.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाने परवानगी दिली असली तरी कोणत्याही प्रकारचे वेतन अनुदान व वेतनेत्तर अनुदान उपलब्ध होणार नाही याचा संपूर्ण भार म.न.पा. धुळे याच्यावर राहील.

वरील मुद्यांच्या अनुषंगाने शिक्षिकांचे १०० % वेतन / मानधन / वेतनेत्तर खर्च हे धुळे मनपा धुळे यांनी अदा करावयाचे आहे. वरील बाबी विशेष धोरणात्मक असल्याने महासभेत सदर विषय मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाने मान्यता दिलेली आहे. तथापी पदाना अद्यापावेतो मान्यता नाही. पदाना मान्यता मिळेपावेतो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शाळा बंद ठेवू शकत नाही. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या म.न.पा. शाळा क्रं. ९,१४,२५ मधील कार्यरत शिक्षकांना महानगरपालिका शिक्षण मंडळ, धुळे यांचे कार्यक्षेत्रात सुरु असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या ज्यु. केजी. / सिनि केजी व १ ते ४ इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळेंमधील शिक्षकांच्या पद मान्यता व आर्थिक तरतुद मंजुरीबाबत खालील अटी शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहें.

१) माहे जून २०१८ पासून पुर्वलक्षी प्रभवाने इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.
२) माहे जुन २०१८ पासून कार्यरत असणा-या शिक्षकांना मनपा स्तरावरून मानधन देय राहील.
३) इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांना जुन २०१८ पासून ८०००/- रू. प्रति महा. मानधन देण्यास व ५००/- प्रति वर्गाला स्टेशनरी खर्च देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
४) सदर इंग्रजी माध्यमाच्या कार्यरत शिक्षकांना जून २०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मानधन देण्यांस मान्यता देणेत येत आहे.
५) सदर पदांचा समावेशाचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यात आलेला आहे. पद मान्यतेनंतर शासन नियमाप्रमाणे भरती प्रक्रिया राबविण्यांत यावी व यात कार्यरत शिक्षकांना प्राधान्याने सामावून घेणेबाबत कार्यवाही करावी.
६) कार्यरत शिक्षिकांना ६ महिने कालावधीरीता नियुक्त्या दिल्यानंतर त्यांची सेवा खंडीत केली जाईल. पुन्हा शासकीय विहित कार्यध्दतीनुसार नवीन नियुक्ती आदेश देण्यात यावा.
७) सदर शिक्षकांना मानधन व इतर अनुषंगिक खर्च मनपा निधी अंतर्गत करणेस मान्यता देण्यांत येत आहे.
८) कार्यरत शिक्षक सेवेचा हक्क सांगणार नाहीत याबाबत १०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र दाखल करावे लागेल.पुढील काळात काही तांत्रिक बाबी न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास इंग्रजी माध्यमाच्या शाळा शिक्षकांची सेवा तात्काळ संपुष्टात करण्यांत येईल.

९) इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांचे नेमणूक झाल्यानंतर त्यांना धुळे मनपा महासभेच्या ठरावानुसार मानधन अदा करण्यात यावे. मानधन अदा करतांना संबंधित शिक्षकांच्या बॅंक खात्यात धुळे मनपा आस्थापनामार्फत मानधन वर्ग करावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९५ मा. महापौर सो.यांच्या पत्रानुसार नगांवबारी चौफुली येथे उडडाण पुलाच्या खाली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेसाठी तत्वता:मान्यता देणेबाबत तसेच मनोहर चित्रमंदिर समोरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धकृती पुतळा पुर्णाकृती करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सर्वात महत्त्वाचा विषय असा आहे की शासनाच्या धोरणानुसार मनपाच्या आवारात किंवा शासकीय इमारतीच्या फार अंगणात त्या जागेत कुठलीही पुतळे उभारण्यात शासनाची मनाई आहे प्रथमच या कायद्याचे पालन करून मनपाच्या आवारात किंवा शासनाच्या धोरणानुसार काटेकोर पालन करून तसेच शासनाचे कुठलेही आदेश न डावलता धुळे शहरांमध्ये असा आहे की एक वेळ वातावरण गरम झाले होते नगावबारी येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवला तिथे वातावरण तापत असताना पोलिस प्रशासन वगैरे व शहराचे खासदार माननीय सुभाष भामरे बीजेपी चे जिल्हाध्यक्ष अनु अग्रवाल आपले सर्व नगरसेवक तिथे उपस्थित असताना लागला त्यावेळेस तिथे जी मागणी झाली त्या अनुषंगाने हा पुतळा उभारण्यास मान्यता देत आहे जागाही मनपाच्या मालकीची असल्याने हा ठराव आपण करीत आहोत त्याप्रमाणे धुळे शहरांमध्ये बऱ्याच वर्षापासून जो मुख्य चौक आहे मनोज चित्रमंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा तिथे आहे तिथे दोन रोड एकत्र येतात चाळीसगाव रोड व मालेगाव रोड या रस्त्याने गावातले नागरिक येतात तिथे समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि अर्धपुतळा आहे. त्यावेळेस आम्ही तिथे कार्यक्रमाला जातो त्यावेळी दरवर्षी अशी मागणी होते की तो पुतळा छोटा आहे तर तो पूर्णाकृती पुतळा बसवावा अमळनेर शहरात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसविला आहे आपल्याला पण शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा या ठिकाणी बसवायचा आहे या महासभेत सर्वात महत्त्वाचं धोरण मनपाच्या आवारात किंवा शासकीय इमारतीच्या आवारात यापुढे कोणताही पुतळा उभारु नये असे शासनाचे धोरण व निर्णय असल्याने शासनाच्या धोरणानुसार यापुढे प्रशासनाने काटेकोर पालन करावे.

म. शितल नवले मनपा म्हणून टाकीजवळील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासाठी पुढच्या वर्षी तरतूद केली तर चांगली होईल.

म. महापौर सर्व सदस्यांच्या सहमतीने नगांवबारी चौफुली येथे उड्डाण पुलाच्या खाली असलेल्या मध्यवती भागात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेकामी मान्यता देण्यांत येत आहे.तसेच मनोहर चित्रमंदिरासमोरील मनपा मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराजाचा अर्धपुतळा असून त्याठिकाणी पूर्णाकृती पुतळा बसविणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत आवश्यक ती तरतूद अंदाजपत्रकात करण्यांत यावी.

तसेच सद्यस्थितीत मनपा नुतन इमारतीच्या दर्शनी भागात साक्रीरोड लगत असलेल्या जागेत ध्वजारोहण कार्यक्रमासाठी जागा राखीव असून स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिन प्रसंगी ध्वजारोहणाचे कार्यक्रमा आयोजित होतात. तसेच मनपाचेही अन्य

कार्यक्रमासाठी जागेची आवश्यकता आहे. तसेच मनपा इमारतीच्या बाजूच्या जागेत व्यापारी संकुलाचे काम प्रस्तावित आहे.त्यामुळे उक्त जागा ध्वजारोहणासाठी व व्यापारी संकुलासाठी कायम स्वरुपी राखीव ठेवण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२७ दिनांक ३०/१२/२०२०

नगांवबारी चौफुली येथे उड्डाण पुलाच्या खाली असलेल्या मध्यवती भागात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेबाबत स्थानिक संस्था तथा व्यक्ती मार्फत मागणी करणेत आलेली आहे.सदरची जागा ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अख्यातरीत आहे. तथापि पुतळा उभारणेकामी महानगरपालिकेची तत्वतता: मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मे.महासभेत घेणेत यावा.तसेच मनोहर चित्र मंदिरासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा असून तो अनेक वर्षापासून आहे तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसविणे बाबतचा प्रस्ताव मे.महासभेत पत्र सादर केलेले आहे.

सदर पत्रानुसार सर्व सदस्यांच्या सहमतीने नगांवबारी चौफुली येथे उड्डाण पुलाच्या खाली असलेल्या मध्यवती भागात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेकामी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मनोहर चित्रमंदिरासमोरील मनपा मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराजाचा अर्धपुतळा असून त्याठिकाणी पूर्णाकृती पुतळा बसविणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत आवश्यक ती तरतूद अंदाजपत्रकात करण्यांत यावी.

तसेच सद्यस्थितीत मनपा नुतन इमारतीच्या दर्शनी भागात साक्रीरोड लगत असलेल्या जागेत ध्वजारोहण कार्यक्रमासाठी जागा राखीव असून स्वातंत्रय दिन, प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिन प्रसंगी ध्वजारोहणाचे कार्यक्रमा आयोजित होतात. तसेच मनपाचेही अन्य कार्यक्रमासाठी जागेची आवश्यकता आहे. तसेच मनपा इमारतीच्या बाजूच्या जागेत व्यापारी संकुलाचे काम प्रस्तावित आहे.त्यामुळे उक्त जागा ध्वजारोहणासाठी व व्यापारी संकुलासाठी कायम स्वरुपी राखीव ठेवण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९६ मा.महापौर सो.यांच्या पत्रानुसार आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंदजी मोदी यांच्या धुळे भेटी प्रसंगी करण्यांत आलेल्या स्वागताचे छायाचित्र धुळे मनपा स्व. अटलबिहारी सभागृहात लावणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर धुळे शहरांमध्ये अतिशय महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे अकलपाडा प्रकल्प आणि भूमिगत गटार योजना आदरणीय पंतप्रधान मोदी साहेब यांच्या हस्ते उद्घाटन झाले आहे ही धुळे शहरासाठी अभिमानाची बाब आहे हे सर्व उद्घाटन होत असताना आदरणीय मुख्यमंत्री फडणवीस साहेब आपले खासदार सुभाष भामरे जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल व मी स्वत:तिथे असताना त्यांचे निधी आला व कामही सुरू आहे हा धुळे शहराचा मानसन्मान आहे.

सर्व सदस्यांच्या सहमतीने सदरचे छायाचित्र धुळे महानगरपालिकेचा सभागृहात दर्शनी जागेवर लावणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मनपा मार्फत नवीन प्रस्तावित इमारतीत

होणा-या सभागृहात सदर छायाचित्र लावण्यांसही मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सभागृहाची प्रतिष्ठा व शिष्टाचार लक्षांत घेता अन्य कोणतेही छायाचित्र सभागृहात लावण्यांत येवू नये.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२८ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे शहराच्या अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना व भूमीगत गटार योजनेचा शुभारंभ आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी सों. यांच्या शुभहस्ते धुळे शहरात दि. 26/02/2019 रोजी झालेले होते. या शुभारंभ कार्यक्रमाप्रसंगी त्यांचे स्वागत व सन्मान धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यांत आलेले होते. सदरचा ऐतिहासिक क्षण हा धुळे शहराच्या व महानगरपालिकेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व चिर स्मरणीय असा ठेवा आहे.या ऐतिहासिक प्रसंगाचे छायाचित्र धुळे महानगरपालिकेचा सभागृहात दर्शनी जागेवर लावणेसाठी सदरचा प्रस्ताव मे. महासभेत घेणेबाबत कार्यवाही करावी असे पत्र सादर केलेले आहे.

सदर पत्रानुसार व सर्व सदस्यांच्या सहमतीने सदरचे छायाचित्र धुळे महानगरपालिकेचा सभागृहात दर्शनी जागेवर लावणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मनपा मार्फत नवीन प्रस्तावित इमारतीत होणा-या सभागृहात सदर छायाचित्र लावण्यांसही मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सभागृहाची प्रतिष्ठा व शिष्टाचार लक्षांत घेता अन्य कोणतेही छायाचित्र सभागृहात लावण्यांत येवू नये.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-९७ मौजे देवपुर धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हेनं.57+58 वरील भुखंड क्र.22-23 64 खालील 15 मी. विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करणेबाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. शितल नवले माझ्या मते सदर जागा आपण २०१५ साली अधिग्रहित केली संबंधित व्यक्ती २०१६ मध्ये कोर्टात गेले माझा आक्षेप असा आहे की न्यायालयात तारखेला वकील जातांना आपण त्यांना व्यवस्थित माहिती देणे आवश्यक आहे त्यांच्याशी बैठक घेणे आवश्यक आहे तसे जर झाले असते तर आपण केस हरलो नसतो याचे कारण असे आहे की २०१६ मध्ये आपला नवीन डीपी आर लागू झाला त्याच्यात टीडीआर देणे बाबत स्पष्ट निर्देश आहेत शासनाने ठरवून दिले की जमिनीच्या मोबदल्यात पैसे देऊ शकत नाही नगररचनाकार यांनी अहवाल पाठवताना सविस्तर वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणे आवश्यक होते सदर जागा किती किमतीची आहे हे सभागृहाला कळणे गरजेचे आहे आपण याबाबत वकिलांशी चर्चा केली पाहिजे होती जर आपल्याला टीडीआर लागू आहे तर कोर्टात या गोष्टी मांडणे आवश्यक होते धुळे महानगरपालिका ही जागेच्या सर्व केसेस हरते हि वस्तुस्थिती आहे आणि आपण संबंधितांना टीडीआर देऊ शकतो एकदम सरळ विषय असताना वाकडातिकडा फिरवायचा सभागृहासमोर कार्यालयीन अहवाल व्यवस्थित येत नाही हा आमचा आक्षेप आहे यात किमतीचा उल्लेख नाही मागे रेखावर साहेब असताना भूसंपादनाचा प्रस्ताव होता त्यात रक्कम नमूद केलेली होती सगळ्यात जास्त प्रॉब्लेम नगररचना विभागात आहे प्लॉन मंजुरीसाठी देखील किती अडचणी येतात हे मला चांगले माहीत आहे हा न्यायालयाचा आदेश आहे सदर आदेश आपण रद्द करू शकत नाही तो न्यायालयाचा अवमान होईल यात अपील किंवा रिट-पिटेशन दाखल करता येते किंवा कसे याबाबत अभ्यास करा तोपर्यंत हा विषय खूप ठेवा ही विनंती.

म.हिरामण आप्पा गवळी आज विषय आहे तो फार महत्त्वाचा आहे आपल्याला या केसमध्ये धुळे महानगरपालिकेचा कोणता वकील आहे हे माहित आहे का केस लढण्याच्या अगोदर वकील सर्व माहिती घेऊन चर्चा करतात व त्यानुसार पुढील कायदेशीर लढा देण्यात येतो परंतु आपल्याकडे तसे होत नाही मी मागे एका वकिलाचा विषय मांडला होता जर एखादा वकील महापालिकेचा वकील असताना महापौरांच्या विरुद्ध लढेल ते कायदेशीर दृष्ट्या योग्य नाही आपण वकिलांना फि देतो त्यांनी मनपाचे हित जपणे आवश्यक आहे आपल्या कोणते वकील काम करतात हेच आपल्याला माहित नाही आपण त्यामुळे न्यायालयात केस हरतो हा प्रस्ताव सध्या स्थितीत ठेवा ही विनंती न्यायालयाचा अवमान होणार नाही यादृष्टीने कायदेशीर सल्ला घ्यावा व माझ्या मागणीचा विचार करावा.

म.नागसेन बोरसे या प्रस्तावामध्ये तीन लोक फिर्यादी आहेत. त्यांनी दावे दाखल केलेले आहेत माझी प्रशासनाला विनंती आहे आपण किती लोकांच्या जमिनी अधिग्रहीत केलेल्या आहेत याची माहिती प्रथम द्यावी या तीन लोकांना आपण किती पैसे देणार आहोत आपल्याला उर्वरित लोकांनाही भूसंपादनाचा मोबदला द्यावा लागेल तेवढी आपल्या पालिकेची आर्थिक परिस्थिती आहे का.

म.नगररचनाकार या प्रस्तावात दत्त मंदिर ते स्वामीनारायण मंदिर हा रस्ता येतो लेआउट प्रमाणे सदर रस्ता १२ मि.होता परंतु मंजूर विकास आराखडा प्रमाणे १५ मीटर आहे त्यामुळे दोन्ही बाजूंना दीड मीटर रस्ता रुंदीकरण करण्यात येऊन रस्ता विकसित केलेला होता आपल्या कार्यालयीन नस्ती मध्ये तेथील बाधित लोकांची यादी आहे त्यांनी टीडीआर नाकारल्यामुळे सदर व्यक्ती कोर्टात गेलेली आहे.

म.नागसेन बोरसे आपण पालिकेची आर्थिक परिस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली का आपण याबाबत बाजू मांडली का?

म.नगररचनाकार आपण बाजू मांडली आहे त्या संदर्भात त्यांना टीडीआर देणे बाबतचे पत्र देखील आपण न्यायालयात दाखल केलेल्या आहेत व हे सर्व न्यायालयात नमूद आहे.

म.नागसेन बोरसे आपल्याला या प्रस्तावातील तीन व्यक्ती व इतर बाधित व्यक्ती यांना भूसंपादनाचा किती मोबदला द्यावा लागणार आहे?

म.नगररचनाकार हा जो प्रस्ताव आहे त्यात फक्त न्यायालयात गेलेल्या या तीन व्यक्तींना न्याय देण्याबाबत न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

म.नागसेन बोरसे इतर लोकही त्याप्रमाणे कोर्टात जातील आपली तशी परिस्थिती आहे का? आपण याबाबत वरिष्ठ कोर्टात अपील दाखल केले आहे का?

म.नगररचनाकार यात आपण अपिल दाखल केलेले नाही.

म.नागसेन बोरसे का केली नाही?

म.नगररचनाकार आपण जर अपील दाखल केले असते तर त्याची मुदत असते त्याप्रमाणे आपल्याला दरमहा पंधरा टक्के व्याज द्यावे लागेल याबाबत सभागृह जो निर्णय घेईल तो मान्य राहील.

म.नागसेन बोरसे माझी एक विनंती आहे स्वामीनारायण मंदिराच्या पुढील रस्ता थांबलेला आहे त्याठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे तो पुढील रस्तेही करण्यात यावा.

म.शितल नवले प्रथम वकिलांचे पॅनल बदलण्याचा निर्णय घ्यावा लागेल जो अकार्यक्षम असेल त्याला पॅनल वर ठेवायची गरज नाही. न्यायालयाचा नेमका आदेश काय आहे?

म.नगररचनाकार म. नगरचनाकार यांनी मे. न्यायालयाच्या निर्णयाचे वाचून केले.
सदर निर्णय 4 डिसेंबरचा आहे.

म.शितल नवले 6 महिन्यांत विषय घ्यायला पाहिजे होता परंतु प्रस्ताव आता आलेला आहे. मार्च महिन्याच्या आधी प्रस्ताव का घेतला गेला नाही.किंवा रिव्हयू पिटीशन दाखल केले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता.

म. नगररचनाकार मे.न्यायालयाच्या निर्णयानंतर विहीत मुदतीत प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडेस सादर केलेला होता.

म. शितल नवले जर मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे धुळयांचा डीपीआर 2008साली मंजूर झाला. त्यानुसार शहरात आरक्षण टाकण्यांत आले. आता ज्या काही जागावर आरक्षण आलेले आहे त्या जागा आपल्याला भविष्यात भूसंपादन कराव्या लागतील. आपण किती लोकांना अशा प्रकारे मोबदला देणार आहोत. हे सर्व न्यायालयांत मांडले जाणे आवश्यक होते. आज आपली सुमारे 100 कि.मी. हद्द आहे जर त्यामध्ये 20 कि.मी. जरी आरक्षण असले तर आपण किती लोकांना मोबदला देणार.

म.महापौर या संदर्भात मा. आयुक्त यांनी खुलासा सादर करावा.

म. आयुक्त मी सर्वप्रथम सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की आपल्याकडे टीडीआर धोरण अमलात आल्यानंतर आपले प्रयत्न टीडीआर देण्याबाबतचा राहिलेले आहेत आपल्याकडे जे प्रस्ताव आले त्यामध्ये प्रशासनाने निश्चितपणे टीडीआर घेणेबाबत प्रयत्न केलेले आहेत हा जो विषय आलेला आहे त्यामध्ये देखील संबंधितांना देणे बाबत आपण भरपूर प्रयत्न केले त्यापैकी काही लोकांनी टीडीआर स्विकारलेला होता. त्यापैकी काहींनी टीडीआर स्वीकारला नाही व त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली टीडीआरबाबत आपण विनंती करू शकतो आग्रह करू शकतो पण कायद्याने बंधनकारक करू शकत नाही ही आपली अडचण आहे कोणतीही जागा भूसंपादन करण्यासाठी तीन प्रकार आहेत एक तर ती जागा भूसंपादन करा टीडीआरचा वापर करा किंवा रिझर्वेशन ॲक्कॉमोडेशन मध्ये ती जागा विकत घ्या. या प्रस्तावात आपण टीडीआर देण्यासाठी प्रयत्न केले होते आपण उच्च न्यायालयात आपला आर्थिक परिस्थितीबाबत माहिती मांडलेली आहे परंतु उच्च न्यायालयाने सुद्धा जर त्यांची मागणी व्हॅल्युएशन साठी असेल तर महानगरपालिका टीडीआरबाबत कंपल्शन करू शकणार नाही त्यामुळे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठवावा असा निर्णय दिलेला आहे हा निर्णय साधारणता डिसेंबर 2019 मधला आहे आणि टीडीआर पॉलिसी लागू झाल्यानंतर शहरामध्ये सुरुवातीला या पॉलिसीबाबत संभ्रम होता त्यामुळे लोक टीडीआर घेत नव्हते . यामध्ये आपण वरिष्ठ न्यायालयात जरी गेलो तरी त्याबाबत आपल्या अपेक्षेप्रमाणे निर्णय होणार नाही कारण टीडीआर नियमाप्रमाणे बंधनकारक नाही त्यामुळे रिव्ह्यू पिटीशन बाबत मी वकिलांशी चर्चा करून येतो आणि आपण त्यांना यासाठी पुन्हा प्रयत्न करू परंतु आता भूसंपादनाचा प्रस्ताव मे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मान्यता देणे गरजेचे आहे ही प्रक्रिया सुरू असतानाच त्या कालावधीत आपण टीडीआर देण्यासाठी निश्चित प्रयत्न करू रिव्हयू पिटीशन बाबत देखील कायदेशीर सल्ला घेऊन कार्यवाही करू. सभागृहाने हा प्रस्ताव मान्य करावा तोपर्यंत प्रस्ताव आपण कार्यवाहीसाठी जिल्हाधि.कारी कार्यालयाकडे सादर करू व त्या कालावधीत आपण बाकीचे प्रयत्न व कार्यवाही सुरु ठेवणार आहोत.

म. हिरामण गवळी याच विषयाला अनुसरून मी पत्र दिलेले आहे स्वामीनारायण मंदिराच्या पुढे शंभर फुटी रस्ता तयार करण्यासाठी प्रस्ताव आलेला आहे सदर ठिकाण शहरासाठी महत्त्वाचे ठिकाण आहे व तो रस्ता महामार्गाला सोडणार आहे त्या कामाच्या प्रस्तावास मंजुरी द्यावी ही विनंती.

म.नगरसचिव यासाठी स्वतंत्र प्रस्ताव नगररचना कार्यालयामार्फत महासभेपुढे सादर करावा लागेल व त्यानंतर आपण त्याबाबत निर्णय घेऊ शकतो.

म. खान मो.साबीर शेठ आपले नियुक्त वकील केस मध्ये व्यवस्थित लक्ष देत नाही . नगर रचना च्या कार्य भागाबद्दल अनेक नगरसेवक बोललेले आहेत या विभागाचा एक महत्त्वाचा अधिकारी श्री संजय बहाळकर यांनी त्याठिकाणी मनमानी कारभार चाललेला आहे त्याने स्वतंत्र खाते त्याच्या घरी सुरू केलेले आहे त्यांच्याबाबत अनेक तक्रारी आहेत संपूर्ण नगर विभागात त्यांचा अधिकार चालतो एक लेआऊट पाच ते सहा वेळा केले जातात नगर रचनाकार देखील संजय बहाळकर यांच्या सल्ल्याने काम करतात. एक कमग्चारी अशा प्रकारे संपूर्ण कार्यालयाला वेठीला धरतो. त्यांच्यावर तांतडीने कार्यवाही करावी व त्यांना निलंबीत करावे नाही तर मी मनपा प्रवेशव्दारावर उपोषणाला बसेल.

म. महापौर मा.आयुक्त सो.यांनी या प्रस्तावाबाबत अभिप्राय सादर केलेला आहे. आयुक्तो महोदयांच्या अभिप्रायानुसार तसेच मे.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भूसंपादन प्रस्ताव म. जिल्हाधिकारी सो. यांचेकडेस सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तथापि प्रशासनाने टी.डी.आर देण्याबाबत गांर्भियाने कार्यवाही करावी व न्यायालयीन याचिकेत नियुक्त वकिलांबाबत वारंवार आक्षेप घेतले जातात याबाबतही प्रशासनाने पॅनल बदलणे व सक्षम वकीलांची नियुक्ती करणे याबाबत कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२९ दिनांक ३०/१२/२०२०

१.श्रीमती प्रमिला मधुकर दुसाने २. श्री.तुकाराम मखा कंखर ३. गुलाबराव तुकाराम चौधरी यांनी मौजे देवपुर धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.५७+५८ वरील भुखंड क्र.२२-२३,४ ६ खालील १५ मी.विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करणेबाबत मे.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथील न्यायालयात दावा दाखल केला होता सदर दाव्यात वादी यांचे बाजुने निकाल दिला असुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार ३ महिन्यात संपादनाची कार्यवाही करणेत यावे.असा आदेश पारीत केला आहे.

मौजे देवपुर धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.५७+५८ वरील भुखंड क्र.२२ -२३ ,४,६ हि मिळकत धुळे शहराच्या मंजुर विकास योजना (दुसरी सुधारीत) नुसार काही रहिवास विभागात समाविष्ट असुन १५.० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहे. मंजुर विकास योजनेनुसार सदर विकास योजना रस्त्यामुळे अर्जदार यांचे भुखंड क्षेत्र बाधीत होत असुन सदर विकास योजना रस्त्यांचे विकासन झाले असुन सदर रस्त्याचे क्षेत्र संपादन करणे आवश्यक होते.

त्यानुषंगाने धुळे शहर मंजुर विकास योजनेतील मौजे देवपुर धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.५७+५८ वरील भुखंड क्र. २२-२३ यांमधील १५.० मी विकास योजना रस्त्याने बाधीत ५७/४२,/८२चौ.मी. क्षेत्र संपादन करावयाचे आवश्यक असल्याने शासनाचे भुसंपादन अधिनियमानुसार जागा संपादनबाबत कार्यवाही करणेसाठी धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावाबाबत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व आयुक्त महोदयांच्या अभिप्रायानुसार तसेच मे.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भूसंपादन प्रस्ताव म. जिल्हाधिकारी

सो. यांचेकडेस सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तथापि प्रशासनाने टी.डी.आर देण्याबाबत गांर्भियाने कार्यवाही करावी व न्यायालयीन याचिकेत नियुक्त वकिलांबाबत वारंवार आक्षेप घेतले जातात याबाबतही प्रशासनाने पॅनल बदलणे व सक्षम वकीलांची नियुक्ती करणे याबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९८ मौजे धुळे सर्व्हे क्रं. 483/अ/2 मधील 100 फूटी (30.0 मी.) विकास योजना रस्ता विकसीत केलेला असून त्याकामी भूसंपादन प्रक्रिया करणे व आर्थिक तरतूदीबाबत निर्णय घेणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगर सचिव यांनी विषयाचे वाचन केले या प्रस्तावास संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी पत्र सादर केलेले असून सदर विषय नामंजूर तथा रद्द करणेबाबत कळवले आहे याबाबतचे पत्र मी महापौरांकडे सादर करीत आहे.

म.शितल नवले या विषयासंदर्भात मे.न्यायालयाने आपल्याला काही आदेशित केलेले नाही मग आपण कशाला होऊन याबाबतीत निर्णय घ्यावयाचा हा विषय रद्द करा.

म. संजय पाटील एक मताने विषय रद्द करा जर नगरसेवक या विषयांमध्ये न्यायालयात गेलेले आहे तर तो विषय महासभेत येतो कसा काय याबाबतीत नगररचना खात्याचा हा गलथानपणा आहे त्यांनी प्रस्ताव महासभेपुढे सादर कसा केला.

म. नागसेन बोरसे सदर विषय सर्वानुमते रद्द करा.

म. हिरामणआप्पा गवळी हा विषय न्यायालयीन प्रक्रियेमुळे रद्द करावा असे सभागृहाचे मत आहे याठिकाणी मी नमूद करतो की डीमार्ट ही संस्था आंतरराष्ट्रीय नामांकित कंपनी आहे डी मार्ट ही संस्था कोणतीही बोगस जागा व्यवहार करीत नाही परंतु या धुळे शहरांमध्ये या आधी रेमेंड व सुजलॉन कंपन्या होत्या त्या सर्व कंपन्या कामगार नेत्यांनी घालवल्या ही कंपनी जर शहरात आली असती व सर्व व्यवहार कायदेशीर झाले असते तर नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला असता आज अडीच हजार कामगार डी मार्ट कंपनीकडे काम करतात अनेक शहरातील बेरोजगारांना त्याचा फायदा झाला असता व त्या अनुषंगाने दुसरे उद्योग यापुढे धुळे शहरात आले असते पण अशा बेकायदेशीर व्यवहारामुळे हा प्रकार झालेला आहे यामुळे संपूर्ण धुळे शहराचे नाव बदनाम झालेले असून कोणताही उद्योजक धुळे शहरात येथे येण्यास तयार नाहीत जर ही बाब कायदेशीर राहिली असती तर अडीच हजार ते तीन हजार लोकांना व्यवसाय उपलब्ध झाला असता बाजूच्या सुरत ठिकाणी १८००० रुपयात कामगार काम करतात अनेक उद्योगधंदे तेथे वाढलेले आहे आज धुळे शहरातून चार महामार्ग केलेले आहेत धुळ्याचे चांगले नाव आहे परंतु अशा गोष्टींमुळे धुळे शहर बदनाम होत आहे परंतु या कंपनीला ज्यांनी फसवले त्यांची चौकशी झाली पाहिजे सुजलाम कंपनीमुळे अनेक लोकांना रोजगार मिळालेला होता ही आता न्यायालयीन बाब झालेली आहे त्यामुळे हा विषय रद्द करावा.

म. अमोल मासुळे हा जो बोगस विषय महासभेपुढे आलेला आहे हा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत सादर झालेला आहे त्यांनी हा बेकायदेशीर विषय पाठवलेला आहे ज्यांनी हा विषय पाठवला त्यांची सखोल चौकशी करावी व त्यांना निलंबित का करण्यात येऊ नये याची नोटीस द्यावी जेणेकरून यापुढे असे प्रकार होणार नाहीत माझी मागणी राहील हा बोगस विषय आहे याची सखोल चौकशी करावी व संबंधितांना निलंबित करावे.

म.साबीर शेख डी मार्ट कंपनी च्या विरोधात कोणीही नाही परंतु या ज्यांनी बेकायदेशीर काम केलेत्यांच्यावर कार्यवाही करून गुन्हा दाखल झाला पाहिजे यात गोलमाल करून घरी लेआऊट ज्याने बनविला त्याच्यावर कार्यवाही करावी नगररचना विभागातील संजय बहाळकर यांच्या घरी नगररचना विभागाचे सर्व कागदपत्रे आहेत. त्यांच्यावर प्रथम कारवाई करा यामध्ये अनेक सुप्रीम कोर्टाचे निकाल आहेत जागेबाबत स्वतंत्र निर्णय आहेत ज्यांनी आल्यावर तो प्रस्ताव तयार केला त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

म. महापौर सभागृहात जे विषय सादर होतात त्यावर सभासदांचा कल पाहून प्रस्ताव मंजूर होतात किंवा नामंजूर होतात या विषयात आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे परंतु या संदर्भात काल परवाच्या वृत्तपत्रात बातमी छापून आलेली होती यात मनपाच्या अधिकारी व पदाधिकारी यांची फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळालेला आहे असे वृत्त होते आणि हा विषय आज आलेला नाही सदर विष तीन-चार महिन्यांपूर्वी नगररचना विभागाकडून नगरसचिव विभागाकडे प्राप्त झालेला होता आणि हा विषय जागेबाबत चा आहे हा प्रस्ताव दिनांक १७/७/२०१७ रोजी सुरू झाला याला तीन वर्षे झालेली आहेत त्या वेळेस मी महापौर नव्हतो आपण नगरसेवक नव्हते दुसरा विषय हा ही चुकीच्या अफवा बसविण्यात येतात व सदस्यांना घाबरविण्यात येते. सदस्य जळगाव महानगरपालिका प्रमाणे जेलीत जातील मी यात नमूद करतो की यात प्रथम सर्वात पहिले महापौरांचे नाव येईल जो विचार करायला पाहिजे आणि बहुतेक सदस्यांचे म्हणणे आहे. अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा, निलंबित करा, विषय बोगस आहे यासाठी या सभागृहाला विषयाची माहिती प्रथम अवगत होणे आवश्यक आहे विषय ना मंजूर करण्याआधी धुळे शहरात चर्चा आहे काही लोक अधिकारी पदाधिकाऱ्यांची बदनामी करीत आहेत या गोष्टी सभागृहाला ज्ञात व्हाव्यात यासाठी मूळ जागामालक व ज्याच्या नावे जागा घेतली ती जागा त्याची नाही ते काम पाहणे हे सभागृहाचे काम नाही त्याबाबत कायदेशीर बाबी पाहणे हे प्रशासनाचे काम आहे नगरचना विभागामार्फत टाउन प्लॅनिंग च्या नियमानुसार तपासणी व पाहणी करून त्याला मान्यता देण्यात येते आणि याप्रमाणे जर प्रशासनाने केले नसेल तर यात ते शंभर टक्के दोषी आहेत जो १०० फुटी रस्ता केलेला आहे मी सभापती असताना त्या रस्त्याला त्यावेळेस कामास मान्यता दिलेली आहे तो साधारणता १८ कोटी रुपयांचा खर्चाचा रस्ता होता. यापूर्वी जो भूसंपादनाचा विषय होता त्याच प्रमाणे हा विषय आहे तो निर्णय मनपाच्या विरुद्ध केलेला आहे आणि हे प्रकरण कोर्टात गेले आहे यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून चांगला वकील उभे करणे गरजेचे आहे सदस्यांचे म्हणणे आहे की वकील योग्य प्रकारे काम करीत नाही परंतु आपल्याला यामध्ये मनपाच्या पॅनेलवरील चांगले जेष्ठ वकील आहेत त्यांची नियुक्ती तेथे करणे गरजेचे आहे परंतु ज्या प्रकारे बदनामी होते ही दुर्दैवी बाब आहे या सर्व गोष्टी पाहता प्लॉन मंजुरी प्रशासनाने दिलेली आहे त्यानंतर ओपन स्पेसजागा संदर्भात तक्रारी झाल्या त्या बाबत तपासणी करण्याचे काम नगररचना विभागाचे आहेत याबाबत नगररचना विभागाने योग्य तो खुलासा या ठिकाणी सादर करावा.

म.शितल नवले यात आपले अधिकारी अधिकारी जबाबदार आहेत. नगररचना विभागाला एवढी घाई का होती दुसरा विषय भूसंपादनासाठी आर्थिक तरतूद करणे बाबत विषय आहे पण किती करावयाची याचा उल्लेख नाही शंभर फुटी रस्त्यात त्याची जागा गेलेली आहे ती किती स्क्वेअर मीटर गेलेली आहे त्याचा उल्लेख नाही हा संपूर्ण सभागृहाचा विश्वासघात आहे त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही का नको ही आमची मागणी आहे मी स्वतः बिल्डर आहे मंजुरी व इतर कामे नगरचना विभागामार्फत वेळेवर होत नाही पण अशा बेकायदेशीर प्रस्ताव करण्यास

त्यांना वेळ मिळतो सविस्तर टिपणी याठिकाणी दिली गेली नाही त्यामुळे सहाजिकच आपल्या पक्षाची बदनामी अधिकारी पदाधिकारी करीत आहेत.

म. साबीर शेठ — यामध्ये फौजदारी केस दाखल करावी.

म.महापौर — आपण जी मागणी केली याबाबत प्रशासनाचा निर्णय आहे परंतु याबाबत अधिक माहिती घेणे आवश्यक आहे सभागृहात ने जी मागणी केली त्याबाबत आपण निश्चित निर्णय घेऊ.

म.नगररचनाकार — सन्मा सदस्य शितलभाऊ शितल भाऊ नवले यांचे बांधकाम परवानगी बाबत आक्षेप आहेत त्याबाबत मी सांगू इच्छितो धुळे महानगर पालिके मार्फत आपण ऑनलाइन बांधकाम परवानगी प्रक्रिया करतो आमच्याकडे येत्या पंधरा दिवसात कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही. ड वर्ग महानगरपालिकेत आपली महानगरपालिका पहिल्या स्थानावर आहे आपण ऑनलाइन प्रक्रिया स्वतः पाहू शकतात.

म.शितल नवले — आपण याबाबत बोलू नका. माझ्याकडे पुष्कळ पुरावे आहे. आपण मूद्दावर बोला.

म.नगररचनाकार — कोणत्याही जागेचा अभिन्यास मंजूर करताना यात प्राथमिक गोष्टी तपासणी केल्या जातात त्यात जागा मालकी मोजणी नकाशा त्यानुसार कोणत्या डीपी झोनमध्ये आहे याची पाहणी व तपासणी केली जाते त्यानुसार रहिवास वापर असेल तर आपण त्याचा अभिन्यास मंजूर करतो या सर्वे नंबर ४८३ दोन मध्ये एपी ५७ नुसार मंजूर आराखड्यात हा रहिवास विभागात समाविष्ट आहे रहिवास वापर अनुज्ञेय असल्याने आपण वापर अनुज्ञेय केला. दुसरी गोष्ट जागा मालकी हे आपण मनपा ठरवित नाही यासाठी सातबारा उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड तपासणी केली जाते सातबारा उताऱ्यावर किशोर मोहनलाल बाफना यांचे नाव होते तिसरी गोष्ट मोजणी नकाशा आपण मागील सहा महिन्यात किंवा एक वर्षात जी मोजणी झाली आहे त्यानुसार अभिनयास मंजूर करताना आपण ती तपासणी करतो या गोष्टी आपण प्राथमिक स्वरूपात चेक करतो यात मागील तीन महिन्याच्या आधीच्या मोजणीची नोंद घेऊन अभिन्यास मंजूर केलेला आहे अभिनयास मंजूर करताना त्यामध्ये कमर्शीयल प्लॉट नियमानुसार जागा सोडणे ओपन प्लेस मंजूर विकास योजनेत डी.पी. रोड मध्ये जे क्षेत्र बाधित आहे ते दर्शवण्यात आलेले आहेत त्या बाधित क्षेत्रातून आपण शंभर फुटी रस्ता विकसित केलेला आहे आज पर्यंत आपण त्याला मोबदला दिलेला नाही भूसंपादनास उशीर झाला तर भरपाईची रक्कम वाढत जाते त्यांना या संदर्भात टीडीआर देणे बाबत विनंती केलेली होती पण त्यांनी टीडीआर न स्वीकारल्याने भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे आपण जर टिपणी मध्ये जागेचे व्हॅल्युएशन नमूद केले तर त्या दिवसापासून ते व्हॅल्युएशन लागू होईल जर यापुढे महासभेने आदेश दिले तर यापुढे टिपणी जागेचे व्हॅल्युएशन देण्यात येईल.

म.शाबीर शेठ — यापूर्वी आपण वारंवार महासभेत शहरामध्ये किती ओपन स्पेस आहेत याबाबत खुलासा मागवला आहे परंतु तीसुद्धा माहिती आज पर्यंत दिली गेली नाही.

म.शितलभाऊ नवले — आपण व्हॅल्युएशन बाबत सांगितले आहे पण रेडिरेकनरचे रेट तर काही बदलत नसतात रेडीरेकनर प्रमाणे व्हॅल्युएशन नमूद करा तेवढे तर आपण भूसंपादन कायद्याप्रमाणे देण्यास बांधील आहोत या टिपणात बाधित क्षेत्राचा उल्लेख नाही सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत या प्रत्यक्षात दोन जणांच्या याचिका सुरू आहेत हे प्रशासनाला माहित नाही का मग ही गोष्ट महासभेसमोर का आली नाही आपण याबाबत माहिती घेतली का यामध्ये गोशाळेची सुद्धा केस सुरू आहे.

म संजय पाटील — या सर्व प्रकरणात नगररचना विभागातील कर्मचारी संजय बहाळकर यांचा मोठा सहभाग आहे त्यांच्याकडील दप्तर प्रथम जप्त करा.

म.आयुक्त या विषयावर बऱ्याच वेळेपासून चर्चा सुरू आहे या विषयाच्या संदर्भात मी खुलासा करतो बांधकाम परवानगी बाबत प्रशासनाची कार्यवाही सुरू आहे. मी स्वतः या संदर्भात क्रेडाई या संस्थेची सकारात्मक चर्चा करून बैठक घेतलेले आहे आपण बांधकाम परवानगी मध्ये व कार्यवाहीत महाराष्ट्रात अव्वल आहोत तरीही यामध्ये ज्या हि काही अडचणी असतील त्या सोडवण्याचा आपण निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत.या जागेच्या संदर्भात मी मी खुलासा करतो कि मालकी हक्क आपण ठरवत नाही ते रेवेन्यू डिपार्टमेंट ठरवते आपण त्यांच्याकडून नवीन फ्रेश उतारी प्राप्त केले ही जी ले आऊटची परवानगी दिलेली आहे ती १००% कायदेशीर आहेत ले आऊटला मंजुरी प्राप्त झाल्यानंतर लेआउट मध्ये जो ओपन प्लेस होता तो ओपन प्लेस त्यांनी तिसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर सर्व विवाद तयार झालेत हे प्रकरण प्रशासनाने अतिशय उत्तम पणे व सक्षम पणे हाताळलेले आहे. मेहरबान न्यायालयात व प्रशासकीय स्तरावर देखील या प्रस्तावाबाबत सक्षमतेने कार्यवाही केली आहे आम्ही यामध्ये उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ पीएम शहा यांच्याकडे सदर याचिका सोपवलेली होती प्रथम संबंधित विधितज्ञ केस स्वीकारत नव्हते परंतू मी स्वतः त्यांच्याशी संपर्क केला व त्यांना याबाबत विनंती केली व नंतर त्यांनी सदर केस स्वीकारली त्यानंतर न्यायालयात त्यांनी प्रभावीपणे बाजू मांडली ती अतिशय योग्य व कायदेशीर दृष्ट्या परिपूर्ण अशी होती आपण आजही त्याबाबत संपूर्ण माहिती घेऊ शकतात सदर बाब आजही न्यायालयाच्या रेकॉर्ड वर उपलब्ध आहे. एडवोकेट पीएम शहा यांनी आपले अंतिम म्हणे मेहरबान न्यायालयासमोर सादर केले दुर्दैवाने त्याच दिवशी पीएम शहा यांचे अकाली निधन झाले त्यानंतर या केसमध्ये आपल्या पॅनेलवरील सक्षम वकील नियुक्त करण्यात आले त्यांना सदर केसचे महत्त्व व गंभीरता समजावून सांगितली यामध्ये ओपन स्पेसचा गैरप्रकार झालेला आहे तो थांबणे व भविष्यात असा प्रकार होऊ नये यासाठी बाजू मांडणे आवश्यक असल्याने संबंधित वकिलांना प्रत्यक्ष समक्ष चर्चा करून या बाबींची माहिती दिली. न्यायालयात सुद्धा त्यांनी अतिशय प्रभावीपणे बाजू मांडलेले आहे . न्यायालयाने सुद्धा आपले म्हणणे दाखल करून घेतलेले आहे व त्याबाबत सकारात्मक मत नोंदवलेले आहे यामध्ये आपण प्रशासकीय स्तरावर किंवा पदाधिकारी स्तरावर कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा किंवा दुर्लक्ष केलेले नाही हा जो विषय आहे तो डेव्हलपमेंट त्यांमध्ये ही जागा आहे त्याची मालकी कोणाची असु शकते खाजगी शासकीय मनपाची अशी कुणाचीही मालकी असू शकते हा जो डीपी रस्ता गेलेला आहे त्या जागेची मालकी आपल्याकडे जे सातबारे उतारे किंवा कागदपत्रे आहेत त्यावरून ती जागा बाफना नामक व्यक्तीची दिसून येत आहे त्यांनी आपल्याकडे भूसंपादन कामासाठी मोबदल्याची मागणी केली आपण त्यांना टीडीआर घ्यावे म्हणून देखील विनंती केली परंतु त्यांनी टीडीआर नाकारला व भूसंपादनाची रक्कम द्यावी अशी मागणी केली आपण त्या ठिकाणी आज रस्तादेखील बनवलेला आहे आज सुद्धा कायदेशीर दृष्ट्या सदर जागा आपल्या मालकीची नाही त्यामुळे आपल्याला ही सर्व प्रक्रिया करणे गरजेचे आहे त्यासाठी हा प्रस्ताव सभागृह समोर आलेला आहे सभागृह जो निर्णय घेईल तो प्रशासनाला मान्य राहील फक्त त्या अनुषंगाने ज्या चर्चा होता त्यानुसार खुलासा सादर केलेला आहे.

म.शितल नवले आपण ज्या प्रकारे खुलासा केलेला आहे तो योग्य आहे व आपण ज्या पद्धतीने न्यायालयात बाजू मांडली ती सुद्धा कौतुकास्पद आहे ही जी जागा आहे त्याबाबत आपण कोर्टात गेलेलो आहोत जर तो विषय न्यायप्रविष्ट होता तर सभागृहासमोर आणायला नको होता हेच आमचे म्हणणे होते हा त्याच लेआऊट चा एक भाग आहे.

म. संजय पाटील — या केस मध्ये जो जबाबदार व्यक्ती आहे त्या संजय बहाळकर नामक कर्मचाऱ्याकडे आजही मनपाचे दप्तर आहे त्याचे दप्तर ताब्यात घ्यावे व त्याचे कपाट सील करावे हे जर गोष्ट झाली नाही तर आपण न्यायालयात देखील व्यवस्थित बाजू मांडू शकणार नाही.

म.आयुक्त — त्यांचे कपाट सील केलेले आहे.

म. महापौर — विषयाबाबत संपूर्ण सभागृहाला व नागरिकांना माहिती व्हावी म्हणून प्रशासनाने यावर खुलासा करणे आवश्यक होते त्यामुळे केसेस बाबत वस्तुस्थिती सभागृहासमोर आली. परंतु सदस्य अडचणीत येतील किंवा जेल मध्यें जातील हे जे चित्र रंगविण्यात आले त्याबाबत दुर्दैव आहे तथापि या संदर्भात मी सांगू इच्छितो आपण जर प्रशासनाच्या अहवालाच्या विरोधात जर आपण निर्णय घेतला तर आपण कायद्याने अडचणीत येऊ शकतो प्रशासनाने विषय नियमाप्रमाणे सादर केल्यावर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असते त्यासाठी या सर्व बाबींचा खुलासा होणे व चर्चा होणे आवश्यक होते या ठिकाणी सभागृहाचा कौल लक्षात घेता चर्चेनुसार सदर प्रस्तावाबाबत मे.न्यायालयांत याचिका दाखल असल्याने सदर बाब न्याय प्रविष्ट आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. तसेच महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने सदर बाब न्याय प्रविष्ठ असल्याने कायदेशीर सल्ला घेवून योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३० दिनांक ३०/१२/२०२०

मौजे धुळे स.क्रं. ४८३/अ/२ ही मिळकत धुळे शहर मंजुर विकास योजना (द्.सु.) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना १९६६ चे कलम ३१(१) अन्वये ४३ जुल २०१५चे शासन निर्णयानुसार स.क्रं.४८३/अ-२ ही मिळकत ईपी—६७ या क्रमांकाने मंजुरी ईपी नुसार सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणेत आलेली आहे. तसेच या मिळकतीचा काही भाग हा १०० फूट (३०.० मी) रुंद वि. योजना रस्त्याने बाधीत होत आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार विकास योजना रस्त्याच्या मोबदल्यात जागा मालकास TDR देण्यांची तरतूद आहे. सदर तरतुदीचा विचार करुन तसेच धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता सदर जागेच्या मोबदल्यात मा. आयुक्त, मा. अति. आयुक्त व जागा मालक यांचे समवेत झालेल्या चर्चेत त्यांना TDR स्वरुपात मोबदला घेणेबाबत विनंती करण्यांत आली होती. तथापि जागा मालक प्राथमिक चर्चेत त्याकरिता तयार नाहीत.

तसेच जागा मालक श्री.किशोर मोहनलाल बाफना यांच्या दि. १०/२/२०२० चे पत्रान्वये त्यांनी स.क्रं. ४८३/अ-२ची काही जागा १०० फूटी (३०.० मी) रस्त्यात जात असल्याने व त्याचा मोबदला त्यांना आजपावेतो न मिळाल्याने मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे दावा(रिट पिटीशन क्रं.१३८१३/२०१७)दाखल केल्याचे कळविले आहे. व जर महानगरपालिका त्यांना योग्य मोबदला देण्यांस तयार असल्यास दावा परत घेण्याची तयारी दर्शविली आहे.

धुळे महानगरपालिकेने आज रोजी स.क्रं.४८३/अ- २ मधील १०० फूटी (३०.० मी) विकास योजना रस्ता विकसीत केला आहे. त्यामुळे सदर बाबतीत अर्जदारास मोबदला देणेस भूसंपादन प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने भुसंपादनाबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी धुळे यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे. तथापि भूसंपादन प्रक्रिया व आर्थिक तरतूदीबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

याबाबत सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावाबाबत मे.न्यायालयांत याचिका दाखल असल्याने सदर बाब न्याय प्रविष्ट आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर प्रस्ताव रद्द

करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. तसेच महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने सदर बाब न्याय प्रविष्ठ असल्याने कायदेशीर सल्ला घेवून योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ९९ मौजे मोहाडी गट क्र.१४२आरक्षण क्र.१७४ (Housing for Urban Poor पैकी (४५ X ७५ मी.) इतकी जागा स्मशानभूमी या वापराकरीता आरक्षीत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. राजेश पवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३१ दिनांक ३०/१२/२०२०

मोहाडी ग.क्र.१४२ हि जागा महानगरपालिकेच्या मालकीची असुन धुळे शहराच्या मंजुर विकास योजना (दु.सु.) नुसार आरक्षण क्र.१७४ (Housing for Urban Poor) या आरक्षणाने बाधीत आहे.

सदर जागेवर स्मशानभुमीची मागणी असल्याने त्यानुसार आरक्षीत Housing for Urban Poor या वापराखालील काही जागा (४५ मी. X ७५ मी.) स्मशानभुमी या वापरात आरक्षीत करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचनाअधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वापरात फेरबदल करणे आवश्यक आहे.

त्यानुसार यापूर्वी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे चर्चेकरीता घेतला असता संदर्भित ठरावानुसार क्र सदर जागा आरक्षण बदलास त्या भागातील सन्मा. सदस्यांचा विरोध असुन सदर जागेवर बेघर नागरीकांसाठी घरकुल उभारणेसाठी आरक्षण केलेले असल्याने प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने सन्मा.सदस्य श्री. राजेश पवार यांचे दि. २६/०८/२०१९ चे पत्रान्वये सदर ग.क्र.१४२च्या आरक्षणाच्या जागेवर वरीलप्रमाणे स्मशानभुमीचा वापर बदल करणेबाबत कळविले आहे.

सदर विषय मे.महासभेत चर्चेकरीता ठेवणेत आला असता धुळे महानगरपालिका ठराव क्र. ७९ दि.२५ नोव्हेंबर २०१९ ने महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाचे निर्णय क्रमांक तसेच धुळे शहरासाठी सुधारीत विकास योजना (दुसरी) शासन निर्णय क्र.टिपीएस-१०१२ / १५६ (ब) पुर्नबाधणी क्र. ६२/ जा.क्र./ १०६/१२/ नवि-९ दि. २८/१२/२०१२अन्वये भागश: मंजूर केली असून शासन निर्णय क्र.टिपीएस-१०१२/५२६ (ब) पुर्नबाधणी क्र. ६२/ जा.क्र./ १०६/१२/नवि-९ दि. ३ जुलै २०१५ अन्वये अंमलात आलेल्या मंजुर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) चे तरतुदीनुसार मौजे मोहाडी गट क्र. १४२ आरक्षण क्र. १७४ (Housing for Urban Poor पैकी (४५ X ७५ मी.) इतकी जागा स्मशानभूमी या वापराकरीता आरक्षीत करणेबाबत मंजुरी दिलेली असुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग -१ दि.२७/०८/२०२० पृष्ठांक ४ व ५ वर प्रसिध्द करणेत येऊन हरकती व सुचना मागविणेत आलेल्या आहेत.

मौजे मोहाडी गट क्र.१४२ आरक्षण क्र.१७४(Housing for Urban Poor पैकी (४५ X ७५ मी.) इतकी जागा स्मशानभूमी या वापराकरीता आरक्षीत करणेबाबत विहित मुदतीत कोणत्याही हरकती व सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने सदर विषय मे.महासभेपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) चे तरतुदीनुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- १०० मौजे वलवाडी धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.७५/१ वरील भुखंड क्र.९ खालील १२ मी. विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचनेबाबत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. शितल नवले या संदर्भात न्यायालयीन निर्णय आलेला आहे का?

म. अमोल मासुळे सदरचा प्रस्ताव ज्या पध्दतीने विषय क्रं. 97 संदर्भात आलेला होता त्याच अनुषंगाने आलेला आहे. व त्या प्रस्तावात ज्या त्रुटया होत्या त्याच त्रुटया या प्रस्तावात आहे. याठिकाणी एक रस्ता आहे व रस्त्यात प्लॉट येतो आहे. त्या प्लॉटचे एकुण क्षेत्र किती आहे. त्यासाठी भूसंपादनाची किती रक्कम द्यावी लागणार आहे. याबाबत अहवालात काहीही नमूद नाही. याबाबत माहिती मिळणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव तो पावेतो तहकूब ठेवावा.

म. महापौर सदर प्रस्तावाबाबत आवश्यक ती माहिती घेवून फेर सादर करावा तो पावतो सदर विषय तहकूब ठेवण्यांस सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३२ दिनांक ३०/१२/२०२०

श्री. रविंद्र नारायण सोनवणे यांनी मौजे बलवाडी धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं. ७५/१ वरील भुखंड क्र.९ खालील १२ मी. विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना दिली होती. त्यावर शासनस्तरावर सुनावणी होवुन संदर्भ क्र.१अन्वये दिलेली खरेदी सुचना संदर्भिय पत्र क्र.२अन्वये शासनाने कायम केलेली आहे.सदर खरेदी सुचना कायम झाल्याने अर्जदाराचे मौजे वलवाडी धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.७५/१ वरील भुखंड क्र.९ खालील १२मी.विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम४९अन्वये विहित मुदतीत करणे बंधनकारक आहे.

मौजे वलवाडी धुळे ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.७५/१ वरील भुखंड क्र. ९ हि मिळकत धुळे शहराच्या मंजुर विकास योजना (दुसरी सुधारीत) नुसार काही रहिवास विभागात समाविष्ट असुन १२.० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहे. मंजुर विकास योजनेनुसार सदर विकास योजना रस्त्यामुळे अर्जदार यांचे संपुर्ण भुखंड क्षेत्र बाधीत होत असुन सदर विकास योजना रस्त्यांने १५.०मी विकास योजना रस्त्याला संलग्नता मिळणेस मदत होत असल्याने सदर रस्त्याचे क्षेत्र संपादन करणे योग्य राहिल.

त्यानुसार शासनाचे धुसंपादन अधिनियमानुसार जागा संपादनबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयीन पत्र क्र.५३६ दिनांक १७/१२/२०१८ अन्वये मा.जिल्हाधिकारी धुळे यांचे कार्यालयाकडे सादर करणेत आला आहे तथापि सदर बाब धोरणात्मक असल्याने सदर विषय म. महासभेसमोर सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेता सदर प्रस्तावाबाबत भूसंपादनाची रक्कम, जागेचे क्षेत्रफळ याबाबत प्रशासनाने सविस्तर माहिती घेवून प्रस्ताव फेर सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०१ धुळे महानगरपालिकेचा (वाढीव हद्दीतील क्षेत्राचा) विकास योजनेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ नुसार इरादा जाहिर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे सदर विषय हा ग्रामीण भागाचा आहे. यामध्ये आपण यापूर्वी आरोटे नामक ठेकेदारालाडी.पी. तयार करण्यासाठी काम दिले होते. माझ्या मते सर्वात जास्त कॉलन्या वलवाडी शिवारात असतील त्यामध्ये ज्या ओपन स्पेस आहेत त्या ओपन स्पेसला कुठे आरक्षण दिले कुठे काढले याबाबत काहीही माहिती नाही आपल्याला विविध आरक्षण करावे लागतात यात प्लेग्रारऊंड व्यापारी संकुल शाळा असे विविध आरक्षण येतात यांची काही माहिती नाही याबाबत श्री. आरोटे यांना आपण देयक अदा केलेले आहेत. ते कोणत्या कामाचे याबाबत खुलासा सादर करावा.

म. महापौर नगररचनाकार श्री. परदेशी सो. यांनी खुलासा करावा.

म. नगररचनाकार आपली वाढीव हद्द 2018 मध्ये समाविष्ट झाली त्याचा विकास आराखडा आजपर्यततयार करण्यांत आलेला नाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 नुसार विकास योजना आराखडा तयार करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रक्रियेकरिताअधिनियमात नमूद केल्याप्रमाणेग विहीत मुदतीत विकास योजना तयार करावी लागते विकास योजना तयार करण्यासांठी ते जे क्षेत्रआहे त्यांचे बेस मॅप तयार करणे आवश्यक आहे. बेस मॅप तयार करतांना गांव नकाशे एकत्र जोडायचे सुरुवातीपासून आजपर्यत जे पण अभिन्यास मंजूर असतील ते यामध्ये इतन कार्पोरेट करायचे ते इन कार्पोरेट करुन त्यांचे जागेवर जाऊन सर्वेक्षण करायचे सदर सर्व्हेक्षणात जागेवर सुरु असलेल्या वापरा प्रमाणे जसे रहिवास, शाळा, दुकान याचा सर्वे करणे हें काम आहे हे सर्वात वेळ खाणार काम असते आपण इरादा जाहीर केला तर त्याला विशिष्ट कालावधी असतो इरादा जाहीर करणे अगोदर आपल्याला तो विद्यमान जमीनआराखडा तयार करावा लागतो इरादा जाहीर करणेअगोदर आपल्या विद्यमान जमीन आराखडा तयार करावा लागतो त्याला एक्झीटींग लॅन्ड युज नकाशा म्हणतात श्री. योगेश आरोटे यांना त्या हद्दवाढ गावाचा नकाशा तयार करणे लेआऊट इन कार्पोरेट करायचे व त्यानुसार जागेवर सर्वेक्षण करुन विद्यमान जागेचा वापर नकाशे तयार करणेचे काम निविदेमार्फत देण्यांत आलेले आहे. सदरचे काम त्यांनी केलेले असून त्याची तपासणी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे वाढीव हद्दीचा विकास आराखडा तयार करणे करिता इरादा जाहीर करणे आवश्यक आहे. डी.पी. तयार करण्यासाठी आपल्या नगररचना विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. या ठरावानुसार आपण शासनाची मंजुरी घेवून डी.पी युनिट पाठवण्याची

मागणी करु डी.पी. युनिट मंजूर होऊन आल्यावर आपण इरादा जाहीर करुन आपला एक्झीटींग लॅन्ड युज नकाशा तयार आहे सदर नकाशाच्या आधारे वाढीव हद्दीच्या भागात भविष्यात आवश्यक सोयी सुविधा विचारात घेवून विकास आराखडा तयार करता येईल. वाढीव भागाच्या सोयी सुविधा त्यामध्ये भागाची व पुढील वीस वर्षातील लोकसंख्या गृहीत धरुन आरक्षण प्रस्तावित करण्यांत येतील. शाळा, हॉस्पीटल, खेळाचे मैदान हे आरक्षण निश्चित होवून पुन्हा महासभेपुढे येईल नंतर ती प्रक्रिया सुरु होईल आता फक्त आपण बेस मॅप तयार केलेला आहे व महासभेकडून मान्यतेसाठी प्रस्ताव आहे. यानंतर आपण शासनाकडेस मागणी करु. त्यानंतर डीपी युनिट आल्यानंतर विकास आराखडा तयार करणे सुरु होईल.

म.संजय पाटील आपण एवढी लांब लचक माहिती दिली ती आम्हाला समजली नाही आपण यापूर्वी कोणाला काम दिले याबाबत सदर अहवालात नमूद नाही. टिपणीमध्ये याचा उल्लेख नाही श्री. आरोटे यांनी काय काम केले त्यांना कोणते काम दिले याचा काही बोध होत नाही.

म. नगररचनाकार आपण त्यांना हद्दवाढ गावातील काम दिले होते याबाबत टेंडर काढून निगोसिएशन करुन स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांना काम दिले हेाते या नंतर हद्दवाढ विभाग व शहराचा नकाशा जोडण्यांचे काम नवीन निविदा काढून करावे लागेल शासनाच्या नवीन डीपी युनिट आल्यानंतर कामाला सुरुवात होईल.

म.आयुक्त आपल्याकडे हद्दवाढ झाल्यानंतर 11 गावे समाविष्ट झाली त्याचा विकास आराखडा तयार झालेला नाही त्याचा विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी हा प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे. आपण प्रथम शासनाला कळवतो की आम्हाला विकास आराखडा तयार करावयाचा आहे त्यानंतर शासन युनिट पाठवते त्यामध्ये विविध अधिकारी असतात ते संपूर्ण अभ्यास करुन विकास आराखडयाची प्रक्रिया करतात त्यासाठी हा प्रस्ताव होता. आपला एक्झीटींग लॅन्ड युज व प्रपोज युज एकत्र करावे यासाठी आपण जुन्या हद्दीच्या भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे नकाशे तयार करण्याच्या नवीन कामासाठी निविदा पक्रिया करुन त्यानंतर आपण नियुक्त एजन्सीकडून करुन घेऊ. सध्या तो विषय नाही आता आपल्याला हद्दवाढ गावाचा विकास योजना आराखडा तयार करायचा आहे त्यासाठी प्रक्रिया सुरुकरावयाची आहे त्यासाठी इरादा जाहीर करावा लागतो. त्यानंतर पुढच्या प्रक्रिया सुरु होतात. त्याच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव सादर झालेला आहे. आपण त्याला मान्यता द्यावी ही विनंती.

म. शितल नवले आपल्याला शहराचा पण एक्झीटींग प्लॅन तयार करावयाचा आहे का?

म. आयुक्त नाही.

म. कमलेश देवरे याबाबत आमची एक सुचना आहे यामध्ये आपण पूर्वी आरोटे यांना काम दिलेले आहे. त्यांचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे त्यांचे काम जर अंतिम टप्प्यात आलेले आहे तर टिपणी मध्ये बजेट तरतूद करावी असे नमूद आहे याचा अर्थ काय ?

म. आयुक्त ते प्रस्तावित केलेले होते. त्याबाबत आपण अधिकृत निविदा प्रक्रिया करु. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

म. कमलेश देवरे श्री. आरोटे यांचे काम संपलेले आहे का?

म. नगररचनाकार जो पर्यत फायनल डीपी होत नाही तो पर्यत त्यांचे काम संपणार नाही जी.आय बेस मॅप असल्यामुळे काम सुरु राहील याबाबत वाढीव हद्दीचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे.

म. संजय पाटील वाढीव गावांचा सर्व्हे झाला पण याबाबत कोणत्याही नगरसेवकाला विचारणा करण्यांत आली नाही.

म. शितल नवले आज जे अस्तित्वात आहे त्यांचे फक्त रेकॉर्ड तयार झालेले आहे.

म.कमलेश देवरे
म.महापौर

पुढील कामासाठी निविदा प्रक्रिया राबवावी.

कार्यालयीन अहवालानुसार व मा. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच वाढीव हद्दीच्या विकास आराखडा तयार करणेकरिता शासनामार्फत डी.पी. युनिट मागविणे याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करणे तसेच त्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये नगररचना अधिकारी नियुक्त करणे तसेच इरादा जाहीर करणेची प्रक्रिया करणेचे अधिकार मा. आयुक्त धुळे महानगरपालिका धुळे यांना देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच जुन्या हद्दीचा नकाशा करणेबाबत निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३३ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे शहराची विकास योजना हि शासनाचे निर्णय क्र.डीपीएस 1012 /526 (न) पुर्नबांधणी क्र.62 /प्र.क्र.106/12/नवि-9 दि.28/12/2012 अन्वये भागश: मंजूर केली असून तसेच प्रारूप विकास योजना धुळे (दुसरी सुधारित) हि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन निर्णय क्र.टीपीएस 2012/526 (न) पुर्नबांधणी क्र.62 /प्र.क्र.106/12/नवि-9 दि.3 जुलै 2015मंजुर झालेली आहे.तसेच धुळे शहराची नवीन हद्दवाढ शासनाचे राजपत्र दि.05/01/2018 रोजी मंजूर झाली असून त्यात 11 गावांचे एकूण क्षेत्रफळ 54.62 चौ.कि.मी. समाविष्ट झालेले आहे. उक्त नुसार धुळे शहराची नव्याने झालेली हद्दीवाढीतील गावाचे क्षेत्राचा विकास योजना आराखडा तयार करणे आवश्यक आहे. परंतु याआधी नव्याने झालेल्या गांवाचा Existing Land Useचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्यातील रहिवास क्षेत्र व वाणिज्य क्षेत्र झाले.निम सार्व.क्षेत्र इत्यादीचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.सदरचे कार्यवाही हि खाजगी संस्थेमार्फत करून घेणे आवश्यक आहे. सदरचे कार्यवाही ही खाजगी संस्थेमार्फत् करुन घेणे आवश्यक असल्याने धुळे महानगरपालिका मे. स्थायी समिती सभा ठराव क्र.25 दि. 28/02/2019 नुसार कामाची निश्चिती व मंजुरी प्रदान केली आहे.त्याअनुषंगाने श्री. योगश डी. आरोटे नाशिक यांनी सदर काम अंतिम टप्प्यात असून अस्तित्वातील वापर नकाशा तयार करुन सादर केलेला आहे.

तथापि विकास योजना तयार करणे, त्यास मंजुरी देण्याचा उददेश घोषीत करणे इ. बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम1966 चे कलम 21अन्वये तरतुद नमुद आहे.तसेच उक्त अधिनियमातील कलम 23 नुसार विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करणेची तरतुद आहे. तसेच उक्त कलम 24अन्वये विकास योजना तयार करणे कामी त्यावरील नियंत्रणबाबत नगररचना अधिकारी नियुक्ती करणेबाबत तरतुद आहे.

त्यामुळे विकास योजना तयार करणे, त्यास मंजुरी देण्याचा उददेश घोषीत करणे इ. बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21 अन्वये तरतुद नमुद केलेली आहे.तसेच उक्त् अधिनियमातील कलम 23 नुसार विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करणेस तसेच कलम 24 अन्वये विकास योजना तयार करतांना त्यावर नियंत्रण अधिकारी नगररचना अधिकारी नियुक्ती करणेस, तसेच धुळे महानगरपालिका धुळे क्षेत्राचा विकास योजना सुधारित करतांना मुळ हद्द व वाढीव हद्द अशा दोन्ही भागांची एकत्रित विकास योजना तयार करणे शहराच्या भविष्यातील नियोजनाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे.

धुळे महानगरपालिकेकडे तांत्रिक कर्मचारी पुरेसे नाहीत व जे आहेत त्यांच्यावर विविध विभागाच्या अतिरिक्त जबाबदा-या आहेत.त्यामुळे शासनाचे मागवून विकास आराखडा तयार करणयात आवश्यक नकाशा या संस्थेमार्फत तयार करण्यांत येत असून ते

काम अंति टप्प्यात आहे तथापि त्यासाठी शासनाचे बाबत दिलेल नुसार तयार करणेत येत आहे. तसेच करिता देखील त्यांची मदत घेणे संयुक्तीक राहणार आहे तथापि याबाबत अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच नवीन हद्दीचा विकास आराखडा नकाशा तयार होत असतांना जुन्या हद्दीचा देखील नकाशा तयार केल्यास शहराच्या नियोजनाच्या दृष्टीने सोईस्कर होणार आहे.

तरी वरील बाबतीत खालीलप्रमाणे बाबी करणे योगय राहील.

१. आर्थीक बाबीचा विचार होऊन शासनाच्या मार्फत विकास आराखडा तयार करणे
२. विकास आराखडा तयार करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ व २५ अन्वये कार्यवाही करणेकरीता मान्यता मिळणे.
३. तसेच जुन्या हद्दीचा नकाशा तयार करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने सदर बाब धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी मे. महासभेपुढे मंजुरीस्तव सादर झाला आहे.

कार्यालयीन अहवालानुसार व मा. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच वाढीव हद्दीच्या विकास आराखडा तयार करणेकरिता शासनामार्र्फत डी.पी. युनिट मागविणे याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करणे तसेच त्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये नगररचना अधिकारी नियुक्त करणे तसेच इरादा जाहीर करणेची प्रक्रिया करणेचे अधिकार मा.आयुक्त धुळे महानगरपालिका धुळे यांना देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच जुन्या हद्दीचा नकाशा करणेबाबत निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०२ झाशी राणी चौक समोरील मनपा जुन्या इमारतीच्या बाहय भागात असलेली जागा अध्यक्ष सुमन फांडेशन धुळे यांना पाणपोई साठी देण्यांत आलेली होती. सदर जागेचा उपयोग करार नाम्याप्रमाणे होत नसल्याने सदर जागा मनपाच्या ताब्यात घेवून मागणी पत्रानुसार जागा देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर कार्यालयीन अहवालानुसार मनपा जुनी प्रशासकीय इमारतीच्या बाहय भागात नागरीकांच्या सेवा सुविधेसाठी मे. सुमन फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने पाणपोई उभारण्यात आलेली होती. तथापी सद्या ती अनेक वर्षापासुन सदरची पाणपाई बंद अवस्थेत असुन त्याचा दुरउपयोग होत आहे.त्याअनुषंगाने सदर पाणपोईची जागा ही मनपा मालकीची असल्याने सदर जागा मनपाच्या ताब्यात घेणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच श्री.राहुल तारगे यांच्या दि.२१/१/२०२० च्या अर्जान्वये सदर जागेत स्वखर्चाने फिल्टर प्लॉन्ट, विद्युत जोडणी व त्या अनुषांगाने इतर साहित्य बसविण्यात तयार असून रू.१ /- प्रमाणे १ लिटर पाणी व रु.१०/- प्रमाणे २० लीटर पाणी वितरीत करण्यास व पाणपोई येथे पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याने मनपाच्या अटी शर्तीनुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार सदर जागा श्री.राहुल तारगे यांना अर्जात नमूद कामासाठी देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत संबंधितांशी आवश्यक त्या अटी शर्तीचा

करारनामा प्रशासनामार्फत करण्यांत यावा. प्रशासनामार्फत याबाबत नियमाप्रमाणे आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही व पुर्तता करण्यांत यावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३४ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालीका व मे. सुमन फौडेशन, धुळे यांच्या संयुक्त विद्यमानाने धुळे मनपा जुनी प्रशासकीय इमारतीच्या बाहय भागात नागरीकांच्या सेवा सुविधेसाठी पाणपोई उभारण्यात आलेली होती. तथापी सद्या ती अनेक वर्षापासुन सदरची पाणपाई बंद अवस्थेत असुन त्याचा दुरउपयोग होत आहे. त्याअनुषंगाने सदर पाणपोईची जागा ही मनपा मालकीची असल्याने सदर जागा मनपाच्या ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करण्याचे आदेशित केले आहे.

अध्यक्ष सुमन फौडेशन, धुळे यांचा दि.२०/१२/२००७च्या अर्जानुसार इकडील कार्यालयीन पत्र क्र./धुमपा/नर/८९७ दि.३०/१/२००८ अन्वये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण व्यापारी संकुल व सुलभ शौचालय यांचे मधील कोप-यातील ४७.०चौ.मी.जागेत पाणपोई बांधण्यासाठी अटी व शर्ती नुसार नाहरकत दाखला देण्यात आला आहे. तसेच धुळे मनपा ठराव क्र. १२६ दि. १७/६/२००८अन्वये सदर उपक्रम हा दिर्घकालीन व लोक उपयोगी असुन या उपक्रमासाठी जागा ३० वर्षासाठी अटी व शर्ती कायम ठेवून मंजूरी देण्यात आली आहे. तथापी सध्यास्थिती सदर पाणपोई बंद असून पाणपोईचे नळ तुटलेले आहे. व सर्वत्र अस्वच्छता आहे. तसेच लगतचे दुकानदार हे सदर जागेचा वापर हे साहित्य ठेवण्यासाठी वापर करत आहे.

तसेच श्री.राहुल तारगे यांच्या दि.२१/१/२०२० च्या अर्जान्वये सदर जागेत स्वखर्चाने फिल्टर प्लॉन्ट, विद्युत जोडणी व त्या अनुषांगाने इतर साहित्य बसविण्यात तयार असून रू.१ /- प्रमाणे १ लिटर पाणी व रु.१०/- प्रमाणे २० लीटर पाणी वितरीत करण्यास व पाणपोई येथे पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध करुन देण्यास तयार आहे.असे अर्जात नमुद केले आहे. तरी सदर बंद असलेली पाणपोईची जागा महानगरपालीकेने ताब्यात घेण्याबाबत व श्री.राहुल तारगे यांना पाणपोई साठी जागा देण्याबाबत मे. महासभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर करण्यांत आलेला आहे.

कार्यालयीन अहवालानुसार मनपा जुनी प्रशासकीय इमारतीच्या बाहय भागात नागरीकांच्या सेवा सुविधेसाठी मे.सुमन फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने पाणपोई उभारण्यात आलेली होती.तथापी सद्या ती अनेक वर्षापासुन सदरची पाणपाई बंद अवस्थेत असुन त्याचा दुरउपयोग होत आहे.त्याअनुषंगाने सदर पाणपोईची जागा ही मनपा मालकीची असल्याने सदर जागा मनपाच्या ताब्यात घेणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच श्री.राहुल तारगे यांच्या दि.२१/१/२०२०च्या अर्जान्वये सदर जागेत स्वखर्चाने फिल्टर प्लॉन्ट, विद्युत जोडणी व त्या अनुषांगाने इतर साहित्य बसविण्यात तयार असून रू. १/- प्रमाणे १ लिटर पाणी व रु.१०/- प्रमाणे २० लीटर पाणी वितरीत करण्यास व पाणपोई येथे पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याने मनपाच्या अटी शर्तीनुसार व अधिनियमातील तरतुदी नुसार सदर जागा श्री.राहुल तारगे यांना अर्जात नमूद कामासाठी ३० वर्षासाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत संबंधितांशी आवश्यक त्या अटी शर्तीचा करारनामा प्रशासनामार्फत करण्यांत यावा. प्रशासनामार्फत याबाबत नियमाप्रमाणेआवश्यक ती कायदेशीर कार्यवाही व पुर्तता करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०३ धुळे महानगरपालिका कामकाजाच्या दृष्टीने विषय समित्या गठीत करण्यांत येत असून यासाठी सन्मा. गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या सदस्यांच्या नावास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व गटनेत्यांकडून प्रापत झालेल्या सदस्यांच्या नावास मान्यता देण्यांत येत आहे.

या सर्व विशेष समितीचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिमितील कलम 30 व 31 मधील तरतुदीनुसार चालेल. सदर समितीचे सचिव हे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख हे असतील उपरोक्त कलमातील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीचे सर्व अभिलेखे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख (सचिव) यांनी ठेवून त्यांचे जतन करणे आवश्यक राहील.व प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन असेल. तसेच विशेष समितीच्या समिती प्रमुख यांच्यासाठी दालन तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग प्रशासनामार्फत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३५ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिकेच्या कामकाजात सुसुत्रता यादी तसेच कामकाजात आवश्यक त्या सुधारणा व गतिमानता निर्माण होवावी यासाठी धुळे महानगरपालिका ठराव नं. 57 दि.7/9/2019 अन्वये विषय समित्या स्थापन करणेबाबत मान्यता देण्यांत आलेली आह. त्या अनुषंगाने सद्यस्थितीत प्राथमिक स्वरुपात पाणीपुरवठा व नियोजन समिती,बांधकाम व विद्युत समिती,आरोग्य/स्वच्छता समिती,मालमत्ताकर व उत्पन्न वर्धन या 4समित्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत.या समित्यांमध्ये प्रत्येकी एकुण7 पालिका सदस्य संख्या निश्चित करण्यांत आलेल्या आहेंत.सदर समित्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातीलकलम 31(अ) नुसार पक्षीय बलाबलानुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन पालिका सदस्य यांची नामनिर्देशन करण्यासाठी पक्षीय बलाबलानुसार गटनेत्या कडून नांवे मागविण्यात आलेली आहेत.

सन्मा.गटनेत्याकडून आलेल्या नावाची निश्चिती करुन त्यास मान्यता घेण्यासाठीह मे. महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. या सर्व विशेष समितीचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिमितील कलम 30 व 31 मधील तरतुदीनुसार चालेल. सदर समितीचे सचिव हे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख हे असतील उपरोक्त कलमातील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीचे सर्व अभिलेखे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख (सचिव) यांनी ठेवून त्यांचे जतन करणे आवश्यक राहील. व प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन असेल.तसेच विशेष समितीच्या समिती प्रमुख यांच्यासाठी दालन तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग प्रशासनामार्फत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

धुळे महानगरपालित सदर प्रस्तावित केलेल्या समितीच्या कामकाजात सुसुत्रता असावी याकरिता धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. धुळे मनपाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी विचारात घेता तसेचअधिनियमातील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांचे वित्तीय अधिकार विचारात घेता विशेष समित्यासाठी नियोजन व वित्तीय खर्चाबाबत अधिकार प्रदान करण्यासाठी धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. शासन अनुदान व मनपा निधीतील कामांची पूर्ण कार्यक्षमतेने अंमलबजावणी होण्यासाठी सदर कामांचा आढावा घेण्याचा अधिकार समितीस प्रदान

करण्यास हरकत नाही सदर समित्या या त्यांच्याकडील प्राप्त अधिकारानुसार घेतलेले निर्णय मे. स्थायी समिती व मे. महासभेस अवगत करेल.

सन्मा.गटनेत्यामार्फत उक्त 4समित्यासाठी खालील प्रमाणे नावे सादर झालेली आहेत

पाणीपुरवठा व नियोजन समिती	**बांधकाम व विद्युत समिती**
1) श्री. नवले शितलकुमार मोहन - भाजपा	1)श्री. गवळी हिरामण विठ्ठल — भाजता
2) श्री. नागमोते अनिल रघुनाथ - भाजपा	2)श्री. ठाकरे रंगनाथ रतन — भाजपा
3)श्री. पवार राजेश ईश्वर - भाजपा	3)सौ. थोरात वंदना विक्रम — भाजपा
4)सौ. बागुल लक्ष्मी दिनेश - भाजपा	4) सौ. वराडे वैशाली भिकन — भाजपा
5)सौ. जाधव शकुंतला शंकर - भाजपा	5)सौ.अग्रवाल सारिका प्रवीण- भाजपा
6)श्रीमती हमीदाबी निसार अहमद - भा.रा. कॉ.	6)खान सद्दीन हुसेन रहेमतुल्ला- भा.रा.कॉ.
7)श्रीमती शेख शाहजहानबी बिस्मिल्ला, रा. कॉ. पक्ष	7)श्री. अन्सारी वसीम - रा. कॉ. पक्ष
आरोग्य व स्वच्छता समिती	**मालमत्ता कर व उत्पन्न वर्धन समिती**
1)श्री. बोरसे नागसेन दामोदर - भाजपा	1)श्री रेलन हर्षकुमार राधेश्याम — भाजता
2) श्री. पाटील रावसाहेब आनंदा - भाजपा	2)सौ. बागुल योगिता प्रशांत — भाजपा
3)सौ. कुलेवार किरण राकेश - भाजपा	3)श्री. जाधव बन्सीलाल माणिक- भाजपा
4)श्री. मोगलाईकर शशि सुधाकर - भाजपा	4) सौ. सुरेखा चंद्रकांत उगले — भाजपा
5)श्री.चौधरी नरेंद्र रुपला - भाजपा	5)सौ. भामरे वंदन संजय- भाजपा
6)श्रह. आसीफ मोमीन - भा.रा. कॉ.	6)श्रीमती मदिना बी पिंजारी - भा.रा.कॉ.
7)सौ. चौधरी मंगला अर्जुन- रा. कॉ. पक्ष	7)श्री अन्सारी अब्दुल लतीफ - रा. कॉ. पक्ष

तरी सदर समिती सदस्य म्हणून नियुक्तीसाठी मान्यता देण्यांत येत आहे.

या सर्व विशेष समितीचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिमितील कलम 30 व 31 मधील तरतुदीनुसार चालेल.सदर समितीचे सचिव हे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख हे असतील उपरोक्त कलमातील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीचे सर्व अभिलेखे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख (सचिव) यांनी ठेवून त्यांचे जतन करणे आवश्यक राहील. व प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन असेल. तसेच विशेष समितीच्या समिती प्रमुख यांच्यासाठी दालन तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग प्रशासनामार्फत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०४ धुळे मनपा हद्दीतील मालमत्ता हस्तांतरण फी मध्ये वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सद्यस्थितीत कोरोना संसर्गाच्या परिस्थितीमुळे संपूर्ण वर्षभरापासून आर्थिक व्यवहार ठप्प असल्याने आर्थिक मंदी निर्माण झालेली आहे. तसेच सदर विषयाचा

अभ्यास करणेसाठी सदस्यांना वेळ मिळालेला नसल्याने त्यांना अभ्यासासाठी वेळ मिळावा यासाठी सदर विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३६ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका बजेट महासभा ठराव क्र.145 दिनांक-२२/०४/२०१० अन्वये धुळे महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे हस्तांतरण फी मध्ये वाढ करण्यात आली होती. सदर वाढ दिनांक-०१/०४/२०११ पासुन लागु करण्यात आली ती वाढ खालील प्रमाणे.

अ.क्र.	वसुली करावयाचे फी चे नांव	धुळे मनपा ने महासभा ठराव क्र.१४५ दिनांक २२/०४/२०१० अन्वये मान्यता दिलेला दर
१	मालमत्ता खरेदी रक्कमेच्या किंमतीवर फी रक्कम	खरेदी रक्कमेच्या किंमतीवर ½ टक्का
२	वारसांचे नांव हस्तांतरण व बक्षीस फी रक्कम	रुपये १०००/- मात्र
३	१)अतिक्रमण मालमत्ता हस्तांतरण दोन रुमसाठी फी रक्कम	रुपये १५००/- मात्र
	२)त्यापुढे खोल्या असल्यास व व्यावसायीक अतिक्रमण असल्यास दुप्पट करता येईल	रुपये ५००/- मात्र
४	सोसायटी मालमत्ता असल्यास खरेदी /बक्षीस दिल्सास फी रक्कम	रुपये १०००/- मात्र
५	१)जुने बांधकाम दाखला फी	रुपये ५०/- मात्र
	२)मालमत्ता कर निरंक दाखला फी	रुपये ५०/- मात्र

वरील दर आकारुन हस्तांतरण व दाखले देण्यात येत आहे.

दिनांक-२४/०४/२०१० नंतर सन २०१५ पावेतो हस्तांतरण फी कुठलीही वाढ न झाल्याने दिनांक-३१/१२/२०१५ चे मंजुर टिपणी नुसार हस्तांतरण फी व दाखला फी वाढी बाबत मे महासभेपुढे विषय क्र.१८०ने ठेवण्यात आला होता.असन २०१५ मध्ये नवीन आकारणी दर तसेच मालमत्ता कर २६ % वरुन ३६ % मध्ये वाढ केल्याने मे.महासभेने ठराव क्रमांक २२१ दिनांक१९/०२/२०१६ ने हस्तांतरण फी वाढीचा ठराव तहकुब करण्यात आला आहे.

आतापावेतो मे.महासभा ठराव क्र.१४५ दिनांक-२२/०४/२०१०चे मंजुर दराने हस्तांतरण व इतर दाखल्यावर आकारणी होत असल्याने सदर दरास बराच कालवधी झाल्याने खालीलप्रमाणे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	वसुल करावयाचे फी चे नांव	धुळे महासभा १४५ धुळे दिनांक-२२/०४/२०१० अन्वयेदि.२२/०४/२०१० पासुन वसुल करण्यात येत असलेली फी रक्कम	२०१६ मध्ये ठराव क्रमांक२२१ दिनाक-११/०२/२०१६ चे मे. महासभेत तहकुब झालेला दर	मनपाचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नविन हस्तांतरण फीवसुलीसाठीमे. महासभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले दर
१	२	३	४	५
१	मालमत्ता खरेदी रक्कमेच्या किंमतीवर फी रक्कम	खरेदीरक्कमेच्या किंमतीवर अर्धा टक्का	खरेदी रक्कमेच्या किंमतीवर १ टक्का	खरेदी रक्कमेच्या किंमतीवर १ टक्का

२	१)ज्या मालमत्तांना सिटी सर्व्हे / ७/१२असेल अशा मालमत्ता वारसाने हस्तांतरण करणे. २)ज्या मालमत्ता सिटी सर्व्हे ७/१२ असेल अशा मालमत्ता हक्कसोड, विना मोबदला असेल त्यावर शासकीय किंमतीच्या १ टक्का	रु.१०००/- मात्र	रु.३०००/-	१)रु.५०००/- २)शासकीय किंमतीच्या १ टक्का
३	१)अतिक्रमण मालमत्ता हस्तांतरण दोन रुमसाठी फी रक्कम २)त्या पुढे खोल्या असल्यास खोल्या असल्यास व व्यावसायीक अतिक्रमण असल्यास दुप्पट करता येईल.	रु.१५००/- रु.५००/-	रु.३०००/- मात्र रु.५००/- मात्र	रु.३०००/- मात्र रु.१०००/- मात्र
४	१)सोसायटीचा ठराव असल्यास मालमत्ता हस्तांतरण बक्षीसपत्र, हक्कसोड २)म्हाडा वसाहत मालमत्ता हस्तांतरण	रु.१०००/- मात्र	रु.३०००/- मात्र	रु.७०००/-मात्र रु.७०००/-मात्र
५	१)जुने घराचा दाखला फी रक्कम २)मालमत्ता कर निरंक दाखला फी रक्कम	रु.५०/-मात्र रु.५०/- मात्र	रु.२००/- मात्र रु.१००/- मात्र	रु.१०००/-मात्र रु.२००/- मात्र

वरील केलेल्या प्रस्तावित दर मे.महासभेपुढे मंजुरीस्तव सादर करण्यांत आला असता सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सद्यस्थितीत कोरोना संसर्गाच्या परिस्थितीमुळे संपूर्ण वर्षभरापासून आर्थिक व्यवहार ठप्प असल्याने आर्थिक मंदी निर्माण झालेली आहे. त्यामुळे नागरीकांवर कोणताही आर्थिक भार निर्माण होवू नये यासाठी सदर प्रस्ताव सदयस्थितीत तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर विषयाचा अभ्यास करणेसाठी सदस्यांना वेळ मिळालेला नसल्याने त्यांना अभ्यासासाठी वेळ मिळावा यासाठी सदर विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- १०५ धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा केंद्राच्या जागेत तसेच म.न.पा नविन इमारतीवर सोलर सिस्टिम आस्थापीत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्वसन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपाची आर्थिक बचत व शासन निकष लक्षात घेवून धुळे महानगरपालिकाच्या उपलब्ध जागेवर सोलर ऑन ग्रिड सिस्टीम बसविणेच्या कामास मान्यता देण्यांत येत आहे. यासाठी सदरील प्रकल्पीय कामे करणे व त्याबाबतचा आराखडा करणे कामी तज्ञ सल्लागार नेमणेव म.न.पा च्या उपलब्ध पात्र जागांवर(Fizibat)सौर प्रकल्प उभारणी करणे कामांसाठी प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३७ दिनांक ३०/१२/२०२०

म.महापौर सो, म.सभापती सो, व म.आयुक्त सो यांनी कार्यालयीन बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार धुळे म.न.पा च्या वीज बिल खर्चात बचत होणेच्या दृष्टीने सौर प्रकल्प

उभारणीबाबत प्रस्तावित करणे बाबत आदेशित आहे. धुळे महानगरपालिकाच्या सुखवद, बाभळे, हनुमान टेकडी,मालेगाव रोड,पांझरा वॉटर,बडगुजर जलकुंभ या पाणी पुरवठा केंद्राचे दरमहाचे वीज बिल सुमारे 1.25 कोटी आहे. तसेच म.न.पा क्षेत्रातील पथदिवेवीज बिल खर्च सुमारे 35 लक्ष प्रती माहे असुन इतर देयकांचे बिल खर्च रू 15 लक्ष आहे,. यानुसार धुळे महानगरपालिका दर महा महावितरण कंपनीस सुमारे 1.75 कोटी वीज बिल अदा करणे.

महानगरपालिकेच्या सुखवद व बाभळे, हनुमान टेकडी, डेडरगाव, पाणी पुरवठा केंद्र व मनपा इमारतीवर सौर सयंत्र बसविणेसाठी मोठया प्रमाणात जागा उपलब्ध आहे, या ठिकाणी ऑन ग्रिड सोलर सिस्टीम बसविल्यास अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतातुन वीज निर्मिती होवुन मनपा त्या उपभोगातुन टप्याटप्याने किमान 40% वीज निर्मिती करून ऑनग्रिड सिस्टीम ने वापर करू शकते.

केंद्र शासन,राज्य शासन, तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अधिकरण (मिडा) यांचे कडील विविध मार्गदर्शक परिपत्रकानुसार या कामासाठी काही प्रमाणात निधी उपलब्ध होणे शक्य आहे. तसेच नाबार्ड कडुन किंवा केंद्र शासनाच्या सोलर मिशन उपक्रमाअंतर्गत या कामी कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध होवु शकते किंवा खाजगी भागीदारी तत्वावर ही म.न.पा हा उपक्रम करू शकते.

धुळे महानगरपालिकाच्या उपलब्ध जागेवर सोलर ऑन ग्रिड सिस्टीम बसविणेच्या कामासाठी प्रकल्प अहवाल तयार करणे,प्रस्तावित ऊर्जा उत्पन्न (जनरेशन) त्यासाठी येणारा अपेक्षित खर्च, प्रस्तावाच्या खर्चासाठी निधी उभारणी, उपलब्ध होणा-या कर्जाबाबत परतफेड इ. बाबत सविस्तर सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. याकामी प्रकल्प तज्ञ सल्लागार नेमणे आवश्यक आहे. या नियुक्त PMC मार्फत ऑन ग्रिड सोलर सिस्टम बसविणे बाबतची तांत्रीक बाबींची पडताळणी, जागेची उपलब्धता, व प्रकल्प खर्च बाबत स्वतंत्र DPR (detailed project report) करणे आवश्यक आहे.

करीता सदरील प्रकल्पीय कामे करणे व त्याबाबतचा आराखडा करणे कामी तज्ञ सल्लागार नेमणेव म.न.पा च्या उपलब्ध पात्र जागांवर (Fizibat) सौर प्रकल्प उभारणी करणे कामांसाठी प्रस्तावास मान्यता होणेस म.महासभेच्या मान्यतेकरीता सादर आलेला आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपाची आर्थिक बचत व शासन निकष लक्षात घेवून धुळे महानगरपालिकाच्या उपलब्ध जागेवर सोलऑन ग्रिड सिस्टीम बसविणेच्या कामास मान्यता देण्यांत येत आहे. यासाठी सदरील प्रकल्पीय कामे करणे व त्याबाबतचा आराखडा करणे कामी तज्ञ सल्लागार नेमणेव म.न.पा च्या उपलब्ध पात्र जागांवर (Fizibat) सौर प्रकल्प उभारणी करणे कामांसाठी प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०६ १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत धुळे शहरात विविध भागात सार्वजनिक शौचालय बांधणेकामी जागा निश्चिती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. वसीम बारी हा विषय सर्व सदस्यांनी मंजूर केला आहे त्यात माझा एक विषय आहे तो त्यात समाविष्ट करावा नदीकिनारी अंजन शाळा दर्गा आहे त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे शौचालय नाही तरी त्या ठिकाणी शौचालय बांधण्यात यावे

म.अमीन पटेल माझा वार्ड क्रमांक १२ मध्ये स्लॉटर हाऊस जवळील शौचालयाचे छत पडले आहे त्यामुळे ते सौचालय बंद करण्यात आले आहे त्या ठिकाणी उभारण्यात यावे तसेच कमी जवळ पाण्याची टाकी आहे त्याठिकाणी शौचालयाची टाकी खराब झाली आहे त्याचे सर्व पाणी रस्त्यावर येत आहे त्याठिकाणी पाच वर्षात काम झालेले संडास बंद पडली आहे त्यावर उपाय करून दुरुस्त करण्याची मागणी करीत आहे.

म. नागसेन बोरसे हा विषय शहराच्या जनतेच्या आरोग्याची निगडित आहे माझी अशी विनंती आहे धुळे शहरात १९ प्रभाग आहेत त्या प्रभागांना दोन कोटी ४२ लाख २४ हजार कमी पडतील अशी माझी विनंती आहे समिती स्थापन करावी त्यात सात ते आठ नगरसेवक घ्यावे ते असे घ्यावे की तेवढ्या पैशामध्ये आठ ते नऊ युनिट शौचालय बनू शकतील माझी अशी विनंती आहे त्या समिती मार्फत निर्णय घेण्यात यावे ही विनंती.

म. महापौर सदर विषय अतिशय महत्त्वाचा आहे धुळे शहरांमध्ये खरंच अतिशय वाईट परिस्थिती असेल त्या ठिकाणी शौचालय करणार जास्तकरून लघु व मध्यम वर्गीय वसाहतीमध्ये शौचालयाचे जास्त आवश्यकता आहे प्रशासनाने पूर्ण खात्री करून जिथे आवश्यकता असेल व जिथे देणे नाही त्या ठिकाणी करावे. याबाबत कामाची आवश्यकता लक्षांत घेवून व प्रत्यक्ष जागेची पहाणी करुन कामे निश्चित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदरील कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी अनुभवी संस्थाना प्राधान्य देण्यांत यावे. तसेच काम पूर्ण झाल्यावर सदर शौचालयाचा देखभाल दुरुस्तीचे काम या कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असलेल्या सक्षम संस्थेलाच देणेबाबत प्राधान्य द्यावे व त्याप्रमाणे निविदा अटी शर्ती मध्ये समावेश करावा व प्रशासनाने उचित व नियमानुसार याबाबत कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३८ दिनांक ३०/१२/२०२०

धुळे शहरात विविध भागात सार्वजनिक शौचालय बांधकाम करण्याबाबत प्रशासना मार्फत टिपणी सादर करण्यात आलेली होती.

म.महापौर व म.आयुक्त सो. यांच्या झालेल्या बैठकीत सदर शौचालय बांधकामासाठी १४ व्या वित्त आयोग अंतर्गत CTPT (Community Toilte and Public Toilet) यासाठी रु.२,४२,२४,०००/- मात्रचे निधी शिल्लक आहे. तसेच नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टीएफसी ८०१५ / प्र.क्र. १०६ / नवि-४, मंत्रालय मुंबई दि.०३/०८/२०१५ अन्वये सार्वजनिक शौचालयासाठी कमाल रु.२५,०००/- प्रती सिट सुद्धा सदर कामा साठी खर्च करता येवू शकते.

तरी याबाबत मा.महापौर सो.,व आयुक्त.सो.,यांच्याकडे शहरातील विविध भागात नवीन शौचालय बांधकाम करण्याबाबत आलेले याद्या विचारात घेवून संपूर्ण शहरामध्ये विविध ठिकाणी शौचालय कोणत्या भागात बांधणे योग्य राहील याबाबत स्थळ निश्चितीकरण करणेसाठी प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झाला असता सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व प्राप्त झालेले सार्वजनिक शौचालयांचे मागणी प्रस्ताव विचारात घेवून जागेची उपलब्धता व कामाची आवश्यकता तपासणी व पाहणी करण्यांत आलेली असून त्याप्रमाणे सद्यस्थितीत उपलब्ध निधीचा विचार करता प्रथम टप्प्यात खालील प्रमाणे शौचालय बांधकामाचे प्रस्ताव १४ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव
1	भोला बाजार ८० फूटी रोड येथे १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे .
2	सुभाषनगर नवीन भिलाटी येथे १० सीट स्त्री व 20 सीट पुरूष सार्वजनिक शौचालय बांधणे.
3	विट्टाभट्टी देवपूर येथे १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.

4	श्रीराम नगर मिलपरिसर येथे १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे .
5	स्लॉटर हाऊस मागील भागात १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
6	पाटील वाडा जुने धुळे भागात १० सीट स्त्री व 20 सीट पुरूष तसेच डबीपुरा येथे 10 सीट स्त्री व 10 सीट पुरूष सार्वजनिक शौचालय बांधणे.
7	शेलारवाडी भागात १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
8	देवपूर दैठणकर नगर भागात १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
9	४०गांवरोड १०० फूटी रोड भागात १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
10	वलवाडी आदिवासी वस्ती भागात १० सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
11	आझाद नगर भागातील भोईवाडा भागामध्ये 10 सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
12	कबीरगंज जनता सोसायटी भागात 10 सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.

तसेच खालील सार्वजनिक शौचालयांची कामे पुढील 15 व्या वित्त आयोगातील उपलब्धहोणा-या निधीनुसार व निर्देशाप्रमाणेदुस-या टप्प्यात घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

1	डबीपुरा नदीकिनारी सार्वजनिक शौचालय बांधणे.
2	मोठी गढी जवळ सार्वजनिक शौचालय बांधणे.
3	वलवाडी,भोकर, भिलाटी या ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे.
4	जामबाग येथे सार्वजनिक शौचालय बांधणे.
5	शाळा नंबर 3 मागे सार्वजनिक शौचालय बांधणे.
6	सिताराम माळी चाळ भागात 10 सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.
7	अंजान बाबा दर्ग येथे महिलासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे
8	यल्लमा माताच्या मंदिराजवळील बर्फ कारखानाजवळ सार्वजनिक शौचालय बांधणे.
9	जिल्हा न्यायालय येथे महिलांसाठी सार्वजनिक शौचालय बांधणे
10	महिंदळे इंदिरानगर भागात सार्वजनिक शौचालय बांधणे.
11	मनपा शाळा क्रं. १७ मायक्रो जलकुंभ सार्वजनिक शौचालय बांधणे.
12	आदिवासी वस्ती असरा सोसायटी जवळ सार्वजनिक शौचालय बांधणे.
13	नकाणे गावात महिलासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे.
14	कामगार नगर येथे पुरूषासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे.
15	मोहाडी दंडेवाला बाबा नगरात सार्वजनिक शौचालय बांधणे.
16	प्रिंपी या गावात सार्वजनिक शौचालय बांधणे.
17	प्र.क्र.17 मध्ये रंगारी चाळ भागात सार्वजनिक शौचालय बांधणे.
18	प्र.क्र.16 मध्ये धोबी घाट भिलाटी भागात पुरूष शौचालय बांधणे.
19	प्र.क्र.12 मध्ये हबीबी शाळेसमोरील ओपन स्पेसजवळ 10 सीट सार्वजनिक शौचालय बांधणे.

सदर कामांची निविदा प्रसिध्द करणेबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच निविदा प्रसिध्द करण्यापुर्वी जागा उपलब्धतेची पाहणी करावी. तसेच सदरील कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी अनुभवी संस्थाना प्राधान्य देण्यांत यावे. तसेच काम पूर्ण झाल्यावर

सदर शौचालयाचा देखभाल दुरुस्तीचे काम या कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असलेल्या सक्षम संस्थेलाच देणेबाबत प्राधान्य द्यावे व त्याप्रमाणे निविदा अटी शर्ती मध्ये समावेश करावा व प्रशासनाने उचित व नियमानुसार याबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०७ 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत शहरातील विविध भागातील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता कॉक्रीट करणे इत्यादी कामे निश्चित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. उमेर शव्वाल अन्सारी आधी जी संरक्षण भिंत बांधली ती पारोळारोड ते मच्छीबाजार पर्यत आली आहे. ताशागल्ली, तिरंगा चौक ते हजार खोली पर्यत काम थांबले आहे. हे काम लवकर सुरु करावे.

म. अन्सारी फातमा वॉर्ड क्रं. 11,12,13 व 19 मध्ये गटारी नाही कुठल्याही मुलभूत सुविधा नाही या 14 व्या वित्त आयोगातून कामे घेण्यांत यावे.

म. संजय पाटील अंबिकानगर मध्ये एक बाळ खड्डयांत पडून मयत झाले आहे. तिथे जर गटार राहिली असली तर त्याचा जिव गेला असता का?

म. अमीन पटेल 14 व्या वित्त आयोगातून संरक्षण भिंत बांधणेसाठी फार मोठा निधी येतो. काही वार्ड असे आहे की 14 व्या वित्त आयोगातून त्या ठिकाणी कामे झाले नाही हमाल मापाडी पासून 100 फूटीचा नाला आहे. पावसाळयात नाल्याला पूर येवून लोकांच्या घरांत पाणी शिरते. अंबिकानगर व हजार खोली भागात गटार नाही त्या दुषित पाण्यामुळे नागरीकांना मलेरिया,डेग्यु सारख्या आजारांना समोरे जावे लागते.

म. प्रतिभाताई चौधरी मी स्वत: व वैभवी दुसाने आम्ही मागील वेळी नगरसेविका असतांना गितानगर ते प्रोफेसर कॉलनी पर्यत संरक्षण भिंत बांधणेबाबत 3 वेळा पत्र दिले आहेत. तुम्ही आणि आयुक्त सो. आपण समक्ष पहाणी पुढच्या वेळेस 14 व्या वित्त आयोगातून संरक्षण भिंत बांधणेचे काम घ्यावे. दुसरे असे की, माझ्या नगरसेवक निधीतून देवपूर भागातील खड्डे बुजविण्यात यावे.

म. हिना पठाण प्र.क्रं.19 ,11,12 मध्ये लोक आम्हाला शिव्या देतात तुम्ही वार्डातील कामे करीत नाही.आम्ही भिक मागून तुम्हाला पैसे गोळा करुन देतो.

म. नागसेन बोरसे 14 व्या वित्त आयोगातून जो विषय आलेला आहे. त्यात गितानगरच्या नाल्याचा भाग आहे. सुशीनाल्यावर स्लॅब कलर्व्हट टाकणे असा विषय असतांना त्या ठिकाणी पुल बनवून टाकला आहे. दि. 22/3/2020 चा प्रस्ताव दलित वस्ती मधील आहे. हा विषय मंजूर झालेला आहे. फक्त पालक मंत्रयांची सही बाकी आहे. तरी हा विषय पुन्हा विषय पटलावर आलेला आहे. माझी अशी विनंती आहे की हा विषय रद्द करुन गितानगरचा जो नाला आहे त्याला संरक्षण भिंत बांधणेबाबत प्रस्ताव घेण्यांत यावा.

म. महापौर याबाबत आलेले कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अहवालात सादर झालेल्या यादीनुसार सद्यस्थितीत 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत वरील कामापैकी प्रथम टप्प्यामध्ये अ.नं.1 ते 11 कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. उर्वरीत अ.नं. 12 ते 24 कामांना तत्वता: मान्यता देण्यांत येत असून सदर उर्वरीत कामे टप्प्या टप्प्याने पुढील वित्त आयोगातून निधीच्या उपलब्धतेनुसार महापौर व आयुक्त यांच्या संयुक्त मान्यतेने

घेण्यांत यावी.याबाबत कामाची आवश्यकता व शासन निकष तपासून प्रशासनाने कार्यवाही करावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १३९ दिनांक ३०/१२/२०२०

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत धुळे मनपा सन २०१५-१६ पासून अनुदान प्राप्त होत आहे. सदर अनुदानामधून ५०% अनुदान घनकचरा व ५० % मुलभूत सोई- सुविधांच्या इतर कामासाठी खर्च करणे बाबत शासन निर्णयात नमूद आहे.

सदर अनुदानातून खालील कामे संदर्भीय पत्रानुसार प्रस्तावित केलेले आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1अ	हाग्रानाला ते कचरा डेपो पावेतो संरक्षण भिंत बांधणे.	2,75,54,570/-
ब	ताडीवाला पारोळा रोड येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	99,02,261/-
2	पारोळा रोड ते वरखेडी ते कचराडेपो पावेतो रस्ता कॉक्रीट करणे व गटार बांधणे.	9,08,25,280/-
3	प्र.क्र.14 मध्ये ओम क्रिटीकल ते कब्रस्थान पावेतो संरक्षण भिंत बांधणे.	72,92,400/-
4	कचरा डेपोला कुंपण भिंत बांधणे.	1,59,89,176/-
5	कचरा डेपो अंतर्गत रस्ते कॉक्रीट करणे.	59,92,560/-
6	धुळे मनपा हद्दीतील साईदर्शन कॉलनी ते रासकर नगर ते सुदर्शन कॉलनी ते शेलारवाडी पावेतो संरक्षण भिंत बांधणे.	1,56,54,445/-
7	देवपूर बस स्थानक मागील सुर्शीनाल्यावर स्लॅब कलवर्ट बांधणे.	51,30,119/-
8	मोती नाला साक्री रोड पांझरा नदी पावेतो संरक्षण भिंत बांधणे.	99,80,185/-
9	गोळीबार टेकडी रोड ते जमानागिरी पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	1,49,40,278/-
10	मौलवीगंज भागातील सार्वजनिक महिला शौचालय जवळ संरक्षण भिंत बांधणे.	34,99,299/-
11	हायवे पुलापासून ते गांडूळ खत प्रकल्पापावेतो रस्ता डांबरीकरण करणे व पोल बसविणे.	98,98,887/-
12	गांडूळ प्रकल्पाअंतर्गत रस्ते कॉक्रीट करणे	50,00,000
13	महानगरपालिका दवाखान्या मागील हाग-या नाल्यावर विश्वकर्माचा भुवनमागे व कुंभार खुंटामागील नाल्यावर पुल बांधणे.	35,37,496/-
14	हाग-यानाल्याकिनारी संरक्षण भिंत बांधणे उर्वरित गुरूदत्त कॉलनीतील संरक्षण भिंत बांधणे.	1,28,84,231/-
15	देवपूर प्रभाग क्रमांक 4 मधील वाडीभोकर रोड उत्तरमुखी मारोती मंदिर ते अमिना पठाण यांच्या घरापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	42,68,975/-
16	लक्ष्मी वाडी ते निसर्ग उपचार केंद्र पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	1,33,85,854/-
17	पारोळा रोड पुलापासून ते हाग्रा नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	69,56,760/-
18	वरखेडी गावातील जुन्या दर्गाजवळ नाना चौधरी घरापासून ते नदीपावेतो नाल्यावस दोन्ही बाजुस संरक्षण भिंत बांधणे.	70,00,000/-
19	प्रभाग क्रमांक 8 मध्ये मच्छि बाजार ते लिंबु नाल्यापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	75,00,000/-
20	देवपूर गिता नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	99,55,248/-
21	भरत नगर ते शाहू नगर नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	49,93,113/-
22	हरहर महादेव व्यायाम शाळा ते यश रेसीडेन्सीपावेतो नाल्यस संरक्षण भिंत बांधणे.	1,00,00,000/-
23	मोगलाई मोती नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	1,00,00,000/-
24	हमालमापाडी कॉलनी ते 100 फुटी रस्त्यापावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	50,00,000/-

सदर कामांसाठीच्या येणा-या संभाव्य खर्चास १४ व्या वित्त आयोग योजने अंतर्गत प्राप्त अनुदानाच्या शिल्लक निधीतून करणेस प्रस्तावित केलेले आहे. महाराष्ट्र शासन नगर

विकास विभाग जा.क्र./टीएफसी ८०१५/ प्र.क्र.१०६ /नवि -४ मंत्रालय दि.०३/०८/२०१५ अन्वये शासन निर्णय पारित झालेला आहे. सदर निर्णयानुसार १४ वित्त आयोगाच्या अनुदाना अंतर्गत कामे प्रस्तावित करण्यासाठी मे. महासभेच्या ठरावाची शिफारस आवश्यक असल्याने सदरचा विषय मे. महासभेपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

याबाबत आलेला कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अहवालात सादर झालेल्या यादीनुसार सद्यस्थितीत 14 व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत वरील कामापैकी प्रथम टप्प्यामध्ये अ.नं 1 ते 11 कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. उर्वरीत अ.नं.12 ते 24 कामांना तत्वता:मान्यता देण्यांत येत असून सदर उर्वरीत कामे टप्प्या टप्प्याने पुढील वित्त आयोगातून निधीच्या उपलब्धतेनुसार महापौर व आयुक्त यांच्या संयुक्त मान्यतेने घेण्यांत यावी.याबाबत कामाची आवश्यकता व शासन निकष तपासून प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने संपूर्ण शहरातील सर्व प्रभागामध्ये समान विकास होण्याच्या दृष्टीने सदर विकास कामाचा समावेश करुन जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गत सदर प्रस्तावाना मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका क्षेत्रात जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत विविध विकास कामे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे. त्यासाठी सन्मा. सदस्यांकडुन मागविण्यांत आलेल्या कामांच्या यादीनुसार खालील कामे निश्चिती करुन जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजित रक्कम
१.	प्र.क्र.१ मध्ये विद्युतप्रभा कॉलनी अजय पाटील यांच्या घरापासून ते सैंदाणे यांच्या घरापावेतो रस्ता क्रॉकीटकरण करणे.	१२,५०,०००/-
२.	प्र.क्र.1 मध्ये बगडे चक्कीपासून ते अंबाजी नगर पावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-
३.	प्र.क्र.1 मध्ये भोकर उपनगर जुने गाव लोणकर यांच्या घरापासून ते नारायण पोलीस यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-
४.	प्र.क्र.१ मध्ये श्री. बोरसे सर यांच्या घरापासून ते श्री. गिरासे यांच्या घरापावेतो ते राहूल चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
५.	प्र.क्र.२ मध्ये सदाशिव नगर येथे खडीकरण व डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
६.	प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी अंतर्गत महाले यांच्या घरापासून ते गोसावी ते मन्साराम माळी ते कापडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
७.	प्र.क्र.२ मध्ये श्री.गवळे रावसाहेब यांच्या घरापासून ते श्री.पावरा सर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
८.	प्र.क्र.२ मध्ये श्री.शंकर सैदाणे यांच्या घरापासून ते एन.पी.दादा पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	१५,००,०००/-

९.	प्र.क्र.२ मध्ये पुजा प्रोव्हिजन ते श्रीकृष्णा कॉलनी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
१०.	प्र.क्र.३ मध्ये टेलीफोन कॉलनी भागात शनीमंदिर ते हरिचंद्र सोनार यांच्या घरापावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
११.	प्र.क्र.३मध्ये लाला सरदार नगर व इस्लामपुरा रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५,००,०००/-
१२.	प्र.क्र.३ मध्ये जाकीर यांच्या बंगल्यापासून ते खाटीक भवन पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
१३.	प्र.क्र.४मध्ये चुडामणी बंगला ते सिधु त्र्यंबक शॉपिंग कॉम्लेक्सपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
१४.	प्र.क्र.४ मध्ये अमन पोतदार यांच्या घरापासून बबन चव्हाण ते खरे मॅशन ते कैलास चौधरी यांच्या घरापावेतो (प्रोपेसर कॉलनी)रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
१५.	प्र.क्र.४मधील जयहिंद कॉलनी श्री विजय बोरसे यांच्या घरासमोर सर्व्हे नं १४/१८/१९ येथे सभामंडप बांधणे.	१२,५०,०००/-
१६.	प्र.क्र.४मधील भिडेबाग श्री.संदिप कुलकर्णी श्री चंदू महाजन यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
१७.	प्र.क्र.५मधील जगन्नाथ नगर मधील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
१८.	प्र.क्र.५ मधील सुभाष नांद्रे यांच्या घरापासून ते उन्नती नगरच्या बोर्डपावेतो रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
१९.	प्र.क्र. 5मध्ये कनात अपार्टमेंट ते श्री देवरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	४२,३०,७१४/-
२०.	प्र.क्र.६ मधील मोराणे येथे बजरंग चौक विकसित करणे.	१२,५०,०००/-
२१.	प्र.क्र६ मध्ये मोराणे येथे पांझरा नदी काठापासून ते दामू पवार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१२,५०,०००/-
२२.	प्र.क्र.६ मधील नकाणे गावात निबा बायजा यांच्या घरापासून ते हिरामण यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१२,५०,०००/-
२३.	प्र.क्र.६ मधील महिंदळे येथे ईच्छापुर्ती कॉलनी परिसरात रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
२४.	प्र.क्र.७मधील दशक्रिया विधी शेड बांधणे.	३०,००,०००/-
२५.	प्र.क्र.7 मध्ये मोहन रेस्टारंट ते उत्तरेस मुस्लिम कब्रस्तानपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	६७,६४,९३८/-
२६.	प्रभाग क्रमांक 7 सेंट्रल बॅक पासून ते समता नगर पावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	४५,००,०००/-
२७.	प्र.क्र.८ मध्ये घडयाळ वाली मस्जिद ते मौलंवी गंजपावेतो कॉक्रीट रस्ता करणे.	४०,००,०००/-
२८.	प्र.क्र.८ मधील निसार चौक पासून काझी प्लॉटपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
२९.	प्र.क्र.८ मध्ये मिश्रा सर यांच्या घरापासून ते शिवाजी व्यायाम शाळेपावेतो बंदिस्त गटार करणे.	२५,००,०००/-
३०.	प्र.क्र.९ मध्ये रामदेव बाबा मंदिर ते पारोळा रोड पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५,००,०००/-
३१.	प्र.क्र.९ मध्ये ग.न.२ची मागची बोळ जैन मंदिर ते पारोळा रोड पावेतो ड्रेनेज लाईन टाकणे.	१०,००,०००/-
३२.	गुरूदत्त कॉलनी ते राकेश रोकडे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	२५,००,०००/-
३३.	प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
३४.	सुभाष नगर मधील बंधुभाव मित्र मंडळ ते गुमान बाबा मंदिरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
३५.	प्र.क्र.१० मध्ये बंधुभाव मित्र मंडळ ते रत्नाकर माळी यांच्या घरापावेतो पाईप गटार करणे.	२५,००,०००/-
३६.	सुभाष नगर जुने धुळे येथील प्लॉट भागात अभ्यासिका बांधणे.	४८,१०,०००/-
३७.	शाळा नंबर २ येथे अत्यधुनिक जीमासाठी बांधकाम करणे.	७०,००,०००/-
३८.	प्र.क्र.१० मध्ये रवी माळी यांच्या घरापासून ते शालिक यांच्या घरापावेतो ते उमेश शिंपी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,६१,०३५/-
३९.	प्र.क्र.१० मधील इंदिरा नगर मध्ये श्री.बापू पाटील यांच्या घरापासून ते श्री.मोहन भिल यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५,००,०००/-
४०.	प्र.क्र.१० मध्ये जलराम मंदिर श्री.गोविंद सोनी ते श्री.कनू शेठ गांधी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-

४१.	प्र.क्र.११ मधील बाळापूर येथे कैलास जगताप यांच्या घरापासून ते वरखेडी रोडपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
४२.	प्र.क्र.११ मधील माणिक नगर व नवनाथ नगर येथे रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
४३.	प्रभाग क्रमांक 11 मधील वाखारकर नगर मध्ये श्री.बाफना यांच्या घरापासून ते मरीमाता मंदिरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे	५०,००,०००/-
४४.	प्र.क्र.१२ मधील जनता सोसायटी ते हजरत अली मस्जिदपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
४५.	प्र.क्र.१२ मधील अकबर बेग मिर्झा गॉर्डन जवळील रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
४६.	प्र.क्र.१२ मधील मोहमद अहमद मस्जिद कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
४७.	प्र.क्र.१२ मधील एकता वॉटर पासून ते अपनी हॉटेलपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५,००,०००/-
४८.	प्र.क्र.१२ मध्ये आयेशा नगर भागात लतीफ भैय्या यांच्या घरापासून ते शेख साहेब यांच्या घरापावेतो रस्ता व गटार करणे.	९,९९,०००/-
४९.	प्र.क्र.१३ मधील जय शंकर कॉलनी धुलिया गॅरेज भागात रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२०,००,०००/-
५०.	प्र.क्र.१३ मधील तिरंगा चौक पासून ते मौलवी गंज नंदि मंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
५१.	प्र.क्र.१३ मधील शोव्हेज स्कूल जवळ कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
५२.	प्र.क्र.१३मधील नंदि रोड पासून बकरदी शेठ यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
५३.	प्र.क्र.१४ मधील प्रकाश पुष्पा अपार्टमेंट किरण बारी यांच्या घरापासून ते ४० गांव रोड नाल्यापर्यंत बंदिस्त गटार करणे.	१३,००,०००/-
५४.	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर येथील कैलास चौधरी ते प्रल्हाद चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२०,३३,४०१/-
५५.	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर भागात अंडरगाऊंड गटार करणे.	१२,५०,०००/-
५६.	प्र.क्र.१४ मध्ये गोपाळ नगर येथे रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
५७.	प्र.क्र.१५ मध्ये महात्माजी नगर बिरारीस यांच्या घरापासून ते खैरनार ते वर्मा यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
५८.	प्र.क्र.१५ मध्ये सुशिल नगर रो.हाऊस रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
५९.	प्र.क्र.१५ मध्ये मित्रकुंज सोसायटी येथील पाटील सर ते धर्मद्रकुमार पंजाबी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१२,५०,०००/-
६०.	प्र.क्र.१५ मध्ये जवाहर नगर बाळू सिंसोदे यांच्या घरापासून संत निरकारी भवन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
६१.	लोंढे यांच्या घरापासून ते लक्ष्मी नारायण प्रो.पाखले यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे.	२०,००,०००/-
६२.	प्र.क्र.१६ मध्ये वसंत सखाराम यांच्या घरापासून ते दशरथ भिल यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१५,००,०००/-
६३.	प्र.क्र.१६ मध्ये रमेश नगर मध्ये कॉक्रीटीकरण रस्ता करणे.	२०,००,०००/-
६४.	मध्ये विखे नगर येथील श्री. राकेश ठाकूर ते चित्ते यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
६५.	प्र.क्र.१७ मध्ये हुडको कॉलनी व श्रीकृष्ण कॉलनी परिसरातील अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
६६.	प्र.क्र.१७मध्ये शिवशक्ती कॉलनी अंतर्गत आर.सी.सी.गटार करणे.	१२,५०,०००/-
६७.	प्र.क्र.१८मध्ये राजेंद्र बागुल यांच्या पुतळयापासून ते ४०गाव रोड (बालू आबा) यांच्या बंगल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
६८.	प्र.क्र.१८ मध्ये श्री.रमेश शिंदे ते श्री सुनिल देसले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	१२,५०,०००/-
६९.	प्र.क्र.१८ मधील शिगाडेवाडी ते हरिभाऊ ओतारी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
७०.	प्र.क्र.१८ मधील पार्वती नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
७१.	प्र.क्र.१९ मध्ये अलेहरा शाळेजवळ पुल बांधणे.	१२,५०,०००/-
७२.	प्र.क्र.१९ मध्ये अलेहरा शाळा ते ४० गांव रोड पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१२,५०,०००/-
७३.	प्र.क्र.१९ मध्ये फैजान बरकत मस्जिद समोर ते रज्जू पठाण च्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-

७४.	प्र.क्र.१९ मध्ये शिफा हॉस्पिटल ते चाळीसगांव रोडपावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	३०,००,०००/-
७५.	अविष्कार कॉलनी भागात ग.नं.१ काझी यांच्या घरापासून ते ग.नं.६ आजम भाई यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.(गल्ली नंबर १ ते ६)	२५,००,०००/-
७६.	सर्व्हे नं.४७४/२ वर्धमान नगर येथे सातभाई यांच्या चक्कीपासून ते विनोद पाटील यांच्या घरापावेतो ते बाळू मंगीडकर यांच्या घरापासून ते ओपन स्पेसपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-
७७.	पुरूषोत्म नगर येथील विनोद मंडपवाले घरसमोरील रस्ता डांबरीकरण करणे.	२४,८२,२१८/-
७८.	अरिहंत मंगल कार्यालय ते विश्वकर्मा नगर पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे.	३०,००,०००/-
७९.	प्रभाग क्रमांक १६ साई कृपा सोसायटी कृष्ण ज्वेलर्स ते धारपुर सर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे व गटार करणे.	२०,००,०००/-
८०.	नॅशनल हायवे ते हिंगलाज माता मंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१०,००,०००/-
८१.	बडगुजर प्लॉट श्वास हॉस्पिटल ते पाटील अंगरबत्तीवाले यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
८२.	प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी बोरसे काका यांच्या घरापासून ते ललीत चव्हाण यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-
८३.	प्र.क्र.१४ मध्ये चाळीसगांव रोड ते सुर्या जीम जवळ ते राजवाडे नाल्यापावेतो डॉ.शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण व बंदिस्त गटार करणे.	३२,००,०००/-
८४.	प्र.क्र.२ मध्ये व्यंकटेश हॉटेल ते देशमुख अपार्टमेंट पावेतो खडीकरण व रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
८५.	प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी येथील नंदू कोकणे ते विजय कापडणीस यांच्या घरापावेतो पाईप गटार व सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे.	२५,००,०००/-
८६.	देवपूर एकविरा देवी मंदिराजवळील अमरधाममध्ये शेड उभारणेबाबत..	३९,९८,७७२/-
८७.	एकता नगर बोर्डपासून नकाणे रोड ते नवजीवन कॉलनीमधून विघ्नहर्ता हॉस्पिटलपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
८८.	प्र.क्र.९ मध्ये पंडीत वाणी यांच्या दुकानापासून ते शंकर माळी यांच्या घरावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१७,५८,४३९/-
८९.	प्र.क्र.४ मध्ये डॉ.बोरकर यांच्या घरापासून ते सेलकर मॅडम यांच्या घरापावेतो ते माणिक डाळवाले हॉस्टेलपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-
९०.	प्र.क्र.3 मध्ये टेलीफोन कॉलनी भागात श्री.निकुंभ यांच्या घरापासून ते श्री.पाटील यांच्या घरापावेतो व श्री.मोरे यांच्या घरापासून ते श्री.खोंडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९४,०००/-
९१.	प्र.क्र.3 मध्ये नेहरू हो.सो.श्री.संकलेचा यांच्या घरापासून ते लक्ष्मी नगर बोर्ड ते श्री.कुलकर्णी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९४,०००/-
९२.	सिंहस्थ नगर बोर्डपासून ते शेलार अॅक्वागार्ड डी.पी.रोडपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
९३.	हाके ते जयभोले किराणापावेतो रस्ता कॉक्रीटकरण व गटार करणे.	२५,००,०००/-
९४.	सर्व्हे नं.जी-24 मध्ये अजबे नगर येथे दिव्या सायकल मार्ट ते डॉ.जैन व प्रशांत वाघ ते मेन्स पार्लरपावेते व मोगल ते शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व गटार करणे.	२५,००,०००/-
९५.	प्र.क्र.10 मध्ये वरखेडी रोड साई ग्राम कॉलनीमधील विनोद गुलाबराव यांच्या घरापासून ते श्री.सुरेश खैरनार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,७२,७४५/-
९६.	प्र.क्र.१७ मधील दगडी चाळ गेटपासून ते शौचालय पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व साई दर्शन कॉलनी चव्हाण यांच्या घरापासून ते श्री.पाटील यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे.	२०,००,०००/-
९७.	प्र.क्र.१७ मध्ये अजाळकर नगर येथे श्री.संजय अजाळकर यांच्या घरापासून ते सैसद वकील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व बंदिस्त गटार करणे.	२४,९८,९००/-
९८.	प्र.क्र.१७ मध्ये दिप नगर दर्गा ते वरावटे सर ते ईशी यांच्या घरापावेतो ते दुध डेअरीपावेतो रस्ता कॉक्रीट व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,५००/-
९९.	प्र.क्र.१५ मध्ये एल.आय.सी कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	५०,००,०००/-
१००.	प्र.क्र.१६ मध्ये श्री.खुशाल बापू पाटील ते वक्रतुंड सोसायटी पावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-

१०१.	प्र.क्र.१६ मध्ये श्री.आखाडे यांच्या घरापासून ते श्री.पवार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे	२५,००,०००/-
१०२.	डोंगर महाराज नगर येथे किरण देशमुख यांच्या घरापासुन ते मनोज डिसा यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे	५०,००,०००/-
१०३.	वलवाडी भागात अंबाजी नगर ते श्री दिक्षीत यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,८७,६३७/-
१०४.	निसर्गउपचार केंद्राजवळील महेश अग्रवाल सिमेंट गोडावन ते रवी वर्मा यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१०५.	प्र.क्र.१४ मध्ये संतोष अग्रवाल यांच्या घरापासून ते अभय नगर बोर्डपावेतो रस्ताडांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
१०६.	श्री.संजय गिरी पहेलवान यांच्या घरापासून ते श्री.मराठे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-
१०७.	डॉ.मनोज जगताप यांच्या घरापासून ते ग्रीन पार्क येथे गटारी करणे.	१२,००,०००/-
१०८.	सुयोग कॉलनी आग्रा रोड श्री.प्रदीप भदाणे ते टागोर कॉलनी ते किशोर कानुगो यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-
१०९.	अॅडविशाल भट जानकी नगर यांच्या घरासमोरील रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-
११०.	प्र.क्र.७ मध्ये पाटील किराणा दुकानापासून ते परदेशी यांच्या घरापावेतो गटारावर रिटर्निंग वॉल बांधणे व स्लॅब टाकणे	४०,००,०००/-
१११.	कैलास नगर येथील श्री.सतिष उगले यांच्या घरापासून ते श्री.राजेंद्र गर्दे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व आर.सी.सी.गटार करणे.(	०९,९५,०६५/-
११२.	प्रभाग क्रमांक १५ मध्ये अरूण कुमारे वैद्य नगर सरदार यांच्या घरापासून ते लंगोटे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
११३.	देवपूर संकल्प कॉलनी बोर्डपासून ते देसले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१८,३७,८८९/-
११४.	प्र.क्र.११ मध्ये पवन नगर भागातील श्री.प्रकाश कोते यांच्या घरापासून ते किशोर बोरसे यांच्या घरापावेते व प्रिती सुधाजी स्कूलपासून ते श्री.भगवान मिस्तरी यांच्या घरापावेतो श्री भैय्या चौधरी यांच्या घरापासून ते श्री.सुरेश काळे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
११५.	डॉ.चेतन पाटील ते चिरंतन हॉस्पिटल संरक्षण भिंत आणि सॅल्ब टाकणे.	१५,००,०००/-
११६.	संभाप्पा कॉलनी येथे श्री.प्रदिप पानपाटील यांच्या घरापासून ते भरत यादबोले यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
११७.	पोलीस चौकी ते गाडूंळ खत प्रकल्पावेतो पोल उभेकरून पथदिवे बसविणे.	२५,००,०००/-
११८.	प्रभाग क्रमांक ९ मध्ये पारोळा रोड श्री.राजू पाठक यांच्या घरापासून ते नगरपट्टी जैन साडीपावेतो एक साईड बंदिस्त गटार करणे.	२०,००,०००/-
११९.	प्र.क्र.९ मध्ये पारोळा रोड किशोर मुंडदा ते नगरपट्टी गावंकरी ऑफिसपावेतो बंदिस्त गटार करणे.	२०,००,०००/-
१२०.	प्र.क्र.१८ मध्ये समता नगर भागात रमेश ड्रॉयव्हर ते शितोळे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१२१.	प्र.क्र.१८ मध्ये लोकरे नगर भागात श्री.भटू पवार यांच्या घरापासून ते नॅनेश साळुंखे यांच्या घरापावेतो गटार करणे.	५,००,०००/-
१२२.	प्र.क्र.७ मध्ये पाडवी सोसायटी जगदीश तनेजा यांच्या घरापासून ते सुशील पोपली यांच्या प्लॉटपावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	५२,००,०००/-
१२३.	दोंदे कॉलनी अंतर्गत श्री.महाले ते गोसावी ते श्री.माळी ते कापडे ते साळुंखे ते श्री.माळी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१२४.	प्र.क्र.१४ मध्ये राधाकृष्ण नगर परिसरात रस्ते डांबरीकरण व अंडरग्राऊंड ड्रेनेज करणे.	२५,००,०००/-
१२५.	कोरके नगर प्लॉट नं.१४ विश्वकर्मा भवनमागे रस्ते डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१२६.	आग्रा रोड मार्गील बोळ चत्रभुज नानजी ते नितिन बंग यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व गटार करणे.	२०,००,०००/-
१२७.	वरखेडी गावातून वडजाई कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे.	८१,४४,४०६/-
१२८.	प्र.क्र.१० मध्ये श्री.अशोक दात्रक ते श्री.रंजनाबाई चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१२९.	प्र.क्र.७ मध्ये संत गाडगेबाब मठापासूनप ते राकेश परदेशी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२०,००,०००/-

१३०.	प्र.क्र.५ मध्ये संभाजी नगर मधील श्री.बोरसे ते श्री.किरण पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-
१३१.	प्र.क्र.६ मध्ये आश्रम शाळा ते राममंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-
१३२.	प्र.क्र.१८ मध्ये शिवाजी राखूडे ते धिवरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
१३३.	प्र.क्र.१८ मध्ये डॉ.सुर्यवंशी ते दिनेश ठाकूर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व गटार करणे.	२५,००,०००/-
१३४.	प्र.क्र.१ मध्ये यशोधन कॉलनी धुडकू पाटील ते ठाकूर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
१३५.	प्र.क्र.१७ मध्ये सानेगुरूजी कॉलनी श्रीलक्ष्मण कदम ते मनोज शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१२,५०,०००/-
१३६.	प्र.क्र.१७ मध्ये विखे नगर मधील अमोल मराठे ते शिर्के यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१२,५०,०००/-
१३७.	प्र.क्र.१८ मध्ये शाम जिरे यांच्या घरापासून ते शितोळे यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे.	२५,००,०००/-
१३८.	प्र.क्र.६ मध्ये राममंदिर ते शिवाजी पुतळापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
१३९.	प्रभाग क्रमांक ७ मध्ये पाडवी सोसायटी जगदीश तनेजा यांच्या घरापासून ते सुशील पोपली यांच्या प्लॉट पावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	५२,००,०००/-
१४०.	जवाहर कुस्ती स्टेडियम नविन बांधकाम करणे.	९९,९८,०००/-

उक्त कामाचे प्रस्ताव सन २०२१-२२ या वर्षात जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर योजने अंतर्गत आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाअंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (अ) दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२०-२१ अंतर्गत लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत मनपा हद्दीतील विविध प्रभागात विकास कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो.यांच्या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. तरी धुळे मनपा हद्दीतील प्रभाग रचनेनुसार प्रभाग क्रमांक १,४,७,१५,१६,१८ हे प्रभाग SC राखीव आहेत. त्यानुसार सदर प्रभागात विकास कामे निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच ५०% पेक्षा जास्त SC लोकसंख्या असणारे २५ भाग आहे. त्या भागात सुध्दा सदर योजनेत कामे समाविष्ट करता येईल. त्यानुसार लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात करणे आवश्सक आहे. त्यासाठी खालील कामे निश्चिती करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम
1.	प्रभाग क्रमांक 1 मध्ये वलवाडी येथील अशोक बैसाणे सर यांच्या घरापासून ते संकल्प कॉलनी बोर्डापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९९,८३२/-
2.	प्रभाग क्र. १ मध्ये इंदिरा नगर भागात लक्ष्मी मंदिरापासून ते साईबाबा मंदिरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१९,९५,६५८/-

3.	प्रभाग क्र १ मध्ये थोरात ताई यांच्या घरापासून ते बि-हाडे ताई यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२४,९५,६१५/-
4.	प्रभाग क्र. १ मध्ये वलवाडी बाबासाहेब आंबडेकर पुतळयाजवळ भाऊलाल वाघ ते बापु गागुर्डे यांच्या घरापावेतो व दैठणकर नगर येथील दिपली बेकरीपासून ते मनोज बैसाणे यांच्या घरापावेतो व विटाभट्टी येथे देवा वाघ ते आशाताई वाघ यांच्या घरापावेतो भुमिगत गटार करणे.	१४, ०८,९६७/-
5.	प्र.क्र.४ मध्ये साने गुरूजी चौकापासून ते लॉ कॉलेजपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	४९,९३,२४७/-
6.	प्र.क्र.४ मध्ये चंदन नगर भागात श्री रवी दुसाने यांच्या घरापासून ते वाणी किराणा दुकानापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५,००,०००/-
7.	प्रभाग क्र.७ मध्ये सुमन पतसंस्थापासून ते चर्चपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,९६,२६५/-
8.	प्रभाग क्र.७ लक्ष्मी नगर येथील संत गाडगेबाबा मठ पासून ते राहूल माने यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे.	९,९८,११४/-
9.	प्रभाग क्र. ७ मध्ये मोगलाई चर्च मागील भागात चर्चपासून ते श्री.जगताप यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९९,५०४/-
10.	प्र.क्र.७ मधील समता नगर येथील मंदिरापासून ते मिलिंद सोसायटीलगत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९८,८५४/-
11.	प्र.क्र.१५ मध्ये भिमनगर येथील शिकलकर यांच्या घराजवळील पुलवार कठडे बांधणे.	७,१४,२०२/-
12.	प्र क्र १५ मध्ये उदयनगर येथे बागुल यांच्या घरापासून ते बैसाणे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१८,००,६२५/-
13.	प्र क्र १५ मध्ये जवाहर नगर मध्ये अरूण वाघ यांच्या घरापासून ते बाविस्कर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१०,००,०००/-
14.	प्रभाग क्र .१५ मधील मारोती मंदिर ते साक्री रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९५,९७९/-
15.	प्र क्र १५ मध्ये अरूणकुमार वैद्य नगर येथे सोनवणे यांच्या घरापासून ते इंगळे ते वानखेडे ते कुलथे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४,९४,७४१/-
16.	प्रभाग क्र.१६ अजबे नगर रामनगर भागतील पंचशील स्तंभापासून ते राम मंदिरपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९९,७०३/-
17.	प्रभाग क्र १६ अजबे नगर ते राम नगर भागातील पंचशील स्तंभ ते छत्रपती चौक ते राम नगर भागात दोन्ही बाजूस गटार करणे.	२४,९९,१७०/-
18.	प्र क्र १६ मध्ये बाहुबली सोसायटी येथील प्रा बैसाणे ताई यांच्या घरापासुन ते गोपाल गोमसाळे यांच्या घरापावेतो काँक्रीट गटार तयार करणे.	४,९९,२८९/-
19.	प्रभाग क्र १६ राम नगर येथील खंडू वाणी ते लताबाई जगताप यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२४,०१,८३८/-
प्रभाग क्र.१८	१८ पिपंळादेवी नगर येथे वंसत भामरे यांच्या घरापासून ते दादाभाई राजपूत यांच्या बंदिस्त गटार व रस्ता कॉक्रीट करणे.	२४,९२,१९३/-

21.	प्रभाग क्र १८ भटाई माता रिक्षा स्टॅप ते खालचे गावातील मारोती मंदिर ते रेल्वे फाटकपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४,९६,००२/-
22.	प्रभाग क्र १८ दंडेवाले भागात श्री.विनोद पवार ते राजू शिकलकर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१४,९२,२३२/-
23.	प्रभाग क्र १८ विठ्ठलमंदिर ते हनुमान मंदिरपावेतो तसेच जय शंकर कॉलनीमध्ये रस्ता डांबरीकरण करणे.	१२,९९,३४०/-
24.	प्रभाग क्र १८ आकाश सुझुकि ते श्री.संदिप गावडे ते श्री.देविदास गावडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	११,२०,२३३/-
25.	प्र.क्र.10 मध्ये गायकवाड चौक येथील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणे.1)कुंदन खरात यांच्या घरापासून त उत्तरेस बडगुजर (चक्की) 2)श्रीराम अहिरे ते गोकूळ चव्हाण 3) विठ्ठल साळवे ते अशोक करंडक 4) नरेश दामोदर ते कौशल्याबाई, महेश चव्हाण ते बापू अहिरे, संदिप खरात, सुनिल माळी ढाक्या ते चिंधु रणदिवे यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
26.	प्र क्र ९ मध्ये गायकवाड उत्तरेकडील बाजु पासून ते सफाई कामगार मेहतर समाज वसाहत पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	५५,०१,८१८/-
27.	निळा चौक भागात किरण जोंधळी यांच्या घरापासुन ते अण्णा साळवे यांच्याघरापावेतो नाल्याकिनारी रस्ता डांबरीकरण करणे.	१९,००,०००/-
28.	प्रभाग क्रमांक 10 मध्ये दादासो गायकवाड चौक येथे नरेश दामोदर विठ्ठल साळवे, महेश चव्हाण, संदिप खरात यांच्या घरापावेतो ड्रेनेजलाईन व बंदिस्त गटार करणे.	२५,००,०००/-
29.	बलवाडी भागातील दिपमाला सोसायटी भागात श्री दिक्षीत यांच्या घरापासून ते प्लॉट नं.45 पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.	१९,००,०००/-
30.	प्र.क्र.7 मध्ये मोगलाई भागात रमापती चौक भैय्या येवले यांच्या घरापासून ते निखील सोनवणे यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट व गटार करणे.	२०,००,०००/-
31.	प्र क्र १५ मध्ये कृष्णकमल कॉलनी भागात राणा प्रो. ते दगडु अमृतकर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२९,००,०००/-
32.	प्र.क्र.9 मधील ग.नं.7 येथे श्री. शाम गवळी ते चर्मकार चौक ते श्री.हरी कांबळे यांच्या घरापावेतो आर.आर.सी. बंदिस्त गटार करणे.	२०,००,०००/-
33.	प्र.क्र.16 मध्ये सत्यसाई बाबा हौसिंग सोसायटी संदिप शिरसाठ यांच्या घरापासून ते शुभम प्रोव्हिजन पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे.	2०,००,०००/-
34.	प्र.क्र.18 मध्ये मोहाडी ललित भाऊ यांच्या घरापासून ते पश्चिमेस प्रमोद सोनवणे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
35.	प्र.क्र.18 मध्ये मोहाडी साहेबराव दौलत ते सार्वजनिक मुतारीपावेतो रस्ता कॉक्रीटकरण व गटार करणे.	२५,००,०००/-
36.	प्र क्र १८ मध्ये सहजीवन नगर येथे सुनील सुराणा यांच्या घरापासुन ते पुष्पक अण्णा ते पप्पु व्यास यांच्याघरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१९,००,०००/-
37.	प्र क्र ४ मध्ये वैभव गावित यांच्या घरापासुन ते नंदु कुलकर्णी यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२०,००,०००/-

38.	प्र क्र १४ मध्ये आण्णाभाऊ साठे नगर भागात कोर्टासमोरील चहाच्या दुकानापासून ते अण्णाभाऊ साठे बोर्डपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	३०,००,०००/-
39.	प्र क्र २ मध्ये नगावबारी परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे. व श्री हनुमान मंदिर ते अष्टकोणी ओटयापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१७,००,०००/-
40.	प्र क्र ६ मध्ये महिंदळे येथे संबोधी नगर भागात श्री बैसाणे यांच्या घरापासुन ते श्री खंडारे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१७,००,०००/-
41.	प्र.क्र.15 मध्ये पोपटाणी यांच्या घरापासून ते भावनानी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१०,००,०००/-
42.	वलवाडी येथील गौतम नगर भागात श्री थोरात यांच्या घरापासुन ते तायडे यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२०,००,०००/-
43.	प्र क्र १३ मध्ये आंबेडकर नगर भागात वाल्मिक बाविस्कर यांच्या घरापासुन ते पिंटू दयाल यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,००,०००/-
44.	भिमनगर भागातील नाल्यावर नाना गोसावी यांच्या घरापासून ते श्री शिकलकर यांच्या घरापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	१९,००,०००/-
45.	दादासाहेब गायकवाड चौक ते उत्तरेस भिल वस्ती ग.न.14 जुने धुळे पर्यंत आर.सी.सी.गटार करणे.	८८,७०,०५०/-
46.	प्र.क्र.१९ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या पुतळापासून ते आखाडे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९९,२११/-
47.	प्र.क्र.1 मध्ये प्रबुध्द कॉलनी / इंदिरा नगर या ठिकाणी सामाजिक सभागृह बांधकाम करणे.	५०,००,०००/-
48.	डॉ.कोळी यांच्या घरापासून ते साळुंखे रावसाहेब यांच्या घराकडुन ते गायत्री नगर प्रभाकर मिस्तरी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-

वरील सर्व विकास कामे प्राधान्यक्रमानुसारच घेण्यात यावे. १ ते ४८ कामे नंबरप्रमाणे देण्यात येत असून १ पासून क्रमाणे कामे घेण्यात यावी व प्रशासनाने तात्काळ मा.जिल्हाधिकारी सो.यांच्याकडेस प्रस्ताव सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४०(ब) दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका क्षेत्रात **नागरी दलित्तेतर योजने अंतर्गत** विकास कामे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील कामे निश्चिती करुन **नागरी दलित्तेतर योजने अंतर्गत** प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकेने सन २०२०-२१ च्या दलित्तेतर वस्ती सुधार योजनेचा आराखडा तयार केलेला आहे. दलित्तेतर वस्तीचे सर्वेक्षण करून खालीलप्रमाणे दलित्तेतर वस्त्यात करावयाच्या

कामांचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्या आराखडयानुसार खालील कामांना या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजित रक्कम
१.	सर्व्हे नं.३६ व सर्व्हे नं.३४/१ येथे सभागृह बांधणे.	९५,४५,८६२/-
२.	ग.नं.७ मध्ये राजू खैरनार यांच्या घरापासून ते भडागे यांच्या घरापावेतो आर.सी.सी.पाईप गटार करणे.	५,९७,४१३/-
३.	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी ग्रामपंचायत ते भैय्या पोलादे यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२४,८२,५०३/-
४.	प्रभाग क्रमांक ७ मध्ये मोहन रेस्टारेंट ते उत्तरेस मुस्लीम कब्रस्थानपावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	६७,६४,९३८/-
५.	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी इंदिरा नगर मध्ये साई बाबा मंदिरापासून ते सार्वजनिक महिला शौचालयपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,५२,९७२/-
६.	सिंचाई कॉलनी,विठ्ठल मंदिरासमोर किशोर जाधव यांच्या घरापासून ते प्रा.पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,९४,३६८/-
७.	धुळे शहरातील पांझरा नदी किनारी सावरकर पुतळा ते पांझरा चौपाटीपावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९९,८४०/-
८.	प्र.क्र.१२ मध्ये माणिक नगर (अंबिका नगर) येथे मिस्बाह मस्जिद ते नाबू शेख यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९३,७३१/-
९.	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रविंद्र मोरे यांच्या घरापासून ते राम मंदिरपर्यंत ते रविंद्र धनगर ते संतोष नवल धनगर यांच्या घरापर्यंत ते प्रकाश निकम ते सुधाकर पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट व गटार करणे.	१९,९८,८५४/-

प्रशासनाने तात्काळ मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडेस प्रस्ताव सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाअंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर धुळे मनपा हद्दीत अनेक प्रमुख डी.पी. रस्ते खराब स्थितीत असून सदर रस्ते हे शहरातील महत्वाचे व अत्यंत वर्दळीच्या परिसरातील रस्ते आहेत. सदर रस्ते नुतनीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी मनपातील नगररचना विभागाकडील जमा होणा-या विकास शुल्कामधून सदर रस्त्यांची कामे बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. सदर कामे महत्वपूर्ण असून सद्यस्थितीत जमा असलेल्या विकास शुल्कातून प्राधान्य क्रमाने

कामे घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. उर्वरीत कामे पुढील जमा होणा-या विकास शुल्क निधीच्या उपलब्धतेनुसार घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४०(क)दिनांक ३०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीत अनेक प्रमुख डी.पी. रस्ते खराब स्थितीत असून सदर रस्ते हे शहरातील महत्वाचे व अत्यंत वर्दळीच्या परिसरातील रस्ते आहेत. सदर रस्ते नुतनीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी मनपातील नगररचना विभागाकडील जमा होणा-या विकास शुल्कामधून सदर रस्त्यांची कामे बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 124 जे (3) मध्ये नमूद केल्यानुसार जमा झालेल्या विकास निधीचा वापर सार्वजनिक सुविधा पुरविण्याकरिता वापरात येईल असे नमूद आहे. तसेच शहरातील खराब झालेल्या डी.पी. रस्त्यांच्या कामाचे नुतनीकरणाचे प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत खालील प्रमाणे सादर करण्यांत आलेले आहे.

यात सद्यस्थितीत जमा असलेल्या विकास शुल्कातून खालील प्रमाणे कामे प्रथम टप्प्यांत घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सर्व प्रस्तावित कामाबाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यांत यावा.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमिंग टॅक पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	८४,४८,०३३/-
२	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमींग टॅक पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी गटार करणे.	९६,९९,९००/-
३	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत १)वाडीभोकर रोड ते ओझोन अॅक्वा पावेतो २) क्षिरे कॉलनी जलकुंभ ते पंचायत समितीच्या मागील बाजूपर्यंत ३)श्री.उपाध्ये ते श्री.बोरसे यांच्या घरापावेतो ४)श्री.जोशी ते नाल्यापावेतोचा रस्ता डांबरीकरण करणेव धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत वाडीभोकर रोड ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे.	६३,६८,४५२/-
४	धुळे मनपा हद्दीतील गायकवाड चौक ते वरखेडी रोड पुलापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे.	९८,००,०००/-
५	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील आग्रा रोड जीटीपी स्टॉप ते श्री.एन.डी.सूर्यवंशी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	६५,३०,९५५/-
६	धुळे मनपा हद्दीतील अरिहंत मंगल कार्यालय ते वडजाई रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेव अरिहंत मंगल कार्यालय ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे.	६३,५९,७९३/-
७	धुळे मनपा हद्दीतील गायकवाडचौक ते वरखेडीरोड पुलापर्यंत बंदिस्त गटार करणे.	४९,७३,०००/-

तसेच खालील कामे पुढील जमा होणा-या विकास शुल्कातून घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.प्रशासनाने निधीच्या उपलब्धतेचा आढावा घेवून टप्याटप्याने निविदा प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

१	धुळे मनपा हद्दीतील ८० फुटी रोड सुभाष चौक ते नटराज टॉकिज पर्यंत डीवायडर ला जाळी बसवून छोटी झाडे लावणे.	४९,९१,०४९/-
२	वरखेडीरोड गांडूळ खत प्रकल्प ते अन्वर नाल्यापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	९८,९२,५००/-

३	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभातनगर बोर्डापासून ते श्री.धरणगावकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	५९,५६,४८४/-
४	अन्वर नाला ते गांव दरवाजा सिध्देश्वरमार्बल पावेतो भागात दोन्ही बाजूस गटार करणे	९७,९२,७१४/-
५	धुळे मनपा हद्दीतील पार्वती नगर व समता नगर भागांत रस्ता डांबरीकरण करणे.	४९,९६,०००/-
६	धुळे मनपा हद्दीतील मालेगाव रोड ते समता नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९५,००,०००/-
७	धुळे मनपा हद्दीतील शासकीय दुध डेअरी रोड ते समता नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	७५,००,०००/-
८	धुळे मनपा हद्दीतील तिरंगा चौक ८० फुटी रोड ते वडजाई रोड पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस पेव्हिंग ब्लॉक बसविणे व डीवायडर ला जाळी बसविणे.	३६,०५,४२९/-
९	धुळे मनपा हद्दीतील रेणुका नगर भागांत रेणुका नगर बोर्डापासून ते तृप्ती प्रोव्हिजन पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	१९,९९,१८१/-
१०	धुळे मनपा हद्दीतील देवपुर भागातील शाहुनगर भागात श्री वसंतराव पवार ते श्री.साळुंखे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे	४३,७४,८४०/-
११	धुळे मनपा हद्दीतील देवपुर भागातील फॉरेस्ट कॉलनी भागात आग्रारोड महादेव मंदिर ते श्री.छगन मिस्तरी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे	४२,५७,३७३/-
१२	धुळे मनपा हद्दीतील साक्री रोड ते रामदास नगर ते सिंधूरत्न शाळे पावेतो रस्ता कॉक्रीट करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे.	७८,१३,३१५/-
१३	धुळे मनपा हद्दीतील मुल्ला जज यांच्या घरापासून ते कोळवले बिल्डींग पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व मुल्ला जज यांच्या घरापासून ते कोळवले बिल्डींग पर्यंत रिटेनिंग वॉल बांधणे.	१,३५,००,०००/-
१४	धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील पाडवी सोसायटी भागांत आग्रा रोड श्रीकृष्ण मंदिर ते श्री.कैलास रोकडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	४४,३४,३६४/-
१५	धुळे मनपा हद्दीतील कोळवले नगर ते सेंटेन्स इंग्लिश मेडियम स्कूल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	७०,००,०००/-

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

मा.महापौर सो. सन २०२०-२१या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत खालील कामे प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (ड) दिनांक ३०/१२/२०२०

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्था अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत खालील नविन कामे प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजित रक्कम
१.	वरखेडी गावात अदिवासी वस्ती जवळील जागेत सभागृह बांधणे.	४९,७९,४४८/-

२.	वरखेडी गावात ग्रंथालय बांधणे.	४८,१०,१०४/-

प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर शासनाच्या नागरी दलित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अवधान गावात पाणी वितरण व्यवस्था सुरळीत करणेकामी वितरण वाहिनी टाकणे व इतरअनुषंगीक कामे करण्यासाठी सन २०१९-२० व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्रस्ताव शासनाकडेस आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर१४०(ई) दिनांक ३०/१२/२०२०

शासनाच्या नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सन २०१८- १९ या वर्षात अवधान गावात ५ लक्ष लिटर क्षमतेच्या जलकुंभ बांधणेच्या कामास यापूर्वीच शासनामार्फत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे. सदरचे काम प्रगती पथावर आहे.सदर भागात जलकुंभाच्या उभारणीनंतर भागात पाणीवितरणासाठी वितरण वाहिन्यांची आवश्यकता आहे. सदरचा भाग हा महामार्गालगत व औद्योगिक वसाहतीचा परिसर आहे. औद्योगिक वसाहतीमुळे भागात सर्वत्र दुषित पाण्याचे स्त्रोत आहेत. त्यामुळे भागातील नागरीकांच्या सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न लक्षांत घेता शुध्द पाणी वितरण व्यवस्था करणे आवश्यक आहे.जलकुंभाच्या उभारणीनंतर वितरण वाहिन्यांच्या कामेही तांतडीने करणे गरजेचे आहे.यासाठी भागाच्या सन्मा.सदस्या सौ.सारिका प्रवीण अग्रवाल यांनी पत्र सादर केलेले आहे.

त्याअनुषंगाने सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात नागरी दलित वस्तीपाणीपुरवठा योजनेअंतर्गत अवधान येथे पाणी वितरण व्यवस्था सुरळीत करणेसाठी वितरण वाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत प्रशासनाने तातंडीने आवश्यक ती पाहणी करुन प्रस्ताव सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात युडी ६ या सहाय्यक अनुदानातून कामातंर्गत खालील कामे निश्चित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (फ) दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिकेअंतर्गत मनपा योजनेतून तसेच शासकीय योजनेतून विविध कामे करण्यांत येतात. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासकीय योजनेतून कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त होत असते. सदरचे काम निश्चितीसाठी महासभेचा ठराव आवश्यक असतो. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात जिल्हा नियोजन मंडळामार्फत यु.डी. ६ या सहाय्यक अनुदानातील कामांसाठी तरतूद केलेली आहे. सदरचे अनुदान शहरातील मंजूर विकास योजनेतील रस्ते बांधणे,गटारी बांधणे,आरक्षणातील भूसंपादन करणे इत्यादी कामासाठी असून यात २३.३३ % अनुदान प्राप्त होतअसते.सदरची कामे मंजूर विकास योजनेतील रस्त्यांची कामे असून खालील कामे सहाय्यक अनुदानाअंतर्गत प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	ग.नं.७ येथे सामाजिक भवन बांधणे.	३९,१२,०००/-
२.	प्रभाग क्रमांक ११ मध्ये ललवाणी मॅडम यांच्या घरापासून ते प्रशांत महाले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
३.	सर्व्हे नंबर ९/१ व ९/२ सुभाष नगर जुने धुळे भागातील येथील रामदास नगर येथील ओपन स्पेसला वॉल कंमाऊंड करणे.	२०,००,०००/-
४.	प्र.क्र.७ येथे मोगलाई देशमुख वाड येथे सामाजिक भवन नुतनीकरण करणे.	२४,९९,०००/-
५.	प्र.क्र.७ मध्ये मोगलाई येथे संत गाडगेबाबा सामाजिक भवन उभारणेबाबत.	२९,३९,३९१/-
६.	सर्व्हे न.४७४/२ वर्धमान नगर येथील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे.	१९,९९,०६६/-
७.	प्र.क्र.१६ मध्ये दक्षता हौसिंग सोसायटी येथे साहेबराव मोरे यांच्या घरापासून ते नंदू देवरे यांच्या घरापावेतो आर.सी.सी.गटार करणे.	२४,९९,०००/-
८.	छत्रपती राजे चौक ते डी.पी.रस्ता पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१५,००,०००/-
९.	प्र.क्र.१० मध्ये माधव कॉलनी भागातील ओपन स्पेस विकसित करणे.	१४,८१,९७४/-
१०.	प्र.क्र.१५ मध्ये विद्याविहार ओपन स्पेस शुभोभिकरण लक्ष्मी नारायण मंदिर ओपन स्पेस मध्ये शुभोभिकरण करणे.	२४,१८,४५८/-
११.	प्र.क्र.६मध्ये जैतोबामहाराज मंदिर येथे वॉलकंपाऊंड व पेव्हरब्लॉक,सुभोभिकरण करणे.	१४,९९,०००/-
१२.	प्र.क्र.२मध्ये आनंद सहकारी बोर्ड व्यायाम शाळा ते मोरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे.	२४,९४,९६५/-
१३.	प्रभाग क्रमांक १६ मध्ये करण चांगरे यांच्या घरापासून ते सोनाजी धनाजी बागुल यांच्या घरापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	१५,००,०००/-
१४.	प्र.क्र.२ मध्ये प्रदिप भदाणे ते मातोश्री बंगला पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९१,२४१/-
१५.	सर्व्हे नंबर१५माऊली नगर जवळ पाथरवटसमाज जवळीलओपनस्पेसलावॉलकंपाउंड करणे.	१९,७३,०००/-
१६.	सुभाष नगर जुने धुळे भागात जुनी भिलाटी येथील घरकुल योजना बिल्डींगच्या मागील जागेत सामाजिक भवन बांधणे.	३५,००,०००/-
१७.	प्र.क्र.७मध्ये रमापती चौक येथील ओपन स्पेसाच्या जागेत मेडीस्टेशन सेंटर उभारणे.	१५,००,०००/-
१८.	प्र.क्र.१८ मध्ये वालचंद्र बापूजी नगर मधील भाऊ कोकणी घरापासून ते बळीराम गवडे	२४,९८,४३२/-

	यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	
१९.	प्र.क्र.१८ मध्ये वालचंद्र बापूजी नगर येथे श्री.निकुंभ यांच्या घरापासून ते आबा सोडावाले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,९४,९६५/-
२०.	प्रभाग क्रमांक १० मध्ये बर्फ कारखाना जानकी नगर,सोनीबाई नगर येथील श्री.राजेंद्र बडगुजर ते रामलाल मराठे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	३३,००,०००/-
२१.	प्र.क्र.७ मध्ये कुमारनगर येथील अंबिका स्टोअरपासून ते जे.के.स्टोअर पावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,८४,४५५/-
२२.	प्र.क्र.७ मध्ये कुमार नगर येथील अमरधाम येथे पेव्हर ब्लॉक व बैठक व्यवस्था करणे.	२५,००,०००/-
२३.	प्र.क्र.२ मध्ये एकता नगर भागात विकास पाटील यांच्या घरापासून ते कुणाल पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे.	२४,९९,०००/-
२४.	प्र.क्र.१ मध्ये श्रमसाफल्य कॉलनी येथे रस्ता डांबरीकरण करणे.	२०,००,०००/-
२५.	महिंदळे येथील सुर्योदय हौ.सो.सर्व्हे नं.७६/३ ब-३ येथे वॉल कंपाऊंड करणे.	१६,६६,३०३/-
२६.	प्रभाग क्रमांक ११ मध्ये पवन नगर येथे रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
२७.	प्रभाग क्रमांक ११ मध्ये स्वामी नारायण कॉलनी येथील नाना वाणी यांच्या घरापासून ऋषीकेश भामरे यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
२८.	प्र.क्र.८ मध्ये निशांत चौक येथे रस्ता कॉक्रीट करणे.	१८,००,०००/-
२९.	प्रभाग क्रमांक ११ मध्ये पवन नगर येथील निलेश महाले यांच्या घरापासून ते त्रिकोणी वाडेकर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
३०.	प्रभाग क्रमांक ११ मध्ये राम नगर शिवनेरी बिल्डींग पासून ते राम मंदिरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२५,००,०००/-
३१.	प्र.क्र.१७ मध्ये मिल परिसरातील श्री.गोविंद लोहार यांच्या घरापासून ते श्री.बच्छाव यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे	२४,९७,६०३/-
३२.	प्र.क्र१७ मध्ये हरीओम कॉलनी भागात श्री.गणेश देशपांडे यांच्या घरापासून ते श्री.चारूदत्त राजपूत यांच्या घरापावेतो ते शरद दिवसे ते चक्कीवाले सोनार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,९७,६०३/-
३३.	प्र.क्र.१७ मध्ये मिल परिसरात अहिल्यादेवी नगर मधील श्री.पिंटू कर्णे यांच्या घरापासून ते श्री अशोक टकले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,८२,८८६/-
३४.	प्र.क्र.७ मध्ये आशा गोपिंचद घाबडा यांच्या घरापासून ते नरेंद्र लेकराज चोहमुरादा यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,४२,०००/-
३५.	प्र.क्र.१७ मध्ये मिल परिसरात शिवशक्ती कॉलनी श्री.राजपूत यांच्या घरापासून ते अरविंद सादरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	२४,८२,८८७/-
३६.	सर्व्हे नंबर १३० देवचंद नगर श्री.पवार यांच्या घरापासून ते श्री.गुलाले यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,८०,०००/-
३७.	प्र.क्र.१५ मध्ये नानक निवासपासून ते वालेच्या यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,४०,०००/-
३८.	प्र.क्र.१५ मध्ये उत्कर्ष कॉलनी मधील गोखले यांच्या घरापासून ते राजू पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,८०,०००/-
३९.	प्रभाग क्रमांक १८ मध्ये भोले बाबा नगर भागात बंदिस्त गटार करणे.	२५,००,०००/-
४०.	प्रभाग क्रमांक १८ मध्ये भोले बाबा नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे.	२५,००,०००/-

याबाबत उक्त कामे मंजूर विकास योजनेअंतर्गत असल्याबाबत खात्री करुन तसेच शासन निकष व कामाची आवश्यकता तपासून तांतडीने प्रस्ताव जिल्हा नियोजन मंडळाकडेस सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर म.अभियंता यांनी सादर झालेल्या अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजने मध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर)अंतर्गत धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारती मध्ये आग प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी म. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (ग) दिनांक ३०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका, धुळे सन २००३ या वर्षात अस्तित्वात आलेली असुन सद्यास्थितीत धुळे शहराची लोक संख्या ४ लक्ष आहे. शहराचा विस्तार-१०१.०८चौ. कि. मी. आहे. धुळे महानगरपालिका अग्निशमन विभागा कडेस सद्यास्थितीत एकुण ०५ अग्निशमन वाहने आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक कायदा २००६-२००९ नुसार शासकीय / निमशासकीय /सार्वजनिक उपक्रमांचे कार्यालय यांचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करणे बंधनकारक करणेत आले आहे.(महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अशंस/०६१२/प्र.क्र. १२९/ नवि -२० मंत्रालय,मुंबई दि. २२ जुन २०१२ नुसार)

धुळे महानगरपालिका शाळा क्र. ०१ येथे बांधणेत आलेल्या नविन प्रशासकीय इमारत मध्ये उंची व क्षेत्रफळ बघता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनीयम २००६ नुसार आग प्रतिबंधक उपाययोजना (हायड्रन्ट सिस्टम,स्मोक डिटेक्टर,फायर अलार्म, फायर एक्सर्टींग्युशर व इ.) करणे आवश्यक आहे.

उक्त प्रमाणे धुळे महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती मध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे करीता एकुण रुपये १,६९,९९,९२०/- मात्रचा खर्च येणार आहे.(डी. एस. आर.मध्ये उपलब्ध साहित्याचे दर अंदाजपत्रकीय दर पत्रकात नमुद केलेले असुन डी.एस. आर. मध्ये उपलब्ध नसलेल्या साहित्याचे दर बाजार दरा प्रमाणे नमुद केलेले आहेत)

सदर अग्निशमन योजना (जिल्हा वार्षीक योजना)अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता रुपये १,७०,००,०००/- मात्रची अर्थ संकल्पीय तरतुद नमुद असुन प्रशासकीय इमारती मध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे करीता येणारा खर्च एकुण रुपये १,६९,९९,९२०/- मात्र येणार असुन महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग पत्र क्र. संकिर्ण - २०१६ /प्र.क्र.२०१५/ उद्योग-४ दि.०१/०९/२०१७मध्ये नमुद नुसार धुळे महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती मध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करणे करीता ई निविदा पध्दतीचा अवलंब करवा लागणार आहे.

म.अभियंता यांनी सादर झालेल्या अहवालानुसार आग प्रतिबंधक उपाययोजना करणे तातडीचे असल्याने सदर योजने अंतर्गत प्रशासकीय इमारती मध्ये आग प्रतिबंधक उपाय योजना करणे करीता रुपये १,६९,९९,९२०/-मात्रचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेमध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत समाविष्ठ करण्यासाठी म.जिल्हाधिकारी सो. यांच्याकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर म.अभियंता यांनी सादर झालेल्या अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजने मध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अग्नीशमन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी धुळे मनपाच्या पांझरा वॉटर वर्क्स येथील जागेतनिवास स्थान बांधणे बाबतच्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून सदरचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजने मध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर)अंतर्गत म.जिल्हाधिकारी सो.यांच्याकडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (ह) दिनांक ३०/१२/२०२०

धुळे शहर हद्द 101.34चौ.मी.आहे.05 जानेवारी 2018 मध्ये धुळे शहर हद्दीत 10 गावांचा समावेश झालेला आहे. धुळे महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत 05 अग्निशमन वाहन उपलब्ध आहे. यासाठी 01 सहा.अग्निशमन ऑफिसर, 03 लीडिंग फायरमन,10 फायरमन, 14 वाहन चालक हेअग्निशमन वाहनांवर उपस्थित असतात.सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेकडे अग्निशमन कर्मचारींसाठी 2 निवासस्थान उपलब्ध आहे.त्यामुळे लिडिंग फायमन,वाहन चालक, फायर ऑफिसर यांना निवासस्थान नसल्याने खूपच अडचणी निर्माण होत असतात. पर्यायाने आग विझविण्यासाठी घरापासून ते अग्निशमन तळापर्यंत पोहोचण्यासाठी उशीर होत असतो. त्याकरीता अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यासाठी निवासस्थान आवश्यक आहे. त्यासाठी धुळे मनपाच्या जागेत पांझरा वॉटर या ठिकाणी 08 निवासस्थान बांधकामासाठी अंदाजपत्रक रु.1,49,75,022/- मात्रचा खर्च येणार आहे.

म.अभियंता यांनी सादर झालेल्या अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजने मध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अग्नीशमन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी धुळे मनपाच्या पांझरा वॉटर वर्क्स येथील जागेत निवास स्थान बांधणेसाठी येणारा खर्च रु. 1,49,75,022/-मात्रला आर्थीक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून सदरचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजने मध्ये अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर)अंतर्गत म. जिल्हाधिकारी सो. यांच्या कडेस प्रस्ताव सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-१०८ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा अंतर्गत शासन अनुदान व विविध योजना तथा अनुदानातील कामे तसेच विकास शुल्कांतील जमा निधीतून करावयाची विकास कामे निश्चित करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. महापौर धुळे महानगरपालिकेस सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्राप्त् होणाऱ्या सर्वसाधारण रस्ता अनुदानातून कामे प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४० (आय) दिनांक ३०/१२/२०२०

शासनाकडून राज्यातील महानगरपालिकाना दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीतील रस्ताची देखरेख, दुरूस्ती, डांबरीकरण व नुतनीकरण इत्यादी अनुषंगीक कामासाठी दरवर्षी विशेष रस्ता अनुदान व सर्वसाधारण रस्ता अनुदान प्राप्त होते. या अनुदानातून शहरातील विविध भागातील अत्यावश्यक रस्त्यांची कामे घेण्यात येतात.

धुळे महानगरपालिकेस सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात एकूण ७५ लाख रूपये अनुदान प्राप्त होणार आहे.

या अनुदानातून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वरखेडी ग्रामपंचायत पासून दक्षिणेस गणराज ॲल्युमिनियम दुकानापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,७३,८७४/-
२.	किरण चौधरी किचन ट्रॉली वरखेडीपासून पश्चिमेस देवनंद पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,५८,२६१/-
३.	वरखेडी संदीप राजधर पाटील घरापासून पश्चिमेस भैय्या पोलादे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९९,२४५/-
४.	वरखेडी दिलीप हिम्मत पाटील यांच्या घरापासून ते दक्षिणेस गोपाळ सुदाम पाटील यांच्या घरापावेतो ते लालचंद मराठे यांच्या घर ते दक्षिणेस गजानन पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९९,८९४/-
५.	वरखेडी गावातील संतोष नवल धनगर यांच्या घरापासून ते उत्तरेस मधुकर गुरव यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,६८,०१९/-
६.	वरखेडी राम मंदिरपासून ते उत्तरेस वारूळे न्हावी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९९,२४४/-
७.	मराठे सर वरखेडी यांच्या घरापासून ते दक्षिणेस शांताराम चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,७३,८७४/-
८.	पाण्याची टाकीपासून ते पुर्वेस प्रविण पाटील मास्तर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,७३,८७४/-
९.	वरखेडी राजेंद्र भदाणे रूतूजा शिवण क्लॉसपासून ते दक्षिणेस घोरपडे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९८,५९४/-

१०.	वरखेडी गोलू चौधरी मंडपवाले यांच्या घरापासून ते अर्जुन न्हावी उत्तर दक्षिण मस्जिद ते दक्षिणेस शेखर मोरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,८४,९३४/-
११.	पंजाब समाज मंदिर ते विक्रम फुलपगारे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,८७,६३६/-
१२.	वरखेडी इंदिरा नगर येथील रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	९,९७,९४४/-
१३.	वैदु वाडा ते सुकलाल माता यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	९,९६,६४४/-
१४.	वरखेडी गुमाला वैदु यांच्या घरापासून ते सुकलाल वैदु यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,८५,५८४/-
१५.	आदर्श धोई समाज व्यायाम शाळा ते समाजमंदिरपावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	९,९७,२९०/-

याबाबत शासन निकष व कामाची आवश्यकता तपासून प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.१९ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या विशेष महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
मंगळवार दिनांक १९ जानेवारी, २०२१
वेळ सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १ (क) (ड) व (ह) अन्वये मा.महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची विशेष महासभा ऑन लाईन पध्दतीने आज **मंगळवार दिनांक १९/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत मधुकर सोनार महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेस ऑन लाईन तसेच ऑफ लाईन पध्दतीने खालील सदस्य गण हजर होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा.श्री.सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	मा.सौ.अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
८	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
९	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
१०	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
११	श्री.बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१२	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------
१३	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१४	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१५	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१६	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१७	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
१८	श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य	----------" ---------
१९	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२०	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२१	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------

२२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२३	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२४	श्रीमती मंडोरे वालीबेन प्रकाशचंद	सदस्या	----------" ---------
२५	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
२६	श्रीमती.जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
२७	श्रीमती.बराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
२८	श्री. पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
२९	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३०	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३१	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
३२	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३४	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
३५	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
३६	श्री. खोपडे दिपक सुरेश	सदस्य	----------" ---------
३७	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
३८	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
३९	श्री. जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
४०	श्रीमती. सोनवणे रेखा नंदु	सदस्या	----------" ---------
४१	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
४२	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
४३	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
४४	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
४५	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
४६	श्री. मोमीन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
४७	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
४८	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
४९	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५०	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. अजीज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्री. गणेश गिरी	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. शांताराम गोसावी	सहा. आयुक्त	----------" ---------
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
७	श्री. दिनकर जाधव	मुख्य लेखाधिकारी	----------" ---------

८	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
९	श्री. के.एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
१०	श्री. एन.पी. सोनार	इस्टेट मॅनेजर	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस ऑनलाईन तसेच ऑफ लाईन उपस्थित मा. आयुक्त सो. उपमहापौर, सन्मा. पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा.सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा. सदस्या सौ.ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील व श्री. विजय बापू जाधव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४१ दिनांक १९/०१/२०२१

सन्मा. सदस्या सौ.ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील व श्री.विजय बापू जाधव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/- X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०९ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(५) मधील तरतुदीनुसार निवृत्त होणा-या सदस्यांच्या जागी नवीन(८)आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या १६ सदस्य निवडीची पहिली सभा दिनांक २ / २ / २०१९ रोजी झालेली होती. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) मधील तरतूदीनुसार स्थायी समितीचे निम्मे सदस्य (८ सदस्य) दिनांक १/२/२०२१ रोजी दुपारी निवृत्त होत आहे. कलम २०(४) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार निवृत्त होत असलेल्या सदस्यांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

अ.नं.	स्थायी समिती वरुन निवृत्त होणारे सदस्यांचे नांव	पक्ष
१	पाटील विमलबाई गोपीचंद	भारतीय जनता पार्टी
२	सोनार सुनिल वसंतराव	भारतीय जनता पार्टी
३	खताळ संतोष छगन	भारतीय जनता पार्टी
४	देवरे सुरेखा भागवत	भारतीय जनता पार्टी
५	पाटील युवराज चैत्राम	भारतीय जनता पार्टी
६	उदासी कशिश गुलशन	भारतीय जनता पार्टी
७	मन्सुरी मुख्तार कासिम	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
८	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	समाजवादी पार्टी

तसेच स्थायी समितीत कायम राहत असलेल्या सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे

अ.नं.	स्थायी समितीत कायम राहत असलेले सदस्यांचे नांव	पक्ष
१	माळी भारती अशोक	भारतीय जनता पार्टी
२	बैसाने सुनिल तुळशिराम	भारतीय जनता पार्टी
३	पाटील मंगला सुरेश	भारतीय जनता पार्टी
४	बोरसे पुष्पा प्रकाश	भारतीय जनता पार्टी
५	मासुळे अमोल पावबा	भारतीय जनता पार्टी
६	देवरे कमलेश नारायण	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
७	पठाण हिना अस्लम	भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस
८	सईद बेग हाशम बेग	एम.आय.एम.

स्थायी समितीचे ८ सदस्य दिनांक १/२/२०२१ रोजी निवृत्त होणार असल्याने स्थायी समितीवर रिक्त होणा-या जागी नवीन ८ सदस्यांची तत्पूर्वी नियुक्ती करणे आवश्यक आहे.

यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम २०(५) नुसार पुढील प्रमाणे तरतूद आहे.

महानगरपालिकेने पोट कलम (३) मध्ये विनिदिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्याच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे अशी तरतूद आहे.

नवीन कौन्सील अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१अ अन्वये स्थायी समितीवर पक्षीय बलाबलानुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन १६ सदस्यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

शासन परिपत्रक जा.क्रं.संकिण २००८/२७६/प्र.क्र.१३/ नवि-३१ दिनांक १५जुलै २००८ नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या पत्रानुसार स्थायी समिती सदस्यांच्या रिक्त होणा-या जागा भरण्याबाबत जे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यता प्राप्त पक्षांचे, गटाचे आघाडीचे किंवा फ्रंटचे आहेत त्याच मान्यता प्राप्त पक्षांचे नॉदणीकृत पक्षाचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेत पक्षांचे /गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.जेणे करुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुदींची पूर्तता होऊ शकेल असे नमूद आहे.

तरी खालील प्रमाणे ८ सदस्यांच्या जागा रिक्त होणार आहे.

१)भाजपा	६
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पाटी	१
३) समाजवादी पार्टी	१

शासन परिपत्रक जा.क्रं.संकिण २००८ /२७६ /प्र.क्र.१३/ नवि-३१ दिनांक १० जानेवारी २००८ नुसार ज्या पक्षांचे सदस्य निवृत्त झालेले आहे त्याच पक्षाचे सदस्य समितीवर नियुक्त करणे अद्यारुत असल्याने नवीन ८ सदस्य नियुक्तीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २० (५) अन्वये नियुक्ती करावयाची आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (५) मधील तरतुदीनुसार निवृत्त होण-या सदस्यांच्या जागी नवीन (८) आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे यासंदर्भात दिनांक १५/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. महापौर सो दालनात सभागृहनेते, विरोधी पक्षनेते व सर्व गटनेत्यांची बेठक घेण्यांत येवून त्यामध्ये अधिनियमातील तरतुदी व शासन

परिपत्रकाची माहिती देण्यांत आली व ज्या पक्षाचे जितके सदस्य स्थायी समिती मधून कमी झाले त्याच पक्षाचे तितके सदस्य त्या पक्षाच्या गटनेत्यांनी नामनिर्देशित करणेबाबत सूचित करण्यांत आले.

त्यानुसार आज विविध पक्षाच्या गटनेत्यांकडून स्थायी समितीवर ८ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत पत्र सादर झालेले आहे.ते मा.महापौर सो यांचेकडेस सुपुर्द करण्यांत येत आहे.

मा. महापौर सो. त्यानुसार खालील प्रमाणे गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे.

१)भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती बालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ६ सदस्यांची नांवे स्थायी
समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	जाधव संजय सुधाकर
२	नवले शितल मोहन
३	बोरसे नागसेन दामोदर
४	कुलेवार किरण राकेश
५	वराडे वैशाली भिकन
६	जाधव बन्सीलाल माणिक

२)समाजवादी पार्टीचे गटनेते श्री. पटेल अमीन अब्दुल करीम यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	पटेल अमीन अब्दुल करीम

३)नॅशनलिस्ट कॉंग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे स्थायी समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहे.

१	चौधरी मंगला अर्जुन

वरील प्रमाणे स्थायी समिती सदस्य पदासाठी गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या ८ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४२ दिनांक १९/०१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(५) मधील तरतुदी नुसार निवृत्त होण-या सदस्यांच्या जागी नवीन (८) आठ सदस्यांची स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे करणे यासंदर्भात दिनांक१५/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.महापौर सो दालनात सभागृहनेते, विरोधी पक्षनेते व सर्व गटनेत्यांची बेठक घेण्यांत येवून त्यामध्ये अधिनियमातील तरतुदी व शासन परिपत्रकाची माहिती देण्यांत आली व ज्या पक्षाचे जितके सदस्य स्थायी समिती मधून कमी झाले त्याच पक्षाचे तितके सदस्य त्या पक्षाच्या गटनेत्यांनी नामनिर्देशित करणेबाबत सूचित करण्यांत आले.

त्यानुसार स्थायी समितीवर ८ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत विविध पक्षाच्या गटनेत्यांकडून आज दिनांक १९/०१/२०२१ रोजी पत्र सादर झालेले आहे.

अ.क्रं	नांव	पक्ष
१	जाधव संजय सुधाकर	भारतीय जनता पार्टी
२	नवले शितल मोहन	भारतीय जनता पार्टी
३	बोरसे नागसेन दामोदर	भारतीय जनता पार्टी
४	कुलेवार किरण राकेश	भारतीय जनता पार्टी
५	वराडे वैशाली भिकन	भारतीय जनता पार्टी
६	जाधव बन्सीलाल माणिक	भारतीय जनता पार्टी

७	चौधरी मंगला अर्जुन	नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी
८	पटेल अमीन अब्दुल करीम	समाजवादी पार्टी

वरील प्रमाणे ८ सदस्य स्थायी समिती सदस्य पदी नामनिर्देशित करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,
सही/- X X X
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११० **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३०(१) व कलम ३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार महिला व बालकल्याण समितीवर मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा(११)महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे.**

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.

धुळे महानगरपालिकेची दिनांक २/२/२०१९ रोजी महासभा होऊन धुळे मनपा ठराव नंबरक ०६ दिनांक२/२/२०१९अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम ३०(१) नुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेसाठी कलम३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून खालील अकरा (११) महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यांत आलेली होती.

यापूर्वी धुळे महानगरपालिका ठराव नंबर ५ दिनांक ३१/१/२००९ नुसार समिती गठीत करणेसाठी ११ सदस्यांची संख्या व एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित करण्यांत आलेला आहे.

महिला बालकल्याण समितीच्या वरील ११ सदस्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ दिनांक १/२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका कलम ३१अ (१) व (२) चे तरतुदी नुसार मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा (११) महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

पक्षीय संख्याबळानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे महिला बालकल्याण समितीवर ११ सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागेल.

१) भारतीय जनता पार्टी धुळे महानगरपालिका ८
२) नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी १
३) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस १
४) ऑल इंडिया मतजलिस इत्तेहद्‌ल मुस्लिमीन पक्ष १

कलम ३०(१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीच्या ११ सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे आवश्यक आहे.

म.महापौर **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम३०(१) व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदी नुसार महिला व बालकल्याण समितीवर मान्यता प्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षांत घेवून अकरा(११)महिला व बालकल्याण समितीचे सदस्यांचे नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेसंदर्भात** दिनांक१५/०१/२०२१ रोजीमा. महापौर सो. यांचे दालनात झालेल्या गटनेत्यांच्या बैठकी अधिनियमातील तरतूदींची माहिती देण्यांत आली आहे. त्यानुसार महिला बालकल्यण समिती सदस्य पदासाठी गटनेत्यामार्फत पत्र महासभेपुढे सादर झालेले आहे.

१) भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या श्रीमती बालीबेन प्रकाशचंद्र मंडोरे यांनी खालील ८ सदस्यांची नांवे महिला बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी सादर केलेली आहेत.

१	थोरात वंदना विक्रम
२	उदासी कशीश गुलशन
३	बागुल लक्ष्मी दिनेश
४	भामरे वंदना संजय
५	भिल निंबाबाई फुलसिंग
६	जाधव शंकुतला शंकर
७	मराठे वंदना राजेंद्र
८	देवरे सुरेखा भागवत

२) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	पिंजारी मदिना समशेर

३) नॅशनलिस्ट कॉग्रेस पक्षांचे गटनेते श्री. देवरे कमलेश नारायण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्यांची नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	शेख शहजहान बी. बिसमिल्ला

४) एम.आय.एम.पक्षाच्या गटनेत्या श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण यांनी त्यांच्या गटातर्फे खालील एका सदस्याचे नांवे महिला बालकल्याण् समिती सदस्य पदासाठी सादर केलेले आहे.

१	अन्सारी सईदा म. इकबाल

वरील प्रमाणे महिला बालकल्याण समिती सदस्य पदासाठी विविध गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या सदस्यांची बालकल्याण समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४३ दिनांक १९/०१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला बालकल्याण समिती गठीत करुन तसेच कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवून यासंदर्भात दिनांक १५/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. महापौर सो दालनात सभागृहनेते, विरोधी पक्षनेते व सर्व गटनेत्यांची बेठक घेण्यांत येवून त्यामध्ये अधिनियमातील तरतुदी व शासन परिपत्रकाची माहिती देण्यांत आली.त्यानुसार महिला बालकल्याण समितीच्या ११ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत विविध पक्षाच्या गटनेत्यांकडून आज दिनांक १९/०१/२०२१ रोजी महासभेत लेखी पत्र सादर झालेले आहे.

अ.क्रं	सदस्यांचे नांव	पक्ष
१	थोरात वंदना विक्रम	भारतीय जनता पार्टी
२	उदासी कशीश गुलशन	भारतीय जनता पार्टी
३	बागुल लक्ष्मी दिनेश	भारतीय जनता पार्टी
४	भामरे वंदना संजय	भारतीय जनता पार्टी

५	भिल निंबाबाई फुलसिंग	भारतीय जनता पार्टी
६	जाधव शंकुतला शंकर	भारतीय जनता पार्टी
७	मराठे वंदना राजेंद्र	भारतीय जनता पार्टी
८	देवरे सुरेखा भागवत	भारतीय जनता पार्टी
९	शेख शहजहान बी. बिसमिल्ला	नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी
१०	पिंजारी मदिना समशेर	भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
११	अन्सारी सईदा म. इकबाल	एम. आय. एम.

वरील प्रमाणे महिला बालकल्याण समितीवर ११ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजूर,

सही/- X X X

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२५ मे २०२१ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह,धुळे
मंगळवार दिनांक २५ मे, २०२१
वेळ सकाळी ११-०० वाजतां

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण२मधील नियम क्रं.१ (क) व (ह) अन्वये मा.महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा ऑन लाईन पध्दतीने आज मंगळवार दिनांक २५/०५/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत मधुकर सोनार महापौर, धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** घेण्यंत आली. त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेस ऑन लाईन तसेच ऑफ लाईन पध्दतीने खालील सदस्य गण हजर होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा.श्री.सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११-०० वाजतां
२	मा.सौ.अपंळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्री.चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	----------" ---------
८	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य्	----------" ---------
९	श्री. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
१०	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
११	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१२	श्री.बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१३	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१४	श्री. दाळवाले कांतिलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१५	सौ.पाटील ज्योस्तना प्रफुल	सदस्या	----------" ---------
१६	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य्	----------" ---------
१७	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
१८	श्रीमती.पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
१९	श्री. पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२०	श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य	----------" ---------
२१	श्रीमती.उबासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२२	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------

२३	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२४	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
२५	श्रीमती महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
२६	श्रीमती चौधरी मंगला अर्जुन	सदस्या	----------" ---------
२७	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
२८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
२९	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३०	श्रीमती.जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३१	श्रीमती.बराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३२	श्री सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३३	श्री. पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
३४	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
३५	श्री. कर्पे प्रदीप बाळासाहेब	सदस्य	----------" ---------
३६	श्रीमती शेख शहजहान बी बिस्मील्ला	सदस्या	----------" ---------
३७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
३८	श्री. पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
३९	श्री. अन्सारी मोहम्मद उमेर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
४०	श्रीमती अन्सारी हमीदाबी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
४१	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
४२	श्रीमती जाधव शंकुतला शंकर	सदस्या	----------" ---------
४३	श्रीमती.पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
४४	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
४५	श्रीमती बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
४६	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
४७	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
४८	श्री. मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
४९	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
५०	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य	----------" ---------
५१	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
५२	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
५३	श्री. मोमीन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
५४	श्रीमती. पिंजारी मविना समशेर	सदस्या	----------" ---------
५५	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
५६	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
५७	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. अजीज शेख	आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां

२	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त	----------" ---------
३	श्रीमती शिल्पा नाईक	उपायुक्त	----------" ---------
४	श्री. शांताराम गोसावी	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
६	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
७	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त	----------" ---------
८	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
९	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
१०	श्री. के.एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
११	डॉ महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. चंद्रकांत जाधव	सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१३	श्री. लक्षमण पाटील	सहा. आरोग्याधिकारी	----------" ---------
१४	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१५	श्री. एन.पी. सोनार	इस्टेट मॅनेजर	----------" ---------
१६	श्री.रमजान अन्सारी.	कार्यालय अधिक्षक	----------" ---------
१७	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु.	----------" ---------
१८	श्री. प्रदीप चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम	----------" ---------
१९	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु.	----------" ---------
२०	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम	----------" ---------
२१	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
२२	श्री. राजेश गायकवाड	लेखापाल मनपा शि.मं.	----------" ---------
२३	श्री. संजय गुजर	औषध निर्माता	----------" ---------
२४	श्री.राजू माईनकर	भांडारपाल	----------" ---------
२५	श्री.किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख	----------" ---------
२६	श्री. प्रसाद जाधव	अति. वि. प्रमुख	----------" ---------
२७	श्री. आत्या राऊत	वाहन विभाग	----------" ---------
२८	श्री. रविंद्र सोनवणे	लिपीक परवाना विभाग	----------" ---------

मा. महापौर आजच्या महासभेस ऑनलाईन तसेच ऑफ लाईन उपस्थित मा. आयुक्त सो. उपमहापौर, सन्मा. पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वांचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले श्रध्दांजलीचा प्रस्ताव

धुळे शहरातील माजी नगरसेविका स्व. अंबाबेन मुलजी मिस्तरी तसेच स्व. श्रीरंग काकड यांचे दु:खद निधन झालेले आहे. दोन्ही नेते उत्तम सामाजिक व राजकीय नेतृत्व म्हणून त्यांनी या शहराच्या सामाजिक क्षेत्रात आपल्या कायर्चकौशल्याने आगळा वेगळा ठसा निर्माण केलेला आहे.तसेच शिरपूर येथील नगरसेवक तपनभाई पटेल यांचे देखील दु:खद निधन झाले आहे.या दिवंगत नेत्यांना आजच्या मे. महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर मनपा धुळे

२)धुळे शहरातील माजी आमदार श्री. धरमचंद्र चोरडिया यांचे दु:ख निधन झाले भारतीय जनता पक्षाच्या जडण घडणात त्यांचा सिंहाचा वाटा होता. एक अभ्यासू व लढावू नेतृत्व म्हणून त्यांनी केलेले राज्य व देश पातळी वरील काम हे उल्लेखनिय ठरलेले होते. त्यांच्यानिधनामुळे भारतीय जनता पक्षाची मोठया प्रमाणावर हानी झालेली आहे. धुळे नगरपालिकेतही नगरसेवक म्हणून त्यांनी केलेले कार्य प्रशंसनीय ठरलेले आहे.अशा महान नेतृत्वास श्रध्दांजली अर्पण करुन शोक ठराव पारीत करावा ही विनंती .

तसेच धुळे नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष व माजी नगरसेवक श्री. दिलीप उमराव जगताप यांचेही दु:खद निधन झालेले आहे. एाक उत्तम सामाजिक व राजकीय नेतृत्व म्हणून त्यांनी या शहराच्या सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्यकौशल्याने आगळा वेगळा ठसा निर्माण केलेला होता.

या दिवंगत नेत्यांना आजच्या महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक:- श्री. हिरामण अप्पा गवळी, नगरसेवक मनपा धुळे

३)धुळे मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.वंदनाताई विक्रम थोरात यांचे वडील माजी सरपंचतोंडी ता. मालेगांव जि. नाशिक कै.दादासाहेब खंडूजी गोबाजी खेमनार यांचा मृत्यू 26/3/2021 आणि लहान भाऊ शहर प्रमुख धनगर समाज युवा मल्हार सेवा धुळे मनपा कै अनिलभाऊ खंडूजी खेमनार यांचे दु:खद निधन दि. 6/4/2021 रोजी झाले आहे.

तसेच धुळे मनपा नगरसेविका श्रीमती मंगलाताई अर्जुन चौधरी यांचे पती सामाजिक कार्यकर्ते कै. दादासाहेब अर्जुन बाबुराव चौधरी यांचे दु:खद निधन दिनांक 12/12/2020 रोजी झाले आहे.

तसेच धुळे शहरातील दानशूर व्यक्तीमत्व कै. तात्यासाहेब श्री. दिलीप उमराव जगताप यांचे दु:खद निधन दिनांक 14/5/2021 रोजी झाले आहे. त्यांनी माजी नगराध्यक्ष नगरपालिका धुळ मा. चेअरमन शिक्षण् मंडळ धुळे मा. चेअरमन जकात समिती नगरपालिका धुळे माजी नगरसेवक नगरपालिका धुळे या पदांवर काम केले होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते तथा युवा उदयोजक श्री.राहुल जगताप श्री. केतन जगताप श्री. दिनेश जगताप डॉ.श्री. राकेश जगताप यांचे वडील होते

तसेच महाराष्ट्रातील राजकारणातील नामांकित व्यक्तीमत्व राज्यसभेचे कॉग्रेसचे खासदार राजीव शंकरराव सातव यांचे दिनांक १६/५/२०२१ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेत आमदार म्हणून दि. 22/10/2009 तें 16/5/2014 पर्यत काम पाहिले तसेच देशाच्या लोकसभेत हिंगोली मतदार संघाचे खासदार 16/5/2014 ते 23/5/2019 पर्यत कामकाज पाहिले होते.सध्या ते राज्यसभेवर खासदार म्हणून काम पहात होते. तसेच भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचें कोअर कमिटी सदस्य होते वरील सर्व दिवंगत नेत्यांना आजच्या महासभेत श्रध्दांजली ठराव पारीत करण्यांत यावा.

तसेच धुळे नगरपालिकेच्या माजी नगरसेविका श्रीमती अंबाबेन मुलजी मिस्तरी यांचे नुकतेच निधन झाले आहे त्यांना देखील आजच्या महासभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

म.महापौर सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार दिवगंत मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४४ दिनांक २५/५/२०२१

मा. महापौर सो.तसेच सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे शहरातील माजी नगरसेविका स्व. अंबाबेन मुलजी मिस्तरी तसेच स्व. श्रीरंग काकड यांचे दु:खद निधन झालेले आहे. तसेच शिरपूरचे नगरसेवक श्री. तपनभाई पटेल यांचे देखील दु:खद निधन झाले आहे.

तसेच धुळे शहरातील माजी आमदार श्री. धरमचंद्र चोरडिया यांचे दु:ख निधन झाले.

तसेच धुळे नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष व माजी नगरसेवक तसेच शिक्ष मंडळाचे माजी चेअरमन श्री. दिलीप उमराव जगताप यांचेही दु:खद निधन झालेले आहे.

तसेच धुळे मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.वंदनाताई विक्रम थोरात यांचे वडील माजी सरपंच कै.दादासाहेब खंडूजी गोबाजी खेमनार यांचा मृत्यू 26/3/2021 आणि लहान भाऊ शहर प्रमुख धनगर समाज युवा मल्हार सेवा धुळे मनपा कै अनिलभाऊ खंडूजी खेमनार यांचे दु:खद निधन दि.6/4/2021 रोजी झाले आहे.

तसेच धुळे मनपा नगरसेविका श्रीमती मंगलाताई अर्जुन चौधरी यांचे पती सामाजिक कार्यकर्ते कै. दादासाहेब अर्जुन बाबुराव चौधरी यांचे दु:खद निधन दिनांक 12/12/2020 रोजी झाले आहे.

तसेच महाराष्ट्रातील राजकारणातील नामांकित व्यक्तीमत्व राज्यसभेचे कॉग्रेसचे खासदार राजीव शंकरराव सातव यांचे दिनांक १६/५/२०२१ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे.

वरील सर्व दिवगंत मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांचे आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत असून तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेला निषेधाचा प्रस्ताव

दिनांक २४/५/२०२१ सोमवार रोजी हिलाल माळी यांनी आकस बुध्दीने व वैयक्तीक व्देषापोटी महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांच्यावर हिन दर्जाचे आरोप पत्रकार परिषदेत केले. महापौर हे धुळें शहराचे प्रथम नागरीक असून त्यांचा कोणताही संबंध नसतांना अशा प्रकारे दोषारोप करुन महापौरांची प्रतिमा जनमानसात मलिन करण्याचा प्रयत्न अत्यंत निषेधजनक आहे. महापौर श्री. चंद्रकांत सोनार हे सुमारे ४० ते ४५ वर्षापासून समाजकारणात व राजकारणात आपआपल्या पध्दतीने यशस्वी कार्य करीत आहेत. कोणताही दुरान्वये संबंध नसतांना अशा प्रकारे बेछुट आरोप करणारे हिलाल माळी यांचा आजच्या मे.महासभेत जाहीर निषेधाचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती

सूचक :- श्री. राजेश ईश्वर पवार, सभागृह नेता मनपा धुळे

याच स्वरुपाची यादी सन्मा. सदस्य श्री. विजय बापू माळी व श्री. संजय शत्रुघ्न भिल, यांनी सादर केलेली आहे.

म.शितल नवले आज जो निषेधाचा ठराव आणलेला आहे त्याला आमच्या प्रभाग क्रं.१७ मधील सर्व नगरसेवकां मार्फत पाठींबा देत आहोत.आपण शहराचे प्रथम नागरीक आहांत कोणताही पुरावा नसतांना आपल्यावर जे आरोप झालेले आहे त्यांचा मी जाहीर निषेध करतो मागच्या दीड वर्षाच्या कार्यकाळा पासून शहरात कोरोना सुरु आहे.आपण या काळात अहोरात्र काम केलेले आहे.कोरोनाच्या काळात आपण प्रेत्येक भागात जावून जनजागृती केली.आपण दिवस रात्र भागात फिरलात व अशा परिस्थितीत आपल्या सर्व कुटुंबाला त्याचा सामना करावा लागला.आपल्या बंधुचे यात निधन झाले. आपल्या पत्नीला देखील या संकटाचा सामना करावा लागला. अशाही परिस्थितीत आपण महापौर पदाला न्याय देऊन जन सामान्यात काम केलेले आहे. या काळात विरोधी पक्षाने काय काम केले.याचा विचार होणे गरजेचे आहे.आपण आपल्या पक्षातर्फे शहराच्या संपूर्ण भागात आपण कोरोना काळातअन्न पोहचविले, पेडची सुविधा, इंजेक्शनची सुविधा आपण धुळेकरांना उपलब्ध करुन दिली. परंतु विरोधी पक्ष त्या काळात अज्ञातवासात होता.आघाडी शासनाच्यामाध्यमातून शिवभोजन दिले. तो जनतेचा पैसा

होता. महापौरांचा कोणताही संबंध नसतांना ते आज महापौरांवर दोषारोप करीत आहे याचा आम्ही सर्व भाजपाचे नगरसेवक निषेध करीत आहोत.

म. महापौर हा निषेधाचा ठराव याठिकाणी आलेला आहे पण हा ठराव घेण्यांची सुध्दा हिलाल माळी यांची पात्रता नाही माझ्यासाठी तो दुर्लक्षित घटक आहे. माझा ज्या गोष्टींशी कोणताही संबंध नाही त्या गोष्टी मला जोडण्यांत आलेल्या आहेत. याठिकाणी माझ्या मुलाला भ्रमरणध्वनी आला व संबंधित इसमाने हिलाल माळी यांच्या नावाचा उल्लेख केला यांत माझ्या मुलाने सांगितले की, या मध्ये हिलाल माळीचेच नांव का आले. शहरातील इतर कोणत्याही नेत्यांचे नांव का आले नाही. एवढाच तो भाग होता. मी स्वत: अशा गोष्टींचा विरोध करतो व याकडे दुर्लक्ष करतो. मला कोणतीही पत्रकबाजी किंवा प्रसिध्दी आवडत नाही. परंतु यांची प्रवृत्ती मला माहिती आहे. केवळ वाद करुन प्रसिध्दी मिळण्यांचा त्यांचा हेतू असतो. हा जो विषय होता मी यापूर्वी पत्रकार परिषद घेवून माझी भूमिका मांडणार होतो. परंतु शहरात व आमच्या सुभाषनगर भागात वाद होवू नये या दृष्टीकोनातून मी माघार घेतली. परंतु हिलाल माळींनी पत्रकार परिषद घेवून व्देष भावनेने व्यक्त्य केले मी महापौर झाल्याचे त्यांना जास्त दु:ख झालेले आहे. जुन्या गोष्टी काढून वाद करण्यांचा प्रयत्न सातत्याने त्यांच्याकडून केला जात आहे. आता पर्यतच्या त्यांच्या राजकीय वाटचाळीत त्यांनी कोणते गैरप्रकार केले याबाबत मला चांगली माहिती आहे. त्यांनी शहरात दहशतीचे राजकारण सुरु केलेले आहे. अनेक निवडणूकांमध्ये आर्थिक व्यवहार केलेला असून पोलीस बांधवांवर तसेच भिल्ल वस्तीवर त्यांनी केलेला हल्ला हा सर्वाना माहित आहे. अशा अनेक गोष्टी आहेत आमचे शहरात सर्वसामान्य नागरीकांशी कोणतेही वाद नाही जे काही वाद झाले ते गुंड प्रवृत्ती विरुध्द झालेले आहेत. आम्ही महिला व सर्वसामान्य नागरीकांचे रक्षण करण्यासाठी काम केलेले आहे. कोणत्याही स्वरुपाची खंडणी वसूल केलेली नाही.यात माझे व त्यांचे वैयक्तीक वाद आहेत. परंतु या वादात त्यांनी शिवसेना पक्षाचा वापर करुन पक्षाला वेठीस धरलेले आहे. पदाधिका-यावर दबाव टाकून त्यांचे दबाव तंत्र सुरु आहे. मी या सर्व बाबींचा लवकरच पदापार्श करणार आहे. कोरोना काळात मला अनेक कांटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागले याही परिस्थितीत त्यांनी मला त्रास देवून माझी मानहानी करण्यांचा प्रयत्न केलेला आहे.मी पुढील काळात याला निश्चितच उत्तर देईन.याठिकाणी निषेधाचा ठराव पारीत करीत असतांना आपण जो पाठींबा दर्शविला त्याबद्दल मी सर्वाचे आभार व्यक्त करतो.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४५ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्यांच्या आलेल्या पत्रानुसार दिनांक २४/५/२०२१ सोमवार रोजी हिलाल माळी यांनी आकस बुध्दीने व वैयक्तीक व्देषापोटी महापौर श्री. चंद्रकांत सोनार यांच्यावर हिन दर्जाचे आरोप पत्रकार परिषदेत केले. महापौर हे धुळें शहराचे प्रथम नागरीक असून त्यांचा कोणताही संबंध नसतांना अशा प्रकारे दोषारोप करुन महापौरांची प्रतिमा जनमानसात मलिन करण्याचा प्रयत्न अत्यंत निषेधजनक आहे.महापौर श्री.चंद्रकांत सोनार हे सुमारे ४० ते ४५ वर्षापासून समाजकारणात व राजकारणात आपआपल्या पध्दतीने यशस्वी कार्य करीत आहेत. कोणताही दुरान्वये संबंध नसतांना अशा प्रकारे बेछुट आरोप करणारे हिलाल माळी यांचा आजच्या सभेत जाहीर निषेध ठराव संमत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा.सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज .

सन्मा.सदस्या सौ.पुष्पाबाई प्रकाश बोरसे, श्री.अनिल रघुनाथ नागमोते, श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे,श्री.बन्सीलाल माणिक जाधव इत्यादी सदस्यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या महासभेत उपस्थित राहू शकत नसल्यान रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४६ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्या सौ.पुष्पाबाई प्रकाश बोरसे, श्री.अनिल रघुनाथ नागमोते, श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, श्री. बन्सीलाल माणिक जाधव इत्यादी सदस्यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या महासभेत उपस्थित राहू शकत नसल्यान रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिकेत नव्याने नियुक्त झालेल्या उपायुक्त श्रीमती शिल्पा नाईक मॅडम यांचे महापौर सो. व उपस्थित पदाधिकारी यांचे हस्ते बुके देऊन स्वागत करण्यांत आले. त्यानंतर उपायुक्त मॅडम यांनी आपला अल्पसा परिचय सभागृहाला करुन दिला.

विषय क्रमांक:-१११ मागील महासभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (७/९/२०१९, १७/९/२०१९, २५/११/२०१९ ३१/१२/२०१९,१७/१/२०२०, १०/६/२०२०,१२/११/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले दिनांक ३११२/२०१९ च्या इतिवृत्तातील विषयामधील बजेटच्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. त्या मिटींग मध्ये आपल्या अभिभाषणात आपण मील परिसरातील जो शेवटचा क्षण असतो त्या ठिकाणी म्हणजे अमरधाम त्या भागातील नागरीक अमरधाम बाबत ब-याच दिवसापासून समस्या मांडत आहेत. त्यांचा पाठपुरावा आम्ही करत आहोत. त्यासाठी 1 कोटी रुपये देतो असे आश्वासन तुम्ही आम्हाला दिले आहे. महापौर महोदय कदाचित ती ओळ टाकण्याचे सुटले असेल ती ओळ जर टाकली तर मी आपला आभारी राहील.

म. महापौर शितलभाऊ त्या भागाच्या अमरधामसाठी आपण संघर्ष केला त्या भागातील सर्व नगरसेवक असतील मागच्या सभेमध्येही मागणी केली. त्यामुळे त्याला आपण अग्रक्रम देण्याचा प्रयत्न केला. म्यु.पल फंडात बजेटमध्ये जर तरतूद केली असती तर ठेकेदाराच्या मागे तुम्हाला फिरावे असते त्यामुळे आपण नगरोत्थान योजनेतून ते काम 75 लाखाचे घेतले आहे.

म. शितल नवले महापौर सो. आपण जे 75 लाख घेतले आहे ते अमरधामसाठी नाही घेतले तिचे दहाव्याच्या कार्यक्रमासाठी व्यवस्था नव्हती आपण ते त्यांच्यासाठी घेतले आहे. आणि एक रस्ता स्मशान भूमीतून जातो तेथे दिवसरात्रा वर्दळ चालू रहाते. त्यासाठी 75 लाखा रुपये ज्या 15 कोटीच्या तरतूदी महासभेने सुचविल्या होत्या त्या अमरधाममध्ये 6 ओटे आहेत. 50 हजार लोकसंख्येच्या वस्तीला 6 ओटे कसे काय पुरतील माझी विनंती आहे सुधारीत बजेट मध्ये तशी तरतुद करावी.

म. महापौर शितलभाऊ उर्वरीत जे ही काही असेल तुम्ही जर एस्टीमेट दिले तर ती तरतूद करुन देईल कारण धुळे शहराचा सर्वात मोठा भाग आहे तो भाग अतिशय सुंदर होण्यांचे तुमचे स्वप्न साकार होणार आहे.

म. हर्षकुमार रेलन — म. महापौर सो.सर्व प्रथम मी मनोज वाघ साहेबांना धन्यवाद देतो माझी प्रत्येक सभेमध्ये मागणी असायची इतिवृत्ताबाबत. तुम्ही सर्व इतिवृत्त देऊन टाकले. यापुढे प्रत्येक मिटींगचे इतिवृत्त वेगवेगळे द्या. कारण एकुण 6 इतिवृत्त आम्ही वाचू शकलो नाही मी फक्त एकच वाचू शकलो. 7/9/2019 च्या मिटींगची त्यामध्ये आपण प्रभाग समिती करता एक विषय घेतला होता प्रभाग समित्या पाहिजे. आपल्या ज वेगवेगळया समित्या आहेत त्या वेळी आपण ठराव पास केला आहे. विषय समित्या लगेच कराव्यात म्हणजे कामात सुसुत्रतायेईल परंतु त्या ठरावावर आज पर्यंतअंमलबजावणी झालेली नाहीमाझी विनंती आहे त्या समित्या जर असत्या तर आपल्याला काम करण असून सोपे झाले असते. मी सुचना करतो दर वेळेचे इतिवृत्त वेळच्या वेळी द्यावे.

म. महापौर — समित्यांचा ठराव करुन प्रशासनाकडे पाठविण्यांत आला आहे.

म.सचिव — प्रभाग समितीच्या ठराव आपण पारीत झाला होता. नियमानुसार त्या प्रभागाचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासाठी प्रस्ताव नगररचना विभागाकडे पाठविला आहे. प्रभाग समितीचे क्षेत्र निश्चित करुन देण्यासाठी त्यांना स्मरण पत्र देण्यांत आले आहे. प्रभाग समितीच्या बाबतीत संबंधित विभागाना पत्र देण्यांत आले आहे परंतु मध्यंतरी कोरोनाच्या काळात ही प्रक्रिया मंदावलेली होती आणि विषय समित्यावर विशेष तज्ञाची नांवे घेण्याबाबत मा. अनुपभाऊनी पत्र दिले आहे. कोरोना थांबल्यानंतर त्यांची कार्यवाही पुढील महिन्यात सुरु करणार आहोत.

म.संजय पाटील — महापौर महोदय, बजेटची महासभा झाली होती त्यामध्ये आपली एक चर्चा झाली होती. हद्दवाढ गावाची जी वसुली होईल त्यांच्या 80 टक्के निधी स्थानिक गावाच्या विकासासाठी वापरला जाईल मला हया बजेट मध्ये त्यांची तरतूद दिसली नाही हद्दवाढ गावासाठी कुठल्याच तरतुदी नाही माझ्या गावाची वसुली 1 कोटी 30 लाख आहे.

म.महापौर — संजुभाऊ आपले एस्टीमेट झालेले आहे. शिंदे सो. हद्दवाढीचा जो पैसा येतो त्यांच काय परिस्थिती आहे आयुक्त सो. यांनी ही त्याला मान्यता दिली की जो निधी त्या गावाच्या विकास कामासाठी वापरण्यात यावा आपण लोकसंख्यानुसार त्यांची रक्कम काढली होती. त्या हिशोबाने आपण केले आहे.

म.संजय पाटील — आपला विषय होता त्या गावाची जी वसुली आहे त्यापैकी 80 टक्के रक्कम त्या गावाच्या विकास कामासाठी खर्च करण्यांत यावा. हद्दवाढ गावाला एक पैसा आला नाही आम्ही प्रस्ताव पाठविले ते आयुक्त सो. यांच्याकडे पोहचले नाहीत.

म. वंदना भामरे — महापौर सो. मागच्या महासभेमध्ये आपण ठराव पारीत करुन घेतला होता. हद्दवाढ गावाचा जो कर वसुल होणार आहे.त्यांच्या 80 टक्के रक्कम गावाच्या विकास कामासाठी खर्च करावी मी त्यांचापाठपुरावा केला मी सभागृहाचे आणि मान्यवरांचे आभार मानते की त्यांनी ठरावानुसार काम देखील केल ज्यांनी ज्यांनी प्रस्ताव सादर केले होते त्यांची त्यांची कामे झाली आहेत. संजुभाऊ आपण तसे प्रस्ताव कदाचित सादर केलेला नसेल त्यामुळे जे काम झालेले नसेलज परंतु प्रत्येक ठरावानुसार आयुक्त सो. आणि महापौर सो. यांनी काम केलेले आहे. आमच्या प्रभाग क्रं. 1 मध्ये जवळ जवळ 2 कोटीचे कामे मंजूर केली आहेत. टेंडर प्लॅश देखील झालेले आहे ते कामे सुध्दा होणार आहत महापौर सो. आयत्यावेळस येणारे जे विषय असतात हद्दवाढ गावाचा 2 महत्वाच्या विषय ती इथे मांडणार आहे मनपात ज्या हद्दवाढ गावाचा विकास आराखडयामध्ये आमचा समावेश झाला नाही.

म.महापौर — हा ठराव पारीत केलेला आहे.

म. वंदना भामरे — हद्दवाढ गावाचा विकास आराखडा झाले नाही ती त्यांचा पाठपुरावा करीत आहे. जर आमच्या भाग विकास आराखडयात आला असता तर जो काही विकास शुल्क आह तो आमच्या गावाच्या विकास कामासाठी वापरता आलाअसता मी जेंव्हा पाठपुरावा करते त्यावळी

आम्हाला असे सांगितले जाते की विकास आराखडा मंजूर नाही मला आयुक्त सो. यांनी शब्द दिला होता की ताई तुमचा संपूर्ण भाग विकास आराखडयात घेतो त्या बाबत मी वारंवार पत्र देखील दिले आहे. अडीच वर्ष झाली तरीह प्रोसेस सुरु झाली नाही ती सुरु करण्यात यावी ज्या वेळेस मनपात आमचे गांव समाविष्ट झाले त्यावेळेस शासनाचे काही नॉम्स असतील रुल असतील त्या गावासाठी काही तरतूद केली आहे का याचेही रुलींगमध्ये स्पष्टीकरण द्यावे.

म. संजय पाटील — आम्ही ताईचे अभिनंदन करतो की हद्दवाढ गावामधील त्यांच्या गावाच 2 कोटीचे टेंडर भरले गेले व ते टेंडर फॅल्स झाले आहे.मग माझ्या गावाची वसुली 1 कोटी 17 लाख रुपये त्यांच्यातून मी 75 लाखाचेच कामे प्रस्तावित केले होते.हल्ली प्रत्ये नगरसेवक तक्रार करतात फायली गायब होतात मग माझ्या 75 लाखाचेच कामाची फाईल चोरी झाली का गायब झाली.

म. महापौर — शिंदे सो. यांच्या फाईली कुठे आहेत ते बघून घ्या नाही तर एस्टीमेट तयार करुन घ्यावें.

म. किरण अहिरराव — हद्दवाढ गावाची कामाची बजेटमध्ये तरतूद नाही असे म्हणतात महिदळेची वसुली 1 कोटी 72 लाख आहे फक्त 40 – 45 लाखाचे कामे प्रस्तावित आहेत.

म. लेखापाल — ग्रामीण भागातील जशी जशी वसुली होईलत्या प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. हद्दवाढ गावातील जमा होणा-या वसुली करातून 80 टक्के कामे घेण्याबाबत ठराव झालेला आहे.

म. राजेश पवार — सन 2020- 21 च्या बजेट मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळयासाठी 5 लाखाची तरतूद केलेली आहे ती अत्यंत कमी आहे. पुढील बजेट मध्ये 50 लाख तरतूद करुन मिळावी ही विनंती.

म.महापौर — सदर तरतूद टोकण तरतूद होती. आपण त्याबाबतचे एस्टीमेट तयार करा. त्यानुसार आपण कार्यवाही करु. मागील महासभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४७ दिनांक २५/५/२०२१

मागील महासभा दिनांक ७/९/२०१९ धुळे मनपा ठराव नंबर ५२ ते ६९ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक १७/९/२०१९ धुळे मनपा ठराव नंबर ७० ते ७१ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक २५/११/२०१९ धुळे मनपा ठराव नंबर ७२ ते ८३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक ३१/१२/२०१९ धुळे मनपा ठराव नंबर ८४ ते १०० अखेर तसेच सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील महापौरांनी दिलेले निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक १७/१/२०२० धुळे मनपा ठराव नंबर १०१ ते १०४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक १०/६/२०२० धुळे मनपा ठराव नंबर १०५ ते १०८ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील महासभा दिनांक १२/११/२०२० धुळे मनपा ठराव नंबर १०९ ते ११२ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११२ महिला बालकल्याण समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे
(३१/१/२०२०, २८/८/२०२०, १४/१०/२०२०, २८/१/२०२१, २३/३/२०२१)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने महिला बालकल्याण समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४८ दिनांक २५/५/२०२१

महिला बालकल्याण समिती सभा दि. ३१/१/२०२०चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठ.नं. १४ ते २० अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महिला बालकल्याण समिती सभा दि.२८/८/२०२०चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठ.नं. १ ते २ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महिला बालकल्याण समिती सभा दि. १४/१०/२०२० चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठ.नं. ३ ते ५ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महिला बालकल्याण समिती सभा दि. २८/१/२०२१ चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठ.नं. ६ ते ९ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच महिला बालकल्याण समिती सभा दि. २३/३/२०२१ चे धुळे मनपा महिला बालकल्याण समिती ठ.नं. १ ते ४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११३ धुळे महानगरपालिकेच्या सभागृह नेतेपदी श्री.राजेश ईश्वर पवार यांना नियुक्ती देण्यांत आली असून सदर बाब सभागृहास माहितीस्तव सविनय सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे व नियुक्ती पत्राचे वाचन केले.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४९ दिनांक २५/५/२०२१

धुळे महानगरपालिकेचे सभागृह नेतेपदी श्री. राजेश ईश्वर पवार यांना जा.क्रं.धुमपा/ स्वीस/ २११ दि. १८/३/२०२१अन्वये नियुक्ती देण्यांत आली असून याबाबत सभागृहास अवगत करण्यांत आले तसेच मा.महापौर व उपस्थित पदाधिकारी यांचे हस्ते बुके देऊन त्यांचे स्वागत करण्यांत आले.

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११४ मा.उपमहापौर सौ.कल्याणीताई सतिष अंपळकर यांनी चाळीसगांवरोड शंभरफुटी रोड येथील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजीराजे चौक असे नामकरण करणेबाबत विनंती पत्र सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमीन पटेल सदर विषयाला माझा विरोध नाही. तथापि सदर ठिकाणी हिंदू मुस्लीम एकता चौक असे नामकरण केल्यास एकतेचा संदेश शहरात निर्माण होईल. त्यामुळे माझ्या विनंतीचा विचार करावा.

म. शितल नवले सदर विषय हा हिंदु धर्मियांच्या अस्मीतेचा विषय आहे.सदर प्रस्ताव कार्यालयीन अहवालानुसार मंजुर करावा.

म. हिरामणअप्पा गवळी सदर प्रस्ताव मंजूर करावा.

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५० दिनांक २५/५/२०२१

मा.उपमहापौर सौ.कल्याणीताई सतिष अंपळकर यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील चाळीसगांवरोड शंभरफूटी रोड येथील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजीराजे चौक असे नामकरण करणेबाबत संदर्भियपत्र प्राप्तआहे.उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्यापपवेतो सदर चौकास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणेसाठी दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी दिली असता मुदतीत एकही हरकत प्रापत झालेली नाही.

सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील चाळीसगांवरोड शंभरफूटी रोड येथील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजीराजे चौक असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११५ मा.खा.डॉ.सुभाष भामरे धुळे यांचे पत्रानुसार श्री.स्वामी नारायण मंदिर ते बायपास रोड पर्यंतच्या नवीन डी.पी. रस्त्यास ब्रम्हस्वरुप प्रमुख स्वामी मार्ग असे नामकरण करणेबाबत सूचित केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.देवेंद्र सोनार सदर विषय अस्मितेचा असून सदर नामकरण करणे ही अतिशय स्वाभिमानाची बाब आहे. श्री. स्वामी नारायण मंदिर ते बायपास रोड पर्यंतच्या नवीन डी. पी. रस्त्यास ब्रम्हस्वरुप प्रमुख स्वामी मार्गअसे नामकरणेस मान्यता द्यावी.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५१ दिनांक २५/५/२०२१

मा.खा.डॉ.सुभाष भामरे धुळे यांचे पत्रानुसार धुळे शहरात नवीन शिखरबध्द मंदिराचे निर्माण झाले आहे. मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी येतअसतात. सदर भविकांना मंदिरात येण्यासाठी आग्रारोड ते नवीन स्वामी नारायण मंदिरापर्यंतच्या डी.पी. रोडचे काम सुरु आहे. या मार्गास ब्रम्हस्वरुप प्रमुख स्वामी मार्ग असे नामकरण करणे बाबत संदर्भिय पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्यापपावेतो सदर रस्त्यास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दै. - या वर्तपत्रात प्रसिध्द करणेत आला असता विहीत मुदतीत कोणतीही हरकत अथवा सुचना प्राप्त झालेली नाही. असा अहवाल प्राप्त झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार श्री. स्वामी नारायण मंदिर ते बायपास रोड पर्यंतच्या नवीन डी.पी. रस्त्यास ब्रम्हस्वरुप प्रमुख स्वामी मार्ग असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११६ सन्मा.सदस्य श्री.युवराज चैत्राम पाटील यांचे पत्रानुसार धुळे शहरातील प्र. क्रं.२९अग्रवालनगर येथील उद्यानाला ज्येष्ठ स्व.पुरणमल बालुराम अग्रवाल उद्यान असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. देवेंद्र सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५२ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्य श्री.युवराज चैत्राम पाटील यांचे पत्रानुसार धुळे शहरातील प्रभाग क्र.29 येथील स.नं.463/1 अ तिरुपती नगर,अग्रवाल नगर येथे ओपनस्पेस आहे.सदरओपनस्पेस येथे वॉल कंपाऊंड करूनउद्यान प्रस्तावित आहे.सदर उद्यानास धुळे शहरातील ज्येष्ठ समाजसेवक स्व.पुरणमल बालुराम अग्रवाल उद्यान असे नामकरण करणे बाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता सदर ओपन स्पेसला अद्यापपावेतो नामकरण झालेले नाही. सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दैनिक दिव्य मराठी दि.05/07/2018 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता श्री.संदीप महेश पाटील,धुळे यांनी हरकती अर्ज दिला आहे. मात्र हरकती अर्जातील जागा व प्रस्तावित नामकरणाची जागा ह्या वेगवेगळ्या असल्याने हरकत लागू होत नाही.

तरी सदरचा विषय मनपा अधिनियम 1949 मधील अनुसुची 'ड' मधील रस्ते या प्रकरणातील 2(1) (अ) नुसार मे. महासभेसमोर फेर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने धुळे शहरातील जुना प्रभाग क्र.29 येथील स. नं. 463/1 अ तिरुपती नगर,अग्रवाल नगर येथे ओपनस्पेस येथे वॉल कपौंड करुन उद्यान विकसीत करण्यांत आलेले आहे. सदर उद्यानास मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे शहरातील ज्येष्ठ समाजसेवक स्व.पुरणमल बालुराम अग्रवाल उद्यान असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११७ सन्मा. सदस्या. अन्सारी सईदा मो. इकबाल यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ मधील इस्लामपुरा बडी जामा मस्जिद जवळील चौकास इमाम अहमद रजा चौक असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हाशम बेग विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५३ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्या. अन्सारी सईदा मो. इकबाल यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ मधील इस्लामपुरा बडी जामा मस्जिद जवळील चौकास इमाम अहमद रजा चौक असे नामकरण करणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर चौकास नामकरण झालेले नाही. तरी उक्त बाबत नागरिकांकडून हरकती व सुचना मागविणेकामी दै. दिव्य मराठी दि.2/2/2020 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकत व सुचना प्राप्त झालेली नाही.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ३ मधील इस्लामपुरा बडी जामा मस्जिद जवळील चौकास इमाम अहमद रजा चौक असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११८ सन्मा. सदस्या श्रीमती मदिना समशेर पिंजारी यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र.१९ मध्ये जामचा मळा भागांतील नवीन बांधण्यात आलेल्या जलकुंभास हजरत मौलाना मजहरुद्दीन जिलानी जलकुंभ असे नामकरण करणेबाबतसूचित केले आहे.यासंदर्भात वृत्तपत्रातून हरकती सुचना मागविण्यांत आलेल्या आहेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. याबाबत काही नागरीकांच्या नामकरण प्रस्तावाबाबत हरकती प्राप्त झालेल्या आहेत. त्या मी सभागृहाच्या पटलावर सादर केलेल्या आहेत.

म. महापौर हा प्रस्ताव विषय पटलावर सादर झालेला आहे. सदर जलकुंभ ज्या जागेत आहे त्या जागेचे मुळ मालक रमजान सुपडू शेख हे होते ते स्वातंत्रयसैनिक असून इंदिरा कॉग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. 40 गांव रेल्वे आणण्यांत त्यांचा मोठा सहभाग होता.त्यांचे नामकरण करणेबाबत नागरीकांनी सुचविलेले आहे. तसेच सदर जलकुंभासाठी जेष्ठ नेते श्री. रोहिदास दाजी पाटील यांनीही निधी उपलब्ध करुन दिलेला असून जलकुंभाच्या भूमिपुजन प्रसंगी रमजान सुपडू शेख यांचे नाव जलकुंभास देणेबाबत सूचित केलेले होते.

म. हिरामणअप्पा गवळी शहराच्या वास्तुंना किवा रस्त्यांना नामकरणासाठी काही शासन निर्णय आहेत का? आपण याठिकाणी कोणत्याही नांवाचा प्रस्ताव सादर करतो. तथापि सदर व्यक्तीचे सामाजिक कार्य पाहणे गरजेचे आहे.त्यासाठी सर्व नामकरण विषय तहकूब ठेवा.

म. महापौर सदर बाब ही भावनेची असते. त्यामुळे प्रस्ताव सादर होतात.

म. प्रतिभाताई चौधरी मी माझ्या प्रभागातील उद्यानाला स्वातंत्रयवीर सावरकर असे नामकरण करण्याबाबत 3 महिन्यापूर्वी पत्र दिलेले होते. परंतु माझा विषय विषय पटलावर आलेला नाही. यात अनेक नामकरणाचे विषय आलेले आहे.आम्ही महिला नगरसेवकांनी प्रत्येक ठिकाणी विषय घेवून फिरायचे का?

म. प्रदीप चव्हाण सदर प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे. त्यावर कार्यालयीन कार्यवाही सुरु आहे.

म. प्रतिभाताई चौधरी याठिकाणी नगरसेवकांचे नातेवाईक यांचे नामकरण करणेबाबत विषय आलेले आहेत. परंतु नामकरण करतांना आपल्या देशातील तसेच समाजातील थोर संत तसेच महापुरुषांचे नांव दिल्यास त्यांचा आदर्श व प्रेरणा नव्या पिढीला मिळू शकेल. यासाठी निश्चित धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे. याबाबत नामकरणासंदर्भात शासनाचे काही निर्देश आहेत का? त्याचाही विचार करावा.

म. भगवान गवळी आजच्या अजेंडयावर एकुण 17 ते 18 विषय नामकरणाचे आलेले आहे. नामकरणाचे प्रस्ताव नगरसेवकांमार्फत सादर होतात. मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने ज्या नगरसेवकांनी नामकरणाचे प्रस्ताव सादर केले त्यांच्याकडून त्यांच्या मानधनातील 3/ 4 महिन्यांचे मानधन महापालिकेत जमा करावे थोर पुरुष व राष्ट्रसंत यांच्या नावाच्या व्यतिरिक्त प्रस्ताव आल्यास नगरसेवकांचे मानधन कपात करावे. ही प्रक्रिया राबविल्यास नामकरण प्रस्तावाबाबत आळा बसु शकेल.

म.साबीरशेठ शासनाच्या निर्देशाप्रमाणे ज्यांनी या समाजासाठी देशासाठी कार्य केलेले आहे त्यांचे नांव देणे योग्य आहे. खाजगी नांवे दयावयाचे असल्यास त्यांनी स्वत:ची जागा तयार करुन किंवा कॉलनी तयार करुन त्याला नांव द्यावे. नामकरणाचे विषय अजेंडयावर येण्यापूर्वी भागातील नगरसेवकांची सहमती घ्यावी. नामकरणाचे विषय तहकूब करा व सर्वांच्या सहमतीने याबाबत निर्णय घ्यावा.

म. महापौर सभागृहाचा कल पाहता सदर नामकरण प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५४ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्या श्रीमती मदिना समशेर पिंजारी यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र.१९ मध्ये जामचा मळा भागांतील नवीन बांधण्यात आलेल्या जलकुंभास हजरत मौलाना मजहरुद्दीन जिलानी जलकुंभ असे नामकरण करणेबाबतसूचित केले आहे.यासंदर्भात वृत्तपत्रातून हरकती सुचना मागविण्यांत आलेल्या आहेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणेबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता सदर नामकरण प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११९ सन्मा.सदस्य सईद बेग हाशम बेग यांचे पत्रानुसार धुळे शहरातील देवपूर भागातील मोहमम्दी नगर आग्रारोड वरील एव्हर स्मार्ट टेलर दुकानापासून ते डॉ. युनुस पटेल यांच्या दवाखान्या पर्यंतच्या रस्त्याचे तसेच शहीद शाह बाबा चौक नामकरणकरणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सईद बेग हाशम बेग विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५५ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्य सईद बेग हाशम बेग यांचे पत्रानुसार धुळे शहरातील देवपूर आग्रारोड ते डॉ.पटेल यांच्या दवाखान्यापर्यंतच्या रस्त्यास नामवंत मल्ल स्व.हाजी सरदार पहेलवान मार्ग व सदर ठिकाणी असणाऱ्या चौकास शहीद शाह बाबा चौक असे नामकरण करणे बाबत संदर्भीय

पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर रस्त्यास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत नागरिकांकडुन हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात प्रसिद्ध केला असता उक्त विषयावर जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट,धुळे यांनी दि.२०/११/२०२० नुसार हरकत नोंदविलेली अआहे. सदर अर्जात त्यांनी सदर मार्गास श्री.झुलाल भिलाजीराव पाटील मार्ग असे नामकरण झाले असल्याबाबत कळविले आहे.

तथापि याबाबत इकडील कार्यालयीन धुमपा/ क्र.१३५/ दि.२१/११/२०२० नुसार शुद्धिपत्रक काढण्यात आले होते.त्यानुसार सदरचा रस्ता हा धुळे शहरातील देवपूर भागातील मोहम्मदी नगर,आग्रा रोडवरील एव्हर स्मार्ट टेलर दुकानापासून ते डॉ. युनुस पटेल यांच्या दवाखान्यापर्यंतच्या रस्त्यास नामवंत मल्ल स्व.हाजी सरदार पहेलवान मार्ग व सदर ठिकाणी असणाऱ्या चौकास शहीद शाह बाबा चौक असे नामकरण करणेबाबत प्रस्ताव महासभेपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे शहरातील देवपूर भागातील मोहम्मदी नगर,आग्रा रोडवरील एव्हर स्मार्ट टेलर दुकानापासून ते डॉ. युनुस पटेल यांच्या दवाखान्यापर्यंतच्या रस्त्यास नामवंत मल्ल स्व.हाजी सरदार पहेलवान मार्ग व सदर ठिकाणी असणाऱ्या चौकास शहीद शाह बाबा चौक असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२० सन्मा. सदस्या मदिना समशेर पिंजारी याच्या पत्रानुसार जामचा मळा ४० गांव रोड परिसरातील गट नं.३१ या भागातील चौकास भारत चौक असे नामकरण करणबाबत विनंती केली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५६ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्या मदिना समशेर पिंजारी याच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील जामचा मळा 40 गांव रोड परिसरातील गट. नं.31 या भागातील चौकास भारत चौक असे नामकरण करणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्यापपावेतो सदर चौकास नामकरण झालेले नाही. तरी उक्त बाबत नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणेकामी दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात प्रसिध्द केली असता विहीत मुदतीत एकही हरकत प्रापत झालेली नाही.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील

जामचा मळा 40 गांव रोड परिसरातील गट. नं.31 या भागातील चौकास भारत चौक असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२१ सन्मा.सदस्य.श्री.संजय सुधाकर जाधव यांचे पत्र दि.०४/०६/२०१९ रोजीच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील सिमेंट पाण्याच्या टाकीला माजी नगरसेविका कै.तुळसाबाई सुकदेवराव दामोदर जलकुंभअसे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.साबीर शेठ सदरचा प्रस्ताव हा माझ्या प्रभागातील आहे. याबाबत मला कोणतीही कल्पना न देता प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. प्रस्ताव सादर करतांना प्रभागातील नगरसेवक म्हणून माझे पत्र तथा सहमतीने घेणे गरजेचे होते. त्यामुळे सदर प्रस्ताव तहकूब ठेवावा.

म. महापौर माजी नगरसेविका तुळसाबाई दामोदर या जेष्ठ नगरसेविका होत्या.आपल्या मागील कार्यकाळात आपण समवेत काम केलेले आहे.तथापि आपले म्हणणे महत्वाचे आहे. आपल्या सहमतीने व पत्रानुसार सदर प्रस्ताव पुनश्च घेण्यांत येईल तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५७ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्य.श्री.संजय सुधाकर जाधव यांचे पत्र दि.०४/०६/२०१९ रोजीच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील सिमेंट पाण्याच्या टाकीला माजी नगरसेविका कै.तुळसाबाई सुकदेवराव दामोदर जलकुंभअसे नामकरण करणेबाबत प्रस्ताव सादर झाला असता प्रस्तावाबाबत त्या भागातील सन्मा.सदस्य श्री.साबीर शेठ यांनी हरकत नोंदविलेली असून त्यांच्या सहमतीने सदर प्रस्ताव पुनश्च सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२२ सन्मा.नगरसेविका शेख मेहरुन्निसा जाकीर यांनी प्रभाग क्रं.१३ मध्ये ८० फूटी रोड परिसरातील असलेल्या शाळा क्रं. ५१ व ५२ येथे सुरु असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे दवाखान्यास हाजी कलीम अन्वर शहा असे नामकरण करणेबाबत विनंती पत्र सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शेख मेहरुन्निसा जाकीर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५८ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.नगरसेविका शेख मेहरुन्निसा जाकीर यांचे पत्रानुसार धुळे महानगरालिका हद्दीतील प्रभाग क्रं. १३ मध्ये ८० फूटी रोड परिसरात असलेल्या शाळा क्रं. ५१ व ५२ येथे मनपा मार्फत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यांत आलेले आहे. तरी सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास हाजी कलीम अन्वर शहा असे नामकरण करणेबाबत कळविलेले आहे. सदर विषयावर हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दै.पुण्यनगरी दि.२२/१२/२०२० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्दी केला असता मुदतीत एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार प्रभाग क्रं.१३ मध्ये ८० फूटी रोड परिसरात असलेल्या शाळा क्रं. ५१ व ५२ येथे मनपा मार्फत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम आलेले असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास हाजी कलीम अन्वर शहा असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२३ सौ. कल्याणीताई सातिष अंपळकर यांच्या दि. 26/1/2020 च्या पत्रानुसार धुळे शहरातील बाराफत्तर ते फाशीपुल १०० फूटी मॉडर्न रस्त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १५९ दिनांक २५/५/२०२१

सौ. कल्याणीताई सातिष अंपळकर उपमहापौर, नगरसेवक श्री. सुनिल बैसाणे, श्री. नागसेन बोरसे, सौ. योगिता बागुल, माजी नगरसेवक श्री.जितेंद्र उंदा शिरसाठ, श्री.विश्वनाथ प्रेमदास खरात व श्री.आनंद सैंदाणे यांच्या पत्रानुसार धुळे शहरातील फाशीपूल १०० फुटी मॉडर्न रस्त्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग असे नामकरण करणे बाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर रस्त्यास नामकरण झालेले नाही. सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा दै.आपला महाराष्ट्र दि.7/10/2018 रोजीच्या वृतपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही.

तरी सदरचा विषय मनपा अधिनियम 1949 मधील अनुसूची ड मधील रस्ते या प्रकरणातील 2 (1) (अ) नुसार मे. महासभेसमोर सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे शहरातील फाशीपूल ते पोलीस कवायत मैदान मुख्य गेट कोप-या पर्यंतच्या रस्त्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२४ मा.महापौर श्री.चंद्रकांत मधुकर सोनार यांनी धुळे मनपाचे असलेल्या जवाहर स्टेडियम येथील आखाडयास धुळे शहरातील नामवंत मल्ल माजी नगरसेवक महाराष्ट्र केसरी स्व.राजधर कोळी पहेलवान आखाडा असे नामकरण करणेस तसेच सदर स्टेडियम मधील पूर्वेकडील प्रेक्षागृहास (गॅलरी) स्व.नरेंद्र(भैय्या) सोनार पहेलवान प्रेक्षागृह तसेच पश्चिमेकडील प्रेक्षागृहास (गॅलरी) स्व.आनंदा बोरसे पहेलवान तसेच दक्षिणेकडील प्रेक्षागृहास (गॅलरी) स्व. विजय (आबा)चौधरी प्रेक्षागृह असे नामकरण करणेबाबत सूचित केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे सदर प्रस्तावाबाबत आपण शहरातील सर्व मल्लांना शब्द दिला होता. याबाबत मी सुध्दा आपणाशी चर्चा केलेली आहे. तथापि सदर स्टेडियमला भारताचे माजी पंतप्रधान जवाहर स्टेडियम असे नामकरण आहे. त्यामुळे त्यांचा आदर ठेवून आपण सदर नाव कायम ठेवून आतील भागातील आखाडा व प्रेक्षागृह गॅलरी यांना नामकरण करणेबाबत सुचविले होते. या प्रस्तावाबाबत मी त्या भागातील स्थानिक नगरसेवक म्हणून आपणाशी चर्चा केलेली होती. यामुळे या प्रस्तावात माझ्या नावाचा उल्लेख होणे अपेक्षित आहे.त्यानुसार प्रस्ताव मंजुर करावा.

म. महापौर याठिकाणी सदर स्टेडियमला यापूर्वी जवाहर स्टेडियम हे आपल्या भारताचे माजी पंतप्रधान यांचे नाव देण्यांत आलेले आहे. सदर प्रस्ताव बदलण्याचा महासभेस अधिकार आहे. तथापि आपण असे केले तर माजी पंतप्रधानाच्या कार्याचा व ज्यांनी नामकरण प्रस्ताव त्यावेळी सुचविला त्या मान्यवरांचा अनादर होईल त्यामुळे आपण शहरातील मल्लांचे आदरस्थान असलेल्या दिवंगत मल्लांचे नामकरण स्टेडियमच्या आतील भागात असलेल्या आखाडयास व प्रेक्षागृह गॅलरीस करण्यांचा प्रस्ताव सादर केलेला आहे. या प्रस्तावात भागातील नगरसेवक श्री.नागसेन बोरसे यांचाही सुचक म्हणून समावेश करावा व प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६० दिनांक २५/५/२०२१

मा.महापौर श्री. चंद्रकांत मधुकर सोनार यांचे पत्र श्री. हिरामण (अप्पा) विठ्ठल गवळी यांचे पत्र तसेच सन्मा. सदस्य श्री. देवेंद्र सोनार, श्री. नागसेन बोरसे यांचे सुचनेनुसार धुळे महानगरपालिके मार्फत शहरातील कुस्ती क्षेत्रासाठी असलेले जवाहर स्टेडियम सद्यस्थितीत नुतनीकरणाचे काम प्रस्तावितआहे.सदर स्टेडियमच्या आखाडयास धुळे शहरातील नामवंत मल्ल माजी नगरसेवक महाराष्ट्र केसरी स्व. राजधर कोळी पहेलवान आखाडा असे नामकरण करणे, तसेच स्टेडियम मधील पूर्वकडील प्रेक्षागृहास (गॅलरी)यास स्व. नरेंद्र(भैय्या)सोनार पहेलवान प्रेक्षागृह, तसेच पश्चिमेकडील प्रेक्षागृहास(गॅलरी) स्व.आनंदा बोरसे पहेलवान प्रेक्षागृह तसेच दक्षिणेकडील प्रेक्षागृहास(गॅलरी) स्व. विजय (आबा) चौधरी प्रेक्षागृह असे नामकरण करणे बाबत संदर्भिय पत्र प्रापत झाले आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले

असता अद्याप पावेतो सदर जवाहर कुस्ती स्टेडियम मधील कुस्ती आखडयास व प्रेक्षागृहास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत नागरीकांकडून 7 दिवसांच्या आंत हरकती व सुचना मागविणेकामी दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रात दि. 20/12/2020 रोजीच्या अंकात प्रसिध्दी देण्यात आली असता विहीत मुदतीत सदर विषयावर एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे मनपाचे देवपूर येथील जवाहर स्टेडियम मध्ये सुरु आलेल्या नुतनीकरणानंतर तयार होणा-या आखाडया धुळे शहरातील नामवंत मल्ल माजी नगरसेवक महाराष्ट्र केसरी स्व. राजधर कोळी पहेलवान आखाडा असे नामकरण करणेस, तसेच तसेच स्टेडियम मधील पूर्वकडील प्रेक्षागृहास (गॅलरी)यास स्व. नरेंद्र (भैय्या) सोनार पहेलवान प्रेक्षागृह, तसेच पश्चिमेकडील प्रेक्षागृहास (गॅलरी) स्व.आनंदा बोरसे पहेलवान प्रेक्षागृह तसेच दक्षिणेकडील प्रेक्षागृहास (गॅलरी) स्व. विजय (आबा) चौधरी प्रेक्षागृह असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२५ सन्मा. सदस्या अन्सारी सईदा मो.इकबाल यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ देवपूर विटाभट्टी नूर मस्जिद समोरील वस्तीला मौलाअली नगर असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सईद बेग हाशम बेग विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६१ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्या अन्सारी सईदा मो. इकबाल यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ देवपूर विटाभट्टी नूर मस्जिद समोरील वस्तीला मौला अली नगर असे नामकरणकरणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्यापपावेतो सदर परिसरास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत नागरिकांकडून ७ दिवसांच्या आत हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दै.दिव्य मराठी दिनांक 17/2/2021च्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता तथापि मुदतीत एकही हरकत व सुचना प्राप्त झालेली नाही.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ देवपूर विटाभट्टी नूर मस्जिद समोरील वस्तीला मौला अली नगर असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२६ सन्मा.सदस्या.सौ.वैशाली भिकन वराडे यांचे दि.११/०६/२०१९ रोजीच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील ८० फूटीरोड व प्राची मेडीकल पासून बडगुजर प्लॉट थेट पारोळारोड या मार्गास व चौकास बुध्दवासी ताईसाहेब सुशिलाताई जोंधळे असे रस्त्यास व चौकास नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६२ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्या.सौ.वैशाली भिकन वराडे यांचे पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील ८० फुटी रोड व प्राची मेडिकल पासून बडगुजर प्लॉट थेटपारोळा रोड या मार्गास व चौकास बुद्धवासी ताईसाहेब सुशिलाताई जोंधळे असे रस्त्यास व चौकास नामकरण करणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर रस्त्यास व चौकास नामकरण झालेले नाही. सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करणेबाबत मा. आयुक्त यांनी तत्वता मान्यता दिलेली आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील ८० फुटीरोड व प्राची मेडिकल पासून बडगुजर प्लॉट थेटपारोळा रोड या मार्गास व चौकास बुद्धवासी ताईसाहेब सुशिलाताई जोंधळे असे रस्त्यास व चौकास नामकरण करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२७ सन्मा. सभागृह नेते श्री.राजेश ईश्वर पवार यांच्या पत्रानुसार मोहाडी गट नं. 23/2 या परिसरास कै.ईश्वर बाबा पवार असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. संजय पाटील विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६३ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सभागृह श्री. राजेश ईश्वर पवार यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं.१८ मोहाडी भागातील गट नं. २३/२ या परिसरास कै. ईश्वर बाबा पवार

असे नामकरण करणे बाबत पत्र प्राप्त आहे. उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर परिसरास नामकरण झालेले नाही.

उक्त बाबत नागरीकांकडून ७ दिवसाच्या आंत हरकती व सुचना मागविणेकामी सदर प्रस्ताव दै. पुण्यनगरी दि. २२/१२/२०२० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आला होता. तथापि उक्त नामकरणाच्या विषयावर एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं.१८ मोहाडी भागातील गट नं. २३/२ या परिसरास कै. ईश्वर बाबा पवार असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२८ सन्मा.सदस्य श्री.सईद बेग हाशम बेग यांच्या पत्रानुसार प्र.क्रं.३ नवरंग कॉलनी येथे नवीन बांधण्यांत आलेल्या जलकुंभास स्व. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जलकुंभ असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सईद बेग हाशम बेग विषय मंजुर करण्यांत यावा.

म. हिरामणअप्पा गवळी नवरंग जलकुंभ येथे झालेल्या नवीन जलकुंभाला यापूर्वी माजी नगराध्यक्ष स्व.राजूअप्पा शिनकर यांचे नामकरण करण्याबाबत प्रस्ताव दिलेला होता. राजूअप्पा शिनकर यांचे कार्य संपूर्ण धुळे शहरास परिचित आहे.त्यांनी सर्व समाजातील नागरीकांसाठी तनमनधनाने कार्य केलेले आहे. माझा राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या नामकरणास विरोध नाही तथापि त्यांचे नांव आपण यापूर्वीच विविध चौक व जागांना दिलेले आहे. त्यामुळे या नवीन जलकुंभास माजी नगराध्यक्ष स्व.राजूअप्पा शिनकर यांचे नामकरण करण्याबाबत विनंती आहे.

म. सुभाष जगताप सदर जलकुंभ नवरंग कॉलनीत उभारण्यांत आलेला आहे.व पूर्वीपासूनच सदर जलकुंभाला नवरंग जलकुंभ हेच नांव प्रचलित आहे. जुना जलकुंभ जिर्ण झाल्याने आपण पाडणार आहोत व तेथे नवीन जलकुंभ करणार आहोत. त्यामुळे नवीन जलकुंभासही पूर्वीचेच प्रचलित नांव नवरंग जलकुंभ हेच कायम ठेवावे अशी विनंती मी त्या भागातील नगरसेवक म्हणून करीत आहे.

म. महापौर सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सभागृहाचा कल पाहता माजी नगराध्यक्ष् स्व. राजूअप्पा शिनकर यांचे कार्य या शहरासाठी अतिशय महत्वपूर्ण व प्रेरणादायी आहे.त्यामुळे सदर जलकुंभास माजी नगराध्यक्ष् स्व.राजूअप्पा शिनकर जलकुंभ असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६४ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्य श्री. सईद बेग हाशम बेग यांनी नवरंग कॉलनी प्रभाग क्रं.३ मध्ये नवीन बांधण्यांत आलेल्या जलकुंभास दिवंगत राष्ट्रपती स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जलकुंभ असे नामकरण करणेबाबत सूचित केले आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर नवीन जलकुंभास नामकरण झालेले नाही.

उक्त बाबत नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणेकामी सदर प्रस्ताव दै. आपला महाराष्ट्र दि .१९/३/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आला होता. तथापि उक्त नामकरणाच्या विषयावर एकही हरकत प्रापत झालेली नाही.

सदर प्रस्ताव चर्चेसाठी मे. महासभेसमोर आला असता सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व केलेल्या उपसुचनेनुसार नवरंग कॉलनी येथील नवीन जलकुंभास माजी नगराध्यक्ष स्व.राजूअप्पा शिनकर जलकुंभ असे नामकरण करण्यांस मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२९ सन्मा. सदस्य सौ.स्नेहल जाधव यांच्या पत्रानुसार प्र.क्रं.7 सिटी सर्व्हे नंबर3549/ ब निरंजन को- ऑप. हाऊसींग सोसायटी मागे अंध शाळेजवळ दिव्यांग व्यक्तींसाठी गार्डन करणेकामी मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. तसेच या प्रस्तावाच मे. महिला वबालकल्याण समिती सभेत तत्वता मान्यता देण्यांत आली आहे. सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या संकल्पनेनुसार सादर झालेला आहे.

म.स्नेहल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. विजय माळी विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६५ दिनांक २५/५/२०२१

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ , सि.टी. सर्व्हे नं. ३५४९/ब निरंजन को. ऑप. हौ.सोसा. मागे अंधशाळे जवळ ओपन स्पेस असलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अंध,अपंग तसेच दिव्यांग व्यक्ती एकत्र जमत असतात. त्यांचा शारीरिक, मानसिक दृष्टीने विकास व्हावा या उद्देशाने अशा सर्व व्यक्तीसाठी गार्डनची सोय करण्यात यावी. तरी सदर कामीचा खर्चास महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत करणे बाबत कळविले आहे.

तरी सदरच्या ठिकाणी समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामीअंदाजपत्रकीय खर्च रु.३८,१०,१८२/-मात्र येणार आहे.सदर कामास महिला बालकल्याण समिती ठराव नं. ७ दि.२८/ १ /२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी उक्त कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु. ३८,१०,१८२/- मात्रला व सदरचे काम करणे कामी मे.महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामाचे एस्टीमेट खर्च रु. ३८,१०,१८२/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३० मा. महापौर श्री.चंद्रकांत मधुकर सोनार यांच्या पत्रानुसार हिंदु हृदयसम्राट शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा पूर्णाकृती पुतळा संतोषी माता मंदिरा समोरील धुळे मनपा हद्दीतील जुने शासकीय रुग्णालय (जुने सिव्हील हॉस्पिटल) साक्रीरोड वरून बस स्टॅन्ड कडे जाणाऱ्या व्ही आकाराच्या जागेत करणेबाबत आलेल्या पत्रावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सदर प्रस्ताव मंजूर करतांना मनाला अतिशय आनंद होत आहे. हिंदुहृदय सम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने मी राजकारणात आलो.मी शिवसेनेच्या माध्यमातून तीन वेळा नगरसेवक झालो. यापूर्वीच आदरणीय बाळासाहेबांचा पुतळा उभारण्याबाबत आमचे मित्र माजी नगराध्यक्ष श्री. महेश मिस्तरी, न्हानूभाऊ परदेशी, संजय गुजराथी, विनोद जगताप, धिरज पाटील भिलेश खेडकर,यांच्या प्रयत्नाने व सुचनेनुसार धुळे महानगरपालिकेच्या नुतन प्रशासकीय इमारतीच्या आवारात करणेबाबत प्रस्ताव मंजुर करण्यांत आला. परंतु तांत्रिक बाबीमुळे सदर प्रस्ताव प्रलंबीत राहिला.तसेच शासनाच्या नवीन निर्णयानुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या आवारात पुतळा उभारण्यांस सद्यस्थितीत प्रतिबध करण्यांत आलेला आहे. तथापि धुळे शहराचे पालक मंत्री आदरणीय अब्दुल सत्तार साहेब यांनी देखील एका बैठकी प्रसंगी माझ्याशी व आयुक्त महोदयांशी चर्चा केली असता संतोषी माता चौकाजवळील जिल्हा सिव्हील हॉस्पीटलच्या त्रिकोणी जागेत पुतळा उभारण्याबाबत सूचित केले व त्यानुसार ठराव केल्यास शासनामार्फत जागा उपलब्धतेबाबत पाठपुरावा करुन निधी उपलब्ध करुन देऊ असे आश्वासित केले त्यानुसार आज माझ्या महापौर पदाच्या कालावधी हा ठराव होत असतांना मला अतिशय आनंद होत आहे.त्यामुळे सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६६ दिनांक २५/५/२०२१

मा.महापौर श्री. चंद्रकांत मधुकर सोनार यांच्या पत्रानुसार आदरणीय हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे संपूर्ण महाराष्ट्राचे हिंदुत्ववादी नेते म्हणून देशात नव्हे तर जगात परिचित होते संपूर्ण देशात व महाराष्ट्रात हिंदुत्वाचा वसा घेऊन त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे स्व.अटल बिहारी वाजपेयी, स्व.मुरली मनोहर जोशी मा.लालकृष्ण अडवाणी,स्व. गोपीनाथजी मुंडे यासारख्या अनेक महनीय व्यक्तींबरोबर त्यांनी हिंदुत्वा बरोबरच समाजकारणाची ज्योत अखंडपणे प्रज्वलित ठेवली या महान व्यक्तिमत्वाचा भावी पिढीला परिचय व्हावा व त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी यासाठी त्यांचा पुर्णाकृती पुतळा धुळे शहरात होणे ही अभिमानाची अत्यावश्यक बाब आहे आम्ही सुरुवातीपासूनच या महान व्यक्तीच्या आदर्श व प्रेरणेमुळेच हिंदुत्वाची वाट स्वीकारलेली होती. भारतीय जनता पक्षाला ही या महान नेत्याचा नेहमीच आदर राहिलेला आहे.देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी सो. यांचेही स्व. बाळासाहेबांशी अनोखे नाते व मित्रत्वाचे संबंध राहिलेले आहेत.स्व. बाळासाहेबांचे स्मारक धुळे शहरात व्हावे यासाठी या जिल्ह्याचे पालकमंत्री मा ना श्री अब्दुल सत्तार साहेब यांनी समक्ष चर्चा करून सूचना केली होती तसेच यासाठी त्यांनी देखील सकारात्मक सहकार्य देण्याचे मान्य केले आहे स्व

बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा जुने सिव्हिल हॉस्पिटल साक्री रोडलगत असलेल्या बसस्टॅंड कडे जाणाऱ्या कोपऱ्यावरील जागेच्या परिसरात करण्यासाठी मे. महासभेच्या विषय पत्रिकेवर विषय घेण्यात यावा तसेच सदर जागा शासकीय असल्याने सदर जागा मागणीचा प्रस्तावही शासनाकडे सादर करण्यासाठी प्रस्ताव विषयपत्रिकेवर घेण्यात आला असता सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा जुने सिव्हिल हॉस्पिटल साक्री रोडलगत असलेल्या बसस्टॅंड कडे जाणाऱ्या कोपऱ्यावरील जागेच्या परिसरात उभारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत तांतडीने जागा मागणीबाबत प्रस्ताव शासनाकडेस सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १३१ राष्ट्रीय महामार्ग क्र.३ ते डि.पी. रोडला जोडणारा रस्ता होणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुभाष जगताप विषय मंजूर करण्यांत यावा.

म.महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६७ दिनांक २५/५/२०२१

मा. महापौर श्री. चंद्रकांत सोनार व मा.आमदार श्री. कुणाल पाटील यांनी मा.मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य यांना धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे देवपूर भागात नवीन झालेल्या स्वामी नारायण मंदिरात राज्यभरातुन, तसेच देश विदेशातुन देखील दररोज भाविक दर्शनासाठी येत असतात व उत्सवाच्या दिवशी तर १० ते १५ हजार भाविक दर्शनासाठी येतात तसेच जिल्हयातील शाळांच्या सहलीदेखील मंदिरात येतात. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.३ ते मंदिराजवळील डि.पी. रोडला जोडणारा रस्ता झाल्यास सर्व नागरिकांचा वाहतुकीचा व मंदिराजवळ होणाऱ्या गर्दी वेळेची पार्किंगचा प्रश्न सुटेल व पर्यटन वाढीला व विकासाला हातभार लागेल याप्रमाणे कळविले आहे व त्याकरीता एकता नगर ते मंदिरासमोरील डि. पी. रोडला जोडणारा शासकिय तंत्रनिकेतनच्या मोकळया बखळ जागेतुन १०० फुट रुंद व सुमारे १०० फुट लांबीचा रस्ता मंजुर होणेस विनंती केली आहे. मा.महापौर,धुळे महानगरपालिका, धुळे यांनी देखील याच संदर्भात शासनास अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यानुषंगाने धुळे शहर मंजुर विकास योजना (दुसरी सुधारीत) हि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये दि.५ जुलै २०१५ रोजी मंजुर झाली असून त्यात मागणी केलेली जागा ही सार्वजनिक निम सार्वजनिक विभागात समाविष्ट आहे.

धुळे शहराच्या मंजुर विकास योजना आराखडयात शासकीय तंत्र निकेतनच्या जागेतुन प्रस्तावित १००फुटी रस्ता दर्शविलेला नसल्याने धुळे महानगरपालिकेस सद्य:स्थितीत त्याचे अधिग्रहन/विकसन करता येणे शक्य नाही.

सदरच्या रस्त्याचे विकसन करावयाचे असल्यास विकसनापूर्वी सदर १०० फुटी रस्ता विकास आराखडयात दर्शविण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच याबाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ [१AA(a)] नुसार शासन स्तरावर शासकीय तंत्र निकेतनच्या जागेतुन लोकहिताच्या

दृष्टीकोनाने सदरचा १०० फुटी रस्ता विकास आराखडयात दर्शविण्याबाबत कार्यवाही करता येणे शक्य आहे.

वरील तरतुदींचा विचार होऊन पुढील कार्यवाही करणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही होणेस व शासकीय तंत्रनिकेतनची जागा धुळे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेत आला होता.

शासन पत्रात प्रस्तुत प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ चे विकास रस्त्याला जोडणारा नवीन १५.० मी रुंद विकास योजना रस्त्याबाबत कलम ३७ अन्वये संपुर्ण वैधनिक कार्यवाही पार पाडून प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत नमुद केले आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार धुळे शहर मंजुर विकास योजनेतील नव्यात स.क्र.७० मधुन १५.० मी विकास योजना रस्ता प्रस्तावित फेरबदलास धोरणात्मक निर्णय असल्याने सदर विषय मे. महासभेपुढे ठेवणेस मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे.सदर मे. महासभेपुढे कलम ३७ (१) कार्यवाहीसाठी किरकोळ फेर बदल करणेसाठी सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावा सदर १०० फुटी रस्ता विकास आराखडयात दर्शविण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषयक्रमांक:- १३२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्रास पर्यायी जागा देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सदर प्रस्ताव हा शहरातील जेष्ठ दलित नेते ढिवरे जिभाऊचा जागा मागणीचा आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक व राजकीय कामासाठी दिलेले आहे.त्यांच्या अध्ययन केंद्रामार्फत अनेक कार्य त्यांनी या शहरात केलेले आहे. श्री.ढिवरे जिभाऊ यांना पर्यायी जागा देणेबाबत प्रशासनामार्फत प्रस्ताव आलेला असून त्याप्रमाणे त्यांना पर्यायी जागा देणेबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

म. नागसेन बोरसे दादासाहेब अध्ययन केंद्रासाठी तत्कालीन नगरपालिका असतांना १९८१ मध्ये जागा दिलेली होती. या प्रस्तावात त्यांनी ४ ठिकाणी जागा मागितलेली आहे. परंतु तेथे प्रशासनाने जागा नाकारली आहे.सदर अध्ययन केंद्र हे धुळे शहरातील दलित चळवळीचे मोठे केंद्र होते. मी लहानपणापासून तेथील सामाजिक कार्याशी परिचित आहे.अनेक ग्रामीण भागातील नागरीकांना न्याय देण्यांचे काम या केंद्रामार्फत ढिवरे जिभाऊंनी केले आहे. आपण असे चळचळीचे केंद्र काढून टाकलेले आहे. प्रशासनाने जी टिपणी ठेवलेली आहे ती चूकीची आहे. सदर केंद्रासाठी शहरातील मध्यवर्ती भागातील जागा उपलब्ध करुन देणे व बांधून देणे याबाबत सन २००४ मध्ये शासनाने देखील पत्र दिलेले आहे. परंतु त्यावर अद्याप पावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही.तरी जागा देण्याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी.

म. महापौर धुळे शहराला जिभाऊंचा आदर आहे.परंतु महानगरपालिकेच्या जागा देणेसंदर्भात काही नियम आहे आपण प्रशासनाच्या अहवालाच्या विरुध्द निर्णय घेवू शकतो का?

म. नागसेन बोरसे शासनाने सन २००४ ला आपल्याला पत्र दिलेले आहे. प्रबोधनकार ठाकरे संकुल येथे अनेक व्यापा-यांनी गाळे ताब्यात ठेवलेले आहे. प्रत्येक पक्षाचे कार्यालय तेथे आहे. मग तेथे अध्ययन केंद्रासाठी जागा का देण्यांत येत नाही. त्यांच्यावर हा अन्याय आहे.

म. वंदनाताई भामरे मी सुध्दा याबाबत आपणास ७- ८ महिन्यापूर्वी पत्र दिलेले होते. तरी त्यावर कार्यवाही नाही. नागसेन भाऊंच्या प्रस्तावानुसार कार्यवाही झाली पाहिजे.

म. महापौर मी आपल्या मताशी सहमत आहे परंतु कार्यालयीन टिपणीत याठिकाणी लेनीन चौक येथील शाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील जागा देणेबाबत नमूद आहे.त्याठिकाणी नाममात्र दरामध्ये जागा द्यावयाची आहे. जर प्रबोधनकार ठाकरे संकुलात जागा द्यावयाची झाल्यास सदर संकुल आयडीएसएसएमटी स्कीम मधील असल्याने शासकीय बाजार भावाप्रमाणे दर लागू करावे लागतील. त्यामुळे कायदयाच्या चौकटीत आपल्याला सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावयाचा आहे. जर नवीन जागा द्यावयाची असल्यास फेर प्रस्ताव घ्यावा लागेल.

म. नागसेन बोरसे लेनीन चौकाची जागा कोणत्या स्कीम मध्ये आहे तेथेही शॉपींगच आहे.

म. महापौर त्याठिकाणी काही मोकळी जागा उपलब्ध आहे. त्याठिकाणी नाममात्र दरावर जागा देणेबाबत विचार करता येईल. तसेच जुन्या महापालिकेतील सचिव कार्यालयाच्या लगतच्या जागेत लोकमान्य टिळकांचा पुतळा स्थलांतर करणेबाबत यापूर्वीच ठराव झालेला आहे. आपणही याबाबत आयुक्त सो. ढिवरे जिभाऊ व आपल्या सर्व नगरसेवकांची एकत्रित बैठक घेवून जागेबाबत योग्य पर्याय काढण्यांत येईल.सदर कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कर्मविर दादासाहेब गायकवाड, बहुउद्देशीय शैक्षणिक सांस्कृतीक मंडळ, धुळे. यांना पर्यायी जागा देणेबाबत पुनश्च पडताळणी व चर्चा करुन प्रशासनाने नियमानुसार निर्णय घ्यावा.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६८ दिनांक २५/५/२०२१

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्रास पर्याय जागा व नुकसान भरपाई मिळणेबाबत मे. महासभेत विषय ठेवला असता (ठराव क्र. १११ दि.२९/९/२००५) सदर विषय तहकुब ठेवण्यात आला आहे. त्यासंदर्भात खालील प्रमाणे पर्यायी जागा सुचविण्यात आलेले आहे.

	जागा मागणी	शेरा
१.	प्रबोधनकार ठाकरे संकुलातील २ गाळे .	उक्त गाळे हे IDSMT अंर्तगत बांधकाम करण्यात आल असून उक्त गाळे हे बाजार विभागा मार्फत भाडे तत्वावर वाटपाची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार बाजार विभागाचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करणे उचित होईल.
२.	जुन्या नगरपरिषेद जवळ १० ते १५ वर्षा पासुन बंद पाण्याच्या टाकीची जागा तेथे बांधकाम करुन मिळावे.	अध्यक्ष मे. सुमन फाऊंडेशन धुळे यांना धुळे मनपा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व्यापारी संकुल व शौचालय यांच्या मधील कोप-याची जागा धुळे महानगरपालिका ठराव क्र. १२६ दि. १७/६/२००८ अन्वये अटी व शर्ती कायम ठेऊन मंजूरी

		देण्यात आली आहे. त्यानुसार जागा उपलब्ध नाही.
३.	जुन्या नगरपरिषदेतील रिक्त झालेल्या कार्यालयातील एक हॉल .	मनपाच्या जून्या इमारतीत आरोग्य विभाग, एल.बी.टी., अभिलेख विभाग, मलेरीया विभाग, प्रकल्प वि भाग, सुतीका गृह व मालमत्ता कर विभाग अर्धा भाग धुळे नगररचना विभाग इ. कार्यालय सुरू आहे. त्याअनुषंगाने जागा शिल्लख नसल्याने जागा देता येत नाही.
४.	जुन्या नगरपरिषदेजवळ खाऊ गल्ली येथे बांधकाम चालू आहे तेथे दोन दुकाने बाधुन मिळावेत.	सदर खाऊ गल्लीचे काम हे बांधकाम विभागा मार्फत होत आहे. त्यानुसार बांधकाम विभागाचा अहवाल घेवुन पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

संदर्भ पत्र क्र. २ अन्वये शासनाने कर्मवीर दादासाहेब गायकवाड, बहुउद्देशीय शैक्षणिक सांस्कृतीक मंडळ, धुळे यांना पर्यायी जागा तात्काळ देणे बाबतची कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे.

वरील पैकी जागा देण्याबाबत प्रस्ताव मे महासभेत ठेवण्यास मा. आयुक्त सो यांनी मान्यता दिली आहे. सुचविलेल्या जागा पैकी लेनीन चौकातील अण्णाभाऊ साठे संकुलातील जागा सुचविण्यात येत आहे. त्यानुसार सदर जागा अथवा मे. महासभा ठरवेल त्याप्रमाणे जागा निश्चिती होण्या करीता सदर विषय महासभे पुढे सादर झालेला आहे.

सदर कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कर्मवीर दादासाहेब गायकवाड, बहुउद्देशीय शैक्षणिक सांस्कृतीक मंडळ, धुळे. यांना पर्यायी जागा देणेबाबत पुनश्च पडताळणी व चर्चा करुन प्रशासनाने नियमानुसार निर्णय घ्यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३३ शाळा क्र.२५ येथील एक खोली विद्यार्थ्यांच्या लायब्ररीकरीता मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. वसीम अन्सारी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १६९ दिनांक २५/५/२०२१

अतुल उलेमा-हिंद या संस्थेने व मा.आमदार श्री.शाह फारुख अन्वर व इतर नगरसेवक व नगरसेवीका, विरोधी पक्ष नेता, गटनेता यांनी दि. 22 व 23/02/2021 रोजी पत्र देवुन ही सामाजिक संस्था असुन देश आणि समाजाचे विकासासाठी सदैव कार्यरत आहे. देशाचे विकास हे युवा, विद्यार्थ्यांचे शिक्षणास जुडलेली बाब आहे. शासन देखील शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे.मुस्लिम अल्पसंख्यांक समाज हा शिक्षणाच्या अभावामुळे मुख्यधाऱ्याशी दुरावला आहे. सदर समाजाचे शैक्षणीक विकासाकरीता शासन देखील प्रयत्नशील आहे. त्यांचे ती अज्ञाता दूर करुन समाजातील युवा, विद्यार्थ्यांना मुख्य धारेत आाणुन देशाच्या सर्वांगीण विकासात हातभार लावणे अत्यावश्यक आणि न्यायोचित आहे.

महानगरपालिकेतर्फे गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षणाची सोय म्हणुन मनपा शाळा चालविल्या जातात. तथापी दुर्देवाची गोष्ट आहे की सदर गोर-गरीब अल्पसंख्यांक समजातील

विद्यार्थ्यांसाठी शहरात योग्य व त्यांना सुरक्षित वाटेल अशी एकही लायब्रेरी व स्टडी रुमची सोय नाही. हजारो विद्यार्थी हे अत्यंत गरीब परीवारातुन येतात. त्यांना राहण्यास पुरेशी जागा नाही.मोठया प्रमाणात लोक झोपडपट्टीत लहान-लहान घरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना शांतात पुर्व वातावरण उपलब्ध नाही. म्हणुन सदर विद्यार्थ्यांना अभयासात अनेक त्रास सहन करावे लागते. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवुन ते दर्जेदार शिक्षण आणि परीणामी मुख्यधारेशी दुर होतात. सदर बाब विचारात घेवुन जमिअतुल उलेमा हिंद, धुळे अशा गरजु गोर-गरीब विद्यार्थ्यांना अभ्यासाठी शांततापुर्व वातावरण आणि लायब्रेरीची सोय करण्याचे प्रयत्न करीत आहे.

मौलवीगंज परीसरात मनपा मालकीच्या शाळा क्र. 25 येथे समाज मंदिराची खोली रिकामी पडलेली आहे. सदर रिकामी खोली मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता लायब्रेरी व स्टडी रुमसाठी जमिअत उलेमा, धुळे या संस्थेस तात्पुर्ते स्वरुपात दिल्यास सदर खोली दुरुस्ती करुन लायब्रेरी व स्टडी रुमची सोय करण्यास तयार आहे. सदर खोली योग्य त्या अटी व शर्तींवर दिल्यास आम्ही त्यांचे तंतोतंत पालन करुन सदर जागेचे वापर शिक्षणाचे प्रसार व प्रचारासाठी करण्यास कटीबध्द राहणार तसेच सदर ठिकाणी रात्री बसणारे नेशेडी व्यक्तींना देखील तेथुन दुर ठेवता येईल असे नमुद केलेले आहे.

उक्त बाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

सदरची मनपा शाळा क्र.25 ही मनपा मालकीची ऊर्दु शाळा आहे सदर ठिकाणी एका बाजुला अंदाजे 25 X 20 या आकाराची एक खोली पंचविस ते तीस वर्षापुर्वी बांधण्यात आलेली आहे. सदरची खोली इमारत जीर्ण झाली असुन मोडकळीस आलेली आहे. सदरची जागा संबंधित शाळाचे मुख्यध्यापक यांच्या सागण्यावरुन सदर खोलीत वर्ग भरत नाही व विद्यार्थी बसत नाही. सदर इमारत त्याशाळेतील विद्यार्थ्यांनसाठी त्याशाळेतील व इतर सर्व समाजातील विद्यार्थ्यांसाठी आभ्यासिका व लायब्रेरी सुरु करणे बाबत मागणी केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतुद ब) नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या जंगम मालमत्तेचे मूल्य पाच हजार रुपयांजून अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेचा विनियोग विक्री करुन, भाडयाने देऊन किंवा अन्य प्रकारे करता येईल आणि त्यास उपरोक्त असा कोणताही हक्क धरुन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षाहून अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी तशीच मंजुरी घेऊन पट्टयाने देता येईल किंवा जिचे मूल्य किंवा अधिमूल्य पन्नास हजार रुपयांहून अधिक नसेल अशी महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा कायमच्या पट्टयाने देता येईल.

क) नुसार आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल.

त्याअनुषंगाने सदरची ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी लायब्रेरी व अभ्यासीकासाठी जागेची मागणी संबंधित संस्थेने केलेली आहे. सदरची जागा खालील अटी व शर्तीस अधिन राहुन महासभेच्या मंजुरीने देणे उचित राहिल.

- सदर जागेची मुळ मालकी ही कायम स्वरुपी मनपाची राहील
- सदर जागेवर सदर संस्थेस हक्क सांगता येणार नाही.
- सदर जागेवर फक्त अभ्यासीका व वाचनालयव लायब्रेरी या व्यतीरिक्त कुठलाही वापर होणार नाही याची दक्षता संस्थेने घ्यावी. दुसऱ्या वापर मनपास अढळुन आल्यास सदर जागा मनपा ताब्यात घेईल.
- सदर जागेवर इमारतीची दागदुगी व दुरुस्तीचा खर्च पुस्तके व इतर अनुषंगीक कामे सदर संस्थेने करावयाची आहे त्यासाठी मनपा कडुन कुठलेही आर्थिक मदत मिळणार नाही.

सदरचे वाचनालय अभ्यासीका व लायब्रेरी हे सर्व जाती व धर्म तसेच समुदायासाठी खुले राहील. याची जबाबदारी संस्थेने घ्यावी.

- वरील अटी शर्ती बाबत सदर संस्थेस करारनामा (नोटरी) करुन द्यावा लागेल.
- सदरची जागा किती वर्षांसाठी द्यावी याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून शाळा क्रं. २५ मधील एक खोली उलेमा-हिंद या संस्थेस धुळे महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत प्रशासनाने मनपा अधिनियमानुसार उचित कार्यवाही व पुर्तता करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३४ **धुळे मनपा मालकीचे जुन्या कार्यालयाच्या दक्षिण बाजूस असलेले सर्वपल्ली राधाकृष्ण व्यापारी संकुलातील गाळ्यावरील प्रथम मजल्याचे स्वखर्चाने बांधकाम करून भाडे तत्वावर गाळे उपलब्ध करून देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल भाऊ नवले अतिशय चांगला प्रस्ताव याठिकाणी आलेला आहे. त्यामुळे आपल्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ होणार आहे. सदर ठिकाणी जकात चालू असतांना आपल्याला ठेकेदाराकडून दुसरा मजला बांधून घ्यावयाचा होता ते काम अध्यर्वट अवस्थेत आहे. ते काम अत्यंत नाममात्र खर्चात पूर्ण होणार आहे व त्यात आपण भर केली तर निश्चितच आपल्या उत्पन्नात वाढ होईल. १५ व्या वित्त आयोगात काही बाबी उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून करावयाच्या असतील तर तो निधी सुध्दा आपल्याला वापरता येतो. त्याच प्रमाणे प्रबोधनकार ठाकरे संकुलातील काही कामे अध्यर्वट अवस्थेत आहे. तसे पाहता वरच्या मजल्याला खर्च फार कमी लागतो वरच्या मजल्याला चार भिंती व स्लॅब या पलिकडे काही खर्च येत नाही. त्यांचे देखील आपल्याला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळेल तो भाग जर विकसीत झाला तर उत्पन्नाचे साधन होईल.

म. हर्षकुमार रेलन यात नागरीकांनी बांधून घ्यावे असे नमूद आहे. म्हणजे नेमके काय ? याचा खुलासा करावा.

म. महापौर आपण जुन्या राधाकृष्णन शॉपींग सेंटर येथील वरचा मजला जकात ठेकेदाराकडून बांधून घेतला तेथे आता नगररचना विभागाचे कार्यालय आहे. उर्वरीत जो भाग आहे तो जर विकसीत केला तर आपल्या उत्पन्नात भर पडणार आहे. त्यामुळे कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७० दिनांक २५/५/२०२१

व्यापारी संकुलानाचे काम सुमारे ३२ वर्षापूर्वी सन १९८९ झालेले असून सदर व्यापारी संकुलानांच्या दक्षिणेकडील भाग म्हणजे डॉ.राजवाडे पुतळ्याकडील ग.नं.१ जुन्या मनपा

मागील आवारात रस्त्यालगतच्या बाजूस सुमारे १० दुकाने असून मागील बाजूस ५ अशी एकूण १५ दुकाने आहेत.तसेच पॅसेज व जिन्याचे बांधकाम झालेले आहे. सदरचे दुकाने व्यापाऱ्यांना मनपा ठराव नं.१७२/दि.२३/१०/१९८९ रोजी देण्यात आलेले आहे.

दुकानाच्या प्रथम मजल्यावर मोकळया टेरेस भागात सोबतच्या नकाशानुसार दुकानाचे व पेसेज, जिना असे एकूण क्षेत्रफळ ३३८.१३ चौ.मी. बांधकामासाठी क्षेत्र उपलब्ध आहे.

यात सुमारे १५ दुकाने तथा ऑफिसचे बांधकाम करता येवू शकेल. यासाठी शासनाचा SSRनुसार रु.२७,००० प्रति चौ.मी.प्रमाणे रक्कम रु.९१,२९,५१०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

मा.महापौर यांनी दिलेल्या पत्रानुसार व मनपाच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने व्यापारी तथा नागरिकांनी स्वखर्चाने बांधकाम केल्यास त्याबाबतचा खर्च अनामत रकमेतून वजा करून त्याप्रमाणे वार्षिक भाडे आकारून सदरची जागा महासभेच्या मंजुरीने मागणी नुसार करार करून भाड्याने हस्तांतर करता येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम ७९ नुसार याबाबतची कार्यवाही करता येवू शकेल.

७९.(क)आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने महापालिकेच्या मालकीचे कोणतेही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभि हस्तांतरित करता येईल.

(ड) जो मोबदला घेवून महापालिकेच्या मालकीची कोणतेही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल,पट्ट्याने देता येईल,किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल. तो मोबदला असे अधिमूल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमती पेक्षा कमी असता कामा नये. अशा स्वरुपाची तरतूद नमूद आहे.

याबाबत म.नगररचनाकार यी खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे. उक्त अहवालानुसार सन २०२१ चे रेडीरेकनर दरानुसार सोबतच्या तक्त्यात अनामत रक्कम ही २८,४२०/- रु.प्रति चौ.मी. व भाडे २८४/- रु.प्रति चौ मी. प्रति माहे. अशी आकारणी येत आहे.

सदर म.नगररचनाकार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार निश्चित केलेली अनामत व भाडे आकारणीप्रमाणे नेहमीच्या अटी व शर्तींवर जागा देणेबाबत सदर विषयास महासभेची मंजुरी आवश्यक आहे असे मत आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार धुळे मनपा मालकीचे जुन्या कार्यालयाच्या दक्षिण बाजूस असलेले विस्तारीत सर्वपल्ली राधाकृष्ण व्यापारी संकुलातील गाळ्यावरील प्रथम मजल्यावरील पूर्वेकडील जिन्याशेजारील 5 दुकाने (पूर्व पश्चिम कुटुंब कल्याण केंद्र ते पश्चिमेसजुन्या सचिव कार्यालयापर्यंतच्या जागेत) तसेच जुन्या राधाकृष्णन व्यापारी संकुलावरील नगररचना विभागाच्या दक्षिणेकडेस असलेली उत्तर दक्षिण दिशेकडील जुन्या सचिव कार्यालयापर्यंतच्या मोकळया जागेत (दक्षिणेस नगररचना कार्यालय ते उत्तरेस जुने सचिव कार्यालय पर्यंतच्या जागेत) मनपा मार्फत बांधकाम करुन भाडे तत्वावर नगररचनाकार यांनी निश्चित केलेल्या दरानुसार गाळे उपलब्ध करून देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत नियमानुसार निविदा प्रक्रिया विहित पद्धतीने करावी. व सदर आराखडे नगररचना विभागाकडून मान्यता प्राप्त करून घ्यावेत.**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३५ धुळे मनपाच्या नविन प्रशासकिय इमारतीचा बाजुला व्यापारी संकुल बांधणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७१ दिनांक २५/५/२०२१

धुळे मनपा मार्फत नविन प्रशासकिय इमारतीच्या बाजुस व्यापारी संकुल बांधणे कामास रु.2,84,50,434/-मात्रला मे.स्थायी समिती ठराव नं.19 दि.28/02/2018अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी ई-निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती.

ई-निविदा सर्वात कमी दराची आलेली निविदा दर धारक मे. वर्षा कन्स्ट्रक्शन कंपनी, धुळे यांना जा.क्र./बांवि/34 दि.28/08/2019 अन्वये कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत12 महिने होती. सदर कामाचा कार्यादेश देवून 6 महिन्याच्या वर कालावधी झाल्याने सदरची निविदा ठेकेदाराने दिलेल्या पत्रा नुसार रद्द करणे बाबत कळविले आहे.

मे.स्थायी समिती यांनी सदरचा कामास मंजुरी दिलेली असल्याने मे.स्थायी समितीमध्ये रद्द करणे बाबत मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर व्यापारी संकुल यापुर्वी जी. प्लस १ प्रमाणे अंदाज पत्रक तयार करणेत आलेले होते. परंतु सदरचे काम रद्द करून जी. प्लस ३ प्रमाणे करणे बाबत सुधारीत बांधकामास मान्यता मिळणे कामी मे.महासभे पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपा मार्फत नविन प्रशासकिय इमारतीच्या बाजुस व्यापारी संकुल बांधणे कामी सुधारीत बांधकामास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३६ जिल्हा पुरवठा अधिकारी धुळे यांचे कडील दि.२२/२/२०२१ च्या पत्रानुसार शासन निर्णयातील परिच्छेद क्रं.१०(अ) मधील तरतुदीनुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील विविध प्रवर्गातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेसाठी मनपाच्या २ सदस्यांची नांवे (ज्या सदस्यांना ग्राहकांच्या हितासाठी काम केलेले असल्यास किंवा काम करण्यांची तयारी असणा-या) पाठविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले सदर प्रस्ताव महत्वाचा आहे.मी मागच्या पंधरवाडयात जिल्हाधिकारी कार्यालयात गेलो होतो.त्याठिकाणी उपमहापौरांची काही तक्रार होती. प्रभाग क्रं.१४मधील १५० ते २०० लोकांची नांवे नाशिक येथे रजिस्टर आहे. त्याबाबत उपमहापौरांनी तक्रार दाखल केलेली होती. केंद्र सरकारच्या अनेक चांगल्या योजना आहेत.त्या योजना गरजू नागरीकांपर्यत पोहचल्या पाहिजे.त्यामुळे सदर ठिकाणी अभ्यासू व चांगल्या व्यक्तींची निवड होवून समितीवर पाठविण्यांत यावे.

म. महापौर याबाबत सन्मा.सदस्यामधून सौ.वंदना संजय भामरे व सौ. कशीश गुलशन उदासी नांवे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७२ दिनांक २५/५/२०२१

जिल्हा पुरवठा अधिकारी धुळे यांचे कडील क्रमांक पुरवठा-5/काबि/69 /2021 दि.22/2/2021च्या पत्रानुसार शासन निर्णयातील परिच्छेदक्रं. 10(अ) मधील तरतुदी नुसार

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील विविध प्रवर्गातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार धुळे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर महानगरपालिकेचे दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे. तरी धुळे महानगरपालिकेवर सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या इच्छुक प्रतिनिधीकडून अर्ज प्राप्त करुन घ्यावे व आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास पाठविणेबाबत नमूद केले आहे.

तरी याबाबत धुळे महानगरपालिकेतील सद्य स्थितीत 73 सदस्य कार्यरत असून त्यांचे कडून सदरची माहिती संकलन करणेसाठी त्यांना पत्र द्यावे लागेल त्यानुसार सदस्यांकडून लेखी स्वरुपात माहिती मागवावी लागेल.या प्रक्रियेस विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी मा.महापौर सो.यांना पत्र देऊन त्यांचेकडून कार्यरत दोन सदस्यांची नांवे मागवून (ज्या सदस्यांना ग्राहकांच्या हितासाठी काम केलेले असल्यास किंवा काम करण्यांची तयारी असणा-या) सदरची नांवे म.जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे यांचेकडेस सादर योग्य होईल असे मत आहे त्यानुसार मा. महापौर सो. यांना पत्र देणेस प्रारुप पत्र स्वाक्षरीसाठी सादर केले असता मा.आयुक्त सो.यांनी महासभेच्या मान्यतेने नांवे कळवावे असे अभिप्राय नोंदविले आहे. तरी सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून सौ. वंदना संजय भामरे व सौ. कशीश गुलशन उदासी यांची नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३७ जागतीक संसर्गजन्य आजार कोरोना विषाणु (COVID १९) चे प्रतिबंधात्मक कार्यवाही उपाययोजने साठी धुळे शहरात उपचार घेत असलेल्या कोविड-१९ रुग्णांना अत्यावश्यक Inj. Remdesivir १०० Mg ६३०० Vial खरेदीसाठी येणा-या संभाव्य खर्चास आर्थीक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सर्वात महत्वाचा विषय आहे. ज्या वेळेस धुळे शहरामध्ये अशी परिस्थिती होती रेमडीसेव्हर इंजेक्शन मिळाले म्हणजे आपला प्राण वाचला. या पध्दतीने लोक फिरत होते. आयुक्त सो. आणि प्रशासनाचे मी खास करुन अभिनंदन करतो की, ना नफा ना तोटा या धर्तीवर प्रशासनाने इंजेक्शन खरेदीसाठी मान्यता दिली. आमचे नेते आदरणीय सुभाषजी भामरे,भाजपा जिल्हाअध्यक्ष अनुपजी अग्रवाल यांच्या मागणीनुसार रेमडीसेव्हर इंजेक्शन आपण खरेदी केले. हे रेमडीसेव्हर ज्या पध्दतीने आपले आरोग्याधिकारी डॉ. मोरे, अति.आयुक्त श्री.गिरी सो. तसेच आयुक्त सो. हे प्रशासनाचे प्रमुख आहेत. त्यांनी सर्व वाटपाची यंत्रणा सांभाळली. यंत्रणा जर सक्षम राहिली तर प्रशासनाला त्यांचे श्रेय मिळत असते. याला मार्गदर्शन आयुक्त सो. व माझे होते. गरजू रुग्णांना जिथे गरज आहे तेथे रेमडीसेव्हर इंजेक्शन देण्यांत आले. त्याच्यात पेशंट कोण आहे दवाखाना कोणता आहे, कोणत्या पक्षाचा आहे हे आम्ही बघितले नाही.अत्यंत चांगल्या प्रकारे रेमडीसेव्हर इंजेक्शन नेत्यांच्या मागणीनुसार धुळे शहरामध्ये वाटप केली. दुसरी विषय माजी मंत्री अमरीशभाई पटेल, माझे मित्र भुपेशभाई पटेल, यांच्या माध्यमातून अनुपशेठ अग्रवाल असतील मी असेल हजारो रेमडीसेव्हर इंजेक्शन आम्ही खरेदी केंले.आणि धुळे शहरात नागरीकांना दिले.कारण मनपाच्या माध्यमातून आपण इंजेक्शन वाटत होतो.आजची परिस्थिती अशी आहे की,एकही रुग्ण रेमडीसेव्हर इंजेक्शनसाठी प्रशासनाकडे

येत नाही. त्यांचे कारण मनपा मार्फत सक्षमतेने यंत्रणा राबविली गेली. ज्या रेमडीसेव्हर इंजेक्शनच्या माध्यमातून पेशंट बरे झाले आहे त्याचे सर्व श्रेय धुळे मनपाने चांगले काम केले. श्री.संजय गुजर यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने यंत्रणा राबविली आहे.या विषयात जिवन मरणाच्या प्रश्नात जो मनपाचा उल्लेख होतो धुळयातील जनता व बाहेरगावातील जनता सुध्दा म्हणतात ते देखील प्रशासनाचे व मनपाचे तोंड भरुन कौतुक करीत आहे. हा विषय मंजूर करीत असतांना आपल्या मनपाच्या तिजोरीवर कुठलाही भार आलेला नाही. फक्त आपण एवढे केले की प्रशासनाच्या माध्यमातून रक्कम कंपनीला आपण आगाऊ दिली. नंतर तेच इंजेक्शन त्याच दरात ना नफा ना तोटा या तत्वावर रुग्णांना उपलब्ध करुन दिली तेवढी रक्कम वसुल होवून मनपाच्या तिजोरीत जमा झालेली आहे. म्हणून हा विषय मंजूर करीत असतांना खास करुन प्रशासनाचे आमचे आयुक्त सो., तसेच डॉ. सुभाषजी भामरे, अनुपजी अग्रवाल, अति.आयुक्त गणेश गिरी सो. डॉ. महेश मोरे,श्री.संजय गुजर तसेच सर्व अधिकारी नाईक मॅडम, शिरसाठ मॅडम या सर्वांचे आम्हाला सहकार्य असते. उपमहापौर सौ. कल्याणीताई अपंळकर, सभागृह नेते राजेश पवार, विरोधी पक्ष नेते श्री. साबीर भैय्या महिला व बालकल्याण सभापती व सर्व नगरसेवक या सर्वाच्या सहकार्याने या गोष्टी शक्य झाला. हे करत असतांना त्या मध्ये जी यंत्रणा राबली आणि कुशल नेतृत्वाच्या माध्यमातून एकही तक्रार न होता यंत्रणा राबली त्यांचे येथे अभिनंदन करुन हा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

म.वंदना भामरे सभागृहाला उद्देशून बापू साहेबांनी स्पष्टीकरण दिलेले आहे बापू सो.आपले बाबा साहेब असतील अनुप भैय्या अग्रवाल असतील महापौर चंद्रकांत सोनार असतील आयुक्त साहेबा यांची टिम असेल आपण सर्वांनी भरभरून कामगिरी केली म्हणून ती यशस्वी देखील झालेली आहे.याबाबत थोडे सत्य मी आपल्यासमोर मांडू इच्छिते. सिस्टीम चांगली राबविली त्या तिळमात्र शंका नाही. परंतू ग्राऊंड लेव्हलच्या नागरीकांना खरोखर न्याय मिळाला आहे का शहरामध्ये एकूण १९ प्रभाग आहे तेथील नागरीक प्रथम महापौर किंवा आयुक्त साहेबांकडे येत नाही तर तो सर्वात प्रथम स्थानिक नगरसेवकाकडे येत असतो परंतू कुठल्याही नगरसेवकाला विश्वासात घेण्यात आलेले नाही. कारण याचा त्रास मला देखील झालेला आहे. रेमेडीसिव्हर वाटपाबाबत ऑनलाईन मिटींग व्हायाला पाहिजे होती. आपल्या प्रभागातील दवाखान्याना किती इंजेक्शन वाटप केलेले आहे याची माहिती कळत नव्हती. पण आपल्याकडून सर्व फॉलो झालेले आहे. काही कोविड सेंटर होते ते त्या पेन्शंटला बाहेरून इंजेक्शन आणा असे सांगत होते. तेव्हा ते पेन्शंटचे नातेवाईक नगरसेवकांकडे येत होते. आम्ही बरेच वेळा डॉ.मोरेकडे फोन केला पण ऐवढया दिवसात एकच इंजेक्शन मिळाले. मग ही योजना हॉस्पिटलमध्ये कुठे पोखरली गेली. आपल्याला वाटले दुसरी लाट येणार नाही पण तज्ञाचे म्हणणे आहे तिसरी लाट देखील येणार आहे.आपण हा विषय मंजूर करीत आहोत खुप चांगली गोष्टी आहे हॉस्पिटल मध्ये किती पेन्शंट ॲटमिट आहे याची माहिती घेवून आपण रेमेडिसिव्हर इंजेक्शन देत असतो हे करीत असतांना नगरसेवकांना आपण विश्वासात घ्या.

म.कमलेश देवरे बापू सो मी सर्व प्रथम तुमचे मनापासून आभार मानतो.आयुक्त सो व त्यांच्या टिमने अत्यंत वाईटकाळात ज्या वेळेस कोव्हिडच्या आजाराने मोठयाप्रमाणात डोके वर काढलेले होते त्यावेळेस कोणाकडेच इंजेक्शन नव्हते त्यावेळी आपण धुळेकर जनतेला रेमेडिसिव्हर इंजेक्शन उपलब्ध करून दिले .त्याबद्दल मी तुमचे मनपासून आभार मानतो. माझ्या मनात एक शंका आहे की, रेमीडिसिव्हर देतांना आपण ६३०० इंजेक्शन विकत घेतले हे सर्व इंजेक्शन वाटप केले गेले का? काही शिल्लक आहे आपल्याकडे आपण म्हटले की, साबीर भैय्यांना इंजेक्शन दिले. आपण त्याच्याकडून पैसे घेतले नाही ज्यावेळेस आम्ही संबंधित व्यक्तीचे नाव दिले

त्यावेळी संबंधित हॉस्पिटला इंजेक्शन पोहचविले. त्यावेळी १५६८/- जी रक्कम घेतलेली आहे त्याची किती रक्कम आपल्याकडे जमा झालेली आहे व किती लोकांना मोफत दिली आहे. ६३०० इंजेक्शन मधून आज आपल्याकडे किती इंजेक्शन शिल्लक आहेत? एकच मागविल्या का टप्पा टप्प्याने मागविले यांचा सविस्तर खुलासा व्हावा वंदनाताई बोल्या या गोष्टी नगरसेवकांना विश्वासात घेवून झालेल्या नाही मी त्याच्या मताशी सहमत आहे. जर एवढीमोठी समाज सेवा आपली मनपा करीत असेल तर आम्ही पण या मनपाचे काही दातृत्व लागतो आम्ही या मनपाचे एक सदस्य आहोत. जर सर्व सन्मा.सदस्यांच्या उपस्थिती हा निर्णय झाला असता .तर मला पण वार्डतील नागरीकासाठी दोन इंजेक्शन भेटले असते. याचा मला देखील आनंद झाला असता.

म.हर्षकुमार रेलन महापौर सो.कमलेशभाऊ व भामरे मॅडमांनी जो विषय काढला आहे तो शहरांची पण तीच भावना आहे. आपण जे काम केलेले आहे ते अप्रतिम व पुण्याचे काम आपण केले आहे. जेव्हा रेमेडिसिव्हर इंजेक्शन मिळतच नव्हते त्यावेळी आपल्या धुळे मनपाने रेमेडिसिव्हर इंजेक्शन मागवून जी लोकांची सेवा केलेली आहे. आपण सर्वांचे प्राण वाचविले आहे खरच मी सर्वांचे अभिनंदन करतो पण दोन नगरसेवकांनी सांगितले की, आम्ही या संस्थेचे विश्वस्त आहोत. मात्र आम्हाला कोणाला काही हि कळविले नाही . आपण ६३०० इंजेक्शन मागविले परंतू आम्ही सर्व नगरसेवक जेव्हा लोक आमच्याकडे यांचे त्यावेळी आम्ही डॉ.महेश मोरे यांना फोन करायचो डॉ.महेश मोरे सांगायचे की तुम्ही जिल्हाधिकारी साहेबाकडे जा तिथून तुम्हाला मिळतील तेथून हॉस्पिटला जाते लोकांचे प्राण गेले हॉस्पिटलमध्ये ते इंजेक्शन पोहचले नाही लोक आमच्यावर रोष व्यक्त करायाचे की मनपात इंजेक्शन आले पण ते आम्हाला मिळत नाही. आम्ही या संस्थेचे विश्वस्त आहोत. आम्हाला त्याबाबतीत आम्हाला माहिती दिली नाही आता तरी आम्हाला माहिती द्या.६३०० इंजेक्शनपैकी किती आले? किती वाटप झाले? किती इंजेक्शन शिल्लक आहे? एवढी माहिती द्या.

म.शितल नवले या विषयामध्ये एकअभिनंदनाचा ठराव करावा अशी माझी मागणी आहे. मनपाची यंत्रणा आपले खासदार सुभाषजी भामरे,जयकुमारजी रावळ, अनुपजी अग्रवाल,आयुक्त सो. मी दर वेळेला आरोप करतो की प्रशासन चूकीचा खुलासा करते एक वेळेस मी गिरी सो. यांच्या कॅबीनला होतो रेम्डीसीवर कसे वाटप होते त्या दिवशी मला कळते आपण जरी 6000 ची मागणी केलेली असेल त्यामध्ये पुरवठा कमी होता आणि मागणी जास्त होती. त्या दिवशी आरोग्य विभागाच अतिशय सुक्ष्म नियोजन बद्दल कौतुक केले पाहिजे. त्याच्याकडे एक चार्ट होता त्या चार्ट मध्ये किती कोव्हीड सेंटर त्यांच्याकडे कोव्हिडचे किती बेड किती आयसीयु बेड किती त्या हॉस्पीटलकडून आलेली रेम्डीसिव्हरची मागणी किती महापौर महोदय खरोखर प्रशासनाच कौतुक करावेसे वाटतेआपल्याकडे 250 / 300 व्हायरल होते. फक्त मागणी 500/ 600 ची होती सर्वात जास्त मागणी होती जवाहर फाऊडेशनची त्यांना 20/ 22 दिले होते त्यांची मागणी 50/60 ची होती त्याप्रमाणामध्ये पेशंट असतील त्या रेशोनुसार प्रशासन काम करत होते त्या दिवशी श्री. गिरी साहेब यांचे पेशंट जिल्हा रुग्णालयात ॲडमीट होते त्यांनी येथून रेम्डीसिव्हर न घेता अमरीशभाईना विनंती करुन त्यांच्याकडून मागविले पण मनपाच्या पदाचा दुरउपयोग नाही केला त्याबद्दल गिरी सो. आपले अभिनंदन त्या व्हायलवर मनपाने मार्कींग केले होते डॉ. नवसारेकडे माझे ही पेशंट ॲडमीट होते त्या दिवशी मलाही इंजेक्शन नाही मिळाले जर बाजारातच नाही तर आपण काय करणार आपली एकमेव ड वर्ग महानगरपालिका आहे त्यांनी इंजेक्शन विकत घेतली.

म. अमीन पटेल कोव्हीड 19 ज्या वेळेस दुसरी लाट आली त्यावेळी अतिशय वाईट परिस्थिती होती जे पेशंट 8-10 दिवसात बरे होत असे त्या पेशंटला 1 ते दीड महिना लागत आहे. देवाच्या कृपेने आज 50 टक्के कोव्हीड पेशंट बरे झले आहेत. मनपाच्या अधिका-यांनी जे कोव्हीड 19 मध्ये काम केले त अत्यंत चांगल्या प्रकारे केले आहे. ऑक्सीजन पेंशटसाठी आयुक्त सो यांनी त्याठिकाणी ऑक्सीजन लावले मी रात्री 12- 1 वाजेला गिरी सो. यांना फोन लावला आरोग्याधिकारीना फोन लावला आयुक्त सो. यांना फोन लावला त्यावेळी त्या सर्वांनी माझे फोन उचले दुसरी गोष्ट मनपाने दिलेले इंजेक्शन माझ्या भागातपण दिले गेले आता कोव्हीड नंतर ब्लॅक फंगस म्हणून नवीन महामारी आली आहे मला वारंवार फोन येत आहे त्यांचे इंजेक्शन बाजारात मिळत नाही माझी विनंती आहे आज लोक त्या इंजेक्शनसाठी परेशान आहे धुळे शहरात 16-18 पेशंट आहेत त्यासाठी मनपाने ही इंजेक्शन खरेदी करावे ते मोफत दयावे किंवा त्याची जी किंमत असेल त्यानुसार द्यावे.

म. हिरामण गवळी जागतिक महामारी या विषयामध्ये आताच शितल भाऊंनी अभिनंदनाचा ठराव मांडला आहे तो योग्य आहे धुळे मनपा ही एकमेव मनपा अशी आहे हा उपक्रम तर राबविलाच परंतु मृत्यू झालेल्यांची विल्हेवाट जिल्हयातील आणि जिल्हयाच्या बाहेरील लोकांची जे धुळयात ॲडमीट आहेत त्यांची विल्हेवाट मनपाने स्वखर्चाने केली त्याच बरोबर आपण जे रेमडीसिव्हर इंजेक्शन दिलेत त्याच्यामध्ये काही राजकीय लोकांच्या पोटामध्ये गोळा उठलात्यांनी कप्लेन्ट मांडायचाही प्रयत्न केला परंतु आमचे जिल्हाअध्यक्ष अनुप अग्रवाल महापौर चंद्रकांत बापू सोनार यांनी काही न जुमानता आयुक्त सो. यांच्या मार्गदर्शनाखाली,डॉ.मोरे,संजय गुजर यांनी रात्री 12-12 वाजेपर्यत त्याचा टाळेबंद कसा करायचा यासाठी पूर्णपणे बसून हे जे मांडत होते ते आम्ही स्वत:डोळयाने बघितले आहे. काही डॉक्टरांना खालच्या भाषेमध्ये बोलावे लागत आम्ही त्या डॉक्टरांना इंजेक्शन दिलेले आहेत पण ते तेथील पेशंटला देत नव्हते त्यावेंळी अनुप अग्रवाल यांनी त्यांना समजावले काही चांगल्या चांगल्या हॉस्पीटल मधून इंजेक्शन चोरीला गेले काही डॉक्टरांनी हात धुवुन घेतले इतके हात घुतले की ते मोठे हॉस्पीटल बांधायला लागले काही नागरीक जेव्हा आमच्याकडे यांच्याचे जे काही बिल घेवून येत आहे आम्ही महापौर आयुक्तांना सांगितल्यानंतर त्याठिकाणी आपली मनपाची जी टीम बसविली होती त्या टीमने पूर्ण अभ्यास करुन रुग्णांचे बिले कमी करुन दिले. त्यामुळे शहरातील तसेच बाहेर गावातील रुग्णांना मनपाने एक मोठा दिलासा दिला होता. यामध्ये अधिकारी वर्ग आपले टीम महापौर सो. डॉ. सुभाष भामरे,अनुपजी अग्रवाल विधान परिषद आमदार श्री.अमरीशभाई पटेल यांनी सुध्दा हे इंजेक्शन देऊन रुग्णांचे जीव वाचविण्यांस मदत केली आहे.ते देखील अभिनंदनास पात्र आहेत.

म.उमेर शव्वाल अन्सारी सन्मा महापौर साहेब हा जो विषय आहे कोव्हिच्या इंजेक्शनबाबत आपण जे नियोजन केले ते अत्यंत चांगले होते. मला वाटते डॉक्टर लोकांनी जास्त काम केले.त्याचे श्रेय जास्त आहे. डॉ.मोरे, संजय गुजर मी त्यांना केव्हाही फोन केला तेव्हा त्यांनी रेमेडीसिव्हर इंजेक्शन उपलब्ध करून दिले. मी याचा आभारी आहे. आपली मनपा धुळे शहरातील लोकांमुळे चालत आहे. लोक आज कितेक वर्षापासून टॅक्स भरत आहे मी विनंती करतो की, ज्या प्रकारे कोवीड मध्ये इंजेक्शन दिले त्या पध्दतीने पुर्ण धुळे शहराला व्हॉक्सीन खरेदी करून द्या. जर प्रत्येक घरात दिले तर धुळे शहरातील कोव्हिड पेन्शंट कमी होईल माझी विनंती आहे हया प्रकारे व्हॅकीनेशन खरेद करा काही मनपाने विकत घेतली आहे आपण ही तसे करू शकता पुर्ण शहरासाठी मनपामार्फत लस उपलब्ध करून घरोघरी जाऊन द्या.

म.प्रतिभाताई चौधरी महापौर सो बऱ्याच जणांनी सुचना मांडल्या रेमेडिसिव्हर इंजेक्शन खरेदी करण्यासाठी त्यावेळेस जो निर्णय घेण्यात आला. निर्णय घेण्यामध्ये महापौर सो.आयुक्त सो.अनुपभैय्या, डॉ.सुभाष भामरे,जयकुमार रावलभाऊ असतील या सर्वांच्या प्रयत्नाने धुळे शहरातील जनतेला इंजेक्शन उपलब्ध झाले. यांचे तर अभिनंदन करण्यात यावे परंतू त्यांच्यासोबत ज्यांनी नियोजन केलेले आहे डॉ.मोरे असतील गणेश गिरी साहेबांच्या टिममध्ये जेवढे होते तेवढयाचे अभिनंदन करण्यात यावे. ज्यावेळेस आमच्या प्रभागातील नागरीकांना इंजेक्शन पाहिजे होते. त्यावेळेस मी आयुक्त सो.यांना देखील फोन केला होता. डॉ.मोरेना ही फोन केलेला होता त्यांच्याकडून चांगल्या प्रकारे सहकार्य मिळाले. लोकांना जीवदान देण्याचे काम केलेले आहे आणि अतिशय चांगला निर्णय घेतलेला आहे. भैय्यांनी सांगितल्या प्रमाणे व्हॉसिनेसन खरेदी करून धुळेकरांना मोफत लस देणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निर्णय घेतलेला आहे ही अतिशय चांगली सुचना आहे. ज्यावेळेस संपुर्ण शहराचे नागरीकांचे लसीकरण होईल त्यावेळी कोरोना मुक्त धुळे शहर होईल.आधी लसीकरण होणे गरजचे आहे. रेमेडिसिव्हरचा विषय हा मे. महासभेत आलेला आहे याबाबत आमच्या नगरसेवकांनी जी खत व्यक्त केली. त्यांना विश्वासात घेतले गेले नाही.या पुढे जे काही निर्णय असतील ते निर्णय नगरसेवकांना विश्वासात घेवून करा.

म.कमलेश देवरे:- आमचे मोठे बंधु शितल भाऊंना सांगू इच्छितो की, सर्व प्रथम मी तुमचा अभिनंदनाचा ठराव केला.सर्वांचे ठराव अभिनंदन ठराव मांडले नंतर मी ऐवढेच विचारले की,इंजेक्शन किती शिल्लक आहे ऐवढी माहिती मिळावी. आता जर इंजेक्शन शिल्लक असतील आणि डब्ल्यु एच.ओ.ची मान्यता नसेल त्यावर बंदी आहे आणि ते जर परत गेले तर आमच्या सन्मा.सदस्यांच्या निधीतून जरी लसीकरण केले तरी आमची काही हरकत नाही.

म.डॉ.महेश मोरे रेमेडिसिव्हर इंजेक्शनच्या बाबतीमध्ये मनपातआयुक्त सो. महापौर सो.अति.आयुक्त सो.यांच्या मार्गदर्शनाखाली आपण रेमेडिसिव्हर इंजेक्शन खरेदी करण्याचा निर्णय घेतला . यामध्ये आपण एकत्रित ६३०० इंजेक्शन खरेदीबाबत कंपनीला आदेश दिला. कंपनीच्या डिमंडप्रमाणे ॲडव्हान करणे गरजेचे होते. त्यानुसार आपण दिनांक १९ एप्रिल २०२१ ला १५०० इंजेक्शनसाठी आर.टी.जी.एस.ने २३,५२,०००/-रूपये आपण कंपनीला वर्ग केलेले आहे.त्यानंतर आपल्याला दिनांक २१ एप्रिल २०२१ च्या पत्रानुसार ४०० इंजेक्शन आपल्याला प्राप्त झाल्या त्यानंतर दिनांक ३० एप्रिल २०२१ ला १०४७ इंजेक्शन आपल्याला प्राप्त झाल्या अशा एकूण १४४७ इंजेक्शन प्राप्त झालेले आहे.त्यापैकी १३५८ इंजेक्शन आपण संबंधित कोव्हिड रूग्णालयामध्ये वाटप केलेले आहे. त्याबदल्यात२२,२८,१५८/- रूपये मनपाकडे जमा करण्यात आलेले आहे. ८५इंजेक्शन उसनवारीने दोडांईचा नगरपालिकेला दिलेले आहे.त्यांच्या मुख्याधिकारी यांच्याशी गणेश गिरी साहेबांनी बोलणे केलेले आहे.त्या बद्दल्यात जी रक्कम आहे ती मनपाकडे वर्ग करणार आहे. ज्याकाही १४४७ इंजेक्शन प्राप्त झालेल्या होत्या त्याचे २२,२८,१५८/- रूपये आपल्याकडे जमाआहेत.१०० टक्के रिकव्हरी झालेली आहे. त्यानंतर आपण पुढील टप्प्यासाठी दिनांक ३०एप्रिल २०२१ ला १००० इंजेक्शनसाठी १५,६८,०००/- कंपनीला आर. टी.जी.एस.च्या मामध्यामातून वर्ग केलेले आहे.कंपनीमध्ये मध्यंतरी इंजेक्शनचा तुडवटा असल्याने ते आपल्याला पुरवठा करू शकले नाही. आत २३ मे ला आपल्याला १००० इंजेक्शन प्राप्त झालेले आहे. त्यांच्या अगोदर जागतिक आरोग्य संघटनेच्या गाईडलाईननुसार त्यांच्यावर बंदी आली तर डब्ल्यु एच.ओ.चा जो प्राटोकॉल आहे त्यांच्यातून रेमेडिसिव्हरला वगळण्यात आलेले आहे.मात्र सद्यास्थिती मध्ये बऱ्याच हॉस्पिटलमध्ये रेमेडिसिव्हर इंजेक्शनचा वापर सूरू आहे.अशा पध्दतीने आता आपल्याकडे १००० इंजेक्शन शिल्लक

आहेत. कालपासून जी आपल्याकडे जिल्हा निहाय कमेटी आहे त्यांच्या मार्फत संबंधित कोव्हिड रूग्णालयाना पुरवितो आहे. दुसरी गोष्ट अशी आयुक्त सो. महापौर सो. यांच्या मार्गदर्शनाखाली कमेटी फॉलो केली होती. त्याचे अध्यक्ष अति.आयुक्त गणेश गिरी सो. होते. त्यात तुषार नेरकर होते मी होतो. आपले मुख्य औषध निर्माता संजय गुजर त्यांच्यावर शासकीय यंत्रणेचे वचक राहावे म्हणून सिव्हिल काही अधिकारी आहे ते घेण्यात आलेले होते. या कमेटीच्या माध्यमातून इंजेक्शन वाटप सूरू होते. यासाठी प्राव्हेट डिस्ट्रिबिटरकडे त्यांच्याकडे इंजेक्शन द्यासाठी मा.जिल्हाधिकारी सो यांनी जिल्हा आरोग्य कमेटी नेमण्यात आली होती. त्यामध्ये सिव्हील सर्जन, डी.एच.ओ.मनपाचे काही अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि प्राव्हेट डिस्ट्रिबिटर यांचे प्रतिनिधी अशी ती कमेटी होती. त्यांच्यामार्फत सर्व दवाखान्यात इंजेक्शन वाटप सूरू होते.रूग्णाच्या संख्ये नुसार वाटप झाल्यानुसार मनपा प्रत्येक दवाखान्यातून त्यानंतर किती रूग्णांना इंजेक्शन आवश्यक आहे. याबाबतीत संबंधित डॉक्टरा कडून एक फॉरमेट तयार केलेला होता. रुग्णाचं नाव, रुग्णालयात दाखल तारीख, त्याला किती इंजेक्शन दिले आहे किती द्यावे लागणार आहे, त्याचे वय,त्याची ऑक्सिजन लेव्हल, एच. आर. सी. स्कोरचा रिपोर्ट अशा पध्दतीचा तो फॉर्मट होता. प्रत्येक दवाखान्यातून रुग्णाची माहिती आपण आपल्याकडे जमा करीत होतो.त्या माहितीच्या आधारे किती रूग्णांना इंजेक्शन आवश्यक आहे त्यानुसार आपण प्रत्येक दवाखान्याना इंजेक्शन वाटप करीत होतो. यासाठी मा.गणेश गिरी सो. यांच्या दालनात दुपारी १ वाजता सर्वांची बैठक व्हायाची त्यानंतर जे रिपोर्ट प्राप्त व्हायाचे त्यानुसार आपण रूग्णालयांना इंजेक्शन वाटप केले होते. आपण मेडिकल स्टोअरला पुरवठा केलेला नाही. कारण आपल्याकडे जे काही लायस्नस आहेत आपल्याकडे होलसेल स्टोअरचे लायसन्स आहे.आपण रिटेल स्टोअरला देवू शकतो पण त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यामध्ये स्थानिक टॅक्सेस वाढले असते आणि त्यांची किंमत वाढली असती. त्यामुळे आपण प्रत्यक्ष रूग्णालयामध्ये वाटप केले आहे. त्यामुळे आपल्याला ज्या किंमतीमध्ये इंजेक्शन मिळाले रू.१५६८/-रूपये त्यांच किंमतीमध्ये आपण इंजेक्शन सदर रूग्णालयांना उपलब्ध करून दिले.

म.महापौर सो सदर विषयात ज्यांनी ज्यांनी सहभाग घेतला त्यांचे सर्वाचे अभिनंदन.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७३ दिनांक २५/५/२०२१

धुळे शहरामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रभाव बघता धुळे महानगरपालिका संचलीत कोविड केअर सेंटर व 2 डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर मध्ये दररोज कोरोना +Ve रुग्णांची संख्या खुप जास्त वाढत आहे. रुग्णांना तातडीने Inj. Remdesivir १०० Mg ची अरवशक्ता आहे. सध्यस्थीतीत स्थानिक बाजारात Inj. Remdesivir १०० Mg चा खुप मोठया प्रमाणात तुटवडा असल्याने मयत रुग्णसंख्या खुप मोठया प्रमाणात वाढत आहे. मा. महापौर, मा. आयुक्त सो., मा. अति. आयुक्त सो. मा. आरोग्याधिकारी सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे उपस्थीतीत तातडीने Inj. Remdesivir १०० Mg उपलब्ध करण्याचे निर्देश आहेत.

महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-2014 / प्र.क्र.82 भाग-III/ उदयोग-4 मंत्रालय, मुंबई दि. 01/12/2016 चे शासन निर्णयानुसार शासन निर्णय 3.3 विशेष परिस्थितीतील खरेदी 3.3.1 आपत्कालिन परिस्थीती किंवा तातडीची परिस्थीतीत विभागप्रमुख रु. 1 कोटीपर्यंत तातडीची आदेशाव्दारे खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली. तातडीचा आदेश खरेदी प्रक्रिया- खरेदीचे मुल्य कितीही असले तरी तातडीच्या खरेदी आदेशाचे प्रक्रियेत दरपत्रकासाठी विनंती या पध्दतीचा स्वीकार देकार मागविण्यासाठी करता येईल. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-

2020/प्र.क्रं.59/20/कोषा प्रशा 5 दि.18 मार्च 2020 नुसार "कोरोना" प्रादुर्भवाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक खर्चास नुसार आर्थीक निर्बंधातुन वगळण्यात आले आहे.कोविड साहित्य खरेदीसाठी शासन निर्णयानुसार घेण्यात आली आहे.

Mylan Pharmaceuticals Pvt. Ltd. Bagalore या उत्पादक कंपनी कडून मुंबई महानगरपालिका, सिव्हिल सर्जन नाशिक यांनी रु. 4800/- प्रती नग प्रमाने Mrp असलेले Inj. Remdesivir १००Mgरु.1568/- प्रती नग प्रमाने खरेदी केलेले आहे. धुळे महानगरपालिकेला Inj. Remdesivir १०० Mg रु.1568/- प्रती नग प्रमाने 6300 Vial खरेदीसाठी रु.98,78,400/- खर्च येणार आहे.

सन २०२१-२२ या वर्षात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण धुळे कडून निधी प्राप्त झालेलानाही. कोविड-19 मयत रुग्णसंख्या खुप मोठया प्रमाणात वाढत आहे. Inj. Remdesivir १०० Mg तातडीची आवशक्ता आहे.

धुळे शहरामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रभाव बघता धुळे महानगरपालिका धुळे शहरात उपचार घेत असलेल्या कोविड-19 रुग्णांना अत्यावश्यक Inj. Remdesivir १०० Mg 6300 Vial खरेदीसाठी महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82भाग-III/उदयोग-4 मंत्रालय, मुंबई दि. 01/12/2016 चे शासन निर्णयानुसार शासन निर्णय 3.3 विशेष परिस्थितीतील खरेदी 3.3.1 आपत्कालिन परिस्थीती किंवा तातडीची परिस्थीतीत विभागप्रमुखांना रु. 1 कोटीपर्यंत खरेदीची मुभा आहे.

सन २०२१-२२ या वर्षात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण धुळे कडून निधी प्राप्त झालेला नाही. मनपा निधीमधुन खर्चासाठी सोबतचा प्रशासकीय मान्यता आदेश व कार्यादेश मंजुरी आदेशास्तव सादर. सदरचा खर्च सद्यस्थितीत मनपा निधीतून करावयाचा आहे.

कोविड-19 निधी प्राप्त झाले नंतर सदर खर्च त्यामधुन समायोजन होणार आहे.

सदर ओषधे मनपा मार्फत procaton करण शहरातील पात्र हॉस्पीटल्स (pvt/ संस्था) खरेदीच्या दरामध्ये वितरीत करणेत येणार आहे.

याबाबत म. महापौर यांनी सदर प्रस्तावावर खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

शहरात कोरोना रुग्णसंख्या व मृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे. शहरात रेमीडी सिव्हर इंजेक्शनचा मोठया प्रमाणावर तुटवडा आहे. त्यामुळे अनेक रुग्ण दगावत आहे. उपचार घेत असलेल्या रुग्णांसाठी मनपा मार्फत सामाजिक बांधीलकी म्हणून रुग्णांना मदत करणे आवश्यक आहे. इंलेक्शनचा तुटवडा लक्षांत घेता व पुढील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यांचे तांतजडीने युध्दपातळीवर इंजेक्शन खरेदी करुन शहरातील पात्र हॉस्पीटल्सला खरेदीच्या दरामध्ये वितरीत करणे महत्वाचे आहे. यासाठी मे.महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर झालेला आहे. तथापि सद्यस्थितीत मे. महासभेचे आयोजन नसल्यसाने परिस्थितीचे गांभिर्य लक्षांत घेवून इंजेक्शन खरेदी व खरेदीच्या दरामध्ये पात्र हॉस्पीटलस/ संस्था यांना वितरीत करणे बाबत तांतडीने कार्यवाही करावी सदर प्रस्तावास येत्या महासभेत घेवून मे. महासभेची कार्योत्तर मान्यता घेणेत येईल् याबाबत आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी व त्याप्रमाणे प्रशासनाने नियोजन करावे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे.

सदर कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार जागतीक संसर्गजन्य आजार कोरोना विषाणु (COVID१९) चे प्रतिबंधात्मक कार्यवाही उपाय योजनेसाठी धुळे शहरात उपचार घेत असलेल्या कोविड-19 रुग्णांना अत्यावश्यक Inj. Remdesivir १०० Mg 6300 Vial खरेदीसाठी खर्च रु.98,78,400/-मात्रला आर्थीक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३८ धुळे महानगपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावुन घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना भामरे महापौर सो.हद्दवाढीचा महत्वाचा विषय आलेला आहे. आमच्या हद्दवाढ गावाचे ग्रामपंचायतीचे जे कर्मचारी वर्ग झालेले आहेत त्याचा कधी पासून पाठपुरवठा करीत आहेत. महापौर सो. आयुक्त सो. जेवढे ही कर्मचारी असतील त्या सर्वांना अडीच वर्ष झाले हा विषय फक्त कागदावर ठेवू नका.जी काही प्रक्रिया असेल शासनाच्या नियमाची प्रक्रिया जलद गतीने करून सर्व कर्मचारीना न्याय द्या आणि जे काही कर्मचारींना कमी करण्यात आलेले आहे. जे रोजदारीवर होते त्याचा ही उदारनिर्वाहाचा प्रश्न आहे. त्यांचाही विचार मनपाने करावा.

म.शितल नवले महापौर सो.जसे आपण हद्दवाढ गावातील कर्मचारी समाविष्ट केलेले आहेत. आयुक्त महोदय आपल्याकडे १९९३ च्या आधीचे कायमस्वरूपीचे रोजंदारीचे कर्मचारी आहेत. त्यातील काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. आता माझ्या मत १५ ते २० कर्मचारी असतील आयुक्त सो.२०१२ पासून त्यांचा विषय प्रलंबित आहे. त्याच्यानुसार मागेच्या महासभेला सन २०१४ - १५ मध्ये यांचे ठराव आहेत ठराव करून शासनाला प्रस्ताव पाठविले आहेत काही मनपा आहेत त्यांनी १९९३ च्या अधीचे कर्मचारी कायम करून घेतले आहेत शासनाला प्रस्ताव पाठवून त्या नंर शासनाचे एक परिपत्रक आलेले आहे.सन २०१९ चे त्यांचे निकष ठरविले आहे. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, मनपा स्तरावर हा निर्णय घेता येईल प्रत्येक वेळा शासनाला प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही माझी विनंती आहे हे करीत असतांना १९९३ च्या आधिचे जे चांगले काम करत आहेत ते वांरवार आमच्या सारख्या नगरसेवकांकडे येत असतात मी हा प्रस्ताव मॅडम आपल्याकडे देतो त्याच्यावर लवकराल लवकर कार्यवाही करावी त्यांचे दोन ते तीन वर्ष राहिले आहेत कमीत कमी ते कायम झाले तर कमीत कमी त्यांच्या परिवाराला लाभ मिळेल ही विनंती आहे.

म.महापौर शितल भाऊ आपण चांगला विषय घेतला याबाबत प्रशासनाने कर्मचाऱ्याच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा कायदा आणि सहानुभूतीची सांगड असल्या कारणाने आपले भाग्य आहे की आयुक्त साहेबांनी निकाली काढले आहे.नगरपालिका व महानगरपालिकेच्या इतिहासात कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय याच बॉडीमध्ये झालेले आहे. आयुक्त साहेबांच्या माध्यमातून झालेले आहे आणि उर्वरित कर्मचाऱ्याचा प्रश्न असेल तर त्यावर प्रशासनाने सहानुभूती पुर्वक विचार करून निर्णय घ्यावा.

म.संजय पाटील महापौर सो यामध्ये कर्मचाऱ्याचे ७५ पदे घेतलेलेआहे त्याच्यामध्ये आकृतीबंध घेतलेला आहे. त्याच्यामध्ये असे काही कर्मचारी आहेत की २०१५ च्या अगोदरचे ते आकृतीबंधा मध्ये येत नाही. हयामध्ये सपूर्ण कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे आयुक्त सो आता आपण हजर झालेलेआहे आपला विषय होवून घेलेला आहे तो पुन्हा उपस्थिती करतो. प्रभाग क्रमांक १ ची

कामे झालेली आहे.माझ्या वार्डची नांद्रे यांची हद्दवाढीच्या कामाच्या फाईली गाहळ झालेली आहे.तुम्हाला आमची विनंती आहे तुमच्याकडे आमचे इस्टीमेट आहे त्यावर प्रशासकीय मान्यता द्या.

म.किरण अहिहराव — पान नं २० हद्दवाढ गावाचे लिपिक शिपाई,वॉचमन,व्हॉलमन, शिपाई कामगार माझ्या महिदंळे गावाची जवळ जवळ ४०० प्रॉपटी आहे. त्या गावाची १२ ते १३ हजार लोकसंख्या आहे . आणि आमचे गाव ज्यावेळेस मनपात वर्ग झाले त्यात आमचे कर्मचारी देखील वर्ग करून घेतले. मनपाने १३००० लोकसंख्याच्या हिशोबाने एकच लिपीक व व्हॉलमन आहे त्याठिकाणी अजून १ लिपीक व १ व्हॉलमन द्यावा जे करून लोकांना योग्य पाणीपुरवठा सुरळीत होईल.

म.प्रतिभाताई चौधरी — महापौर सो. महत्वाचे विषय प्रथम अजेंडावर घ्यावे दुसरा विषय असा आहे की, हद्दवाढ गावाचे जे कर्मचारी आहेत. मनपाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट करण्याचा हा जो विषय आहे त्यात मनपात काही कर्मचारी मानधन तत्वावर आहे. त्यांचे मानधन ८ ते १०००० रूपये आहे. काही कर्मचारी ८ ते १२ वर्षापासून मानधनावर काम करीत आहेत. आता काही कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. आज जो तुम्ही या विषयाचा प्रस्ताव शासनाला पाठविणार आहे. त्यामध्ये पुर्वलक्षी प्रभावाने असा उल्लेख करून शासनाकडे पाठवा.

म. महापौर — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.तसेच मनपा कडील उर्वरीत रोजंदारी कर्मचारीना देखील कायम पदावर रिक्त पदावर समावेशन करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७४ दिनांक २५/५२०२१

वलवाडी,भोकर, महिंदळे,नकाणे, अवधान,चितोड,नगाव, फागणे, वरखेडी, कुंडाणे, बिलाडी, बाळापूर, मोराणे, लळींग, वडजाई, पिंप्री या १६ गावांचा धुळे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रारुप यादी अधिसूचना प्रसिध्द करणेत आलेली आहे.

वलवाडी, महिंदळे, बाळापूर, पिंप्री ही ४ संपूर्ण गावे गावठाणासह, भोकर,अवधान, चितोड,वरखेडी,मोराणे या सहा महसुली गावचे गावठाणासह काही क्षेत्र , तर नगाव या गावाचे गावठाणाशिवाय ११ गावे समाविष्ट करणेत आलेली आहेत.

धुळे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करणेत आलेल्या १० गावांत अंतिम यादी प्रसिध्द करते वेळी खालील कर्मचारी कार्यरत होते. तसेच नगाव या गावाचे गावठाणाशिवाय समाविष्ट करणेत आलेली असल्याने उक्त ग्रामपंचायतीतील कर्मचारी धुळे महानगरपालिके कडे वर्ग करणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४९३ परिशिष्ट ४ मधील कलम ५ (क) मध्ये असलेली तरतुदीनुसार ग्रामपंचायतीचे नगरपरिषद/ नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्या बाबत प्राथमिकअधिसूचना निर्गमित करण्याच्या दिनांकापूर्वी संबंधित ग्रामपंचातीमध्ये नियमित स्वरुपात कार्यरत असणाऱ्या व नगरपरिषद/नगरपंचातीमध्ये समावेश करण्यासाठी अर्हताप्राप्त ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समावेश करणेबाबत कार्यपध्दती व तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत.त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवर समाविष्ट झालेल्या ११ग्रामपंचायतीमधील एकुण ७५कर्मचारी यांना समावेश करणे आवश्यक आहे.

उक्त ग्रामपंचायती महानगरपालिकेच्या नियंत्रणात घेतांना तत्कालीन आयुक्तसो यांचे जा.क्र. धुमपा/आस्था/१३९० दि. १२/०१/२०१८ आदेशान्वये मुद्दा क्र. ८ नुसार दि. ५ जानेवारी २०१८ पूर्वी हद्दवाढ क्षेत्रातील कामकाजासाठी त्या क्षेत्रास संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या नोकरीत असलेले अधिकारी व कर्मचारी असतील आणि अन्य तरतूद करण्यात येईपर्यंत दि. ५ जानेवारी २०१८ पूर्वी त्यास जे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क होता आणि ते सेवेच्या ज्या

शर्तीच्या ज्या शर्तीच्या अधिन होते तेच वेतन व भत्ते त्यास मिळतील व ते त्याच्या सेवेच्या अधिन असतील तसेच या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दि. ५ जानेवारी २०१८ पूर्वी केलेली सेवा महानगरपालिकेच्या सेवेत असतांना केलेल्या सेवा असे मानले जाईल. या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा परिशिष्ट ४ मधील तरतुदीनुसार लाभ अथवा कारवाईस पात्र असतील असे नमुद आहे.

दिनांक ०५/०१/२०१८ रोजी एकुण ११८ कर्मचारी कार्यरत होते. त्यानंतर प्राथमिक अधिसूचना दिनांक १०/०८/२०१५ नंतरचे कर्मचारी यांना तत्कालीन आयुक्तसो यांचे आदेशाने एकुण ४० रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेतुन कमी करणेत आलेले आहे.

उक्त आकृतीबंधातील कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबतची माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांचे कार्यालयाकडून मिळणेबाबत वेळोवेळी पत्र देणेत आले असुन त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. पं.स./ धु/ ग्रापं/०८दि.२७/०१/२०२१अन्वये सहपत्र १नुसार एकुण१ ते ७८कर्मचारी हे महानगरपालिकेच्या प्रथम उद्घोषनेच्या दिनांकपर्यंत ग्रामपंचायत मध्ये सातत्याने कार्यरत असलेबाबत नमुद केलेले आहे.

त्याअनुषंगाने ७८ कर्मचाऱ्यांपैकी सद्य:स्थितीत ७५ कर्मचारी कार्यरत आहेत त्यापैकी श्री.ज्ञानेश्वर पंडीत ठाकरे, खोदकाम मजूर वलवाडी हे दि.३०/०९/२०१० रोजी सेवेत नियुक्त झाले होते त्यांचे सेवेत असतांना निधन झाले आहे. २) श्री.अशोक सुकदेव पाटील, शिपाई, महिंदळे व श्री. प्रल्हाद मांगु वाघ, ग्रामपंचायत कर्मचारी (सर्व कामे करणारे) पिंप्री हे दोन कर्मचारी विहित वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले आहे.

धुळे महानगरपालिका ठराव क्र.१२३ दि.३०/१२/२०२० अन्वये ज्या कर्मचाऱ्यांना रु.१०,०००/-पेक्षा कमी मानधन आहे त्यांना रु.१०,०००/-मात्र तसेच वर्ग ४ चे ज्या कर्मचा-यांना रु.८,०००/- पेक्षा कमी मानधन आहे त्यांना रु.८०००/- व लागु करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सफाई कर्मचा-यांच्या कामाचा कालावधी कायम सफाई कामगारांप्रमाणे निर्धारीत करण्यांत यावा व सदर कर्मचा-यांचा पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करावा असा ठराव पारीत झाला आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.धुमपा आस्था-/३६३५ दि.२४/०२/२०२१ अन्वये वर्ग-३ च्या कार्यरत कर्मचाऱ्यांना रु.१०,०००/- व वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना रु.८,०००/- मात्र मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दि. १०/०८/२०१५ धुळे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रारुप यादी अधिसुचना प्रसिध्द करणेत आलेली आहे. धुळे महानगरपालिकेसाठी धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी दि.०४/०३/२०१६ देणत आलेली असुन शासन निर्णय दि. ०५/०१/२०१८ अन्वये वलवाडी, महिंदळे, बाळापूर, पिंप्री ही ४ संपूर्ण गावे गावठाणासह, भोकर, अवधान, चितोड, वरखेडी, मोराणे या सहा महसुली गावचे गावठाणासह काही क्षेत्र, तर नगाव या गावाचे गावठाणाशिवाय ११ गावे नव्याने समाविष्ट करणेत आलेली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार नविन पद मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

१० गावांचे वार्षीक महसुली उत्पन्न रक्कम रु.१२,८४,७६,७२२/- मिळत असून या कर्मचाऱ्यांचे वेतनावर वार्षिक रक्कम रु.१,१८,६०,२०० मात्र खर्च होणार आहे म्हणजेच एकुण वार्षिक उत्पन्नातून ९.२३ टक्के रक्कम वेतनावर खर्च होणार आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९,अनुसूची ड, कराधन प्रकरण ८ चे तरतुदीनुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील व वाढीव हद्दतील मालमत्तांचे सर्व्हेक्षण

कर्मचाऱ्यांमार्फत व जि.आय.एस. मॅपींगव्दारे करण्यात येत असुन सदर कार्यवाही पूर्ण झालेनंतर महानगरपालिकेस आर्थीक मोठया प्रमाणात उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच वाढीव हद्दीतील मालमत्तेच्या किंमतीत शहर हद्दीत समावेश झाल्याने मुद्रांक शुल्कातूनही मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

उक्त नमुद कर्मचाऱ्यांना धुळे महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेतल्यास सन २०२०-२१ चे प्रत्यक्ष ०.८३ एवढी आस्थापना टक्केवारीत वाढ होणार आहे.

धुळे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ११ गांवातील कर्मचाऱ्यांना धुळे महानगरपालिका कायम आस्थापनेवर समावेशनाबाबत वेळोवेळी निवेदन सादर केलेली असुन मा.मंत्री महोदय तसेच मा.आमदार धुळे ग्रामीण विधानसभा यांनी विधान सभा तारांकित प्रश्न उपस्थित करुन समावेशनाबाबत अद्यावत माहितीची मागणी केलेली आहे.

धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधात नमुद शैक्षणिक पात्रतेनुसार उक्त ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवर समावेश करणेसाठी खालीलप्रमाणे संवर्गातील जागा मंजुर करणेचा प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	गावाचे नांव	लिपीक	शिपाई	वॉटरमन	सफाई कामगार	वायरमन	वॉचमन	एकुण
१	वलवाडी	०५	०१	०८	१०	०१	-	२५
२	भोकर	०१	०१	०१	०१	-	०१	०५
३	नकाणे	०२	०१	०२	-	-	-	०५
४	महिंदळे	०३	०१	०१	०७	-	-	१२
५	मोराणे	०२	०२	०२	०१	-	-	०७
६	चितोड	-	०२	०२	-	-	-	०४
७	अवधान	०१	-	०१	०१	-	-	०३
८	वरखेडे	०२	०२	०१	०३	-	-	०८
९	बाळापूर	०१	०१	०२	०२	-	-	०६
१०	पिंपरी	-	-	-	-	-	-	-
	एकुण	१७	११	२०	२५	०१	०१	७५

तरी वरीलप्रमाणे एकुण७५जागांसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५१(४)नुसार नविन पद मंजुरीचे अधिकार शासनास असल्याने सदर कर्मचाऱ्यांचे पद मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यापूर्वी मे.महासभेच्या ठरावाची व मान्यतेची आवश्यक्ता आहे त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव मे.महासभेपुढे पाठविणेस मान्यतेसाठी सादर करणेसाठी प्रस्तावित केले असता मा. उपायुक्त(सा.प्र.) यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

१) मागील ११४ कर्मचाऱ्यांचे समावेशानंतर सद्य:स्थितीत बिंदु नामावलीनुसार लिपीक पदाची २९पदे शिपाई पदाची ९०पदे, व्हॉलमन पदाची ८पदे, वॉचमन पदाची ८ पदे, सफाई कामगारांची ३०० पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत.

२) ग्रामपंचायत कालीन एकुण ७५ कर्मचाऱ्यांचे समावेशन वरील रिक्त पदांवर प्रवर्ग निहाय व शैक्षणिक पात्रतेनुसार मा. शासनाची मान्यता घेऊन समावेशन करण्यास हरकत नाही.

३) ७५कर्मचाऱ्यांचे समावेशन बिंदु नामावलीनुसार करावे लागेल. तथापी काही कर्मचाऱ्यांना बिंदु नामावली नुसार समावेशन करणे शक्य झाले नाही, तर मा.शासनाकडे उर्वरीत कर्मचाऱ्यांसाठी पद निर्मितीचा प्रस्ताव देखील सादर करणेस मान्यता मिळावी असे नमुद केले आहे.

प्रस्तावातील कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांचा समावेशन सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या पदांवर करण्यात येणार आहे. त्यांना नवीन पदांचा प्रस्ताव शासनाकडून मंजुर झाले नंतर एकत्रित आदेश निर्गमित करणे योग्य होईल. जेणे करुन सदर कर्मचाऱ्यांची जेष्ठता एक सारखी राहील याबाबत कार्यवाही करणेत येईल.

याप्रमाणे प्रशासनाकडून मे. महासभेपुढे अहवाल सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार तत्कालीन धुळे नगरपालिकेत दि.१०/०३/१९९३ पूर्वी व दि.११/०३/१९९३ ते२७/०३/२०००पूर्वीचे सद्यस्थितीतील ६५ रोजंदारीवर कर्मचारी कार्यरत आहे. शासनाने दि. १०/०३/१९९३ पूर्वी व दि.११/०३/१९९३ ते २७/०३/२००० पूर्वीचे रोजंदारीवरील कर्मचा-यांना दि. ०५/०२/२०१९ चे शासन निर्णयानुसार एक विशेष बाब म्हणून कायम सेवेत सामावून घेण्याबाबतचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. धुळे महानगरपालिकेत सद्यस्थितीत रोजंदारीवरील कर्मचा-यांची संख्या ६५ आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांचे धुळे महानगरपालिकेत संवर्गनिहाय व प्रवर्ग निहाय रिक्त पदावर कायदेशीर बाबी तपासून समावेशन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवर समाविष्ट झालेल्या ११ ग्रामपंचायती मधील एकुण ७५ कर्मचारी यांचा बिंदु नामावलीनुसार ६५कर्मचा-यांचे समावेशन झाल्यानंतर रिक्त उरणा-या पदांवर समावेशन करणे व आवश्यकता असल्यास (कमी पडल्यास) नवीन पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१(४) नुसार शासनाकडेस सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.तसेच सदर कर्मचा-यांची सेवा शासन अंतिम अधिसुचने दिनांकापासून समावेशन ग्राहय धरण्यांत यावे व सेवानिवृत्तीसाठी ग्रामपंचायत कालीन सेवा ग्राहय धरावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३९ १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोगा बाबत कार्यपध्दती निश्चीत करणेसाठी बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर याबाबत मा. आयुक्त महोदयांनी माहिती द्यावी.

म. आयुक्त आपल्याकडे ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती झाली होती. त्यानुसार वित्त आयोगाची स्थापना झाली. आणि केंद्र शासनामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थाना लोकसंख्येच्या गुणोत्तरानुसार निधी वितरीत करण्यांत येतो. त्यानुसार प्रत्येक ५ वर्षाला वित्त आयोगाच्या शिफारसी लागू होतात. आतापर्यत आपल्याला १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारसी लागू होत्या. आता १५ वा वित्त आयोग लागू झालेला आहे. यात दोन भाग आहेत त्यात १० लाखापेक्षा जास्त व १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहराची वर्गवारी आहे. आपण १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहराच्या वर्गवारीत येतो. यात शासनाने बेसीक ग्रॅन्ड ५० टक्के आणि ५० टक्के असे काही घटक शासनाने ठरवून दिलेले आहे. आणि त्या घटकांवरच तो खर्च करावा लागणार आहे.त घटक म्हणजे पिण्याचे पाणी यांत रेनवॉटर हॉर्वेस्टींग रिसायकलींग आणि सॉलीड वेस्ट मॅनेजमेन्ट या दोन घटकांवर ५० टक्के निधी खर्च करावा लागणार आहे.

आणि उर्वरीत ५० टक्के निधी बेसीक ग्रॅन्ट आहे यांचे सुध्दा काही निकष आहे यावर्षी सुध्दा आपण त्यांचा चांगला वापर करु. आजच उपमुख्यमंत्री महोदयांची व्ही.सी. झाली यात त्यांनी कोविडसाठी देखील सदर निर्धीचा वापर करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत याबाबत सुधारीत सुचना आल्यानंतर आपण त्यांची अंमलबजावणी करु.

म. शितल नवले — यात ५० टक्के पिण्याचे पाणी आणि ५० घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी वापरण्यांचे निकष आहे. आपल्याला तापी योजनेसाठी ज्या काही दुरुस्ती कराव्याच्या आहे उदा फिल्टरेशन प्लॅन्ट, पंप दुरुस्ती लिकेजेस यासाठी आपण हा निधी वापरु शकतो का?

म आयुक्त — आपल्याला जर याठिकाणी १०० रुपये मिळणार असतील तर ५० रुपये पिण्यांचे पाणी व घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करु शकतो. उर्वरीत ५० रु इतर बाबींसाठी खर्च करता येतील.

म. शितल नवले — आपल्याला शहराचा पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी १५ तें २० कोटी रुपये लागणार आहे. आपण यासाठी तज्ञ संस्थेची नियुक्ती प्रक्रिया करीत आहोत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार आपल्याला पाणीपुरवठा योजनेत बदल तथा सुधारणा कराव्या लागतील त्यासाठी खर्च लागणार आहे. सदरचा खर्च या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणेबाबत ठराव तसेच कामाची निश्चिती करण्यांत यावी.

म. प्रतिभाताई चौधरी — आपला देवपूर येथील नेहरुनगर जलकुंभ जुना झालेला आहे.तेथे नवीन जलकुंभ होणे गरजेचे आहे. या निधीतून सदर ठिकाणी नवीन जलकुंभ घेणेबाबत निर्णय घ्यावा तसेच शहरात काही भागात ६ इंची, ८ इंची अशा विविध आकाराच्या पाईप लाईनस आहेत काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होतो त्यामुळे पाणीपुरवठा अनियमित असतो काही भागात शेवटच्या घरापर्यंत पाणी पोहचत नाही यासाठी आपली पाणीपुरवठा योजना सक्षम वहावी म्हणून संपूर्ण वितरण यंत्रणेचे वॉटर ऑडीट करावे व त्यानुसार वितरणात सुधारणा करावी यासाठी होणारा खर्चही या निधीतून करण्यांत यावा.

म. आयुक्त — आपण पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपण पाणीपुरवठा नियोजनाबाबत आपल्या स्तरावर प्रयत्न करीत आहोत परंतु त्यासाठी सक्षम यंत्रणा व तज्ञ सल्लागार नियुक्ती गरजेची आहे. त्यासाठी आपण प्रक्रिया ही केलेली आहे ते काम अंतिम टप्प्यात आहे. आपण त्यांच्या मार्गदर्शनानुसार यामध्ये निश्चितच मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहोत.

म. महापौर — शासनाचे या वित्त आयोगाबावत जे काही निर्देश आहेत त्यानुसार शहरात ज्या ठिकाणी जलकुंभाची आवश्यकता असेल त्याठिकाणी जलकुंभ उभारण्यांस या निधी अंतर्गत मान्यता देण्यांत येत आहे. मोगलाई, जोरावरअली सोसायटी, वरखेडी, बाळापूर,स्वामी नारायण मंदिर देवपूर, नेहरुनगर, मायक्रो जलकुंभ अन्सारनगर, इत्यादी ठिकाणी जागेची उपलब्धता व आवश्यकता तपासून त्याप्रमाणे प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा.

म. वंदना थामरे — आमच्या वलवाडी भागात जलकुंभांना कुंपन भिंत नाही मी याबावत सातत्याने पत्रव्यवहार केलेला आहे पण निधी नसल्यामुळे काम झालेले नाही तसेच वलवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथेही संरक्षण भिंत नाही.यामुळे सदरचे काम १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून घेण्यांत यावे.

म. अमीन पटेल शहरात डायरियाचे प्रमाण वाढलेले आहे. आज आपल्या शहरातील फिल्टरप्लॅन्ट खराब झालेले आहे त्यामुळे शहरात दुषित पाणीपुरवठयांचे प्रमाण वाढलेले आहे. आपल्या शहरातही मालेगांव प्रमाणे नवीनअद्ययावत फिल्टरप्लॅन्ट जलकुंभावर बसविणे आवश्यक आहे. सदरच्या निधीतून यासाठी तरतूद करावी.

म. महापौर याबाबत अभियंता यांना सुचना देण्यांत येते की, आपल्या बांभळे किंवा अन्य ठिकाणी असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रावर संरक्षण भिंत होणे गरजेचे आहे. तेथे सुरक्षा असणे आवश्यक आहे .या योजनेचे सवर् निकष तपासून जलशुध्दीकरण केंद्राच्या ठिकाणी संरक्षध्ण भिंत बांधणेसाठी या निधी अंतर्गत प्रस्ताव सादर करावा.निधीबाबत शासनाचे निर्देश आहेत निधीचा विनियोग मुदतीत होणे आवश्यक आहे. अन्यथा पुढील निधी प्राप्त होणार नाही. प्रशासनाने याबाबतही दक्षता घ्यावी व निकष व कामाची आवश्यकता तपासून तसेच जागेची उपलब्धता लक्षात घेवून या निधीअंतर्गत प्रस्ताव सादर करावा.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७५ दिनांक २५/५/२०२१

सन २०२०-२१ या वर्षापासुन १५ वा वित्त आयोग लागु झालेला आहे. १५ वा केंद्र वित्त आयोगाच्या अंतीम अहवाल प्रसिध्द झालेला आहे. यानुसार १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत राज्यातील नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांना नॉन मिलीयन प्लस सिटी (Non Million Plus Cities) यासाठी स्वतंत्र निधी मंजुर करण्यात आलेला आहे. यात धुळे महानगरपालिके साठी सन २०२०-२१ या वर्षासाठी निधी मंजुर झाला असुन पहिला व दुसरा असा एकुण 22 कोटी निधी प्राप्त झाला आहेत.

शासन निर्णयानुसार १५ वा वित्त आयोगा अंतर्गत Non Million Plus Cities गटातील नागरी स्थानीक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या वितरणाची व विनियोगाची कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चीत केलेली आहे.

१) निधी वितरणाचे निकष :-

१५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Non Million Plus Cities घटकांसाठी खालील दोन प्रकारासाठी समान हप्त्यात अनुदान प्राप्त होणार आहे.

अ) मुलभुत अनुदान / बंधनकारक अनुदान (Basic Grant Untined Grants)

ब) बंधनकारक अनुदान (Tied Grants)

a) Drinking water (including rainwater harvesting and recycling)

b) Solid waste management

निकष क्र.१ :- (पात्रता) शासन निर्णय क्र.एफ.एफ.सी. २०२०/प्र.क्र.५६ नवि-४ दिनांक २८ ऑक्टोंबर २०२० मध्ये नमुद प्रस्तावात नमुद केल्यानुसार Million Plus Cities अंतर्गत समाविष्ट नागरी समुहातील नागरी स्थानीक स्वराज्य संस्था व्यतीरीक्त राज्यातील इतर सर्व महानगरपालिका / नगरपरिषद इ. समावेश होईल.

निकष क्र.२ :- (लोकसंख्या क्षेत्रफळ) Non Million Plus Cities गटातील पात्र नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांना सदर अनुदानाच्या ९०% निधी २०११ च्या लोकसंख्या व क्षेत्रफळाच्या प्रमाणात वाटप होणार आहे.

II) १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत Non Million Plus Cities गटासाठी प्राप्त अनुदानातुन हाती घ्यावयाची कामे

अ) बंधनकारक अनुदानात (tied grants) (एकुण अनुदानाच्या ५० टक्के)

१) बंधनकारक अनुदानापैकी ५०% अनुदान a) Drinking Water (including rainwater harvesting and recycling) पेयजल पाणी पुरवठा, जल पुर्नभरण / पावसाच्या पाण्याची साठवण जल पुर्नप्रक्रिया यासाठी खर्च करण बंधनकारक आहे.

२) उर्वरीत ५०% अनुदान b) (Solid waste management) घनकचरा व्यवस्थापन यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे.

३) उपरोक्त a) व b) यापैकी एका घटकाची गरज पुर्ण झालेली असल्यास व त्यासाठी खर्च करण्याची आवश्यकता नसल्यास त्या घटकासाठीचे अनुदान दुसऱ्या घटकासाठी खर्च करण्याची मुभा असेल.

ब) मुलभुत अनुदान / बंधनकारक अनुदान (Basic Grants / United Grants) :-

१५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त मुलभुत अनुदान / बंधनकारक अनुदान (Basic Grants /United Grants) महानगरपालिकांच्या बाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ मध्ये नमुद केलेल्या आवयक कर्तव्यांकरीता खर्च करणे पुढील अटींच्या अधीन राहुन अनुज्ञेय राहिल.

१) केंद्र व राज्य योजनाअंतर्गत मंजुर पायाभुत सुविधा प्रकल्पावरील लोकवर्गणी मनपा / नपाचा हिस्सा व असे प्रकल्प पुर्ण करण्याकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च (जर प्रकल्प मान्यतेच्या असेल तर अशा प्रकल्पाच्या बाबतीत लोकवर्गणीच्या हिश्याची रक्कम राखुन ठेवता येइल)

२) शासन / भारतीय आर्युविमा महामंडळ / हुडको इ. वित्तीय संस्थांकडुन पायाभुत सुविधा प्रकल्पांसाठी महानगरपालिका / नगरपरिषदेने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी होणारा खर्च. सदर कर्जाची परफेड संबंधीत नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांनी केली नाही तर त्या नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांना १५ व्या वित्त आयोगाच्या देय निधीतुन शासन अशा कर्जाच्या परतफेडीकरीता आवश्यक रक्कम परस्पर वळती करु शकेल.

३) नागरी स्थानीक स्वराज्य संस्थेकडील पाणी पट्टी व वीज बिले (दंड सोडुन) भरण्याचा खर्च

४) उपरोक्त १ ते ३ येथे नमुद बाबींवर खर्च करण्यास वाव नसल्यास प्राप्त अनुदानातील उर्वरित शिल्लक रक्कम संबंधीत कायद्यातील आवश्यक कर्तव्यांपैकी **कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर आस्थापना खर्चाशिवाय** अन्य कर्तव्यांवर खर्च करणे अनुज्ञेय राहिल.

५) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोगाची कार्यपध्दती :-

- **प्रशासकीय मंजुरीची कार्यपध्दती :-**

१) **महानगरपालिका:-**१५व्या वित्त आयोगा अंतर्गत Non Million Plus Cities गटात अनुदानातुन घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधीत महानगरपालिकेच्या आयुक्तांना राहतील.

मात्र प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी खालील बाबींची पुर्तता झाल्याची खात्री करण्यात यावी.

१) प्रस्तावीतकामे ही१५व्या वित्त आयोगाअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांपैकीच असावी.

२) नागरी स्थानीक स्वराज्य संस्थेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत कामाची शिफारस केली असावी

३) सदर कामांना सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी असणे आवश्यक आहे

४) ज्या प्रस्तावात बांधकामे अंतर्भुत आहेत अशा कामांच्या बाबतीत प्रस्तावीत बांधकामा खालील जमिनीची मालकी संबंधीत स्थानीक स्वराज्य संस्थेची असावी

५) सदर प्रस्तावातील बांधकामे ही शहराच्या विकास आराखड्याशी सुसंगत आहेत किंवा कसे याबाबतचे नगररचना कार्यालयाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असेल

६) अग्निशमन वाहने / उपकरणे व इतर अग्निशमन यंत्रसामुग्री खरेदी करतांना संचालक अभियान सेवा यांची तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक राहील.

६) बंधनकारक अनुदान (Tied Grants) मागणीचे प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती :-

१) सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठीचे Non Million Plus Cities गटासाठी बंधनकारक अनुदान (Tied Grants) व Million Plus Cities गटासाठी water supply etc. व solid waste managent या घटकासाठीचे बंधनकारक अनुदान (Tied Grants) मागणी करण्यासाठी **आवासन व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार** नोडल मंत्रालय म्हणुन काम पाहणार आहे.

२) आवासन व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत उपरोक्त अनुदान वितरणासाठी गुणांकन कार्यक्रम (Marking Scheme) विहीत केलेला आहे. यांची प्रत विवरण पत्र १ येथे जोडलेली आहे.

३) या गुणांकन कार्यक्रमानुसार Million Plus Cities व Non Million Plus Cities गटातील सर्व नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांनी Water Supply and Waste Water Management व solid waste managent या दोन घटकाची माहिती विवरणपत्र १ मधील गुणांकन कार्यक्रमात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ३० नोव्हेंबर २०२० पुर्वी आयुक्त तथा संचालक , नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना सादर करावी.

४) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांनी विवरण पत्र १ मधील गुणांकन कार्यक्रमात दर्शविल्याप्रमाणे नागरी स्थानीक स्वराज्य संस्थानिहाय माहिती City Finance Portal वर प्रधान सचिव (नवि-२) यांच्या मान्यतेने दि.३१ डिसेंबर २०२० पुर्वी अपलोड करावी.

(V)निधी वितरण कार्यपध्दती :-१५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीकरीता राष्ट्रीयकृत बँकेच्या स्थानीक बँक शाखेमध्ये स्वतंत्र खाते उघडणे बंधनकारक राहिल व सदरच्या खाते क्रमांकासह तपशिलवार माहिती शासनास कळविणे बंधनकारक राहिल.

(VI)विनियोग प्रमाणपत्र सादर करणे:-१) केंद्र शासनाकडुन १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त होणारा निधी जुन व ऑक्टोंबर या दोन महिन्यात प्राप्त होणर आहे. त्यामुळे अनुदानाच्या पुढील हप्तयाची मागणी केंद्र शासनाकडे करण्यासाठी किमान ७०% खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र दरवर्षी १५ मे व दि.१५ सप्टेंबर पर्यंत नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

७) १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत केंद्र शासनाकडुन अनुदान प्राप्त होणाऱ्या पहिल्या आर्थिक वर्षातील निधीचे विनियोग प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केल्यानंतरच पुढील आर्थिक वर्षातील अनुदान केंद्र शासनाकडुन प्राप्त होणार आहे.

(VII) १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन हाती घेण्यात आलेल्या योजनांचा अंमलबजावणीचा आढावा घेणे:-शासनाने विहित केलेल्या उपरोक्त कार्यपध्दतीचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करावे.

त्यानुसार उक्त संदर्भिय शासन निर्णयात Marking scheme for claiming tied grant under १५th Finance Commission for the period २०२१-२२ to २०२५-२६ हे सोबतच्या विवरणपत्र १ मध्ये नमुद केले आहे.

त्यानुसार सदरचा प्राप्त होणारा अनुदानातुन बंधनकारक अनुदान एकुण अनुदानाच्य ५०% घनकचरा व्यवस्थापन साठी५०%व वॉटर सप्लाय साठी अंतर्गत खर्च करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एफएफसी २०२०/प्र.क्र.५६ नवि-४ दि.२८ऑक्टोंबर २०२० मध्ये १५ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नागरी स्थानीक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगा बाबतची कार्य पध्दती निश्चीत करणे या शासन निर्णयातील ब मधील (iii) १ मध्ये नमुद नुसार Non Million Plus citiesगटातील अनुदानाबाबत घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार महापालिकांच्या बाबतीत संबंधीत महापालिकेच्या आयुक्तांना असतील असे नमुद असुन प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी (२) मध्ये नमुद नुसार नागरी स्थानीक स्वराज्य संस्थेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत कामाची शिफारस केली असावी असे नमुद असल्याने प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१५ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोगा बाबत कार्यपध्दती निश्चित करणेसाठी मे.महासभेपुढे सादर करणे बाबत नमुद केले आहे. त्यानुसार १५ व्या वित्त आयोगा निधी वितरण व नॉन मिलीयन प्लस सिटी गटा करीता प्राप्त अनुदानातुन घ्यावयाची कामे या बाबत शासन निधी रु.22 कोटी मात्र प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अनुदानाच्या ५०% रक्कम घनकचरा व्यवस्थापन व ५०%वॉटर सप्लाय साठी खर्च करणे बंधनकारक आहे. तरी विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार १५व्या वित्त आयोग अनुदानाचे विनियोग बाबत कार्यपध्दती निश्चित करणेकामी उक्त प्रस्ताव व मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव तसेच शासन निर्देश व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार प्राप्त होणा-या अनुदानातून जागेची उपलब्धता तसेच आवश्यकता तपासून शहरात विविध ठिकाणी नवीन जलकुंभ बांधणे तसेच जलशुध्दीकरण केंद्रासाठी संरक्षण भिंत बांधणे व पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सक्षम होण्यासाठी तज्ञ सल्लागार संस्थेच्या सुचनेनुसार आवश्यकते बदल व सुधारणा करणेस्तव होणारा खर्च सदर निधी अंतर्गत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. यांत खालील कामे प्राधान्याने करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

१. वरखेडी येथे ५ लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ व पंपींग स्टेशन उभारणे अंतर्गत वितरण वाहिनी टाकणे व वाल कपौंड करणे.
२. जगदीशनगर येथे १२.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारणे रायझींग मेन लाईन टाकणे.

३. अवधान येथे फिल्ट्रेशन प्लॅन्ट तलावात जॅकवेल व सम तसेच ऑन लाईन बुस्टर उभारणे.
४. जोरावरअली सोसायटी येथे १० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ उभारणे व रायझींग मेन लाईन टाकणे.
५. मोहाडी गावात जलकुंभ उभारणे.
६. डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र बळकटीकरण करणे.
७. बांभळे व वलवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथे संरक्षण भिंत बांधणे.
८. नगांवबारी जलकुंभ येथे वॉल कपौंड करणे.

तसेच शासन निकषानुसार प्राप्त होणारा ५० टक्के निधी घनकचरा वाहतूक व संकलन व्यवस्था तसेच अनुषंगिक कामांसाठीच वापरण्यांत यावा.प्राप्त झालेला व प्राप्त होणारा निधी वेगवेगळया स्वतंत्र खात्यात ठेवण्यांत यावा. व सदरचा निधी त्याच घटकांसाठी वापरण्यांत यावा.जेणे करुन याबाबत ताळमेळ घेणे सोईस्कर होईल.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४० मनपा देवपुर अमरधाम व चित्तोड रोड अमरधाम येथे शवदाहिनी बसविणे तसेच महाराष्ट्र ऑईल एक्टेक्शंस प्रा. लि. धुळे यांचे पत्रानुसार देवपूर एकविरादेवी मंदिराजवळील अमरधाम येथे स्वखर्चाने गॅस शवदाहिनी बसविणेकामी मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन माझे एकच म्हणणे आहे यासाठी आयुक्तांकडे गेलो होतो एकदा त्यांनी मला असे सांगितले होते की आपण दोन शवदाहिनी मागवित आहोत त्यातील एक एकवीरा देवी अमरधाम व दुसरी कुमार नगर अमरधाम येथे मागितली आहे. आणि आयुक्त साहेबांनी ती मागणी मान्य केली होती मात्र आता विषय आल्यानंतर कुमारनगर अमरधाम ऐवजी एकविरा देवी व चितोड रोड अमरधाम असा विषय आलेला आहे या आमरधामला जरूर द्यावी माझी विनंती राहील तिसरी शवदाहिनी आमच्या कुमारनगर अमरधामला द्यावी ही विनंती

म. महापौर एकवीरा देवी अमरधाम येथे श्री.वसंतशेठ अग्रवाल यांच्या माध्यमातून गॅस शवदाहिनी विनामूल्य तत्वावर उपलब्ध होणार आहे एकविरा देवी येथे गॅस शवदाहिनी देण्यासाठी ज्यावेळेस भाजपा महानगराध्यक्ष श्री.अनुपजी अग्रवाल, श्री. प्रशांतजी मोराणकर आयुक्त सो आणि मी आमची चार जणांची बैठक झाल्यानंतर त्यांनी जे दातृत्व दाखविले आहे तो साहेबांनी त्यास मान्यता दिली त्यामुळे आज हा विषय घेण्यात आलेला आहे श्री वसंतशेठ अग्रवाल ऑईल एक्टेक्शंस प्रा.लि.धुळे यांनी जे दातृत्व दाखविले त्याबद्दल संपुर्ण धुळेकर जनता आपले ऋणी आहे आपल्या दातृत्वाबद्दल अभिनंदन व मनपूर्वक आभार या कामात सुप्रसिद्ध श्रीरामजी देशपांडे मा.अनुपजी अग्रवाल श्री प्रशांत मोराणकर या सर्वांचे सहकार्य लाभल्याने मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७६ दिनांक २५/५/२०२१

धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये हददवाढ क्षेत्रासहच्या भागात एकुण ११ हिंदू अंत्यविधी स्मशानभूमी आहे.सदयास्थितीत कोरोना प्रादुर्भावामुळे मृत्यु संख्येमध्ये वाढ झालेली आहे.अशा परिस्थितीमध्ये अंत्यविधीसाठी विदयुत शवदाहिनी किंवा गॅस शवदाहिनीचा पर्याय शासनाच्या १२ एप्रिल २०२१ च्या परिपत्रकानुसार विदयुत दाहिनी,गॅस दाहिनी बसविण्याचे कामी नगरोत्थान योजने अंतर्गत करण्यासाठी अनुज्ञेय आहे. धुळे महानगरपालिका पत्र क्र.१९ दि.२३/०४/२०२१ नुसार देवपुर अमरधाम येथे विदयुत शवदाहिनी अथवा गॅस शवदाहिनी बसविण्या कामी शासन अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करण्यात आलेला आहे.म.महापौर सो.,यांनी देवपूर अमरधाम तसेच चित्तोड रोड अमरधाम येथे सुध्दा शवदाहिनी बसविण्याचा प्रस्ताव करावा अशा सुचना दिल्या आहेत. सदरच्या कामीसाठी शासन निधी उपलब्ध होण्यासाठीच्या प्रस्तावा सोबत दयावयाच्या प्रमाणापत्रामध्ये मनपा सर्वसाधारण सभेचा ठराव आवश्यक आहे.

या संदर्भात महाराष्ट्र ऑईल एक्टेक्शंस प्रा.लि. धुळे यांचे पत्र प्राप्त झालेले असून सदर संस्था एकविरा देवी मंदिर जवळील अमरधाम येथे गॅस शववाहिनी सयंत्र स्वखर्चाने उभारणी करण्यास तयार आहे याकामी आवश्यक ती जागा बांधकाम, आणि विज पुरवठयाची सोय महानगरपालिकेने करावे व उभारणी पूर्ण झाल्यानंतर कायम स्वरुपी वापर व व्यवस्थापनाची व्यवस्था महानगरपालिकेने करावी असे कळविले आहे.तसेच सदर शववाहिनी सयंत्राची सोय सदर संस्थेमार्फत स्व.सौ.कमलादेवी वसंतलाल अग्रवाल यांच्या स्मरणार्थ देण्यांत येत असून त्याबाबत प्रस्तावास मान्यता देणेबाबत पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे.

करीता उक्त प्रमाणे प्रस्तावाकरीता धोरणात्मक निर्णय असल्याने मनपा देवपुर अमरधाम व चित्तोडरोड अमरधाम येथे शवदाहिनी बसविण्यास मान्यता होणेसाठी म. महासभेकडे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र ऑईल एक्टेक्शंस प्रा.लि.धुळे यांचे पत्रानुसार एकविरा देवी मंदिर जवळील अमरधाम येथे गॅस शववाहिनी सयंत्र स्वखर्चाने उभारणी करण्यास सदर संस्थेस मान्यता देण्यांत येत आहे. याकामी आवश्यक ती जागा बांधकाम, आणि विज पुरवठयाची सोय महानगरपालिकेने करावी. यासाठी आवश्यक त्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे व उभारणी पूर्ण झाल्यानंतर कायम स्वरुपी वापर व व्यवस्थापनाची व्यवस्था महानगरपालिकेने करावी.तसेच सदर शववाहिनी सयंत्राची सोय सदर संस्थेमार्फत स्व.सौ. कमलादेवी वसंतलाल अग्रवाल यांच्या स्मरणार्थ देण्यांत येत असून त्याबाबत त्यांच नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच चितोडरोड,कुमारनगर व वरखेडी अमरधाम येथेही शवदाहिनी बसविणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याकामी तांतडीने उचित कार्यवाही प्रशासनामार्फत करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४१ सन्मा.सदस्य श्री.अमोल पावबा मासुळे यांचे पत्रानुसार चितोडरोड अमरधामला श्री.संत तुकाराम महाराज वैकुठधाम असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले सदर भागात मोठया प्रमाणावर संमिश्र समाजाची वस्ती आहे. संत तुकाराम महाराज हे सोषित, वंचित समाजाला दिशा देणारे संत पुरुष होते. धुळे महानगरपालिकेच्या माध्यमातून याठिकाणी नवीन अद्ययावत वैकुंठधाम आकारास येणार आहे. त्यामुळे अशा संत पुरुषाचे नामकरण करण्यांस आमच्या प्र.क्र.१६ च्या सर्व नगरसेवकांची संमती आहे. समन्वयाने हा प्रस्ताव मंजूर करावा हि विनंती.

म.अमोल मासुळे आजच्या अजेंडयावर चितोड रोड अमरधामचे श्री.संत तुकाराम महाराज असे नामकरण करणेबाबतचा जो विषय घेण्यात आलेला आहे. सर्वात प्रथम मिल परिसर वाशीयाची जी मागणी होती तुमच्याकडे विनंती केली. तो विषय तुम्ही अजेंडयावर घेतला त्याबद्दल सर्व प्रथम मी तुमचे व आमच्या वार्डतील नागरीकांच्या वतीने धन्यवाद देतो व आभार व्यक्त करतो. ज्या पध्दतीने महाराष्ट्र ही संताची भूमी आहे सर्व संतापैकी संत तुकाराम हे नाव अग्रगन्न आहे. वारकरी संप्रदायाच्या सर्व संतापैकी हे एक संत तुकाराम महाराजाचे नाव सर्वात प्रथम घेतले जाते. जगगुरू तुकोबा रायाचे कार्य होते ते कुठल्याही जाती पाती धर्मासाठी नसून सर्वांना प्रेरणादायी कार्य होते. आज सभागृहात सर्व सन्मा.सदस्यांनी देखील एक मुखाने त्या विषयास मंजूरी दिली. मी सदस्याचे देखील मिल परिसर वासीयांच्या वतीने आभार व्यक्त करतो. याठिकाणी चितोड रोड अमरधामसाठी नगेरोत्थान योजनेअंतर्गत जो ७५ लाखाचा निधी भाजपाचे नेते आमचे आदरणीय डॉ.सुभाष जी भामरे, जिल्हाध्यक्ष श्री.अनुप अग्रवाल व महापौर श्री.चंद्रकात सोनार तुमच्या सर्वच्या माध्यमातून व आयुक्त साहेबांना देखील धन्यवाद देतो.

म.महापौर आता शितल भाऊ आपण जो विषय मांडला त्याभागातील नगरसेवक शितलभाऊ नवले , संतोष खताळ,सुरेखा उगले, वंदना मराठे , योगिता बागुल व अमोल मासुळे सर्व जे नगरसेवक आहेतआपण या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता द्यावी. शितल भाऊ तुम्ही जे अमरधामचे उर्वरित काम सांगितले आहे .त्याचे लवकरच इस्टिमेट दिले तर ते काम देखील तुमच्या सुचनेनुसार करण्यात येईल.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७७ दिनांक २५/५/२०२१

सन्मा.सदस्य श्री.अमोल पावबा मासुळे तसेच सन्मा. सदस्य श्री. शितल नवले, सौ. सुरेखा उगले, सौ.वंदना मराठे, श्री. संतोष खताळ,सौ.योगिता बागुल,सौ. रेखा सोनवणे यांच्या संमतीनुसार व पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील मिल परिसरातील चितोडरोड येथे अंत्यविधीसाठी मनपाचे अमरधाम आहे. सदर ठिकाणी या भागातील मृत्यू झालेल्या नागरीकांचे अंत्यसंस्कार केले जातात. महाराष्ट्र ही संताची भूमी मानली जाते.या सर्व संतापैकी संत तुकाराम महाराज आहेत. वारकरी संप्रदायाचे सर्वश्रेष्ठ संतापैकी संत तुकाराम महाराजांचे

नाव घेतले जाते. त्यांनी संपूर्ण आयुष्य ध्यान व चिंतन तसेच समाजाच्या कल्याणाची कामे केली आहेत. त्यांनी आपल्या रसाळ वाणीतून अनेक अभंग रचना केल्या आहेत. संत तुकाराम महाराज यांनी वारकरी जगतगुरु म्हणून ओळखले जाते.संत तुकाराम महाराजाचे अभंग हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक द्योतक आहेत. संत तुकाराम महाराज यांनी बहुजन समजाला देव धर्म या संबंधी मते लोकांना पटवून दिली. त्याचप्रमाणे समाजातील अंधश्रध्देचा पगडा दूर करुन लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्यांचे कार्य केले. संत तुकाराम महाराज यांचे समाज प्रबोधनाचे कार्य आजही समाजाला मार्गदर्शक ठरले आहे.अशा या थोर संतानी केलेली कार्य सर्व समाजासाठी प्रेरणादायी व दिशादायी असल्याने या परिसरातील चितोडरोड येथीलअमरधामास श्री. संत तुकाराम महाराज वैकुंठधाम असे नामकरण करणे बाबत **सन्मा.सदस्य श्री.अमोल पावबा मासुळे तसेच सन्मा. सदस्य श्री. शितल नवले, सौ. सुरेखा उगले, सौ.वंदना मराठे, श्री. संतोष खताळ,सौ.योगिता बागुल,सौ. रेखा सोनवणे यांची संमती व पत्र प्राप्त आहे.** उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर अमरधामास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत जा.क्रं.धुमपा/ बांवि/३९ दि. ११/५/२०२१ नुसार दै. देशदुत या वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणेत आल्या होत्या तथापि अद्याप पावतो एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

तरी सदर नामकरण प्रस्तावास मंजुरी मिळणेस्तव मे.महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार चितोडरोड अमरधामला श्री. संत तुकाराम महाराज वैकुठ धाम असे नामकरण करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४२ **सन्मा. सदस्या सौ. योगिता प्रशांत बागुल यांचे पत्रानुसार प्र.क्र. १६ मधील रस्त्यास रमाबाई आंबेडकर पथ तसेच मोती नाल्यावरील पुलास राष्ट्रमाता जिजाऊ पुल असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे सदर विषय मंजूर करण्यांत यावा

म.महापौर सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७८ दिनांक २५/५/२०२१

सन्मा. सदस्या सौ. योगिता प्रशांत बागुल यांचे पत्रानुसार धुळे शहरातील प्रभग क्रं. १६ मध्ये धान्य गोडाऊन ते सुरत बायपास हा महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यास अद्याप नामकरण झालेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांनी समाजातील मोठया प्रमाणावर योगदान दिलेले आहे. तसेच राजमाता जिजाऊ यांचे कार्य देखील तेवढेच महान आहे. त्यांच्या कार्याची महती लक्षात राहावी तसेच त्यांचे कार्य नागरीकांसाठी नेहमीच

प्रेरणादायी ठरावी याकरिता प्र.क्रं. १६ मध्ये धान्य गोडाऊन ते सुरत बायपास पावेतो रस्त्यास रमाबाई आंबेडकर पथ तसेच प्रभागातील मोती नाल्यावरील पुलास राजमाता जिजाऊ पुल असे नामकरण करणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्यापपावेतो सदर रस्त्यास व पुलास नामकरण झालेले नाही.

तरी उक्त बाबत जा.क्रं.धुमपा/बांवि/ ३९ दि. ११/५/२०२१ नुसार दै. देशदुत या वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणेत आल्या होत्या तथापि अद्यापपावतो एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ११ नियम २ (१) (अ) नुसार प्र.क्रं. १६ मध्ये धान्य गोडाऊन ते सुरत बायपास पावेतो रस्त्यास **रमाबाई आंबेडकर पथ** तसेच प्रभागातील मोती नाल्यावरील पुलास **राजमाता जिजाऊ पुल** असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४३ मा.महापौर सो. मनपा धुळे यांचे पत्रानुसार महाराणा प्रताप पुतळा व नियोजित छत्रपती महाराज पुर्णाकृती पुतळासाठी देखरेख समिती गठीत करणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी आम्ही आज तुमचा मनपासून अभिनंदन करते तुम्ही खुप चांगला विषय तुम्ही अजेडावर घेतला. त्यामध्ये नियोजित शिवाजी महाराज पुतळा आत जो त्याला पुर्णाकृती करण्यासाठी व महाराणा प्रताप पुतळा देखाभाल दुरूस्ती करण्यासाठी समिती गठीत करण्यासाठी तो निर्णय घेतलेला आहे. मला एक महत्वाचे सांगायचे आहे महाराणा प्रताप पुतळा व शिवाजी महाराज पुतळा हे शहरातील दोन नाही तर शहरातील जेवढे थोर महापूरूषाचे पुतळे आहेत त्या सर्वांची देखभाल दूरूस्ती करण्यासाठी समिती गठीत करणार आहे त्यामध्ये शहरातील जेवढे थोर महापूरूषाचा समावेश करण्यात यावा.

म.शितल नवले आपण जी समिती गठीत करतो आहे तर माझी विनंतीआहे मराठा समाजाच्या ज्या ज्या संघटना आहे त्या सर्व संघटनाना बसून जर ही समिती गठीत केली तर कामेही व्यवस्थित होतील आणि कुठलेही वादविवाद होणार नाहीत.

म.अमोल मासुंळे छत्रपती शिवाजी महाराज हे१२ बलुतेदार समाजाचे होते समितीत सर्व समाजातील व्यक्ती घ्या.

मा.महापौर बंटी भाऊ तसे नाही ही सुचना केली ती अतिशय महत्वाची आहे. कारण की काही गोष्टी करून घेणे महत्वाचे असते. जी काही पहिले चुक झालेली आहे ती हया वेळेस सुधारण्यात येईल.या समितीमध्ये राणाप्रताप पुतळयावर जवळ जवळ ७५ लाख रूपये नगरोत्थान योजने अंतर्गत खर्च करीत आहे आणि धुळे शहराची अतिशय चांगली वास्तू तयार होत आहे. आता वास्तूची रक्षण व पावित्र राखण्यासाठी आपल्याला एक समिती नेमण्यासाठी एक समिती

नेमायाची आहे. समितीमध्ये आपले नगरसेवक राहतील तर काही बाहेरचे असतील तसेच काही राजपूत समाजाचे देखील राहतील अशी ही देखरेख समिती असेल जर आपण देखरेख समितीच्या माध्यमातून हस्तांरन करून देवू कारण आपल्याकडून देखभाल होणार नाही कारण यंत्रण कमी आहे म्हणून त्यांच्याकडे सोपविण्यात येईल.

म.नागसेन बोरसे धुळे शहरामध्ये आज जे काही पुतळे आहेत त्यांची जी दुरावस्था बघता आपण जो विषय आणलेला आहे अतिशय महत्वाचा आहे. परंतू माझी एक विनंती आहे की ज्या ज्या भागातील पुतळे असतील त्यात्या भागातील स्थानिक नगरसेवकाना त्या समितीमध्ये घेण्यात यावे. कारण काय छत्रपती संभाजी राजे पुतळाची समिती झाली होती त्या समितीमध्ये आम्ही स्थानिक लोक होतो. आम्हाला आपल्याकडून सांगितले गेले होते की, त्या समितीमध्ये आपल्याला घेतले जाईल परंतू त्या समितीमध्ये मला घेतले नाही ज्यावेळेस छत्रपती संभाजी राजेची समिती गठीत झाली त्यावेळेस माझा विचार करण्यात आला नाही.

म.महापौर नागसेन भाऊ त्यावेळेस माझा काही संबंध नाही.त्यावेळेस आयुक्त देशमुख साहेब व महापौर कल्पनाताई महाले होत्या .त्यावेळी वाद चालू होता. राजूबाबा मार्फत समिती नेमायाची त्यावेळी त्यांनी छावा संघटनेला प्राधान्य दिले. सदर दोन्ही पुतळयांच्या देखरेख व निगा ठेवण्यासाठी शासन दिशा निर्देशानुसार देखरेख समिती गठीत होणे आवश्यक आहे. तरी सदर दोन्ही पुतळयांच्या देखरेख व निगासाठी खालील प्रमाणे देखरेख समिती गठीत करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १७९ दिनांक २५/५/२०२१

मा.महापौर सो.मनपा धुळे यांचे कडील जा.क्रं. धुमपा/स्वीय/२१६ दिनांक २१/५/२०२१ रोजीच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत महाराणा प्रताप पुतळा चौक सुशोधिकरण व नुतनीकरणाचे काम पूर्णात्वास आलेले आहे. तसेच मनोहर टॉकीज समोरील छत्रपती शिवाजी महाराजाचा अर्ध्याकृती पुतळा असून त्याठिकाणी पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभारणेबाबत ठराव पारीत झालेला असून त्याकामासही लवकर सुरुवात होणार आहे. सदर दोन्ही पुतळयांच्या देखरेख व निगा ठेवण्यासाठी शासन दिशा निर्देशानुसार देखरेख समिती गठीत होणे आवश्यक आहे. तरी सदर दोन्ही पुतळयांच्या देखरेख व निगासाठी खालील प्रमाणे देखरेख समिती गठीत करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**** विरशिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी स्मारक देखरेख समिती,धुळे ****

अ.क्र	नाव	पदनाम	अ.क्र.	नाव	पदनाम
१	श्री.अजितसिंग विजयसिंग राजपूत	अध्यक्ष	२०	अँड.शैलेश प्रकाशसिंग राजपूत	कायदेशीर सल्लागार
२	श्री.जगदीश बाबुराव राणा	उपाध्यक्ष	२१	श्री.अजय रामकृष्ण नाशिककर	मार्गदर्शक
३	श्री.तेजपालसिंग भरतसिंग गिरासे	उपाध्यक्ष	२२	श्री.हिरामण विठ्ठल गवळी	मार्गदर्शक
४	श्री.विजयसिंग चंद्रसिंग ठोके	उपाध्यक्ष	२३	श्री.प्रदिप बाळासाहेब कर्पे	मार्गदर्शक
५	श्री.गौरवसिंग रामचंद्र कोर	उपाध्यक्ष	२४	श्री.चेतन प्रकाशचंद मंडोरे	मार्गदर्शक
६	श्री.भिकन मधुकर वराडे	उपाध्यक्ष	२५	श्री.राहूल सुर्याकांत तारगे	सदस्य
७	श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार	कार्याध्यक्ष	२६	श्री.भुषण चंद्रकांत सोनार	सदस्य
८	श्री.संभाजी पुंडलिक राजपूत	कार्याध्यक्ष	२७	श्री.युवराज लक्ष्मण चौधरी	सदस्य

९	श्री.निलेश प्रकाश जाधव	कार्याध्यक्ष	२८	श्री.गोविंदा दिलीप चौधरी	सदस्य
१०	श्री.पुष्करसिंग बापूसिंग राठोड	कार्याध्यक्ष	२९	श्री.बापू माणिक ठाकूर	सदस्य
११	श्री.मनजीतसिंग गजेंद्रसिंग सिसोदिया	सचिव	३०	श्री.शशिकांत मनोहर बडगुजर	सदस्य
१२	श्री.संजय अर्जुनसिंग परदेशी	सचिव	३१	श्री.परेश मोहन देवरे	सदस्य
१३	श्री.अभिजित सुरेशसिंग परदेशी	सहसचिव	३२	श्री.प्रतिक प्रकाश बडगुजर	सदस्य
१४	श्री.गुलाबसिंग ओमकार परदेशी	प्रसिध्दी प्रमुख	३३	श्री.महेश कैलास माळी	सदस्य
१५	श्री.नरेंद्रसिंग प्रतापसिंग सिसोदिया	सल्लागार	३४	श्री.बबलू दिनेश बडगुजर	सदस्य
१६	डॉ.दरबारसिंग नारायणसिंग गिरासे	सल्लागार	३५	श्री.गणेश दगडू पाटील	सदस्य
१७	श्री.रामचंद्र राजसिंग कोर	सल्लागार	३६	श्री.नितीन दिलीप पोतदार	सदस्य
१८	श्री.भिमसिंग रायसिंग राजपूत	सल्लागार	३७	श्री.दिनेश भानुदास वाखारकर	सदस्य
१९	श्री.विजय बापू जाधव	सल्लागार	३८	श्री.रविंद्र (पप्पू) गजानन वराडे	सदस्य

****छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा समिती****

अ.क्र	नाव	पदनाम	अ.क्र.	नाव	पदनाम
१	श्री. अनुप ओमप्रकाश अग्रवाल	अध्यक्ष	३६	श्री.नानासाहेब कदम	
२	श्री.चंद्रकांत मधुकर सोनार	उपाध्यक्ष	३७	श्री.प्रदिप पांडुरंग जाधव	
३	श्री.हिरामण विठ्ठल गवळी	उपाध्यक्ष	३८	श्री.सुधाकर दादा बेद्रे	
४	श्री.संदिप दत्तात्रय महाले	उपाध्यक्ष	३९	श्री. दिनेश भानुदास वाखारकर	
५	श्री.महादेव चैत्राम परदेशी	उपाध्यक्ष	४०	श्री.चेतन प्रकाशचंद मंडोरे	
६	श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार	कार्याध्यक्ष	४१	श्री. विकास चंद्रकांत जाधव	
७	श्री.राजेश ईश्वर पवार	कार्याध्यक्ष	४२	श्री.नरेश रूपला चौधरी	
८	श्री.प्रदिप बाळासाहेब कर्पे	कार्याध्यक्ष	४३	श्री. शशिकांत मनोहर बडगुजर	
९	श्री.शितल मोहन नवले	सचिव	४४	श्री.अमोल पावबा मासुळे	
१०	श्रीमती कल्पनाकाकू सुनिल महाले		४५	श्री. संजय शत्रुघ्न भिल	
११	श्री. भुषण चंद्रकांत सोनार		४६	श्री.दिनेश यशवंत बागुल	
१२	श्री सुनिल श्रीधर देवरे		४७	श्री.अमोल बबनराव डापसे	
१३	श्रीमती कल्याणीताई सतिष अंपळकर		४८	श्री. हेमत हिरामण माळीच	
१४	श्रीमती जयश्रीताई कमलाकर अहिरराव		४९	श्री.भगवान गोविंदा मराठे	
१५	श्रीमती शैलजा चंद्रकांत सोनार		५०	श्री.तुषार गोपाळ मोरे	
१६	श्रीमती स्नेहल मनोज जाधव		५१	श्री.विनोद मंगा जगताप	
१७	श्रीमती भारतीताई अशोक माळी		५२	श्री.विक्रम माणिक फुलपगारे	
१८	श्रीमती सुरेखा चंद्रकांत उगले		५३	श्री.युवराज लक्ष्मण चौधरी	
१९	श्रीमती वैशाली भिकन वराडे		५४	चि.राकेश युवराज रोकडे	
२०	श्रीमती निशा प्रमोद पाटील		५५	श्री. दिपक पुरुषोत्तम विसपुते	
२१	श्रीमती कशीश गुलशन उदाशी		५६	श्री.महेश अशोक चांडोडे	
२२	श्रीमती सारीका प्रविण अग्रवाल		५७	श्री.प्रमोद भिकाजी काकडे	
२३	श्रीमती योगिता प्रशांत बागुल		५८	श्री. राहुल सुर्यकांत तारगे	
२४	श्रीमती किरण राकेश कुलेवार		५९	श्री.योगेश दिलीपराव गुरव	
२५	श्रीमती श्रेया देवेंद्र सोनार		६०	श्री.रोहित रविकांत सानप	

२६	श्रीमती निशा भुषण सोनार		६१	श्री.जयेश सतिष मगर	
२७	श्री.नागसेन दामोदर बोरसे	सदस्य	६२	श्री.प्रतिक राजेंद्र माळी	
२८	श्री.राकेश लक्ष्मण कुलेवार	सदस्य	६३	श्री.नरेश कांतीलाल गवळी	
२९	श्री.भिकन मधुकर वराडे		६४	श्री.निलेश रामभाऊ कोळी	
३०	श्री.भगवान शंकर गवळी		६५	श्री.मोहन टकले	
३१	श्री.कमलेश नारायण देवरे		६६	श्री.निलेश शांताराम ढोले	
३२	श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे		६७	श्री.किरण गजानन वराडे	
३३	श्री. सुभाष सुकलाल जगताप		६८	श्री.प्रशांत सोनार	
३४	श्री. संतोष छगन खताळ		६९	श्री.विजय नारायण सोनार	
३५	श्री.निंबा त्र्यबक मराठे				

उक्त प्रमाणे समिती मार्फत सदर पुतळयाच्या देखभाल व निगा दुरुस्तीसाठी समितीस मान्यता देण्यांत येत असून तसेच धुळे शहरातील चाळीसगांव रोड क्रॉसींगजवळील छत्रपती शिवाजी महाराजाचा अर्धाकृती पुतळयाच्या जागेवर महानगरपालिकेमार्फत पूर्णाकृती पुतळा बसविण्यांत यावा. तसेच पुतळा उभारणीबाबत आवश्यक त्या शासन मान्यता घेण्यांत याव्यत. तसेच पूर्णाकृती पुतळा उभारणीच्या कामासाठी येणारे संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४४ मा.महापौर सो.मनपा धुळे यांचे पत्रानुसार वरखेडी गावात नवीन जिम तयार करणेबाबत तसेच सुभाषनगर भागात जीम उभारणे बाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभा चौधरी हा जो विषय घेण्यात आलेले आहे सुभाषनगर आणि वरखेडीमध्ये ते तर कराच तुम्ही पण तुम्ही शहरांचे महापौर आहात त्याप्रमाणे धुळे शहरात जिथे जिथे आवश्यकता आहे तिथे तिथे जिम करा.

म.वंदना भामरे आपण स्वत: अमरधामची पाहणी केलेली आहे. वृत्तपत्रात देखील गाजावाजा झालेला आहे त्याबाबत पत्र देखील दिलेले आहे. तो विषय अजेंडयावर का घेण्यात आला नाही. भोकर आणि वलवाडी अमरधाम दुरूस्ती ८० लक्ष रूपये

म.महापौर ताई या बजेटमध्ये तरतूद करून देवू.

म.साबीर शेठ कोणत्या निधी मधून हे काम घेण्यात येणार आहे.

म.महापौर सदरचे काम हे फंडातून घेण्यात आलेले आहे. वरखेडी व सुभाषनगर भागात अत्याधुनिक जिमसाठी जागा देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८० दिनांक २५/५/२०२१

मा.महापौर सो.मनपा धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/ स्वीय/२१६ दिनांक २१/५/२०२१ रोजीच्या पत्रानुसार वरखेडी गावात युवक व विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने व शारिरीक व्यायामाची आवाड निर्माण होण्यासाठी अत्याधुनिक जिम करणे गरजेचे आहे त्या दृष्टीने वरखेडी गावातील मुख्य रस्त्यावर गंगामाई शाळे शेजारील जागेत गट नं. २७५ पैकी शाळेच्या पूर्वेकडील तसेच वरखेडी आंगणवाडी समोरील जागा (चतुसिमा उत्तरेस वरखेडी धुळे कडे जाणारा रस्ता, दक्षिणेस आंगणवाडी, पूर्वस रस्ता,पश्चिमे गंगामाई शाळा) स्व. न्हानु पहेलवान

व्यायामशाळेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९अन्वये तसेच नगररचना अधि नियमान्वये ३० वर्ष कराराने नाममात्र दरात जिमसाठी कराराने देणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सुभाषनगर भागातील शाळा नंबर २ येथे महानगरपालिकेमार्फत अत्याधुनिक जिम (आधुनिक व्यायाम साहित्यासह) करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.यासाठी येणा-या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने तांतडीने याबाबत नियमानुसार कार्यवाही व उचित पूर्तता करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४५ धुळे मनपा शाळा क्रं.४ व ८ येथे बी.ओ.टी. तत्वावर शॉपींग कॉम्पलेक्स व मल्टी पर्पज (विविध उपयोगी हॉल)बनविणेकामी प्रशासनाकडून आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन हा जो विषय आहे शाळा क्रमांक ४ व ८ तेथे शॉपिंग कॉम्पलेस बांधायाचे आणि मल्टीप्रपज हॉल तयार करावायाचा आहे हया दोन्ही शाळा आहेत शाळा क्रमांक ४ हेरीटेज शाळा आहे. १०० वर्षापुर्वीची एक दगडी शाळा बांधलेली आहे. पुढचे जे भविष्य आहे आपल्या देशाचे ते शिक्षणावरच पुर्ण आहे. शाळा क्रमांक ८ जी आहे ती आता बंद आहे. त्या ठिकाणी मी स्व:ता भेट दिलेली होती. त्या शाळेचे उर्दु शिक्षण आहे. ते स्व.खर्चाने डिजीटल करून मुलांना फार चांगला प्रकारे शिक्षण देत आहे आणि मुले सुध्दा तीथे शिक्षण घेत आहे मी मनपाला प्रशसनाला आणि महापौर आपल्याला एक विनंती करेल जिथे जिथे गरीबांचे मुले शिकता आहेत. त्या शाळेचे शॉपिंग कॉम्पलेस करू नका. आपल्याकडे जीतकी शॉपिंग कॉम्पलेस बांधली आहेत शाळा तोडूनच बांधण्यात आलेली आहे .आपल्या शिक्षणाची गरज नाही. आता मोदी सरकाराने जो नविन शिक्षण कायदा केलेला आहे त्यामध्ये ज्या स्थानिक भाषा आहेत त्यामध्ये शिक्षण देण्याची ठरविले आहे. इंग्रजी ही सेकंड भाषा आहे आता आपण काय करतो आहे शाळा तोडतो आहे आणि शॉपिंग कॉम्पलेस बांधत आहोत. ग.नं.६ची शाळा तोडून तेथे कॉम्पलेस बांधलेले आहे .त्यात शाळेसाठी ८ खोल्या अलाऊड केल्या आहेत पण आजपावेतो शिक्षण मंडळाला हॉड ओव्हर केलेली नाही. माझी आपल्याला विनंती आहे हा जो विषय आहे आपल्याला कुठेही शॉपिंग कॉम्पलेस मल्टीप्रपज हॉल करायाचा आहे तो समाजाकरीत फार उपयुक्त आहे गरीबांना लग्न कार्यासाठी दिला तर काहिच हरकत नाही. पण असे कॉम्पलेस हॉल शाळा तोडून बांधू नका आपल्याकडे ज्या ज्या रिकाम्या जागा पडलेल्या आहेत.मनपाच्या १५०जागा आपल्याकडे रिकाम्या आहेत त्याच्यावर कोणीतरी ताबा घेतलेला आहे. त्यात कब्जा करून घेतलेल्या जागाबाबत अडीच वर्षपुर्वीच ठराव करून घेण्यात आलेला आहे. मी बजेटच्या मटिंगमध्ये बोलेलो होतो बॅलेस सिट बनवा. ते बनविले नसल्याने आपल्याकडे आजपावेतो किती जागा आहेत हे समजत नाही. यावर प्रशासनाने एकेही पाऊल उचलेले नाही. आपल्या जागा लोक फुकट वापरत आहे आणि आपण आपल्या लहान मुलाचे भविष्य खराब करून त्याशाळा तोडून आपण तिथे शॉपिंग कॉम्पलेस बांधतो आहेत. माझी विनंती आहे आपल्याला ही शाळा कोणत्याही परिस्थितीमध्ये तूटायला नको. त्याठिकाणी आज पुर्ण शाळा भरलेली आहे. आम्ही देखील सरकार शिक्षण देत नाही. तेथे ही मनपाचा शिक्षण देते. त्याच्या शाळा हया फार सुदंर पध्दतीने चालत आहे. आणि आपले शिक्षण मंडळ काय आहे तिथे आपण साधे शिक्षण मंडळावर सदस्य ही देत नाही. प्रशासन अधिकारी नाही.आपण शिक्षण

मंडळाची काय हाल करून ठेवले आहे.गरीब लोकांना इंग्रजीच्या मामध्यातून शिक्षण घेणे परवडत नाही. वर्षाला १ लाख रूपये खर्च येतो असे पुष्काळ लोक आहेत १०००० सुध्दा परवडत नाही. मनपाच्या शाळांची आज जी परिस्थिती झालेली आहे ती आपण लावून ठेवलेली आहे कुठल्याही परिस्थितीत कोणतीही शाळा तूटायला नको व तेथे शॉपिंग कॉम्पलेस बांधयला नको. शहरात शॉपिंग कॉम्पलेसची फार गरज आहे. ज्या आपल्या मालकीच्या जागा आहे त्या लवकरात लवकर खाली करून चांगले शॉपिंग कॉम्पलेस बांधा,मल्टीप्रपज हॉल बांधा परंतू शाळा क्र.४ व ८ या शाळाच्या विषयाला माझा स्पष्ट विरोध नोंदवा हि विनंती.

म.हिरामण गवळी — साहेब या शाळेसाठी मागणी कोणी केलेली आहे. ज्या ठिकाणी गोकाक मार्केट आहे पुर्वीचे बांधायचेच असेल तर त्या शाळेची व्यवस्था लावून शाळा क्रमांक २१ ला बी.ओ.टी तत्वावर तेथे शॉपिंग बांधले. तेथील शाळा भरविण्यात यावी असे सांगितले पण तेथे वरील मजल्यावर शाळा भरत नाही व शिक्षक हि बसत नाही. जुने लोक ज्यावेळेस दाखला मागयाला जाता तर त्याहि ठिकाणी कोणी नाही. मौजे धुळे शहरातील सर्व्हे नं.४१३ हि ओपन स्पेस सलीम बेग मिर्झा रा.अबू बकार मस्जिद मिलतनगर त्यांनी बेकायदेशीर यांच महिन्यात त्यांनी नावावर करून नाव लावून घेतलेले आहे. मनपाला देखील त्यांची पुर्व कल्पना नाही. आपल्या लोकांना मोजमाप करू दिले नाही यांच सुध्दा आमदाराचा हात आहे. मागच्या पंचवार्षिकला आम्ही मागणी केली होती धुळे शहराच्या किती ओपन स्पेस आहेत .हे देखील माहिती नाही. आपल्या जागेवर परस्पर नावे लावून घेता. मी उतारा घेवून गिरी. सो. परदेशी सो.कडे गेलो. परदेशी साहेब म्हटले की, मी अर्ज दिला आहे.

मा.महापौर — परदेशी साहेब आप्पाचा विषय गांभियाने लक्ष द्यावे.

म.हिरामण गवळी — मी त्या पवारवर गुन्हा दाखल करेल व त्यांच्यात मनपाला नाईलाजास्तव पार्टी करावे लागेल. आता पुतळयाची जी जागा सांगितली सिव्हील हॉस्पीटल कोणाचे आहे ती जागा आपल्या मनपाची आहे.मी सन २०१३ मध्ये गुन्हा नोंदविला आहे की, सिटी सर्व्हे नं. अशी अशी जागा चोरीला गेलेली आहे.माझी विनंती आहे की,ज्या ज्या जागा आपण ताब्यात घेतल्या अशा अनेक जागा आहेत. कॉलन्या झाल्या त्या नावावर करून घेतल्या.चार दिवसात जागा ताब्यात घेतल्या नाही तर मी संबंधितांवर गुन्हा दाखल करेल.

म.महापौर — आयुक्त सो. आपण ज्या ज्या जागा ठरावानुसार दिलेल्या आहेत. ५५० लोकांना आयुक्त सो. यांनी नोटीसा दिलेल्या आहेत.ज्यांचे करारनामे मुदत संपली आहे त्यांची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया चालू आहे. तुम्ही हा जो विषय मांडला त्यात परदेशी साहेबांनी लक्ष द्यावे.

म.हिरामण गवळी — मागच्या पंचवार्षिकला जय शंकर कॉलनीची जागा किती लाखात दिली.

म.साबीर शेठ — धन्यवाद आप्पा साहेब कायदेशीर विषय महापौर साहेबांच्या समोर मांडला गेला .मा.आमदार साहेबांनी एकविरा देवी मंदिर परिसरात तीन ते चार उदघाटन केले शाळा नं.५ येथे मल्टीप्रपज हॉल करा. गावातल्या इतक्या जागा सोडून आमदारांना बारा पत्थरची जागा दिसत आहे. त्या ठिकाणी लहान मुले शिक्षण घेत आहे. माझी विनंती आहे.

म.वसीम बारी — विषय क्रमांक १४५ बी.ओ.टी.तत्वावर शॉपिंग कॉम्पलेस बांधणेबाबतचा विषय आला आहे. तो विषय चुकीचा आलेला आहे.कारण की तिथे शाळा क्र.४ व ८ ला शिक्षणाला मंदिर असे म्हणतात. त्या ठिकाणी चार शाळा चालतात. शाळा क्रमांक ४ मध्ये तीन शाळा वर्ग झालेल्या आहे. शाळा क्रमांक ९,२५,१४ त्या शाळेत १५० ते २०० विद्यार्थी आहे. शाळा क्रमांक ४ मध्ये लॉयब्ररी व जीमखाना चालत आहे. शाळा क्रमांक ८ मध्ये बालवाडी आहे तिथे ४० ते ५० लहान मुले शिकत आहे.आणि पहिली ते सातवी ऑनलाईन रजिस्टर शिक्षण घेत आहे. जी शाळा बंद आहे तेथील ग्राऊंडवर मुले खेळतात .आपण ते तोडून तेथे मल्टीप्रपज हॉलला मंजूरी

देवू नका.आम्ही सर्व नगरसेवक राष्ट्रवादी पार्टी,समाजवादी पार्टी तर्फ आम्ही आयुक्त साहेबांना व महापौर साहेबांना निवेदन दिलेले आहे या विषयाला तहकूब न करता रद्द करावा याला आमचा विरोध आहे.

म.महापौर सदर विषय अतिशय महत्वाचा असल्याने कारण की, त्या शाळेचे क्षेत्रफळ पहाता लोकेशन पाहता अतिशयच किंलीन जागा आहे. काही वर्षापुर्वी जिल्हाधिकारी म्हणून गोकार्क तेथे त्यांनी जागा उपलब्ध करून दिली आणि गोकार्क मार्केट तयार झालेले आहे. मी स्व:ता त्या शाळेमध्ये गेलो आहे डिजिटल शाळा तेथे अतिशय चांगल्या पध्दतीने चालते ऊर्दु शाळा चांगल्या पध्दतीने चालू असते. यासर्व गोष्टी पाहत असतांना मनपाच्या शाळाच्या माध्यमातून तिथे विद्यार्थ्यांना चांगल्या पध्दतीचे शिक्षण मिळत असते. आणि मनपाच्या हिताच्या दृष्टीकोनातून दुसरी कडे बघितले तर त्या जागेचे जे क्षेत्र फळ आहे त्या ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर तिथे मार्केट तयार झाले तर त्या मार्केटच्या माध्यमातून धुळे मनपाला भरपूर उत्पन्न मिळणार आहे. म्हणजे आपल्या अपेक्षा पेक्षा बाहेर उत्पन्न आपल्याला प्राप्त होणार आहे आणि हे सर्व होत असतांना त्या ठिकाणी ट्र फीकवरून कायम वादविवाद होत असतो. या सर्व गोष्टी पाहता सुचना कोणी केल्या आहेत त्या आपण बाजूला ठेवू या. परंतू ती जागा आहे अतिशय व्यावसायिक आहे तिथे जर आपण व्यापारी संकूल केले तर मनपाच्या उत्पन्नात भर पडणार आहे. आणि दुसरा दृष्टीकोन बघता तिथे जी शाळा आहे तीच्यावर एक प्रकारे अघात होणार नाही शाळा अबाधित ठेवू.

म.हर्षकूमार रेलन शॉपिंग कॉम्पलेस करायाचे तर एकविरा देवी मंदिर परिसराजवळ जागा आहे तिथे करा.कृपया शाळा बंद करून काम करू नका.

म.महापौर ज्या शाळा चांगल्या आहेत हया सर्व गोष्टी पाहता उत्पन्न वाढेल व्यापारी संकुल होईल, जे गाळेधारक आहे त्यांना गाळे भेटेल शेवटी सभागृह सदस्यांच्या बाजूने निर्णय घेत असतो आणि सदर विषयला बहूसंख्य सदस्यांचा विरोध आहे. काल त्या भागातील नागरीक व नगरसेवक त्याबाबतीत निवेदन देवून गेले यासर्व गोष्टीचा विचार करता सदर विषय त्या भागातील नगरसेवक आणि खास करून जी निवेदन दिलेले आहे त्यानुसार आपण ज्या पध्दतीने सांगल त्या पध्दतीने निर्णय घेण्यात येईल.

म.शितल नवले महापौर सो.थोडया पैसे करीता रिस्क ठेवू नका. येणारी पुढील पिढी आपल्याला दोष देईल. सदरचा विषय रद्द करा आपल्याकडे लागेल तेवढया जागा देवपूर भागात पडलेल्या आहेत. सर्व शाळा बिल्डरच्या घशात घाळणार असाल तर चुकीचे आहे.

म.महापौर सन्मा. सदस्यांनी केली चर्चा व सभागृहातील सदस्यांच्या भावना व विचार लक्षात घेतो सदर प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८१ दिनांक २५/५/२०२१

धुळे मनपा शाळा क्र. ४ व ८ येथे बी.ओ.टी. तत्वावर शॉपिंग कॉम्पलेक्स व मल्टी पर्पज हॉल झाल्यास शहराची मोठ्या प्रमाणात ट्राफिकची समस्या सुटण्यास तसेच मनपाला देखील आर्थिक फायदा होईल. तसेच शॉपिंग कॉम्पलेक्स झाल्यास पाचकंदील भागातील व शाळा नं.४व८चा भागातील गर्दी कमी होण्यास मदत होईल तसेच विविध उपयोगी हॉल (मल्टी पर्पज) झाल्यास सदर ठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्यास मदत होईल. तरी सदर विषयाचे गांभीर्य बघून तात्काळ तसा प्रस्ताव शासनास सादर करावा असे कळविले आहे.

तरी शासनाकडे प्रस्ताव सादर करणे कामी मे. महासभेची मंजुरीची आवश्यकता असल्याने सदर जागा बाबत म.नगररचना विभाग, धुळे मनपा यांचा कडून धुळे शहर मंजूर विकास योजनेत सदरची जागा पब्लिक- सेमी पब्लिक म्हणून दर्शविली असून जागेच्या पूर्व-

पश्चिम रस्त्या लगतची जागा Commercial वापर म्हणून दर्शविली आहे. सदरील जागेवर सध्यास्थितीत अस्तीवातील शाळा आहे. शाळा मालकी शिक्षण मंडळाची दिसून येत आहे असा अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

उक्त बाबत म.आयुक्त सो.,यांच्या आदेशानुसारConsultant मार्फत आराखडा / अंदाजपत्रक तयार करणे,नगररचना विभागामार्फत आवश्यक तांत्रिक तपासणी करून आर्कीटेक्ट नेमणूकीची निविदा प्रक्रिया करणेसाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केंलेल्या चर्चेनुसार सदर जागा ही शैक्षणिक क्षेत्रासाठी आवश्यक असून सादर झालेला कार्यालयीन प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

दि.२९ जून २०२१ रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
मंगळवार दिनांक २९/०६/२०२१
वेळ सकाळी ११-०० वाजता

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधील नियम क्रं. १(क) (ड) व (ह) अन्वये मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन सर्वसाधारण महासभा आज **मंगळवार दिनांक २९/०६/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री.चंद्रकांत मधुकर सोनार, महापौर,** धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यंत आली.

त्या बैठकीचे इतिवृत्त-

सभेस खालील सदस्य ऑन लाईन तसेच ऑफ लाईन उपस्थित होते.

अ.नं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	मा. श्री.सोनार चंद्रकांत मधुकर	महापौर	सकाळी ११- ०० वाजतां
२	मा.सौ.अंपळकर कल्याणी सतिष	उपमहापौर	----------" ---------
३	श्रीमती भामरे वंदना संजय	सदस्या	----------" ---------
४	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य	----------" ---------
५	श्री.चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य	----------" ---------
६	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	----------" ---------
७	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	----------" ---------
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्य	----------" ---------
९	श्रीमती वाघ सुमनबाई यशवंत	सदस्या	----------" ---------
१०	श्री. नागमोते अनिल रघुनाथ	सदस्य	----------" ---------
११	श्री. जगताप सुभाष सुकलाल	सदस्य	----------" ---------
१२	श्रीमती. अन्सारी सईदा म. इकबाल	सदस्या	----------" ---------
१३	श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा	सदस्या	----------" ---------
१४	श्री . सईद बेग हाशम बेग	सदस्य	----------" ---------
१५	श्री. बोरसे नागसेन दामोदर	सदस्य	----------" ---------
१६	श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव	सदस्या	----------" ---------
१७	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	----------" ---------

१८	श्री.दाळवाले कांतीलाल माणिकराव	सदस्य	----------" ---------
१९	सौ. पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल	सदस्या	----------" ---------
२०	श्री. गवळी भगवान शंकर	सदस्य	----------" ---------
२१	श्री.देवरे कमलेश नारायण	सदस्य	----------" ---------
२२	श्रीमती पाटील निशा प्रमोद	सदस्या	----------" ---------
२३	श्री.पाटील रावसाहेब आनंदराव	सदस्य	----------" ---------
२४	श्री. अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्या	----------" ---------
२५	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य	----------" ---------
२६	श्रीमती उदासी कशीश गुलशन	सदस्या	----------" ---------
२७	श्रीमती.कुलेवार किरण राकेश	सदस्या	----------" ---------
२८	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य	----------" ---------
२९	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य	----------" ---------
३०	श्रीमती महाले कल्पना सुनिल	सदस्या	----------" ---------
३१	श्रीमती.चौधरी मंगल अर्जुन	सदस्या	----------" ---------
३२	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य	----------" ---------
३३	श्री.जाधव विजय बापू	सदस्य	----------" ---------
३४	श्री. भिल संजय शत्रुघ्न	सदस्य	----------" ---------
३५	श्रीमती जाधव स्नेहल मनोज	सदस्या	----------" ---------
३६	श्रीमती.वराडे वैशाली भिकन	सदस्या	----------" ---------
३७	श्री. सोनार देवेंद्र चंद्रकांत	सदस्य	----------" ---------
३८	श्री.पाटील संजय रामदास	सदस्य	----------" ---------
३९	श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश	सदस्या	----------" ---------
४०	श्रीमती.थोरात वंदना विक्रम	सदस्या	----------" ---------
४१	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	----------" ---------
४२	श्रीमती शेख शाहजहान बी बिसमिल्ला	सदस्या	----------" ---------
४३	श्री.मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	----------" ---------
४४	श्री.पटेल अमीन अब्दुल करीम	सदस्य	----------" ---------
४५	श्री. अन्सारी मोहम्मद उमैर मोहम्मद शव्वाल	सदस्य	----------" ---------
४६	श्रीमती अन्सारी हमीदा बी निसार अहमद	सदस्या	----------" ---------
४७	श्री.खान मोहम्मद सावीर मुहिबुल्लाह	सदस्य	----------" ---------
४८	श्रीमती जाधव शंकुतला शंकर	सदस्या	----------" ---------
४९	श्री.पाटील युवराज चैत्राम	सदस्य	----------" ---------
५०	श्रीमती ईशी यशवंत	सदस्या	----------" ---------

५१	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या	----------" ---------
५२	श्री. जाधव संजय सुधाकर	सदस्य	----------" ---------
५३	श्री. जाधव बान्सीलाल माणिक	सदस्य	----------" ---------
५४	श्रीमती बागुल योगिता प्रशांत	सदस्या	----------" ---------
५५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	----------" ---------
५६	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	----------" ---------
५७	श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या	----------" ---------
५८	श्रीमती मराठे वंदना राजेंद्र	सदस्या	----------" ---------
५९	श्री. नवले शितल मोहन	सदस्य	----------" ---------
६०	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य	----------" ---------
६१	श्रीमती. देवरे सुरेखा भागवत	सदस्या	----------" ---------
६२	श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण	सदस्या	----------" ---------
६३	श्री. पवार राजेश ईश्वर	सदस्य	----------" ---------
६४	श्री. मोमिन आसिफ ईस्माईल	सदस्य	----------" ---------
६५	श्री. पिंजारी मविना समशेर	सदस्या	----------" ---------
६६	श्रीमती. पठाण हिना असलम	सदस्या	----------" ---------
६७	श्री. खान सद्दीन हुसैन रहेमतुल्लाह	सदस्य	----------" ---------
६८	श्री. मंसुरी अब्दुल करीम शेख हसन	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
६९	श्री. गवळी हिरामण विठ्ठल	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
७०	श्री. मोगलाईकर शशी सुधाकर	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------
७१	श्री. महाले संदीप दत्तात्रय	नामनिर्देशित सदस्य	----------" ---------

उपस्थित अधिकारी गण

अ.नं.	अधिका-याचे नांव	हुद्दा	सभेस उपस्थितीची वेळ
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त	सकाळी ११-०० वाजतां
२	श्रीमती शिल्पा नाईक	उपायुक्त	----------" ---------
३	श्री. शांताराम गोसावी	प्र. उपायुक्त तथा सहा.आयुक्त	----------" ---------
४	सौ. पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त	----------" ---------
५	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त	----------" ---------
६	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त	----------" ---------
७	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार	----------" ---------
८	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र. नगरसचिव	----------" ---------
९	श्री. के. एन. शिंदे	अभियंता	----------" ---------
१०	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी	----------" ---------

११	श्री. चंद्रकांत जाधव	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
१२	श्री. लक्ष्मण पाटील	प्र.सहा.आरोग्याधिकारी	----------" ---------
१३	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल	----------" ---------
१४	श्री.एन.पी. सोनार	इस्टेट मॅनेजर	----------" ---------
१५	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक	----------" ---------
१६	श्री.राजकुमार सुर्यवंशी	लिपीक परवाना विभाग	----------" ---------
१७	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मू. निर्धारण अधिकरी तथा प्र. मु. लेखाधिकारी	----------" ---------
१८	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता	----------" ---------
१९	श्री. राजेश गायकवाड	व.सहा.मनपा शि.मं.	----------" ---------
२०	श्री.राजेंद्र माईनकर	भांडार पाल	----------" ---------
२१	श्री.किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख	----------" ---------
२२	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग	----------" ---------
२३	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. वि.	----------" ---------
२४	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम	----------" ---------

मा.महापौर आजच्या ऑनलाईन महासभेस उपस्थित मा.अति.आयुक्त सो. सन्मा. पदाधिकारी, नगरसेवक बंधु भगिंनी, अधिकारी वर्ग पत्रकार व छायाचित्रकार या सर्वाचे आजच्या महासभेत मन:पुर्वक स्वागत करतो. नगरसचिव यांनी महासभेस सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्य सर्वश्री..सुनिल बैसाणे, शितल नवले,संजय रामदास पाटील, हर्षकुमार राध्येशाम रलन, प्रतिभा शिवाजीराव चौधरी, अमोल पावबा मासुळे,हिरामण विठ्ठ ल गवळी,खान मोहमंद साबीर मुहिबुंल्लाह, सुभाष सुकलाल जगताप, नरेंद्र रुपला चौधरी, भारती अशोक माळी,वसीम बारी, रावसाहेब नांद्रे पाटील, संतोष छगन खताळ, संजय भिल, विजय जाधव,देवेंद्र सोनार, राजेश ईश्वर पवार,युवराज चैत्राम पाटील, अमीन पटेल,दगडू भिमा बागुल, कमलेश नारायण देवरे,वंदना संजय भामरे, कल्याणी सतिष अंपळकर इत्यादी सदस्यांनी यांनी महापौर श्री. चंद्रकांत बापू सोनार यांच्या अडीच वर्षाच्या यशस्वी कार्किर्दीबाबत शुभेच्छापर मनोगत व्यक्त करुन त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांची मागणी केली.

म.महापौर- आज सर्व सदस्यांच्या माध्यमातून माझ्याबद्दल ज्या भावना आपण दाखवलेल्या प्रेम आपण दाखविले मन असं गहिवरून आलेले आहे.तरी अडीच वर्ष कसे गेले हे मलाही कळले नाही आणि ज्या वेळेस आपण बोलत होता त्या वेळी मन भरून येत होतं एवढे प्रेम आज मला माझ्या सदस्यांकडून मिळाले यापेक्षा माझं भाग्याचा दिवस कोणताही नाही प्रथम सुनील भाऊ बोलले ते आमचे लहान बंधू आहेत शीतल भाऊ यांच्या वडिलांबरोबर त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम केली आहे शिवसेनेच्या माध्यमातून शिवसेनेत राष्ट्रवादीमध्ये होतो प्रतिभाताई बोलल्या संजू भाऊ पाटील हे बोलले महेश भाऊ आम्ही सोबत राहायचं आमचा एक मित्र मदन पाटील चालला गेला बंटी भाऊ मासुळे यांनी आज येथे

जे प्रेम व्यक्त केले आमच्या वहिनी भारतीताई माळी भगवान आप्पा नरेश आप्पा आप्पा आज नरेश आप्पा पहिल्यांदा बोलले छान बोलले खताळ आप्पा विजुभाऊ बोलले आज देवा दादा बोलले हरीषजी वसीम भाई बोलले कमलेश दादा देवरे वंदनाताई आमीन भाई आणि आमचे चाच्या साबिर शेठ हिरामण आप्पा संदीप तात्या महाले किरण भाऊ या सर्वांनी जे प्रेम दाखवलं राजूभाई आमचे सभागृहनेते, आपले सर्वांचे आभार मानतो. असेच प्रेम राहू द्यावे कारण की महापौर पदावरून उतरल्यानंतर आपल्याला बरंच काही करून घ्यायची आहे आणि आपल्या सहकार्याने व आपल्या मार्गदर्शनाने एकत्र राहून काही गोष्टी करायच्या आहेत आज अडीच वर्ष कसे चालले गेले हे कळाले नाही सर्वात महत्त्वाचा म्हणजे विकासाच्या दृष्टिकोनातून शंभर कोटीचे रस्ते असतील अक्कलपाडाचे काम असेल काम भूमिगत गटारीचे असेल शहरातील आता एलईडी लाईटचे काम आता चांगल्या प्रकारे सुरू आहे संपूर्ण शहराचे जीआयएस मॅपिंगचे काम सुरू झालेली आहे नगरोत्थानाच्या माध्यमातून सर्व प्रभागात कामे चालू आहेत. दलितवस्तीच्या माध्यमातून कामे चालू आहे ज्या मनपामध्ये मी रोजंदारीने काम केलेले आहे त्या मनपातील फंडातील १५० कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा ठराव माझ्या हस्ते करण्यात आला ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे सातवा वेतन आयोग मी महापौर असताना लागू करण्यात आला. अनुकंपाधारकांना नोकरी दिल्या हा कोरोनाचा काळ आहे. कोरोना काळात जी सेवा करता आली ती माझ्या माध्यमातून पूर्ण केली खास करून पत्रकार छायाचित्रकार यांची माफी मागतो की मी प्रसिद्धीपासून दूर राहिलो आपल्या संपर्कात राहिलो नाही काही पदाधिकारी प्रसिद्धी मिळवण्यासाठी काम करत असतात परंतु त्यागोष्टीकडे लक्ष दिले नाही माझ्यावर काही पत्रकार बांधव नाराज असतील मी त्याबददल दिलगिरी व्यक्त करतो. आज आमचे मित्र आमचे लहान बंधू भगवानअप्पा यांचीउपमहापौर पदी नियुक्ती झाली आहे त्यांच्या आपल्याला सत्कार करायचा आहे तसेच दुसरे नियुक्ती पत्र त्याच विभागातील नगरसेवक आमचे लहान बंधू कमलेश देवरे यांना विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती द्यायची आहे एक प्रसंग सांगतो नाशिकला कार्यक्रमाला कमलेश देवरे आणि मी गेलो नाशिक मध्ये एकाच गाडीत होतो गाडीत टेप लावला आम्ही दोघं होतो अर्धातास रोडवर नाचण्याची मजा घेतली होती. त्याची सभापती म्हणून निवड होणार होती राष्ट्रवादी पक्षाकडून बहुमत होते त्यावेळी पक्षाकडून त्यांचे नाव जाहीर झालं परंतू योगाशिवाय काही गोष्टी असतात फक्त फार्म भरायचा बाकी होता त्यावेळी त्यांच्याकडून सभापतीपद हिरावलं गेलं त्या वेळेस त्यांना फार दु:ख झालं असेल आज पुन्हा त्यांना या सभागृहामध्ये विरोधी पक्षनेत्यांचे पत्र देण्याचा सन्मान मला मिळत आहे.आणि या सर्व गोष्टी करत असताना प्रशासनाच्या माध्यमातूनसर्वांनी अडीच वर्षाच्या कार्यकाळात सहकार्य केले आणि प्रशासनाच्या माध्यमातून आपण काम करीत असतो संगनमताने आपले काम सुरळीत आणि व्यवस्थित होते मी एक गोष्टीकडे लक्ष प्रामुख्याने देत असतो माझं लक्ष असते चुनावकडे असतं दबावाकडे नसते जो पण विषय असतो तो चुनाव त्याला दीर्घायुष्य असते आणि दबावामध्ये नाही म्हणून निर्णय घेताना चुनाव म्हणजेच सर्वसंमतीने एक मताने आणि जास्त बहुमताने जर झाला त्या गोष्टी जास्त येतात त्या दृष्टिकोनातून मी लक्ष देत असतो आणि एक महत्त्वाचा विषय असा आहे की धुळे मनपात माझी कारकीर्द आणि नगराध्यक्ष आणि महापौर यांचे स्वीय सहाय्यक मनोज भाऊ यांची कारकीर्द सारखी सुरुवात झाली आहे १९९०-९१ ला मी नगरसेवक

झालो म्हणून मनोज भाऊ स्विय सहाय्यक झाले आणि त्या गोष्टीला तीस वर्ष झाली कोणत्याही नगराध्यक्ष आणि महापौरांनी असे सुचले नाही कि मला माझ्या मर्जीतला स्विय सहाय्यक पाहिजे सर्वांनी म्हणून मनोजभाऊंना स्विकारले मी पुष्कळ वेळा मनोजला विचार करत राहतो परंतु कोणत्याही नगराध्यक्ष महापौरांचे प्रायव्हसी मनोज भाऊ यांनी आतापर्यंत कोणा नगराध्यक्ष महापौर किंवा अधिकाऱ्याकडे लिक केलेली नाही ते त्यांचे कार्य करत राहतात सतत गौरवण्यात येण्यासारखे ते आहेत सर्व काम करीत असताना मनपाचे सांस्कृतिक कार्यक्रम खेळाचे कार्यक्रमाचे इतर काही गोष्टी असतील त्या सर्व घडामोडी आणि समन्वय पदाधिकाऱ्यांचे अधिकाऱ्यांचे वाद होत असतील त्यामध्ये मनोज भाऊनी मध्यस्थी करून एक चांगला आदर्श निर्माण केला आहे त्यांनी दीर्घकाळ गॅप न देता नगरध्यक्षाचे स्वीय सहाय्यक राहिले याबद्दल त्यांना शुभेच्छा देतो ते अजातशत्रू आहे मनोज भाऊ त्यांना आतापर्यंत कोणीही वाईट म्हटले नाही त्यांच्यावर कोणतेही आरोप केले नाही ते त्यांचे काम करीत असतात आणि महत्त्वाचा विषय असा आहे की गिरी सो म्हणून आज येथे विराजमान आहेत ते यापूर्वी या मनपा होते कलामंदिरला स्थायी समिती सदस्य पदाची निवडीची सभा झाली त्यावेळेस फार मोठा संघर्ष तिथे झाला ती आठवण आली आहे आणि योग बघा आयुक्त साहेबांना आज अचानक मंत्रालयात जावे लागले ते इथे आमच्या भगिनी कल्याणीताई यांनी अडीच वर्ष भावासारखे प्रेम दिलं अतिशय प्रेमळ स्वभावाचे आमच्या काही परंतु त्यांच्या रुद्रावतार मी बघितला आहे आणि अडीच वर्षाचा माझ्या बरोबर राहीलेल्या चांगलं काम त्यांच्या माध्यमातून झाले आहे मी आज या मनपा मध्ये एक कर्मचारी असताना मला महापौरपदाचा मान मिळाला जो सन्मान मिळाला आहे तो भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मिळाला आहे आदरणीय मोदीजी साहेब, श्री देवेंद्रजी फडवणीस साहेब श्री.गिरीशभाऊ महाजन डॉ.सुभाषजी भामरे साहेब, श्री.जयकुमार रावल साहेब जिल्हाध्यक्ष अनुपभाऊ अग्रवाल आणि भारतीय जनता पार्टीचे पाहिजे सर्व बंधू भगिनी नगरसेवक स्वीकृत नगरसेवक विरोधी पक्ष नेता आमचे साबीर भैया पदाधिकारी अधिकारी सर्व गटनेते या सर्वांनी आज जे प्रेम दाखवलं अडीच वर्षांच्या कारकिर्दीमध्ये माझ्याकडून काही चुका झाल्या असतील त्याबद्दल मी क्षमा मागतो आणि भविष्यात धुळे शहरासाठी काम करायचे आहे जेवढे काम आतापर्यंत झाले आहे पुढे करीत राहील जे कोणी महापौर बनेल कोर्टात केस असल्यामुळे ओबीसीचा निकाल लागला तर पक्ष जो उमेदवार देईल त्याच्यापाशी पाठीशी आम्ही उभे राहू आणि एसटीचा निकाल लागला तर पक्ष ज्याचे नाव सुचवेल त्याच्यामागे आम्ही उभे राहून परंतु भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जी विकास कामे झालेली आहेत सर्वात महत्वाचा विषय घेऊन ड्रेनेज मुळे जी मनपाची आणि पक्षाची हानी झालेली आहे त्याला मूळ कारण आमचं दुर्दैव असे की ती योजना एमजीपी कडे वर्ग झाली आणि एमजीपी ही मनपाच्या अंडर नसल्याने ते महाराष्ट्र शासनाच्या अंडर आहेत म्हणून काही गोष्टी दुर्लक्षित झालेल्या एमजीपीच्या माध्यमातून त्यांच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्यांच्यावर मनपाचा कोणताही अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने हा त्रास धुळे शहराला व आपल्याला बघावा लागला आहे. कारण की ज्या वेळेस ही योजना लागू करायची होती त्यावेळी संपूर्ण धुळे शहरांमध्ये पुढच्या ड्रेनेज लाईन चा विषय आता संपलेला आहे आणि त्याच्यामुळे जो त्रास झाला त्याला मूळ कारण एमजीपी आम्ही सूचना केल्यानंतर काही गोष्टी करायच्या ठेकेदार असो किंवा अधिकारी असो आमचे अधिकारी यांचे नियंत्रण

नसल्यामुळे हा घोळ झाला त्याचा भुर्दंड देवपूर वासियांना भोघावा लागत आणि त्याचा त्रास आपल्याला देखील झाला या सर्व गोष्टी होत असताना धुळे शहरांमध्ये नागरिकांनी भारतीय जनता पार्टी वर विश्वास दाखवून ५० नगरसेवकांना निवडून दिलं त्याबद्दल या धुळे शहराच्या नागरिकांच्या आम्ही कायम ऋणी राहू त्याचे आभार मानतो त्यांचे उपकार आम्ही फेडू शकत नाही या शब्दात त्यांचे आभार मानतो जय हिंद जय महाराष्ट्र..

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८२ दिनांक २९/६/२०२१.

सन्मा. सदस्य श्री. सुनिल बैसाणे, शितल नवले,संजय रामदास पाटील, हर्षकुमार राध्येशाम रलन, प्रतिभा शिवाजीराव चौधरी, अमोल पावबा मासुळे,हिरामण विठ्ठ ल गवळी,खान मोहमंद साबीर मुहिबुंल्लाह, सुभाष सुकलाल जगताप, नरेंद्र रुपला चौधरी, भारती अशोक माळी,वसीम बारी, रावसाहेब नांद्रे पाटील, संतोष छगन खताळ, संजय भिल, विजय जाधव,देवेंद्र सोनार, राजेश ईश्वर पवार,युवराज चैत्राम पाटील, अमीन पटेल,दगडू भिमा बागुल, कमलेश नारायण देवरे,वंदना संजय भामरे, कल्याणी सतिष अंपळकर इत्यादी सदस्यांनी यांनी महासभेत उपस्थित सर्व सदस्यांनी महापौर श्री.चंद्रकांत मधुकर सोनार यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांचा गौरव केलेला असून त्याप्रमाणे यादी सादर करुन अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत मागणी केलेली आहे. यांत नमूद केले आहे की,सन २०१९ मध्ये धुळेकर नागरीकांनी भारतीय जनता पार्टीस भरघोस मते देवून 50 नगरसेवक निवडून अभूतपूर्व यश मिळवून दिले. त्यानंतर धुळे महानगरपालिकेत मा. श्री. चंद्रकांत बापू सोनार यांची महापौर म्हणून स्तूत्य निवड करण्यांत आली. मा. चंदुबापू सोनार यांनी गेल्या अडीच वर्षापासुन धुळे महानगरपालिकेचा कारभार कार्यकुशलतेने सोबत घेवून कुठल्याही प्रकारचे वादविवाद न होता आपल्या राजकीय अनुभवाचा उपयोग करुन धुळे शहरातील सर्व प्रभागातील सदस्यांना सोबत घेवून कुठल्याही प्रकारचे वैयक्तीकहित न साधता तसेच भेदभाव न करता विकास कामे करतांना सर्वाना समसमान न्याय देण्याचा प्रयत्न केला. अशा निस्वार्थ भावनेने मनपा प्रशासनाला सोबत घेवून गेल्या अडीच वर्षापासुन अत्यंत उत्कृष्टपणे आपला सर्व कार्यकाळ पूर्ण करण्यांत आला. अत्यंत उत्कृष्टपणे चांगले काम केल्याबद्दल महापौर मा. श्री.चंद्रकांत बापु सोनार यांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

अभिनंदनाचा ठराव पारीत करणेबाबत

१) धुळे महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी विशेष महासभेत निवडणूक होवून मा. श्री. भगवानअप्पा शंकर गवळी (पंगुडवाले) यांनी ५० मते घेवून दणदणीत विजय प्राप्त केला व त्यांची धुळे महानगरपालिकेच्या उपमहापौर पदी स्तुत्य निवड झाली. तरी मा. श्री.भगवानअप्पा शंकर गवळी (पंगुडवाले) यांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

दि.२८/६/२०२१ रोजीर धुळे महानगरपालिकेच्या उपमहापौर पदी मा.श्री.भगवानअप्पा शंकर गवळी यांची उपमहापौर पदी स्तुत्य निवड झालेली असून त्यांच्या अ भिनंदनाचा ठराव आज रोजीच्या महासभेत पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

म. महापौर सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार उपमहापौर पदी निवड झाल्याबद्दल श्री. भगवान शंकर गवळी यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८२ अ दिनांक २९/६/२०२१.

सन्मा.सदस्याच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी विशेष महासभेत निवडणूक होवून मा. श्री. भगवानअप्पा शंकर गवळी (पंगुडवाले) यांनी ५० मते घेवून दणदणीत विजय प्राप्त केला व त्यांची धुळे महानगरपालिकेच्या उपमहापौर पदी स्तुत्य निवड झाली. तरी मा. श्री.भगवानअप्पा शंकर गवळी (पंगुडवाले) यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

३) महापौर व आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/६/२०२१ रोजी कोविड- १९ या भिषण आपत्तीमुळे दोन किंवा एक पालकांना गमावलेल्या बालकांच्या संगोपनासाठी बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीच्या अनुषंगाने धुळे शहराचे दानशूर व्यक्तीमहत्व ओम श्री. ग्रुपचे स्वत: कै. हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ श्री. महेंद्र ओंकार अग्रवाल (कैलास शेठ) यांनी अनाथ बालकांचा शालेय शिक्षणासाठीची फी ७.५० लाख रुपये मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आपण केलेल्या आव्हानामुळे सुपुर्द केली आहे. तर त्या अनुषंगाने श्री. महेंद्र ओकार अग्रवाल(कैलास शेठ) यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करावा ही विनंती.

सुचक श्री. शितलकुमार मोहन नवले,

म. महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्री.महेंद्र ओकार अग्रवाल(कैलास शेठ) यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८२ ब दिनांक २९/६/२०२१.

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार महापौर व आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/६/२०२१ रोजी कोविड- १९ या भिषण आपत्तीमुळे दोन किंवा एक पालकांना गमावलेल्या बालकांच्या संगोपनासाठी बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीच्या अनुषंगाने धुळे शहराचे दानशूर व्यक्तीमहत्व ओम श्री. ग्रुपचे स्वत: कै. हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ श्री. महेंद्र ओंकार अग्रवाल (कैलास शेठ) यांनी अनाथ बालकांचा शालेय शिक्षणासाठीची फी ७.५० लाख रुपये मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आपण केलेल्या आव्हानामुळे सुपुर्द केली आहे.त्याअनुषंगाने श्री.महेंद्र ओकार अग्रवाल(कैलास शेठ) यांचा धुळे महानगरपालिकेच्या वतीने अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दाजलीची यादी

सुटी संपल्यानरे कर्तव्यावर जात असतांना भारतीय सैन्य दलातील जवानांच्या वाहनाला दिल्लीनजीक अपघात झाला. या अपघातात आपल्या खान्देशातील भूमीपुत्र धुळे तालुक्यातील सौदाणे (वडजाई) गावाचा रहिवासी धनश्याम कपुरचंद बागुल वय वर्ष २८ या जवानाचा दुदैवीपणे मृत्यू झाला. अशा या शहीद जवानाला आज रोजीच्या महासभेत श्रध्दांजली वाहुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे

म.महापौर सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८२ क दिनांक २९/६/२०२१.

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार भारतीय सैन्य दलातील जवानांच्या वाहनाला दिल्ली नजीक अपघात झाला.या अपघातात आपल्या खान्देशातील भूमीपुत्र धुळे तालुक्यातील सौदाणे (वडजाई) गावाचा रहिवासी धनश्याम कपुरचंद बागुल वय वर्ष २८ या जवानाचा दुदैवीपणे मृत्यू झाला.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे..

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १४६ मागील महासभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(दि. ३०/१२/२०२०, १९/१/२०२१, २५/५/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी महापौर सो. दिनांक ३०/१२/२०२० रोजीच्या सभेतील विषय क्रं.१०८ ठराव नंबर १४० मध्ये जिल्हा नगरोत्थान योजनेतील कामाचे ठराव नमूद केले आहे. त्यात पा. नं. ५१ वर सन २०२१-२२ ची कामाची यादी दिलेली आहे.यात काही प्रभागाना ७० लाखाचा निधी दिलेला आहे. आमच्या प्रभागात ड्रेनेज लाईन टाकण्यांचे काम सुरु आहे. त्यामुळे प्रभागातील संपूर्ण रस्ते अत्यंत खराब झालेले आहे.तरी आमच्या प्रभागातील जयहिंद हायस्कूल जवळील १५ लाखाचा रस्त्यांचे कामाचा समावेश करण्यांत यावा ही विनंती.

म. महापौर आपल्या प्रभागातील जवळपास १ कोटीचे कामे घेण्यांत आलेले आहे. मागील सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८३ दिनांक २९/०६/२०२१

मागील सर्वसाधारण महासभा दिनांक ३०/१२/२०२० चे धुळे मनपा ठराव नंबर ११३ ते १४०अ ते आय अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच विशेष महासभा दिनांक १९/१/२०२१ चे धुळे मनपा ठराव नंबर १४१ ते १४३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच सर्वसाधारण सभा दिनांक २५/५/२०२१ रोजीचे धुळे मनपा ठराव नंबर १४४ ते १८१ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

महापौर,

धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- १४७ धुळे महानगरपालिकेच्या सर्व प्रभागात बाल संरक्षण समिती स्थापन करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८४ दिनांक २९/०६/२०२१

मा.जिल्हाधिकारी सो., तसेच शासन निर्णय १० जुन २०१४ नुसार महानगरपालिकेच्या क्षेत्रातील बालकांवरील अन्याय अत्याचार, शोषण, बालविवाह थांबविण्यासाठी व तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम १०६ नुसार बालकांचे संरक्षण आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येक प्रभागात बाल संरक्षण समिती त्वरीत स्थापन करावी व ती समिती ११ जणांची असावी असे आदेश देण्यात आले आहेत.

समिती अंतर्गत १८ वर्षाखालील मुलांचे संरक्षण मिळण्यासाठी आणि सुरक्षित वातावरणासाठी ही समिती प्रभावी ठरेल. पिडीत, हरवेले, निराधार, कोव्हीडमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना संरक्षण, संगोपन मिळण्यासाठी प्रत्येक प्रभागात बाल संरक्षण समिती स्थापन कराण्यात यावी.

शासन परिपत्रका नुसार एकात्मिक बाल संरक्षण संरक्षण योजनेचे केंद्र शासनाने आखून दिलेले उद्दिष्ट खालील प्रमाणे.

१. बालकांना अत्यावश्यक सेवा व सुविधा पुरविणा-या संस्थाचे बळकटीकरण करणे.
२. सर्व संबंधित संस्थामधील (शासकीय/अशासकीय) व्यक्तींची क्षमता वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम राबविणे.
३. बालकांच्या संरक्षणाच्या संदर्भातील सर्व प्रकारची (सर्व विभागांकडील) सांख्यिकीय व गुणात्मक माहिती संकलित करणे.
४. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर बाल संरक्षणाला बळकटी देण्यासाठी त्या स्वरुपाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
५. बालकांना आवश्यक सोई सुविधा पुरविणा-या सर्व शासकीय/निमशासकीय व सामाजिक संस्थाशी बालकांना सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने समन्वय साधणे.
६. बाल संरक्षण बाबी विषयी समाजामध्ये जनजागृती करणे.

७. बालकासंदर्भातील सर्व कायद्यांची अंमलबजावणी करणे.

बाल संरक्षण समिती महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी खालील प्रमाणे स्थापन करावयाची आहे.

रचना –

१. नगर सेवक / नगर सेविका – अध्यक्ष १
२. वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी – सदस्य १
३. वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी – सदस्य १
४. प्राथमिक/माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक (शिक्षणाधिकारी व्दारा नियुक्त) – सदस्य १
५. पोलीस स्टेशनमधील नियुक्त बाल संरक्षण अधिकारी – सदस्य १
६. स्थानिक सामाजिक संस्था प्रतिनिधी – सदस्य २
७. अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती (महानगरपालिका शाळा)–सदसय १ (शिक्षणाधिकारी व्दारे नियुक्त)
८. महानगरपालिकेच्या प्राथमिक/ माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक – सदस्य १ (शिक्षणाधिकारी व्दारे नियुक्त)
९. वैद्यकीय अधिकारी (शासकीय / खाजगी) – सदस्य १ (समिती व्दारे निवड केलेला/ केलेली)
१०. अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका – सदस्य सचिव

समिती स्थापन कण्यासाठी महानगरपालिके अंतर्गत मे.महासभेचा ठराव करणे आवश्यक आहे. सदरच्या बाल संरक्षण समिती स्थापन करण्याची कार्यवाही एकात्मिक बालविकास विभाग (नागरी प्रकल्प) व बाल संरक्षण विभाग जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय अंतर्गत कार्यरत बाल संरक्षण विभाग धुळे यांनी एकत्रीत पणे कार्यवाही करणे.

बाल संरक्षण समिती स्थापन करणे साठी मे. महासभेचा ठराव प्रथम आवश्यक आहे. तसेच समितीवर ११ सदस्य असून ७५ वॉर्ड वाईज समिती तयार करावयाच्या आहेत. जी. आर. प्रमाणे बालसंरक्षण समितीचे कामकाज अंगणवाडी पर्वेक्षक सदस्य सचिव व बालसंरक्षण विभाग यांनी पहावयाचे आहे महिला बालकल्याण समितीकडे मनुष्यबळ नाही तसेच ११ सभासद वार्डातून कोणते घ्यावे कुणाचे नांव सुचवावे हे सन्मा. सदस्य तथा अध्यक्ष हेच त्यांच्या वार्डातून ठरवतील. त्यामुळे विभागाला प्रारुप देता येणार नाही तसेच समिती स्थापनेचे बाबत जी.आर. प्रमाणे योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे.

सदर समितीमध्ये प्रभागातील जेष्ठ नगरसेवक यांची अध्यक्ष पदी नियुक्ती करणेस हरकत नाही.

- समिती मधील इतर सदस्यांची नेमणूक समिती अध्यक्ष यांच्याशी विचार विर्मष करुन करता येईल.

- यासाठी आवश्यक माहिती पोलीस प्रशासन, अंगणवाडी सेवी विषयी माहिती एकात्मिक बाल विकास अधिकारी यांचेकडून मागवून समिती अध्यक्षांकडे सादर करता येईल.
- प्रभागातील १८ वर्षाखालील बालकांचे संरक्षण विषयी, सुविधा उपलब्ध करुन देणेविषयी सदर समितीमध्ये निर्णय घेणे व अंमलबजावणी करणे सोयीचे होणार आहे.
- तरी सदर प्रभाग निहाय बाल संरक्षण समिती स्थापन करणेस मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर असे अभिप्राय मा.उपायुक्त सो. यांनी नोंदविले आहे.तरी सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे निर्णयार्थ सादरझाला आहे.

तरी उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून शासन निर्देशाप्रमाणे धुळे महानगरपालिकेच्या सर्व प्रभागात बाल संरक्षण समिती स्थापन करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार पुढील उचित कार्यवाही प्रशासनामार्फत तात्काळ करणेत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकम:-१४८ मा. महापौर सो.यांच्या सुचनेनुसार व सन्मा.सदस्य श्री. हिरामण अप्पा गवळी यांच्या पत्रानुसार धूळे महानगरपालिका हद्दीतील हाग्रा नाल्यास हरित नाला असे नामकरण करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८५ दिनांक २९/०६/२०२१

मा. महापौर सो. यांच्या सुचनेनुसार धुळे महानगरपालिका हद्दीतून हाग-या नाला वाहत असून सदर नाल्यास हाग-या नाला असे संबोधतात. सदरचे नांव वेगळे असल्याने त्यास मध्यवती नाला असे नामकरण देणेबाबत सूचित केले आहे.

उक्त बाबत नागरीकांकडून ७ दिवसांच्या आंत हरकती व सुचना मागविणेकामी सदरचा विषय दै. वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत मंजुरीस्तव सादर केला असता मा. आयुक्त सो.यांनी चर्चेत सुचित केल्या नुसार सदरील नाल्यास हरीत नाला असे नांव देऊन त्यास शहरातील प्रमुख नाला असल्याने त्यास देखील करणे उक्त बाबत चांगला आर्किटेक्ट नेमून त्यास इतर शहरातील नाल्यांचे प्रमाणे सुशोभिकरण करणे बाबत अग्रेषित केले त्या प्रमाणे नांव बदलून सदरचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी मे. महासभेपुढे ठेवणेबाबत मंजुरीसाठी सादर केला आहे.

यावर म. आयुक्त सो. यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविला आहे.

शहरातील वाहणारे प्रमुख नाले विकसनाचे Vision राबविणे आवश्यक वाटते. त्या अंतर्गतअशा नाल्यांचे Master Plantयार करून टप्याटप्याने सुशोभिकरण, बळकटीकरण, सौंदर्यीकरण करणे अभिप्रेत असेल.

उपरोक्त नाला शहरातील महत्वाचा नाला असून प्रचलित हाग-या नाला हे नांव बदलून हरीत नाला ठेवणेस शिफारस आहे. त्यानुसार हरकती व सुचना इ. प्रक्रिया करावी.

उपरोक्त मंजुरीप्रमाणे दै.आपला महाराष्ट्र या दैनिकात ७ दिवसाच्या आंत हरकती सुचना प्राप्त न झाल्याने सदरचा नाल्यास हरीत नाला असे नामकरण करणेबाबत प्रस्ताव मंजुरीसाठी सादर झाला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने धूळे महानगरपालिका हद्दीतील हाग्रा नाल्यास हरित नाला असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४९ सन्मा.सदस्य श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील वलवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राचे भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलशुद्धीकरण केंद्र असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८६ दिनांक २९/०६/२०२१

सन्मा. सदस्य श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे यांनी धुळे महानगरपालिका हद्दीतील वलवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राचे भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलशुद्धीकरण केंद्र असे नामकरण पत्र सादर केलेले आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर जलशुध्दीकरण केंद्रास कोणतेही नामकरण झालेले नाही.

धुळे महानगरपालिका हद्दीतील खालील नामकरणांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून मा.आयुक्त सो.मनपा धुळे यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दैनिक आपला महाराष्ट्र दि.०४/०६/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही.

तरी सदर जलशुध्दीकरण केंद्रास भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलशुद्धीकरण केंद्र असे नामकरण करणे बाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे निर्णयार्थ सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका हद्दीतील वलवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राचे भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलशुद्धीकरण केंद्र असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५० सन्मा.सदस्य सौ.प्रतिभाताई चौधरी यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.4 मधील सर्व्हे नं.21/2 प्रोफेसर कॉलनी येथील आशियाना अपार्टमेंट समोरील उद्यानास महाराणी येसूबाई संभाजीराजे भोसले उद्यान असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८७ दिनांक २९/०६/२०२१

सदस्य सौ. प्रतिभाताई चौधरी यानी पत्र देवून धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४ मधील सर्व्हे नं.२१/२ प्रोफेसर कॉलनी येथील आशियाना अपार्टमेंट समोरील उद्यानास महाराणी येसूबाई संभाजीराजे भोसले उद्यान असे नामकरण करणे बाबत सूचित केले आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर उद्यानास नामकरण झालेले नाही.

उक्त बाबत नागरीकांकडून ७ दिवसाच्या आंत हरकती व सुचना मागविणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो.मनपा धुळे यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दैनिक आपला महाराष्ट्र दि.०४/०६/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही. तरी सदर उद्यानास महाराणी येसूबाई संभाजीराजे भोसले उद्यान असे नामकरण करणेस मे.महासभे समोर निर्णयार्थ सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४ मधील सर्व्हे नं.२१/२ प्रोफेसर कॉलनी येथील आशियाना अपार्टमेंट समोरील उद्यानास महाराणी येसूबाई संभाजीराजे भोसले उद्यान असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५१ सन्मा.सदस्य सौ. प्रतिभाताई चौधरी यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.4 मधील प्रा.श्री.एम.टी.भदाणे यांच्या घरासमोर जयहिंद कॉलनी येथील सर्व्हे नं.14/1 येथील उद्यानास स्वातंत्रयवीर वि. दा. सावरकर उद्यान असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर नामकरण प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८८ दिनांक २९/०६/२०२१

सन्मा. सदस्य सौ. प्रतिभाताई चौधरी यानी पत्र देवून धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४ मधील प्रा. श्री. एम. टी. भदाणे यांच्या घरासमोर जयहिंद कॉलनी येथील सर्व्हे नं.१४/१ येथील उद्यानास स्वातंत्रवीर वि.दा.सावरकर उद्यान असे नामकरण करणेबाबत सुचित केले आहे.

उक्त बाबत मनपा अभिलेख तपासले असता अद्याप पावेतो सदर उद्यानास नामकरण झालेले नाही.

उक्त बाबत नागरीकांकडून ७ दिवसाच्या आंत हरकती व सुचना मागविणेच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो. मनपा धुळे यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

सदर नामकरणाच्या विषयावर हरकती व सुचना मागविणे कामी सदरचा विषय दैनिक आपला महाराष्ट्र दि.०४/०६/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला असता एकही हरकती व सुचना प्राप्त झालेली नाही.तरी सदर उद्यानास स्वातंत्रवीर वि.दा.सावरकर उद्यान असे नामकरण करणेबाबत मे.महासभेसमोर निर्णयार्थ सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४ मधील प्रा. श्री. एम. टी. भदाणे यांच्या घरासमोर जयहिंद कॉलनी येथील सर्व्हे नं.१४/१येथील उद्यानास स्वातंत्रवीर वि.दा.सावरकर उद्यान असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५२ धुळे शहरासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना करिता प्रोसेसींग प्रकल्प 15 वर्षांपर्यंत चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी Design, Build, Finance, Own, Operate & Transfer DBFOOT) यासाठीचे संयुक्त ई-निविदा मागविण्यात आलेली असून यास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौर महोदय हा विषय मंजुरीसाठी आला नसून कऱ्योत्तर मंजुरीसाठी आला आहे मोघम स्वरूपाचा विषय सभागृहापुढे ठेवलेला आहे २४ कोटी रुपयांचा हा विषय असून या विषयाबाबत सभागृहातील सदस्यांना प्रशासनामार्फत कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही आदेश वगैरे पास करून दिले आहेत आणि हा विषय काऱ्यत्तोर मंजुरीसाठी पाठवलेला आहे या विषयाबाबत काही माहिती नाही याबाबत कुठलीही माहिती सदस्यांना दिली दिली नाही आमच्या आयुष्याला पूर्णपणे विरोध आहे हा विषय ठेवावा आणि पुढच्या सभेच्या वेळ पूर्वी

सर्व सदस्यांना माहिती द्यावी कोणत्या कंपनीने भरले आहे केव्हा झाले आहे काम कुठे होणार आहे बापूसाहेब मला व फिटर भाऊ नवले यांना भारत सरकारच्या भारत अभियान कार्यक्रमा साठी प्रशिक्षणाला पाठवले होते त्या कार्यक्रमाला धुळे महानगर पालिके मार्फत आम्ही दोघे गेलो होतो तिथे आम्हाला घनकचरा व्यवस्थापनाबाबत माहिती देण्यात आली होती आम्हाला एवढे अपेक्षित होते की आम्हा दोन लोकांना बनवले असं आम्हाला जर तिथे पाठवले आहे तर आम्हाला विचारात घेतले गेले नाही २४ कोटी लहान रक्कम नाही या विषयाला विरोध नाही शहरासाठी गरजेच आहे परंतु आम्हाला कुठल्याही प्रकारे विश्वासात न घेता आम्ही या विषयाला कुठल्याही प्रकारे कार्यक्रम मंत्री देऊ शकत नाही आमचे स्पष्ट म्हणणे आहे हा विषय खूप ठेवावा.

म. महापौर — हा विषय २४ कोटीचा नाही आहे कितने नीट वाचून घ्या हे काम अतिशय महत्त्वाचे आहे ते काम शासन स्तरावर चा आहे.

म. हर्षकुमार रेलन — आम्हाला काही न विचारता कुठलाही विषय मंजूर करून घेणार का.

म. संजय पाटील — जोपर्यंत डिटेल माहिती प्रत्येक नगरसेवकाच्या हातात येत नाही तोपर्यंत हा विषय खूप ठेवा आपण पाच वर्षाकरिता निवडून येतो मग पंधरा वर्ष घेण्यासाठी देता हा विषय पास करीत असाल तर माझा याला विरोध आहे

म.प्रदीप चव्हाण — स्वच्छ भारत अभियान अंतर्गत धुळे शहरासाठी महाराष्ट्र शासनाने रु. २४ .५० कोटीचा डी पीआर मंजूर केला होता . त्यात प्रोसेसिंग लॅन्ड फिल्डसाठी 4,78,50,000 व डेव्हलपमेंट लॅन्ड फिल्डसाठी 5,41,73,841/-हे दोन कामे समाविष्ट होती. उक्त कामासाठी, नागपूरचे कन्स्ल्टंट श्री.आर.जगताप अॅन्ड असोसिएट एक तज्ज्ञ संस्था आहे यांच्या मार्फत कामासाठीचे निविदा प्रपत्र त्यात प्रकल्प 15 वर्ष चालविणे, व देखभाल दुरुस्तीसह Design, Build, Finance ,Own,Operate & Transfer(DBFOOT) या तत्वावर निविदा मागविण्यांत आलेली होती. त्यानुसार सदर कामांसाठी ई-निविदा सूचना क्र १५७ दि. १०/३/२०२१ मागविली होती. तथापि त्यात एकही निविदा प्राप्त न झाल्याने पुनश्च दुसरी ई निविदा सुचना क्रं.४८ दि.२५/०५/२०२१ अन्वये मागविण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर केला आहे.

म.नगरसचिव — नेमके काम काय होणार आहे

म. सुनील बैसाणे — याच्याने काय फायदा होणार आहे हे सांगा

म.प्रदीप चव्हाण — या प्रोजेक्ट अंतर्गत शहरातून निघणारा ओला व सुका कचरा शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत त्यानुसार हे टेंडर मागविले आहे आपण सुरुवातीला ओला कचरा आणि सुका कचरा हे मिक्स स्वरूपात एका प्लांट मध्ये वजन करुन त्यानंतर त्या कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचे शंभर एमएम ट्रोलमिलवर प्रक्रिया करुन त्याचे रिजेक्त पार्ट लॅन्डफिल्डलला पाठवून उर्वरीत कच-यांचे बायो डिग्रेशन करुन 21 दिवसासाठी दर आठवडयाल टर्निग व शिप्टींग करुन तो परत 35 एम.एम. ट्रोलमिलवर प्रक्रिया करुन परत 16 एम.एम. ट्रोलमिलवर प्रक्रिया करुन त्यानंतर पुन्हा 4 एम.एम. च्या ट्रोलमिलवर प्रक्रिया करुन

कच-यांचे कॉलेटी कपोंन्ट करुन व टेटींग करुन अशा स्वरुपात प्रक्रिया केली जाते. असे मंजूर डीपीआर मध्ये नमूद केले आहे.

म. महापौर सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १८९ दिनांक २९/०६/२०२१

धुळे शहरासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना करिता रक्कम रू.२४,५०,७३,५६७.६३/- मात्र रक्कमेस म.मुख्य अभियंतामहाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक यांनी तांत्रिक मंजुरी देऊन स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना करिता रक्कम रू.२४,५०,७३,५६७.६३/- मात्रचा प्रकल्प अहवाल शासनाने मंजूर केला आहे.

त्यानुसार स्थापत्य विभागाकडील १) Processing plant & machinery रक्कम रु.४,७८,५०,०००/- व २) Development of Landfill रक्कम रु.५,४१,७३,८४१/- याकामांची निविदा मागविणे आवश्यक असल्याने इकडील कार्यालयामार्फत ई-निविदा सूचना क्र.१५७ दि.१०/०३/२०२१ नुसार मागविण्यात आली होती .तथापि ई-निविदा प्रक्रियेत एकही निविदा प्राप्त न झाल्याने सदर कामांसाठी फेर ई-निविदा सूचना क्र.४८ दि.२५/०५/२०२१ नुसार मागविण्यात आलेली आहे.

सदर कामाचे निविदा प्रपत्रे हे श्री.आर.जगताप & असो.नागपूर यांच्याकडुन तयार करून घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार त्यांनी प्रकल्पाचे १५ वर्षांपर्यंत चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी Design,Build, Finance ,Own, Operate & Transfer (DBFOOT) यासाठीचे संयुक्त ई-निविदा मागविण्यात आली आहे. तरी उक्त बाबत कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे ठेवणे बाबत निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन धुळे शहरासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना करिता प्रोसेसींग प्रकल्प 15 वर्षांपर्यंत चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी Design, Build, Finance, Own, Operate & Transfer DBFOOT) यासाठीचे संयुक्त ई-निविदा मागविण्यात आलेली असून यास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५३ उपाध्यक्ष, नॅशनल एज्यु. सोसायटी सिल्लोड,ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद यांच्या कडील पत्रानुसार म.न.पा. हद्दीतील मनपा मालकीच्या शाळेची इमारत नाममात्र भाडे तत्वावर संस्थेस देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन महापौर सो. आपण जर प्रशासीय टिपणी बघितली असता त्यामध्ये असे दिले आहे की, सदर शाळा आपल्या महानगरपालिकेलाच लागणार आहे.ही शाळा आपल्याला कुठल्याही संस्थेला द्यावयाची असेल जी काही कामाची नसेल भविष्यात पण आपल्याला त्यांची गरज नसेल तरच ती आपण एखाद्या संस्थेला देऊ शकतो पण प्रशासनाने स्वत: त्यांच्या टिपणी मध्ये लिहिले आहे की, त्याठिकाणी १३ खोल्या आहेत त्यापैकी ११ खोल्या आपल्यालाच लागणार आहे. तर आपण दुस-या कोणाला कसे काय देऊ शकतो. आपण महाराष्ट्रात राहून मराठी शाळा बंद करत गेला तर कसे चालेल मराठी गरीब मुलांकरिता काहीच करावयचे नाही का मग मराठी शिकायला लो क जातील कुठे कारण प्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार मराठी शाळा आम्हाला लागणार प्रशाळेचा मुलांचे समायोजन तिथे केले आहे. समायोजन केल्यानंतर मग ही शाळा आपण दुस-याला कसे काय देऊ शकता जर समजा आपल्या दुस-या संस्थेला दावयाची आहे सभागृहाने ठरविले तर सभागृहाची मर्जी आहे त्या संस्थेबद्दल सभागृहाला सदस्यांना काही माहिती आहे का? सिल्लोडची शाळा जर ती शाळा तुम्हाला दयावयाची होती तर आम्हाला पण द्या मी आपल्याला पत्र देतो आहे माझी संस्था ३८ वर्ष जुनी आहे.आपण या शहराच्या गरीब लोकांचा काही विचार करणार आहात का नाही मराठी भाषेचा सन्मान करा अशा शाळोचा धोरणात्मक निर्णय घेऊन कोणालाही चालवायला देऊ नका या सभागृहाला व सदस्यांना या संस्थेबद्दलची काही माहिती नाही अशा संस्थांना शाळा देऊ नका तरी सदरचा विषय रद्द करावा ही विनंती करतो.

म. भगवान गवळी सदर संस्थेचा अन्यत्रजागा देणेत यावी.

म. शितल नवले सदर संस्थेला शाळा नं. २९ ही जागा देण्यांत येवू नये.

म. महापौर सर्वात महत्वाचा विषय असा आहे आपण बोलले मराठी शाळा जिवंत रहायला पाहिजे त्यासाठी मनपा फार मोठा प्रयत्न करत आहे.शिक्षण मंडळाच्या माध्यमातून परंतु मनपाच्या शाळा मार्फत पुरेसे शिक्षण मिळत नसल्याने चांगली सुविधा मिळत नसल्याने गरीबातील गरीब मध्यमवर्गीय सुध्दा खाजगी शाळेत प्रवेश घेतो हे आपले दुदैव आहे. राहिला विषय त्या जागेचा मी सभागृहाच्या सर्व सभासदाचा मान राखून ती जागा मी त्या शाळेला बिलकुल देणार नाही त्या जागेवरअग्रवाल एज्युकेशन ट्रस्टला ती जागा देण्यांची सुचना करण्यांत येत आहे.आणि आपण जी सुचना केली त्या माध्यमातून जी मागणी आपणस जी खंत व्यक्त केली आपण शिक्षण मंडळ संपूर्णपणे १०० टक्के कोलमडून गेलेले आहे. सुभाषनगर भागात मनपाच्या ३ शाळा आहेत. शाळा नं.२२,१६,२ पण जुन्या धुळयामध्ये गरीब शेतकरी कष्टकरी लोक जास्त असतांना सुध्दा त्या शाळेमध्ये पटावर ५ पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या नाही तिन्ही शाळा आज बंद आहेत. ही शोकांतिका आहे आज याला मुळ कारण शिक्षण मंडळ,शिक्षण मंडळ त्यांच्याकडे लक्ष देत नाही गरीबतला गरीब सुध्दा मनपा शाळेत प्रवेश करीत नाही हे दुदैव आपले तुम्ही म्हणता मराठी शाळा जिवंत राहयाला पाहिजे तुम्ही मागणी करा तुम्ही ट्रस्ट चालवतात त्या गोष्टीकडे लक्ष देतात त्यामुळे तुम्ही मागाल ती शाळा आम्ही तुम्हाला देऊ आम्ही शाळा द्यावयास तयार आहोत परंतु कोणतीही संस्था पुढे येत नाही परंतु त्यांनी मागणी

केलेली आहे आणि ज्या भागात मागणी केलेली आहे सर्व सभासदाचा कल आहे की तिथे देऊ नका म्हणून त्या शाळेमध्ये न देता ज्या ठिकाणी मुस्लीम बहुल समाज आहे.अशा ठिकाणी जागेचा शोध घेवून त्या संस्थेला देण्यात येईल.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९० दिनांक २९/०६/२०२१

धुळे म.न.पा कार्यक्षेत्रात म.न.पा मार्फत मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळा चालविल्या जातात. सद्यस्थितीत १२ उर्दू माध्यमाच्या व ८ मराठी माध्यमाच्या शाळा कार्यरत आहेत.

संदर्भीय पत्रात नमुद म.न.पा शाळा क्रं.२९ ही मराठी माध्यमाची बंद अवस्थेतील शाळा असून सदरहू शाळा मालेगांवरोड, बर्फ कारखान्याच्या पाठीमागे अस्तित्वात आहे. सदरहू शाळेचे समायोजन म.न.पा शाळा क्रं.२८ येथे झालेले आहे. सदरहू मनपा शाळा क्रं.२९ ही मनपाच्या मालकीची इमारत असून इमारतीत १३ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. इमारतीत विजेची सोय असून सदरहू शाळेत आरटीई २००९ अन्वये सर्व निकषांची पुर्तता करण्यात आलेली आहे.

सदरहू शाळा ही शासन मान्य माध्यमिक शाळा असून सदरहू शाळेचे कामकाज सद्यस्थितीत धुळे म.न.पा इमारतीच्या आवारात असलेल्या गुजराथी शाळेसमोरील जागेत करण्यात येत आहे. प्रशाळेचे मुख्याध्यापक यांच्याशी झालेल्या चर्चेअंती सदरहू शाळेत इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे एकूण ६ वर्ग भरत असून एकूण १२ कर्मचारी कार्यरत आहेत. या शाळेसाठी म.न.पा शाळा क्रं.२९ मधील ६ वर्गासाठी ६ खोल्या, प्रयोगशाळेसाठी १ खोली, ग्रंथालयासाठी १ खोली, शिक्षक दालन १ खोली, संगणक रुम १ खोली, मुख्याध्यापक दालन १ खोली अशा प्रकारे ११ खोल्यांची आवश्यकता असल्याचे सांगितलेले आहे.या सर्व खोल्याची दुरुस्ती करण्यात आलेली असून सदरहू इमारत आरटीई निकषांची पुर्तता करीत आहे.

म.न.पा. शाळा क्रं.२९, धुळे येथे शैक्षणिक कामासाठी मिळणेबाबत सुचित केलेले आहे. उपाध्यक्ष,नॅशनल एज्यु. सोसायटी सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांनी महानगरपालिका हद्दीतील महापालिकेच्या मालकीची शाळा क्रं.२९ची इमारत त्यांच्या संस्थेस नाममात्र भाडे तत्वावर मिळणेबाबत विनंती अर्ज या कार्यालयात म.न.पा धुळे मार्फत सादर केलेला आहे.तरी सदरहू बाबत आपल्या स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाहीस्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल लक्षांत घेवून सदर संस्थेने मागणी केलेली शाळेच्या जागेत उर्दू भाषिक समाज या शाळेपासून जास्त अंतरावर असल्याने व त्यामुळे सदर शाळेमध्ये उर्दू भाषिक विद्यार्थी येण्याची शक्यता नसल्याने सदर शाळेचा विचार करणे योग्य ठरणार नाही.

सर्व सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार व सभागृहाचा कल लक्षात घेता नॅशनल एज्यु. सोसायटी सिल्लोड,ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद ही संस्था नामांकित असून अनेक शैक्षणिक

संस्था यशस्वीपणे चालविण्याचा त्यांना अनुभव आहे.तसेच विषयांकित प्रकरणी संपूर्ण खर्च (पगार,मेंटेनन्स इ.) सदर संस्थाच करणार आहे. त्यामुळे शहरातील विदयार्थ्यांना अतिशय दर्जेदार व चांगली शैक्षणिक सुविधा प्राप्त होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करुन या संस्थेस मनपा शाळा क्रं.२० उर्दू शाळा चालविण्यासाठी २० वर्षाच्या कराराने कायदेशीर अटी शर्तीनुसार वार्षिक ३००००/- रूपये मात्र भाडे आकारणी करुन देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत प्रशासनाने सदर संस्थेशी आवश्यक तो अटी शर्तीचा करारनामा भाडे पट्टयाचा व ताबा पावती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार करण्यांत यावी. प्रशासनाने कायदानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. सदर विषयास सर्व सभासदांच्या मान्यतेने मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५४ मा.महापौर सो. यांच्या पत्रानुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रस्ता अनुदान अंतर्गत कामे निश्चीतीबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले

म. महापौर सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्राप्त होणारया रस्ता अनुदानातुन कामे प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९१ दिनांक२९/६/२०२१

शासनाकडून राज्यातील महानगरपालिकांना दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीतील रस्त्यांची देखरेख, दुरुस्ती, डांबरीकरण व नुतनीकरण इत्यादी आनुषांगिक कामांसाठी दरवर्षी विशेष रस्ता अनुदान व सर्वसाधारण रस्ता अनुदान प्राप्त होते.या अनुदानातून शहरातील विविध भागतील अत्यावश्यक रस्त्यांची कामे घेण्यात येतात.

धुळे महानगरपालिकेस सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण ७५ लाख रुपये अनुदान प्राप्त होणार आहे.

या अनुदानातून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात खालील कामे प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्र.क्रं. ९ मधील शुभम मिस्तरी यांच्या घरापासून ते उमेश सांगळे यांच्या घरापोवेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९४,८४८/-
२	प्र. क्रं. १० मधील बर्फ कारखाना ते भेळवाला ते पप्पू माळी यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	११,९४,३१५/-
३	प्र.क्रं. १० मध्ये देविदास कॉलनी मधील यशवंत चव्हाण यांचय घरापासून ते विजू छल्लाणी यांच्या घरापावेतो ते भैया बडगुजर यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२२,५७,४०९/-
४	वरखेडे येथे पुंडलिक दगा ते शिवदास पुनम चौधरी किराणा दुकानापासून पूर्वस शेखर धनगर मल्हारगड पर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२४,९२,१४६/-
५	प्रभाग क्रं. १९ मध्ये मुल्ला नगर युसुफ मुल्ला घर ते रऊफ शेख यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीटी करण करणे	२२,५०,८३७/-

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५५ मा.महापौर सो.यांच्या पत्रानुसार लोक शाहिर आण्णा भाऊ साठे नागरि दलित वस्ती सुधार योजना, नागरी दलित्तेतर योजने अंतर्गत सन२०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी कामे निश्चीती करणे बाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. महापौर सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी महापालीका क्षेत्रात नागरी दलित्तेतर योजनेअंतर्गत सर्व समावेशक विकास कामे करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९२ दिनांक २९/६/२०२१

धुळे महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलित्तेतर योजने अंतर्गत विकास कामे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील कामे निश्चिती करुन नागरी दलित्तेतर योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यांत मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकेने सन २०२१-२२ च्या दलित्तेतर वस्ती सुधार योजनेचा आराखडा तयार केलेला आहे. दलित्तेतर वस्तीचे सर्वेक्षण करुन खालीलप्रमाणे दलित्तेतर वस्त्यात करावयाच्या कामांचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्या आराखडयानुसार खालील कामांना या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्रं.	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्र.क्रं. १० मधील माऊली नगर येथील श्री. लक्ष्मण बडगुजर यांच्या घरापासून ते दिपक माळी यांच्या घरापोवेतो काँक्रीट रस्ता करणे.	१६,५१,७३३/-
२	प्र.क्रं. १० मध्ये गौरव वाणी ते जयवंत दुसाणे यांच्या घरापोवेतो ते पुनमचंद जैन ते संजू भावसार यांच्या घरापोवेतो रस्ता काँक्रीट करणे.	२०,०३,०३१/-
३.	प्र. क्रं. १० देविदास कॉलनीमधील बाबा माळी यांच्या घरापासून ते अशोक जाधव यांच्या घरापावेतो ते सुनिल मंडपवाले यांच्या घरापावेतो पाईप गटार करणे.	२४,९३,०९९/-
४.	प्र. क्रं. १० सुर्यादय कॉलनी मधील मारोती मंदीरापासून ते कपिल कावटे ते गौरव वाणी यांच्या घरापासून ते राजू बडगुजर यांच्या घरापावेतो पाईप गटार करणे.	२४,९२,४४९/-
५.	प्र. क्रं. १० गुरुदत्त कॉलनीमधील हर्षल मायाचार्य यांच्या घरापासून ते रघूनाथ माळी यांच्या घरापावेतो पाईप गटार करणे.	२४,९३,२७६/-
६.	वरखेडी गावात नॉजेल ॲकाडमी गौरव लोटन माळी यांचे घर ते पूर्वस समाधान भिकन मराठे यांचे घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	२४,९२,७९६/-
७.	वरखेडी गावात लोटन रतन मराठे यांचे घर ते पूर्वेस सुभाष हिरामण गुजर यांच्या घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट पोल करणे.	२४,९२,७९६/-

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- १५५ मा. महापौर सो. यांच्या पत्रानुसार लोक शाहिर आण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, नागरी दलितेत्तर योजनेअंतर्गत सन२०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी कामे निश्चीती करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या आलेल्या यादींचा विचार करुन धुळे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१-२२ अंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना या अंतर्गत (लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास योजने अंतर्गत) मनपा हद्दीतील विविध प्रभागात विकास कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९२ (अ) दिनांक २९/६/२०२१

धुळे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१-२२ अंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना या अंतर्गत (लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास योजने अंतर्गत) मनपा हद्दीतील विविध प्रभागात विकास कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.तरी धुळे मनपा हद्दीतील प्रभाग रचनेनुसार प्रभाग क्रं. १,४,७,१५,१६,१८ हे प्रभाग एस. सी.प्रवर्गासाठी राखीव आहेत. त्यानुसार सदर प्रभागात विकास कामे निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच ५० टकके पेक्षा जास्त एस.सी. लोकसंख्या असणारे २५ भाग आहे. त्या भागात सुध्दा सदर योजनेत कामे समाविष्ट करता येईल. त्यानुसार लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात करणे आवश्यक आहे.त्यासाठी खालील कामे निश्चीत करुन अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना या अंतर्गत (लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास योजने अंतर्गत) प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्रभाग क्रमांक १ मध्ये श्रमसाफल्य कॉलनी भागात एडवोकेट देशमुख यांच्या घरापासून ते जगदेव यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१९९७८७३
२	प्रभाग क्रमांक १ मध्ये मयुरी थोरात यांच्या घरापासून ते मुन्ना ठाकूर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	२३९७७१४
३	प्रभाग क्रमांक १ मध्ये आमेन नगर येथे ठाकरे यांच्या घरापासून ते कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	२३९१९२५
४	प्र क्र १० मध्ये वरखेडी रोड, गायकवाड चौक पासुन ते श्री साळवे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२२०००००
५	प्रभाग क्रमांक ४ मध्ये मसुद खान यांच्या घरापासून ते श्री रवी वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे	२४९३६५२

६	गायकवाड चौक व्यायामशाळा शशी वाघ यांचे घ्र ते दगडी गल्ली कैलास नवल सुर्यवंशी परीसरापावेतो रस्ता सिमेंट कॉक्रींट करणे.	२२०००००
७	प्रभाग क्रमांक ४ मध्ये संदीप पगारे यांच्या घरापासून ते विलास चत्रे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे	२४९४३०२
८	प्र क्र १० मध्ये गायकवाड चौक भागात 1) श्री कपूरे ते नाल्या पावेतो 2) रुईकर ते नाला 3) श्री शेवगेकर ते संतोष मिस्त्री 4) शिवाजी मिस्त्री ते शेवगेकर 5) किरण ठाकूर ते सायकलवाले 6)कुंदन खरात यांच्या घरापासून ते उत्तरेस बडगुजर(चक्की) 7)श्रीराम अहिरे ते गोकूळ चव्हाण 8) विठ्ठल साळवे ते अशोक करंडक पर्यंत बंदिस्त पाईप गटार (ड्रेनेज लाईन) करणे.	२००००००
९	प्रभाग क्रमांक ४ मध्ये प्रकाश पवार यांच्या घरापासून ते रवी वाघ यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे.	१९९४८७६
१०	प.क्रं. ४ मध्ये श्री. शाम जेगदेव यांच्या घरापासून ते उत्तरमुखी मारोती मंदिरापावेतो ते रामराजेअप्पा यांच्या घरापार्यत रस्ता डांबरीकरण करणे.	२००००००
११	प्रक्रं. ४ मध्ये श्री.महुकर यांच्या घरापासून ते दगडू शिंदे यांच्या घरापर्यत ते डॉ. नवगाळे यांच्या दवाखान्यापावेतो बंदिस्थ गटार करणे	१५०००००
१२	प्रभाग क्रमांक ७ मध्ये सुभाष सपकाळे यांच्या घरापासून ते मोगलाई पोलीस स्टेशन पावेतो रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	९९०००००
१३	प्र क्र ७ मध्ये नेहरू पुतळ्यापासून संतोष वाघ चौक पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे	५००००००
१४	प्र क्र ७ मध्ये महाले नगर भागात जगदीश केशव नेरकर यांच्या घरापासून ते फुले नगर येथील सार्वजनिक शौचालयापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	३००००००
१५	प्रभाग क्रमांक १५ मध्ये उत्कर्ष कॉलनी भागात बिराडे यांच्या घरापासून ते कुलकुले यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	२४९०५३५
१६	प्रभाग क्रमांक १५ मध्ये रमाई नगर येथें नाल्यालगत संरक्षण भिंत बांधणे	४५०७६९८
१७	प्रभाग क्रमांक १६ मध्ये देवचंद नगर मध्ये बुरा भाऊ पवार ते दीपक गूलाले यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण व काँक्रेट गटार करणे	२४९८९१२
१८	प्रभाग क्रमांक १६ मध्ये तुळजाई सोसायटीमध्ये श्री सोनकांबळे ते डीपी रस्ता पावेतो रस्ता डांबरीकरण व दोन्ही बाजूस बंदिस्त गटार करणे	२४९८१८८
१९	प्र क्र ९ मध्ये गायकवाड चौक भागात प्रकाश अहिरे यांच्या घरापासुन ते भाऊसाहेब देवरे ते जैनुद्दीन शेख ते मन्या विचू ते सुरेश जाधव ते भुषण सुर्वे ते अशोक सांगळे ते शिवनेरी किराणा पावेतो बंदिस्त आर.सी.सी. गटार करणे.	२२०००००
२०	प्रभाग क्रमांक ७ मध्ये कुमारनगर भागात नारी शाळा ते मनोहर मेघानी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	२२०००००
२१	प्रभाग क्रमांक ७ मध्ये कुमार नगर मध्ये डॉक्टर सैंदाणे पासून ते श्री लखमीचंद पर्यानी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	२३०००००

२२	प्रभाग क्रमांक १६ मध्ये छत्रपती राजे चौक ते श्री वाकळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व काँक्रीट गटार करणे	१४९९९४१
२३	प्रभाग क्रमांक १६ मध्ये अरुणोदय नगर अंतर्गत श्री गवळी यांच्या घरापासून ते श्रीमती पाटील ताई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व बंदिस्त गटार करणे	१५०००००
२४	प्र क्र १६ मध्ये दक्षता हौसिंग सोसायटी भागात श्री नाना महाजन यांच्या घरापासून ते श्री नंदु देवरे यांच्या घरापर्यंत तसेच श्री मोरे ते श्री चव्हाण तसेच श्री सोनार ते नंदु देवरे यांच्या घरापर्यंत बंदिस्त पाईप गटार करणे.	२००००००
२५	गायकवाड चौक भागात सुपा सोनावणे ते शशी वाघ ते गंगाधर सुर्यवंशी ते दगडी गल्ली पावेतो बंदिस्त आर.सी.सी. गटार करणे.	२२०००००
२६	प्रभाग क्रमांक १८ वरचे गाव भागात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे	१४९४५३२
२७	प्रभाग क्रमांक १८ गोलू बोरसे यांच्या घरापासून ते गजानन मंदिर पावेतो ते हायवे पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४९८०७२
२८	प्रभाग क्रमांक १८ दंडे वाले बाबा नगर भागात रस्ता काँक्रीट करणे.	९९९६३८
२९	प्रभाग क्रमांक १८ मध्ये संतोषीमाता नगर भागात रस्ता काँक्रीट करणे.	९९८९८८
३०	प्रभाग क्रमांक १८ मध्ये वरचे गावात दामोदर नगर भागात बंदिस्त गटार व रस्ता काँक्रीट करणे.	१९९९१८८
३१	प्र क्र १ मध्ये वलवाडी भागात श्री चौधरी यांच्या घरापासून ते साईबाबा मंदीरा पावेतो बंदिस्त पाईप गटार करणे.	९०००००
३२	प्र क्र १ मध्ये राजाराम नगर भागात दत्तु पाटील यांच्या घरापासून ते श्री विसपुते यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२२०००००
३३	प्रभाग १८ मध्ये चक्करबर्डीरोड ते शेखर फोटो स्टुडीओ पर्यंत तसेच चक्करबर्डी रोड ते प्रभाकर वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	१८०००००
३४	प्रभाग क्रमांक १६ मध्ये श्री मगन पुंडलिक बागुल यांच्या घरापासून ते भिलाटी बेघरवस्ती पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व बंदिस्त गटार करणे.	२२०००००
३५	प्रभाग क्रमांक १६ मध्ये वसंत सखाराम सोनवणे यांच्या घरापासून ते श्री मोहन नथू कुवर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण व बंदिस्त गटार करणे.	२२०००००
३६	प्रभाग क्रमांक १५ मध्ये बाळप्पा कॉलनी भागात अथर्व अपार्टमेंट पासून ते बागुल यांच्या घरापर्यंत तसेच १०० फुटी रोड रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	६०००००
३७	प्र क्र १८ मध्ये भोलेबाबा नगर भागात मनोज वाघ यांच्या घरापासुन ते स्वनिल हिरे ते श्री सुडके ते श्री गुरव यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	३८०००००
३८	प्र. क्रं. १८ मोहाडी संजयभाऊ नगर भागात राजेंद्र बोरसे ते श्री चव्हाण सर घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे .	२२०००००
३९	नदीकिनारी सर्वे नं ६४ येथे पत्रा शेड (ओटा पायरीसह) बांधणे.	२०००००

४०	दैठणकर नगर भागात गोबाजी थोरात यांच्या घरापासुन ते अमृत सागर यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीट करणे.	२००००००
४१	सिद्धिविनायक रिक्षा स्टॉप पासून ते सैय्यद जाकीर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे तसेच गफ्फुर शेख यांच्या घरापासून ते मारीमाता मंदिरापर्यंत गटार करणे.	२००००००
४२	धुळे मनपा हद्दतील वलवाडी भागातील अंबाजीनगर बोर्ड ते बर्गीचक्कीपर्यत रस्ता डांबरीकरण करणे.	२४८५१६५

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५६ मा. महापौर सो. यांच्या पत्रानुसार सभागृह रचना निश्चितीबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. महापौर सभागृहात महासभा बैठकी प्रसंगी शिष्टाचाराप्रमाणे बैठक व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रथम रांगेत माजी महापौरांसाठी आसन व्यवस्था आरक्षित करण्यांस व त्याठिकाणी नामफलक ठेवणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९३ दिनांक २९/०६/२०२१

धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात विविध सभाचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी शिष्ठाचाराप्रमाणे सभागृहात बैठक व्यवस्था असणे अपेक्षित आहे.विद्यमान पदाधिकारी, माजी महापौर, ज्येष्ठ नगरसेवक, यांच्यासाठी आसन आरक्षित करून त्याप्रमाणे बैठक व्यवस्था व रचना होण्यासाठी मे.महासभेत विषय घेण्यात आलेला असता महासभेच्या बैठकी प्रसंगी सभागृहात शिष्ट्राचाराप्रमाणे प्रथम रांगेत माजी महापौर यांच्यासाठी आसन आरक्षित ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.त्याच प्रमाणे मनपाचे सन्मा. पदाधिकारी यांच्यासाठीही शिष्ट्राचाराप्रमाणे आासन व्यवस्था निश्चित करावी व सदर ठिकाणी नामफलक ठेवण्या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५७ मा. महापौर सो. यांच्या पत्रानुसार १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत असलेल्या शिल्लक उर्वरीत निधीतून संरक्षण भिंतीचे कामे निश्चिती तथा फेरबदल करणे व जमा होणा-या विकास शुल्क अंतर्गत पुढील कामे निश्चित करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.महापौर धुळे महानगरपालिकेमार्फत १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत संरक्षण भिंत बांधणेकामी यापुर्वी महासभा ठराव क्रमांक १३९ दिनांक ३०/१२/२०२० अन्वये ठराव पारीत झालेला असून त्यातील काही कामांचा निविदा प्रक्रिया झालेल्या आहेत. सदर १४ व्या वित्त आयोग योजनेत

याकामी निधी शिल्लक आहे. त्या शिल्लक असलेल्या उर्वरीत निधीतून कामे प्रस्तावित करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका ठराव क्रमांक १९४ दिनांक:-२९/०६/२०२१

धुळे महानगरपालिकेमार्फत १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत संरक्षण भिंत बांधणेकामी यापुर्वी महासभा ठराव क्रमांक १३९ दिनांक ३०/१२/२०२० अन्वये ठराव पारीत झालेला असून त्यातील काही कामांचा निविदा प्रक्रिया झालेल्या आहेत. सदर १४ व्या वित्त आयोग योजनेत याकामी निधी शिल्लक आहे. त्या शिल्लक असलेल्या उर्वरीत निधीतून खालील कामे प्रस्तावित करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच खालील कामे निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्य क्रमांकाने क्रमवारीने घेणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

अ.क्र.	कामांचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	प्रभाग क्रमांक 8 मध्ये मच्छि बाजार ते लिंबु नाल्यापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	७५,००,०००/-
2.	देवपूर गिता नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	९९,५५,२४८/-
3.	वरखेडी गावातील जुन्या दर्गाजवळ नाना चौधरी यांच्या घरापासून ते नदीपावेतो नाल्यावर दोन्ही बाजूस संरक्षण भिंत बांधणे.	७०,००,०००/-
4.	हागऱ्या नाल्याकिनारी संरक्षण भिंत बांधणे उर्वरित गुरूदत्त कॉलनीतील संरक्षण भिंत बांधणे.	१,२८,८४,२३१/-
5.	महानगरपालिका दवाखान्या मागील हागऱ्या नाल्यावर विश्वकर्मा भुवन मागे व कुंभार कुंट नाल्यावर पुल बांधणे.	३५,३७,४९६/-
6.	लक्ष्मीवाडी ते निसर्ग उपचार केंद्र पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	१,३३,८५,८५४/-
7.	प्र.क्र.१५ मध्ये विद्यावर्धीनी कॉलेजपासून ते मलेरिया ऑफिसपावेतो नाल्यास संरक्षण बांधणे.	८०,४२,०००/-
8.	मोगलाई मोती नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	१,००,००,०००/-
9.	पारोळा रोड पुलापासून ते हाग्रा नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	६९,५६,७६०/-
10	हरहर महादेव व्या.शाळा ते यश रेसीडेन्सीपावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	१,००,००,०००/-
11	प्रभाग क्रमांक २ मध्ये अजय नगर येथील पोपट माळी ते आग्रा रोड पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	४९,९१,०३२/-
12	प्र.क्र.२ व जीटीपी कॉलनीपासून ते भगवती सोसायटी पावेतो नाल्यास दोन्ही बाजूस आर.सी.सी.संरक्षण भिंत बांधणे.	१,५०,००,०००/-
13	प्र.क्र.२ मध्ये सदाशिव नगर ते स्वामी नारायण मंदिरापावेतो संरक्षण भिंत बांधणे.	६२,२५,८५८/-
14	प्र.क्र.५ मध्ये भरत नगर ते शाहू नगर येथे नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	१,५०,००,०००/-

15	देवपूर प्रभाग क्रमांक ४ मधील वाडीभोकर रोड उत्तर मुखी मारोती मंदिर ते अमीना पठाण यांच्या घरापावेतो असलेल्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	४२,६८,९७५/-
16	प्रभाग क्रमांक १६ चितोड खालचे गाव बेघर वस्ती येथे नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	५०,००,०००/-

याबाबत कामाची आवश्यकता व शासन निकष तपासून प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजूर
सही/-x x x
महापौर
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५८ मोहाडी उपनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसविणेच्या जागेवर असलेला जिर्ण दवाखाना निष्काशित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. राजेश पवार विषय मंजूर करावा.

म.देवेंद्र सोनार धुळे महानगरपालिकेच्या हद्दवाढी नंतर वरखेडी गावाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरचे गाव आमच्या सुभाष नगर जुने धुळे भागालगत असल्याने सदर गावाशी आमचे जिव्हाळाचे संबंध आहे. सदर गावाची लोकसंख्या सर्वात जास्त असून गावातील नागरीक व युवकांची गावातीला मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे बाबत सुरूवातीपासूनच मागणी होती. त्यामुळे आमच्या वरखेडी गावातही मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यासाठी मान्यता देण्यांत यावी

म.शितल नवले या विषयाच्या निमित्ताने विनंती की, आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा शाहू महाराज नाटयमंदिराच्या दर्शनी भागामध्ये उभारण्यासाठी ठराव पारीत करण्यांत यावा. पुतळयासाठी येणारा खर्च समितीच्या वतीने करण्यांत येईल याबाबत मी पत्र सादर करीत आहे.

म. देवेंद्र सोनार मा.शितल भाऊंनी अतिशय चांगला विषय मांडलेला आहे. छत्रपती शाहू महाराज नाटयमंदिर हे माझ्या प्रभागात आहे. सदरचे नाटयमंदिराचे सुचक माझे वडील महापौर चंद्रकांत सोनार हे होते.त्यांच्या विनंतीवरुन माजी आमदार श्री.बाबासाहेब राजवर्धन कदमबांडे यांनी शासनाकडून विशेष निधीतून नविन अत्यानुधिक नाटयमंदिर उभारलेले होते. तसेच सदर नाटय मंदिरास राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव देणेबाबतही सुचक म्हणून माझे वडील महापौर चंद्रकांत सोनार होते. त्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा शाहू महाराज नाटयमंदिराच्या दर्शनी भागामध्ये उभारण्यासाठी आजच्या बैठकीत ठराव पारित करण्यात यावा. त्यामुळे धुळे शहराच्या सौंदर्यात निश्चित वाढ होणार आहे.

म.सुनिल बैसाणे आमच्या फाशीपुल परिसरात मोठया प्रमाणावर मातंग समाजाची वस्ती आहे. त्याठिकाणी बऱ्याच वर्षापासून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा व्हावा म्हणून सदर समाजातील

नेते वारंवार मागणी करीतआहेत.त्या पुतळाबाबतही या महासभेत निर्णय होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या पश्चिम बाजूस गाळा क्रं. १ च्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मान्यता देण्यांत यावी.

म. अमोल मासुळे धुळे शहरातील फाशीपुल परिसरातील लेनीन चौकात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणेबाबत ब-याच दिवसापासूनची मागणी आहे. परंतु अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही. संबंधित भागात बहुजन मातंग समाजाचे मोठया प्रमाणावर वस्ती आहे. तरी महानगरपालिकेच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या पश्चिम बाजूस गाळा क्रं.१ च्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा.

म.महापौर सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर जीर्ण दवाखाना निष्कासित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच दवाखान्याच्या बाजूला असलेल्या अतिक्रमित इमारतीबाबत प्रशासनाने नियमानुसार उचित कार्यवाही करावी.

सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार व सादर झालेल्या पत्रानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाटयमंदिराच्या आवारात दर्शनी भागात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेस व राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समितीस मान्यता देण्यात येत आहे.

वरखेडी गावातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा मनपाच्या माध्यमातून उभारणेस व महानगरपालिकेच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या पश्चिम बाजूस गाळा क्रं. १ च्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत शासनाच्या अटी शर्तीनुसार उचित पूर्तता व कार्यवाही करण्यांत यावी.

धुळे महानगरपालिका ठराव नंबर १९५ दिनांक २९/०६/२०२१

सन्मा. सदस्य श्री. राजेश ईश्वर पवार यांच्या पत्रानुसार धुळे महानगरपालिका मोहाडी उपनगर येथे गट नंबर २ / २ येथे भटाई माता रिक्षा स्टॉप व सार्वजनिक दवाखाना शेजारी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वरूढ पुतळासाठीची आवश्यक त्या परवानगी घेतल्या असून सुमारे ४० वर्षापासून धुळे मनपाचा सार्वजनिक दवाखाना असून छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ पुतळा उभारणे कामी वरील सदर बिल्डींग अडथळा निर्माण होत आहे. तसेच त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजाचे पुतळा सुशोभिकरण देखील करण्यात येणार आहे. तरी धुळे मनपा यांचा जुना सार्वजनिक दवाखाना व त्याबाजूस असलेले बिल्डींग काढण्यात यावी असे संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

तरी धुळे मनपा जुना सार्वजनिक दवाखाना व त्याबाजूस असलेले बिल्डींगचे मोजमाप करून म.नगररचना विभागाकडे सदर टिपणी सादर केली असता सदर मोहाडी गट नं. २/२ मराठी शाळा , नपा , धुळे असे भोगवट धारकाचे नाव आहे. क्षेत्र १ हेक्टर ५२ आर एकूण क्षेत्र

आहे. ७/१२ उताऱ्यानुसार सदर जागा नपा,धुळे मराठी शाळा यांच्या मालकीची आहे असा अभिप्राय देण्यात आलेला आहे.

उक्त प्रमाणे दि.०६/०५/२०२१ रोजी मोहाडी गट नं. २/२ *भटाई* माता रिक्षा स्टॉपजवळ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा नगररचना विभागाने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे सदर जागेवर म.सभागृह नेते , नगररचनाकार श्री.प्रकाश सोनवणे यांच्या समवेत समक्ष पहाणी केली असता सदर जागेत यापूर्वी तत्कालीन न पा चा वेळेस मनपाचा दवाखाना होता तो जीर्ण झालेला असल्याने सदर दवाखाना म्हाडा घरकुल मध्ये सुरु करणेत आलेला आहे. सदर दवाखान्याच्या बाजूला मनपाचा जागेत २ मजली इमारत बांधलेली आहे.सदर इमारत मनपाने बांधलेली नाही. सदर दवाखान्याचे STRUCTURAL AUDIT -करणेत आले आहे.सदर अहवालानुसार दवाखाना जीर्ण, तडे पडलेले असल्या बाबत नमूद आहे. तरी सदरचा दवाखाना निष्काशित करणेसाठी मे.महासभेपुढे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर जीर्ण दवाखाना निष्कासित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच दवाखान्या बाजूला असलेल्या इमारतीबाबत प्रशासनाने नियमानुसार उचित कायदेशीर कार्यवाही करावी.

नगरसेवक देवेंद्र सोना यांचा मागणीनुसार वरखेडी गावात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा.त्या नुसार वरखेडी हे गाव हद्दवाढ गावापैकी सर्वात मोठे लोक संख्येचे गाव असल्याने सदर गावातील नागरीकांचा भावना लक्षात घेता सदर गावात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारल्यास गावाचा वैभवात तसेच सौदर्यांत मोठया प्रमाणात भर होणार असल्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महानगरपालिकेचा माध्यमातून करण्यात यावा येणारा सर्व खर्च महानगरपालिकेने करावा येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशायकीय मान्यता देण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.देवेंद्र सोनार व शितल नवले यांच्या मागणीनुसार व सादर झालेल्या पत्रानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाटयमंदिराच्या आवारात दर्शनी भागात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेस व खालीलप्रमाणे पुतळा समिती स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा समिती

नाव	पद
श्री.यशवर्धन राजवर्धन कदमबांडे	अध्यक्ष
श्री.अनुप ओमप्रकाश अग्रवाल	खजिनदार
श्री.देवेंद्र चंद्रकांत सोनार	कार्याध्यक्ष
श्री.हेमंत सुधाकर मदाने	सेक्रेटरी
श्री.शितल मोहनभाऊ नवले	स्थापत्य समिती
श्री.प्रकाश भास्करराव पाटील	स्थापत्य समिती
श्री.विनायक वालचंद शिंदे	उपाध्यक्ष

श्री.सुनिल शामराव महाले	उपाध्यक्ष
श्री. प्रदीप बाळासाहेब कर्पे	उपाध्यक्ष
श्री. हिरामण विठ्ठल गवळी	उपाध्यक्ष
श्री. भिकन मधुकर वराडे	उपाध्यक्ष
श्री.निंबा त्रयंबक मराठे	उपाध्यक्ष
श्री.अँङ गोपीसागर एम.धिवरे	उपाध्यक्ष
श्री.राजीव पंडीतराव सोनवणे	उपाध्यक्ष
श्री. संजय सुधाकर जाधव	सहसेक्रेंटरी
श्री.योगीराज शिवाजीराव मराठे	सहसेक्रेंटरी
श्री.हरिशचंद्र कौतिक लोंढे	सहसेक्रेंटरी
श्री.राजेंद्र विष्णू इंगळे	सहसेक्रेंटरी
श्री.संजय दगडूजी गायकवाड	सहसेक्रेंटरी
श्री.वाल्मिक अण्णा सुकदेवराव दामोदर	संचालक
श्री.मोहम्मद शव्वाल मो.अमीन अन्सारी	संचालक
श्री.शामकांत रघूनाथ सनेर	संचालक
श्री. किरण गुलाबराव पाटील	संचालक
श्री.युवराज किसनराव करनकाळ	संचालक
श्री. भुषण चंद्रकांत सोनार	संचालक
श्री. गणेश रामभाऊ मोरे	संचालक
श्री.अनिल महादू दामोदर	संचालक
श्री.मो.अहमद मो. यासीन सिध्दीकी	संचालक
श्री. भगवान गोविंदा मराठे	संचालक
श्री.साहेबराव नागो देसाई	संचालक
श्री.डॉ.संजय दगडू पाटील	संचालक
श्री. विलास प्रकाश मराठे	संचालक
श्री.अतूल दिनकर सोनवणे	संचालक
श्री.रत्नाकर धोंडू माळी	संचालक
श्री.राजाराम वालजी पाटील	संचालक
श्री. ईश्वर खंडू मराठे	संचालक
श्री.भुपेंद्र अशोकराव लहामगे	संचालक
श्री.संजय रामदास पाटील	संचालक
श्री. दिनेश संतोष पाटील	संचालक
श्री.अशोक रघूनाथ सुडके	संचालक
श्री.भटू रतन बागूल	संचालक
श्री.दिलीप जगन्नाथ शितोळे	संचालक

श्री. दगडू भिमराव बागुल	संचालक
श्री.संदीप सुरेश पाटोळे	संचालक
श्री.सचिन नानाभाऊ आखाडे	संचालक
श्री.विकास रामहरी बाबर	संचालक
श्री. कमलेश नारायण देवरे	संचालक
श्री. राहुल दामोदर गायकवाड	संचालक
श्री. विरेंद्र लक्ष्मण मोरे	संचालक
श्री. रजनिश अशोक निंबाळकर	संचालक
श्री. कुणाल संजय पवार	संचालक
श्री. जगदीश (आबा) भुजंगराव कदम	संचालक
श्री. अमोल हनुमंत भागवत	संचालक
श्री. रोहित भानुदास चांदोडे	संचालक
श्री. नबाब बेग मिर्झा	संचालक
श्री. संदीप दत्तात्रय महाले	संचालक
श्री. विनोद जगताप	संचालक
श्री.प्रदीप ताराचंद पानपाटील	संचालक
आ.श्री.अमरीशभाई पटेल	सल्लागार
आ.श्री.जयकुमारभाऊ रावल	सल्लागार
खा.डॉ. सुभाषबाबा भामरे	सल्लागार
आ.कुणाल रोहिदास पाटील	सल्लागार
श्री.चंद्रकांत मधूकर सोनार	सल्लागार
श्री.एम.जी. धिवरे	सल्लागार
श्री.राजवर्धन रघुजीराव कदमबांडे	सल्लागार
श्री.भगवान रामभाऊ करनकाळ	सल्लागार
श्री.किरण एकनाथ शिंदे	सल्लागार
ॲड कुंदन इंद्रदास पवार	कायदेशीर सल्लागार
ॲड राजेंद्र बन्सीलाल गुजर	कायदेशीर सल्लागार

महानगरपालिकेच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या पश्चिम बाजूसगाळा क्रं.१ च्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत साहित्य रत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत शासनाच्या अटी शर्तीनुसार उचित पूर्तता व कार्यवाही करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
महापौर,
धुळे महानगरपालिका,धुळे